E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.675

**AKSHARA**
**MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL**
**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**
**September, 2024 Special Issue 14 Volume II**

# Relevance of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj in 21st Century

## (राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची 21 व्या शतकातील प्रस्तुतता)



**लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज**

**Chief Editor**
**Dr. R. K. Shanediwan**
Principal,
Shri Shahji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

Akshara Multidisciplinary Research Journal September, 2024 Special Issue 14 Volume II

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

# One day Interdisciplinary National Seminar on Relevance of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj in 21st Century

## (राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची २१ व्या शतकातील प्रस्तुतता)

## Editorial Board
**(Special Issue)**

**❖ Chief Editor ❖**
**Dr. R. K. Shanediwan**
Principal,
Shri Shahji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

**❖ Executive Editor ❖**
**Dr. S. V. Shikhare**
Head, Department of History
Shri Shahji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

**Dr. R. D. Mandanikar**
Coordinator, IQAC and Head, Department of Political Science
Shri Shahji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

**Mr. S. D. Aparadh**
Assistant Professor, Department of History

**Dr. V. J. Dethe**
Assistant Professor, Department of Political Science

**Dr. S. D. Jadhav**
Assistant Professor, Department of History

*Akshara Publication*
Plot. 42 Akshara Publication Gokuldham Residency
Prerna Nagar Wanjola Road Bhusawal Dist.Jalgaon [M. S.] India 425201

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

*E- ISSN 2582-5429* / **SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II**

# *Editorial Board*

## -: Chief & Executive Editor:–

**Dr. Girish Shalik Koli**
Dongar Kathora
Tal.Yawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425301
Mobile No: 09421682612
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

## -:Co-Editors :–

- **Dr. Sirojiddin Nurmatov,** *Associate Professor, Tashkent Institute of Oriental Studies, Tashkent City, Republic Of Uzbekistan*
- **Dr.Vivek Mani Tripathi**, Assistant Professor, *Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China*
- **Dr.Maxim Demchenko** *Associate Professor Moscow State Linguistic University, Institute of International Relationships, Moscow,Russia*
- **Dr.Mohammed Abdraboo Ahmed Hasan,** *Assistance Professor (English) The Republic of Yemen University of Abyan General manager of Educational affairs in University of Abyan ,Yemen.*
- **Dr. Wajira Gunasena,** *Lecturer, Dept of Languages, Cultural studies & Performing Arts University of Sri Jayewardenepura, Nugegoda, Sri Lank*
- **Shiv Kumar Singh ,** *Lecturer, Indian Faculty of Arts and Humanities, University of Lisbon Portugal.*
- **Dr. Vijay Eknath Sonje,** *Assistant Professor* (Hindi) D. N. College, Faizpur [M. S.]
- **Mr. Nilesh Samadhan Guruchal,** *Assistant Professor* (English)Smt. P. K. Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India.
- **Dr. Shaikh Aafaq Anjum,** *Assistant Professor* (Urdu) Nutan Maratha College, Jalgaon. [M. S.] India.
- **Mr. Dipak Santosh Pawar,** *Assistant Professor* (Marathi)Dr. A.G.D. Bendale Mahila Mahavidyalya**,** Jalgaon [M. S.] India.

## PEER REVIEW POLICY

*AMRJ will send a copy of research work to the editorial board. The board will verify the same according to the rules of research methodology. Then plagiarism in the work will be checked. In case if the research methodology is not followed properly by the researcher, message will be given to the researcher and he/she will be asked to revise the work in a stipulated period.*

*After checking research methodology and plagiarism, the work will be sent to the Peer Review Committee.*

## SINGLE BLIND PEER REVIEW BY EXPERT PEER REVIEWERS

*AMRJ adopts the Single Blind Peer Review Method. After checking research methodology and plagiarism, the work will be sent to the Peer Review Committee for review through email. AMRJ do not disclose the details of researcher to Peer Review Committee. The Peer Review Table will be displayed online according to the criteria decided by the Editorial Board. After the approval by Peer Review Committee, the research work will be published in the Issue. In case if any instructions received from Peer Review Committee, the same will be forwarded to the researcher and he/she will be asked to clear the matter. Editorial Board of AMRJ will be the final authority to decide whether a research work is to be published or not.*

**AMRJ Disclaimer:**

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of Akshara's editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it. AMRJ is an online research journal. It is printed only for the conavenience of reading and archiving its online content.* ***(Applicable in Jalgaon jurisdiction)***

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

# *Message...*

19-09-2024

To,
Dr. R. K. Shanediwan,
Principal,
Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya,
Kolhapur.

It is with great pleasure that I learn about the upcoming National Seminar on "Relevance of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj in the 21st Century," jointly organized by the Department of History and Department of Political Science, Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur on 25th September 2024.

I am confident that this seminar will provide a valuable platform for scholars to delve into the multifaceted relevance of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj's vision and legacy in contemporary times. The publication of selected papers in a peer-reviewed and refereed journal is a commendable initiative.

I extend my best wishes for a successful seminar, and I am certain that the deliberations and discussions will greatly benefit the participants. The seminar's outcome will undoubtedly contribute to a deeper understanding of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj's enduring impact.

Wishing the National Seminar grand success!

(Shahu Chhatrapati)

Member of Parliament

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

# *Message...*

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
एम.एस्सी., पीएच्.डी.
कुलगुरू
**Prof. (Dr.) D. T. Shirke**
M.Sc.,Ph.D.
**Vice Chancellor**

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
**SHIVAJI UNIVERSITY,**
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी (कार्या.) : (०२३१) २६०९०६०
निवास : (०२३१) २६०९०५३
Tel. (Office) : (0231) 2609060
Resi. : (0231) 2609053
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

## MESSAGE

I am very happy to know that, **The Department of History and Department of Political Science, Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur** are jointly organizing a One-day National Seminar on **"Relevance of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj in the 21st Century."** on 25th September, 2024.

I am sure that various aspects of the relevance of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj in the 21st Century will be presented and discussed during this seminar. It is worth and appreciating that all the selected papers will be published in the peer reviewed and refereed journal. I am sure that the deliberations and discussions in the Seminar will be beneficial to the participants.

I wish the National Seminar a grand success.

13 SEP 2024

**Prof. (Dr.) D. T. Shirke**
**Vice Chancellor**




स्थापना : १९०१

**श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था**

२९६८, 'सी', दसरा चौक, कोल्हापूर-४१६ ००२.

☎ २६४२९२१, २६४०९२२. फॅक्स : (०२३१) २६४१९५४

Email : shahuchha@hotmail.com

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे — स्थापना : १९७१

**श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय**

२९६८, 'सी', दसरा चौक, कोल्हापूर-४१६ ००२. ☎ (०२३१) २६४४२०४

फॅक्स : २६४१९५४ ▪ Email : sscm34.cl@unishivaji.ac.in

Website : www.shahajicollege.ac.in

Affiliated to : Shivaji University, Kolhapur-416 004. Maharashtra





**Office Blog Address : : sscm34admin.blogspot.com** ▬ **Accredited by NAAC (3rd Cycle) with Grade 'A' (CGPA 3.13)**

चेअरमन
**श्री. मानसिंग विजयराव बोंद्रे**

ऑन. सेक्रेटरी
**श्रीमती संगीता विजयराव बोंद्रे**

▪ प्राचार्य :
**डॉ. आर. के. शानेदिवाण**
M.A., B.Ed., Ph.D., Net (Marathi), M.A. (Pol. Sci.), BJ, PGDGS, PGDT, CWE&GP

संदर्भ क्र. : एस् एस् सी एम्/

दिनांक :


## शुभसंदेश...

मला अत्यंत आनंद होत आहे की श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर, आय.क्यू.ए.सी. अंतर्गत आणि इतिहास व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २५ सप्टेंबर २०२४ रोजी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची २१ व्या शतकात प्रासंगिकता" या विषयावर आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन होत आहे. हे चर्चासत्र काळाच्या कसोटीवर उतरणाऱ्या शाहू महाराजांच्या विचारधारेच्या व्यापक आणि सखोल विवेचनासाठी एक मौल्यवान व्यासपीठ ठरणार आहे, असे माझे मत आहे.

राष्ट्रीय चर्चासत्रातून राजर्षी शाहू महाराजांच्या प्रगत, समताधिष्ठित आणि समाज कल्याणकारी दृष्टिकोनाचे समकालीन काळातल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात पुनर्मूल्यांकन होईल. त्यांच्या धोरणांचा आणि कार्याचा आजच्या परिस्थितीत कसा प्रभाव पडतो, त्यातून काय शिकावे, याचा सखोल अभ्यास होईल अशी माझी खात्री आहे.

विशेषतः या चर्चासत्रामधील शोधनिबंध नियतकालिकात प्रकाशित होत आहेत ही अत्यंत प्रशंसनीय बाब आहे. हा उपक्रम संशोधनाच्या दर्जाचे महत्त्व आणखी अधोरेखित करणारा आहे.

माझ्या मनापासून शुभेच्छा आहेत की, हे चर्चासत्र अतिशय यशस्वी होईल आणि सहभागी संशोधक व अभ्यासकांना शाहू महाराजांच्या विचारांचा दीर्घकालीन परिणाम आणि त्यांच्या दूरदर्शीतेचे व्यापक पैलू समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल.

राष्ट्रीय चर्चासत्र अत्यंत यशस्वी होवो ह्याच मन:पूर्वक सदिच्छा!

**मा. श्री. मानसिंग विजयराव बोंद्रे**
व्हाइस चिफ पेट्रन तथा चेअरमन,
श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, कोल्हापूर

# शुभसंदेश...

आमच्या श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयामध्ये दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महारज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्ताने राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्याच्या अनुषंगाने विविध मान्यवर, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांनी लिहिलेल्या संशोधनपर लेखांचे संकलन प्रसिद्ध होत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सुरू केलेल्या कोल्हापूरातील पहिल्या शिक्षण संस्थेचा घटक या नात्याने मला आज विशेष आनंद होत आहे. या निमित्ताने महाराजांनी समस्त कोल्हापूर वासियांवर केलेल्या अनंत उपकरांची काही अंशी परतफेड होईल अशी माझी व माझ्या सर्व सहकाऱ्यांची विनम्र भावना आहे.

राजर्षी शाहू महाराज यांनी १९ व्या शतकाच्या अखेरच्या दशकात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये महत्त्वाचे पुरोगामी निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. विशेषत: दलित, मागास, महिला, अस्पृश्य या संदर्भामध्ये त्यांनी घेतलेले निर्णय काळाच्या पुढे जाऊन दिशादिग्दर्शन करणारे ठरले. आज २१ व्या शतकामध्ये जगातील बहुतांश देश स्वतंत्र झाले असून त्या-त्या देशामध्ये लोकशाही व्यवस्था असल्यामुळे निर्णय घेत सुलभ बनले आहे. या पार्श्वभूमीवर १२५-१५० वर्षांपूर्वीचे समाजवास्तव नजरेसमोर ठेवून राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा पुनर्विचार करावयास हवा. येथे एक बाब लक्षात घ्यायला हवी की, भारताच्या संविधानाची निर्मिती होत असताना राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे प्रतिबिंब त्यामध्ये स्पष्टपणे उमटल्याचे दिसून येते. आजच्या तरूण पिढीसमोर या सर्व बाबी येणे ही काळाची गरज आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही माणूस व त्याची प्रतिष्ठा या दिशेने गंभीरपणे काम करायला हवे याची जाणीव होत आहे. अशावेळी राजर्षी शाहू महाराजांनी दाखवलेला कणखरपणा नव्या पिढीला समजून सांगायला हवा. आजचे तरूण संशोधक या सर्व बाबींकडे कशा पद्धतीने पाहतात व त्यांनी कशा पद्धतीने पहायला हवे याचेही दिग्दर्शन करायला हवे. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण, धर्म, कायदा, सामाजिक सुधारणा, स्त्री सबलीकरण या बरोबरच अस्पृश्यता निवारण, विवाह विधीतील संशोधन, आंतरजातीय विवाह, विधवांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी योजना, शेतीतील सुधारणा, नवे तंत्रज्ञान, पाण्याचे नियोजन अशा अनेक बाबी संशोधनाच्या स्तरावर नव्याने विचारात घ्याव्या लागतील. हा हेतू मनात ठेवून संशोधन लेख मागविण्यात आले व त्याला मिळालेला प्रतिसाद मनाला समाधान देणारा आहे.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने आमच्या संस्थेचे चिफ पेट्रन खासदार श्रीमंत शाहू महाराज, व्हाईस पेट्रन तथा चेअरमन मा. श्री. मानसिंगराव बोंद्रे यांनी बहुमोल सहकार्य केले. त्याचबरोबर या चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून ज्येष्ठ विचारवंत श्री. किशोर बेडकिहाळ यांची उपस्थिती लाभली. राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याच्या अनुषंगाने ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अवनीश पाटील यांची विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक या राज्यातून मान्यवर प्राध्यापक व संशोधकांची उपस्थिती लाभणार असून राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार व कार्याचा २१ व्या शतकाशी असणारा संबंध व त्यांची प्रस्तुतता समजून घेण्यास निश्चितच मदत होणार आहे.

या चर्चासत्राचे आयोजन आमच्या महाविद्यालयातील इतिहास व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने होत आहे. या विभागातील संबंधित सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, प्रशासकीय सहकारी या सर्वांचे या निमित्ताने मन:पूर्वक अभिनंदन!

**डॉ. आर. के. शानेदिवाण**
प्राचार्य, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

# संपादकीय...

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्ष निमित्ताने आमच्या श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र व इतिहास विभागाच्या वतीने ''२१ व्या शतकात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांची प्रस्तुतता'' या विषयावर एक दिवसीय अंतर विद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रात सहभागी प्राध्यापक संशोधक विद्यार्थी व इतर मान्यवरांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनकार्याबद्दल संशोधन पेपर लिहिलेले आहेत. संशोधन लेखाचे प्रकाशन करताना आम्हास विशेष आनंद होत आहे. शाहू महाराजांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, व्यापार, पर्यावरण, शेती विषयक, अस्पृश्यता निवारण, सामाजिक लोकशाही, सामाजिक न्याय, महिला सबलीकरण, शिक्षण, व्यवस्थापन इत्यादी विषयाच्या अनुषंगाने शोध निबंध आले आहेत .

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कार्यक्षेत्र सुरुवातीला कोल्हापूर संस्थाना नंतर महाराष्ट्र आणि त्याच्यापुढे संपूर्ण भारत असे झाले होते. असा हा मानवतावादी राजा सनातनी हिंदू धर्म आणि धर्माच्या पाठिंब्यावर उभी असणारी जाती संस्था मोडीत काढावी यासाठी सतत कार्यरत होता. हे सर्व करीत असताना त्यांनी आपल्या संस्थानात शेतीचे नवनवे प्रयोग करीत व्यापार व उद्योगाला विशेष प्रोत्साहन दिले.

राजर्षी शाहू महाराजांनी आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्राला पुरोगामीत्वाची दिशा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. समाजकारण, राजकारण, शिक्षण, उद्योग, सहकार, कृषी सिंचन, क्रीडा, संस्कृती अशा चौफेर क्षेत्रातील त्यांचे कार्य महाराष्ट्राच्या वाटचालीसाठी दीपस्तंभासारखे असून त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण राज्याच्या वाटचालीवर झालेला आहे.

छत्रपती शाहू महाराजांच्या वैविध्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या पैलू वरती प्रकाश टाकणारे शोधनिबंध अभ्यासकांनी लिहिले आहेत याचे स्वागत आपण कराल अशी अपेक्षा आहे.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने आमच्या संस्थेचे चिफ पेट्रन खासदार श्रीमंत शाहू महाराज, व्हाईस चिफ पेट्रन तथा चेअरमन मा. श्री. मानसिंगराव बोंद्रे यांनी बहुमोल सहकार्य केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि प्रशासकीय सहकारी हे सर्व घटक आणि या चर्चासत्राचे आयोजन करणारे इतिहास व राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक वृंद या सर्वांचे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

| | |
|---|---|
| **डॉ.एस. व्ही. शिखरे** | **डॉ. आर. डी. मांडणीकर** |
| संपादक | संपादक |
| इतिहास विभाग प्रमुख | समन्वयक, आय.क्यु.ए.सी. व राज्यशास्त्र विभाग प्रमुख |

E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

# Index


| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Pg.No. |
|---|---|---|---|
| 1 | राजर्षी शाहू महाराज: द्रष्टा राजा | डॉ. आर. के. शानेदिवाण | 13 |
| 2 | छत्रपती शाहू महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन आणि प्रासंगिकता | डॉ. सुरेश वसंत शिखरे | 19 |
| 3 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आदर्श जैवविविधता संरक्षण धोरण | डॉ. मधुकर विठोबा जाधव | 26 |
| 4 | राजर्षी शाहू छत्रपती यांचे दळणवळण विषयक विचार | डॉ. संतोष अभिमन्यू जेठीथोर | 31 |
| 5 | छत्रपती शाहू महाराजांचे मुस्लिम समाजासाठी शैक्षणिक धोरण: एक दृष्टीक्षेप | प्रा.सतीश यशवंत चौगुले | 40 |
| 6 | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य | प्रा. सूर्यवंशी नरेंद्र नरसिंग | 42 |
| 7 | वेदोक्त प्रकरणी भास्करराव जाधव व लोकमान्य टिळक यांच्या वैचारिक भूमिकेचा आढावा | डॉ. किशोर गुलाब गाढवे | 46 |
| 8 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य | डॉ. आर. डी. मांडणीकर | 51 |
| 9 | राजर्षी शाहू महाराजांचे आपत्ती व्यवस्थापन धोरण आणि कार्य | अभिषेक प्रविण चौगले | 56 |
| 10 | भारतीय राज्यघटना : छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराचे प्रतिबिंब | डॉ. विजय देठे | 60 |
| 11 | छत्रपती राजर्षी शाहू : फुले-आंबेडकर कार्याचा सेतू | डॉ. रचना माने | 65 |
| 12 | राजर्षि छत्रपति शाहू महाराज का शैक्षिक कार्य | डॉ .सरोज पाटील | 69 |
| 13 | राजर्षि छत्रपती शाहू महाराजांचे कृषीविषयक कार्य | प्रा. डॉ. डी. एल. काशिद पाटील | 72 |
| 14 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निर्मूलन: विचार आणि कार्य | डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव | 76 |
| 15 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचार आणि कार्याची प्रासंगिकता | डॉ. ए. बी. बलुगडे | 81 |
| 16 | कोल्हापूर संस्थानातील राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणांची प्रासंगिकता – एक अध्ययन | प्रा.डॉ. मेघा संजय पाटील | 83 |
| 17 | छत्रपती शाहू महाराज आणि स्त्री मुक्ती | प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे-पाटील | 88 |
| 18 | राजर्षी शाहूंचे स्त्रीशिक्षण विषय कार्य | प्रा. मनिषा पाटील | 91 |
| 19 | छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक व ओद्योगिक कार्याचा अभ्यास | प्रा. डॉ. सौ. एन. डी. काशिद पाटील | 95 |
| 20 | शाहू महाराजांचे मानव संसाधन विकास धोरण | विक्रम दीपक रेपे | 99 |
| 21 | राजर्षी छ. शाहू महाराज - एक कलाप्रेमी राजा | प्रा. श्री. सरदार निवृत्ती पाटील | 104 |
| 22 | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे जलसिंचन विषयक धोरण | प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | 106 |
| 23 | लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक योगदान | डॉ. संतोष शहापूरकर | 109 |
| 24 | राजर्षी शाहू महाराज यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन, हुकूम आणि कायदे | डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील | 111 |
| 25 | छत्रपती शाहू महाराज आणि आरक्षण | निवास गणपती पाटील | 114 |
| 26 | स्त्रीमुक्ती लढ्याचा राजा शाहू छत्रपती | इनामदार ऋषिकेश किरण | 118 |
| 27 | कोल्हापूरला 'कलापूर' बनविणारा राजा: 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज' | डॉ. शिवाजी दत्तात्रय जाधव | 120 |

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II


| | | | |
|---|---|---|---|
| 28 | समतावादी लोकराजा राजश्री शाहू महाराज | **डॉ. उर्मिला न. क्षीरसागर** | **124** |
| 29 | राजर्षी शाहू महाराज यांच्या समाज परिवर्तनवादी सुधारणांचा अभ्यास | **डॉ. अनिल शिवाजी टिके** | **128** |
| 30 | 21 व्या शतकातील छत्रपती शाहू महाराजांची प्रसंगिकता | **डॉ. खोपडे स्मिता जयेंद्र** | **131** |
| 31 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि सत्यशोधक समाज | **डॉ. पल्लवी अनिल कोडक** | **135** |
| 32 | राजर्षी शाहूमहाराज, डॉ. आंबेडकर आणि माणगाव परिषेद एक -ऐतिहासिक अभ्यास | **डॉ. मधुकर खंडू पवार** | **139** |
| 33 | छत्रपती शाहू महाराजांनी महिलां सन्मानासाठी केलेल्या कायद्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन | **डॉ. मनिषा शंकर यादव** | **143** |
| 34 | छत्रपती शाहू महाराजांचे कला व वाड्मय क्षेत्रातील योगदान | **डॉ. रेखा काशिनाथ पसाले** | **146** |
| 35 | छत्रपती शाहू महाराज आणि कृषी विकास | **प्रा. अरुण सदाशिव कटकोळे** | **150** |
| 36 | 21 व्या शतकातील छ. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची प्रस्तुतता | **प्रा. डॉ. राक्षसे सिद्धार्थ गुणाजी**<br>**प्रा. डॉ. बसवेश्वर भिमराव पांडागळे** | **154** |
| 37 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज व लोक कल्याणकारी राज्य- एक चिंतन | **प्रा. बैनवाड स्वाती प्रकाशराव** | **156** |
| 38 | राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कार्य | **प्रा.डॉ. जयकुमार चंदनशिवे** | **158** |
| 39 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कला, संस्कृती आणि क्रीडा क्षेत्रांतील योगदान | **प्रा. संदीप अशोक पाटील** | **160** |
| 40 | राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक कार्य | **बाळासो आण्णा सुतार** | **164** |
| 41 | राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्याचा थोडक्यात आढावा | **सौ. संगीता किरण लोखंडे** | **172** |
| 42 | छत्रपति शाहू महाराज,सहकार कृषी उद्योग प्रणेते | **डॉ. महादेव आ. शिंदे** | **174** |
| 43 | शाहू महाराजांचे लोक कल्याणकारी धोरण | **प्रा. (डॉ) राजू कलमेश सावंत** | **179** |
| 44 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी केलेले कायदे : एक अभ्यास | **प्रा.अरुणा खंडू सकटे** | **181** |
| 45 | छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यातील सामाजिक न्याय | **प्रा. डॉ. राजेंद्र नाडेकर** | **184** |
| 46 | शाहू महाराजांचे पर्यावरण रक्षण विषयक कार्य: शाहू कालीन शिवारण्य (पडसाळी - मुडागड ) | **प्रा. संजयकुमार मेणशी** | **187** |
| 47 | स्त्री मुक्तीचे दीपस्तंभ राजर्षी शाहू महाराज | **प्रा. डॉ. शोभा चाळके-म्हमाने** | **191** |
| 48 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक धोरणाचे पाईक-सुशिलकुमार शिंदे | **श्री. नारायण रामलाल उंबरे**<br>**प्रा. डॉ. रमेश नामदेव शेवाळे** | **194** |
| 49 | राजर्षी शाहू महाराजांची बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत भूमिका | **डॉ. मुल्ला जे. यु.** | **200** |
| 50 | राजर्षी छत्रपती शाहूजी महाराज यांच्या जीवन कार्यावरील साहित्य संपदा | **डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील** | **204** |
| 51 | छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान | **श्रीमती उर्मिला राजेंद्र कदम** | **208** |
| 52 | राजश्री शाहू महाराज: सामाजिक सुधारांद्वारे वंचित समुदायांचे उन्नती करणारे थोर समासुधारक | **आशिष बाबासाहेब घाटगे** | **211** |

| | | | |
|---|---|---|---|
| 53 | अनुसूचित समाजाच्या उद्धारामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान | **कु. उषादेवी ईश्वरा चौधरी** | **214** |
| 54 | संविधानापूर्व भारतातील शाहू महाराजांचे न्याय आणि समानतेचे विचार | **चौरे संदीप वसंत** | **217** |
| 55 | छत्रपती शाहू महाराज आणि सामाजिक चळवळी | **डॉ.ज्योती रमेश कांबळे** | **219** |
| 56 | शाहू महाराजांचे स्त्रियांच्या हक्काबाबत विचार | **डॉ. दीपक रा. पाटील** | **222** |
| 57 | राजर्षी शाहूंच्या अक्षर नि अक्षय धनाचे समृद्ध दालन : कोल्हापूरातील राजर्षी शाहू अध्यासन केंद्र | **डॉ. नीता पांडुरंग पाटील** | **225** |
| 58 | छत्रपती शाहूजी महाराज और साटमारी खेल | **डॉ. प्रशांत बिभीषण पाटील** | **227** |
| 59 | 'शाहूपुरी' वसाहती विषयक छत्रपती शाहू महाराजांचा व्यापारी दृष्टीकोन | **डॉ. बाळासाहेब आमगोंडा कोटलगी** | **230** |
| 60 | छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कोल्हापूर येथे शाळा - वसतिगृहे सुरू न करण्यामागची भूमिका | **डॉ. श्रीधर भाऊसाहेब शिंदे** | **234** |
| 61 | आपत्ती व्यवस्थापनाचा मानदंड : राजर्षी शाहू महाराज | **प्रा. एम. आय, मुजावर** | **238** |
| 62 | राजर्षी शाहूंचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य | **प्रा. डॉ. के. आर. गावडे** | **240** |
| 63 | स्त्री उद्धारकर्ते:राजर्षी छत्रपती शाहू महाराज | **प्रा. डॉ. सौ. सुनिता एस. राठोड** | **243** |
| 64 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि ब्राह्मणेत्तर चळवळ | **प्रा. संदिप भैरू जाधव** | **247** |
| 65 | राजर्षी शाहू महाराज यांच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास | **प्रा. सुभाष बाजीराव शिंदे** | **249** |
| 66 | छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक परिवर्तनाची माणगाव परिषद | **प्रा. तेजस धनपाल गवळी** | **253** |
| 67 | शाहू कालीन संगीत परंपरा : १८९५ ते १९२२ | **प्रियांका राजाराम पाटील** | **256** |
| 68 | लोकराजा राजर्षी शाहू महाराज: सामाजिक लोकशाहीचा स्तंभ | **श्री. रवींद्र ज. भोसले** | **260** |
| 69 | राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरसंस्थानामध्ये राबविलेल्या शेती विकास विषयक धोरणांचा चिकित्सक अभ्यास | **श्री. अर्जुन राजाराम कांबळे**<br>**श्री. शुभम तानाजी पाटील** | **261** |
| 70 | छत्रपती शाहू महाराज आणि स्त्री मुक्ती: २१ व्या शतकातील प्रासंगिकता | **श्री. सोमनाथ विजया ज्ञानदेव रसाळ** | **265** |
| 71 | राजर्षी शाहू महाराजाचे विचार व आचाराचे वारसदार : छत्रपती राजाराम महाराज | **डॉ. डी. पी.गावडे** | **267** |
| 72 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कोल्हापूर संस्थानाच्या कृषी विकासातील योगदान | **डॉ. सौ. अरुंधती दिपक पाटील** | **272** |
| 73 | राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांचे कार्य | **डॉ.अर्जुन ग.येरगे**<br>**प्रा.रुपेश रमेश जाधव** | **274** |
| 74 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज: पुरोगामी राजकीय सुधारणांचे प्रणेते | **प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश** | **276** |
| 75 | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे वसतिगृहाच्या चळवळीतील योगदान: एक समाजशास्त्रीय अभ्यास | **प्रा. डॉ. विशाल वसंत कुरणे** | **279** |
| 76 | राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याची उपयुक्तता | **प्रा. डॉ. सुरेश मारुती चव्हाण** | **281** |
| 77 | छत्रपती शाहू महाराज: ब्राह्मणेत्तर स्त्रीसुधारणावाद परिप्रेक्ष | **प्रियांका शशिकांत रणवरे** | **285** |

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II


| | | | |
|---|---|---|---|
| 78 | बेळगाव मधील ब्राम्हणेतर चळवळीचे आश्रयदाते बॅरिस्टर भुजंगराव केशवराव दळवी | **श्री इराप्पा विष्णू मोरे** | **290** |
| 79 | छत्रपती शाहू महाराज आणि सामजिक न्याय | **ज्योती प्रकाश बनसोडे** | **293** |
| 80 | एक अभ्युदय राजा : राजर्षि छत्रपति शाहू महाराजा | **डॉ. अक्षय राजेन्द्र भोसले** | **296** |
| 81 | राजर्षी शाहू महाराज यांचे कृषीविषयक धोरण | **डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार** | **300** |
| 82 | वसतिगृह चळवळीचे प्रणेते: राजर्षी छत्रपती शाहू महाराज | **प्रा. गौरव काटकर /प्रा. ऐश्वर्या हिंगमिरे प्रा. प्रतिमा शिंदे** | **303** |
| 83 | राजर्षि शाहू महाराज का सामाजिक योगदान | **प्रा. डॉ. सारिका राजाराम कांबळे** | **306** |
| 84 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज व कृषी क्षेत्रातील परिवर्तनीय कार्य | **प्रा. सागर हरी चरापले** | **309** |
| 85 | कलासक्त राजर्षी शाहू महाराज | **श्री.पंढरीनाथ पाटील** | **311** |
| 86 | छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक व अस्पृश्योद्धाराचे कार्य | **सौ.अस्मिता महेंद्र इनामदार** | **313** |
| 87 | पश्चिम महाराष्ट्राच्या शेती विकासामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जलधोरण | **डॉ. संजय सागरू सपकाळ** | **316** |
| 88 | An Agri-Economic legacy of Chhatrapati Shahu Maharaj to the Sustainable development in Maharashtra and its present relevance | **Dr. S. R. Kattimani** | **319** |
| 89 | Rajarshi Chhatrapati Shahu: An Educational Reformer | **Dr. Santosh Barale** | **321** |
| 90 | Relevance of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj's Economic Vision in the 21st Century: A Critical Analysis | **Prof. Rohini G. Deshpande** | **326** |
| 91 | Impact Of Chhatrapati Shahu Maharaj’s Ideology For The Welfare Of St Community: An Empirical Study Of Vaurla And Ambaulim Villages In Quepem Sub- Division Of Goa | **Sachin Chandrakant Gaonkar Prabir Kumar Rath** | **332** |
| 92 | Chhatrapati in Vedokta | **Dr. Shubhangee B. Bhosale** | **337** |
| 93 | Chhatrapati Shahu Maharaj: Review Of The Welfare Policies | **Ms. Sharvari B. Katkar** | **346** |
| 94 | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj: The Modern Social Reformer | **Dr. K. M. Desai** | **350** |
| 95 | Social Justice Role Of Chhatrapati Shahu Maharaj: A Creative Step Towards Progressive Maharashtra - A Study | **Dr. Sunil Madhukar Neve** | **354** |
| 96 | Shahu Maharaj's Contribution to Industrial & Trade Development: A Step toward Economic Modernization. | **Dr. Mrs. Chandrabhaga K. Patil** | **359** |
| 97 | Rajarshi Shahu Maharaj: Pioneer of Women's Empowerment | **Dr. Sarika Vishwas More** | **365** |
| 98 | RajarshiShahu Maharaj and the Emancipation of Women: A Study of Gender Equality | **Dr. Surekha Gurupad Mandi** | **369** |
| 99 | Chhatrapati Shahu Maharaj: Contribution in Social and Educational life | **Miss. Bhatkar Madhuri S.** | **372** |
| 100 | Relationship between Chhatrpati Shahu Maharaj and Dr. Babasaheb Ambedkar | **Mrs. Madane Priyanka S.** | **375** |

| | | | |
|---|---|---|---|
| 101 | The Economic Vision of Rajarshi Shahu Maharaj: Pioneering Trade and Commerce Development in Kolhapur | **Mr. Santosh H. Kamble** | **377** |
| 102 | One Man Army: Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj in 21 St Century | **Dr. Anil Khatal Jambhale**<br>**Dr. Padmshri K. Waghmare** | **382** |
| 103 | Impact Of Chhatrapati Shahu Maharaj's Principles Of Social Transformation In Goa: A Case Study Of Dhangar Community In Sawardhat, Amthane Village Of Bicholim Taluka-Goa | **Hritik Naik,**<br>**Datta Parab**<br>**Sachin Gaonkar** | **387** |
| 104 | Rajashree Shahu Maharaj Innovative Water Management Practices And A Historical Study of Sustainable Development in Kolhapur District | **Mrs.UjwalaAtmaram Patil** | **390** |
| 105 | Contribution of Chhatrapati Shahu Maharaj in Women Empowerment | **Mrs. Sayali Sandeep Patil** | **394** |

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

01

# राजर्षी शाहू महाराज: द्रष्टा राजा

**डॉ. आर. के. शानेदिवाण**
प्राचार्य,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

व्यवस्था कोणतीही असो, त्या व्यवस्थेला दिशा देणारे नेतृत्त्व खंबीर असावे लागते. विशेषत: वैचारिक नेतृत्त्व या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. 19 व्या शतकचा उत्तरार्ध नजरेसमोर आणला तर एक बाब प्रकर्षाने लक्षात येते की, हा काळ ब्रिटीश राजसत्तेचा ऐन भरातील काळ होता. संपूर्ण देशावर त्यांची मजबूत पकड होती. त्या काळातील भारतीय समाजावर जात, धर्म, वर्ण या बाबींचा प्रभाव होता. अंधश्रद्धेने तर थैमान घातले होते. एकाअर्थी दैववादाचा प्रचंड पगडा असणारा समाज विज्ञानापासून खूप दूर होता. समाज शिक्षणापासून वंचित होता. स्त्रियांचा होणारा मानसिक, शारीरिक छळ कल्पनेपलीकडील होता. दलित, अस्पृश्य समाजाचे जगण्याचेच अधिकार काढून घेतल्यासारखी परिस्थिती होती. काही मूठभर लोक संपूर्ण समाजव्यवस्थेचे नियमन करीत आहेत असे चित्र होते. हा काळ महाराष्ट्राच्या पातळीवर वैचारिक घुसळणीचा होता. अशा काळात राजर्षी शाहू महाराजांचा जन्म झाला.

कोल्हापूर शहराची ओळख सांगताना 'शाहूंची नगरी' असा उल्लेख होतो. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये समतेचा संदेश आपल्या कृतीतून देणारा राजा म्हणून राजर्षी शाहू महाराजांना ओळखण्यात येते. ब्रिटीश काळात हिंदूस्थानामध्ये अनेक संस्थानिक होते. या संस्थानिकांनी आपल्या मर्जीनुसार राज्यकारभार केला. त्यांनी प्रजेच्या हितापेक्षा आपल्या दैनंदिन जगण्यामध्ये विलासी वृत्तीचा अंगिकार केला होता. ब्रिटीशांच्या मेहरबानीवर त्यांचे राज्य सुरू होते. स्वाभाविकपणे या संस्थानिकांनी कोणताही नवा विचार मांडला नाही. पुरोगामी विचार व कृती मांडण्याचा तर प्रश्नच नव्हता. अशा काळात राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या विचार, कृती आणि स्वतंत्र प्रतिभेने कोल्हापूर संस्थानामध्ये विचारांची आमुलाग्र क्रांती केली. राजा कसा असावा याचे आदर्श उदाहरण म्हणून राजर्षी शाहू महाराजांकडे पाहण्यात येते.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक सुधारणांच्या अंगाने विचार आणि कृती होऊ लागली. यामध्ये अन्य विचारवंतासह महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे योगदान खूप मोठे आहे. त्यांनी स्त्री शिक्षणासह अनाथ, विधवा यांच्यासाठी विविध उपक्रम सुरू केले. समाजामध्ये अस्पृश्य म्हणून ज्यांची संभावना होत होती, त्यांना सन्मानाची वागणूक मिळायला हवी यासाठी प्रयत्न सुरू केले. समाजाची अशी सेवा करणे दीड-दोनशे वर्षांपूर्वी खूप जोखमीचे काम होते. एका अर्थी धर्मसत्तेला अंगावर घेण्याचाच प्रकार होता. फुले दाम्पत्यासह अन्य सुधारकांनी आपली भूमिका न सोडता समाजासाठीचे योगदान दिले. 19 व्या शतकाच्या अखेरच्या दशकापर्यंत फुले दाम्पत्याचा विचार व कृतीला पाठबळ मिळत राहिले. सरकार दरबारीही याची दखल घेतली जाऊ लागली. साधारणपणे हा काळ राजर्षी शाहू महाराजांच्या जडणघडणीचा काळ होता. महात्मा फुले प्रभूतींचा प्रभाव त्यांच्या मनावर होत होता. एका कर्त्या सुधारकाची घडण होत होती.

2 एप्रिल 1894 साली शाहू महाराजांनी राजसूत्रे हातात घेतली. राजसूत्रे हाती घेतानाच्या काळातील एक नोंद आहे. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या नेतृत्त्वाखाली 'सार्वजनिक सभे'चे एक शिष्टमंडळ या समारंभास उपस्थित होते. त्यावेळी शाहू महाराजांना सार्वजनिक सभेतर्फे मानपत्र देण्यात आले. या मानपत्रामध्ये, "तुम्ही छत्रपती घराण्यात जन्माला आलेला आहात. छत्रपतींच्याकडे महाराष्ट्राचे नेतृत्त्व नैसर्गिक असते. तुम्ही कोल्हापूर संस्थानचे अधिपती असल्यामुळे कोल्हापूरच्या जनतेची काळजी घेणे हे तुमचे परमकर्तव्य आहेच पण त्याचबरोबर सर्वसामान्यपणे महाराष्ट्राच्या जनतेची काळजी घेणे हे देखील छत्रपती या नात्याने आपले कर्तव्य आहे" असा आशय होता. (यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला, कराड, 1980, पृ. 42) राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी लोकमान्य टिळक यांनी केसरीचा अग्रलेख 'करवीर क्षेत्री कपिलाषष्ठीचा योग' या मथळ्यासह लिहून शाहू महाराजांबद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. नामदार गोखले, लोकमान्य टिळक यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांची पूर्ती राजर्षी शाहू राजांनी आपल्या हयातीत करण्याचा निश्चयपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**'वेठबिगार' पद्धती बंद केली :**

राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडताना विसाव्या शतकातील भारतीय व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर हा आलेख मांडणे महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्यापूर्वी 25-30 वर्षे व स्वातंत्र्योत्तर 75 वर्षे हा कालखंड लक्षात घेऊन काही निर्णयाच्या

संदर्भात संशोधनात्मक स्तरावर मांडणी केली तर राजर्षी शाहू महाराजांचे मोठेपण लक्षात येते. यास संदर्भात पुढील काही निर्णय व त्याची अंमलबजावणी याचा विचार करता येईल.

शाहू महाराजांनी वयाच्या 20 व्या वर्षी राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. तो पर्यंत आपल्या राज्यामध्ये प्रचलित असणाऱ्या प्रथा, परंपरांचा त्यांना अभ्यास केला असावा असे वाटते. याचे कारण, वयाच्या 20 व्या वर्षी त्यांनी 'वेठबिगार पद्धती' बंद केल्याचे जाहीर केले. एवढ्या लहान वयात असा प्रगल्भ विचार व निर्णय महाराजांनी घेतला. याचा अर्थ शाहू महाराजांची नाळ जनतेशी जोडलेली होती. 'राजे' असले तरी समाजातील सर्व घटकांशी त्यांचा संपर्क होता. त्यांच्या जगण्याशी, राहणीमानाशी त्यांचा जवळून परिचय होता. त्यामुळेच बलवान व्यक्ती किंवा समाजाकडून दुर्बलावर होणारा अन्याय त्यांना अस्वस्थ करीत असावा व त्यातूनच त्यांनी माणसाचे माणूसपण हिरावून घेणारी वेठबिगार पद्धती बंद केली. ब्रिटिश राजवटीत अनेक संस्थानिक होते, राजे पण होते पण असा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणारा पहिला राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज होत. वेठबिगारी बंद केल्याचे साल 1894. म्हणजे भारत स्वतंत्र होण्यापूर्वी 53 वर्षे अगोदर शाहूराजांनी असा निर्णय घेतला. स्वतंत्र भारतात असा निर्णय घेण्यासाठी किती कालावधी लागला हे समजून घेतल्यानंतर शाहूराजांच्या द्रष्टेपणाची ओळख होते. 1947 साली भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. विज्ञानप्रेमी पंतप्रधान पंडीत नेहरूंनी सलग 16 वर्षे भारताचे नेतृत्त्व केले. त्यानंतर पुढील काळात लाल बहादूर शास्त्री व इंदिरा गांधी यांनीही या देशाची धूरा वाहिली. पण 1976 पर्यंत 'वेठबिगार' संबंधी कोणताही निर्णय झाला नाही. 1947 ते 1976 म्हणजे स्वातंत्र्यानंतर 28 वर्षे या महत्त्वाच्या बाबींकडे सरकारचे लक्ष नव्हते. जानेवारी 1976 मध्ये इंदिरा गांधी यांनी वेठबिगारी पद्धती बंद करण्याचा निर्णय घेतला. शाहूराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यावर पहिल्याच वर्षी निर्णय घेतला तर भारत सरकारला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास 29 वर्षे लागली. लोकनियुक्त सरकारकडून अशा निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी अशी अपेक्षा असते. कारण तळागाळातले लोक येथे प्रतिनिधीत्व करीत असतात. पण असे घडले नाही, पण 'राजा'ने प्रजेचा विचार केल्याचे दिसून येते.

**राखीव जागांचा निर्णय :**

राजर्षी शाहूराजांनी राजसूत्रे आपल्या हाती घेतल्यावर त्यांनी संस्थानातील नोकरदारांची माहिती घेतली. त्यांना आढळून आले की, सरकारी नोकरीमध्ये ब्राह्मण समाजाचेच लोक अधिक प्रमाणात आहेत. हे प्रमाण एकूण नोकरीच्या 97% इतके होते. ब्राह्मण जातीची लोकसंख्या 3% असतानाही नोकरीत एवढे जास्त प्रतिनिधित्व कसे याचा अभ्यास महाराजांनी केला. शिक्षण हाच यावरील पर्याय असल्याचे त्यांनी जाणले. हजारो वर्षांपासून भारतीय समाजामध्ये शिक्षण किंवा विद्या घेण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण समाजाला होता. या काळात संस्कृतचे प्राबल्य होते. ब्रिटीश सत्ता भारतात स्थापित झाल्यावर ब्राह्मण समाजाने काळाची पाऊले ओळखून इंग्रजी शिक्षण आपलेसे केले. स्वाभाविकपणे इंग्रजांना लागणारा कर्मचारी वर्ग ब्राह्मण समाजातून उपलब्ध झाला. संस्थानामध्येही फारशी वेगळी परिस्थिती नव्हती.

तत्कालीन समाजातील साक्षरतेचे प्रमाण नजरेसमोर ठेवले तर एक बाब प्रकर्षाने जाणवते की, ब्राह्मण समाजातील साक्षरतेचे प्रमाण 85% हून अधिक होते. तर इतर जातीतील साक्षरतेचे प्रमाण केवळ 1% इतकेच होते. या 1% जनतेतील लोकही ब्राह्मणांच्या वर्चस्वामुळे नोकरीत स्थिरावू शकत नव्हती. याचा अर्थ मागासलेल्या समाजाला अतिरिक्त सवलत दिल्याशिवाय त्यांचा विकास होणार नव्हता. या संदर्भातील महाराजांचे द्रष्टेपण समजून घ्यायला हवे. त्यांनी संस्थानातील मुलांना शिक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यांच्यासाठी वसतिगृहे सुरू केली. पण नोकऱ्या कशा देणार? महाराज या संदर्भाने विचार करीत असतानाच्या काळात म्हणजे 1902 साली इंग्लंडमध्ये एडवर्ड बादशहाच्या राज्याभिषेक समारंभाला गेले होते. त्यांनी तेथील व्यवस्थेचा अभ्यास केला. तेथे वास्तव्यास असतानाच त्यांनी आपल्या संस्थानात 50% जागा राखीव राहतील असे जाहीर केले. हा निर्णय दूरगामी स्वरूपाचा होता. नोकरीतील प्रतिनिधित्वाचा मार्ग सर्वसामान्य लोकांसाठी खुला झाला. सव्वाशे वर्षांपूर्वी असा निर्णय घेणारा पहिला संस्थानिक राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज होत. यामुळे विचारांसोबत कृतीने आदर्श निर्माण करणारा राजा म्हणून शाहूराजांचे नाव इतिहासात अमर झाले. ज्या काळात हा निर्णय झाला त्या काळी हिंदूस्थानात सहाशेहून अधिक संस्थानिक होते. ब्रिटीशांचे मांडलिकत्व त्यांनी पत्करल्यासारखी परिस्थिती होती. जनतेच्या कल्याणापेक्षा आपला ऐशोआराम त्यांना विशेष प्रिय होता. पण शाहूराजांनी राजा आणि राजदंड यांना शोभेसे निर्णय घेतले. राजदंड ही शाभेची वस्तू नसून त्याच्या साक्षीने सर्वसामान्य प्रजेचे कल्याण करण्याचा विचार अभिप्रेत असतो. त्यामुळेच राजर्षी शाहूराजे राजवाड्यापेक्षा गोरगरिबांच्या वाड्या, वस्त्यावर अधिक रमले. त्यांच्या सुखदु:खाशी समरस झाले. राजवाड्यावरील मिष्टान्नापेक्षा त्यांनी वाड्यावस्त्यावरील गोरगरिबांच्या झोपड्यातील मीठ-भाकर खाण्यात समाधान मानले. असा राजा हिंदूस्थानच्या इतिहासात विरला होता. सर्वसामान्य माणसांशी प्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळे राजर्षी शाहूराजांना

प्रजेची नाडी समजली होती व त्यातूनच 'राखीव' जागांचा निर्णय घेण्यात आला. 1902 च्या वटहुकुमामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये बहुजन समाजासह मागासलेल्या समाजांना मोठ्या प्रमाणात संधी मिळू लागली. एकाअर्थी 'प्रजेचा राजा' ही बिरूदावली सार्थ ठरली.

राजर्षी शाहू महाराजांनी राखीव जागांचा निर्णय घेतला. समाजातील दुर्बल घटकांना अन्य सबल समाज घटकांशी जोडून घेण्याचा हा प्रयत्न होता. हा निर्णय म्हणजे दुर्बल घटकांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठीचा प्रयत्न होता. याचे चांगले परिणाम त्या काळात दिसून आले. सर्वसाधारणपणे 20 व्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्रिटीशांकडे अशाच पद्धतीने राखीव जागांची मागणी केल्याचे लक्षात येते. दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावा, त्यांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतली. या संदर्भात महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये मतभेदही झाले. असे असले तरी डॉ. आंबेडकरांचा विचार त्याकाळात काही प्रमाणात का असेना मान्य करण्यात आला. मला असे वाटते की, डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या मागे राजर्षी शाहू महाराजांनी घेतलेल्या निर्णयांचा भक्कम आधार होता. हीच परिस्थिती स्वातंत्र्योत्तर काळातही दिसून येते. डॉ. आंबेडकरांनी दलित सदृश समाज घटकांना सवलती देण्याचा निर्णय घटनेच्या माध्यमातून घेतला. त्यामागेही राजर्षी शाहूंचाच विचार होता. हजारो वर्षे विशिष्ट जात व वर्णव्यवस्थेमुळे दबलेला, पिचलेला समाजवर्ग व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणायचा असेल तर त्यांना सर्व बाबतीत सवलती व आरक्षण द्यायला हवे हीच भूमिका त्यामागे होती. महाराष्ट्राच्या स्तरावर मंडल आयोगाची स्थापना व अंमलबजावणी यामागेही दुर्बलांना आधार देण्याचीच भूमिका आहे. 1902 साली घेतलेला निर्णय आजही राज्यकर्त्यांना दिशादर्शक ठरतो आहे. राजा आणि प्रजा यांच्यातील नाते सौहार्द आणि प्रेमाचे असावे. राजाने प्रजेची काळजी वाहावी आणि त्यासाठी समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला नजरेसमोर ठेवून निर्णय घ्यावेत अशी अपेक्षा असते. राजर्षी शाहूंनी असे निर्णय घेतले आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय व्यवस्थेनही त्याचे अनुकरण केले हेच शाहू महाराजांचे द्रष्टेपण होय.

**विवाह विषयक कायदा:**

राजर्षी शाहूराजांनी रयतेशी पालकत्वाचे नाते निर्माण केले होते. आपल्या संस्थानातील प्रत्येक व्यक्ती, कुटुंब आपले कुटुंब आहे हीच त्यांची भावना होती. त्यामुळे व्यक्तीजीवनाशी निगडीत अनेक बाबींसंदर्भात त्यांनी निर्णय घेतले. यामध्ये विवाहसंदर्भातील घेतलेले निर्णय व सुधारणा ऐतिहासिक होत्या.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीश सत्तेबरोबर ब्राह्मण वर्चस्वाने अक्षरश: कळस गाठलेला होता. अनेक प्रथा, परंपरा, रूढी, अंधविश्वासाने समाज त्रस्त होता. यातील विवाह संस्था तर अमानुष प्रथेने ग्रासलेली होती. विशेषत: मुलींच्या संदर्भात याचे गंभीर परिणशम दिसून येत होते. तत्कालीन समाजरितीचा अभ्यास केला तर लक्षात येते की, सामान्यपणे मुलीचा विवाह तिच्या वयाच्या 8 किंवा 9 व्या वर्षी व्हायचा. 10 वर्षांवरील मुली 'घोडनवरी' म्हटले जायचे. मुलाच्या वयाला फारसे बंधन नव्हते. या प्रथेसंदर्भात काही सुधारकांनआवाज उठविला होता. यामध्ये राजाराम मोहनरॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, जोतिबा फुले यांचा समावेश होता. अशा काळात 19 व्या शतकाच्या अखेरच्या दशकात राजर्षी शाहू महाराजांचा विवाह झाला होता. त्यावेळी त्यांचे वय पंधरा तर महाराणींचे वय 12 वर्षे सुद्धा नव्हते. याचा अर्थ शाहूराजांचा विवाह हाही बालविवाहच होता. पण तत्कालीन परिस्थितीत राजघराण्याचा निर्णय स्वीकारून त्यांनी विवाह केला. अर्थात पुढील काळात त्यांनी घेतलेल्या निर्णयांच्या आधारे असे म्हणता येते की, एवढ्या लहान वयात झालेल्या लग्नाला त्यांची संमती नसावी. पण त्यांनी निर्णय स्वीकारला. पण जेव्हा राज्याची सूत्रे त्यांनी आपल्या हाती घेतली त्यावेळी मात्रा विवाह कायद्यामध्ये अमुलाग्र सुधारणा केल्या.

राज्यकारभार करीत असताना जनभावना समजून घ्याव्या लागतात. कोणताही निर्णय विशेषत: प्रथा, परंपरा, रूढी या संदर्भातील घेताना लोकभावना कधी दुखातील सांगता येत नाहीत. शाहू महाराजांना 'विवाह' कायद्यामध्ये सुधारणा करावयाची होती. त्यासाठी त्यांनी स्वत:च्या घरापासून सुरूवात केली. भलेही त्यांच्या पत्नीचे वय लग्नावेळी 12 वर्षाहून कमी होते पण शाहूराजांनी आपल्या मुलीच्या लग्नावेळी मात्र कोणताही दबाव न घेता लग्न चौदा वर्षे पूर्ण झाल्यानंतरच केले. याचा अर्थ त्यांना समाजामध्ये बदल करायचा होता. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करण्यास सुरूवात केली, पण ही सुरूवात स्वत:पासून केली हे ध्यानात घ्यावयास हवे.

शाहू महाराजांनी खूप विचारांती 8 सप्टेंबर 1906 रोजी एक हुकुम आपल्या संस्थानात जारी केला. (करवीर सरकारचे गॅझेट, भाग-1, ता. 8 सप्टे. 1906) यानुसार नवऱ्या मुलाने माझे वयास अठरा वर्षे पूर्ण झाली आहे व नवरी मुलीने माझे वयास चौदा वर्षे पूर्ण झाली आहेत असे लिहून द्यावयाचे आहे. पुढील काळात 12 जुलै 1919 रोजी 'कोल्हापूर इलाख्यातील विवाहासंबंधी कायदा' गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. या अंतर्गत विवाहाच्या वेळी पुरूषाचे वय 18 वर्षे पूर्ण व स्त्रीचे वय 14 वर्षे असायलाच हवे असे

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

स्पष्टपणे नमूद केले आहे. त्याचबरोबर वयाची 18 वर्षे पूर्ण केलेली कोणतीही व्यक्ती स्त्री अथवा पुरूष सज्ञान आहे असेही या कायद्याद्वारे नमूद करण्यात आले. 'सज्ञान' याचा अर्थ ती व्यक्ती स्वत:च्या विवेकाला स्मरून विवाहसंबंधी निर्णय घेण्यास स्वतंत्र आहे असा होतो. स्त्रीला स्वत:च्या आयुष्याचा निर्णय घेण्याचा अधिकार देणारा निर्णय शाहूराजांनी घेऊन स्त्रियासंदर्भातील आपल्या उदार अंत:करणाचा प्रत्यय आणवून दिला आहे.

समाज कोणताही असो त्यामध्ये स्त्री-पुरूष या दोहोंनाही समान संधी असल्याशिवाय समाजाचे पोषण योग्य पद्धतीने होत नाही. आपल्या भारतीय समाजात दीर्घकाळ पुरूषांनी सत्ता गाजवली. पुरूषांनी स्वत:ला सोयीचे होतील असे नियम बनविले. या नियमांना धर्मसंस्कार असे म्हणून समाजातील दुर्बल घटकांवर लादले. विशेषत: स्त्रियांना याचा सर्वाधिक फटका बसला. अगदी जन्मापासूनच्या सर्व स्थित्यंतरामध्ये स्त्री अक्षरश: भरडली गेली. तिच्या मन आणि शरीरचा किंचितही विचार न करता तिच्यावर बंधने घालण्यात आली. विवाहासंदर्भातील अलिखित नियमांमध्ये याचे स्वरूप भयावह होते. विवाह हा आपल्या कुटुंबव्यवस्थेचा पाया आहे. पण हा पायाच कांहीवर अन्याय करणारा होता. राजर्षी शाहू महाराजांनी सर्व परिस्थिती मानवतेच्या अंगाने समजून घेतली. जो घटक कुटुंबव्यवस्था पुढे नेण्यासाठी महत्त्वाचाच नव्हे तर अपरिहार्य आहे. त्या घटकाला न्याय देण्याच्या हेतूने आपल्या राजसत्तेच्या राजदंडाचा वापर केला. आपले निर्णय आणि कृती यातून महिलांना सन्मान मिळवून दिला.

**शिक्षण विषयक सुधारणा :**

शाहूराजांनी आपल्या प्रजाजनांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यासमोर महात्मा जोतिबा फुले यांचा आदर्श होता. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजाला शहाणे करायचे असेल तर त्यांना शिक्षण द्यायला हवे, ही बाब हेरून मुलींसाठी शाळा सुरू केली. त्याची व्याप्ती जसजशी वाढू लागली तसतसे समाजमन शिक्षित होऊ लागले. नवी चेतना निर्माण जाली. फुले दाम्पत्यांनी सुरू केलेला शिक्षणाचा यज्ञ गती घेत असतानाच ब्रिटिश पार्लमेटमध्येही एक महत्त्वाचा निर्णय झाला. 1880 साली इंग्रजांनी आपल्या कायद्यामध्ये महत्त्वपूर्ण बदल करून इंग्लंडमध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. साधारणपणे हा काळ असा होता की ज्या काळात इंग्रजांचे राज्य सर्व जगभर पसरले होते. स्वाभाविकपणे इंग्लंडमध्ये झालेल्या निर्णयाचा परिणाम जेथे जेथे इंग्रजांचे राज्य होते तेथे तेथे होणे स्वाभाविक होते. त्यामुळे 1882 साली शिक्षणविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी इंग्रज सरकारने 'हंटर शिक्षण कमिशन' नेमले. या कमिशन' नेमले. या कमिशनच्या माध्यमातून भारतातील शिक्षण व्यवस्थेचा विचार होणे अपेक्षित होते.

इंग्लंडमध्ये शिक्षण व्यवस्थेसंदर्भात Filtration theory म्हणजे झिरपण्याचा सिद्धांत मान्य झालेला होता. या सिद्धांतामध्ये 'वरच्या वर्गाला शिक्षण दिले तर हळूहळू, झिरपत झिरपत खालपर्यंत पोहोचेल' अशी धारणा होती. परंतु भारतीय व्यवस्थेत असे घडणे शक्य नव्हते. या सिद्धांताला जोतिबा फुले यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी याची संयुक्तिक कारणमीमांसा केली. त्यांनी भारतातील जातवास्तव मांडताना येथील वर्णव्यवस्था कशी आहे याचेही भान कमिशनला करून दिले. त्यांच्या मतानुसार तत्कालीन भारतातील जात, वर्णव्यवस्था एकमेकांवर ठेवलेल्या मडक्यासारखी आहे. सर्वात खाली मोठे मडके म्हणजे मोठी जनसंख्या याला शूद्र म्हटले जाई. शूद्रांच्या वरील हंडी वैश्यांची, वैश्यांच्या वरील हंडी क्षत्रियांचे व सर्वात वर असणारे मडके लहान.. त्यांची लोकसंख्या सर्वात कमी... पण त्यांचे वर्चस्व. हे ब्राह्मण. ही मडकी मातीची नसून धातूची आहेत त्यामुळे त्यातून कांहीही झिरपणार नाही, असे स्पष्टपणे नोंदवून महात्मा फुले यांनी विरोध केला. 'झिरपण्याचा सिद्धांत' इतरत्र मान्य होऊ शकेल पण भारतात कदापिही लागू होऊ शकत नाही असे जोतिबांनी सांगितले. अर्थात त्यावेळी इंग्रज राजवटीने फुलेंचा विचार मान्य केला नाही. पण राजर्षी शाहू महाराजांनी त्याचा नीट अभ्यास केला असावा.

राजर्षी शाहू महाराजांनी राजसूत्रे हातात घेतली. वयाच्या मानाने त्यांचे आकलन प्रगल्भ होते. त्यांनी आजूबाजूच्या परिसरासह परिस्थितीचेही बारकाईने निरीक्षण केले. विशेषत: माणसाचे एकमेकांशी असणारे संबंध कमालीचे विषमता दर्शवत होते. हिंदू समाजव्यवस्थेमध्ये तर वर्णवर्चस्व आणि प्रचंड प्रमाणात रूजलेली अस्पृश्यता यामुळे समाजाचे संतूलन बिघडलेले होते. लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव किंवा अनास्था जाणवत होती. या सर्व परिस्थितीचे आकलन होत असतानाच संस्थानच्या दैनंदिन कारभारात ब्राह्मण समाजाचे असणारे वर्चस्व त्यांना स्पष्टपणे जाणवले. ब्राह्मण समाज केवळ नोकरीमध्ये वर्चस्व राखून नव्हता तर वर्णवर्चस्वाचा आधार घेऊन अन्य समाजावर वचक ठेवीत होता. शाहू महाराज या परिस्थितीने खूप अस्वस्थ व्हायचे. एक समाज दूसऱ्या समाजावर अशातऱ्हेने वर्चस्व निर्माण करते. याचा अर्थ एकाअर्थी माणूसकीला काळीमा फासणारी वृत्ती आहे हे त्यांची भावना बनली. ही परिस्थिती बदलायला हवी असा ठाम निर्धार राजांनी केला. पण त्यासाठी ठोस उपाययोजना लोकांपुढे ठेवणे जरूरी होते. महाराज स्वत: शिक्षित होते. शिक्षणाने विचार करणे सहज शक्य तर होतेच पण त्याचबरोबर आजूबाजूच्या परिसराचे आकलन

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

सद्सद्विवेकाने करता येते. योग्य आणि अयोग्याचा निवाडा करता येतो ही त्यांची धारणा होती. याचा अर्थ समाजाला शिक्षित केले तर परिस्थितीत बदल होऊ शकतो असे महाराजांना मनोमन पटले. त्यांनी सर्वसामान्यांना शिक्षणाची दारे सताड उघडी करण्याचा निर्णय घेतला. हिंदूस्थानच्या इतिहासात आपल्या संस्थानातील लोकांसाठी असा निर्णय घेणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज एकमेव राजे होते.

शाहू महाराज शिक्षित होते. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले होते. पाश्चात्य राष्ट्रांमध्ये झालेले परिवर्तन शिक्षणामुळेच झाले हे त्यांनी जाणले होते. त्यामुळेच आपल्या संस्थानातील स्त्री-पुरूष-मुले-मुलींना शिक्षणाची संधी प्राप्त करवून देण्याचा ध्यास त्यांनी घेतला. 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदूस्थानला अत्यंत आवश्यकता आहे' असा प्रगल्भ विचार त्यांनी मांडला. केवळ विचार मांडून ते थांबले नाहीत तर त्यांनी त्या दिशेने कृती करण्यास सुरूवात केली.

द्रष्टे नेतृत्त्व आपल्या निर्णयांचा पाठपुरावा योग्य पद्धतीने करतात. त्यासाठीचे पक्के नियोजन त्यांनी केलेले असते. शाहू महाराजांनीही शिक्षणासंदर्भातील आपले विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी नियोजन केले. यामध्ये,

1) राजसूत्रे हाती घेतल्यानंतर शिक्षण क्षेत्राचा आढावा घेऊन कोणत्या सुधारणा करता येतील याची दिशा निश्चित करण्यासाठी समितीची स्थापना केली.
2) शिक्षणाची सुरूवात प्राथमिक पासून होते. संस्थानातील प्राथमिकसह माध्यमिक शाळांची संख्या वाढविल्या.
3) बहूजन समाजातील मुलामुलींना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती, पारितोषिके सुरू केली.
4) नवीन शाळा सुरू करणे, इमारती बांधणे, इमारतीची देखभाल करणे या संदर्भाने नियम तयार केले.
5) शिक्षणाचा खर्च अवाढव्य होता. संस्थानातून खर्चाची तजवीज होत होती. परंतु पैसा कमी पडू नये यासाठी 'शिक्षण कर' सुरू केला. यासाठीचा दिशादर्शक आराखडा तयार केला.
6) समाजामध्ये देवस्थाने मुबलक होती. देवस्थानांनी शिक्षणासाठी मदत करावी यासाठीचा जाहीरनामा काढण्यात आला.
7) समाजामध्ये समता, बंधूभाव निर्माण होण्याच्या दृष्टीने स्पृश्य-अस्पृश्य मुलांसाठी असणाऱ्या स्वतंत्र शाळा बंद करून एकत्रितपणे शिक्षण घेण्यासाठीची यंत्रणा कार्यरत केली.
8) मुलांच्या आर्थिक स्तराचा विचार करून शैक्षरिक साहित्य, पुस्तके देण्याची योजना तयार केली.
9) शाळांतील अभ्यासक्रम अत्यंत बारकाईने तयार करण्यात आला.
10) शिक्षकांच्या नेमणूका योग्य कसोट्यांच्या आधारे करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या.
11) मुलांपर्यंत योग्य शिक्षण पोहचण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक हवेत याचे भान ठेवून शिक्षक केंद्राची निर्मिती केली.
12) शाळांवर देखरेख ठेवण्यासाठी पंचांची नेमणूक करण्यात आली.
13) गरजू विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था वसतिगृहाच्या माध्यमातून करण्यात येऊ लागली.
14) सर्वात महत्त्वाचे म्हणजे संस्थानच्या तिजोरीतून एकूण उत्पन्नाच्या किमान 6% रक्कम शिक्षणावर खर्च व्हावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होऊ लागला.

शंभर सव्वाशे वर्षांपूर्वीचे समाजवास्तव नजरेसमोर आणले तर शाहूराजांच्या निर्णयाचे मौलिकत्व लक्षात येते. शिक्षण देण्याचा निर्णय झाला. पण त्यासंदर्भातील जाणीव लोकांमध्ये करणे गरजेचे होते. महाराजांनी स्वत: लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगीतले. याचा इष्ट परिणाम लगेचच दिसू लागला. बहूजन समाजातील मुले/मुली शाळेत येऊ लागली. त्यांच्या पालकांनाही याचे महत्त्व पटू लागले. एका अर्थी शिक्षण ही लोकचळवळ बनविण्यामध्ये शाहू महाराजांना यश प्राप्त झाले. करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये या संदर्भाने अनेक निर्णय जाहीर झाले असून 29 सप्टेंबर 1917 रोजीचा कायदा ऐतिहासिक ठरला. हा सक्तीच्या शिक्षणाविषयीचा कायदा महाराजांनी जाहीर केला.

शाहूराजांनी 1917 साली मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासंदर्भातील निर्णय घेतला. एवढेच नाही तर जे विद्यार्थी मुले-मुली शाळेत येणार नाहीत त्यांच्या पालकांना दंड करण्याची तरतूदही या निर्णयामध्ये होती. राजांचा हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरला. प्राथमिक शिक्षणासह माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाची सुद्धा व्यवस्था करण्यासंबंधाने त्यांच्या धोरणामध्ये समावेश होता. अर्थात तत्कालीन समाजातील गोर-गरिबांच्या मुलांना असे शिक्षण घेण्यासाठीची आर्थिक कुवत नव्हती. इच्छा आहे पण परिस्थितीने पुढे पाऊल टाकता येत नाही अशी कुचंबना होत होती. यासाठी एक मार्ग दिसत होता. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह राहण्या-

जेवणाची सोय करणे. असा विचार या अगोदर कोरणत्याही संस्थानामध्ये झालेला नव्हता. पण महाराजांनी निर्णय घेतला आणि त्याची अंमलबजावणीही केली. असा समाजाभिमुख निर्णय घेणारे पहिले राजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते.

**समारोप :**

राजर्षी शाहू महाराज यांना 48 वर्षांचे आयुष्य लाभले. यापैकी 28 वर्षे त्यांनी कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार केला. हा काळ केवळ संस्थानासाठी महत्त्वाचा नव्हता तर संपूर्ण महाराष्ट्र किंवा भारतीय समाज व्यवस्थेला नव्या वळणावर घेऊन जाणारा होता, असे म्हटल्यास चुकीचे ठरू नये. राजर्षी शाहूंनी क्रांतीकारक निर्णय घेतले. सदरचे निर्णय घेत असताना त्यांनी निश्चित स्वरूपाची भूमिका घेतली. विशेषत: जातव्यवस्था मोडून काढणे आणि सर्व माणसांना समानतेच्या पातळीवर आणणे ही त्यांची भूमिका त्यांच्या प्रत्येक निर्णयातून दिसून येते. काळाच्या पुढे जाऊन निर्णय घेत असताना त्यांनी प्रस्थापितांचा दबाव मानला नाही. आपल्याला जे पटेल तेच त्यांनी निर्णयाच्या आधारे साध्यही केले. शाहू महाराजांच्या मृत्यूपश्चात भारतीय समाजाने 100 वर्षांची वाटचाल केली आहे. यातील 75 हून अधिक वर्षे स्वतंत्र भारताच्या राज्यव्यवस्थेतील आहेत. आजही महाराजांनी घेतलेले निर्णय भारतीय समाजात आदर्शवत ठरले आहेत. त्यामुळेच भारतीय संविधानाची रचना करताना शाहू महाराजांनी घेतलेल्या बहुतांश सर्व निर्णयांचे पडसाद घटना निर्मितीवर जाणवतात. हेच राजर्षी शाहूजी महाराज यांचे द्रष्टेपण आहे. ते खऱ्या अर्थाने राजे होते, प्रजेचे पालक होते.

**संदर्भ :**

1) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, संपा. प्रा. डॉ. रमेश जाधव, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, 2016.
2) राजर्षी शाहू विचार व कार्य, प्राचार्य डॉ. जे. के. पोवार, राज प्रकाशन, कोल्हापूर.
3) यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला, कराड, श्री. पी. बी. साळुंखे व्याख्यान.
4) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश भाग 1 व 2, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य.
5) राजर्षी शाहू महाराज, प्राचार्य डॉ. जे. के. पोवार, राज प्रकाशन, कोल्हापूर.
6) करवीर सरकारचे गॅझेट, भाग-1, ता. 29 सप्टेंबर 1917.
7) तत्रैव, ता. 28 ऑगस्ट 1915.
8) तत्रैव, ता. 18 डिसेंबर 1915.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

02

# छत्रपती शाहू महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन आणि प्रासंगिकता

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
सहयोगी प्राध्यापक तथा, इतिहास विभाग प्रमुख,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:** छत्रपती शाहू महाराजांचा शासनकालास आधुनिक भारताच्या ऐतिहासिक पटलावर अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. महाराजांच्या नेतृत्वाखाली, सामाजिक न्याय आणि आर्थिक विकासाच्या दिशा ठरविण्यात आलेल्या अनेक सुधारणा व धोरणांमुळे कोल्हापूर राज्याच्या प्रगतीला नवी गती मिळाली. तथापि, शाहू महाराजांच्या धोरणांचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि समर्पक पैलू म्हणजे त्यांच्या पर्यावरणीय दृष्टिकोनाचा गडद ठसा. निसर्ग आणि पर्यावरणाचे संरक्षण हे शाहू महाराजांच्या आदर्श कार्यपद्धतील एक अविभाज्य अंग होते. त्यांचा पर्यावरणीय दृष्टिकोन निसर्गाचा समतोल आणि दीर्घकालिक जतन व संरक्षणावर केंद्रित असलेला दिसतो. यानुसार, त्यांनी आपल्या कार्यकाळात जी कार्यपद्धती अंगीकृत करून ठोस धोरणे आणि उपाययोजना राबविल्या, ज्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीस सुरक्षितता प्राप्त होण्यास मदत झाली आणि पर्यावरणीय चांगुलपणाचा एक आदर्श निर्माण केला आहे. प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून शाहू महाराजांचे पर्यावरण विषयक धोरण, पर्यावरणाची जपणूक करण्याचे उद्दिष्ट, आणि त्यांच्या धोरणांचे आजच्या संदर्भातले महत्त्व याचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून, शाहू महाराजांच्या कार्यकौशल्याला आणि त्यांच्या समर्पक दृष्टिकोनाला समकालीन पर्यावरणीय संरक्षणाच्या दृष्टीने त्यांच्या कार्याची प्रासंगिकता स्पष्ट करता येईल.

**मुख्य बीज शब्द**: शाहू महाराज, पर्यावरणीय दृष्टिकोन, धोरणात्मक उदाहरण, वृक्षसंपदा, जलसंवर्धन, निसर्गामधील हस्तक्षेप, पर्यावरणीय संरक्षण इत्यादि;

**उद्देश:**

१) शाहू महाराजांच्या शासनकाळात निसर्ग व पर्यावरणासंबंधीच्या विचारसरणीचा अभ्यास करून त्यांच्या पर्यावरणीय दृष्टिकोनाची स्पष्ट कल्पना प्राप्त करणे.

२) शाहू महाराजांनी स्वीकारलेले आणि राबवलेले निसर्ग संरक्षणाचे धोरणात्मक उपाय व त्यांचे प्रभाव विश्लेषित करणे, विशेषतः वृक्षसंपदा, जलसंवर्धन, आणि पर्यावरणीय समतोल साधण्याच्या उपाययोजना.

३) शाहू महाराजांच्या धोरणांची प्रभावीता आणि दीर्घकालीन परिणामांचा अभ्यास करणे. यामध्ये त्यांच्या निर्णयांचे आणि उपाययोजनांचे सामाजिक व पर्यावरणीय परिणाम समजून घेणे.

४) शाहू महाराजांच्या पर्यावरणीय धोरणांची आधुनिक संदर्भात मूल्यांकन करून त्यांचा आजच्या काळातील पर्यावरणीय धोरणांवर काय प्रभाव पडू शकतो याचे विश्लेषण करणे.

५) शाहू महाराजांचे पर्यावरणीय दृष्टिकोन व धोरणे आधुनिक शासकीय आणि सामाजिक धोरणांसाठी प्रेरणा स्रोत म्हणून कशी वापरली जाऊ शकतात हे स्पष्ट करणे.

६) पर्यावरणीय समतोल साधण्यासाठी शाहू महाराजांनी वापरलेले सिद्धांत व तत्त्वे तपासणे आणि त्यांची आधुनिक पर्यावरणीय धोरणांमध्ये पुनरावृत्ती कशी केली जाऊ शकते का? हे स्पष्ट करणे.

**विज्ञानवादी विचारणाचे बिजारोपण:**

शाहू महाराजांच्या वैचारिक जडण-घडणीचे महत्वपूर्ण पैलू त्यांच्या जीवनचरित्रातून स्पष्टपणे दिसतात. शाहू महाराजांचे शिक्षण राजकोट आणि धारवाड येथे झाले. त्यांच्या आठ वर्षांच्या शैक्षणिक कालावधीत त्यांना प्राचार्य नॉक्टन, सी. एस. कॅंडी, आणि सर फ्रेजर यांसारख्या उच्च विद्याविभूषित पाश्चात्य शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. विशेषतः सर फ्रेजर हे महाराजांचे पालक-शिक्षक होते. युरोपातील वैज्ञानिक दृष्टिकोन महाराजांच्या शिक्षणात समाविष्ट होता आणि हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नैसर्गिकरित्या रुजलेले होते. महाराजांनी आधुनिक अभ्यासक्रमाद्वारे आणि पाश्चात्य वैज्ञानिक दृष्टीकोणाद्वारे आपल्या ज्ञानवर्धनाची प्रक्रिया केली. त्यांचे जीवन आणि विचारशास्त्र विज्ञानवादी, जिज्ञासू आणि नविनतेच्या शोधात असलेले दिसते. शाहू महाराजांच्या शालेय जीवनातील सहलींमध्ये आणि कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आल्यानंतर त्यांनी संस्थानचे जे अभ्यास दौरे केले त्या काळात त्यांनी केलेल्या निरीक्षणात, त्यांनी वस्तुस्थिती आणि विज्ञानाच्या प्राथमिकतेसाठी अत्यंत महत्त्व दिले.

शाहू महाराजांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करतांना स्पष्ट होते की त्यांच्या ठायी अहंकाराचा लेशही नव्हता. अहंकारामुळे व्यक्ती विज्ञानाच्या विरोधात विचार करू शकते, परंतु महाराज याला अपवाद होते. त्यांनी नेहमीच वस्तुस्थितीच्या साक्षात्कारावर भर दिला आणि समाजाच्या प्रगतीसाठी योजनात्मक निर्णय घेतले. उदा. १८९६ ते १९०५ च्या दुष्काळाच्या संकटात त्यांनी तात्कालिक उपायोजना न करता, शेती सुधारणा आणि जलस्रोतांचा विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी शेतीसाठी बारामाही पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपाय केले. यामध्ये जलसंवर्धन आणि नवीन पाण्याचे स्रोत निर्माण करण्यावर विशेष लक्ष देण्यात आले. शाहू महाराजांनी पर्यावरणाच्या समतोलाचे महत्व ओळखले होते. त्यांनी आपल्या निर्णयांमध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जतनासोबतच पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रयत्न केले. विविध जाहीरनामे आणि आदेशांद्वारे त्यांनी पर्यावरण रक्षणाचे धोरण स्पष्ट केले. त्यांनी वणवे लागण्यास प्रतिबंध करण्यासाठी कठोर कायदे लागू केले. शाहू महाराजांनी वृक्ष संवर्धनाच्या बाबतीत देखील कठोर धोरण स्वीकारले. त्यांनी वृक्ष तोडण्यास मनाई केली, अत्यावश्यक असलेल्या वृक्षांचे संरक्षण सुनिश्चित केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जसे वृक्ष संवर्धनाचे महत्व समजले होते[१] तसेच शाहू महाराजांनीही निसर्गाच्या संरक्षणासाठी समान तत्परता दाखवलेली दिसते. कारण दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करताना निसर्गात कमीत-कमी हस्तक्षेप करायला हवा यावर महाराज ठाम राहिलेले दिसतात. पावसाळ्यात पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरवल्यास भूजल पातळी वाढते आणि जलस्रोत समृद्ध होतात; आणि यामध्ये विविध प्रकारचे वृक्ष अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात हे वास्तवदर्शी वैज्ञानिक सत्य महाराजांनी बाजूला केले नाही. वृक्षांचे जतन आणि संवर्धन करणे हे भविष्याच्या दृष्टीने गरजेचे आहे याचा विचार करून शाहू महाराजांनी अनेक प्रयत्न केल्याचे दाखले आज उपलब्ध आहेत. समकालीन राजे-राजवाडे यांचे चैनी-विलाशी जीवन पाहता शाहू महाराज या मोहजाळात अडकेले नाहीत. एखाद्या समस्येच्या मुळाशी जावून त्याचा कायमचा बंदोबस्त करणे हा महाराजांचा शिरस्ता होता. निसर्ग आणि पर्यावरण जतन, संवर्धन आणि संरक्षणाची मूलभूत गरज ओळखून शाहू महाराजांनी पर्यावरण संरक्षणासंदर्भात अनेक ठराव मंजूर करून संस्थानातील वृक्षसंपदेचे संरक्षण करण्याचे अतिशय महत्वकांशी कार्य केले. थोडक्यात; शाहू महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन आणि त्यांचे कार्य हे आजही मार्गदर्शक ठरते. त्यांच्या निर्णयांमुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन हे युगप्रवर्तक कार्याचे उदाहरण आहे.

**शाहू महाराजांचे जंगलविषयक धोरण:** शाहू महाराजांनी जंगलांच्या संरक्षणासाठी कोल्हापूर संस्थानात नियम केले. या नियमांनुसार जंगलांचे दोन प्रमुख विभाग केले होते: अ) राखलेले जंगल आणि ब) संरक्षण केलेले जंगल. अ) राखलेले जंगल क्षेत्रात वन अधिकारी यांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही कृत्यासाठी जंगलात शिरणे निषिद्ध होते. मात्र, अशा जंगलातून रहदारीचे मार्ग जात असतील, तर त्या मार्गाने जाण्या-येण्यास प्रतिबंध नव्हता. जंगलाखेरीज इतर ठिकाणी गुरांस वगैरे पिण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्यास, त्या ठिकाणी जाण्यास मोकळीक होती. परंतु, अशा रस्त्याने व पाण्याच्या ठिकाणी जातांना आजूबाजूच्या जंगलास किंवा जमिनीस उपद्रव होईल असे कृत्य करणे निषिद्ध होते. ब) राखीव जंगलात आग लावणे, विस्तव पेटविणे किंवा नेणे, गुरे चारणे, कोणतीही झाडे किंवा लाकडे कापणे, साल काढणे, फांद्या किंवा पाने तोडणे, खाणी खणून दगड-चुना-कोळसा काढणे, लागवडीसाठी जमीन उकरणे, शिकार करणे या सर्व कृत्यांना मनाई होती. संरक्षित केलेल्या जंगलात, गावकऱ्यांनी आपल्या गावाच्या हद्दीतच गुरे चारावी, असा नियम करण्यात आलेला होता. फॉरेस्ट ऑफिसर जाहिरात काढेल त्याचवेळी फळे, पाने, गवत, फुले आणि कंद गोळा करण्याची परवानगी मिळत असे. या जंगलात शेळ्या आणि मेंढ्यांच्या व्यतिरिक्त इतर जनावरेही चारता येत असत. घरगुती वापरासाठी आणि जळणासाठी लागणारी लाकडे वाऱ्याने मोडलेली किंवा वाळून पडलेली असावीत, अशी अपेक्षा होती. मात्र, अशा लाकडांची उपलब्धता नसल्यास, गरीब जनतेसाठी वन अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली योग्य ती झाडे तोडून घेण्याची परवानगी दिली जाई. राखीव आणि संरक्षित जंगलांचे नुकसान केल्याचे आढळल्यास, संबंधित व्यक्तीविरुद्ध न्यायालयाने दिलेली शिक्षा भोगावी लागेल, तसेच त्यावर अधिक सहा महिने शिक्षा किंवा पाचशे रुपये दंड, किंवा काही प्रसंगी दोन्ही शिक्षा एकाचवेळी दिल्या जातील, अशी तरतूद करण्यात आली होती. यासह, जंगलातील जो भाग नियमांनुसार बंद ठेवलेला असेल, त्या भागात गुरांनी अतिक्रमण केल्यास ती गुरे ताब्यात घेऊन कोंडवाड्यात ठेवण्याचा अधिकार होता, आणि अशा जनावरांच्या मालकांकडून योग्य शुल्क घेऊनच ती गुरे सोडली जात. या नियमांत इतक्या कडक तरतुदी करण्यात आल्या होत्या.

**झाडांचे संरक्षण आणि झाडे लावण्यासाठी आर्थिक तरतूद:** शाहू महाराजांनी झाडांची फक्त निगा राखणे पुरेसे मानले नाही, तर नवीन झाडांची लागवड करण्यासाठी सरकारी तिजोरीतून आर्थिक तरतूदही केली. यामुळे सरकारी योजनांमध्ये पर्यावरणाच्या देखभालीसाठी नियमित आर्थिक पाठबळ मिळत असे, जे त्यावेळी एक दूरदर्शी निर्णय होता. शाहू महाराजांनी पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन याला विशेष महत्त्व दिले होते. त्यांनी फक्त अस्तित्वातील झाडांचे रक्षण करण्यावरच भर दिला नाही, तर नवीन झाडे

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

लावण्यास प्रोत्साहन दिले. हे त्यांचे पर्यावरणप्रेम काही ठळक उदाहरणांमधून स्पष्ट होते, जे त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक मानता येईल. उदा. १) वाडी रत्नागिरी हे एक धार्मिक स्थान कोल्हापूरात असल्याने तेथे झाडे लावण्यासाठी रुपये २०७ मंजूर केले.[२] २) रजपुतवाडी या भागात तेथे असणाऱ्या माळावर खड्डे काढून झाडे लावण्याचे काम झालेले होते. त्या खर्चासाठी आलेल्या एकूण ६८७ रुपये ८ आणे व २ पैसे इतक्या रकमेस मंजूरी दिली.[३] ३) शाहू महाराज हे अभिवन प्रयोग करण्याला नेहमीच प्रोत्साहन देत असत. असेच एक नवीन झाड जे 'रेडेडोहात बच्चा' या नावाने ओळखले जायचे. त्यांची झाडे लावण्यासाठी त्यांनी २९७ रुपयांची विशेष मदत जाहिर केली.[४]

झाडे लावणे आणि त्यांच्या तोडीला प्रतिबंध करणे या गोष्टींबरोबरच, जी झाडे आधीच लावलेली होती ती चांगली जगण्यासाठी आवश्यक ती काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे होते. यासाठी महाराजांनी आपल्या संस्थानात लावलेल्या झाडांना पाणी देण्याची योग्य व्यवस्था केली आणि त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद केली होती. त्याचे काही उदाहरणे देता येतील. उदा. १) एजन्सी कम्पाऊंडमध्ये काही झाडे लावण्यात आली होती. त्यांना वेळेवर पाणी घालण्यासाठी, १९०४ च्या वार्षिक बजेटमध्ये १ हजार रुपयांच्या तरतुदीस मंजुरी दिली होती. परंतु पुढे खर्च वाढून १६२४ रुपये १५ आणे ७ पैसे इतका झाला. अतिरिक्त खर्च (रुपये ६२४.१५.४) महाराजांनी मंजूर केला आणि वाढीव खर्च सहन करून झाडांच्या रक्षणासाठी त्यांची विशेष काळजी घेतली.[५] २) वाडी रत्नागिरी येथे ज्योतिबा देवस्थानच्या परिसरात झाडे लावण्यात आली होती. ती झाडे जगवण्यासाठी १९०७ मध्ये पाणी देण्यासाठी ८७ रुपये खर्च करण्यास शाहू महाराजांनी मंजुरी दिली.[६] ३) वाडी रत्नागिरी या देवस्थानाजवळ यात्रेकरू आणि वाटसरू येत असत. त्यांना झाडांच्या सावलीत बसता यावे यासाठी तेथे झाडे लावण्यात आली होती. या झाडांना पाणी देण्यासाठी १९१० मध्ये १५३ रुपये ५ आणे २ पैसे खर्च करण्यास मान्यता दिली होती.[७] ४) पन्हाळा येथे कच्चे वहिवाटी बागांमध्ये लावलेल्या झाडांना पाणी घालण्यासाठी १३०० फ. या वर्षात ७६६ रुपये ६ आणे ३ पैसे एवढा खर्च झाला होता. हा खर्च बागेच्या उत्पन्नातून करण्यास महाराजांनी परवानगी दिली.[८] ५) सरकारमार्फत झाडांना पाणी देण्यासाठी शाहू महाराजांनी दिलेल्या आदेशानुसार, झाडांना पाणी देण्यासाठी आवश्यक असलेल्या पशुधनाच्या खरेदीसाठीही खास आर्थिक तरतूद केली होती. वाडी रत्नागिरी येथे झाडांना पाणी देण्यासाठी एक रेडा (पशुधन) व्यवस्था केली होती. हा रेडा कामावर सक्षम नसल्यामुळे त्याला विकून नवीन रेडा खरेदी करण्यासाठी ३५ रुपये खर्चले गेले. यावरून स्पष्ट होते की, झाडांच्या देखभालीसाठी महाराजांनी आर्थिक संसाधने पुरवण्यास महत्त्व दिले. वरील काही उदाहरणावरून आपणास हे सहज लक्षात येते की शाहू महाराज वृक्ष संवर्धनाच्या संदर्भात किती दक्ष होते. महाराजांनी फक्त झाडे लावण्यावर भर न देता ती टिकवण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवरही लक्ष केंद्रित केले होते. झाडांना वेळेवर पाणी मिळावे यासाठी त्यांनी आर्थिक तरतूद करून सरकारी निधी वापरण्यास मान्यता दिली. पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेसाठी खर्च वाढला तरी त्यांनी तो स्वीकारला, कारण त्यांना निसर्ग संरक्षणाचे महत्त्व माहित होते. त्यामुळे, महाराजांची पर्यावरणविषयक धोरणे केवळ वृक्षारोपणापुरती मर्यादित नसून, निसर्गाच्या दीर्घकालीन संरक्षणासाठी त्यांनी ठोस उपाययोजना केल्या होत्या.

**झाडांचे नुकसान टाळण्यासाठी ठोस पावले:**

शाहू महाराजांनी झाडांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना केल्या. उदाहरणार्थ, पोरले थट्टी येथे कामगारांना गवतासाठी बोरगावमधील राने देण्याचा पूर्वी आदेश दिला गेला होता. मात्र, त्या रानामध्ये मौल्यवान झाडे होती आणि नर्सरी व वृक्षारोपणही केलेले होते. या पार्श्वभूमीवर महाराजांनी त्या झाडांचे रक्षण करण्यासाठी निर्णय घेतला की, कामगारांना फक्त गवताच्या वापरापुरतेच त्या रानाचा अधिकार द्यावा, आणि झाडांचे नुकसान होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. कामगारांच्या हलगर्जीमुळे जर झाडांचे नुकसान झाले, तर त्या नुकसानीची वसूली कामगारांकडूनच केली जाईल, असे आदेश दिले. जेथे झाडांना जपणे शक्य होते, तेथे महाराजांनी त्यांच्यासाठी उपाय करून त्यांचे रक्षण होईल असे ठराव मंजूर केलेले होते. उदा. पोरले थट्टी याठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना गवत कामासाठी त्यांच्या ताब्यात बोरगावमधल्या गावची राने देण्याबाबतचा हुकूम पूर्वी दिलेला होता. त्यामुळे तेथे त्या रानांचा लिलावही झाला पण त्या ठिकाणी काही मौल्यवान दुर्मिळ झाडे लावलेली होती. शिवाय तेथे नर्सरी व वृक्षारोपणही केलेले होते. अशा वेळी या कामामुळे त्या झाडांचे नुकसान होण्याचा संभव लक्षात घेऊन छत्रपतींनी ते रान फक्त गवतापुरतेच कामगारांना देण्यात यावे आणि काम करताना त्या रानाच्या आतील झाडांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी असे सांगितले आणि नुकसान झाले तर ते त्या कामगारांकडूनच वसूल केले जाईल, असे आदेशही दिले. झाडांचे जास्त नुकसान होऊ नये म्हणून त्या रानाचा झालेला लिलावही रद्द केला होता यातून त्यांनी रयतेचे ही सोय केली. ज्यामुळे मौल्यवान झाडांचे रक्षण झाले. हे दाखवते की महाराजांना निसर्गाच्या दीर्घकालीन संरक्षणाची जाणीव होती.[९] पर्यावरणाच्या रक्षणासाठी कठोर

नियमांबरोबरच महाराजांनी जनतेच्या सोयीचीही काळजी घेतली. त्यांनी गवताच्या गरजेच्या अनुषंगाने रयतेला आवश्यक तो फायदा मिळावा याची दक्षता घेतली, परंतु झाडांचे नुकसान न होता हे घडावे यासाठी त्यांनी योग्य पावले उचलली. अशा प्रकारे त्यांनी लोकहित आणि पर्यावरण रक्षण यामध्ये संतुलन साधले. थोडक्यात: शाहू महाराजांच्या निर्णयांमधून झाडांचे रक्षण आणि संवर्धन याबद्दल त्यांची दूरदृष्टी दिसून येते. त्यांनी झाडांचे संरक्षण करण्यासाठी कठोर नियमावली तयार केली, परंतु त्याचवेळी सामान्य जनतेच्या गरजांचीही काळजी घेतली. त्यांच्या धोरणांमधून पर्यावरण आणि लोकांच्या गरजांमध्ये संतुलन साधण्याचा यशस्वी प्रयत्न दिसून येतो.

**झाडांचे संरक्षण सामूहिक जबाबदारी:**

शाहू महाराजांनी पर्यावरण संरक्षणाला उच्च स्थान दिले होते आणि झाडांचे रक्षण ही फक्त सरकारी जबाबदारी नसून जनतेचेही कर्तव्य आहे, याची जाणीव त्यांनी सतत करून दिली. झाडांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक ठराव मंजूर केले आणि कठोर पावले उचलली. उदा. शाहू महाराजांनी स्पष्टपणे नमूद केले होते की, रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांचे रक्षण हे संस्थानातील लोकांचे कर्तव्य आहे. त्यांनी बावडी गावच्या लोकांना झाडे तोडण्याबद्दल सक्त ताकीद दिली होती, परंतु असे प्रकार घडत राहिल्यामुळे महाराजांनी अधिक कठोर निर्णय घेतला. त्यांनी एक ठराव पास करून गावकऱ्यांना त्यांच्या हद्दीत असलेल्या झाडांचे रक्षण करण्याची जबाबदारी दिली आणि संबंधीत अधिकाऱ्यांनी लक्षपूर्वक करावे व यामध्ये काही अफरातफर झाली तर संबंधित व्यक्तीला जबाबदार ठरविण्यात येईल[१०] अशी आज्ञा दिली. सार्वजनिक जागांवरील झाडांचे रक्षण करणे ही जबाबदारी सरकारबरोबरच जनतेचीही आहे, हे स्पष्ट केले होते.

**वृक्ष तोडीस सक्त विरोध:**

शाहू महाराजांनी वृक्षांचे अर्थात जंगलांचे महत्व समजून घेतल्याने, महाराज नेहमीच वृक्षतोडीला विरोध करत होते हे आपणास काही उदाहरणावरून नमूद करता येईल; उदा. १) करवीर पेठयातील बावडे पेटा येतील २०६ स्थानिक लोकांनी गावाच्या रस्त्याच्या कडेची झाडे तोडल्याचे समजले. तेंव्हा ५ जून १९०० मध्ये एक जाहीरनामा काढला. त्यामध्ये असे म्हटले होते की, "सदर इसमांनी जे कृत्य केले त्याजवरून ते शिक्षेस पात्र आहेत व त्याजकडून नुकसानही भरून घेणे रास्त आहे. पण सालमजकुरी प्लेग, दुष्काळ असल्याने त्यांना माफी देण्यात आली आहे. मात्र पुन: असे कोणाकडून घडून येईल तर, त्याजबद्दल रीतीप्रमाणे कज्जे करून शिक्षा देण्यात येईल..........सबब या जाहीरनामयावरून प्रसिद्ध करण्यात येते की, इत:पर रस्त्याच्या बाजूची वगैरे सरकारी झाडे, किंवा त्यांच्या फांद्या, पाने, शिरी, मुळया आणि कोच हे ज्या खात्याचे ताब्यात आहेत त्याची लेखी परवानगी घेतल्यावचून कोणी तोडल्यास किंवा झाडांची वाढ खुंटेल असे एखादे कृत्य केल्यास, त्यांने हा हुकूम अमान्य केल्याबद्दल तो शिक्षेस पात्र होईल हे सर्वास मालूम व्हावे."[११] थोडक्यात काय, तर हे प्रकरण महाराजांकडे आल्यानंतर, झाडे तोडण्याच्या गुन्ह्यासाठी संबंधितांना शिक्षा देणे आणि नुकसान भरपाई वसूल करणे योग्य ठरेल, असे त्यांचे मत होते. मात्र, त्या वर्षी दुष्काळ आणि प्लेगमुळे लोकांची परिस्थिती आधीच अत्यंत बिकट झाल्याने, ते जगण्यासाठी अशा कृत्याला प्रवृत्त झाले असावेत, हे लक्षात घेऊन महाराजांनी त्यांना एकदा माफ करण्याचा निर्णय घेतला. तथापि, जर पुन्हा झाडांचे नुकसान झाले, तर कोणतीही दया न दाखवता नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल, याची जाणीव ठेवण्याची ताकीद त्यांना देण्यात आली. या आदेशावरून, परिस्थिती कितीही बिकट असली तरी निसर्गाचे नुकसान होऊ न देणे हे आपले कर्तव्य आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. २) कोल्हापूर शहराला कळंबे तलावाचे पाणी पुरवले जात होते. मात्र, पाण्याच्या प्रवाहाला नेमक्या काही झाडांच्या मुळ्यांनी अडथळा निर्माण केला होता, ज्यामुळे समस्या निर्माण झाली होती. त्या झाडांची मुळे पाटात येत असल्याने ती झाडे तोडावी लागणार होती. परंतु, संस्थानाचे दिवाण यांनी एक अतिशय चांगला उपाय महाराजांना सुचवला. त्यांच्या मते, झाडे जवळ असल्यामुळे मुळे पाटात येणारच होती, त्यामुळे ती तोडण्यापेक्षा तेथे लोखंडी नळया बसवाव्यात, ज्यामुळे पाणीही घाण होणार नाही आणि पाटात झाडांची मुळेही येणार नाहीत. शाहू महाराजांना ही अभिनव कल्पना फार आवडली आणि त्यांनी त्या कामास तात्काळ मंजुरी दिली, ज्यामुळे झाडे आणि तलावाच्या पाण्याचा योग्य समन्वय साधला गेला.[१२] ३) जनावरांच्या पोषणासाठी काही वेळा राखीव क्षेत्र असले तरी सर्वसामान्य लोक आपल्या जनावरांसाठी रस्त्यावरील झाडे तोडून नेत असत. विशेषतः फिरस्ती लोक, ज्या ठिकाणी ते तात्पुरती वस्ती करतात, तेथे आजूबाजूच्या झाडांचा उपयोग त्यांच्या प्राण्यांसाठी करतात. कोल्हापूर-गगनबावडा-मिरज रस्त्यावर अशाच प्रकारे उंटवाल्यांनी आपला पडाव टाकला होता आणि ते लोक रस्त्यावरील झाडांच्या फांद्या त्यांच्या उंटांसाठी तोडून नेत होते. त्यामुळे तेथील त्यांची वस्ती हटवावी अशी बाब महाराजांसमोर आली असता, महाराजांनी उंटवाल्यांना अशाप्रकारे झाडांच्या फांद्या तोडू नयेत, याबद्दल सक्त ताकीद देण्याचा आदेश दिला.[१३] रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांचे रक्षण केलेचे पाहिजे ही भूमिका महाराजांनी घेतली होती.

**जनावरांसाठी राखीव वृक्ष संपदा**:

फक्त मानवांसाठीच नाही, तर जनावरांच्या पोषणासाठीही महाराजांनी झाडांचे महत्व ओळखले. जनावरांचे पोषण योग्य प्रकारे होईल, यासाठी काही भागांमध्ये फक्त जनावरांसाठी राखीव झाडे लावण्यात आली होती. हत्तींसाठी राखीव झाडे लावण्याचे उदाहरण यावर प्रकाश टाकते. जनावरांच्या पोषणाची कमतरता होऊ नये यासाठी ते स्वतंत्रपणे व्यवस्था करत असत. जनावरांमुळे इतर भागातील झाडांचे नुकसान होणार नाही आणि त्यांना पोषणही योग्य मिळेल, याची विशेष काळजी त्यांनी घेतली होती. काही भागातील झाडे केवळ जनावरांसाठी राखून ठेवण्यात आली होती. भुदरगड पेठयातील वाकीखोल, दाजीपूर इत्यादी गावांच्या भागात राखीव जागांवर नारळाच्या झाडांची लागवड करण्यात आली होती, ही झाडे त्यांनी खास हत्तींसाठी राखून ठेवली होती. त्यामुळे या झाडांचे संरक्षण नीटपणे व्हावे, यासाठी वन अधिकारी, भुदरगड मामलेदार आणि महालकर यांना देखरेख करण्याचे आदेश महाराजांनी दिले होते. राधानगरी येथे सरकारी हत्ती ठेवले असल्यामुळे, त्यांच्या खाण्यासाठी भुदरगड पेठयातील गंगापूर, सुरूपली आणि वाळवे या गावांतील काळया गवताची कुरणे खास हत्तींसाठी राखून ठेवून ती खाजगीकडील म्हणून सरकारात दाखल करून घेतली.[१४] शाहू महाराजांचे वरील उदाहरण स्पष्ट निर्देशित करते की, महाराजांचे पर्यावरणप्रेम केवळ तात्कालिक नव्हते, तर दीर्घकालीन आणि भविष्याच्या दृष्टीने घेतलेले निर्णय होते. ते झाडांचे रक्षण करण्याबरोबरच नव्याने झाडे लावण्यावर आणि त्यासाठी आर्थिक पाठबळ निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत होते. यामुळे त्यांची पर्यावरणाबद्दलची जागरूकता आणि संवेदनशीलता दिसून येते.

**जंगल संवर्धनासाठी केलेले उपाय:**

कोल्हापूर संस्थानातील काही भाग जंगलव्याप्त असून, तेथील वातावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. जलस्त्रोत वाढीसाठी आणि जंगलांचे संरक्षण करण्यासाठी महाराजांनी काही खास आदेश पारित केले होते. उदा. १) पन्हाळा पेट्यातील कोलीक, वासी, पडसाळी, गाटणे व मानवाड या भागातील वस्ती उठवून, त्या क्षेत्रातील जमीन सरकारच्या हक्कात घेऊन ते भाग राखीव जंगलात समाविष्ट करण्याबाबतचा ठराव पारित केला. महाराजांनी वस्ती उठवून जंगल क्षेत्र तयार करण्यासाठी आवश्यक निर्देश दिले आणि जमीन ताब्यात घेण्यासाठी योग्य मोबदला देण्याचे आदेश दिले. झाडांचे नुकसान होऊ नये म्हणून सरकारने झाडांची तोड करण्यास मनाई केली. या कामासाठी वन संरक्षक अधिकारी, मोजणी कारकून, शिपाई व गडकरी यांची नेमणूक केली.[१५] २) मौजे नौकुडा पेटा गडहिंग्लज येथील सर्वे नंबर २०२ व जमीन नंबर २७.३० ही जागा गायरानाकडील काही कामासाठी देण्याबाबत अगोदर आज्ञा केली होती. परंतु, या जागेत वृक्षारोपण केले असून, बरीच झाडे आहेत व अशी जमीन तिकडे दिल्यास जंगलाचे नुकसान होईल. ही बाब निदर्शनास आल्यावर जमीन जंगलाकडेच ठेवण्याबाबत महाराजांनी नंतर ठराव मंजूर केला. यामुळे झाडांचेही नुकसान झाले नाही व जंगलाचाही भाग सुरक्षित झाला.[१६] ३) कोलिक जंगलातील काही भाग समाविष्ट करण्यासाठी जागा घेण्याची योजना होती, पण त्यात असलेल्या वाशी गावातील काही लोकांची घरे जात होती. त्यामुळे त्यांना मोबदला म्हणून ६९४ रुपये देऊन जागा जंगलात समाविष्ट केली.[१७] ४) कोलिक जवळच्या जंगल भागाजवळ पडसाळी म्हणून गाव आहे. त्या गावाची घरे ही जंगलाच्या भागात येत होती. तेव्हा त्या गावच्या लोकांना त्यांच्या घरांसाठी २०८ रुपयांचा निधी मंजूर करून त्यांना योग्य मोबदला दिला.[१८] ५) जंगलातील आसपासच्या गावातील लोक लाकडे तोडून नेत होते. त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण नसल्यामुळे कोणीही कधीही लाकडे घेऊन जाऊ शकत होते. याला प्रतिबंध करण्यासाठी पास व्यवस्था केली. पास असेल तरच लाकडे नेऊ द्यावीत, पास नसेल तर नेऊ देऊ नये असे केल्याने तेथील जंगलाचे नुकसान होणार नाही. अशा अटी असलेला महत्त्वाचा हुकूम महाराजांनी केला.[१९] ६) जंगलांची सुरक्षितता जंगल अधिकारी आणि आसपासच्या लोकांवर अवलंबून असते. जंगलातील वणवे आणि नुकसान टाळण्यासाठी, महाराजांनी संबंधितांकडून रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले होते. जंगलाच्या सुरक्षिततेसाठी कठोर कायदे लागू केले जातात, जे आजही पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरतात.[२०] असे स्पष्ट आदेश छत्रपती शाहू महाराजांनी दिले.

**पर्यावरणीय इतिहास लेखन आणि शाहू महाराज सहसंबंध मांडता येईल काय?**

पर्यावरणीय इतिहास लेखन आणि शाहू महाराजांच्या पर्यावरण विषयक दृष्टीकोण व कार्याची जोड लावण्याचा उद्देश म्हणजे पर्यावरण संरक्षणाच्या ऐतिहासिक प्रवाहात शाहू महाराजांच्या योगदानाची मांडणी करणे. पर्यावरणीय इतिहास हा मानवी समाज आणि निसर्गाच्या परस्पर संबंधांचा अभ्यास करतो. शाहू महाराजांचे कार्य या परिप्रेक्ष्यात मांडता येईल. कारण;

१) पर्यावरणीय इतिहास लेखनात पारंपारिक राजकीय, आर्थिक आणि सामाजिक इतिहासाच्या बाहेर जाऊन निसर्गाचा मानवी जीवनावर आणि शासन व्यवस्थेवर कसा प्रभाव पडतो, हे समजण्याचा प्रयत्न होतो. या दृष्टिकोनातून शाहू महाराजांच्या धोरणांमधील निसर्ग संरक्षण आणि पर्यावरणीय संतुलनाची महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट होते.

२) शाहू महाराजांच्या शासन काळात ज्या प्रकारे दुष्काळ, जल व्यवस्थापन, जंगल संरक्षण, आणि वृक्ष संवर्धनाच्या विविध उपाययोजना राबवल्या गेल्या, त्या उपाययोजना पर्यावरणीय इतिहासात महत्त्वाचे टप्पे म्हणून मांडता येतील. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी घेतलेले निर्णय त्यांच्या शासनाच्या एकात्मिक धोरणांचा भाग होते.

३) शाहू महाराज सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी शेतकरी, श्रमिक आणि दलित समाजासाठी विविध सुधारणांची प्रभावी अंमलबजावणी केली. हे सुधारणाकार्य पर्यावरणीय परिप्रेक्ष्यात जोडता येईल, जसे की जलस्रोत व्यवस्थापन आणि शेती सुधारणा. त्यांच्या धोरणांनी पर्यावरण आणि समाज या दोन्हीचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला.

४) शाहू महाराजांनी जंगलांची राखण करण्यासाठी केलेल्या कायद्यांमध्ये पर्यावरणीय दृष्टिकोन होता. वृक्षतोडीवर नियंत्रण आणणे, वनांची पुनर्रचना करणे, आणि गावातील लोकांना पर्यावरणीय जाणीव करून देणे हे त्यांचे धोरण महत्त्वपूर्ण होते. हे धोरण पर्यावरणीय इतिहासाच्या लेखनात मानवी हस्तक्षेप आणि निसर्गाच्या संरक्षणाची भूमिका स्पष्ट करते.

५) शाहू महाराजांच्या कालखंडात पडलेल्या दुष्काळाचा सामना करताना त्यांनी जलस्रोत व पर्यावरण व्यवस्थापनावर भर दिला. या उपाययोजनांचा इतिहासात विशेष अभ्यास करून निसर्गाच्या व्यवस्थापनावर राजकीय धोरणांचा कसा प्रभाव पडतो हे दाखवता येईल.

६) शाहू महाराजांनी घेतलेल्या निर्णयांमधून आणि पर्यावरणीय नितीमधून त्यांना एक आदर्श पर्यावरणीय शासक म्हणून मांडता येईल. आधुनिक पर्यावरणीय इतिहास लेखनात त्यांची उदाहरणे वापरून पर्यावरण संरक्षणाच्या कार्यात ते कसे आदर्श ठरले हे दाखवता येईल.

थोडक्यात: शाहू महाराजांचे पर्यावरणीय कार्य आधुनिक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडल्यास पर्यावरणीय इतिहासातील त्यांचे स्थान अधिक अधोरेखित करण्यास मदत होईल.

**निष्कर्ष:**

छत्रपती शाहू महाराज हे फक्त सामाजिक सुधारक नव्हते, तर ते एक दूरदृष्टी असलेले पर्यावरण संरक्षक होते. त्यांच्या शासनकाळातील पर्यावरण संरक्षणाच्या धोरणांची मांडणी आजच्या काळातही महत्त्वपूर्ण ठरते. त्यांनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी घेतलेल्या निर्णयांमध्ये दीर्घकालीन विचार, निसर्गाचा समतोल राखण्याची तळमळ, आणि मानवी गरजा व पर्यावरण यामधील समन्वय स्पष्टपणे दिसून येतो. शाहू महाराजांनी जंगलांची राखण करण्यासाठी स्पष्ट धोरणे आखली. वृक्षतोडीवर नियंत्रण आणणे, आणि झाडांची तोड फक्त कायदेशीर प्रक्रियेने होणे, यासाठी त्यांनी कठोर कायदे लागू केले. वृक्षतोडीवर नियंत्रण म्हणजे केवळ पर्यावरणीय संरक्षण नसून भविष्यातील नैसर्गिक संसाधनांची टिकवणूक आहे, हे त्यांच्या धोरणांतून दिसते. शाहू महाराजांनी पाण्याचे महत्व ओळखून जलस्रोतांचे संवर्धन आणि वापराचे नियमन केले. दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी त्यांनी विविध स्तरावर जलसाठ्यांची निर्मिती केली आणि पाणी व्यवस्थापनासाठी शाश्वत उपाययोजना राबविल्या. पाण्याच्या स्रोतांची वृद्धी आणि शेतीसाठी पाण्याचा सातत्यपूर्ण पुरवठा हे त्यांच्या पर्यावरणीय दृष्टिकोनातील प्रमुख घटक होते. शाहू महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन केवळ शासनापुरता मर्यादित नव्हता, तर त्यांनी समाजाच्या सर्व स्तरांनाही या प्रयत्नात सहभागी केले. गावकऱ्यांना जंगलाच्या संरक्षणाची जबाबदारी देऊन त्यांनी सामुदायिक सहभागातून पर्यावरण संरक्षणाचे काम केले. हे धोरण आजच्या 'सामूहिक सहभागातून पर्यावरण संवर्धन' या संकल्पनेशी सुसंगत आहे. शाहू महाराजांनी केवळ झाडे आणि जंगलांचे संरक्षण केले नाही, तर त्या जंगलातील जैवविविधतेचीही काळजी घेतली. त्यांच्या निर्णयांमध्ये जंगलांमधील विविध वनस्पती आणि प्राण्यांची संरक्षणाविषयी स्पष्ट उल्लेख होता. हे कार्य पर्यावरणातील जैवसाखळीचे महत्व ओळखून केलेले होते. शाहू महाराजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पर्यावरणासंबंधी निर्णय हे त्यावेळच्या समाजाच्या पर्यावरणीय शिक्षणासाठी आदर्श होते. त्यांनी केलेल्या योजना आणि धोरणांमधून आजच्या पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी मार्गदर्शन मिळू शकते. शाहू महाराजांचे पर्यावरणीय दृष्टिकोन हे आजच्या काळातील पर्यावरणीय संकटांना तोंड देण्यासाठी दिशादर्शक ठरू शकतात. त्यांनी घेतलेल्या पर्यावरणीय निर्णयांमध्ये विज्ञान आणि मानवी गरजांचा समतोल साधला गेला होता. त्यांच्या या दूरदृष्टीतून शिकून, आपण आजच्या पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यास तयार होऊ शकतो.

**अंतटिपा व संदर्भ ग्रंथ:**

१) आज्ञापत्रात नमूद केल्याप्रमाणे, "आरमारास तख्ते, सोट, डोलाच्याकाठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते. ते आपल्या राज्यात अरण्यामध्ये सागवानादि वृक्ष आहेत. त्याचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लेहून परवानगीने तोडून न्यावे. या विरहित जे लागेल ते परमुलकीहुन खरेदी करून आणावीत. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून हेहि लाकडे

आरमाराचे प्रयोजनाची परंतु त्यास हात लावू न द्यावा. काय म्हणोन की, ही झाडे दो वर्षानी होतात यैसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुत काळ जतन करून वाढविली ती झाडे तोडलियांवरी त्याचे दु:खास पारावार काये? येकास दु:ख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहित स्वल्पकालेच बुडोन नाहीसे होते किंबहुना धण्याचेच पदरी प्रजापीडनाचा दोष पडतो. यां वृक्षाच्या अभावे हानीहि होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित यखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असे, तरी त्याचे धण्यास राजीकरून त्याचे संतोषे तोडून न्यावे. बलात्कार (बळजबरी) सर्वथा न करावा.'

२) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ४९, ठराव क्रमांक १०८३, पृ. २४६
३) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ७१ , ठराव क्रमांक ४५९, पृ. १४८
४) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ९२, ठराव क्रमांक १२४, पृ. ४६,
५) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ५० अ, ठराव क्रमांक ११३३, पृ.२७१
६) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ६३, ठराव क्रमांक ५२९, पृ. २१५
७) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ८१, ठराव क्रमांक ४९३, पृ. १७८
८) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ९८, ठराव क्रमांक २९३, पृ. १३६
९) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ६७, ठराव क्रमांक ३२०, पृ. १४२
१०) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ५० अ, ठराव क्रमांक ४६१, पृ. ३१
११) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ३५, ठराव क्रमांक ७९०, पृ. १७८, संगवे, विलास., (संपा.) रजर्षी शाहू छत्रपती पेपेर्स,, खंड, दूसरा (१८९४-१९००), २०१२, पृ. ४००)
१२) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. १०२, ठराव क्रमांक ६६८, पृ. ३०२
१३) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ७१, ठराव क्रमांक ६७०, पृ. २१९
१४) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ६६, ठराव क्रमांक ७५७, पृ. १६, ठराव बुक नं. ६७, ठराव क्रमांक ६८, पृ. १८,
१५) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ८४, ठराव क्रमांक ७२६, पृ. ३१३
१६) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ८४, ठराव क्रमांक ९१५, पृ. ४२९
१७) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ८८, ठराव क्रमांक ५६३, पृ. ३४८
१८) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ८८, ठराव क्रमांक ५६४, पृ. ३४८
१९) कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, ठराव बुक नं. ८८, ठराव क्रमांक ८०९, पृ. ४५४
२०) कोल्हापूर सरकारचे गॅझेट भाग १, ०६/१२/१९१९, पृ. २०१

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**03**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आदर्श जैवविविधता संरक्षण धोरण

**डॉ. मधुकर विठोबा जाधव,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास विभाग
यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी

---

**प्रस्तावना:** राजर्षी छत्रपती शाहू महाराज कोल्हापूरच्या समृध्दीचे जनक होत. त्यांनी महाराष्ट्रातील पहिली हरितक्रांती कोल्हापूर संस्थानात सुरू केली.राधानगरी धरण बांधुन जलसंवर्धनाला बळ दिले. त्यांचे वृक्ष, जल,प्राणी व पक्षी यांच्याबद्दलचे धोरण सर्वश्रेष्ठ आहे. राधानगरी हे देशातील सर्वात मोठे धरण बांधणारे जलनितीचे जनक छत्रपती शाहू महाराज होत. पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्याचे धोरण राबवून जलनितीचा एक आदर्श आपल्यासमोर ठेवला आहे. शेतकरी प्रगतशील व्हावा व त्याने नव-नवीन पिके घ्यावीत असा त्यांचा अट्टहास होता. त्यासाठी विविध योजना सुरूकरूननवीन पिकांच्या लागवडीचे अनेक प्रयोग केले.शेती प्रदर्शने भरवून शेतकऱ्यांमध्ये शेतीविषयी गोडी निर्माण केली.विज्ञान प्रदर्शने भरवून शेतकऱ्यांना विज्ञाननिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला. शेती प्रदर्शने पाहण्यासाठी शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात यावा म्हणून हत्तीच्या झुंजी, कुस्त्यांचे फड व मर्दानी खेळाचे सामने भरविले. शेतीतील विविध वाणाची रोपे करून त्यातूनअनेकबागा तयार करविल्या.आंबा, फणस, साग, काजू, जांभूळ, ताग आदि. पिकांच्या बागा लावण्यासप्रत्यक्ष साहय व प्रोत्साहन दिले.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जैवविविधता संरक्षण धोरणाचा अभ्यास करणे.
2. छत्रपती शाहू महाराजांच्या जलनीती व वृक्षसंवर्धन या कार्याची माहिती घेणे.
3. शाहू महाराजांचे पर्यावरण संवर्धन विकासातील योगदान स्पष्ट करणे.

**गृहितके-** 1. छत्रपती शाहू महाराजांचे जैवविविधता संरक्षण धोरण देशाला दिशा देणारे आहे.

2. छत्रपती शाहू महाराजांचे जलव्यवस्थापन आजही मार्गदर्शक आहे.

**मुख्य व सुचक शब्द-**अभयारण्ये, जलसिंचन, वन्यजीव, जलप्रदूषण, पाणलोट, उद्योग, हरीतक्रांती, जलक्रांती,विज्ञाननिष्ठ.

**संशोधन पध्दती-** प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये महत्वपूर्ण अशी प्राथमिक व दुय्यम साधने वापरली आहेत. याबरोबरच वृत्तपत्रे, मासिके, वार्षिक अहवाल या साधनांचाही वापर करण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण-I.आदर्श जलनीती-** शाहू महाराजांचा जलनीतीचा दृष्टकोन श्रेष्ठ असा आहे. जलसिंचनाशिवाय शेतीचा विकास होणार नाही म्हणून कोल्हापूर संस्थानात इ.स. 1902 साली सार्वत्रिक पाढबंधारे धोरण जाहीर केले. या धोरणाच्या माध्यमातुन शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये एक भव्य योजाना आणली ती म्हणजे कोल्हापूरच्या पश्चिमेस सह्याद्री घाटात भोगावती नदीचा जलप्रवाह वाहतो त्याचा उपयोग शेतीसाठी करता येईल म्हणून धरणाची आखणी केली. हे राधानगरी धरण म्हणजे कोल्हापूरची जीवनदायी ठरली. या धरणाच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानात हरित क्रांतीलाखऱ्या अर्थाने सुरूवात झाली. हे राधानगरी धरण म्हणजे कोल्हापूरची जीवनदायी ठरली. राधानगरी धरण बांधून हरीत क्रांतीचा पाया रचला. कोल्हापूर-गैबी खिंड व निपाणी-फोंडाघाट या रस्त्याच्या बाजूने भोगावती नदी वाहते त्यातील एका जागेवर राधानगरी धरण बांधले. कोल्हापूरपासून 31 मैल अंतरावर असलेल्या धरणाची लांबी2600 फूट व उंची 110 फूट निश्चत करण्यात आली. या धरणाचे पाणलोट क्षेत्र 38.225 ची मैलाचे गृहीत धरण्यात आले. या जलशयाला 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव'असे नाव देण्यात आले. शाहू महाराजांनी संस्थानातील अनेक ठिकाणी तळी व तलाव बांधले त्यांनी निर्माण केलेले राधानगरी धरण हा तर जलक्रांतीचा पायाच आहे. शाहू महाराजांनी तळी, तलाव बांधण्याबरोबरच त्यांच्या संरक्षणाची व सर्व सामान्यांच्या सार्वजनिक आरोग्याची काळजी घेतलेली होती.

**तलाव प्रदुषण बाबतीतील निर्णय:** शाहू महाराजांनी संस्थानातील तलाव प्रदुषणा बाबतीतील करवीर सरकारच्या ठरावा प्रमाणे दि. 25 जून 1895 रोजी तमाम लोकांना कळविण्या करिता प्रसिध्द करण्यात येत आहे की, "कळंबा तलावात लोक स्नान करतात, जनावरे घालतात, कपडे धुतात यामुळे तलावाचे पाणी खराब होते.सबब सदरहू कळंबा तलाव भरपूर भरला म्हणजे जी पाण्याची मर्यादारेषा राहते त्या रेषेपासून आणखी पलीकडे 400 वारावर दुसरी रेषा काढली असता जशी निघेल त्या रेषेचे आतील तलावाच्या सर्व भागास डिस्ट्रिक्ट पोलीस ऍक्ट 7 कलम 31 हे लागू करण्यात आले आहे". त्यांचा हा निर्णय क्रांतीकारी होता.त्यांनी इ.स. 1921

साली शिरोली येथील तलावात घाण करू नये असा ठराव केला होता. शाहू महाराजांनी दि.16 जुलै 1895 रोजी विहिरी संदर्भात ठराव केला होता तमाम लोकांना कळविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे की, "ठाणे हिरणीपैकी मौजे कलविकट्टे येथील सर्वे नं 126 यात सार्वजनिक लोकांची पाणी पिण्याची विहिर आहे. त्या विहिरीचे पाणी स्नान करून, कपडे धुऊन खराब करून टाकले जाते. सदर ठिकाणी असे करण्यास मनाई करण्यात येत आहे". कळंबा तलावाला बांध घालण्यासाठी शाहू महाराजांनी मोठा खर्च केला होता. कळंबा तलावातून सायफान पध्दतीने पाणी जाण्यासाठी बांधण्यात आलेल्या छोटया कालव्यांच्या कमानी,पाण्याचा खजिना म्हणून ओळखला जाणारा जलकुंभ ही सारी शाहू महाराजांची जलसंवर्धनाची जिवंत शिल्पे आहेत.

**रंकाळा तलावाचे संरक्षण:** रंकाळा तलाव प्रदूषीत होऊ नये म्हणून शाहू महाराजांनी स्वतंत्र धुण्याच्या चाव्या निर्माण केल्या. दगडी कट्टे बांधून 120 नळ येथे जोडण्यात आले. प्रत्येक नळाखाली दगडाचे एक कुंड व कपडे धुण्यासाठी मोठा घडीव दगड, अंघोळीसाठी 38 स्वतंत्र स्नानगृहे बांधण्यात आली. या ठिकाणी पाण्याचा वापर झाल्यानंतर या कुंडातील बाहेर पडणारे पाणी पाटाव्दारे शेतीला पुरवण्यात आले. या योजनेसाठी इ.स.1883 साली 25 हजार 740 रूपये एवढा खर्च आला.

**नदीचा घाट वाचविण्याचा प्रयत्न:** शाहू महाराजांनी दि.22 ऑक्टोंबर 1912 मध्ये जाहिरनाम्यात म्हटले आहे की,"नृरसिंहवाडी येथील कृष्णा, पंचगंगा संगमावरील घाटानजीक मळई जमिनी सरकारात घेऊन शेवरी लावून घाटाचा बचाव करण्यासाठी गाळ साचणे करीता वाढविणेचा आहे. कोल्हापूर संस्थानात नदी ओढयास शेतकरी लोक बंधारे किंवा धरणे घालून पाणी तुंबवितात अथवा नेहमीच्या प्रवाहाप्रमाणे जाण्यास बंदी करतात".त्यापासून सार्वजनिक अडथळा होण्याबाबत शाहू महाराजांनी नियम तयार केले होते.

**पाणी खराब होईल असे कृत्य करण्यासमनाई:** इ.स. 1907 साली कोल्हापूर शहरात प्लेगाची साथ आलेली होती. त्यावेळी कळंबा गावचे लोक शेतात झोपडीत राहतात. तेव्हा त्याच्या पिण्याच्या पाण्याची अडचण होते. त्यामुळे त्यांनी कळंबा तलावातून घागरी भरून पाणी नेण्याकरीता परवाणगी मागितलेली होती. त्यावेळी पाणी न्यावे परंतु तलावात भांडी, कपडे वगैरे काही एक धूवू नयेत असा नियमकरण्यात आला. कोल्हापूरातील पंचगंगा नदीच्या घाटावर व नदीत ठिक-ठिकाणी लोक धुणे धुतात.त्यामुळे पाणी खराबहोते. जनावरे नदीत गेल्याने पाणी खराब होते. यासाठी महाराजांनी इंजिन लावून पाणी काहिलीत काढून लोकांना वापरासाठीद्यावे असा हुकूम काढला होता.

**जलप्रदूषण करण्यास सक्त मनाई:** जलप्रदूषण होऊ नये म्हणून शाहू महाराजांनी ठोस पावले उचलली होती. त्यासंबंधी दि.18 सप्टेंबर 1906 रोजीचा जाहीरनामा पुढीलप्रमाणे "तमाम लोकांस कळविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येते की कोल्हापूर शहरातील कपिलतीर्थ मुजविले होते. त्या अलीकडे विहिर काढण्यात येऊन त्या विहिरीचे पाणी सार्वजनिक पिण्याकरीता उपयोग करीत आहोत. यासाठी सदरहू विहिरीचे पाण्यात अगर विहिरीचे नजिक 10 फुटात स्नान करण्याचे, कपडेधुण्याची, खरकटे, निर्माल्य, गणपती किंवा दुसऱ्या असल्या मुर्ती व पिंड वगैरे टाकण्याची किंवा अन्य रीतीने पाणी खराब होईल असे करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. सदरहू असे वर्तन ज्यांच्याकडून होईल त्याजवर कायद्याप्रमाणे खटला भरण्यात येईल.

**खतामुळे पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून उपाययोजना:** शाहू महाराजांनी दि.27 जुन 1905 रोजी जाहीरनामा काढून अतिग्रे येथील तलावासंदर्भात सूचना केल्या. त्यामध्ये तलावापासून 200 यार्डाचे अतील जमिनीस सोनखत किंवा दुसरे एखादे घाणखत घालणे मना करण्यात आले आहे. हे सर्वांना माहित व्हावे.

**रयतेलाजगवा, जनावरांनाजगवा:** दुष्काळाचा तोटा सर्वसामान्य शेतकऱ्यांनाबसू नये म्हणून दुष्काळ काळात भास्करराव जाधव यांना दुष्काळ आयुक्त म्हणून नेमले व रयतेची काळजी घेतली. दुष्काळात रयतेकडे लक्ष देण्यासाठी खास असे खाते व अधिकारी नियुक्त केले. दुष्काळ काळात धरणे, तळी, विहिरी आदि कामे करून शेती कसण्याकडे लक्ष दिले. छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानातील रयतेसाठी स्वतः सरकार दरबारातून धान्याची दुकाने काढली. शेतकऱ्यांना सारा माफी देवून जणावरांच्या चारा पाण्याची व्यवस्था केली. 'खजिना रिकामा करा, शेतकऱ्यांना जगवा, जनावरांना जगवा'असा आदेश दिला .

**धरणे, तळी, विहिरी पाणीदार:** राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानासाठी स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून त्यावर त्यांनी इरिगेशन ऑफिसरची नेमणुक केली. या खात्यामार्फत प्रत्येक गावाची बंधाऱ्याच्या दृष्टीने तपशीलवार पाहणी केली. नव्या विहिरी, तलाव, बंधारे निर्माण करण्यात आले. इ.स. 1896 च्या दुष्काळीची झळ एकाही शेतकऱ्यालाबसू दिली नाही. दुष्काळामध्ये माणसाच्या अन्न-पाण्याची व जनावरांच्या वैरण चाऱ्याची उत्तम सोय केली. जलसिंचन विभागामार्फत शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी तसेच पिण्यासाठी पाणी व जनावरांना पाणवठे आदि. ची सोय केली. संस्थानातील विहिरी, तळी, तलाव यांचा शोध घेऊन त्यामधील गाळ काढण्याची व्यवस्था करून विहिरी व तळे जास्तीत जास्त पाणीदार केली.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**वन्यजीव संरक्षण:** शाहू महाराजांनी खास राखीव जंगले निर्माण करण्याची परंपरा निर्माण केली. वन्यजीवांच्या प्रजनन काळात शिकारी केल्या नाहीत. त्यामुळे राखीव जंगलातील प्राण्यांचे संगोपन आणि संवर्धन झाले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दाजीपूर अभयारण्य जे गव्यासाठी प्रसिध्द आहे. संपूर्ण भारतभर स्वातंत्र्यानंतरही अशी जंगले टिकून राहिली आहेत. ती आज त्या-त्या प्रांतातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये बनली आहेत .

**चित्त्याच्या पैदाशीचा प्रयोग:** शाहू महाराजांनी रायबाग येथे पशुनिपज केंद्र उभारले होते. या ठिकाणी बंदिस्त जागेत चित्त्याच्या पैदाशीचा प्रयोग केला. कोल्हापूरजवळ सोनतळी येथे महाराजांनी जनावरांच्या पैदाशीसाठी पॅडॉक उभे केले. त्यामध्ये विविध प्राणी आणि पक्षांमधील संकर घडवून आणले. घोडा आणि गाढव यांच्या संकरातून खेचाराच्या काही जातीही तयार केल्या होत्या. ज्यामध्ये अशाच पध्दतीने सोनतळी येथे उत्तम जातिवंत घोड्यांच्यापैदाशीसाठी स्टड फार्म उभारला होता. शाहू महाराज वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनाबाबतही सजग आणि आग्रही होते. त्यासाठी त्यांनी विविध कायदे बनवून वेळो-वेळी त्यांचे काटेकोर पालन केले होते.

**शिकारीसाठी केलेले कायदे:** शाहू महाराजांनी शिकारी विषयी तसेच पाळीव प्राण्यांविषयी कडक कायदे-कानून बनविले होते. शिकारीचा पास असल्याशिवाय शिकारी जनावरे मारण्यास सक्त मानाई होती. दि.26 मे 1902 च्या जाहीरनाम्यात करवीर इलाख्यातील कोणत्याही प्रकारची शिकार पासाशिवाय करावयाची नाही.ज्यास लहान अगर मोठी कसलीही शिकार करावयाची असेल त्यांनी त्या-त्या प्रकारची शिकार करणेबद्दल पास घेतल्यावर करावयाची आहे. हा पास दरवर्षी नविन घ्यावा लागत असे. पास परवाणगी शिवाय शिकार केल्यास कलम 188 प्रमाणे कानून चालविण्यात येईल अशी नोंद आहे. महादू जिवबा पाटील बिगरपासी राधानगरी येथील डुक्कर मारले होते. त्याचेवर दि.18 जुन 1910 रोजी जंगल कानून कायद्याप्रमाणे खटला चालून त्यास 7 रूपये दंड केला होता. बिगरपासी बंदूक असल्याने ती सरकारात जमा करून घेतली होती.

**हत्ती महाल:** शाहू महाराजांच्या कालखंडात वाघ, हत्ती, गवा, बिबटया किंवा इतर जंगली प्राणी मानवी वस्त्यात तसेच शेतामध्ये येऊन नुकसान करणाऱ्या घटना घडत होत्या. त्यासाठी त्यांनी योग्य उपाययोजना केलेल्या होत्या. राधानगरी येथे गावाच्या हद्दीत हत्ती महाल बांधलेला होता. हत्तीमुळे लोकांना उपद्रव होऊ नये म्हणून त्या इमारतीच्या आवारातील जमिनी सरकारात घेतल्या होत्या.

**जंगल व्यवस्था सुरळीत:** इ.स. 1911 मध्ये एक जाहिरनामा काढण्यात आलेला होता. डुक्कर सोडून शिकारी जनावरे मारण्यास मनाई केली.याबरोबरच शिकारी जंगलात उनाड जनावरे चरताना आढळल्यास अतिक्रमण केल्यास जंगल कायदा कलम 52 प्रमाणे दुप्पट दंड आकारण्यात आला होता. म्हणजेच जंगल व्यवस्था सुरळीत चालून लोकांमध्ये चांगली दहशत निर्माण होईल.

**अभयारण्ये:** हत्ती, घोडे, चित्ते या प्राण्यांवर शाहू महाराजांचे मोठे प्रेम होते. सर्वात वेगवान प्राणी चित्ता कायम महाराजांच्या आजूबाजूला वावरत असे. शाहू महाराजांनी पश्चिमेकडील सहयाद्रीच्या घाटात अनेक जंगले अभयारण्ये म्हणून राखीव ठेवली होती. दाजीपूर अभयारण्य हे गव्यासाठी प्रसिध्द आहे. वाघ, गवे, सांबरे, अस्वले, काळवीट, हरीण, ससे, रानडुक्कर तसेच इतर अनेक स्थलांतरित प्राणी आणि पक्षी अभयारण्यात सुरक्षित होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी चिप्री पार्क, कात्यनी पार्क, रेंदाळ पार्क उभे केले होते. या पार्कसाठी ज्या जमिनी लोकांकडून घेतल्या होत्या त्याचा योग्य मोबदला देण्याचा हुकूम दिला होता. चिप्री पार्कमध्ये हरणे वगैरे शिकारी जनावरे सोडून जंगल वाढविण्याचा आदेश शाहू महाराजांनी दिला होता. तसेच बऱ्याचदा या पार्कमधील होणारी हरणांची बेकायदा शिकार रोखण्यासाठी 25 रूपये दंडाची व्यवस्था केलेली होती. अभयारण्य म्हणजेकोलिक येथील शिवारण्य हे सुंरक्षित जंगल होय. या जंगलातील प्राण्यांनी त्यांच्या सीमेबाहेर जाऊ नये म्हणून 30 मैल लांबीचा 12 फूट रूंद आणि 15 फूट खोलखंदक तयार करून घेतला होता. या अभयाराण्याला किल्ल्यासारखे स्वरूप असून त्यास दोन प्रवेशव्दारे होती. याच अभयारण्यात महाराजांनी परदेशातून आणलेले रानहत्ती वास्तव्यास होते. या अरण्यात वन प्राण्यांना पाणी पिण्यासाठी सुसज्ज असा तलाव बांधण्यात आलेला होता. शाहू महाराजांनी इ. स. 1894 मध्ये बालिंगा येथील 8 एकर जमीन वनौषधी बाग करण्यासाठी फोरेस्ट ऑफिसच्या ताब्यात दिली होती तसेच कात्यायनी येथे बोटॅनिकल पार्क देखील शाहू महाराजांनी निर्माण केले होते.

**जंगल संरक्षण:** शाहू महाराजांनी वन्य प्राण्यांसाठी जंगले राखीव ठेवलेली होती.त्यांनीजंगलाच्या संरक्षणासाठी जंगलाचे दोन प्रमुख विभाग केले होते. संरक्षित जंगल व राखलेले जंगल असे ते दोन भाग होते. संरक्षित केलेल्या जंगलामध्ये फोरेस्ट ऑफिसरने जाहिरात काढल्यावरच फुले, फळे, पाने, गवत,कंद काढण्यास परवणगी होती.राखीव किंवा राखलेल्या जंगलात फोरेस्ट ऑफिसच्या परवाणगीशिवाय कोणतेही कृत्य करण्यास मनाई होती. तसेच आग लावणे, विस्तव पेटवणे यासारख्या कृत्यास पूर्ण बंदी होती. संरक्षित राखीव जंगलाचे जर कोणी नुकसान केले तर कोर्ट जी शिक्षा देईल त्याखेरीज सहा महिने दंड व500 रूपये दंड किंवा दोन्ही शिक्षा एकाच वेळी दिला जात असत अशी तरतूद केली होती. या संदर्भात राजर्षी शाहू महाराजांनी इ.स. 1900 साली जाहीरनामा

काढला होता "रस्त्याच्या बाजूची झाडे, फांद्या, पाने, शिरी, मुळया, कोंब हे ज्या खात्याच्या ताब्यात आहे त्यांची लेखी परवाणगी घेतल्याशिवाय कोणी तोडले किंवा झाडांची वाढ खुंटेल असे कृत्य केले तर तो व्यक्ति शिक्षेस पात्र ठरत असे. त्याचबरोबर रस्त्याचे बाजूची वगैरे झाडांचे रक्षण ती झाडे ज्या गावकऱ्यांचे हद्दीत असतील त्या गावकऱ्यांनी आणि तालुक्याचे अधिकारी यांनी नजर पुरवून करावी असा हुकूम व्हावा व त्या संबंधी अफरातफर झालेस त्यास जबाबदार धरावे" असा हुकूम काढला.

**जंगल संरक्षणासाठी बक्षीस योजना:** जंगल संरक्षणामध्ये जनतेने उस्फुत सहभाग घ्यावा म्हणून शाहू महाराजांनी जंगल सुधारणा कामात जर एखाद्या व्यक्तीने मदत केली तर त्याला 50 रूपये किंमतीची लाकडे बक्षीस देण्याचा नियम केला होता. पन्हाळा येथील घाणेरी तोडण्याची परवाणगी झाडे तोडणाऱ्या ठेकेदाराने महाराजांकडे मागितली त्यावेळी महाराजांनीपुढील प्रमाणे निकाल दिला. तो म्हणजे "सदरहू जातीची झाडे तोडू द्यावीत परंतु ती झाडे तोडताना इतर झाडे तुटणार नाहीत याचा बंदोबस्त ठेवावा."

**परवाना पास:** शाहू महाराजांनी परवाना पासची व्यवस्था केलेली होती. त्यांनीइ.स. 1912 साली तोरगल जहागिरीतील जंगलाच्या संरक्षण व्यवस्थेचा ठराव केला होता. जंगलाचे नुकसान होऊ नये म्हणून त्या परीसरातील लोकांना परवाना पास दिला होता. लाकूड विक्रीवर ज्याचा उदयनिर्वाह आहे. अशा लोकांना पास दाखवूण लाकूड घेण्याची परवाणगी होती. हद्दीबाहेर लाकूड जाणार नाही याची व्यवस्था केलेली होती. आणि नेल्यास योग्य मोबदला घेण्यास सांगितले होते. गावाचे पाटील, कुलकर्णी तसेच जहागिरीतील नोकर यांना या सर्वावर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आलेले होते.

**वृक्षारोपन:** राजर्षी शाहू महाराजांनी जातिबा डोंगरावर भक्तांना सावली मिळावी म्हणून अनेक झाडे लावली. या झाडांना पाणी मिळावे म्हणून विशेष खर्चासाठी दि. 3 डिसेंबर 1907 च्या आदेशानुसार 87 रूपये मंजूर केले. महाराजांनी झाडांच्या देखभालीसाठी व रक्षणासाठी पगारी लोकांची नेमणूक केलेली होती. रस्त्यावर विविध प्रकारची झाडे लाऊन वनराई निर्माण केलेली असे .यातून झाडे लावा झाडे जगवा ही मोहीम यशस्वीपणे राबविली जातअसे.महत्वाचे म्हणजे ज्या त्या गावातील हद्दीतील झाडांच्या संरक्षणासाठी त्या गावातील पोलीस पाटील यांच्यावर ती जबाबदारी सोपविली होती.

**विविध पिकांची लागवड:** कोल्हापूरमध्ये आधुनिक शेतीची पेरणी करीत असताना चहा, कॉफी, रेशीम, वेलदोडे, कोको, रबर, ताग, अंबाडी, बटाटे, लाख, कंबोडियन कापूस या पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केले. पन्हाळा व भुदरगड भागात चहाची, व कॉफीची लागवड करण्यात आली.

**झाडांचे संरक्षण:** शाहू महाराजांनी नविन झाडे लावण्याबरोबरच जुन्या झाडांचेही चांगल्या प्रकारे संरक्षण केले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोल्हापूर शहरात कळंबा तलावाचे पाणी पाटाने यायचे या पाटामध्ये झाडांच्या मुळया आल्या होत्या त्या विषयी सांगितले की,"झाडाच्या मुळया तोडल्यातर त्या पुन्हा पाटात येणार आणि झाडे तोडून उपयोग नाही त्यासाठी पाटात लोखंडी नळे घालणे सोईचे होईल" यातून झाडाचे संरक्षण होईल .

**संरक्षित वने:** शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या पूर्व बाजूला ससे, हारणे, रानकोंबडे, रानडुकरेआदि. प्राण्यांसाठी संरक्षित वने तयार केली होती. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपतीशिवाजीमहाराजांचे धोरण पुढेचालू ठेवून शिवअरण्यासाठी जंगल राखीव ठेवले.कोणत्याहीजंगलासआगलावूनयेम्हणूनवनरक्षकाच्यानेमणुकाकेल्याहोत्या .

**सारांश:** राजर्षी शाहू महाराजांचे जैवविविधतेचे धोरण आजही नवी दृष्टी देणारे आहे. आजच्या काळात ही शाहू महाराजांनी केलेले विविध प्रयोग,अनेक कायदे आणि नियमांची अंमलबजावणी केल्यास भारतातील वनसंपदेचे क्षेत्र वाढून वन्यजीवांचे संरक्षण होण्यास नक्कीच मदत होईल. म्हणूनच शाहू महाराजांचे जैवविविधता संरक्षण धोरण महत्त्वपूर्ण आहे. अनेक प्रकारची झाडे लाऊन त्यांची चांगल्या प्रकारे जोपासना करावी त्यासाठी महाराजांचे विशेष लक्ष होते. त्यांनी वृक्ष लावणे, वृक्ष वाचविणे व त्यांची काळजी घेणे याकडे कटाक्षाने लक्ष पुरविले. संस्थानामध्ये विविध प्राण्यांची जोपासना केली जात असे व त्याची नेहमी काळजी घेण्यात येई. ठिक-ठिकाणी मोठ-मोठे तलाव व विहिरी निर्माण केल्या. तलावांची व विहिरींची दुरूस्ती केली. शाहू महाराजांनी पर्यावरण रक्षण, पाणी व्यवस्थापन, वृक्ष संवर्धन, प्राणी संवर्धन या घटकांकडे विशेष लक्ष दिले. शाहू महाराज निसार्गाचे व पर्यावरणाचे अतिशय काटेकोरपणे पालन करीत होते म्हणून त्यांचे जैवविविधता संरक्षण धोरण आजही सर्वश्रेष्ठ आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

1. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, 1913.
2. शिवाजी विद्यापीठ, श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, व्याख्याते धनंजय कीर, कोल्हापूर, 1970.
3. साळुंखे पी. बी [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, 2016.
4. कठारे दु. म. [संपा], लोकराजा राजर्षी, लातूर, 2018.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

5. जाधव रमेश [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, 2016.
6. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, 1913.
7. संगवे विलास व खणे बी. डी, राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स [खंड 2] .
8. संगवे विलास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कार्य व प्रभाव, कोल्हापूर, 2007.
9. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, 2001 .
10. नाईक तु. बा, छत्रपती शाहू महाराज, पुणे, 2005.
11. सुर्यवंशी कृ. गो, राजर्षी शाहू राजा व माणूस, पुणे, 1984.
12. धटावकर भास्कर [संपा], राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, मुंबई, 1988.
13. फडके य. दि, शाहू छत्रपती आणि लोकमान्य, पुणे, 1982.
14. जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, पुणे, 1997 .
15 .पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, कोल्हापूर, 2013.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

04

# राजर्षी शाहू छत्रपती यांचे दळणवळण विषयक विचार

**डॉ. संतोष अभिमन्यू जेठीथोर**
सहयोगी प्राध्यापक व प्रमुख इतिहास विभाग
डी. आर. माने महाविद्यालय, कागल

---

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याव्दारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहूमहाराज होत. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्वाच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता, या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य राजर्षी छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, आखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा, बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व सर्व समाजालाही या कर्तव्याच्या अनुरोधाने मार्गदर्शन केले. आपल्या कार्याविषयी होणारी प्रचंड टीका त्यांनी निर्भयपणे सहन केली. पण आपल्या ध्येय धोरणात व कार्यपद्धतीत बदल केला नाही. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना असामान्य व्यक्तिमत्वाचा, बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून लोकप्रियता मिळाली. त्यांनी आपल्या संस्थानात आर्थिक पाया भक्कम करण्याच्या दृष्टीकोनातून अनेक पायाभूत सुधारणा केल्या. त्यांनी दळणवळण सुधारणेच्या व्यवस्थेला प्राधान्य दिले. कोल्हापूर संस्थानाला अनेक राज्याशी जोडून व्यापार वृद्धी करण्याचा प्रयत्न केला. असे हे दळणवळण विषयक धोरण कसे होते. ते गतिमान करण्यासाठी कोणते प्रयत्न केले ? त्यासाठी निधीचा पुरवठा कसा केला ? यातून त्यांची दूरदृष्टी काय होती ? हे मांडण्याचा प्रयत्न मी या शोधनिबंधातून केला आहे. यासाठी राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य , श्रीशाहूंचे चरित्र, राजर्षी शाहू वसा आणि वारसा या ग्रंथाचा वापर केला आहे.

**राजर्षी शाहू पूर्वकालीन कोल्हापूर राज्याची स्थिती -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून मराठी माणसा मध्ये अस्मिता व स्वातंत्र्यप्रेम निर्माण केले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या वडिलांचे विचार पुढे नेऊन प्राणपणाने हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. छत्रपती संभाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने रायगड जिंकून येसूबाई व पुत्र शाहू यांना कैदेत ठेवले. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांचे धाकटे पुत्र राजाराम महाराज यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मोगलांशी जिद्दीने संघर्ष सुरु ठेवला.छत्रपती राजाराम महाराजांचे इ.स. १७०० मध्ये अकाली निधनानंतर स्वराज्याच्या कारभाराची व संरक्षणाची जबाबदारी महाराणी ताराबाई यांच्यावर पडली. यावेळी त्यांचे वय २५ वर्षाचे होते. ऐन तारुण्यात वैधव्याचे दु:ख बाजूला ठेवून सर्वात बलाढ्य मोगल सत्ताधीश औरंगजेब याच्याशी सतत ७ वर्षे संघर्ष केला. त्यामुळे महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाला अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झाले.[१] औरंगजेब बादशहा १७०७ साली मृत्यू पावला. त्यामुळे येसूबाई व शाहू यांची मोगलाचे मांडलिकत्व स्वीकारण्याच्या अटीवर सुटका केली. शाहूराजे स्वराज्यात आल्यावर महाराणी ताराबाई व त्यांच्यात यादवी सुरु झाली. पुढे खेडच्या लढाईत ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला. पुढे वारणेच्या तहानुसार मराठा राज्याचे दोन राजधानीत विभाजन झाले. कोल्हापूरची गादी महाराणी ताराबाई यांच्याकडे तर सातारची गादी शाहूराजे यांच्याकडे आली.[२]

१७१४ साली ताराबाईंच्या सवतीचे पुत्र संभाजी महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले. त्यांच्या राणी जिजाबाई या मोठ्या कर्तबगार होत्या, स. १७६० साली पुण्याच्या नानासाहेब पेशव्याने कोल्हापूर राज्य गिळंकृत करण्याचा कुटिल डाव रचला होता. तो या राणीने लष्करी पराक्रमाने उधळून लावला. त्यांच्याच कारकिर्दीत ब्रिटिशांनी कोल्हापूर राज्याची कुरापत काढून पश्चिम किनाऱ्यावरील सिंधुदुर्ग किल्ला काबीज केला. तो जिजाबाईंनी मुत्सद्देगिरीने परत मिळवला. पण त्या प्रसंगाने ब्रिटिशांचा कोल्हापूर राज्यात चंचुप्रवेश झाला. त्यांना आपल्या वखारी उघडण्याची परवानगी मिळाली. पण एवढ्यावरच ते समाधानी नव्हते. कोल्हापूरचे राज्य आपल्या प्रभावाखाली आणण्यासाठी ते काही ना काही निमित्त सतत शोधत राहिले. कोल्हापूरकरांना निपाणीकर देसाईंच्या हल्ल्यांचा सतत त्रास होत होता. तेव्हा त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांनी ब्रिटिशांची मदत घ्यायची ठरवले. यावेळी कोल्हापूरच्या गादीवर दुसरे शिवाजी महाराज होते. त्यांच्याशी ब्रिटिशांनी स. १८१२ साली सहकार्याचा करार केला. त्यान्वये त्यांनी किनाऱ्यावरील

सिंधुदुर्ग आदी किल्ले मिळवलेच, शिवाय ब्रिटिशांच्या सल्ल्याशिवाय छत्रपतींनी कोणाशी लढाई करू नये, तसाच प्रसंग उद्भवला तर ते प्रकरण ब्रिटिशांकडे सोपवावे, अशीही अट त्यांनी त्यांच्यावर लादली. या अटीच्या कलमाने कोल्हापूर राज्याचे सार्वभौमत्व प्रथम लयास गेले. १८२६ साली ब्रिटिशांनी कोल्हापूर राज्याच्या लष्करावर मर्यादा घातल्या आणि लवकरच १८२९ साली आणखी एक करार लादून, "यापुढे छत्रपतींचा कारभार चांगल्या प्रकारे चालविला जावा म्हणून कंपनी सरकारच्या पसंतीने एका योग्य अधिकाऱ्याची नेमणूक केली जाईल. त्यास कारभारासंबंधी मुखत्यारी देण्यात येईल," असे कलम जारी केले. या करारान्वये कोल्हापूरकर छत्रपतींच्या लष्करी व मुलकी अशा दोन्ही क्षेत्रांतील कारभाराची मुख्य सूत्रे इंग्रज कंपनी बहादूरांच्या हाती गेली.[३]

१८४४ साली कोल्हापूर राज्याच्या कारभारावर ब्रिटिशांनी आपल्या वतीने दाजो कृष्ण पंडित यांची प्रमुख कारभारी म्हणून नेमणूक केली. दाजी कृष्णांच्या कारकिदांतच कोल्हापूर राज्यातील गडकऱ्यांनी उठाव केला. तो शिताफीने मोडून काढून ब्रिटिशांनी नवी व्यवस्था स्थापन केली. त्या अन्वये कोल्हापूर राज्यात एक 'पोलिटिकल सुपरिटेंडेंट' नेमण्याचे व त्याच्या हाती राज्याचे मुलकी व लष्करी अधिकार देण्याचे ठरविले. या वेळी छत्रपती बाबासाहेब महाराज अल्पवयीन होते. तेव्हा ते वयात येईपर्यंत कोल्हापूरचा सर्व कारभार पोलिटिकल सुपरिटेंडेंटच्याच हाती राहणार होता. मेजर ग्रॅहॅम हा कोल्हापूरचा पहिला पोलिटिकल सुपरिटेंडेंट म्हणून नियुक्त झाला- (स. १८४५). पुढे १८६१ साली पोलिटिकल सुपरिटेंडेंटचे पद 'पोलिटिकल एजंट' मध्ये रूपांतरीत झाले. बाबासाहेब महाराज वयात आल्यावर १८६४ साली त्यांना कारभाराची मुखत्यारी दिली गेली, पण जेमतेम दोन वर्षे त्यांनी ती उपभोगली असेल नसेल तोच त्यांचे निधन झाले. त्यांच्यानंतर अल्पवयीन राजाराम महाराज गादीवर बसले. म्हणजे पुन्हा सर्व कारभार ब्रिटिशांच्या हाती गेला (स. १८६६). राजाराम महाराजांच्या रूपाने कोल्हापूरला एक सुज्ञ व जाणता राजा मिळण्याची परिस्थिती निर्माण होत असतानाच दुर्दैवाने त्यांचा युरोपच्या दौऱ्यावर असता इटलीतील फ्लॉरेन्स शहरी मृत्यू झाला (स. १८७०). कोल्हापूरचा कारभार पूर्ववत ब्रिटिशांच्या हाती राहिला. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर दुर्दैवी चौथे शिवाजी महाराज गादीवर आले (स.१८७१). त्यावेळी ते नऊ वर्षांचे होते. म्हणजे कोल्हापूरचा कारभार ब्रिटिशांनी नेमलेल्या कारभाऱ्यांमार्फतच चालू राहिला. त्यावर माधवराव बर्वे ह्या अत्यंत कडव्या व अहंमन्य ब्राह्मण अधिकाऱ्याची 'दिवाण' म्हणून नेमणूक केली गेली होती. चौथ्या शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीची शेवटची वर्षे कोल्हापूर दरबारातील कटकारस्थानांनी गाजली. छत्रपतींना मनोरुग्ण ठरवून त्यांना अहमदनगर किल्ल्यात डांबून ठेवले गेले. तिथेच ब्रिटिश सोजीरांच्या अत्याचारांत त्यांचा हृदयद्रावक अंत घडून आला (डिसेंबर १८८३). तत्पूर्वीच १८८२ मध्ये 'रीजन्सी कौन्सिल'ची स्थापना होऊन बाबासाहेब महाराजांचे भाचे, फ्लॉरेन्सला निधन पावलेल्या राजाराम महाराजांचे मावस बंधू व कागलच्या थोरल्या पातीचे जहागीरदार जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे हे 'रीजंट' म्हणून नेमले गेले होते. याच आबासाहेब घाटग्यांचे थोरले पुत्र यशवंतराव हे १७ मार्च १८८४ रोजी 'शाहू छत्रपती महाराज' म्हणून कोल्हापूरच्या गादीवर आले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांना कोल्हापूर संस्थानच्या कारभाराची अधिकार प्राप्ती झाली.

असा हा थोडक्यात शापूर्वकालातील कोल्हापूर राज्याचा इतिहास होता. १९व्या शतकाच्या प्रारंभी सार्वभौम असणारे कोल्हापूरचे राज्य आस्ते आस्ते ब्रिटिश साम्राज्य- सत्तेच्या प्रभावाखाली जाऊन ५०-६० वर्षांच्या अवधीत ब्रिटिशांचे एक मांडलिक संस्थान बनले. कोल्हापूरचे दुर्दैव असे, की शाहूपुर्वकालात अर्धशतकाहून अधिक काळ अल्पवयीन राजांच्याच कारकिर्दी झाल्या. त्यामुळे ब्रिटिशांनी नेमलेले दिवाण, रीजेंट अथवा कौन्सिल यांच्याच हाती कोल्हापूरचा कारभार राहिला. आपला राजा गादीवर बसून खरेखुरे राज्य करतो आहे, असे दृश्य कोल्हापूरच्या प्रजाजनांनी पन्नास वर्षे पाहिलेच नव्हते. त्यांच्या दृष्टीने हे अर्धशतक म्हणजे एक काळोखे पर्वच ठरले होते. [४]

**राज्यारोहण आणि लोककल्याणकारी कामाची सुरुवात**

शाहू महाराजांचे ब्रिटिशांनी योजल्याप्रमाणे शिक्षण/प्रशिक्षण संपले होते. आता ते सज्ञान होऊन कोल्हापूर राज्याचा त्यांच्याकडे सर्वाधिकार सोपविण्याचा समय आला होता. त्या दृष्टीने ब्रिटिशांनी सर्व तयारी करून शाहू महाराजांच्या राज्यारोहणाचा म्हणजे राज्याधिकार प्राप्तीचा दिवस २ एप्रिल १८९४ असा ठरवला. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड हॅरिस त्यासाठी खास कोल्हापूरला आले होते. त्यांनी २ एप्रिल रोजी भरवलेल्या खास दरबारासाठी दक्षिणेतील राजेरजवाडे व जहागीरदार, कोल्हापूरचे सरदार व जहागीरदार, प्रतिष्ठित वतनदार, ब्रिटिश अधिकारी व स्त्री-पुरुष आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती यांना पाचारण करण्यात आले होते. या सर्वांच्या उपस्थितीत शाहू महाराजांचे राज्यारोहण झाले. कोल्हापूरच्या प्रजाजनांचा राजा राज्याचा खराखुरा अधिकारी झाला. जवळ जवळ पन्नास वर्षे अशा राजाला पाहावयास प्रजानन आतुर झाले होते. खुद्द लॉर्ड हॅरिस यांनीही आपल्या अभिनंदनपर भाषणात प्रजाजनांच्या या भावनेची दखल घेतली होती. केसरीचे संपादक लो. टिळक यांनीही या प्रसंगीच्या आपल्या अभिनंदनपर विशेष अग्रलेखात म्हटले होते, की हा दिवस म्हणजे कोल्हापूरच्या प्रजेस कपिलाषष्ठीचा अपूर्व योग आहे. कोल्हापूरचे राज्य म्हणजे

भारतातील इतर संस्थानांप्रमाणे एक संस्थान नव्हते. येथे महाराष्ट्राची अस्मिता असणाऱ्या शिवछत्रपतींच्या वंशजांची गादी होती. त्यामुळे महाराष्ट्राचे स्वाभाविक पुढारीपण या गादीवरील छत्रपतींकडे जाते आणि त्या दृष्टीने छत्रपतींचीही मराठी माणसांप्रत व देशाप्रत काही कर्तव्ये आहेत अशी भावना त्या काळात लो. टिळक, प्रो. गोपाळ कृष्ण गोखले आदी महाराष्ट्रातील प्रमुख विचारी पुरुषांकडून व्यक्त झालेली आढळते. [५]

**राज्यारोहण प्रसंगीचा प्रजेला उद्देशून काढलेला जाहीरनामा**

शाहू महाराजांनी राज्यारोहण प्रसंगी आपल्या प्रजेला उद्देशून एक जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्याचा प्रारंभ "स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २२० विजयनाम संवत्सरे फाल्गुन वद्य ११, इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपती यांजकडून" अशा मायन्याने केलेला होता. त्यात म्हटले होते, "आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थानची हरएक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी, अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आमच्या पदरचे सर्व लहानथोर जहागीरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार, व्यापारी आदिकरून तमाम प्रजानन शुद्ध अंतःकरणापासून मोठ्या राजनिष्ठेने आम्हा साह्य करतील, अशी आमची पूर्ण उमेद आहे. ही आमची कारकीर्द दीर्घ कालपर्यंत चालवून सफल करावी, अशी मी त्या जगन्नियंत्या परमात्म्याची एकमावे प्रार्थना करितो."[६] उपरोक्त जाहीरनाम्याचा मायना मोठा अर्थपूर्ण होता. हिंदवी स्वराज्य संस्थापक शिवछत्रपतींच्या 'आज्ञापत्रा' चा हा मायना आहे. आपण शिवछत्रपतींचे वारसदार आहोत, आपल्या पाठीशी त्यांची पुण्याई आणि ऐतिहासिक वारसा आहे, हेच शाहू महाराजांना येथे सूचित करावयाचे होते. प्रजेचे सुख व कल्याण हेच "हिंदवी स्वराज्या" चे अंतिम ध्येय होते आणि तेच ध्येयधोरण महाराजांनी जाहीरनाम्याच्या शेवटी ईशप्रार्थनेत व्यक्त केले आहे.

**लोककल्याणकारी राज्यकारभाराची सुरुवात** -राज्यारोहण प्रसंगीच्या जाहीरनाम्यातील महाराजांची प्रजेच्या सुखाची व कल्याणाची भाषा ही औपचारिक भाषा नव्हती. ती महाराजांच्या हृदयांतरीची भावना होती. तिचा प्रत्यय राज्यारोहणानंतर अवघ्या १२ दिवसांनी काढलेल्या एका सरकारी आदेशात येतो. या आदेशाचा विषय रयतेच्या सुख-दुःखाशी निगडित होता. छत्रपती महाराजांच्या अथवा कोणाही बड्या इंग्रज अधिकाऱ्याचा मुक्काम स्वारी शिकारीनिमित्त एखाद्या पेट्यात होत असे, तेव्हा त्या ठिकाणची सरबराई करण्याचे काम पेट्याच्या मामलेदाराकडे असे. महाराज आपल्या आदेशात म्हणतात, "पेट्याचे मामलेदार त्या पेट्याचे फौजदारास सरबराई ठेवण्याबद्दल हुकूम करितात; फौजदार आपले ताब्यातील पोलिसाकडे हे काम सोपवितात. मग ते पोलीस सभोवारचे खेड्यापाड्यांत जाऊन एके ठिकाणी बकरी, दुसरे ठिकाणी अंडी, कोंबडी वगैरे जेथे जो जिन्नस सापडेल तो घेतात. हुजूरचे स्वारीचा त्या तालुक्यातून कूच होण्याचे वक्ती स्वारीबरोबर जो खाजगी खात्यातील कारकून कामगिरीवर असतो तो मामलेदार यांजकडून हिशेब घेतो आणि पोहोचल्या जिनसांबद्दल पैसा अदा करीतो. नंतर तो पैसा मामलेदार फौजदाराकडे, फौजदार आपले शिपायाकडे, शिपाई गावगन्नाचे पाटलांकडे आणि पाटील ज्या इसमाकडून जिन्नस घेतले त्या इसमास अदा करतात, असा काल्पनिक समज आहे; परंतु ज्या गोरगरीब इसमांकडून जिन्नस घेण्यास येतात, त्या इसमांस तो सर्व किंवा त्यांतील काहीतरी पैसा पोहोचतो किंवा कसे याजबद्दल वानवा वाटतो. असे होऊ नये व ज्या गोरगरिबांचा माल घेतला त्यास भरपूर पैसा पोहोचावा व आपल्या स्वारीच्या निमित्ताने कोणास उपसर्ग यत्किंचितही होऊ नये, अशी खुद्द श्रीमन्महाराज सरकार यांची इच्छा आहे. सबब खाली लिहिल्याप्रमाणे सामग्रीचा पुरवठा करण्याबद्दल नियम करण्यात येत आहेत.

१. गहू, ज्वारी, तांदूळ, डाळ वगैरे धान्ये, पीठ, साखर, मसाला वगैरे सामग्री खुर हुजूरचे मुदपाकखान्याकडे स्वारीचे लोकांकरिता लागेल ती यथाशक्य सर्व कोल्हापुराहून खासगी खात्याकडून नेण्यात यावी.

२. बकरी, कोंबडी, अंडी हे जिन्नस घेण्याकरिता स्वारी निघण्याचे अगोदर खासगीकडील मुद्दाम एक कामगार पाठविण्यात यावा. त्याने मुक्कामाचे ठिकाणानजीक जो बाजारचा गाव असेल त्या गावी बाजाराचे दिवशी जाऊन सर्व जिन्नस मालकास रोख पैसे जेव्हाचे तेव्हा जेथल्या तेथे देऊन घ्यावे. सर्पणाबद्दलची त्याचप्रमाणे आगाऊ तजवीज करावी, सामानाचे पैशाचा बटवडा करणे तो त्या वेळी मुलकी कामगार गावी हजर असल्यास त्याचे समोर पैसा आदा करून त्याची सही घ्यावी. तसा कोणी नसल्यास गावकामगार पाटील-कुलकर्णी यांचे समक्ष पैसा अदा करून मालकाची पावती घ्यावी व कामगाराची साक्ष घ्यावी..." वगैरे वगैरे.

अशाच प्रकारचा आदेश दोनशे वर्षांपूर्वी शिवछत्रपतींनी चिपळूणच्या छावणीतील शिपायांना उद्देशून काढला होता. छावणीसाठी दाणागोट्याची व गवतचाऱ्याची चोख व्यवस्था केली गेली होती. पण शिपाई त्यांची उधळमाघळ करू लागल्याचे कानावर आल्यावर महाराजांनी त्यांना खडसावले होते. उधळमाघळ करून ऐन पावसाळ्यात अन्नधान्याची व गवतचाऱ्याची वानवा होताच शिपाई रयतेच्या घरात घुसून जोरावरी करतील. आणि मग, महाराज म्हणतात, जे कुणबी घर करून जीवमात्र राहिले आहेत ते

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

परागंदा होतील, उपाशी मरायला लागतील, तेव्हा मोगलांह्न तुम्ही अधिक असा त्यांचा तळतळाट होईल. महाराजांनी पुढे बजावले आहे, की जो काही दाणागोटा, गवत अगर भाजीपाला लागेल तो बाजारात जाऊन वाजवी भावात खरेदी करावा. त्यासाठी कोणावर जुलूम करण्याची गरज नाही.

रयतेचे कल्याण हेच आपल्या कारभाराचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे, हो शिवछत्रपतींची भावना त्यांचे वंशज असणाऱ्या शाहू महाराजांच्या ठिकाणी दृग्गोचर व्हावी, ही इतिहासाची सुखद पुनरावृत्ती होती. [७]

**राजा म्हणजे निस्वार्थी रयतेचा सेवक** -आपणाला मिळालेला राज्याधिकार हा राजवैभव व राजविलास यांचा उपभोग घेण्यासाठी नसून तो आपल्या रंजल्या-गांजल्या प्रजाननांच्या; विशेषतः गरीब व अज्ञानी जनतेच्या उद्धारासाठी आहे, अशी राजाच्या 'उपभोगशून्य स्वामित्वा'ची जाण शाहू महाराजांच्या ठिकाणी राज्यारोहणाच्या क्षणापासून उत्पन्न झाल्याचे दिसून येते. राज्यारोहणापूर्वी कारभाराच्या प्रशिक्षणाचा एक आवश्यक भाग म्हणून महाराजांकडून त्यांच्या शिक्षकांनी संस्थानच्या सर्व भागांचा दौरा करवून घेतला होता. या दौऱ्यात खेड्यापाडयांतील, डोंगराळ मुलखांतील, गरीब रयतेची दयनीय अवस्था त्यांनी जवळून पाहिली होती. डोळस नजरेने त्यांनी रयतेच्या दारिद्र्धाचे दशावतार टिपले होते आणि म्हणूनच राज्याधिकार मिळाल्यावर हा राजा राजवाड्याच्या विलासात मग्न न होता आपल्या राज्यात सतत फिरताना दिसत होता. दाजीपूर- पन्हाळयाच्या दुर्गम प्रदेशापासून शिरोळ पेट्यातील नरसोबावाडीपर्यंत आपल्या प्रजाजनांना भेटत, त्यांच्याशी बातचीत करीत, त्यांची सुख-दुःखे समजून घेत तो अविश्रांत कष्ट घेताना दिसत होता; त्यास रयतेचे दारिद्र्य, दुःख, बेदना, अज्ञान व अंधश्रद्धा यांचे दर्शन पावलोपावली होत होते आणि त्याच्या मनात यावर कोणती व कशी उपाययोजना करावी, हाच प्रश्न सतत उभा राहत होता. याची एक-दोन उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. अशाच एका दौऱ्यात नरसोबावादी या तीर्थक्षेत्री महारोग्यांची दयनीय अवस्था पाहून महाराजांचे मनास तीव्र वेदना झाल्या. समाजाकडून झिडकारलेल्या, सर्वाथनि पतित व घृणास्पद मानलेल्या या दुर्दैवी जिवांसाठी काय करता येईल, हा प्रश्न त्यांना सतावत राहिला आणि मग त्या प्रश्नाची सोडवणूक लवकरच केली गेली. १८९७ साली व्हिक्टोरिया राणीचा 'डायमंड ज्युबिली उत्सव' सर्व देशभर साजरा केला गेला. कोल्हापुरातही तो साजरा झाला. महाराणीच्या उत्सवास्मृत्यर्थ महाराजांनी 'व्हिक्टोरिया लेपर असायलम' ही सेवाभावी संस्था (आश्रम) स्थापन केली. त्यांनी स्वतः त्या आश्रमाची पायाभरणी केलो. तीर्थक्षेत्रीच्या मार्गावर आपल्या देहाचे ओंगळवाणे प्रदर्शन मांडणाऱ्या महारोग्यांना 'आश्रमवासी' बनवून त्यांचे दुःखी जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न त्यांच्या राजाने केला होता. [८]

अशीच एक रयतेच्या कल्याणाची एक साधी गोष्ट मोठी उद्बोधक वाटावी अशो आहे. कोल्हापूर हे उसाचे मळे व गुन्हाळे यांविषयी सर्वत्र प्रसिद्ध होते. या उसाचे मळे पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे हात ऊस गाळताना अनेकदा घाण्यात सापडत होते. बोटे चिंबून असह्य वेदना होऊन हात थोटे बनत होते. राजाच्या नजरेत शेतकऱ्याचे हे दुःख येताच त्याची विचारचक्रे फिरू लागली. हे थांबविता येणार नाही का ? आणि मग राजाने आपल्या संस्थानातील हुन्नरी लोकांना आवाहन करणारा एक जाहीरनामा काढला : "घाण्यामध्ये हात सापडणार नाही अगर सापडलाच तर त्यास इजा होणार नाही, अशा तन्हेची त्यात काही यांत्रिक युक्ती तारीख १ जानेवारी, १८९६ च्या आत कोणी शोधून काढल्यास ज्याची युक्ती सोपी, थोडक्या खर्चात होणारी व पसंत अशी ठरेल, त्यास चांगले बक्षीस देण्यात येईल."

महाराजांच्या आवाहनाला प्रतिसाद मिळून नव्या युक्तीचे अनेक प्रकारच्या घाण्याचे नमुने दरबारला सादर केले गेले. त्यातील एक उत्कृष्ट ठरवून त्याचे काही नमुने तयार केले गेले आणि प्रत्येक पेट्याच्या मामलेदाराकडे ते पाठवून महाराजांनी तमाम रयतेसाठी दुसरा एक जाहीरनामा काढला. त्यात म्हटले होते की 'शेतकऱ्यांनी या सुधारित घाण्याप्रमाणे आपल्या घाण्यात सुधारणा कराव्यात; त्यासाठी मामलेदाराने त्यांची मने बळवावीत.' महाराजांना भेटण्याची कार्यालयीन वेळ सकाळी ११ ते १२ अशी होती. पण या वेळी पूर्वनियोजित भेटीच होत. सामान्य रयतेस अशी भेट घेणे जमत नसे. मग महाराज सायंकाळी ४.३० वाजता तबेल्याकडे नेमाने जात, त्यावेळी मार्गात थांबून ते रयतेची भेट घेत असत. रयतही त्यांच्याशी मनमोकळेपणे बोलत असे.

**दुष्काळ, प्लेग या संकटाशी दोन हात** -राज्यारोहणानंतर शाहू महाराजांनी आपल्या लोककल्याणी कारभाराचा श्रीगणेशा उत्साहात सुरू केला असता त्यांना प्रथम दुष्काळ व प्लेग अशा दोन अस्मानी संकटांस तोंड द्यावे लागले. त्यात त्यांच्या प्रशासन कौशल्याची चांगलीच कसोटी लागली. १८९६-९७ मध्ये देशात अनेक ठिकाणी दुष्काळ पडला. मुंबई इलाख्यातही तो सर्वत्र पसरून हजारो लोक अन्नान्न करून तडफडून मरत होते. अशा परिस्थितीत आपल्या प्रजाजनांना व त्यांच्या गुराढोरांना जगवणे, हे राज्यकर्ता म्हणून महाराजांचे पहिले कर्तव्य होते. या कर्तव्यास महाराज पूर्णपणे जागले. त्यांनी उन्हातान्हातून दुष्काळग्रस्त भागाचे दौरे काढून प्रजेला दिलदिलासा दिला. म्हैसूर राज्यातून धान्य मागवून गावागावांत स्वतः धान्याची दुकाने काढली, धान्य घेण्यासाठी रयतेच्या हाती पैसा

यावा म्हणून रस्त्यांची, विहिरी तलाव खुदाईची दुष्काळी रोजगाराची कामे काढली. सरकारची जंगले व कुरणे रयतेच्या गुराढोरांसाठी खुली केली गेली. काही जनावरांची सोय सरकारी थट्टीत मोफत करण्यात आली. १८९९-१९०० मध्ये पुन्हा एकदा भीषण दुष्काळ पडला. याही दुष्काळात पूर्वीच्या सर्व उपाय-योजना राबवल्या गेल्या. याशिवाय शाहू महाराजांनी एक स्वतंत्र दुष्काळ निवारण खातेच निर्माण करून त्यावर भास्करराव जाधवांसारख्या अत्यंत कर्तबगार अधिकाऱ्याची नेमणूक केली. तसेच तालुक्याच्या ठिकाणीही दुष्काळ- निवारणाची कार्यालये स्थापन केली गेली आणि त्यातून दुष्काळ निवारणाच्या उपाय- योजना कार्यान्वित केल्या जाऊ लागल्या.[९]

शाहू महाराजांच्या अविश्रांत व नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे दुष्काळावर मात करता आली. मुंबई इलाख्यात भीषण दुष्काळात हजारो लोक तडफडून मरत असता, कोल्हापूर संस्थानात एकही भूकबळी पडला नव्हता. याचे प्रमुख कारण असे होते, की अशा दुष्काळात जे अपंग, वृद्ध आणि निराधार लोक भूकबळी ठरतात, अशांच्यासाठी महाराजांनी आपल्या राज्यात ठिकठिकाणी नऊ 'निराधार आश्रम' काढले होते, या आश्रमांत सुमारे ५० हजार निराधार लोकांना अन्नवस्त्र देऊन महाराजांनी 'जीवनदान' दिले होते! याहून विशेष म्हणजे रस्ते, पूल, तलाव या ठिकाणी रोजंदारीवर काम करणाऱ्या मजूर आई-बापांच्या तान्ह्या मुलांची देखभाल करण्यासाठी कामाच्या ठिकाणी 'पाळणाघरे' उभी केली गेली होती. आई-बाप कामावर गेल्यावर झाडाच्या सावलीत भुकेने व्याकुळलेल्या त्या लहान जीवांचे आक्रंदनही या राजाच्या नजरेतून सुटले नव्हते, याचे नवल वाटल्याशिवाय राहत नाही. आजचे आमचे प्रगतशील महाराष्ट्र शासन राज्यातील 'रोजगार हमी' चो योजना व तेथे काम करणाऱ्या मजुरांच्या बालकांसाठी 'पाळणाघरां'ची सुविधा राबवत असते. कोल्हापूरच्या शाहू राजाने या दोन्ही गोष्टी शंभर वर्षांपूर्वी आपल्या राज्यात प्रत्यक्षात अमलात आणल्या होत्या. कदाचित हिंदुस्थानातील अशा प्रकारचो ही पहिलीच घटना असेल ![१०]

दुष्काळाशी झगडत असतानाच शाहू महाराजांना प्लेगसारख्या अत्यंत घातकी साथीशी सामना करावा लागला. मुंबई इलाख्यात प्लेगची सुरुवात सन १८९६ साली प्रथम झाली. लवकच मुंबईत हाहाकार उडवीत तो कराची, भिवंडी, पुणे इत्यादी भागांतही पसरला. प्लेगच्या वार्ता कानावर पडताच महाराजांनी त्याला प्रतिबंध करणारी मोर्चेबांधणी अगोदरच सुरू केली होती. त्यामुळे प्लेगला कोल्हापूर राज्यात दोन वर्षे तरी प्रवेश करता आला नाही. पण शेवटी तो १८९८ मध्ये आलाच आणि दोन वर्षे तो कोल्हापूरच्या प्रजेला सतावत राहिला. या सुमारास महाराजांची दुष्काळी भागात भ्रमंती चालू होती. आता या भ्रमंतीतच ते अधिकाऱ्यांना व प्रजाजनांना प्लेगशी सामना करताना कोणत्या उपाययोजना करावयाच्या याची माहिती देऊ लागले. प्लेगची शास्त्रीय माहिती व उपाय योजना सांगणारी हजारो पत्रके त्यांनी गावोगाव पोहोचती केली. त्यातून एक प्रकारे लोकजागरणाची जंगी चळवळच उभी राहिली. प्लेगची लागण झालेल्या गावांतील लोकांना ते गाव सोडून बाहेर मळ्यात, माळावर, उघड्या मैदानावर तात्पुरत्या झोपड्या उभारून राहावे लागे. या कामी सरकारने खास मदतीच्या उपाय योजना राबवल्या होत्या. गोरगरिबांना झोपड्यांचे साहित्य मोफत पुरवले जात असे. प्लेगचा प्रादुर्भाव गावात होऊ नये यासाठी घरी निर्जंतुके ठेवावी लागत. यासाठी सरकारने खास आदेश काढून उपाय योजनांची माहिती गावोगावी पोहोचती केली होती; आणि त्या आदेशांची अंमलबजावणी पाटील-कुलकर्णी सारख्या वतनदारांवर सोपवली होती. या अंमलबजावणीच्या कामात हयगय करणाऱ्यांची वतने जप्त करून महाराजांनी त्यांच्यावर जरब बसवली होती. खरे तर दुष्काळ व प्लेग या संकटातून प्रजेला वाचवण्यासाठी महाराज आपल्या जीवाचे रान करत होते. कधी घोड्यावर तर कधी सांडणीस्वार घेऊन ते राज्यभर अविश्रांत फिरत असत.

अशा प्रकारे रात्रंदिन प्रजेच्या हिताची व रक्षणाची काळजी लागून राहिलेले महाराज या सुमारास आपले गुरू फ्रेजर यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात "पन्हाळा राजवाड्यात मी फक्त झोपतो, इतर सारा वेळ मी कार्यालयात काम करण्यातच व्यग्र असतो. सकाळचा वेळ मी शहरातील प्लेगची कामे कशी चालली आहेत यावर देखरेख ठेवतो. थोड्या दिवसांपूर्वी ग्रामीण भागातील पिकांची पाहणी स्वतः करता यावी म्हणून मी घोड्यावरून ४० मैल आत गेलो होतो. त्यासाठी मी एकच घोडा घेतला होता व ताशी सुमारे ३ मैल जात होतो. घोड्यावरून जाता जाता चौकशी करीत होतो. त्यामुळे मला अतिशय थकवा आला आहे डिसेंबर १८९९." याच सुमारास कोल्हापूर-पन्हाळा ही ठिकाणे प्रथमच टेलिफोनच्या तारांनी जोडली गेली. त्यामुळे पन्हाळ्यावरून कारभार पाहणाऱ्या महाराजांच्या वेळेत मोठी बचत झालीच; शिवाय दळणवळणास गती आल्यामुळे प्लेग निवारण कार्यासही गती प्राप्त झाली. या संदर्भात महाराजांनी म्हटले आहे, "टेलिफोनची व्यवस्था ही खरोखरच मोठी फायदेशीर गोष्ट झाली आहे. त्यामुळे कोल्हापुरातील अधिकारी जणू येथेच आहेत असे समजून त्यांच्याशी आता मला बोलता येते. प्लेगच्या दिवसांत अत्यंत महत्त्वाची अशी वेळही आता वाचू लागली आहे."[११]

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**राजर्षी शाहू महाराजांची अर्थनीती :** राजर्षी शाहू महाराजांनी १८९४ ते १९२२ या कालखंडात कोल्हापूर संस्थानचा कारभार छत्रपती या नात्याने पाहिला. त्यांनी समाजकल्याण आणि आर्थिक विकास घडवून आणण्याकरिता अशा स्वरुपाची पुरोगामी आर्थिक धोरणे आखली. महाराजांचे जे काही आर्थिक धोरण होते. ते अंतर्गत वित्तव्यवस्था व प्रत्यक्ष नियंत्रण नीती पुरतेच मर्यादित राहिले होते. राजर्षी शाहू महाराजांनी ह्या धोरणाची पुरोगामी आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे प्रथम स्पष्टपणे ठरवून त्यांचा उभ्या हयातभर पाठपुरावा केला.[१२]

**राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचे उद्देश :** महाराजांनी जगातील इतर सत्ताधीशांच्या उलट आपले धोरण राबविले. त्यांनी अस्पृश, मागासलेले वर्ग यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आणि सर्वसाधारण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी कटाक्षाने आर्थिक आणि प्रशासकीय याबाबतीत सत्ताधीश म्हणून हस्तक्षेप करणाऱ्या धोरणाचा अवलंब केला. त्याचप्रमाणे या उपायांच्या अंमलबजावणीबाबतही तितकेच लक्ष पुरविले. त्यांच्या कारकिर्दीच्या सुरवातीच्या काळातच आधुनिक विचारांनी त्यांच्या मनात घर केले होते. तरी पण त्यावर आधारलेल्या आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करताना त्यांना बरेच परिश्रम घ्यावे लागले. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मागासलेल्या व जातिपातींनी बरबटलेल्या या छोट्याशा संस्थानातील तांत्रिक, प्रशासकीय आणि वित्तीय अडचणीमुळे सर्वकष कार्यक्रमाच्या स्वरूपात प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे अवघड होते. त्यामुळे बराच काळपर्यंत त्यांना ते शक्य झाले नाही. असे असले तरी कालांतराने निरनिराळ्या हितसंबंधीयांकडून विरोध होत असतानाही सामाजिक, आर्थिक विकासाच्या अनेक योजना कार्यान्वित करण्याच्या बाबतीत शाहू महाराजांनी असामान्य जिद्द आणि निर्धार दाखविला.[१३]

शाहूमहाराजांची भाषणे, त्यातून व्यक्त होणारे त्यांचे धोरण आणि त्यांच्या परिणामांची व्याप्ती आणि स्वरूप लक्षात घेतले म्हणजे असे म्हणावे वाटते की, मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या किंवा समाजवादी देशात सामाजिक, आर्थिक उद्दिष्टांसंबंधी ज्या कल्पना पुढे दुसऱ्या महायुद्धानंतर प्रस्तुत झाल्या त्या वस्तुतः किती तरी आधी शाहू महाराजांनी एक जीवित कार्य म्हणून जाणीवपूर्वक आपल्या डोळ्यांसमोर ठेवल्या होत्या. त्याचप्रमाणे सामुदायिक गरज आणि हस्तक्षेपवादी विचारसरणी यांवर आधारलेला 'सार्वजनिक कुटुंबाचा' आधुनिक आर्थिक सिद्धांत त्याच्या आर्थिक धोरणांना लागू पडतो, असेही दिसून येते.[१४]

**महाराजांचे आर्थिक बाबीविषयक धोरण**

सुरक्षा व कल्याणकार्य, सामाजिक-आर्थिक बाबी (आरोग्य, शिक्षण, वाहतुकीची साधने, पाणीपुरवठ्याच्या योजना आणि विस्तारित सेवा, शेती, उद्योग, दुष्काळनिवारण, आर्थिक गुंतवणूक अशा सर्व बाबीवर होणाऱ्या शाहूमहाराजांच्या एकूण खर्चात १८९४ ते १९२२ च्या दरम्यान असाधारण वाढ झाली. तथापि ही वाढ तीन सुस्पष्ट कालखंडात निरनिराळ्या प्रमाणात झाल्याचे आढळून येते.

**१. १८९४ ते १९०४** या पहिल्या कालखंडात खर्चांच्या वाढीचे प्रमाण थोडे होते. तो कालखंड नव्या धोरणाच्या जमवाजमवीच्या पूर्वतयारीच्या आणि विकासाच्या छोट्या प्रकल्पांचा होता.

**२. १९०४ ते १९१६** पर्यंतच्या दुसऱ्या कालखंडात खर्चाच्या वाढीला चांगली गती मिळाली. त्याचप्रमाणे त्यात फारसे चढउतारही झाले नाहीत. याचे कारण त्या कालावधीत सामाजिक-आर्थिक विकासाचा कार्यक्रम सातत्याने आणि मोठ्या प्रमाणवर हाती घेण्यात आला होता, हे होय.

**३. १९१६ ते १९२२** च्या तिसऱ्या कालखंडात खर्चात बरीच वाढ झाली आणि या वाढीचे प्रमाण खूपच वरखालीही होत गेले. पाणीपुरवठ्याच्या योजना, रस्तेबांधणी, भांडवल गुंतवणूक, विशेषतः युद्धरोखे आणि देणग्या यांवर झालेल्या खर्चाचे कमोजास्त प्रमाण त्याला कारणीभूत ठरते.[१५] सामान्य माणसाला भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा कमी व्हाव्यात आणि आपल्या प्रजाजनांना निरोगी आणि आर्थिकदृष्ट्या सफल जीवन जगता यावे, म्हणून शाहूमहाराजांनी खुद्द कोल्हापुरात व ग्रामीण भागात फार मोठ्या प्रामाणावर वैद्यकीय, आरोग्यविषयक आणि पशुवैद्यकीय सेवा विनामूल्य किंवा सवलतीच्या दराने उपलब्ध करून दिल्या.

**दुष्काळावर मात करण्यासाठी केलेली उपाययोजना**

अवर्षण, दुष्काळ, दैन्य, द्रारिद्र्य या गोष्टी आपल्या देशामध्ये फार पुरातन काळापासून आलेल्या आहेत. निसर्ग तर इथे इतका लहरी आहे की चुकूनच पाऊस जसा पाहिजे तसा, जितका पाहिजे तेवढा व जिथे हवा तिथे पडलेला आपल्याला दिसेल. अतिवृष्टी अगर अनावृष्टी याच गोष्टी आपल्याला जास्त परिचित आहेत. ऋग्वेदामध्ये देवदेवतांना वेळेवर व भरपूर पाऊस पडावा या बाबतीत प्रार्थना केलेल्या दिसून येतात. रामायणातील जातक कथांमधूनही दुष्काळाचे उल्लेख आढळतात. 'कौटिलीय अर्थशास्त्रात' तर दुष्काळात राजाचे कर्तव्य कोणते, याबद्दल खुलासेवार सांगितले आहे.[१६] अगदी आधुनिक काळाचा विचार केल्यासही आपल्याला असे कळून येईल की, एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी फार मोठ्या प्रमाणावर भारतात सर्व ठिकाणी दुष्काळाची छाया

पसरली होती. १८६० ते विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत काही मोजकी वर्ष सोडल्यास भारताचा आर्थिक इतिहास आपल्याला दुष्काळाच्या, दारिद्र्याच्याच कथा सांगतो. शाहूमहाराजांनी १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानचा कारभार पाहावयास सुरुवात केली. त्या काळी सामाजिक व राजकीय परिस्थिती अनुकूल नव्हती आणि आर्थिक परिस्थिती तर फारच प्रतिकूल होती. कारभारात नुकतेच कुठे लक्ष घालण्यास महाराजांनी सुरुवात केली होती. तोच संस्थानावर दुष्काळाची छाया पसरली. प्लेगाने आपली चाहूल दाखविली. बावीस वर्षांच्या या तरुण राजाने ज्या पद्धतीने दुष्काळास व साथीच्या रोगांस झुंज दिली ती पाहिली म्हणजे खरोखर आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही.[१७] दुष्काळाची वार्ता आल्याबरोबर महाराजांनी प्रथमतः काय केले असेल तर संस्थानातील रयतेची प्रत्यक्ष पाहणी व विचारपूस, नोव्हेंबर, १८९६ मध्ये महाराजांनी गडहिंग्लज, रायबाग, कटकोळ या भागांना भेटी दिल्या. या प्रदेशात अखेरचा पाऊस न झाल्याने लोकांची स्थिती बरीच हलाखीची झाली होती. प्रत्यक्ष शेतावर जाऊन महाराजांनी लोकांची दुःखे जाणून घेतली.

महाराजांनी जवळून पाहिलेली लोकांची गरिबी, प्यायच्या पाण्याचीही सोय नसलेलो स्थिती, अज्ञान, उच्चवर्णीयांकडून होत असलेली आर्थिक आणि सामाजिक पिळवणूक, शेतीतला मागासलेपणा, धड रस्तेही नसलेली खेडी, जिराईत शेती, अशा सगळ्या गोष्टीचा महाराजांच्या मनावर फार परिणाम झाला. आपल्या प्रजेचे कल्याण व्हावे म्हणून त्यांनी विविध मार्गानी आर्थिक व नैसर्गिक संकटांना तोंड द्यायचे ठरविले. १९०२ मध्ये महाराज इंग्लंडला गेले होते, तेथील ओद्योगिक प्रगती त्यांनी स्वतः पाहिली होती. तेथील नद्यांवरील धरणे, कालव्यांतून शेतीला घेतलेले पाणी, त्यांनी व्यापारामध्ये मारलेली भरारी, या सगळ्या गोष्टी त्यांनी अगदी जवळून पाहिल्या व अभ्यासिल्या. माझ्या संस्थानात, माझ्या देशात असे का नाही, हा विचार त्यांच्या मनात घर करून राहिला. त्याचेच रूपांतर त्यांच्या सर्वव्यापी कृतीत दिसून येते. दुष्काळाशी झुंज देण्यासाठी महाराजांनी अनेक तऱ्हेच्या उपाययोजना अमलात आणल्या. त्यामध्ये त्यांनी प्रशासकीय पातळीवरती कमी मुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या योजना हाती घेतल्या. **कमी मुदतीच्या योजने मध्ये -** स्वस्त धान्य दुकान, धान्याची आयात, पिण्याचे पाणी, रस्ते व पूल बांधणे, दुष्काळी भत्ता, तात्पुरत्या दुष्काळी कचेऱ्या, लहान मुलांसाठी केलेली योजना, मोफत मदत, गरिबांसाठी आश्रम, जनावरासाठी केलेली योजना, तर **दीर्घ मुदतीच्या योजने मध्ये-** धरणे व पाटबंधाऱ्याची योजना, रस्ते – पूल बांधण्याची योजना, शेतकऱ्याना कर्जे, सुधारित शेतीचे प्रयोग व शिक्षण इ. [१८]

**राजर्षी शाहू महाराजांचे दळवळण विषयक विचार :**

उद्योगधंदे व व्यापार यांच्या वाढीसाठी दळवळणांच्या साधनांचे, विशेषतः रेल्वे, रस्ते यांचे महत्व अनन्यसाधारण असते. सामाजिक अभिसरणासाठीसुद्धा हे अत्यावश्यक असते. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत सुरुवातीला संस्थानात रस्ते खूप अपुरे होते. ते रस्ते मुख्यत: संस्थानाबाहेरून येऊन पुन्हा संस्थानाबाहेर जाणारे होते. म्हणून त्यांनी रस्ते बांधणीवर लक्ष केंद्रित केले. त्याचबरोबर राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्याची आर्थिक स्थिती भक्कम करण्याच्या दृष्टीने त्यांनी शेती, सहकार, उद्योग, व्यापार याकडे लक्ष दिले. याला भरीव अशी मदत केली. ग्रामीण भागातील व्यक्ती आणि वाणिज्य यांच्या चलनशीलतेस चालना मिळावी, त्याप्रमाणे सामाजिक आणि प्रशासकीय सेवा, शेतीमालाचे विपणन (मार्केटिंग), कृषीतंत्रशास्त्र आणि शेतीला लागणाऱ्या आधुनिक पायाभूत सुविधा यांच्या प्रक्रियेतील बदल हे सारे सुकरतेने घडून यावे, म्हणून शाहूमहाराजांनी १८५ मैलांहून अधिक लांबीचे पक्के रस्ते बांधले.[१९] त्यांच्या रस्तेबांधणीच्या खर्चात१९२२ पर्यंत रु. ५१.८ हजारांवरून रु. १४१.४ हजार इतकी वाढ झाली. म्हणजे एकूण वाढीचे प्रमाण १७३ टक्के पडते. १८८७ पासून १९२२ पर्यंत रस्त्यांची लांबी २३३ मैलांवरून ४१८ मैलांवर गेली. त्याच कालावधीत एक हजार चौरस मैलांतील रस्त्यांच्या लांबीचे प्रमाण ७२.४मैल लांबीचे रस्ते होते. १९२२ साली त्यांच्या निधनाच्या वर्षी हे प्रमाण दर हजार चौरस मैलास १२९.९ मैल लांबीचे रस्ते झाले.

**रेल्वेची योजना**: भारतातील रेल्वे प्रदीर्घ काळ खाजगी मालकीचीच होती. कोल्हापूर संस्थानातील रेल्वे मात्र सरकारी क्षेत्रातच सुरु झाली. कोल्हापूर शहर मिरज रेल्वे जंक्शनला जोडणाऱ्या रेल्वेचे काम सन १८८८ साली शाहू महाराजांच्या हस्ते सुरु झाले. सन १८९१ साली ते काम पूर्ण झाले. हा सर्व खर्च सरकारने केला. वाहतुकीच्या साधनांचा विकासाशी असलेला थेट संबंध लक्षात घेवून शाहू महाराजांनी याकामी लक्ष घातलेले दिसते. मूळ योजनेत कोल्हापूर संस्थानातील रेल्वे लाईन ही कोल्हापूर– निपाणी– रायबाग अशी टाकण्याची होती. परंतु राधानगरी धरणाच्या बांधकामात पैसा कमी पडू लागला म्हणून ही योजना सोडून द्यावी लागली.[२०] शाहू महाराजांनी संस्थानाच्या रेल्वेचा उपयोग सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आणि समाजकल्याण अधिक प्रमाणात साध्य होण्यासाठी केला. रेल्वेपासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नात १८९४ ते १९२२ च्या दरम्यान ३१५.६ टक्के वाढ झाली, म्हणजे ते रुपये ३८.२ हजारांवरून १५८.१ हजार रुपयांवर गेले.[२१]

**रस्ते व पूल बांधण्याच्या योजना :** दुष्काळी कामामध्ये रस्ते व पूल बांधण्याच्या कामाला फार महत्व असते. अशी कामे दुहेरी फायद्याची असतात.एक तर दुष्काळात लोकांना रस्ता बांधणीच्या कामामुळे रोजगार मिळतो. ते बेकार राहत नाहीत. त्यांची उपासमार होत नाही. दुसरा फायदा म्हणजे दुष्काळाच्या काळात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अन्नधान्य पाठवायचे असेल तर चांगल्या रस्त्यांची व नदी – ओढ्यावरच्या पुलांची फार आवश्यकता असते. दुष्काळाला तोंड देण्यासाठी कायमच्या दीर्घकालीन योजनेमध्ये महाराजांनी मोठे रस्ते व पूल बांधण्याला अग्रक्रम दिला. ही योजना आपल्या संस्थानापुरतीच मर्यादित अशी नव्हती. महाराजांनी ब्रिटिश हद्दीतून जाणारे रस्तेही बांधले. त्यासाठी त्यांनी ब्रिटिश सरकारकडून मान्यता घेतली. निपाणी-फोंडा रस्ता महाराजांनी १८९९-१९०० मध्ये चांगला पक्का असा बांधण्यास घेतला. १८९६-९७ मध्ये पन्हाळा व कटकोळ पेट्यात दुष्काळाची तीव्रता जास्त होती म्हणून महाराजांनी तेथे मोठ्या प्रमाणात रस्ते बांधण्याचे काम हाती घेतले. तसेच महाराजांनी नवीन रस्ते बांधण्यावर व जुने दुरुस्त करण्यावर जवळजवळ ४०,४१२ रुपये खर्च केले.१८९७-९८ मध्ये महाराजांनी जवळजवळ ७५ मैलांचा नवीन रस्ता बांधला व त्यासाठी १,३७,३९३ रुपये खर्च केले. यामध्ये हातकणंगले ते वडगाव, वडगाव ते कोडोली, शिरोळ रेल्वे स्टेशन ते उदगाब, तारदाळ ते हातकणंगले, कचकोळ ते मनोली, मनोली ते सुनाल या रस्त्यांचा समावेश होतो.[२२] निपाणी-दाजीपूर रस्त्यावरील नद्यांवर मोठेमोठे पूल बांधण्याचे काम महाराजांनी सुरू केले. या सर्व दुष्काळी कामांचा फार मोठा फायदा कोल्हापूर संस्थानामधील लोकांना झाला. एका ठिकाणी भरपूर पिकलेले धान्य दुष्काळ पडलेल्या दुसऱ्या भागाकडे वळविण्यास सरकारला अत्यंत सोयीचे झाले. राजर्षी शाहू महाराजांनी रस्ते दुरुस्त करून त्यावर नाके बसविण्याबद्दल एक ठराव केला. तो पुढीलप्रमाणे

**२९. रस्ते दुरुस्त झालेवर दस्तुरी नाके बसविणेबाबत**

(मुलकी ठराव क्र. १०८१) **कामातील तात्पर्य** गगनबावडा व अनुस्कुऱ्या पर्यंत चांगले रस्ते दुरुस्त झाले पाहिजेत सबब दस्तुरी नाकी बसवून पैसा वसूल करावा व त्यातून दरसाल थोडीथोडी रकम खर्च करून रस्ते चांगले करावे असे उत्तर भाग प्रांत म्हणतात. रस्त्यालगत मोठी गावे व व्यापार नाही रस्ते दुरुस्त नाहीत सबब दस्तुरी बसवू नये रस्ता दुरुस्त झालेवर नाकी बसविणेचा विचार व्हावा. रस्ता दुरुस्त होणेस बराच खर्च येईल सबब त्या भागाचे स्थिती वरून नाकी बसवणे इष्ट नाही म्हणून सरसुभे कडून प.आ. ने. ८६३/५ – ५ – १९०० ने. आले.

निकाल हुकुम –

सदरी प्रांताचे डिस्ट्रीक्ट ऑफिसर यांनी शिफारस केले प्रमाणे तजवीज होणेचे मंजूर केले आहे सबब नाकी कोठे कोठे बसणे वगैरे बद्दल पुर्ता विचार होऊन जरूर लिहून यावे. [२३]

मुक्काम कोल्हापूर

दिनांक २९ – ५ – १९०० सही शाहू छत्रपती

**सारांश :-**

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात उद्योगधंदे व व्यापार यांच्या वाढीसाठी दळवळणांच्या साधनांचे, विशेषतः रेल्वे, रस्ते यांचे महत्व अनन्यसाधारण असते. हे पटवून देण्याचा प्रयत्न त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून करून दाखविला. तसेच सामाजिक अभिसरणासाठीसुद्धा हे किती अत्यावश्यक आहे हेही सांगितले. शाहूमहाराजांनी संस्थानाच्या रेल्वेचा उपयोग सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आणि समाजकल्याण अधिक प्रमाणात साध्य होण्यासाठी केला. या दळणवळणांच्या सोयी उपलब्ध झाल्याने कोल्हापूर संस्थान अनेक शहराशी जोडले गेले. त्यातून आर्थिक व वैचारिक अदान – प्रदान घडून आले.

शाहूमहाराजांनी अंगीकारलेले आर्थिक धोरण आणि त्यासाठी अनुसरलेले प्रत्यक्ष मार्ग यांच्यायोगे आर्थिक विकास, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांत किफायतशीर रोजगार, शेतकरी, कारखानदार आणि गरीब कारागिरांच्या उत्पन्नात वाढ, गरीब व श्रीमतांच्या संपत्ती आणि उत्पन्न यांच्यातील विषमतेला आळा घालणे, पश्चिम महाराष्ट्रात सामाजिक-सांस्कृतिक क्रांतीचा स्फुल्लिंग प्रज्वलित करणे त्यांना शक्य झाले. एकूणच त्यांनी स्वतंत्र समाजवादी अर्थव्यवस्था उभी केली. आधुनिक विकसनशील अर्थव्यवस्थेचा प्रणेता आणि समाजवादी मुत्सद्दी राजर्षी शाहूमहाराजांच्या रूपाने आपणांस दिसतो. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्त्य जगतात नवीन अर्थशास्त्रीय विचारांचा उगम होण्यापूर्वीच ते विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणारा तत्कालीन संस्थानिकांचा मेरुमणी म्हणून राजर्षी शाहूमहाराजांचे स्थान अबाधित आहे. त्यांनी आपल्या संस्थानात ज्या ज्या सुधारणा राबविल्या, त्या त्या आधुनिक समाजवादी अर्थशास्त्रीय सिद्धांतावर आधारलेल्या होत्या.

**संदर्भ :-**

१. गर्गे, स. मा., करवीर रियासत, शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर. २०१७. पा. ६१

२. कित्ता, पा. ७८
३. कित्ता, पा. ३९५
४. डॉ. पवार, जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. २०१६. पा. १३
५. कित्ता, पा. १४
६. कित्ता, पा. १४
७. कित्ता, पा. १५
८. डॉ. पवार, जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. २०१६. पा. २५
९. कित्ता, पा. २६
१०. कित्ता, पा. ३०
११. कित्ता, पा. ३१
१२. डॉ. जाधव, रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन राजर्षी शाहू चरित्रे साधने प्रकाशन समिती, मुंबई. २०१६. पा. १७५
१३. कित्ता, पा. १७७
१४. डॉ. जाधव, रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन राजर्षी शाहू चरित्रे साधने प्रकाशन समिती, मुंबई. २०१६. पा. १७५
१५. कित्ता., पा. १७८
१६. कित्ता., पा. १६५
१७. कित्ता., पा. १६५
१८. कित्ता., पा. १६६
१९. पानसरे, गोविंद, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर . २०१२ . पा. ३६
२०. पानसरे, गोविंद, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर . २०१२ . पा. ३७
२१. डॉ. जाधव, रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन राजर्षी शाहू चरित्रे साधने प्रकाशन समिती, मुंबई. २०१६. पा. १७९
२२. डॉ. जाधव, रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन राजर्षी शाहू चरित्रे साधने प्रकाशन समिती, मुंबई. २०१६. पा. १७१
२३. राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, संपादक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. २०२२ पा.१६

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

05

# छत्रपती शाहू महाराजांचे मुस्लिम समाजासाठी शैक्षणिक धोरण: एक दृष्टीक्षेप

**प्रा.सतीश यशवंत चौगुले**
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा

---

**प्रस्तावना**

छत्रपती शाहू महाराज (१८७४-१९२२) हे कोल्हापूर संस्थानाचे पुरोगामी विचाराचे शासक होते.ज्यांनी समाजातील वंचित आणि मागासवर्गीय घटकांच्या उन्नतीसाठी अनेक क्रांतिकारी पाऊल उचलले. त्यांच्या शैक्षणिक धोरणांमध्ये मुस्लिम समाजातील मागासलेपण दूर करण्यावर विशेष भर होता. त्या काळातील धार्मिक आणि सामाजिक मतभेद दूर करून, मुस्लिम समाजाला शैक्षणिक प्रवाहात सामील करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी शाळा, शिष्यवृत्ती, आधुनिक शिक्षणाचा प्रसार, आणि मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले प्रयत्न या शोधनिबंधात मांडण्यात आले आहेत.

**१. मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये प्रवेश**

शाहू महाराजांच्या कारकिर्दीत, भारतात धार्मिक आणि जातीय भेदभावाच्या समस्यांमुळे मुस्लिम विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळत नव्हता. शाहू महाराजांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी ठोस पावले उचलली. त्यांनी कोल्हापूरमधील शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी प्रवेश खुला करण्याचे आदेश दिले, जेणेकरून सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळू शकेल. जिथे सर्वधर्मीय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आणि एकत्रित शिक्षण घेण्याची संधी निर्माण झाली[१]. शाहू महाराजांच्या या धोरणांमुळे, केवळ स्थानिक पातळीवरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात धार्मिक विविधतेसह शिक्षणास प्रोत्साहन मिळाले. यामुळे मुस्लिम समाजातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊ लागले आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळाली.

**२. शिष्यवृत्ती योजना**

शाहू महाराजांनी गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी विविध शिष्यवृत्ती योजनांची सुरुवात केली. मुस्लिम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना विशेषतः महत्त्वाची होती, कारण या योजनांमुळे त्यांना शिक्षण घेण्यासाठी आर्थिक अडचणींवर मात करता आली. या शिष्यवृत्तींच्या माध्यमातून उच्च शिक्षणासाठी मदत मिळाली आणि अनेक मुस्लिम विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याच्या संधी मिळाल्या. 1902 साली शाहू महाराजांनी मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरू केली. यामुळे मुस्लिम समाजातील तरुणांना शिक्षणाच्या माध्यमातून नव्या संधी मिळाल्या, ज्यांचा फायदा समाजाच्या प्रगतीसाठी झाला[२].

**४. मुस्लिम बोर्डिंगची स्थापना-** शिक्षणाच्या प्रवासात विद्यार्थ्यांना निवासाच्या सोयी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे होते. दि.१५ नोव्हेंबर १९०६ रोजी किंग्ज एडवर्ड मोहामेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. पुढे १९११ साली शाहू महाराजांनी मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी एक स्वतंत्र मुस्लिम बोर्डिंग स्थापन केले. या बोर्डिंगच्या स्थापनेमुळे मुस्लिम विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात महत्त्वाची मदत मिळाली. मुस्लिम बोर्डिंग हे केवळ निवासस्थान नव्हते, तर ते एक शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र बनले होते, जिथे विद्यार्थी विविध उपक्रमांतून आपले ज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकसित करू शकले. या बोर्डिंगमुळे मुस्लिम विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील सातत्य राखले गेले आणि त्यांना सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा सामना करता आला[३].

**४. मदरशांमध्ये आधुनिक शिक्षणाचा समावेश-**शाहू महाराजांनी मुस्लिम समाजाच्या पारंपरिक शिक्षणपद्धतीत सुधारणांचा प्रस्ताव मांडला. मदरशांमध्ये केवळ धार्मिक शिक्षण देण्याऐवजी आधुनिक विषयांचा समावेश करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. १९१० साली शाहू महाराजांनी कोल्हापूरमधील एक मदरसा सुधारित केला आणि गणित, भूगोल, इतिहास यांसारखे आधुनिक विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केले. यामुळे मुस्लिम विद्यार्थ्यांना केवळ धार्मिक शिक्षण न मिळता, आधुनिक ज्ञानक्षेत्रांत प्रावीण्य मिळविण्याची संधी मिळाली.[४] या धोरणामुळे मुस्लिम समाजातील शैक्षणिक प्रगतीला चालना मिळाली आणि विद्यार्थ्यांना आधुनिक जगातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित झाली. शाहू महाराजांचे हे पाऊल मुस्लिम समाजातील शैक्षणिक सुधारणांसाठी क्रांतिकारक ठरले.

**५. मुस्लिम स्त्रियांचे शिक्षण-**मुस्लिम समाजातील स्त्रियांचे शिक्षण त्या काळात खूपच मागे होते. शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींच्या सहभागाला समाजातील अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागत असे. शाहू महाराजांनी या स्थितीत बदल घडवण्यासाठी

पुढाकार घेतला. १९१२ साली त्यांनी इन्साफ गर्ल्स स्कूल या शाळेची स्थापना केली, जी विशेषतः मुस्लिम मुलींसाठी होती. यामुळे मुस्लिम मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होण्याची संधी मिळाली, आणि समाजातील स्त्रिया अधिक स्वतंत्र आणि साक्षर बनू लागल्या.[५] शाहू महाराजांनी मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणास दिलेली चालना त्यांच्या समतावादी दृष्टिकोनाचे प्रतीक होते. या धोरणांमुळे समाजातील मुलींच्या शिक्षणाचा दर वाढला, ज्याचा प्रभाव त्यांच्या सामाजिक स्थितीवरही झाला.

**६. मुस्लिम शिक्षकांची नेमणूक-**शिक्षणाच्या प्रसारासाठी आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी शाहू महाराजांनी मुस्लिम समाजातील शिक्षकांची नेमणूक केली. १९०५ मध्ये त्यांनी मुस्लिम शिक्षकांची सरकारी शाळांमध्ये नेमणूक केली, ज्यामुळे मुस्लिम विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीला चालना मिळवली.[६] हे शिक्षक मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी एक आदर्श बनले आणि त्यांनी समाजात शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण केली. शाहू महाराजांच्या या धोरणामुळे मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना आत्मविश्वास प्राप्त झाला आणि त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात प्रगती साधली.

**७. समाजात शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण-**शिक्षण हे समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वाचे आहे, हे सर्व समाजघटकांना समजावे यासाठी शाहू महाराजांनी विविध मोहीमा राबवल्या. त्यांनी मुस्लिम समाजातील नेत्यांशी संवाद साधून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. १९१५ साली त्यांनी मुस्लिम समाजातील नेत्यांसमवेत एक मोठी सभा आयोजित केली, ज्यात शिक्षणाच्या महत्त्वावर चर्चा झाली आणि मुस्लिम तरुणांना आधुनिक शिक्षण घेण्याचे आवाहन करण्यात आले.[७] शाहू महाराजांचे हे प्रयत्न समाजाच्या विविध घटकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व जागृत करण्यासाठी आणि मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण ठरले.

**निष्कर्ष-** छत्रपती शाहू महाराजांचे मुस्लिम समाजासाठी शैक्षणिक धोरण हे त्यांच्या समतावादी दृष्टिकोनाचे प्रतीक होते. मुस्लिम समाजातील शैक्षणिक मागासलेपण दूर करून त्यांना शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून सक्षम बनवणे हे त्यांच्या धोरणांचे मुख्य उद्दिष्ट होते. या धोरणांनी मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीची संधी दिली आणि त्यांचे सामाजिक जीवन सुधारले. शाहू महाराजांनी शैक्षणिक प्रवाहात मुस्लिम समाजाला सामील करून त्यांची उन्नती साधण्याचे कार्य केले.

**संदर्भ**

१. Desai, Vishwanath. The Correspondence of Shahu Maharaj. Kolhapur Archives, 1999.
२. Patil, Ramesh. Education and Social Change in Kolhapur: A Study of Shahu Maharaj's Educational Policies. Kolhapur University Press, 2001.
३. Sawant, Prakash. "Religious Tolerance and Educational Initiatives in the Era of Shahu Maharaj." Journal of Maharashtrian History, vol. 9, 2006, pp. 130-136.
४. Ibid desai
५. Kulkarni, Asha. "Government Policies of Shahu Maharaj for Muslims." Kolhapur Historical Studies, vol. 22, 2004, pp. 110-115.
६. Deshpande, Sudhir. "Shahu Maharaj and Educational Reforms in Kolhapur." Kolhapur Journal of History, vol. 17, 2002, pp. 184-192.
७. Joshi, Madhav. Daily Tarun Bharat, Kolhapur ,date 26,July,1995,pp.6.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

06

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य

**प्रा. सूर्यवंशी नरेंद्र नरसिंग,**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

---

**प्रस्तावना:** सामाजिक क्षेत्रातील बदल किंवा कोल्हापूर जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक आणि कृषी विकासाची बीजे हे छत्रपती शाहू महाराजांच्या ध्येय धोरणामध्ये प्रतिबिंबित होतात. छत्रपती शाहूंनी स्त्रीविषयक विविध प्रकारच्या प्रथा परंपरेला विरोध करत स्त्री सुधारण्याची चळवळ आपल्या राज्यात राबविली. प्रस्तुत शोध निबंधात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाच्या बाबत केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधा करिता दुय्यम साधनाचा वापर करण्यात आलेला आहे.

**स्त्री शिक्षण:** स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक होते. पारंपरिक सामाजिक वास्तव बदलण्यासाठी स्त्रियांना शिक्षित करणे ब्राह्मणेत्तर चळवळीला आवश्यक वाटले. त्यातून छत्रपती शाहू आणि त्यांच्या चळवळीने महाराष्ट्रभर स्त्री शिक्षण राबविल्याचे दिसते. स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते असलेल्या शाहूंनी शिक्षिका तयार करण्यासाठी स्त्रियांसाठी अध्यापक महाविद्यालय सुरू केले. पुढे शाहूंनी कृष्णाबाई केळवकर या हुशार मुलीला मुंबईच्या ग्रँड मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविले. शाहूंनी १९०२ च्या जानेवारीत तिची नेमणूक सहाय्यक डॉक्टर म्हणून 'अल्बर्ट एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल' मध्ये केली. पुढे तिला उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन इंग्लंडमध्ये वैद्यकीय ज्ञानात पारंगत होण्यासाठी डब्लिन येथे पाठविले. तेथे ती यशस्वी होऊन १९०३ च्या फेब्रुवारीमध्ये कोल्हापुरात परत येऊन आपल्या कामावर रुजू झाली.[१]

शाहूंची धाकटी सून इंदुमती राणीसाहेब वयाच्या साडेअकराव्या वर्षी विधवा झाल्या. इंदुमतीने स्वतःच्या पायावर उभे राहावे म्हणून शाहूंनी तिला शिकविण्याचा निर्णय घेतला. तेव्हा त्यांना तत्कालीन समाज, आप्तेष्ट, सरदार, दरबार मंडळी इतकेच काय पण प्रत्यक्ष पत्नीच्या सुद्धा कडव्या विरोधाला तोंड द्यावे लागले. सर्व विरोधाचा परिहार करून त्यांनी इंदुमतीच्या शिक्षणासाठी सोनतळीला खास आश्रम उघडला. उत्तम आणि निष्णात अशा शिक्षकाची नेमणूक केली मॅट्रिकच्या परीक्षेत त्या दुसऱ्या क्रमांकाने पास झाल्या. पुढे कोल्हापूरचे शिक्षण खातेच इंदुमतीच्या हाती देण्याचा शाहूंचा निर्णय होता. इंदूमतीच्या सर्वांगीण शिक्षणासाठी शाहूंनी अँनी बेझंटचा सल्ला घेण्याचे ठरवले होते. यावरून त्यांच्या स्त्री शिक्षणाची तळमळ दिसून येते.[२] करवीर संस्थानच्या शिक्षणाधिकारी मिस लिटल यांनी राजीनामा दिल्यानंतर त्या जागी रखमाबाई केळवकर यांची शिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक केली.[३] स्त्री शिक्षणविषयक शाहूंची दृष्टी व्यापक होती स्त्री-पुरुष समतेसाठी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण मिळावे अशी त्यांची मनीषा होती. म्हणून त्यांनी मुलांच्या शाळेत मुली उत्तीर्ण झाल्याबद्दल शिक्षकांना इनाम देऊन त्यांना ५१२ रुपयांची खास मंजुरी दिली.[४]

शूद्रातिशूद्र मुलींच्या शिक्षणाकडेही शाहूंनी लक्ष पुरविले. त्यांनी १९०७ मध्ये चांभार, ढोर यांच्या मुलीसाठी स्वतंत्र शाळा काढून ९६ रुपयांची खास मंजुरी त्यांना दिली.[५] राजघराण्यातील स्त्रियांनाही चांगले शिक्षण मिळावे यासाठी शाहू महाराज आग्रही होते. महाराणी लक्ष्मीबाईच्या (शाहू पत्नी) शिक्षणाची काळजी घेण्यासाठी मिसेस कॉक्स या युरोपीय बाईची नेमणूक केली होती.

५०% स्त्रिया असलेल्या या देशात शाहूंनी स्त्री उन्नतीसाठी स्वतः लक्ष घातले. करवीरच्या जनतेसाठी शाहू महाराजांनी तीन आदर्श ठेवले. पहिला - करवीर नगरीत व संस्थानातही द्वेषाच्या कोणत्याही प्रकाराला वाद घालावयाचा नाही. दुसरा - प्रजेला सर्वदृष्ट्या संतोष देणे व पुरुषा इतकेच स्त्रियांना शिक्षण देणे. तिसरा - पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा समान हक्क आपल्याला मान्य असल्याचे शाहूंनी मान्य केल्याचे गणपतराव सूर्यवंशी दाखवितात.[६] शाहूंच्या या आदर्शाचा परिणाम स्त्रीशिक्षणाचा प्रसार झपाट्याने व स्त्रियांना आत्मभान देण्यात आला.

शाहूंनी आपल्या संस्थानात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. स्त्री जर शिक्षित असेल तर तिच्या पोटी जन्माला येणारी पिढी शिक्षित होईल, म्हणूनच त्यांनी राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना फी-माफी व शिष्यवृत्ती चालू केल्या. त्यांनी कोल्हापूर शहर व बावडा येथील मुलीच्या मराठी चौथ्या इयत्तेच्या वार्षिक परीक्षेत पहिल्या येणाऱ्या दोन मुलींना 'श्री राधाबाई अक्कासाहेब महाराज स्कॉलरशिप' व 'श्री नंदकुमार महाराणी भावनगर स्कॉलरशिप' अशा प्रत्येकी ४० रुपयांच्या शिष्यवृत्ती सुरू केल्या. तसेच कोल्हापूर इलाख्यात परीक्षेत सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या तीन मुलींना

स्कॉलरशिप व उत्तम वर्तनाबद्दल चाळीस रुपयांचे बक्षीस देण्यात येईल, असा ठराव पास केला होता. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी आज्ञा काढली होती. त्यांच्या राहण्याची जेवणाची व शिक्षणाची सोय केली होती. शाहूंच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ०.१० टक्क्यावरून ०.३५ टक्क्यापर्यंत वाढल्याचे दिसते.[७] शिक्षित स्त्रियांचे प्रमाण वाढवण्यामध्ये शाहूंच्या स्त्री शिक्षण संस्थांचा मोठा वाटा होता. त्यांनी आपल्या राजवाड्याच्या पूर्वेस मुलीसाठी 'अहिल्याबाई गर्ल्स हायस्कूल' या नावाची मुलीसाठी मोफत शाळा सुरू केली. जवळच माध्यमिक शिक्षणासाठी 'लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल' सुरू करण्यात आले.[८] शाहूंच्या प्रयत्नाने कोल्हापुरातच व्ही. टी. पाटील यांनी 'ताराराणी विद्यापीठाची' स्थापना करून तेथील स्त्री शिक्षणाचा पाया विस्तृत आणि भक्कम करण्याचा प्रयत्न केला.[९] त्यामुळे स्त्रियांना उच्च शिक्षण घेण्याची संधी स्थानिक पातळीवर निर्माण झाली. सौ. सुचेता कोरगावकर यांनी 'महिला दक्षता' समितीच्या माध्यमातून समस्याग्रस्त महिलांना आधार उपलब्ध करून दिल्याचे त्यांचे लक्ष शिक्षणाकडे वळू लागले.[१०]

ब्राह्मणोत्तर स्त्री शिक्षणाबरोबरच ब्राह्मण स्त्रियांच्याही शिक्षणासाठी शाहूंनी प्रयत्न केल्याचे दिसते. डॉक्टर आनंदीबाई जोशी यांना अमेरिकेत त्यांनी अभिनंदनाचे पत्र पाठविले होते. परतीच्या प्रवासासाठी आर्थिक मदत ही केली होती. त्यात आनंदीबाईंनी भारतात परत आल्यावर कोल्हापुरातील नवीन सुरू झालेल्या सरकारी इस्पितळात 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल' मध्ये 'असिस्टंट दरबार सर्जन' या उच्च मुद्द्यावर काम करावे, त्यांना निवासाच्या लगतच सर्व सुखसोयींनी युक्त बंगला देण्यात येईल, दरमहा ३०० ते ५०० रुपये वेतन मिळेल. त्यांना इकडील होतकरू व तरुण मुलींना वैद्यकीय व परिचारिका शिक्षण द्यावे इत्यादीविषयी आनंदीबाईंना शाहूंनी लिहिले होते. पण भारतात आल्यावर आजारपणातच २६ फेब्रुवारी १८८७ ला आनंदीबाई मरण पावली.[११] डॉक्टर आनंदीबाई जोशीच्या मृत्यूने स्त्रियांच्या सुश्रेषेसाठी प्रशिक्षित सेविका निर्माण करण्याचे अपूर्ण राहिलेले काम शाहूंनी डॉक्टर कृष्णाबाई केळवकर यांच्यामार्फत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. १९१४ मध्ये त्यांनी दवाखान्यात काम करणाऱ्या सेविकांना प्रशिक्षण व स्कॉलरशिप देऊ केल्याचे दिसते. प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलीसाठी सहा प्रकारच्या स्कॉलरशिप त्यांनी ठेवल्या होत्या.[१२] कृष्णाबाई या हॉस्पिटलमध्ये स्थिरस्थावर झाल्यानंतर १९१७ मध्ये रुग्णपरिचारिकेचा नवा अभ्यासक्रम त्यांनी 'ए.ई. हॉस्पिटल' मध्ये सुरू केला आणि तिथे शिकण्यासाठी स्त्रियांना उत्तेजन मिळावे म्हणून सहा स्कॉलरशिप देऊ केल्या. "कोल्हापूर ए.ई. हॉस्पिटलमध्ये तारीख १ माहे डिसेंबर १९१७ इसवी पासून नवीन नर्सिंग क्लास सुरू होणार आहे. करिता त्यामध्ये ज्यांचे शिकण्याची इच्छा असेल त्यांनी चांगल्या वर्तणुकीबाबत सभ्य गृहस्थांचा दाखला घेऊन सदर दिवशी हजर रहावे. विद्यार्थिनींची प्रवेशपरीक्षा घेऊन पहिल्या सहा नंबरास स्कॉलरशिप देण्यात येईल."[१३] अशा प्रकारची नोटीस शाहूंनी प्रसिद्ध केली. यामुळे स्त्रियांच्या आरोग्याकडे शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची दृष्टी देण्यास शाहू यशस्वी झाल्याचे दिसते.

**प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे -**शिक्षण प्रसाराच्या आणखी एका धोरणाचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. २४ जुलै १९१७ रोजी महाराजांनी हुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याची योजना जाहीर केली. तसेच १६ ऑगस्ट १९१८ रोजी शिक्षण विषयक कराचा कायदा केला आणि सर्व प्राथमिक शाळातून विद्यार्थ्यांना फी माफी करण्यात आली राजाराम कॉलेजच्या विद्यार्थिनींची फी माफी केली होती त्याचा संदर्भ येऊन गेला आहे.

**वैदिक शिक्षणासाठी विद्यालय -**महाराजांनी ६ जुलै १९२० रोजी जुन्या राजवाड्यात वैदिक शिक्षण देण्यासाठी विद्यालय सुरु केले आणि ते शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहची सोय केली. या वसतिगृहात तीस-चाळीस विद्यार्थी शिक्षण घेत असत. वैदिक शिक्षण देणाऱ्या आणखी दोन संस्था नंतर सुरु झाल्या. त्यापैकी एक म्हणजे 'श्री शाहू वैदिक विद्यालय' ही संस्था राजाराम महाराजांनी सुरु केली. दुसरी संस्था रावबहादूर भोसले यांनी 'शाहू वैदिक विद्यालय' नावाने चालविली. या तिन्ही संस्थांचा हेतू सामान्यतः ब्राह्मणेत्तर समाजात वैदिक शिक्षणाचा उपयोग करून धार्मिक विधी करणारा विद्यार्थी वर्ग निर्माण करावा, म्हणजे असे विधी योग्य प्रकारे पार पाडता येतील हा होता. अशा प्रकारे संस्थानात सर्व मिळून वीस वसतिगृहे चालू झाली. स्त्री शिक्षणासंदर्भात या पद्धतीमुळे अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. सर्वसाधारण समाजात शिक्षण नाही म्हणून मागासलेपणा कायम राहिला होता. तो नाहीसा करावयाचा, तर शिक्षणाचा प्रसार करणे आवश्यक आहे, या व्यापक दृष्टीने महाराजांनी शिक्षण विषयक सवलती, शिक्षण संस्थांची वाढ आणि शिक्षण संस्थांना आर्थिक मदत अशा तीन मार्गांनी प्रयत्न केले.[१४]

**स्त्रियांच्या उन्नतीचे कायदे-** सामाजिक कार्यात, विशेषता: स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांनी असे कायदे केले की, त्या अन्वये बालविवाहास बंदी केली, तसेच आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढवली. नोंदणी विवाहाची सुविधा निर्माण केली. पाराच्या विवाहास कायद्याने मान्यता दिली. हे सर्व कायदे जुलै १९१७ च्या मध्यास करण्यात आले. त्या बरोबरच देवाला मुली वाहण्याची अमानुष रूढी बंद करण्यासाठी प्रतिबंधक कायदा केला.[१५]

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**निष्कर्ष:**

छत्रपती शाहू महाराज व अनेक कर्तबगार महिलांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचे सकारात्मक परिणाम आज अखेर दिसून येत आहेत. शाहू महाराजांनी शेती, उद्योग या क्षेत्रात केलेल्या कार्याचे फलित आज ही दिसून येत आहे. राधानगरी सारख्या धरण बांधणीमुळे आज कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो हेक्टर जमीन बारमाही ओलीताखाली आहे. शाहू महाराजांनी वसवलेल्या कृषी बाजारपेठा आजही यशस्वीपणे कार्य करत असल्याचे दिसून येते. शाहूच्या सामाजिक शैक्षणिक सुधारणांचे दीर्घकालीन परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला राज्यात बळकटी दिल्याने त्याकाळी ०.३५% स्त्री साक्षरतेचे जे प्रमाण होते ते स्वातंत्र्योत्तर कोल्हापूर जिल्ह्यात लक्षणीयरित्या वाढत गेल्याचे दिसून येते. २०११ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्ह्याची लोकसंख्या ३८७६००१ इतकी होती तर यामध्ये १८९५३४३ (म्हणजेच ४८.८९ टक्के) इतक्या महिला होत्या. जिल्ह्याचा एकूण साक्षरता दर हा ८५.५१% इतका नोंदवला गेला. तर ग्रामीण भागात महिला साक्षरता दर ६९.७३% तर शहरी भागात महिला साक्षरता दर हा ८३.९५% इतका आढळून आला आहे. अर्थात अजून ग्रामीण महिला साक्षरतेचे प्रमाण हे कमी असले तरी ०.३५% वरून ६९.७३% पर्यंतच्या या साक्षरतेच्या दीर्घ प्रवासाची बीजे ही छत्रपती शाहूंनी पेरलेल्या शैक्षणिक धोरणामध्ये दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र आणि राज्य सरकारांनी नियोजनाच्या अंगीकार करून सामाजिक आणि आर्थिक बदलांसाठी अथवा विकासासाठी खूप प्रयत्न केले त्यांची फल निश्चिती सातत्याने येत गेली. सर्व शिक्षा अभियान असेल किंवा १९९० च्या दशकातील रात्र शाळेचा उपक्रम असेल ज्यामुळे कोल्हापुरातीलच नव्हे तर संपूर्ण भारतवर्षातील स्त्रियांच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा घडून आली. [(१६)]

२) सामाजिकदृष्ट्या उपेक्षित वर्गाची शैक्षणिक प्रगती देखील स्वातंत्र्योत्तर काळात खूप मोठ्या प्रमाणावर घडून आली. कोल्हापूर जिल्ह्यातील एस.सी प्रवर्गाचे साक्षरतेचे प्रमाण हे फक्त ५४.३४% इतके १९९१ च्या जनगणने वेळी होते ते वाढत जाऊन २०११ मध्ये ७५.६३% इतके झाले. म्हणजेच एकंदरीत सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाची ही शैक्षणिक प्रगती छत्रपती शाहू महाराजांनी घालून दिलेल्या शैक्षणिक पायामुळेच शक्य झाली असे म्हणता येईल. त्या काळात शाहू महाराजांनी अस्पृश्यतांच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केली होती. तसेच वेगवेगळ्या जाती-धर्मीयांसाठी बोर्डिंग अथवा वस्तीगृहांची निर्मिती देखील केली होती. यावरून शाहूच्या शैक्षणिक कार्यामुळे आजची नेत्रदीपक प्रगती दिसून येत आहे स्पष्ट आहे.[१७]

३) शाहू महाराजांनी संस्थान काळात सातत्याने पुरोगामी आणि शैक्षणिक धोरणाचा पुरस्कार करून संपूर्ण राज्यालाच सामाजिक समानता, सामाजिक न्याय, या तत्त्वांची ओळख करून दिली होती. अनेक कर्तबगार महिलांना, कारागिरांना, कलाकारांना त्यांनी राजाश्रय दिला होता. कृष्णाबाई केळकर इंदूमती राणीसरकार, रखमाबाई केळकर, आनंदीबाई जोशी यासारख्या महिलांना शैक्षणिक सहाय्य केले. त्यातून पुढील काळात अनेक लढाऊ महिला नेतृत्व उदयास आली. यामध्ये उल्लेखनीय महिला म्हणजे विमलाबाई बागल होय. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांसाठी आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याचे बळ पुढील काळात महिलांना प्राप्त झाले. त्याची प्रचिती संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महिलांचा सहभाग, हैदराबाद मुक्ती संग्रामातील महिलांचा सहभाग आणि गोवामुक्ती मध्ये महिलांचा सहभाग अभ्यासल्यास दिसून येईल.

४) प्रशासकीय सेवांमध्ये महिलांचे प्रमाण हे वाढताना दिसून येत आहे. आज एकूण प्रशासकीय सेवांमध्ये २१% महिला कार्यरत आहेत. हे प्रमाण स्वातंत्र्याच्या वेळी नगण्य स्वरूपाचे होते. स्त्रियांना प्रशासकीय सेवांमध्ये समाविष्ट करण्याची सुरुवात छत्रपती शाहू महाराजांनी करवीर संस्थानात केली त्याची फलनिश्चिती म्हणून आज महिलांचा प्रशासकीय सेवांमध्ये वाढता सहभाग दिसून येत आहे.

५) महिलांचा सामाजिक कार्यातील सहभाग हा फार कमी होता तो इंदुमतीराणीऽ साहेब यांच्या कार्यामुळे वाढीस लागला. इंदुमतीराणी साहेब यांच्यामुळे किंवा त्याच्या पुढाकाराने स्त्री-मुक्ती चळवळ तर सुरू झालीच परंतु ४ एप्रिल १९५४ रोजी 'ललित विहार' सारख्या संस्थेची स्थापना झाली. अखिल भारतीय मराठा महिला परिषद १९५३ मध्ये कोल्हापुरात भरवण्यात आली. बडोद्याच्या महाराणी शांतादेवी गायकवाड या महिला परिषदेच्या अध्यक्ष होत्या. तर इंदुमती राणीसाहेब स्वागताध्यक्ष होत्या. या सामाजिक स्त्री - स्थित्यंतराची बीजे ही संस्थानकाळात शाहू महाराजांनी आपल्या धोरणामध्ये बीजवली होती.

६) बालविवाह बंदी, आंतरजातीय विवाहास मान्यता, आणि मुलीच्या लग्नाची वयोमर्यादा वाढवली गेली ती शाहू महाराजांच्या स्त्री उन्नतीच्या कायद्यांनी आणि धोरणांनी स्वातंत्र्योत्तर काळात या अनिष्ट-रूढी परंपरांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

संविधानाने पायबंध तर घातलाच पण स्त्री उन्नतीची तरतूद ही करून ठेवली अर्थात पूर्णपणे आजची स्त्री ही सामाजिक रूढी-परंपरातून मुक्त झाली नसली तरी आजच्या स्त्री वर्गाचा प्रवास हा स्त्री-मुक्ती कडे आहे हे स्पष्ट आहे.

**७)** महिलांचा राजकीय सहभाग हा स्वातंत्रोत्तर काळात कोल्हापूर जिल्ह्यातच नाही तर देशभर वाढू लागला. नगरपालिका, ग्रामपंचायत, महानगरपालिका, विधानसभा, लोकसभा इत्यादी मध्ये महिलांचा सहभाग हा फारच कमी होता तो स्वातंत्र्योत्तर काळात हळू-हळू वाढत असल्याचे दिसून येते. जगभरात केंद्रीय निर्णय प्रक्रियेमधील महिलांचा सहभागा जवळपास २६.९% आहे तर भारत हे प्रमाण फक्त १४.७% इतकेच आहे.[१८]

**संदर्भ :**

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई (२००१) पृ. १०४
२. सूर्यवंशी गणपतराव सुबराव : राजा शाहू आणि समाजप्रबोधन, इचलकरंजी (१९७८) पृ. ५४
३. धाटावकर भास्कर (सेवा) : शाहू छत्रपतीचे निवडक आदेश, मुंबई (१९८८), पृ. १३९
४. धाटावकर भास्कर (सेवा) : कित्ता पृ. १४५
५. सूर्यवंशी गणपतराव सुबराव : राजा शाहू आणि समाजप्रबोधन, इचलकरंजी (१९७८ पृ. २३९
६. सूर्यवंशी गणपतराव सुबराव : कित्ता पृ. २४०
७. साळुंखे हिंदुराव : छत्रपती शाहू, स्मतीदर्शन, कोल्हापूर १९८९ पृ. १६
८. साळुंखे हिंदुराव : कित्ता पृ. ७
९. साळुंखे हिंदुराव : कित्ता पृ. १४
१०. साळुंखे हिंदुराव : कित्ता पृ. १०६
११. धाटावकर भास्कर (सेवा) : शाहू छत्रपतीचे निवडक आदेश, मुंबई (१९८८), पृ. ९४, ९५
१२. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, खंड ७, कोल्हापूर १९९७ पृ. ४४८
१३. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स : कित्ता पृ. ४६९
१४. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स : कित्ता पृ. ४८०
१५. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक २०११, पृ. २०
१६. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक २०११, पृ. ३४
१७. सूर्यवंशी कृ. गो. इंदुमती राणीसाहेब, ढोकळ प्रकाशन पुणे (१९७६) पृ. १६८
१८. Periodic Labour Force Survey (PLFS) (२०२३)

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**07**

# वेदोक्त प्रकरणी भास्करराव जाधव व लोकमान्य टिळक यांच्या वैचारिक भूमिकेचा आढावा

**डॉ. किशोर गुलाब गाढवे**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड, जि. सातारा

---

**प्रस्तावना:**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात 19 व्या शतक हे राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तनाचे शतक म्हणून ओळखले जाते. याची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले यांनी केली होती. अशा परिवर्तनाच्या कालखंडात कोल्हापूर राज्यांमध्ये सुधारणावादी विचारांचा पुरस्कार करणारा राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज सत्तेवर होते. 1894 ते 1922 या 28 वर्षाच्या अल्प कारकिर्दीमध्ये त्यांनी अनेक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. 19 व्या शतकाच्या प्रारंभीचा विचार केला तर आपल्या सुधारणांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक आदर्श निर्माण करत तत्कालीन परिस्थितीमध्ये कर्मठ विचारसरणीच्या लोकांच्या विरोधाला न जुमानता घेतलेला निर्णय पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. एकदा निर्णय घेतल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही हा त्यांच्या राज्यकारभाराचा विशेष पैलू महत्त्वाचा वाटतो. त्यांच्या कारकिर्दीतील वेदोक्त प्रकरण ही घटना त्यांचे आयुष्याला आणि एकंदरीतच कोल्हापूर राज्यातील लोकांच्या जीवनामध्ये बदल घडवून आणणारी ठरली. वेदोक्त प्रकरण खरे तर राजा आणि राज कुटुंब यांच्या पुरते मर्यादित होते. परंतु राजपुरोहित नारायणराव राजोपाध्याय यांनी शाहू महाराजांच्या आदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करून उद्धटपणाचे वर्तन केले.आपल्याच पुरोहिताकडून होणारा हा अपमान शाहू महाराजांना सहन झाला नाही. म्हणूनच ब्राह्मणी वर्चस्वाला धक्का देण्यासाठी राज्यकारभाराच्या आणि समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक असणारे निर्णय घेत या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात भास्करराव जाधव लोकमान्य टिळक या बुद्धिवादी विचारवंतांची भूमिका ही महत्त्वाची वाटते. भास्करराव जाधवांनी बुद्धीवादी दृष्टिकोन स्वीकारत या प्रकरणाकडे पाहत असताना राजर्षी शाहू महाराजांना आपला पूर्ण पाठिंबा दिला. तर लोकमान्य टिळकांनी शाहू विरोधी भूमिका घेत कोल्हापुरातील ब्रह्मवृंदाला पाठिंबा देण्याचा प्रयत्न केला. शाहू विरोधी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या दृष्टीने वेदोक्त प्रकरणाचा आढावा घेणे महत्त्वाचे वाटते. म्हणूनच शोधनिबंधाचा विषय वेदोक्त प्रकरण आणि भास्करराव जाधव व लोकमान्य टिळक या बुद्धिवादी विचारवंतांची भूमिका तपासणे, वेदोक्त प्रकरणामुळे परिवर्तनाला झालेली सुरुवात आणि त्याचे समाजावर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे हा या निबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**वेदोक्त प्रकरणाची सुरुवात:-** 1894 ला शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्याच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यापासून सर्वच क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू केला. यावेळी दरबारातील वातावरण बघितले तर राज दरबारातील प्रशासनामध्ये ब्राह्मण अधिकाऱ्यांची संख्या अधिक होती. ते अनेक वेळा राज आदेशाची अवहेलना करण्याचा प्रयत्न करत असत. या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी दरबारातील ब्राह्मण अधिकाऱ्यांची संख्या कमी करून ब्राह्मणेतर अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्यावरती भर दिला. 1894 साली कोल्हापूर राजदरबारात ब्राह्मणेतर कारकुनांची संख्या 10 होती. 1905 पर्यंत ही संख्या 60 पर्यंत वाढली.[१] यामध्ये उच्च बुद्धिमत्ता असणाऱ्या लोकांचा भरणा अधिक होता. वेगवेगळ्या प्रदेशातून असे लोक शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये आणण्याचा प्रयत्न केला होता. उदा. भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, महादेव डोंगरे, रावसाहेब दाजीराव विचारे यासारख्या तरुणांना कोल्हापूर राज्यात आणून त्यांच्यावरती महत्त्वाच्या पदांची जबाबदारी सोपवली.[२] भास्करराव जाधव यांच्याकडे असिस्टंट सर सुभे म्हणजेच प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रावसाहेब दाजीराव विचारे यांची कार्यकारी अभियंता म्हणून नेमणूक केली. 1895 ते 1921 या कालखंडात भास्करराव जाधव यांनी कोल्हापूर राज्यांमध्ये विविध महत्त्वाच्या पदांवर काम करत आपल्या कार्य आणि कर्तुत्वाची छाप उमटवली. ते संस्कृत भाषेचे उत्तम जाणकार होते. मागासलेल्या लोकांची उन्नती साधण्यासाठी त्यांच्यात शिक्षण प्रसार गरजेचे आहे. हे ओळखून शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी जे प्रयत्न केले त्याला भास्करराव जाधवांनी मोलाची साथ दिली.[३] छत्रपती शाहू महाराजांनी स्वीकारलेल्या बहुजनांच्या शिक्षण प्रसाराच्या धोरणामुळे कोल्हापूर संस्थानातील ब्राह्मण वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ लागले होते. त्यांना आपला सामाजिक दर्जा गमवावा लागेल याची भीती वाटू लागली होती. हीच वेदोक्त प्रकरणापाठीमागची खरी पार्श्वभूमी होती असे वाटते.

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**वेदोक्त की पुराणोक्त**: 1899 सालच्या वेदोक्त प्रकरणाने क्षत्रिय कुळातील धार्मिक विधी कोणत्या पद्धतीने करावेत म्हणजेच वेदोक्त की पुराणोक्त यावरून वादाला सुरुवात झाली. छत्रपती शाहू महाराज हे आध्यात्मिक प्रवृत्तीचे, धार्मिक विधी नितीनियम पाळणारे होते. त्यांची वेदांवरती श्रद्धा होती. धर्मपिठे, पुरोहितवर्ग आणि कर्मकांड यांची समाजाच्या स्थैर्यासाठी आवश्यकता आहे. धार्मिक श्रद्धा नसेल तर समाजात अराजकता माजेल. अशी भूमिका शाहू महाराजांची होती. तर त्यांचेच विश्वासू सहकारी भास्करराव जाधव मात्र मूर्ती पूजा न मानणारे, कर्मकांडाला बगल देऊन सामान्यपणे जीवन जगणारे एक बुद्धीवादी व्यक्तिमत्व होते. समाजाचे शिक्षण, जातीभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, ब्राह्मणी वर्चस्व नाहीसे करणे यासंबंधी शाहू महाराज आणि भास्करराव जाधव एकाच विचाराचे होते. परंतु धार्मिक बाबतीत मात्र परस्परांचे विचार भिन्न होते. भास्करराव जाधव बुद्धीप्रामाण्यवादी व्यक्तिमत्व होते. तसेच ते सत्यशोधक विचारसरणीचे कट्टर पुरस्कर्ते होते. मूर्तिपूजा त्यांना अमान्य होती. परमेश्वर आणि भक्त यांच्यात पुरोहित या मध्यस्था ची गरज नाही अशी त्यांची धारणा होती.

परंतु आपला हा दृष्टिकोन शाहू महाराजांच्या कार्यात अडसर ठरणार नाही याची त्यांनी काळजी घेतली होती. शाहू महाराज कोल्हापूर संस्थानातील धार्मिक स्थळांना भेटी देणे, तेथे धार्मिक विधी पार पाडणे, पवित्र स्नान करणे हा त्यांचा नेहमीचा कार्यक्रम होता. 1899 सालच्या कार्तिक महिन्यात पवित्र स्नानासाठी ते राजाराम शास्त्री भागवत, कौटुंबिक सदस्य आणि नातेवाईकांसह पंचगंगा नदीच्या घाटावर स्नानासाठी गेले. यावेळी राज कुटुंबाचे धार्मिक विधी पार पाडणारे पुरोहित नारायणराव राजोपाध्ये यासाठी उपस्थित होते. राज पुरोहितांनी स्वतः स्नान न करता मंत्रोच्चारण केले ते मंत्रोचारण वैदिक पद्धतीचे नव्हते तर पौराणिक मंत्र त्यांनी म्हणण्याचा प्रयत्न केला होता. ही गोष्ट शाहू महाराजांच्या बरोबर उपस्थित असणाऱ्या राजाराम शास्त्री भागवत यांच्या लक्षात आली. त्यांनी ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आणून दिली. याबाबत शाहू महाराजांनी नारायणराव राजोपाध्ये या पुरोहिताला प्रश्न केला. त्यावेळी राजपुरोहितांनी उद्धटपणे दिलेल्या उत्तराने महाराज अचंबीत झाले. मंत्र म्हणण्यापूर्वी मी स्नान करणे आवश्यक नाही. तसेच वैदिक मंत्र म्हणणे ही आवश्यक नाही. कारण ते शुद्रांसाठी नाहीत. जर वैदिक मंत्र म्हणायचे असतील तरच स्नान करून म्हणावे लागतात.[४] आपल्याच राजपुरोहितकडून झालेला हा अपमान शाहू महाराजांना अनपेक्षित होता. त्यावेळी महाराजांनी आम्हाला वैदिक मंत्रांचा अधिकार आहे असे सांगितले. त्यावर पुरोहित नारायणराव राजोपाध्ये उत्तरले की, जोपर्यंत ब्राह्मणवृंद (१४ ब्राह्मण) आपला क्षत्रिय दर्जा मान्य करत नाहीत तोपर्यंत मी आपला क्षत्रिय दर्जा मान्य करणार नाही.[५] अशा परिस्थितीत महाराजांनी तडकाफडकी कोणताच निर्णय घेतला नाही. या प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केला असता असे लक्षात येते की, हे प्रकरण शाहू महाराज आणि राजवाड्यातील धार्मिक विधी पुरते मर्यादित होते. या प्रकरणात शाहू महाराजांनी संयमी आणि शांत राहण्याची भूमिका घेतली.

पुढच्याच वर्षी 1900 साली कार्तिक महिन्यात आणखी एक महत्त्वाची घटना घडली. पंचगंगा नदी घाटावरील एक घाट ब्राह्मणांच्यासाठी राखून ठेवला जावा अशा आशयाचा ठराव कोल्हापूर नगरपालिकेमध्ये पास करण्यात आला. परंतु या निर्णयाच्या विरोधात ब्राह्मणेत्तर लोकांनी मोर्चे बांधणी करून त्यांचा हा निर्णय हाणून पडला. ब्राह्मणांसाठी राखीव असणाऱ्या घाटावर नगरपालिकेने लावलेली नोटीस फाडून टाकण्यात आली.[६] या घटनेमुळे अगोदरपासून धुमसत असणाऱ्या वेदोक्त प्रकरणात आगीत तेल ओतण्याचे काम केले होते. यावेळी कोल्हापुरातील राजाराम कॉलेज मधील संस्कृत विषयाचे प्राध्यापक राजाराम गोविंदराव विजापूरकर यांनी 'ग्रंथमाला' आणि 'समर्थ' वृत्तपत्रातून छत्रपती शाहू महाराजांवरती टीका करत ब्रह्मवृंदाची बाजू घेण्याचा प्रयत्न केला होता. विजापूरकर स्वत:ला लो.टिळकांचे शिष्य समजत असत.

**नारायणराव राजोपाध्यांची भूमिका:** कोल्हापुरातील वेदोक्त प्रकरणाने उठलेल्या वादळामध्ये ब्राह्मणवृंद नारायणराव राजोपाध्ये यांची बाजू घेऊ लागला होता. यामुळेच राजोपाध्ये शाहू महाराजांनी काढलेल्या आदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या या कृतीच्या विरोधात राज दरबारा कडून त्यांना तीन नोटीस देण्यात आल्या. या काळात शाहू महाराजांनी मध्यस्था मार्फत त्यांना समजावण्याचा ही प्रयत्न केला. पण राजोपाध्ये ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. हे बघून राजदरबाराने त्यांना राजपुरोहित पदावरून काढून टाकले, इनाम म्हणून दिलेल्या जमिनी काढून घेतल्या, आणि त्यांची संपत्ती ही जप्त करण्यात आली. यामुळे संतप्त झालेल्या नारायणराव राजोपाध्ये यांनी हे प्रकरण पुण्याच्या ब्रह्मसभेकडे नेले. या प्रकरणात लोकमान्य टिळकांनी हस्तक्षेप करत शाहू महाराजांच्या विरोधात भूमिका घेतली.यावेळी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी सुध्दा टिळकांची बाजू घेत शाहू महाराजांच्या विरोधी भूमिका घेतली. खरे तर टिळक आणि गोखले यांच्यात अनेक बाबतीत मतभेद होते. परंतु वेदोक्त प्रकरणांमध्ये मात्र गोखले टिळकांच्या बाजूला उभे राहिले. यावेळी लोकमान्य टिळकांनी "केसरी" या वृत्तपत्रातून "वेदोक्ताचे खूळ" या नावाने दोन लेख लिहून ब्रह्मवृंदाची बाजू घेण्याचा प्रयत्न केला.पहिल्या अग्रलेखात "वेदोक्ताची मागणी हे एक खूळ आहे" असे सांगत छत्रपती शिवाजी

महाराजांच्या बाबतीत वेदोक्ताचा अधिकार जो दिला गेला तो त्यांच्या कार्य कर्तुत्वाकडे पाहून दिली गेलेली सवलत होय. सध्या अशी मागणी करणारे शिवाजी महाराजांपेक्षा थोर दिसत नाहीत.सबब ही मागणी योग्य नाही.शिवाय परंपरेने चालत आलेली गृहकर्मे करण्याच्या पद्धतीने आपला मानभंग होतो,सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे हे सिध्द होते असे मराठा समाजातील काही धुरिणांना वाटते असे मत व्यक्त करत टिळकांनी शाहू महाराजांकडे बोट दाखविण्याचा प्रयत्न केला होता.

केसरी मधील दुसऱ्या अग्रलेखातून अशी भूमिका मांडली की; “वेदोक्त मंत्रांच्या उच्चारामुळे एखाद्या जातीचा सामाजिक दर्जा वरचा ठरत नाही.आणि वेदोक्त पद्धतीने धार्मिक कार्य करण्यास नकार देणाऱ्या ब्राह्मण पुरोहिताची इनामे जप्त करणे हे अन्यायकारक आहे”. अशी भूमिका मांडली. याच काळात कोल्हापूर, पुणे, सातारा आणि मद्रास प्रांतातील इंग्रजी वृत्तपत्रातून शाहू महाराजांच्या भूमिकेवर टीका करण्यात येऊन समाजामध्ये शाहू महाराजांच्या विरोधी वातावरण तयार करण्यात ब्रह्मवृंदाला यश मिळाले होते. याच्या जोरावर ब्रह्मवृंदाचे वर्तन उद्धट आणि त्रासदायक होऊ लागले होते. यासंदर्भात कोल्हापूर दरबाराने लंडन भेटीवर गेलेल्या शाहू महाराजांबरोबर केलेल्या पत्रव्यवहारांमध्ये या गोष्टींचा उल्लेख करण्यात आलेला आहे.[७] परंतु डिसेंबर १९१९ साली टिळकांनी आपल्या वेदोक्ताच्या भूमिकेत बदल केला होता. एखाद्या समुदायाला वेदोक्ताचा अधिकार पाहिजे असल्यास तो समुदाय या अधिकाराचा वापर करू शकतो. टिळकांच्या मते कोल्हापूर प्रकरणात छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार आहे किंवा नाही हा खरा मुद्दा नव्हता. धर्मकृत्या साठी दिली गेलेली इनामे जप्त केली जातात याला आपला आक्षेप आहे. शिवाय छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार असावा या भूमिकेला आपला पाठींबा होता. आणि ब्राह्मणेतरांना देखील तो मिळाला पाहिजे याला आपला विरोध नव्हता.[८]

**नारायणराव राजोपाध्ये यांची फिर्याद**: - कोल्हापूर दरबाराने राजपुरोहित नारायणराव राजोपाध्ये यांची सर्व संपत्ती जप्त केल्यामुळे याबाबत त्यांनी आपली फिर्याद कोल्हापूर पॉलिटिकल एजंटकडे केली. आपले काढून घेतलेले अधिकार परत मिळावेत अशी याचिका दाखल केली. या प्रकरणात पोलिटिकल एजंटने सर्व प्रकरण समजून घेत ब्रिटिश सरकारला शाहू महाराजांच्या अधीसत्तेमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. आपल्या विरोधात निकाल लागल्यामुळे राजोपाध्यांनी हे प्रकरण मुंबई सरकारकडे नेण्याचा प्रयत्न केला. परंतु मुंबई सरकारने सुद्धा कोल्हापूर पोलिटिकल एजंटने दिलेला निर्णय कायम ठेवत या प्रकरणी हस्तक्षेप करण्यास नकार दिला.यावेळी ब्रह्मवृंदाला असा संशय आला होता की,भास्करराव संस्कृत भाषेचे विद्वान असून तेच शाहू महाराजांना संस्कृत वाड्मयातील क्षत्रियांच्या वेदोक्ताच्या अधिकाराला अनुकूल संदर्भ काढून देतात.[९] त्यामुळे वेदोक्त प्रकरण वाढत चालले आहे. ब्रह्मवृंदाचा पाठिंबा असल्यामुळे राजपुरोहितांनी हे प्रकरण भारत सरकारकडे दाखल केले परंतु भारत सरकारने म्हणजेच तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड कर्झनने मुंबई सरकारची भूमिका योग्य असल्याचा निर्णय दिला. राजा म्हणून छत्रपती शाहू महाराजांना नारायणराव राजोपाध्ये यांचे सर्व हक्क हिरावून घेण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामध्ये भारत सरकारने हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही.[१०] असे नमूद केले. अशाप्रकारे वेदोक्त प्रकरणात भारत सरकारने सुद्धा नारायणराव राजोपाध्ये यांच्या विरोधात निर्णय दिल्यामुळे ब्रह्मवृंदाचा कणाच मोडला गेल्यासारखे झाले होते. लोकमान्य टिळकांच्या या भूमिकेचा बारकाईने अभ्यास केला असता असे लक्षात येते की, टिळक चातुर्वर्ण्य व्यवस्था समाजामध्ये कायम राहिली पाहिजे याच मताचा पुरस्कार करणारे होते. तर काही काळानंतर चिरोल कमिशन पुढे साक्ष देताना भास्करराव जाधवांनी वेदोक्त प्रकरणाबाबतची आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले की “वेदोक्तामध्ये मला काही विशेष अर्थ दिसत नाही. केवळ ब्राह्मण विरुध्द जातात म्हणून हा हक्क आम्ही मागतो.”[११] या विधानावरून भास्करराव जाधवांची भूमिका किती उदात्त होती याची कल्पना येते. तर डिसेंबर १९१९ साली लो.टिळकांनी आपल्या वेदोक्ताच्या भूमिकेत बदल केला होता.

सारांश :

1899 साली वेदोक्त प्रकरणाची सुरुवात अगदी शुल्लक कारणाने झाली होती. या प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करत असता असे लक्षात येते की छत्रपती शाहू महाराज आणि त्यांच्या राज कुटुंबाचे धार्मिक विधी एवढ्या पुरतेच हे प्रकरण मर्यादित होते. पुढे या प्रकरणात कोल्हापुरातील ब्रह्मवृंद,पुण्यातील लोकमान्य टिळक आणि इतर मंडळी यांनी शाहू महाराजांच्या विरोधी भूमिका घेऊन वेदोक्त प्रकरणाला ब्राह्मण पुरोहित शाही विरुद्धच्या बंडाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला. वेदोक्त प्रकरणाच्या सुरुवातीला शाहू महाराजांनी समजूतदारपणा संयमी भूमिका घेतली होती. परंतु ब्राह्मणी वर्चस्वाला शह दिला जातोय या विचाराने सनातनी ब्राह्मणांनी राजपुरोहित नारायणराव राजोपाध्ये यांना भरीस घालण्याचा प्रयत्न करून प्रसंगी उद्धटपणे वागण्याला प्रोत्साहित करून शाहू महाराजांना शह देण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात लोकमान्य टिळकांनी वेदोक्त प्रकरणावरून शाहू महाराजांच्या विरोधी भूमिका घेऊन राजकीय आणि सामाजिक कलह वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. कोल्हापूर दरबाराने नारायणराव राजोपाध्ये यांना असणारे अधिकार, इनाम वतन आणि संपत्ती काढून घेतल्यानंतर या प्रकरणाला राजकीय वळण लागले. नारायणराव राजोपाध्यांनी

आपल्याला न्याय मिळावा यासाठी कोल्हापूर पॉलिटिकल एजंट, मुंबई सरकार आणि भारत सरकारकडे अपील करून सुद्धा प्रत्येक ठिकाणी राजोपाध्ये यांच्या विरोधी निकाल लागला. सरकारने राज्यकारभारात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. यामुळे कोल्हापूर संस्थानातील ब्राह्मवृंदाला भोसले कुळ हे क्षत्रिय असून त्यांना वेदोक्त मंत्राचा अधिकार आहे हे मान्य करावे लागले. राजर्षी शाहू महाराजांनी क्षत्रियत्व आणि क्षत्रियत्वाचे हक्क तर सिद्ध केलेच.त्याचबरोबर ब्राह्मणी वर्चस्वा विरुद्ध पुरोहितशाही विरुद्ध धार्मिक आचारांच्या संदर्भातील समानता प्रस्थापित करण्याच्या लढ्यात रूपांतरित केले.

१. वैदिक पाठशाळा स्थापन केली. ती फक्त ब्राह्मण किंवा क्षत्रियांपुरती मर्यादित न ठेवता अस्पृश्य विद्यार्थ्यांनाही ती खुली केली. मराठा समाजात पुरोहित तयार करून ब्राह्मणांना शह देण्याचा प्रयत्न केला.

२.क्षात्रजगतगुरु नियुक्तीचा निर्णय घेतला. शंकराचार्यांचे पीठ ही कोणाची मक्तेदारी असू नये. तशी मक्तेदारी होत असल्यास ती मोडली पाहिजे.

३. कोल्हापूर संस्थानातील प्रशासनात ब्राह्मण नोकरशाहीच्या मक्तेदारी वरती आघात केला. ब्राह्मणेतरांची संख्या वाढवली.

४. वेदोक्त प्रकरणापासून शाहू महाराजांची धर्म जिज्ञासा जागृत झाली होती. वैदिक परंपरेमध्ये एक समानतेचा धागा होता.ही परंपरा सर्वांना खुली होती.धर्म समानतेचा विचार त्यामध्ये होता. हिंदू धर्माच्या आणि वैदिक परंपरेच्या चौकटीत राहून शाहू महाराजांनी ब्राह्मणी वर्चस्वाला आव्हान दिले. शाहू महाराजांनी वेदोक्त प्रकरणाच्या माध्यमातून धर्मसत्ता आणि राजसत्ता यांची फारकत करण्याचा प्रयत्न केला.

५.या प्रकरणाच्या माध्यमातून आपल्या अधिकाराबाबत लोकांना जागृत केले.पुरोगामी सामाजिक कायदे करून सामाजिक समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.या दृष्टिकोनातून वेदोक्त प्रकरण घडले ते एका अर्थाने बहुजन समाजाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना ठरली.

६.स्त्रियां व मागास जातींना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

७. मराठा व तत्सम जातीत एक नवा स्वाभिमान व आत्मभान निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.

८. सामाजिक अन्याय व विषमता दूर करण्यासाठी त्यांनी विधायक पावले उचलली.

परिणामांचा विचार करता आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. लोकमान्य टिळकांच्या या भूमिकेचा बारकाईने अभ्यास केला असता असे लक्षात येते की, टिळक चातुर्वर्ण्य व्यवस्था समाजामध्ये कायम राहिली पाहिजे याच मताचा पुरस्कार करणारे होते असे वाटते. तर काही काळानंतर चिरोल कमिशन पुढे साक्ष देताना भास्करराव जाधवांनी वेदोक्त प्रकरणाबाबतची आपली भूमिका स्पष्ट करताना मांडलेले मत महत्वाचे वाटते." वेदोक्तामध्ये मला काही विशेष अर्थ दिसत नाही.केवळ ब्राह्मण विरुध्द जातात म्हणून हा हक्क आम्ही मागतो". या विधानावरून भास्करराव जाधवांची भूमिका किती उदात्त होती याची कल्पना येते. तर डिसेंबर १९१९ साली लो.टिळकांनी आपल्या वेदोक्ताच्या भूमिकेत बदल केला होता. एखाद्या समुदायाला वेदोक्ताचा अधिकार पाहिजे असल्यास तो समुदाय या अधिकाराचा वापर करू शकतो. टिळकांच्या मते कोल्हापूर प्रकरणात छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार आहे किंवा नाही हा खरा मुद्दा नव्हता. धर्मकृत्या साठी दिली गेलेली इनामे जप्त केली जातात याला आपला आक्षेप आहे. शिवाय छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार असावा या भूमिकेला आपला पाठींबा होता. आणि ब्राह्मणेतरांना देखील तो मिळाला पाहिजे याला आपला विरोध नव्हता. लो.टिळकांची ही भूमिका सारवासारवीची वाटते.टिळक हे ब्राह्मण्यवादी विचारसरणीचे होते. या तुलनेत भास्करराव जाधवांचे विचार वास्तववादी होते. ते खऱ्या अर्थाने सत्यशोधक विचारांचे पाईक होते. वेदोक्त प्रकरणाने सामाजिक बदलाचे वारे सुरु झाले हे आपणाला मान्यच करावे लागते. या प्रकरणा मधून शाहू महाराजांनी सामाजिक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राजसत्ता ही लोकसेवेसाठी असते हे समाजाला आणि तत्कालीन राजसत्तांना दाखवून दिले.

संदर्भ:

१. डॉ.पवार जयसिंगराव, (संपा) श्रीमछत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र , प्रकाशक,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००९ ,पृ.१३३
२. डॉ. भोसले अरुण, दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व, छत्रपती शाहू महाराज – नामदार भास्करराव जाधव यांच्यावरील लेख, पहिली आवृत्ती, २०२२ पृ. १०१ ते १११
३. कित्ता, डॉ. भोसले अरुण, दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व, छत्रपती शाहू महाराज – नामदार भास्करराव जाधव याच्यावरील लेख, पहिली आवृत्ती, २०२२ पृ. १०१ ते १११

४. कीर धनंजय, शाहू छत्रपती, : अ रॉयल रिव्होल्युशनरी, पाप्युलरी प्रकाशन, मुंबई,१९७६ पृ.७८
५. उपरोक्त, डॉ.पवार जयसिंगराव, (संपा) श्रीमछत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, प्रकाशक,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००९ ,पृ.१६०
६. उपरोक्त, डॉ.पवार जयसिंगराव, (संपा) श्रीमछत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, प्रकाशक,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००९ ,पृ.१९०
७. डॉ.अशोक चौसाळकर,(संपा ) समाज प्रबोधन पत्रिका, लोकमान्य टिळक विशेषांक,अंक,२३४ एप्रिल-में-जून-२०२१, पृ.२७
८. डॉ.अशोक चौसाळकर,(संपा ) समाज प्रबोधन पत्रिका, लोकमान्य टिळक विशेषांक,अंक,२३४ एप्रिल-में-जून-२०२१, पृ.२७ व २८
९. डॉ. भोसले अरुण, दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व, छत्रपती शाहू महाराज – नामदार भास्करराव जाधव याच्यावरील लेख, पहिली आवृत्ती, २०२२ पृ. १०१ ते १११
१०. फडके य.दि.,छत्रपती शाहू आणि लोकमान्य,श्रीविद्या प्रकाशन १९८६,पृ.३९
११. डॉ. भोसले अरुण, दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व, छत्रपती शाहू महाराज – नामदार भास्करराव जाधव याच्यावरील लेख, पहिली आवृत्ती, २०२२ पृ. १०१ ते १११

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

08

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य

**डॉ. आर. डी. मांडणीकर**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

अस्पृश्यता हा भारतातील उच्च-नीच स्वरूपाच्या जाती व्यवस्थेतून जन्माला आलेला एक महाभयंकर रोग आहे. त्याकरिता ही उच्च-नीच जाती-जातीची उतरंड मोडली पाहिजे व जातीभेदाचा विषवृक्ष मूळासकट उपटून काढला पाहिजे. अस्पृश्यता हे याच जातीव्यवस्थेच्या समाजवृक्षाला लागलेले महाभयंकर विषारी फळ आहे. त्या वृक्षाचे निर्मुलन करावयाचे असेल तर आपल्या समाजातील जातीभेद गाडले पाहिजे, अशी शाहू महाराजांची धारणा होती. भारतीय संस्कृतीवर व राष्ट्रावर जातीव्यवस्थेचा हानीकारक परिणाम होत असल्याने आपल्या राज्यातील जाती-जातीत असणारे मतभेद व मत्सर जीवंत राहता कामा नये असे महाराजांना वाटत होते. शाहू महाराजांनी स्वराज्याचा विचार करताना प्रथमत: जातीभेद झुगारून देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. राज्यात खरी समता निर्माण करावयाची झाल्यास जातीभेद गाडले पाहिजेत व मोडलेही पाहिजेत. जातीभेद जसा सामाजीक समतेला घाटक आहे तशाच राष्ट्रालाही घातक आहे. ज्या काळात जातीव्यवस्थेचे भयंकर स्तोम माजवीले जात होते त्या काळात शाहू महाराजांनी जातीव्यवस्थेविरूद्ध व जातीभेदाविरूद्ध आपला खंबीर आवाज उठविला होता. एका संस्थानाचा राजा हा अस्पृश्यतेचा विचार करतोअणि लोकांपुढे निर्धारपूर्वक मांडतो याला फार मोठे महत्त्व आहे.

अस्पृश्यता ही भारतीय समाजव्यवस्थेला शतकानुशतके लागलेली भयंकर कीड आहे. या अस्पृश्यतेमुळे या देशातील कोट्यावधी पददलित गुलामगिरीचे जिणे जगत होते. अस्पृश्यतेमुळे पददलित माणूस समाजिकदृष्ट्या हिन ठरविला गेला. आर्थिकदृष्ट्या त्याला सवर्ण वरिष्ठाचा कायमचा सेवक केला आणि राजकीयदृष्ट्या वरिष्ठाचा गुलाम बनविला गेला. अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे अनेक समाजसुधारकांनी अनेक दृष्टीने पाहिले. कधी बौद्धिक मंथन करून, कधी भूतदयावादातून तर कधी समाजक्रांतीच्या मार्गाने मात्र शाहू महाराजांची भूमिका याहून वेगळी होती. त्यांनी जीविताचा भाग म्हणून या प्रश्नाकडे पाहिले. जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे हा शाहू महाराजांचा आग्रह होता. नागपूर, दिल्ली, माणगांव, नाशिक इत्यादी ठिकाणच्या परिषदेत त्याची अस्पृश्यता निवारणाबाबत आपली भूमिका मांडली. शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारणविषयी जो विचार मांडला तो सहानुभूतीपूर्वक नाही तर प्रत्यक्ष कृतीरूप आहे. अस्पृश्य लोकांना शिक्षण घेण्याचा हक्क प्रदान करण्यात आला. त्यांना शिष्यवृत्या देऊन त्यांच्या प्रगतीच्या दिशा स्पष्ट केल्या.

अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या जाती-जमाती-धर्माच्या विद्यार्थी वसतिगृहांची स्थापना केली. चांभार, महार यांच्याकरिता रात्रीच्या शाळा काढल्या. पूर्वापार चालत आलेली बलुतेदार पद्धती बंद केली. वाडी रत्नागिरी येथी महार लोकांकरिता पिण्याच्या पाण्यासाठी विहीर बांधण्याची व्यवस्था केली. वेठबिगारी पद्धत बंद केली. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये यासाठी शाहू महाराजांनी वटहुकूम काढले. सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, स्टेट हौसेस, सरकारी अन्नछत्रे, नदीचे पाणोठे, सार्वजनिक विहीरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही. शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता निवारणासाठी वटहुकुम, आदेश व ठराव करून कायदेशीररित्या जातीव्यवस्था नष्ट करण्याचे कार्य केले.

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य :** भारतातील जातीभेदामुळे समाजात राजकीय व सामाजिक एकता दिसून येत नव्हती. जातीभेदामुळे अस्पृश्य लोकांना माणूस म्हणून जीवन जगता येत नव्हते. माणूस म्हणून माणसाला असलेले अधिकार मिळत नव्हते. जातीभेद नष्ट करून किमान सामाजिक ऐक्य साधण्याचा विचार शाहू महाराजांचा होता. जातीभेद हेच जातीमत्सराचे मूळ असल्याने सर्व जाती नष्ट करून समाज एकजीनसी बनविण्याचे धोरण त्यांचे होते. जातीनिर्मुलनाचे उद्दिष्ट सहज साध्य नाही. त्यासाठी प्रत्येक जातींनी शिक्षण घेतले पाहिजे. जातीभेद निर्मुलनाच्या संदर्भात शाहू महाराजांनी प्रथम आपल्या कृतीत उतरून स्वत: वैयक्तिक आचरणाने इतर समाजाला आदर्श घालून दिला. आवश्यक तेथे कायदे करून आदेश काढून, वटहुकुम काढून त्यांची कडक अंमलबजावणीही केली. अस्पृश्य समाजाला वर आणण्याची जबाबदारी अस्पृश्याची व उच्चजातीय हिंदूंची आहे. त्यासाठी अस्पृश्य लोकांनी प्रगतीकडे बघितले पाहिजे व सवर्णयांनी काही पायऱ्या खाली आल्या पाहिजेत. अस्पृश्य हा दुबळा आहे, त्याला कणखर बनवण्याची जबाबदारी उच्च वर्गातील लोकांची आहे. अस्पृश्य लोकांना उन्नत व प्रगत व्हायचे असेल तर त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. शाहू

महाराजांनी अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी आपल्या राज्यात अनेक कायदे संमत केले. महाराजांनी जातीव्यवस्थेचा कलंक नष्ट करण्यासाठी आपल्या संस्थानात काही कृतीयुक्त उपाययोजना, आज्ञा व आदेश काढले आहेत.

**शिक्षणाचा प्रसार :** अस्पृश्य वर्गातील मुलांना शिक्षण देण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील अस्तित्वात असलेल्या शाळेत प्रवेश देण्यासाठी आदेश काढला. स्पृश्य-अस्पृश्य यांच्यासाठी वेगळी शाळा न काढण्याचा आदेश दिला. सामाजिक गुलामगिरी विरूद्ध अस्पृश्य समाजाला संघर्ष करण्यासाठी तयार करणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. त्यासाठी त्यांना शहाणे करणे आवश्यक होते. म्हणून शाहू महाराजांनी प्रथमत: शिक्षणावर भर दिला.

१) शिक्षण खात्याने अस्पृश्यांशी कशारितीने वागावे याबाबतचा एक आदेश १५ जानेवारी १९१९ मध्ये काढला. हुजूरांच्या पाहण्यास असे आले की अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळा खात्यात वेगवेगळ्या पद्धतीने वागविले जात असे. अस्पृश्य विद्यार्थ्यांना शाळा कंपाऊंडच्या आत येऊ दिले जात नव्हते. सरकारी इमारती खासगी उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसून अस्पृश्याची प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे. शिक्षण संस्था गरीब लोकांकरिता असून गरीबातील गरीब जे अस्पृश्य त्यांना समतेच्या पायावर वागविणे योग्य आहे. शाळा खात्यात अस्पृश्यांना समतेने वागविले नाही तर शाळेतील मुख्याध्यापक असो अगर शिक्षक त्याला जाब द्यावा लागेल आणि खासगी संस्थांना जी मदत मिळते ती काढून घेण्यात येईल.

**२) स्पृश्य-अस्पृश्य मुले एकाच शाळेत :** कोल्हापूर संस्थानात काही ठिकाणी अस्पृश्यांना वेगळ्या शाळा होत्या. महाराजांनी या वेगळ्या शाळा बंद करून सर्वांकरिता एकच शाळा असाव्यात असा एक आदेश काढला. २६ डिसेंबर १९१८ रोजी स्पृश्य अस्पृश्य मुले एकाच शाळेत राहणेची आहेत. ज्या ठिकाणी स्पृश्य व अस्पृश्य मुलांकरिता शाळा वेगवेगळ्या आहेत त्या बंद करून सर्वांकरिता एकच शाळा ठेवायची आहे.

**३) चांभार, महार यांच्याकरिता रात्रीची शाळा :** १९०६ साली कोल्हापूरात महार, चांभार वगैरे जातीसाठी एक रात्रशाळा होती. २८ नोव्हेंबर १९०६ च्या आदेशाने शाहू महाराजांनी ती शाळा कायम केली. ४ नोव्हेंबर १९०७ च्या आदेशानुसार कोल्हापूरात अस्पृश्यांच्या मुलींच्या शाळेला मंजुरी व खर्चाची तरतूद केली.

**४) अस्पृश्यांना शिक्षण घेण्यास मदत :** १६ ऑगस्ट १९१८ च्या आदेशाने अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांना मदत करण्यचा आदेश दिला. चांभार व ढोर समाजातील लोकांना प्रत्येकी पाचशे रूपये प्रमाणे सदर जातीतील मुलांचे शिक्षणाच्या कामी म्हणून देण्यात आले आहेत.

**५) अस्पृश्य वर्गाला मोफत शिक्षण :** शाहू महाराजांनी सर्वात महत्त्वाचा आदेश २४ नोव्हेंबर १९१९ रोजी काढला. त्यानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. दरबाराकडून हुशार विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती सुरू केली. ७ एप्रिल १९१९ च्या आदेशानुसार अस्पृश्य मुलांना पाठ्यपुस्तके, पेन्सील व शैक्षणिक साहित्य मोफत देण्याचे जाहिर केले. तलाठी वर्गातील अस्पृश्य मुलांना दरमहा रू. ६०/- प्रमाणे खास शिष्यवृत्ती जाहीर केली. २० सप्टेंबर १९१९ रोजीच्या आदेशानुसार सरकारी शाळेत सर्व जातीच्या मुलांना एकत्र बनविले. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अगदी सुरूवातीच्या काळात अस्पृश समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. ती मग वेगळी व स्वतंत्र व्यवस्था केली. महार, चांभार, ढोर जातीतील लोकांसाठी शिक्षण मिळावे म्हणून स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. परंतु काही कालांतराने सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांसाठी एकत्र शाळा स्थापन करण्याचा आदेश काढला. यातून असे दिसून येते की, शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाची व्यवस्था आपल्या कोल्हापूर संस्थानात राबविली.

**६) अस्पृश्य मुलांचे उपनयन-** अस्पृश्यांना उच्चवर्णियांच्या बरोबर आणण्यासाठी या मुलांना धार्मिक शिक्षण देण्याचा मोठा क्रांतीकारी निर्णय घेतला व अस्पृश्य मूलांना धार्मिक शिक्षण देऊन त्यांची वैदीक पद्धतीने संथा केली. यामुळे अस्पृश्यातील भेकडपणा कमी होऊन आत्मविश्वास निर्माण झाला. अस्पृश्य मूलांचे उपनयन करून त्यांना वेदांची संथा देणारा व त्यांना ब्राह्मणांसारखा श्रेष्ठ दर्जा मिळवून देणारा छत्रपती शाहू राजा हा हिंदुस्थानातील एकमेव राजा होय.

**सामाजिक समता :** अस्पृश्यता निवारणाच्या कामी व सामाजिक समता निर्माण करण्याच्या प्रश्नात महाराजांचे विचार व कार्य मूलगामी आणि क्रांतीकारक होते. 'बोले तैसा चाले' अशीच त्यांची भूमिका होती. शाहू महाराजांनी दलित व अस्पृश्य यांचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत मूलगामी विचार मांडले. त्या विचारांना आपल्या राज्यात कायद्याचे स्वरूप दिले. त्या काळात राजकीय सुधारणा अगोदर की सामाजिक सुधारणा याबाबत मतमतांतरे होती. या काळात सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे तत्त्वज्ञान

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

समाजापुढे धाडसाने मांडून सामाजिक समतेसाठी मूलगामी व क्रांतीकारक ठाम भुमिका शाहू महाराजांनी घेतली. दलित माणसाला, अस्पृश्य माणसाला माणूस म्हणून माणसाप्रमाणे वागविण्याचे शाहू महाराज यांचे कार्य चिरंतन स्वरूपाचे आहे.

शाहू महाराजांनी सर्वप्रथम अस्पृश्य समाजाला हात घातला. हा समाज माणूस असूनही गुलाम होता. त्याला पशुसारखे वागवले जात होते. जगण्यासाठी आणि जगणे ठिकवून ठेवण्यासाठी त्याला कोणतीच सामग्री जमवण्याचा अधिकार नव्हता. त्यांच्या अंगावर जातीची चामडी इतकी टणक वाढली गेली होती की ती भेदून त्याला स्वत:चे भावविश्व कधीही व्यक्त करता येत नव्हते. अस्पृश्यता हा या समाजावरील कलंक आहे. हा कलंक पुसण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक कायदे व जाहीरनामे काढले. जाहीरनामे व कायदे यांची अंमलबजावणी करण्यात आली. या प्रयत्नांना कृतीची जोड मिळावी म्हणून अनेक ठिकाणी शाहू महाराजांनी अस्पृश्याबरोबर भोजन केले, मराठा-धनगर यांच्यात विवाह घडवून आणला. गंगाराम कांबळे यांना हॉटेल काढून दिले व त्यांच्या हॉलेलात स्वत: चहा घेत असत. राजवाड्यात, प्रशासनात, जाहीर समारंभात अस्पृश्यांचा वावर वाढविला. नागपूर, दिल्ली, माणगाव इत्यादी परिषदांमधून अस्पृश्य उद्धाराचे कार्य केले. सर्वप्रथम महाराजांनी गुन्हेगारी जातीची हजेरी बंद केली. पारधी, बेरड आणि वडार आदि अनेक जातींना गुन्हेगार ठरविले होते. सरसकट सर्वांना रोज पोलीस पाटलासमोर जाऊन हजेरी द्यावी लागत होती. काही झाले तरी हजेरी चूकत नसे. २७ जुलै १९१८ ला एक जाहीरनामा काढून शाहू महाराजांनी हजेरी बंद केली व त्यापैकी काही जातीचे पुर्नवसन केले.

**१) महार लोकाकरितां पिण्याच्या पाण्यासाठी विहीर :** १२ नोव्हेंबर १८९४ च्या ठरावानुसार वाडी-रत्नागिरी येथील महार लोकांची वस्ती बरीच असून त्यांचेकरिता पाण्याची सोय नसल्याने त्यांचे फार हाल होतात ही गोष्ट खरी आहे हे महाराजांना कळताच महाराजांनी महार लोकांकरिता पिण्याच्या पाण्यासाठी विहीर बांधण्याची व्यवस्था केली. तसेच दुष्काळ असल्याने महार लोकांना तगई देण्यास हरकत नाही असा आदेश काढण्यात आला.

**२) बलुतेदारी पद्धत बंद केली-** २२ फेब्रुवारी १९१८ साली एक कायदा करून पूर्वापार चालत आलेली बलुतेदार पद्धती बंद केली. १९२१ साली महार वतन खालसा केली. मग बलुत्यातंर्गत जमीन एकत्रित केली. दहा एकरामागे एकाला सरकारी नोकरी देण्याचा फतवा काढला. वतनातील जमनी महाराजांच्या नांवावर केल्या. सरकारी नोकऱ्या महारांना देण्याचे तर जाहीर झाले.

**३) अस्पृश्यांना वकिलीच्या सनदा :** अस्पृश्यांची अस्मिता जागी व्हावी व त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून शाहू महाराजांनी मॅट्रिक पास झालेल्या अगर इंग्रजी चांगले शिकलेल्या महार, मांग, चांभार जातीच्या विद्यार्थ्यांना वकीलीच्या सनदा दिल्या.

**४) अस्पृश्य कर्तबगार नोकरांना बढती :** ५ ऑगस्ट १९१८ रोजीच्या आदेशान्वये अस्पृश्य जातीतील कर्तबगार नोकर असेल तर त्यास बढती देण्यात यावी. अस्पृश्य जातीच्या लोकांना तलाठी नेमण्याबद्दल हुकुम देण्यात आला. सदर लोकापैकी आपले कर्तबगारीने व बुद्धीने पुढे येतील त्यांना कारकून व अवल कारकून पदी बढती देण्यात यावी. अल्पावधीतच अस्पृश्य समाज वकील, तलाठी, कोलमन, जमादार, कारकून, शीलाईकार अशा वेगवेगळ्या पदावर दिसू लागला.

**५) अस्पृश्य लोकांकडून वेठबिगारी घेऊ नये :** महार, मांग वगैरे कोणाही अस्पृश्य लोकांकडून राजघराण्यातील लोकांशिवाय व स्टेट दप्तरांच्या कामाशिवाय वेठ, वरळ घेण्याची नाही. तहत, रावब, दिवाण सा. पर्यंत कोणाही रिजंड अगर ॲडमिनिस्ट्रेटर नोकराने वरील कामाशिवाय दर लोकांस वेठीस धरण्याचे नाही. पाटलाने जर वेठीस महार घेतला तर त्यास वतनातून कमी केले जाईल. तसेच मांगाकडून ढोर, नाडा वगैरे हरएक काम फूकट वेठ वरळेच्या स्वरूपात कोणी करून घेईल त्यासाठी जबर शासन करण्यात येईल. असा आदेश ३ मार्च १९२० रोजी काढला आहे.

**६) इनाम जमिनी रयतावा करून देणे :** १९ मे १९२१ च्या आदेशानुसार महारांच्या इनाम जमिनी रयतावा करून देण्याची व्यवस्था करावी असा आदेश देण्यात आला. या लोकांनी आपखुशीने इनाम जमिनी रयता करून देणे हाच उत्तम मार्ग आहे. सदर गावच्या म्हारकी इनाम जमिनी इनामातून काढून रयताव्यात दाखल कराव्यात. सदर जमिनीवर काही बाबी वगैरे बसलेल्या असल्यास त्या सर्व कमी करण्यात येत आहेत. या आदेशाच्या आधारे महारांना रयताव्याचे पूर्ण हक्क देण्यात येत आहेत. त्यांच्याकडून कोणतेही नोकरी घेण्याची नाही. २ सप्टेंबर १९०० रोजी काढलेल्या आदेशानुसार महरांच्या जमिनी इनाम वसाहतीसाठी घेतल्या त्या बदल्यात त्यांना दुसऱ्या जमिनी देणे.

**७) अस्पृश्यता निवारणाचे जाहीरनामे :**

१ जानेवारी १९१९ रोजी शाहू महाराजांनी दोन जाहीरनामे मंजूर केले. त्यातील पहिला महसूल व न्याय खात्यासंबंधी होता. कोल्हापूर संस्थानातील जातीयतेला कायद्यानेच कायमची मुठमाती देण्यासाठी जाहीरनामा काढावा लागला आहे. आमच्या संस्थानातील जे अस्पृश्य नोकरदार आहेत त्यांच्याशी समतेने व प्रेमाने वागले पाहिजे. कोणत्या अधिकाऱ्यास असे वागण्याची इच्छा

नसेल त्यानी आपल्या पदाचा राजीनामा देण्यात यावा. त्या अधिकाऱ्याला पेन्शन मिळणार नाही. अशाच आशयाचे हुकुम आरोग्य खाते व शिक्षण विभागालाही देण्यात आले. कोल्हापूर संस्थानातील शाळा, महाविद्यालयात अस्पृश्यता माणने हा गुन्हा ठरेल अशा आशयाचा हुकुम २३ ऑगस्ट १९१९ रोजी काढण्यात आला.

६ सप्टेंबर १९१९ च्या जाहीरनाम्याने सरकारी कार्यालये अन्नछत्रे इमारती, पाणवठे अस्पृश्यांना खुली केली व अस्पृश्यता पाळणाऱ्यांना दंडाची तरतुदीही केली.

**८) फासेपारधी लोकांसाठी घरबांधणी :** ६ सप्टेंबर १९१२ रोजीच्या आदेशानुसार फासेपारधी लोकांना राहण्यासाठी घर बांधून देण्यात यावे. कोटीतीर्थाचे माळावर फासेपारधी लोकांना त्यांच्या तेवीस कुटुंबास झोपड्या बांधून देणे. या कामाकरिता १२०० रूपये मंजूर करत आहोत. फासेपारधी जातीस लोकांना महाराजांनी राजवाड्यात चौकीदाराचे काम दिले.

**९) नाव-आडनावावरून जातीची ओळख :** अस्पृश्य लोकांची नावे-आडनावे बऱ्याचदा जातीवाचक असतात. त्यांच्या नावावरून जातीचा बांध लगेच होईल. म्हणून शाहू महाराजांनी कोल्हापूरमधील अस्पृश्य पैलवानाची नावे बदललेली आहे. उदा. महार पैलवानास, जाठ पैलवान, चांभारास सरदार पैलवान भंगी पैलवानास पंडीत पैलवान अशी नावे ठेवली. कारण दुसऱ्या जातीतील पैलवानास आपण अस्पृश्य पैलवानाशी कुस्ती करीत आहोत, हे समजत नाही.

**१०) अस्पृश्यांच्या अन्नपाण्याचा जाहीर स्वीकार :**

शाहू महाराजांच्या काळात अस्पृश्यांना शिवणे म्हणजे फार अपवित्र मानले जात असायचे हे फक्त ब्राह्मणच मानीत असे नव्हे तर मराठाही अपवाद नव्हता. तेव्हा शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी अस्पृश्यांच्या हातचे अन्नपाणी स्वीकारून अस्पृश्यतेच्य उच्चाटनासाठी कार्य केले.

**११) दलित मंडळाची स्थापना :** दक्षिण महाराष्ट्र दलित परिषदेचे अधिवेशन संपल्यानंतर कोल्हापूरात दलितोद्धाराचे कार्य सतत चालू ठेवण्यासाठी एक मध्यवर्ती संस्था असणे आवश्यक आहे. दक्षिण महाराष्ट्र सत्यप्रसारक मंडळ, या नावाने रजिस्टर झाली. महाराजांनी रजिस्ट्रेशन फी माफ केली. संस्थेने कार्यकारी मंडळ निवडले गेले व त्यातील काही कार्यकर्त्याच्या उपजीविकेच्या ही प्रश्न महाराजांनी सोडविला. दलितोद्धारांच्या प्रचार कार्याला जोराने सुरूवात झाली. कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील दलितोद्धारांच्या चळवळीचे एक केंद्र बनले.

**१२) दिल्लीची दलित परिषद :**शाहू महाराजांनी क्रांतीचे रणसिंग फुंकल्यानंतर त्यांची क्रांती महाराष्ट्रातच नव्हे तर संबंध भारतात पसरली. दु:खीताच्या वाली आणि गरिबाच्या कैवारी म्हणून बहुजन समाज त्यांच्याकडे आकर्षित आला. नागपूर शहरातील बहिष्कृत परिषदेद्वारे जनतेला त्यांनी जे ज्ञानामृत पाजले त्यांची आठवण मागासवर्गीयांना होणे स्वाभाविकच आहे. याच जाणीवेमुळे दिल्ली परिसरातील दलित वर्गीयांनी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी विनंती केली. १६ फेब्रुवारी १९२२ ला ते भारतीय अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष झाले. या परिषदेचत संबोधताना म्हणाले. दलित समाजाची सेवा करण्याची संधी तुम्ही मला उपलब्ध करून दिली. दुसऱ्यावर भरवसा टाकून जर तुम्ही वावरू लागतात तर तुमचा उद्धार लवकर होणार नाही. आपला उद्धार आपणच केला पाहिजे. धर्मरूढी व समाजरूढी आपण झिडकारली पाहिजे. आपली संघटना आपणच बळकट केली पाहिजे. आपली संघटना असल्याशिवाय आपला तरणोपाय नाही.

शाहू महाराजांच्या अस्पृश्यतोद्धाराचे समाजकार्य स्फूर्तीदाते महात्मा जोतिबा फुले हे होते. महात्मा फुले यांचा अस्पृश्योद्धाराचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्षात उतरविला आणि संस्थांचा राजा यासाठी कायदे करू शकतो. वटहुकुम काढू शकतो व त्याची अंमलबजावणी डोळ्यात तेल घालून काटेकोरपणे करू शकतो यांचा महान आदर्श शाहू महाराजांनी चिरंतन स्वरूपात भारतीय राज्यकर्त्यांपुढे घालून दिला.

अस्पृश्यता निमुर्लनासाठी शाहू महाराजांनी टाकलेले हे क्रांतीकारक पाऊल होय. हे निर्विवाद सत्य आहे. अस्पृश्यता निमुर्लन करणे हे तर खरे ध्येय होते. महाराष्ट्रात नव्हे तर भारतातील इतर प्रांतात अशी महान क्रांती पूर्वी कधी घडलेली नव्हती. परंतु राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात अस्पृश्यतेचा, जातीयतेचा नायनाट करण्याचा अटोकाट प्रयत्न केला. महार आणि तलाठी, चांभार यांना नगरपालिकेच्या स्थायि समितीचा अध्यक्ष, अस्पृश्यांच्या घरी जाऊन जेवण करणे, गंगाराम कांबळे याला हॉटेल टाकून देणे व त्याच्या हॉटेलमध्ये चहा घेणे, सोनतळी कँपवर अस्पृश्य लोकांसाठी जेवणाची मेजवाणी देणे हे दुर्मिळ स्वरूपाचे क्रांतीमय सामाजिक अभिसरण घडवून आणणारे छत्रपती राजर्षी शाहू महाराज महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात प्रथमच दिसले. मानवी हक्काचा जाहीरनामा घोषित न करता दलित, वंचित आणि पददलितांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देण्याची ही कृती, वस्त्र, वित्त, विद्या आणि स्वाभिमानापासून वंचित झालेल्यांना हे सर्व हक्क बहाल करण्याचे महान कार्य केले. दलितांच्या जीवनात समरस होऊन

जाण्याची रीत, त्यांच्या ताटातील अन्न खाऊन त्यांच्या फुटक्या मडक्यातून पाणी पिण्याची कृतीयुक्त क्रांती, अंत्यजाशी विवाहसंबंध जोडून त्यांना समान संधी देऊन, उद्योगधंदे काढून देऊन, नोकऱ्यात समान संधी देऊन त्यांना माणूसकीच्या आणि समानतेच्या व्यासपीठावर आण्याची थोर मोलाची कामगिरी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी केली.

**संदर्भ :**

१) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, डॉ. रमेश जाधव, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग.
२) राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
३) राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व कार्य, डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
४) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, शामराव पाटील, सांगली.
५) शाहू राजा, प्रज्ञावंत गौतम, प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर.
६) छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि कायदे कानून, बगाडे दत्तात्रय, पद्मा प्रकाशन, कोल्हापूर.
७) शाहूंच्या आठवणी, साळुंखे नानासाहेब, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.
८) शाहू छत्रपती एक क्रांतीकारक, किर धनंजय, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
९) राजर्षी शाहू महाराजांनी भाषणे, जाधव बी. बी., राजर्षी प्रकाशन.
१०) राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर चळवळ, डॉ. जयसिंगराव पवार, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

09

# राजर्षी शाहू महाराजांचे आपत्ती व्यवस्थापन धोरण आणि कार्य

**अभिषेक प्रविण चौगले,**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज

---

**प्रस्तावना:** २ एप्रिल १८९४ रोजी छत्रपती शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला. राज्यकारभाराची सूत्रे शाहू महाराजांनी हाती घेतल्यानंतर दोन वर्षातच दुष्काळ व प्लेग सारख्या आपत्ती राज्यासमोर उभ्या राहिल्या. त्या काळात आपत्ती व्यवस्थापन ही संकल्पना अस्तित्वातच नव्हती. तरीदेखील कारकीर्दीच्या सुरुवातीला महाराजांनी दुष्काळ व प्लेग महामारीच्या निर्मूलनासाठी कशा पद्धतीने धोरणे आखली व त्यांची अंमलबजावणी केली याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टये:

१) आपत्ती व्यवस्थापनाचे टप्पे समजून घेणे.

२) दुष्काळ निवारणासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आखलेली धोरणे, निर्णय व त्यांची अंमलबजावणी यांचा अभ्यास करणे.

३) प्लेगच्या साथीस पायबंद घालण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आखलेली धोरणे, घेतलेले निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी यांचा आढावा घेणे.

४) दुष्काळ आणि प्लेग या दोन्ही आपत्तींच्या काळात राजश्री शाहू महाराजांनी केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्याचा एकूण आढावा घेणे व आजच्या काळाच्या संदर्भात या कार्याचा विचार करणे.

संशोधन पद्धती:- हा शोध निबंध लिहिण्यासाठी प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरली आहे.

**आपत्ती व्यवस्थापनाचे टप्पे :-** विसाव्या शतकाच्या मध्यानंतर आपत्ती व्यवस्थापन प्रणाली विकसित होत गेली. आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रामुख्याने तीन टप्प्यांचा समावेश होतो. हे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत. १) आपत्तीपूर्व टप्पा - यामध्ये संकटाचा पूर्व अंदाज घेणे, प्रतिकारासाठी नियोजन करणे, अंमलबजावणीसाठी प्रभावी यंत्रणा उभी करणे, यांचा समावेश होतो. २) आपत्ती दरम्यानचा टप्पा- यामध्ये आखलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व उपाययोजना करणे, योजनांमधील त्रुटी दूर करणे या कृतींचा समावेश होतो. ३) आपत्तीपश्चातला टप्पा - यामध्ये मदत, पुनर्वसन, भविष्यात आपत्ती उद्भवू नये किंवा भविष्यात आपत्ती उद्भवल्या नंतर आपत्तीची झळ कमीत कमी बसावी यासाठी उपाययोजना अशा कृतींचा समावेश होतो.

दुष्काळाची आपत्ती व त्याचे निवारण :

**आपत्तीपूर्व नियोजन :** राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत संस्थानात १८९६-१८९७, १८९९-१९००, १९०१-१९०२, १९०५-१९०६, १९१८-१९१९ असे एकूण पाच दुष्काळ पडले होते. संस्थानांमध्ये दुष्काळाच्या झळा तीव्र झाल्यानंतर शाहू महाराजांनी स्वतः प्रत्यक्ष पाहणी केली. सन १८९६-१८९७ मध्ये महाराजांनी दुष्काळी भागाचा दौरा केला. प्रत्यक्ष शेतीवर जाऊन रयतेची दुःखे जाणून घेतली. पिण्याच्या पाण्याची समस्या, शेतीचे प्रश्न, धान्याच्या किमती, बेरोजगारी यासंबंधी माहिती जाणून घेतली. महाराजांच्या या दौऱ्याने लोकांचे मनोधैर्य वाढले.

**आपत्ती काळातील नियोजन व कृती :** दुष्काळाचा सामना करण्यासाठी १८९९ यावर्षी महाराजांनी 'दुष्काळ विभाग' सुरू केला. दुष्काळी आयुक्त म्हणून दरबारी दिवाण यांची नेमणूक केली. दिवाणांच्या ऑफिसमध्ये खास दुष्काळी कचेरी सुरू केली. विविध मामलेदार कचेऱ्यात दुष्काळी विभाग सुरू केले. दुष्काळी कचेऱ्यांमध्ये दुष्काळासंबंधी माहिती संकलित करून आवश्यक त्या ठिकाणी विविध दुष्काळी कामे सुरू केली.

**पिण्याच्या पाण्याची सोय:** पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी नव्या विहिरी बांधणे, विहिरींचे खोलीकरण, नवीन तलाव बांधणे, जुन्या तलावांची दुरुस्ती, झरे खोदणे यासारखी कामे शाहू महाराजांनी हाती घेतली. या कामांमधून लोकांना रोजगार प्राप्त झाला. लोकांना रोजगार मिळावा म्हणून शाहू महाराजांनी रस्ते व पूल बांधणीची कामे हाती घेतली. ही कामे पार पडल्याने दुष्काळी भागात अन्नधान्याचे दळणवळण करण्यास मदत झाली. कष्टकरी मजूर, कमी पगाराच्या दरबारी लोकांना दुष्काळी भत्ता देण्याची व्यवस्था महाराजांनी केली. संस्थानात स्वस्त धान्याची दुकाने सुरू केली. दुष्काळामध्ये शेतकऱ्यांकडे भांडवलाची वानवा असते. त्यामुळे शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना दरबारी तोटा सहन करून मोठ्या प्रमाणावर तगाई कर्जे दिली. या कर्जाच्या आधारे शेतकऱ्यांनी आपल्या शेतीच्या सुधारणांची कामे करावीत, असा महाराजांचा हेतू होता.

दुष्काळाच्या काळात अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक उपाययोजना केल्या. व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांना ना-नफा ना-तोटा या तत्त्वावर किंवा प्रसंगी तोट्यात मालाची विक्री करावयास सांगून तोट्याची दरबार कडून भरपाई करण्यास सांगितले. धान्याच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी इतर प्रांतातून धान्य आयात केले. धान्याचा साठा संपलेल्या व्यापाऱ्यांना परप्रांतातून धान्य खरेदी करण्यास बिनव्याजी कर्जे दिली. त्यामुळे धान्याच्या किमती नियंत्रणात राहण्यास मदत झाली.

**मदत आणि पुनर्वसन :-** दुष्काळी कामावर येणाऱ्या मजुरांच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणाघरे उभारली. मजुरांच्या मुलांचा सांभाळ व देखभाल करण्यासाठी दरबाराकडून आयांची नेमणूक केली. मुलांच्या रोजच्या दूधपाण्याच्या खर्चाची तरतूद केली. दुष्काळाच्या झळा बसलेल्या गोरगरीब रयतेला महाराजांनी शिधा स्वरूपात अन्नाची मदत दिली. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी स्वस्त खानावळी सुरू केल्या. असाध्य रोगांनी पीडित अशक्त व्यक्तींसाठी दरबारच्या वतीने मोफत निराधार आश्रम सुरू केले. तेथे या लोकांच्या राहण्याची, जेवणाची, कपडे-लत्ते व औषधोपचाराची मोफत सोय करण्यात आली. जे लोक घरातून बाहेर पडू शकत नव्हते अशा वयोवृद्ध, अपंग, आंधळया व पांगळया लोकांसाठी घरपोच शिधावाटप करण्याची सोय शाहू महाराजांनी केली.

महाराजांच्या नजरेतून मुकी जनावरेही सुटली नाहीत. एका जाहीरनाम्यात महाराज लिहितात, "ज्याला आपली जनावरे पोसण्याचे सामर्थ्य नाही, त्याने ती संस्थांच्या थट्टीत पाठवावीत. तेथे ती पाळली जातील. मालकाला जरुरी वाटेल तेव्हा त्यांनी जनावरे परत न्यावीत." जनावरांसाठी महाराजांनी स्वस्त दराने गवत विकण्याची तजवीज केली. जनावरे मोफत चारण्यासाठी संस्थानची जंगले खुली केली.

**आपत्तीपश्चातचे कार्य :** वारंवार पडणाऱ्या दुष्काळाशी यशस्वीपणे मुकाबला करण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात स. १९०२ साली 'जलसिंचन धोरण' (Irrigation Policy) जाहीर केले. त्यानुसार मि. गुप्ते यांची इरिगेशन ऑफिसर म्हणून नेमणूक होऊन त्यांना संस्थानातील सर्व लहान मोठ्या तळ्यांचा व विहिरींचा अहवाल तयार करण्याचा हुकूम झाला. यासाठी महाराजांनी ३ फेब्रुवारी १९०२ रोजी जाहीरनामा काढला. त्यामुळे दुष्काळाचा सामना करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने कामकाजास सुरुवात झाली.

दुष्काळावर उपाय करण्यासाठी राधानगरी धरण बांधण्यास शाहू महाराजांनी १९०८ साली सुरुवात केली. हे धरण कोल्हापूर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेले आहे. १८९६-९७ च्या दुष्काळात संपूर्ण भारतात १० लाख लोकांचे मृत्यू झाले. परंतु महाराजांनी दुष्काळ निवारणासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे कोल्हापूर संस्थानामध्ये एकही भूकबळी पडला नाही.

प्लेगची आपत्ती व त्यांचे निवारण:

**आपत्तीपूर्व नियोजन:** अंधश्रद्धा व दैववादी मानसिकतेमध्ये गुरफटलेल्या समाजाला प्लेग रोगाबद्दलची माहिती होण्यासाठी महाराजांनी संस्थानात लोकप्रबोधनाचा कार्यक्रम हाती घेतला. प्लेग रोगाबद्दलची पूर्ण माहिती, प्लेग होण्याची कारणे व प्रतिबंधात्मक उपाय कसे करावेत याबद्दलची सर्व माहिती लोकांना प्राप्त व्हावी यासाठी महाराजांनी विविध आज्ञापत्रे जाहीरनामे आणि पत्रके काढली. संस्थानातील शिक्षक, ग्राम अधिकारी व इतर खात्यातील अधिकाऱ्यांना साथीसंबंधीची पत्रके, जाहीरनामे, आज्ञापत्रे रयतेला वाचून दाखवावीत असा आदेश दिला. लोकप्रबोधनाबरोबरच घराघरात असणारी अडगळ दूर करणे, घरात सर्वत्र हवा खेळती राहील, घरामध्ये जास्त सूर्यप्रकाश येईल याची तजवीज करणे. उंदरांची बिळे बुजविणे, उंदीर पकडण्यासाठीचे सापळे लावणे व घर स्वच्छतेची प्रभावी मोहीम सुरू केली. संस्थानांमध्ये लोक मोठ्या प्रमाणात एकत्र येऊ नयेत यासाठी महाराजांनी संस्थानातील सर्व जत्रा-यात्रा भरवण्यावर बंदी घातली. या धोरणानुसार त्यांनी १८९७ साली यल्लमाची यात्रा, जोतिबाची यात्रा, दुर्गमानवाड, नांदणी इत्यादी ठिकाणच्या यात्रा बंद करण्याचा निर्णय घेतला.

कोल्हापूर शहरात प्लेगची लागण होऊन साथीचा फायदा होऊ नये म्हणून लोकांनी घ्यावयाच्या दक्षतेसाठी महाराजांनी ८ फेब्रुवारी १८९९ रोजी एक जाहीरनामा काढला यामध्ये त्यांनी असे लिहिले होते की जी घरे मोकळी करण्याबद्दल इकडून हुकुम होईल ती ताबडतोब २४ तासाच्या आत त्या घरमालकांनी मोकळी करून देऊन गावाबाहेर राहण्यास निघाले पाहिजे. आपल्या घरातील महत्त्वाच्या चीज वस्तू बद्दल जर लोकांना चिंता वाटत असेल तर त्या वस्तू एका पेटीमध्ये घालून लोकांनी ती पेटी कोल्हापूर येथील हुजूर खजिन्यात ठेवण्यासाठी द्यावी व हुजूर खजानीस यांच्या सहीची पावती घ्यावी. आपल्या घरी राहण्यास परवानगी मिळाल्यानंतर लोकांनी सदरची पावती देऊन ती पेटी हुजूर खजिन्यातून आणवून घ्यावी.

**आपत्तीकाळातील नियोजन व कृती:** २ जानेवारी १९०० रोजी राजर्षी शाहू महाराजांनी प्लेगविषयी आणखी एक जाहीरनामा काढला. त्यामध्ये त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसांच्या आत शहरात वस्ती करून राहणारे लोकांनी

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

शहराबाहेर आपले राहण्याची सोय करून तेथे राहण्यास गेले पाहिजे असे बजावले आहे. त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांना आपली दुकाने उघडण्यास मनाई केलेली आहे. त्याचप्रमाणे गोरगरीब मजूर लोकांना सरकारमार्फत मोफत झोपड्या बांधून देण्यात येतील. ज्या मजुरांना उदरनिर्वाहासाठी दररोज मजुरी करणे गरजेचे आहे त्यांच्यासाठी कळंबा तलावाजवळ सरकार मार्फत मोफत झोपड्या बांधून दिले आहेत जेणेकरून तलावाच्या रिलीफ कामावर त्यांना मजुरी मिळेल. संपूर्ण शहर रिकामे झाल्यानंतर डीसइन्फेक्शन (निर्जंतुकीकरण) चे काम सुरू करण्यात येईल. अशा विविध सूचना महाराजांनी या जाहिरनाम्यातून दिलेल्या आहेत.

जेव्हा प्लेग कोल्हापूर संस्थानात फैलावण्यास सुरुवात झाली तेव्हा कोल्हापूर संस्थानातून बाहेर पडणाऱ्या आणि आत येणाऱ्या मार्गावर प्लेग संक्रमित लोकांना आळा बसावा यासाठी मौजे किणी, पेठा, आळते या ठिकाणी क्वारंटाईन केंद्रे सुरू करण्यात आली. संस्थानात येणाऱ्या लोकांची वैद्यकीय तपासणी करूनच प्रवेश देण्याची सक्ती केली. रेल्वे स्थानकावर वैद्यकीय तपासणी करण्यासाठी वैद्यकीय विभाग सुरू केला. वैद्यकीय तपासणी शिवाय उतारूंना नगर प्रवेश बंद करण्यात आला. उतारूंना तीन दिवस क्वारंटाईन करून ठेवले जात असे. त्या ठिकाणी त्यांच्या भोजन, निवासासाठी खास अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. क्वारंटाईनच्या भीतीने तपासणी चुकवणाऱ्या फसव्या व चुकार लोकांची नावे सांगणाऱ्या व्यक्तींना बक्षिसे जाहीर करण्यात आली, त्यामुळे शहरात चोरून येणाऱ्या प्रवाशांवर चांगलाच वचक बसला.

२२ जानेवारी १९०० या दिवशी शाहू महाराजांनी प्लेगसंदर्भात एक जाहीरनामा काढला. प्लेगच्या साथीत कोल्हापूर शहरातील घरेदारे व चीज वस्तू निर्जंतुक करण्यासंबंधीचे नियम या जाहीरनाम्यामध्ये विशद केलेले आहेत. या जाहीरनाम्यामध्ये घराचे निर्जंतुकीकरण, धान्य, कपडे, लोखंडी समान, लाकडी व दगडी सामान या सर्वांचे निर्जंतुकीकरण कसे करावे या संदर्भातील माहिती दिली आहे. प्लेगची लागण झालेल्या लोकांना दवाखान्यात पोहोचविण्याची जबाबदारी पाटील, कुलकर्णी या वतनदारांकडे देण्यात आली. महाराजांच्या असे निदर्शनास आले की सर्वसामान्य जनतेबरोबर अधिकारी सुद्धा दरबाराची हुकूम पाहण्यास चालढकल करतात. त्यामुळे प्लेगची साथ आटोक्यात येणे ऐवजी फैलावत चालली आहे. महाराजांनी यावर एक आदेश काढला, "प्लेग संबंधात काढलेले हुकुम काटेकोरपणे पाळले नाहीत व त्यांची अंमलबजावणी केली नाही तर कोणतीही सबब न ऐकता ग्राम अधिकाऱ्यांची वतने काढून घेतली जातील. मात्र काही ग्राम अधिकाऱ्यांनी आमची वतने परंपरागत आहेत असे म्हणून दरबारचा हुकूम दुर्लक्षित केला. महाराजांच्या कानी या बातम्या येताच तीन अधिकाऱ्यांची वतने जप्त केली. वतने जप्त केल्याच्या वार्ता ऐकताच दरबारी हुकूमाची अंमलबजावणी काटेकोरपणे होऊ लागली. प्लेगचे रोगी दवाखान्यात पाठवले जाऊ लागले. घरे निर्जंतुक करण्यात येऊ लागली व घरातील लोकांना अन्यथा हलविण्यात येऊ लागले.

वेगवेगळ्या खबरदाऱ्या घेऊन देखील संस्थानांमध्ये सन १९८७-१८९८ या काळात गडहिंग्लज व शिरोळ पेठातील १८ गावे प्लेगने अत्यंत ग्रासली होती. जवळपास ३१,१३१ लोक प्लेगच्या छायेखाली वावरत होते. तेव्हा महाराजांनी आणखी कडक निर्बंध घालण्यास सुरुवात केली. प्लेगची लागण होऊन एखादी व्यक्ती मरण पावल्यानंतर तिचे कपडे जाळून टाकण्याची दक्षता घेण्यात येऊ लागली. प्लेगच रोगी पकडण्यासाठी महाराजांनी पाच ते पंधरा रुपयांची बक्षिसे जाहीर केली. पोस्टमन लोकांना प्लेगग्रस्त गावांमध्ये प्रवेश बंद केला. प्लेगचा प्रादुर्भाव अधिक असलेल्या गावातील लोकांना गावाच्या बाहेर किंवा मळयात वस्ती करण्यास भाग पाडले. नवीन वस्त्या व गावातील मोकळी घरे यावर पहारा ठेवण्यासाठी व चोऱ्यामाऱ्यांना आळा घालण्यासाठी पुरेसे पहारेकरी नेमले. या उपाययोजनांमुळे प्लेग निर्मूलनामध्ये कमालीचा बदल घडून आला.

कोल्हापूर शहरा मधील प्लेगची गंभीरता पाहून महाराजांनी कोटीतीर्थ येथे मोठे प्लेगनिवारा केंद्र उभारले. महाराज स्वतः या हॉस्पिटलची पाहणी करत. प्लेग छावण्यासाठी आवश्यक असलेले डॉक्टर, परिचारिका, आया व इतर कर्मचारी वर्ग इत्यादींच्या नियुक्त्या ते स्वतः करत.

**आपत्तीपश्चातचे कार्य :-** प्लेग रोखण्यासाठी नंतरच्या काळात प्लेगची रोगप्रतिबंधक लस निर्माण झाली. ती अत्यंत परिणामकारक होती, परंतु समाजातील रूढी, खोट्या समजुती यामुळे जनता लस टोचून घ्यायला तयार नव्हती. लोकांनी स्वतःहून प्लेगची लस टोचून घ्यावी यासाठी महाराजांनी अनेक सवलती व इनाम जाहीर केले. परंतु तरी देखील लस टोचून घेण्याचे प्रमाण अत्यल्प होते. तेव्हा जनतेला प्रोत्साहन देण्यासाठी शाहू महाराजांनी घरातल्या सर्व लोकांसकट स्वतःला लस टोचून घेतली आणि जनतेसमोर एक आदर्श घालून दिला.जेव्हा महाराजांना असे समजले की होमिओपॅथीमध्ये प्लेगवर औषधोपचार आहे त्यावेळी त्यांनी कोल्हापूर येथे भारतातील पहिला होमिओपॅथीचा सार्वजनिक दवाखाना सुरू केला. राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या उपायांमुळे प्लेगच्या बळींची संख्या कोल्हापूर संस्थानात इतर प्रदेशांच्या मानाने बरीच कमी होती. दुष्काळ आणि प्लेग या दोन

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

आपत्तींच्या कालावधीत राजर्षी शाहू महाराजांनी जे अविरत प्रयत्न केले त्याबद्दल ब्रिटिश अधिकाऱ्यांनीही त्यांचे अभिनंदन केले होते.

**निष्कर्ष:** ३-४ वर्षांपूर्वी जी कोरोनाची महामारी जगभर पसरली होती, त्यावेळी निर्जंतुकीकरण, क्वारंटाईन हे शब्द आपण वारंवार ऐकत होतो. शाहू महाराजांनी शंभर वर्षांच्या पूर्वी हे उपाय अंमलात आणले होते. आजदेखील एखाद्या संसर्गजन्य रोगाचे संकट जर मानवासमोर निर्माण झाले तर त्यावर उपाय योजताना शाहू महाराजांचे प्रतिमान आपल्याला डोळ्यासमोर ठेवावे लागेल. आजही दरवर्षी देशाच्या कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळ पडतो. त्यावेळी शाहू महाराजांनी केलेल्या उपायांचा आदर्श राज्यकर्त्यांनी डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. कोल्हापूर आणि देशाच्या कित्येक भागांमध्ये पूराची आपत्ती वारंवार निर्माण होते. तिचा सामना करताना शाहू महाराजांचे आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य मार्गदर्शक ठरेल. आपत्ती व्यवस्थापनाचे शास्त्र उदयास येण्याच्या कितीतरी आधी दुष्काळ आणि प्लेग यासारख्या आपत्तींचे ज्या शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन केले त्याला तोड नाही. राज्यकर्त्यांनी नागरिकांची आपत्तीच्या काळात कशी अविरत श्रम घेऊन काळजी घेतली पाहिजे यासंदर्भातील राजर्षी शाहू महाराजांचे कार्य केवळ एकविसाव्या शतकातच नाही, तर अनंत काळापर्यंत दिशादर्शक राहील.

संदर्भ :-

१) पाटील अवनीश (संपा.), राजर्षी शाहू छत्रपती : विचारवेध, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पहिली आवृत्ती: जून २०२४
२) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जानेवारी २००१
३) https://www.esakal.com/amp/sampadakiya/dr-ramesh-jadhav-writes-article-about-rajarshi-shahu-maharaj-312664
४) https://marathi.indiatimes.com/maharashtra/ahmednagar-news/shahu-maharajs-disaster-management-guide/amp_articleshow/75576882.cms
५) https://www.maxmaharashtra.com/max-blog/shahu-maharaj-disaster-management-guide/86669/

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

10

# भारतीय राज्यघटना : छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराचे प्रतिबिंब

**डॉ. विजय देठे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:**

हिंदुस्थानातील सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे महत्त्वाचे आधारस्तंभ म्हणजे छत्रपती शाहू महाराज. छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा फुले यांच्या सामाजिक समता व न्याय या कार्याची प्रेरणा घेऊन कार्य करणारे हिंदुस्थानातील कल्याणकारी राजा म्हणून छत्रपती शाहू महाराजांना ओळखले जाते. शाहू महाराज यांनी आपल्या अधिकार सत्तेचा वापर बहुजनांच्या कल्याणासाठी केला. शाहू महाराजांच्या जडणघडणीमध्ये त्यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचा मोठा वाटा असलेला दिसतो. राजकोट व धारवाड येथे महाराजांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. धारवाड येथे स्टुअर्ट्स मिल्फर्ड फ्रेझर आणि आचार्य कृष्णाजी भिकाजी गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच वैचारिक मंथन मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. धारवाड येथे शिक्षण घेत असताना महाराजांनी उत्तर हिंदुस्तानच्या दोन व दक्षिण हिंदुस्तानची एक अशा तीन शैक्षणिक सहली करून तेथील विविध शहरांना भेटी देऊन भारताच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला. २ एप्रिल १८९४ रोजी महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली तेव्हा हिंदुस्थानात साडेसहाशे संस्थांने कार्यरत होती या संस्थानातील बरेच राजे ऐहिक व भौतिक सुखामध्ये लोळण घेत होते परंतु याला दोन राजे अपवाद होते एक म्हणजे कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज आणि दुसरे म्हणजे बडोदा संस्थानाचे सयाजी गायकवाड महाराज. या दोन्ही राज्यांनी भौतिक सुखाकडे पाठ फिरवून सामाजिक सुधारणेच्या कार्याला वाहून घेतले. शाहू महाराजांनी आपल्या कार्यकाळामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा मोठ्या प्रमाणात केल्या. शाहू महाराज यांच्या विचाराचा आणि कार्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रभाव पडलेला होता, भारतीय राज्यघटना निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. भारतीय संविधानात समाविष्ट केलेल्या अनेक महत्त्वपूर्ण तत्त्वांमध्ये शाहू महाराजांचे विचार आणि कार्य प्रतिबिंबित झालेले दिसते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'भारतीय राज्यघटना: छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचे प्रतिबिंब' या शीर्षकाखाली संशोनिबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**मुख्य बीज शब्द**- शाहू महाराज, संस्थान, कायदे, शिक्षण, अस्पृश्यता, दलित, राज्यघटना, हक्क, तरतूद.

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

१) छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक कार्याचा आढावा घेणे.

२) शाहू महाराजांचे विचार आणि भारतीय राज्यघटनेतील तरतुदींचा अभ्यास करणे.

३) शाहू महाराजांच्या विचाराची प्रस्तुतता अभ्यासणे

भारतीय संविधान आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य

**१) सामाजिक कार्य -** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी 1894 ते 1922 या 28 वर्षाच्या कालखंडात अनेक सामाजिक सुधारणा आपल्या संस्थांना मध्ये केल्या. सामाजिक, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर चळवळ, आर्य समाज या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य शाहू महाराजांनी केले. महाराजांनी आपल्या संस्थानात पुढील वेगळ्या मुद्द्याच्या आधारे पुरोगामी धोरण स्वीकारलेले दिसते- ब्राह्मणेत्तर व दलित वर्गात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला, जातीव्यवस्था नष्ट करून समानतेचा दर्जा निर्माण केला, बलुतेदार पद्धती व वर्णव्यवस्था नष्ट केली, बुद्धिजीवी व श्रमजीवी यांच्यातील भेद नष्ट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला, उच्चवर्णीय कडून कनिष्ठ व दुर्बल वर्गाचे होणारे शोषण थांबवले, अस्पृश्यता निवारण्यासाठी विविध उपाय व कायदे केले, आपल्या राज्यकारभारामध्ये विविध पदावरती अनेक जाती-धर्माच्या लोकांच्या नेमणुका केल्या, पुरोहित वर्गाचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी पुरोहित शाळेची निर्मिती करून त्या शाळेला आर्थिक मदत केली. वरील वेगवेगळी धोरण स्वीकारण्यामागे शाहू महाराजांचा पुरोगामी विचार होता. कारण बहुजन समाज जागृत झाल्याशिवाय सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होणार नाही यावर शाहू महाराजांचा विश्वास होता, त्यामुळेच त्यांनी ३ एप्रिल १८९४रोजी प्रजेला लोककल्याणाची हमी देणारा जाहीरनामा प्रसिद्ध केला. मानवाची बुद्धिमत्ता आणि मानसिक सामर्थ्य यांचा त्यांच्या जातीशी, वंशाशी किंवा धर्माशी काही संबंध नसतो हे वैज्ञानिक सत्य शाहू महाराजांनी जाणून उच्चवर्णीय यांच्याबरोबरच

बहुजनांनाही प्रतिष्ठेचे व्यवसाय करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे धोरण आपल्या संस्थानात अवलंबले. दरम्यानच्या कालखंडात महाराजांच्या जीवनात वेदोक्त प्रकरण घडले, या प्रकरणामुळे महाराजांच्या जीवनातच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्तानच्या सामाजिक सुधारणेमध्ये अमुलाग्र बदल झाला. दुर्बल जातीय आर्थिक सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या जोपर्यंत शक्तिशाली होत नाहीत तोपर्यंत जातीव्यवस्था समूळ नष्ट होणार नाही हे महाराजांचे जातीसंस्था नष्ट करण्याच्या संघर्षाचे प्रमुख सूत्र होते म्हणूनच त्यांनी विद्यार्थ्यांसाठी शाळा व वस्तीगृहाची चळवळ उभी केली. शाहू महाराज यांच्या विचाराचे सार समतावादी तत्त्वावर आधारित होते, त्यांनी जातीय भेदभावाविरुद्ध आवाज उठवला आणि समाजातील सर्व स्तरातील लोकांना समान हक्क मिळावा यासाठी प्रयत्न केले. त्यांनी आपल्या संस्थानातील अस्पृश्यांना शाळेत प्रवेश देण्याचा आदेश दिला आणि त्यांच्या शिक्षणासाठी निधीही उभा केला शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या तत्वाचा अंगीकार करून महात्मा फुले यांच्या विचारापासून प्रेरणा घेतली. समाजातील शोषित आणि वंचित वर्गासाठी त्यांनी अनेक सुधारणा केल्या. भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेमध्ये शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो तो म्हणजे राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये समता, बंधुता, न्याय या तत्त्वांचा उल्लेख आहे. जी शाहू महाराजांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यामध्ये स्पष्टपणे प्रकट झालेली आहेत. राज्यघटनेत कलम 14 ते 18 मध्ये समतेचा मूलभूत हक्क मान्य केलेला आहे जो की, शाहू महाराज यांच्या कार्याची पुनरावृत्ती आहे. तसेच कलम 17 मध्ये अस्पृश्यता नष्ट करण्याची तरतूद केलेली आहे. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यते विरुद्ध केलेल्या कार्याचे हे प्रत्यक्ष प्रतिबिंब आहे त्यांनी समाजातील सर्व घटकांना समान वागणूक मिळावी यासाठी प्रयत्न केले हे भारतीय राज्यघटनेतील अस्पृश्यता समाप्तीच्या तत्त्वात दिसून येते. त्यामुळे अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा समजला गेला आहे.

**२) शैक्षणिक कार्य -**जातीय समानता प्रस्थापित करणे म्हणजे जातीसंस्थांच्या अस्तित्वाला छेद देणे हे समीकरण महाराजांच्या मनात पक्क रुजलेल दिसते म्हणूनच त्यांनी सर्वप्रथम बहुजनांच्या शिक्षणाला हात घातलेला दिसतो. शाहू महाराजांनी आपल्या संस्थांना मध्ये 1917 साली मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अमलात आणला, सक्तीचे शिक्षण घेण्यासाठी मुलांचे वय ७ ते १४ वर्ष ठरविण्यात आले, शिक्षण घेण्यास कुचराई केली तर एक रुपया दंड करण्यात आला, या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी तालुक्याचा मामलेदार व गाव कामगाराकडे दिली. सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी जो खर्च येईल त्यासाठी आपल्या संस्थानातील सावकार, वकील, डॉक्टर आणि दरबारातील वरिष्ठ अंमलदारावर शैक्षणिक कर लागण्यात आला.

सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वस्तीग्रह सुरुवातीला निर्माण करून जाती व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्या लक्षात आले की, सशक्त जातीच शिक्षणाचा चारा फस्त करून इतरांना केवळ चगळा राखून ठेवण्याचे देखील सौजन्य दाखवीत नाहीत. त्यामुळे सर्व जाती धर्मांच्या मुलांसाठी शाळा एकच ठेवली परंतु जातवार सभा घेऊन प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांचे स्वतंत्र वस्तीग्रह सुरू केले. फक्त विद्यार्थ्यांनीच जातीभेद मानायचं नाही तर शिकवणाऱ्या शिक्षकांनी सुद्धा जातीभेद मानायचा नाही, यासाठी शाहू महाराजांनी 1919 साली वटहुकूम काढला की, 'कोणत्याही शिक्षकांनी अस्पृश्यता मानायची नाही'. शाहू महाराजांनी शिक्षणाच्या क्षेत्रात केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे त्यांनी आपल्या संस्थानातील मुलांसाठी शाळा उघडल्या आणि दलित, अस्पृश्य, वंचित वर्गासाठी शैक्षणिक सुविधा पुरवल्या. शिक्षण हे सामाजिक समता आणि प्रगतीची महत्त्वपूर्ण साधने आहेत हे महाराजांच्या कार्यातून दिसून येते. शिक्षणानेच समाजातील व्यक्तींना आपले हक्क समजून घेता येतात आणि त्यांच्या विकासाला चालना मिळते असा शाहू महाराजांचा ठाम विश्वास होता. भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेमध्ये कलम21(ए )अंतर्गत प्रत्येक मुलामुलींना शिक्षणाचा अधिकार दिलेला आहे जो की, शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नामध्ये दिसून येतो. दलित अस्पृश्य मागासवर्ग आणि स्त्रियांच्या शिक्षणाला शाहू महाराजांनी प्राधान्य दिले.

**३) प्रशासनात 50 टक्के राखीव जागा-** शाहू महाराजांनी समाजाची दुरावस्था पाहिलेली होती. आपल्या संस्थानातील बहुजन व दुर्बलांना नोकरीची संधी देण्यासाठी आरक्षणाचा कायदा केला. 1902 साली शाहू महाराजांनी आपल्या प्रशासनात मागासवर्गीयांसाठी 50 टक्के जागा राखीव ठेवल्या. त्यानुसार त्यांना प्रशासकी सेवेत सहभागी करून घेतले शाहू महाराजांचा हा आरक्षणाचा कृतिशील विचार आज आधुनिक भारताच्या प्रशासनात किती मूलगामी व दूरदृष्टी स्वरूपाचा ठरला आहे हे समजून येते. शाहू महाराजांच्या मते, केवळ जन्माने श्रेष्ठ मानल्या गेलेल्या समाजातील विशिष्ट लोकांना जे सुख-समृद्धीचे जीवन उपभोगता येते तेच जीवन मोठ्या प्रतिष्ठेने बहुजनांच्या वाट्याला यावे म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात 50% जागा नोकरीत राखून ठेवल्या, तत्कालीन व्यवस्थेमध्ये हिंदुस्थानामध्ये साडेसहाशे संस्थानिकामध्ये हा पहिला संस्थानिक राजा होता की ज्यांनी आपल्या संस्थानांमध्ये बहुजनांच्या साठी नोकरीमध्ये 50% जागा राखीव ठेवल्या म्हणूनच महाराजांना 'राखीव जागांचा किंवा आरक्षणाचा जनक' असे म्हणतात. भारतीय स्वातंत्र्यानंतर प्रारंभीच्या काळात राज्यघटनेच्या कलम 334 नुसार अनुसूचित जाती जमातींना 23 टक्के राजकीय

प्रतिनिधित्वाचे आरक्षण देण्यात आले तर 335 कलमांतर्गत शैक्षणिक आणि नोकरीमध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली. तसेच 1990 साली सरकारी नोकरी आणि शिक्षणामध्ये ओबीसी प्रवर्गाला सत्तावीस टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली तर 2019 साली आर्थिक निकषावर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी दहा टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली. याचाच अर्थ आरक्षण ही शाहू महाराजांनी भारतीय समाज व्यवस्थेला दिलेली देणगी आहे.

**४) धर्मनिरपेक्ष कार्य-** छत्रपती शाहू महाराजांची वैचारिक आणि शैक्षणिक जडणघडण ही उच्च प्रतीची झाल्यामुळे त्यांच्या अंगी धर्मनिरपेक्षतेचा विचार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. 1889 च्या कालखंडामध्ये भारतामध्ये पश्चिमात्य ख्रिश्चन मशनरी चे कार्य जोरात चालू होते त्यांनी मुंबई पुणे नागपूर कोल्हापूर या ठिकाणी प्रचार व प्रसार केंद्रे उघडली होती या मशनरी आपल्या धर्माचा प्रसार व प्रचार करत असताना त्यांना हिंदुस्थानच्या जनते मध्ये अनेक अज्ञान व अडाणी समजुती दिसून आल्या तसेच मोठ्या प्रमाणात रोगराई दिसली. या मशिनऱ्यांनी तेव्हा कोल्हापूर, सांगली सारख्या संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षण व आरोग्याच्या सुविधांची सोय उपलब्ध करून दिली त्यावेळेस महाराजांनी कोणताही धार्मिक विचार न करता या मशनऱ्यांना पाठिंबा दिलेला दिसतो. 1894 साली महाराजांनी संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांचा सत्कार महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी होत होता. असाच सत्कार पुणे येथील सार्वजनिक सभेने पुणे शहराच्या वतीने 24 सप्टेंबर 1894 साली घेतला. या सत्काराला उत्तर देताना शाहू महाराज म्हणतात की, "मुंबई- पुणे मध्ये नुकत्याच हिंदू मुस्लिम दंगली घडून गेल्या हे चुकीचं घडलेलं आहे, या दोन्ही समाजात सलोखा आणि शांतता निर्माण केली जावे असे मला वाटते, छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब बादशाह यांच्यातील संघर्ष हा स्थानिक आणि परकीय असा होता हिंदू विरुद्ध मुस्लिम असा नव्हता. दोन्हीही राज्यांच्या दरबारात हिंदू व मुस्लिम सरदार व सैनिक होते". छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये सुरुवातीपासून आयुष्याच्या अखेरपर्यंत हिंदू - मुस्लिम हे दोन्ही धर्म सुखा समाधानी राहून आपले जीवन जगावे हीच भूमिका घेतली. हिंदू मुस्लिम संघर्षाचे अनेक प्रसंग निर्माण झाले परंतु कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांच्या कालखंडापासून ते आज पर्यंत हिंदू मुस्लिम यांच्यातील ऐक्याला काळिंबा लागलेला नाही. रावसाहेब बनणे यांनी संपादित केलेल्या "राजर्षी शाहू स्मारक" ग्रंथात अशी नोंद सापडते की,'कोल्हापूरच्या मराठा बोर्डिंग मध्ये अनेक मुस्लिम मुले राहत होती आणि मुस्लिम बोर्डिंग मध्ये अनेक मराठा मुले राहत होती'. यावरून शाहू महाराज यांचे धर्मनिरपेक्षतेचे धोरण दिसून येते. 21 मार्च 1908 मध्ये शाहू महाराज यांची जेष्ठ कन्या राधाबाई उर्फ अक्काताई यांचा विवाह देवासचे राजे तुकोजीराव पवार यांच्याशी केला त्यावेळी खास लग्नकार्यासाठी आजचा भवानी मंडप तयार करण्यात आला, या विवाह वेळी राजानी आपल्या स्वखर्चातून मराठा जातीच्या व मुस्लिम जातीच्या 18 जोडप्याचे विवाह केलेले दिसून येतात. राज घराण्यातील राजकुमार किंवा राजकुमारी यांच्या वैवाहिक जीवनाला जनतेने आशीर्वाद द्यावेत म्हणून त्यांच्या विवाहात आपल्या प्रजेतील काही व्यक्तीचे विवाह राजांनी आपल्या स्वखर्चाने लावून देण्याची हिंदू प्रथा होती. या कार्यामधून हिंदू मुस्लिम ऐक्याचा विचार दिसून येतो. कोल्हापूर शहरातील रविवार पेठेत सणगर गल्लीत मशिद बांधण्यास कोल्हापूर प्रशासनाने हरकत घेतली होती, त्यावेळेस 18 नोव्हेंबर 1902 रोजी शाहू महाराजांनी मशीद बांधण्यास खास परवानगी दिली याच्या नोंदी संस्थानाच्या दप्तरी आढळतात. 6फेब्रुवारी 1904 रोजी कोल्हापूर शहरातील शाहूपुरी मधील मशिदीस जागा उपलब्ध करून मशिद बांधण्यास मंजुरी दिल्याची नोंद आहे. पन्हाळगडावर मुस्लिम जनतेच्या मागणीवरून पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. पाटगाव मशिदीसाठी तीनशे रुपये मौनी महाराजांच्या मठाच्या उत्पादनातून द्यावेत असा वटहुकूम 2 सप्टेंबर 1919 रोजी काढलेली नोंद सापडते. मुस्लिम धर्माचा पवित्र ग्रंथ असणाऱ्या कुराणाचे मराठीत भाषांतर करण्यासाठी महाराजांनी कमिटी नेमली आणि त्या कमिटीच्या खर्चासाठी 25 हजार रुपये खर्चाची तरतूद केल्याची नोंद आहे. वरील वेगवेगळया मुद्द्याच्या आधारे शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानांमध्ये हिंदू- मुस्लिम सलोख्याच्या संबंधातून धर्मनिरपेक्षतेचे धोरण अवलंबलेले दिसते. भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेमध्ये कलम 25 ते 28 मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार भारतीय जनतेला देण्यात आला. शाहू महाराजांचे हेच धर्मनिरपेक्षतेचे धोरण पुढे भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेत 1976 साली 42 व्या घटनादुरुस्तीने आलेले दिसते.

**५) सामाजिक आणि आर्थिक समता-** शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शेतकऱ्याच्या आणि मजुरांच्या हक्कासाठी अनेक सुधारणा व कायदे केले भारतीय राज्यघटनेच्या कलम 38 मध्ये राज्याला समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी कार्य करण्याचे निर्देश दिले आहेत जे शाहू महाराजांच्या विचारधारेचेच प्रतिबिंब आहे.

**६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर शाहू विचारांचा प्रभाव** – भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये शाहू महाराजांच्या विचाराचा प्रभाव केवळ अप्रत्यक्ष नाही तर प्रत्यक्षपणे सुद्धा दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू महाराजांच्या कार्याचे महत्त्व

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

ओळखले होते म्हणून त्यांच्या विचारांचा समावेश राज्यघटनेच्या तत्त्वात केलेला दिसतो, शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाच्या दिशेने जे पायाभूत काम केले त्याचा भारतीय राज्यघटनेवर खोलवर प्रभाव पडलेला आहे.

**७) समाज सुधारण्यासाठी धाडसी कायदे -**

शाहू महाराजांनी आपल्या 28 वर्षाच्या राज्यकारभारामध्ये अनेक कायदे केले ते पुढील प्रमाणे-

**अ) शिक्षण विषयक कायदे-** 1916 व 1919 मध्ये सक्तीचा शिक्षणाचा कायदा केला. सात ते बारा वयोगटातील मुला मुलींनी सक्तीचे व मोफत शिक्षण घेतले पाहिजे असा कायदा करण्यात आला, जर सक्तीचे शिक्षण घेण्यास कुचराई केली तर त्यास एक रुपया दंड करण्यात आला. तर 1918 साली शिक्षण विषयक कराचा कायदा करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्यानंतर 2002 साली 86 व्या घटनादुरुस्तीनुसार कलम 21(क) मध्ये शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्रदान केला. थोडक्यात शाहू महाराजांनी केलेल्या कायद्यानंतर 83 वर्षानंतर भारतात शिक्षणाचा मूलभूत हक्क नागरिकांना दिला याचा अर्थ शाहू महाराज काळाच्या किती पुढील विचाराचे होते याची प्रचिती येते.

**ब) अस्पृश्यउद्धाराचे कायदे-** छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या 28 वर्षाच्या कारभारामध्ये अस्पृश्यांसाठी दहा आदेश काढले त्यामध्ये प्रामुख्याने- अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांच्या सरकारी शाळेत प्रवेश देण्यासंदर्भात आदेश, अस्पृश्य मुलांना समतेने वागवावे, मेडिकल अधिकाऱ्यांनी अस्पृश्यांना दवाखान्यात समतेने वागवावे, महसूल व न्यायाधीकरण अधिकाऱ्यांनी अस्पृश्य नोकरवर्गाशी अमानुष्यतेने न वागता त्यांच्याशी समतेने वागावे, सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, शासकीय अन्नक्षेत्रे, सार्वजनिक विहिरी, पानवटे येथे अस्पृश्यता विटाळ मानावयाचा नाही, अस्पृश्य लोकांना पशुतुल्य, नीच वागणूक न देता त्यांना समानतेची वागणूक द्यावी, वेठ - वरळा प्रतिबंध आदेश, अस्पृश्य व गुन्हेगार लोकांची दररोजची हजेरी बंद करण्याचा आदेश, 'महारकी वतन' रद्द करण्याविषयीचा आदेश अशा पद्धतीचे आदेश त्यांनी आपल्या संस्थानात काढून अस्पृश्य लोकांना समानतेची वागणूक देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेच्या कलम 17 मध्ये अस्पृश्यता नष्ट करण्याची तरतूद केली आहे. शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारणासाठी केलेल्या विविध कायद्यांचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत दिसून येते.

**क) स्त्री हक्क संबंधीचे कायदे-** 27 जुलै 1917 रोजी 'विधवा पुनर्विवाह कायदा' आपल्या संस्थानात लागू केला, या कायद्याच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानात स्त्री-उद्धाराच्या विकासाच्या दृष्टीने पुरोगामी पाऊल उचलले गेले. 12 जुलै 1919 रोजी ' विवाह कायदा' करण्यात आला. या कायद्यानुसार विवाहाच्या वेळी पुरुषाचे वय 18 व स्त्रीचे वय 14 असावे अशी अट घालण्यात आली. आंतरजातीय विवाहाची सुरुवात महाराजांनी आपल्या घरापासूनच केली ते म्हणजे आपली चुलत बहीण चंद्रप्रभा हिचा विवाह इंदूरच्या तुकोजीराव होळकरांचे सुपुत्र यशवंतराव यांच्याशी निश्चित केला. परंतु दुर्दैवाने शाहू महाराजांचे निधन झाले आणि महाराजांच्या निधनानंतर 9 फेब्रुवारी 1924 रोजी हा आंतरजातीय विवाह संपन्न झाला. 29 जुलै 1919 रोजी 'स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणारा कायदा' कोल्हापूर संस्थानात करण्यात आला. या कायद्यानुसार स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या अपराध्यास दोनशे रुपये दंड आणि सहा महिन्याची कैद अशी शिक्षा ठरवण्यात आली. छत्रपती शाहू महाराज हे पुरोगामी व आधुनिक विचाराचे होते. भारतीय स्वातंत्र्यानंतर 2005 साली "कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा" संसदेने मंजूर केला. याचा अर्थ भारतीय स्वातंत्र्याच्या अगोदर 86 वर्ष शाहू महाराजांनी हा कायदा सहमत करून आपली पुरोगामीत्व सिद्ध केलेले दिसून येते. 11 जुलै 1919 रोजी 'घटस्फोटाचा कायदा' म्हणजेच 'काडीमोड' चा कायदा शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अमलात आणला. तसेच 17 जानेवारी 1920 रोजी ' किंवा देवदासी प्रतिबंधक कायदा' आपल्या राज्यात लागू केला. शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी वरील वेगवेगळे महत्त्वपूर्ण कायदे करून स्त्री उन्नतीचे कार्य केलेले दिसते, भारतीय समाजातील स्त्री जातीला न्याय मिळवून देऊन तिला आत्म सन्मान मिळवण्यासाठी शाहू महाराजांचे कार्य गौरवास्पद आहे. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील समाज सुधारण्यासाठी घेतलेले धाडसी निर्णय आणि त्याचा अंमल भारतीय राज्यघटनेच्या विविध तत्त्वातून जाणवतो त्यांचे कार्य सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या तत्त्वांच्या प्रसारासाठी एक प्रेरणादायी उदाहरण आहे.

**सारांश** समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या अधिकार सत्तेचा वापर शाहू महाराजांनी केला. बहुजन समाज जागृत झाल्याशिवाय सामाजिक, आर्थिक समता प्रस्थापित होणार नाही त्यामुळे शैक्षणिक मार्गाने समाज जागृती घडवून आणण्याचे विधायक कार्य शाहू महाराजांनी केले. महाराजांनी सामाजिक व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर चळवळ व आर्य समाज यांच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक परिवर्तन घडवून आणले. दलितउद्धाराचे, अस्पृश्यता निवारणाचे, स्त्री उद्धाराचे, जाती निर्मूलनाचे, दारिद्र्य निर्मूलनाचे महत्त्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले म्हणूनच शाहू महाराजांना "जाणता लोकराजा" असेही संबोधण्यात येते. स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काच्या संरक्षणासंबंधी आणि स्त्रीमुक्तीसाठी, त्यांच्या

उन्नतीसाठी विविध स्वरूपाचे कायदे करून विधायक कार्य केले. अन्याय अत्याचार करणाऱ्याच्या वर्तनास प्रतिबंध कायदा करणारे छत्रपती शाहू महाराज हे स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी आहेत. शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानातील रयतेला समानतेची व समतेची वागणूक देण्यासाठी विविध स्वरूपाचे कायदे पारित केले आणि त्या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. शाहू महाराजांच्या वरील सर्व कार्यांचा असे लक्षात घेतला असता असे म्हणता येईल की, भारतीय राज्यघटनेत शाहू महाराजांच्या विचाराचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसते, त्यांनी केलेल्या समाज सुधारणांचे आणि शैक्षणिक सुधारणांचे भारतीय राज्यघटनेवर दूरगामी परिणाम झालेले आहेत. त्यांच्या विचारधारेच्या प्रभावामुळेच आज भारतीय राज्यघटना एक समता, न्याय आणि बंधुता या तत्त्वावर आधारित मजबूत दस्तऐवज म्हणून ओळखली जाते. शाहू महाराजांच कार्य हे भारतीय लोकांना आभारच मानावे लागतील अशा स्वरूपाचं आहे कारण भारतीय समाजाच्या परिवर्तनात शाहूंचे विचार महत्त्वपूर्ण योगदान देतात. शाहू महाराजांच्या विचाराचेच फलित म्हणून भारतीय राज्यघटना आज सर्वांच्यासाठी मार्गदर्शक ठरत आहे. भविष्यात भारतीय समाजाला सामाजिक न्यायाची फळे चाकावयाची असतील तर शाहू महाराजांच्या कृतीशील सामाजिक विचारांचा विसर पडून चालणार नाही. शाहू महाराजांचे विचार दूरदृष्टीचे होते, जातीभेद निर्मूलन, दुर्बलांना आरक्षणाचा लाभ, सक्तीचे शिक्षण, महिलांचे संरक्षण व सन्मान इत्यादी कायदे त्यांनी आपल्या संस्थानात केली. नव्या काळात भेदभाव, विषमतेचे विचार नव्याने वाढीस लागत आहेत अशा काळात विवेकी, मानवतावादी विचारांचे कृतिशील आचरण करणे हेच शाहू महाराजांच्या कार्याला वंदन आहे. थोडक्यात भारतीय राज्यघटना ही राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराचे प्रतिबिंब आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) भारताचे संविधान, भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय, संचालक,- मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशन - 2006

२) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग -२ , संपादक- संचालक, पुराभिलेख संचालनालय मुंबई- 2024

३) सदाशिव मार्तंड गर्गे, करवीर रियासत, करवीर छत्रपती घराण्याचा इतिहास ( इसवी सन 1710 ते इसवी सन 1873), गो.य. राणे प्रकाशन, पुणे- 9 ,जून 1980.

४) डॉ.जयसिंगराव पवार, - 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, जानेवारी- 2001.

५) डॉ. रमेश जाधव, - 'लोकराजा शाहू छत्रपती' सुरेश एजन्सी, पुणे - 1997.

६) डॉ.जयसिंगराव पवार, - 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर -जानेवारी 2019.

७) द.रा. बगाडे, - 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि कायदे कानून'.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

11

# छत्रपती राजर्षी शाहू : फुले-आंबेडकर कार्याचा सेतू

**डॉ. रचना माने**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

प्रस्तावना: १८१८ ला पेशवाईचा अंत झाला आणि संपूर्ण भारतावर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. ब्रिटिश कालखंडापासून प्रबोधन योग सुरू झाले. इंग्रजी राज्याच्या आगमनामुळे भारतीयांचा इंग्रजी शिक्षण, इंग्रजी वाङ्मय व पाश्चात्त्य संस्कृती यांच्याशी परिचय झालेल्या मुठभर सुशिक्षितांनी गांभीर्याने भारतीय समाजस्थितीचे अवलोकन करण्यास सुरुवात केली. भारतीय स्त्रियांची दयनीय अवस्था पाहून या उदारमतवादी सुधारकांनी स्त्रीविषयक जुन्या विचारसरणीला लक्ष बनवले. सामाजिक न्यायाच्या व समानतेच्या निकषांवर हिणकस ठरलेली प्रत्येक रुढी बदलण्याचा ते प्रयत्न करू लागले. या प्रयत्नातून समाज सुधारकांची अखंड परंपरा निर्माण झाली. स्त्रीच्या सर्वंकष परवशतेची कारणमीमांसा करून तिला मुक्त करण्यासाठी, माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी समाजसुधारकांनी वैचारिक व कृतिशील संघर्ष केला. स्त्रीविषयक जाणिवांना अधिक व्यापक बनविले. नवविचारांचे वारे समाजात वाहू लागले.

स्त्री संबंधीच्या वैचारिक मंथनामध्ये अनेक व्यक्तींनी दिलेल्या योगदानामध्ये म. फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. तिघांचा कालखंड एकमेकास लागून पण वेगवेगळा. म. फुले यांनी मुलींची पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची, स्त्रीप्रश्न सोडवणुकीची व एकूणच स्त्रीसंबंधी समाजसुधारणांची पायाभरणी केली. तर डॉ. आंबेडकरांनी राज्यघटनेद्वारे स्त्रियांना विविध राजकीय, सामाजिक व आर्थिक अधिकार देऊन त्याचा कळसाध्याय गाठला. म. फुले व डॉ. आंबेडकर या दोघांच्या कालखंडाच्या मधल्या काळात राजर्षी शाहू महाराज होऊन गेले. त्यांनी म. फुले यांच्या कार्याचा कृतियुक्त वारसा चालवला. तर डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलातील अनेक कायदे आपल्या संस्थानात तत्पूर्वीच जारी केल्याने जनमानस तयार झाले. एकंदरीत वेगवेगळया काळात होऊन गेलेल्या म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्या स्त्री विषयक कार्याला जोडणारा सेतू राजर्षी शाहू ठरले.

म. फुले हे सामाजिक सुधारणासंबंधी, समतेसंबंधी क्रांतिकारक भूमिका मांडणारे आधुनिक महाराष्ट्रातील पहिले विचारवंत होत. मानवी हक्क, मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय ही त्यांच्या विचारांची त्रिसूत्री होती. मानवमुक्तीचा त्यांनी केलेला विचार व तदनुषघाने टाकलेली पावले आधुनिक समाज निर्मितीत महत्त्वाची ठरतात. स्त्री-शुद्रांच्या शोषणाचे मूळ त्यांचे अज्ञान, धर्म व धर्म प्रणित कल्पना, धर्मग्रंथ, वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था यात आहे. त्यामुळे स्त्रीला जोखडबंद करणाऱ्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना जोतिबांनी विरोध केला. स्त्रीच्या माणूसपणाचा हक्क नाकारणाऱ्या रूढी-परंपरा व पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले. स्त्रीदास्याची कारणे परखडपणे उघड केली. पुरुष सत्ता व जातीभेदावर कठोर प्रहार केला. समाज परिवर्तनात स्त्रीमुक्तीला प्राधान्य दिले. प्रबोधन युगाचा आवाज बहुजन समाजापर्यंत आणि स्त्रियांपर्यंत पोहोचवण्याचा पहिला प्रयत्न म. फुले यांनी केला. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे, मानवी जागृतीचे अत्यंत प्रभावशाली साधन आहे याची जाणीव झाल्याने स्त्री अन्यायाच्या उच्चाटनासाठी त्यांनी स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले. स्त्री शिक्षणाकडे समाज परिवर्तनाचे हत्यार म्हणून पाहिले. मुलींसाठी शाळा काढल्या. गृहपयोगी स्त्रीशिक्षण या मर्यादित भूमिकेऐवजी स्त्रियांच्यात चिकित्सकवृत्ती व प्रश्न विचारण्याची ताकद निर्माण करणे ही त्यांची भूमिका होती. स्त्रीप्रश्नांना वाचा फोडण्याचा, त्यांची सामाजिक स्थिती सुधारण्याचा एक मार्ग शिक्षणाच्या रूपाने जोतिबांनी खुला केला. स्त्री शिक्षणाबरोबरच प्रौढ विवाह, विधवा विवाह, पतिता, परितक्त्यांचे प्रश्न, अनाथ बालिका, आंतरजातीय विवाह याबाबतीत कृतिशील भूमिका घेऊन सर्वकष समाज परिवर्तनाचे कार्य केले. स्त्रियांना वस्तूवत मानणाऱ्या समाजात स्त्रीला पुरुषांबरोबर दर्जा देण्याचा प्रयत्न केला. स्त्रीला स्वातंत्र्य, शिक्षण, प्रतिष्ठा, समानता मिळाल्याशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकणार नाही हे जाणले व त्या दृष्टीने प्रयत्नशील राहिले. एकंदरीत जोतिबांनी स्त्रीला व्यक्ती म्हणून पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी क्रांतिकारी कार्य केले.

म. फुले यांचे निधन १८९० झाले तर राजर्षी शाहू १८९४ ला गादीवर आले. कृतिशील समाज सुधारक असणाऱ्या राजर्षी शाहू महाराज यांच्या क्रांतदर्शी सामाजिक कार्याला विविध पैलू असल्याचे दिसून येतात. हातातील राज्यसत्ता सामाजिक उद्धाराचे साधन म्हणून वापरणाऱ्या शाहू महाराजांनी कृषी-सहकारापासून ते विज्ञान-तंत्रज्ञानापर्यंत तसेच स्त्री दास्यविमोचनापासून ते

नाट्यगायनादी कलावंतांपर्यंत सामाजिक भानाचे एक नवे पर्व सुरू केले. अनेकविध अनिष्ट रूढी-परंपरांनी तत्कालीन स्त्री जीवन अक्षरशः जर्जर झाले होते. स्त्री शिक्षणासंदर्भात फुले दांपत्याने केलेले कार्य भविष्यकालीन स्त्री स्वातंत्र्याची पायाभरणी करणारे ठरले. म. फुले यांच्या अनेक विचारांचा कृतीशील वारसा चालवणाऱ्या शाहू महाराजांनी स्त्री शिक्षण व स्त्री स्वातंतत्र्यासंदर्भात विशेष योगदान दिले. उल्लेखनीय असे कार्य केले. समाज परिवर्तनामध्ये व देशाच्या प्रगतीमध्ये शिक्षणाचे महत्त्व ओळखलेल्या शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात १९१७ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. जे आई-वडील मुलांना शाळेत पाठवणार नाही त्यांच्यावर महिना एक रुपये प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले. परिणामतः शाळांची व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली. स्वातंत्र्यानंतर जवळजवळ ६२ वर्षानंतर २००९ साली ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम केंद्र सरकारकडून संमत केला गेला. या पार्श्वभूमीवर काळाच्या कितीतरी अगोदर शाहू महाराजांनी काळाची पाऊले ओळखून घेतलेले निर्णय त्यांची दूरदृष्टी अधोरेखित करतात. शाहू महाराजांनी तत्कालीन रितीप्रमाणे स्त्रियांना केवळ गृहपयोगी शिक्षण न देता त्यांच्या स्वतंत्र विचारक्षमतेला चालना देईल असे आधुनिक शिक्षण दिले तसेच स्त्रियांच्या गुणवत्तेनुसार त्यांना काम करण्याची संधीही दिली. स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी शिक्षकांसाठी इनाम, मागास जातीच्या स्त्रियांसाठी राहण्याजेवण्याची दरबारामार्फत मोफत व्यवस्था, शिष्यवृत्ती, राजाराम कॉलेजमध्ये मुलींना मोफत शिक्षण अशा अनेक योजना राबवल्या. शिक्षणाधिकारी रखमाबाई केळवकर यांची कन्या कृष्णाबाई यांना ग्रँड मेडिकल कॉलेज मधील वैद्यकीय शिक्षणासाठी व पुढे परदेशातील उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी आर्थिक मदत केली. दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान स्वतः कोरडे पाषाण असा प्रकार विशेषतः समाजसुधारकांच्या बाबतीत घडत असताना शाहू महाराज मात्र स्वतःच्या घरातसुद्धा या सुधारणा घडवून आणण्यास विसरले नाहीत. म. फुलेंनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करताना मुलींच्या शाळेत शिकविण्यासाठी शिक्षिकेची गरज ओळखून प्रथम स्वतःच्या पत्नीला-सावित्रीबाईंना शिकवले व शिक्षिका बनवले. प्रसंगी समाजाचा व वडिलांचा विरोध देखील झुगारला. शाहू महाराजांनीही आपल्या विधवा सुनेला-इंदुमती यांना शिक्षण देताना राजपरिवाराकडून होणारा तीव्र विरोध झुगारून शिक्षण दिले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. सून इंदुमतीने डॉक्टर व्हावे, रयतेची सेवा करावी अशी महाराजांची इच्छा होती. पण महाराजांच्या अचानक जाण्याने सुनेला डॉक्टर करण्याची त्यांची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. असे असले तरी त्यांनी विधवा सुनेला शिक्षणाच्या प्रवाहात मात्र आणले. सर्वांचा विरोध पत्करून स्वतःच्या विधवा सूनेचे शिक्षण सुरू करण्यामागे समाजातील इतर स्त्रियांपुढे स्त्री शिक्षणाचा एक आदर्श ठेवण्याचा त्यांचा मानस होता. म. फुलेंचे खरे वारसदार असलेल्या शाहू महाराजांनी समाजासमोर कृतीशील समाजसुधारणेचा आदर्श ठेवला.

शाहू महाराजांनी स्त्रियांचा सर्वांगीण विकास डोळ्यासमोर ठेवून त्यांची धार्मिक व सामाजिक बंधनातून सुटका होण्यासाठी त्यांच्यावर होणाऱ्या अनन्वित अन्याय-अत्याचारांचे निवारण करणारे कायदे त्यांनी बनवले. ते अमलात आणले. आंतरजातीय विवाह, संमतीवयाचा कायदा, घटस्फोटाचा कायदा, पुनर्विवाहाचा कायदा असे स्त्रीउद्धाराचे अनेक कायदे केले. एवढेच नाही तर मुरळी, जोगतीणीसारख्या स्त्रित्वाचा बाजार मांडणाऱ्या पद्धतीस प्रतिबंध करणारे कायदेही केले.

१९०६ मध्ये १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर स्त्रियांना वयात आल्याचे कायद्याने समजावे असा हुकूम काढला. विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा जुलै १९१७ मध्ये केला. सदर कायद्यानुसार संस्थानातील हिंदू व जैन धर्माच्या लोकांना दोहोपैकी कोणत्याही धर्मातील मनुष्याशी विवाह करण्याची मुभा दिली. असे विवाह कायदेशीर ठरवले. विवाहावेळी पुरुषाचे वय १८ तर स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण असले पाहिजे अशी अट घातली. याच कायद्यातील एका कलमानुसार १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. या कायद्यांतर्गत होणाऱ्या विवाहाच्या रीतसर नोंदणीची तरतूदही केली. स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा हा कायदा म्हणजे शाहू महाराजांचे एक क्रांतिकारी पाऊलच होय. वास्तविक पाहता १८९१ ला इंग्रज सरकारने मोठ्या धाडसाने मंजूर केलेल्या संमती वयाच्या कायद्यानुसार विवाहोत्तर मुलीचे संभोग वय बारा वर्षे असावे या दंडकाला तत्कालीन परंपरानिष्ठ लोकांनी मोठा विरोध केला होता. त्या पार्श्वभूमीवर विवाहाचे वय १४ करणे व १८ वर्षाच्या मुलीला जोडीदार निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य देणे एक प्रचंड मोठे क्रांतिकारी पाऊल होते. शाहू महाराजांनी अशी अनेक क्रांतिकारी पावले उचलली. परिणामतः तत्कालीन अन्य संस्थानिकांच्या तुलनेत शाहू महाराजांची वाटचाल इतिहासात दखलपात्र व अजरामर ठरली. स्त्री शौर्यावर मर्यादा घालणाऱ्या पडदा पद्धतीचाही त्यांनी निषेध केला. सामाजिक स्वास्थ्यासाठी विधवा विवाहास कायदेशीर मान्यता असणे किती गरजेचे आहे हे ठासून सांगितले. आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करणाऱ्या राजर्षी शाहूंनी स्वतःच्या चुलत बहिणीचा विवाह धनगर कुटुंबात करून देऊन स्वतःच्या कृतिशीलतेचा आणखी एक आदर्श समाजासमोर ठेवला. २ ऑगस्ट १९१९ स्त्री सन्मानाच्या दिशेने पाऊल उचलणारा एक महत्त्वपूर्ण दिवस. याच दिवशी कोल्हापूर

सरकारच्या गॅझेटमध्ये स्त्रियांना क्रूरपणे वागवण्यास प्रतिबंध करणारा तसेच काडीमोड संदर्भातला कायदा असे स्त्रियांना संरक्षण देणारे दोन महत्त्वपूर्ण कायदे जारी केले गेले. या कायद्यान्वये स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्यास सहा महिन्यांचा कारावास व दोनशे रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षेची तरतूद करण्यात आली. त्यांनी केलेला घटस्फोटाचा व वारसाचा कायदादेखील स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करणारा तसेच पंचांच्या लहरी निर्णयांना लगाम घालणारा होता. स्त्रीच्या अन्न-वस्त्र-खर्चाच्या योग्य व्यवस्थेसोबतच वैवाहिक संतती असेल तर त्याचा ताबा, पोटगी व शिक्षणाबद्दलची व्यवस्थाही या कायद्याने लावली होती. शाहू महाराजांनी केलेले हे कायदे म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडात हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून आकारास आलेल्या भविष्यकालीन कायद्यांची नांदी होती. काळाची पावले ओळखून काळाच्या अगोदरच पावले टाकणारा हा राजा खरोखरच महननीय आहे.

तत्कालीन कालखंडात देवाला स्त्रिया सोडण्याची प्रथा मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. देवाची पत्नी म्हणून सोडलेल्या या स्त्रियांचा उपभोग समाजातील वासनागांध वृत्ती राजरोसपणे घेत होती. देवाला सोडल्यानंतर त्यांचा जन्मदात्या घराशी ना काही संबंध असे ना जन्मदात्याच्या संपत्तीत हक्क असे. पण देवाला सोडलेल्या स्त्रीला संबंधित देवस्थानात परंपरेने चालत आलेले काही हक्क मिळत. कितीही अप्रतिष्ठित असले तरी त्याला समाजाची व परंपरेची मान्यता होती. शाहू महाराजांनी 'देवदासी प्रथा प्रतिबंधक' कायदा करून तो हक्क व दर्जाच अमान्य केला. अंधश्रद्धेला खतपाणी घालणारी व निष्पाप स्त्रियांना वासनागांध पुरुषांचे भक्ष बनवणारी ही अनिष्ट प्रथा व तिला दिलेला सामाजिक कायद्याचा दर्जाच अमान्य करून देवदासी प्रथेचा पाया उखडून टाकण्याचा प्रयत्न केला. यामागे अशा स्त्रियांच्याकडे बघण्याच्या माणुसकीच्या दृष्टीचा प्रत्यय येतो. अशा स्त्रियांचे देवस्थानातील हक्क बरखास्त झाल्याने व दर्जा अमान्य केल्याने त्या या अनिष्ट प्रथेतून मुक्त होतील व त्यांच्या वाट्याला माणूसपणाचे जिणे येईल असे महाराजांना वाटत होते. त्याचबरोबर अशा स्त्रियांचा आपल्या आई-बापाच्या संपत्तीतील वारसा हक्क देवाला सोडल्या तरी आबाधित राखला. २०व्या शतकाच्या अगदी शेवटी देवदासी सारख्या अनिष्ट रूढी परंपरांचा बिमोड करण्यासाठी, समाजातून त्यांना मुळापासून उखडून टाकण्यासाठी चळवळी सुरू झाल्या. पण त्या अगदी अलीकडच्या काळात. तत्पूर्वी जवळजवळ ७०-८० वर्षांपूर्वी या प्रकारच्या अनिष्ट प्रथा समाजातून मुळापासून उखडून काढण्यासाठी कायद्याच्या माध्यमातून महाराजांनी या प्रथेच्या मुळाशी सुरुंग लावला. वास्तविक पाहता कायद्याने एका रात्रीत जादूची कांडी फिरवावी तसेच समाज परिवर्तन घडत नाही. अनेक कायदे कित्येक वर्षांपासून अस्तित्वात आहेत पण त्याची म्हणावी तशी फलश्रुती दिसत नाही. समाजाच्या सकारात्मक परिवर्तनासाठी लोकांचे मानसिक परिवर्तन गरजेचे असते. हे खरे असले तरी कायद्याचे महत्त्व कमी होत नाही. कायद्याने एक टप्पा गाठला जातो व समाजाच्या मानसिक परिवर्तनासाठी एक पार्श्वभूमी तयार होते. जमिनीवर सांडलेले पाणी हळूहळू जसे आतपर्यंत झिरपत जावे त्या पद्धतीने हळूहळू काळासोबत कायदा समाज मनामध्ये उतरतो व लोकांचे मानसिक परिवर्तन होते.

१९२२ ला राजर्षी शाहूंचे निधन झाले. त्या दरम्यानच भारतीय अवकाशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा एक नवा तारा उदयास येत होता. डॉ. आंबेडकरांच्या समाज परिवर्तनाच्या एकूण कार्यात आधुनिक भारतीय स्त्रीसाठी त्यांनी दिलेले योगदान अनेक दृष्टीने महत्त्वाचे ठरते. स्त्री-पुरुष विषमतेमुळे स्त्रीवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी कायद्याचे महत्त्वाचे अस्त्र वापरले. लिंगभेदामुळे स्त्रीवर घोर अन्याय अत्याचार झाले. आजही होत आहेत. कारण परंपरेचा कायदा आजही प्रभावी आहे. फक्त स्त्रिया आहेत म्हणून दलितांप्रमाणे हीन वागणूक लादली गेलेल्या स्त्रियांबद्दल डॉ. आंबेडकरांना फार सहानुभूती होती. म्हणूनच त्यांनी तिला समानतेचा दर्जा मिळावा असा आग्रह धरला. स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून, नागरिक म्हणून स्वतःचे जीवन स्वतःच्या इच्छेप्रमाणे जगण्याचे, सर्व हक्क उपभोगण्याचे, व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाचे स्वातंत्र्य असावे; सर्व क्षेत्रातील विकासाच्या समान संधीचे हक्क, समाज, देश एकूणच मानवाच्या विकास प्रक्रियेत योग्य सहभागाचा हक्क असावा; त्यासाठी तिच्यावरील अनिष्ट, अनावश्यक धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय बंधने दूर होण्याची आवश्यकता सांगितली. स्त्रीमुक्ती लढ्याकडे पुरुषप्रधान मूल्यांविरुद्धचा लढा, विषमतेविरुद्धचा समतेचा लढा म्हणून व्यापक अर्थाने पाहिले. स्त्रियांच्या प्रगतीवर समाजाची प्रगती अवलंबून असते अशी धारणा असणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना कार्यप्रवण होण्यास प्रोत्साहन दिले. स्त्रियांमध्ये त्यांच्या न्याय्य हक्कांची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांना राज्यघटनेद्वारे पुरुषांबरोबर आणले, समान अधिकार बहाल केले आणि स्त्रियांच्या विकासाचा मार्ग खुला केला. पाश्चात्य स्त्रियांनी शेकडो वर्ष वारसा हक्क, मतदानाचा हक्क, कायदेशीर समानता यासाठी लढा दिला, चळवळी उभारल्या, तुरुंगवास पत्करला. मात्र भारतीय स्त्रियांना या सर्व गोष्टी संघर्ष न करता भारतीय राज्यघटनेनुसार सहज मिळाल्या.

डॉ. आंबेडकरांनी शतकानुशतकापासून चालत आलेल्या अनिष्ट रूढी परंपरांवर, अंधश्रद्धांवर हल्ला चढवला. स्त्रीदास्याचे महत्त्वाचे कारण असणाऱ्या अल्पवयीन विवाह पद्धतीला विरोध केला. शोषणमुक्तीची पायवाट असणाऱ्या, समाज परिवर्तनाचे

प्रभावी हत्यार असणाऱ्या, स्त्रियांच्या दैन्यावस्थेवरील रामबाण उपाय असणाऱ्या शिक्षणाचे महत्त्व ओळखले. त्यांनी समान शिक्षण व सहशिक्षणाचाही पुरस्कार केला. त्यांच्या एकूण कार्यातील सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे हिंदू कोड बिल होय. हिंदू कोड बिलाच्या कायद्याचा केंद्रबिंदू स्त्री आहे. डॉ. आंबेडकरांनी राज्यघटनेद्वारे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय हक्क तर हिंदू कोड बिलाद्वारे सामाजिक हक्क देण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांच्या दर्जात सुधारणा घडवून त्यांना प्रगतीपथावर आणण्याचा प्रयत्न या बिलाद्वारे केला. पुरुषप्रधान व्यवस्थेतील पारंपरिक कुटुंब पद्धतीत होणाऱ्या स्त्री शोषणाला आळा बसावा म्हणून स्त्रियांना महत्त्वपूर्ण हक्क देणाऱ्या हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. भारतीय स्त्री प्रश्नांची सोडवणूक ते कायद्याच्या आधारे करू पाहत होते. स्त्रियांना मानसिक दिलासा देणारा, विवाहाअंतर्गत स्थैर्य देणारा, कुटुंबातील स्त्रीचे स्थान पक्के करणारा, विवाहातील पोरखेळ थांबून स्त्रियांची मानहानी नष्ट करणारा, एकपत्नीत्वाचा कायदा; आयुष्यभर मुकाट्याने जात सहन न करता मतभेद असतील तर विभक्त होऊन नवीन आयुष्य जगण्याची संधी देणारा घटस्फोटाचा कायदा; अल्पवयीन मुलीच्या विवाहाला प्रतिबंध घालणारा कायदा, स्त्रियांची कुटुंबातील किंमत वाढवणारा, स्त्रियांना स्वहक्कासाठी सजग बनवणारा वारसा हक्काचा कायदा; पोटगीचा कायदा यासारख्या कायद्यांमुळे स्त्री आत्मनिर्भर बनली. तिच्या अस्तित्वाला अर्थ आला. तिच्या स्थानाची दखल घेतली गेली आणि म्हणूनच स्त्रीस्वातंत्र्याच्या इतिहासात हिंदू कोड बिल हा सर्वात महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल. घटनेनुसार स्त्रीला राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक स्वातंत्र्य मिळाले तर हिंदू कोड बिलाने स्त्रीला समर्थ केले आणि म्हणूनच हिंदू कोड बिल लिहून डॉ. आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामाच मांडला.

म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपापल्या काळात स्त्रीजीवना संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण व क्रांतिकारक निर्णय घेतले. कृती केली. परिणामी स्त्रीदास्यविमोचनाचा, स्त्रीजीवन परिवर्तनाचा एक प्रवाह निर्माण झाला. त्याची फलश्रुती म्हणून स्त्री जीवनात फार मोठा बदल घडला. स्त्रीला आत्मभान, आत्मप्रतिष्ठा देणाऱ्या स्त्रीवादी चळवळीचा पाया घातला गेला. संविधानाने मिळालेली विकासाची समान संधी, शिक्षणामुळे आलेली वैचारिक प्रगल्भता, आर्थिक स्वावलंबन यांच्या बळावर सक्षम होऊन ती सशक्तीकरणाची वाट चालू लागली. तिला आपल्या स्वतंत्र व्यक्तीत्वाची जाणीव झाली. सर्व ठिकाणी समान संधीची मागणी होऊ लागली. नागरिक म्हणून सर्व हक्क असावेत असा आग्रह धरला जाऊ लागला. पूर्वकालीन विषमताधिष्ठित अन्यायी कायदे बदलण्याचा, स्त्री विकासाला पोषक व व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा देणाऱ्या कायद्यांचा आग्रह होऊ लागला. त्याची फलश्रुती म्हणून स्त्री संरक्षणार्थ, स्त्री विकासार्थ, स्त्री सन्मानार्थ आज विविध कायदे संमत करण्यात आले आहेत. समाज जीवनाची विविध क्षेत्रे स्त्रीला उपलब्ध आहेत. सर्वच क्षेत्रात स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केल्याने ती आत्मविश्वासू बनली आहे. स्त्री-पुरुष कर्तृत्व क्षेत्रातील अंतर कमी होऊ लागले आहे. ती स्वतःचे कुटुंबाशी समाजाशी असलेले नाते तपासून लागली आहे. आपल्या हक्कांचे, अस्तित्वाचे आणि प्रतिष्ठेचे तिला भान आले. आजच्या स्त्रीला आलेले हे आत्मभान म. फुले, राजर्षी शाहू व डॉ. आंबेडकरांसारख्या प्रेषितांनी स्त्रीशोषणमुक्तीसाठी व स्त्री सुधारणांसाठी केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे. म. फुलेंनी पायाभरणी केलेल्या स्त्रीसुधारणेच्या, स्त्री उद्धाराच्या कार्याचा कळस म्हणजे घटनेद्वारे डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना दिलेले विविध राजकीय, सामाजिक व आर्थिक अधिकार होय. या पायाच्या आणि कळसाच्या मधला खांब होण्याचे, दोघांच्या विचार कार्याला जोडणारा सेतू होण्याचे कार्य छत्रपती राजर्षी शाहूंनी आपल्या निर्णय कृतीने केले.

संदर्भ-

१) पवार, जयसिंगराव, 'राजर्षी शाहू एक दृष्टिक्षेप', मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर,
२) बाबर, सरोजिनी, 'स्त्री शिक्षणाची वाटचाल', मुंबई, प्र. आ. १९६८
३) वैद्य, प्रभाकर, 'म. फुले आणि परंपरा', मुंबई, लोकवांग्मय गृह, प्र.आ. १९७४
४) पाटील, अवनीश, 'राजर्षी शाहू छत्रपती: विचारवेध', संपा., डायमंड पब्लिकेशन, प्र. आ. जून २०२४
५) नाईक निंबाळकर, सुवर्णा, 'समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज', संस्कृती प्रकाशन, द्वि. आ. नोव्हेंबर २०२१

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

12

# राजर्षि छत्रपति शाहू महाराज का शैक्षिक कार्य

**डॉ .सरोज पाटील**
प्रोफेसर
श्री शहाजी छ. महाविद्याल, कोल्हापुर

---

**प्रस्तावना:** 19 वी शती के आरंभ में संपूर्ण भारत अंग्रेजों के चंगूल में फस चुका था। अंग्रेजों की शातिर नीति ने लगभग भारत के हर क्षेत्र के राजवंश को दबोच लिया था। अंग्रेज अनेकानेक कारण देकर भारत के राजवंशों को खालसा करते जा रहे थे। ऐसे में कुछ गिने चुने राजवंशों को छोड अधिकांशराजवंशों ने स्वार्थी नीति का अवलंब कर अपना राजपाट बचाए रखने के लिए अंग्रेजों की शरण लेना शुरू किया था। जिससे संपूर्ण भारत पर एकाधिकार का अंग्रेजों का सपना पूरा हो चुका था। भारत के स्थानिय सत्ताधिशों (राजवंशों) से अंग्रेज भयमुक्त बने थे। अपने मतानुकूल राजकाज चला रहे अंग्रेज भारत को लूटकर अपनी तिजोरियां भर रहे थे। ऐसे में विडंबना इस बात की थी कि देश का अस्तित्व बचाए रखने की जिम्मेदारी से बेखबर देश के अधिकांश राजवंश अपने ऐय्याश जीवन में व्यस्त थे। उनके जीवन का अधिकांश समय युरोपिय देशों में रंगीन जिंदगी जीने में व्यतीत हो रहा था। देश की आम जनता का खयाल तक इन राजवंशों के प्रतिनिधियों के पास नहीं था। इस पार्श्वभूमी पर महाराष्ट्र के कोल्हापुर राजवंश के प्रतिनिधि राजर्षिशाहू महाराज का व्यक्तित्व अव्दितीय रुप में मुखर होता है। राजर्षिशाहू महाराज दत्तक विधान के साथ कागल से कोल्हापुर राजवंशकेप्रतिनिधी बने थे। महाराज के आगमन के पूर्व कोल्हापुर राजवंश की स्थिति कुछ खासी अच्छी नहीं थी, जिससे अंग्रेजों की वक्रदृष्टि कोल्हापुर संस्थान पर पडी थी। वे कुछ न कुछ कारण देकर कोल्हापुर संस्थान को खालसा करने में जुटे थे। महाराज के राज्यारोहन के पूर्व ५०वर्षों से कोल्हापुर संस्थान को अल्पायु राजा प्राप्त हुए थे। पूरे करवीर संस्थान में अराजकता व्याप्त थी। अंग्रेजों व्दारा नियुक्त दिवाण या एजंट व्दारा कोल्हापुर का राजपाट चल रहा था। इसमें स्वार्थांध दरबारी सदस्यों की कूटनीति,नौकर वर्ग की बेजिम्मेदारी,उनका उन्मत्त व्यवहार,अंग्रेज एजंट की मनमानी के चलते संस्थान के राजा निष्प्रभसिध्द हो रहे थे। इन्ही कूटनीतियों का शिकार बने कोल्हापुर संस्थान के चौथे शिवाजी पर बीमार होने,पागल होने का आरोप लगाकर कोल्हापुर गद्दी को खालसा करने पर अंग्रेज तुले हुए थे। चौथे शिवाजी की मृत्यु के बाद राणी आनंदीबाई नेराजर्षीशाहू महाराज को गोद लिया और महाराज कोल्हापुर संस्थान के अधिकारिक प्रतिनिधी बने। २०,२१ साल की आयु में कोल्हापुर संस्थान के सूत्र महाराज के हाथों में आए। बेहद जिम्मेदारी और इनामदारी के साथ उन्होंने सूत्रों का ग्रहण किया। राजा जनता का सच्चा सेवक होता है, उसे प्राप्त हुआ अधिकार ऐय्याश जीवन जीने के लिए नहीं बल्कि जनकल्याण में समर्पित रहने के लिए होता है यह उनकी निश्चित धारणा थी। अतः जनकल्याण और लोकमंगल की भावना लेकर वे आजीवन चलते रहे।

**बीजशब्द** -आजादी, संस्थान, राजर्षि, अज्ञान, शिक्षा, छात्रावास

**राजर्षिशाहू महाराज का संस्थान के प्रति व्यापक दृष्टिकोण -** तत्कालीन दौर अज्ञान,अशिक्षा,रुढीपरंपरा में जकडा हुआ था। सालों से लोग उसी वातावरण में जीते आ रहे थे। परिणामतः आम आदमी का जीवन समस्याओं से युक्त बना हुआ था। केवल महाराष्ट्र ही नहीं बल्की पूरे भारत की यही स्थिति थी। इस बात का अंग्रेज शासन पूरा पूरा लाभ उठा रहा था। इससे महाराज बडे अस्वस्थ बने थे। किसी भी हालत में उन्हें अपनी जनता को उन्नत बनाना था। उन्होंने रुढी परंपराओं मेंजकडे अज्ञानी समाज को दिशा देने का प्रण उठाया था। अपने लक्ष्य को मूर्त रुप देने के लिए उन्होंने राज्यारोहन के पूर्व प्रशासकिय प्रशिक्षण के तौर पर प्रजा की स्थिति का अवलोकन करने के लिए अपने गुरु स्टुअर्ट फ्रेजर और रघुनाथ सबनीस के मार्गदर्शन में कोल्हापुर संस्थान की यात्राएं की। राधानगरी से लेकर पन्हाला तक फैले हुए देहातों में वे लोगों से मिलते रहे। जनता का दुःख,अभाव,वेदना,अज्ञान,अंधश्रध्दा को देखा,लोगों से बातें की जिससे जनता का पालक होने का अहसास उनमें निर्माण हुआ। राजा और प्रजा के बीच की प्रखर आत्मीयता इस दौरान निर्माण हुई। जो अंत तक बनी रही। जनता के कमजोर पक्षों पर काम करने की उन्होंने ठान ली। अज्ञान,अशिक्षा,जातिभेद,उंचनीच,घीसी पीटि रुढी परंपराएं,अर्थिक अभाव आदि प्रमुख मुद्दे थे जिनपर काम किए बगैर कोल्हापुर संस्थान का विकास असंभव है इस बात को वे समझ चुके थे।

**राजर्षिशाहू महाराजके शैक्षिक कार्य का आरंभ -** कोल्हापुर संस्थान के कमजोर पक्षों में से सबसे अहम मुद्दा अशिक्षा है और उसे दूर करना होगा, इसे महाराज ने पहचान लिया। उन्होंने शिक्षा के प्रचार प्रसार पर जोर दिया। अशिक्षा ही मनुष्य को आगे बढने नहीं देती इस पर उनका शतप्रतिशत विश्वास था। 'शिक्षा से स्वउध्दार' उनका ब्रीद वाक्य था। अखिल भारतीय मराठा परिषद में उन्होंने

कहा था"मेरा यह ठोस मानना है कि शिक्षा के बिना किसी भी देश का विकास नहीं हुआ है यह इतिहास बताता है।" अज्ञान में डूबे हुए देश में कभी भी उत्तम राजनेता एवं शूर वीर नहीं उत्पन्न हो सकते। इसीलिए अनिवार्य तथा निःशुल्कशिक्षा की हिंदुस्तान को बडी आवश्यकता है। इस संदर्भ में हमारा भूतकाल इतिहास की अंधेरी रात है।'' (पृ.14,राजर्षिशाहू छत्रपति)

अतः शिक्षा के क्षेत्र में संस्थान में व्याप्त अहंकार को मिटाने के लिए राजा शाहू अपना खजाना रिता करने के लिए तैयार थे। शिक्षा के माध्यम से वे लोगों में कर्तव्य और जिम्मेदारी की भावना निर्माण करने के विचार से प्रेरित थे। कर्तव्यतत्पर व्यक्ति का विकास शतप्रतिशतसंभव है यह बात उन्होंने लोगों के सामने रखी थी जिसके लिए उन्होंने 8 सितंबर,1917 को नि:शुल्क परंतु अनिवार्य शिक्षा कायदा जारी किया। अपनी निगरानी में उन्होंने सन 1918 में अनिवार्य एवं निशुल्कशिक्षा का एक स्वतंत्र खाता तैयार किया, उसपर शैक्षिक निर्देशक एवं शैक्षिक जांच अधिकारी की नियुक्ती की। दूरदराज के देहातों के मंदिरों,धर्मशालाओं,पंचायत गृहों,सरकारी रिक्त स्थानों पर स्कूल खोलें। गांवो के स्कूलवाली उम्र के बच्चों की सूची बनाकर उन्हें स्कूल भेजने की जिम्मेदारी स्थानिय मुख्याध्यापकों,गांवकामगार,तलाठी आदि अधिकारियों पर सौंपी। इसप्रकार संस्थान के हर उच्चपदस्थ अधिकारी को शिक्षा अभियान में सहभागी करा लिया। अपने बच्चों को स्कूल न भेजनेवाले माता पिताओं पर १रुपया जुर्माना बिठाया। तत्कालीन दौर में महाराष्ट्र,कर्नाटक,गुजरात,सिंध इतने व्यापक इलाके की शिक्षा व्यवस्था पर अंग्रेज सरकार सालाना १ लाख रुपये से भी कम खर्च कर रही थी वहीं महाराज अकेले कोल्हापुर संस्थान के लिए १ लाख रुपये खर्च कर रहे थे। यह बात महाराज के शैक्षिक कार्य की व्याप्ति और उसका मूल्य उजागर करती है।

**शाहू महाराज का सर्वधर्म समभाव युक्त शैक्षिक कार्य -** शिक्षा के संदर्भ में महाराज के प्रयास सफल बनें। संस्थान के बच्चे पढने लगे। धीरे धीरे बच्चों की उच्चशिक्षा की समस्या सामने आने लगी। एकतो देहातों में उच्चशिक्षा प्राप्त करना संभव नहीं था, दूसरे बच्चे पढने के लिए शहरों में आए तो भी उनके रहने, खाने की समस्या थी। शहरों में रहने का खर्चा भी वे उठा नहीं सकते थे। तत्कालीन दौर में जातिव्यवस्था बडी तीव्र थी जिससे मराठा या उसकी समांतर जातियों के बच्चे ब्राहमणों के साथ भोजनालयमेंखान पान नहीं कर सकते थे। दलित बच्चों को तो भोजनालय के दरवाजे से ही भगाया जाता था। उन स्थितियों में तत्काल परिवर्तन ले आना महाराज के लिए संभव नहीं था परंतु प्राप्त स्थितियों पर उपाय स्वरुप महाराज ने विविध जाति धर्मो के 21 छात्रावास खोले। जिससे बच्चे अपनी अपनी जाति के छात्रावासों में रहकर एकाग्रता से पढने लगे। शिक्षाग्रहण की गति तेज बनी। तत्कालीन दौर में पूरे भारत में कोल्हापुर अकेला संस्थान था जहांपर हर जाति के छात्रों की शैक्षिक व्यवस्था के लिए इतने सारे छात्रावास खोले गए थे।

**स्त्री शिक्षा के प्रति शाहू महाराज की सजगता -** महाराज मानते थे कि शिक्षा का पूरा पूरा विकास तभी संभव है जब स्त्री और पुरुष बराबर शिक्षा ग्रहण करें । दोनों में कोई दूजाभाव न रहे। अन्यथा समाज का बहुत बडा स्त्री वर्ग शिक्षा से वंचित रह जाएगा और सौ प्रतिशत शैक्षिक विकास का उनका सपना साध्य नहीं हो पाएगा।

इसके लिए सबसे पहले उन्होंने स्त्री अध्यापिकाओं को तैयार करनेवाला फिमेल टे"निंग स्कूल खोला। रखमाबाई केळवकर इस महिला को शिक्षणाधिकारी के तौर पर नियुक्त किया। ग्रामीण इलाकों में स्त्रियों के लिए स्कूल खोले। अधिकाधिक लडकियों को स्कूल आने के लिए प्रोत्साहित करनेवाले शिक्षकों को उत्तेजनार्थ पारितोषिकघोषित किए। परिक्षाओं में अव्वल आनेवाली लडकियों के लिए अपनी पुत्री आक्कासाहब महाराज और भावनगर की महाराणी जी नंदकुंवर जी के नाम पर पारितोषिकघोषितकिए। कृष्णाबाई केळवकर,राधाबाई सूर्यवंशी,ताराबाई खानविलकर,डॅनिअल आत्रिका बेकर इन प्रतिभाशाली लडकियों को उच्चशिक्षा के लिए अर्थसहाय्य देकर मुंबई भेजा। पिछडे वर्ग की महिलाएं मी शिक्षाग्रहण की प्रक्रिया से जुडे इसलिए उन्होंने इन महिलाओं के रहने-रुकने,खाने-पिने की व्यवस्था करनेवाला एक आदेश अपनी महाराणी के नाम निकाला। कोल्हापुर संस्थान की महिलाओं की शिक्षा के लिए इतना कुछ करनेवाले महाराज अपने परिवार की महिलाओं कीशिक्षा के लिए भी उतने ही सतर्क थे। अपने पुत्र प्रिंस शिवाजी की विधवा पत्नी इंदुमती राणी की शिक्षा के लिएवे विशेष आग्रही रहे। स्त्री शिक्षा के क्षेत्र में महाराज का योगदार अत्यंत वंदनिय है।

**दलित वर्ग में शैक्षिक प्रसार के आग्रही शाहू महाराज -** तत्कालीन वर्ण व्यवस्था में उच्चवर्णियों व्दारा निम्नवर्णियों पर होनेवाला अन्याय दूर करने के लिए निम्न वर्गीयों में शैक्षिक प्रसार की आवश्यकता महाराज में महसूस की थी। शिक्षा के माध्यम से दलितों को सबल बनाने का प्रण महाराज ने उठाया था,दलित वर्ग में शिक्षा के प्रति प्रचंड अनास्था होने के कारण यह कार्य बडा कठिण था। सबसे पहले इन बच्चों के रहने के लिए उन्होंने स्वतंत्र छात्रावास बनाने के साथ साथ अपने निकट वासियों भास्करराव जाधव,श्रीपतराव शिंदे,खंडेराव बागल जी को साथ लेकर 'विद्या प्रसारक मंडळी' नाम की संस्था स्थापित की। इस संस्थाव्दारा दलित छात्रों को इकठठा करने एवं छात्रों का शैक्षिक स्तर उच्चवर्णिय छात्रों के समांतर लाने की पूरी जिम्मेदारी उठाई जा रही थी। इस अभियान अंतर्गत चौथी उत्तीर्ण हुए दलित छात्रों का शैक्षिक स्तर उंचा उठाने के लिए विशेष पात्रता वर्ग शुरू किए। इस संदर्भ में

भास्करराव जाधव लिखते हैं, ‘‘दलितों के स्कूल और उनके दलित शिक्षक शिक्षा आदान प्रदान कर तो रहे थे परंतु यह छात्र चौथी कक्षा से आगे नहीं बढ पा रहे थे। इन्हें अंग्रेजी शिक्षा देना बडा कठिण हो रहा था। क्योंकि मराठी में चौथी कक्षा तक की पढाई सही तरीके से न होने के कारण आगे बढना मुश्कील था। यह समस्या दूर करने के लिए विशेष कक्षा चलाने का निर्णय लिया गया।’’ (पृष्ठ, 73राजर्षि शाहू छत्रपति जीवन व कार्य) इस निर्णय का बहुत बडा लाभ हुआ। इन कक्षाओं से बाहर निकले छात्र अंग्रेजी शिक्षा में अव्वल आने लगे, कुछ छात्र प्रथम क्रमांक पर भी यश प्राप्त करने लगे |

केवल यहां तक महाराज नहीं रुके उन्होंने दलित वर्ग के छात्रों के लिए खास आदेश निकाले।तत्कालीन समय में चमार,महारआदि दलितों के लिए एक रात्रशाला थी | सन् 28 नवंबर,1906 में उसे हमेशा के लिए जारी रखा जाए यह आदेश निकाला |4 अक्तूबर,1907में कोल्हापुर के चमार,ढोर लडकियों के लिए स्वतंत्र स्कूल की मंजूरी देनेवाला आदेश निकाला और प्रतिवर्ष स्कूल के खर्चे के लिए 96 रुपयों की व्यवस्था कर दी। 1909 में भास्करराव जाधव और उनके साथियों व्दारा स्थापित दलित छात्रावास निर्माण के लिए जगह दे दी। 24नवंबर,1911के आदेश के अनुसार सभी दलित वर्गो के लिए हर प्रकार की शिक्षा नि:शुल्क दी जाए यह घोषित किया गया | साथ में होनहार दलित छात्रों के लिए दरबार की ओर से छात्र वृत्ति की घोषणा भी की। 7अप्रैल,1919 के आदेश द्वारादलित वर्ग की आर्थिक दुरावस्था देख उनके लिए नि:शुल्कशैक्षिक साधन (किताबे,कापियां,लेखनी) की व्यवस्था के लिए ढाई हजार रुपये मंजूर किए।28 सितंबर,1919 में महाराज ने कोल्हापुर संस्थान में स्थित दलित वर्गो के लिए खोले स्वतंत्र स्कूल बंद किए जाने एवं उन छात्रों को सरकारी स्कूलों में प्रवेश दिए जाए यह आदेश निकाला। कोल्हापुर के साथ साथ नाशिक,नागपुर आदि शहरों के दलित छात्रों के लिए भी महाराज ने भरपूर आर्थिक सहायता दी।

इसप्रकारमहाराज के राज्यारोहन के दरम्यान केवल 5 स्कूलों मे 168 दलित छात्रा शिक्षा ग्रहण कर रहे थे। वही महाराज के प्रयासो से अगले 18 साल में 27शालाओं में 636 दलित छात्र शिक्षा ग्रहण प्रक्रिया से जुडे।

तत्कालीन दौर में समाज व्दारा उपेक्षित गुनाहगार माने जाने वाले ‘फासेपारधी’ समाज को मुख्य धारा में ले आने के लिए महाराज ने विशेष प्रयत्न किए। फासे पारधियों का लूटमार का काम बंद करवाकर उन्हें उनके परिवार सहित वे अपने साथ कोल्हापुर ले आए। उनके रहने खाने का प्रबंध किया। उन्हे अर्थाजन के लिए काम दिए, साथ में उनके बच्चों के लिए स्कूल खोले। शिक्षितफासेपारधी बच्चों में से कुछ बच्चों कोआगे पुलिस में नौकरी दिलवाई। ‘कोई जन्म से गुनाहगार नहीं होता’ तो अभाव उसे गुनाहगार बनाता है। अत:शिक्षा के जरिए उनका जीवनस्तर परिवर्तित करनेवाले महाराज की सोच कालातित है।

महाराज ने देखा कि मराठों की तुलना में मुस्लिम वर्ग शिक्षा के क्षेत्र में अत्यंत पिछडा हुआ है। मुस्लिमों की शिक्षा के प्रति अनास्था देख महाराज ने मोहामेडन एज्युकेशन सोसायटी का निर्माण किया। इसके तहत मुस्लिम बोर्डिंग की स्थापना कर स्वयं उसके अध्यक्ष बने। आर्थिक सहयोग देकर मुस्लिम बच्चों को पढने के लिए प्रेरित किया। अरबी भाषामेंलिखित मुस्लिम धर्मग्रंथ‘कुराण’ को महाराष्ट्र के मुस्लिम आसानी से पढ पाए इसलिए उसका मराठी में अनुवाद करने की योजना महाराज ने बनाली और उसके लिए 25000/-रु.खर्च किए। महाराज अन्य छात्रावासों की तुलना में मुस्लिम छात्रावास के प्रति विशेष संवेदनशील थे। उन्हें अपने संस्थान में हिंदू- मुस्लिम सांप्रदायों में सौहादपूर्ण वातावरण अपेक्षित था।

अस्पृश्य जातियों को उच्चवर्णियों के साथ लाने के प्रयासों में महाराज ने अत्यंत क्रांतिकारी निर्णय लिए। भास्करराव जाधव लिखते हैं,‘‘अस्पृश्य माने गए बच्चों को योग्य धार्मिक शिक्षा देने की योजना महाराजने बडी विचारपूर्वक बना ली। इसके लिए उन्होंने आर्य समाजीय स्वामी जीका उपयोग करा लिया। अस्पृश्य बच्चों को उपनयन विधि के साथ आर्य बना लियाउन्हेंवेदों के संस्कार दिए। जिससे अस्पृश्य बच्चों में बसा हीनता का भाव दूर हुआ और वे स्कूल और अन्यत्र भी आत्मविश्वास के साथ रहने लगे। इसप्रकार अस्पृश्य बच्चों को उपनयन के साथ वेदों के संस्कार देनेवाले राजा शाहू हिंदुस्थान के ज्ञात इतिहास के पहले राजा है।

**निष्कर्ष-** राजर्षि शाहू महाराज केवल वंशपरंपरा से बने हुए राजा नहीं थे बल्कि वे जनता के राजा थे। सच्चे जनप्रतिनिधि थे। समाज के हर वर्ग,वर्ण के व्यक्ति की शिक्षा के लिए उन्होंने दिया हुआ योगदान कालातित है। केवल कोल्हापुर संस्थान ही नहीं बल्कि महाराष्ट्रके साथ पूरे भारतवासियों की दृष्टि में महाराज का शैक्षिक योगदान चिरवंदनीय है और रहेगा।

**संदर्भ सूची -**

1) क्रांति के अग्रदूत राजर्षि शाहू महाराज -प्रा.वेदकुमार वेदालंकार विकासप्रकाशन,कानपुर,संस्करणप्रथम,1999
2) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ - संपा.डॉ.जयसिंगराव पवार महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,कोल्हापुर, संस्करण प्रथम,2001
3) राजर्षी शाहू छत्रपतीजीवन व कार्य - संपा.डॉ.जयसिंगराव पवार महाराष्ट्र तिहास प्रबोधिनी,कोल्हापुर, संस्करण प्रथम,2016
4) शाहूंच्या आठवणी: प्रा.बाबासाहेब साळुंखे वृषाली प्रकाशन,कोल्हापूर,संस्करण 51, 2020

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**13**

# राजर्षि छत्रपती शाहू महाराजांचे कृषीविषयक कार्य

**प्रा. डॉ. डी. एल. काशिद पाटील**
भूगोल विभाग प्रमुख,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय दसरा चौक, कोल्हापूर

---

भारतीय अर्थव्यवस्थेचे केंद्रस्थान भारतीय शेती आहे. भारताची संपूर्ण अर्थव्यवस्थाच या केंद्राभोवती फिरत आहे. वास्तव आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रत्येक क्षेत्र प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेती व्यवसायाशी निगडित आहे. प्रत्येक देश अर्थव्यवस्थेच्या बलस्थानावरून ओळखला जातो इंग्लंडचे बलस्थान व्यापार, जपानचे बलस्थान औद्योगीकरण तसेच भारताचे बलस्थान भारतीय शेती आहे. भारताचा औद्योगिक विकास, अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार, सेवा क्षेत्र, मूलभूत सोई सुविधा इत्यादी शेती विकासावर अवलंबून आहे. भारताचे अंदाजपत्रक सुद्धा शेतीवर ठरत असते. थोडक्यात काय तर भारतीय शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा प्राण आहे. कृषी विकासाशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साधणे शक्यच नाही. जगामध्ये आज ही भारताची ओळख एक कृषीप्रधान देश अशीच आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे कोणतेही चित्र शेती विकासात प्रतिबिंबित होत असते.'

आपल्या देशाप्रमाणे आपले महाराष्ट्र राज्य व कोल्हापूर जिल्हासुद्धा कृषी प्रधान म्हणून ओळखला जातो. कोल्हापूरच्या अर्थव्यवस्थेचा आधारवड सुद्धा शेती व्यवसाय आहे. परंतु देशात आत्तापर्यंत तब्बल १ लाख, ३५ हजारहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची आकडेवारी अधिकृत आहे. सधन राज्य समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यातही एका वर्षभरात ३००० शेतकरी आत्महत्या करतात ही बाब अतिशय चिंताजनक आहे. वाढते कर्जबाजारीकरण, हमी भाव मिळण्यातील अडचणी, सरकारची अस्थिर धोरणे आणि तोट्यातील शेती या समस्यांना शेतकरी आजही दोन हात करताना बळी पडतात. या समस्या आजही उद्भवण्याचे मुख्य कारण म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शेतीविषयक धोरणे आणि अंमलबजावणीचा महाराष्ट्र राज्याला पडलेला विसर असेच म्हणावे लागेल.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे मातीवर आणि शेतीवर प्रचंड श्रद्धा होती त्यांच्यादृष्टीने शेती एक आत्मियतेचा विषय होता त्यांनी शेतीविषयक महत्व व्यक्त करताना म्हणतात की " कृषीकर्म इतके पवित्र आहे की, वैदिक काळात वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्यांची मंत्रीही (कृषीकर्माची उन्नती करण्याकरिता) नांगर हाकीत असत. ज्याच्या योगाने भूमीमध्ये एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते कृषिकर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानत नाही..... आपल्याला माहित आहेच की, कृषीकर्मापासून मनुष्यजातीलाही सुख मिळते...... कृषीकर्म करताना क्षात्रधर्माला बाध येतो असे नाही. त्यावर समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे. हे कर्म करणारे नीच आहेत, शूद्र आहेत, हे म्हणणे मला मुळीच पटत नाही.अशा शब्दात महाराजांनी शेतीची महंती सांगितली आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानातील लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेतीच होती. आज ही आपला देश कृषी प्रधान मानला जातो. कोणत्याही देशातील विकास हा त्या प्रदेशातील शेती, उद्योग, शिक्षण, सेवा या प्रक्रियेवर अवलंबून आहे अशी धारणा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची होती आणि आजही हे चित्र फारसे बदललेले नाही. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी आपल्या संस्थानातील शेतीला आधुनिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कृषी क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणण्याचे अथक प्रयत्न केले. महाराजांनी १८९५-९६ मध्ये संस्थानामधील अधिकार सूत्रे हाती घेतल्यापासून शेतीच्या विकासाबाबत येणाऱ्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित समस्यांना व आव्हानांना अत्यंत निर्भीडपणे सामोरे जाण्याचा प्रयत्न सदैव केला. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शेतीच्या सुधारणा, धोरण, योजना आणि अंमलबजावणी करण्यापूर्वी आपल्या संस्थाना मधील शेतीमध्ये शेतकऱ्यांना सतत भेडसावणाऱ्या समस्यांचा शोध घेतला. यासाठी संस्थानामध्ये त्यांनी अत्यंत विश्वासू सल्लागारांची मदत घेतली. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात अनेक राजे देशांमध्ये राजवैभवामध्ये सुख घेत होते. परंतु या रयतेच्या राजाने संस्थानामधील गाव आणि गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या नजरेस उमजलेल्या कृषी विषयक समस्यांचा शोध घेतला. त्या सर्वसाधारण कृषी समस्या पुढील प्रमाणे आहेत. शेतकऱ्यांचे अज्ञान आणि अशिक्षितपणा, जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, संघटनात्मक पातळीवर शेतीमाल विकण्याचा अभाव, भांडवलाची कमतरता, शेतीचा आकार लहान, शेतीतंत्रज्ञानाचा अभाव, नवनवीन अवजारे वापरणे बाबतचे अज्ञान या प्रमुख समस्यांनी शेतकरीवर्गाला ग्रासलेले होते ही वस्तुस्थिती महाराजांच्या निदर्शनास आली. छत्रपती शाहू महाराज यांच्या मते शेतीचा उद्धार झाला की शेतकऱ्याचा

उद्धार होतो आणि पर्यायाने देशाचा उद्धार होतो. या विचारधारणेमुळे महाराजांच्या निदर्शनास आलेल्या कृषीविषयक समस्यांची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांच्या अंमलबजावणीची पूर्तता करण्याचा निर्धार महाराजांनी केला.

**शेतकऱ्यांचे अज्ञान आणि अशिक्षितपणा दूर करण्यासाठीचे सर्वसामान्य शिक्षण धोरण:** बडोदे येथील श्री खाशेराव जाधव यांना लिहिलेल्या एका पत्रात शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत ते लिहितात "सक्तीच्या मोफत शिक्षणाचा प्रसार करून लोकांना ज्ञान द्यावे. त्यांना आपली एकंदर परिस्थिती काय आहे व गरजा काय आहेत ते कळावे व देशात ऐक्य वाढून सर्वांचे कल्याण व्हावे हे ध्येय पुढे ठेवून चालणेचा माझा संकल्प आहे" कोल्हापूर संस्थानात १९१६ मध्ये सार्वत्रिक व मोफत शिक्षण योजनेचा पाया घातला व १९१२ मध्येच प्रत्येक खेड्यात शाळेची व्यवस्था छत्रपती शाहू महाराजांनी केली होती. महाराष्ट्र राज्यात शिक्षण सार्वत्रिक व मोफत होण्यास १९४८ साल उजडावे लागले. शिक्षणच विकासासाठी सर्वोतम उपाय आहे असे छत्रपती शाहू महाराजांचे ठाम मत होते. शेतीविषयक माहिती समजून घ्यायची असेल तर शिक्षण आवश्यकच होते.

शेती व्यवसाय चांगल्या प्रकारे करावयाचा किंवा शेती कसावयाची असेल तर शेतीचे शास्त्रशुध्द शिक्षण घ्यावयास हवे ही निकड लक्षात घेवून महाराजांनी कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये शेती शिक्षणाची सुरुवात केली. संस्थानातील शेतकऱ्यांच्यामध्ये शेतीविषयक साक्षरता वाढविण्यास मदत होईल या हेतूने खेडोपाडी शेतकी शाळा सुरू करण्यात आल्या. कृषी विषयक नवनवीन सुधारणा किंवा शेतीतील आधुनिक प्रयोग समजून घेण्यासाठी शेतीची माहिती वाचण्यासाठी शिक्षण अत्यंत गरजेचे आहे अशी धारणा महाराजांची होती म्हणून शिक्षणाची दारे सर्वसामान्य जनतेसाठी पर्यायाने शेतकऱ्यांसाठी खुली केली. शिक्षणाने फक्त सैन्य आणि शेतकरी बनता येते असा संकुचित अर्थ अभिप्रेत नाही तर शेतीवर आधारित व शेतीस पूरक उद्योग व उच्च व्यवसाय करण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करावा अशी अपेक्षा महाराजांची होती.

**जलसिंचनाच्या सुविधा:** तत्कालीन परिस्थितीमध्ये शेतीविषयक शाश्वत पाणीपुरवठ्याच्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या हेतूने महाराजांनी 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले. आपल्या संस्थानांमध्ये पाण्याची उपलब्धता आणि उणीव असणारी गावातील ठिकाणे शोधण्याच्या उद्देशाने व बिनचूक सर्वे होण्याच्या हेतूने खास इरिगेशन ऑफिसर्सच्या नेमणुका केल्या. जुन्या विहिरींना पुनर्जीवित करण्याच्या निमित्ताने विहिरीतील गाळ काढण्यात आले. काही गावांतील तलावांची डागडुगी, त्याची दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे पावसाचे कित्येक वर्षानुवर्षे वाया जाणारे पाणी गावागावातील तलाव, विहिरीमध्ये साठवणूक होऊ लागले. यामुळे जमिनीची भूजल पातळी वाढवण्यास मदत झाली. महाराजांनी सुमारे त्याकाळात २० बंधारे बांधले होते परंतु संस्थानातील शेतीला कृत्रिम पाणी पुरवठा करण्यासाठी हे प्रयत्न तोकडे पडत आहेत ही जाणीव महाराजांना झाली होती म्हणून त्यांनी राधानगरी धरण बांधण्याचा मनोदय केला. राजर्षी शाहू महाराजांचे अत्यंत विश्वासू ब्रिटिश राजकीय मार्गदर्शक कर्नल फेरीस या अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रात असे म्हणतात की

"आपण येथून निघून गेल्यावर, मी सुमारे २० बंधारे बांधले, पण माझी महत्वकांक्षा पूर्ण झाली नाही. म्हणून मी आता एक मोठा सिंचन प्रकल्प हाती घेणार आहे. संपूर्ण भारतात मोठा असा तो प्रकल्प असणार आहे. त्यासाठी मी माझी पूर्ण शक्ती लावत आहे ही योजना यशस्वी व्हावी हीच माझी अंतरीची इच्छा आहे" या भावनिक पत्रव्यवहारातून छत्रपती शाहू महाराजांच्या राधानगरी धरण उभारणीबाबतची तळमळीची भावना व्यक्त होते. राधानगरी धरण बांधण्यासाठी प्रामुख्याने अनेक घटक राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अस्वस्थ करत होते. त्यापैकी एक म्हणजे १८९६- ९७ आणि १८९९- १९०० मध्ये आपल्या संस्थानात पडलेला कोरडा दुष्काळ या दुष्काळाची झळ इतकी तीव्र होती की लोकांना खायला अन्न आणि जनावरांना चारा वेळेवर मिळणे फार कठीण झाले होते परंतु या प्राथमिक गरजांची पूर्तता करताना छत्रपती शाहू महाराजांची प्रचंड दमछाक झाली होती.

राधानगरी धरण उभारणीसाठी महत्त्वाचे दुसरे कारण म्हणजे महाराजांचा युरोपचा दौरा.सन १९०२ मध्ये इंग्लंड, इटली, स्कॉटलंड येथील शास्त्रीय शेती पद्धतीचे निरीक्षण, शेतीतज्ञांकडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन याचा महाराजांना कृषी धोरण ठरविण्यास मदत झाली. रॉयल एग्रीकल्चरल सोसायटी ऑफ इंग्लंड या संस्थेने महाराजांना सन्मानित केले ही बाब अधिक प्रेरणादायी ठरली. या दौऱ्याच्या दरम्यान युरोपियन राष्ट्रांनी अभियांत्रिकी ज्ञानाच्या आधारे तेथील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून बांधलेली धरणे आणि कृषीला केलेला पाणी पुरवठा या सुविधांनी प्रभावित होवून अशा प्रकारची धरणे आपल्या संस्थानातील शेती जलसिंचनासाठी बांधल्याशिवाय शेतीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागणार नाही या विचारांनी शाहू महाराजांना प्रेरणा मिळाली. या दौऱ्यातील शेतीविषयक सुधारणांच्या अभ्यासाने प्रभावित होऊन राधानगरी धरणाची पायाभरणी केली. या धरणाच्या मार्गदर्शनासाठी ब्रिटिश अभियंता अधिकाऱ्याची मागणी करण्यात आली होती परंतु तत्कालीन मुंबई सरकारने सर एम विश्वेश्वरय्या

यांची या धरण बांधणीच्या मार्गदर्शनासाठी शिफारस केली तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक अभियंता रावबहादूर दाजीराव अमृतराव विचारे यांनी या धरणाचा आराखडा तयार केला. धरण परिसरातील या अभयारण्याला 'दाजीपूर' अभयारण्य असे नामकरण केले. राधानगरी या धरण बांधणीचे कार्य १९०१ ते १९१७ पर्यंतच्या कालावधीमध्ये विनाखंड काम झाले आणि निधी अभावी हे काम काही काळासाठी थांबवण्यात आले. परंतु नव्याने हे बांधकाम राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी १९५७ मध्ये पूर्णत्वास नेले. या तलावाचे नाव ''महाराणी लक्ष्मीबाई तलाव'असे नामकरण करण्यात आले. या धरणामुळेच संस्थानातील शेतीला हरितक्रांतीचे स्वरूप प्राप्त झाले.

**बाजारपेठांची उपलब्धता:** निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित समस्यांना तोंड देत अपार कष्ट करून शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाला योग्य तो भाव मिळावा या हेतूने महाराजांनी बाजारपेठांची निर्मिती केली. कोल्हापूर येथील रेल्वे स्टेशनच्या जवळील जमिनीवर शाहूपुरी ही नवीन बाजारपेठ महाराजांनी वसविली. यामुळे कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापाऱ्यांना खास सवलती देऊन वखारी घालण्यास प्रोत्साहन दिले. या बाजारपेठामुळे संस्थानातील शेतीमालास हमखास अशी बाजारपेठ उपलब्ध झाली त्यामुळेच कोल्हापूरमध्ये उत्पादित होत असलेल्या गुळाला व इतर मालाला मुंबई व इतर राज्यातून मागणी वाढली.

**कृषी प्रदर्शन:** आपल्या संस्थानातील शेतकऱ्यांना नवीन शेती अवजारे व शेती पद्धतीचे प्रात्यक्षिक पाहता यावे या हेतूने कृषी प्रदर्शन यात्रा, जत्रांचे कालावधी डोळ्यासमोर ठेवून भरविली जात असत. ४ फेब्रुवारी १८९६ रोजी पहिले कृषी प्रदर्शन, १६ एप्रिल १९१४ रोजी खासबाग येथे कृषी दुसरे कृषी प्रदर्शन, १५ ऑगस्ट १९२० रोजी तिसरे कृषी प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनात कृषीवर आधारित उद्योग, शेतीची आधुनिक साधने, जास्त उत्पन्न देणाऱ्या पिक धान्याच्या जाती, शेती विषयक माहिती पत्रके, उत्तम पैदाशीची जनावरे, नवनवीन शेती पद्धतीचे मार्गदर्शन, पशुपालन व्यवसाय ही माहिती शेतकऱ्यांना समजल्यानंतर शेतीमध्ये नवीन सुधारणा होतील अशा अपेक्षेने ही प्रदर्शने भरवली जात होती.

**कृषी तज्ञांचा सन्मान व सत्कार बक्षीसे**: कृषि विषयक शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी किवा विद्यार्थी यांना छ. शाहू महाराजांनी सातत्याने प्रोत्साहन दिले. शेती शिक्षणासाठी अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यास बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले. व तसा त्या संबंधीचा ठराव (ठराव क्र.९९०) करण्यात आला. या मध्ये रामचंद्र धोंडो शेळके यांना या शिक्षणासाठी १५०० रु. बिनव्याजी कर्ज देण्यात आले. या रकमेची फेड करण्यासाठी ६ वर्षाची मुदत देण्यात आली. तात्पर्य प्रशिक्षणार्थी किवा विद्यार्थी यांना महाराजांकडून आर्थिक पाठबळ मिळत असे. तसेच कृषि विषयक साहित्य किवा पुस्तके लिहलेल्या महादू नारायण देवधर यांची पुस्तके विकत घेऊन त्यांचा सन्मान वाढवला. 'शेतकी व शेतकरी' या पुस्तकाच्या ५० प्रती विकत घेऊन त्या शेतकऱ्यांना मोफत वाटण्यात आल्या. यामुळे अश्या पुस्तकाच्या स्वरूपातून शेतीतील नवनवीन प्रयोगाचे आणि प्रशिक्षणाचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत झाली आणि कृषितज्ञांच्या कार्याचा सन्मान वाढला.

**नाविन्यपूर्ण शेतीप्रयोग:** छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये विशेष लक्ष देऊन शेतीमध्ये नवनवीन विशेष प्रयोग केलेत. दक्षिण हिंदुस्थानी कॉफीची लागवड असलेले भाग हे आपल्या येथील घाटमाथ्याच्या भौगोलिक परिस्थितीशी मिळते जुळते व त्यामध्ये साम्य असल्याचे दिसून आल्यामुळे आपल्या घाटमाथ्यावरील उघड भागावर कॉफीची व चहाची शेती करावी या विचाराने त्यांनी मृग नक्षत्राच्या दरम्यान २००० रोपे आणवून त्यांनी पहिला प्रयोग पन्हाळा तालुक्यातील पेंडाखले येथे केला. त्यानंतर भुदरगड, पन्हाळा, बालिंगा येथे चहा व कॉफीची लागवड करण्याचा प्रयोग यशस्वी केला. पन्हाळा येथील चहा पन्हाळा नंबर ४ या ब्रॅंडने विकला जाऊ लागला. पन्हाळा येथे उत्पादित होत असलेल्या चहाची उत्तम चव असल्याचा निर्वाळा बडोद्याचे सयाजीराव महाराज यांनी दिला.

कोरफड उत्पादनाचा प्रयोग कोरफड कुंपन व जंगलाच्या हद्दी निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरला. शिरोळ तालुक्यात कंबोडियन कापूस लागवडीचे प्रयोगही त्यांनी केले.याबरोबरच हिरडा, जांभूळ, ताग, काजू, साग, आंबा, फणस, इ लागवडीचेही प्रयोग केलेत. निलगिरी येथून औषधी वनस्पती, बेंगलोरहून रबर व कोको, बऱ्हाणपूरच्या बोटॅनिकल गार्डनमधून मौल्यवान प्रतीचे लाकूड यांच्या लागवडीचे नवे प्रयोग अमलात आणले.

**शेतीला पतपुरवठा:** शेतकरी कर्जबाजारातून मुक्त व्हावा या हेतूने व्हिक्टोरिया राणीच्या निधनानंतर गरीब व कर्जबाजारी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी एक फंड सम्राज्ञीच्या नावे स्थापन करण्यात आला. तसेच १९११ मध्ये सातवा एडवर्ड बादशाह मृत्यू पावल्यानंतर कोल्हापूर संस्थानात त्यांच्या नावे एक फंड जमा करून "किंग एडवर्ड एग्रीकल्चरल इन्स्टिट्यूट या संस्थेची १९१२ मध्ये स्थापना करून संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेती कार्यासाठी निधी उपलब्ध करून देणे सुरू झाले. या निधीमध्ये महाराजांनी रुपये ५००० दिले होते व संस्थेला प्रतिवर्षी रुपये १००० ची ग्रॅंट मंजूर केली होती.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**निष्कर्ष:** प्रस्तुत संशोधन लेखामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये शेतीमध्ये उद्भवलेल्या समस्यांचा प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून त्या समस्यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांचे अज्ञान आणि अशिक्षितपणा दूर करण्याच्या दृष्टीने सर्वसामान्यांना मोफत शिक्षण आणि शेतीविषयक शिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. शेती विषयक उच्च व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ देऊन शेतीविषयकचे ज्ञान वाढवण्यासाठी ठोस ठराव मंजूर केले. शिक्षणाचा प्रसार, नवनवीन प्रयोग याचे प्रशिक्षण शहरांमध्येच न ठेवता खेडोपाडी शेतकी शाळा सुरू करून शेती विषयक अद्यावत ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले. शेती कार्यामध्ये भांडवलाची कमतरता पडू नये म्हणून त्यांनी अनेक फंड निर्माण केले व त्यातून सावकारकीच्या विळख्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न केले. शेतीचा आकार लहान असल्यामुळे तुकडे बंदी कायदा अस्तित्वात आणला. कृषीमाल बाजार विषयक संघटनेचा अभाव लक्षात आल्यामुळे शाहूपुरी, जयसिंगपूर व अन्य ठिकाणी बाजारपेठांची निर्मिती केली. त्यामुळे शेतकऱ्याच्या शेती मालाला हमखास भाव मिळू लागला. शेतकऱ्यांना शेती तंत्रज्ञान आणि नवनवीन कृषी प्रयोग समजण्यासाठी कृषी प्रदर्शने भरविण्यात आली. त्यामुळे नवनवीन अवजारे व तंत्र वापराचे ज्ञान शेतकऱ्यांना अवगत झाले. संस्थानातील शेतीला दुष्काळासारख्या समस्येने ग्रासलेले होते यावर उपाय म्हणून राधानगरी जलसिंचन प्रकल्प उभा करण्यात आला आणि खऱ्या अर्थाने आपल्या सस्थानात हरितक्रांतीची बीजे रुजविली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शेतीविषयक कार्य अतुलनीय आणि अजरामर आहे. राज्य व केंद्र शासनाला भविष्यकालीन शेतीविषयक धोरणांची अमंलबजावणी करताना महाराजांचे हे कार्य चिरकाल मार्गदर्शक ठरणार आहे.

**संदर्भ:**

१) डॉ. अर्जुनराव शंकर महाडीक, प्रा. उल्हास महादेव माळकर - बदलता महाराष्ट्र- 'महाराष्ट्रातील शेत जमीनिचा वापर प्रवृती आणि समस्या' पृष्ठ क्र. २०७
२) प्राचार्य डॉ. ना.य.डोके – 'राजर्षि छत्रपती शाहू महाराजांचा शिक्षण विषयक दृष्टोकोन', राजर्षि शाहू गौरवग्रंथ, पृष्ठ क्र. ८३७
३) प्रा. मीना कुलकर्णी – 'कोल्हापूर सस्थानातील शेती व सहकार' राजर्षि शाहू गौरवग्रंथ, पृष्ठ क्र. १५९,१६०
४) 'बळीराजाचा राजा...शाहू महाराज शेती व शेतकरी'- 'लोकमत' राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या १४६ व्या जयंतीनिमित्य आढावा'.
५) प्रा. डॉ. गजानन बी. वणवरे, -'छत्रपती शाहू महाराजांच्या कृषी क्षेत्राच्या विकासाची प्रासंगिकता- एक चिकित्सक अध्ययन', इतिहास संशोधन पत्रिका, जुलै २०१८
६) डॉ. गायकवाड लहू कचरू– 'छत्रपती शाहू महाराजांचे कृषीविषयक धोरण: आजची प्रासंगिकता', इतिहास विभाग, कला वाणिज्य व विज्ञान कॉलेज, नारायणगाव जि. पुणे.
७) जाधव आर.-२०१२, 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ ', उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) पवार ज.-२००८, 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ ', कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
९) https://en.wikipedia.org/wiki/Shahu_of_Kolhapur
१०) https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner
११) https://www.bbc.com/marathi/articles/cye78l9jj52o

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**14**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निर्मूलन: विचार आणि कार्य

**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव,**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी. ता. गगनबावडा जि. कोल्हापूर.

---

**प्रस्तावना:** वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था ही भारतीय समाजाची खास वैशिष्ट्ये आहेत. पण या पलीकडे जाऊन अस्पृश्यता भारतीय समाजाचे प्रमुख अंग राहिले आहे. ज्यामुळे एकेकाळी भारत आणि बहिष्कृत भारत असे दोन देश निर्माण झाले होते. भारतातील प्रत्येक खेड्यामध्ये वेशीच्या आतील गाव आणि वेशीच्या बाहेरील गाव अशी खेड्यांची ओळख बनली होती. ज्या लोकांचा स्पर्श विटाळ मानला गेला त्यांना बहिष्कृत करून गावकुसाबाहेर ठेवण्यात आले. त्यांना वर्षानुवर्षे त्यांच्या नैसर्गिक मानवी हक्क, अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. त्यांना जनावरांच्या पेक्षाही हीन वागणूक देण्यात आली. असा एक वर्ग म्हणजे अस्पृश्य होय. खरंतर भारतीय समाजात वर्णव्यवस्थेवर आधारित ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णांची निर्मिती दिसून येते. याखेरीज अस्पृश्यता नावाचा एक वर्ग भारतीय समाजामध्ये दिसून येतो. जो जगात इतर कोणत्याही देशांमध्ये पाहाव्यास मिळत नाही.

भारतीय सनातन धर्मग्रंथांचा आधार घेऊन एका विशिष्ट वर्गाला अस्पृश्य संबोधले गेले. मागील जन्मातील कर्माचे फळ असे सांगून त्यांना ते लाजिरवाणे जगणे स्वीकारण्यास भाग पाडले. अशी ही अस्पृश्यता प्राचीन काळापासून चालत आलेली होती. ही अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी मध्ययुगीन कालखंडामध्ये अनेक लोकांनी प्रयत्न केले. तर १९ व्या शतकाच्या सुरुवातीस समाज सुधारकांनी अस्पृशतेचा नायनाट करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यामध्ये विशेषत: महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वी. रा. शिंदे अशा कित्येक महामानवांचा उल्लेख करता येईल. यामध्ये विशेषत: छत्रपती शाहू महाराज यांनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या संदर्भात आपल्या विचारांना कृतीची जोड दिली. त्यासाठी आपल्या राजकीय सत्तेचा पुरेपूर वापर केला. प्रसंगी शिक्षा आणि दंड यासारख्या मार्गांचा अवलंब केला. ज्याचा परिणाम अस्पृश्य वर्गाच्या सर्वांगीण जीवनावर झाला. त्यांचे जीवन बदलून गेले. हजारोवर्षांपासून वंचित राहिलेल्या एका घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे महान कार्य महाराजांनी केले. त्यांना सन्मानाचे जीवन जगण्याची संधी प्राप्त करून दिली. सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिकोनातून शाहू महाराजांनी मांडलेले विचार आणि कार्य आजच्या काळात सुद्धा आपल्याला दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरते.

प्रस्तुत संशोधनपर निबंधामध्ये छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निर्मूलनाचे विचार आणि त्या संदर्भात त्यांनी केलेले कार्य या अनुषंगाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**उद्देश:** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निर्मूलन विचार आणि कार्य समजावून घेणे.

**महत्वाचे शब्द**: अस्पृशता, श्रुती, स्मृती, छंदोगद, चांडाळ, मेद, वेठरवळा इ.

**संशोधन पद्धती:**प्रस्तुत संशोधन लेखासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनासाठी प्राथमिक तसेच दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**अस्पृश्यतेचा अर्थ:**अस्पृश्यता हा भारतीय समाजाचा भाग आहे का? असा प्रश्न ज्या वेळेला निर्माण होतो त्यावेळी खरंतर ज्या सनातनी धर्मग्रंथांचा आधार घेतला जातो त्यामध्ये प्रत्यक्षात अस्पृश्यतेच्या संदर्भात उल्लेख मिळत नाहीत. विशेषतः श्रुती, स्मृती, पोथी, पुराण यामध्ये अस्पृश्यतेचा उल्लेख सापडत नाही. इतकेच नाही तर अस्पृश्यता ही ईश्वरनिर्मित आहे. यालाही साधार पुरावे उपलब्ध नाहीत. असे असताना प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये अस्पृश्यता नावाचा वर्ग दिसून येतो. या पाठीमागील नेमकी पार्श्वभूमी काय आहे? हे समजून घ्यायला हवे. अस्पृशतेच्या संदर्भात प्रत्यक्षात श्रुतीमध्ये सुद्धा कोठे ही अशा लोकांचा स्पर्श टाळावा असे स्पष्टपणे म्हटलेले नाही. तर स्मृतीमध्ये अंत्ययोनी म्हणून वर्णन केलेल्या जातींचा उल्लेख सापडतो. पण त्यांना अस्पृश्य मानलेले नाही. हे लक्षात घ्यायला हवे. उदा: धोबी, चर्मकार, नट, बुरुड, कोळी, मेद आणि भिल्ल या सात अंत्ययोनी होत. यापैकी कोणालाही अस्पृश्य मानण्यात आलेले नाही.[१] याशिवाय, पापी लोक कुत्रा, डुक्कर आणि चांडाळ योनीमध्ये जन्म पावतात असे छंदोगद्यात म्हटल्याचे आढळत असले तरी कुत्रे आणि डुकरे यांना आपण स्पर्श करतो. मग चांडाळ यांनाच तेवढे अस्पृश्य कसे म्हणायचे याचे स्पष्टीकरण सनातन धर्माचा अभिमान बाळगणारे कोणीही विद्वान देत नाहीत. ते चांडाळला डुकरापेक्षा अधिक हिन खुशाल म्हणू देत

परंतु तो अस्पृश्य मात्र ठरू शकत नाही. लोक डुकरांना अस्पृश्य मानत नाहीत. श्रद्धात दिलेले डुकराचे मांस खाणारे परलोकातील पितर नऊ महिने तृप्त राहतात, असे मनुनेच आपल्या स्मृतीमध्ये लिहिले आहे.[२] तेव्हा अशा रीतीने श्रुती आणि स्मृती यांच्या दृष्टीने विचार केला तरी अस्पृश्य मानले जाणारे चांडाळ हे अस्पृश्य नाहीत. याव्यतिरिक्त मलीन कर्म हे अस्पृशतेचे मूळ आहे असे जे लोक सांगतात त्यांनी खरंतर इतिहास आणि विज्ञानाकडे पाठ फिरवलेली आहे. कारण मलीन कार्य किंवा हीन कार्य करणारे व त्यावर उपजीविका करणारे लोक बऱ्याच देशांमध्ये आहेत. परंतु भारताखेरीज अस्पृश्यता कुठेच आढळत नाही. ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी.[३] थोडक्यात, एकमेकांचे आचार, विचार आणि संस्कार यांना भिन्न मानून ज्यांचा स्पर्श टाळला गेला व ज्यांना बहिष्कृत करून गावकुसाबाहेर ठेवण्यात आले. अशा एका मानवी समूहाला अस्पृश्य म्हणून संबोधले गेले आहे. पूर्वजन्मी आपण केलेल्या पुण्यकर्मामुळे किंवा पापकर्मामुळे उच्च वा नीच कुळामध्ये आपला जन्म होतो. असा विचार वर्षानुवर्षे त्यांच्या मनावर बिंबवण्यात आला होता. गत जन्मातील कर्माचे फळ म्हणून कोट्यावधी लोकांना अस्पृश्य ठरवून विनाकारण समाजाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला ठेवण्यात आले त्यांनाच आपण अस्पृश्य असे संबोधतो. शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मूलनाचा विचार:

अस्पृश्यता ही अमानवीय, अशास्त्रीय आणि अनैसर्गिक दुष्ट स्वरूपाची आहे हे शाहू महाराजांनी जाणले होते. आणि म्हणून त्यांनी या अस्पृशतेचे आपल्या संस्थानातून उच्चाटन करण्याचे धोरण स्वीकारलेले होते. अस्पृशतेमुळे व्यक्तीव्यक्तीमध्ये भेद निर्माण होऊन सामाजिक समता नाहीशी झाली आहे. यावर शाहू महाराजांचा विश्वास होता. भारतातील एक जात दुसऱ्या जातीचा पराकोटीचा द्वेष करते. माणसा-माणसांमध्ये भेद निर्माण करते. आणि म्हणून आपल्या संस्थानातून या अस्पृशतेचे समूळ उच्चाटन झाले तरच अस्पृश्यांची परिस्थिती सुधारेल असे त्यांना वाटत होते. त्यासाठी अस्पृश्यांची या सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी शाहू महाराज प्रयत्न करत होते. त्या दृष्टीकोनातून त्यांनी राजाज्ञा, जाहीरनामे सुद्धा जारी केले. कायद्यानेच अस्पृश्यता नष्ट करण्याचे त्यांचे धोरण होते. अस्पृशतेच्या संदर्भात छत्रपती शाहू महाराजांचे विचार अगदी स्पष्ट होते. ते म्हणतात की, अस्पृश्य हा शब्द कोणत्याही व्यक्तीसाठी वापरणे योग्य नाही. कारण आपण सर्वजण एकाच राष्ट्राचे घटक आहोत. आपण सर्वजण भारतीय आहोत. त्यामुळे आपली जात किंवा धर्म किंवा वर्ण कोणता आहे याचा विचार न करता आपण एकाच राष्ट्राचे नागरिक आहोत. ही भावना आपल्यामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. कारण जात आणि धर्म हे राष्ट्रीय एकात्मतेच्या आड येता कामा नये. असे त्यांचे स्पष्ट मत होते. वैयक्तिक जीवनामध्ये सुद्धा त्यांना अस्पृश्य हा शब्द वापरायला आवडत नसे. मी या शब्दाचा धिक्कार करतो. अशा पद्धतीचे उद्गार छत्रपती शाहू महाराज यांनी दिनांक ३० मे, १९२० रोजी नागपूर येथे झालेल्या भाषणात व्यक्त केले होते.[४] अस्पृश्यता टिकवण्यामध्ये परंपरागत आणि जातीनुसार केले जाणारे व्यवसाय हा त्यातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता. कारण हिंदू धर्माने प्रत्येक जातीला एक निश्चित व्यवसाय ठरवून दिला होता. जो व्यक्तीची जात निश्चित करत असे. म्हणूनच अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर लोकांनी परंपरागत व्यवसायांचा त्याग करावा व लोकांनी सैन्य किंवा प्रशासनामध्ये भरती व्हावे. अशा पद्धतीचा सल्ला शाहू महाराजांनी अस्पृश्यांना दिलेला होता. याचबरोबर आपल्या सामाजिक, राजकीय अधिकाराबद्दल अस्पृश्यांनी नेहमी जागृत असले पाहिजे. ही भूमिका त्यांनी मांडलेली दिसून येते.[५] छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निर्मूलन संदर्भातील विचार आणि भूमिका ही खूप महत्त्वाची होती. आपल्या संस्थानातून अस्पृशतेचे निर्मूलन करण्यासाठी त्यांनी आदेश, शिक्षा आणि दंड नीती वापर करून सामाजिक समता निर्माण करण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केलेला दिसून येतो.

**शाहू महाराजांच्या अस्पृशता निवारण उपाययोजना:** अस्पृश्यांचा उद्धार ही शाहू महाराजांची भूमिका काही एका दिवसांमध्ये तयार झालेली नव्हती. ही भूमिका हळूहळू काही प्रसंगांच्या माध्यमातून निर्माण झालेली दिसून येते. त्यासाठी शाहू महाराजांच्या आयुष्यातील वेदोक्त प्रकरणासारखी घटना सुद्धा तितकीच कारणीभूत होती. समाजातून अस्पृशतेचे निर्मूलन झाले पाहिजे हा विधायक विचार घेऊन छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या परीने वेगवेगळया प्रकारच्या उपाययोजना आपल्या संस्थाकाळात राबवल्या. तसेच त्याला कायद्याची जोड दिली. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी दलित जातीतील विद्यार्थ्यांच्यासाठी असलेल्या वेगवेगळया शाळा बंद केल्या. आणि सर्वांना एकाच सरकारी शाळेत प्रवेश देऊन मानवी विषमता दूर केली. याशिवाय स्वतः शाहू महाराज अस्पृश्यांच्यामध्ये मुक्तपणे वावरत असत. त्यांच्या हातातून पाणी, चहा, जेवण घेत असत. म्हणजेच आपल्या आचरणांने इतरांना अस्पृश्यता न पाळण्याची शिकवण देत असत. एक राजा अस्पृश्यांशी इतक्या प्रेमाने वागतो हे पाहून इतर सर्व सामान्य लोकांच्यावर आणि सोबत असणाऱ्या सरकारी नोकऱ्यांच्यावर त्याचा परिणाम होऊन त्यांच्याही वर्तनामध्ये बदल होत असे. अस्पृश्यांना ते प्रेमाने सूर्यवंशी असेही म्हणत असत. अस्पृश्यता पाळणे आणि अस्पृश्य व्यवहार करणे हा त्यांनी कायद्याने गुन्हा ठरवला. तसेच अस्पृश्यता पाळणाऱ्याच्या विरोधात कठोर कायदे केले. कोल्हापूर संस्थानातील हजेरी पद्धतीवर बंदी घालून, महार वतने नष्ट केली. त्यामुळे वेठबिगारी सारख्या अमानुष प्रथेतून अस्पृश्यांची मुक्तता झाली. त्यांना तलवार बरोबर घेण्याचा तसेच रथाचा

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

सारथी, माहुत होण्याचा मान मिळाला. शाहू महाराजांनी त्यांच्यासाठी काही जागा सुद्धा आरक्षित ठेवून आरक्षणाची व्यवस्था केली. अशा स्वरूपाचे आरक्षण देणारे छत्रपती शाहू महाराज हे भारतातील पहिलेच राजे होते.[६] महार समाज हा वतनाच्या गुलामगिरीत कितपत पडला होता. जमिनीच्या लहान-लहान तुकड्यांचा मोह त्याला सोडवत नव्हता. यावर शाहू महाराजांनी उपाययोजना काढली ती म्हणजे कसबा करवीर मधील समस्त गावच्या महार लोकांची जमीन एकत्र करायची व त्यांच्याच पैकी काही लोकांना त्या जमिनीचे प्रत्येक कुटुंबाचा उदरनिर्वाह चालेल अशा पद्धतीने फेरवाटप करायचे व बाकीच्या मोजक्या लोकांना सरकारी सेवेत दाखल करून घ्यायचे. या पद्धतीने महार लोकांना वतनाच्या जुलमी कामातून मुक्त करण्याचे शाहू महाराजांनी ठरवले होते. त्याप्रमाणे शाहू महाराजांनी १६ महार लोकांना सरकारी नोकर म्हणून नेमणूक दिलेली दिसून येते. शाहू महाराजांचे हे धोरण म्हणजे अस्पृश्यतेच्या मुळावरच घाव घालण्याचा भाग होता. त्यामुळेच महार लोकांच सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता झाली.[७] महार वतनाप्रमाणेच 'वेठरवळा' नावाची अमानुष पद्धत या काळात अस्तित्वात होती. ही वेठरवेळाची पद्धत म्हणजे महारजातीच्या लोकांच्या पायातील बेडी होती. या पद्धतीमुळे महार जातीतील लोकांना गावातील पाटील-कुलकर्णी तसेच सरकारी अधिकारी यांची विनामोबदला कामे तसेच सेवा करावी लागत होती. त्यामुळे त्यांना गावाबाहेर पडता येत नव्हते. तेव्हा शाहू महाराजांनी वेठरवेळाची प्रथा बंद करुन करून त्यांना या जाचातून मुक्त केले.[८] अस्पृशतेसाठी मनू धर्मशास्त्राचे कायदे कारणीभूत आहेत. कारण ते एकाच जातीचे वर्चस्व निर्माण करतात. ही गोष्ट शाहू महाराज यांच्या लक्षात आली होती. जे कायदे इतर जातींना तुच्छ, कस्पटासमान लेखतात. केवळ ब्राह्मणांची सेवा करणारे व त्यांना मानसन्मान प्रतिष्ठा मिळवून देणारे कायदे, अनिष्ट रूढी प्रथा, परंपरा, नाहीशा करून सर्वांना समानतेची वागणूक देणारे कायदे निर्माण केले पाहिजेत ही शाहू महाराजांची भूमिका होती. शाहू महाराजांचा हा समतावादी दृष्टिकोन अस्पृश्यता आणि जातिभेद कमी करण्यासाठी परिणामकारक ठरला.[९] अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर पहिल्यांदा जातीभेद नष्ट केला पाहिजे. आणि जातिभेद नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत. त्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही. म्हणून भिन्न-भिन्न जातींच्या मध्ये रोटी-बेटी व्यवहार झाले पाहिजेत असा विचार शाहू महाराजांनी मांडला.[१०] त्यासाठी ते मार्टिन ल्युथर किंग आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे उदाहरण देतात. कारण त्यांची चरित्रे आपणास जातिभेद नष्ट करण्याची शिकवण देतात. छत्रपती शिवाजी शिवाजी महाराज यांनी मुसलमान, मराठा यांच्याकडून देश कार्य करून घेतले तर महार, मांग यांच्याकडून रिसाले व तोफखाना तयार करून घेऊन स्पृश्य-अस्पृश्या विचारास जबर धक्का दिला.[११] शेवटी अस्पृशतेच्या संदर्भात शाहू महाराज म्हणतात की, अस्पृश्य हा शब्द माणसाला वापरणे हा निंद्य प्रकार आहे. शिवाय अस्पृश्य लोक हे इतर लोकांच्या पेक्षा जास्त बुद्धिमान, पराक्रमी, सुविचारी आणि सर्व त्यागी आहेत. ते आपल्या हिंदी राष्ट्राचेच घटक अवयव आहेत. त्यामुळे मी त्यांना कधीच अस्पृश्य समजत नाही. त्यांचे आणि आपले हक्क समसमान आहेत. ही भावना सर्वांनीच आपल्या मनात ठेवली पाहिजे अशा पद्धतीचे विचार शाहू महाराजांचा होता. जो राष्ट्रीय एकात्मतेच्या आणि राष्ट्रीय अखंडतत्त्वाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा होता. ही गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी.[१२]

**अस्पृशता निर्मूलनासंदर्भातील शाहू महाराजांचे आदेश:**कोल्हापूर संस्थानातून अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यासाठी शाहू महाराजांनी सर्वतोपरी प्रयत्न केले होते. त्यासाठी त्यांनी आपल्या राजकीय सत्तेचा वापर केला. अस्पृश्यता कायद्याने बंद करण्यासाठी त्यांनी विविध प्रकारचे राज्यातल्या जाहीरनामे पारित केले. दिनांक २२ फेब्रुवारी, १९१८ मध्ये बलुतेदारी नावाची पद्धत त्यांनी कायद्याने बंद केली.१३ कारण ही पद्धत एक प्रकारे अस्पृश्य लोकांना गुलाम बनणारी होती. त्यामुळे सर्वप्रथम ती बंद करणे गरजेचे होते. या बलुत्याच्या बदल्यात दलित लोकांच्यावर कामाची सक्ती केली जात होती. पुढे इ. स. सन १९१९ मध्ये शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातून अस्पृश्यता नष्ट केल्याच्या संदर्भात एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यानुसार अस्पृशता पाळणारी व्यक्ती ही शिक्षेस पात्र ठरवण्यात आली होती. तसेच कोणताही सरकारी नोकरदार जर या कायद्याची अंमलबजावणी करत नसेल तर त्याला राजीनामा द्यावा लागेल. तसेच स्वतःच्या निवृत्ती वेतनाबरोबर इतर सुविधांना मुकावे लागेल. हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करणारा जाहीरनामा शाहू महाराजांनी २७ जुलै, १९१८ रोजी प्रसिद्ध करून अस्पृश्यांना स्वातंत्र्याचे हक्क दिले. अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर त्यासाठी अस्पृश लोकांना वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी दिली पाहिजे. ही भूमिका घेऊन शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे खुली केली व अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतील शिकलेल्या लोकांना तलाठी म्हणून गावोगावी नेमणूक दिली. त्या संदर्भातील आदेश २० ऑगस्ट, १९१८ रोजी त्यांनी पारित केला, तर १ जानेवारी १९१९ रोजी प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांच्यासारखी समानतेची वागणूक द्यावी म्हणून त्यांनी शिक्षण खात्याला राजाज्ञा दिलेली दिसून येते. अस्पृश्येच्या वाढीस अस्पृश्यांच्या मुलांच्यासाठी असलेल्या वेगवेगळ्या शाळा कारणीभूत ठरत आहेत. ही गोष्ट लक्षात आल्याने शाहू महाराजांनी या शाळा बंद करण्यासंदर्भातील

आदेश ३० सप्टेंबर, १९१९ रोजी पारित केला. आणि स्पर्शा-स्पर्श प्रथा बंद केली. तसेच दिनांक ८ ऑक्टोबर, १९१९ रोजी कोल्हापूर संस्थानातील सर्व सरकारी व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांना खुली करण्याचा आदेश शाहू महाराजांनी जाहीर केला. त्यामुळे संस्थांनामधील सर्व पाणवठे, हॉटेल्स, पोस्ट, रुग्णालय, कचेरी, राजवाडा, राजांची पंगत, तलाव, विहिरी त्यांना खुल्या झाल्या.[१४] शाहू महाराजांनी दिलेल्या राजाज्ञा आणि वेळोवेळी काढलेले आदेश किंवा जाहीरनामे यामुळे संस्थांनामधील अस्पृश्यता कमी होऊन दलित समाजातील लोकांना मानाचे आणि सन्मानाची जीवन प्राप्त झालेले दिसून येते. छत्रपती शाहू महाराजांचे हे कार्य कितीतरी काळाच्या कितीतरी पुढचे आणि पुरोगामी स्वरूपाचे होते लक्षात येते.

**छत्रपती शाहू महाराज आणि अस्पृश्यांचे शिक्षण :** अस्पृश्यतेच्या मुळाशी लोकांचे अज्ञान आहे. ही गोष्ट प्रकर्षाने शाहू महाराजांना जाणवल्यामुळे त्यांच्या लक्षात आले की, शिक्षणाशिवाय अस्पृश्यांचा उद्धार होणार नाही. म्हणून त्यांनी इ. स. १९०७ मध्ये भास्करराव जाधव, महादेवराव, खंडेराव बागल, श्रीपतराव शिंदे यासारख्या लोकांच्यावर काही जबाबदारी सोपवली होती. या लोकांनी अस्पृश्यांच्यासाठी ‘विद्या प्रसारक मंडळ’ नावाची संस्था स्थापन केली. छत्रपती शाहू महाराज यांच्या राज्यरोहण प्रसंगी अस्पृश्यांच्या शाळांची संख्या ५ होती. तर १९१२ पर्यंत ती २७ होऊन विद्यार्थ्यांची संख्या ६३६ इतकी झालेली दिसून येते.[१५] या काळात इयत्ता चौथी पास अस्पृश्य विद्यार्थ्यांना पाचवीच्या वर्गामध्ये प्रवेश मिळवण्यासाठी अडचण येत होती. त्यासाठी शाहू महाराजांनी स्वतंत्रपणे पात्रतावर्ग सुरू करुन त्याची सर्वस्वी जबाबदारी श्रीपतराव शिंदे यांच्यावर दिलेली दिसून येते. ज्याचा परिणाम म्हणजे अस्पृश्य विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषा सुधारणा झाली. तसेच काही विद्यार्थ्यांनी तर वर्गामध्ये नंबर ही मिळवलेला दिसून येतो.[१६] दिनांक २४ ऑक्टोबर, १९११ रोजीच्या आदेशाने अस्पृश्यांना सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. तसेच हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सोय करण्यात आली. त्याचबरोबरच दिनांक ७ एप्रिल, १९१९ च्या आदेशाने अस्पृश्य

लोकांची दैनाअवस्था लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणासाठी उत्तेजन द्यावे या हेतूने पाठ्यपुस्तके, पेन्सिल इत्यादी साहित्य मोफत देण्यासाठी अडीच हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली दिसून येते. याशिवाय महार जातीतील लोकांना गावोगावी तलाठी म्हणून नियुक्ती देण्याबरोबरच दलित समाजातील मुलांना आठ रुपये दरमहा शिष्यवृत्ती देण्यात येत होती. ज्याचा परिणाम म्हणजे दलित जातीतील व्यक्ती गावातील एक प्रमुख अधिकारी बनली. या पाठीमागे शाहू महाराजांचे फार मोठे योगदान होते. दिनांक २८ सप्टेंबर, १९१९ रोजी शाहू महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्या. त्या संदर्भात ते म्हणतात की, अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र असलेल्या शाळा बंद करण्यात येत आहेत. आणि इतर मुलांच्या प्रमाणेच अस्पृश्य जातीतील मुलांना सरकारी शाळांमध्ये दाखल करून घेतले जावे. सरकारी शाळेमध्ये शिवा-शिव न पाळता सर्व जातीच्या धर्माच्या मुलांना एकत्र बसू दिले जावे. असे स्पष्ट आदेश दिल्याचे नमूद आहे. याशिवाय, इसवी सन १९२० साली महाराजांचे धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांच्या स्मरणार्थ महाराजांनी अस्पृश्य लोकांच्या विद्येला उत्तेजन देण्याकरता दहा हजार रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा तयार करून ठेवल्या होत्या. व त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती दिली जात होती.[१७] एकंदरीतच छत्रपती शाहू महाराज यांनी केलेल्या कार्यामुळे अस्पृश्य वर्गातील मुलांना शैक्षणिक सुविधा मिळाल्या ज्यामुळे अस्पृश्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होऊन त्यांना सन्मानाचे जीवन प्राप्त झाले शाहू महाराजांची शाहू महाराजचे धोरण आणि भूमिका ही खूप महत्त्वाचे होती असे म्हणता येईल.

**निष्कर्ष:**

१) आचार, विचार आणि संस्कार यांना भिन्न मानून एका विशिष्ट वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाजूला ठेवले होते. त्यांना अस्पृश्य असे संबोधले गेले आहे.
२) अस्पृश्यतेमुळे सामाजिक विषमता निर्माण झालेली दिसून येते.
३) अस्पृश्यता निर्मूलन हे शाहू महाराजांनी हे आपले जीवित कार्य मानले होते.
४) अस्पृश्यता निर्मूलनाकरीता शाहू महाराजांनी राजकीय सत्ता आणि कायदा यांचा वापर केला.
५) अस्पृशतेच्या मुळाशी लोकांचे अज्ञान आहे. हे जाणून शाहू महाराजांनी त्यांच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**संदर्भ:**

१) पवार जयसिंगराव (संपा.), श्री शाहूंचे चरित्र, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर,२००९,पृ. ११६.
२) तत्रैव, पृ. ११७.
३) तत्रैव, पृ. ११८.

४) हरेल केशव, राजर्षी शाहू महाराज यांचे राजकीय विचार, निर्मिती विचार मंच,कोल्हापूर, २००५, पृ. २९.
५) तत्रैव, पृ. ३०.
६) तत्रैव, पृ. ३१.
७) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: पत्रव्यवहार आणि कायदे, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, २००७, पृ. ३४.
८) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१७, पृ. ७७.
९) पवार जे. के. आणि पवार पद्मजा ज्योतिराम, राजर्षी शाहूंचे विचारधन, राज प्रकाशन, कोल्हापूर, २०२२, पृ.७३.
१०) तत्रैव, पृ. ८४.
११) तत्रैव, पृ.७६.
१२) तत्रैव, पृ. ७७.
१३) कीर धनंजय, प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७०, पृ.१७.
१४) तत्रैव, पृ.१६.
१५) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१७, पृ. ७२.
१६) तत्रैव, पृ. ७३.
१७) तत्रैव, पृ. ७५.

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

15

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचार आणि कार्याची प्रासंगिकता

**डॉ. ए. बी. बलुगडे**
सहाय्यक प्राध्यापक मानसशास्त्र विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रास्ताविक:** राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे दूरदृष्टी असणारे राजे होते. कोल्हापूर संस्थानाचा त्यांनी केलेला सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक, कृषी इ. विकास इतर छोट्या-मोठ्या संस्थानासाठीदेखील आदर्शवत ठरला. रयतेचा राजा, लोककल्याणकारी राजा, द्रष्टा राजा म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. सदैव रयतेचे कल्याण आणि हिताचा सदोदित विचार करणारा तसेच नवनवीन योजना सहृदयतेने राबवून रयतेचे हित जोपासणारा राजा म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे पहावे लागते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अवघे २८ वर्षे आयुष्य लाभले. सन १८९४ ते १९२२ या अत्यल्प कारकीर्दीत त्यांनी 'रयत' हा घटक केंद्रस्थानी ठेवून विविधांगी कार्ये आपल्या संस्थानात यशस्वीरीत्या पूर्ण केली. आज काळ पुढे सरकतो आहे. अनेक समाजसुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनंतर होऊन गेले आहेत. त्यांनीदेखील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपले सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातील महत्वपूर्ण योगदान दिले आहे. आज जवळपास १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र, असे असले तरी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी रयतेच्या सर्वांगीण विकासासाठी जे योगदान दिले आहे त्याचे महत्व आज तसूभरही कमी झालेले नाही. उलट राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचार आणि कार्याची प्रेरणा आणि आदर्श घेवून अनेक विचारवंत सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचार आणि कार्याची प्रस्तुतता आजही सामाजिक, शैक्षणिक, कृषी व अन्य क्षेत्रात स्फूर्तीदायी व प्रेरणादायी ठरत आहे.

**उद्दिष्ट्ये:** १) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक विचार आणि कार्याचा आढावा घेणे.

२) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्याची आजच्या काळातील प्रस्तुतता विशद करणे.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार:** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानातील अज्ञान, निरक्षरता आणि अंधश्रद्धा ही अनुभवली होती. त्यांच्या मनात नेहमीच समाज आणि लोकांमध्ये पसरलेली ही अंधश्रद्धेची कीड सतत टोचत होती. त्यांना सतत वाटत होते की, ही कीड समूळ नष्ट केल्याशिवाय समाजाचा विशेषत: बहुजन समाजातील लोकांचा विकास अटळ आहे आणि ही कीड नष्ट करण्याचे प्रमुख अस्त्र म्हणजे शिक्षण होय. बहुजन समाजाची शिक्षणाअभावी झालेली दुरावस्था दूर करण्याचे माध्यम म्हणजे शिक्षणच आहे हे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी वेळीच ओळखले होते. म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थानात अनेक शिक्षणविषयक क्रांतीकारक निर्णय घेतले. खामगाव (विदर्भ) येथे २७ डिसेंबर १९१७ रोजी एका भाषणात त्यांनी "शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती शक्य नाही." हे मांडलेले विचार माणसाच्या व्यक्तिगत आणि सामाजिक विकासासाठी शिक्षण किती महत्वाचे आहे हे सूचित करतात. नाशिक येथील भाषणात "रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा संपूर्ण रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळायला हवा" असे परखड मत त्यांनी मांडले होते. अज्ञानाच्या सागरात बुडून गेलेल्या देशात मुसुद्दी आणि लढवय्ये तरुण तयार होण्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करणे हा विचार त्यांनी अंगीकारला. यातूनच त्यांची शिक्षणविषयक तळमळ आणि कळकळ दिसून येते.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य:** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानात सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रसारासाठी २४ जुलै १९१७ रोजी करवीर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याबाबत फतवा काढला. याशिवाय २१ सप्टेंबर १९१७ रोजी संस्थानातील सर्व रयतेला लिहिता-वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास समर्थ व्हावे यासाठी "सक्तीच्या शिक्षणाचा कायदा" केला. या कायद्याच्याधारे योग्य वयाच्या मुलांना शाळेत पाठविण्यासंदर्भात पालकांवर सक्ती करण्यात आली. या कायद्याचे उल्लंघन केल्यास अथवा ही सक्ती मोडल्यास एक रुपया प्रत्येक महिना दंड करण्याची तरतूद देखील करण्यात आली. या उद्देशपूर्वक घेतलेल्या निर्णयाचे फलित म्हणून पुढील वर्षभराच्या काळात संस्थानात जवळपास ९६ नव्या शाळा सुरू झाल्या. नंतरच्या काळात त्यात वाढ होऊन शाळांची संख्या ४२० पर्यंत गेली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कालखंडात संस्थानामध्ये जात-पात, वंश व धर्माचा प्रचंड पगडा होता. स्पृश्य-अस्पृश्यतेची भावना प्रचंड होती. त्याकाळी स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भावनेमुळे स्पृश्य व अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा होत्या. खरतरं हीच भावना महाराजांच्या मनात सदैव बोचत होती. पण ही गोष्ट कायद्याने दूर करणे तितके शक्य नव्हते. स्पृश्य-अस्पृश्यांना समान पातळीवरील शिक्षण उपलब्ध करून देणे हा त्यांचा ध्यासच होता. यासाठी त्यांनी थोडे सौम्य धोरण अवलंबिले. अस्पृश्यांसाठी रात्र

शाळा, वसतिगृहे, सर्व प्रकारचे मोफत शिक्षण, शिष्यवृत्त्या, विद्यावेतन इ. नवनवे प्रयोग राबविले. त्यांनी अस्पृश्यांना शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून स्पृश्य-अस्पृश्यतेची दरी कमी करण्याचा प्रयत्न केला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कालखंडात संस्थानामध्ये पुरोगामी धोरण स्वीकारून स्त्री शिक्षणविषयक अनेक नवनवीन प्रयोग केले. त्यांनी संस्थानातील स्त्री शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी स्त्री शिक्षणाधिकारी (रखमाबाई केळवकर) चे पद निर्माण केले होते. स्त्री शिक्षणाच्या उन्नतीसाठी आणि मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण वाढावे यासाठी त्यांनी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना विशेष बक्षीस, इनाम ठेवले होते. काही स्त्रीयांसाठी त्यांनी मोफत राहण्याची आणि जेवणाची देखील व्यवस्था केली होती. अत्यंत हुशार आणि महत्वकांक्षी मुलींसाठी खास शिष्यवृत्त्या, मोफत शिक्षणाची व्यवस्था (राजाराम कॉलेज), वैद्यकीय शिक्षण इ. सोय त्यांनी त्याकाळी आपल्या संस्थानात केली होती. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सुरू केलेली ही शैक्षणिक चळवळ ही केवळ कोल्हापूर संस्थानापुरती मर्यादित न राहता त्यांच्या कार्याची प्रेरणा घेवून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यापर्यंत अनेक शिक्षण प्रसारकांनी संपूर्ण महाराष्ट्रभर ही चळवळ पुढे चालू ठेवली.

**शिक्षणप्रसाराचा दीपस्तंभ- वस्तीगृह निर्मिती:**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना लाभलेल्या अत्यल्प कालखंडात आपले संपूर्ण जीवन रयतेच्या विकासासाठी अर्पित केले. संस्थानातील अनेक उपेक्षित, शोषित, दीन-दुबळे, अडाणी, अशिक्षित, अंधश्रद्धाळू अशा लोकांसाठी त्यांनी शैक्षणिक प्रसार केला. या शैक्षणिक प्रसाराचा महत्वपूर्ण अभिनव प्रयोग म्हणजे वस्तीगृहांची स्थापना होय. शिक्षण घेत असताना राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था नीटपणे व्हावी म्हणून त्यांनी वस्तीगृहे स्थापन केली. याचा फायदा सर्वच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होऊ लागला. मात्र नंतरच्या काळात वस्तीगृहामध्ये निर्माण झालेले जातीय-धार्मिक तेढ आणि संघर्ष पाहून महाराजांनी सर्व जातीव धर्मीयांसाठी वस्तीगृहे सुरू केली. अशी जवळपास २३ इतकी वसतीगृहे त्यांनी आपल्या कारकीर्दीत सुरू केली.

**संस्कृत भाषेचा अभ्यास:** संस्कृत भाषा ही सर्व भाषेची जननी आहे. त्यामुळे संस्कृत भाषेचा अभ्यास सर्वांनीच करायला हवा अशी धारणा महाराजांची होती. संस्कृत भाषेच्या अध्ययन आणि अध्यापनाचा मक्ता हा केवळ कोणा एका विशिष्ट वर्गाला दिलेला नाही तर हा अधिकार सर्वांनाच आहे. हा अधिकार जनमाणसात रुजविण्यासाठी त्यांनी सत्यशोधक शक्तीची निर्मिती केली. 'जय जवान जय किसान' हा नारा अधिक प्रखर करण्यासाठी महाराजांनी संस्थानात सैनिकी शाळा सुरू केल्या.

**राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार आणि आजची प्रस्तुतता:**शिक्षण हे मानवी जीवनाच्या विकासाचे साधन आहे. शिक्षण हेच समाजाला अंध:कारातून प्रकाशाकडे नेण्याचा राजमार्ग आहे. हे महाराजांनी वेळीच ओळखले होते. म्हणूनच त्यांनी सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा पुरस्कार करून शिक्षणाचे महत्व अनेकप्रकारे अवलंबिले होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणविषयक मांडलेले विचार आणि कार्य हे १९ व्या शतकातील होते. हे विचार आजच्या २१ व्या शतकातील शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि समाज यांना नक्कीच सुयोग्य मार्गदर्शक आणि दिशा देणारे आहेत. शिक्षण हे साधन आहे; साध्य नाही. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानप्राप्ती किंवा अर्थार्जनाची साधन नाही तर जीवनाच्या सर्वच गुलामगिरीतून सुटका करून घेणे आणि आपला सर्वांगीण विकास साधणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट्य आहे. शिक्षणातून मन आणि बुद्धी यांचा समतोल विकास साधला जाने अपेक्षित आहे. आजची शिक्षण व्यवस्थेमध्ये बरेच परिवर्तन झालेले आपल्याला पहावयास मिळते. अर्थार्जन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे यावर अलीकडील शिक्षणावर अधिक भर दिसातून येतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जो ध्यास ठेवून शिक्षणाची द्वारे खुली केली होती तो विचार आजच्या शिक्षण व्यवस्थेत कुठेतरी बाजूला पडत चालला आहे असे अलीकडील अभ्यासक्रमाची रचना पाहिल्यानंतर निदर्शनास येते. सध्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० चा अवलंब अनेक विद्यापीठाने केलेला आहे. या विद्यापीठीय शिक्षणप्रक्रियेत मूल्याधारित शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, अभ्यासपूरक शिक्षण इ. वर अधिक भर दिलेला आहे. जेणेकरून समाजातील अज्ञान व अंधश्रद्धा यावर दूर करून समतोल आणि सर्वांगीण विकास साधता येईल. सामुदायिक सहभाग अभ्यासक्रम (CEP) हा अभ्यासक्रम विद्यापीठीय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. कदाचित महाराजांनी योजलेले समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही तत्वे शिक्षणातून रुजवली जावीत या धोरणाचा पुरस्कार सध्यास्थितीतील शिक्षण प्रक्रियेत दिसून येत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १०० वर्षापूर्वी जे विचार समाजमनात बिंबविण्याचा प्रयत्न केला होता ते विचार आजच्या शिक्षणप्रक्रियेत आणण्याचा प्रयत्न होत आहे.

**संदर्भ:**

१) जाधव रमेश: राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई (२०१६).
२) डॉ. आलोक जत्राटकर: राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक धोरण (२०१८)
३) डॉ. वैशाली विठ्ठल खेडकर: राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**16**

# कोल्हापूर संस्थानातील राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणांची प्रासंगिकता – एक अध्ययन

**प्रा.डॉ. मेघा संजय पाटील**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, ता. वाळवा, जि. सांगली.

---

**प्रस्तावना:** राजर्षी शाहू महाराज हे हिंदुस्थानातील सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ होते. सामाजिक न्याय, सामाजिक समता निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्यापासून प्रेरणा घेतली होती. आपल्या अधिकार सत्तेचा वापर बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी करायचा मार्ग शाहू महारांजानी स्वीकारला होता. शाहू महाराजांनी एका बाजूला महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य पुढे नेले तर दुसऱ्या बाजूला डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व उभे केले महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणून ओळख देण्याचे मोठे श्रेय शाहू महाराजांना जाते. शाहू महाराजांच्या समाजकार्यामुळेच महाराष्ट्राला पुरोगामी म्हटले गेले त्यांनी केलेल्या सुधारणा मुलगामी स्वरूपाच्या होत्या. महाराष्ट्रातील समाजसुधारकांची चर्चा करताना फुले, शाहू, आंबेडकर असा जोड उल्लेख केला जातो याचे कारण न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, आगरकर यांनी पुरस्कारलेल्या सुधारणांचे बहुतांश लक्ष्य हे उच्चवर्णीय लोक होते आणि त्या सुधारणा बऱ्याच अंशी कौटुंबिक होत्या याउलट महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या सुधारणा व्यापक आणि मुलगामी होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केलेले शैक्षणिक कार्य स्त्री मुक्तीसाठी केलेले प्रयत्न, अस्पृश्यता निवारण, सामाजिक रूढी परंपरांना दिलेले छेद, शेती विकास, मानवाधिकार कायदे, सांस्कृतिक धोरणे यामुळे प्रचलीत समाज व्यवस्थेत सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेला छेद देणारे असे त्यांचे कार्य होते. त्यांचे हे कार्य स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्राच्या जडणघडणीत फार मोलाचे ठरले. त्यांच्या पुरोगामी विचारामुळे महाराष्ट्रात सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. राजर्षी शाहू महाराज खऱ्या अर्थाने मानवतावादी लोकशाहीचे संरक्षण करणारे राज्यकर्ते होते. शाहू महाराजांनी शेतकऱ्यांसाठी व्यापक प्रमाणात कृषी धोरणे आखली त्यामुळे कोल्हापूर संस्थानात शेतीमध्ये सुधारणा घडून आल्या. सामाजिक क्षेत्रामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रीमुक्ती, अस्पृश्यता निवारण, मागासलेल्या लोकांना आरक्षण देवून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील संकीर्ण रूढी, परंपरा दूर करण्याचा प्रयत्न केला. राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक परिवर्तन हा शाहू महाराजांचा मुलभूत स्वरूपाचा विचार आहे. शाहू महाराजांचे लोककल्याणकारी धोरण आणि त्या धोरणातील समतेचा विचार यांचे अवलोकन करणे गरजेचे आहे. कोल्हापूर संस्थानामधील जनतेला शाहू महाराजांनी स्वातंत्र्य, समता, न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. बहुजन, शेतकरी, कामगार, उपेक्षित स्त्रिया, दलित इ. समाजाला विकासाच्या एका नव्या प्रवाहात आणले त्यांना हक्क आणि स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रवृत्त व संघटित केले. शाहू महाराजांच्या विकास नितीमुळे समाजाचा सर्वांगीण विकास साधला गेला. शाहू महाराजांनी समाजाला एक विचार दिला व त्या विचाराप्रमाणे कोल्हापूर संस्थानात अंमलही सुरु केला शाहू महाराजांची शैक्षणिक धोरणे, सामाजिक धोरणे राजकीय धोरणे, आर्थिक धोरणे यामुळे कोल्हापूर संस्थानात राजकीय आणि सामाजिक क्रांतीला सुरुवात झाली.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांच्या परोगामी धोरणांचा आढावा घेणे.
२. शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणांचा आढावा घेणे.
३. शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.
४. शाहू महाराजांच्या राजकीय धोरणांचा आढावा घेणे.
५. शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे.

**संशोधन अभ्यासाचे महत्व:** कोल्हापूर संस्थानासाठीचे राजर्षी शाहू महाराजांचे योगदान महत्वपूर्ण आहे. बहुजन समाजाच्या अस्मितेचे प्रतिक ठरलेल्या शाहू महाराजांचे नाव घेतल्याशिवाय समाजकारण राजकारण पुढे सरकत नाही. शाहू महाराजांच्या विचार कार्यामुळे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती मिळाली. समाजात एक नवा वर्ग अस्मितेने आणि हक्काने उभा राहिला असल्याचे आपणास दिसून येते राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्य समता न्याय हक्क या राजकीय विचारावर भर दिला होता. शाहू महाराजांनी समाजातील उपेक्षित दलित समाजाला दिशा देण्याचा आणि त्यांचे मागासलेपण नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मागासलेल्या लोकांना

लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणले. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. विधवा स्त्रीयासाठी विधवा प्रतिबंधक कायद्याचा पुरस्कार केला प्रशासनात ५० टक्के जागा मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्या प्राथमिक शिक्षण समाजासाठी मोफत केले. आंतरजातीय विवाहाचा कायदा केला या सर्व लोकोपयोगी पुरोगामी धोरणाची जाणीव वर्तमान समाजाला होणे गरजेचे आहे.

**राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य:** शाहू महाराजांच्या काळात नोकऱ्यात, सत्तास्थानात शिक्षणात ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी होती. ब्राम्हणांनी हे स्थान इंग्रजी शिक्षणाच्या जोरावर मिळवले होते. ब्राम्हणेत्तर समाजातील मुले आर्थिक अडचणीमुळे उपलब्ध शेती व्यवसायामुळे आणि परंपरागत सवयीमुळे स्वयंस्फूर्तीने शिकणे अशक्य होते. तसेच ब्राम्हणेत्तर समाजातील पालकांना शिक्षणाची गरज तितक्या तीव्रतेने जाणवत नव्हती. कारण शेती वा अन्य व्यवसायावर त्यांचे कसेबसे भागत होते.अशा परिस्थितीत बहुजन समाजातील मुलांनी शिकावे म्हणून त्यांच्यात जिद्द व इर्षा निर्माण करणे आवश्यक होते. शाहू महाराजांनी बहुजन समाजातील विदयार्थ्यांना शिक्षणासाठी उत्तेजन दिले कोल्हापूर संस्थानात 1916 मध्ये सार्वत्रिक व मोफत शिक्षण योजनेचा पाया घातला गेला व 1918-19 मध्ये तिचा खेडयापाडयात अंमल सुरु झाला. तत्पूर्वी 1912 मध्येच प्रत्येक खेडयात शाळेची व्यवस्था शाहू महाराजांनी केली. महाराष्ट्र राज्यात शिक्षण सार्वत्रिक व मोफत होण्यास 1948 साल उजाडावे लागले. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात आर्थिक दृष्टया मागासलेल्या लोकांना फी माफी व आर्थिक मदत, राहण्या जेवण्याची मोफत सोय करुन दिली. ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी शहरात वसतिगृहे स्थापन केली. मराठा, जैन, लिंगायत, मुस्लिम इत्यादी जाती जमातीच्या मुलांसाठी वसतिगृहे सुरु केली अशी वसतिगृहे जवळपास २० च्या आसपास होती. दलित वर्गाला मोफत शिक्षण मिळावे म्हणून वटहुकूम काढला अस्पृश्यांसाठी स्वत:च्या खाजगी खर्चातून दोन वसतिगृह काढली कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के नोकऱ्या ब्राम्हणेत्तर वर्गाला देण्यात याव्यात असा वटहूकूम काढला.

**सक्तीच्या शिक्षणाचा कायदा:** २१ सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा खास जाहीरनामा काढून प्रसिध्द करण्यात आला. या कायद्यान्वये शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आईबापांवर सक्ती करण्यात आली. आईबापांनी वयोमर्यादेतील मुलांना शाळेत पाठविले नाहीतर त्यांना प्रत्येकी एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद करण्यात आली. १९१७ सालचा एक रुपया म्हणजे १६ हजार ३९२ रुपये होते. शाहू महाराजांनी त्या काळात इतका मोठा दंड ठेवला आणि तो दंड न भरल्यास संपत्ती जप्त करण्याचे आदेश दिले याचे कारण शिक्षणाविना कोणीही वंचित राहू नये हे होते. वर्षभरात संस्थानामध्ये ९६ शाळा सुरु झाल्या त्याकाळात कोल्हापूर सारख्या छोटया संस्थानात शाहू महाराज शिक्षणावर एक लाख रुपये खर्च करीत होते. हा पैसा महाराजांनी संस्थानातील प्रत्येक घरावर एक रुपया अशा नाममात्र शिक्षण कराच्या रुपाने उभा केला. त्याचबरोबर सावकर, वकील, डॉक्टर अशा लोकांवर शिक्षण कर लावून त्यांच्या प्राप्तीच्या प्रमाणात वसूल केला.

**अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न:** शाहू महाराजांनी अस्पृश्यांत शिक्षणविषयक जागृती करणे आणित्यांच्या शाळांची व विदयार्थ्यांची संख्या वाढविणे या गोष्टीला प्राधान्य दिले सन १८९४ मध्ये संस्थानात अवघ्या पाच शाळा अस्पृश्यांसाठी होत्या त्यात १६८ विद्यार्थी होते १९०७-०७ साली ही संख्या अनुक्रमे १६ व ४१६ इतकी झाली. १९१२ मध्ये शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ इतकी झाली. २४ नोव्हेंबर १९११ रोजी शाहू महाराजांनी आदेश काढून संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत केले या शिवाय हुशार अस्पृश्य विद्यार्थ्यांना दरबाराकडून विशेष शिष्यवृत्ती देण्याचे धोरण स्वीकारले. २८ सप्टेंबर १९१९ रोजी आदेश काढून शाहू महाराजांनी संस्थानातील स्वतंत्र अस्पृश्य शाळा बंद केल्या व अस्पृश्य मुलांना सरकारी शाळेमध्येच इतर मुलांसमवेत दाखल करुन घ्यावे व सर्व जाती धर्माच्या मुलांस एकत्रित बसविण्यात यावे असे ठरविले.

**स्त्री शिक्षण:** शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षण विषयक अत्यंत पुरोगामी धोरण स्विकारले होते संस्थानात मुला-मुलींसाठी शाळा होत्याच पण मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या प्रौढ व मागास वर्गातील स्त्रियांसाठी १९१९ मध्ये विशेष गॅझेट हुकूम जारी करुन त्याव्दारे शिक्षणोत्सुक स्त्रियांच्या राहण्या जेवण्याची व्यवस्था दरबाराकडून मोफत केली. मुलींसाठी शिष्यवृत्तीची सोय केली.

**राज्यघटना व शिक्षणाचा अधिकार:** महात्मा फुले यांनी आरंभिलेल्या आणि राजर्षी शाहू महाराज यांनी चालविलेल्या शैक्षणिक कार्याची प्रतिपूर्ती भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून करण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमात देशातील सर्व मुलांमुलींना सक्तीच्या व मोफत शिक्षणाची तरतूद केली. त्याचप्रमाणे कलम ४६ नुसार समाजातील अनुसूचित जाती जमातीच्या शैक्षणिक सामाजिक आर्थिक विकासासाठी समान संधी देण्याची तरतूदही करून ठेवली. ८६ व्या घटना दुरुस्तीने राज्यघटनेत २१ अ या कलमाचा अंतर्भाव करण्यात आला. ज्यामुळे भारतात ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांमुलींना मोफत

E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा मुलभूत अधिकार देण्यात आला. १ एप्रिल २०१० रोजी देशात शिक्षणाचा अधिकार कायदयान्वये प्रस्थापित झाला. तथापि त्यापूर्वी सुमारे शंभर वर्षापूर्वी १९१७ मध्ये आपल्या संस्थानात सक्तीच्या व मोफत शिक्षणाविषयक कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या शाहू महाराजांचे द्रष्टेपण आणि शिक्षण या दोहोंचे महत्त्व अधिक प्रकर्षाने अधोरेखित होताना दिसते.

**राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक सुधारणा विषयक भूमिका:** चातुर्वर्ण्य समाजरचना मोडून तिथे समताप्रधान समाजरचना व लोकशाही आणि समाजवाद प्रस्थापित करुन भारताच्या विविधतेला एक राष्ट्रियत्व प्राप्त करुन देणे हे शाहू महाराजांचे अंतिम उद्दिष्टये होते आणि हे उदिष्टय प्राप्त करण्यासाठी त्यांनी सर्व पातळीवर प्रयत्न् केले. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अनेक क्रांतिकारक निर्णय घेवून सामाजिक बदल घडवून आणले. सामाजिक बदल हे धिम्या गतीने होत असले तरी ते राजाश्रय देवून स्थिर करण्याचा प्रयत्न केला. जातीनिहाय वसतिगृह आणि शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे हा त्यापैकी एक महत्त्वाचा घटक होता. सामाजिक सुधारणेबाबत त्यांचे धोरण स्पष्ट होते आणि म्हणूनच त्यांच्या कृतीला विचाराची जोड लाभली होती. सामाजिक सुधारणा करण्याचा शिक्षण हा एक मार्ग असला तरी तेवढया पुरते मर्यादित नाही याची जाणीव शाहू महाराजांना होती. शिक्षण घेतलेल्या व्यक्तिला संधी दिली तरच सुधारणा प्रत्यक्षात येतील असे महाराजांना वाटत होते. कोल्हापूर संस्थानात सुधारणा घडवून आणताना शाहू महाराज हे काळाच्या पुढे जावून विचार व कृती करणारे होते हे सहजपणे लक्षात येते.

**राखीव जागा (आरक्षण):**

- भारताची राज्यघटना १९५० साली अंमलात आली त्यात मागास जाती जमातीसाठी राखीव जागांची तरतूद केलेली आहे. भारताची राज्यघटना आणि राखीव जागांच्या या कालक्रमांच्या तुलनेत शाहू महाराजांचे कार्य ठळकपणे लक्षात येते. शाहू महाराजांनी राज्यघटना अस्तित्त्वात येण्यापूर्वी म्हणजेच २६ जुलै १९०२ रोजी आपल्या संस्थानात ५० टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या.
- विद्यापीठाची पदवी नसलेल्या बहुजन समाजातील काही वकिलांना कोल्हापूर संस्थानात वकिली करण्याच्या सनदा शाहू महाराजांनी दिल्या त्यांनी संस्थानी कारकीर्दीत आणि संस्थाने खालसा झाल्यानंतरही कोल्हापूरच्या कोर्टात वकिली केली.
- शाहू माहाराजांनी जातीभेद नाहीसे व्हावेत म्हणून केलेले कार्य प्रसिध्द आहे. कायदे करुन आणि मागासजातीला सर्वतोपरी मदत करुन शाहू महाराजांनी हे कार्य केले. गंगाराम कांबळे या महार नागरिकास हॉटेल काढून दिले. स्वत: महाराज तिथे चहा पीत असत.शिकारीस असताना धनगराच्या घरात जेवण घेत असत.
- छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच शाहू महाराजांनी मागासलेल्या जाती जमातींना व तथाकथित गुन्हेगार जमातींना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी खास व्यवहार केले. शाहू महाराजांनी फासेपारधी आणि तत्सम गुन्हेगार समजल्या गेलेल्या जमातींना जवळ केले. नोकऱ्या दिल्या त्यांच्यातून अंगरक्षक नेमले पहारेकरी नेमले. स्थावर वाहक नेमले. त्यांना जमिनी दिल्या, घरे बांधून स्थायिक केले आणि प्रतिष्ठा दिली.
- शाहू महाराजांनी स्त्रीयांना धार्मिक रुढी, परंपरा यामुळे होणाऱ्या त्रासाची दखल घेवून तो त्रास कमी करण्याच्या दृष्टिने प्रयत्न केले स्वत:च्या सुनेला उच्च् शिक्षण दिले शाहू महाराजांनी स्त्रिया आणि विवाह यासंबंधी केलेले कायदे म्हणजे त्यांच्या पुरोगामी आणि कर्त्या समाजसुधारकत्वाची खरी खूण आहे.
- धर्माच्या नावाखाली देवादिकांना मुले – मुली वाहण्याची घृणास्प्द प्रथा संस्थानात होती या प्रकारातून अनेक अनैतिक गोष्टी घडत शाहू महाराजांनी जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा केला कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास जबर शिक्षेची तरतूद केली.
- विवाहविषयक प्रचलित रुढी, आणि जुने धर्मावर आधारित व इतर कायदे यामुळे स्त्रीयांचे जीवन कष्टमय होते. शाहू महाराजांनी १९२० च्या आसपास केलेले कायदे पाहिले की त्यांचे पुरोगामित्व अधिकच उजळून दिसते शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात १२ जुलै १९१९ रोजी आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहास नोंदणी पध्दतीने मान्यता देणारा कायदा केला. आंतरजातीय विवाहास कायदेशीर मोहर उठविण्यासाठी शाहू महाराजांनी एक विवाह नोंदणी अधिकारी, नियुक्त केला होता शाहू महाराजांनी स्वत:च्या घरापासून याची सुरुवात केली. त्यानंतर जवळजवळ २५ विवाह मराठी – धनगर जातीत संपन्न झाले.

- हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विधवेस विवाह करण्याचा हक्क नव्हता. शाहू महाराजांनी १९१७ साली आपल्या संस्थानात पुर्नविवाह नोंदणीसंबंधी कायदा केला. शाहू महाराजांनी विधवा पुर्नर्विवाह कायदा कोल्हापूर संस्थानात करुन स्त्री उध्दाराच्या विकासाच्या दृष्टिने पुरोगामी पाऊल उचलले.
- संस्थानातील अनेक समाजात घटस्फोट संबंधी (काडीमोड) जात पंचायतीचे कायदे होते आणि त्याप्रमाणे व्यवहार चालत असत जात पंचायतीचे हे कायदे पुरुषांना अनुकूल व स्त्रियांना प्रतिकूल असत. शाहू महाराजांनी ११ जुलै १९१९ रोजी घटस्फोटाचा कायदा मंजूर केला. शाहू महाराजांनी घटस्फोटाचा कायदा करुन हिंदू समाजात एक क्रांतीकारक पाऊल उचलले हा कायदा भारतातील पहिला कायदा होता.
- स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची प्रखरता किती प्रचंड आहे हे शाहू महाराजांनी जाणले. घरोघरी स्त्रियांना अबला मानून तिच्यावर अन्याय अत्याचार केले जातात. शाहू महाराजांनी २९ जुलै १९१९ रोजी स्त्रियांना क्रुरपणे वागविण्यास प्रतिबंध करणारा कायदा केला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात अशा प्रकारचा कायदा २००५ साठी संसदेने मंजूर केला. 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा–२००५' परंतु शाहू महाराजांनी असा कायदा ८६ वर्षापूर्वी संमत करुन आपले पुरोगामित्व सिध्द केले.
- प्राचीन व मध्ययुगीन काळातही शेती हेच भारतीयांच्या उदरनिर्वाहाचे साधन होते. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. कोल्हापूर संस्थानामध्ये अधिकारसूत्रे हाती घेतल्यापासून ते कारकिर्दीच्या शेवटापर्यंत त्यांनी शेतीमध्ये विविध सुधारणा केल्या. संस्थानामधील नैसर्गिक व मनुष्यनिर्मित संकटांशी झगडून सतत शेतीविकासासाठी प्रयत्न् केले. शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना बियाणांच्या, खतांच्या पैशाच्या स्वरुपात मदत केली. शेतीमध्ये संशोधनाला चालना दिली. लोकांना प्रोत्सहान देण्यासाठी स्वत: दरबारातर्फे वेगवेगळया लागवडीचे प्रयोग केले. निधी उभे करुन व्यावहारिक व तात्विक संशोधनाला गती दिली. संस्थानातर्फे आदर्श शेती सुरु केली. शेतीविषयक प्रदर्शने भरविली. लोकांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली. हरितक्रांती घडवून आणण्यासाठी पाटबंधाऱ्यांच्या योजना आखल्या. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात चहा, कॉफिची लागवड प्रायोगिक तत्त्वावर केली त्याचबरोबर लोकांना रोजगार मिळावा म्हणून कोरफड, रबर ,ताग, हिरडा,जांभूळ,काजू, साग, आंबा, फणस, इत्यादींच्या लागवडीचे प्रयोग केले. शेतकऱ्यांच्या मालासाठी संस्थानात विक्री संघटना नव्हती. शाहू महाराजांनी सहकारी पतपेठया काढण्याचा मंत्र लोकांना दिला व कृतीत ही उतरवला. १९१२ मध्ये शाहू महाराजांनी सहकारी कायदा मंजूर केला व सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले त्यामुळेच अर्बन – को- ऑफरेटिव्ह नंतर बलभीम को- ऑपरेटिव्ह सोसायटी यासारख्या संस्था निघु शकल्या १९२०-२१ च्या अहवालानुसार कोल्हापूर संस्थानात ३७ सहकारी सोसायटया निर्माण झाल्या होत्या. शाहू महाराजांनी शेती व सहकाराच्या बाबतीत जी पावले उचलली त्यांच्यामुळे कोल्हापूर संस्थानचा कायापालट होण्यास मदत झाली.

**निष्कर्ष**:

- ✓ शाहू महाराजांच्या विचारकार्याच्या प्रभावाची छाप भारतीय संविधानात १५(१), १६(४),४६, १६४, २४३, ३३५,३४०,३४१,३४२ या अनुच्छेदानुसार दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या पायाभूत तरतूदीत आढळते.
- ✓ शाहू महाराजांच्या राखीव जागाच्या धोरणामुळेच भारतीय संविधानात आरक्षणाची तरतूद करुन समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत आहे.
- ✓ शाहू महाराजांनी स्वत: पासून केलेले आंतरजातीय विवाहाचे समर्थन सर्व धर्मियांसाठी केलेली वसतिगृहाची सोय सर्वधर्म समभाव निर्माण होण्यासाठी महत्त्वाची आहे.
- ✓ शाहू महाराजांनी १९१९ ला आंतरजातीय विवाहाचा कायदा केला. राज्यघटनेच्या कलम १७ मध्ये अस्पृश्यता पालन दंडनीय अपराध मानले १९५५ साली अस्पृश्यता निवारण कायदा व १९७९ ला आंतरजातीय विवाह कायदा करुन शाहू महाराजांच्या समाजोपयोगी विचारकार्याचा आदर केला आहे.
- ✓ शाहू महाराजांनी शिक्षणाची गरज ओळखून १९१७ साली सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर केला भारत सरकारने २००९ मध्ये मोफत व सक्तीचा कायदा करुन शाहू महाराजांचा शैक्षणिक विचार स्वीकारला.

**सारांश**:

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात विचारपूर्वक जाणीव पूर्वक परिवर्तन घडवून आणले होते. समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला होता.विविध सहकारी संस्थांची स्थापना केली आर्थिक,सामाजिक, सांस्कृतिक, शिक्षण, राजकीय क्षेत्रात

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

नवनवीन पायाभूत योजना कार्यान्वित केल्या. मागासलेल्या वर्गाला सर्वतोपरी उत्तेजन दिले. शाहू महाराजांचे लोकोपयोगी कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टिने अमूलाग्र व अत्यंत महत्त्वाचे होते. एवढेच नाही तर संस्थान कार्यात शाहू महाराजांनी दलितांना सहभागी करुन घेतले हा परिवर्तनवादी आणि बहुजनवादी विचार समाजापुढे येणे आवश्यक आहे. शाहू महाराजांनी जातीयता, धर्मांधता, कर्मकांड, परंपरा या विचारांना छेद देण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांच्या विचाराची आजही प्रासगिंकता आहे. शाहू महाराजांचे विचार केवळ तर्कशुध्द नव्हते तर ते कृती समर्थ होते. बहुजन समाजासाठी वसतिगृहाचे धोरण महत्वाचे आहे. महाराष्ट्रात आज समाजकल्याण विभागामार्फत वसतिगृह स्थापन केली आहेत. शाहू महाराजांचे पाणी व्यवस्थापन आणि जलसिंचन योजना आजही उपयोगी आहेत शाहू महाराजांनी उद्योगाला चालना देण्यासाठी शाहू मिलची स्थापना केली व्यापारवृध्दीला चालना दिली संस्थात शाहू महाराजांनी उत्पन्नापेक्षा खर्च कधीही वाढू दिला नाही संस्थानचे सरकारी अंदाजपत्रक संतुलित ठेवले होते. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मानवाधिकाचे संरक्षण केले. आज राज्यात मराठा आरक्षणावरून तापलेले वातावरण पाहता राजर्षी शाहू महाराजांचे विचार सत्ताधाऱ्यांपासून ते सर्वसामान्यांनाही मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरावेत असेच आहेत.

**संदर्भ:**

१. जाधव रमेश (२०१६), ‘राजर्षी शाहू गौरव ग्रंथ’, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई.
२. पवार जयसिंगराव (संपा. २००७), ‘राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ’, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर.
३. The Constitution of India (Nov. 2015) Ministry of Law and Justice Government of India.
४. मोरे गिरीष (२००९), ‘राजर्षी शाहू विचार व कार्य’, निर्मिती विचारमंच कोल्हापूर.
५. भोसले एस. एस. (१९७५), ‘राजर्षी शाहू काळ व विचार आणि कार्य’, कोल्हापूर जिल्हा परिषद.
६. कुलकर्णी मीना आणि कुलकर्णी व. शि. (१९७६), ‘श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण’, गौरी नंदन पब्लिकेशन कोल्हापूर.
७. बेलेकर आर.डी. (२००५), ‘राजर्षी शाहू सर्वांगीण शिक्षण कार्यक्रम’, यशोदा प्रकाशन गारगोटी.
८. पानसरे गोविंद (२००७), ‘राजर्षी शाहू वसा आणि वारसा’, न्यू एज प्रिटींग प्रेस मुंबई.

AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

17

# छत्रपती शाहू महाराज आणि स्त्री मुक्ती

**प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे-पाटील**
सहा.प्राध्यापिका
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय उरूण इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

---

**प्रस्तावना:** आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण ही फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांनी झाली.शाहू महाराज एक साधारण राजे होते आणि मुळात सर्वसामान्यांच्या पाठीशी होते छत्रपती शाहू महाराज राजवाड्यात जरी राहत असले तरी संपूर्णतः ते रयतेसाठीच झटत होते. शाहू महाराजांच्या काळात कोल्हापुरात स्त्रियांची सामाजिक स्थिती आणि आर्थिक स्थिती समाधानकारक नव्हती._शाहू महाराजांचे वेगळेपण म्हणजे राजा असूनही त्यांनी आपल्या राजदंडाचा वापर प्रत्येक घटकाला उन्नत करण्यासाठी केला.शाहू महाराजांच्या काळातही समाज सुधारक होते.त्यांनी ही कार्य केले, मात्र शाहू महाराजांनी केलेले कार्य हे सर्व स्तरांना स्पर्श करणारे होते.शाहू महाराजांनी दोन पातळींवर स्त्रीमुक्तीचे कार्य केले, एक म्हणजे स्त्री शिक्षित व्हावी यासाठी प्रमुख कार्य केले आणि दुसरे म्हणजे स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण व्हावे. आणि यासाठीच त्यांनी केलेले कायदे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अभ्यासले आहेत.

**उद्देश :**

1. स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक कायद्यांचे अध्ययन करणे.
2. शाहू महाराजांनी केलेले कार्य हे उत्क्रांतीच्या दिशेने केलेले कार्य आहे याचा सखोल अभ्यास करणे.
3. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न अभ्यासणे.
4. मुलींसाठी महिलांसाठी अभिनव उपक्रम राबवले याबाबतची माहिती संकलन करणे.
5. शाहू महाराजांचा स्त्री प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभ्यासणे.
6. शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी केलेल्या सामाजिक सुधारणांचे अध्ययन करणे

संशोधन पद्धती: प्रस्तुतचे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी द्वितीय तरय संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी छत्रपती शाहू महाराज यांच्यावर आधारित पुस्तके, लेख, स्त्री-साहित्य,शोधनिबंध याचा आधार घेतलेला आहे.

**छत्रपती शाहूमहाराज आणि स्त्री मुक्ती:** छत्रपती शाहू महाराज हे समाजक्रांतिकारक होते त्यांनी आपल्या राजदंडाचा वापर जनतेचा सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी केला. त्यांनी आपले छत्रपती पद, अधिकार, आपले वेगळेपण हे आपल्या समाजाला उन्नत करण्यासाठी वापरणाऱ्या शाहू महाराजांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत. त्या पैलूमधील एक पैलू म्हणजे स्त्रीवर्ग. स्त्रियांवर होणारा अन्याय अत्याचार या जाणिवेतूनच त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. स्त्रियांची गुलामी खंडित करायची असेल तर प्रथम स्त्रियांनी शिक्षित होणे गरजेचे आहे याची जाणीव महात्मा फुलेंप्रमाणे शाहू महाराजांनाही झाली आणि "स्त्री शिक्षण"हा त्यांच्या सुधारणावादी धोरणाचा एक भागच बनला. शाहू महाराजांनी त्यांच्या राजवटीत ब्राह्मणेतर वर्गाला जातीयवादातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पारंपारिक स्थिती आणि धर्माच्या विरोधात विविध कायदे केले आणि समाजातील स्त्रियांच्या सध्याच्या स्थानाला महत्त्व दिले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या विचाराशी त्यांनी स्वत:ला झोकून दिले.तरीही, त्यांना असे वाटले की शिक्षण हे ब्राह्मणेतर आणि दलितांच्या उत्क्रांतीचे आणि प्रगतीचे साधन म्हणून काम करू शकत नाही. म्हणून, त्यांनी आपल्या राजवटीत सामाजिक समता, न्याय आणि मूल्य वाढविण्यासाठी विविध कायदे केले. शाहू महाराजांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारसरणीचे ते उत्कट समर्थक होते. बहुजन समाजाच्या जीवनातील शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजले.परिणामी, त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी शैक्षणिक धोरण तयार केले आणि त्याची अंमलबजावणी सुरू केली. शाहू महाराजांच्या मतानुसार, स्त्रियांसह बहुजन समाजातील शिक्षणाच्या अभावामुळे राज्याचे नुकसान होत होते. मंदिरांवर पुजाऱ्यांचा पगडा होता, आणि शाळांना मंदिरे मानून त्यांचा अडथळा थांबवायला हवा जेणे करून खऱ्या धर्माचे ज्ञान होईल. समाजातील, म्हणजे प्रचलित जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेत स्त्रियांची स्थिती सर्वात वाईट होती. शाहू महाराजांनी परिस्थितीचे निरीक्षण केले आणि पुरुष प्रधान समाजातील स्त्रियांचे जीवन सुधारण्याचा यथार्थ विचार केला. त्यांनी महिलांच्या समस्यांचे आकलन केले आणि असा निष्कर्ष काढला की शिक्षण हे एकमेव उत्तर नाही. सध्याच्या सामाजिक जाती आणि वर्णव्यवस्थेतील स्त्रियांचे शोषण रोखण्यासाठी मजबूत आणि अंमलबजावणी करण्यायोग्य कायद्यांची आवश्यकता त्यांनी जाणली. महिला सक्षमीकरणासाठी विशेष कायदे तयार करण्याची त्यांची बांधिलकी अविश्वसनीय होती. ते आज लक्षणीय आहेत.

**शाहू महाराजांचा स्त्री प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन :-** हिंदू धर्मात भ्रष्ट प्रथा समाजात पाळल्या जात होत्या.स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार नव्हता.बालविवाह हे नेहमीचे आणि नित्याचे होते.उच्च किंवा श्रीमंत वर्गांमध्ये बहुपत्नीत्वाला परवानगी होती आणि ती आवश्यक मानली जात होती. महिलांना कोणताही व्यवसाय किंवा नोकरी उपलब्ध नव्हती उच्च जातीतील किंवा उच्चवर्गीय कुटुंबांमध्ये विधवा विवाह, विभक्त होणे आणि घटस्फोटावर बंदी होती, सामाजिक आणि नैतिक संहिता स्त्रियांबद्दल अपवादात्मक भेदभाव करणारी होती, 'पडदा' ची कुरूप प्रथा दिसून आली; अशा प्रकारे, त्याची ओळख जवळजवळ उच्च मध्ययुगीन स्थितीचे भिन्नता बनली होती. त्यात स्त्रियांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन नक्कीच होते. त्यांचे आयुष्य फक्त चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित होते. ते घर आणि कौटुंबिक जीवनात अडकले होते. शाहू महाराजांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षमीकरणासाठी धोरणे सुरू केली. शिक्षणामुळे महिलांच्या जीवनात परिवर्तन, म्हणजेच विकास घडवून आणू शकतो, याची खात्री पटली. मराठा समाजामध्ये असणाऱ्या स्त्रियांच्या(घोषा )पडदा पद्धतीचा त्यांनी निषेध केला. आणि त्यानी स्त्रियांमधील वीरत्वाच्या गुणांना प्रोत्साहन दिले. स्त्री अस्मितेचा दृष्टिकोन सर्व कक्षांना स्पर्श करणार होता. आणि या दृष्टिकोनातूनच त्यांनी स्त्री उद्धाराचा ध्वज आपल्या हाती घेतला. स्त्रियांना सर्वांगाने कसे समृद्ध करता येईल हा शाहूंचा विचार होता त्यानुसार त्यांनी कार्यही केले.

जागतिक पातळीवर जेव्हा उदारमतवादी स्त्रीवाद,मार्क्सवादी स्त्रीवाद, जहालवादी स्त्रीवाद आणि समाजवादी स्त्रीवाद अशी मांडणी केली जात होती तेव्हा शाहू महाराजांनी स्त्रीमुक्तीचे कार्य हे उदारमतवादी स्त्रीवाद यासाठी केले त्यातूनच स्त्री-स्वातंत्र्याचा, स्त्री-जागृतीचा संकल्प त्यांनी हाती घेतला. समाजातील स्त्री उतरंडीमध्ये सर्वात खालच्या वर्गात असणाऱ्या स्त्री देवदासी, जोगतीनी,मुरळी यांच्यासाठी १९२० मध्ये कायदा केला.आणि जोगतीनी ही प्रथा बंद केली. शाहू महाराजांनी केलेले कार्य स्त्री उत्क्रांतीच्या दिशेने केलेले कार्य आहे.त्यामुळे मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला.

**शाहू महाराजांनी केलेले स्त्री-मुक्तीसाठीचे कायदे :-**

**१) विधवा पुनर्विवाह कायदा** – विधवा झाल्यानंतर महिलांना पुढील आयुष्य एकाकी काढावे लागे. त्यामुळे राजश्री शाहूंनी २६ जुलै १९१७ रोजी विधवा पुनर्विवाह कायदा केला. हा विवाह विधिपूर्वक व्हावा अशी ही योजना केली गेली. आंतरजातीय,आंतरधर्मीय विवाह कायदा हा शाहू महाराजांनी १२ जुलै १९१९ ला केला.त्यांनी आपल्या संस्थांमध्ये मुलीच्या लग्नाचे वय १२ वरून १४ वर्षे केले होते.या कायद्यात एक कलम असेही होते, १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर लग्नासाठी मुलींना आपल्या पालकांची परवानगी घेण्याची गरज नाही.स्वतंत्र भारतात १९५५ ला असा कायदा करण्यात आला होता शाहू महाराजांचे कार्य दूरदृष्टीतून केलेले होते.प्रचलित सामाजिक नियमांना आव्हान देत त्यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन आणि प्रोत्साहन दिले.

**2) स्त्री शिक्षणाचा कायदा** – कोल्हापूर प्रांतातील सर्व लोकांना लिहिता-वाचता आले पाहिजे आणि त्यादृष्टीने त्यांचा विकास व्हावा यासाठी सक्तीच्या शिक्षण समितीने हा सक्तीचा शिक्षण कायदा तयार केला आहे. त्यांनी ८ सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर राज्यातील सर्वांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याच्या आदेशाला मान्यता दिली.राजश्री शाहूंनी स्त्री शिक्षणात प्रोत्साहन पर विविध क्रांतिकारी निर्णय घेतले. संस्थानात मुला-मुलीं बरोबरच मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. मागास प्रवर्गातील महिलांच्या शिक्षणासाठी १९१९ एका हुकूम गॅझेट केला. त्यानुसार अशा सर्व महिलांची निवास व जेवणाची सर्व व्यवस्था मोफत केली गेली. त्या काळात होणारे जातीभेद ओळखून जातीनिहाय मुला-मुलींसाठी शाळा सुरू केल्या मुलींच्या शिक्षणात प्रगती व्हावी म्हणून त्यांनी विविध उपक्रम राबविले.ज्यात कोल्हापूरच्या पहिल्या महिला महाविद्यालयाचा समावेश आहे. "शिक्षणाचा उद्देश केव्हा नोकरी मिळवणे हा नाही तर स्वतःसाठी आणि भावी पिढ्यांसाठी एक चांगले जग निर्माण करणे हा आहे"असा शाहुंचा निर्धार होता.

**३) स्त्री अत्याचार विरोधी शिक्षा** – महिलांचा छळ प्रतिबंधक कायदा, १९१९ महिलांवरील क्रूरता म्हणजे महिलांचा शारीरिक आणि मानसिक छळ. यात पुरुषांद्वारे अपमान, शिवीगाळ, शाब्दिक हल्ले आणि महिलांच्या चारित्र्यावर संशय घेणे हे क्रौर्याचे कृत्य आहे.यासाठी राजश्री शाहू महाराजांनी २ ऑगस्ट १९१९ रोजी करवी संस्थांना स्त्री अत्याचार विरोधी कायदा केला या कायद्यानुसार संस्थानातील महिलांना स्वसंरक्षणाचा अधिकार मिळाला. घरगुती छळ प्रतिबंध कायदा शाहू महाराजांनी केला होता हा कायदा म्हणजे स्त्री उद्धाराकडून स्त्री मुक्तीकडे जाण्याचा मार्ग होता. अशा प्रकारचा कायदा भारत सरकारने २००५ मध्ये संमत केला.

**४) घटस्फोटाचा कायदा -** स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणारा कायदा शाहू महाराजांनी केला होता. जी व्यक्ती आवडत नाही,जिच्या बरोबर राहणे अशक्य आहे अशा व्यक्तीकडून लवकरात लवकर घटस्पोट मिळवून ती स्त्री मुक्त व्हावी असा कायदा देखील शाहू महाराजांनी केला होता. जातपंचायतीकडे घटस्फोटासंदर्भातील अधिकार शाहू महाराजांनी काढून घेतले होते.

**५) महिलांचे संपत्ती हक्क :** त्यांनी महिलांना संपत्तीचे अधिकार प्रदान करण्यासाठी कायदा आणला, ज्यामुळे त्यांना मालमत्तेची मालकी आणि व्यवस्थापन करण्यास सक्षम केले.त्यांच्या नैसर्गिक वडिलांच्या मालमत्तेत आणि जुन्या प्रथा संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न केले.

**६) महिला सबलीकरण:** त्यांनी महिलांना राजकारण आणि सामाजिक कार्यासह सार्वजनिक जीवनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. १२ वर्षांहून अधिक काळ धर्माला वाहिलेल्या, जोगतीन, मुरली, देवदासी, भावीन या देव किंवा मंदिरासाठी वचनबद्ध असलेल्या मुलींच्या हक्कांचे ते संरक्षण करेल. मुलींनी जोगतिनियर देवदासी बनू नये म्हणून हा कायदा स्पष्टपणे करण्यात आला होता. तरीही, शिक्षण हे ब्राह्मणेतर आणि दलितांच्या उत्क्रांतीचे आणि प्रगतीचे साधन म्हणून काम करू शकत नाही असे त्यांचे मत होते. म्हणून, त्यांनी आपल्या राजवटीत सामाजिक समता, न्याय आणि मूल्य वाढविण्यासाठी विविध कायदे केले.

**७)महिलांच्या आरोग्याला प्रोत्साहन:** शाहू महाराजांनी आरोग्य सुविधांची स्थापना केली आणि महिलांचे आरोग्य आणि कल्याण यांना प्रोत्साहन दिले. या सुधारणांनी त्यांच्या कारकिर्दीत भारतातील महिला सक्षमीकरण आणि सामाजिक बदलामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.शाहू महाराजांच्या पुरोगामी दृष्टी आणि प्रयत्नांनी भारतातील महिलांचे हक्क आणि सामाजिक सुधारणा पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**८)देवदासी प्रथेवर बंदी:** छत्रपती शाहू महाराजांनी देवदासी प्रथेवर बंदी घातली, ज्यामुळे स्त्रियांना मंदिरातील वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जाते.

**९) आर्थिक स्वातंत्र्याद्वारे सशक्तीकरण:** छत्रपती शाहू महाराजांनीत्यांनी महिलांना आर्थिक कार्यात सहभागी होण्यासाठी, आर्थिक स्वातंत्र्याला चालना देण्यासाठी प्रोत्साहित केले.

**१०) आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह कायदा, १९१९ :-** शाहू महाराजांच्या काळात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह समाजाला मान्य नव्हता. असे लग्न करण्यास इच्छुक असलेल्या मुलीवर खूप टीका झाली. शाहू महाराजांनी पुढाकार घेऊन अशा विवाहांच्या नोंदणीला कायदेशीर परवानगी देण्यासाठी कायदा केला. अर्थात, अशा विवाहाच्या वेळी, वधूचे किमान आवश्यक वय १४ वर्षांपेक्षा जास्त आणि वराचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असावे. १२ जुलै १९१९ रोजी बालविवाहाची परंपरा असताना हा कायदा लागू झाला.

**छत्रपती शाहूनी केलेल्या स्त्रियांसाठी सामाजिक सुधारणा:** शाहू महाराजांनी बालविवाह, सती, पडदा यांसारख्या सामाजिक दुष्कृत्यांचे उच्चाटन करण्याचे काम केले.त्यांनी महिलांना पडदा पद्धत (बुरखा आणि एकांत) टाकून देण्यास प्रोत्साहित केले.तसेच त्यांनी महिलांना राजकारण, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.छ.शाहू महाराजांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले कायदे आजही प्रासंगिक आहेत.भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर वरील चर्चा केलेल्या मुद्द्यांसाठी कायदे केले यावरून महिलांच्या सक्षमीकरणाबाबत शाहू महाराज किती दूरदर्शी होते हे दर्शविते. पूर्वी ब्रिटीश राजवटीत महिला सक्षमीकरणासाठी, आजूबाजूच्या समाजातील मूलतत्त्ववादी महिलांच्या हक्कांच्या सुरक्षेच्या विरोधात होते. त्यामुळे ब्रिटीश राज्यकर्ते या कायद्यांचे समर्थन करण्यास तयार नव्हते. तथापि, शाहू महाराजांनी अनेक धाडसी पावले उचलली आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी अत्यंत दृढनिश्चय, बांधिलकी आणि धैर्याने कायदे केले. त्यांनी त्यांना मनापासून अंमलात आणले आहे, जे महिला सक्षमीकरणासाठी त्यांची वचनबद्धता दर्शवते.

**सारांश :-** स्त्रीमुक्ती हे समाज परिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे. शिक्षणाने माणूस बुद्धिमान होतो त्याचबरोबर समाज प्रबोधनाने राष्ट्र प्रगतीच्या दिशेने वाटचाल करते. छत्रपती शाहू महाराजांनी वेगवेगळ्या योजनातून स्त्री सक्षमीकरणाला पाठबळ दिले. शाहूंच्या मते स्त्री ही सबला आहे ,तिला समाजाने अबला ठरवले होते त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाला चालना देऊन छ.शाहू महाराजांनी मोलाचे कार्य केले.तिला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. समाजात तिचे स्थान उच्च आहे असा सैद्धांतिक दृष्टिकोन आहे. स्त्रीला स्वतंत्र माणूस म्हणून, एक नागरिक म्हणून, स्वतःचं मत मांडण्याचा आणि स्वाभिमानीने जगण्याचा हक्क मिळावा यासाठी छ.शाहू महाराजांनी प्रयत्न केले.

**संदर्भ:**

1. डॉ. पोवार जयसिंगराव (2007) दुसरी आवृत्ती 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर
2. कीर धनंजय. राजश्री शाहू छत्रपती : एक समाजक्रांतीकार राजा. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. 2001.
3. ए. बी, (1924). श्रीमंत छत्रपती महाराज यांचे चरित्र. बेळगाव
4. पानसरे गोविंद. (2003) राजर्षी शाहू: वसा आणि वारसा. लोकवाड:मय गृह. मुंबई.
5. फडके, य. दी. (1989). विसाव्या शतकातील महाराष्ट्र. खंड. १ आणि २
6. संजय चव्हाण AISSMS इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**18**

# राजर्षी शाहूंचे स्त्रीशिक्षण विषय कार्य

**प्रा. मनिषा पाटील**
के. बी. पी. कॉलेज उ. इस्लामपूर

---

**प्रस्तावना:** समानता, स्वातंत्र्य, लोकशाही या तीन संकल्पना मानव म्हणून जगण्यासाठी आवश्यक आहेत. जुनी मुल्यव्यवस्था नाकारायची असेल तर चिकित्सक दृष्टी ठेवून त्यातील अन्याय्य परंपरांचा निषेध करावा लागेल. वर्ग, जाती, वंश यांच्या जोडीला लिंगभेद, पुरूषी वर्चस्व ही झुगारून द्यावे लागते. प्राचीन काळापासून संपत्ती, शिक्षण, राजकारण पुरूषांच्या हाती होती. कर्तव्य, निसर्गधर्म, कौटुंबिक स्वास्थ, मातृत्व, प्रेम या नावाखाली स्त्रियाही दुय्यमत्व स्विकारात राहील्या. प्राचीन काळात गार्गी, मैत्रेयी या ब्रम्हवादीनींचा उल्लेख येतो मध्ययुगात रजिया सुलतान, नूरजहॉंन, रूकैय्या बेगम यांच्या शिक्षित असण्याचा उल्लेख येतो. संत स्त्रियांच्या अभंगांचा उल्लेख येतो. परंतू ब्रिटीशपूर्व काळात स्त्रियांच्या शिक्षणाबाबत समाज उदासीनच असल्याचे दिसून येते. दलित (शुद्र) आणि स्त्रियाना शिक्षणाचाही अधिकार नाकारलेला होता. म. फुलेनी पुणे येथे पहिली मुलींची शाळा निर्माण केली. त्यानंतर स्त्रियांची स्थिती जाणणारे लोकराजे राजर्षी शाहूचे नावच घ्यावे लागेल. त्यांनी आपल्या सुनेस उच्च शिक्षण दिले. राजाराम कॉलेजमध्ये मुलींना फी माफ केली आणि स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले.[1]

इ. स. 1894-1922 या काळात कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू होते. शाहूंच्या राज्यारोहणानंतर शाहूनी संस्थान कारभारात लक्ष घातले तेव्हा त्यानी पाहीले की इतर संस्थानांप्रमाणेच कोल्हापूरमध्येही सती, स्त्रीशिक्षणबंदी बालविवाह, विधवा विवाह बंदी, विषम विवाह, बहुपत्नीत्व, केशवपन यासारख्या अनिष्ट प्रथा समाजात रूढ होत्या. त्यापैकी सतीप्रथा, बालकन्यावध या प्रथा कोल्हापूर सह महाराष्ट्रात फारश्या रूढ नव्हत्या. बालविवाह, सक्तीचे वैधव्य, विषम विवाह, बहुपत्नीत्व या प्रथा सार्वत्रिक होत्या. या प्रथांविरूध्द शाहुराजानी कायदे केले. स्त्रीमुक्तीच्या दिशेने पावले टाकली. राजर्षी शाहुंचा अपवाद वगळता कोणत्याही भारतीय संस्थानिकानी महिला सबलीकरणासाठी फारसे प्रयत्न केल्याचे दिसत नाही. स्त्रियांसारख्या वंचित घटकाच्या उन्नतीसाठी शिक्षण गरजेचे आहे. हे शाहूंनी जाणले.

**राजर्षी शाहूंचे स्त्रीशिक्षणविषयक मत:** काशीबाई कानिटकर यांनी 'आनंदीबाई जोशी चरीत्रात' कोल्हापूर कारभारी मंडळावर दोषारोप केले. त्या म्हणतात, ''कोल्हापूर कारभारी मंडळ अगदी जुन्या मताचे व कुत्सित होते.'' तेव्हा केरळ कोकीळ मासिकात (वर्ष दहावे अंक 8) रखमाबाई केळवकर कृष्णाजी दादाजी (डॉक्टर) च्या पत्नी होत्या. राजर्षी शाहूनी त्यांची 'लेडी सुपरीटेंडेन्ट ऑफ द मेन स्कुल' म्हणून नेमणूक केली होती. कोल्हापूर शहरातील व बावडयातील शाळांच्या देखरेखीचे काम दिले होते. त्यांच्या नेमणूकीबाबत केरळ कोकीळ मध्ये लिहीले आहे. रमाबाई रानडे, भांडारकर, रावबहादूर पटवर्धन, आगरकर यांनीही स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले होते. राजर्षी शाहू कोल्हापूर संस्थानचे राजे होते. त्यानी राजाराम कॉलेजमधील मुलीना शिक्षण फी माफ केली होती.[3] शाहूंच्या स्त्रीमुक्ती स्त्रीशिक्षण, स्त्रीविकास विषयक आचरण त्यांच्या पुरोगामित्वाची साक्ष देते. राजर्षी शाहूंच्या मते स्त्री शिकली तर पुरूष, समाज कल्याणच होईल.

**राजर्षी शाहूंचे स्त्रीपुरूष समतावादी विचार:** स्त्री पुरूष दोघानाही समाजात समान स्थान असले पाहीजे असे राजर्षी शाहूंचे मत हाते. म्हणून त्यानी स्त्रीशिक्षणावरही आपले लक्ष केंद्रीत केले. त्याकाळात ब्राम्हणांचे कट्टर नेते लोकमान्य टिळक यांनीही प्राथमिक शिक्षण आणि स्त्रीशिक्षणाला विरोध दर्शविला होता. याउलट शाहू महाराजानी मात्र स्त्री शिक्षणाचे जोरदार समर्थन केले. स्त्री जर शिक्षित झाली तर कुटुंबाच्या स्वावलंबनामध्ये आणि मुलाबाळांच्या संगोपनामध्ये हातभार लागल्याशिवाय रहाणार नाही. असे मत त्यांनी सभेमध्ये व्यक्त केले होते.[4] लोकमान्य टिळकांनी संमती वयाच्या कायदयासही विरोध केला होता. तसेच बालविवाहासही समर्थन दिले होते. शाहूनी मात्र आपल्या पत्नीचे लहान वय पहाता पत्नी जाणती होईपर्यंत आपण प्रतिक्षा करू असे वचन त्यांच्या गुरूना दिले होते. आधुनिक काळात राजाराम मोहन रॉय यानी स्त्रियांच्या, वर्तमान पत्राच्या, संघटना व नागरी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. महात्मा जोतिराव फुले यानी समाजातील सर्वाना शिक्षणाचा समान हक्क मिळावा म्हणून प्रयत्न केला. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने सर्व सामाजिक, धार्मिक व राजकीय हक्क मिळायला हवेत याचा आग्रह धरला. राजर्षी शाहू महाराजानी आरक्षणाची नीती लागू करून स्त्रियांसहीत सर्व वंचीत घटकाना हक्क प्रदान करण्याचा प्रयत्न केला. शाहूनी कोल्हापूर संस्थानात तर सयाजीराव गायकवाड यानी बडोदा संस्थानात विविध कायदे करून मानवी हक्कांची प्रस्थापना केली.[5] न्या. रानडे, गोपाळ गणेश

आगरकर, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, ताराबाई शिंदे यांनीही स्त्री हक्क, स्त्री पुरूष समानता याबाबत आपले विचार मांडून वैचारिक संघर्ष केला होता.

**राजर्षी शाहू आणि मुलींसाठी शिष्यवृत्त्या:** शाहू महाराजानी मुलीच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न चालू ठेवले होते. त्यांनी मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी श्रीमंत आक्कासाहेब महाराजांच्या विवाहापित्यर्थ ''श्री राधाबाई आक्कासाहेब महाराज शिष्यवृत्ती'' व श्रीनंदकुंवर महाराणी भावनगर स्कॉलरशिप अशा शिष्यवृत्त्या सुरू केल्या. यातील ठरावात ते म्हणतात, ''कोल्हापूर शहर व इन्फंट्री बावडा यातील शाळातील वार्षिक परीक्षा इयत्ता चौथीत प्रथम येणाऱ्या दोन मुलीना वार्षिक 40 रूपये व शहर सोडून इतर इलाख्यात सर्वात योग्य आढळणाऱ्या मुलीना तसेच उत्तम वर्तन असणाऱ्या मुलीना 40 रू. शिष्यवृत्ती देण्यात येईल.[6] असे जाहीर केले. राजर्षी उदारमतवादी शिक्षणापासून तांत्रिक शिक्षणापर्यंत अस्पृश्य शिक्षणापासून मुलींच्या शिक्षणापर्यंत लक्ष देत होते. त्यामुळे करवीर संस्थानातील साक्षरता वाढण्यास मदत झाली. शिक्षणाची लालसा आणि तंत्रशिक्षणाची ओढ निर्माण झाली.

**मुलींच्या स्वतंत्र शाळा:** महात्मा फुलेंप्रमाणे राजर्षी शाहूनीही शिक्षणास महत्व दिले होते. शिक्षणाशिवाय समाज मानसिक गुलाम होतो. असे त्यांचे मत होते. शिक्षणाची सक्ती मोडणाऱ्या पालकानाही त्यानी दंड सुरू केला. शाहूराजानी मुलींसाठी अनेक ठिकाणी स्वतंत्र शाळा काढल्या. समाज शहाणा बनवायचा असेल तर स्त्रीला विसरून चालणार नव्हते. मुला-मुलींच्या एकत्रित शाळेत पास होणाऱ्या मुलींची संख्या पाहून शिक्षकाना खास बक्षिस दिले जात होते.[7] शिक्षकानी अधिक चांगले शिकवावे यासाठी त्याना मासिक वेतन, प्रशिक्षण दिले जात होते. हुशार मुलींसाठी त्यांनी 5 शिष्यवृत्त्या ठेवल्या होत्या. प्रौढ महिला व मागासवर्गीय महीला यांच्या शिक्षणासाठी महाराज विशेष काळजी घेत असत.

**इंदूमती राणीसाहेब यांचे शिक्षण:**

राजर्षींची एकूण स्त्रिविषयकदृष्टी स्त्री-पुरूषी वर्चस्वाचा जाहीर झगडा सुरू होण्यापूर्वी स्त्रियांचे शिक्षण सुरू व्हावे. असे राजर्षी ना वाटे, राजर्षी नी आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर अनेक विरोध-निषेध झुंगारून देवून त्याना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्याना शिक्षण देवून कोल्हापूरचे शिक्षणखाते इंदुमती राणीसाहेबांच्या हाती देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. परंतू त्यांच्या अकाली मृत्युमुळे ते घडले नाही.[8] सुनेला शिक्षण देण्याचे मत परीवारासमोर बोलून दाखविताच महाराजाना कुटूंबातून विरोध झाला. इंदूमती विधवा झाल्या त्यावेळी त्यांचे वय साडेअकरा होते. तेव्हा राजर्षीने त्यांचे शिक्षण राजवाडयापासून दूर सोनतळी येथे सुरू केले. त्यांच्याबरोबर चार मुली आश्रमशाळेत शिकू लागल्या. इंदूमती आणि शाहू राजे यांचे नाते हृदय आणि प्रेरक होते. शाहू राजांच्या मृत्यूनंतर इंदूमती राणीसाहेबांचे डॉक्टर बनण्याचे स्वप्न अपूरे राहीले परंतू त्या मॅट्रीक झाल्या होत्या. त्यानी गृहशास्त्र, प्राणी जगत, शिक्षणशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास भारतीय धर्मग्रंथ, इंग्रजी भाषा आणि साहीत्य याविषयी उत्तम पुस्तके संग्रहीत केली. नाटय संगिताची आवड जोपासली स्त्रीशिक्षण हे त्यांचे आवडीचे कार्यक्षेत्र राहीले. ललिताविहार यानावाने स्त्रीप्रश्नांचा विचार करणारे व्यासपीठ बनविले. अखिल भारतीय मराठा महीला परिषदेचे नाशिक येथे अधिवेशन झाले त्याचे अध्यक्षपद इंदूमतीदेवींकडे होते. 1954 मध्ये त्यानी ललिताविहार ही संस्था त्यानी स्थापन केली. आर्थिक परालंबित्व स्त्रीला नामुष्कीजनक असते. इंदूमतीदेवीनी ''महाराणी विजयमाला छत्रपती गृहीणी महाविद्यालयाची'' स्थापना कोल्हापूरात केली व मुलींसाठी औद्योगिक कलाभवनही स्थापन केले. इथे शिकणाऱ्या स्त्रियांसाठी स्वतंत्र वसतीगृहही स्थापन केले.[9] सुनेसही ती विधवा झाली असता शिक्षण देण्यासाठी राजर्षी शाहूनी प्रयत्न केले. तिच्या वैचारिक जागृतीसाठी प्रयत्न केले. त्या डॉक्टर झाल्या नाहीत परंतू शाहूच्या विचाराशी बांधील राहून समाजकारणात समाजउन्नतीकरणात त्या सामिल झाल्या.

**स्त्री शिक्षणास प्रोत्साहन:** इ. स. 1917 मध्ये 27 प्राथमिक शाळा होत्या. त्यात 1296 मुले शिकत होती. 1922 मध्ये 420 प्राथमिक शाळा होत्या. त्यात 22 हजार 7 मुले होती. त्यामध्ये मुलीही होत्या. मुलींच्या शिक्षणासाठी राजर्षी शाहूनी वेगळे निर्णय घेतले. रखमाबाई केवळकर या महिलेची महिला शिक्षणधिकारी म्हणून निवड केली. प्रशिक्षित शिक्षिका मिळाव्यात म्हणून 'फीमेल ट्रेनिंग' स्कूलची स्थापना केली. रखमाबाई केवळकर यांच्या मुलीला मुंबईत व परदेशात पाठविले (कृष्णाबाई) त्यांच्याकडे कोल्हापूरच्या हॉस्पिटलची महत्वाची जबाबदारी दिली. 11 ऑक्टोबर 1919 रोजी जाहीरनामा काढून मागासलेल्या जातीतील स्त्रियांसाठी लॉजिंग-बोर्डिंगसह सर्व व्यवस्था मोफत केली.[10] राजर्षी शाहूनी केलेले सर्वच निर्णय महिला सबलीकरणासाठी उपयोगी पडतील. शाहूंनी स्त्री शिक्षणासाठी उध्दारासाठी केलेले प्रयत्न कायदे यावरून त्यांची दूरदृष्टी स्पष्ट होते. दक्षिण महाराष्ट्रात 16 संस्थाने होती. भारतात 562 संस्थाने होती. परंतू कोणत्याही संस्थानाने राजर्षी शाहूंसारखे पुरोगामी कायदे स्त्रियांसाठी लागू केलेले नव्हते.

**शिक्षण आणि बौध्दीक गुलामगिरी:** राजर्षी शाहू दि. 27 जुलै 1920 मध्ये हुबळी येथील आपल्या समारोपाच्या भाषणात म्हणतात. ''ब्राम्हण पुढारी लोकसेवेचा आव आणून शासनाने प्राथमिक शिक्षण दिले पाहीजे असा ओरडा करीत होते. परंतू ते काम त्यांनी केले नाही. फक्त तोंडाची वाफ दवडली. आय. सी. एस ची परीक्षा हिंदूस्थानात झाली पाहीजे. अशी चळवळ सुरू केली. कमिशन नेमले परंतू ते यशस्वी झाले नाहीत. आयसीएस परिक्षेकरीता फंड उभा केला. प्राथमिक शिक्षणाकरिता फंड उभारून गावोगावी मास्तर पाठविणे अशक्य नव्हते परंतू तसे त्यानी केले नाही. अनाथ बालिकाश्रम सारख्या संस्था सर्वांच्या पैशावर उभारण्या जातात पण त्याचा फायदा ब्राम्हणाना होतो. ज्या जातीत पुनर्विवाहाची चाल नाही अशांच्या विधवा या विधवाश्रमात असतील असा नियम आहे. यात मराठयात पडदा आहे. आश्रमाचा फायदा ब्राम्हणाना मिळणार, ब्राम्हणेतरानी फक्त पैसे द्यायचे. ब्राम्हणी काव्यास फसू नका आपले शिक्षण आपले हाती घ्या आणि उन्नतीच्या मागे लागा.[11] राजर्षी शाहूना माहीत होते की उच्चभ्रू समाज सर्वसामान्य समाजास उन्नत होवू देणार नव्हता. यातून एकच पर्याय उरतो तो म्हणजे शिक्षण आणि शिक्षण सर्व वंचीत थरापर्यंत जाणे गरजेचे होते आणि या वंचित वर्गात स्त्रियाही अग्रक्रमाने येतात असे राजर्षी शाहूंचे मत होते.

राजर्षी शाहू एका विशिष्ट वासाहातिक समाजात जन्मास आले. महाराजानी सामाजिक आंतर्विरोधाना समजावून घेतले. वसाहतवादी व्यवस्थेत निर्माण झालेल्या जातीग्रस्त सरंजामशाही विचाराविरोधी कार्य केले ते एकाच विचारप्रवाहाशी बांधील नव्हते. ते सत्यशोधक समाजाचे चाहते तसेच आर्य समाजाचे अभ्यासक होते. जनतेसाठी त्यांना समाज उन्नत करायचा होता. स्त्रीला सबला बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्री तिचे शिक्षण, विवाह, प्रकृती, आणि तिला अनिष्ट प्रथांपासून मुक्तता देणे याकडे राजर्षी शाहूंनी सर्वार्थाने लक्ष दिले. स्त्री उद्धाराचे कार्य संस्थानाबरोबर बाहेर ही व्हावे असे राजर्षी शाहूंना वाटत होते. राजे स्त्री शिक्षणाबरोबरच स्त्री सन्मानही केंद्रस्थानी ठेवत होते. पूर्वी शिमग्याच्या सणादिवशी महिलांना अर्वाच्च शिव्या देण्याची प्रथा होती. लज्जा उत्पन्न होईल अशा शिव्या दिल्या जात अकारण दिल्या जात महाराजांनी ही अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी 29 जानेवारी 1921 रोजी जाहीरनामा प्रसिध्द केला. हुकुमाविरूध्द कोणीही वर्तन केल्यास त्याच्याविरूध्द कायदेशीर कार्यवाही होईल असे सांगितले.[12] महिलांची प्रतिष्ठा परत देण्याचा हा स्तुत्य प्रयत्न होता. आजही स्त्रियांना 'आई बहीणीवरून शिव्या देण्यास बंदी करण्यासाठी कायदा व्हावा यासाठी आंदोलन करावे लागते. विद्यापीठही तसे परीपत्रक काढते. महिलांना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणारे केलेले प्रयत्न राजर्षी शाहु यांचे पुरोगामीत्व त्यांनी स्त्रीशिक्षणासाठी व महीलांवरील अन्यायाविरोधातील त्यांनी केलेल्या कायदयावरून सिध्द होते.

निष्कर्ष:

1) एका वासाहातिक समाजात राजेपदाच्या मर्यादा लक्षात घेता राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीशिक्षण व स्त्रीउन्नतीचे प्रयत्न लक्षणीय होते.
2) शाहू महाराजांनी स्त्रियांना धार्मिक रूढी आणि परंपरा यामुळे होणाऱ्या त्रासाची दखल घेवून त्यांचा त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या विधवा सुनेस शिक्षण दिले स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. स्त्रिया आणि विवाह यासंबंधी कायदे केले.
3) मुलींना शिक्षण घेता यावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अनेक ठिकाणी शाळा काढल्या. प्रोत्साहन मिळावे म्हणून शिष्यवृत्ताही ठेवल्या.
4) मागासवर्गीय महीला व प्रौढ महिला यांना शिक्षण मिळावे यासाठीही राजर्षी शाहूंनी प्रयत्न केले.
5) बहुजनाचे शिक्षण, उन्नती, याकरीता शाहुंनी शिष्यवृत्त्या, मोफत शिक्षण, वसतीगृहांची सोय नवीन शाळा कॉलेजची निर्मिती यासाठी अविरत कष्ट घेतले.

संदर्भ:

१) कॉ. गोंविद पानसरे, राजर्षी शाहू वसा आणि वारसा- प्रकाशक- श्रमिक प्रतिष्ठान, 635 सी कोल्हापूर- व्दितीय आवृत्ती – ऑगस्ट - 2003 पृष्ठ क्र- 14
२) प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाळ - भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्रीजीवन कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा औरंगाबाद 431 001 – ISBN-978-93-81161-72-9- सुधारित आवृत्ती - जानेवारी 2017 पृष्ठ क्र - 248, 249
३) डॉ. विलास संगवे – राजर्षी छत्रपती शाहू महाराज - कार्ड व प्रभाव - एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस - प्रथमावृत्ती ऑक्टो- 2001-पृष्ठ क्र- 32
४) संपा. डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ प्रथमावृत्ती - 29 मे 2001 पृष्ठ क्र. 608

५) डॉ. राजशेखर सोलापूरे - मानवी हक्क आणि समाज- अरूणा प्रकाशन, लातुर - प्रथमावृत्ती 10 डिसें 2014 (मानवीहक्क दिन) ISBN- 978-93-83389-97-1 पृष्ठ क्र. 24 – 25
६) संपा. प्रा. डॉ. रमेश जाधव – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ – सुधारीत तिसरी समिती – मंत्रालय, मुंबई – 400 021 – पृष्ठ क्र. 86
७) पूर्वोक्त - पृष्ठ क्र. 85
८) पूर्वोक्त - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – संपा. डॉ. जयसिंगराव पवार - पृष्ठ क्र. 618
९) पूर्वोक्त – पृष्ठ क्र. 619, 620, 621
१०) पूर्वोक्त – प्राचार्य गाठाळ – भारतीय इतिहासातील स्त्रिया पृष्ठ क्र. 251
११) संपा. गायकवाड प्रदीप – राजर्षी शाहूंची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे – क्षितिज पब्लिकेशन्स नागपूर – पाचवी आवृत्ती – 1 जाने. 2011 – पृष्ठ क्र. 108 – 109.
१२) पूर्वोक्त – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ – डॉ. रमेश जाधव – पृष्ठ क्र. 825.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**19**

# छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक व ओद्योगिक कार्याचा अभ्यास

**प्रा. डॉ. सौ. एन. डी. काशिद पाटील**
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना -**भारत हा खंडप्राय देश आहे. बहुवंशी, बहुधर्मी, बहुभाषी, बहुरंगी असा हा विविधतेने नटलेला पण सांस्कृतिक एकता असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण देश आहे. प्राचीन काळापासूनच उज्वल ऐतिहासिक परंपरा भारताला लाभलेली आहे. येथे देशांतर्गत अनेक छोटी-मोठे राज्य होती. या राज्यांना संस्थाने व राजांना संस्थानिक या संज्ञा दिल्या गेल्या. भारताचा एक तृतीयांश पेक्षा अधिक भूभाग या संस्थानिकांच्या अंमलाखाली होता. जगाच्या लोकसंख्येच्या एकपंचमांश लोकसंख्या भारतात होती. तेव्हा भारताच्या एकूण लोकसंख्येच्या एक तृतीयांश हून अधिक लोकसंख्या या संस्थानात होती. १९०१ साली ६ कोटी ८० लाख लोकसंख्या या विविध संस्थानात राहत होती. संस्थांने निरनिराळ्या आकाराची असून वैशिष्ट्यपूर्ण तसेच वेगवेगळ्या महत्त्वाची होती. उदा. निजामांचे संस्थान हैदराबाद, ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा इ. संस्थांने होती. दक्षिण भारतात त्या मानाने, कर्तुत्वाने व पुरोगामी विचाराने अग्रेसर असलेले छत्रपतींचे कोल्हापूर राज्य होते. याच कोल्हापूर संस्थानामध्ये जे छत्रपती होऊन गेले. त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे लोककल्याणकारी राजा म्हणून ओळखले जातात.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे शिवरायांचे वंशज होते. शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. शाहू छत्रपतींनी २ एप्रिल १८९४ पासून ते ६ मे १९२२ पर्यंत एकूण २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू महाराजांचा कालखंड हा विविध क्षेत्रांच्या बाबतीत भरभराटीचा कालखंड होता. त्यांच्या कारकीर्दीत शेती, उद्योग, व्यापार व बाजारपेठा, सहकारी चळवळींचा विकास, दळणवळण क्षेत्रातील सुधारणा, शहरांचा विकास इत्यादी बाबतीत संस्थानाने उल्लेखनीय कामगिरी केली. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात व संस्थानाबाहेर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय चळवळी केल्या. अस्पृश्यता निवारण, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वसतीगृहांची अभूतपूर्ण योजना, धरणे बांधून हरितक्रांतीच्या दिशेने केलेली वाटचाल, मल्लविद्धेला दिलेले उत्तेजन, ललित कला व कलावंतांना दिलेला आश्रय, राजकारभारात कामगारांना प्रतिनिधित्व इत्यादी विविध क्षेत्रातील महाराजांचे कार्य उल्लेखनीय आहे.

ब्रिटिश सरकारच्या नियंत्रणाखाली एक संस्थानिक या नात्याने महाराजांच्या कार्यावर व कर्तुत्वावर काही मर्यादा पडलेल्या होत्या. परंतु या सर्व मर्यादा मोठ्या खुबीने कौशल्याने आणि मुसिद्धगिरीने त्यांनी बाजूला सारल्या व हा राजा जनसामान्यांचे, गोरगरिबांचे, दिनदुबळ्यांचे, रंजले गाजलेल्यांचे कल्याण करण्यासाठी सदासर्वकाळ झटत होता.

**अभ्यास श्रेत्र -**कोल्हापूर संस्थान हे ब्रिटिश भारतातील मुंबई प्रेसिडेन्सीच्या डेक्कन स्टेटस एजन्सी अंतर्गत भारतातील मराठा संस्थान होते. कोल्हापूर संस्थांनचा कालखंड इ.स. १७११ ते इ.स.१९४९ इतका होता. दक्षिण महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध संस्थान म्हणून कोल्हापूर संस्थांन ओळखले जाते. पूर्व व पश्चिम सीमेवर बेळगाव जिल्हा (कर्नाटक राज्य) नैऋत्य व पश्चिम दिशांना गोवा व रत्नागिरी जिल्हा, उत्तर व पूर्व बाजूस सांगली जिल्हा अशा पूर्वीच्या कोल्हापूर राज्यांच्या सीमा महाराष्ट्र राज्यातील आधुनिक काळातील कोल्हापूर जिल्ह्याशी अगदी मिळत्या जुळत्या आहेत. भारत स्वातंत्र्य झाल्यावर कोल्हापूरचे महाराजा छत्रपती शहाजी (द्वितीय) यांनी हे संस्थान भारतात विलीन केले. कोल्हापूर राज्य त्यांच्या जहागीर किंवा सरंजामदार वासल इस्टेट इचलकरंजीसह ३१६५ चौरसमैल (८२०० km) क्षेत्र व्यापलेले आहे. १९०१ च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या ९१००११ इतकी होती. त्यापैकी कोल्हापूर शहरात ५४३५३ लोक राहत होते.

**उद्देश** -छत्रपती शाहू महाराजांच्या आर्थिक व ओद्योगिक कार्याचा आढावा घेणे.

**अध्ययन पद्धती-**प्रस्तुत लेखासाठी दुय्यम साहित्याचा आधार घेतला असून दुय्यम माहितीमध्ये संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमान पत्रातील लेख, मासिके, इंटरनेटवरील माहिती इ. चा आधार घेतलेला आहे. वरील उद्देश डोळ्यासमोर ठेऊन सामग्री संकलन केले आहे.

**विषय विवेचन-** शाहू महाराजांनी आर्थिक विकासातील औद्योगिकीकरणाचे महत्त्व ओळखले होते. त्याचप्रमाणे भांडवली किंवा सरकारी मक्तेदारीच्या दुष्परिणामांचीही त्यांना जाणीव झालेली होती. त्यामुळे त्यांनी खाजगी क्षेत्रातील लघुउद्योग त्याचप्रमाणे संयुक्त क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावरील आणि सहकारी क्षेत्रातील उद्योगांना आर्थिक सहाय्य आणि वित्तीय प्रोत्साहन देऊन चालना देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळच्या ब्रिटिश सरकारचे धोरण याबाबतीत उदासीनतेचे व नकारात्मक होते. सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण

होऊ नये म्हणून शाहू महाराजांनी कारखान्याचे केंद्रीकरण होऊ दिले नाही. त्याचबरोबर संयुक्त क्षेत्रातील उद्योगात अकार्यक्षमता आढळून आल्यास त्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थांनाचा कारभार हाती घेतला त्यावेळी प्रजननातील साक्षरतेचे प्रमाण, संस्थानातील रस्ते, पाणीपुरवठ्याच्या योजना, शेतीला लागणाऱ्या पायाभूत सुविधा, शेती पद्धती, आधुनिक यांत्रिक उत्पादन, व्यापार व वाणिज्य या सर्व बाबतीत करवीर संस्थांनची अर्थव्यवस्था अविकसित होती. तेव्हा संस्थांनमधील उद्योगधंद्याचीही स्थिती फारशी चांगली नव्हती. १८९४ पर्यंत कोल्हापूर संस्थानातील उद्योगधंद्यात तेल काढणे, चामड्याचे उद्योग, कागद निर्मिती, सोनार काम, सुतार काम, बांगड्या तयार करणे, वस्त्रोद्योग, लोकरी पासून कांबळी बनवणे, दोर वळणे, तांदूळ सडणे इत्यादी पारंपरिक उद्योग अस्तित्वात होते. तत्कालीन कोल्हापूर संस्थानातील प्रदेश प्रामुख्याने कृषी प्रधान होता आणि औद्योगिक प्रगती फारशी झालेली नव्हती. हे चित्र बदलण्यासाठी छ. शाहू महाराजांनी राज्यकारभारची सूत्रे हातात घेताच संस्थांनाच्या औद्योगिक विकासासाठी पूरक अशी धोरणे आखली. लघु आणि विकेंद्रीत उद्योगांचे धोरण अमलात आणून येथे कृषी औद्योगिक समाजाची पायाभरणी करण्याचे ध्येय शाहू महाराजांनी बाळगले होते. औद्योगिक विकासातून रोजगार वाढीसह उत्पन्नात वाढ होऊन संतुलित विकास साधण्याचा शाहू महाराजांचा प्रयत्न होता. १८९५ ते १९०७ मध्ये कोल्हापूरचे औद्योगिक सर्वेक्षण करण्यात आले व त्यानुसार कोल्हापूर संस्थांनाच्या परिस्थितीला उपयुक्त अशा लघु व विकेंद्रीत उद्योगांचे धोरण अवलंबले गेले. छत्रपती शाहू महाराजांनी विकेंद्रीत उद्योगधंद्याची दृष्टी लक्षणीय होती. त्याचबरोबर उद्योगधंद्यासाठी आवश्यक लागणाऱ्या तंत्र कौशल्याचे शिक्षण देण्यासाठी ‘जयसिंगराव घाटगे टेक्निकल स्कूल’ आणि ‘राजाराम इंडस्ट्रियल स्कूल’ या दोन तांत्रिक शिक्षण केंद्रांची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे औद्योगिक शिक्षणाला चालना मिळाली. कोल्हापुरातील औद्योगिक संग्रहालयालासुद्धा नवचेतना दिली.

शाहू महाराजांनी कृषी व उद्योग हे एकमेकांवर अवलंबून असल्याचे ओळखले. त्यासाठी लोकांना कृषी व औद्योगिक उत्पादने तसेच आधुनिक अवजारे, तंत्रज्ञान याची माहिती मिळवण्यासाठी १९१४ मध्ये खासबाग मैदानावर भव्य औद्योगिक व कृषी प्रदर्शन छ. शाहू महाराजांनी भरवले होते. त्यात जनावरांचा विभाग, कृषी विभाग व कला आणि औद्योगिक विभाग करण्यात आले. जवळपास ३०००० लोकांनी या प्रदर्शनाला भेट दिली होती. औद्योगिक प्रदर्शन भरवल्याने लोकांना औद्योगिक ज्ञान मिळण्याबरोबरच औद्योगिक उत्पादनांना राज्यात व राज्यात बाहेर बाजारपेठ उपलब्ध झाली.

उद्योगाच्या विकासासाठी प्रयत्न करताना शाहू महाराजांनी स्थानिक आणि देशांतर्गत उद्योगाच्या विकासावर लक्ष केंद्रित केले. त्यामध्ये कागद कारखाना, फाउंड्री (धातू ओतण्याचा कारखाना), ग्राइंडिंग मिल, लोह उद्योग, शाई कारखाना, घोड्यासाठी खोगीर बनवणाऱ्या जिनगरांचा व्यवसाय इत्यादींचाही समावेश आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १८९४ ते १९२२ या कालखंडात कोल्हापूर संस्थांनचा कारभार पाहताना समाज कल्याण व आर्थिक विकास घडवून आणण्याकरता पुरोगामी आर्थिक धोरणे आखली. त्यात शासकीय आर्थिक धोरणांमध्ये अंदाजपत्रकीय तरतुदी, व्यापारी चलन विषयक धोरणे आणि प्रत्यक्ष नियंत्रणे यांचा समावेश होतो. जुन्या कोल्हापूर संस्थानात मध्यवर्ती बँक किंवा रियासतीचे स्वतःचे चलन अस्तित्वात नव्हते. वित्तीय व्यवहार इंपिरियल बँक ऑफ इंडिया व इंग्रज सरकारच्या भारतीय चलनाद्वारे होत असत. करवीर संस्थांनचे परप्रांताशी व्यापारी संबंध मर्यादित व जुजबी स्वरूपाचे होते. त्यामुळे प्रथम छ. शाहू महाराजांनी या धोरणाची पुरोगामी आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे ठरवून त्यांचा पाठपुरावा केला. शाहू महाराजांनी कमी उत्पन्न असलेल्या लोकांच्या उन्नतीसाठी आर्थिक सुधारणावरही लक्ष केंद्रित केले. त्यांनी जमीन सुधारणा सुरू केल्या आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मदत करण्यासाठी सहकारी चळवळीवर काम केले. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी कुटीर उद्योगांनाही चालना दिली. ग्रामीण भागातील दारिद्रय आणि शेतीतील स्थितिशीलत्व यांविरुद्ध त्यांनी अनेक बाजूंनी हल्ला चढविला. याउलट इंग्रज राजवटीखालील भारतीय प्रदेशात शेती सुधारणेसंबंधीचे कसलेही धोरण अस्तित्वात नव्हते. छ. शाहू महाराजांनी संस्थानाच्या रेल्वेचा उपयोग सामाजिक आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आणि समाजकल्याण अधिक प्रमाणात साध्य होण्यासाठी केला .

“शाहू स्पिनिंग अँड विव्हींग मिल” हा छ. शाहू महाराजांच्या कारकिर्दित कोल्हापूर संस्थानातील कापड मिलचा सर्वात मोठा प्रकल्प होय. १९०५-०६ मध्ये स्थापन झालेली शाहू मिल ही कोल्हापूर संस्थानातील औद्योगिक विकासाची सुरूवात मानली जाते.१९२० साली शाहू महाराजांनी सार्वजनिक क्षेत्रात स्थापन केलेला "वूड डिस्टिलेशन फॅक्टरी" हा आणखी एक उद्योग आहे. या वूड डेस्टिलेशन इंडस्ट्रीजच्या (काष्टार्क) उद्योगातून प्राप्त होणाऱ्या लोणारी कोळसा, व्हिनेगर व डांबर या पदार्थांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत बरीच मागणी असल्याने शाहू महाराजांनी या उद्योगाला प्रोत्साहन दिले.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

१९०५ साली शिरोळ येथे जिनिंग अँड प्रेसिंग मिल आणि १९०९ साली गडहिंग्लज येथील जिनिंग फॅक्टरी हे उद्योगही संयुक्त क्षेत्रात स्थापन केले. कोल्हापूर संस्थानातील जिनिंग मिलची संख्या सातपर्यंत नंतर वाढली. राज्यातील कापूस उत्पादनावर हा उद्योग अवलंबून होता. शाहू महाराजांनी स्थानिक विणकाम उद्योगाच्या भरभराटीसाठी स्थापन झालेल्या सहकारी उत्पादक संस्थामध्ये रायबागच्या श्री शाहू विव्हर्स असोसिएशन व श्री राजाराम विव्हर्स असोसिएशनचा समावेश होतो. श्री शाहू विव्हर्स असोसिएशन मधील धोती, रुमाल, खण, साडी इत्यादी मालाला कोल्हापूर संस्थानाच्या व्यतिरिक्त बाहेरील बाजारपेठातून देखील पुरेशी मागणी होती. इ.स.१९०७ च्या दरम्यान रायबाग येथे छत्रपती शाहू महाराजांच्या देखरेखीखाली शाहू यंत्रमाग कारखाना सुरू झाला शाहू महाराजांच्या मदतीने खाजगी क्षेत्रात स्थापन करण्यात आलेल्या लघुउद्योगांची संख्या बरीच मोठी आहे. शिरगावकर ऑइल मिल, भुईमुगाचे कारखाने, इतर जिनिंग फॅक्टरीज्, साखर कारखाना, युवराज महाराज ऑइल मिल आणि इंडियन सायकल अँड मोटर कंपनी लिमिटेड हे त्यापैकी प्रमुख लघुउद्योग आहेत.

छत्रपती शाहू महाराजांनी वनसंपत्तीवर आधारित विविध उद्योग प्रयोगात्मक सुरू केले. कोल्हापूर संस्थांनाच्या वनविभागाच्या देखरेखीखाली रेशीम उद्योग सुरू करण्यात आला. काही वनौषधी व काष्टार्क तेलापासून निर्माण झालेले सुगंधी औषधी तेल उद्योग, निलगिरी झाडाच्या पानापासून तेल निर्मिती तसेच सूर्यफूल, भुईमूग, अंबाडी, नारळ, मोहरीचे बी इत्यादी पासूनच्या उत्पादित तेलाला सर्वत्र मागणी असल्याने या उद्योगाला शाहू महाराजांनी संरक्षण देऊन त्यांच्या भरभराटीसाठी प्रयत्न केले. उसापासून तयार होणाऱ्या गुळाची बाजारपेठ सुद्धा निर्माण केली. कोल्हापुरात मधुमक्षिका पालन उद्योग याच पद्धतीने शाहू महाराजांनी पूर्णपणे विकसित केला. सार्वजनिक, संयुक्त, सहकारी आणि खासगी क्षेत्रातील उद्योगाचे सहअस्तित्व आणि ते सुरू करण्याच्या आणि त्यांचे नियंत्रण करण्याच्या कामी सरकारने बजावलेली कामगिरी हे शाहू महाराजांनी विकसित केलेल्या संमिश्र अथवा स्वतंत्र समाजवादी अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. अशा विविध औद्योगिक प्रकल्प, शाहुपुरी, जयसिंगपूर आणि गडहिंग्लज येथे सुरू करण्यात आलेली प्रमुख विपणन केंद्रे आणि जे. जी. टेक्निकल इन्स्टियूटमधून दिले जाणारे तांत्रिक शिक्षण यामुळेच भावी काळात साखर कारखाने, तेलाच्या गिरण्या, लोखंडाचे आणि पोलादाचे कारखाने, ऑईल इंजिन्स, इलेक्ट्रिकल मोटारी, यांत्रिक कारखाने आणि ऑईल इंजिन्स व मोटारी यांना लागणारे सुटे भाग बनविणा या अनेक ओतशाळा यांसारखे विविध उद्योगधंदे भरभराटीस येऊ शकले कोल्हापूर संस्थांनाच्या महसुलामध्ये वतन चिठ्ठया, इम्पिरियल बँक आणि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव बँक यातील ठेवी यापासून बरीच मोठी भर पडत असे. मध्यवर्ती बँक अस्तित्वात नसल्यामुळे करवीरच्या विकसनशील अर्थव्यवस्थेला भासणारी रोकड सुलभतेची गरज ही त्यामुळे भागत असे.

सर्वकष दुष्काळ असताना ब्रिटिश हिंदुस्थानातील दुष्काळ निवारणाच्या कार्यक्रमापेक्षा छ. शाहू महाराजांनी केलेले दुष्काळ निवारक कार्य हे सुनियोजित, कल्पक, उत्पादक आणि त्याहीपेक्षा मानवतावादी होते. त्यामुळे दुष्काळ पीडीतांच्या हालअपेष्ठांना आळा बसला तसेच करवीर अर्थव्यवस्थेतील भांडवल निर्मितीस हातभार लागण्या बरोबरच दुष्काळ निवारणाची कामे आणि विकासाच्या योजना यात संपूर्ण सुसूत्रता आली. या धोरणाचा दूरगामी परिणाम असा दिसून आला की कोल्हापूर जिल्हा हा जवळजवळ संपूर्णपणे दुष्काळमुक्त झाला आणि महाराष्ट्र राज्यातील अत्यंत विकसित अशा विभागात त्याची गणना होऊ लागली.

शाहू महाराज निरनिराळे कर, कर विरहित चालू महसुलाच्या बाबी, सार्वजनिक कर्जे आणि ठेवी आणि याचबरोबर रोखीतील संचित शिल्लक यामधून आपला वाढता खर्च भागवत. तसेच जकात आणि कंपिटेशन करांपासून मिळणाऱ्या महसूलाचा वापर त्यांनी ग्रामीण भागातील रस्ते, शहरातील मंडई आणि बाजारपेठा यांच्या निर्मितीसाठी केला.

व्यवसाय आणि उद्योग यांमधून महसूलाची साधने निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. रेल्वे, जंगल, अबकारी, निर्मिती-उद्योग यांतील उत्पन्नात वाढ झाली तर कर विरहित चालू महसूल शुल्कापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणात मोठी घट झाली. त्यामुळे शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य व सार्वजनिक सेवा मोफत अथवा अनुदानित तत्त्वाने पुरवण्यात आल्या.

**निष्कर्ष-** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा कालखंड हा कोल्हापूर संस्थांनाच्या इतिहासातील भरभराटीचा कालखंड ठरला. या काळात येथे आधुनिक उद्योगाची सुरुवात झाली. तसेच मोठ्या प्रमाणात विविध उद्योग व आधुनिक लघुउद्योग स्थापन करण्यात आले. छ. शाहू महाराजांच्या प्रोत्साहनामुळे व सहकार्यामुळे अनेक लघु व कुटीर उद्योगांचा विकास झाला. अनेक औद्योगिक पायाभूत सुविधा तसेच आर्थिक बाबतीत राज्याच्या सहकार्यामुळे विविध आधुनिक उद्योगधंदे कोल्हापूर संस्थानात सुरू झाले.छ. शाहू महाराजांचे आर्थिक धोरण आणि त्यासाठीचे मार्ग हे आर्थिक विकास , सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांत किफायतशीर रोजगार, शेतकरी, कारखानदार आणि गरिब कारागिरांच्या उत्पन्नात वाढ, गरिब व श्रीमंत यांच्यातील संपत्ती आणि उत्पन्न यांच्यातील विषमतेला आळा घालणे, पश्चिम महाराष्ट्रात सामाजिक- सांस्कृतिक क्रांतीचा स्फुल्लिंग प्रज्वलित करणे त्यांना शक्य

झाले. त्यांनी स्वतंत्र समाजवादी अर्थव्यवस्था उभी केली. आधुनिक विकसनशील अर्थव्यवस्थेचा प्रणेता आणि समाजवादी मुत्सद्दी राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने आपणांस दिसतात. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्य जगतात नवीन अर्थशास्त्रीय विचारांचा उगम होण्यापूर्वीच ते विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणारा तत्कालीन संस्थानिकांचा मेरूमणी म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे स्थान अबाधित आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. कुलकर्णी एम., कुलकर्णी ब.शि.-१९७५ 'श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण' गौरी नंदन प्रकाशन, कोल्हापूर,.
2. जाधव आर.-२०१२, 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ ', उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
3. जाधव आर. -२००१, 'लोकराजा छत्रपती शाहू ', सुरेश एजन्सी, पुणे.
4. पवार ज.-२००८, 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ ', कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
5. पाटील अ.-२०२४, 'राजर्षी शाहू छत्रपती विचार वेद', डायमंड पब्लिकेशन, पुणे.
6. मचाले डी.-२०२४, 'छ. शाहू महाराजांचे औद्योगिक धोरण आणि भूमिका' 'राजर्षी शाहू छत्रपती विचार वेद', डायमंड पब्लिकेशन, पुणे.
7. सूर्यवंशी कृ.गो.-१९९२, 'वादळ आणि राजश्री शाहू' कल्पक मुद्रण,
8. https://en.wikipedia.org/wiki/Shahu_of_Kolhapur
9. https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner
10. https://www.bbc.com/marathi/articles/cye78l9jj52o
11. https://www.culturalindia.net/reformers/shahu-chhatrapati.html
12. https://www.shahumaharaj.com/home.html
13. https://www.shaleyshikshan.in/2023/05/Biography-of-Rajarshi-Shahu-Maharaj.html
14. Kolhapur State https://en.wikipedia.org/

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

20

# शाहू महाराजांचे मानव संसाधन विकास धोरण

विक्रम दीपक रेपे

---

**प्रास्ताविक:** एकविसाव्या शतकामध्ये जगात व्यवस्थापन शास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. व्यवस्थापन शास्त्राच्या मूलभूत तत्त्वांमध्ये मनुष्यबळ विकास व्यवस्थापन हा एक महत्त्वाचा भाग आहे. कार्पोरेट कल्चर मध्ये आज त्या ठिकाणी असणारे अधिकारी आणि कर्मचारी यांना Liability नाही तर Assets म्हणून consider केलं जातं, याचाच अर्थ आज Human Capital या संकल्पनेला नक्कीच महत्त्व प्राप्त झाले आहे. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कृतीतून अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करत असताना निश्चितच आपल्याला व्यवस्थापन शास्त्रातील अनेक मूलभूत अंग पहावयास मिळतील जे आजही एकविसाव्या शतकात अनुकरणीय आहेत यामधीलच एक महत्त्वाचा पैलू म्हणजे शाहू महाराजांचे मानव संसाधन विकास (Humam Resource Management) राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये करवीर संस्थानात राज्यकारभार शिस्तबद्ध आणि उत्तम पद्धतीने चालण्यासाठी विविध नियमावली घालून दिलेल्या होत्या. या सर्व नियमावली राजर्षी शाहू महाराजांच्या सहीनिशी आज ठराव बुकात अस्सल स्वरूपात आपल्याला पहावयास मिळतात. तत्कालीन परिस्थितीमध्ये शाहू महाराजांनी विविध जातीधर्मातील व्यक्तींना राज्यकारभारात सामील करून घेतले होते. याचाच अर्थ आजच्या कार्पोरेट कल्चरमध्ये काही ठिकाणी जो भेदभाव (Discrimination ) असल्याच्या तक्रारी आपल्याला दिसतात याला राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानांमध्ये आपल्या कृतीतून बगल देण्याचा प्रयत्न केला होता प्रत्येक व्यक्तीमध्ये काम करण्याची विशिष्ट क्षमता असते. त्या क्षमतेची पारख करून त्याचा योग्य पद्धतीने कार्य पूर्ततेसाठी उपयोग करणे यामध्ये खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू महाराजांचे नेतृत्व गुण आपल्याला दिसतात. यालाच एचआर व्यवस्थापन शास्त्रामध्ये Right person at Right place and Time असे म्हणतात. याचे एक मूर्तीमंत उदाहरण म्हणजे राजर्षी शाहू महाराजांनी आपले बंधू पिराजीराव उर्फ बापूसाहेब घाटगे यांना आपल्या निर्णय प्रक्रियेमध्ये बऱ्याच ठिकाणी सहभागी करून घेतल्याचे आढळते. अगदी शाहू महाराजांनी ज्याला आपले महत्तम जीवित कार्य मानले ते म्हणजे राधानगरी धरण , खासबाग कुस्ती मैदान, पॅलेस थिएटर म्हणजेच सध्याचे केशवराव भोसले नाट्यगृह या ठिकाणी बापूसाहेब घाटगे यांनी अतिशय उत्तमपणे धुरा सांभाळल्याचे आपल्याला आढळते. यामागे निश्चितच राजर्षी शाहू महाराज यांची प्रेरणा होती. संस्थानच्याकोल्हापूर शहरामध्ये जे शिस्तबध्द टाउन प्लॅनिंग झालं यामध्ये लक्ष्मीपुरी, शाहूपुरी आणि राजारामपुरी याचा अंतर्भाव आहे. शाहूपुत्र राजाराम महाराज यांनी आपले वडील राजर्षी शाहू महाराजांकडून खऱ्या अर्थाने प्रेरणा घेऊन त्यांच्या बऱ्याच अपूर्ण असणाऱ्या संकल्पना पूर्ण केल्या.

तत्कालीन राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता राजर्षी शाहू महाराजांनी खंडेराव ऊर्फ बाळासाहेब गायकवाड, रावबहादूर भास्करराव जाधव, रावबहादूर दाजीराव विचारे, दिवाणबहादूर सर रघुनाथराव सबनीस, आण्णासाहेब लठ्ठे, खंडेराव बागल, युसफ अब्दुल्ला, रावसाहेब डी. आर. भोसले, डॉ. पी. सी. पाटील, दत्तोबा पोवार, गंगाराम कांबळे, बाबुराव यादव, सत्यशोधक नानासाहेब मुळीक, वासुदेव दत्तात्रय तोफखाने,दत्तोबा दळवी, संगीतसूर्य केशवराव भोसले, गोविंदराव टेंबे, शंकरराव सरनाईक, बालगंधर्व, शाहीर लहरी हैदर, कलामहर्षी बाबुराव पेंटर, सरदार बाळासाहेब यादव, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,अशा अनेक विद्वान लोकांमधील कौशल्य जाणून घेऊन त्यांना वेळोवेळी सर्व प्रकारे प्रोत्साहन देऊन त्यांच्या कौशल्याचा कोल्हापूर संस्थानच्या सर्वांगीण विकासात योग्यप्रकारे वापर करून घेतला.म्हणजेच एखादा लीडर म्हणजेच नेता ज्यावेळी आपल्या सोबत शरीराने नसतो तेव्हा त्याच्या विचारांचा पगडा जो आहे तो निश्चितच पुढील कार्याला प्रेरणा देत असतो. त्याच वैचारिक वारशाला आजही एकविसाव्या शतकात अनन्यसाधारण महत्व आहे.

**उद्दिष्ट्ये:**

1. राजर्षी शाहू महाराजांच्या आदर्शवत व्यक्तिमत्वाचा अभ्यास व्यवस्थापन शास्त्राच्या (Management) दृष्टिकोनातून करणे व त्याचे विविध पैलू चरित्रातून वर्गवारी करणे.
2. मानवी संसाधन व मनुष्यबळ विकास (Human Resource Management) या व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या वैशिष्ट्यांमधून राजर्षी शाहू महाराजांचे कार्य आणि त्याचे 21व्या शतकातही अवलोकन अभ्यासणे.

प्रश्नावली -

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

१. समाजामध्ये जातीय तेढ आणि विषमता निर्माण होत असताना राजर्षी शाहू महाराजांनी तो बॅलन्स साधण्याचा कसा प्रयत्न केला होता. तत्कालीन परिस्थितीत अनेक समाज हे दुर्लक्षित होते यात प्रामुख्याने फासेपारधी समाज, गोंधळी समाज, कोरवी समाज, गुरव समाज, महार समाज अशा अनेक समाजांना समाजाच्या मुख्य प्रहावात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.फासेपारधी समाजास राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या प्रमुख अंगरक्षकांच्या कामाची जबाबदारी तसेच रजपूतवाडी छावणीच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली होती.

२. संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृह बांधत असताना राजर्षी शाहू महाराजांचे ध्येय आणि आज ती वास्तू जळत असताना आपण विसरत चाललेलो जतन संवर्धनाचा मूलमंत्र– राजर्षी शाहू महाराज हे इंग्लंड भेटीवरून कोल्हापुरात परत आल्यानंतर कोल्हापुरात कुस्ती संवर्धनासाठी खासबाग कुस्ती मैदानाची उभारणी केली त्याचबरोबर कोल्हापूर संस्थानातील कलाकारांच्या कलेला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने पॅलेस थियेटरची व ॲम्पी थियेटरची उभारणी केली. याच पॅलेस थियेटरचे नामकरण नंतरच्या काळात संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह असे झाले आहे. १९१५ साली राजर्षी शाहू महाराजांच्या कल्पनेतून केशवराव भोसले नाट्यगृहाची उभारणी झाली. त्याचबरोबर खासबाग या भव्य कुस्ती संकुलाची उभारणी झाली. पण आज राजर्षी शाहू महाराजांच्या पश्चात शंभर वर्षांनंतर आपल्याला राजर्षी शाहू महाराजांचा हा सांस्कृतिक ठेवा जतन करता आला नाही, हे दुर्दैव म्हणावे लागेल. ८ ऑगस्ट २०२४ रोजी केशवराव भोसले नाट्यगृह आगीच्या भक्ष्यस्थानी पडले व अजूनही या घटनेचे ठोस कारण आपण शोधू शकलो नाही हि शोकांतिका आहे.

३. नवीन शैक्षणिक धोरण आणि शाहू महाराज- राजर्षी शाहू महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेतांनाच रयतेच्या सुखासाठी कटीबद्ध असल्याचे सांगितले होते. त्याच धोरणातून राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील प्रत्येक खेडोपाडी प्राथमिक शिक्षणाच्या शाळांची उभारणी केली. या शाळेवर तज्ञ शिक्षकांची नेमणूक केली. मुलांच्या शाळेतील मुली परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर त्या शाळेतील मास्तरांना बक्षिस देणारे एकमेव राज्यकर्ते म्हणजे शाहू महाराज. १९१७ साली राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत परंतु सक्तीचे केले. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत अशा पालकांना १ रुपया दंड केला. मुलांच्या शिक्षणासाठी वसतिगृहांची उभारणी केली. मुलांना शिष्यवृत्त्या दिल्या. याचे फलित म्हणे बहुजन वर्गातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात सामील झाले. आजच्या शासनाने राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचा अवलंब केला तर हे शैक्षणिक धोरण आजच्या पिढीला देखील उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

४. राजर्षी शाहू महाराजांचे जलव्यवस्थापनाचे कार्य – राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीच्या सुरवातीलाच कोल्हापूर संस्थानात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. या परिस्थितीची दाहकता शाहू महाराजांनी अनुभवून दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजणी करण्याच्या हेतूने कोल्हापूर संस्थानात १९०२ साली पाटबंधारे धोरण व पाटबंधारे खात्याची स्थापना केली. शंकर सीताराम गुप्ते यांना इरिगेशन ऑफिसर म्हणूने नेमले. अनेक गावातील जुने तलाव, विहिरी यातील गाळ काढून त्यांची दुरुस्ती केली. याच बरोबर महाराजांनी स्वतःचे जीवनकार्य म्हणून पाहिलेल्या श्री लक्ष्मी तलाव (राधानगरी धरण) या महत्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी केली. राजर्षी शाहू महाराज हेच खऱ्या अर्थाने कोल्हापूरच्या हरितक्रांतीचे जनक आहेत यात काही शंका नाही. याचबरोबर राजर्षी शाहू महाराजांनी जलप्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना राबविलेल्या होत्या. पंचगंगा नदीतील पाणी लोकांना नदीच्या काठावर काहिलीत काढून दिलेले होते. त्याच बरोबर कळंबा, रंकाळा व इतर तलावात लोकांनी घाण करून प्रदूषण करू नये यासाठी कडक निर्णय देखी वेळोवेळी महारजांनी घेतलेले पहावयास मिळतात.

५.राजर्षी शाहू महाराजांचे पर्यावरण संवर्धनाचे कार्य – राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीचा महत्वाचा पैलू म्हणजे राजर्षी शाहू महाराजांचे पर्यावरण संवर्धनाचे कार्य. राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभार करतांना पर्यावरण संवर्धन करण्यासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले होते. रस्त्याचे आजूबाजूचे झाडांचे रक्षण करण्याची जबाबदारी महाराजांनी त्या गावचे प्रमुख असणाऱ्या लोकांच्यावर सोपवलेली होती. तसेच कळंबा तलावाचे पाटात झाडाच्या मुळया जातात म्हणून झाडे तोडल्यास रस्त्यावरील छाया नाहीशी होईल म्हणून महाराजांनी झाडे न तोडता पाण्याच्या पाटात लोखंडी नळे घालण्याचा आदेश दिलेला होता. कात्यायनीच्या परिसरात शाहू महाराजांनी औषधी वनस्पतींची लागवड करून बोट्यानिकल गार्डन उभारलेले होते. त्याचबरोबर चहा, कॉफी, वेलदोडे व इतर मसाल्याच्या पदार्थांच्या झाडांची लागवड केली. रेशीम उद्योगासाठी तुतुच्या झाडांची लागवड केली.

६. दरबारी क्लार्क श्री भीमराव रेपे या सामान्य व्यक्तीला राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या रोजगार संधी – राजर्षी शाहू महाराजांच्या काळात अनेक व्यक्ती नावारूपाला आल्या. ज्यांनी राजर्षी शाहू महाराजांचे विचार शाहू महाराजांच्या पश्चात पुढे नेण्याचे कार्य केले. राजर्षी शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीचे फलित म्हणजे गरीब कुटुंबातील होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी वसतिगृह

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

हीच मोलाची भूमिका बजावत होती. भीमराव रेपे हे देखील एका गरीब कुटुंबातील विद्यार्थी जे राजर्षी शाहू महाराजांच्या मराठा वसतिगृहात राहून शिक्षण घेऊन इ.स. १९०४ साली ते मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले होते. पुढे महाराजांच्या सांगण्यावरूनच ते संस्थानच्या नोकरीत रुजू झाले. संस्थानची नोकरी करून इ.स. १९४१ साली ते संस्थानच्या नोकरीतून सेवानिवृत्त होऊन संस्थानने बहाल केलेल्या नाईक या पदवीसह आपल्या मुळगावी सरवडे याठिकाणी स्थायिक झाले. व पुढील काळात सहकार चळवळीत भरीव असे योगदान दिलेले आहे.

७. पुराभिलेख कार्यालयामध्ये जतन केलेले ऐतिहासिक दस्तऐवज आणि त्यांचा आजही ऐतिहासिक संदर्भ घेण्यासाठी होत असलेला वापर, या कार्यालयात संबंधी शाहू महाराजांनी घेतलेल्या भूमिका – कोल्हापूर पुरालेखागार कार्यालयात राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील शेकडो अस्सल अशी कागदपत्रे एकाच ठिकाणी पहावयास मिळतात. महाराजांनी राज्यकारभार करतांना वेळोवेळी घेतलेले लाखोंच्या संख्येने असलेले आदेश, महाराजांच्या काळातील पत्रव्यवहार, शाहू महाराजांच्या काळातील कोल्हापूर संस्थानचे गॅझेट व कोल्हापूर संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल हे कागदपत्रे आपल्याला राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीची माहिती देण्यास सहाय्यभूत ठरतात. या कागदपत्रांचा उपयोग अनेक भारतीय तसेच परदेशी अभ्यासकांना मोठ्याप्रमाणावर होत असतो. राजर्षी शाहू महाराजांच्या वास्तववादी इतिहासाची मांडणी करण्यासाठी हीच अस्सल कागदपत्रे प्रमाणभूत ठरतात.

**विवेचन/चर्चा:** राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या काही निर्णयामुळे त्यांचे व्यवस्थापन कौशल्य किती प्रगत होते याची निश्चितच आपल्याला खात्री होते. यामध्ये दरबार शिस्तीसाठी आणि एकंदरीत संस्थानाचा कार्यभार सुरळीतपणे चालण्यासाठी त्यांनी ठराव स्वरूपात काही ठोस निर्णय दिले आहेत. हे निर्णय म्हणजेच व्यवस्थापन शास्त्रातील मनुष्य संसाधन विभागातील घालून दिलेल्या मूल्यांना तंतोतंत लागू पडतात. यापैकी काही महत्त्वाच्या ठराव स्वरूपातील निर्णयांचा आपण आढावा घेऊयात.

1. नोकरी जमिनीवर तगाई देणे बाबत 2. क्वारंटाईन नोकरीच्या रजेसंबंधीच्या सूचना 3. वृद्ध व अशक्त व्यक्तीच्या मुलास नोकरी 4. अधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्या नोकरांना दहशत 5. परवानगी शिवाय संस्थांच्या बाहेरचा दौरा लेखी नोंद 6. ऑफिस कामाचा खाजगी वापर करू नये 7. वरचेवर बदल्या न करता तिथेच बढती द्यावी कारखाना संदर्भातील निकाल 8. कामात कसूर केल्याबद्दल बिलाच्या रकमेची जबाबदारी निश्चित करावी 9. रात्रपाळीला गैरहजर राहिल्याबद्दल बदली कामगारांना एक रुपया दंड 10. समाधानकारक काम केलेस योग्य ठिकाणी बढती.. रायबाग येथील मामलेदार यांच्या संदर्भातील ठराव 11. वरिष्ठांशी उद्धट वर्तन केलेस पदोन्नती शिक्षा 12. सरकारी नोकरदारास वंशपरंपरागत इनामी जमीन 13. नोकर लोकांनी सह्या स्वच्छ कराव्यात. 14. वेतन सुधारणा अहवाल व अंदाजपत्रक, रोजीचा भत्ता. 15. मयत कर्मचाऱ्यांच्या पत्नीस पोटगी देणे संदर्भातील निर्णय 16. हजेरीपत्रक संदर्भातील सादरीकरण करणे संबंधित सूचना 17. कार्यालयीन कामात कागदाचा काटकसरीने वापर करावा 18. कर्मचारी वर्गांच्या गणवेशास मंजुरी 19. लष्कर भरती संदर्भातील रिक्रुटमेंट नोटीस 20. रिक्रुटमेंट कमिटी व सभासद पद 21. घाणेरडे लिहिणाऱ्या कारकुनास बडतर्फीची शिक्षा 22. प्रामाणिक नोकरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना बढती - कारकून केशव देसाई यांचे संदर्भातील निर्णय 23. वाहन भत्ता निश्चिती व वाहन पत्रक सादर करणे बंधनकारक 24. आगाऊ सूचना न देता नोकरी सोडणाऱ्या शिक्षा

**परिणाम:** राजश्री शाहू महाराजांनी घेतलेल्या या ठराव स्वरूपातील निर्णयाकडे आपण पाहिले असता, यामध्ये निश्चितच त्यांचे सर्वांगीण असे व्यवस्थापकीय नेतृत्व गुण आपल्याला ठळकपणे दिसतात. शिस्तबद्धता व पारदर्शकता तसेच निर्णयातील स्पष्टता, अचूक वेळ व निर्णय, निर्णयांची अंमलबजावणी यामध्ये व्यवस्थापनातील आदर्शवत व्यक्तिमत्व असे आपण राजर्षी शाहू महाराजांना स्पष्टपणे संबोधू शकतो. वरील निवडलेल्या सर्व निर्णय प्रक्रियेतील ठरावांमध्ये राजर्षी शाहू महाराजांच्यामानव संसाधन व मनुष्यबळ विकास व्यवस्थापन या गोष्टींचा अंतर्भाव आपल्याला निश्चितपणाने दिसतो. आजही कार्पोरेट ऑफिसेस मध्ये सुद्धा या ठरावांची अंमलबजावणी जशीच्या तशी होऊ शकते असे आजच्या काळाला सुद्धा सुसंगत असे हे ठराव आहेत. उदाहरण - राजकोट किल्ला येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारलेला होता, परंतु अल्पावधीतच या पुतळ्याचे अस्तित्वच नष्ट झाले. म्हणजेच ज्यांनी हे काम पूर्ण केले होते त्यांनी त्या कामाची योग्य त्या पद्धतीने गुणवत्ता जपली नाही. म्हणजेच कामात कसूर केले आहे. यासाठी बिलाच्या रकमेची जबाबदारी निश्चित करावी असा शाहू महाराजांचा ठराव आहे ,जो कदाचित आपण आजही अंमलात आणू शकतो असे माझे वैयक्तिक मत आहे.

**कामगिरीचे मूल्यांकन: (Performance Appraisa)-** हा ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट चा अविभाज्य घटक आहे . राजर्षी शाहू महाराजांनी बढती, वंशपरंपरागत इनामी जमीन, नोकर जमिनीवर तगाई यासारख्या घेतलेल्या निर्णयावरून आपल्याला अधिकारी व कर्मचारी यांच्या कामगिरीचे मूल्यांकन केलेले दिसते. योग्य त्या ठिकाणी संबंधित व्यक्तीने अपेक्षित कामगिरी केली असेल तर

निश्चितच त्याला चांगली संधी उपलब्ध करून देणे, नव्याने जबाबदारी देणे, नवीन पिढी निर्माण करत असताना संघटना आणि नेतृत्वगुणांचा विकास करणे, यासारखे व्यवस्थापन शास्त्रातील अनेक पैलू राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कृतिशील निर्णयांमधून दर्शवलेले आहेत. अशा प्रकारचे performance appraisal and evaluation कामगिरीचे मूल्यांकन हे कार्पोरेट क्षेत्रात सध्या वेगवेगळ्या पद्धतीने होत असते. संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी निश्चितच राजश्री शाहू महाराजांनी घालून दिलेल्या निर्णयांचा आपण अंतर्भाव करू शकतो.

**Training** -प्रशिक्षण ही सुद्धा अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्र आत्मसात करण्यासाठी प्रशिक्षण गरजेचे असते. राजर्षी शाहू महाराजांनी चित्यांसाठी चित्तेवान हे पद निर्माण करून त्यांना खास चित्ते हाताळण्यासाठी प्रशिक्षण दिले. आजही त्या प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची चित्तेवान म्हणून जगभर ओळख आहे. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार निर्मितीसाठी इथल्या कोळी बांधवांना विदेशी तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी उत्तेजन दिले आणि त्यांच्याकडून ते कुशलपणे कार्य करून घेतले, याचा आदर्श निश्चितच शाहू महाराजांनी घेतलेला होता. त्यामुळेच प्रशिक्षण ही एक महत्त्वाची गोष्ट आहे जी व्यवस्थापन शास्त्रातील राजर्षी शाहू महाराजांनी अंगीकारली होती.

**Conclusion remarks -** एकविसाव्या शतकामध्ये एकीकडे आपण पाहिलं असता यांत्रिकीकरण म्हणजेच ऑटोमायझेशन यामुळे रोजगाराच्या असणाऱ्या संधी आपल्याला अल्प प्रमाणात उपलब्ध होताना दिसत आहेत आणि दुसरीकडे कुशल कर्मचारी मिळत नाहीत म्हणून बऱ्याच बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये जागा रिकाम्या दिसतात, असा दुहेरी विरोधाभास आपल्याला निश्चितपणाने आढळतो. यासाठीच आपल्या अंगी असणारी कौशल्य ओळखून त्याप्रमाणे योग्य ते प्रशिक्षण घेऊन स्पर्धात्मक युगामध्ये आपल्याला आपली गुणवत्ता सिद्ध करणे आवश्यक आहे. Recruitment - selection -training performance evolution या व्यवस्थापकीय मूल्यांचा आपण योग्य पद्धतीने अंगीकार केल्यास निश्चितच कंपनीची ध्येय धोरणे आणि उद्दिष्टे गाठण्यासाठी मदत होते. आजच्या कार्पोरेट युगात प्रत्येक कंपनीला आपली ध्येय धोरणे आणि उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. राजर्षी शाहू महाराजांनी अनेक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कार्य केले. यामध्ये मुख्यतः शैक्षणिक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून 23 बोर्डिंग ची स्थापना केली जी आजतागायत 21व्या शतकातही अविरतपणे शैक्षणिक दानाचे महत्त्वाचे कार्य करत आहेत. भारत देश हा कृषिप्रधान देश म्हणून संबोधला जातो. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर मध्ये जोतिबा आणि पन्हाळा येथे चहा व कॉफीच्या मळ्याची लागवड , कात्यायनी येथे बॉटनिकल पार्क अशाप्रकारे आधुनिकता अवलंबली होती. जयसिंगपूर वसाहत ,इचलकरंजी व कोल्हापूर शहरातील व्यापार पेठा यामध्ये लक्ष्मीपुरी, राजारामपुरी ,शाहूपुरी यामध्ये आपल्याला निश्चितच कार्पोरेट टाउन प्लॅनिंग दिसून येते.

आज मल्टी टास्किंग ही आपल्याला गर्दीतून वेगळेपण सिद्ध करण्यासाठी गरजेचे आहे. शैक्षणिक गुणवत्ते सोबतच इतर कला आपल्याला निश्चितच वेगळी ओळख निर्माण करून देतात. राजर्षी शाहू महाराजांनी तत्कालीन काळात कला व क्रीडा या दोन्ही क्षेत्रांना राजाश्रय दिला होता. त्यामुळेच आपली नोकरी सांभाळत सुद्धा अनेक कलाकार करवीर संस्थानांमध्ये नावारूपास आले. 21 व्या शतकामध्ये लोकाश्रयाची निश्चितच गरज आहे यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय कसा दिला होता हे अंगीकारले पाहिजे आणि पुरोगामी म्हणजेच नेहमी पुढारलेली पिढी निर्माण निर्माण होताना सर्वांगीण नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती निर्माण झाल्या पाहिजेत. सामाजिक कार्य करत असताना त्याचा फायदा निश्चितच समाजाला झाला पाहिजे आणि तो वर्षानुवर्षे शतकांनो शतके तसाच टिकून राहिला पाहिजे ,यासाठी निश्चितच राधानगरी धरणाचे मूर्तीमंत उदाहरण आपल्याला नजरेसमोर घेता येते. कोल्हापूर शहरासह राधानगरी ते शिरोळ कित्येक हेक्टर जमीन ओलिताखाली आली आणि कोल्हापूर संस्थानात हरितक्रांती झाली. यासाठीचा द्रष्टपणा हा नेतृत्व करणाऱ्यांच्या अंगी विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळेच आजही एकविसाव्या शतकात हे धरण म्हणजे राजर्षी शाहू महाराजांच्या दूरगामी विचारसरणीचा आणि एकंदरीत त्यांनी घेतलेल्या निर्णयांचा अनुकूल होणारा परिणाम आजही आपल्याला स्पष्टपणे जाणवतो. आजच्या राजकारण्यांनी समाजकार्य करत असताना निश्चितपणाने राजर्षी शाहू महाराजांचा नुसता भाषणापुरता आदर्श न घेता त्यांचे व्यक्तिमत्व अभ्यासून ते अंगीकारले पाहिजे. व्यवस्थापन शास्त्रातील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून राजर्षी शाहू महाराजांची नेहमीच ख्याती राहील याबाबत तिळमात्र शंका नाही. आजच्या २१ व्या शतकात , बदलत्या निसर्ग नियमानुसार आपण कृतिशील वारसा जितका जपण्याचा प्रयत्न करू तितकेच आपण यशस्वी होऊ आणि राजर्षी शाहू महाराजांचे खरे कृतिशील वारस ठरू हीच अपेक्षा.

**सारांश -** राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये आपल्याला विविध पैलू आढळतात, यामध्ये शिवछत्रपतींचे वैचारिक वारस म्हणून खऱ्या अर्थाने शाहू महाराजांची एक वेगळी ओळख आहे. शिवछत्रपतींनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून राज्यकारभार सुरळीतपणे चालावा यासाठी प्रयत्न केले. यामध्ये खऱ्या अर्थान सत्तेचं केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण सुद्धा आपल्याला

अभ्यासायला मिळत. शिवछत्रपतींचे हेच ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट म्हणजेच मनुष्यबळ विकास व्यवस्थापन म्हणजे थोडक्यात माणसं ओळखून त्यांना योग्य ठिकाणी, योग्य वेळी योग्य त्या जबाबदाऱ्या देऊन ते कार्य पूर्ण करणे हेच कसब त्यांना व्यवस्थापनाच्या सर्वोच्च स्थानी मॅनेजमेंट गुरु म्हणून घेऊन जातं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे हीच मूल्ये स्वतः राजर्षी शाहू महाराजांनी अभ्यासून ती आपल्या व्यक्तिमत्त्वांमध्ये अंगीकारण्याचा आणि कृतीमध्ये आणण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आपल्याला आढळतो. त्यामुळेच 'माणसं घडवणारा राजा' अशी शाहू महाराजांची ओळख आपल्याला निश्चितपणाने होते. आजच्या या 21व्या शतकात व्यवस्थापन शास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यामध्ये शाहू महाराजांनी जे मनुष्यबळ विकास व्यवस्थापन केलं ते नक्कीच आजही प्रेरणादायी आहे. राजर्षी शाहू महाराजांनी अनेक ठरावांमधून व्यक्तींच्या केलेल्या नेमणुका व त्यांचे प्रशिक्षण, दरबारातील राज्यकारभारात सुसूत्रता यावी यासाठी वेळोवेळी केलेली नियमावली, शिस्तभंग कारवाई, वेतन सुधारणा कायदा, बढती, वारसा हक्क यासह विविध ठरावांचा जर आपण अभ्यास केला तर नक्कीच ते आजच्या काळातही सुसंगत आहेत आणि आजच्या कार्पोरेट कल्चर मध्ये सुद्धा त्या आपण अंगीकारू शकतो. याचा आढावा या शोधनिबंधामधून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ:

1) भास्कर धाटवकर, शाहू महारजांचे निवडक आदेश, महाराष्ट्र शासन

2) मुलाखत, श्री गणेशकुमार खोडके,अभिलेखाधिकारी, कोल्हापूर पुरालेखागार कोल्हापूर

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

21

# राजर्षी छ. शाहू महाराज - एक कलाप्रेमी राजा

**प्रा. श्री. सरदार निवृत्ती पाटील**
ग्रंथपाल,
कै. वाय. डी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यवलूज, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

---

**प्रस्तावना** -कोल्हापूर ही एक ऐतिहासिक नगरी आहे. या नगरीची प्रतिष्ठापना इ.स.पूर्व 300 वर्षाच्या आधीपासूनची आहे. हिंदुस्थानच्या संस्थानामध्ये कोल्हापूर संस्थानचा कारभार हा नावलौकिकतेचा आहे. या करवीर नगरीला छ. शाहू महाराजांसारखा एक लोककल्याणकारी व दृष्टा राजा लाभला. आपल्या राजसत्तेचा बहुजनाच्या उद्धारासाठी कौशल्याने वापर केला. एक ध्येयवादी, विद्याप्रेमी, समतावादी, लोकाभिमुख राजा म्हणून शाहू महाराजांचा गौरव करावा लागेल. शाहू महाराजांचे सांस्कृतिक, कला व क्रीडा विषयक धोरण आजच्या काळातही फार उपयुक्त आहे. संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला अशा अनेक विविध ललीतकलांना प्रोत्साहन देण्याचे धोरण आपल्या संस्थानामध्ये राबविले. अनेक जाती धर्माच्या गुणी खेळाडूंचा, कलावंतांचा शोध घेऊन त्यांना राजाश्रय दिला. त्यामुळे ते सर्वांचे आश्रयदाते, मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत बनले. हिंदुस्थानच्या इतिहासात कोल्हापूर संस्थान हे मल्लविद्येचे माहेरघर, कुस्ती पंढरी, नाट्य पंढरी म्हणून उदयास आले.

**करवीर नगरी - मल्लविद्येचे माहेरघर:** कोल्हापूरच्या लाल मातीतील मल्लविद्या संपूर्ण भारतभर रुजविण्याचे, जोपासण्याचे व वाढविण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. इंग्रज संत्तेचा विरोध असतानाही मल्लविद्येला, मल्लांना, तालमींना प्रोत्साहन देण्याचे कार्य शाहूंनी केले. अनेक बुरुजबंद मल्लांना आणून जंगी मैदाने भरवून प्रजेला लढती दाखविल्या आणि कोल्हापूर संस्थानाचे नाव कुस्ती क्षेत्रात अजरामर केले. मल्लविद्येला चालना देण्यासाठी त्यांनी जुन्या राजवाड्यातील मोतीबागेत 1895 साली मोतीबाग तालमीची स्थापना केली व तालमीच्या प्रवेशद्वारावर लिहिले ''पहिली शरीरसंपत्ती, दुसरी पुत्रसंपत्ती, तिसरी धनसंपत्ती असेल तोच पुण्यवान.''

31 जुलै 1897 साली महाराजांना पुत्ररत्न प्राप्त झाले. युवराजाच्या नामकरण संस्काराच्या निमित्ताने महाराजांनी कुस्त्यांचे जंगी मैदान भरविले. कुस्तीला राजाश्रय देवून कुस्तीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यावर त्यांनी भर दिला. 'रुस्तुम-ए-हिंद' च्या तोडीचे मल्ल तयार करण्यासाठी महाराजांनी दहा कलमी योजना आखली व जिद्दीने कार्यास प्रारंभ केला. शाहू महाराज स्वतः एक वस्ताद होते. पैलवान तयार करणारी वस्तादाची एक कर्तबगार पिढीच तयार केली. तसेच पैलवानांना खुराक तयार करणे ही एक कला आहे. हे ओळखून खुराक तयार करणाऱ्या लोकांची वेगळीच नेमणूक केली. परप्रांतीय मल्लांना खुराक, कुस्ती लढविण्यासाठी मनपसंद बक्षीसे, सेवा सुविधा, न्यायप्रियता यामुळे उत्तरेकडील मल्लांचा ओढा करवीरकडे वळू लागला.

कुस्तीत गदा देण्याची प्रथा प्रथम शाहू महाराजांनी सुरू केली. शाहू महाराजांनी रोम, पॅरिसला भेटी दिल्या. तेथील आखाडे पाहून चाळीस-पन्नास हजार प्रेक्षक बसतील एवढे जंगी मैदान बांधण्याचे ठरविले. त्याचबरोबर मैदानाची रचना करताना सर्वांना कुठूनही कुस्ती दिसेल अशी व्यवस्था केली. सन 1912 साली खासबाग मैदानाच्या निर्मितीने मल्लाच्या दिग्विजयाची मुहूर्तमेढ रोवली. पूर्वी मैदाने मोफत व फुकट भरत असत; पण खासबाग मैदान हे तिकीट लावून घेतलेले पहिले कुस्ती मैदान होय. या मागेही शाहू महाराजांची एक दूरदृष्टी होती. ती म्हणजे मल्लविद्येला परावलंबित्वाच्या पाशातून मुक्त
करून स्वावलंबन करण्याचे महत्त्वाचे पाऊल होते. कुस्तीगिरांसाठी महाराजांनी 'हजारी फंडाची' स्थापना केली. तिकीट विक्रीतून मैदानाचा खर्च वजा जाता जी रक्कम राहत असे ती रक्कम हजारी फंडात जमा होत असे. या हजारी फंडातूनच पैलवानांच्या म्हातारवयात औषधोपचार व इतर खर्चासाठी तरतूद केली. पैलवानकी सोडल्यानंतर त्यांची काळजी घेणारा, दूरदृष्टी असणारा हिंदुस्थानातील एकमेव राजा म्हणजे छत्रपती शाहू महाराज होय. मल्लविद्येला प्रोत्साहन देताना त्यांनी कधीही जात-पात, धर्म-पंथ पाहिला नाही.

**नाट्यपंढरी-**संपूर्ण हिंदुस्थानच्या संस्थानामध्ये 'कलाप्रेमी' राजा म्हणून कोल्हापूरचे शाहू महाराज यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल. शाहू महाराजांनी साहित्य, संगीत, कला क्षेत्रात अनेक लोकांना राजाश्रय दिला. विविध क्षेत्रातील कलाकार व नाटक कंपनीवाल्यांना त्यांच्या अडचणींना मदत करून व्यवसायात त्यांना स्थैर्य प्राप्त करून दिले. 1892 मध्ये संगीतास वाहिलेली देवल क्लबसारखी संस्था भारतीय किर्तीची बनविली. गानमहर्षी अल्लादियाखाँ व त्यांच्या कुटुंबाला राजाश्रय देवून करवीर संस्थानात संगीत विद्यापीठ स्थापन केले. भास्करबुवा बखले, हैदरखॉ, मंजीखॉ, केसरबाई केरकर, गोविंदबुवा शाळीग्राम, देवासचे गवई रजब अलीखॉ, अध्वर्यू

हैदरबक्षखॉ, अब्दुल करीम खॉ, अंजनीबाई मालपेकर, ज्ञानचंद्रिका लक्ष्मीबाई जाधव अशा अनेक गायकांनी भारतीय शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात आपले नाव अजरामर केले.

शाहू महाराजांनी शास्त्रीय संगीत क्षेत्राबरोबरच भजन, शाहिरी, जलसे यांना प्रोत्साहन दिले. तुकाराम बुवा सरनाईक, पंडितराव करंबेळकर, कृष्णा बागीकर असे अनेक भजनी गायक तयार झाले. शाहिर विठ्ठल डोणे, रामचंद्र माळी, ईश्वरा माळी, लहरी हैदर असे नामवंत शाहिरांची पिढी जन्माला आली. कलगीवाले व तुरेवाले यांनाही प्रोत्साहन दिले.

चित्रकलेच्या क्षेत्रात जी उल्लेखनीय प्रगती झाली तिचा पाया शाहू महाराजांनी घातला. शाहू महाराज स्वतः चित्रकलेचे चाहते होते. आबालाल रहेमानयाचे चित्रकलेतील कौशल्य पाहून महाराजांनी त्याची ‘दरबारी चित्रकार’ म्हणून मासिक वेतनावर नियुक्ती केली. आनंदराव पेंटर, कलामहर्षी बाबुराव पेंटर, बाबा गजबर, दत्तोबा दळवी, माधवराव बागल यांना शाहू महाराजांचे प्रत्यक्ष प्रोत्साहन व सहाय्य लाभले.

शाहू महाराज नाट्यरसिक व हौसी होते. त्यांच्या कारकिर्दीत नाट्यकलेला वैभवाचे दिवस लाभले. केशवराव भोसले, बालगंधर्व यांच्यासारखे महान कलावंत करवीर नगरीने मराठी रंगभूमीस दिले. अनेक नाटक कंपन्या कोल्हापूरात येऊ लागल्याने महाराजांना थिएटरची अडचण भासू लागली. कारण त्यावेळी ‘लक्ष्मीप्रसाद’ हे एकच थिएटर होते. 1898 साली ‘शिवाजी थिएटर’ बांधून घेतले. शाहू महाराज 1902 साली विलायतेस गेले. त्यावेळी रोम येथील नाट्यगृहे पाहून कोल्हापूरातही तशीच योजना आखली. 1913 साली नाट्यगृहाचे बांधकाम सुरू झाले. थिएटरची रचना, आवाज योजना, प्रेक्षकास उठूनही रंगभूमीवर काय चालले आहे हे दिसावे अशी योजना आखून थिएटर बांधून घेतले. अवघ्या 2 वर्षात म्हणजे 1915 साली थिएटर पूर्ण झाले. दसऱ्याच्या मुहुर्तावर युवराज छत्रपती राजाराम महाराज यांच्या हस्ते नाट्यगृहाचे उद्घाटन झाले, त्यास 'पॅलेस थिएटर' असे नाव दिले. किर्लोस्कर कंपनीच्या ‘मानापमान’ या नाटकाचा प्रयोग झाला. शाहू महाराजांच्या काळात अनेक नट-नाटककार तयार झाले. व्ही शांताराम, भालजी पेंढारकर, मा. विनायक अशी अनेक माणसे नाटकात चमकली. त्यातून अनेक नाटक कंपन्या तयार झाल्या.

संगीत नाट्य या कलांना राजाश्रय देवून शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात एक उर्जितावस्था आणली. 1912 साली दादासाहेब तोरणे व दादासाहेब फाळके यांनी मुक चित्रपटाची स्थापना केली. ‘पुंडलिक’ हा भारतातील पहिला मुकपट होता. 1913 साली दादासाहेब फाळकेंनी ‘राजा हरिश्चंद्र’ हा चित्रपट तयार केला. या कलेचा अविष्कार कोल्हापूरमध्येच घडला. कलामहर्षी बाबुराव व आनंदराव पेंटर या बंधुनी 1913 साली कोल्हापूरात ‘महाराष्ट्र सिनेमा’ या नावाचे सिनेमागृह काढले. या सिनेमागृहाचे उद्घाटन शाहू महाराजांच्या हस्ते झाले. 1917 साली बाबुराव पेंटर यांनी स्वदेशी बनावटीचा, हिंदुस्थानातील पहिला कॅमेरा तयार केला. त्याचबरोबर त्यांनी ‘‘महाराष्ट्र फिल्म कंपनी’’ सुरू केली. शाहू महाराजांनी त्यांना मंगळवार पेठेत जागा दिली. हिंदूस्थानच्या चित्रपट निर्मितीचा पाया घालण्यामध्ये शाहू महाराजांचा फार मोठा वाटा आहे.

शाहू महाराज स्वतः एक कला व क्रिडाप्रेमी होते. आपल्या कलावंताची कला जाणणारे, त्यांना आर्थिक सहाय्य देणारे, भविष्याची काळजी घेणारे, पाठीवर मायेची, शाबासकीची थाप देणारे असे महान राजे होते. नाट्य, संगीत, कला, मल्लविद्या यांना चालना, प्रोत्साहन देऊन कोल्हापूर संस्थान कलेचे माहेरघर बनविले. छत्रपती शिवरायांच्या विचाराचा व कार्याचा वारसा मोठ्या समर्थपणे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक महान मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांनी आपली ओळख निर्माण केली. राजर्षी शाहूंनी 1894 ते 1922 असे 28 वर्षे कोल्हापूरच्या गादीवर राज्य केले. शाहू महाराजांनी त्याच्या कारकिर्दीत करवीर संस्थानामध्ये जे कार्य केले ते इतके प्रभावी व महत्त्वपूर्ण होते की, स्वातंत्र्यभारताची राज्यघटना तयार करताना घटना समितीला त्यांनी केलेल्या कार्याची नोंद घ्यावी लागली.

**संदर्भ -**

1) पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज - विचार आणि कार्य, सह्याद्री प्रकाशन, पुणे, जून 2012, पृ. क्र. 203 ते 214
2) जाधव रमेश (संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, 2016, पृ. क्र. 93 ते 138
3) साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी 2015, पृ. क्र. 11
4) पवार जयसिंगराव (संपा.), श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 2008, पृ. क्र. 297
5) बागल माधवराव, शाहू महाराजांच्या आठवणी, बाबुराव धारवाडे, कोल्हापूर, 2004, पृ. क्र. 172

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

22

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे जलसिंचन विषयक धोरण

**प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम**
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग मुधोजी कॉलेज, फलटण

---

**प्रस्तावना :** राजपदाचा वापर जनकल्याणासाठी करावयाचा असतो अशा प्रकारचा आदर्श राजर्षी शाहु महाराजांनी घालुन दिला. महान आदर्श राज्यकर्ता, बहुजन समाजाचा नेता आपल्या प्रत्यक्ष कृतीद्वारे बहुजन समाजाला जागृत करुन त्यांची सर्वांगीन क्षेत्रात प्रगती घडवुन आणनारे समाजिक, शैक्षणिक क्षेत्रात अविस्मरणीय प्रगती घडवुन आणली. त्याच प्रकारे सर्व सामान्याच्या उन्नतीसाठीही जनहिताची धोरणे राबविली व सर्व सामान्याच्या उन्नतीसाठी फार मोठे योगदान संस्थानाचा दौरा करुन जनतेच्या समाजिक, आर्थिक स्थितीचे ज्ञान प्राप्त केल्याचे उल्लेख मिळतात. शेतकरी कष्टकरी, शुद्रातीशुद्र, स्त्री हे राजर्षी च्या चिंतनाचे विषय होते. या सर्व पिडीत घ्राटकांचा उत्कर्षासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. एका उल्लेखाप्रमाणे छत्रपतीचे शिक्षण संपल्यानंतर त्यांनी अधिक शिक्षणासाठी इंग्लंडला जावे अशी असलेली इंग्रज अधिकाऱ्यांची विनंती झुगारुन त्यांनी युरोपच्या यात्रे ऐवजी भारतीय यात्रा केली देशातील शेतकरी जनतेचे दु:ख प्रत्यक्ष पाहीले, उदयोग धंदयाविना होणारी कामगाराची उपासमार व शेतकऱ्यांचे हाल पाहीले. बहुसंख्य जनता दु:खात कितपत पडल्याचे त्यांना समजले. म्हणुन जनहिता बाबत कोल्हापुर संस्थान आदर्श ठरल्याचे पाहीजे असा त्यांनी विचार केला होता.

आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योग धंदे व सहकार या तिन्ही क्षेत्रात अग्रेसर आहे. तथापि या प्रगतीचा प्रारंभा स्वतंत्र्योत्तर काळातील नाही. स्वातंतंत्र्यपूर्व काळात शाहू महाराजाच्या कारकीर्दीत या प्रगतीची पायाभरणी झाली. त्या काळात कोल्हापूर संस्थानात सुरु झालेली हरित क्रांती महाराष्ट्रातील पहिली हरितक्रांती होती. त्या क्रांतीचे जनकत्व महाराजांच्या दूरदृष्टीकडे व कल्याणकारी, पुरोगामी धोरणाकडे जाते.

**पाणी व चारा टंचाई :** पाणी म्हणजे जीवन, या आशयाचे एक सुक्त वेदामध्येही आहे. हे पाणी जमीनीच्या खाली व वर आहे. पृथ्वीचा एक तृतीयांश भाग पाण्याने व्यापला हे खरे असले तरी पिण्यासाठी व शेतीसाठी जे पाणी हवे आहे. त्याचा मुख स्त्रोत पाऊसच आहे. पाऊस कमी पडणे किंवा न पडणे यामुळे कोरडा दुष्काळ पडला असे म्हटले जाते. "छत्रपती शाहू महाराज नुकतेच गादीवर आले होते. राज्य कारभाराला आरंभ होतो ना होत तोच १८९६ मध्ये राज्यात दुष्काळ पडला. या दुष्काळाची २२ वर्षाच्या छत्रपती शाहू महाराजांनी जो अटीतटीचा संघर्ष केला. त्यामुळे आपल्या काळात पडलेल्या पहिल्याच भयानक दुष्काळात शाहू छत्रपतीनी मोठ्या जिद्दीने नैसर्गीक आपत्तीशी झुंज दिली दुष्काळात एक मानवी बळी जाऊ दिला नाही."

**जुन्या विहीरींना अनुदान व जुन्या विहीरींची दुरुस्ती :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळाच्या तडाख्यातून वाचविण्यासाठी एक रामबाण उपाय योजला. तो उपाय म्हणजे संस्थानात जलसिंचन सुविधा मोठ्या प्रमाणात वाढविल्या. पाणीपुरवठा वाढविल्यामुळे आपोआपच शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत होते. हे ओळखून राजर्षी शाहू महाराजांनी इ.स.१९०६ नंतर जलसिंचनाच्या कामात अधिक लक्ष घातले, त्या करीता जुन्या विहीरींची दुरुस्ती व्हावी व नव्या विहीरी खोदल्या जाव्यात म्हणून तगाईच्या रुपाने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यात आला. त्यामुळे १९०५-१९०६ मध्ये ११,७०० होत्या. ती सन १९२०-१९२१ मध्ये ती १२,८०० पर्यंत पोहोचली. तसेच वडगांव, शिरोळ, रायबाग, शाहापूर आणि रुकड इत्यादी ठिकाणी २० हून अधिक लहान मोठया तलावंची बांधणी करण्यात आली. बेडसगांव, काळकोट, अतिग्रे इत्यादी ठिकाणी असणाऱ्या तलावाची दुरुस्ती करण्यात आली.

**राजर्षी शाहु महाराजांचे जल धोरण :** छत्रपती शाहु महाराज हे कृतिशील सुधारक होते. राज्य रोहना प्रसंगी सामान्य जनतेला दिलेल्या वचनपुर्ती प्रमाणे राज्याचा मुख्या घटक असलेल्या शेतकरी वर्गाकडे त्यानी विशेष लक्ष पुरविले शेतीला पाणी पुरवठा म्हणुन लहान मोठ्या तलावांची बांधणी जुन्या तलावाची दुरुस्ती कच्या व पक्या विहीरी, पाण्याची साठवणुक करणे अशा सुविधा केल्या. च्या शिवाय दुष्काळग्रस्त भागात कायम स्वरुपी मात करण्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात १९०२ मध्ये अभुतपुर्व असे पाटबंधारे धोरण जाहीर केले. पाटबंधारे खाते निर्माण करुन त्यावर खास इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. आणि संस्थानातील जलधोरण आखण्यासाठी प्रत्येक गावची जलव्यवस्थापण व पाठबंधाऱ्याच्या निर्मितीच्या दृष्टिने तपशीलावर व बारकाईने पाहणी करण्यात आली.

**राधानगरी धरणची निर्मीती :** कोल्हापूर संस्थानात पंचगंगा, वारणा, दुधगंगा, वेदगंगा, तुळशी, कुंभी, कासरी, भोगावती, हिरण्यकेशी इत्यादी लहान मोठ्या नदया वाहत असून या नद्यांच्या काठावरील शेतकरी पारंपारिक पद्धतीने सिंचन करीत असे. संस्थानाच्या डोंगर उतारावर पावसाचे प्रमाण जापस्त होते. परंतु पावसाचे पाणी वाहून जात असल्या कारणाने त्याच्या अधिक चांगल्या पद्धतीने उपयोग करता येत नव्हता. या पाण्याचा देशावरील जमीन उपयोग व्हावा म्हणून महाराजांनी राधानगरी धरणाचा महत्वकांक्षी प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले. राजर्षी शाहू महाराजांनी भोगवती नदीवरील भुदरगड तालुक्यातील फेजीकडे गावाच्या हद्दीमध्ये राबविण्याचे निश्चित करण्यात आले. त्याकरिता जागतिक किर्तीचे अभियंते विश्वेश्वर यांचा सल्ला घेण्यात आला. त्यापैकी पहिल्या जागी ११०० फुट लांब व ९१ फुट उंच धरण बनणार होते. ज्याचा फायदा ५००० एकर जमिनीला मिळणार होता. परंतु राजाचे स्वप्न हयापेक्षा मोठे असल्याने ही जागा रद्द करण्यात आली. फेजीवडे गावाच्या हद्दीत २६०० फुट लांबीचे व ११० फुट उंचीचे धरण बनविण्यात येणार होते. यासाठी अंदाजे तीस लाख रु. खर्च करण्यात येणार होता व २०,००० एकर पेक्षा अधिक क्षेत्र पाण्याखाली येणार असल्यामुळे हया जागेस मान्यता दिली.

महारणी महालक्ष्मीबाई यांच्या हस्ते नोव्हेंबर १९०९ मध्ये तलावाच्या बांधकामास सुरुवात झाली. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरु झाले. तरीही शाहू महाराजांनी काम चालूच ठेवले. १९१८ पर्यंत १४ लाख रुपये खर्च झाले, परंतु महायुद्धामुळे निर्माण झालेल्या साधन सामग्रीच्या तुटवडयामुळे धरणाचे बांधकाम बंद करावे लागले. छत्रपती शाहूंच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांनी १९२४ मध्ये धरणांचे बांधकाम पूर्ण् केले. धरणाच्या निर्मितीसाठी २६ लाख रुपये खर्च केले गेले त्याकाळात २००० मजुर कामावर होते राधानगरी धरणातील साठणाऱ्या पाण्याचा साठ्यातून ६० दशलक्ष घनफूटपाणी शेतीसाठी उपलब्ध झाले. या धरणाचा उभारणीमुळे राधानगरी ते कुरुंदवाड पर्यंतचा ३२००० एकर जमीनीस पाणी पुरवठा होऊ लागला त्यामुळे संस्थानातील शेती हिरवीगार झाली. महाराजांचे हरितक्रांतीचे स्वप्न झाले. कोल्हापुर संस्थान हिरवेगार झाले. आजही स्थापत्य शास्त्रामध्ये या प्रकारच्या बंधाऱ्यांना कोल्हापूर टाईप बंधारा नावाने संबोधले जाते.

**राधानगरी जलविद्युत प्रकल्प :** कोल्हापूर जिल्ह्यात एक मोठा जलविद्युत प्रकल्प असून तो सह्याद्रीच्या खंडीत रांगेत पूर्वेकडील डोंगररांगाच्या पायथ्याशी भोगावली नदीवर आहे. जलसिंचनाबरोबर जलविद्युत प्रकल्प तयार झाला. जलविद्युत प्रकल्प असल्यामुळे जलसिंचन विकासावर याचा काहीही परिणाम झाला नाही. पुढे यांच्या प्रेरणेतून कोल्हापूरमध्ये नाविण्यपूर्ण जलसिंचन व जलविद्युत प्रकल्प राबविण्यात आले.

**निष्कर्ष :**

१. कोल्हापूर जिल्ह्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी जलसिंचनाची योजना तयार केली.
२. राजर्षी शाहू महाराजांकडे काळाच्या पुढे बघण्याची दूरदृष्टी होती.
३. जलसिंचनाशिवाय कृषी विकासाला चालना मिळणे अशक्य याची जाणीव शाहू महाराजांना होती.
४. कोल्हापूर जिल्ह्यातील आर्थिक विकास घडून आणावयाचा आहे तर जलसिंचनाशिवाय पर्याय नाही. हे त्यांनी ओळखले होते.
५. राजर्षी शाहू महाराज तळागाळातील गरीब जनतेविषयी आस्था असणारे लोक राजे होते.

**समारोप :**वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्ह्यात राजर्षी शाहू महाराजांनी स्वयंपूर्ण जलनिती धोरण राबवून दुष्काळावर मात केली. गरीब जनतेच्या हिताकडे लक्ष दिले. छ. शाहू महाराज यांच्या जल व्यवस्थापनाचा व्यापक कार्यक्रम पाहता असे दिसते की, त्यांनी त्यांच्या शासनकाळात लोकोपयोगी योजनांची मोठया प्रमाणात राबविण्यात. सततच्या दुष्काळ, अवर्षण यावर मात करण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. ते वाखाणण्याजोगे आहेत. छ. शाहू महाराजांच्या राजवटीत आर्धीकारकिर्द दुष्काळाशी सामना करण्यात गेलीत. यावरुन तत्कालीन दुष्काळाची भिषण रुपे व प्रमाण लक्षात येते. अत्यंत प्रतिकुल परिस्थिती त्यांनी दुष्काळी स्थितीमध्ये जे सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी जे कार्य केले त्यासाठी शेजारील ब्रिटीश शासनाचीही आर्थिक व तांत्रिक कामासाठी त्यांची मदतही घेतली. लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी व शेतकरी व शेती, जनतेच्या पिण्याच्या पाण्याची प्रश्न या सर्वांवर मात करण्यासाठी त्यांची जलनिती विषयीचे धोरण महत्वाचे ठरते. कोल्हापूर संस्थानाच्या भागात सहयाद्रीच्या टेकडया असल्याने त्यांनी या टेकडया व माळरानावरही चर खोदून दुष्काळी काळात लोकांना रोजगार दिला व पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्याची योजनाही केली. जलस्तर व जंगल वाढवण्यासाठी प्रयत्न केले असे लोकोंपयोगी राजा अशी राजर्षी शाहू महाराजांची जी प्रतिमा आहे. ती सदैव त्यांच्या कार्यातुन दिसत असते. शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या बऱ्याचशा प्रकल्पाला स्वातंत्र्यानंतर सरकारने विकसित केले. त्यावरुन त्यांची जलसिंचनाविषयी भविष्यकालीन योजना ही निश्चित दिर्घ उपयोगाची होती.

नदी पात्रात पाणी आडविण्याच्या बांधांना कोल्हापूरी बंधारे असे नावाने ओळखतात. अशा पद्धतीने शाहू महाराजाने थोर असे जलनितीचे कार्य केले.

**संदर्भसूची :**

१. चौधरी कि.का., (संपा.) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, मराठी आवृत्ती १९८९, पृ. २१२
२. डॉ.सावंत उत्तम, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००५, पृ. ७५
३. साळुंखे पी.बी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शिक्षण विभाग, मुंबई, १९७६, पृ. १६९
४. डॉ. पवार जयसिंगराव (संपा) : राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१, पृ.९४९-९५०
५. कल्याणकर बि.व्ही., क्रांती सुत्के: राजर्षी छत्रपती शाहु, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, १९९१ पृ. १०१
६. डॉ. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक पब्लिकेशन औरंगाबाद २००९ पृ. १०१
७. चव्हाण रविकुमार, छत्रपती शाहुचे जलधोरण रयत जागर, त्रैमासिक ऑक्टो/नोव्हे/डिसें २००६ पृ. ०५
८. राणा अशोक, लोकांचा राजा शाहु छत्रपती, किशोर कडू, जिजाई प्रकाशन, पुणे २००६ पृ. ४०
९. जाधव रमेश, 'लोकराजा शाहू छत्रपती' शेती विकास प्रकल्प, शैलेंद्र प्रकाशन, पुणे, २००५ पृ. ११०

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

23

# लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक योगदान

**डॉ संतोष शहापूरकर**
शिवराज कॉलेज गडहिंग्लज. कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

भारतात छत्रपती शाहु महाराजांना लोकतंत्रवादी व समाजसुधारक म्हणुन ओळखले जाते. त्यांना कोल्हापूर संस्थांनच्या इतिहासात असाधारण स्थान आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराज-कृषि उद्योग प्रणेते ! रयतेचे राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी सहकार, सामाजिक, कृषि उद्योग यांसह विविध क्षेत्रांत भरीव कार्य केले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म दि. २६ जून १८७४ मध्ये कागलच्या घाटगे घराण्यात झाला. राजश्री शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे होते. तर आईचे नाव राधाबाई होते. हाच दिवस महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जातो. त्यांच्या अगणिक प्रासंगिक जीवनाचा आलेख त्याच्या कर्तृत्वाने गोंदलेला आहे. असे म्हटले जाते की, त्यांच्या कर्तृत्वाशी त्याचे कार्य जोडलेले आहे. अश्या कार्यांवरील त्याची नितांत असलेली निष्ठा व प्रेरणा असू शकते. त्या प्रेरणेतून जे कार्य जन्म घेते, ते कार्य उजळते, प्रकाशमान होते.

शेती, उदयोग व व्यापार इत्यादी क्षेत्रांचा विकास झाल्यास जनतेचे दारीद्र याचे उच्चाटन होईल अशी छत्रपती शाहु महाराजांची खात्री होती.

कोल्हापूर संस्थानातील 90 टक्के जनतेची उपजिवीका शेतीवर अवलंबून होती. त्यांनी 1902 मध्ये इटली सारख्या कृषीप्रधान देशाला भेट दिली. तेथील कृषी धोरणाचे सुक्ष्म निरिक्षण केले. शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी कृषी धोरण, कृषी विकासासाठी सिंचन सुविधा, धरणे, सुधारीत बि-बियाणे, अवजारे, प्रदर्शने, आधुनिक पिके, तुकडेबंदी इत्यादी उपाय योजना केल्या. त्यामुळे कृषी विकासाला चालना मिळाली.

शाहू महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानात सुरू झालेली हरितक्रांती ही महाराष्ट्रातील पहिली क्रांती होती. म्हणून हरितक्रांतीचे जनकत्व शाहू महाराजांकडे जाते. आपल्या राज्यात बहुसंख्य जनता शेतकरी आहे. हा शेतकरी अज्ञान व दारिद्र्यामुळे सामाजिक दृष्ट्या मागासलेला आहे. तसेच त्याच्यावर आस्मानी संकट कधीही कोसळतात. यामुळे तो अतिशय दैन्य अवस्थेत असल्याचे महाराजांनी जाणले. या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याचे राजर्षी शाहू महाराजांनी ठरविले.

`महाराज परदेश दौऱ्यावर जात असत तेंव्हा तेथील शेतीविषयक धोरणांची माहिती घेण्यास ते अधिक उत्सूक असत. आधुनिक पध्दतीने शेती करण्यावर त्यांचा अधिक भर होता. त्यांच्या मते शेतकऱ्यांचे अज्ञान व निरक्षरता, भांडवलाची कमतरता, शेतीचे विन किफायतशीर आकारमान, विक्री बाबत संघटनेचा अभाव या कृषी क्षेत्रातील महत्वाच्या अडचणी आहेत."

राजर्षी शाहू महाराजांनी कृषि क्षेत्रातील या अडचणी सोडविण्याचा प्रयल केला. शेतकऱ्यांना कृषी शिक्षण दिले, ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. गावातील शाळेतच शेतकऱ्यांना शेतीविषयक शिक्षण देण्याची व्यवस्था केली. शेतकऱ्यांकडे भांडवलाची कमतरता असल्याचे आढल्यानंतर ती दूर करण्यासाठी त्यांनी संस्थानात विविध निधी मार्फत निधी स्थापून शेतकऱ्यांना कर्ज व मदतीची व्यवस्था केली. त्याचबरोबर शेतीमाल विक्रीसाठी सहकारी पतपेढ्या स्थापन करायला प्रोत्साहन दिले.

**शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी केलेले कार्य :-**

1. इ.स. 1896-97 आणि 1899-1900 या काळात कोल्हापूर संस्थानात दोन मोठे दुष्काळ पडले होते. दुष्काळावर मात करण्यासाठी व शेतीच्या शास्वत विकास करुन तथा शेतीला पुरेसा व हमखास पाणी पुरवठा होण्यासाठी 1902 मध्ये "सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहिर केले. त्यासाठी त्यांनी पाटबंधारे खाते व इरिगेशन ऑफिसरची नेमणुक केली. त्याच प्रमाणे सिंचन विकासाच्या योजना त्वरीत अंमलात आणल्या. नव्या व जुन्या विहीरी,छोटे-मोठे तलाव, लहान मोठे बंधारे यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेतली. तसेच नाल्यामध्ये दगड-रेती टाकून बंधारे बांधले. या सुविधामुळे कोल्हापूर संस्थान मध्ये कृषी क्षेत्रात कांती घडून येण्यास मदत झाली.
2. कोल्हापूर संस्थानातील शेती सुजलाम् सुफलाम् होण्यासाठी, संपूर्ण जमीनक्षेत्र सिंचन क्षेत्राखाली येण्यासाठी 'राधानगरी धरणाची कल्पना त्यांच्या मनात आली. 1909 मध्ये राधानगरी धरणाच्या बांधकामाला सुरुवात केली. 1918 सालापर्यंत राधानगरी धरणास 14 लाख रुपये खर्च करण्यात आले आणि चाळीस फुटापर्यंत बांधकाम झाले. या धरणातून दरवर्षी सहाशे

दशलक्ष घनफुट पाणी शेतीसाठी उपलब्ध झाले. शेतीला बारा महिने पाणी उपलब्ध झाल्याने शाहू महाराजांचे हरित क्रांतीचे स्वप्न त्यांच्या हयातीत साकार झाले.

3. युरोपमध्ये शेती शास्त्रीय पध्दतीने केली जात असल्याने शेतीपासून अधिक उत्पादन घेता येते. हे शाहू महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते. तेव्हा आपल्या देशातही कृषी क्षेत्रात शेतीसंबंधी आधुनिक बियाणे, रासायनिक खते, व आधुनिक मशागत पध्दती याचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. याचा फायदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात झाला.
4. कोल्हापूर संस्थानातील शेतक-यांना शेतीसंबंधी आधुनिक साधनांची माहिती व प्रसार व्हावा या उद्देशाने घोडे व गुरांची वार्षिक प्रदर्शना बरोबरच कृषी उत्पादनाची दालन मांडण्याची प्रथा सुरु केली. शाहू महाराजांनी चिंचली या गावी 4 फेब्रुवारी 1896 रोजी पहिले प्रदर्शन भरविले. प्रदर्शनामध्ये मोठया संख्येने शेतकरी वर्ग यावा यासाठी कुस्त्यांची दंगल, मर्दानी खेळाचे सामने व हत्तीच्या झुंज यासारखे करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले.
5. शेतीमध्ये परंपरागत पिकांबरोबर आधुनिक पिके जसे चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, कोको यासारखी पिके घेतली तर शेतीक्षेत्राचा कायापालट होऊ शकेल याची खात्री शाहू महाराजांना होती. म्हणुन शाहू महाराजांनी संस्थानातील पश्चिम भागात मुबलक पर्जन्यमान असणाऱ्या सह्याद्रीच्या भागात नव्या पिकांची लागवड केली. संशोधीत वाणाची पिके यांच्या रोपांची लागवड शेतकऱ्यांनी करावी. यादृष्टीने अनेक रोपवाटीका दरबारातर्फे तयार करुन घेतल्या.
6. कुटुंबातील वाढत्या सदस्यसंख्येमूळे शेत जमिनीचे हिस्से वाटे होत राहिल्याने शेतीचा आकार लहान-लहान होत आहे. छोटया आकाराची शेत जमिन कसण्यासाठी अडचण व आर्थीक दृष्ट्या परवडणारी नसल्याने उदरनिर्वाह कठीण होते. त्यामूळे उपासमारीचे संकट कोसळते. परीणामी तरुणामध्ये गुन्हेगारीची प्रवृत्ती निर्माण होते. याची खात्री शाहू महाराजांना होती म्हणुन त्यांनी सर्व वतनी जमीनी अविभाज्य करुन टाकल्या. एवढेच नव्हे तर सामान्य शेतक-याच्या मुलांनी शेती बरोबरच शेती पुरक व्यवसाय करावा यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे शेती क्षेत्रातील हंगामी बेरोजगारी दूर होवून शेतक-यांच्या व शेतमजुरांच्या उत्पन्नात वाढ होईल. अशी शाहू महाराजांची विचारधारा होती.

**निष्कर्ष -** शेतीच्या विकासासाठी आजही पाण्याची व विजेची पाहिजे तशी व्यवस्था नाही. शाहुच्या शेती विकासाच्या पद्धतीनुसार पाण्याचे स्रोताचे व्यवस्थापन करुन शेती ही जास्तीत जास्त ओलिताखाली आणून शेतीचा विकास करावयास पाहिजे. आजच्या सहकारी चळवळीमध्ये भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्या होतात. त्यासाठी शाहूच्या विचारांची गरज असून शेतकऱ्यांसाठी कृषिविषयक बँकामार्फत ५० टक्के कर्जात सुट देऊन अवजारे, बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांचा सवलतीच्या दराने पुरवठा केला पाहिजे. शाहू महाराजांनी जुन्या शेती क्षेत्रास नवीन पद्धतीचा वापर करुन आधुनिक शेतीकडे वळवून एक हरित क्रांती केली. 'राधानगरी धरण', कालवे, बंधारे, विहिरी इत्यादी पाण्याचे स्रोत उपलब्ध करुन नवीन पिकाचे उत्पादन घेऊन कोरडवाहू शेती ओलिताखाली आणून अधिक विकासाला चालना दिल्याचे आढळते. अशा या दूरदृष्टी असणाऱ्या लोकराजा राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शेतीचा आणि शेतकऱ्यांचा कायापालट करून टाकला.

**संदर्भ सूची :-**

1)भारत वाघमारे संकलीत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज जीवन आणि शैक्षणिक विचार, प्रबुध्दभारत प्रकाशन, नागपूर
2) भारत वाघमारे संकलीत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज जीवन आणि शैक्षणिक विचार,
जाधव, बी. बी. (संपा.) छत्रपती शाहु महाराज यांची भाषणे, कोल्हापूर, १९७१,
3) पवार, वसुधा शाहु छत्रपती एक अभ्यास, सुमेरु प्रकाशन, पहिली आवृत्ती, २५ नोव्हें, २००४,
4) दै. पुढारी, छ. शाहु जन्मशताब्दी विशेषांक संपा. ग. गो जाधव,
5) साठम, द. ना., आधुनिक भगीरथ राजर्षी शाहु, प्रहार प्रकाशन, कोल्हापूर,
6) साळुखे, हिंदुराव, उपरोक्त,
7) कीर, धनंजय, राजश्री शाहु छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९७९,
8) कुंभार नागोराव, राजर्षी शाहु महाराज, 9) डॉ. घुगे वि. बा., राजर्षी शाहु अ मॉडेल रुलर, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, १९९४,
10) लडे, ए. बी., छ. शाहु महाराजांचे आत्मचरित्र, खंड १, द टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई, १६२४,
11) डॉ.माने अ. रा., छत्रपती राजाराम व त्यांचा काळ, पीएच्. डीचा अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, डिसेंबर, २००४.
12) साळुंखे हिंदुराव, छ. शाहु स्मृतिदर्शन, उपरोक्त,

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

24

# राजर्षी शाहू महाराज यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन, हुकूम आणि कायदे

**डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील**
इतिहास विभाग प्रमुख,
मिरज महाविद्यालय, मिरज, महाराष्ट्र

**प्रस्तावना -** राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती आणि समाजसुधारक होते. त्यांच्या नेतृत्वात महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. त्यांनी महिलांना शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केलेल्या कार्यामुळे भारतीय समाजातील महिलांच्या स्थितीत लक्षणीय बदल झाला. या षोनिबंधात आपण त्यांच्या महिलाविषयक कार्याचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

**बीज शब्द -**राजर्षी शाहू महाराज यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन,कायदे, सक्षमिकरण, कार्य

**उद्दिष्ट्ये -** १. राजर्षी शाहू महाराज यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन आणि कार्याचा अभ्यास करणे

२. राजर्षी शाहू महाराज यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन आणि कार्याची वर्तमान कालीन उपयुक्तता तपासणे.

**संशोधन पद्धती-**सदर निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. प्राथमिक व दुय्यम साधने वापरलेली आहेत.

**राजर्षी शाहू महाराज यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन -**विसाव्या शतकातील एक महान समाजसुधारक म्हणजे राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती होते. त्यांच्या विचारांमध्ये समाजातील सर्व घटकांना समान हक्क आणि सन्मान मिळावा, अशी प्रबल भावना होती. विशेषतः महिलांच्या बाबतीत त्यांनी केलेले कार्य आणि विचार आधुनिक काळातही प्रेरणादायी ठरतात.शाहू महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अत्यंत प्रगत आणि समतावादी होता. त्या काळात स्त्रिया समाजात दुय्यम दर्जाची वागणूक भोगत होत्या. त्यांच्यावर अनेक सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक बंधने होती. या सर्व बंधनांना तोडून स्त्रियांना स्वतंत्र, सन्माननीय आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी शाहू महाराजांनी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी महिलांसाठी शिक्षणाचा प्रसार केला, कारण शिक्षण हेच सशक्तीकरणाचे प्रभावी साधन आहे. बालविवाह प्रतिबंधक कायदा, विधवा पुनर्विवाह कायदा, सती प्रथा बंदी कायदा असे विविध कायदे लागू करून त्यांनी स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण केले. महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळावे म्हणून त्यांनी महिलांसाठी संपत्तीचे हक्क सुनिश्चित केले. शाहू महाराजांचा महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेला प्रयत्न त्यांच्याच काळात नव्हे तर आजही स्त्रीपुरुष समानतेसाठी एक आदर्श मानला जातो

**समानतेचा दृष्टिकोन**: शाहू महाराजांनी स्त्री-पुरुष समानतेचा आदर्श मानला. त्यांचा विश्वास होता की महिलांना पुरुषांसारख्या सर्व संधी आणि अधिकार मिळायला हवेत. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, व्यवसाय आणि समाजात उच्च स्थान मिळवून देण्यासाठी कष्ट केले.

**शिक्षणाची महत्व** शाहू महाराजांचा एक महत्त्वपूर्ण विचार म्हणजे स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. शिक्षण हे सशक्तीकरणाचे साधन आहे, असे त्यांचे ठाम मत होते. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा, महाविद्यालये, वस्तीगृहे स्थापन केली, ज्यामुळे अनेक स्त्रिया शिक्षित होऊ शकल्या.

**स्वतंत्रता आणि आत्मनिर्भरता:** स्त्रियांना आत्मनिर्भर बनविणे हे शाहू महाराजांचे एक प्रमुख ध्येय होते. त्यांनी स्त्रियांना व्यवसाय आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी विविध उपक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. त्यांनी कुटीर उद्योग, हस्तकला आणि इतर व्यवसायांमध्ये स्त्रियांना सहभागी होण्यास प्रोत्साहित केले.

**सामाजिक सुधारणा:** शाहू महाराजांनी स्त्रियांवरील अन्यायकारक प्रथा आणि कुप्रथांचा विरोध केला. त्यांनी बालविवाह, सती प्रथा आणि अन्य अन्यायकारक प्रथा बंद करण्यासाठी कायदे केले. या सामाजिक सुधारणा स्त्रियांना एक नवीन जीवन दिले आणि त्यांना समाजात सन्मानित स्थान मिळवून दिले.

**स्त्री-पुरुष समान हक्क:** शाहू महाराजांनी स्त्रियांना संपत्ती आणि वारसा हक्क दिले. त्यांनी स्त्रियांना संपत्तीचे समान हक्क मिळवून दिले, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली. यामुळे स्त्रियांना समाजात आर्थिक स्वातंत्र्य मिळाले.

**राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले स्त्रीविषयक कायदे, हुकुमनामे , जाहीरनामे -** शाहू महाराजांनी महिलांच्या हितासाठी विविध कायदे आणि नियमावली लागू केली. त्यांनी महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या. यामुळे महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूकता आली आणि त्यांना सुरक्षितता मिळाली.महिलांना स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याची संधी मिळाली आणि त्यांचा आत्मसन्मान वाढला.

*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**१. ' प्रसुतीविद्या 'ग्रंथाविषयी जाहीरनामा - ३० जानेवारी १८९७ -** महाराजांच्या दरबारातील एक डॉक्टर विष्णू गोपाळ आपटे यांनी लिहिलेले 'प्रसुतीविद्या' हे पुस्तक सर्वांनी वाचावे म्हणून महाराजांनी एक जाहीरनामा काढलेला होता.[1] सर्व सामान्य माणसाला स्त्रियांच्या शरीर शास्त्राची पुरेशी माहिती नसते. पण असणे अत्यंत आवश्यक आहे हे महत्त्व लक्षात घेऊन शाहू महाराजांनी अतिशय सोप्या भाषेत असणारे हे पुस्तक माफक दारात उपलब्ध करून त्या संदर्भात जाहीरनामा काढलेला होता.

**२.मिस कृष्णाबाई केळवकर यांच्यासंदर्भातील हुकूमनामा - १२ फेब्रुवारी १९०४ -**कृष्णाबाई केळवकर या इंग्लंडमधील वैद्यकशास्त्रातील उच्च शिक्षणाची पदवी घेऊन कोल्हापूरमध्ये परतल्या होत्या. शाहू महाराजांच्या प्रोत्सानामुळेच त्यांनी ही पदवी प्राप्त केली होती. कोल्हापुरातील अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल मध्ये लेडी डॉक्टर म्हणून १६ जानेवारी १९०४ पासून दरमहा २५ रुपये वेतनावर नियुक्ती व बढती करण्यात आल्याचा १२ फेब्रुवारी १९०४ रोजीचा हुकूमनामा आहे.[2] स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे तसेच शिकलेल्या स्त्रियांना आपल्या विद्वितेनुसार संधी देणे हे सुद्धा शाहू महाराजांनी महत्त्वपूर्ण कार्य केल्याची दिसून येते.

**३. स्त्रियांची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्या वयात आल्याचा कायदा व हुकूमनामा - ८ सप्टेंबर १९०६-** करवीर संस्थानात एका वटहुकुमामध्ये इसम वयात आल्याचे वय अठरा वर्षे पूर्ण असे नमूद केले होते . (कि.आ. नंबर ६८५, तारीख १८ ऑगस्ट १९०६ ) यामध्ये 'इसम' असा मोघम शब्द होता . 'स्त्री' असा विशेष उल्लेख नव्हता. शाहू महाराजांनी ८ सप्टेंबर १९०६ मध्ये वरील कायद्यामध्ये स्त्रियांचा समावेश केला. "पुरुषाप्रमाणे स्त्रियांच्या वयाची १८ वर्षे पुरी झाल्याचे खात्री झाली म्हणजे वयात आली असे समजावे" असा हुकूमनामा काढला.[3] स्त्रियांचे विवाहाचे वय किती असावे यासंदर्भामध्ये अठरा वर्षे निश्चित करणे हे शाहू महाराजांचे अत्यंत धाडसाचे व पुरोगामी कार्य होते.

**४. शिक्षणाचा सक्तीचा जाहीरनामा - २४ जुलै १९१७ कायदा - २१ सप्टेंबर १९१७** - शाहू महाराजांनी १९१७ मध्ये शिक्षण सक्तीचा कायदा लागू केला, ज्यामुळे मुलींना शाळेत जाणे अनिवार्य झाले.[4] हा कायदा मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल होते आणि यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोठा वाव निर्माण झाला.

**५. श्रीराधाबाई अक्कासाहेब महाराज स्कॉलरशिप व श्री नंदकुवर महाराणी भावनगर स्कॉलरशिप - ३ मार्च १९१३-** करवीर संस्थानातील हुशार मुलींना शिक्षणात प्रोत्साहन मिळावे म्हणून शाहू महाराजांनी राज कन्या राधाबाई उर्फ अक्कासाहेब महाराज व भावनगरच्या महाराणी नंदकुवर यांच्या नावाने गुणवत्ता शिष्यवृत्ती जाहीर केल्या होत्या. या स्कॉलरशिपच्या अनुषंगाने स्त्रियांच्या शिक्षणासंदर्भात शाहू महाराज किती जागृत होते हे लक्षात येते. स्कॉलरशिप संबंधाने जी नियमावली तयार केली होती त्या नियमांमध्ये काही उल्लेखनीय बाबी होत्या. उदाहरणार्थ, ज्या विद्यार्थिनींना स्कॉलरशिप मिळणार आहे त्या विद्यार्थिनीने पुढील शिक्षण चालू ठेवणे आवश्यक होते. दरवर्षी ४० रुपये अशी स्कॉलरशिप एक वर्षापर्यंत देण्यात येणार होती. कोल्हापूर शहर व बावडा-इन्फंट्री यातील शाळातील मुलींच्या मराठी चौथ्या इयत्तेच्या वार्षिक परीक्षेतील सर्वात वर येणाऱ्या दोन मुलींना "श्रीराधाबाई अक्कासाहेब महाराज स्कॉलरशिप" देण्यात येणार होती. तसेच कोल्हापूर इलाख्यामध्ये ज्या प्रथम तीन मुली येतील त्यांना "श्रीनंदकुवर महाराणी भावनगर स्कॉलरशिप" देण्यात येणार होती. ही स्कॉलरशिपची रक्कम एकूण ४० रु. दर तीन महिन्यातून विभागून दिली जाणार होती. या स्कॉलरशिप शिवाय उत्तम वर्तणूकीबद्दल "श्री. सौ. राधाबाई अक्कासाहेब महाराज" यांच्या नावाने एक ४० रुपयाचे बक्षीस देण्यात येणार होते.[5]

६. **विधवा पुनर्विवाह कायदा - जुलै १९१७ -** मागासलेल्या समाजातील अनेक जातीमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते पण उच्चवर्णीय जातीमध्ये ते नव्हते त्यामुळे उच्चवर्णीय जातीतील अनेक स्त्रियांना अत्यंत दुःखी व उपेक्षित जीवन जगावे लागत असे. शाहू महाराजांनी या विधवा पुनर्विवाह कायद्याद्वारे उच्चवर्णीय जातीतील अनेक स्त्रियांना संभाव्य अन्याय व अत्याचाराला विरोध करण्याचे साधन उपलब्ध करून दिले.[6]

**७. आंतरजातीय विवाह कायदा - १२ जुलै १९१९ -** आंतरजातीय विवाह कायदा कोल्हापूर संस्थांनमध्ये संमत करण्यात आला. या अन्वये संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना जातीनिर्बंध न पाळता दोहो पैकी आपआपल्या कोणतेही धर्माच्या मनुष्यबरोबर लग्न करण्याची मुभा दिली गेली. याच कायद्यामध्ये १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची अथवा पालकाची संमती आवश्यक असणार नाही असेही कलम होते.[7] म्हणजेच स्त्रीला आपला जन्माचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे हे वैशिष्ट्यपूर्ण पुरोगामी कलम होते. विवाह नोंदणीसाठी विवाह नोंदणी अधिकारीही नियुक्त केला होता.

**८. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा - २ ऑगस्ट १९१९ -** कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा पास करून अत्यंत त्रासदायक व जुलमी अन्यायामधून महिलांची सुटका केली. या कायद्याचा भंग केल्यास सहा महिन्याचा करावास व दोनशे रुपये पर्यंत दंडाची

शिक्षा अशी तरतूद केली होती.[8] यामध्ये एकूण ११ कलमे आहेत. या कायद्यामुळे घरातीलच पुरुष वर्गाकडून स्त्रियांवर होणारे अत्याचार व हिंसा याला आळा घालण्यास मदत झाली.

**९. वारसा हक्क आणि घटस्फोट कायदा - जानेवारी १९२०** - वारसा हक्काच्या कायद्यात शाहू महाराजांनी काही महत्त्वाच्या दुरुस्त्या केल्या. यानुसार विविध वर्णव्यवस्था नुसार वारसा हक्कातील फरक काढून टाकला गेला. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात घटस्फोटासंबंधीचा कायदा याच सुमारास आणला. त्यामध्ये स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर तिच्या अन्न वस्त्राच्या खर्चाची योग्य ती व्यवस्था कशी केली जाईल याकडे लक्ष ठेवून कलमे तयार केली.[9] वैवाहिक संतती असेल तर त्याच्या ताब्याबद्दलची पोटगी बद्दल व शिक्षणाबद्दलची व्यवस्था ही या कायद्यामध्ये लावली गेली. या कायद्याने जातपंचायतीला घटस्फोटाचे असलेले अधिकार काढून घेतले गेले.

**१०. देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा -१७ जानेवारी १९२०** - देवाच्या नावावर मुली सोडण्याच्या रूढीतून देवदासी वर्ग निर्माण होत असे. दलित स्त्रियांमध्ये देवदासी ही क्रूर प्रथा होती. या देवदासी जोगतीण , मुरळी, भावीण या रूपामध्ये अत्यंत दयनीय अवस्थेत जगत होत्या. या देवदासी म्हणजे हिंदू समाजावरील कलंकच होता. या स्त्रियांचे जीवन अत्यंत नर्कच होते, अशा स्त्रियांना स्वातंत्र्य, मुक्ती, समान दर्जा आणि न्याय देण्यासाठी हा कायदा करण्यात आला.[10]

**११.शिमग्याच्या सणात स्त्रीविषयक बीभत्स भाषा वापरणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कारवाईचा हुकूमनामा - २१ मार्च १९२१. -** शिमग्याच्या सणात स्त्रियांना उद्देशून निंद व बीभत्स भाषा वापरण्यात येत असे. ही चाल लाजिरवाणी व स्त्रियांच्या बाबतीत अपमान कारक आहे. शाहू महाराजांनी या विरोधात एक हुकूम काढून ती भाषा वापरण्यासाठी मनाई केली.[11] हा एक स्त्रियांच्या बाबतीतील फार मोठा सन्मानाचा विषय होता. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सारखेच शाहू महाराजांनी सुद्धा स्त्रियांना आदर देण्याचे धोरण आचरणात आणले होते हे लक्षात येते. याशिवाय शाहू महाराजांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविल्या. त्यांनी महिलांना व्यवसाय आणि उद्यमशीलतेच्या क्षेत्रात प्रोत्साहन दिले. त्यांनी महिलांना कुटीर उद्योग, हस्तकला, विणकाम इत्यादी क्षेत्रात प्रशिक्षण दिले. यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळाली महिलांच्या आरोग्यसेवेकडे विशेष लक्ष दिले. त्यांनी महिलांसाठी आरोग्य केंद्रे, दवाखाने आणि प्रसूतीगृहे स्थापन केली. यामुळे महिलांच्या आरोग्याची काळजी घेतली गेली.

**निष्कर्ष:** राजर्षी शाहू महाराजांचे महिलाविषयक कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या नेतृत्वात महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यदृष्ट्या स्थितीत सुधारणा झाली. त्यांनी महिलांना सशक्त, स्वावलंबी आणि आत्मसन्मान प्राप्त करून दिला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात महिलांना प्रतिष्ठा आणि सन्मान मिळाला. त्यांच्या स्त्रीविषयक विचारांमध्ये आधुनिकता, समानता, आणि स्त्रीपुरुष समानतेची प्रबल भावना होती. त्यांनी स्त्रियांना समाजात योग्य स्थान मिळवून देण्यासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सुधारणा केल्या. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक विचार त्यांचा दूरदृष्टी आणि समाजसुधारक दृष्टिकोन दर्शवतात. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, समानता, आणि स्वातंत्र्य दिले. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजातील महिलांना नवीन दिशा मिळाली आणि त्यांनी समाजात सन्मान आणि प्रतिष्ठा मिळविली. शाहू महाराजांचे स्त्रीविषयक विचार आजही प्रेरणादायी आहेत आणि समाज सुधारण्यासाठी आदर्शवत आहेत.

**संदर्भ -**

१. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकुमानामे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००६, पृष्ठ क्र. ७.
२. कित्ता,पृष्ठ क्र. २५.
३. कित्ता,पृष्ठ क्र. ३२.
४. अ. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर,२०१३, पृष्ठ क्र.९७.
ब. डॉ. मोरे गिरीश, राजर्षी शाहू: विचार व कार्य, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २००९, पृष्ठ क्र. ५३.
५. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकुमानामे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,२००६, पृष्ठ क्र. ६०.
६. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर,२०१३, पृष्ठ क्र.९१.
७. कित्ता,पृष्ठ क्र. ९२.
८. कित्ता,पृष्ठ क्र. ९३.
९. कित्ता,पृष्ठ क्र. ९३.
१०. कित्ता,पृष्ठ क्र. ९४.
११.डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकुमानामे, मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,२००६, पृष्ठ क्र. १२७.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

25

# छत्रपती शाहू महाराज आणि आरक्षण

**निवास गणपती पाटील**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :** समाजातील दुर्लक्षित,मागास आणि वंचित घटकांसाठी सर्व देशांमध्ये कमी-अधिक प्रमाणात काही सोयी सुविधा दिल्या जातात. अशा घटकांनी मुख्य प्रवाहात यावे, समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी हातभार लावावा ह्या दृष्टीने अशा समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठी अशा सुविधांची गरज असते. भारताचा विचार करता भारतात अशा विविध घटकांच्या विकासासाठी अनेक योजना, सुविधा, महामंडळे, आयोग इत्यादी तयार करण्यात आलेले आहे. अशा वंचित घटकांच्या उन्नतीसाठी भारतात राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांत आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये ठराविक समाज घटकांना आरक्षण देण्याची सुविधा केली असली तरी ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. त्याच बरोबर त्यांनी कोल्हापूर संस्थानात आरक्षण धोरण लागू केले. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले.

**उद्देश :**

१.आरक्षण आणि आरक्षणाची गरज अभ्यासणे.

२. छत्रपती शाहू महाराज यांचे आरक्षण धोरण अभ्यासणे.

**विषय विवेचन :**

**आरक्षण :-** समाजातील दुर्लक्षित, मागास आणि वंचित घटकांसाठी सर्व देशांमध्ये कमी-अधिक प्रमाणात काही सोयी सुविधा दिल्या जातात. अशा घटकांनी मुख्य प्रवाहात यावे, समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी हातभार लावावा ह्या दृष्टीने अशा समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठी अशा सुविधांची गरज असते. म्हणूनच राखुन ठेवणे व ज्यासाठी जे राखुन ठेवले त्यांनाच ते देडणे असा आरक्षणाचा अर्थ आहे. आरक्षणाच्या मागे काही हेतून असतो तत्त्व असते. त्यात सर्वांचेच हित असते.

**आरक्षणाची गरज :-** ज्या समाजावर वर्षांनुवर्षे अन्याय झाला तो अन्याय दूर करून त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची सुविधा देण्यात आली आहे, याला अनेकदा 'सकारात्मक भेदभाव' असे म्हटले जाते. हा भेदभाव कोणाच्या विरुद्ध नसून कोणाच्यातरी कल्याणासाठी केलेला असतो. समाजातील सर्व घटकांना विकास प्रक्रियेत सहभागी करून घेणे हे 'कल्याणकारी राज्याचे' एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. ऐतिहासिक अन्याय वर्तमानात किती खेचायचा असे म्हणत काही लोक आरक्षणाला पूर्णतः विरोध करतात. मात्र हा विरोध तात्विकदृष्ट्या योग्य नाही असे म्हणता येते. कारण ठराविक समाजाला ऐतिहासिकरीत्या फायदा झाल्याने त्या सकारात्मक गोष्टींचा फायदा वर्तमानातही त्या समाजाच्या पुढील पिढ्या घेत आहेत. म्हणूनच ही दरी भरून काढण्यासाठी आरक्षण ही सुविधा काम करत असते. आरक्षण दिल्याने कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होईल असे म्हटले जाते. मात्र कार्यक्षमतेसाठी आपण कोणते निकष वापरतो यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत.

**शाहू महाराज आणि आरक्षण** :-"बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या मुलमंत्राने भारावलेले शाहू महाराज नवयुगातील राष्ट्रपुरुष होते. गरीबांना न्याय मिळावा, गरिबांना माणूस म्हणून जगता आले पाहीजे, यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या काळात गरिबांसाठी आरक्षणाचे धोरण राबवले. तत्कालीन समाजव्यवस्थेने गरीब हा गरीबच राहील यासाठी फारमोठ्या प्रमाणात प्रयत्न केले होते. ब्राम्हण वर्गाने सत्ता - संपत्ती व प्रतिष्ठेची समाजातील मक्तेदारी आपल्याकडेच कशी राहील. यासाठी प्रयत्न केले होते. याची जाणीव ठेवून राजर्षी शाहूंनी आपल्या संस्थानात अनेक क्रांतीकारी कायदे निर्माण केले. त्यातील महत्वाचा कायदा आहे. राजर्षी शाहू गादीवर

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

येण्याच्या आधी जवळपास वीस वर्ष नोकरशहाच्या हातामध्ये संस्थानाचा सारा कारभार होता. यामध्ये एका विशिष्ट जातीच्याच नोकराचे वर्चस्व होते. ही मक्तेदारी मोडून काढून बहुजन समाजातील नवशिक्षीत तरुणांना राज्यकारभारात सहभागी होण्याची राजर्षी शाहूंनी संधी दिली. त्यामूळेच रावबहादूर रघूनाथराव सबनीस, नाम.भास्करराव जाधव, रावबहादूर अण्णासाहेब लठ्ठे, डोंगरे, डी.आर.भोसले यासारख्या बहुजन समाजातील अनेक कर्तबगार व्यक्ती पुढे आल्या जन्मापेक्षा गुणवत्तेवर आधारित सामाजिक दर्जा व स्थान हे आधुनिकतेचे सूत्र स्विकारुन त्यांनी आपल्या प्रशासनात आवश्यक ते बदल केले होते. प्रशासनाचे स्वरुप केवळ नोकरशाहीचे असू नये, जनमता बाबत प्रशासनाने संवेदनक्षम असायला पाहिजे प्रशासनाचे पावित्र्य कोणत्याही परिस्थितीत अबाधित राहिले पाहिजे,या सर्व आग्रहामधून राजर्षी शाहूची आधुनिक दृष्टी प्रत्ययास येते.

**वेदोक्त प्रकरण** :-वेदोक्त प्रकरण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वादास शाहू छत्रपतींच्या जीवनात तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातही फार महत्त्वाचे स्थान आहे. "वेदोक्त प्रकरणाची मुळे थेट शिवाजीच्या काळापर्यंत जाऊन भिडतात. शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळी हाच वाद निर्माण झाला होता." (फडके, (१९८६):४३) महाराष्ट्रातील कृतघ्न ब्राह्मणांना गागाभट्टाकरवी निरुत्तर केले. पुढे छत्रपती थोरले शाहू महाराज ह्यांनी अष्टप्रधान मंडळ मोडून ब्राह्मणांना पेशवेपद वंशपरंपरेने बहाल केले आणि पेशव्यास सातारा राजधानीत राहण्यास भाग न पाडता त्याला पुण्यास राहू दिल्यामुळे पेशवाई राज्यात ब्राह्मणांनी वेदोक्त प्रकरणे गाजवून ब्राह्मणेतरांचा धार्मिक व सामाजिक छळ केला. वादाला मूळ झाले असे, "पंचगंगेवर कार्तिक महिन्यात (ऑक्टोबर१८९९) शाहू छत्रपती, त्यांचे बंधू आप्पासाहेब घाटगे, मामासाहेब खानविलकर, राजारामशास्त्री भागवत व इतर मंडळी स्नानासाठी गेली असता नारायण भटजी हा शाहूंचा पुरोहित महाराज स्नान करीत असताना जो मंत्र म्हणत होता ते मंत्र पुराणोक्त असल्यामुळे राजारामशास्त्री भागवतांनी महाराजांचे लक्ष वेधले. शाहूंनी याचा खुलासा नारायण भटजीला विचारताच नारायण भटजीने पुढचा मागचा विचार न करता शूद्रांना पुराणोक्त मंत्रच म्हणावयाचे असतात, हे स्पष्ट केले." (कीर, (१९९२) : ८२) शाहू महाराजांच्या अपमानामुळे संपुर्ण बहुजन समाज एक झाला व त्यांच्या मनात ब्राह्मणा विषयी रोष खदखदू लागला. त्यावेळी कोल्हापूर नगरपालिका ब्राह्मणमय होती. पंचगंगेवर ब्राह्मणांसाठी वेगळा घाट राखीव ठेवला होता. नगरपालिकेने महाराजांच्या अपमानाचा बदला घेण्याची वेळ आली. ऑगस्ट १९०० मध्ये बहुजन समाजाने हातात बंडाचा झेंडा घेतला. यामुळे शाहू महाराज यांनी "नोव्हेंबर १९०१ मध्ये राजवाडयातील धार्मिक विधी वेदोक्त पध्दतीने करण्याबद्दल फर्मान सोडले. हुकुमाप्रमाणे धार्मिक विधी न केल्याबद्दल १ मे १९०२ रोजी राजोपाध्यांचे वार्षिक इनाम जप्त करण्यात आले." (साळुंके, (मार्च ८८) : २४०) अशा प्रकारे या वेदांत्त प्रकरणाने पाच वर्षाचा सामाजिक संघर्ष झाला. त्या सामाजिक संघर्षातून आरक्षण निर्माण झाले. मागासलेला समाज आहे, त्यांच्यासाठी काही तरी व्यवस्था करावी लागेल, असे शाहू महाराजांचे म्हणणं पडले. त्यातून आरक्षण धोरणाचा उदय झाला.

**आरक्षणाची सुरुवात :-**आरक्षण देण्याची प्रमुख कारणे म्हणजे ठराविक समाजावर झालेला ऐतिहासिक अन्याय आणि प्रत्येक समाजाचे प्रतिनिधित्व शासनात असणे ही आहेत. आरक्षण समाजातील जाती व्यवस्था किंवा जातीयवाद कमी करण्यासाठी आहे असा काहींचा समज आहे, मात्र आरक्षणाचा आणि ह्या गोष्टींचा काहीही संबंध नाही. आरक्षणाने जाती व्यवस्था किंवा जातीयवाद कमी होतो असे कोठे निदर्शनास आलेले नाही. भारतीय समाजाचा विचार करता सुरुवातीला वर्णव्यवस्था होती मात्र नंतर तयार झालेली जातीव्यवस्था यामुळे समाजातील ठराविक घटकांवर हजारो वर्षे अन्याय झाल्याचे आपल्याला दिसते. अशा ऐतिहासिक अन्यायाच्या कारणामुळे ठराविक सामाजिक घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना विशेष सुविधा द्याव्यात म्हणून आरक्षण ही संकल्पना सुरू झाली. मात्र 'सामाजिक न्यायाचे साधन म्हणून सुरू झालेले आरक्षण स्वतःच एक साध्य झाल्याचे' आपल्याला दिसते. याची सुरुवात १८८२ मध्ये झाली,विल्यम हंटर यांनी भारतात जाती आधारित आरक्षण सुरू व्हावे ही कल्पना मांडली तर शाहू महाराजांनी ही प्रत्यक्षात उतरविली, शाहू महाराजांना सर्व जाती-धर्मांच्या लोकांचा उत्कर्ष साधावयाचे धोरण निर्माण केले आहे. त्यांनी एकाच जातीच्या हाती राज्यकारभाराची सर्व सूत्रे ठेवण्याचे अन्यायकारक धोरण न राबवता सर्व जातींना स्थान दिले गेले. त्यासाठी मागासलेल्या जातींना पन्नास टक्के नोकऱ्या राखून ठेवणारा व मागासांच्या सामाजिक, राजकीय जीवनात एक नवे पर्व सुरू करणारा एक क्रांतिकारक जाहीरनामा २६ जुलै १९०२ रोजी शाहू छत्रपतींनी इंग्लंडमधून काढला. त्यात राजर्षी म्हणतात, हा हुकूम पोहचल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागांपैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकातील भराव्यात. वास्तवात मागासच असलेल्या मराठा-शेतकरी, जैन, लिंगायत व इतर तत्सम जाती यांचाही समावेश होता हे दिसते. यावरून त्यांची समाजाचे सूक्ष्म अवलोकन करण्याची क्षमता व दूरदृष्टी दिसून येते. शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणा बाबत भाई माधवराव बागल यांनी एक किस्सा लिहून ठेवला आहे. शाहू महाराजांच्या नंतरचं कोल्हापुरातील एक महत्त्वाचं व्यक्तिमत्त्व म्हणून भाई माधवराव बागल यांचं नाव घेतलं जातं. ते शाहू महाराजांचे समकालीन म्हणूनही ओळखले जातात. भाई बागल यांनी शाहू महाराजांच्या आठवणी नावांचं

एक किस्सेवजा पुस्तक लिहिलं आहे. या पुस्तकात त्यांनी शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणाबद्दलचा एक किस्सा नोंदवला आहे. शाहू महाराजांच्या बहुजनांना आरक्षण देण्याच्या निर्णयावर अभ्यंकर नावाच्या एका वकीलाने आक्षेप घेतला. तुम्ही आरक्षण कुठल्या न्यायाने दिले, असा सवाल केला. ज्याच्यात क्षमता आहे, तो पुढे जाईल, असे त्याने शाहू महाराजांना सांगितले. महाराजांनी वकीलाचे म्हणणं शांतपणे ऐकून घेतले. घोड्याच्या पागेत बसलेल्या शाहू महाराजांनी वकीलाला तिथेच एक प्रयोग करून दाखवला. शाहू महाराजांनी मोतदारांना घोड्यांची चंदी जमिनीवर टाकायला सांगितली. सगळीकडे चंदी टाकण्यात आली. नंतर महाराजांनी घोड्यांचा सांभाळ करणारे जे मोतदार होते त्यांना सांगितलं, सगळे घोडे सोडून द्या. मोतदारांनी पागेतली सर्व घोडे सोडून दिले. मोतदारांनी जसे सोडून दिलं तसं घोडे चंदी खाण्यासाठी तुटून पडले. पण सगळी चंदी धष्टपुष्ट घोड्यांनीच खाऊ टाकली. सर्व चंदी फस्त केली. अशक्त, कमजोर, लुळीपांगळी घोडी, तसेच मागे राहिली. मग शाहू महाराजांनी त्या वकीलाला सांगितलं, माझं आरक्षण धोरण हे अशा लोकांसाठी आहे. जे लोक धष्टपुष्ट नाहीत, कमजोर, कमकुवत आहेत, अशा लोकांसाठी आहे. धष्टपुष्ट, ताकदवान घोडी कमजोर, कमकुवत घोड्यांना काहीच खाऊ देत नाहीत. आरक्षण अशाच कमकुवत लोकांना आरक्षण धोरणातून संधी दिली जाते.

अशा प्रकारे शाहू महाराज यांना कोल्हापूर राज्यात ब्राह्मणांची लोकसंख्या ३ ते ४ टक्क्यांच्या दरम्यान होती, परंतु सरकार आणि प्रशासन आणि शिक्षण या पदावर त्यांचा वाटा सुमारे ७०ते ८० % टक्के असल्याचे दिसून आले. १८९४ मध्ये शाहूजी महाराज राजा बनले तेव्हा सर्वसाधारण प्रशासनाच्या एकूण ७१ जागांपैकी ६० जागांवर ब्राह्मण अधिकारी होते. १९०२मध्ये शाहूजी महाराजांच्या सूचनेनुसार इतर जातींसाठी ५० टक्के आरक्षण लागू झाले आणि २० वर्षांत परिस्थिती बदलली. १९२२ मध्ये सर्वसाधारण प्रशासनाच्या एकूण ८५ जागांपैकी ५९जागांसाठी ब्राह्मण नसलेले अधिकारी नेमले गेले. न्याय आणि समानतेवर आधारित समाज निर्माण करणे हे शाहूजींनी आरक्षणाच्या अंमलबजावणीचे उद्दीष्ट ठेवले आणि यासाठी सामाजिक विविधता आवश्यक होती.

**आरक्षणाची वाटचाल व वर्तमान स्थिती :-**असमानता व न्याय दूर करण्यासाठी शाहूजींनी घेतलेल्या या निर्णयाच्या अनुषंगाने १९१८ मध्ये म्हैसूर राज्य, १९२१ मध्ये मद्रास जस्टिस पार्टी आणि १९२५ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी (आताचे मुंबई) यांनी आरक्षण लागू केले. ब्रिटीशांच्या राजवटीतून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर संविधानाचा अनुच्छेद ३३० ते ३३४ मध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि अँग्लो-इंडियन यांच्यासाठी लोकसभा आणि विधानसभा यांमध्ये आरक्षित जागांची तरतूद दहा वर्षांसाठी केलेली आहे व ही कालमर्यादा वाढविण्याचा अधिकार शासनाकडे आहे. म्हणूनच १०४व्या घटना दुरुस्तीने हे आरक्षण ८० वर्षांसाठी वाढविण्यात आलेले आहे( म्हणजेच २०३० पर्यंत), तसेच अँग्लो- इंडियन समुदायाचे आरक्षण बंद करण्यात आले आहे. म्हणजे संविधानाने दहा वर्ष आरक्षणाची सोय दिली होती असा जो प्रचार केला जातो तो चुकीचा असून ही तरतूद केवळ राजकीय आरक्षणासाठी होती (राजकीय आरक्षण हे मूळ संविधानात १०वर्षांसाठी होते, सोबतच ही मर्यादा वाढविण्याचे अधिकार संसदेला होते, त्याच अधिकारांचा वापर करून आता राजकीय आरक्षण ८० वर्षांसाठी देण्यात आले आहे). शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षणाबाबत असे कोणतेही बंधन संविधानात नाही. सामाजिक व आर्थिक मागास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या विकासासाठी विशेष सुविधा आणि शैक्षणिक प्रवेशासाठी विशेष सोयी करणे अनुक्रमे अनुच्छेद १५(४) व १५(५) नुसार शक्य आहे. अनुच्छेद १५(३) नुसार महिला व बालकांना विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन उपाययोजना करू शकते अशी तरतूद आहे. याशिवाय अनुच्छेद ३० नुसार अल्पसंख्यांकांना विशेष सुविधा दिलेल्या आहेत. अनुच्छेद १६(४) नुसार समाजातील दुर्बल घटकांना शासकीय नोकऱ्यांमध्ये विशेष सुविधा देण्याची सोय आहे. मात्र ह्याच अनुच्छेदानुसार ही सुविधा 'पर्याप्त' (adequate) प्रतिनिधीत्वासाठी आहे 'प्रमाणशीर' (proportional) प्रतिनिधित्वासाठी नाही हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच एका विशिष्ट समुदायाची लोकसंख्या समाजात ३०% असेल तर त्यांना ३०% शासकीय नोकऱ्या द्याव्यात असे बंधन शासनावर नाही. तसेच ७७व्या घटनादुरुस्तीने संविधानात अनुच्छेद १६(४अ) समाविष्ट करून बढतीतील आरक्षणाची सोय केलेली आहे. तर १०३व्या घटनादुरुस्तीने संविधानात अनुच्छेद १५(६) आणि १६(६) समाविष्ट करून आर्थिक दृष्ट्या मागास घटकांना(EWS) १०% आरक्षणाची सोय शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये केली आहे. अनुच्छेद २४३(D) आणि २४३(T) नुसार अनुक्रमे ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमाती आणि महिलांसाठी आरक्षणाची सुविधा आहे. संसदेने १०३व्या घटनादुरुस्तीने संविधानात अनुच्छेद १५(६) आणि १६(६) समाविष्ट करून शिक्षण व शासकीय नोकऱ्यांमध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी (EWS) १०% आरक्षण लागू केले आहे. याने इंद्रा साहनी खटल्यात घातलेले ५०% आरक्षणाचे बंधन पाळले गेले नाही. पण यावर काही तज्ञांचे असे मत आहे की 'वरील खटल्यात

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

घालण्यात आलेली मर्यादा ही जातीय आरक्षाणासाठी होती, हे आरक्षण जातीआधारीत नसल्यामुळे ५०%चे बंधन पाळणे गरजेचे नाही.'

सारांश :-राखीव जागांचे धोरण अंमलात आणणारे शाहू महाराज हे हिंदुस्थानातील पहिले राज्यकर्ते ठरले. म्हणूनच शाहू महाराजांना आरक्षणाचे जनक म्हणतात. पहिल्यांदाच आरक्षण धोरण राबवताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. काही अडचणींवर त्यांनी सुरवातीलाच तोडगा काढला. जसे की आरक्षण धोरण नेमके राबवायचे कसे, नोकऱ्यांत मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी नेमकी प्रक्रिया कशी राबवायची? यावर शाहू महाराजांनी एक तोडगा काढला. मागासवर्गीयांचं जिथे सध्या ५० टक्क्यांहून कमी प्रतिनिधित्व आहे, अशा ठिकाणी नोकऱ्यांमध्ये मागसवर्गीयांनाच प्राधान्यानं भरती करण्याची तरतूद केली आणि आपल्या संस्थानात आरक्षण धोरण राबवायला सुरवात केली. बघता-बघता शाहू महाराजांच्या याच आरक्षण धोरणाची गोड फळही लोकांना चाखायला मिळाली. आज देशात जे आरक्षण धोरण राबवण्यात येतंय. त्याची पाळंमुळंही आपल्याला शाहू महाराजांच्या १०० वर्षांपूर्वीच्या या दूरदृष्टीच्या धोरणात सापडतात.

संदर्भसूची :

1. भगत, रा. तु. (२०१६), "राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व शिक्षणकार्य", रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर:
2. जाधव, नरेंद्र (१९८०), "महाराष्ट्रातील मानचिन्हे", मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे
3. फडके यशवंत, (२००१), "राजर्षी शाहू छत्रपतींचे लोकाभिमुख प्रशासन (लेख)", पवार; जयसिंगराव (संपा), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर.
4. साळुंखे पी.बी.(१९७३), "राजर्षी शाहू , भाषण तिसरे", शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5. घोरपडे वाय.के. (१९५९), " कोल्हापूर शाहू छत्रपती-चरित्र आणि कार्य ", कोठल प्रकाशन, पुणे.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**26**

# स्त्रीमुक्ती लढ्याचा राजा शाहू छत्रपती

**इनामदार ऋषिकेश किरण**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्रीमती. मीनलबेन महेता महाविद्यालय, पाचगणी

---

**प्रस्तावना:** शाहू महाराजांनी स्त्रीमुक्तीचे केलेले कार्य हे दोन पातळ्यांवर पाहता येते. एक म्हणजे स्त्री शिक्षित व्हावी यासाठी केलेले प्रयत्न तर दुसरीकडे स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण व्हावे म्हणून त्यांनी केलेली कायदे. समाजाच्या जडणघडणीत विकासात प्रत्येक घटकाचा सहभाग असावा तरच तो विकास स्वयंपूर्ण ते कडे वाटचाल करत असतो आणि इथे तर स्त्री व तिच्या सन्मानाला वर्षानुवर्षे पद्धतशीरपणे संपवण्याचा प्रयत्न व्यवस्थेकडूनच चालवला जात असल्याचे आपणाला दिसून येते. या व्यवस्थेमध्ये बदल घडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी आपल्या स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या धोरणातून केलेले पाहायला मिळते. महिला सुद्धा माणूस आहे ते समजून घेण्यासाठी आपल्या संस्कृतीने, व्यवस्थेने, समाजाने शेकडो वर्ष खाल्ली आहेत. महिला तिचे भावविश्व, तिची कर्तबगारी, तिचे जग , तिचे मोठेपण आदींचा तपशीलवार विचार करून शाहू महाराजांनी व्यवस्थेला समाजाला प्रश्न विचारायला सुरुवात केली. राजश्री शाहू महाराजांकडे धनासत्ता होती, राजसत्ता होती या दोन्ही सत्तांचा उपयोग स्त्री सक्षमीकरणासाठी व स्त्रीमुक्तीसाठी केलेला पाहायला मिळतो.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. या शोधनिबंधातून राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारांचा आढावा घेणे.
2. राजर्षी शाहू महाराजांनी पारित केलेल्या स्त्री सक्षमीकरणाच्या कायद्यांचा अभ्यास करणे.
3. राजश्री शाहू महाराजांचे स्त्री सबलीकरणाचे विचार जाणून घेणे.

**संशोधन पद्धत आणि तथ्य संकलन :** प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना गुणात्मक पद्धतीचा व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, लेख, मासिके, अहवाल, इंटरनेट इ. वापर करण्यात आलेला आहे. स्त्री तिचे शिक्षण तिचा विवाह तिची प्रकृती तिला पुनर्विवाहाचे आणि काडीमोड घेण्याचे स्वातंत्र्य असशील आणि अनिष्ट प्रथांपासून तिची सुटका तिथे स्वावलंबन इत्यादी पातळ्यांवर शाहू महाराजांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले दिसतात. या सर्वातूनच शाहू महाराजांचे स्त्रीमुक्तीचे

**स्त्री शिक्षणासंबंधीचे कार्य :** शाहू महाराज शिक्षणासंबंधी अतिशय आग्रही असल्याचे आपणाला त्यांच्या कार्यातून दिसून येते. शिक्षण हे सक्तीचे असावे व ते सर्वच मानवांना मिळायला हवे यासंबंधी शाहू महाराज प्रयत्नशील होते. यातूनच 25 जुलै 1910 ला मोफत शिक्षणाचा कायदा शाहू महाराजांनी केला. शिक्षणात स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता शाहू महाराजांनी शाळांची संख्या, अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या व स्त्रियांची संख्या यावर जाणून-बुजून लक्ष दिलेले पाहायला मिळते. मुलींनी अधिक अधिक शिक्षण घ्यावे यासाठी महाराजांनी वेगळे प्रयत्न केले पाहायला मिळतात. राजाराम कॉलेज मध्ये मुलींना शैक्षणिक फी माफ करणे असो किंवा वेगवेगळ्या समित्या स्थापन करून मुलींमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करणे असो. 1919 पासून शिक्षण घेत असलेल्या स्त्रियांची राहण्या जेवण्याची मोफत सोय करण्यात आली. महाराजांची सून इंदुमती राणे साहेबा अतिशय अल्पवयात विधवा झाल्या महाराजांनी त्यांना शिक्षण देण्याचा निर्णय घेतला या निर्णयाला प्रचंड विरोध झाला. राजवाड्यावर कलह झाला पण महाराजांनी विरोध न जुमानता आपल्या सुनेच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्या वयाच्या ठराव्या वर्षी मॅट्रिक झाल्या. ग्रामीण भागातील मुलींना देखील शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी शाहू महाराजांनी स्वतंत्रपणे ग्रामीण भागात शाळा काढल्या. हुशार मुलींसाठी महाराजांनी पाच शिष्यवृत्ती ठेवल्या. रमाबाई केळवकर त्यांची कन्या कृष्णाबाई यांना महाराजांनी मुंबईत कॉलेजला पाठवून डॉक्टर बनवले. महाराजांनी प्रोत्साहन दिल्यामुळे ते उच्च शिक्षणासाठी लंडनला गेल्या.महिला शिकली की कुटुंब शिकते आणि सर्व महिला शिकल्या की सारा समाज शहाणा होतो, हा विचार शाहू महाराजांनी संपूर्णपणे अंगीकारला.

**विवाह संबंधीचा कायदा** : ज्या काळात मुलींचा विवाह वयाच्या दहाव्या बाराव्या वर्षी सर्रास होत असे त्या काळात शाहू महाराजांनी लग्नासाठी मुलींचे वय 14 वर आणि मुलांचे वय 18 वर्षे केले. 12 जुलै १९१९ ला महाराजांनी कोल्हापूर इलाख्यातील विवाहसंबंधीचा कायदा गॅझेटेरियन मध्ये प्रसिद्ध केला. या कायद्यात खरोखरच एक क्रांतिकारी गोष्ट होती ती म्हणजे 18 वर्षाची वय पार झालेल्या मुलीला स्वतःच्या निर्णयानुसार लग्न करण्याची तरतूद होती. आपल्याला आवडेल तो जोडीदार तिने निवडला आणि लग्न केले तर ते कायदेशीर ठरणार होते. लग्नाच्या बाबतीत महिलेला एक अर्थाने पूर्ण स्वातंत्र्य देणार हा कायदा होता. बालविवाहाचे प्रयोजनच मुळात स्त्रीचे स्वातंत्र्य मारण्यासाठी असते. स्त्री शहाणी झाली, स्वतः निर्णय घेऊ लागली की प्रतिगामी व्यवस्था

कोलमडायला लागते. तिने आंतरजातीय विवाह केला की जातिव्यवस्था हादरायला लागते. ते होऊ नये म्हणून बालविवाह. स्त्री नुसतीच मुले जन्माला घालणारी नाही तर जाती टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे असते हे ओळखून शाहू महाराजांनी महिलांना दिलेले लग्नाचे जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य क्रांतिकारक ठरते. ज्या काळात हा कायदा केला तो काळ नजरेसमोर आणला की या कायद्याचे महत्त्व आणखी स्पष्ट पणे पटायला लागते.

**आंतरजातीय विवाहला मान्यता देणारा कायदा :** शाहू महाराज केवळ बालविवाहाला प्रतिबंधक करूनच थांबले नाहीत तर त्यांनी आंतरजातीय विवाहला मान्यता देणारा कायदा देखील केला. आज देखील समाजात आंतरजातीय विवाह एक क्रांतिकारक गोष्ट समजली जाते. शाहू महाराजांनी साधारण 1920 च्या काळात आंतरजातीय विवाह मान्यता देणारा कायदा कोल्हापूर संस्थांच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध करून एक प्रकारे जातीव्यवस्थेला आवाहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. यातून फक्त जातीव्यवस्थेला आव्हान दिले गेले नाही तर पितृसत्ताक व्यवस्थेला देखील प्रश्न विचारण्यात आले. आंतरजातीय विवाहास कायद्याने मान्यता दिली. इतकेच नव्हे तर कायद्यांना कृतीत आणण्यासाठी स्वतः पुढाकार घेतला. महाराजांनी आंतरजातीय विवाह साठी केवळ प्रजेलाच प्रोत्साहन दिले नाही तर आपल्या चुलत बहिणीचा विवाह इंदूरच्या यशवंत होळकर महाराजांशी जुळवून आणला.

**विधवा विवाहास मान्यता देणारा कायदा** : पतीच्या निधनानंतर पत्नीचे आयुष्यात अतिशय झिकेरीचे बनते कुटुंबात आणि बाहेर तिला प्रतिष्ठा राहत नाही. धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमातील भाग घेऊ शकत नाही. बहुतेक वेळा पतीच्या निधनाबद्दल पत्नीला जबाबदार धरली जाते. पुनर्विवाह मान्यता नसल्याने तिचे सारे आयुष्यच अंधारमय बनते. शाहू महाराजांनी 1917 मध्ये विधवांच्या विवाहस मान्यता देणारा कायदा केला. यातून शाहू महाराजांची दूरदृष्टी दिसून येते.

**घटस्फोटासंबंधी कायदा :** पुनर्विवाहाला परवानगी देणार कायदा झाला तरी मुळात घटस्फोटाची पद्धत ही जात पंचायतीच्याद्वारे पार पाडली जात होती. जातपंचायतीचे कायदेही पुरुषांना अनुकूल आणि स्त्रियांना प्रतिकूल असत. हे सर्व टाळण्यासाठी महाराजांनी 11 जुलै 1919 ला काडीमोड कायदा केला. नियमात सुसूत्रता आणली. पक्षपात बंद केला आणि स्त्रियांना सुद्धा काडीमोडासाठी परवानगी दिली. पुरुषप्रधान व्यवस्थित पती कसाही असला तरी चालतो महिलेचे एकदा का लग्न झाले की तिचे संपूर्ण आयुष्य पतीभोवतीच तयार केली जात असे. अशा व्यवस्थित शाहू महाराजांनी प्रयत्नपूर्वक विचार करून घटस्फोट संबंधित कायदा केला.

**जोगत्या - मुरळ्या प्रतिबंधक कायदा :** धर्माच्या नावाखाली देवाधिकांना मुले मुली वाहण्याची घृणास्पद पद्धत संस्थानात होती. या प्रकारातूनच अनेक अनैतिक गोष्टी घडत. धर्मालासुद्धा किळसवाणे स्वरूप येई. महाराजांनी जोगत्या मुरळ्या प्रतिबंधक कायदा केला. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना जबर शिक्षेची तरतूद केली. देवाधर्माच्या नावाने महिलांची विटंबना व्हावी हे शाहू महाराजांना मान्य नव्हते .

**स्त्रियांच्या छळवणुकीस प्रतिबंध करणारा कायदा :** पुरुषप्रधान आणि जातीवर आधारित असलेल्या समाजात महिलेला प्रतिष्ठा नसतेच ती केवळ झाडाचा विषय राहत नाही तर सातत्याने तिचा आत्मसन्मानही हिरावून घेतला जातो. पूर्वी एखाद्या टोळीचा, नायकाचा अपमान करायचा असेल तर त्याची स्त्री पळवून नेली जायची स्त्री गेली की पुरुषाची प्रतिष्ठा केली असे मानले जायचे. आजही भांडणात एखाद्याला अप्रतिष्ठित करायचं असेल तर आई-बहीण पत्नी यांच्या नावाने शिवी हासडली जाते. स्त्रिया या कधी मनोरंजन म्हणून तर कधी भोग म्हणून तर कधी पुरुषी अहंकार म्हणून अप्रतिष्ठित होत असतात. या सर्वाचा विचार करून महाराजांनी 2 ऑगस्ट 1919 ला स्त्रियांच्या छळवणुकीस प्रतिबंध करणारा कायदा केला. अशाप्रकारे अनेक प्रकारच्या अन्ययांपासून स्त्री जातीचे मुक्तता करणारे कायदेशी शाहू महाराजांनी केले. हे कायदे झाले म्हणजे त्याप्रमाणे समाजात सुधारणा झाल्या असे नाही, हे खरे. पण त्यामुळे या कायद्यांचे महत्त्व आणि ती करण्यामागील राजर्षी शाहू महाराजांची उदात्त्य मानवतावादी दृष्टी कमी महत्त्वाची ठरत नाही. राजर्षी शाहू महाराजांचे विचार आजही आपल्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम करतात. म्हणून या क्रांतीपुत्रांची देवळे न उभारतात त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गावरून आपल्याला वाटचाल करायला हवी. शाहू महाराजांचे विचार चिरकाल आणि शाश्वत स्वरूपाचे आहेत. म्हणून प्रत्येक बुद्धिवादी मनुष्याला त्यांच्या विचारानेच वाटचाल करायला लागणार आहे. शेवटी हे हेगेलच्या शब्दात सांगायचे तर – "The great man of the age is the one who can put into words the will of his age , tell his age what it's will is and accomplish it. What he does in the heart and essence of his age, he actualizes his age."

संदर्भ ग्रंथ :

1. कांबळे, उत्तम. राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती (२००३) सुगावा प्रकाशन, पुणे.
2. पवार, जयसिंगराव . राजर्षी शाहू छत्रपती - एक मा मागोवा (२००४) सुमेरू प्रकाशन, मुंबई.
3. पानसरे, गोविंद. राजर्षी शाहू वसा आणि वारसा (२०१०) लोकवाड्.मय गृह , मुंबई.
4. गौतम, प्रज्ञावंत . शाहू राजा. (१९९१) दि राहुल पब्लिकेशन, कोल्हापूर.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

27

# कोल्हापूरला 'कलापूर' बनिवणारा राजा: 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज'

**डॉ. शिवाजी दत्तात्रय जाधव**
सहाय्यक प्राध्यापक
श्री शहाजी छ. महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना**: आज आपणास अभिप्रेत असलेल्या कोल्हापूर नगरीच्या कलाविकासाला पारंपरिक भारतीय कलेची प्रत्यक्ष अशी पार्श्वभूमी नाही. विसाव्या शतकाच्या आरंभकाळात कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूरचे खऱ्या अर्थाने सांस्कृतिक संवर्धन केले. राजर्षी शाहू महाराज एक कल्याणकारी व दृष्टे राज्यकर्ते होते. महाराजांनी समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण कृती कार्यक्रम निर्धारपूर्वक राबवत असताना त्यांनी साहित्य, कला, संगीत, व क्रीडा इत्यादी क्षेत्रांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अग्रक्रमाने राबवले. त्यांनी चित्रकला, नाट्य, संगीत, कुस्ती, विविध कला, क्रीडा प्रकारांना भरभरुन प्रोत्साहन दिले. तसेच गुणी खेळाडू, कलावंतांना चा शोध घेऊन त्यांना राजाश्रय देऊन इतिहास घडवणारा एक पिढी निर्माण केली. त्यांच्या या प्रोत्साहानामुळे कोल्हापूरचे नाव देशपातळीवर पोहोचण्यास मदत झाली. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे खऱ्या अर्थाने 'कलापूर' बनले. तसेच त्यांच्या काळात 'मल्लविद्याचे माहेरघर' म्हणून देशभर ओळखले जात होते. कोल्हापूर सारख्या एका छोट्या संस्थानाचा संस्थानिक देशभरातील कलावंत, पैलवान, खेळाडुंचा प्रमुख आश्रय, मार्गदर्शक व प्रेरणा स्तोत्र बनतो यावरून शाहू महाराजांचे सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील भारतीय पातळीवरील अद्वितीय कामगिरी लक्षात येते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कला, क्रीडा क्षेत्रामधील दिलेल्या योगदानांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**संगीत** --संगीत आणि नाट्य या कलाक्षेत्रांमध्ये छ. शाहू महाराजांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कारकिर्दीत अल्लादियाँ खाँ (इ.स.१८५५-१९४०) त्यांचे बंधू हैदर खाँ साहेब (इ.स.१८६१-१९३६) हे जयपूर येथील गायक दरबारात गायक म्हणून होते. अल्लादियाँ खाँ आठवड्यातून दोन दिवस महालक्ष्मी मंदिरात गायन सादर करत तर नवरात्रीत दररोज गायन होत असे.[१] अल्लादिया खाँ यांनी उत्तरेची ख्याल गायकी महाराष्ट्रात आणून, ती येथे लोकप्रिय करण्याची महनीय कामगिरी केली. एवढेच नव्हे तर अत्यंत परिश्रम करुन आपल्या अभिजात गायनाची एक वेगळीच परंपरा निर्माण केली. या गानपरंपरेला पुढे गायनातील घराण्याचा दर्जा प्राप्त झाला व या घराण्याला 'कोल्हापूर घराणे' असे मानण्यात येऊ लागले.[२] अल्लादिया खाँ शिवाय गान तस्विनी केसरबाई केरकर, अंजनीबाई मालपेकर, कुशल सारंगिये हैदरबक्ष यासारख्या अप्रतिम गायक व वादकांना छत्रपती शाहू महाराजांनी सुरुवातीपासून भरपूर उत्तेजन दिले.[३] तसेच इ.स. १८९३ मध्ये बाबा देवल यांनी 'देवल क्लबची' स्थापना केली. देवल क्लबच्या माध्यमातून कित्येक नामवंत गायक, वादक येथे तयार झाले.[४] गोविंदराव टेंबे, भास्कर बखले, बालगंधर्व, मंजीखाँ, केशवराव भोसले, भुजीखाँ अशा अनेक स्थानक व बाहेरील थोर कलावंतांनी या क्लबला मोठे मानाचे स्थान प्राप्त करुन दिले. देवल क्लबची किर्ती शाहू महाराजांच्या कानावर गेल्यानंतर त्यांनी या क्लबला जागेपासून ते इमारत बांधकाम फंडापर्यंत मदत केली.[५] शाहूंच्या आश्रयामुळे 'देवल क्लब' प्रसिद्धीस आला. तेव्हा देशातल्या प्रत्येक गायक-गायिकेला वाटायचे की आपले गायन देवल क्लबमध्ये व्हावे. महाराजांच्या आश्रयामुळे व प्रेरणेने ही संस्था आखिल भारतीय किर्तीची बनली होती.[६]

अशाप्रकारे महाराजांनी अभिजात संगीत विषयीच्या आवडीमुळे हिंदुस्थानातील संगीताच्या विविध घराण्यांच्या, अनेक थोर कलावंतांना कोल्हापूरात आकृष्ट केले. यामुळे कोल्हापूर बरोबर सर्व महाराष्ट्राला शास्त्रीय संगीताची गोडी लागली. एवढेच नव्हेतर महाराष्ट्रीय कलावंताची एक उच्च दर्जाची संगीत परंपरा निर्माण केली.

**नाट्यकला** -छ. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत नाट्यकलेला संगीतकलेच्या बरोबरीचा राजाश्रय प्राप्त झाला. बालगंधर्व, केशवराव भोसले यांच्यासारख्या महान कलावंतांना महाराजांनी राजाश्रय दिला होता. तसेच किर्लोस्कराची 'किर्लोस्कर नाटक मंडळी' दत्तोपंत हल्ल्याळकर यांची 'महालक्ष्मी प्रासादिक नाटक मंडळी', भाऊराव जाधव यांची 'कोल्हापूर संगीत नाटक मंडळी', गोविंदराव टेंबे यांची 'शिवराज संगीत मंडळी' याखेरीज केवळ स्त्रियांनी चालविलेली 'शेषसनी स्त्री संगीत नाट्य मंडळी' इ. नाटक मंडळीना शाहू छत्रपतींचे कृपाछत्र लाभले होते. या काळात विविध नाटक मंडळींना, सरदार-जहागिरदारांच्या जुन्या वाडयात किंवा मंडपात आपले प्रयोग सादर करावे लागत असे. काही वेळेला नाटकांचे प्रयोग उघडयावरही होत असत. या सर्व अडचणी लक्षात घेऊन शाहू महाराजांनी इ.स. १९१५ रोजी 'पॅलेस थिएटर' हे आधुनिक सोयीसुविधांनी युक्त असे नाट्यगृह तयार करुन घेतले.[७] अशाप्रकारे शाहू महाराजांनी नाटक कंपन्यांना आणि कलावंतांना त्यांची कला प्रदर्शित करण्यासाठी हक्काचे एक व्यासपीठ उपलब्ध करुन दिले.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र शासनाने या थिएटरचे 'केशवराव भोसले नाट्यगृह' असे नामकरण केले. शाहू महाराजांनी नाट्यकलेस राजाश्रय दिल्यामुळे नाटक हा करमणुकीचा प्रकार कोल्हापूरमध्ये लोकप्रिय झाला.

**चित्रकला -** 'चित्रकला' या ललितकलेच्या क्षेत्रात शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरने उत्तुंग भरारी मारली. या क्षेत्रात आबालाल रहिमान सर्वात श्रेष्ठ चित्रकार संस्थानकाळात होऊन गेला. कलातपस्वी आबालाल अब्दुलरहिमान भालदार शेख उर्फ आबालाल रहिमान हे जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई या संस्थेत शिक्षण घेतलेले कोल्हापूरचे पहिले विद्यार्थी त्यांच्या एका चित्रसंचामधील चित्रकारीचे असामान्य तंत्रकौशल्य पाहून त्यांना 'व्हाइसरॉयज् मेडल' प्रदान करण्यात आले. शाहूंनी त्यांना राजाश्रय दिला व दरबारी चित्रकार म्हणून नेमले.[८] या कालखंडातील दुसरे ज्येष्ठ कलावंत बाबूराव पेंटर कोणत्याही कला शाळेत कलाशिक्षणाचे धडे न घेता केवळ आत्मप्रेरणेने व स्वत:च्या कल्पकतेने त्या काळी प्रचलित असलेल्या पाश्चात्य कला शैलीमध्ये प्रभुत्व संपादन करुन स्वत:ची चित्रशैली निर्माण केली म्हणून त्यांना 'कलामहर्षी' म्हणून ओळखले जाऊ लागले.[९] आबालाल रहिमान यांच्या प्रेरणेतून कोल्हापूरात अनेक कलावंत निर्माण झाले. त्यापैकी एक दत्तोब दळवी, शाहू महाराजांच्या प्रोत्साहनातून 'जे.जे.स्कूल ऑफ आर्ट' मध्ये शिक्षणास गेले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूरमध्ये 'दळवीज आर्ट इन्स्टिट्यूट' ची स्थापना करुन शिक्षणाची गंगा कोल्हापूरात सुरु केली.[१०] शाहू महाराजांनी चित्रकलेला प्रोत्साहन दिल्यामुळे शाहूनंतरच्या काळात चित्रकारांची एक तेजस्वी प्रभावळ उदयास आली. यामध्ये माधवराव बागल, गणपतराव वडणगेकर, जी. कांबळे, रविंद्र मेस्त्री, चंद्रकांत पी. सरदार, जयसिंगराव दळवी, बाबूराव सडोलीकर, आदी कलावंतांनी कोल्हापूरची कलापंरपरा समृद्ध करण्यास हातभार लावला.[११] अशाप्रकारे शाहू महाराजांकडून संगीत व नाट्य चित्रकलेला मिळालेल्या प्रोत्साहनामुळे कोल्हापूरचे, पर्यायाने महाराष्ट्राचे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सांस्कृतिक जीवन समृद्ध झालेले दिसून येते.

**मर्दानी कला -** शाहू महाराजांनी संगीत नाट्य व चित्रकलेबरोबर मर्दानी कलेला प्रोत्साहन दिले. त्यांनी आपल्या संस्थानात विविध मर्दानी कलांना राजाश्रय देऊन त्याचा विकास केला. यामुळे मर्दानी कलेची आवड असणारे लोक कोल्हापूरात हे खेळ पाहण्यासाठी तसेच आत्मसात करण्यासाठी येत होते.

**मल्लविद्या -** संस्थानकाळात छ. शाहू व छ. राजाराम महाराजांच्या काळात मल्लविद्येस महत्त्व प्राप्त झाले. शाहूंच्या कारकीर्दित 'मल्लविद्या' मोठ्या प्रमाणात विकसित झाली. संस्थान काळाचे एक अभ्यासक हिंदुराव साळुंखे आपल्या लेखात म्हणतात की, 'भारतामध्ये पतियाळाला मल्लविद्येचे गंगोत्री मानले जाते, तर कोल्हापूरला 'मल्लविद्येचे माहेर' म्हटले जाते. याच दृष्टिकोनातून पतियाळाचे महाराज राघवेंद्रसिंग यांना 'मल्लविद्येचे भोक्ते' आणि कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांना 'मल्लविद्येचे पोशिंदे' तसेच 'मल्लांचे मल्ल' असे संबोधले जाऊ लागले.'[१२] शाहू महाराजांनी मल्लविद्येस उदार राजाश्रय दिला. शाहू महाराजांनी सर्व जातीच्या, सर्व धर्माच्या मल्लांना प्रोत्साहन दिले. तसेच शाहूंनी संस्थानाबाहेरील मल्लांना राजाश्रय दिला. यामुळे सर्व देशातून विशेषत: पंजाब, दिल्ली या प्रदेशातील मल्ल इथे आकृष्ट होऊ लागले. त्यांच्या मेहनतीची व खुराकाची चोख व्यवस्था दरबाराकडून होत राहिली. यामुळे कोल्हापूर हे हिंदुस्थानातील 'मल्लविद्येचे विद्यापीठ' बनले.[१३] शाहू महाराजांनी मल्लविद्येचा विकास करण्यासाठी संस्थानात कुस्त्यांची मैदाने भरविली. शाहूंच्या आधी कोल्हापूरात फक्त शुक्रवारी मैदाने भरत होती. शाहूंनी शुक्रवार, मंगळवार या दोन दिवशी नियमित मैदाने भरविण्याचा पायंडा पाडला. ही मैदाने जुन्या राजवाड्याच्या पश्चिमेस बाबूजमाल दर्ग्यात व मंगळवारी विठोबा देवळाच्या पिछाडीस भरत होती. तसेच शाहू महाराजांनी खेडोपाडीच्या लोकांना जत्रा-उत्सवाच्या वेळी व अन्य मंगलप्रसंगी कुस्त्यांचे फड भरविण्यास उत्तेजन दिले. शाहूंच्या काळात ऊरुस, ईद यासारख्या सणांनाही कुस्त्यांची मैदाने भरत होती. कुस्त्यांच्या मैदानास महाराज स्वत: हजर राहत होते. त्यामुळे जहागीरदार, सरदार, श्रीमंत, व्यापारी, जमीनदार मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागली.[१४] राजर्षी शाहू महाराज मल्लविद्येच्या विकासासाठी खऱ्या अर्थाने झटले. म्हणून कोल्हापूरचे नाव राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाले.

**साठमारी -** राजर्षी शाहू महाराजांनी मल्लविद्येबरोबरच साठमारी या मर्दानी कलेचा विकास केला. शाहू महाराजांनी मदमस्त झालेल्या हत्तीचा 'साठमारी' हा खेळ बडोद्याहून कोल्हापूरला आणला आणि आपल्या कल्पनेप्रमाणे या मर्दानी खेळाला विकसित केले. साठमारीचे आगड (आखाडे) त्यांनी आपल्या कल्पनेप्रमाणे बांधले. बडोद्याची साठमारी घोड्यावर स्वार होऊन खेळली जात होती. शाहू महाराजांनी विकसित केलेली साठमारीत तेथील साठमार पायीच हत्तीवर चाल करीत आणि हत्ती चवताळून आला की, आगडमध्ये बांधलेल्या बुरजात आश्रय घेत. यावेळी साठमाराचे प्रसंगावधान व चपळाई या गुणांची कसोटी लागत होती.[१५] शाहू महाराजांनी या मर्दानी कलेला, प्रोत्साहन देण्यासाठी संस्थानात कोल्हापूर, सोनतळी, राधानगरी, पन्हाळा, रुकडी इ. ठिकाणी साठमारीसाठी आगड बांधले.[१६] बाहेरुन साठमारी तज्ञ आणून आपली माणसे या कलेत तरबेज केली. यामुळे कोल्हापूर हे देशातील

साठमारीच्या खेळाचे बडोद्याच्या तोडीचे प्रमुख केंद्र बनले. साठमारीबरोबर महाराजांनी 'हत्तीच्या टकरा' हा अभिनव खेळ कोल्हापूरात सुरु केला. प्रांरभी ह्या टकरा जुन्या राजवाड्याच्या चौकात होत असे. नंतर त्या साठमारीच्या आगडात केल्या जाऊ लागल्या. टकरीच्या प्रसंगी हत्तीचे दात जायबंदी होऊ नये म्हणून खास क्लुप्ती योजली जात असे.त्यासाठी दोन हत्तींच्या मध्ये सहा फूट उंचीची भिंत उभी केली जात होती. त्यामुळे हत्तीचे दात व नाजूक गंडस्थल यांचा बचाव होत असे.[१७]

**चित्याची शिकार -** कुस्ती, साठमारी यासारख्या खेळाबरोबर शिकार याबद्दलही शाहू महाराजांना आवड होती. शाहूंच्या काळात शिकार करण्याच्या अनेक पद्धती अस्तित्वात होत्या. यामध्ये 'चित्त्याची शिकार' ही कोल्हापूरच्या छत्रपतींची खासियत होती. चित्ता हा निसर्गातील एक वेगवान प्राणी आहे. शिवाय त्याच्या दौडीतील लय व झेप यामध्ये शास्त्रोक्तपणा असतो. चित्ता शिकारीत या सर्वांचा उपयोग केला जात होता. त्यासाठी चित्त्यास खास प्रशिक्षण दिले जात होते.[१८] चित्ता शिकार खेळ राजर्षी शाहू महाराजांनी विद्यार्थी दशेत राजकोट मुक्कामी शिक्षण घेत असता भावनगर येथे प्रथम पहिला व त्यानंतर काही काळानंतर त्यांनी कोल्हापूर संस्थानात आणला. हा खेळ इ.स. १९४० पर्यंत म्हणजे राजाराम महाराज असेपर्यंत कोल्हापूर संस्थानात अस्तित्वात होता.[१९] महाराजांनी अनेक चित्ते पाळून त्यास खास तंत्राने प्रशिक्षित केले होते. चित्ता शिकारीसाठी संस्थानात अनेक ठिकाणी संरक्षित वने तयार केली होती. तेथे असणाऱ्या हरणांच्या कळपातील काळविटाचीच शिकार करण्याचे प्रशिक्षण चित्त्यास दिले होते.[२०] अशा चित्त्यांना वाहून नेणाऱ्या गाड्या त्यांनी स्वत:च डिझायन करुन बनवून घेतल्या होत्या. संस्थास जेव्हा व्हाईसरॉय, ब्रिटिश अधिकारी यासारखे बडे पाहुणे भेट देत त्यांच्या सन्मानार्थ 'चित्त्याची शिकार' आयोजित केली जात होती.[२१]

**रेसकोर्स -** कोल्हापूरमध्ये ब्रिटिश रेसिडेन्सीचा अंमल सुरु झाल्यानंतर ब्रिटिश अधिकारी, त्यांचे कुटुंबिय, सैनिक येथे राहण्यासाठी आले. यामुळे त्यांच्या राहणीमानाच्या पद्धतीला साजेशा काही नव्या सुविधा येथे निर्माण करण्यात आल्या. ताराबाई पार्कमध्ये गोल्फ कोर्स, बिलियर्डस् हॉल, मद्यपान, जुगाराला प्रतिष्ठा मिळवून देणारा क्लब, रमण मळयाजवळच्या तळयामध्ये बोटिंगची सोय तसेच पद्माळयात रेस कोर्स सुरु करण्यात आले. पद्माळयामधील रेसकोर्सवर शर्यतीचा हंगाम पावसाळ्यानंतर असत. या शर्यती पाहण्यासाठी अरेबियन शौकीन खास कोल्हापूरमध्ये येत होते. शर्यतींच्या तिकिटांची विक्री मैदानावर आणि विल्सन रोड (शिवाजी रोड), आराम कॉर्नरला होत असे. शर्यती अगोदर बाहेरुन आलेल्या घोड्यांची सोय पद्मावती मंदिराच्या जवळ असलेल्या कृष्णाच्या देवळातील पागेत केली जात होती. येथे येणाऱ्या घोड्यांना दगा फटका होऊ नये म्हणून स्वतंत्र सुरक्षा व्यवस्था पुरवली जात होती.[२२] या स्पर्धेसाठी नामवंत जॉकी येथे घोडे घेऊन येत होते. बाहेरुन आलेल्या जॉकींची राहण्यांची सोय 'देवल क्लब' मध्ये केली जात होती. त्यांचा सर्व खर्च दरबारातून केला जात होता.[२३] कोल्हापूरमधील रेसकोर्सला रॉयल वेस्टर्न टर्फ क्लबचा परवाना होता. छत्रपती शाहू महाराजांनी या रेसकोर्ससाठी सोनतळी येथे घोड्यांचे पैदास केंद्र सुरु केले होते. त्यामध्ये इंग्लिश, अरबी, ऑस्ट्रेलियन व देशी घोड्यांची पैदास केली जात होती. या घोड्यासाठी खास राखीव कुरणे ठेवली होती. या रेसकोर्समधील शर्यती पाहण्यासाठी कोल्हापूरमध्ये देशी व विदेशी पाहुणे भेटी देत होते. पुढीलकाळात राजाराम महाराजांच्या निधनानंतर रेसकोर्सवरची घोडयाची धाव थांबली.[२४]

थोडक्यात लोकराजा राजर्षी छत्रपती शाहूमहाराज यांचे सर्व क्षेत्रातील कार्य अलौकिक आहे. सामाजिक सुधारणेबरोबरच राजर्षींनी साहित्य, कला, कुस्ती,अशा विविध क्षेत्रांत अजोड कामगिरी केली आहे. आजही त्यांच्या कार्याची ओळख शहरातील भव्य अशा वास्तूंमधून प्रकर्षाने समोर येते. खासबाग कुस्त्यांचे मैदान असो, साठमारी असो, त्यांच्या उदार आश्रयाखाली सुरू असलेल्या सांस्कृतिक संस्थांच्या इमारती असोत; त्या नेहमीच प्रेरणादायी ठरत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी दिलेल्या राजाश्रय मूळे कुस्ती, मर्दानी खेळ, संगीत, नाट्य, चित्रकला इ. विविध कलाक्रिडांना बहर येऊन कोल्हापूर हे 'कलापूर' या नाव लौकिकास पात्र ठरले.

**संदर्भ**

१. भिडे ग.दि.,देशपांडे पु.ल.(संपा.),कोल्हापूर दर्शन, इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिसेस,पुणे, १९७१, उपरोक्त, पृ. १६८-१६९.
२. कणबरकर रा.कृ. (संपा.), राजर्षी शाहू मोहोत्सव १९९३, राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट, कोल्हापूर, १९९३,पृ.४.
३. जाधव, प्रतापसिंह ग. (संपा.), जरीपटका, ६५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, १९९२, पृ. ६७
४. माळी गुरूबाळ, वारसा कोल्हापूरचा, ए.एस.प्रकाशन कोल्हापूर, १९९९, पृ.६९.
५. साळुंखे पी.बी. (संपा), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई. १९७६, पृ. ११६-११७.
६. पवार (डॉ)जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, द्वितीय आवृती,२००७, पृ. २१७.
७. कित्ता, पृ. २१९.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

८. भगत, रा.तु., रंगसम्राट आबालाल रहिमान, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, १९९३, पृ. १५-२०.
९. सडवेलकर, बाबुराव, कला महषिर् बाबुराव पेंटर शताब्दी समारंभ ग्रंथ, पृ.१.
१०. जाधव, श्यामकांत, रंगचित्रकाराचे, वस्तुगंध प्रकाशन, कोल्हापूर, २००२, पृ.५६.
११. पवार (डॉ)जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त पृ. २२९.
१२. कित्ता, पृ.६३१.
१३. कित्ता, पृ. २१४.
१४. साळुंखे, पी.बी., उपरोक्त, पृ. ३६-३७.
१५. किर्लोस्कर शांता (संपा), किर्लोस्कर, पुणे, १९८३, पृ. १८.
१६. पवार(डॉ) जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त पृ.२१२.
१७. साळुंखे हिंदुराव, छत्रपती शाहू स्मृती दर्शन, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, १९९८, पृ. ५५-५६.
१८. पवार(डॉ) जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. ६४३.
१९. जाधव लिलावती, नेर्लेकर गणेशराव, शिकारी चित्ता आणि चित्तवान, चैतन्यप्रसाद पब्लिकेशन्स्, २००९, मनोगत, गणेशराव नेर्लेकर.
२०. पवार(डॉ) ज.भा., राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई, २००९, पृ.१५२.
२१. जाधव लिलावती, नेर्लेकर गणेशराव, उपरोक्त, पृ. ११०.
२२. काशीद सुधाकर, कोल्हापूर, पाऊलखुणा, सकाळ पेपर्स लिमिटेड,कोल्हापूर, पृ. ३६.
२३. माळी गुरुबाळ, उपरोक्त, पृ. ७४.
२४. काशीद सुधारकर, उपरोक्त, पृ. ३७-३८.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

28

# समतावादी लोकराजा राजश्री शाहू महाराज

**डॉ उर्मिला न. क्षीरसागर**
सहयोगी प्राध्यापक
मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली

---

**प्रस्तावना:**

आधुनिक समाजाच्या जडणघडणीमध्ये विचार व कार्याने नवयुग निर्माण करणाऱ्या कृतिशील विचारवंतांमध्ये छत्रपती शाहू महाराज या विचारवंताचा समावेश होतो. संपूर्ण आयुष्य त्यांनी दलित पीडित शोषित यांच्या प्रगतीसाठी खर्ची घातले. समाज जीवनात बदल घडवून आणण्याचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. समाजातील सर्व माणसे समान आहेत त्यांना माणूस म्हणून प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्यांच्यातील उच्च नीच भेदभाव नष्ट व्हावा, या हेतूने ते कार्य करीत राहिले. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्त्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक ध्येय छत्रपती शाहू महाराजां जवळ होते एक आदर्श राजा, बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली बहुजन समाजाला जागृत करण्याचे काम त्यांनी केले आपल्या कार्याविषयी होणार टीका त्यांनी सहन केली, पण आपल्या धोरणात बदल केला नाही.

उद्देश: आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक सामाजिक आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांचा त्यांची सर्वांगीण प्रगती घडून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे छत्रपती शाहू महाराज होय. त्यांनी केलेल्या समतावादी योजना, सामाजिक सुधारणा आजच्या तरुण पिढीसाठी आदर्शवत आहेत. त्यांचे कार्य समाजासमोर यावे म्हणून, सर्वांनी त्याचा बोध घ्यावा, यासाठी प्रस्तुत शोधनिबंध लिहिला आहे.

**की वर्ड्स:** बहुजन समाज, सार्वत्रिक शिक्षण, समाज सुधारक, अस्पृश्य उद्धार, प्रजाहितदक्ष, समता.

**पूर्व आयुष्य:** छत्रपती शाहू महाराज कागलच्या घाटगे घराण्यातील. त्यांचा जन्म २६ जुलै 1874 रोजी झाला.[1] वडील जयसिंगराव घाटगे व आई राधाबाई होय. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीबाई साहेब यांनी 17 मार्च 1894 ला त्यांना दत्तक घेतले. राजकोट, धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. श्रीमंत लक्ष्मीबाई साहेब यांच्याशी त्यांचा विवाह 1891 मध्ये झाला. विसाव्या वर्षी 2 एप्रिल 1894 ला कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे त्यांनी आपल्या हाती घेतली.[2] आपणास मिळालेल्या सत्ता व अधिकाराचा उपयोग संस्थानामधील सामान्य जणांच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न केला जाती संस्थेच्या द्वारे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने त्यांनी बहुजन समाजाचे नेतृत्व स्वीकारले.

**छत्रपती शाहू पूर्व समाज जीवन:** सुराज्य निर्माण करण्यासाठी लोकशाही बळकट करण्यासाठी बहुजन समाजात जागृती येणे आवश्यक आहे, असे महाराजांचे मत होते. बहुजन समाजात शिक्षणाचा मोठा प्रसार होण्याची आवश्यकता त्यांना जाणवली. समाजात स्त्रियांची, विशेषता विधवा स्त्रियांची स्थिती दयनीय होती. धार्मिक जीवनात कर्मकांड, अंधश्रद्धा या पूरोहितांच्या श्रेष्ठत्वाला विशेष प्राधान्य मिळाले होते. अशिक्षित जातीवर अनेक बंधने होती. असंख्य लोक अज्ञान व दारिद्र्याचे जीवन जगत होते, यामुळेच महाराजांनी बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात क्रांतिकारक बदल करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजाला स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी पात्र बनवणे, महाराजांना आवश्यक वाटत होते. त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य व्यतीत केले.

**सार्वत्रिक शिक्षण:** महाराजांची शिक्षण वेक्षक दृष्टी मुलगामी होती. शिक्षणाखेरीस समाजाच्या सर्वांगीण विकास संभवतच नाही, अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुसिद्धी लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, असे त्यांचे मत होते.[3] त्यांनी शिक्षण सुधारणा समिती नेमुन नियोजनपूर्वक शैक्षणिक धोरण तयार केले नव समाज निर्मितीसाठी प्रत्येकाला शिक्षण दिले पाहिजे, ही समतावादी भूमिका महाराजांनी घेतली. शिक्षणाशिवाय सारा समाज मतीहीन होईल, नीती भ्रष्ट होईल, गतिहीन होईल, अर्थशून्य होईल आणि कायमचा खचून जाईल म्हणून महाराजांनी सर्वांसाठी शिक्षणाची सोय केली. प्रत्येक व्यक्तीच्या ठाई असलेले सामर्थ्य आणि कौशल्य वाढवण्यास शिक्षणाचा हातभार लागणार आहे, अशी त्यांची श्रद्धा होती[4] इसवी सन 1894 साली राज्याची सूत्रे हाती घेतली तेव्हा कोल्हापूर संस्थानात 190 शाळा आणि विद्यार्थी संख्या 11399 होती. सन 1922 साली 590 शाळा आणि विद्यार्थी संख्या 31096 पर्यंत पोहोचली. 500 लोकवस्तीच्या प्रत्येक गावी शाळा त्यांनी सुरू केल्या. दरवर्षी सरकारी महसुलापैकी सहा टक्के खर्च

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

शिक्षणावर त्यांनी केला. 1913 मध्ये त्यांनी प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावी व ती बहुसंख्येने राहणाऱ्या जातीच्या व्यक्तीने चालवावी असे मत दिले स्वतंत्र खाते उघडून शिक्षण संचालकांची नेमणूक केली. 1 जुलै 1918 पासून सुरु होणाऱ्या सर्व शाळांची तारीख वार यादी करवीर गॅझेटमध्ये प्रकाशित केली[5] 'स्त्री शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी विशेष अधिकाराची जागा त्यांनी निर्माण केली. होतकरू मुलींसाठी शिष्यवृत्ती दिल्या. रखमाबाई केळुसकर यांना 1895 मध्ये राज्याच्या पहिल्या भारतीय स्त्री अधीक्षक म्हणून नेमले. स्त्री विषयक कायदे,बालविवाह, विधवा विवाह, नागरी विवाह, पुनर्विवाह इत्यादी मंजूर करून त्याची अंमलबजावणी केली. स्त्रियांच्या कर्तुत्वाचे क्षेत्र मोकळे केले पाहिजे, त्यांची अस्मिता जागी केली पाहिजे, असा महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन होता. त्यांनी पाटील स्कूल, तलाठी स्कूल सुरू केले. शिक्षक प्रशिक्षण केंद्र तसेच लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल सुरू केले.[6]

अस्पृश्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी प्रयत्न केले. 1896-97 मध्ये अस्पृश्य शाळांची संख्या सहा पर्यंत होती. महाराजांनी ती संख्या 25 वर नेली. 1908 मध्ये अस्पृश्यांसाठी वसतिगृह काढले. वसतीगृहाद्वारें बहुजन समाजाचा विकास घडवून आणला. कोल्हापुर है शहर वसती ग्रहांची जननी व छत्रपती शाहू महाराज हे भारतीय विद्यार्थी वसतिगृहांचे आद्य जनक मानले जातात. कोल्हापूर हे मल्लविद्याचे विद्यापीठ बनविले. ग्रंथ निर्मिती व ग्रंथ वृद्धीच्या प्रयत्नांना आर्थिक सहकार्य केले. शिक्षण हे सामाजिक विकासाचे, आर्थिक समृद्धीचे व सत्तेचे उगम स्थान असल्यामुळे गतिशील महाराजांना हे शिक्षण हरेक मार्गाने सर्व थरातील लोकांपर्यंत पोहोचवायचे होते.

**अस्पृशोद्धार:** महाराजांनी जातिभेद निर्मूलनासाठी प्रयत्न केले. प्रबोधन केले. शिक्षणातून समाज क्रांती त्यांना घडवायची होती. 1902 साली त्यांनी आदेश काढला होता, सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी 50 टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या.बहुजन समाजातील नवशिक्षित तरुणांना राज्यकारभार त्यांनी सामावून घेतले. शिकलेल्या दलितांना वकिलीच्या सनंदा दिल्या. मांगांना कुत्तेवान म्हणून ठेवले.हत्तीवरील वाहत म्हणून दादू आणि रामू या महारांना ठेवले. स्वतः महाराजांचा ड्रायव्हर यल्लाप्पा नाईक हा महार होता. अस्पृश्य जातींना समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली. समाजातील शिवा शिवीची भावना नष्ट व्हावी हा त्यांचा हेतू होता. पोलीस नाईक, हवालदार, जमादार या पदांवर त्यांच्या नेमणुका केल्या. सन 1919 मध्ये दर महा आठ रुपये स्कॉलरशिप देऊन अस्पृश्य मुला-मुलींना तलाठी क्लासला पाठवून प्रशिक्षण दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सत्कार त्यांनी माणगाव मध्ये केला.

सर्व व्यक्तींचा दर्जा हक्क आणि संधी यांच्या समते खेरीज स्थिर स्वातंत्र्य संभवतच नाही, या गृहीत कृत्यावर महाराजांची सर्व धोरणे आधारलेली होती. सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, सरकारी विश्रामगृहे, अन्नछत्रे, पानवटे इत्यादी ठिकाणी मनुष्यप्राण्याचा विटाळ मानून नये, असा आदेश त्यांनी काढला होता जुलै 1918 मध्ये त्यांनी महार,रामोशी आणि बेरड या जातींची हजेरी पद्धत बंद केली[7] सुशिक्षित दलितांना सरकारी नोकऱ्या व वकिलीच्या सनदा दिल्या. म्युनसी पालिटीचे सभासद होण्याचा हक्क दिला. सर्व सार्वजनिक ठिकाणी त्यांना इतरांच्या बरोबरीने वावरता येईल असा बंदोबस्त केला. जाती परिषदांना त्यांनी उत्तेजन दिले. जातिभेद निर्मूलनाच्या संदर्भात महाराजांनी

केवळ विचारच मांडले नाहीत, तर आपल्या वैयक्तिक आचाराने याविषयी समाजासमोर आदर्श ठेवला. आवश्यक तिथे कायदे करून या विचारांची अंमलबजावणी केली.

**वेदोक्त प्रकरण:** महाराजांनी समाजाभिमुख धोरणाचा स्वीकार केला संस्थांच्या राज्यकारभारात ब्राह्मण किंवा उच्च जातीच्या व्यक्तींचेच प्रमाण अधिक आहे हे पाहून त्यांनी अब्रह्मणांना नोकऱ्या दिल्या या काळातील वेदोक्त प्रकरणांनी सामाजिक जीवनाला वेगळेपण मिळाले सन 899 मध्ये पुरोहित नारायण भटजी वेदोक्त ऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणत असल्याचे दिसले महाराज क्षत्रिय नसल्यामुळे सूत्रांसाठीचे मंत्र म्हणत असल्याचे त्यांनी सांगितले म्हणून महाराजांनी भिक्षुक संघर्ष केला राजांनी भंग केल्याबद्दल प्रमुख राजपुरोहित राजू उपाध्ये यांना नोकरीतून बडतर्फ केली त्यांची वतने काढून घेतली न्यायालयात निकाल महाराजांच्या बाजूने लागला प्रभातकार कोठारी विजय मराठाकार शिंदे प्रबोधनकार ठाकरे इत्यादींनी या प्रकरणी शाहू महाराजांची वैचारिक बाजू घेतली[8] आर्थिक क्षेत्रातील कार्य समाजाचा आर्थिक विकासावर इतर क्षेत्रातील सर्वांगीण विकास अवलंबून असतो याची जाणीव असल्याने महाराजांनी शेती उद्योगधंदे व्यापार व सहकार इत्यादी क्षेत्रात नवीन उपाययोजना केल्या व समाजाचा कायापालट घडविला दुष्काळ निवारण ची कामे केली जनावरांच्या चारापाण्याची सोय केली शेतसरात सूट दिली. सावकारांच्या ताब्यातून जमिनी सोडविल्या महाराणी लक्ष्मीबाई तलावांना राधानगरी धरणाचे काम केले या प्रदेशात हरितक्रांती घडवून आणली तुतीच्या झाडांची लागवड केली राखीव जंगलांची निर्मिती केली जनावरांची पिकांची प्रदर्शनी भरविली बलुतेदारी पद्धतीवर बंदी घातली यावरून समाजाच्या आर्थिक विकासासाठी महाराजांनी किती लक्ष दिले याची जाणीव होते.

1895 मध्ये त्यांनी शाहूपुरी या व्यापार पेटीची स्थापना केली शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विविंग मिल चा पाया घातला जिनिंग व हातमाग फॅक्टरी ला मदत केली सहकाराची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली आर्थिक विकासाकडे लक्ष दिले लघु व विकेंद्रीत उद्योगांचे धोरण अवलंबत आणून कृषी औद्योगिक समाजाचा पाया घातला.[9] समाजाचा शैक्षणिक व सामाजिक विकास होणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच महत्त्व आर्थिक विकासालाही आहे याची महाराजांना जाणीव असल्याने शेती व्यापार उद्योग धंद्याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले व प्रोत्साहन दिले

**कला क्रीडा क्षेत्रात योगदान:** हाराजांनी सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान दिल्याने कोल्हापूर हे संस्थान कला क्रीडा विद्येचे माहेरघर झाले महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत शाहू महाराजांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे कलांना प्रोत्साहन देताना कलावंतांची जात पात धर्म पंथ यांचा विचार ते करीत नसत कोल्हापूर गायन समाज त्यांच्याच पाठबळावर स्थापन झाला होता शास्त्रीय संगीता बरोबर महाराजांच्या प्रोत्साहनामुळे भजन गायकीसह जालना मिळाली तुकाराम बुवा सरनाईक पंडितराव करंबळेकर कृष्णा बागणीकर इत्यादी भजन गायक त्यांच्या काळात उदयास आले माकडवाल्यांची त्यांनी वसाहत उभारली त्यांना सरकारी नोकऱ्यात सामावून घेतले त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची सोय केली त्यांच्या स्थिर जीवनाचा पाया घातला फासेपारध्यांना पहारेकरी म्हणून नेमले.

बालगंधर्व केशवराव भोसले गोविंदराव टेंबे इत्यादी कलावंतांना त्यांनी मदत केली अल्लादिया खासारख्या केसरबाई केरकर इत्यादी कलाकारांना प्रोत्साहन दिले शाहीर तमासकीर सत्यशोधक चलसेवाले इत्यादी कलाकारांशी त्यांचे सक्य होते 1913 मध्ये कोल्हापुरात महाराष्ट्र सिनेमा हे सिनेमागृह उभे केले महाराष्ट्र फिल्म कंपनीला त्यांनी जागा दिली मल्लविद्या व मर्दानी खेळाकडे त्यांनी एक कला प्रकार म्हणून पाहिले 895 मध्ये मोतीबाग तालीम बांधली मल्लविद्याच्या विकासाची पद्धतशीर योजना राबवली देशभरातून मल्ल शिक्षणासाठी कोल्हापूरला येत पैलवानांना आश्रय देताना जात-पात पाहिली नाही महाराजांनी दिलेल्या उदार आश्रयामुळे कुस्ती पंढरी ठरलेल्या शेकडोम मुलांची एक सशक्त पिढी पुढे आली त्यांनी उभारलेल्या खासबाग मैदानामुळे कोल्हापूरची शान वाढली.[10]

**शिकार आणि वन्य जीव संरक्षण संवर्धन:** महाराजांना शिकारीचा छंद बालपणापासून होता बहिरी ससाणे सारस लगड वगैरे प्राणी त्यांनी पाळले होते वन्यजीवांच्या संवर्धन संरक्षणार्थ संरक्षित अभयारण्याची व्यवस्था त्यांनी केली होती प्राण्यांची पिकांचे नुकसान करू नये म्हणून अरण्याच्या भोवताली खंदक खोदून घेण्याची खबरदारी त्यांनी घेतली होती कासारी नदीवर पशुपक्ष्यांसाठी एक छोटे धरण त्यांनी बांधून घेतले होते त्यांनी प्राण्यांवर भरपूर प्रेम केले आपल्या राज्यामध्ये हत्तींची पैदास व जोपासना उत्तम व्हावी यासाठी राधानगरी रजपुतवाडी कोल्हापूर वगैरे ठिकाणी भव्य आगड उभारले परदेशातील स्नेहांकडून विविध प्राण्यांची मागणी करणारी शाहू महाराजांची अनेक पत्रे उपलब्ध आहेत.

**सारांश;** समाजात परिवर्तन घडवून समता स्थापन करणाऱ्या क्रांतिकारक व्यक्तिमत्त्वाच्या छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थांच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान दिलेले दिसते. त्यांच्या ठिकाणी असलेल्या अभिजात रसिकतेमुळे संगीत, नृत्य, चित्रपट, नाटक चित्रकला, मल्लविद्या, शिकार वगैरे अनेक क्षेत्रात एक नवे चैतन्य निर्माण झाले. बरीच गुणी माणसे समाजासमोर आली व त्यांनी देशव्यापी कीर्ती मिळवली. ज्या काळात कलावंतांना फारशी सामाजिक प्रतिष्ठान नव्हती,स्वकीयांचा पाठिंबा नव्हता, त्या काळात महाराजांनी त्यांना बहुतेक मानसिक आधार दिला. वर्ण जाती निर्मूलनाची त्यांची भूमिका होती. त्यांनी शिक्षण, शेती, रोजगार, दुष्काळ निवारण सहकार इत्यादी क्षेत्रात विकासासाठी प्रयत्न केले. सहकारी माध्यमातून पतपुरवठा, शेतमालाची खरेदी विक्री इत्यादी क्षेत्रांमध्ये त्याकाळी राबवलेली धोरणे किती अचूक होती, हे काळाने सिद्ध केले. त्यांची दूरदृष्टी यात दिसून येते. महाराजांनी बांधलेली धरणे, आज त्या परिसरात आढळणाऱ्या हरितक्रांतीस कारणीभूत ठरली आहेत. त्यांनी उभ्या केलेल्या सहकारी चळवळीचा आज झालेला विस्तार अनेक क्षेत्रात पाहायला मिळतो. समाजातील मागासलेपणा दूर करून विषमतेने व्यापलेले सामाजिक जीवन समानतेच्या पातळीवर आणण्याचे एकमेव साधन म्हणून महाराजांनी शिक्षणाचा विचार केला होता. औद्योगिक तंत्रज्ञान विषयक आणि उदारमतवादी शिक्षणाला प्राधान्य देऊन पश्चिम महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक व शेतकी औद्योगिक क्रांतीची बीजे त्यांनी शिक्षण प्रसाराद्वारे पेरली होती जातीभेद, स्त्रीदास्य, पुरोहित वर्ग वर्चस्व, शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी वगैरे सरंजामशाहीची अपत्ये निकालात काढण्यासाठी महाराजांनी जे काही केले ते स्वराज्यासाठी अनुकूल समाज तयार करण्याचे प्रकल्प होते. माननीय यशवंतराव चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे, शाहू महाराजांना अभिप्रेत असलेली सामाजिक क्रांती पूर्णत्वास न पोहोचल्यामुळे जातीभेद अस्पृश्यता, आंतरजातीय विवाह या सर्व विषयावरचे त्यांचे विचार आजही क्रांतीकारक वाटतात. महाराजांचे विचार आणि व्यवहार आजही मार्गदर्शक आहेत. प्राथमिक शिक्षण, शेती आणि शेतकरी सुधारणा मागासवर्गीयाना समान संधी, शेतकरी आणि कामगार यांच्या प्रश्नांचा समन्वित विचार आणि अस्पृश्यता निर्मूलन या क्षेत्रात शाहू महाराजांनी जे भरीव कार्य

केले, ते आदर्श समजून आपणास ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. भारतीय संविधानाने समतेच्या हक्काचे जे पैलू अधोरेखित केले आहेत, ते सगळे शाहू महाराजांच्या भाषणामध्ये, शासन निर्णयामध्ये आणि कारभारात व्यक्त झालेले दिसून येतात. आपण सर्वजण समान प्रतिष्ठेचे बांधव आहोत हे त्यांनी नागपूरच्या अस्पृश्यता निवारण परिषदेपुढे केलेले प्रतिपादन बंधू भावाचे तत्व अचूक शब्दात स्पष्ट केले आहे. त्यांची आर्थिक धोरणे भारतीय संविधानातील समाजवाद्यांच्या समताधिष्टीत समाज रचनेचा आणि सामाजिक न्यायाच्या आदर्श जवळ जाणारी होती. 6 मे 1922 ला या महान व्यक्तिमत्त्वाच्या जीवनाची अखेर झाली, त्यांच्या निधनामुळे एक क्रांतीपर्वाचा अस्त झाला.

**संदर्भ**

1. सूर्यवंशी जी.एस. राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन, इचलकरंजी १९७८, पृष्ठ क्रमांक 29.
2. नाईक तू.बा. छत्रपती राजश्री शाहू महाराज, युनिव्हर्सल प्रकाशन कोल्हापूर, 1974, पृष्ट क्रमांक 10.
3. भोळे भा.ल.छत्रपती शाहू महाराज, महाराष्ट्र चरित्र ग्रंथ माला, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे 2010, पृष्ठ क्रमांक 73.
4. भगत रा. तू. राजश्री शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे 2003, पृष्ठ क्रमांक 106.
5 डॉक्टर पवार जयसिंगराव, (संपादक) राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, 2001, पृष्ठ क्रमांक 389.
6.Sangve Vilas, (ed.) Rajshri Shahu Chhatrapati Papers, bol vi, (1910-1913) kolhapur, Shahu Research centre, Shivaji University, 1994, Pg.No.62
7. भोळे भा. ल छत्रपती शाहू महाराज, श्री गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, 2010, पृष्ठ क्रमांक 112.
8. सूर्यवंशी कृ.गो राजश्री शाहू राजा आणि माणूस, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे, 1984, पृष्ठ क्रमांक 239.
9.Mhopare R.S.Patil J. F. Economic Policies and Program, of Rajshri Chhatrapati Shahu Maharaj, kolhapur, Shivaji Uni. 2007
10. साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर 2016, पृष्ठ क्रमांक 111.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

29

# राजर्षी शाहू महाराज यांच्या समाज परिवर्तनवादी सुधारणांचा अभ्यास

**डॉ. अनिल शिवाजी टिके**
इतिहास विभाग प्रमुख
मुधोजी महाविद्यालय,फलटण

---

**प्रस्तावना:** महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले यांच्या कार्यामुळे समाज परिवर्तनाची नांदीच निर्माण झाली. राजर्षी शाहू महाराज यांनी समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करणारे, समतावादी धोरणाचा पुरस्कार करून समाज परिवर्तन घडवून आणणारे, जातीयता दूर करणारे, अस्पृशोउद्धार, सर्व धर्म समभाव हे तत्व बाळगून राज्यकारभार करणारे राजर्षी शाहू महाराज होते. त्यांनी सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक या काळात शाहू महाराजांनी प्रयत्न केले. छत्रपती शाहू महाराज हे एक समाज सुधारक व कोल्हापूर संस्थानचे छत्रपती (इ स १८८४- १८२२) दरम्यान होते.

सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार राजर्षी शाहू महाराज हेच होते. लोकांनी दिलेली 'लोकांचा राजा' ही प्रतिमा राजर्षी शाहू महाराजांची जनलोकांत रुजवली. राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले. आपल्या संपूर्ण जीवनकार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारक राज्यकर्ते ठरले. रयत व उपेक्षीत समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. राजर्षी शाहू महाराजांची आपल्या कालावधीत राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, कौटुंबिक आणि व्यक्तिगत अशा स्वरूपांचे अनेक निर्णय घेतले. हे निर्णय घेताना त्यांनी समाजपरिवर्तनाची संदर्भ चौकट वापरली.

याच विषयाच्या अनुषंगाने 'राजर्षी शाहू महाराज यांच्या समाज परिवर्तनवादी सुधारणांचा अभ्यास' विषय घेऊन प्रस्तुत शोधनिबंधात मांडणी केली आहे.

**१. संशोधनाचे उद्देश :**

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्य व कर्तृत्वाचा अभ्यास करणे.
२. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समाज, जातिभेदाविरोधी विषयी विचार याचा अभ्यास करणे.
३. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून शिक्षणविषयक विचार व योगदानाचा अभ्यास करणे.
४. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्यउद्धाराचे कार्य अभ्यासने.
५. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची शैक्षणिक व नोकरीतील आरक्षणाविषयी भूमिका याचा अभ्यास करणे.
६. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्त्री जातीच्या संरक्षणाचे कायदे अभ्यासने.

अशा विविध उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केलेली आहे.

**२. विषय विवेचन :** राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून इ. स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व 'शाहू' हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोदयाच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबध्द झाले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ. स १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले[१]

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. राजर्षी शाहू महाराज यांच्या मते, 'शिक्षणामुळे समाजाचा दर्जा उंचावतो' यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. त्यांचे शैक्षणिक कार्य व विचार समाज परिवर्तनाकडे घेऊन जाणारे होते. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाच प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण

करण्याची भूमिका घेतली. जुलै १९१७ मध्ये विधवा वर्गाची समाजातील स्थिती पाहून विधवाच्या पुनर्विवाह कायदेशीर मान्यता देणारा कायदा पास केला. कोल्हापूर संस्थानांमध्ये १२ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर इलाख्यातील विवाह संबंधी कायदा या नावाने गॅझेट प्रसिद्ध झाले. या कायद्यामध्ये मुलाचे विवाहाचे वय १८ वर्षे पूर्ण तर मुलीचे विवाह वय १४ वर्षे पूर्ण असावे अशा पद्धतीची अट या कायद्यामध्ये होती.[२] समाज वर्गाकडून स्त्रियांची होणारी पिळवणूक थांबवण्याचा मोठा प्रयत्न केला. यातूनच त्यांनी बहुपत्नीत्व, बालविवाह, अमान्य वर्तनास प्रतिबंध घालणारे कायदा, देवदासी प्रतिबंधक कायदा, घटस्फोट व वारसा कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, विधवा पुनर्विवाह कायदा असे धोरण राबवून १७ जानेवारी १९२० मध्ये घटस्फोट व वारसा हक्क संबंधीचा कायदा करवीर संस्थांमध्ये पास केला. सन १९२० चा हा कायदा हिंदू वारशाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा म्हणून सुधारणावादी पद्धतीने तो प्रसिद्ध केला. २ ऑगस्ट १९१९ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये अमानवी वर्तनास प्रतिबंध घालणारा कायदा प्रसिद्ध केला. कायद्यामुळे स्त्रियांची स्थिती सुधारणा व संरक्षण होण्यास मदत झाली याचे श्रेय राजर्षी शाहू महाराज यांनाच जाते.[३]

अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत बंद केजातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापण केली.

समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू महाराजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती, म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. करवीर तालुक्यातील 'चिखली' या गावी सक्तीचे पण मोफत प्राथमिक शिक्षण देणारी पहिली शाळा ४ मार्च १९१८ रोजी सुरू झाली.[४] तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रु दंड आकारण्याची कायदेशीर तरतूद केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत सन १९१९ मध्ये बंद केली.

अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सन १९०८ मध्ये 'अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली. अस्पृश्यांमध्ये शिक्षणासाठी जागृती घडवून आणणे, शाळांची संख्या वाढवणे हा महत्त्वाचा उद्देश होता. शैक्षणिक कार्यामुळे शाळांच्या संख्येबरोबर विद्यार्थी संख्या वाढली. सन १९१२ पर्यंत अस्पृश शाळांची संख्या २७ तर विद्यार्थ्यांची संख्या ६३६ इतकी झाली. अस्पृश्यता उद्धरासंदर्भात राजर्षी शाहू महाराजांचे विचार अत्यंत प्रेरक व दिशादर्शक ठरतात. त्यांच्या मते, "अस्पृश्यता म्हणजे जाती भेदाचे हिडीस रूप आहे आणि ते सर्वांना लज्जास्पद आहे." अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसास लावणे हे फार निंदनीय आहे.तुम्ही अस्पृश्य नाही तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त पराक्रमी, असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटक आहात."[५] या समाजाची मानसिक गुलामगिरी नष्ट व्हायला हवी आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा. त्यामुळे या समाजाला शिक्षण, नोकरी, व्यवसाय संधी यांची उपलब्धता करून द्यावी असे जर झाले तर अस्पृश्यता निर्मूलन हे कार्य अगदी गतिशील होईल असे राजर्षी शाहू महाराज मानत होते. जातिभेद व अस्पृश्यता या एकमेकास हिन समजणाऱ्या व आपापसात द्वेष वाढवणाऱ्या गोष्टी असल्याने त्यांचा ब्राह्मण वर्गाने त्याग करावा अशी प्रेमाची विनंती करताना शाहू महाराज म्हणतात, प्रेमाने प्रेम वाढते व द्वेषाने दोष वाढतो. अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. असा व्यापक दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून ६ जुलै १९०८ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातीला ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली

राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठी कायद्याची निर्मिती केली. त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले व मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. जातिभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पाडली. जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. ब्रिटिश सरकारने या जमातींवर गुन्हेगारीचा शिक्का मारला त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे शाहू महाराजानी हजेरी पद्धत बंद केली.[६] या जातीजमातींच्या लोकांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले.

राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या उद्देशाने १८ सप्टेंबर १९१८ रोजी आपल्या राज्यातील महार वतने रद्द केली. अस्पृश्यांच्या नावावर जमिनी रयतवारीने करुन दिल्या.[७] त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहू महाराजांनी समतेसाठी प्रयत्न केले. २६ जुलै १९०२ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करून छत्रपती शाहूंनी आपल्या द्रष्ट्या पुरोगामित्वाचे दर्शन घडविले. या नुसार सरकारी खात्यात रिक्त होणाऱ्या जागांपैकी ५० टक्के जागांवर सुशिक्षित तरुणांची भरती करण्यात येईल असे त्यांनी जाहीर केले.[८] यादृष्टीने संपूर्ण भारतामध्य आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात वसातीगृहे सुरू केली. यातूनच १८ एप्रिल १९०१ रोजी मराठा विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस' ची स्थापना करण्यात आली. तसेच लिंगायत, सारस्वत, पांचाल, जैन, मुसलमान, शिपी, देवज्ञ, वैश्य, ढोर, चांभार, नाभिक इ. जातीच्या विद्यार्थासाठी स्वतंत्र वसतिगृह सुरु करण्यात आली. पुरोहित पद्धती बंद करण्याच्या उद्देशाने ६ जुलै १९२० रोजी शाहूनी शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा सुरू केली.२३ फेब्रुवारी १९१८ च्या आदेशानुसार करवीर संस्थानात पगारी तलाठ्यांच्या नेमणुका केल्या जाऊ लागल्या होत्या.[९] अशा रीतीने बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. शाहू महाराजांनी शेती, उद्योग, सहकार या तिन्ही क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडवून आणले. राजर्षी शाहू महाराज यांनी शेती व्यवस्थेत बदल घडवून आणून शेती व्यवस्थेतील आधुनिक उपक्रमाची संकल्पना मांडली. कोल्हापुरात आधुनिक शेती अवजारांचे म्युझियम, संस्थानात चहा पिकवण्याचा प्रयत्न, शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण, शेती अवजाराचे प्रदर्शन, सुधारित शेती पद्धतीचा प्रसार यावरुन शास्त्रीय पद्धतीने शेती विकास हे तत्व राजर्षी शाहू महाराज यांनी यशस्वी केले.

थोडक्यात यावरून असे दिसून येते कि राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरक ठरले. शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, चलन व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, स्त्री शिक्षण, राजकीय व्यवस्था, अस्पृश्यउद्धार हे त्यांचे कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाहीच्या दृष्टीने मुख्यघटक बनले. या कार्यावरच सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ निर्माण झालेले दिसतात.

**निष्कर्ष**

१. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व विचार समाज परिवर्तनाकडे घेऊन जाणारे होते.

२. मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका राजर्षी शाहू महाराजांनी बजावली.

३. कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला.

४. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कार्यात समता, बंधूता, न्याय, धर्म निरपेक्षता यावर विशेष भर दिला.

५. उपेक्षित वर्गाला सामाजिक दर्जा व या वर्गात स्वाभिमान निर्माण केला.

६. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करण्याची भूमिका घेतली.

८. सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजानी प्रयत्न केले.

९. राजर्षी शाहू महाराज यांचे समाज परिवर्तनाचे विचार हे खऱ्या अर्थाने समाजाला समतेच्या मार्गावर घेऊन जाणारे ठरले.

**संदर्भ :**

१.भगत, रा. तु (२०१६) राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व शिक्षणकार्य, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.पृ.क्र.२७.

2. जाधव नरेंद्र (१९८०) महाराष्ट्रातील मानचिन्हे , मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे. पृ.क्र. ५०.

3. नांदेडकर, प्रा. डॉ. व. गो. (२०११) राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ.क्र.४०-४५.

४ कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पॅप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती मुंबई १९८९. पृ.क्र.१२०.

५. भोसले एस. एस. क्रांतीसुक्ते राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती १९९१, पृ.क्र.१२५.

६. पवार जयसिंगराव (संपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती, मे २००१. पृ.क्र.३२१.

८. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८. पृ.क्र.५०.

९. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती एक मागवा,सुमेरू प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती २००४. पृ.क्र.४८.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

30

# 21 व्या शतकातील छत्रपती शाहू महाराजांची प्रसंगिकता

**डॉ. खोपडे स्मिता जयेंद्र**
श्री शिवाजी मराठा हायस्कूल व जुनीयर कॉलेज, पुणे

---

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे लोककल्याणकारी राजे होऊन गेले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोल्हापूर गादीचे ते अधिपती होते. त्यांचा कालखंड (26 जून 1874 ते 6 मे 1922) एकूण 48 वर्षांचा आहे. त्यांचा जन्म 26 जून 1874 रोजी कसबा बावडा जिल्हा कोल्हापूर येथे घाटगे घराण्यात झाला[1]. 1884 साली ते कोल्हापूर गादीवरती दत्तक आले,आणि 2 एप्रिल 1894 रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला[2]. ते उच्चशिक्षित होते. धारवाड आणि राजकोट येथे त्यांचे शिक्षण झाले. राजगादीवर आल्यानंतर त्यांनी आपल्या राज्यात अमुलाग्र बदल केला.राजा हा राज्याचा मालक (धनी) नसतो, तर तो जनतेचा सेवक असतो.राजसत्ता ही उपभोगासाठी नव्हे तर लोककल्याणासाठी असते. हे राजकीय तत्त्वज्ञान त्यांनी दिले. छत्रपती शिवाजी महाराजांचा वसा आणि वारसा त्यांनी अत्यंत खंबीरपणे सांभाळला.राजेशाहीच्या काळात लोकशाहीची पायाभरणी त्यांनी केली. आजच्या संसदीय लोकशाहीची पाळीमुळे शिवचरित्र आणि शाहू चरित्रात आपल्याला प्रकर्षाने दिसतात.

शाहू महाराजांनी कृषी,आरोग्य, क्रीडा, व्यापार, जलसिंचन, साहित्य, कला, शिक्षण, उद्योग,जातीनिर्मूलन, स्त्रीमुक्ती( स्त्री स्वातंत्र्य), धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक, इत्यादी क्षेत्रात अमुलाग्र क्रांती केली. शाहू महाराजांच्या काळात आपल्या देशात सुमारे 550 संस्थाने (छोटी राज्य) होती.पण शाहू महाराजांचे राज्य हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे कारण ते राज्य लोककल्याणकारी राज्य होते.

शाहू महाराजांच्या मृत्यूला 2022 साली शंभर वर्षे पूर्ण झाली. तर 2024 हे वर्ष शाहू महाराजांचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष आहे. तरी देखील शाहू महाराजांचे विचार आणि कार्य आज देखील प्रेरणादायक आहेत. आजही शाहू महाराजांचे विचार आणि कार्य प्रस्तुत आहेत.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात १९१७ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले[3]. ग्रामीण भागातील विशेषतः बहुजन समाजाच्या शिक्षणावर त्यांनी अधिक भर दिला. त्यांनी शालेय शिक्षणावर एक लाख रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला. त्यातील ८० हजार रुपये दरबार खजिन्यातून आणि २० हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च केले. मंदिरातील पैसा शिक्षणासाठी वापरणारा भारतातील प्रागतिक विचारांचा राजा म्हणजे शाहू महाराज[४]! ज्यावेळेस शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात शालेय शिक्षणासाठी एक लाख रुपये खर्च केले. त्यावेळेस इंग्रज सरकारचा सिंध, गुजरात, मुंबई, कर्नाटक प्रांताचा शिक्षणावरील खर्च एक लाख रूपये होता[५]. म्हणजे इंग्रज सरकारच्या अनेक पटींनी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात शिक्षणावर खर्च केला. अन्नक्षेत्राला पैसे देण्यापेक्षा ते पैसे शाळेला दिले तर स्वावलंबी आणि स्वाभिमानी पिढी निर्माण होईल, हा त्यांचा दूरदृष्टीचा विचार होता[६]. त्यांचा तो विचार आजदेखील खूप उपयुक्त आहे. स्वतंत्र भारतातील शालेय शिक्षणावरील खर्च एकूण बजेटच्या सुमारे पाच टक्केच्या पुढे सरकलेला नाही. शाळा, महाविद्यालयांपेक्षा धार्मिक स्थळावर जास्त खर्च होताना प्रकर्षाने दिसतो. अशा काळात शाहू महाराजांच्या विचारांची व कार्याची नितांत गरज आहे. त्यांनी कोल्हापूरात सर्व जातिधर्मियांसाठी वसतिगृहांची स्थापना केली आपल्या राज्यात त्यांनी कोणत्याही स्वरुपाचा भेदभाव केला नाही.

शाहू महाराज धार्मिक होते. अंबाबाई, तुळजा भवानी, शंभू महादेव, जोतीबा इत्यादी दैवतांबद्दल त्यांना नितांत आदर होता, परंतु परधर्मियांचा त्यांनी द्वेष केला नाही, जैन, बौद्ध मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी इत्यादी धर्मियांचा हिंदू धर्मियांप्रमाणेच हिंदू आदर-सन्मान केला.त्यांना संरक्षण दिले. मुस्लीमांच्या शिक्षणासाठी त्यांनी कोल्हापूर शहरात मुस्लीम बोर्डिंग स्थापन केली[७]. जैन बोर्डिंग, दलित बोर्डिंग स्थापन केली. आपल्या राज्यात त्यांनी जातिय किंवा धार्मिक ध्रुविकरणाला थारा दिला नाही. पारगांवच्या मौनीबाबा मठाच्या उत्पन्नाची रक्कम तेथील मुस्लीमांना मशिदीच्या बांधकामासाठी तर रुकडी येथी पिराच्या उत्पन्नातील रक्कम तेथील अंबाबाई मंदीराच्या बांधकामासाठी दिली,[८] असा धार्मिक आणि सामाजिक समतोल त्यांनी साधला. आज मात्र सामाजिक समतोल बिघडत आहे. देशात मोठ्या प्रमाणात जातिय आणि धार्मिक ध्रुवीकरण होताना दिसत आहे. अशा काळात शाहू विचारांची देशाला नितांत गरज आहे. शाहुविचार हा समाजाला, सर्वजातीधर्मीयांना अर्थात देशाला जोडणारा विचार आहे.त्यांना संरक्षण दिले. मुस्लीमांच्या शिक्षणासाठी त्यांनी कोल्हापूर शहरात मुस्लीम बोर्डिंग स्थापन केली. जैन बोर्डिंग, दलित बोर्डिंग स्थापन केली. आपल्या राज्यात त्यांनी जातिय किंवा धार्मिक ध्रुविकरणाला थारा दिला नाही. पारगांवच्या मौनीबाबा मठाच्या उत्पन्नाची रक्कम तेथील मुस्लीमांना मशिदीच्या बांधकामासाठी तर रुकडी येथील पिराच्या उत्पन्नातील रक्कम तेथील अंबाबाई मंदीराच्या बांधकामासाठी दिली, असा

धार्मिक आणि सामाजिक समतोल त्यांनी साधला. आज मात्र सामाजिक समतोल बिघडत आहे. देशात मोठ्या प्रमाणात जातिय आणि धार्मिक ध्रुवीकरण होताना दिसत आहे. अशा काळात शाहू विचारांची देशाला नितांत गरज आहे. शाहुविचार हा समाजाला, सर्वजातीधर्मीयांना अर्थात देशाला जोडणारा विचार आहे.

शाहू महाराज धर्माभिमानी होते, परंतु धर्मातील अनिष्ठ रूढी परंपरा नष्ट झाल्या पाहिजेत या विचारांचे होते. त्यामुळेच त्यांनी स्वतंत्र क्षात्र जगत गुरुपीठ नेमले. त्यावरती महान संस्कृत आणि तत्त्वज्ञानाचे पंडित सदाशिव लक्ष्मणराव पाटील (बेनाडीकर )यांची नेमणूक केली. हे त्यांच्या धार्मिक क्रांतीचे उदाहरण आहे. मानवाच्या प्रगतीसाठी धर्म असतो, हाच त्यांचा सुधारणावादी दृष्टीकोन होता, या दृष्टीकोनाची आज खूप गरज आहे, कारण २१ व्या शतकातील मानव अधिक कट्टरतेकडे चालला आहे.

शाहू महाराजांना जातीभेद मान्य नव्हता, त्यांनी खाजगी आणि सार्वजनिक जीवनात कधीही भेदभाव पाळला नाही, यांनी गंगाराम कांबळे यांना कोल्हापूरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी (आताचा भाऊसिंग्जी रोड) हॉटेल टाकून दिले, ते हॉटेल चालावे, त्याला प्रतिष्ठा मिळावी, गंगारामची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी शाहू महाराज स्वतः गंगाराम कांबळे यांच्या हॉटेल आत चहा पिण्यासाठी जात असत[९]. आज भारतीय समाजाला या मानसिकतेची गरज आहे. शुद्रतिशूद्रांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, ही शाहू महाराजांची भूमिका होती. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबडेकर, बालगंधर्व (नारायण श्रीपाद राजहंस), गान महर्षी मल्लादिखाँसाहेब, संगीतसूर्य केशवराव भोसले, कलामहर्षी बाबुराव पेंटर, भाई माधवराव बागल, शाहीर लहरी हैदर, प्रबोधनकार ठाकरे, आप्पासाहेब दादगोंडा पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी असंख्य प्रतिभावंतांना मोलाची मदत केली.[१०] मदत करताना ब्राहमण, मराठा, कायस्थ, मागासवर्गीय असा भेदभाव शाहू महाराजांनी केला नाही. राजा हा सर्व जातिधर्मियांचा आधारस्तंभ असतो, हा वस्तुपाठ आपल्या कृतीतून शाहू महाराजांनी घालून दिला. राजकीय नेत्याने भेदभाव न करता सर्वांचा सर्वांगीण उद्गार करायचा असतो. हा संदेश शाहूचरित्र आजही २१ व्या शतकात आपणाला देते.जातीभेदाने मानवी समाजाचे नुकसान होते, प्रगती खुंटते असा शाहू महाराजांचा विचार होता. शाहू महाराज केवळ बोलणारे नव्हे, तर प्रत्यक्ष कृती करणारे राजे होते, त्यांनी आपल्या भगिनी चंद्रप्रभादेवी यांचा विवाह इंदोरचे राजपुत्र यशवंतराव होळकर यांच्याबराबर निश्चित केला,[११] पुढे तो त्यांचे राजपुत्र राजाराम महाराज यांनी लावून दिला. शाहू महाराजांचे हे विचार आणि कार्य आजच्या काळात दीपस्तंभासारखे आहेत. छत्रपतींची परंपरा समतावादी आहे. छत्रपतींची परंपरा सामाजिक सलोखा जपणारी आहे.छत्रपतींची परंपरा मानवी मूल्ये वृद्धिगत करणारी आहे. म्हणून ती २१ व्या शतकात देखील अत्यावश्यक आहे.

शाहू महाराजांनी आपल्या देशात आरक्षणाचा पाया घातला. सर्व जातिधर्मातील उपेक्षित, वंचितांना त्यांचे प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी त्यांनी आपल्या राज्यात 1902 साली ५०% आरक्षणाची घोषणा केली.[१२] शाहू महाराजांचा हा निर्णय क्रांतीकारक आहे, कारण आरक्षण सुरू करण्यापूर्वी प्रशासनात विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. कोणत्याही समुदयाचा हक्क हिरावून न घेता वंचितांना न्याय देण्याची भूमिका शाहू महाराजांनी घेतली. त्यावेळेस त्यांना विरोध आला, परंतु त्यांनी अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने त्यांनी आपले मत पटवून दिले, आज आरक्षणावरून अनेक समुदाय समोरासमोर ठाकले आहेत. देशात संघर्षाचे वातावरण आहे. जोपर्यंत आपल्या देशात सामाजिक आणि शैक्षणिक विषमता आहे तोपर्यंत आपल्या देशाला आरक्षणाची गरज आहे. आदिवासी, मागासवर्गीय, मजूर, कष्टकरी, शेतकरी, उपेक्षित वंचित वर्गाला त्यांचे प्रतिनिधित्व देण्यासाठी आरक्षणाची गरज आहे, शाहू महाराजांनी आपल्या देशात आरक्षणाचा घातलेला पाया हा शाहू महाराजांचा संवेदनशील दृष्टीकोन दर्शवितो. तेच आरक्षण डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनी 'संविधानात' शब्दबद्ध केले. आपल्या देशाच्या सामाजिक, शैक्षणिक आर्थिक विकासासाठी आरक्षणाची आजही गरज आहे.

शाहू महाराजांना आपल्या इष्ट परंपरांचा अभिमान होता, परंतु अनिष्ट परंपरा त्यांनी निर्धारपूर्वक नाकारल्या.[१३] ते विज्ञानवादी विचारांचे होते, भविष्य, पंचांग, मुहूर्त यावर त्यंचा विश्वास नव्हता, त्यांचा विश्वास प्रयलावर आणि कर्तृत्त्वावर होता." एकदा शाहू महाराजांकडे नामवंत जोतिषी आला व शाहू महाराजांना हस्तरेषा पाहून भविष्य कथन करण्यासाठी आग्रह करु लागला, तेव्हा शाहू महाराजांनी त्या ज्योतिषाला दरबारातून बाहेर काढले, त्याला अटक करून, ज्याला स्वतःचे उद्याचे भविष्य कळत नाही. अटक होणार आहे, हे ज्ञात असते तर तू आला असतास का ? असा प्रश्न केला"' व त्या जोतिषाला राज्याबाहेर हाकलून लावले[१४] याचा अर्थ शाहू महाराज प्रागतिक विचारांचे होते. ते अंधश्रद्धाळू नव्हते. परंतु आज अनेक नेते, अधिकारी, शिक्षित लोक भविष्य, पंचांग, मुहूर्त पाहतात. त्यामध्ये भरडले जात आहेत. विज्ञान युगात देखील अंधश्रद्धेने थैमान घातले आहे. त्यामुळेच शाहू महाराजांचे विचार आणि कार्य २१ व्या शतकांत देखील प्रासंगिक आहेत.

शाहू महाराज निर्व्यसनी होते, त्यांना दारूचा मोठा तिटकारा होता, कांही आप्तस्वकीय मद्यप्राशन करतात असे समजताच शाहू महाराज तेथे गेले. दारूच्या बाटल्या फोडल्या व त्यांना कडक शब्दात समज दिली.[१५] शाहू महाराजांच्या या विचारांची आज नव्या

पिढीला नितांत गरज आहे. आज आपण पाहतो, आपल्या देशात दारू, गुटखा, तंबाखू, अंमली पदार्थाने तरुण पिढीला विळखा घातला आहे. अनेकांचे जीवन उध्वस्त होत आहे. दारू आणि अंमली पदार्थ शरीरासाठी अपायकारक आहेत. हा संदेश शाहूचरित्र देते, त्यामुळेच शाहूविचार २१ व्या शतकात देखील अनुकरणीय आहे.

शाहू महाराज हे शेतकऱ्यांचे राजे होते, त्यांनी शेती, शेतकरी, मजूर आणि श्रमिकांचा कैवार घेतला. त्यांच्या घामाला दाम आणि श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे ही त्यांची भूमिका होती. कृषिक्षेत्रात क्रांती करण्यासाठी त्यांनी शेतीचे आधुनिकीकरण केले. काळाच्या ओघात ढाल-तलवार आणि तोफांची लढाई संपली असल्यामुळे त्यांनी तोफा वितळवून शेतीसाठी अवजारे तयार करून घेतली. शेतीमध्ये आधुनिकरण आणले. शेतीला बारमाही पाणी पुरवठा करण्यासाठी त्यांनी भोगावती नदीवर धरण बांधले (१९०९)[१६] त्या धरणाला 'राधानगरी धरण' असे नांव दिले. हे भारतातील त्याकाळातील सर्वाधिक जलसाठ्याचे पहिले धरण आहे. ते धरण आज ११६ वर्षाचे झाले आहे, तरीही ते मजबूत आणि अभेदय आहे. त्या धरण बांधकामासाठी शाहू महाराजांनी आपला शासकीय आणि खाजगी खजिना रिता केला. त्या धरणामुळे कोल्हापूरचा कायापालट झाला. दरडाई उपन्न
वाढले. आपल्या देशात जलसिंचनाची अनेक काम अपुरी आहेत, त्यामध्ये मोठा भ्रष्टाचार आहे. शेतकरी पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत, राज्यकर्ते त्याकडे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यासाठी शाहू विचारांची आजही गरज आहे.

शाहू महाराजांनी शेतीचे आधुनिकीकरण केले. 'पन्हाळा टी-4' या जातीच्या चहाची लागवड केली,[१७] तो चहा युरोपात निर्यात केला. 'जयसिंगपूर' नावाचे शहर वसविले. ती कृषी बाजारपेठ म्हणून नावारूपाला आली. कोल्हापूर - मिरज रेल्वेमार्ग निर्माण केला. शाहू महाराजांनी शेती आणि शेतक-यांना प्रतिष्ठा मिळवून दिली. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे, असे त्यांचे कृषिधोरण होते, त्यामुळे त्यांच्या राज्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात क्रीडा, साहित्य, कला, सांस्कृतिक कलेला आश्रय दिला.[१८] अनेक कलाकार, शाहिरांच्या, लेखकांच्या, पैलवानांच्या गायकांच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहिले. ज्या राज्यात शांतता, सुरक्षितता आणि आर्थिक विकास असतो, त्या राज्यात क्रीडा, साहित्य, कला यांचा विकास होतो. शाहू महाराजांनी अनेक कलाकार, पैलवान यांना राजाश्रय दिला. त्यामुळे अनेक पैलवान नावारूपाला आले. आज आपल्या देशाला ऑलिम्पिकमध्ये समाधानकारक यश मिळत नाही, कारण खेळाडूंना समाधानकारक राजाश्रय नाही. शाहू महाराजांनी अनेक पत्रकार, शाहीर, इतिहास लेखक, नाटककार यांना प्रोत्साहन दिले. आज अशा नेतृत्वाची गरज आहे. इतिहास लेखनाबाबत शाहू महाराज खूप दक्ष होते त्यामुळेच त्यांनी उत्खनन व शिवचरित्र, प्रतापसिंह महाराजांच्या चरित्र लेखनासाठी भरघोस आर्थिक मदत केली.

१८९९ साली घडलेले वेदोक्त प्रकरण हे भारतीय इतिहासाला कलाटणी देणारे प्रकरण आहे.[१९] शाहू महाराजांना जेव्हा पुरोहितांनी वेदोक्त मंत्राचा अधिकार नाकारला तेव्हा धर्ममार्तंडाना शरण न जाता शाहू महाराज त्यांच्याविरुद्ध कायदेशीरपणे लढले. शाहू महाराज हे धर्मांधांना शरण जाणारे नव्हते, संकटसमयी नाउमेद न होता, ते लढले. संकटाला संधी समजणारे ते राजे होते. ते धर्मांधांना शरण जाणारे राजे नव्हते. या घटनेने शाहूचरित्राला कलाटणी मिळाली. अपमानाने गर्भगळीत न होता, त्यांनी लढा दिला व धार्मिक अधिकार प्राप्त केले. संकटाला सामोरे गेले पाहिजे व आपल्या हक्कासाठी लढले पाहिजे, हा धडा शाहूचरित्र आजही आपणाला देते. त्यांनी. सुरुवातीला आर्य समाज आणि त्यानंतर सत्यशोधक विचारांचा पुरस्कार केला. परंतु त्यांनी कोणाचाही द्वेष केला नाही. आपल्या राजकीय विरोधकांशी ते शत्रूभावनेने वागले नाहीत, शाहू महाराज हे सुसंस्कृत राजे होते. राजकारणात विरोधकांशी वैरभावाने वागायचे नसते, हा वस्तुपाठ शाहूचरित्र आजही आपणाला शिकविते.

शाहू महाराज स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. त्यांनी महिलांना शिक्षण दिले.[२०] धरणाचे उद्घाटन महाराणी लक्ष्मीबाईंच्या हस्ते होते. आपल्या राज्यात विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला, स्नुषा इंदुमती राणी यांना शिक्षणासाठी स्वातंत्र्य दिले. रखमाबाई केळवकर यांना कोल्हापूर संस्थानचे शिक्षणाधिकारी केले.[२१] त्यांच्या कन्या द्वारकाबाई व कृष्णाबाई यांना राजकीय- शैक्षणिक स्वातंत्र्य प्रोत्साहन दिले. शंभर वर्षापूर्वी स्त्रियांना स्वातंत्र्य देणारे शाहू महाराज क्रांतिकारक राजे होते. स्त्रियांचा आदर सन्मान करून त्यांना स्वातंत्र्य देणारे शाहू महाराज २१ व्या शतकातही प्रातः स्मरणीय आहेत.

आज लोकशाही आहे. लोकशाही राज्यात देखील शाहू महाराजांचे राजेशाही विचार आणि कार्य प्रस्तुत आहेत कारण ते स्वकेंद्रित नव्हते, तर ते लोककल्याणाकारी होते. केवळ शेतीने राज्याचा सर्वांगिण विकास होणार नाही, तर औद्यागिक विकासाची नितांत गरज आहे, हे त्यांनी ओळखले यासाठी त्यांनी आपल्या राज्यात औद्योगिकरणाला चालना दिली. त्यांना उद्योग केंद्र सुरू केले याची साक्ष आजची भव्य शाहू मिल देत आहे. शाहू महाराज यांचे कार्य आणि विचार काळाच्या पुढचे आहेत. त्यामुळे ते आजच्या २१ व्या शतकात देखील उपयुक्त, प्रेरणादायक आणि दीपस्तंभासारखे आहेत.

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**संदर्भ सूची**

1) संपादक डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. मंजुश्री पवार, राजर्षी शाहू. (पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, खंड एक दोन आणि तीन), संचालक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०१९, पृष्ठ क्र. ८००
2) तत्रैव, पृष्ठ क्र. १७
3) तत्रैव; पृष्ठ क्र. १२०
४) तत्रैव, पृष्ठ क्र.१२०
५) तत्रैव, पृष्ठ क्र. १२१
६) तत्रैव, पृष्ठ क्र. १२५
७) तत्रैव, पृष्ठ क्र.१२५
८) तत्रैव, पृष्ठ क्र. १९०
९) तत्रैव, पृष्ठ क्र. ८९
१०) तत्रैव, पृष्ठ क्र.२२१
११) तत्रैव, पृष्ठ क्र. ११०
१२) तत्रैव, पृष्ठ क्र. ९५०
१३) तत्रैव, पृष्ठ क्र. २५०
१४) तत्रैव, पृष्ठ क्र. ७५८
१५) प्रा. साळुंखे नानासाहेब, शाहूच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, एकावन्नावी आवृत्ती, पृष्ठ क्र. १६८
१६) डॉ. पवार जयसिंगराव, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २०२
१७) तत्रैव, पृष्ठ क्र. २०३
१८) तत्रैव, पृष्ठ क्र. २१३
१९) तत्रैव, पृष्ठ क्र. ३६
२०) तत्रैव, पृष्ठ क्र. ११२, ११३
२१) तत्रैव, पृष्ठ क्र. १२३

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

31

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि सत्यशोधक समाज

**डॉ. पल्लवी अनिल कोडक**
मराठी विभाग,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा जोतीराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विशेष उल्लेखनीय ठरते. भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही त्रिसूत्रीरुजावी म्हणून या महापुरुषांनी आपले आयुष्य पणाला लावले.आधुनिक महाराष्ट्रातराजर्षी छत्रपती शाहू महाराज आणिसत्यशोधक समाज यांची कार्यक्षेत्रे भारतीय समाज सुधारणा आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. ही दोन आंदोलने सामाजिक विषमताविरोधी आणि न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या भारतीय चळवळीचा भाग होती.सत्यशोधक समाजाचीस्थापना महात्मा ज्योतिराव फुले यांनी केली. सत्यशोधकसमाज आणि राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य एकमेकांना पूरक ठरते.याच्याद्वारे भारतीय समाजात समानता, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.सत्यशोधक समाजाने समाजात एक जागरूकता निर्माण केलीआणिराजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी याच विचारांचापुरस्कार केला.शाहू महाराजांचे कार्य सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांशी संबंधित आहे. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांना पुढे नेण्याचे काम केले आणि समाजातील असमानता व जातीभेदाविरुद्ध प्रभावीपणे लढा दिला.

**सत्यशोधक समाजाची स्थापना-**महात्मा फुलेयांनी सत्यशोधक समाज का व कसा स्थापन केला यांचा सविस्तर वृत्तांत त्यांचे एक सहकारी तुकाराम हणमंत पिंजन यांनी दिला आहे.तर सत्यशोधक समाजाचा पहिला अहवाल सांगतो, "ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकास मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत, यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारसंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यांस मुक्त करण्याकरिता काही शूद्र मंडळींनी हा समाज तारीख २४ सप्टेंबर, सन १८७३ इसवी रोजी स्थापन केला. या समाजात राजकीय विषयावर बोलणे अजिबात वर्ज्य आहे."(राजर्षी शाहूगौरवग्रंथ पृ. ९०३) सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ साली महात्मा जोतिराव फुले यांनी केली. या समाजाचा मुख्य उद्देश म्हणजे भारतीय समाजातील जातिवाद,अस्पृश्यताआणि सामाजिक असमानतेविरुद्ध संघर्ष करणे.सत्यशोधक समाजाने सामाजिक सुधारणा, शैक्षणिक साक्षरताआणि जातिवादाविरुद्ध प्रचार यावर जोर दिला.

**सत्यशोधक समाजाच्या कार्याची काही प्रमुख उद्दिष्टे :**

1) समाजातील विभाजन आणि भेदभाव समाप्त करणे.
2) सर्व समाजासाठी शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करणे.
3) प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार आणि संधी मिळवून देणे.
4) सत्यशोधक समाजाने अनेक सामाजिक सुधारणा केल्या, जसे की विधवांचे पुनर्विवाह, स्त्री शिक्षणआणि जातिवादाविरोधी प्रचारयामुळे भारतीय समाजात सकारात्मक बदल घडवून आणले गेले.

**राजर्षी छत्रपतीशाहू महाराजांचे जीवन आणि कार्य -** राजर्षी छत्रपतीशाहू महाराज (१८७४-१९३७) हे कोल्हापूर संस्थांचेराजेहोते.त्यांच्या जीवनातत्यांनी समाजातील विषमता आणि असमानतेच्या समस्यांचा सामना केला. आणि सामाजिक न्यायासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. राजर्षी छत्रपतीशाहू महाराजांनी आपल्या राज्यात अनेक सुधारणा केल्या, ज्यामुळे त्यांनी समाजात मोठे बदल घडवले.कोल्हापूर संस्थानात सामाजिक,सांस्कृतिक, शैक्षणिक सुधारणा करण्याचा राजर्षी छत्रपतीशाहू महाराजांचा ध्यास होता. त्यासाठी लोकोपयोगी कार्य करणाऱ्या विविध संस्थांना महाराजांनी भरीव असे सहकार्य केले. अशा संस्थामध्ये तत्कालिन आर्य समाज, थिऑसाफिकल सोसायटी, मुहमेडन सोसायटी, प्रार्थना समाज, अमेरिकन मिशन अशा संस्थांच्या शैक्षणिक प्रसारासाठी शाहू महाराजांनी मोठे सहकार्य केले होते. त्यात कोल्हापूर परिसरात गावोगावी सत्यशोधक चळवळीचा प्रसार करताना सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना राजर्षी शाहू महाराजांचे सर्व प्रकारचे सहकार्य होते. कारण सत्यशोधक समाजाचे पुढारी भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, महादेवराव डोंगरे हे महाराजांच्या पदरी सेवेत होते व तिघेही महात्मा जोतिबा फुलेयांच्याविचार व चळवळीचे कट्टर समर्थक होते.

फुले यांच्यानंतर महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ अनेक भागात पसरली होती. कोल्हापूर या संस्थानात सत्यशोधक चळवळीचे काम करणारी अनेक मातब्बर मंडळी होती.कोल्हापूर संस्थानाची राजसूत्रे स्वीकारल्यानंतर १८९४ साली शाहू महाराज पुणे दौऱ्यावर असताना सत्यशोधक चळवळीचा महाराजांशी पहिल्यांदा परिचय झालेला दिसतो.(राजर्षी शाहुंना समजून घेताना...पृ.४७) दिनांक ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूर येथे सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. त्यात भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे,महादेवराव डोंगरे, हरिभाऊ चव्हाण, विठ्ठल बिराजी ढोणे यांची पदाधिकारी म्हणून निवड झाली. त्यावेळी समाजाच्या कार्यालयासाठी राजर्षी शाहू महाराजांनी गंगावेशीत जागा दिली.एवढेच नव्हे तर विठ्ठल बिराजी ढोणे यांचा पगार खाजगी खात्यातून देण्याची व्यवस्था केली. संबंधित कार्यकर्त्यांना प्रचार दौरे काढण्यास सांगितले.महाराजांनी स्वतः इतर राजेरजवाड्यांशी संपर्क साधून शिक्षण परिषदा घेण्यास त्यांना प्रेरीत केल्याच्या नोंदी मिळतात. (राजर्षीशाहुंना समजून घेताना...पृ.४७) शाहू महाराज सत्यशोधक चळवळीकडे आकर्षित होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्या काळातील गाजलेले वेदोक्त प्रकरणअसावे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे स्वतः तर सत्यशोधक समाजाच्या सर्व उपक्रमात हिरिरीने भाग घेत होतेच, परंतु शाहू महाराजांनी बडया बड्यालोकांना सत्यशोधक चळवळीत आणले. शाहू महाराजांचे बंधू कागलचे जहागीरदार बापूसाहेब महाराज, मेहुणे मामासाहेब खानविलकर, सरदार परशुराम देसाई घोसवाडकर, सरदार नानासाहेब मुळीक अशी कितीतरी नावे सांगता येतील की ज्या मातब्बर मंडळीना शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाशी जोडलेले होते. १९०१-०२ सालात कोल्हापुरात वेदोक्त प्रकरणाचा प्रारंभ झाला. त्यामुळे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे अस्तित्व पुन्हा जाणवू लागल्याची नोंद प्रसिद्ध संशोधक न. र. फाटक आणि वि. भि. कोलते यांनी केल्याचे आढळते." याचा अर्थ वेदोक्त प्रकरण शाहू छत्रपतीच्या आयुष्यात घडल्यामुळे ते हिंदू समाजातील ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध संघर्ष करण्यास तयार झाले असा होतो. परंतु प्रत्यक्षात त्यांनी हिंदू समाजातील ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध लढा देण्यास त्यापूर्वीच सुरूवात केली होती असे दिसते. कारण २ एप्रिल, १८९४ रोजी कोल्हापूर संस्थानच्या गादीवर त्यांचा राज्याभिषेक झाल्यावर वर्षा-दोन वर्षातच त्यांनी आपल्या शासनव्यवस्थेतील अभिजनांच्या वर्चस्वाला शह देण्यास आरंभ केला होता. त्यामधूनच भास्करराव जाधव, दाजीराव अमृतराव विचारे, रघुनाथराव सबनीस इत्यादी ब्राह्मणेत्तर व्यक्तीना त्यांनी आपल्या शासनव्यवस्थेत महत्त्वाची पदे दिली होती"(राजर्षी शाहूगौरवग्रंथपृ.९०४)यापूर्वी म्हटल्याप्रमाणे वेदोक्त प्रकरणानंतर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा ओढा जास्तीतजास्त सत्यशोधक समाजाकडे होता. एवढेच नव्हे तर शाहू छत्रपतीनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारप्रणालीप्रमाणे प्रत्यक्ष कार्य करून आपण महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार आहोत, हे सिद्ध केले होते. परंतु त्यापूर्वी त्यांनी आपल्या संस्थानात सत्यशोधक समाजाला प्रेरणा दिली. अनेक सत्यशोधकांना त्यांनी समाजाचे कार्य मुक्तपणे करावे म्हणून मदत केली. इतकेच नव्हे तर सत्यशोधक समाजाची तत्त्वे आपणास मान्य कशी आहेत हे सांगून आपल्या अनेक भाषणांतून,खाजगी संभाषणातून महात्मा फुले यांच्यासंबंधीआदर व्यक्त केला आहे.

**सामाजिक सुधारणा -** राजर्षी छत्रपतीशाहू महाराजांनी जातिवाद आणि अस्पृश्यतेविरोधी संघर्ष केला. त्यांनी दलित आणि मागासलेल्या वर्गासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली. तसेच शाळा आणि शिक्षण क्षेत्रात सुधारणा केल्या.ज्यामुळे सर्व समाजाच्या लोकांना समान शैक्षणिक संधी मिळाली.सत्यशोधक समाजाने समाजातील अंधश्रद्धा आणि कुप्रथांना विरोध केला. शाहू महाराजांनी याच मार्गाने कार्य सुरू केले. त्यांनी जातिवाद आणि सामाजिक असमानतेला विरोध करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली. शाहू महाराजांनी सार्वजनिक शौचालये, जलसंधारण प्रकल्पआणि सामाजिक सुरक्षा यावर लक्ष दिले.

**आर्थिक सुधारणा-** राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांनी आर्थिक सुधारणा करून गरीब वर्गाच्या जीवनात सुधारणा केली. त्यांनी कृषी क्षेत्रात सुधारणांचे कार्य केले,ज्यामुळे शेतकऱ्यांना फायदा झाला. याशिवायत्यांनी आर्थिक साहाय्यता योजना सुरू केल्या आणि गरीब व दुर्बल वर्गाच्या आर्थिक स्थितीला सुधारण्यासाठी प्रयत्न केले.

**महिलांचे हक्क -**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी महिलांच्या हक्कांचे संरक्षण केले आणि त्यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रोत्साहन दिले. विशेषतः विधवांचे पुनर्विवाह आणि महिलांच्या शिक्षणासाठी विविध शाळा सुरू केल्या.

**सत्यशोधक समाज आणि शाहू महाराज यांचे साम्य -** सत्यशोधक समाज आणि शाहू महाराज यांचे कार्य अनेक बाबतीत एकमेकांना पूरक ठरले. दोन्ही चळवळींनी जातिवादअस्पृश्यता, आणि सामाजिक विषमतेविरुद्ध संघर्ष केला. तसेचत्यांनी शैक्षणिक सुधारणा आणि सामाजिक समानतेसाठी प्रयत्न केले.

**जातिवाद आणि अस्पृश्यतेविरोधी कार्य -**सत्यशोधक समाजाने जातिवाद आणि अस्पृश्यतेविरोधी लढा दिलातर राजर्षी छत्रपतीशाहू महाराजांनीआपल्या राज्यात त्या समस्यांचा सामना केला. दोन्ही चळवळींनी समाजात समानता आणि न्याय मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले.

**शिक्षणाच्या प्रसारामध्ये योगदान** -राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांनी आपल्या राज्यात शिक्षण क्षेत्रात सुधारणा केल्या. प्रत्येक व्यक्तीला समान शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.सत्यशोधक समाजाने शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वाची कामे केली,विशेषतः महिला शिक्षण आणि दलित शिक्षणाच्या संदर्भात. शाहू महाराजांनी याच तत्त्वांला पुढे नेण्याचे काम केले. शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात सुधारणा केली आणि विविध शाळा व महाविद्यालये स्थापन केली. त्यांनी शिक्षण सुलभ व सर्वसमावेशक बनवलेआणि शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्याय साधण्याचा प्रयत्न केला.राजर्षी छत्रपतीशाहू महाराजांनी महिलांच्या शिक्षणावर विशेष लक्ष दिले. सत्यशोधक समाजाने महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले आणि शाहू महाराजांनी यासाठी विविध शाळा आणि महाविद्यालये सुरू केली. त्यांनी महिलांना शिक्षण प्राप्त करून देण्यासाठी नवीन पायाभूत सुविधांची निर्मिती केली.

**सामाजिक सुधारणा-** दोन्ही चळवळींनी सामाजिक सुधारणा आणि समानतेच्या दिशेने कार्य केले. सत्यशोधक समाजाने विधवांचे पुनर्विवाह आणि स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले, तर शाहू महाराजांनी देखील महिलांचे हक्क आणि आर्थिक सुधारणा यावर जोर दिला.'शिक्षणानंतर स्वराज्य, जातिभेद हे प्रश्न निकडीचे आणि प्राधान्यक्रमाचे आहेत.जोपर्यंत हिंदुस्थान जातिबंधनात निगडित राहील तोपर्यंत स्वराज्यसंस्थेपासून मिळणारे संपूर्ण फायदे त्यास घेता येणार नाहीत...जोपर्यंत आमच्यामध्ये जातीजातीतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत, तोपर्यंत आम्ही आपापसात झगडत राहणार आणि आमच्या हितवृद्धीस अपाय करून घेणार.... आम्हाला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक जातिप्रथा झुगारून देणे अत्यंत आवश्यक आहे...'(सत्यशोध की साहित्याचा इतिहासपृ.५५९) महाराजांचे प्रस्तुत विचार आजही कालसुसंगत आहे. आजही आम्ही जातिबंधनात आहोत आणि स्वराज्यसंस्थेच्या सर्व फायद्यांपासून वंचित आहोत. या जातजाणिवा नष्ट होण्यासाठी खऱ्या इहवादी, उपयुक्त शिक्षणाची गरज आहे. ते एका भाषणात म्हणतात, 'मी जुन्या मताचा कट्टर अभिमानी होतो. अशा दुराभिमानाने इतरांच्या उन्नतीस अडथळा निर्माण होतो म्हणून जातिभेद मोडणे इष्ट आहे जरूर आहे, जातिपरिषदांमधून जातिभेद दृढ, तीव्र होऊ नयेत. जातिद्वेष हा या देशाचा फार प्राचीन रोग आहे.' (सत्यशोधकी साहित्याचा इतिहास पृ.५५९)महाराजांनी मिश्रविवाहांचे समर्थन केले, 'आमचा धर्म आर्य धर्म' या भाषणात ते ठामपणे सांगतात, 'जातीजातींत विवाहसंबंध होऊ लागल्याशिवाय जातिभेदाची तीव्रता कमी होणार नाही.'महाराजांच्या शिक्षण, समाज, राजकारण, स्वातंत्र्य इ. कोणत्याही विषयावरच्या भाषणात जातिभेदाविरोधी भूमिका पुन्हापुन्हा मांडली आहे.

**समाजातील प्रभाव -** सत्यशोधक समाज आणि शाहू महाराज यांचे कार्य भारतीय समाजात दीर्घकालीन प्रभाव निर्माण करणारे होते. त्यांच्या प्रयत्नांनी जातिवाद आणि अस्पृश्यतेविरोधी विचारांची नवी दिशा दिली. त्यांनी सामाजिकसमानतेसाठी विविध उपाययोजना केल्या, ज्यामुळे भारतीय समाजाच्या सामाजिक संरचनेत बदल झाला.

**शिक्षण क्षेत्रातील बदल -** सर्वच सत्यशोधकांनी, आपल्या सुधारणा कार्याचा प्रारंभ शिक्षणापासून केला आहे.राजर्षी छत्रपती शाहू महाराजही याला अपवाद नाहीत'शिक्षणानेच आपला तरणोपाय आहे; असे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाहीअसे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडूनगेलेल्या देशातउत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणारनाहीत म्हणूनच सक्तीच्यावमोफतशिक्षणाचीहिंदुस्थानलाअत्यंतआवश्यकताआहे. (सत्यशोधकी साहित्याचा इतिहास पृ.५५९) सत्यशोधक समाजाच्या कार्यामुळे शैक्षणिक साक्षरतेला प्रोत्साहन मिळाले आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या. त्यांच्या कार्यामुळे शाळांमध्ये जातिवाद आणि भेदभाव कमी झाला.

**सामाजिक समता-** राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांनी आणि सत्यशोधक समाजाने सामाजिक समतेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. यामुळे समाजातील विविध वर्गांमध्ये समानतेचा विचार फोफावला.महात्मा फुले यांची सार्वजनिक सत्यधर्माची संकल्पना समता आणि स्वातंत्र्य या दोन तत्त्वांच्या आधारे व्यापक अशा प्रकारच्या मानवतावादाची अपेक्षा करणारी होती. म्हणूनच ते देव आणि मानव यामध्ये दलाली करणा-या ब्राह्मणी पुरोहितशाहीवर प्रथम तुटून पडले होते. शुद्रातिशूद्रांची, बहुजनांचीब्राह्मणी पुरोहितांच्या धार्मिक गुलामगिरीतून प्रथम सुटका करणे, हे त्यांनी आपले आद्य कर्तव्य मानले होते. त्या दृष्टीकोनातून त्यांनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्माची मांडणी सुरू केली होती.

**महिलांच्या हक्कांसाठी संघर्ष-** महिलांच्या हक्कांसाठी दोन्ही चळवळींनी महत्त्वाचे कार्य केले. सत्यशोधक समाजाने महिलांच्या शिक्षणाचा प्रचार केला आणि शाहू महाराजांनी महिलांच्या हक्कांसाठी अनेक सुधारणा केल्या.राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे उदारमतवादी, उपयुक्ततावादी होते. ते हाडाचे सत्यशोधक होते, सत्यशोधक चळवळीला आपल्या संस्थानात त्यांनी सर्व शक्ती, बळ आणि साधने पुरवून वाढविले. संस्थानाबाहेरही त्यांनी मदत केली. भट पुरोहितांशी सामना करण्यासाठी सत्यशोधकांनी त्यांना साथ दिली. रा.ब. भास्करराव जाधव, शामराव देसाई, केशवराव विचारे, दिनकरराव जवळकर, प्रबोधनकार ठाकरे, मुकुंदराव पाटील,

श्रीपतराव शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांना त्यांनी सहकार्य दिले आणि त्यांचे सहकार्य घेतले. त्यांच्या भाषणातील काही विधानांना सुभाषितमूल्य आहे. ती विद्यालयातील भितीवर म्हणींच्या स्वरूपात लावावीत, असे डॉ. वि.भि. कोलते यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे.(सत्यशोधकीसाहित्याचाइतिहास पृ.५५०) महाराजांच्या विचार व कार्यातून अनेक व्यक्ती, संस्था आणि चळवळींना स्फूर्ती आणि प्रेरणा मिळाली आहे.

**सत्यशोधक चळवळ आणि शाहू महाराज यांचे योगदान एकत्रितपणे-** सत्यशोधक चळवळ आणिराजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान भारतीय समाजाच्या विकास सुधारणेत अत्यंत महत्त्वाचे आहे. दोन्ही चळवळींनी जातिवाद, सामाजिक असमानताआणि अंधश्रद्धाविरुद्ध लढा दिला.समाजातील दुर्बल वर्गाच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम राबवले.सत्यशोधक चळवळीने अंधश्रद्धा आणि जातिवादाविरुद्ध जागरूकता निर्माण केली,तर शाहू महाराजांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक प्रभावाचा उपयोग करून समाजातील असमानता कमी करण्यासाठी काम केले. त्यांच्या कामामुळे भारतीय समाजात एक सकारात्मक बदल घडला आणि सुधारणा चळवळींचे महत्त्व स्पष्ट झाले.आजच्या काळातसत्यशोधक चळवळ आणि शाहू महाराज यांचे कार्य भारतीय समाजाच्या सुधारणात्मक चळवळींच्या इतिहासात छाप सोडते. त्यांच्या योगदानामुळे समाजातील अनेक समस्यांवर उपाय सापडले आहेत. आणि त्यांच्या विचारांनी आणि कार्याने समाजातील असमानतेला समाप्त करण्यासाठी मार्गदर्शन केले.कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज हे एक अष्टावधानी लोकप्रिय व्यक्तिमत्त्व होते. आपल्या संस्थानातील गरीबातील गरीबाचे व्यापक कल्याण व्हावे ही त्यांची तळमळ होती पण ब्राम्हण वर्गाचा त्यास विरोध होता. त्यातून वेदोक्त प्रकरण उदभवले व महाराज त्यावेळेपासून समाजशील होवून सत्यशोधक चळवळीचे आधारवड बनले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सत्यशोधक समाजाचा प्रसार करण्यासाठी तन मन धनाने सर्वोत्तम सहकार्य केले. आपल्याअधिकाऱ्यांना सत्यशोधक चळवळीच्या कार्यासाठी दौरे काढण्यास मुभा दिली व आपल्या अन्य राज परिवारातील मंडळींना सत्यशोधक चळवळीस जोडले. त्यांच्या या अथांग कामगिरीमुळे माधवराव बागलांनी राजर्षी शाहू महाराजांचा गौरव 'सत्यशोधक शाहू' या शब्दात केला असून तो सार्थ वाटतो.

**निष्कर्ष :**

१) सत्यशोधक समाज आणि राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य भारतीय समाजाच्या सुधारणा आणि समानतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरले.सत्यशोधक समाजाने जातिवाद आणि अस्पृश्यतेविरोधी लढा दिला, तर शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक, आणि शैक्षणिक सुधारणा केल्या. दोन्ही चळवळींनी समाजात मोठे बदल घडवले आणि त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजात दिसून येतो. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाची सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती सुधारली आहे.

२) सत्यशोधक समाजाचे कार्य आणि शाहू महाराजांचे योगदान भारतीय समाजाच्या सुधारणा चळवळींच्या इतिहासात अत्यंत महत्वपूर्ण आहे. सत्यशोधक समाजाने समाजातील अंधश्रद्धा, जातीभेदआणि असमानतेला विरोध केला आणि शाहू महाराजांनी याच कार्यालापुढे नेले. त्यांच्या कामामुळे भारतीय समाजात मोठा बदल घडवला गेला आणि समाजातील असमानतेला दूर करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात आल्या.

३) सत्यशोधक समाज आणि शाहू महाराज यांच्या कार्यामुळे भारतीय समाजातील विविध अडथळे पार करण्यास मदत झाली आहे. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने समाजातील असमानतेला समाप्त करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. आजच्या काळात,त्यांच्या कार्याचे महत्त्व अधिकच वाढले आहे आणि त्यांच्या योगदानामुळे समाजातील सुधारणा चळवळीला एक नवीन दिशा प्राप्त झाली आहे.

४) एकोणिसाव्या शतकात सुरु झालेली सत्यशोधक चळवळ ही महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक घटना मानली जाते. सत्यशोधक चळवळ ही ब्राम्हणेत्तर समाजातील पहिली व्यापक व लोकप्रिय चळवळ ठरली. विद्रोह हा तिचा बाणा आणि स्वाभिमान हा या चळवळीचा पाया होता.

५) महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीचा विकास हा फुले-शाहू-आंबेडकर या तीन टप्यात झाला.महात्मा फुल्यांनी बीज पेरले तर शाहू महाराजांनी याचे वटवृक्षात रुपांतर केले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यापक चळवळीने सत्यशोधक विचारांना क्रांतीची फळे आलेली पाहतो.

**संदर्भ ग्रंथ-**

१) जाधव रमेश, शाहू छत्रपती आणि सत्यशोधक चळवळ,राजर्षीशाहू गौरव ग्रंथ,राजर्षी शाहू जन्मशताब्दी प्रकाशन, सुधारित तिसरी आवृत्ती : २०१६.
२) गुंदेकरश्रीराम, सत्यशोधकी साहित्याचा इतिहास (खंड पहिला), सत्यशोधकी साहित्य प्रकाशन लातूर, प्रथमावृत्ती : १ मे,२०१०.
३)सं.राजहंसकपिल,शाहुंना समजून घेताना..... संवाद प्रकाशन कोल्हापूर प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०२०.
४) मोरे गिरीष, राजर्षी शाहू : विचारवकार्य, निर्मितीप्रकाशनकोल्हापूर, तृतीयावृत्ती: एप्रिल२०२१

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

32

# राजर्षी शाहूमहाराज, डॉ. आंबेडकर आणि माणगाव परिषेद एक – ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. मधुकर खंडू पवार**
सहाय्यक प्राध्यापक,
गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर

**प्रस्तावना**: भारताच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासातील प्रभाव टाकणारी एक महत्त्वाची घटना म्हणून दिनांक २१ व २२मार्च १९२० रोजी माणगाव येथे संपन्न झालेल्या दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाच्या परिषदेकडे पाहावे लागेल. तत्कालीन भारतामध्ये ब्रिटिश राजवटी अस्पृश्य समाजातील लोकांनी यशस्वी करून दाखवलेली ही पहिली परिषद आहे. राजश्री शाहू महाराज महाराज यांचे मिळालेले सहकार्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मिळालेले नेतृत्व इतिहासात नोंदवून ठेवावे असेच आहे. डॉ. आंबेडकरांनी नव्याने चालू केलेल्या कर्तुत्वाला व त्यांच्या नेतृत्वाला लोकमुद्रीत करण्याचे कार्य माणगाव परिषदेच्या माध्यमातून झाले होते.कोणतीही ऐतिहासिक घटना घडताना त्या घटनेची दुरगामी परिणाम विविध क्षेत्रावर होत असतात. सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, पातळीवर त्याचे पडसाद उमटतात .माणगाव परिषद ही सुद्धा एक ऐतिहासिक घटना आहे. आंबेडकरी चळवळीचा मानबिंदू आहे. या घटनेच्या माध्यमातून पुढे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रामध्ये उलथापाल्त झाली. भारतीय समाज मनावर या परिषदेने सकारात्मक परिणाम घडून आणले.तेव्हा, प्रस्तुत शोध निबंधमध्ये माणगाव परिषदेमधील राजश्री शाहू महाराज यांचे भाषण आंबेडकर यांचे भाषण परिषदेसाठी दादगोडा आप्पासाहेब पाटील यांचे योगदान, परिषदेतील ठराव शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांचे डावपेच यांचे विवेचन करण्यात आले आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१) माणगाव परिषदेमधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे भाषण अभ्यासणे
२) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे परिषदेमधील भाषण अभ्यासणे
३) दाद गोडा, आप्पासाहेब पाटील यांचे या परिषदेमधील योगदान अभ्यासणे
४) या परिषदेचे विविध परिणाम अभ्यासणे

**संशोधन पद्धती व साधने -** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे त्यासाठी प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य लोकांची प्रगती घडून आणणाऱ्या एका कणखर व्यक्तीची महाराजांना आवश्यकता होती. कारण त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महाराजांना ब्राह्मणाचा प्रचंड विरोध होता. अस्पर्शांची उन्नती करण्यासाठी त्यांच्यातीलच नेता हवा होता. असे महाराजांना वाटत होते. मुंबईतील पन्हाळा लॉज मध्ये महाराज चहा घेत होते. त्यांनी टेबल वरील टाइम्स ऑफ इंडियाच्या १६ जानेवारी १९१९ च्या अंकातील "महार ऑन होम रूल" हा लेख वाचला. तो लेख महार, या टोपण नावाने कुणीतरी लिहिला होता. स्वातंत्र्य मिळवणे हा टिळकांचा नव्हे, तर महाराचा देखील जन्मसिद्ध हक्क आहे. याबाबतची मुद्देसूद मांडणी प्रस्तुत लेखात केली होती. टिळकांना वैचारिक दृष्टिकोनातून उत्तर देणारा हा व्यक्ती कोण? पुढे त्यांना महार या टोपण नावाने लेख लिहिणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत असे त्यांना कळले.तरुण डॉ.आंबेडकरांचे अभिनंदन करावे. संस्थानात आणावे अस्पर्शासंबंधी केलेल्या सुधारणा त्यांना दाखवावेत असे महाराजांना वाटले. म्हणून त्यांनी आंबेडकरांसाठी एक पत्र तयार करून ते दत्तोबा दळवी नावाच्या दरबारी असिस्टंट कडे दिले.

कोल्हापुरातील दत्तोबा पवार यांना डॉ. आंबेडकर यांची भेट घेण्याची इच्छा असल्याचे सांगून महाराजांनी भेट घडवून आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.पुढे १७ डिसेंबर १९१९ रोजी मुंबईमध्ये महाराजांनी प्रत्यक्ष आंबेडकरांची भेट घेतली त्यावेळी महाराजांनी अस्पर्शांच्या उद्धारासंदर्भात चर्चा केली. आणि आंबेडकरांना वृत्तपत्र काढण्यासाठी महाराजांनी २५०० रुपयाची मदत केली. तसेच कोल्हापूरला येण्याचे निमंत्रण दिले. महाराजांच्या निमंत्र्यावरून आंबेडकर कोल्हापूरला गेले होते. तिथे ते दोन दिवस राहिले. या भेटीत अस्पर्शांच्या उन्नतीच्या संदर्भात महाराजांशी त्यांनी चर्चा केली. पुढे आंबेडकराची शाहू महाराजांनी रथातून शहरभर मिरवणूक काढली.अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी एक परिषद घेण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला. त्यांना निरोप द्यायला महाराज स्वतः रेल्वे स्टेशनवर गेले होते. या भेटीची तारीख कोठेच उपलब्ध नाही.[१]

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

दिनांक २१ आणि २२ मार्च १९२० रोजी दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकाची पहिली ऐतिहासिक बहिष्कृत परिषद माणगाव येथे संपन्न झाली. या घटनेस १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. १९२० मध्ये जेथे ऐतिहासिक परिषद झाली. ते ठिकाण कोल्हापूर जिल्ह्यातील हातकलंगले तालुक्यातील माणगाव हे गाव आहे. पूर्वी माणगाव हे रुई, साजणी, आणि माणगाव यांच्यामध्ये हाळ नावाची जमीन तिथे होती असे म्हटले जाते. माणगाव येथे प्राचीन गरुडेश्वर मनुकाबाई ही मंदिर आहे. मानकाई देवी वरून माणगाव हे नाव पडले असावे असे म्हटले जाते .माणगाव हे ठिकाण कागल जहांगीर येथील एक खेडे होते. त्या ठिकाणी अस्पृश्य मानल्या मानलेल्या लोकांना एकत्र करून त्यांच्यात परिवर्तन व्हावे वेठबिगारी नष्ट व्हावी शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांनी ही परिषद आयोजित केली होती.

माणगाव परिषद आयोजित करणारे आणि माणगावला सन्मान भूमी हा दर्जापर्यंत नेणारे तत्कालीन माणगावचे सुपुत्र आप्पासाहेब दाद गोंडा पाटील यांचाही उल्लेख सन्मानाने केला पाहिजे. माणगाव परिषद यशस्वी होण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. राजर्षी शाहूच्या कार्यामुळे आप्पासाहेब पाटील प्रभावित झाले होते. माणगावात करमट वातावरण असूनही ते मागे आले नाहीत. आपल्या वाड्यावर अस्पृश्य मानलेल्या जातीतील लोकांना ते बोलवत सहभभोजन घडवून आणत .माणगाव परिषदेच्या नियोजनात यांचा सिंहाचा वाटा होता. परिषदेसाठी त्यांनी आपल्या नात्यातील लोकांकडून कापडी मंडप त्यांनी मागून घेतले. येणाऱ्या लोकांसाठी जेवणाची सोय व्हावी म्हणून धान्य गोळा करण्यासाठी मुष्टी फंड योजनेला त्यांनी सहकार्य केलं. त्यामुळे कोणत्याही अडथळ्या विना ही परिषद पार पडली. माणगावातील दुसरे सुपुत्र थोरले नाना मास्तर यांनी आपल्या गावात परिषद होणार आहे. यासाठी अनेक ठिकाणाहून लोक येणार आहेत. याची जाणीव त्यांना होती. त्यासाठी त्यांनी त्या लोकांच्या जेवणाची व्यवस्थित जबाबदारी उचलली होती.परिषदेनंतर आप्पासाहेब पाटलावर आणि गावातील अस्पृश्य बांधवांवर तेथील लोकांनी बहिष्कार घातला. त्यांच्याशी सर्व व्यवहार बंद केले. प्रकरण शाहू महाराजापर्यंत गेल्यानंतर त्यांनी, तेथील लोकांना समज दिल्यानंतर काही काळानंतर वातावरण शांत झाले .मात्र जुनाट प्रवृत्ती संपली नव्हती. त्यांना त्रास देणे सुरूच होते. त्रासाला कंटाळून आप्पासाहेबांनी मिरजेला जाऊन ते किल्ला परिसरात राहायला गेले.[२]

राजर्षी शाहू महाराजांनी या परिषदेमध्ये काय संदेश दिला तो समजून घेणे आवश्यक आहे. दिनांक २२ मार्च १९२० रोजी दुपारी तीन वाजता परिषदेच्या दुसऱ्या दिवशीचे कामकाज सुरू झाले तत्पूर्वी शाहू महाराजांचे वेशीपासून ढोल,ताशे,ब्यांड,लेझीम, यांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. महाराजा बरोबर त्यांचे बंधू कागल अधिपती बापूसाहेब महाराज, दरबारातील मानकरी अधिकारी, डॉ. आंबेडकर माणगावचे गाव कामगार अप्पासाहेब दादगोंडा पाटील, स्वागत अध्यक्ष राजसाहेब इनामदार,तसेच बहिष्कृत समाजाबद्दल आस्था असणारे काही मंडळी उपस्थित होते .या परिषेदेला पाच हजारापेक्षा जास्त लोकांची उपस्थिती होती.

**राजश्री शाहू महाराजांचे भाषण:** या दोन दिवशी परिषदेमध्ये महाराजांनी जे भाषण केले ते समाजाला अंतर्मुख करणारे होते. अस्पृश्य जातीवर पिढ्यानपिढ्यापासून जी गुलामगिरी लादण्यात आली होती .तिच्याविरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकले. अस्पर्शासाठी जे कार्य करीत होते त्यांच्याविषयी त्यांनी आपल्या भाषणात माहिती दिली. महाराजांनी बलुतेदारी महार वतने सोडून द्यावीत म्हणून आव्हान केले.वेठबिगारी संपवण्यासाठी त्यांनी काही उपाययोजना सांगितल्या. त्यांना स्वाभिमानाने व प्रतिष्ठाने जगता यावेत म्हणून वकिलाच्या सनद्या बहाल केल्या. मागासवर्गीयाना पुढे आणण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले. ते पुरेसे नाहीत याची कल्पनाही त्यांनी आपल्या भाषणाद्वारे दिली.हे काम पुढे नेण्यासाठी डॉ. आंबेडकर सारखा नेताच पुढे आला पाहिजे .आणि ते पुढे आलेले आहेत. हेही त्यांनी आवर्जून सांगितले. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बहिष्कृत वर्गावर लादलेली गुलामगिरी नष्ट होईल. असा त्यांनी विश्वासही व्यक्त केला.तसेच अस्पृश्य वर्गासाठी काय काय सुधारणा संस्थांमध्ये केल्या. ते त्यांनी सांगितलेच. पण पुढे काय करणार हेही ते सांगितले. ते म्हणाले मी लवकरच या लोकांना सेल्फ गव्हर्नमेंट थोड्या प्रमाणावर देणार आहे. त्याचा फायदा सर्वांना विशेषता अस्पृश्य मानलेला लोकांना सारखा मिळावा म्हणून," मी कम्युनियलं रिप्रेझेंटेशन" ही देणार असे महाराज म्हणाले. आपल्या भाषणात शाहू महाराजांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आणि तो म्हणजे राजकारण व स्पर्श अस्पर्शता यांच्यातील परस्पर संबंध अस्पर्शांना मनुष्याप्रमाणे वागल्याशिवाय राजकारण कसे होणार .त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशात वागवितांत त्याप्रमाणे वागविले पाहिजे आणि तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार. आणि असे जो वागवेल त्यांनीच देशकार्य केले असे म्हणता येईल इतरांना नाही. महाराजांनी भाषणात डॉ. बाबासाहेब विषयी जिव्हाळा आदर व्यक्त केला. पंडित आणि विद्वानाचे भूषण म्हणून त्यांनी या तरुण नेत्याचा गौरव मुक्तकंठाने केला. आज माझे मित्र आंबेडकर यांनी या सभेचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. या वाक्यापासून त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली .आणि भाषणाचा शेवट. त्यांनी खालील शब्दात व्यक्त केला. तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. तर कृतीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवतील असे पुढारी पाहिजेत.[३]

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अध्यक्षीय भाषण :** महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात माणगाव परिषद ही मैलाचा दगड ठरली. आंबेडकरांनी पुढे अनेक लढे लढविले. प्रचंड संघर्ष केला त्या सर्वाच्या मागे माणगाव परिषदेच्या प्रेरणा होत्या. ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. परिषदेच्या अध्यक्षपदावरून त्यांनी केलेल्या भाषणाचा वृत्तांत मूकनायक, या पत्राच्या दिनांक १० एप्रिल १९२० च्या अंकात आला आहे.हिंदू धर्माची विभागणी त्यांनी तीन गटात केली. १] सर्वात जन्माने श्रेष्ठ व पवित्र ज्याला आपण ब्राह्मण वर्ग असे म्हणतो तो पहिला गट २] ज्याची जन्मसिद्ध श्रेष्ठता व पवित्रता ब्राह्मणापेक्षा कमी दर्जाचे आहे असा ब्राह्मणोत्तराचा वर्ग म्हणजे दुसरा गट. ३] जे जन्मसिद्ध कनिष्ठ व अपवित्र मानले गेले आहेत. अशा बहिष्कृत वर्गाचा तिसरा गट. हिंदु समाजाचे असे विश्लेषण केल्यानंतर आंबेडकरांनी जन्मसिद्ध श्रेष्ठतेमुळे व पवित्रतेमुळे गुणहिन ब्राह्मणाचे कसे पावले याचे वर्णन केले. नंतर त्यांनी ब्राह्मणोत्तराचे हाल सांगितले. ब्राह्मणोत्तरांमध्ये विद्या नसल्यामुळे ते मागे राहिले. तरीपण विद्या व द्रव्य मिळवण्यात चे मार्ग त्यांच्यासाठी मोकळे आहेत. सध्या त्यांच्याकडे या दोन्ही गोष्टी नसतील मात्र नजीकच्या भविष्यकाळात त्यांना त्या मिळू शकतील.बहिष्कृत वर्गाची स्थिती मात्र अतिशय दयनीय आहे. आपले आत्मबल व स्वाभिमान हरवून बसलेला हा वर्ग आहे. त्यांना शाळेत जाता येत नाही,सार्वजनिक विहिरीवर पाणी भरता येत नाही,रस्त्यावर चालता येत नाही, वाहनाचा उपयोग करता येत नाही, ते आपल्या मानवी हक्कापासून दुरावले आहेत. आर्थिक दृष्ट्या त्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. व्यापार नोकरी व शेती हे जे धनसंस्थेचे तीन मार्ग आहेत ते त्यांना खुले नाहीत.विटाळा मुळे गिऱ्हाईक मिळत नसल्याकारणाने त्यांचा व्यापार करण्याची सोय उरली नाही . बहिष्कृत वर्गाच्या परिस्थितीचे असे विवेचन केल्यानंतर आंबेडकरांनी या परिस्थितीवर मात करण्यासाठी आपण राजकीय सामर्थ्य,प्राप्त केले पाहिजे असे सुचविले . आणि राजकीय सामर्थ्य संपादन करण्यासाठी प्रतिनिधित्व प्राप्त करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. त्याशिवाय राजकीय सामर्थ्य मिळणार नाही. नैसर्गिक गुण आणि अनुकूल परिस्थिती या दोन गोष्टीमुळे उन्नती साध्य करता येते.बहिष्कर्ताजवळ नैसर्गिक गुणाची वाणवा नाही पण परिस्थिती मात्र त्यांना अनुकूल नाही. हे त्यांनी स्पष्ट केले.पण परिस्थितीवर मात्त करायचे असेल तर राजकीय सामर्थ्य संपादन केले पाहिजे हा शेवटी आंबेडकरांनी संदेश दिला.[४]

**माणगाव परिषदेत पारित केलेले ठराव**: १] महायुद्धात ब्रिटिश सरकारला व दोस्त राष्ट्रांना जय मिळाल्याबद्दल ही परिषद आनंद व्यक्त करीत आहे. २] शाहू छत्रपती महाराज करवीर संस्थानामध्ये बहिष्कृताना समानतेचे हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्यकृत्य आरंभिले आहे. प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने शाहूमहाराज याचा जन्मदिवस सणाप्रमाणे साजरा करावा असे या परिषदेचे मत आहे. ३] प्रार्थमिक शिक्षण मुला- मुलीचा भेद न करता जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सक्तीचे व मोफत शिक्षण करण्यात यावे. ४] मेलेल्या जनावराचे मास कोणत्याही जातीच्या माणसाने खाने हा गुन्हा आहे असे कायद्याने मानले जावे. असा या सभेचा अभिप्राय आहे. ५] तलाठ्याच्या जाग्यावर बहिष्कृत वर्गाच्या नेमणुका केल्या जाव्यात अशी या परिषदेची मागणी आहे. ६] बहिष्कृत वर्गांना सार्वजनिक रस्ते, विहिरी, तलाव, शाळा धर्मशाळा, करमणुकीच्या जागा, भोजनगृह, इत्यादी सार्वजनिक सोयीचा उपयोग घेण्याचा त्यांना हक्क आहे. ७] भावी कायदे कौन्सिलात बहिष्कृत वर्गांना त्याचे प्रतिनिधी त्यांच्या लोकसंख्येच्या व गरजेच्या प्रमाणात त्यांच्या मतदारसंघातून निवडून घेण्यात यावेत. अशी या परिषदेची हक्काची मागणी आहे.[५]

**माणगाव परिषदेबाबत शाहू -आंबेडकरांचे डावपेच :**

1) माणगाव परिषद कोल्हापूर संस्थानात झाली. तर महाराजांवर ब्राह्मणी वर्तपत्र कडाडून हल्ला करतील. ते अनेक अडचणी निर्माण करतील याची कल्पना शाहू महाराजांना होती. म्हणून २१ आणि २२ मार्च १९२० रोजी झालेली. ही परिषद कागल संस्थानात असलेल्या माणगाव येथे घेण्यात आली होती.
2) परिषदेचा फोटो कुठेच उपलब्ध नाही. याचे कारण असे की मुद्दामच परिषदेचे फोटो काढण्यात आले नव्हते. हा देखील शाहू -आंबेडकर यांच्या डावपेचाच एक भाग होता.महाराजा कडे अनेक दरबारी फोटोग्राफर होते .परंतु या ऐतिहासिक परिषदेचा मात्र एकही फोटो नाही .कारण त्या वेळी परिषदेचा फोटो क काढण्यात आलेला नव्हता.
3) प्रस्तुत परिषदे करता शाहू महाराज शिकारीच्या निमित्ताने शिकार करण्याच्या ड्रेसवरच माणगावच्या परिषदा आले होते.
4) २२ मार्च १९२० रोजी कर्नलवूड हाऊस यांना महाराजांनी कोल्हापूरहून एक पत्र लिहिले. त्या पत्रात सुरुवातीला शिकारी बद्दल लिहिले. नंतर ते नमूद करतात की, मी माणगावला पान सुपारीच्या बैठकीला जात आहे. ती बैठक आंबेडकरांच्या देखरेखी खाली होत आहे .मी शोषित वर्गाच्या लोकांसाठी जे कार्य केले आहे त्याकरिता मी माझे आभार प्रकट करणार आहे. हा शाहू महाराज आणि आंबेडकर यांचा मृत्युदीपणा होता .असे छत्रपती शाहू महाराज डॉ. आंबेडकर समग्र पत्र व्यवहार या पुस्तकाचे संपादक डॉ. संभाजी बिराजे यांनी नमूद केले आहे.[६]

**निष्कर्ष :** माणगाव परिषदेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक जीवनात सुरुवात झाली असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. त्यांच्या सार्वजनिक जीवनातील ही पहिली सभा झाली. मानवी हक्काच्या क्रांतिकारी चळवळीची मुहूर्तमेढ माणगावच्या परिषदेत रोवली गेली. मानवी हक्काच्या चळवळीमध्ये माणगाव परिषदेचे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. माणगाव हे आज जगाच्या नकाशात सन्मान भूमी म्हणून अधोरेखित होत आहे. माणगाव परिषदेमुळे माणगाव मधील शिक्षणाचे प्रमाण वाढले अनेक जाती धर्मातील तरुण शिक्षण घेऊ लागले मानाच्या अनेक पदावर आज माणगावचे सुपुत्र कार्यरत आहेत. आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे काही मंडळी विधिमंडळात व संसदेतही गेले त्याचे उदाहरण शेड्युल कास्ट फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष एस. के .डीगे. हे खासदार झाले तर दादासाहेब शिर्के हे आमदार झाले

**संदर्भसूची :**

१] संपादक प्रा. उज्वला देसाई डॉ.गिरीश मोरे शतकोतर चिंतन प्रथम आवृत्ती २८ एप्रिल २०२२ पृष्ठ क्रमा. ४८
२] उपरोक्त पृष्ठ क्रमां. ८२
३] उपरोक्त पृष्ठ क्रमां. ८४
४] संपादक : डॉ. नारायण कांबळे डॉ. संजय शिंदे राजश्री शाहू नव्या दिशा. नवे चिंतन पृष्ठ क्र. ३६३
५] उपरोक्त : पृष्ठ क्र . ३६४
६] लोकराज्य,राजश्री छत्रपती शाहू महाराज सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ २४ जून २०२४ पृष्ठ क्र. ६३

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

33

# छत्रपती शाहू महाराजांनी महिलां सन्मानासाठी केलेल्या कायद्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ. मनिषा शंकर यादव**
श्री. गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर, जि. अकोला

---

**प्रस्तावना:** पुरोगामी महाराष्ट्रातील पुरोगामी व्यक्तीमत्व म्हणजे कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज होय. यांनी आपल्या हयातीत जी कामे केली त्या कामांना तोड नाही. शिक्षणाचा प्रसार असो की अस्पृश्यता निवारण कला, क्रिडा यांना स्थान यामध्ये त्यांनी नेहमीस भविष्यवेत्याची भूमिका घेतलेली दिसते शाहू महाराजांनी अस्पृश्यासाठी केलेले काम हे आधुनिक काळातही अलौकीक आहे. महिलांना समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त करुन देण्यास छ. शाहू महाराजांचे कायदे कारणीभूत ठरलेले दिसून येतात. प्राथमिक शिक्षण असो की होळी सारख्या सणानिमीत्य दिल्या जाणाऱ्या शिव्या याला देखील महाराजांनी कुठेतरी स्त्रि प्रतिष्ठा धोक्यात येते म्हणून मज्जाव केलेला दिसून येतो. विधवा विवाह, घटस्फोट, पोटगी, या सारखी धोरणे त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात राबवलेली दिसून येतात. त्यामुळे स्त्रीयांचा समाजिक दर्जा निर्माण करण्यामध्ये त्याचे स्थान अग्रस्थानी असलेले दिसुन येते शाहू पूर्व कालखंडामध्ये पुरुषाच्या तुलनेत स्त्रीचे स्थान कनिष्ठ होते. तिला कोणतेही स्वातंत्र्य नव्हते, वडील, पती मुलगा यांच्या आज्ञेबाहेर ती काहिच करु शकत नव्हती पण शाहू काळात त्यांनी स्त्रीयांना या पारंपरिक चाकोरीतून बाहेर काढले स्त्रिला शिक्षणाचा, संपत्तीचा व आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार दिला त्यासाठी कठोर कायदे केले म्हणून छत्रपती शाहु महाराजाचे कार्य हे महिलांच्या समाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक दृष्टीकोणातुन बहुमुल्य असल्याचे दिसते.

**संशोधनाची उद्दीष्ट्ये:**

१) छत्रपती शाहू महाराजांच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याचा अभ्यास करणे.
२) छत्रपती शाहू महाराजांच्या आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह व नोंदणी पध्दतीस मान्यता देणाऱ्या कायद्याचा अभ्यास करणे.
३) छत्रपती शाहू महाराजांच्या स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणाऱ्या कायद्याचा अभ्यास करणे.
४) छत्रपती शाहू महाराजांच्या काडीमोड (घटस्फोट) कायद्याचा अभ्यास करणे.
५) छत्रपती शाहू महाराजांच्या अनौरस संतती व जोगतिण संबंधीच्या कायद्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके:**

१) छत्रपती शाहु पूर्व कालखंडात व शाहूकाळात मुलींना शिक्षण दिले जात नव्हते.
२) कोल्हापूर संस्थानामध्ये आंतरातीय व आंतरधर्मीय विवाहास मान्यता शाहू महाराजांनी दिली.
३) पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रियांना मोठ्या प्रमाणात छळ होत असे.
४) छ. शाहूपूर्व कालखंडामध्ये स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार नव्हता.
५) अनौरस संतती व भावीण, मुरळी, जोगतिण, यांना वडीलांच्या संपत्ती मध्ये अधिकार नव्हता.

छ. शाहू महाराजांनी मुली शिकल्या पाहिजेत याकरीता कोल्हापूर संस्थानात शिक्षण त्यांना उपलब्ध करुन दिले तसेच मोफत देण्याची साये हि करण्यात आली होती यामुळे रयतेच्या मुला मुलींना ज्ञानगंगेचा लाभ घेता आला. उच्च वर्गाने समाजात निर्माण केलेली विषमता धर्माच्या नावावर होणारे अन्याय अत्याचार दूर करुन उपेक्षित लोकांना शिक्षणाचा अधिकार देण्याच काम शाहु महाराजांनी केले स्त्रि ही तर गुलामांची गुलाम तिला मान व कधीच मानले जात नव्हते अशा स्त्रियांच्या सन्मानासाठी महाराजांनी महत्वपूर्ण असे कायदे केले त्यामुळे स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा व मानाचे स्थान प्राप्त झाले समाजिक न्याय व स्वातंत्र्य समता देण्याचे काम प्रत्यक्ष कृतीतून शाहू महाराजांनी केले हे. या कायद्याचा आढावा पुढील प्रमाणे.

**२९ सप्टेंबर १९१७ सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा:** शाहु महाराजांनी १९१७ मध्ये संस्थानात सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा केला. त्यामुळे गावोगावी शाळा सुरु केल्या एवढेच नाही तर शाळेत आपले पाल्य पाठवणे सक्तीचे केले. या मागे त्यांचा उद्देश प्रजाननांना लिहता वाचता आले पाहिजे व हा प्रयत्न दिसतो, याकायाद्यानुसार ७ वर्षापासुन ते १४ वर्षापर्यंत सर्व मुला मुलींना शाळेत पाठवणे अनिवार्य होते. त्याचबरोबर मूल शाळेत येत नसेल तर १ रुपया दंड हा प्रत्येक मुलांस करण्याची सोय कायद्यात होती तसेच मूले शाळेत वेळच्या वेळी जातात की नाही हि पाहाण्याची जबाबदारी पालकांवर सोपवण्यात आली होती. मुले मुली शाळेत

AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

गैरहजर फक्त आजारी असल्यास राहिल ही तरतुद होती. आई बापांमूळे मूले शाळेपासून वंचित राहत असतील तर मूल शाळेत जाई पर्यंत दंड महाराजांनी आखला होता आई बापामूळे गैरहजर राहत असतील तर शाहू महाराजांनी तंन ६२ आणे पासूनचा दंड तो १ रूपयापर्यंत केला होता. आई वडील मूलांना मजूरी साठी किंवा शेतात पाठवत असतील तर त्यांना १ रुपयापासून ते ५ रुपयापर्यंत दंड केला होता. त्यामुळे मूलासोबत मूली नाही मोफत शिक्षणाचा लाभ घेता आला मूलांना घरकाम, आजारी माणसाची शुश्रृषा या करिता शाळेत पाठवले जात नसे शाहू महारांजनी मूली या शिक्षणापासून वंचीत राहू नयेत म्हणून आई वडीलां मुलांना शाळेत पाठवावे म्हणून दंडाची सोय केलेली दिसते या शिक्षणामूळेच मूली पुढे डॉक्टर, शिक्षिका झालेल्या दिसून येतात.

**आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास मान्यता:** १२ जुलै १९१९ मध्ये शाहू महाराजांनी आंतरजातीय आंतरधर्मिय विवाहास मान्यता देणारा कायदा केला कारण या आधी असे विवाह बेकायदेशीर मानले जात होते. त्यामूळे स्त्रियांची ससेहोलपट होत असे विवाह होऊनही स्त्रिला बेवारस आयुष्य जगावे लागत असे सासर माहेर या दोघांपासून वंचित व्हावे लागत असे, स्त्रिलाही कुचंबना सहन करावी लागू नये तिला ही तिच्या हक्काचे मिळावे यासाठी उपरोक्त कायदा शाहू महाराजांनी आंतरजीतीय विवाह कायदेशीर ठरवणारे बील मांडले होते. या पार्श्वभूमीवरच महराजांनी सस्थांनामध्ये अशा प्रकारचा कायदा केला या कायद्यानुसार वधूचे विवाह वय १४ वर्षे वयाचे १८ वर्षे ठरवण्यात आले तसेच १८ वर्षे पर्वी असलेल्या वधूस विवाहासाठी पालकांच्या संपत्तीची गरज नसल्याचे स्पष्ट केले संमती वयाच्या कायद्यानुसार वधू विवाह वय १२ वर्षे होते. शाहू महाराजांनी ते १४ वर्षे करुन प्रगतीचे पाऊल उचलले होते. त्याचबरोबर विधवा स्त्रियानाही दुसरा विवाह करण्याचा अधिकार दिला. तसेच झालेले विवाह नोंद ठेवण्याचा कायदा केला. विवाह नोटीस बुक ही संकल्पना छ. शाहू महाराजांनी राबवलेली होती.

**स्त्रीयांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा:** २ ऑगष्ट १९१९ मध्ये स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा शाहू महाराजांनी केला. स्त्रियांना दिली जाणारी क्रूर वागणूक थांबवण्यासाठी त्यांनी हा कायदा केला होता. स्त्रियांची होणारी छळवणूक हुंडा तसेच अनेक कुप्रथा यामूळे स्त्रियांना कोणीही वाली उरला नव्हात स्त्रियांना फक्त शिक्षण देऊन चालणारी नाही तर त्यांना समाजात दर्जाही प्राप्त झाला पाहीजे यासाठी महाराजांनी कायदे केले स्त्रियांना अयोग्य प्रकारची शाररिक दु:ख पिडा देणारी यातना, स्त्रियांच्या शरीराला इजा पोहचवणे, स्त्रियांना मानसिक क्लेश देणे त्याच्या शरीर मनावर इजा होईल अशी भिती दाखवणे, मारझोड करणे याला या कायद्याने प्रतिबंध करण्यात आला. जर अशी कोणी वागणूक स्त्रियांना देत असेल तर त्यासाठी ६ महिने कैद व २०० रु पर्यंत दंड करण्यात आला होता. स्त्रिचे वय १४ वर्षापेक्षा कमी असेल तर या कायद्यानुसार शिक्षा दुप्पट होती, रखेल ठेवणे, अन्नपाणी न देणे, झोपू न देणे स्त्रीची अवहेलना करणे तिच्याशी सहवास टाळणे, स्त्रियांचा उपमर्द करणे, अंगावर थुंकणे, रस्त्यातुन ओढत नेणे, स्त्रियांना चारित्र्या विषयी दुषणे देणे, स्त्रियांना अर्धपोटी ठेवणे, स्त्रियांच्या अंगावर चालून जाणे, यासाठी कठोर शिक्षेची तरतूद केली होती. स्त्रियांशी क्रुरपणे वागणूक हाच शिक्षेचा माफक अर्थ व कायदा होता हिंदूस्थानातील स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव यामुळे तीला अनेक पुरुषांचे अन्याय सहन करावे लागतात या सर्व त्रास व जाचापासून स्त्रियांची मुक्तता करण्यासाठी शाहू महराजांनी के कायदे केले होते.

**काडीमोड कायदा (घटस्फोट कायदा):** ११ जुलै १९१९ मध्ये हा कायदा शाहूनी संस्थानासाठी केला नवरा बायकोतील संबंध चांगले नसतील तर हा कायदा स्त्रीला नकोशा विवाहापासून मुक्तता देतो जातपंचायतीच्या माध्यमातून विवाहाचे नकोसे नाते टिकवण्यापासून स्त्रीला मुक्त करण्यासाठी थोडक्यात जातपंचायतीच्या कचाट्यातुन मुक्ततेसाठी हा कायदा महत्वाचा ठरतो काडीमोडणे याचा सर्वस्वी अधिकार स्त्रीच्या मर्जीवर अवलंबून असल्याने हा महत्वाचा होता. नवऱ्याला महारोग झाला. नपुंसक, वेडा असेल तर स्त्रिला काडीमोड घेता येत असे. तसचे तिच्या मूलांच्या व तिच्या उदरनिर्वाहासाठी पोटगीची व्यवस्था मूलांच्या ताब्याची व्यवस्था देखील कायद्याने करण्यात आली होती.

**अनौरस संतती व जोगतीनीसंबंधी कायदा:** १७ जानेवारी १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानात हा कायदा करण्यात आला या कायद्यानुसार अनौरस संतती म्हणून ज्यांची हेटाळणी होत होती. त्यांना पित्याच्या घराण्यातील वारसाचे कोणतेही हक्क मुली देवाला सोडल्या असल्यामुळे मिळणार नाहीत अशी तरतूद केली या मागील उद्देश स्त्रियांनी मुरळी, भावीन, देवदासी, जोगतीण होऊ नये हा असलेला दिसून येतो एक प्रकारे वाईट मार्गापासून स्त्रियांना परावृत्त करण्यासाठी हा कायदा महत्वाचा ठरतो.

**निष्कर्ष :** छ. शाहु महाराजांनी महीलांसाठी केलेल्या कायद्यामुळे त्यांना सामाजिक स्थान व प्रतिष्ठा प्राप्त झाली. या कायद्यामुळे महीलांचे समाजातील स्थान उंचावले.

**संदर्भ:**

१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – संपादक डॉ. जयसींग पवार महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर, प्रथमवृत्ती जानेवारी २००१

*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

२) आधुनिक भारत- शं.द. जावडेकर तिसरी आवृत्ती १९६८ पुणे.
३) राजर्षी शाहू – एक दृष्टीक्षेप- डॉ. जयसिंग पवार फडके प्रकाशन कोल्हापूर – १९८९ पुणे.
४) लोकराजा शाहू छत्रपती – रमेश जाधव प्रथम आवृत्ती १९९७ पुणे.
५) विसाव्या शतकातील महाराष्ट्र – य.दी. फडके प्रथमावृत्ती १९८९ पुणे.
६) राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग – वा.द. तोफखाने प्रथमावृत्ती १९६३ कोल्हापूर
७) शाहू छत्रपतीचे निवडक आदेश भाग-२ महाराष्ट्र शासन १९८९
८) राजर्षी शाहू छत्रपती यांचे भाषणे – संपादक श्याम येडेकर मंगल प्रकाशन प्रथमावृत्ती १९७१
९) राजर्षी शाहू छत्रपती – धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन पुणे दुसरी आवृत्ती – १९९२
१०) राजर्षी – एक व्यक्तीदर्शन – श्याम येडेकर

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

34

# छत्रपती शाहू महाराजांचे कला व वाङ्मय क्षेत्रातील योगदान

**डॉ. रेखा काशिनाथ पसाले**
मराठी विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक,
आर्ट्स अंड कॉमर्स कॉलेज, कासेगाव

---

**प्रस्तावना :** वयाच्या आठव्या वर्षी राज्यकारभाराची अर्थात कोल्हापूर संस्थानाची सूत्रे आपल्या हाती घेतल्यानंतर छत्रपती शाहू महाजांनी राज्यकारभार करत असताना लोककल्याणकारी धोरण स्वीकारले आणि ते लोककल्याणकारी धोरण हे व्यक्तीच्या सर्वांना स्पर्श करणारे असे होते. त्यांनी फक्त कृषी, औद्योगिक, क्रीडा, प्रशासन या गोष्टींकडेच लक्ष दिले नाही तर त्यांनी कला व वाङ्मयाला देखील आपल्या लोककल्याणकारी धोरणात अग्रक्रम दिला संस्थानामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यामुळे त्यांची कला आणि वाङ्मय क्षेत्रातील रुची आणि श्रोते या ठिकाणी प्रतिबिंबित होते त्यामुळे त्यांच्या कला आणि वाङ्मय क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये छत्रपती शाहू महाराज यांच्या कला आणि वाङ्मयीन क्षेत्रातील योगदानाची विस्तृत चर्चा या ठिकाणी करण्यात येणार आहे.

**उद्दिष्टे-:**

- छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन परिचयाचा अभ्यास करणे.
- छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा अल्पसा आढावा घेणे.
- छत्रपती शाहू महाराज यांच्या कला व वाङ्मयीन क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.

**विषय विवेचन :** शाहू महाराजांचा जन्म जून २६, इ.स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे नाव यशवंत त्यांच्या वडिलांचे जयसिंगराव (आप्पासाहेब), आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च, इ.स. १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले आणि त्यांनी त्याचे नाव शाहू हे नाव ठेवले. एप्रिल २, इ.स. १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. मुंबई येथे ६ मे इ.स.१९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे प्रजापती म्हणून काम करत असताना आपल्या संस्थानामध्ये बहुजन हिताय बहुजन सुखाय या उक्ती प्रमाणे कार्य केले. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये कला क्रीडा साहित्य यांना देखील मोठया प्रमाणावर प्रोत्साहन दिलेले आहे. यातून त्यांच्यातील एक साहित्यिक, श्रोता झळकतो. त्यांनी कला आणि साहित्याच्या क्षेत्रात केलेल्या योगदानाची दखल त्यांच्या विविध कार्यातून दिसून येते.

**राजर्षी शाहू महाराजांचे सांस्कृतिक आणि कला-क्रीडा विषयक धोरण :** राजर्षी शाहू महाराजांचे सांस्कृतिक आणि कला-क्रीडा विषयक धोरण समजून घेणे हे आजच्या काळातही उपयुक्त आहे. संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला अशा ललितकलांना महाराजांनी सातत्याने प्रोत्साहन दिले. त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूर हे खऱ्या अर्थाने 'कलापूर' बनले होते. तसेच 'मल्लविद्येचे माहेरघर' म्हणून देशभर ओळखले जाऊ लागले. राजर्षी शाहू महाराज एक लोककल्याणकारी आणि द्रष्टे राज्यकर्ते होते. मागासवर्गांच्या उन्नतीचा आपला महत्त्वपूर्ण कृती कार्यक्रम निर्धारपूर्वक राबवत असतानाच त्यांनी साहित्य, कला, संगीत, क्रीडा इत्यादी क्षेत्रांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अग्रक्रमाने राबविले. गुणी खेळाडू, कलावंतांचा शोध घेऊन आणि त्यांना राजाश्रय देऊन इतिहास घडविणारी एक पिढी त्यांनी निर्माण केली. कोल्हापूरसारख्या एका छोट्या संस्थानाचा संस्थानिक देशभरातील कलावंत, पैलवान, खेळाडू वगैरेंच्या गळ्यातील ताईत होतो, त्यांचा प्रमुख आश्रयदाता, मार्गदर्शक आणि प्रेरणास्रोत बनतो, यावरून शाहू महाराजांची सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील भारतीय पातळीवरील अद्वितीय कामगिरी लक्षात येते. संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला अशा ललितकलांना महाराजांनी सातत्याने प्रोत्साहन दिले.

शाहू महाराजांना शेतकऱ्यांचा राजा, दीन दलितांचा कैवारी, लोककल्याणकारी राजा अशा अनेक नावांनी संबोधले जाते. समाजाची खरी नाळ ओळखून समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी शाहू महाराजांनी उचललेले प्रत्येक पाऊल आश्वासकच होते. समाजातील प्रत्येक घटकाला स्वतःचा उदात्त चेहरा दाखवण्याचे आणि आपल्या हक्कांची जाणीव करून देण्याचे युगांतरकारी कार्य शाहू महाराजांनी केले. अशा शाहू महाराजांच्या नजरेतून कलाक्षेत्रही सुटले नाही. कलेवरच्या निस्सीम श्रध्देमुळे, प्रेमामुळेच शाहू महाराजांना कलाप्रेमी राजा म्हटले जाते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घडणीमध्ये शाहू महाराजांचे योगदान अग्रणी आहे. साहित्य,

कला, संगीत अशा विविध क्षेत्रांबाबतीत राजर्षीच्या व्यक्तिमत्वातून पुढे आलेली सक्रिय गुणग्राहकता लोभस, मोलाची वाटते. कलाक्षेत्राला जिवंत आणि लोकाभिमुख करण्यामध्ये शाहू महाराजांचा मोलाचा वाटा दिसून येतो. गायन, वादन, चित्र, शिल्प, नाटय, मल्लविद्येचे चाहते असणाऱ्या शाहू महाराजांमुळेच कोल्हापूर ही कलावंतांची खाण बनली.

**गायन :** उत्तर भारतात एका गायकाच्या पोटीच जन्मलेल्या अल्लादियों खाँ यांच्या गायन कलेवर आकृष्ट होऊन शाहू महाराजांनी त्यांना राजाश्रय दिला आणि दरबारी गायक म्हणून नेमले. शाहू महाराज गुणग्राहक होते, हे यावरून स्पष्ट होते. शिवाय संगीताची आवड हे बीज त्यांच्यात वडील आबासाहेब घाटगे यांच्यामुळे पेरले गेले होते. जयपूर घराण्याची गायकी असणारे अल्लादियों खॉसोबत त्यांचे बंधू हैदरखों आणि तिघे पुत्र मंजीखों, मूर्जीखों, नसिरुद्दीन खाँ कोल्हापुरात वास्तव्यास आले आणि कोल्हापूर हे संगीत विद्यापीठच बनले. अल्लादियों खाँ यांच्या देशोधडीला लागलेल्या कुटुंबाला शाहू महाराजांनी दिलेला राजाश्रय म्हणजे कलानगरीला मिळालेली नवसंजीवनी होती.

महाराजांनी दिलेल्या प्रेरणेतून आणि अल्लादिया खीं (१८५५-१९४६) यांच्या शिकवणीतून पं. भास्करबुवा बखले, हैदरखों (१८६१-१९३६), मंजीखों (१८८८-१९३७), नथ्थनखों, केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर, जसदन जरीवाला, गोविंदबुवा शाळीग्राम, निवृत्तीबुवा सरनाईक असे प्रथितयश गायक निर्माण झाले. अल्लादियोंखों ते मंगेशकर कुटुंब यामधल्या काळात संगीताला राजाश्रय दिला तो शाहू महाराजांनीच. १८८२ साली स्थापन झालेल्या कोल्हापुरातील देवल क्लबला शाहू महाराजांचा आधार, आश्रय मिळाला आणि सांगितीक परंपरेने चांगलीच मोहोर उमटवायला सुरूवात केली.

**अल्लादियों खौं :** जयपूर-अत्रौली घराण्याच्या गायकीचा आविष्कार करणारे अल्लादियाखों इ.स. १८९५ ते इ.स. १९२२ या काळात शाहू महाराजाकडे दरबारी गायक म्हणून राहिले. कोल्हापूरच्या जुन्या राजवाडयातील भवानी मातेच्या मंडपात आठवडयातून दोन दिवस देवीपुढे आणि नवरात्रात नेहमी हजेरी देत असत. कलापूरचे नाव साऱ्या हिंदुस्थानात पोहोचवण्यात अल्लादियों खौं अग्रणी राहिलेले दिसून येतात. प्रकांड विद्वत्तेच्या खाँसाहेबांनी मोठा आणि प्रतिभाशाली शिष्यवर्ग तयार केला.

**नाटय :** संगीत कलेप्रमाणेच नाट्यकलेलाही शाहू महाराजांनी राजाश्रय दिला. महाराज कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आले. तेव्हा कोल्हापूरात नुकतीच नाट्यकलेची नांदी झाली होती. जुना राजवाडा, लक्ष्मी प्रसाद थिएटर या ठिकाणी झालेल्या किर्लोस्कर, शाहू नगरवासी, महालक्ष्मी प्रासादिक कंपनीच्या नाट्यकलाकारांची महाराजांकडूनच बडदास्त ठेवली जात असे. गोविंदराव टेंबे (१८८१-१९५५) महाराष्ट्र कोकिळ शंकरराव सरनाईक, बालगंधर्व, संगीतसूर्य केशवराव भोसले या नाट्यकलाकारांना आणि कोल्हापूर संगीत नाटक मंडळी, शिवराज संगीत नाटक मंडळी (१९५-१६), यशवंत संगीत नाटक मंडळी (१९१९), बळवंत नाटक मंडळी यासारख्या नाट्यकंपन्यांनाही महाराजांनी खरा राजाश्रय दिला. यावरून महाराजांची कलासक्त वृत्ती, मनाचा मोठेपणा आणि द्रष्टेपणा अधोरेखित होतो.

**संगीतसूर्य केशवराव भोसले :** शाहू महाराजांनी मराठा रंगभूमीला दिलेला एक प्रतिभावान् चतुरस्त्र कलावंत म्हणजे केशवराव भोसले. स्वदेश हितचिंतक मंडळी या नाटक कंपनीतून केशवराव भोसले पुढे आले. १ जानेवारी १९०८ मध्ये ललित कलादर्श नाटक मंडळी त्यांनी स्थापन केली. त्या माध्यमातून 'मृच्छकटिक नाटकाचे अनेक प्रयोग झाले. महाराजांनी मोठे मानधन देऊन केशवरावांना गौरवले. केशवराव भोसलेंनी मिळवलेली संपत्ती देवल क्लबसारख्या संस्थेस उभारी देण्यास खर्च केली. त्याच्या अभूतपूर्व यशामागे महाराजांच्या ठिकाणी असणाऱ्या मातेच्या वत्सलतेचे आणि रसिक हृदयाचे दर्शन घडते.

**बालगंधर्व :** नारायण राजहंस म्हणजेच बालगंधर्व ही शाहू महाराजांनी मराठी रंगभूमीला दिलेली अनमोल देणगी बालगंधर्वांच्या गाण्यातील कौशल्य, माधुर्य आणि रूपवान शरीरठेवण ही वैशिष्ट्ये हेरून महाराजांनी त्यांना किर्लोस्कर नाटक कंपनीत रुजू केले (१९०५). पुढे १९ जून १९१३ मध्ये किर्लोस्कर कंपनीतून बाहेर पडून बालगंधर्वांनी गंधर्व नाटक मंडळी स्थापन केली. संगीत शाकुंतलमधील शकुंतलेच्या भूमिकेमुळे पदार्पणातच बालगंधर्वांनी एक वेगळी उंची गाठली. त्यांच्या स्त्री भूमिकांची छाप रसिक मनावर अधिराज्य गाजवत राहिल्याचे दिसते. त्यामध्ये शाहू महाराजांचे त्यांना सर्वांगाने पाठबळ मिळत राहिले.

**काव्य :** काव्य हा भाषिक व्यवहाराचा एक खास प्रकार असल्यामुळे काव्याच्या कोणत्याही वाचकाने व समीक्षकाने विविध प्रकारच्या काव्यरचना पाहिलेल्या असतात व त्यामुळे संकेत उलगडण्याच्या विविध पद्धती व एकाहून अधिक संमिश्र प्रकारचे मूल्याग्रह धरूनच तो समोरचे नवे काव्य बघत असतो. काव्य मध्ये केशवसुत, भा. रा. तांबे, रेव्हरंड टिळक यांच्यासारख्या महान कवींच्या प्रभावळीतले कवी सुमंत उर्फ आप्पाजी धुंडीराज मुस्तुले म्हणजे महाराजांच्या गुणग्राहकतेचा आणखी एक पैलू' कवी
"श्री शाहूनुपाची सेवा, आमुचा देवा।

कलाकारांच्या ठायी महाराजांबद्दल असणारा आदर, कार्यगौरव ओळीतून नेमका स्पष्ट होतो.

**कवी सुमंत :** कवी सुमंत महाराजांबद्दल लिहीतात. शाहुविण दुसऱ्या आम्ही न भजतो देवा ।। शाहू महाराजांकडे खाजगीत घरडेघाशी करणारे कारकून म्हणजे प्रतिभासंपन्न कवी सुमंत मौक्तिकमाला, भावनिनाद, गीतावली ही त्यांची काव्यसंपदा त्यातील प्रतिमा आणि पांडित्याच्या अनोख्या आविष्काराची जाणीव महाराजांना होती. म्हणूनच महाराजांनी त्यांना 'कवि-मौक्तिक पदवी दिली. सहजसुंदरता, निसर्गसौंदर्य, भावोत्कटता ही कवी सुमंतांच्या कवितेत सापडणारी सौंदर्यस्थळे.

**भजन आणि शाहिरी संगीत :** मानवी जीवनात उत्साह आणि आनंद निर्माण करणाऱ्या शास्त्रीय संगीताला हक्काचे स्थान मिळवून देणाऱ्या महाराजांनी भजन संगीतात तुकारामबुवा सरनाईक, कृष्णा बागणीकर, तर शाहिरी संगीतात शाहीर विठ्ठल डोणे, शाहीर लहरी हैदर, शाहीर रामचंद्र माळी यासारख्या उमद्या, गुणी कलाकारांना सर्व बाजूनी सहाय्य करण्याचे धोरण अवलंबून कोल्हापूरला कलापूर बनविले.

**शाहिर लहरी हैदर :** शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या शाहीर कलावंताना राजाश्रय दिला. सरकारी दरबारी नोकऱ्या दिल्या शाहिरांना तालमींसाठी विनामूल्य जागाही दिल्या. शाहू महाराजांच्या काळात शीघ्र कवित्वामुळे शाहीर लहरी हैदर अधोरेखित झाले. त्यांना आधुनिक मराठी शाहिरीचे अग्रदूत मानले जाते. झाशीची राणी, तानाजी मालुसरे, छत्रपती शाहू, आधुनिक फाजिल सुधारणेचा पोवाडा, भोंदू साधू जोधपुरची राणी हे त्यांचे पोवाडे गाजले. शाहीर पिराजीराव सरनाईक हे त्यांचे पट्टशिष्य होत. शाहीर लहरी हैदर महाराजांचे वर्णन करताना पोवाडयात म्हणतात.

जो निद्रिस्त महाराष्ट्राला जागे करण्याला। ज्ञानरवी झाला ।
शाहू छत्रपती सत्यआधार ।
मानवी जाणविले अधिकार म्हणून शाहू प्रभु देव अवतार ।।

**चित्रकला :** चित्रकला ही एक व्हिज्युअल कला आहे, जी पेंट , रंगद्रव्य , रंग किंवा इतर माध्यमे घन पृष्ठभागावर (ज्याला "मॅट्रिक्स" किंवा " समर्थन " म्हणतात) लागू करण्याच्या सरावाने दर्शविली जाते. हे माध्यम सामान्यत: ब्रशच्या सहाय्याने पायावर लावले जाते, परंतु इतर अवजारे, जसे की चाकू, स्पंज आणि एअरब्रश वापरले जाऊ शकतात.

आबालाल रहिमान यांच्या चित्रकलेची दखल घेऊन त्यांना दरबारी चित्रकार हुद्दा बहाल करून महाराजांनी त्यांच्यासाठी तनखा सुरू केली हे विशेष. आणि त्याच प्रेरणेतून पुढे आनंदराव पेंटर, बाबुराव पेंटर, बाबा गजबर, दत्तोबा दळवी, भाई माधवराव बागल या कलाकारांनाही महाराजांचा आश्रय आणि आधार मिळाला.

कलाकार स्वच्छंदी मन घेऊनच कलाविष्कार करत असतो, अजरामर कलाकृती उतरवत असतो हे कलाकारांच्या मनातले विश्व जाणण्याची सुंदर कला महाराजांच्या ठिकाणी कायमच जिवंत होती हे यातून स्पष्ट जाणवते.

**आबालाल रहिमान :** सन १९८६ मध्ये मुंबईत जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकतानाच त्यांच्यातील चित्रकलेतील कौशल्याला 'व्हाईसरॉयज मेडल' अशा आबालाल रहिमान यांनी महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच कोल्हापूरात चित्रकलेची आराधना केली. इ.स. १८९७ मध्ये महाराजांनी त्यांना दरबारी चित्रकार म्हणून नियुक्त करून तनखा सुरु केली. निसर्ग, गोरगरीब, ग्रामस्थ हे त्यांच्या चित्रांचे विषय असत. जलरंग आणि तैलरंगाचा समर्थ वापर, विविध तंत्र पध्दतींचा वापर ही त्यांची वैशिष्टये. उत्कट आविष्काराची, वर्णनात्मक, प्रगल्भ निसर्गाशी तादात्म्य पावणारी चित्रे ही त्यांची हातोटी होती.

**नाटयगृह :** रोममधील भव्य नाट्यगृहाप्रमाणे आपल्याकडेही तसे नाट्यगृह उभारण्याची जिद्द महाराजांनी अवघ्या तीन वर्षात सत्यात उतरवली. १९१५ साली महाराजांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या पॅलेस थिएटरचे, नाट्यगृहाचे स्वातंत्र्योत्तर काळात केशवराव भोसले नाटयगृह असे नामकरण केले. नाट्यकलावंतांच्या परकाया प्रवेशाला मिळालेले हक्काचे थिएटर शाहू महाराज या द्रष्टया राजाची साक्ष देणारे ठरते.

कागलचे ओव्हरसियर जिवबा कृष्णाजी चव्हाण यांच्याकडून सल्लामसलतीने तयार झालेला उत्तम आराखडा, बाळकृष्ण गणेश पंडितांकडून करवून घेतलेले सुबक बांधकाम, त्यासाठी खास परदेशातून मागवलले लोखंडी गर्डर्स या साऱ्याचा परिपाक म्हणजे महाराजांच्या कलाप्रणित दूरदृष्टीने १९१३ ते १९१५ या दोन वर्षात दिमाखात उभारलेले केशवराव भोसले नाटयगृह या सा-यावर विलायतेमधील (रोम) नाट्यगृहांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो.

**चित्रपट :** शाहू महाराजांच्या कारकिर्दीमुळे अनेक कलाकार, कारागीर तंत्रज्ञ करवीर नगरीकडे आकर्षित झालेले दिसून येतात. शाहू महाराजांच्या चिकित्सक, आश्वासक आणि कलाप्रेमी नजरेतून कलाक्षेत्रातील बदलत्या तंत्राचा मागोवा घेऊन एका क्रांतिकारी स्थित्यंतराला सुरुवात झालेली दिसून येते ती म्हणजे चित्रपट कला. भक्कम पाश्चात्य पार्श्वभूमी असलेल्या या सिनेमाकलेची भारतात प्रथमच मुहूर्तमेढ रोवली ती करवीरनगरीत, तीही जयप्रभा स्टुडिओ च्या रूपानं भव्य जागा आणि प्रशस्त वास्तू कलाकारांच्या

कलासक्तपणाला बहाल केली. म्हणूनच जयप्रभा स्टुडिओ हा देशातील सिनेसृष्टीचा पहिला मानदंड प्रकल्प म्हणून महाराजांच्या पाऊलखुणा दाखविणारा ठरतो. कलापूरला दिगंत किर्ती प्राप्त करून देण्यात शाहू महाराजांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाल्याचे यातून ठळक जाणवते.

करवीर नगरीला भारतीय चित्रपटसृष्टीचे माहेरघर बनवण्यात मोलाचा वाटा होता कलामहर्षी बाबुराव पेंटर यांना प्रतिभावान कलाकार, चित्रकार, शिल्पज्ञ, तंत्रज्ञ म्हणून ते ओळखले जात असे ते आणि त्यांचे बंधू आनंदराव पेंटर (१८९०-१९५४) यांनी १९१३ साली कोल्हापूर चित्रपट प्रदर्शनासाठी महाराष्ट्र सिनेमा' थिएटर बांधले. महाराजांच्या प्रेरणेतूनच स्वदेशी बनावटीचा मूव्ही कॅमेरा हिंदुस्थानात प्रथमच दोघा बंधूमुळे अवतरला. बाबुराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनी (१ डिसे. १९१७) ला मंगळवार पेठेत देणगी म्हणून जागा देऊन चित्रपट निर्मितीला बळ दिले. या कंपनीच्या माध्यमातून बाबुराव पेंटरनी २४ चित्रपट, इतर फिल्म कंपन्यांचे ९ चित्रपट अशा ३३ चित्रपटांना दिग्दर्शक म्हणून योगदान दिले. पुढे १९३२ मध्ये प्रभात फिल्म कंपनीने अयोध्याचा राजा हा पहिला बोलपट तयार करून कोल्हापूरचे नाव अग्रणी केले.

शांताराम या प्रवासातच बाळासाहेब यादव, झुंजारराव पवार, बाबुराव पेंढारकर, किशाबापू बकरे, स्टंट किंग गणपतराव बकरे, व्ही., विष्णुपंत पागनीस, बाळ गजबर, बी. नांद्रेकर हे प्रतिभावान कलावंत नावारूपास येत गेले. विविध कला आणि कलाकारांना महाराजांच्या पाठबळाचा परिसस्पर्श झाला आणि कलाक्षेत्राने उत्तुंग भरारी घेतली. कलावंतामधील माणूस जाणण्याच्या कसबामुळेच महाराज कला-कलाकारांचे आश्रयदाते बनले असे म्हणता येईल. अनेक संस्थानिकांनी देशात कला आणि कलाकाराला आश्रय दिला असला तरी कलाकारांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे शाहू महाराज हे एकमेवाद्वितीयच होत.शाहू महाराजांच्या कारकिर्दीत कलादालने तर समृध्द झालीच, पण त्यांनी दिलेल्या राजाश्रयामुळे कलेला महाराष्ट्रात सुवर्णयुग प्राप्त झाले.

**निष्कर्ष :**

१. कलासक्त राजा
२. कलेवर व कलाकरांवर निस्सीम प्रेम
३. कलेकडे बघण्याची चिकित्सक नजर / दृष्टी
४. कलाकारातला माणूस जाणण्याची हातोटी
५. कलेचा अधिष्ठाता राजा
६. कलेकडे बघण्याचा उदार आणि उदात्त दृष्टिकोन
७. कला आणि कलाकाराचे वैभव जपणारा राजा
८. कलावृध्दीसाठी सक्षम आर्थिक पाठबळ देणारा राजा
९. कलाक्षेत्राकडे बघण्याची संवेदनशील नजर
१०. कलाकारांचा आधारवड

**संदर्भ :**

१. भगत, रा. तु. (२०१६), "राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व शिक्षणकार्य", रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.
२. जाधव, नरेंद्र (१९८०), "महाराष्ट्रातील मानचिन्हे", मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे.
३. पवार जयसिंगराव,( नोव्हेंबर २००५), "राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा", मेहता पब्लिशिंग हाऊस , कोल्हापूर.
४. चव्हाण रा .ना., ( २००२), "राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य , सनय प्रकाशन, पुणे.
५. कीर धनंजय, (२०१७), "लोकराजा शाहू महाराज व्यक्तित्व आणि विचार", सुधीर गवळी प्रकाशक, पुणे.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

35

# छत्रपती शाहू महाराज आणि कृषी विकास

**प्रा. अरुण सदाशिव कटकोळे**
इतिहास विभाग प्रमुख,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी.

---

**प्रस्तावना :** सन १७१० मध्ये महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूरच्या स्वतंत्र गादीची स्थापना करून कोल्हापूर राज्याची स्थापना केली. तेंव्हापासून कोल्हापूरच्या राज्याला एका स्वतंत्र संस्थानाचा दर्जा मिळून या संस्थानाने सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात एक वेगळे आणि स्वतंत्र स्थान निर्माण केले. सन १८८४ मध्ये कोल्हापूर संस्थानच्या गादीवर छत्रपती शाहू महाराज आले. त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने रयतेच्या उन्नतीसाठी सहकार, सामाजिक, कृषी उद्योग आदी क्षेत्रात भरीव कार्य केले. त्यांनी केलेल्या कृषिविषयक धोरणामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात व २१ व्या शतकात कोल्हापूर जिल्ह्यामध्ये हरितक्रांती घडून आली. याचे संपूर्ण श्रेय छ. शाहू महाराजांना जाते. त्यांनी केलेल्या कृषिविषयक सुधारणांमुळेच स्वातंत्र्योत्तर काळात कोल्हापूर जिल्ह्याचा आर्थिक विकास घडून आला आहे. आणि त्यामुळेच पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्याने आपले वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

**विषयाची निवड:**छ. शाहू महाराजांच्या कार्याचे विविध अंगांनी संशोधन झालेले आहे. परंतु ऐतिहासिक दृष्टीकोनातून शाहू महाराजांनी केलेल्या कृषिविषयक सुधारणांचा अभ्यास सखोल झालेला नाही. त्यामुळे त्यांनी केलेल्या कृषिविषयक सुधारणांचे महत्त्व लक्षात घेऊन हा विषय निवडला आहे.

**विषयाचे महत्त्व:** कृषी हा कोल्हापूर संस्थानचा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे कोल्हापूर संस्थानाच्या विकासामध्ये कृषी व्यवसायाने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. छ. शाहू महाराजांनी केलेल्या कृषिविषयक सुधारणांमुळे संस्थानचा आर्थिक विकास घडून आला. त्यांनी केलेल्या आर्थिक विकासांमध्ये कृषिपूरक उद्यागांचा महत्त्वाचा वाटा आहे. गुळ उद्योग, साखर उद्योग, कापड उद्योग, दुग्ध व्यवसाय इ. उद्योगाचा त्यामध्ये समावेश होतो. छ. शाहू महाराजांनी केलेल्या कृषिविषयक सुधारणेमुळे झालेल्या आर्थिक विकासाचा इतिहास पुढे आल्यास, अभ्यास झाल्यास निश्चितच संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी, शिक्षक आणि समाजास उपयुक्त ठरेल.

**विषयाचे स्वरूप व व्याप्ती:** प्राचीन काळापासून कृषी ही संज्ञा फार व्यापक असून कालपरत्वे कृषीचे स्वरूप व्यापकच राहिले आहे. छ. शाहू महाराजांनी केलेल्या कृषी विकासामुळे कृषी व्यवसाय हा केवळ उपजीविकेचे साधन न राहता एक व्यवसाय बनला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केलेला कृषिविषयक सुधारणांचा अभ्यास करणे.
२. छ. शाहू महाराजांच्या कालखंडातील कृषी, जलसिंचन, पीकपद्धती, खते, इ. बदलांचा अभ्यास करणे.
३. छ. शाहू महाराजांनी केलेल्या कृषी विकासामुळे झालेल्या आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** संशोधकाने प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. प्राथमिक व दुय्यम साधनांची सत्यता तपासून माहितीची वस्तुनिष्ठपणे मांडणी केली आहे.

**कोल्हापूर संस्थानचे भौगोलिक स्थान/पर्जन्य जमीन :** कोल्हापूर संस्थान ७३$^{0}$ ते ७४$^{0}$ पूर्व रेखांश व १५$^{0}$ ते १७$^{0}$ उत्तर अक्षावर असून या संस्थानच्या अमलाखाली करवीर, गडहिंग्लज, शिरोळ, आळते, राधानगरी, भुदरगड, चनवाड, पन्हाळा, रायबाग,कटकोळ, गगनबावडा, विशाळगड, आजरा, कागल इ. पेठे (सध्याचे तालुके) होते.[१] संस्थानची पूर्वपश्चिम लांबी सुमारे ११० कि.मी. असून पर्ज्यन्यमान , जमीन , हवामान इ. बाबतीत विविधता आढळून येते. पश्चिमेकडील गगनबावडा पेठ्यात सुमारे ६००० मि.मि. पाऊस पडतो. तर पूर्वेकडे कमी कमी होत शिरोळ पेठ्यात ५०० मि.मि. इतकाच पाऊस पडतो. संस्थानचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे दर मैलास पावसाचे प्रमाण बदलते. पर्ज्यन्यमानाप्रमाणे जमिनीतही भिन्नता असून कोकण व घाटमाथ्यावर अतिवरकस व तांबट जमीन तर पूर्वेकडे मध्यम, भारी, काळ्या तसेच नदीकाठच्या गाळ, पेर जमिनीचा समावेश आहे. जमिनीच्या प्रतवारीनुसार संस्थानात भात, ज्वारी, नाचणी, गहू इ. अन्नधान्ये पिके, तर हरभरा, वाटाणा, कुळीथ, उडीद, मूग, मटकी, चवळी व पावटा अशी कडधान्ये पिके आणि काजू, नारळ, आंबा, फणस,पेरू,चिक्कू, द्राक्षे इ. फळपिके तसेच भाजीपाल्याचेदेखील उत्पादन घेतले जात असे. पंचगंगा, दुधगंगा, वेदगंगा, कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती, हिरण्यकेशी इ. नद्यांच्या सुपीक प्रदेशाचे वरदानही कोल्हापूर संस्थानला लाभल्यामुळे संस्थानचा आर्थिक विकास घडून आला.[२]

**छ. शाहू महाराज आणि कृषी विकास :** २६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात जन्मलेल्या छ. शाहू महाराजांना १७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी दत्तक घेतले. कोल्हापूर संस्थानच्या गादीवर येताच शाहू महाराजांनी संस्थानच्या आर्थिक विकासास प्राधान्य दिले. त्यासाठी त्यांनी कृषीविकासास अग्रक्रम दिल्याचे दिसून येते.[३] कोल्हापूर संस्थानातील ९०% जनतेची उपजीविका ही कृषीवरच अवलंबून होती. उद्योजकता ही कृषिविकास झाल्याशिवाय वाढणे अशक्य आहे. हे ओळखून छ. शाहू महाराजांनी १९०२ मध्ये इटली या कृषिप्रधान देशाला भेट दिली. तेथील कृषीचे निरीक्षण केल्यानंतर त्यांच्या हे लक्षात आले की, प्रगत देशाच्या तुलनेत आपल्या देशाची कृषी प्रगती खूपच कमी आहे. त्यामुळे कृषी उत्पादन वाढविण्यासाठी कृषी आधुनिकीकरण आणि कृषीला व्यवसायाची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न महाराजांनी केल्याचे आढळून येते. छ. शाहू महाराजांनी पुढील टप्प्यांमध्ये कृषी विकास घडवून आणला.[४]

**छ. शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी केलेली कार्ये :** कृषी आधुनिकीकरण होऊन त्याचा विकास होण्यासाठी शाहू महाराजांनी पुढील कार्ये केली.

**१) राधानगरी धरण निर्मिती :** सन १८९५-९६ मध्ये कोल्हापूर संस्थानात दुष्काळ पडला होता. छ. शाहू महाराजांनी दुष्काळ निवारण्यासाठी स्वतंत्र विभागाची स्थापना करून त्याठिकाणी छावण्या उभारल्या आणि दुष्काळापासून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी जागतिक कीर्तीचे अभियंते श्री विश्वेश्वरय्या आणि कोल्हापूर संस्थानाचे अभियंते मीटर यांना सर्व्हेसाठी नियुक्त केले आणि फेजिवडे येथे भोगावती नदीवर धरण बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला.[५] सदर प्रकल्प उभा करण्यासाठी भोगावती नदी आणि तिचा परिसर निवडण्याचे कारण म्हणजे या भागात वार्षिक सुमारे ५००० मि. मि. इतका पाऊस पडत असे. तसेच हा प्रदेश मातीचा पातळ थर असलेल्या ट्रॅप जातीच्या खडकांनी बनलेला आहे.[६] हे धरण ३६०० फूट लांबीचे आणि ११० फूट उंचीचे बांधले जाणार होते. त्यासाठी ३० लाख रु. खर्च येणार होता. तर 20 हजार हेक्टरहून अधिक जमीन लागवडीखाली येणार होती. महाराजांनी या धरण योजनेस हुकुम ३९०/१९०८ दि. २२/०९/१९०८ रोजी मंजुरी दिली. तर धरणाच्या बांधकामास नोव्हेंबर १९०९ रोजी महाराणी लक्ष्मीबाई तथा आईसाहेब यांच्या हस्ते सुरुवात केली.[७] सन १९१०-११ च्या अहवालानुसार त्यावर्षी २ लाख घनफूट बांधकाम झाले. तर वर्षअखेर रु. ६८,२९९/- इतका खर्च झाला. पुढे सन १९१८ मध्ये पहिले महायुद्ध आणि इतर कारणांमुळे धरणाचे बांधकाम बंद पडले ते महाराजांच्या हयातीत पुन्हा सुरु झाले नाही.[८]

**२) आधुनिक कृषीचा प्रसार:** आधुनिक कृषीचा प्रसार होण्यासाठी शाहू महाराजांनी संस्थानात १९१२ मध्ये 'किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूट'ची स्थापना केली.[९] या संस्थेला जोडूनच कोल्हापुरात आधुनिक कृषी अवजारांचे एक संग्रहालय सुरु करण्यात आले. शेतकऱ्यांना सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास कृषी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव, जोतीबा यात्रा अशा प्रसंगी 'कृषी प्रदर्शन' भरविली. अशा प्रदर्शनात कृषीशी निगडीत आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने, नमुने पत्रके इत्यादींची मांडणी करण्यात येत असे. त्याचबरोबर उत्तम पैदासिच्या जनावरांचे आणि विज्ञान प्रदर्शनदेखील भरवण्यात येत असे.

**३) चहा, कॉफी आणि रबरचा प्रयोग:** संस्थानात पारंपरिक भात, गहू, ज्वारी इ. पिके घेतली जात होती. त्याऐवजी महाराजांनी अधिक पर्जन्य असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगात पश्चिमेकडे उतार जमिनीवर चहा, कॉफी, रबर मळ्याचे प्रयोग केले. यापैकी चहाचा प्रयोग अपेक्षेहून अधिक यशस्वी ठरला. आणि पन्हाळा टी. नं. ४ या नावाने तो संस्थानाबाहेर इतर राजेरजवाडे यांना पोहचू लागला.[१०]

**४) सहकारी संस्थांमार्फत कर्जपुरवठा :** संस्थानात त्याकाळी शेतीस लागणारा कर्जपुरवठा सावकार करीत असे आणि व्याजाचा दर १२ ते ३०% इतका जास्त असे. तसेच बियाणे किंवा उपजीविकेसाठी कर्ज काढल्यास त्याची उत्पादने दुप्पटीने होई. शेतकऱ्याने कर्जफेड न केल्यास सावकार त्याची जमीन जप्त करित असे. त्यामुळे शेतकऱ्यास शेतमजूर म्हणून राहावे लागे.[११] यातून शेतकऱ्यांना कायमचे मुक्त करण्यासाठी शाहू महाराजांनी शेती उद्योग व शेतमालाचे विक्री व्यवस्था व्हावी या उद्देशाने संस्थानात सहकारी पतपेढ्या स्थापन केल्या आणि १९१२ मध्ये सहकार कायदा लागू करून सहकारविषयक धोरण राबविण्यासाठी श्री भास्करराव जाधव या अधिकाऱ्यांवर या विकासाची जबाबदारी सोपविली. त्यांच्या या प्रयत्नामुळे सन १९१३ मध्ये पहिली को-ऑपरेटीव्ह संस्था स्थापन झाली. तसेच नंतरच्या काळात बलभीम सहकारी व त्यानंतर शाहू को-ऑपरेटीव्ह अशा संस्था स्थापन झालेल्या दिसून येतात.

**५) इनामे अविभाज्य केली:** छ. शाहू महाराजांचे कृषी अर्थव्यवस्थेतील सर्वात क्रांतिकारक कार्य म्हणजे त्यांनी मे १९१३ मध्ये संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य केली. प्रत्येक पिढीबरोबर इनामाचे तुकडे होऊन कृषी उत्पादकतेवर त्याचा विपरीत परिणाम

होतो. हे ओळखून इनामे अविभाज्य करण्याचे पाऊल उचलले. त्यामुळे मोठ्या भावाकडे इनाम गेल्यावर इतर भावांना व्यवसाय शोधणे भाग पडले. त्याचा परिणाम उद्योगधंदा वाढीमध्ये झालेला दिसून येतो.[१२]

**६) संस्थानात कृषी शिक्षणाचा विकास:** संस्थानात कृषी आधुनिकीकरण घडवून आणावयाचे असल्यास शेतकऱ्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. हे ओळखून १८८६ पासून महाराजांनी राजाराम महाविद्यालयात शेती अभ्यासक्रम सुरु केला.[१३] एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या दोन्ही सुपुत्रांना कृषी शिक्षण घेण्यासाठी इंग्लंड आणि अलाहाबाद येथे पाठविले. त्यामुळे राजाराम महाराज हे कृषी पदवी संपादन करणारे पहिले व्यक्ती ठरले.[१४]

**७) शिक्षण संस्था :** किंग एडवर्ड अॅग्रीकल्चर इन्स्टिट्यूट या संस्थेबरोबरच महाराजांनी पुढील शिक्षण संस्था निर्माण केल्या.

१. राजाराम हायस्कूल : राजाराम महाविद्यालयात एक मॉडन शेती फार्म काढून तेथे पिक प्रात्याक्षिके करवून शेतकऱ्यांना शिक्षण देण्याचे प्रयत्न केले.[१५]
२. लॉर्ड आयर्विन शेतकी संग्रहालय : या संग्रहालयाची स्थापना सन १९२९ मध्ये भारताचे व्हाइसरॉय आणि ग.ज. लॉर्ड आयर्विन यांच्या नावाने स्थापन करण्यात आली. शेतकऱ्यांना या संग्रहालयाच्या माध्यमातून आधुनिक कृषी ज्ञानाची माहिती दिली जात असे.[१६]
३. शाहू शेतकी शाळा : शाहू शेतकी शाळा ही जुनी संस्था असून कोल्हापूर संस्थांनने ती सुरु केली होती. शाहू शेतकी संस्थेच्या विद्यार्थ्यांकडून या फार्मवर प्रात्यक्षिके करून घेतली जात.[१७]
४. अमेरिकन शेतकी शाळा : संस्थान काळात अमेरिकेच्या सेवाभावी संस्थेने कोल्हापूरमध्ये शेतकी प्रशिक्षण देणाऱ्या शेतकी शाळा सुरु केल्या आणि प्रत्येक विद्यार्थ्याला १० रुपये विद्यावेतन सरू केले. एका वर्षात एका वर्गामध्ये ७ विद्यार्थी शिक्षण घेत असत.[१८] अशाप्रकारे शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात कृषी विकास घडवून आणला. आणि कृषीचे योग्य ज्ञान व्हावे यासाठी संस्थानात शैक्षणिक संस्थांचे जाळे उभे केले. त्यामुळेच महाराजांच्या कालखंडात कृषी व्यवसायाचा विकास होऊन आर्थिक विकास घडून आल्याचे दिसते.

**निष्कर्ष :** छ. शाहू महाराजांनी आपल्या ज्ञानाचा, पदाचा योग्य उपयोग करत आपल्या कार्यकर्तृत्त्वाने संस्थांचा आर्थिक विकास घडवून आणला. यासाठी प्रथमत: त्यांनी कृषी व्यवसायाकडे लक्ष दिले. कारण कृषी हाच संस्थानचा प्रमुख व्यवसाय होता. आणि बहुतांशी जनतेची उपजीविका ही कृषीवरच अवलंबून होती. त्यामुळे कृषीसाठी आवश्यक असणारे कृत्रिम जलसिंचन शेतकऱ्यांना लागणारी बी-बियाणे, खते पुरवठा इत्यादी उपलब्ध करून दिल्यामुळे संस्थानातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना यश येऊन उत्पन्नात भरघोस वाढ घडून आली. त्याचा परिणाम संस्थानच्या आर्थिक विकास होण्यात झाला. वाढत्या कृषी उत्पादनामुळे उद्योगधंदेही वाढीस लागले. शेतकऱ्यांना कृषीचे योग्य ज्ञान मिळावे. आणि कृषी आधुनिकीकरण व्हावे. यासाठी त्यांनी कृषी शिक्षणसंस्थाही निर्माण केल्या. त्यामुळेच संस्थानचा सर्वांगाने आर्थिक विकास झाला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जी हरितक्रांती झाली त्याचे श्रेय छ. शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणाकडे आणि दूरदृष्टीकडे जाते. आज २१ व्या शतकातदेखील कोल्हापूर जिल्ह्याला छ. शाहू महाराजांच्या आर्थिक विचाराची आणि दूरदृष्टीची गरज आहे. आजच्या काळात शाहू महाराजांचे कृषिविषयक विचार अंमलात आणल्यास निश्चितच कोल्हापूर जिल्हा केवळ पश्चिम महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात आर्थिक दृष्ट्या अग्रेसर होईल.

**संदर्भसूची :**

१. फरास गनी – (संपा.) भारत स्वातंत्र्य आणि विकास, प्रकाशक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापूर, पृ.क्र. १९८.
२. उपरोक्त. पृ. क्र. १९७.
३. www.shaleyshikshan.inwas first indexed by google in oct. -2020.
४. बनचरे गजानन (लेख) छ. शाहू महाराजांच्या कृषी क्षेत्राच्या विकासाची प्रासंगिकता एक चिकित्सक अभ्यास, प्रकाशन हिस्टॉरिकल रिसर्च जर्नल vol-4 July2018 पृ. क्र. १.
५. पाडळकर विजय विष्णू – स्वातंत्र्योत्तर काळातील राधानगरी तालुक्याचा राजकीय आर्थिक व सामाजिक अभ्यास अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ. २८.
६. चौधरी की. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, कोल्हापूर जिल्हा दर्शन विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई, १९८९ पृ. क्र. २१५.
७. पाडळकर विजय विष्णू- उपरोक्त. पृ. क्र. २९.

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

८. कित्ता पृ. ३०.
९. पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशक, डॉ. जयसिंगराव पवार संचालक, महामंडळ इतिहास प्रबोधिनी, १०८, साने गुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर पृ. क्र. २०३.
१०. उपरोक्त. पृ. क्र. ६९४.
११. फरास गनी – (संपा.)उपरोक्त. पृ. क्र. २०५.
१२. चौधरी की. का., उपरोक्त. पृ. क्र. २४२.
१३. फरास गनी – (संपा.) उपरोक्त. पृ. क्र. २०४.
१४. कित्ता पृ. २०५.
१५. फरास गनी – (संपा.) उपरोक्त. पृ. क्र. २०४.
१६. Administrative Report of Kolhapur,1930-31, Page 84.
१७. महाराष्ट्राचे जिल्हे, कोल्हापूर, प्रकाशन महाराष्ट्र शासन, पृ.क्र. २५.
१८. खोत रमेश, कोल्हापूर संस्थानातील कृषी विकास (१९०१-४९) अप्रकाशित प्रबंधिका, पृ. क्र. १०१.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**36**

# 21 व्या शतकातील छ. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची प्रस्तुतता

**प्रा. डॉ. राक्षसे सिद्धार्थ गुणाजी**
राज्यशास्त्र विभाग,
गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर.

**प्रा. डॉ. बसवेश्वर भिमराव पांडागळे**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंदे, विक्रमगड.

---

**प्रास्ताविक -**आजपर्यंत जगात जे विविध राजे झाले त्यात अगदी अलेक्झांडर पासून ते सिझरपर्यंत आणि सम्राट अशोकापासून ते छ. शिवाजी महाराजापर्यंत हे सर्वच राजे कार्यसम्राट आणि धुरंधर होते. आजपर्यंत लाखो राजे जन्माला आले आणि मृत्यू पावले पण त्यातही काही राज्याच्या कार्यकर्तृत्वाने छाप पडली ती म्हणजे छ. शिवाजी महाराजांचा समृद्ध वारसा सांगणारे कोल्हापूर (करवीर) छ. शाहू महाराज. शाहू महाराज राजा असले तरी त्यांच्या राजेशाही व्यवस्थेचे स्वरूप वेगळ्या स्वरूपाचे होते. ते आधुनिक राजे होते. त्यांचे विचार कालसुसंगत चालणारे होते. तसेच काळाचा वेध घेऊन आपल्या सत्तेचा वापर जनहितासाठी करणारे होते. म्हणून शाहू महाराज इतिहासतल्या इतर धुरीण राजापेक्षा वेगळे ठरतात. नाहीतर जगाच्या इतिहासात आपण पाहिलेच आहे. जगाने तो रोममधला सम्राट कालीगुला, सम्राट नीरो हे जगाला भयभीत करणारे वेडे पीर सम्राट जगाने अनुभवले आहेत. सदरील संशोधन लेखात मी 21 व्या शतकातील छ. शाहू महाराजांच्या विचारांची प्रस्तुतता याबद्दल मत मांडणार आहे.

**संसूचक शब्द -** छत्रपती शाहू महाराज, आदर्श राज्य, लोकराजा, लोकशाही, राजेशाही, कल्याणकारी राज्य इत्यादी.

**संशोधन लेखाचा उद्देश**

1) छत्रपती शाहू महाराजांचे विचार समजून घेणे आणि चर्चा करणे.
2) छत्रपती शाहूंच्या विचारातून समाजात झालेले बदल यावर भाष्य करणे.
3) छत्रपती शाहूंच्या कार्याचा आढावा घेणे.
4) छत्रपती शाहूंच्या विचार कार्याची प्रस्तुतता यावर भाष्य करणे.
5) छत्रपती शाहूंच्या समाज बद्दलाच्या अंतिम ध्येयाबाबत मत मांडणे.

**गृहितके**

1) छत्रपती शाहूंचे विचार समाज परिवर्तन करणारे आहेत.
2) छत्रपती शाहूंचे विचार शाश्वत आणि चिरकालीन आहेत.
3) छत्रपती शाहूंचे विचार समाजाच्या प्रगतीला पोषक आहेत.
4) छत्रपती शाहूंचे विचार आदर्श राज्याची साकाररुप आहे.

**छत्रपती शाहूंचे विचार - प्लेटोच्या आदर्श राज्याचा साकार -** जगाच्या इतिहासात डोकावून पाहिल्यावर आपल्या लक्षात येते की, सर्वच राजांनी तलवारीच्या बळावर जनतेवर सत्ता गाजवली. आपल्या राज्याच्या सैन्याची आणि तलवारीची जेवढी धार तेज तेवढीच सत्ता जोरात हाकली. तो सर्व प्रभाव होता तो हुकूमशाही या आक्रमक तंत्राचा यात अनेकांचा बळीही गेला. यातला दृष्य स्वरूपातला बळी जाणारा पहिला सेलिब्रीटी तत्त्वज्ञ 'सॉक्रेटिस' होता. सॉक्रेटिस अथेन्सचा होता. याने मानवी ज्ञानाला पसरविण्यासाठी आपले जीवन खर्ची केले. पण त्याला आपले जीवनच मुकावे लागले. याला कारण होती ती तिथली व्यवस्था. सॉक्रेटीसनंतर त्याचाच शागीर्द असलेला प्लेटो होता. त्याने या सर्व परिस्थितीचा विचार केला आणि जग बदलाचे कार्य हाती घेतले. हे कार्य त्याने आपल्या गुरुला म्हणजेच सॉक्रेटिसला वाहिलेली श्रद्धांजली होती. त्याने एक विचार मांडला. तो विचार म्हणजे आदर्श राज्याचा विचार होता. आदर्श राज्यातील शासन संस्था एकच गोष्ट सदैव पाहिल, जनतेचे हित मंगल कसे होईल. प्रजेला सुख कसे लाभेल याच एका गोष्टीकडे शास्ते रात्रंदिवस पाहतील. सुख, स्वास्थ्य, शांती, निरामयता इत्यादी गोष्टी प्रजेस देणे हे शासकाचे काम राहील. प्लेटोचे ध्येय काय? सौंदर्याचे जीवन, न्यायाचे जीवन, प्रेममय जीवन, सत्य, शिव सुंदर जीवन हे प्लेटोचे ध्येय होते. पण प्लेटोचे स्वप्न त्याच मातीत भंगल होते. प्लेटोच्या हयातीत आणि नंतर सुद्धा रोम आणि रोमच्या दूरवर आदर्श राज्य आणि राज्य काही जन्माला येऊ शकला नाही. सगळाच अनागोंदी कारभार रोमच्या पहिल्या काही सम्राटांचे खून झाले. म्हणून रोमच्या गादीवर बसणारे सम्राट गुलामापेक्षाही दुःखी असत. पण हे प्लेटोचे तंतोतंत वैशिष्ट्ये असलेले आदर्श राज्य हे दूर भारतात छ. शाहू महाराजांच्या रूपात कोल्हापूरला साकाराला आले. हे राज्य खऱ्या अर्थाने प्लेटोचे आदर्श राज्य होते.

**छत्रपती शाहू महाराजांचा जीवन परिचय -**शाहू महाराजांचा जन्म 26 जून इ. स. 1874 रोजी कागल येथे घाटगे घराण्यात झाला.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

त्यांचे मुळ नाव यशवंत, त्यांच्या वडीलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी 17 मार्च 1884 रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व 'शाहू' हे नाव ठेवले. शाहूंचे प्राथमिक शिक्षण धारवाड येथे झाले. 1 एप्रिल 1891 रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. 2 एप्रिल 1894 रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स.1922 पर्यंत म्हणजे 28 वर्षे ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. मुंबई येथे 6 मे 1922 रोजी त्यांचे निधन झाले.

**लोकशाही मूल्यांचा पुरस्कर्ता - शाहू महाराज एक लोकराजा -**शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे राजा होते. पण लोकशाही मूल्य माणणारे होते. ते एक प्रकारे पुरोगामी शासक होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मूल्यांवर त्यांची आसिम श्रद्धा होती. लोकशाही व्यवस्थेला अनुसरून असणारे कोल्हापूर संस्थानाचे पहिले कायदे पुस्तक त्यांच्या कारकिर्दीत छापले गेले. गोवधबंदीचा कायदा, पुनर्विवाहाचा कायदा, वतनेबंदीचा कायदा, गुन्हेगार जमाती हजेरी कायदा बंद करणे इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण व आधुनिक लोकशाहीकडे नेणारे कायदे त्यांच्या काळात संमत करण्यात आले.

**आरक्षण व्यवस्था -** आज या आरक्षण मुद्द्याने भारतभरात खूप मोठे रान उठले आहे. जगात आरक्षणाचा मुद्दा अगदीच नवा आहे असे नाही. जगातल्या अतिप्रगत देशात सुद्धा आरक्षण व्यवस्था आहेच. अमेरिकेतसुद्धा अल्पसंख्यांक लोकांना उद्योगधंद्यामध्ये काही सोयी सवलती पुरविल्या जातात. सध्या भारतातल्या अनेक उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या अनेक समाजाने अमेरिकन सरकारने दिलेल्या सोयी-सवलतींचा फायदा घेऊन अमेरिकेत उद्योगधंदे उभारले आहेत. भारतात 500 संस्थानापैकी 3 संस्थांनानी जे पिडीत आहेत. त्या लोकांना न्याय पद्धतीने वागवण्यासाठी आरक्षण व्यवस्था केली. त्या तीन संस्थानात म्हैसूर, बडोदा आणि कोल्हापूर ही संस्थाने होती. या तीन संस्थानापैकी विशेष बाब म्हणजे बडोदा आणि कोल्हापूर मराठी राज्य होती. संयोगाने दोन्हीही मराठा शासकांच्या हाती होती. (आज हाच समुह 21 व्या शतकात स्वतःसाठी आरक्षणाची मागणी करत आहे.) आधुनिक भारतात आरक्षणाचे धोरण सर्वात आधी 26 जुलै 1902 रोजी कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी लागू केले. त्याच्या 1860 मध्ये ज्योतीराव फुल्यांनी मागणी केली होती. एक पुरोगामी शासक असलेल्या शाहू महाराजांनी मागास जातीसाठी 50 टक्के आरक्षण जाहीर केले. आजच्या आरक्षण व्यवस्थेतल्या समस्या सोडविण्यासाठी नक्कीच शाहू महाराजांनी जे आरक्षणाच्या बाबतीतले धोरण राबवले. त्याचे मार्गदर्शन मिळते.

**शाहूंचे सुधारणावादी विचार --**समाज परिवर्तनासाठी शिक्षण हे महत्त्वाचे हत्यार आहे. हे शाहू जाणून होते. त्यांनी आपल्या संस्थानात अनेक गावात शाळा स्थापन केल्या. तसेच सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. उच्च शिक्षणासाठीचे राजाराम महाविद्यालय आर्थिक मदत करून कार्यरत ठेवले. अनेक शिक्षणसंस्थांना मदत केली. सामाजिक व धार्मिक क्रांतीसाठी सत्यशोधक समाजाबरोबर आर्यसमाज, प्रार्थना समाज, ब्राम्हो समाज, पुनरूज्जीवनाच्या चळवळींना त्यांनी सढळ हाताने मदत केली. औद्योगिक विकासाठी मोठ्या प्रमाणात मदत केली. आर्थिक विकासासाठी मोठी धरणे बांधली, कृषि तज्ञांना बोलावून शेतीसुधारणा केली. दळणवळणासाठी मिरज-कोल्हापूर रेल्वे चालवली.

**शाहू महाराजांच्या विचारांची महत्त्व आणि प्रस्तुतता --** आजही शंभर वर्षानंतरही शाहू महाराजांच्या विचाराची प्रस्तुतता आहे. कुठलाही देश त्या देशाचा विकास हा तेथील नेतृत्व तयार केलेल्या मुळ विचारांच्या बांधणीवर बऱ्याच अंशी अवलंबून असते. शाहू महाराज हे एक राज्यकर्ता होते. त्यांनी आखलेल्या धोरणावरच भारताच्या विकासाची पायाभरणी झाली. कुठल्याही देशाला प्रगतीसाठी ध्येयधोरणे आखून त्याची राबवणूक करणारा एक खमक्या नेता लागतो. तेच स्थान भारतात शाहूंचे होते. बऱ्याच अंशी शाहूंचे विचार भारतीय राज्यघटनेत प्रतिबिंबीत झाल्याचे आपणास दिसून येतात. पर्यायाने राज्यघटनेनुसार भारताचा सर्व कारभार हाकला जातो. हिच शाहूंच्या विचारांची खरी प्रस्तुतता आहे.

**समारोप -** शाहू महाराज पारंपारिक राजेशाही व्यवस्थेतून आलेले असले तरी त्यांनी प्रत्यक्षात लोकशाही मूल्यांना जोपासणारी राजेशाही सत्ता थाटात चालविली. ज्यातून ते लोकप्रिय राजा झाले. भारतातील तत्कालीन 500 संस्थानापैकी काही मोजक्या चार ते पाच संस्थानाच्या राजांनाच त्यांच्या लोकप्रिय कार्यकर्तृत्वाने जनतेच्या हृदयात आदराचे स्थान मिळाले. त्यात कोल्हापूरच्या शाहू महाराजांचा वरचा क्रमांक आहे. त्यांनी केलेला विचार आणि कार्य येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी महत्त्वपूर्ण आणि मार्गदर्शक आहे. शाहू महाराजांचे अंतिम ध्येय समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, हेच होते.

**संदर्भ सूची**

1) नांदेडकर व. गो., 'राजकीय विचार आणि विचारवंत', डायमंड, पुणे, जानेवारी 2011.
2) कुबेर गिरीश, 'रेनेसॉन्स स्टेट', मंजुल पब्लिकेशन हाऊस, पुणे-2024
3)चव्हाण रा. ना. (संपादक रमेश चव्हाण) 'राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य'.

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

37

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज व लोक कल्याणकारी राज्य- एक चिंतन

**प्रा. बैनवाड स्वाती प्रकाशराव**
राज्यशास्त्र विभाग
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद

---

**प्रस्तावना:-म**हाराष्ट्राला प्रगत अशा समाजसुधारकांची परंपरा लाभलेली आहेत भारतीय समाज व्यवस्थेतील अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात जगातील अनेक देशात जाऊन समाज व्यवस्थेत अनेक प्रकारच्या समस्या राहिलेल्या कोणत्या राष्ट्रात वर्णभेद होता कुठे स्त्री पुरुष समानता होती पण भारतीय समाज असे मात्र सर्वच प्रकारचे भेद होते या भेदामध्ये वर्णभेद तर होताच त्याच बरोबर स्त्री-पुरुष असमानता जातीभेद व जन्मदिष्ट श्रेष्ठत्वाच्या संकल्पना होत्या जन्मामुळे माणसाला श्रेष्ठ व कनिष्ठ दुय्यमत्व प्राप्त होत होते शहरी भागात राहणारे ग्रामीण भागात राहणारे जन्माने स्वतःला उच्च भरणे समजणारी माणसे इतरांना अस्पृश्य मानत होती येथे माणसाला माणूस समजले जात नव्हती जसे जॉर्ज अरविंद ॲनिमल फॉर्ममध्ये म्हटले आहे की सर्व माणसे समान आहेत पण काही माणसे अधिक समान आहेत हा विचार भारतीय समाज व्यवस्थेला देखील तंतोतंत लागू होतो.

महाराष्ट्र देखील त्याला अपवाद नव्हता येथे शतकानू शतके साधलेपणा मागासलेला पण होता तो कृतीत जसा होता तसाच तो विचारात देखील होता एकीकडे युरोपात जाऊन लॉक सारखा विचारवंत म्हणतो माणसाला समाज राज्य निर्मितीपूर्वीच काही नैसर्गिक हक्क आहेत त्यात समान युक्त जीवन वित्त व स्वातंत्र्याचा अधिकारांतर्भूत होता. सन्मानाने जीवन जगणे हा अधिकार सांगताना कोणत्याही व्यक्तीला नैसर्गिक वृत्तीपर्यंत आधर युक्त जीवन जगता येते हे त्याने सांगितले पण भारतासारख्या राष्ट्रात आज आधुनिक जगात जीवन जगताना नैसर्गिक काही संकल्पना सर्व जनतेस माहीत असेलच असे सांगता येत नाही तर त्या कालखंडात जेव्हा माणसांना जन्माने सन्मान मिळत होता माणसाला माणूस म्हणून जगण्या गादीचा नव्हता तेव्हाही कळते जवळपास अशक्यप्राय गोष्ट होती. पण याही कालखंडात महाराष्ट्रात अनेक समाज सुधारक घडून आले ज्यांनी या परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न केले. यातील अग्रणी नाव होते छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे त्या कालखंडात राजेशाही अस्तित्वात होती व राज्या स्वरुप केवळ पोलीस स्वरूपाचे होते पॉलिसी म्हणजे राजाने केवळ जनतेच्या जीविताचे वित्ताचे रक्षण करावे एवढेच अभिप्रेत होते पण आज आधुनिक काळात जी लोककल्याणकारी राज्याची संकल्पना उद्या झाली लोकशाही बरोबरच आधुनिक कालखंडात लोक कल्याण राज्याची संकल्पना देखील उद्या झाली मात्र छत्रपती राजर्षी शाहू महाराज काळाच्या पुढे होते त्यांनी आपल्या संस्थानात आजची आधुनिक कल्याणकारी राज्याची संकल्पना पुढे आणलेली दिसून येते. महाराष्ट्रातील करवीर संस्थान असे संस्थान होते की जे राजाच्या लहरीपणावर न चालता ते राजाच्या कायद्यावर चालत होते छत्रपती राजेश शाहू ही या संस्थानाचे पुरोगामी विचाराचे थोर पुरुष होते त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण जातीभेद निवारण स्पृश्यता निवारण यासारख्या प्राकृतिक समाजामधील कार्य केलेले दिसून येतात राजा कसा असावा हे त्यांच्या कार्यातून दिसते प्रस्तुत शोध निबंध छत्रपती राजर्षी शाहू महाराज व लोककल्याणकारी राज्याची संकल्पना यांचा आढावा घेतला जाणार आहे. लोकल जानकारी राज्यात जनतेचे आरोग्य शिक्षण समांतर इत्यादी सर्व बाबींचा विचार केला जातो तोच विचार राजश्री शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केला होता.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

अ) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आढावा घेणे.

ब) लोककल्याणकारी राज्याची संकल्पना चा आशय समजून घेणे.

क) समाज सुधारक या नात्याने छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या सुधारणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** सदर शोध निबंध तयार करण्याकरिता दुय्यम साधनसामुग्रीचा वापर करण्यात आला आहे ज्यात वृत्तपत्रे संदर्भ ग्रंथ आंतरजालचा वापर करण्यात आला आहे.

**राजर्षी शाहू महाराज व कल्याणकारी राज्य:-** छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी लोक कल्याणकर राज्याची भूमिका समजून घेणारी त्यांच्या थोडक्यात जीवन परिचय करून घेणे महत्त्वाचे ठरते. शाहू महाराजांचा जन्म कागलच्या जहागीरदार घाडगे घरा ण्यात झाला त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव आईचे नाव राधाबाई होते चौथ्या शिवाजीच्या निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक विधान आणि गेले त्यांनी इंग्रजी संस्कृती इतिहास राज्यशास्त्र इत्यादींचे शिक्षण घेतले होते म्हणूनच त्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्ट ठिकाणी दत्त होता त्यांच्या लोककल्याणकारी राज्याचे साधर्म साधणारा सुधारणा पुढील प्रमाणे

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**१) शैक्षणिक कार्य:-** बहुजन समाजात जर बदल घडवून आणायचा असेल तर त्यांच्या शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे हे त्यांनी ओळखले व त्यातून त्यांनी आपला आपल्या संस्थानात शिक्षण विशेषणा प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा इसवी सन 1917ला कायदाच केला त्यानुसार प्रत्येक गावात प्राथमिक शिक्षणासाठी शाळा सुरू झाल्या जे पालक आपल्या पाल्याला शाळेत पाठवणार नाहीत त्यांना एक रुपया दंड ठेवला होता त्यामुळेच राजेश शाहू महाराज काळाच्या पुढे होते त्यांनी आर्य समाजाला देखील आश्रय दिला होता व पुढारी समाजाच्या गुरुकुलाची स्थापना देखील त्यांच्या संस्थानात झाली व राजाराम महाविद्यालय देखील अजून समाजाला चालवण्यासाठी त्यांनी दिले.

**२) कृषी विषयक कार्य:-** श्रावणी केवळ समाज सुधारणेकडेच लक्ष दिले नाही तर त्यांनी कृषी देखील मोठा भर दिला शेती व उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शनी भरवली पन्हाळ्यावर चहा कॉफी रबर यांच्या लागवडीचे प्रयोग केले शहापूर व जयसिंगपूर येथे बाजारपेठेचे निर्मिती करण्यात आली आणि सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्यांनी राधानगरी धरणाची निर्मिती केली सर्व संस्थान यामुळे सुजलाम सुफलाम बनले त्याचबरोबर त्यांनी कारखान्याचे निर्मिती केली त्यांनी शाहू मिल ची स्थापना केली आपल्या संस्थांना त्यांनी 1913 ला सहकारी संस्थानांचा कायदा केला व सहकार व सुधारणा यावर भर दिला. कृषी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूटच्या स्थापनेत त्यांचा सिंहाचा वाटा होता

**३) समानतेच्या संदर्भातील कार्य:-** समानता म्हणजे मग ती सर्वच बाबतीत आणण्यासाठी प्रयत्न केला नव्हे तसे कायदे त्यांनी आपल्या संस्थानात घडून आणले 26 जुलै 1902 मध्ये त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला जात कोल्हापूर संस्थानातील 50% शासकीय नोकऱ्या मागासवर्गीय राखीव ठेवण्यात येतील असा आदेश दिला त्याचबरोबर 1918 19 मध्ये अस्पृश्यता पाळण्यासंदर्भात प्रतिबंधक वटहुकूम जारी केला जात शाळा पानवटे विहिरी कचेरा दवाखाने इत्यादी ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यावर प्रतिबंध घालण्यात आला. महार वतन खालचा केले व वेठबिगारीतून मुक्तता केली अनेक जाती जमातीतील लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातिव्यवस्था नष्ट व्हावी म्हणून आंतरजातीय विवाहचा प्रोत्साहन दिले व आंतरराष्ट्रीय कायदा मान्यता दिली तसेच बालविवाह रोखण्यासाठी नोंदणी विवाह प्रोत्साहन दिले घटस्फोट व विधवा पुनर्वास कायदेशीर मान्यता दिली मागासवर्गीय मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षण दिले.

**४) प्रशासकीय कार्य:-** त्यांनी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या तरुण नाना तलाठी पदे दिली बहुजन समाजातील व्यक्तींना राजकीय कार्याचा भाग वि नोंदविता यावा म्हणून इसवी सन 1916 मध्ये निपाणी येथे डेक्कन रयत असोसिएशन ही संस्था स्थापन केली त्याचबरोबर देवदासी प्रथा कायदेशीर दृष्ट्या बंद केली छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात आणि कलाकारांना राजश्री दिला संगीत नाटक चित्रपट चित्रकला लोककला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कुस्ती या क्षेत्रात कलावंतांना त्यांनी प्रोत्साहन देण्याचे काम केले.

निष्कर्ष:-

1) छत्रपती राजर्षी शाहू महाराज रयतेचे राजे होते.
2) छत्रपती राजश्री शाहू महाराज कृषी बाबत आजच्या राज्यकर्त्यांपेक्षा अधिक जागृत होते.
3) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले.
4) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी महिलांविषयी मोठे भरीत योगदान दिलेले आहे.
5) महाराजांनी शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारक निर्णय घेतले.

सारांश:- छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व घेतल्यानंतर लक्षात येते की आधुनिक राजकीय विचारांमध्ये असलेली लोककल्याणकारी राज्याची संकल्पना त्याने त्यांच्या संस्थानांमध्ये छान पद्धतीने राबवली होती त्यांच्या अस्पृश्यता निवारणाचे स्त्री शिक्षण स्त्री विषयक प्रश्न या संदर्भात केलेले कायदे जातीव्यवस्थेचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न या सगळ्यांचा विचार केल्यास त्यांचे विचार व कृती आधुनिक कल्याणकारी राज्याशी मिळते जुळती असल्याचे दिसते समाजामध्ये न्यायपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्या या प्रयत्नांना मोठे यश प्राप्त झालेली दिसते अनेक संस्थानात राजे लोकांचे शोषण करत होते त्याच कालखंडातील छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत म्हणूनच त्यांचा जन्मदिन 26 जून महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय देऊन साजरा करण्याचे ठरवले आहे व तो सामाजिक न्याय देऊन साजरा केला जातो.

संदर्भ ग्रंथ सूची:-

१) डॉ.कोंडकर आर.एस." रयतेचा राजा: राजर्षी शाहू महाराज" , अरुणा प्रकाशन, लातूर
२) डॉ. नाईक निंबाळकर सुवर्णा "समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज", संस्कृती प्रकाशन, पुणे.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**38**

# राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कार्य

**प्रा.डॉ. जयकुमार चंदनशिवे**
मराठी विभाग प्रमुख
कन्या महाविद्यालय, मिरज

---

**प्रस्तावना** - महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक समाजसुधारकांचा मोठा वाटा आहे. त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. महाराजांनी सामाजिक परिवर्तनात सुधारणा करताना अस्पृश्यता, गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, शिक्षण प्रसार, स्त्रियांचे संरक्षण, औद्योगिक क्रांती नंतर कामगार चळवळीच्या अनुषंगाने विवेचन कलाक्षेत्र असे विविध समाजहित लक्षात घेऊन कार्य केले. म्हणूनच ते मानव मुक्तीचे कार्य करणारे राजे होते. महाराजांची सामाजिक दृष्टी व्यापक होती. या दृष्टिकोनातूनच त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक समाज हिताचे कायदे केले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासन, शिक्षण, कृषी, उद्योग सहकार, क्रीडा, कला असे नवनवीन उपक्रम राबविले. प्रजेचे कल्याण हेच आपल्या कार्याचे अंतिम उद्दिष्ट मानले. प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून राजर्षीशाहू महाराजांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक धोरणाचा परामर्श या शोधनिबंधात घेतलेला आहे.

**उद्दिष्टे**

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.
२. सामाजिक सुधारणा विषयक दृष्टिकोन विशद करणे.
३. राजर्षी शाहू महाराजांचा कृषी, उद्योग, या विषयक विचार समजून घेणे.
४. राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन विशद करणे.

**सामाजिक सुधारणा:-** महाराष्ट्रात जी समाज सुधारणा चळवळ दिसते ती महात्मा फुले, न्या. रानडे, आगरकर या थोर समाज सुधारकांमुळे पण १८९० ते १९०९ या काळानंतर मात्र समाजसुधारणा चळवळ मंदावली होती. कर्मठ प्रतिगाम्यानची चळवळ जोर धरू लागली होती. अशा परिस्थितीत मंदावलेल्या सामाजिक चळवळीस खंबीर नेतृत्व महाराष्ट्राला कोणी दिले असेल तर ते म्हणजे राजर्षी शाहू महाराजांनी. कोल्हापुरात' वेदोक्ताचा' प्रसंग घडला. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांना अंतर्मुख बनवले. एका सामान्य पुरविताने केलेला अवमान हा छत्रपतींनी वैयक्तिक न मानता तो सर्व बहुजन समाजाचा मानला. यातूनच छत्रपतींनी बहुजन समाजाच्या उद्धाराचे पहिले पाऊल उचलले ते कट्टर समाज सुधारक म्हणून पुढे आले. महाराष्ट्रातील समस्त बहुजन, दलित, पीडित समाज त्यांच्याकडे मुक्तिदाता म्हणून पाहू लागले.

राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुलेंचा समतेचा वारसा पुढे चालविला महाराजांनी आपल्या राज्यात स्त्रियांसाठी कायदे केले.कायदे करताना महाराजांनी समाजातील स्त्रियांना पुरुषी वर्चस्वापासून मुक्त करण्यासाठी पाच कायदे केले. त्यामध्ये पुनर्विवाह नोंदणी कायदा, आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह कायदा, स्त्री अत्याचारांना प्रतिबंध करणारा कायदा, काडी मोड अथवा घटस्फोट कायदा, जोगतीण प्रतिबंध कायदा असे स्त्रियांसाठी कायदे केले. महाराजांच्या या पाच कायद्याकडे नजर टाकल्यास असे लक्षात येते की, अन्यायी रूढी परंपरा व अत्याचार आणि जुलुम या सर्वांपासून स्त्रियांचे संरक्षण व्हावे. त्यांना समाजात माणूस म्हणून जगता यावे. या उदात्त मानवतावादी दृष्टिकोनातून असे कायदे करून सामाजिक इतिहासात एक मोठा क्रांतिकारी निर्णय घेतला होता.

महाराजांना राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर अवघ्या तीन वर्षात उद्भवलेल्या दुष्काळ व प्लेग या दोन भयंकर संकटांना तोंड द्यावे लागले होते. या संकटाचा त्यांनी अविस्रांतपणे मुकाबला केला. प्लेगासारख्या साथीचा रोग देव देवतांच्या मुळे होतात.हे लोकांच्या मनात असलेली ब्राह्मक कल्पना त्यांनी मोडीत काढून प्लेगच्या साथीची शास्त्रशुद्ध माहिती देणारी हजारो पत्रके काढून ती राज्यभर वाटली.खबरदारी म्हणून त्यांनी अनेक उपाययोजना आखल्या. गावातील लोकांना गावाबाहेर काढून त्यांना झोपड्या बांधून दिल्या. कोल्हापुरात हजारो लोकांच्या वसाहतींची व्यवस्था केली. त्यांना दैनंदिन वस्तूंसाठी पाठपुरावा केला. यासाठी दरबारातील सर्व वरिष्ठ अधिकारी रात्रंदिवस राबत होते.याशिवाय या रोगाने बळी पडलेल्या रुग्णावर तातडीने उपचार व्हावेत म्हणून ठीक ठिकाणी क्वारंटाईन कॅम्पस स्थापन केले होते. अशा पद्धतीने त्यांनी प्लेगच्या संकटावर मात करण्यासाठी उपाय योजना केल्या होत्या.

**कृषी आणि औद्योगिक विकास:-** राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार हे समाज सुधारणेला चालना देणारे होते. आपला देश कृषी प्रधान देश आहे. त्यामुळे शेतीच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो.याची जाणीव महाराजांना असल्यामुळे

त्यांनी आपल्या राज्यात शेतीच्या विकासाकडे लक्ष दिले. शेतकऱ्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेतीच्या दुरावस्थेमुळेच शेतकऱ्यांना दारिद्र्यात झगडावे लागत आहे. हे महाराजांनी जाणून घेतले व शेतकऱ्यांच्या शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी महाराजांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून १९१२ मध्ये कोल्हापूर या ठिकाणी' किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूट' ची स्थापना केली.या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना बी -बियाणे, खते, अवजारे, पशुपालन याची माहिती दिली. शेतकऱ्यांसाठी आधुनिक अवजारांचे प्रदर्शन भरून शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक देण्याचे कार्य महाराजांनी केले. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले त्यामध्ये शेतीला कर्ज पुरवठा करण्यासाठी विविध योजना हाती घेतल्या.कमी व्याजदराने कर्जपुरवठा करण्याची सोय उपलब्ध करून दिली. शेती विभाजनास विरोध केला. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी जलनीतीचा अवलंब केला. शेती सिंचनाखाली आल्याशिवाय खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही, म्हणून त्यांनी नवीन विहिरी, तलाव, बंधारे आणि कालवे बांधण्यास सुरुवात केली.१९०९मध्ये १४ लाख रुपये खर्च करून राधानगरी धरण पूर्ण केले. भू गर्भातील पाण्याचा उपसा न करता नदी तलाव या ठिकाणचे पाणी शेतीसाठी वापरण्यावर भर दिला. पावसाच्या पाण्याचे नियोजन करून त्याची साठवणूक केल्यास दुष्काळा सारख्या संकटाला तोंड देता येते, म्हणून सार्वजनिक तळी बांधण्याची मोहीम हाती घेतली. औद्योगिक विकासाशिवाय कोणत्याही देशाची प्रगती शक्य नाही याची जाणीव राजर्षीशाहू महाराजांना होती. त्यासाठी औद्योगिक विकास हे महाराजांचे उद्दिष्ट होते. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात महाराजांनी अनेक उद्योगांची निर्मिती करून आर्थिक विकासाला चालना दिली. आपल्या राज्यात औद्योगिक क्षेत्राचा विकास केला. औषधी तेल उद्योग, सुती कापड उद्योग, मधुमक्षिका पालन, तसेच कौशल्यावर आधारित उद्योग प्रशिक्षणाची व्यवस्था केली. १९०६मध्ये 'दि शाहू छत्रपती स्पेनिंग अँड विव्हींग मिल्स' या गिरणीची स्थापना केली.त्यामुळे कोल्हापूर बरोबरच शिरोळ, इचलकरंजी या ठिकाणी अनेक जिनिंग फॅक्टरी स्थापन झाल्या.आपल्या राज्यात बाहेरील अनेक उद्योजकांना व्यापाऱ्यांना व्यापार करण्यासाठी व्यवसाय करण्यासाठी मदत केली.

**शैक्षणिक कार्य:-** आधुनिक महाराष्ट्राचे इतिहासकार राजर्षी शाहू महाराज यांना महात्मा फुलेंचा वारसदार मानतात. कारण समाजातील वर्णभेद जातीभेद, अस्पृश्यता यावर प्रहार करून समाजाच्या सामाजिक प्रगतीसाठी महात्मा फुलेंनी शिक्षणाचा प्रसार केला, आणि ही शिक्षणाची परंपरा महाराजांनी पुढे जोमाने चालवली. पुढे ही समाज क्रांतीची मशाल महाराजांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या हाती दिली.फुले -रानडे -आगरकर यांच्याप्रमाणेच महाराजांनी आपल्या राज्यात शिक्षणास अग्रक्रम दिला.प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नाही जेवणाची व इतर अडचण आहे. अशा समाजातील सर्व जाती-धर्माच्या गरीब, गरजू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह स्थापन केली. त्यांच्या राहण्या जेवणाची व्यवस्था वसतिगृहाच्या रुपाने केली. महाराजांनी विविध जातींच्या मुलाने शिकावे या उदात्त हेतूने हीस्थापना केली होती. यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो विद्यार्थी शिकण्यासाठी कोल्हापूरला आले. महाराजांचे हेच कार्यपुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी हाती घेतले.आपल्या राज्यातील लोकांचे जीवनमान सुखकर व कल्याणकारी व्हावे म्हणून अनेक योजना हाती घेतल्या.

**सारांश:** प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास केला असता राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याच्या कक्षा मोठ्या प्रमाणात विस्तारलेल्या असल्याचे दिसून आले. त्यांचे सामाजिक आर्थिक व शैक्षणिक धोरण आज ही समाजाला लागू पडते. आधुनिक महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या चळवळीत महाराजांचे कार्य अनन्यसाधारण असे आहे. त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून लोकजागृतीचे बीजारोपण केले.

संदर्भ:

१.कीर धनंजय:- राजर्षी शाहू : पॉप्युलर प्रकाशन मुंबई 2016.
२.भोळे भास्कर: आधुनिक भारतीय राजकीय विचार: पिंपळापुरे प्रकाशन नागपूर
३ पवार जयसिंगराव:-राजर्षी शाहू छत्रपती एक : मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे 2004
४.संगवे विलास:- राजर्षी छत्रपती शाहू महाराज कार्य व : एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस कोल्हापूर 2007

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

39

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कला, संस्कृती आणि क्रीडा क्षेत्रांतील योगदान

**प्रा. संदीप अशोक पाटील**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कोवाड, ता. चंदगड जि. कोल्हापूर

---

**प्रस्तावना:** राजर्षी शाहू महाराजांनी कला, क्रीडा, संगीत, गायन, कुस्ती, शिकार या पारंपारिक भारतीय लोककलांचे कोल्हापूर संस्थानात जतन व संवर्धन करण्यासाठी तन, मन, धन अर्पण केले. भारतीय पारतंत्र्याच्या काळात शाहू राजांनी लोककलांचे केलेले पुनर्जीवन करण्याचे काम क्रांतिकारक स्वरूपाचे होते. कोल्हापूरची कलानगरी बनविणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण करण्यात शाहू महाराजांचा सिंहाचा वाटा आहे. शिल्प, चित्र, गायन, वादन, नाट्य आणि मल्लविद्यचे ते चाहते होते. कोल्हापूर हे कलावंताचे माहेरघर व्हावे अशी शाहू महाराजांची इच्छा होती. गणपतराव जोशी, केशवराव भोसले, बाबुराव पेंटर, अल्लादियाखाँ, हैदर बक्ष, केसरबाई केरकर, आबालाल रेहमान, आंनंदराव पेंटर, गोविंदराव टेंबे, शाहीर लहरी हैदर आणि बळवंतराव रुकडीकर अशा असंख्य गुणी कलावंताना शाहू महाराजांनी लौकिकाप्रत नेले. आजच्या २१ साव्या शतकातील डीजीटल च्या दुनियेत भारतीय संस्कृतीतील लोककलांची जोपासना करणे व ती भावी पिढ्यापर्यंत पोहचविणे काळाची गरज बनली आहे. सदृढ शरीर व सृजनशील सामाजिक जाण असणारा आदर्श समाजाची निर्मिती व्हावी असे राजर्षी चे मत होते. या उद्देशाने प्रस्तुत अभ्यास विषय निवडला आहे.

संशोधनाची पद्धत: प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरिता ऐतिहासिक, ग्रंथालयीन व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे . या संशोधन कार्यासाठी प्राथमिक व द्वितीय संदर्भ साधनांचा तसेच स्मारक ग्रंथ यांचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे .

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात नाट्य कलेचा केलेला विकास स्पष्ट करणे.
२. छत्रपती शाहू महाराजांनी चित्रकार आणि चित्रकलेला दिलेले प्रोत्साहन स्पष्ट करणे.
३. छत्रपती शाहू महाराजांनी मल्लविद्येला दिलेला राजाश्रय, प्रोत्साहन स्पष्ट करणे.
४. शिकार, साठमारी या साहसी खेळांची केलेली जोपासना स्पष्ट करणे.

**चित्रकला आणि राजर्षी शाहू महाराज:**

**१. आबालाल रेहमान**: आबालाल रेहमान यांना परमेश्वराकडून चित्रकलेची देणगी मिळाली होती. एकदा मुंबईत चित्रकलेचे प्रदर्शन भरलेले होते. आबालालचा येणारा पहिला नंबर वशिलेबाजी ने दुसऱ्याच व्यक्तीस दिला गेला. तेव्हा शाहू महाराजानी निराश झालेल्या आबालाल यांना राजाश्रय दिला. त्यांना 'स्टेट आर्टिस्ट' म्हणून नेमले. त्यांनी रेखाटलेली महाराणी अहिल्याबाई होळकर, राजर्षी शाहू महाराज यांची तैल चित्रे रसिक मनाला सुखावून जातात. एकदा शाहू महाराज बहिरी ससाण्या मार्फत एका पक्षाची शिकार केली. बहिरी ससाण्याचा तो पराक्रम, त्याने घेतलेली झेप याचे चित्र काढण्याची विनंती आबालाल रेहमान यांना महाराजांनी केली . तेव्हा आबालाल रेहमानी प्रत्यक्ष शिकार झालेल्या ठिकाणीचे मूर्तिमंत चित्र रेखाटले. ज्यावेळी राजर्षी शाहू महाराज निर्वितले तेव्हा आबालाल रेहमानानी आपल्या चित्रांचा खरा चाहता हरपला म्हणून आपली संपूर्ण चित्रे पंचगंगेच्या पाण्यात विसर्जित केली. यावरून शाहू महाराज चित्रकलेचे किती भोक्ते होते याची प्रचीती येते.

**गायन कलेला राजाश्रय:** शाहू महाराज हे गुणीजनांचे चाहते होते. त्यामुळे त्यांनी बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर, भूगंधर्व रहिमत खाँ अशा सारख्या प्रसिद्ध गायकांना आपल्या दरबारी आश्रय दिला. शाहू महाराज शात्रोक्त संगीताचे चाहते होते. ते एक रसिक राजा होते. हिंदी शात्रोक्त संगीताची जपवणूक करावी आणि नवनवे गायक तयार करावेत यासाठी कोल्हापुरात स्थापन केलेल्या 'गायन शिक्षण समाज' या संस्थेस शाहू महाराजांनी सहा हजार रुपयाची देणगी दिली. भास्करराव बखले, अल्लादिया खाँ, अब्दुल करीम, रामकृष्ण बुवा वझे आणि श्रीपाद नारायण राजहंस उर्फ बालगंधर्व हे प्रसिद्ध गायक कोल्हापूर संस्थानात येऊन आपले संगीताच्या मैफली भरवित.

**१. अल्लादियाखाँ:** अल्लादियाखाँ हा प्रसिद्ध गायक त्यावेळी कराची (पाकिस्तान )येथे एका शेठकडे आपल्या १०-१५ परिवारासहित नोकरी करीत होता. त्याची ख्याती ऐकून महाराजांनी दरबारी ठेवण्यासाठी आपल्या सबनिसाला खाँ साहेबाच्याकडे

*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

पाठवून शाहू महाराजाकडे दरबारी गायक म्हणून राहण्याची विनंती केली परंतु महाराज आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करणार नाहीत म्हणून नकार दिला. पुढे महाराजांनी अल्लादिया ना दरबारी बोलविले तेव्हा ते आले असता महाराज आपल्या बंगल्यावरील हत्तींना मल्लीद्याचे गोळे भरवित होते. ते दृश्य पाहून अल्लादिया शरमले खाँ व दोनशे हत्ती पाळणारे हे महाराज आपल्या कुटुंबाला का नाही पोसू शकणार? म्हणून महाराजाकडे हजर झाले. एका नवरात्री उत्सवामध्ये अल्लादिया खाँ याने गायलेल्या गाण्यावर महाराज खुश होऊन अल्लादियाखाँ ला राजाश्रय दिला.

**2. केसरबाई केरकर:** केसरबाई केरकर या प्रसिद्ध गायिकेला शाहू महाराजांनी लहानपणापासून तिच्यातील गुण हेरून राजाश्रय दिला . १९१७ साली केसरबाई केरकर नऊ वर्षीच्या होत्या. तेव्हा तिचे गायन ऐकण्यासाठी शाहू महाराज स्व:त हजर होते. तिचे गायन ऐकून महाराज मंत्रमुग्ध झाले. लहानग्या केसरबाईकडे हवे ते मागण्याची विनंती केली. तेव्हा तिने अल्लादियाकडे खाँ गाणी शिकण्याची इच्छा व्यक्त केली. पुढे अल्लादिया खाँ कडे महाराजांनी शब्द टाकला. अल्लादिया खाँ नी केसरबाई आपल्याकडे आश्रय देवून गायन कलेत पारंगत बनविले. पुढे केसरबाई ना संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल १९३८ साली रवीन्द्रनाथ टागोरानी विश्वभारती संस्थेमार्फत 'सुरश्री' ही मानाची पदवीने सन्मानित केले. स्वतंत्र भारताचे प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी संगीत अवार्ड, पद्मभूषण पदवी, देऊन केसरबाईना गौरविले .

**३. आपाजी धुडीराज मुरतुले:** आपाजी धुडीराज मुरतुले उर्फ सुमंत हे राजर्षी शाहू महाराजाकडे कारकून म्हणून कामास होते . परंतु त्यांचा मुळचा पिंड कवी मनाचा होता . त्यामुळे त्यांच्या कामात चुका होत. महाराजांना कडे त्यांची तक्रार गेल्यावर सुमंत ना कारकून कामावरून काढून दरमहा ३५ रुपये मानधन देऊन दरबारी कवी म्हणून राजाश्रय दिला . त्यांच्या प्रतिभा शक्तीला वाव दिला.

'श्री शाह नृपाची सेवा, आमुचा ठेवा |
शाहुवीन दुसऱ्या आम्ही न भजतो देवा ||
अशी शाहू महाराजांची महती त्याने आपल्या काव्यातून गायली आहे. '

**शाहीर, लावणी, पोवाडे राजाश्रय:**

राजर्षी शाहू हे गुणांची कदर करणारे राजे होते. विठ्ठल रामजी डोणे, रामचंद्र नरहर माळी, शाहीर लहरी हैदर, जंगली मुजावर या शाहिरांच्या कलेला उत्तेजन दिले. शाहीरांनी आपल्या पोवाड्यातून शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणाच्या कार्याची महानता वर्णून सांगितली आहे.

शाहीर लहरी हैदर एके ठीकाणी म्हणतात,

' जो निद्रिस्त महाराष्ट्राला | जागे करण्याला | न्यान रवी झाला |
शाहू छत्रपती सत्य आधार |'

**४. नरहरी बुवा सरडे:** शाहू महाराजांनी भजन -कीर्तन, लावणी, फटका, साकी दिंडी, वाघ्या-मुरळी इत्यादी कलांना प्रोत्साहन दिले. त्यापैकी नरहर सरडे हा एक सोंगी महाराजांच्या आश्रयाला होता. एकदा कुस्तीच्या फडात कुस्त्या सुरु होत्या. शाहू महाराज प्रत्यक्ष तेथे हजर होते. त्यावेळी एक पंजाबी मल्ल मैदानात उतरून प्रतिस्पर्धी मल्लाचा पराभव केला. त्यावेळी त्या पंजाबी मल्लाने शाहू महाराजाकडून बक्षीस स्वीकारताना आपल्या दाढी, मिश्या काढल्या तेव्हा नरहरी सरडे याला पाहताच महाराजांनी त्याला मिठी मारली.

**नाट्य कलेला आश्रय:** राजर्षी शाहू महाराज हे नाट्यप्रेमी राजा होते. १८९४ साली शाहू महाराजांचा कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर एक मोठा समारंभ आयोजित करण्यासाठी वेगवेगळ्या नाटक कंपन्याना आमंत्रित केले. किर्लोस्कर नाटक कंपनीतील गणपतराव जोशी या नटावर त्यांची विशेष मर्जी होती. 'हॅम्लेट' या नाटकातील गणपतरावांची भूमिका महाराजांना विशेष आवडत असे. 'अथेल्लो' व 'संत तुकाराम' यांच्या भूमिका ही ते सरसपणे करीत. 'कोल्हापूरकर हिंदू नाटक मंडळी' ही पहिली नाटक कंपनी नारायणराव कारखानीस यांनी कोल्हापुरात सुरु केली . पुढे या कंपनीतून 'चित्तचक्षु चमत्कारिक नाटक मंडळी' सुरु झाली. या कंपनीतून पुढे आणखी एक 'नरहर बुवा कोल्हापूरकर नाटक मंडळी' सुरु झाली.

**१. बालगंधर्व घडविला:** अप्पाशास्त्री बेलेकर हे पंडित महाराजांचे पुरोहित होते . महाराजांना संगीत नाटकाची आवड आहे म्हणून आपला नातू श्रीपाद नारायण राजहंस म्हणजे आज ज्यांना बालगंधर्व म्हणून ओळखले जाते त्यांना महाराजांच्याकडे घेऊन गेले. त्यांची लहानपणीची गायन कला ऐकून महाराज मंत्रमुग्ध झाले. त्यांना राजाश्रय दिला. बालगंधर्वना नीट ऐकू येत नव्हते त्यांचा उजव्या कानात दोष होता. त्यावेळी महाराजांनी मिशन हॉस्पिटल मिरज चे प्रसिद्ध डॉ . व्हेल यांच्याकडे पाठवून उपचार केले. पुढे अल्लादिया साहेब यांच्या हवाली करून त्यांना गायनाचे प्रशिक्षण दिले. पुढे त्यांची ख्याती किर्लोस्कर या नाट्य कंपनीपर्यंत गेली.

या नाट्य कंपनीत नारायण राजहंस यांनी 'शाकुंतल' या नाटकात शाकुंतलेची केलेली भूमिका महाराजांच्या मनात घर करून गेली. पुढे शाहू महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहना मुळे हाच नारायण पुढे मराठी रंगभूमीचा आवडता नटसम्राट 'बालगंधर्व' म्हणून नावारूपास आला.

**२. नाटककार दत्तोपंत:** दत्तोपंत हे गोवा नाटक मंडळीत प्रथम काम करीत होते. पुढे ते कोल्हापुरात महाराजांच्या आश्रयाला आले. दत्तोपंत्ताचा आवाज सुरेल, मधुर, तालबद्ध होता. त्यांच्या गाण्यावर महाराज मंत्रमुग्ध होत असत. 'करवीर निवासिनी' ही नाट्य मंडळी कोल्हापुरात स्थापना केली. शाहू महाराजांनी आपल्या कन्येच्या विवाहानिमित दत्तोपंत्तानी या नाटक कारांनी 'मृच्छकटिक' या नाटकाचा प्रयोग राजवाड्यावर आयोजित केला होता. हे नाटक बघून सर्व स्त्रिया भारावून गेल्या. या नाटकातील दु:खद प्रसंगी राज कुलातील स्त्रीया इतक्या एकरूप झाल्या कि त्यांचे रडणे थांबता थाबंत नव्हते अखेर नाइलाजाने हे नाटक बंद करण्यात आले. 'शापसंभ्रम' या नाटकात दत्तोपंतानी साकी एका संगीत नाटकात पुंडलिक पात्र साकारत असताना दत्तोपन्ताचा पहाडी सुरेख आवाज महाराजांना एवढा आवडला कि ते परत परत गायला सांगू लागले. राजर्षी कलावंतांच्या कलेला दाद देणारे दर्दी राजे होते.

**३. केशवराव भोसले नाट्यगृहाची निर्मिती:** अण्णासाहेब किर्लोस्कर नाटक मंडळाची स्थापना १८८० साली केली. १८८६ साली ती कोल्हापुरात आली. या नाट्यकंपनी 'सौभद्र' या नाटकाचे कोल्हापुरात प्रयोग झालेले उत्पन्न ६१४ रुपये ८ आणे एवढे होते. 'शारदा' नाटकात केशवराव भोसले यांची 'शारदा' नाटकातील शारदेची भूमिका महाराजांना आवडली. केशवराव म्हणजे तळपती तलवार आहे. या शब्दात शाहू महाराजांनी केशवरावांचा गौरव केला आहे. पुढे महाराजांनी १९१५ साली रोम येथील नाट्यगृहाच्या धर्तीवर कोल्हापुर संस्थानात ऐतिहासिक 'पॅलेस थिएटर' १९१५ साली बांधून युवराज राजाराम महाराज यांच्या शुभ हस्ते त्याचे 'मानापमान' या नाटकाच्या प्रयोगाने उद्घाटन केले. 'पॅलेस थिएटर' चे पुढे 'केशवराव भोसले सन्मानार्थ 'केशवराव भोसले' यांच्या नाट्यगृह असे नामाभिधान करण्यात आले. मराठी रंगभूमीवर घोड्यावर बसून भूमिका करणारे पहिले नट दत्तोपंत हल्याळकर आणि नटवर्य केशवराव भोसले यांच्या सन्मानार्थ महाराजांनी हजारो रुपये खर्च केले. नाट्यकलेला प्रोत्साहन देण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात 'शिवराय मंडळाची' स्थापना केली.

**स्त्री नाटक कंपनीची निर्मिती:** शेषासनीया या नायकिणी पेशातील स्त्री ने स्त्री यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी 'शेषासनी संगीत नाटक मंडळी' या संस्थेची स्थापना केली. मराठी रंगभूमीवरील स्त्री यासाठी काम करणारी पहिलीच नाटक कंपनी होती. 'नल-दमयंती', 'सौभद्र', 'शाकुंतल' हि त्यावेळेची गाजलेली नाटके या नाटक कंपनीने सादर केली. राजर्षी शाहू राजांनी या नाटक कंपनीला राजाश्रय दिला.

**मल्ल विद्येला प्रोत्साहन दिले:** राजर्षी शाहू महाराज बलोपसाकांचे चाहते होते. शरीरसंपत्ती हेच पुरुषार्थाचे साधन आहे असे ते मानीत. त्यांनी मल्लविद्येला लोकशिक्षणाचे एक सामर्थ्य संपन्न असे अंग मानले. कोल्हापूरला मल्ल विद्येचे विद्यापीठ बनविले. तालीम म्हणजे शौर्य, शक्ती, धाडस, चपळता, कुशलता, कुशाग्रता, सत्वर निर्णय, निर्भयता वाढीचे केंद्र होते म्हणून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात तालीमी काढून ते एक शस्त्र विद्यचे, बल संवर्धनाचे, संस्कृतीचे आणि शिक्षण प्रशिक्षणाचे एक प्रवाही केंद्र निर्माण केले.

**ऐतिहासिक खासबाग मैदानाची निर्मिती:**'स्पर्धेशिवाय प्रगती नाही' असे शाहू महाराजांचे मत होते. राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ साली एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहण सभारंभासाठी१९०२ साली इंग्लंडला गेले असताना परत येताना त्यांनी इटली शहराची राजधानी रोम शहराला भेट देऊन तेथील कुस्ती मैदानाची पाहणी केली. पुढे रोम मधील कुस्ती मैदानासारखी कोल्हापुरात ऐतिहासिक 'खासबाग' मैदानाची उभारणी १९१२ साली केली. इमामबक्ष व गुलाम मोहद्दीन या भारतातील गाजलेल्या मल्लांच्या लढतीने या खासबाग मैदानाचे शाहू राजांनी उद्घाटन केले. कृष्णा मर्दाने, शिवाप्पा बेरड, व्यकप्पा बुरुड, गणपत शिंदे, गोविंद कसबेकर, नारायण कसबेकर, बाबू बिरे, गणू भोसले, देवाप्पा धनगर, देवाप्पा हळीगळी, गोपाळ परीट, या मल्लांना राजर्षी राजाश्रय देवून उत्तरेकडील मल्लांची मल्ल विद्येतील मक्तेदारी मोडून काढली. या मैदानात रंगणारी कुस्ती प्रेक्षक कुठेही बसला तरी ती दिसावी अशा पद्धतीची रचना या मैदानाची केली होती. तेथे सर्व जाती धर्माच्या पैलवानांना आमंत्रित करून कुस्त्यांचे फड रंगविले. या स्पर्धेतून शिस्त, संयम, शक्ती संपादनाचे शिक्षण ते देत. खासबाग मैदान महाराजांच्या लोकशिक्षण प्रक्रियेतील 'जरीपटका' ठरले. पैलवानांना चांगल्या प्रतिचे दूध मिळावे म्हणून कोल्हापुरात दुभत्या म्हशीचे गोठे उभारले. दरवर्षी मल्लांच्या देखरेसाठी महाराज आपल्या खाजगीतून ३० हजार रुपये एवढी रक्कम खर्च करीत. उत्तरेकडील मल्लांनी कनिष्ठ जातीतील मल्ला बरोबर लढतीस नकार देऊ नये म्हणून अस्पृश्य समाजातील मल्लांना 'जाठ पैलवान', 'पंडीत पैलवान' अशी नावे दिली. सामाजिक विषमता नष्ट करणारे महाराजांचे हे कार्य दूरगामी परिणाम करणारे होते. कोल्हापुर संस्थानांत ठिकठिकाणी तालमी उभारल्या. आपल्या संस्थानांत परकीय संकट

आल्यानंतर ते निवारण्यासाठी प्रत्येक गावात एक किल्ला आणि प्रत्येक मनुष्याकडे एक तलवार असली पाहिजे असे राजर्षींचे मत होते.

***शिकार कलेला प्रोत्साहन:*** शिकार करणे हा कोल्हापूर छत्रपती घराण्याचा पूर्वापार छंद होता. अल्पवयीन राजांच्या काळात लुप्त झालेली या कलेचे शाहू राजांनी आपल्या कारकिर्दीत पुनरुज्जीवन केले. शिकार करणे केवळ मौजमजा करण्यासाठी महाराजांनी छंद जोपासला नाही. तो एक क्रीडा प्रकार आहे आणि विशिष्ट अशा तंत्राने विकसित होणारा कला प्रकार आहे म्हणून त्याचे जतन त्यांनी केले.

**१. चित्ता शिकारी तंत्र :** शाहू महाराजांचा 'चित्ता शिकार' हा सर्वात आवडता छंद होता. चित्याच्या वेगाचा फायदा घेऊन हरणाच्या कळपातील काळविटाची महाराज शिकार करीत. त्यासाठी महाराजांनी असे अनेक चित्ते बाळगून त्यांना विशिष्ट तंत्र वापरून त्यांना प्रशिक्षण दिले होते. चित्यासाठी खास संरक्षित वने कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी तयार केली होती.

**२. रानडुक्कराची शिकार:** रानडुकराची शिकार करणे हा महाराजांचा दुसरा आवडता छंद होता. घोड्यावर बसून रानडुकराचा पाठलाग करून भाल्याच्या साहय्याने शिकार महाराज करीत. यात घोडेस्वाराचे कौशल्य, धाडस, प्रसंगावधान, शारीरिक दणकटपणा इत्यादी गुण महाराजांच्या अंगी होते. शाहू महाराजांचे थोरले सुपुत्र शिवाजी महाराज रानडुकराची शिकार करीत असताना घोड्यावरून पडून १२ जून १९१८ साली दुर्दैवी अंत झाला.

**३. वाघाची शिकार:** वाघाची शिकार करण्याची साहसी कला महाराजांनी अवगत केली होती. १८९६ साली महाराजांनी वयाच्या २२ साव्या वर्षी पावणेनऊ फुट लांबीच्या ढाण्या वाघाची शिकार केली होती. कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा परिसरातील तेंडवा जातीच्या क्रूर वाघाची शिकार महाराजांनी नि:शस्त्र वाघाच्या जबड्यात हात घालून केली होती. १९१० साली महाराजांनी शिकारी कुत्र्यांच्या साहाय्याने एका वाघाची शिकार केली होती.

**४. बहिरी ससाणा शिकार तंत्र:** बहिरी ससाणा शिकार तंत्र शाहू महाराजांनी विकसित केले होते. प्र शिक्षित ससाण्याच्या साहाय्याने महाराज काळविटाची व माळढोकची या प्राण्यांची शिकार करीत असत.

साठमारी: साठमारी म्हणजे हा मदमस्त झालेल्या हत्तींचा खेळ महाराजांनी कोल्हापुरात आणला. साठमारी करणे म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशी गाठ. असे असूनही महाराजांनी हा साहसी खेळ कोल्हापूर संस्थानात रुजविला आणि वाढविला. साठमारी साठी आखाडे त्यांनी सोनतळी, राधानगरी, पन्हाळा, रुकडी या ठिकाणी बांधले. महाराजांना या खेळात एवढा रस होता कि साठमारी प्रसंगी वापरायची चिमट्याची साधने आपल्या संस्थानातील टेक्निकल स्कूल मध्ये तयार केली. ती शहाजी छत्रपती मध्ये आजही बघायला मिळतात. त्याचबरोबर हत्तीच्या टक्करा करण्याचा अभिनव खेळ महाराजांनी आपल्या संस्थानात सुरु केला.

**कलावंतांच्या केशराचा मळा फुलविला:** राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानातनृत्य, नाट्य, संगीत, गायन, वादन, कुस्ती, आणि अभिनय क्षेत्रातील कलावंत, भाग्यवंत, गुणवंत, आणि यशवंत यांनी राजाश्रय देऊन त्यांच्यातील कलेचे मोल जपले. भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन केले. कोल्हापुरात कलावंतांचा केशराचा मळा फुलविला. आजच्या यांत्रिकीकरण्याच्या युगात लोप पावत चाललेली भारतीय लोककला, लोकसंस्कृती पुनर्जीवन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांचे लोककला क्षेत्रांतील कार्य आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे.

संदर्भ साधने –

१. प्राचार्य रा . तु . भगत राजर्षी शाहू छत्रपती, रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर, २०११
२. प्रा नानासाहेब साळुंखे शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन कोल्हापूर, २०१०
३. धनंजय कीर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, २००५
४. डॉ. जयसिंगराव पवार राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर, २००७
५. कोठेकर शांता, इतिहासाचे तत्त्व आणि तत्त्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०२१

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**40**

# राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक कार्य

**बाळासो आण्णा सुतार**
प्रा. डॉ. एन डी पाटील महाविद्यालय, मलकापूर

---

**प्रस्तावना -**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू राजांचे वर्णन 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' अशा शब्दात केले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात, "शाहूराजा नुसता मराठा नव्हता, नुसता ब्राह्मणेतरही नव्हता, तो नवयुगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता". "यशवंतराव मोहिते यांनी "महाराष्ट्राचे गौतम बुद्ध"म्हणून तर सयाजीराव गायकवाड यांनी, "माणसातील राजा व राजातील माणूस" असे त्यांचे वर्णन केले आहे. राजर्षि तू राजा प्रेमळ, निधडा दिलदार । मराठगडी तू नेता आमुचा प्रणाम शतवार । मान आमुचा शान आमुची, तू दैवत आमचे । तुझ्या प्रतापे मोला चढले, हे जीवन आमचे । पायी गती, हाती शक्ती व हृदयी मानवाची उन्नती हा ध्येयवाद स्विकारून भारताच्या इतिहासात अजरामर झालेल्या राजर्षि शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात सामाजिक क्रांतीचे बीजारोपण केले."मना सारखा राजा अन राजा सारख मन"ही उक्ती छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्यासाठी खूप समर्पक वाटते. बहुजन समजाने जाती धर्माच्या भिंती तोडून शाश्वत प्रगती करावी यासाठी शाहू महाराजांनी तत्कालिन शैक्षणिक, आर्थिक, शेती व व्यवसायिक धोरणांत समाज उपयोगी अमुलाग्र बदल केले. त्यांनी राबवलेली ही धोरणं असंख्य बहुजन लोकांसाठी महत्वपूर्ण ठरली.स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज'असा त्यांचा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले.कृतिशील समाजसुधारक म्हणून त्यानां सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ मानले जाते. लोककल्याणकारी व समाजक्रांतीच्या कार्यामुळे जगात आदर्श म्हणून त्यांची कीर्ती दिगंत झाली. १८९४ ते १९२२ या २८ वर्षांच्या कालखंडात त्यांनी ध्येयनिष्ठेने, कळकळीने व 'बहुजन हिताय बहुजन सुखाय'या तत्त्वप्रणालीने समाजपरिवर्तनाचे कार्य केले. गौतम बुद्धांच्या विचाराची पेरणी करून जसे सम्राट अशोकाने कल्याणकारी राज्य केले, तसे महात्मा फुले यांच्या विचारांची पेरणी करून कल्याणकारी राज्य निर्माण करणारा शाहू राजा इतिहासात एकमेवाद्वितीय ठरले.राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीचा व मोफत शिक्षणाचा कायदा करून तो प्रभावीपणे राबविला. सर्व जाती धर्माच्या विशेषतः ग्रामीण भागातील मुला-मुलींना शिक्षण मिळावे यासाठी वसतिगृहे उभारली. त्यातून प्रेरणा घेतलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख व बापूजी साळुंखे यांनी शिक्षणाची गंगा महाराष्ट्रभर पोहोचविली. राजर्शी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अनेक सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक सुधारणा करून संपूर्ण भारतात आदर्श निर्माण केला. सदर शोध निबंधामध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

**उद्दिष्टे - (Objective)**

१) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

२) छत्रपती राजा शाहू महाराज यांच्या शैक्षणक कार्याची विचारांची प्रासगिकता पडताळणे.

३)राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा आढावाघेणे.

**संशोधन पध्दती-** प्रस्तुत शोध लेखासाठी 'वर्णनात्मक व विश्लेषणात्मक'संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलन प्रस्तुत शोध लेखासाठो तथ्य संकलनाच्या व्दितीय स्रोताचा वापर केला असून यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, संकेत स्थळ इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

महाराजांचा जन्म २६ जून इ. स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व 'शाहू'हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. या वेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाई वय १२ वर्षांहून कमी होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते.छत्रपती शाहू महाराजांना" राजर्षी" ही कानपूरच्या कुर्मी क्षत्रीय समाजाने दिलेली उपाधी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्यांच्या क्षात्र गुरुने दिली. मुंबई

येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजेच दोन एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण सोहळा झाला. अगदी लहानपणापासूनच शाहू महाराज हे कुशाग्र बुद्धीचे आणि मानवतावादी विचारांचे होते. त्यांच्या याच विचारांमध्ये आबासाहेब यांच्या दूरदृष्टीने भरच पडली. कारण आबासाहेबांनी त्यांच्या शिक्षणात कसलीच कसर सोडली नाही. राजकोट या ठिकाणी त्यांचे बरेचसे शिक्षण पूर्ण झाले. त्यांचे शिक्षण पूर्ण होत होते, त्या वेळी त्यांना ब्रिटिश शासनाचे कर्तव्यदक्ष असणारे आय. सी. एस. अधिकारी स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेझर आणि सर रघुनाथराव सबनीस यांच्यासारखे अत्यंत चांगले शिक्षक त्यांना लाभले.

महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली.महाराष्ट्राला तीन प्रमुख समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या महाराष्ट्र राज्याला" फुले-शाहू- आंबेडकरांचा महाराष्ट्र "असे म्हटले जाते. छत्रपती शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी विविध कार्य केले. "शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिल", शाहूपुरी व्यापार पेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी "किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट" इत्यादी संस्था कोल्हापूरमध्ये स्थापन करण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी त्यांनी केली. शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले. अशा विविध उपक्रमातून फार मोठ्या प्रमाणात कृषीविकास केला. छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी तसेच "मूकनायक" या वृत्तपत्रासाठी सहकार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना छत्रपती शाहू महाराजांनी माणगावच्या परिषदेमध्ये "अखिल भारताचे पुढारी" म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित, उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावे असे आवाहनही केले होते. त्यांनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महान कार्य केले.

१९१७ साली महाराजांनी प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. यासाठी एक लाख रुपये खर्च करण्याचा निर्णयही त्यांनी घेतला. त्यापैकी ऐंशी हजार रूपये दरबार खजिन्यातून व वीस हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च करण्यात आले. देवस्थानचा पैसा प्राथमिक शिक्षणाकडे वळविणारे शाहू महाराज हे देशातील क्रांतिकारक राजपुरूष होते. पंढरपूर येथील अन्नछत्रासाठी कोल्हापूरच्या दरबारातून दरमहा एकशे बारा रूपये आठ आणे जात असत. महाराजांनी ते अन्नछत्राऐवजी 'मराठा विद्याप्रसारक समाज'या संस्थेला देण्याचा निर्णय ऑक्टोबर १९२० च्या आदेशान्वये घेतला. अन्नदानापेक्षा विद्यादान श्रेष्ठ आहे, अशी शाहू राजांची धारणा होती. ज्ञानसंपन्न माणूस अन्नासाठी वणवण भटकणार नाही, हे महाराजांचे मत होते. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्यानंतर जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठविणार नाहीत त्यांना दर महिना प्रत्येकी एक रुपया दंड करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला. यातून त्यांची शिक्षणाच्या प्रसाराची तळमळ दिसून येते. ज्यावेळी ते आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षणावर एक लाख रुपये खर्च करीत असत, त्यावेळी इंग्रज सरकारचा सिंध, गुजरात, मुंबई, कर्नाटक या सर्व प्रांताच्या शिक्षणावरील खर्च एक लाख रूपये होता. महाराजांनी अभ्यासक्रम तयार करण्यापासून ते शिक्षकांना प्रशिक्षण देणे, शाळा तपासणे याचीसुद्धा व्यवस्था केली. गावपाटलांना नियमितपणे शाळा तपासून तसा अहवाल पाठविण्याची योजना त्यांनी केली. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. गरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आपला राजवाडाच खुला केला. त्यामुळे बहुजन व दलित समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे खुली झाली आहेत. करवीर संस्थांनात २२४ प्राथमिक शाळा, माध्यमिक शिक्षणासाठी राजाराम हायस्कूल व उच्च शिक्षणासाठी राजाराम कॉलेज होते, पण या शाळांमध्ये उच्चवर्णीय विद्यार्थ्यांचीच संख्या जास्त होती. राजाराम हायस्कूलची विद्यार्थी संख्या ४४१ त्यामध्ये ३६८ ब्राह्मण विद्यार्थी होते. म्हणजे साधारण ८४ टक्के विद्यार्थी ब्राह्मण समाजातले आणि उरलेले १६ टक्के इतर समाज, राजाराम कॉलेजमध्ये ६१ विद्यार्थी होते. इतर ५५विद्यार्थी ब्राह्मण समाजाचे आणि त्यांना शिकवणारे पण उच्चवर्णीयच याचा अर्थ ब्राह्मणेत्तर

समाजातील केवळ १० टक्के मुले उच्चशिक्षित होती. अनेक गावात शाळा नव्हत्या, शिक्षक नव्हते ही प्राथमिक शिक्षणाची अवस्था हा चिंतनाचा विषय होता हे विदारक दृश्य पाहून महाराज अस्वस्थ झाले.

शाहू महाराजांनी २८ मे १९१३ रोजी शाळा स्थापन करण्याची आदेश प्रत्येक गावात देऊळ, चावडी, धर्म शाळा कोणत्याही ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या मोकळया जागेत शाळा सुरू करावी. गावोगावी शाळा स्थापन झाल्या. या शाळांमध्ये विद्यार्थी दाखल झाले पाहिजेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले यासाठी महाराजांनी फर्मान काढले. जे पालक आपले मुले शाळेला पाठविणार नाहीत अशा पालकांसाठी एक रुपया दंड करावा. हा दंड मुले शाळेत येईपर्यंत प्रत्येक महिन्यास करावा असे समन्स मामलेदारांना काढावयास सांगितले आणि त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली आणि हे शाहू महाराजांचे पालकांना दंड करण्याचे फर्मान प्रभावी ठरले. बहुजन समाजाची मुले-मुली शिकून उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ लागली. त्यांनी या सगळ्या गोष्टीत स्वतः लक्ष घातल्याने अनेक समस्या त्यांच्या लक्षात आल्या. उदाहरण सांगायचे झाल्यास, ग्रामीण भागातील शेतकरी हे मुलांना कामात मदत म्हणून शाळेत पाठवायला चालढकल करायचे. मात्र महाराजांनी त्यातही मार्ग काढला. सकाळी किंवा संध्याकाळी विद्यार्थ्यांना शाळेत पाठवावेच लागायचे.

छत्रपती शाहू महाराज म्हणतात, "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे. असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झालेली नाही हा इतिहास आहे. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम लढवय्ये कधीही निपजणार नाहीत.म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे." हे विचार शाहू महाराजांनी फक्त बोलून नाही तर प्रत्यक्षात उतरवून दाखवले आणि करवीर संस्थानात शैक्षणिक क्रांतीची तेजोमय पहाट झाली. यावरूनच शिक्षणप्रसाराची त्यांची तळमळ लक्षात येते. शिक्षणावर केलेला खर्च भविष्यासाठी मोठी गुंतवणूक असते, असा त्यांचा विचार होता. त्यासोबत सुरुवातीला सुरू केलेल्या अस्पृश्यांच्या शाळा महाराजांनी बंद करून सर्वांना एकत्र शिक्षण देत समानता साधण्याचा प्रयत्न केला. १९१७-१८ साली एकूण शाळा २७ आणि विद्यार्थिसंख्या १२९६ होती. त्यांच्या सक्तीच्या आणि मोफत शिक्षण देण्याच्या प्रयत्नांमुळे पुढील पाच वर्षांत शाळांची संख्या ४२०, तर विद्यार्थिसंख्या २२ हजारांच्या वर झाली. या योजनेवर सुरुवातीला होणारा एक लाख रुपयांचा खर्च पुढे वाढत जाऊन तीन लाखावर गेला. या शिक्षणाच्या प्रवाहात महाराजांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विचार करून विविध स्वरूपाच्या शाळा आपल्या संस्थानात सुरू केल्या. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, सर्वसामान्य कुटुंबातील मुलेदेखील पुरोहितपण करायला शिकल्यास त्यांना कुणासमोरही हात पसरायला नकोत म्हणून पुरोहित शाळा, भारताचा स्वातंत्र्यलढा यशस्वी होण्यासाठी सैनिक व्हावेत म्हणून सैनिकी शाळा उभारल्या, संस्थानामधील तरुणांसाठी उद्योग शाळा, संस्कृत शाळा, मानवतावादी दृष्टिकोन शिकवणाऱ्या सत्यशोधक शाळा, डोंबारी मुलांची शाळा, विविध कलांवर आधारित कला शाळा अशा विविध शाळा महाराजांनी आपल्या राज्यात सुरू केल्या.

**प्राथमिक शिक्षणाचा कायदा-** समाज हा आपला, अंधारात आहे पडलेला। मूळ कारण घ्यावे घ्यानाला, अज्ञानीपणा हा भवला। तेव्हा शिक्षण पाहिजे सर्वांला, असे वाटून शाहू राजाला प्राथमिक शिक्षणाचा त्यांनी पाया घातला ॥ शाहू छत्रपतींना आपल्या प्रजाजनांसाठी उच्च शिक्षणाचे पंचपक्वान्नांचे ताट नको होते, त्यांना त्यांच्यासाठी साधी 'कोंड्याची भाकर'द्यायची होती. 'No cake to a few until all are served with bread'हे त्यांचे तत्त्व होते. या तत्त्वास अनुसरूनच त्यांनी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. शिक्षणातून फक्त सुशिक्षित समाज तयार करणे, इतकेच माफक उद्दिष्ट न ठेवता शिक्षण ही परिवर्तनाची गंगोत्री आहे, हे ध्येय बाळगून राजर्षी शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी राजर्षी शाहूंनी बंधू पिराजीराव घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली १९१३ मध्ये समिती नेमली. भास्करराव जाधव, म. ग. डोंगरे, अण्णासाहेब लट्ठे, वाय.के. दिलवर, डॉ. एच. एन. घाटगे या सदस्यांची नियुक्ती करुन शिफारशी मागवून घेतल्या. २४ जुलै १९१७ रोजी त्यांनी काढलेल्या हुकुमात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीची योजना जाहीर करताना, येत्या गणेश चुतर्थीपासून करवीर इलाख्यातील सर्व शाळांत मोफत व सक्तीचे शिक्षण अंमलातआले. सर्व प्राथमिक शाळांतून फी माफी करण्यात आली आहे, असा आदेशही २५ जुलै १९१७ रोजी काढला. २४ जुलै १९१७ रोजी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी कायदा केला होता. या जाहीरनाम्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी २१ सप्टेंबर १९१७ रोजी करण्यात आली. सक्तीच्या शिक्षणाचा आदेश काढल्यानंतर अवघ्या ५९ दिवसांत त्याची अंमलबजावणीही केली. परीक्षा घेऊन शिक्षकांची नियुक्ती केली. या योजनेसाठी मोठा खर्च होणार असल्याने शंभर रुपयांहून अधिक उत्पन्न असलेल्या नागरिकांना एक रुपया शिक्षणकराची आकारणी केली. ३० सप्टेंबर १९१७ला कोल्हापूर संस्थानात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला.

या योजनेअंतर्गत ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली. वर्षभरात संस्थानांतील खेडयापाडयात अशा ९६ शाळा सुरू झाल्या. पहिल्या नव्या सक्तीच्या शाळेचा उद्घाटन सोहळा ८ मार्च १९१८ रोजी चिखली गावी खुद्द शाहू महाराजांच्या हस्ते संपन्न झाला. कोल्हापूरसारख्या लहानशा संस्थानाने प्राथमिक शिक्षणासारख्या बाबीवर दरवर्षी लाख रुपये खर्च करणे म्हणजे साधी बाब नव्हती. त्या काळी प्राथमिक शिक्षकाचा पगार १२ रुपये होता. त्यामानाने ही रक्कम प्रचंड होती. त्या सुमारास महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य सिंध इतक्या अफाट प्रदेशावर पसरलेल्या मुंबई इलाख्याचीही शिक्षणातील तरतूद एक लाख रुपये नव्हती. या पार्श्वभूमीवर शाहू महाराज आपल्या संस्थानाच्या उत्पन्नातून एक लाख रुपये प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करीत होते, ही गोष्ट हिंदुस्थानच्या इतिहासात अपूर्व मानली पाहिजे. महाराजांनी हा पैसा प्रत्येक घरावर एक रुपया नाममात्र शिक्षणकराच्या रूपाने उभा केला. संस्थानातील मामलेदार-महालकरी या अधिकाऱ्यांपासून गावच्या पाटलापर्यंत सर्वांना या प्राथमिक शिक्षण चळवळीत सहभागी करून घेण्यात आले. जे लोक मुले शाळेत पाठवणार नाहीत त्यांना दंड करणे, दरमहा शाळा तपासणी करून त्याचा रिपोर्ट पाठवणे, इ. कामे त्यांच्यावर सोपवण्यात आली. यामागे महाराजांचा हेतू हाच होता की, प्राथमिक शाळांची योजना कागदोपत्री न राहता तिची अमलबजावणी पूर्ण कार्यक्षमतेने व्हावी. प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात शाहू महाराजांनी घेतलेले निर्णय सामाजिकदृष्ट्या महत्वाचे होते. १८९४ मध्ये संस्थानात २२१ शाळा होत्या तर १९२२ मध्ये शाळांचे प्रमाण ५५५ वर पोचले. १९१७मध्ये या कायद्याची अंमलबजावणी झाली, तेव्हा १२९६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. शाहूंच्या मृत्यूसमयी १९२२ मध्ये २२ हजार ७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. शाहूंच्या शिक्षणाचे धोरण कोल्हापूर संस्थानासह संपूर्ण देशाने स्वीकारले. घटनेतही प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रावबहादूर पी. सी. पाटील, शिक्षणतज्ज्ञ प्रि. सी. आर. तावडे, भाई माधवराव बागल अशा अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी महाराजांनी अर्थसहाय्य केले. शाहूंच्या कार्यातून प्रेरणा घेतलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख व बापूजी साळुंखे यांनी शिक्षणाची गंगा महाराष्ट्रभर पोहोचविली. राजर्षी शाहूंनी दूरदृष्टीने राबविलेले शिक्षण धोरण शिक्षणाला सर्वसमावेशक बनवत गेले आणि आधुनिक भारताच्या उभारणीत ते महत्त्वाचा टप्पा ठरले.

**मोफत व सक्तीचे शिक्षण -**शिक्षण हे मानवी जीवन-विकासाचे साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातुन शोषण मुक्त समाज निर्माण करता येईल. शिक्षणातून मानवी मूल्य समाज मनावर बिंबविता येतात. समता, स्वतंत्रता, न्याय आणि व्यक्तीची प्रतिष्ठा ही सामाजीक मूल्य शिक्षणातूणच समजू शकतात. आपले हक्क कोणते? आपले कर्तव्ये कोणते? याची जाणीव होण्यासाठी आणि आर्थिक, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी समाजाला शिक्षणाचीच आवश्यकता आहे. शाहू महाराज प्राथमिक शिक्षणाबाबत म्हणतात की, शिक्षण हेच आमचा तरणोपाय आहे'असे माझे मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडूण गेलेल्या देशात लढवये वीर कधीच निपजनार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची भारताला अत्यंत गरज आहे. आपल्या समाजातील दुर्लक्षीत दुःखी, कष्टी, उपेक्षित, दिनदलित, आदिवासी, शेतकरी, डोंबारी लोकांना शिक्षणाची संजीवणी द्यावी लागेल, असे शाहू महाराज म्हणत होते."शिक्षणाच्या बाबतीत गतकाळ म्हणजे इतिहासातील अंधारी रात्र होती." फक्त एकाच जातीने शिक्षणाचा मक्ता घेतला होता, म्हणून त्यांनी सार्वत्रिक सक्तीचे व मोफत शिक्षणाचा पुरस्कार करुन ते शिक्षणाचे महत्त्व खालील प्रमाणे सांगितले आहे. सर्वाच्या विकासासाठी शिक्षण, स्वराज्यासाठी शिक्षण, मोफत व सक्तीचे शिक्षण, दुर्बलाला सबल करण्याची शिक्षण,समाज उन्नतीसाठी शिक्षण, जातीभेदाच्या निर्मुलणासाठी शिक्षण,ब्राम्हणोत्तर वर्गाच्या प्रगतीसाठी शिक्षण,शिक्षण प्रसाराच दीपस्तंभ शाहू महाराज हे सातशे संस्थानिका पैकी पहिले संस्थानिक होय. शाहू महाराजांनी गादीवर येण्यापूर्वी संपूर्ण संस्थानाचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांना गावांमध्ये प्राथमिक शाळांचा अभाव जाणवला. कुठे शाळा होती तिथे शाळेच्या वास्तूची पडझड झालेली आढळली. काही ठिकाणी शाळेत शिक्षक नव्हते. ही सर्व परिस्थिती पाहिल्यावर त्यांनी शिक्षण सक्तीचे करणारा आदेश काढला. महाराजांनी घरावर एक रुपया नाममात्र शिक्षणकराच्या रूपाने उभा केला. संस्थानातील मामलेदार-महालकरी या अधिकाऱ्यांपासून गावच्या पाटलापर्यंत सर्वांना या प्राथमिक शिक्षण चळवळीत सहभागी करून घेण्यात आले. जे लोक मुले शाळेत पाठवणार नाहीत त्यांना दंड करणे, दरमहा शाळा तपासणी करून त्याचा रिपोर्ट पाठवणे, इ. कामे त्यांच्यावर सोपवण्यात आली. यामागे महाराजांचा हेतू हाच होता की, प्राथमिक शाळांची योजना कागदोपत्री न राहता तिची अमलबजावणी पूर्ण कार्यक्षमतेने व्हावी. यासाठी जातीने लक्ष घातले.

**मुलींनाशिक्षणाससंधी-**राजांनी आपल्या संस्थानात शिक्षणाची गंगा सर्व जाती धर्मातील जनतेच्या दारापर्यंत पोहोचलेली होती. त्यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात आपल्या कुटुंबातील स्त्रियांच्या पासून केलेली होती. रखमाबाई यांची कन्या कृष्णाबाई यांना वैद्यकीय शिक्षण दिले आणि कोल्हापूरमध्ये सरकारी दवाखान्यात डॉक्टर म्हणून काम करण्याची संधी दिली. एवढेच नव्हे, तर त्यांना वैद्यकीय

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

क्षेत्रातील पुढील शिक्षण घेण्यासाठी परदेशीदेखील पाठवले आणि कृष्णाबाई यांनी परदेशात उच्च शिक्षण घेऊन दुसऱ्या महिला डॉक्टर होण्याचा मान पटकावला. महाराजांच्या शिक्षणविषयक कार्याचे अजून एक मोठेपण म्हणजे त्यांनी मुलींच्या शिक्षणावर भर दिला. संस्थानात मुलामुलींच्या शाळा होत्याच, त्यासोबतच मुलींच्या स्वतंत्र शाळादेखील त्यांनी सुरू केल्या.ज्या काळात मुलींना शिक्षणास संधी द्यायला काही पालक तयार होत नव्हते, त्या काळात महाराजांनी मुलींच्या शिक्षणात कमतरता राहू नये यासाठी खास महिला शिक्षणाधिकारी हे पद निर्माण केले. कोल्हापूर संस्थानांमधील शिक्षण अधिकारी असणाऱ्या मिस लिटल या आपल्या मायदेशी गेल्या म्हणून हे पद रिक्त झाले. आणि त्या पदावर रखमाबाई केळवकर यांच्यासारख्या अत्यंत बुद्धिमान स्त्रीला नेमले.कर्नल अॅडरसन हे पोलिटिकल एजंट म्हणून आल्यावर त्यांनी कोल्हापूर शहरात मुलींची शाळा सुरू केली.त्या कालखंडात भुदरगड सारख्या भागात खास मुलींच्या शाळा निर्माण करण्यात आल्या होत्या. काही ठिकाणी मुलांच्या शाळेत मुलींही शिक्षण घेत असत. कोल्हापूर शहरातील मुलींच्या शाळेत कशिद्याचे काम, अंगरखे, पैरणी, चौळया शिवण्याचे शिक्षण मुलींना देण्यासाठी एका शिक्षकाची नेमणूक करण्यात आली होती. सन १८८३ मध्ये कोल्हापूर राज्यात नऊ मुलींच्या शाळा असून ५०० मुली शिक्षण घेत होत्या. सन १८८६-८७ मध्ये होतकरू व तरूण मुलींना वैद्यकीय परिचारिका शिक्षण देण्यासाठी वैद्यकीय विद्यालय सुरू केले होते. ते अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलच्या आवारात होते. या वैद्यकीय विद्यालयाचे सुपरिंटेंडेंट पद डॉ. आनंदीबाई जोशी यांच्याकडे देण्यात येणार होते पण त्यांचे फेब्रुवारी १८८७ मध्ये निधन झाल्याने ही योजना प्रत्यक्षात साकार झाली नाही. सुईणकाम वर्गही अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलमध्ये सन १८८९-९० मध्ये सुरू करण्यात आला होता. सन १८९३-९४ मध्ये कोल्हापूर राज्यात २६ मुलींच्या शाळा होत्या. त्यामध्ये १,४१९ मुली शिक्षण घेत होत्या.स्त्री शिक्षणासाठी भरीव कार्य राजांनी आपल्या संस्थानात केले. याचाच परिणाम म्हणून आज प्रत्येक क्षेत्रामध्ये मुलींची उंच भरारी आहे. त्यासोबतच मुलींच्या शिक्षणाला सर्वांनीच प्रोत्साहन द्यावे यासाठी त्यांनी इनामेसुद्धा जाहीर केली. महाराजांनी शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलींना उपस्थिती भत्ता द्यायला सुरुवात केली. एवढेच नव्हे तर महाराजांनी मुलींना उच्च शिक्षणदेखील मोफत दिले. कोल्हापुरातील राजाराम कॉलेजमध्ये मुलींच्या उच्च शिक्षणाची महाराजांनी सोय केली. मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

**वसतिगृहे हीच ज्ञानगृहे**

तळागाळातील लोकांच्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी महात्मा फुले व तत्कालीन समाजसुधारकांनी शाळा काढल्या, शिक्षणाची दारे उघडली. तोच कित्ता शाहू महाराजांनी पुढे चालवला. त्यात भर म्हणजे ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहायचे कुठे हा प्रश्न सतावत असे. हे महाराजांच्या लक्षात आले, त्या वेळी त्यांनी १८९६ साली सर्व विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह काढले. कोणत्याही परिस्थितीत सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये यासाठी महाराजांनी हा पर्याय निवडला. विशेष म्हणजे काळाच्या ओघात त्यांचा हा पर्याय कमालीचा यशस्वी ठरला. कारण याच सर्व वसतिगृहांतून अनेक नामवंत तयार झाले. १९०१ ते १९२२ या बावीस वर्षांच्या कालखंडात शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानात भिन्नभिन्न जातींची २३ वसतिगृहे स्थापन करून त्या त्या जातींच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोलाची मदत केली. घरापेक्षा ही वस्तीगृहात दर्जेदार सुविधा मिळाल्या पाहिजेत, वसतीगृहाचे आकर्षण मुलांना वाटले पाहिजे. मुले वसतीगृहात रमली तरच मन लावून अभ्यास करतील असे महाराजांना वाटायचे त्यामुळेच कोल्हापूरची वसतिगृहे ही होतकरू मुलांसाठी ज्ञानगृहे बनली. महाराजांनी सुरू केलेली वस्तीगृहांची चळवळ फक्त कोल्हापूर एवढीच मर्यादित न राहता शाहू महाराजांची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रभर अनेक वसतिगृह निघाली.

ब्रिटिश पार्लमेंटला 'मदर ऑफ पार्लमेंट्स'असे मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात. त्याप्रमाणे कोल्हापुरास 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस'म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असे सार्थ यश मिळाले आहे .सर्व जातींसाठी एक बोर्डिंग काढण्याचा १८९६ मध्ये केलेला प्रयोग अयशस्वी झाल्यानंतर १९०१ पासून शाहू महाराजांनी प्रत्येक जातीचे बोर्डिंग काढण्यास सुरुवात केली. १९०१ मध्ये यातील पहिले व्हिक्टोरिआ मराठा बोर्डिंग सुरू झाले. ग्रामीण भागातून शहरी भागात शिकण्यास येणाऱ्या विविध जाती-धर्मांच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन केली. त्यामध्ये १९०१ मध्ये मराठा विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना कोल्हापूर येथे केली. नाशिक येथे उदाजी विद्याधी वस्तीगृह उभारले व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांमध्ये येऊन शिक्षण घेण्याची संधी प्राप्त करुन दिली. १९०२ मध्ये राज्यातील मागासवगीय विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय सेवेमध्ये पाच टक्के जागा राखीव ठेवल्या. नाशिकमधील 'श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृह'या संस्थेच्या इमारतीची पायाभरणी करीत असता त्यांनी जे भाषण केले आहे, त्यात त्यांनी म्हटले आहे. "माझ्या चिमुकल्या राज्यातील प्रजाजनांनी एका बाबतीत तरी विशेष नाम कमविले आहे. हे मी अभिमानपूर्वक सांगतो." त्यांचे उदाहरण लोकांपुढे आल्याने हा कित्ता पुष्कळ ठिकाणी गिरविला गेला आहे. नाव जरी मराठा बोर्डिंग असले तरी मराठा विद्यार्थ्यांशिवाय ब्राह्मण, मुसलमान, शिंपी व अस्पृश्य जातीतील

मुलेही तेथे राहात होती. हळूहळू वीस वसतिगृहे संस्थानात सुरू झाली. त्यामध्ये दिगंबर जैन बोर्डिंग, वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह, मुस्लिम बोर्डिंग, मिस क्लार्क होस्टेल, दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, श्री नामदेव बोर्डिंग, पांचाळ ब्राह्मण वसतिगृह, श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन होस्टेल, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, ढोर-चांभार बोर्डिंग (इंदुमती बोर्डिंग), शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, सुतार बोर्डिंग, नाभिक विद्यार्थी वसतिगृह, सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग, श्री देवांग बोर्डिंग अशी बोर्डिंग समाविष्ट होती. या वसतिगृहांना त्यांनी जागा दिल्या. काहींना इमारतींसह जागा दिल्यामुळे कोल्हापुरात वीस वसतिगृहे स्थापन झाली.ही वसतिगृहे महाराजांनी आपल्या संस्थानाच्या बाहेर असणाऱ्या मोठ्या शहरात गोरगरीब आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुरू केली. परिणामी ग्रामीण वा इतर भागांतून येणाऱ्या सर्वसामान्य आणि गरीब मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हायला मदत झाली. त्यांनी जसजसा शिक्षणाचा प्रसार होईल तसतसा जातिभेद कमी होत जाऊन कालांतराने जातिवाचक बोर्डिंगे काढण्याची आवश्यकता राहणार नाही, असे त्यांना वाटू लागले. या वसतिगृहामधून शिकलेल्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे दिसून येते. शाहू महाराजांची कोल्हापुरातील बोर्डिंगची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बोर्डिंग निघाली. पुणे, नाशिक, अहमदनगर व नागपूर या ठिकाणच्या वसतिगृहांना महाराजांनी सढळ हाताने मदत दिली. पुण्यातील शिक्षण संस्थांनासुद्धा शाहू महाराजांनी मदत केली.

**शिष्यवृत्ती व नादारी-** छत्रपती राजश्री शाहू महाराजांनी १९११ मध्ये एक जाहीरनामा काढून १५ टक्के विद्याथ्यांना नादारी देण्याची घोषणा केली. नादारी म्हणजे गरीब व होतकरू विद्याध्यांना शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी होती. या नादारी च्या माध्यमातून हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत असे समाजातील दलित व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील बालकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. कित्येक बालके बालवयात अति कष्टाचे श्रम करण्यास जात होती. परिणामी त्यांना प्राथमिक शिक्षणाच्या हक्कापासून वंचित राहावे लागते. राजश्री शाहू महाराजांनी बहुजनांच्या मुलांना शिक्षणाची दारे खुली करुन दिली. हुशार विद्यार्थाना खास शिष्यवृत्त्या मंजूर केल्या. ७ एप्रिल १९१९ रोजी अस्पृश्य मुलांच्या शैक्षणिक साहित्यासाठी अडीच हजार रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर केली. अस्पृश्य विद्यार्थ्यांना दरमहा आठ रुपयांप्रमाणे खास शिष्यवृत्त्या जाहीर केल्या.महाराजांचे धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांचे अपघाती निधन झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ महाराजांनी 1920 साली 'अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजना'करिता 10 हजार रुपयांचा प्रॉमिसरी नोट तयार करून ठेवल्या आणि त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपये प्रमाणे आठ शिष्यवृत्त्या सुरू केल्या. विशेष म्हणजे त्यापैकी तीन शिष्यवृत्त्या अस्पृश्य मुलींच्यासाठी ठेवल्या गेल्या होत्या. संस्थानात जर अशा मुली मिळाल्या नाहीत तर संस्थानाबाहेरच्या अस्पृश्य मुलींना त्या द्याव्यात, असेही महाराजांनी आपल्या त्या हुकमात म्हटले आहे.

**ट्रेनिंग शाळा-**विद्यार्थ्यांना शिक्षण देणा-या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी कोल्हापुरात सन १८६७ मध्ये ट्रेनिंग शाळेची स्थापना करण्यात आली. या शाळेत तीन वर्षे अभ्यासक्रम चालत होता. सन १८८३-८४ पूर्वी या शाळेमधून सरासरी दहा विद्यार्थी शिक्षक होवून बाहेर पडत असत. तसेच स्वीशिक्षक तयार करण्याकरिता सन १८८२ मध्ये स्त्रियांचा ट्रेनिंग वर्ग सुरू करण्यात आला. सन १८८६-८७ मध्ये मिस लिटल या ट्रेनिंग वर्गाच्या सुपरिटेंडेंट होत्या. सन १८८५ पर्यंत एकूण १६४ प्रशिक्षित शिक्षक बाहेर पडले होते.

**'मागेल तेथे शाळा'-**शिक्षण प्रसाराचा केंद्र बिंदू खेडे गाव आहे. गाव तेथे शाळा हा संदेश दिला म्हणून गावात पाटील शाळा काढल्या गेल्या होत्या. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामधील अस्पृश्यांचा आणि मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे ठरवले होते. त्या काळच्या समाजव्यवस्थेचा विचार करता स्पृश्य आणि अस्पृश्य हे एकत्र शिकणे खूप कठीण काम होते. म्हणून त्यांनी अस्पृश्यांसाठी वेगळ्या शाळा काढल्या होत्या. सुरुवातीला पाच शाळांवरून सुरू झालेला प्रवास २७ शाळांपर्यंत जाऊन पोहोचला. मोठ्या प्रमाणात गोरगरिबांना शिक्षणाचा अधिकार मिळावा. यासाठी महाराजांनी विशेष प्रयत्न केले. त्यातील महत्त्वाचा भाग म्हणजे २४ नोव्हेंबर १९११पासून सर्व विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण करण्यात आले. हे करत असताना फक्त जाहीरनामा काढून महाराज थांबले नाहीत, तर त्यांनी असाही आदेश काढला, की जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार माहीत त्यांना एक रुपया दंड करण्यात येईल. त्यामुळे शिक्षणाबद्दलची अनास्था कमी व्हायला मदत झाली. लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजायला सुरुवात झाली.'मागेल तेथे शाळा' ही महत्वाची शिक्षण चळवळमहाराजांनी आपल्या संस्थानात सुरू केली. महाराजांनी त्या काळात जवळजवळ १००च्या आसपास शाळा सुरू करून विद्यार्थ्यांना नवी दिशा दिली. महाराज स्वतः या शिक्षणाच्या कार्यावर लक्ष ठेवून होते.

**प्रौढ शिक्षण-**या सर्व शिक्षणाबरोबरच महाराजांनी प्रौढ शिक्षणासही सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी शिक्षक नेमले, यासोबतच ज्यांना राहायचे असेल, त्यांनादेखील सोय उपलब्ध करून देण्यात महाराजांनी आघाडी घेतली.कोल्हापुरात रात्रशाळाही सुरू होत्या. मजूर,

करागीर, कुणबी, माळी, गवंडी, यांना दिवसा काम करून रात्री शिक्षण घेता यावे म्हणून कर्नल अंडरसन यांनी रात्रशाळा सुरू केल्या. सन १८७१ मध्ये कोल्हापूर शहरात पहिली रात्रशाळा सुरू करण्यात आली. सन १८८३ मध्ये रात्रशाळांची संख्या एकोणीस झाली होती. सन १८८३-८४ मध्ये कोल्हापूर येथील मध्यवर्ती तुरूंगामध्ये कैद्यांना शिक्षण देण्यासाठी रात्रशाळा सुरू केली होती. या शाळेची वेळ सांय ६ वे ८ अशी होती. सन १८९३-९४ मध्ये रात्रशाळांची संख्या राज्यात चार असून त्यामध्ये ११५ विद्यार्थी शिकत होते." राजाराम कॉलेजमध्ये चित्रकला वर्ग, शेतकी वर्ग सुरू करण्यात आले होते. शेतकी वर्ग श्री. डी. बी. मराठे यांच्या देखरेखीखाली होता. राजाराम कॉलेजमध्ये शारिरीक शिक्षणाकडेही लक्ष दिले जाई. येथील व्यायामशाळेचा दररोज वापर केला जाई राजाराम कॉलेजमध्ये उत्तमपणे क्रिकेट हा खेळ खेळला जात होता. जयसिंगपूर टेक्निकल शाळेत पितळी ओतकाम, सुतारकाम, चित्रकला, भूमिती, शिल्पकला व स्थापत्यशास्त्र हे विषय शिकवले जात असत. महाराजांनी आपल्या संस्थानात शिक्षणासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. संस्थानात राहणारा दीन-दलित-सर्वसामान्य-गोरगरीब-बहुजन-अल्पजन या सगळयांना महाराजांनी त्यांच्या त्यांच्या कुवतीनुसार, त्यांच्या त्यांच्या क्षमतेनुसार शिक्षणात जिथे मिळेल तिथे संधी दिली. शक्य होईल तेवढे सहकार्य उपलब्ध करून दिले. मग त्यांनी त्यासाठी कधीही वशिला, भेदाभेद, लहान-मोठेपणा हा फरक केला नाही. ज्या वेळी त्यांनी मोफत शिक्षणाचा कायदा केला, त्या वेळी ते स्वतः लक्ष घालून होतेच, शिवाय कुणीही कसल्याही प्रकारची फी वा शुल्क आकारले, तर त्याच्यावरदेखील महाराजांनी कारवाई केल्याचे आढळते. शिक्षणातून जगण्याचा नवा मार्ग उपलब्ध होतो. यामुळे शिक्षणावर एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करणारे महाराज जगातील एकमेव संस्थानिक असावेत. त्यांच्याकडे जी जी व्यक्ती शिक्षणासाठी मदत मागायला गेली, ती रिकाम्या हाताने कधीच परत आली नाही. त्यांच्या याच कार्याचा आधार घेत महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या असंख्य लोकांनी शिक्षणाचा प्रवाह सतत प्रवाही ठेवला. त्यामुळे आज महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणून संबोधले जाते.

**बहुजन शिक्षण-**महाराज दलितोद्धारक होते, डॉ. आंबेडकरांनी त्यांचा समाजक्रांतिकारक म्हणून गौरव केला व आज तर 'फुले-शाहू-आंबेडकर प्रेरणा'असा शब्द प्रयोग समतेची प्रेरणा या अर्थी रूढ झालेला आहे. शाहू महाराजांनी समाजजीवनाचे बारकाईने निरीक्षण केले. आलेल्या अनुभवांचा उपयोग राजाने रयतेच्या हितासाठी केला. आपल्या राज्यात जनहिताचे अनेक कायदे केले. 'प्रजस्य सुखम्, सुखम राजा'प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे, हे धोरण अमलात आणले. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाला तरणोपाय नाही, हे महात्मा फुले यांनी जाणले होते. या धोरणाचा स्वीकार शाहू महाराजांनी केला. हा प्रश्न सोडविण्याची इच्छाच नव्हती. म. फुल्यांनी हा प्रश्न सोडविण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला. महात्मा फुले यांच्या 'बहुजन हिताय'विचारांचा वारसा आपल्या प्रत्येक कृतीतून प्रत्यक्षात आणणाऱ्या महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाचा कार्यक्रम जाणीवपूर्वक हाती घेतला. शूद्रातिशूद्रांच्या मुलांसाठीच नव्हे तर मुलींच्यासाठीही त्यांनी प्राथमिक शाळा काढल्या पण त्यांच्या प्रयत्नांना साधनांच्या मर्यादा होत्या. त्यांच्याजवळ ना होती संपत्ती, ना होती सत्ता. तरीही त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केलेले कार्य हे एका महान क्रांतीचे उगमस्थान ठरले! शूद्रातिशूद्रांच्या प्राथमिक शिक्षणाच्या या बिकट प्रश्नास हात घालणारा दुसरा महापुरुष म्हणजे राजर्षी शाहू छत्रपती ! त्यांच्याजवळ सत्ता होती, साधनसंपत्ती होती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्याजवळ शूद्रातिशूद्रांच्या उध्दाराची तळमळ व इच्छाशक्ती होती.कोल्हापूर राज्यात मुस्लीम धर्मियांच्या मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी तीन शाळा होत्या. मागासवर्गीय मुलांना शिक्षण देण्यासाठी कोल्हापूर राज्यात सन १८८९-९० मध्ये चार शाळा होत्या. त्या शाळांमध्ये १७२ विद्यार्थी शिकत होते. तर सन १८९१-९२ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेत १५६ विद्यार्थी शिकत होते. कोल्हापूर येथे चांभार जातीच्या मुलांसाठी स्वतंत्र एक शाळा होती त्यात ६० विद्यार्थी शिकत होते.१८९६-९७ मध्ये करवीर राज्यात अस्पृश्यांच्या शाळा ६ होत्या आणि त्यामधील विद्यार्थ्यांची संख्या १९६ होती. हीच संख्या शाहू छत्रपतींच्या प्रयत्नांमुळे १९१० मध्ये ६९४ इतकी झाली. तर शाळांची संख्या २२ इतकी वाढली. शाहू छत्रपतींनी खासगी खर्चातून सोनतळी, स्टेशन बंगला आणि रुकडी येथे अस्पृश्य विद्यार्थी वसतिगृहे चालविली. त्यानंतर १९०८ मध्ये कोल्हापुरात खास अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी मिस क्लार्क वसतिगृह उघडले. याखेरीज १९१८ मध्ये आर्य समाज गुरुकुल, वुडहाऊस वसतिगृह, १९१९ मध्ये ढोर-चांभार जातीतील मुलांसाठी इंदुमती राणीसाहेब वसतिगृह, १९२० मध्ये पंढरपूरला अस्पृश्य वसतिगृह सुरू केले. नाशिक व नागपूर येथील चोखामेळा बोर्डिंग हाऊस या अस्पृश्य वसतिगृहांना शाहू छत्रपतींनी प्रत्येकी पाच हजार रुपये देणगी देऊन हातभार लावला. अस्पृश्यांच्या वसतिगृहांची केवळ सोय करून शाहू छत्रपती थांबले नाहीत; तर त्यांनी २४ सप्टेंबर १९११ रोजी मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी माफ करण्याचा ठराव मान्य केला. जातिभेद नष्ट करण्यासाठी अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करण्यात आल्या. अस्पृश्यांची मुले स्पृश्यांच्या मुलांसोबत शिकू लागली. खेड्यातील शेतकऱ्यांच्या मुलांनी सकाळी किंवा संध्याकाळी दोन तास शाळेत जावे व बाकीचा वेळ शेतीकामात घालवावा, अशी सवलत देण्यात आली.राजर्षी शाहू

महाराजांनी आपल्या संस्थानामधील अस्पृश्यांचा आणि मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे ठरवले होते. त्या काळच्या समाजव्यवस्थेचा विचार करता स्पृश्य आणि अस्पृश्य हे एकत्र शिकणे खूप कठीण काम होते. म्हणून त्यांनी अस्पृश्यांसाठी वेगळ्या शाळा काढल्या होत्या. सुरुवातीला पाच शाळांवरून सुरू झालेला प्रवास २७ शाळांपर्यंत जाऊन पोहोचला.

महात्मा फुले यांच्याप्रमाणेच राजर्षी शाहू छत्रपती शिक्षण हा आधुनिक काळातील बहुजनांना उध्दारणारा महान तारक मंत्र आहे, असे मानत होते. शिक्षण ही सर्व प्रकारच्या सुधारणांची गुरुकिल्ली आहे, यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. प्राथमिक शिक्षणाचा शुभारंभ करताना विविध शाळा काढल्या. १. प्राथमिक शिक्षण, २. दुय्यम शिक्षण ३. पुरोहित शाखा १८९९ ४. पाटील शाळा, ५. उद्योग शाळा, ६. संस्कृत शाळा, ७. सत्यशोधक शाळा, ८. डॉबारी मुलांची शाळा, ९. कला शा. वेदोक्त प्रकरणातून 'पुरोहित शाळेचा जन्म झाला, देशातील कोणत्याही धर्माचा व जातीचा माणूस पुरोहित होऊ शकतो यातून महाराजांनी जन्माधिष्ठित पूरोहित गिरीच्या मक्तेदारीला सुरुग लावूण वैदिक धर्माचे दरवाजे सर्वांसाठी खुली केली. आपल्या देशाला कमी लेखू नये म्हणून त्यांनी भावी राजा तयार करण्यसठी युवराज शाळा काढल्या 'बहुजन हिताय, बहुजण सुखाय'हा शाहू महाराजांच्या शिक्षणाचा मुलमंत्र होता.

**समारोप-**बहुजन समाजोद्धारक, समाज क्रांतिकारक, आरक्षणाचे जनक, उपेक्षित, वंचित व निराधारांचे भक्कम आधार, शैक्षणिक क्रांतीचे शिल्पकार, कला, क्रीडा संस्कृतीचे आश्रयदाते, कुस्तीचे चाहते, हरित क्रांतीचे निर्माते, सहकाराचे जाणते, उद्योग, व्यवसाय व व्यापारांचे महाराष्ट्राचे भाग्यविधाते, भारतातील सामाजिक राजकीय उद्गाते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जीवनकार्य सर्व पिढ्यांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे.समाजात एकरुपता यावी. सर्वांना शिक्षणाचा, जगण्याचा समान अधिकार मिळावा यासाठी झटणारा राजा म्हणून शाहू महाराजांची किर्ती आहे. केवळं राजेपण न मिरवता सामाजातील प्रत्येक घटकासाठी आपला उपयोग व्हावा यासाठी शाहू महाराज अखंड आयुष्य झटत राहिले. सक्तीचं शिक्षण, स्त्री सक्षमीकरण, समानता, दिनदुबळ्यांना त्यांचे मुलभूत अधिकार मिळवून देणे, जातीव्यवस्थेतील विषमता दूर करणे अशी अनेक महान कामं महाराजांनी त्यांच्या कालखंडात पार पाडली.राजर्षी शाहूंनी दूरदृष्टीने राबविलेले शिक्षण धोरण शिक्षणाला सर्वसमावेशक बनवत गेले आणि आधुनिक भारताच्या उभारणीत ते महत्त्वाचा टप्पा ठरले आहे. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. महात्मा फुले यांच्याप्रमाणेच राजर्षी शाहू छत्रपती शिक्षण हा आधुनिक काळातील बहुजनांना उध्दारणारा महान तारक मंत्र असून शिक्षण ही सर्व प्रकारच्या सुधारणांची गुरुकिल्ली आहे, यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. या श्रद्धेतून त्यांनी शिक्षणाचा प्रवाह अखंड प्रवाही ठेवला.

संदर्भ ग्रंथ-

१) डॉ जयसिंगराव पवार – श्री शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती २००१
२) राजर्शी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई १९७६.
३) देशपांडे, सागर: मासिक जडण-घडण, सप्टेंबर २०१७.
४) जाधव, रमेश: राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई २०१६.
५) पवार, जयसिंगराव (संपा.): राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितियावृत्ती, २००७.
६) करवीर राज्याचा इतिहास, श्री महाराणी ताराबाई टिचर्स कॉलेज पुस्तकालय, नं.१.
७) शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २००९

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

41

# राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्याचा थोडक्यात आढावा

**सौ. संगीता किरण लोखंडे**
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग
भाई तुकाराम कोलेकर कॉलेज, नेसरी

---

**प्रस्तावना:-** छत्रपती शाहू महाराज यांचा उल्लेख केला जातो. असा महान समाजसुधारकांचा जन्म जन्म 26 जून 1874 मध्ये कोल्हापूर येथील कागल या गावी झाला त्यांच्या वडिलांचे नाव आबासाहेब तर आईचे नाव राधाबाई होते.ब्रिटिश काळामध्ये बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी शाहू महाराजांनी अनेक प्रयत्न केले. त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले, स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. त्यांनी आपली संपूर्ण आयुष्य दलितांच्या उद्धारासाठी आणि बहुजनांच्या उत्कर्षासाठी आपली संपूर्ण आयुष्य पणाला लावले व जनतेच्या नेहमी सुखासाठी व त्यांना नेहमी चांगले राहणीमान, माणुसकीची योग्य वागणूक मिळावी, त्यांना सुखी जीवन जगता यावे यासाठी नेहमी अहोरात्र प्रयत्न केलेले आहेत. सर्वसामान्य जनतेला, बहुजनांना माणुसकीची वागणूक मिळावी त्यांना योग्य जीवनमान जगता यावे यासाठी अहोरात्र प्रयत्न केले आहे. कोल्हापूर संस्थानामध्ये जो बहुजनांचा विकास झाला आहे त्यांचा विकास करण्यासाठी राजश्री छत्रपतींचा मोलाचा वाटा आहे.

राज्याचे छत्रपती शाहूंनी त्या काळामध्ये अस्पृश्यता, असमानता आणि ब्राह्मणवादी व्यवस्था होती, ही व्यवस्था बहुजनांच्या विकासासाठी घातक आहे हे मोडून काढण्यासाठी छत्रपती शाहूंनी रूढी परंपरे विरुद्ध जाऊन मोलाचे कार्य केले आहे व ब्राह्मणांची वर्चस्व कसे कमी होईल व बहुजनांना कसा न्याय मिळेल यासाठी नेहमी पुढाकार घेतलेला आहे. शाहूं महाराजांनी बहुजन समाजाला या रूढी परंपरेतून आणि समाज व्यवस्थेतून बाहेर काढण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले होते.

शाहू महाराजांची सामाजिक, शैक्षणिक कार्य लक्षात घेता कानपूरच्या कुरमी समाजाने शाहू महाराजांना राजश्री ही पदवी दिली. ही पदवी शाहूंनी समाजाच्या व जनतेच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याची दखल होती. शाहू महाराज हे लोकशाहीचे आधारस्तंभ होते, राजश्री छत्रपती शाहू महाराज आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी पुढे समाजाच्या उन्नतीसाठी महात्मा फुले यांनी सुरू केलेली सत्यशोधक समाजाची प्रभावशाली परंपरा चालू ठेवली या सत्यशोधक समाजामार्फत समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले, सामाजिक रूढी परंपरेचे नेहमी आवाज उठवला, निरक्षरता कमी करण्यासाठी अनेक बोर्डिंग सुरू केले (जैन बोर्डिंग, प्रिन्स मराठा बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, महार मांग बोर्डिंग) अनेक आश्रम शाळा व बोर्डिंग निर्माण केले, अनेक चांगले नेतृत्व तयार केले आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. आज निव्वळ दलितांना राखीव जागा मिळाल्या पाहिजेत, आरक्षणाविषयी नेहमी डांगोरा फिटणारे हे राज्यकर्ते पाहता शंभर वर्षांपूर्वी दलितांना योग्य न्याय,मानसन्मान देणाऱ्या राजश्री शाहू छत्रपतींची थोरवी दिसून येते. म्हणजेच भविष्यात दलितावर होणारा अन्याय व त्यांना मिळणारी वागणूक लक्षात घेता शाहू महाराजांनी भविष्याचा विचार करून अगोदरच दलितांना आरक्षण दिले होते त्यांचे किती महान विचार होते हे आपणाला दिसून येते, म्हणून एक महानराजा म्हणून राजश्री छत्रपती शाहूंच्या कडे पाहिली जाते.

गंगाराम कांबळे याला हॉटेल उभारण्यासाठी अर्थसहाय्य करून नेहमी आपल्या सहकार्यासोबत त्यांच्या हॉटेलवर जाऊन स्वतः फक्कड चहा घेत हे म्हणजे समता व एकतेचे सांगड घालणारा राजाचे नीतिमंत उदाहरण दिसून येते. शिकारी करतेवेळी वाड्या-वस्तीवर जी महार मागांची जी घरे असतात त्या घरामध्ये जाऊन आवडीने व चवीने मीठ भाकरीवर ताव मारत खात असत यातून एक राजा आपल्या जनतेसाठी समान संधी व जनता ही राजासाठी एकच असते त्याचे नीतीवंत उदाहरण म्हणून कोल्हापूर संस्थानाकडे पाहिले जाते. आपल्या संस्थानात शेतीचे नवनवीन प्रयोग केले, कोल्हापूरमध्ये प्रथमच कॉफीची पीक घेण्याचा आधुनिक प्रयोग केला, पाटबंधारे योजना तयार केल्या, राधानगरी धरण बांधले, शाहूपुरी, लक्ष्मीपुरी बाजारपेठ, जयसिंगपूर बाजारपेठ अशा अनेक गुळाच्या व व्यापारी बाजारपेठा वसवून कोल्हापूरचा विकास करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले गेले.

आपल्या संस्थानात कृषी प्रदर्शनी भरून हरितक्रांतीची मुहूर्त मुहूर्तमेढ रोवली, शाहू स्पिनिंग मिल स्थापन करून कोल्हापूर जनतेला रोजगार देण्यासाठी व औद्योगिकरणाचा पाया घालण्यासाठी पुढाकार घेतला गेला. आजही शाहू मिल महाराष्ट्रातील पहिली मिल होय, राजश्री शाहूंनी आधुनिकीकरणाचा स्वीकार करून जनतेला रोजगार भिमुख बनवले व जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले.आपल्या संस्थानात कलाकार, कुस्तीगीर, होतकरू हुशार विद्यार्थ्यांना मानधन व खुराक दिले, परदेशी शिक्षणाची संधी निर्माण करून दिल्या, होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्यांचे शिक्षण पूर्ण करून घेतले, बहुजन समाजातील

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

पात्र लोकांना होतकरू विद्यार्थ्यांना वकिलांच्या सनदा बहाल केल्या.या सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी राजश्री शाहूंनी आपल्या संस्थानाचा खजिना मुक्त हस्ते रिकामा केला. निरक्षरतेमुळे दैनंदिन दुःख सोसत बसलेल्या जनतेसाठी ज्ञानयज्ञ उभारून त्यांना समर्थ बनवले, शाहू राजांनी गरिबांच्या झोपडीपर्यंत व पारध्याच्या पालापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवली. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अभिषेक घालणारे राजश्री शाहू छत्रपती आणि याउलट "मागेल त्याला शाळा" व "देणगी त्याला प्रवेश" हे धोरण राबवणारे आजचे राज्यकर्ते व शिक्षण सम्राटनि केलेला शिक्षणाचा खेळखंडोबा बघितल्यावर आपण राजश्रींचे नाव उच्चारायला लायक आहोत का हा प्रश्न पडतो.

राजश्री शाहू महाराजांनी आपल्या 28 वर्षाच्या कारकिर्दीत केलेल्या विविध अंगी कार्यामुळे कोल्हापूर संस्थांमध्येच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनला सुरुवात केली. वेदोक्त चळवळ, अस्पृश्यता निवारण व मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वस्तीग्रहाची चळवळ, अस्पृश्यतोउद्धार या विषयी सामाजिक क्षेत्रात विविध अंगी कार्य केले. छत्रपती शाहू महाराजांच्या पुरोगामी शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार झाला, त्यांच्या शैक्षणिक कार्यापासून प्रेरणा घेऊन बहुजन समाजातील अनेक नेत्यांनी आपापल्या भागात बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण क्षेत्राची स्थापना केली, शाहू महाराजांनी जातिभेद निर्मूलन, अस्पृश्य उद्धार, स्त्री शिक्षण, आंतरजातीय विवाह कायदा या उपायाद्वारे सामाजिक उन्नतीसाठी सतत प्रयत्न केले हे कार्य करीत असताना त्यांना टीकाही सहन करावी लागली तरीही ते आपल्या कार्यापासून विभक्त झाले नाहीत. शाहू महाराजांच्या काळात कोल्हापुरात सुरू झालेल्या वस्तीगृहाचा कोल्हापूर संस्थानातील तसेच संस्थांना बाहेर हजारो विद्यार्थीना उपयोग झाला व आजही होत आहे.

बहुजन समाजातील तीन-चार पिढ्या व वस्तीगृहाणे घडवल्या व आजही हे कार्य सुरू आहे भारत सरकारच्या परराष्ट्र सेवेतील वरिष्ठ अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यासारख्या अनेक नामवंत व्यक्तींचा वस्तीगृहाच्या विद्यार्थ्यांमध्ये समावेश होतो. शाहू महाराजांनी केलेल्या विविध अंगी सुधारणामुळे कोल्हापूर हे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणाचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. शाहू महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन नवे नेतृत्व आधुनिक महाराष्ट्राच्या किंबहुना आधुनिक भारताच्या उभारणीमध्ये मोलाची कामगिरी बजावत आहेत. सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात क्रांतिकारी ठरलेल्या निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी होय. हेच शाहू महाराजांचे वेगळेपण होते.

- ✓ बहुजन समाजाचे व्रत परिश्रमपूर्वक साध्य केले.
- ✓ सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी कार्य केले.
- ✓ शाहू महाराजांनी 1902 नंतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचा ऐतिहासिक जाहीरनामा काढला.
- ✓ महाराष्ट्रातील या निधड्या छातीचा क्रांतिकारक राजा आपल्या राज्यात अस्पृश्यता निवारण कायद्याची कसौशीने अंमलबजावणी करत होता हे दृश्य भारतीय समाज प्रबोधनाच्या इतिहासातील सोनेरी पान आहे.

शाहू महाराजांच्या दूर-दृष्टीमुळे करवीर संस्थान पाण्यापासून धान्यापर्यंत संपन्न झाली ही संपन्नता अनेक क्षेत्रात विशेषता औद्योगिक, शैक्षणिक क्षेत्रात कामे आली आहे. अत्यंत अवघड परिस्थितीत राज्यकारभार करण्याची आव्हान वयाच्या अवघ्या 20 वर्षी छत्रपतींनी स्वीकारले. अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून सर्वसामान्य लोकांच्या कल्याण साधण्याचे कार्य हाती घेतले. अशा महानराजाला मानाचा मुजरा.

**संदर्भसूची:-**

1. 5 जानेवारी 2004 वर्तमानपत्र सकाळ सुधाकर काशीद
2. महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत साहित्य विद्याभारती प्रकाशन
3. महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन कोल्हापूर
4. के-सागर सोशल रिफॉर्मन्स इन महाराष्ट्र के सागर पब्लिकेशन 2006
5. समकालीन राजकीय चळवळी- प्रकाश पवार
6. शाहूच्या आठवणी मराठी लेखक प्राध्यापक नानासाहेब साळुंखे
7. वारसा गोविंद पानसरे संजय प्रकाशन
8. शाहूचे आत्मचरित्र गोविंदराव तांबे
9. लोक राजा राजश्री शाहू- छत्रपती सुरेश एजन्सी पुणे प्रथम आवृत्ती 1997
10. राजश्री शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य प्रथम आवृत्ती 2003

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

42

# छत्रपति शाहू महाराज,सहकार कृषी उद्योग प्रणेते

**डॉ. महादेव आ. शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:** शाहू महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवणयंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार, चांभार पैलवानांना सरदार ,पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली.

अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले.तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना वाळीत टाकले होते त्यावेळेस शाहूंनी त्यांना कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांत कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले.महाराजानी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांचे संबंध चांगले होते. डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक'हे पाक्षिक ३१ जानेवारी १९२०ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ आर्थिक मदत केली.

**लोकराजा छत्रपती शाहू महाराज आणि जागतिकीकरण-** सन १९९१ पासून आपण जागतिकीकरणाचा स्वीकार केला. गेली तीन दशकांहून अधिक काळ आपण जागतिकीकरणाच्या वातावरणामध्ये वावरत आहोत. खरं म्हणजे जागतिकीकरण ही संकल्पना आपण खूप उशिरा स्वीकारली आहे. लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी जागतिकीकरणाशी स्वत:ला आणि कोल्हापूर संस्थानला शंभर वर्षांपूर्वीच जोडले होते. त्यामुळेच ब्रिटनमधील मँचेस्टरची मशिनरी शाहमिलमध्ये आलेली दिसते. राजर्षी शाहूंनी इंग्रजी शिक्षणाचा पाया घातलेला दिसतो. मेरी वेदर किंवा मेरी वॉलन्सेस यांना नवे काही उभारण्याचे बळ दिलेले दिसते. त्याकाळात विदेश दौरा करण्यास तीव्र विरोध होत असे. शिवाय विदेश दौरा केलाच तर पूजा-अर्चा करण्याची सक्तीच होती. अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून छत्रपती शाहू महाराजांनी विदेश दौरा केला. केवळ सहल म्हणून दौरा केला नाही; तर सन १९०२ च्या युरोपच्या दौऱ्यात छत्रपती शाहूंनी पाश्चात्त्यांच्या प्रगतीचे, आधुनिक ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाचे, आधुनिक प्रकल्पाचे बारकाईने निरीक्षण केले. युरोपातील लोकांनी नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रत्येक स्रोत मोठ्या कल्पकतेने वापरून आपली भौतिक प्रगती केल्याचे छत्रपती शाहूंनी पाहिले. आपल्याकडेही असं का होऊ नये, असे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. त्यातून वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर व पाणी टंचाईवर कायस्वरूपी मात करण्याचा निर्णय छत्रपती शाहूंनी घेतला.छत्रपती शाहू महाराजांनी सन १९०२ मध्ये कोल्हापूर संस्थानचे 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले. १९०२ सालच्या या पाटबंधारे धोरणामध्ये असे म्हटले होते की, 'संस्थानात इरिगेशन होण्याचे तलाव कोठे आहेत. त्यांस पाण्याचा पुरवठा कोठून होतो. वर्षभर तिमाही पाणी किती येते, किती पाण्याचा उपयोग करता येईल, तलाव बांधून पाणी आल्यास गाळ कोणत्या जातीचा येईल, त्यापासून शेतीचा फायदा अगर गैरफायदा होईल, वगैरे गोष्टींबद्दल माहिती खुलासेवार घेण्याची आहे.' तसेच स्वतंत्र पाटबंधारे विभाग स करून त्यावर खास 'इरिगेशन

ऑफिसर'ची नेमणूक करण्यात आली. राजर्षी शाहूच्या हयातीत राधानगरी धरणाचे संपूर्ण काम होऊ शकले नाही. मात्र राधानगरी धरण हे छत्रपती शाहूचे जीवितकार्य बनले होते.

रयतेचा राजा राजश्री शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी सहकार सामाजिक कृषी उद्योग आदी विविध क्षेत्रात बरीव कार्य केले राजश्री शाहू महाराज यांची आज जयंतीच्या निमित्त प्रसंगीत माणसाच्या जीवनाचा उल्लेख त्याच्या कर्तुत्वाने गुणलेला असतो असे म्हटले जाते त्याच्या कर्तृत्वाशी त्याची कार्य जोडलेली असते या कार्यावरील त्याची नितांत असलेले निष्ठा त्याची प्रेरणा होऊ शकते त्या प्रेरणे चुकून जे कार्य जन्म घेते ते कार्य उजळते प्रकाशमान होते निखळ परिणाम त्या संपत्तीत होतात राजश्री शाहू महाराज

राजेपणापासून फारकत घेऊन पायउतार झाले आणि रयतेच्या सुखदुःखाशी समरस झाले. त्यावेळी पासून एका समाज उत्क्रांतीला सुरुवात झाली ही क्रांती विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सुरू झाली आणि तिचे पडसाद आजही 21 व्या शतकात उमटतात याचा करता करिता केंद्रबिंदू आहे राजश्री छत्रपती ते अष्टावदनी होते हे तर खरेच शिवाय ते खरे कर्मवीर होते त्या कर्माला शिस्त आणि विचार यांची जोड होती म्हणूनच त्यांचे विचार क्रांती यशस्वी झाली राजश्री शाहूंच्या वेळच्या कालमान परिस्थिती याचा वेध घेता त्यांनी जे काही निर्णय घेतले ते काल सुसंगतच म्हणावे लागतील काही निर्णय भविष्याच्या दृष्टीने विसंगत वाटत होते तरीसुद्धा प्राप्त तिला सामोरे जाण्यासाठी ते निर्णय खरच मांडले पाहिजेत ते ब्रिटिशांची मांडलिक राजे होते म्हणून त्यांच्या कार्याला खूप मर्यादा होता त्या मर्यादा देत राहूनही त्यांचे कार्य उदंड म्हणावे लागेल हे सारे पार पाडताना त्यांची त्यांना किती देश झाले असतील हे लक्षात घेणे गरजेचे आहे तरीही परिस्थितीला पूर्ण उरलेला हा राजा कसलेला सेनानीच होता लढवय यात्रा आहेच शिवाय तो हुशार बुद्धिमान मुसदी आहे त्याचे शहाणपणी पराकोटीची आहे त्यांच्या कालखंडात राज्यकर्त्यांनी करू गोळा करावा आणि संरक्षण आणि आपल्या राज्य हद्दीतील अंतर्गत कायदा संस्था पहावी एवढीच मर्यादित कार्य राज्यकर्ते आपली माणिक प्रजेचे आर्थिक जीवनमान सुधारावे असे त्यांना कार्यप्रणालीत नव्हते आर्थिक क्षेत्रात सजनी ज्याचे त्यांनी पहावे असे त्यांचे धोरण असे त्यांना प्रगतीपथावर नेणे त्यांना आर्थिक दृष्ट्या भक्कम करून सुखी करणे हे त्यांच्या फेसबुकनातील नव्हते जो समर्थ असेल तो टिकेल दुबळा असेल तो मरील ही अर्थनीती होती सरळ दुपट्ट मार्गाने याच पद्धतीचा सारा राज्यकारभार चालेल अशावेळी शाहू छत्रपतींनी या नीतीला छेद देऊन समाजातील सर्व घटकांचा विचार मनी मानसी ठसविला होता यामध्ये शेती आणि शेतकरी यांचाही विचार त्यांच्या केंद्रस्थानी होता शेती आणि शेतकरी यांच्या बद्दलची त्यांची आस्था कमालीची संवेदनशील होती आपला सारा देशच शेतीप्रधान आहे महाराजांचे राज्यही शेतीप्रधान आहे पण शेतकरी मात्र नादलेलाअडलेल्या अवस्थेत जगतो आहे हे एक सत्य होते म्हणून त्यांच्या क्षमता सुद्धा मर्यादित होत्या कोल्हापूर संस्थांची त्यावेळची लोकसंख्या आठ ते नऊ लाखांच्या दरम्यान होती आज ती कितीतरी अधिक आहे या भूमीचा मुख्य व्यवसाय शेतीच होता आज उद्योगधंदे वाढले आहेत सहकारी सूत गिरण्या साखर कारखाने आणि तसं उद्योग सतीपूर्वक उद्योग यांचे जाळे पसरली आहे महाराजांच्या कारकिर्दीत शेती हा प्रधान व्यवसाय होता पण शेतीची लहान लहान तुकड्यात विभाजन झाले होते वाटणी व्यवहाराने अशा लहान तुकड्यांची निर्मिती झाली होती ती बदलावी आणि त्यांचे रूपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे हा त्यांचा विचार होता म्हणजे शेती केपायचे होईल आणि शेतकऱ्यांची प्रगती होईल असे त्यांचे स्पष्ट मत होते हेच मत त्यांनी वेळोवेळी बोलून दाखवली आहे श्रमाची प्रतिष्ठा जगात मोठी फारच मोठी आहे शेती ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे शेती पाण्याखाली येणे अगत्याचे म्हणून त्यांनी नव्या विहिरी तलाव बंधारे कालवी काढायला प्रोत्साहन दिले त्यासाठी त्यापैकी त्या काळचा मोठा पाण्याचा प्रश्न पाणी प्रकल्प म्हणजे राधानगरी धरण ही त्यांची अत्यंत महत्वकांक्षा योजना होय 1990 ला धरणाच्या बांधकामाची सुरुवात झाली संस्था लहान त्याचे उत्पन्न मर्यादित अशा अवस्थेत या प्रकल्पाला पैसा कमी पडू लागला अनेक शंका नाही उपस्थित होऊ लागल्या त्यांनी काम तसेच चालू ठेवले महाराजांच्या कारकिर्दितील अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे हा प्रकल्प हे त्यांचे भव्य स्मारकच मानायला पाहिजे मात्र शाहू छत्रपतींच्या कारकर्दीतला हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही पुढे राजाराम महाराजांनी तो पूर्ण केला महाराजांनी शेतीचे विविध प्रयोग आणि त्यासाठी संशोधन याचाही मागोमामा घेतला जुन्या अवजारांच्या ठिकाणी नवीन अवजारे आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केली त्यासाठी त्यांनी तज्ञांची प्रात्यक्षिते प्रदर्शने, शेती संस्था असे उपक्रम सुरू केले शेतीला उपयुक्त जनावरांचे प्रदर्शने त्यांनी घडवून आणली पारंपरिक पिकांशिवाय नवी पिके घेण्याचा उपक्रम त्यांनी यशस्वीपणे रावीला पन्हाळा व भुदरगड येथे चहा आणि कॉफीची लागवड करण्याचा प्रयोग केला शिवाय वेलदोडे कोको रबर ताग अंबाडी बटाटे, लाख ट्रॅफिक ओका कंबोडियन कापूस आदींची लागवड म्हणजे महाराजांच्या प्रयोगशीलतेची आणि प्रगतीशीलतेचे धोतक होय उद्योग निर्मला मध्ये ते अग्रेसर ठरले कोल्हापूरची शाओमील हे त्याचे मोठे उदाहरण येथे पहिल्यांदा सुत आणि नंतर कापड निर्मिती सुरू झाली.

*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

इचलकरंजी कोल्हापूर शिरोळ चिंचली गडिंग्लज अशा ठिकाणी जिनिंग फॅक्टरी सुरू झाल्या महाराजांनी माणसाचे जीवनमान सुदराबाई म्हणून प्रयत्नांची पराकाष्टा केली यामागे विचार रचनात्मकता आणि त्यांची कळकळ होती हा अष्टावदनी राजा त्या काळचं लेनस ठरला अस्पृश्य जनतेबद्दल त्यांचा अत्यंत कळवला होता म्हणून ती लोक त्यांना देव माणिक महात्मा फुले आणि विराज शिंदे यांचा अपवाद वगळता शाहू महाराजा इतका जाती घेत काढून टाकणारा दुसरा पुढारी झाला नाही एका महान हेतूने प्रेरित झालेला हा राजा त्यांच्या निरीक्षवृत्तीने राजेश्री पदाला पोहोचला शाहू केवळ राजन होता तो छत्रपती नव्हता किंवा समाज सुधारक नव्हता सामाजिक सुधारणा बरोबरच शाहूंनी शेतीस व उद्योगधंद्यात प्रोत्साहन दिले पन्हाळ्यावर चहा कॉफी रबर यांच्या लागवडीचे प्रयोग केले कृषी उत्पादनासाठी त्यांनी अनेक प्रदर्शने भरवली कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी जयसिंगपूर यासारख्या बाजारपेठा वसविल्या त्यामुळे कोल्हापूरही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला शाहू मिल ची स्थापना करून आधुनिक वस्त्र उद्योगात त्यांनी चालना दिली शाहूनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानाचा कायापालट करणारा उपक्रम ठरला सहकारी संस्थांचा कायदा करून सहकारी चळवळीची मुहूर्त मेढ रोवली सामाजिक सुधारणा कायदा 1913ला समंत करून त्यांनी शेतीस व उद्योगास प्रोत्सहन दिले

**कोल्हापूरला उद्योगनगरी बनवण्याचं श्रेय देखील राजर्षी शाहू महाराजांना जातं-** स्वतंत्र भारतामध्ये विलीन होईपर्यंत कोल्हापूरने राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. विशेषता विसाव्या शतकाच्या मध्यानंतर कोल्हापूरने औद्योगिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर प्रगती केली. भारताच्या उद्योग नकाशावर आपले ठळक असे अस्तित्व निर्माण केले. पण यासाठीची जी मुहूर्तमेढ रोवली ती राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी. **आधुनिक कालखंडामध्ये १८८४ साली कोल्हापूर संस्थानचे छत्रपती म्हणून अधिकार प्राप्त झालेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी उद्योग वाढीसाठी विशेष प्रयत्न केले.**आपल्या २८ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी सामाजिक सुधारणा शेती, उद्योग, कला, क्रीडा, शिक्षण इत्यादी क्षेत्रांमध्ये भरीव अशी प्रगती केली होती. त्यामध्ये १८९१ मधलं मिरज ते कोल्हापूर रेल्वे मार्ग, श्री छत्रपती मिल्स राधानगरीचे धरण इत्यादींचा समावेश होता. कोल्हापुरातल्या उद्योग नगरीच्या पायाभूत उभारणीचे श्रेय पण सर्वस्वी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनाच दिले जाते. औद्योगिक क्षेत्राच्या उभारणीला त्यांनी दिलेला राजाश्रय आणि प्रोत्साहन यामुळे १९०६ मध्ये कापड उद्योगातली मोठी गिरणी 'शाहू छत्रपती मिलची' स्थापना झाली. शाहू मिलची स्थापना करून परिसरात उद्योग धंदे सुरू व्हावेत हा हेतू महाराजांचा होता. **कारण संस्थान काळात काही मोजक्याच उद्योगांचे अस्तित्वात होते. त्यामध्ये तेल काढणे, पोहे चुरमुरे उत्पादन, आयुर्वेदिक औषध निर्मिती, तपकीर, साबण, आगपेटी, सिमेंट प्रक्रिया, बेकरी आणि मोटारकार दुरुस्ती इत्यादींचा समावेश होतो.**

फौंड्री उद्योग कोल्हापूर मध्ये सुरू व्हावा अशी राजर्षी शाहू महाराजांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी निपाणी मधील यमाजी आनंदराव आंबले यांना कोल्हापुरात बोलवून घेतले. यमाजी आंबले हे तेव्हाचे मॅकेनिकल इंजिनिअर होते. शहरात नवीन उद्योग सुरू व्हावा यासाठी महाराजांनी शहरातील बागल चौकांमध्ये आंबलेंना मोफत भूखंड देऊन फौंड्री उद्योगाचा पाया घालण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार आंबले यांनी फौंड्रीची स्थापना करून बैलांच्या साह्याने चालवण्यात येणाऱ्या उसाच्या चरकाचे उत्पादन सुरू केले. पण दुर्दैवाने १९२० मध्ये फौंड्रीत काम करत असताना आंबले यांना अपघात झाल्याने हा प्रयोग तिथेच थांबला. दरम्यान हा प्रयोग जरी थांबला असला तरी बागल चौकाच्या आसपासच्या परिसरात इतर उद्योग सुरू व्हायला लागले होते यात लेथ मशीन, शेपिंग मशीन अशी छोटीमोठी वर्कशॉप्स सुरू करण्यात येत होती. या उद्योगांची संख्या वाढून १९४७ दरम्यान १३५४ इतकी झाली होती. आणि याच दरम्यान कोल्हापूरच्या उद्यमनगरीचे नाव शिवाजी उद्यमनागर पडले. कोल्हापूरच्या उद्यमनागरीच्या उभारणीमध्ये शिवाजी टेक्निकल स्कुलचा पण मोठा वाटा आहे. छत्रपती शाहू महाराजांचे वारस छत्रपती राजाराम महाराज यांनीही शाहूं सारखी दूरदृष्टी ठेऊन उद्योग विस्ताराचे धोरण अवलंबिले. शेती आणि उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी ओब्रायन टेक्निकल स्कुल, शिवाजी टेक्निकल स्कुल अशा तंत्रशिक्षण देणाऱ्या केंद्रांची स्थापना केली. याचा परिणाम असा झाला की, कोल्हापूर शहरातून आणि आजूबाजूच्या परिसरातून आलेले कामगार हे कौशल्यपूर्ण कामासाठी या तंत्रशिक्षण संस्थांमधून शिकून येत असत. या संस्थांनी कष्टाळू आणि कल्पक कामगारांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण दिलं. अशाप्रकारे आज कोल्हापूरची जी औद्योगिक क्षेत्रातील ओळख आहे, ती ओळख निर्माण करण्यासाठी राजर्षी शाहूंनी प्रयत्न केले. आणि उद्यमनगरीला आकार दिला.

राजर्षी शाहूंच्या अर्थनीतीवर अधिक लिहिण्याची गरज- लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जीवन-कार्य म्हणजे आदर्श राजाचे एक मूर्तिमत उदाहरण ठरले आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक सुधारणांची पायाभरणी राजर्षी शाहू महाराजांच्या विचार आणि कार्यातून झालेली दिसून येते. काळाच्या पुढे १०० वर्षे पाहणारा एक

प्रजाहितदक्ष, गुणग्राहक, कर्तव्यदक्ष राजा म्हणून सर्वसामान्य जनतेच्या हृदयसिंहासनावर विराजमान असणारा रयतेचा राजा म्हणजेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज होत. राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, सांस्कृतिक, क्रीडा इत्यादी क्षेत्रात क्रांतिकारी स्वरूपाचे कार्य केले आहे. राजर्षी शाहंच्या सामाजिक कार्यावर फार मोठ्या प्रमाणावर लिहिले गेले; आजही लिहिले जात आहे. त्या मानाने लोकराजा राजर्षी शाहूंचे आर्थिक विचार, धोरण किंवा कार्याकडे संशोधक, लेखकांनी फारसे लक्ष दिल्याचे दिसत नाही. विशेषत्वाने उल्लेख करायचा तर – 'श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण'- लेखक – सौ. मीना कुलकर्णी व ब. शि. कुलकर्णी; 'छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण एक चिकित्सक अभ्यास' – लेखक : ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. वि. बा. घुगे; 'राजर्षी शाहूंची अर्थनीती'-संपादक – प्राचार्य डॉ. जे. के. पवार या तीन ग्रंथांचा विचार करता येईल. या तिन्ही ग्रंथांचा परिचय 'राजर्षी शाहूंची वाङ्मयीन स्मारके ' मध्ये दिलेला आहे

लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे कर्तृत्व बहुआयामी होते. समाजातल्या रंजल्या-गांजल्याबद्दल त्यांना कणव होती. त्यांनी लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी, कल्याणासाठी केलेले कार्य हे अलौकिक स्वरुपाचे ठरले आहे. राजर्षी शाहूंचे विचार, सिद्धांत अनुभवांवर आधारलेले होते. त्यांनी जेजे पाहिले, अनुभविले, त्या अनुभवांचे मंथन करुन मानव मुक्तीसाठी त्यांनी तसे प्रयत्न केले. अर्थात् शाहू महाराज 'राजा' होते, त्यांच्याकडे सत्ता होती म्हणूनच त्यांनी हे अवाढव्य आणि अलौकिक कार्य केले असे म्हटले तर इतर राजांनी, सत्ताधाऱ्यांनी असे कार्य का केले नाही; असाही विचार मनात येतो. याबाबत पुढे जाऊन असे म्हणता येईल की, सत्तेला स्वयमेव असे मूल्य नसतेच, तर नवसमाज निर्मितीच्या कार्यात ती जे योगदान करील त्यावरून तिचे मोल ठरते, हे राजर्षी शाहूंच्या राज्यकारभाराचे मध्यवर्ती सूत्र होते. "सामाजिक सुधारणांबरोबरच शाहूंनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. 'शाहू मिल' ची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणार उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. शाहूंनी 'सहकारी संस्थांचा कायदा' करून सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली (१९१३).

लोकराजा राजर्षी शाहू महाराजांनी शेती, उद्योग, व्यापार, सहकार, इत्यादी क्षेत्रात क्रांतिकारी व मूलभूत स्वरूपाचे कार्य केले आहे, विचार मांडले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील हरितक्रांतीचे ते जनक ठरले आहेत. शेती-उद्योगात त्यांनी अनेक प्रयोग यशस्वी केले आहेत. अर्थकारणातील त्यांच्या कार्यांबद्दल फारसे लेखन, संशोधन झालेले नाही. तेंव्हा राजर्षी शाहूंचे कृषीविषयक धोरण, उद्योगविषयक धोरण, तसेच त्यांची जलनीती, व्यापारनीती, सहकारनीती, दुष्काळ निवारण कार्य व नीती, प्रशासननीती, ग्रामविकासनीती, त्याचप्रमाणे कामगार विषयक धोरण व विचार, मानवी संसाधनाचे नियोजन, त्यांचे वाहतूक, दळण-वळण धोरण, त्यांचे काळातील सार्वजनिक आय-व्यय इत्यादीबद्दल सखोल अभ्यास होण्याची, ह्या सर्व कार्याबद्दल ग्रंथ, पुस्तके, पुस्तिका प्रसिद्ध होण्याची अत्यंत गरज आहे. कारण राजर्षी शाहूंचे आर्थिक क्षेत्रातील विचार व कार्य आजही मार्गदर्शक आहेत. राजर्षी शाहूंचे आर्थिक धोरणे आणि आर्थिक विचार समाजापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहचले नाहीत ही खंत आहे.

**संदर्भ**

1. 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष' राजर्षी शाहू महाराज यांची आज जयंती *Maharashtra Times*. 04-01-2022 रोजी पाहिले.
2. "ShahuChhatrapati Biography – ShahuChhatrapati Life&Profile". *Cultural India*. 15May 2016रोजी पाहिले.
3. "ChatrapatiShahuMaharaj (Born on 26th June)". *Mulnivasi organiser 6 .May 16-06-2016 .1922रोजी* मूळ पान *पासून संग्रहित*. 15May 2016रोजी पाहिले.
4. *Date, Vidyadh 22 July .(2002* "Gov seeks total make-over of ChhatrapatiShahuMaharaj's image". The Times of India. 15May 2016रोजी पाहिले.
5. *भगत, रा .तु) .२०१६.( राजर्षी शाहू छत्रपती -जीवन व शिक्षणकार्य .कोल्हापूर :रिया पब्लिकेशन्स .pp. ४१-१४२.*
6. *जाधव, नरेंद्र )१९८०.( महाराष्ट्रातील मानचिन्हे .पुणे :मॅजेस्टिक प्रकाशन.*
7. *KashinathKavlekar (.(1979 Non-Brahmin Movement in Southern India, 1873– .1949p. .63*
8. *Mike Shepperdson, Colin Simmons (.(1988 The Indian National Congress and the political economy of India, 1885– .1985p. .109*

9. Pune's endless identity wars". *Indian Express.* 1August 2015रोजी पाहिले.

10. *RajarshiShahuChhatrapati Papers: 1900– 1905A.D.: Vedokta controversy .Shahu Research Institute, 1985–Kolhapur (Princely State). .1985*

11. *नांदेडकर, प्रा .डॉ .व .गो) .२०११.( राजकीय विचार आणि विचारवंत .पुणे :डायमंड पब्लिकेशन्स .pp. २७०.* ISBN -81-978 .5-348-8483

12. *भगत, प्राचार्य रा .तु) .२०१६.( राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य .कोल्हापूर :रिया पब्लिकेशन .pp. २२० -२४८.*

13. *भगत, प्राचार्य रा .तु) .२०१६.( राजर्षी शाहू महाराज -जीवन व शिक्षणकार्य .कोल्हापूर :रिया पब्लिकेशन, कोल्हापूर .pp. २५८ -२७७.*

14. जुलाई को नहीं 26जून को मनाएं शाहू जी महाराज की जयंती." *Navbharat Times )हिंदी भाषेत.(* 27-06-2021 रोजी पाहिले.

15. शाहू महाराज का जन्म दिन ईद-दीवाली की तरह मनाओं- डॉ आंबेडकर" Check |url= value (सहाय्य.( *राष्ट्रीय भारत समाचार )हिंदी भाषेत.26-06-2020 .(*27-06-2021 रोजी पाहिले].[permanent dead link[

16. *नरके, Prof HariNarkeप्रा हरी .(29-06-2020)* "प्रा .हरी नरके :छ .शाहूराजांचा रिलेव्हन्स काय?- प्रा .हरी नरके." *प्रा .हरी नरके.* 27-06-2021 रोजी पाहिले.

17. शाहुजयंतीचे जनक :डॉ .बाबासाहेब आंबेडकर – प्रा .हरी नरके" *)इंग्रजी भाषेत 27-06-2021 .26-06-2019 .(रोजी* मूळ पान *पासून संग्रहित.* 27-06-2021 रोजी पाहिले.

18. "दोन महापुरुषांचा पत्रबं. *Maharashtra Times.*

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

43

# शाहू महाराजांचे लोक कल्याणकारी धोरण

**प्रा. (डॉ) राजू कलमेश सावंत**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज आर्ट्स अँड कॉमर्स, सांगली

---

**प्रस्तावना:** एक थोर समाज सुधारक, प्रजादक्ष राजा व उत्कृष्ट प्रशासक म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराज महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये प्रसिद्ध आहेत. कोल्हापूरच्या संस्थानाचे प्रजापती असताना छत्रपती शाहू महाराजांनी "बहुजन हिताय बहुजन सुखाय" हे तत्व उराशी बाळगून कोल्हापूरच्या संस्थानांमध्ये जी लोकोपयोगी कार्य केली ती खऱ्या अर्थाने दखल घेण्यासारखे अशी आहेत.समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये कोल्हापूरचे संस्थानिक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य अत्यंत प्रभावी राहिलेले आहे .त्यांचे संपूर्ण जीवनच समाजातील पददलित मागास अल्पसंख्याक, निराधार गरीब यांच्या कल्याणासाठी अर्पित आहे. सरकारी नोकरी मध्ये आरक्षणाचा कायदा केला. शिक्षणासोबत शेती, उद्योगधंदे, जंगलसंपत्ती, सहकार, व्यापार, सांस्कृतिक क्षेत्रात चित्रकला, नाट्यकला, गायन तसेच क्रीडा क्षेत्रात कुस्ती व इतर विविध क्षेत्रांचा विकास करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात पैसा पुरविणे, मार्गदर्शन करणे, कलावंतांना प्रोत्साहन देणे असे अभूतपूर्व कार्य केलेले आहे. अशा या थोर लोकराजाच्या जीवनकार्याचा प्रभाव आजपर्यंत कायम आहे आणि उद्याही राहील. कारण त्यांनी समाजपरिवर्तनाचे फार मोठे कार्य केले आहे. त्यामुळे त्यांनी कोल्हापूरच्या संस्थानांमध्ये जी लोककल्याणकारी कार्य केले त्यातून समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये देखील त्यांचे अमूल्य असे योगदान असल्याचे दिसते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये त्यांच्या याच लोककल्याणकारी धोरणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**पारिभाषिक शब्द-** लोककल्याणकारी राज्य, जनतेचे हित.

**उद्दिष्टे- :**

१. छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन परिचयाचा अभ्यास करणे
२. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आढावा घेणे
३. प्रजादक्ष राजा म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
४. छत्रपती शाहू महाराज यांचे कोल्हापूर संस्थानातील प्रशासन समजून घेणे.

**विषय प्रवेश:** लोकनेते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यात झाला. कुस्ती, शिकार, घोड्यावर बसणे यांसारख्या कौशल्यांमध्ये त्यांची बरोबरी करणारा एकही राजकुमार तेथे नव्हता. त्याचठिकाणी त्यांचा मनमिळावू व निर्भिड स्वभाव सर्वांच्या नजरेत भरला. इ.स.१८८५ ते १८८९पर्यंत महाराजांनी राजकोट येथील महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर १८९० ते १८९४ या काळात धारवाड येथे महाराजांचे शिक्षण झाले. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी समाजजीवनाचे बारकाईने निरीक्षण केले. त्या वेळी त्यांचे वय केवळ वीस वर्षांचे होते. राज्यातील जनतेसाठी विविध योजना आखून जनतेच्या कल्याणाचे कार्य सुरू केले. 'प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे' यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी संगीत, वाद्य, शिकार, कुस्ती, अश्वारोहण, मल्लखांब यासारख्या कलांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे कोल्हापूर हे खऱ्या अर्थाने कलापूर झालेले दिसते. शाहू महाराजांनी संस्थानातील गुणी कारागिरांना उत्तेजन दिले त्यांनी कोल्हापूर संस्थानाचे प्रजापती असताना अनेक लोकोपयोगी कार्य केली व कोल्हापूर संस्थानाचे व महाराष्ट्राचे नाव जगाच्या पाठीवर सोनेरी अक्षरात लिहिले त्यांनी केलेले लोककल्याणकारी कार्य पुढील प्रमाणे आहे.

**अस्पृश्य समाजाच्या उद्धराचे कार्य:**महात्मा फुलेंचा अस्पृश्य उद्धराचा वारसा शाहू महाराजांनी पुढे चालविला. अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांना समाजात बरोबरीचे स्थान मिळवून देण्यासाठी महाराजांनी त्यांच्यात शिक्षणाच्या प्रसाराला महत्त्व दिले. सर्वांसोबत अस्पृश्यांच्या मुलांनाही शिक्षण मिळावे यासाठी कायदे केले. बारा बलुतेदारी पद्धती व महार वतन कायद्याने बंद करून या समाजास इतरही उद्योग व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य मिळवून दिले. आपल्या राज्यात मागासलेल्या वर्गासाठी ५० टक्के आरक्षणाचा कायदा करून प्रभावीपणे प्रत्यक्षात आणणारे शाहू हे पहिलेच राजे होते. मंडळ आयोगाच्या ९० वर्षांपूर्वी १९०२ मध्ये महाराजांनी जी तत्वे राबविली त्याच सूचना मंडळ यांनी आरक्षणाबाबत मांडल्या होत्या. वेठबिगारी, हजेरीची सक्ती अशा काही जुलमी पद्धतीही महाराजांनी रद्द केल्या.

शाहू महाराज बाबासाहेबांना आपल्या अगदी जवळचे स्नेही, मित्र मनात असत. ज्यावेळी बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन परतले त्यावेळी महाराज स्वतः बाबासाहेबांना भेटायला गेले होते. पुढे या दोघांमध्ये अनेक भेटी, पत्रव्यवहार झाले. शाहू महाराजांचा बाबासाहेबांवर प्रचंड विश्वास होता. त्यांना तेंव्हाच वाटले होते की बाबासाहेब हेच अस्पृश्यांचे खरे नेते असून भविष्यात संपूर्ण देशाचे नेते म्हणून ते उदयाला येतील. महाराजांचा हा विश्वास बाबासाहेबांनी खरा ठरविला. महाराजांनी बाबासाहेबांना अनेक वेळा आर्थिक मदत सुद्धा केली. ज्यातू बाबासाहेब परत परदेशी शिक्षण घेऊ शकले, आपले वृत्तपत्र सुरू करू शकले.

**शेती, उद्योग आणि शाहू महाराज:** शाहू महाराज हे दूरदृष्टी असणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. आपल्या राज्यात त्यांनी शेती आणि उद्योगांच्या विकासासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले. स्वातंत्र्यापूर्वी आपल्या राज्यात हरितक्रांती घडवून आणणारे शाहू महाराज हे पाहिले राजे होते. त्यांनी भोगावती नदीवर प्रचंड धारण बांधून शेतीला नव्या उंचीवर नेऊन ठेवले. कोल्हापूर उसाच्या शेतांनी फुलून गेले. त्यातून गुळाच्या बाजारपेठा निर्माण झाल्या. आज कोल्हापूर गूळ आणि साखरेच्या उत्पादनात अग्रेसर आहे.

१९०६ साली शाहू महाराजांनी सहकार क्षेत्रातील पहिली सुताची व कापडाची गिरणी 'श्री शाहू स्पिनिंग अँड विव्हिंग मिल'सुरू केली. आणि १९१२ मध्ये सहकार क्षेत्रातील प्रगतीसाठी सहकारी कायदा केला.

**कला, साहित्य, इतिहास आणि शाहू महाराज:** शाहू महाराज हे कलाकार व त्यांच्यातील कलागुणांना वाव देणारे कलासक्त व्यक्तिमत्त्व होते. त्याच्या काळात अनेक कलाकार कोल्हापूरच्या मातीने देशाला दिले. बालगंधर्व यांच्या सारखे कलाकार हे महाराष्ट्राला महाराजांनीच दिले. कोल्हापुरातील ही कलावंतांची परंपराच पुढे भारतीय सिनेसृष्टीची जणांनी ठरली. संगीत त्तज्ञ बाबुराव जोशी लिहितात की, शाहूमहाराज हे नाटक कंपनीला जवळजवळ सर्वच सामान देत असत. धुण्याच्या सोड्यापासून ते रंग रांगोटीचे सर्वच सामान ते पुरवत असत. बाबुराव पेंटर हे महाराजांच्याच काळात उदयाला आले.

कुस्ती आणि मलखांब विद्या ही महाराजांची आवडती कलाक्षेत्रे होत. शाहू महाराज यांनी स्वतः यात विशारद हासील केली होती. त्यांनी ही विद्या सर्वच जाती धर्माच्या लोकांपर्यंत पोहचवली. स्पर्धेत विजयाच्या वेळी ते सर्वच पहिलवान लोकांचा सन्मान करत असत. विजेत्यांना बक्षिसे देत असत. स्वतःचा जरीचा फेटा काढून देण्याला ते मागेपुढे पाहत नसत. रोम मधील भव्य आखड्या सारखेच खासबाग कुस्तीचे मैदान / आखाडा शाहू महाराजांनी कोल्हापुरात बांधला. एकाच वेळी ४५००० पैलवान या आखाड्यात बसू शकतात. महाराजांना इतिहासाचे ही प्रचंड वेड होते. त्यांच्या दरबारी कृष्णाजी अर्जुन केळुसकर, प्रबोधनकार ठाकरे यांच्या सारखे अनेक प्रतिभावान होते ज्यांनी विविध ग्रंथ व ऐतिहासिक लेखन केले. त्यांनी या संशोधनकार्य भोसले घराण्याचा इतिहास ही ग्रंथरूपाने मांडून घेतला.

**समारोप:** अशाप्रकारे प्रत्येक क्षेत्रात शाहू महाराजांनी आपल्या जनतेच्या हिताचाच विचार केला. आपल्या राज्यातील सर्वसामान्य जनता ही हरप्रकारे लायक व प्रगतीस पात्र होईल याच प्रबळ इच्छेने शाहू महाराजांनी आपले प्रत्येक पाऊल टाकले. महाराजांच्या समकालीन अनेक राजे भारतात होते परंतु सयाजीराव गायकवाड सोडले तर इतर कुणीच जनतेच्या हितासाठी राज्य चालवले नाही. शाहू हे खऱ्या अर्थाने लोकराजा, राजर्षी आणि बहुजन प्रतिपालक होते.

**संदर्भ:**

१. पवार जयसिंगराव,( नोव्हेंबर २००५), "राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा", मेहता पब्लिशिंग हाऊस ,कोल्हापूर.
२. चव्हाण रा .ना., ( २००२), "राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य , सनय प्रकाशन, पुणे.
३. कीर धनंजय, (२०१७), "लोकराजा शाहू महाराज व्यक्तित्व आणि विचार", सुधीर गवळी प्रकाशक, पुणे.
४. सरगडे संजय कुमार,( २६जून २०२२), "लोककल्याणकारी राजा- राजर्षी छत्रपती शाहू महाराज", दैनिक मुक्तागिरी- लेख.
५. वाणी प्रियांका, 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष' राजर्षी शाहू महाराज", महाराष्ट्र टाईम्स, २६ जून २०२३

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

44

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी केलेले कायदे : एक अभ्यास

**प्रा.अरुणा खंडू सकटे**
अर्थशास्त्र विभाग
शिक्षणमहर्षि डॉ.बापूजी साळुंखे कॉलेज,मिरज

---

**प्रस्तावना:**

19 व्या शतकात भारतामध्ये अनेक राजे होऊन गेले. भारतामध्ये १९ वे शतक हे एक सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक सुधारणाचा काळ म्हणून ओळखले जाते. कारण या काळात खऱ्या अर्थाने एका नव्या युगाची स्थापना झाली होती. कारण इंग्रजी शिक्षण, इंग्रज यामुळे भारतीयांमध्ये आपल्यात काय कमतरता आहे हे जाणवू लागले होते आणि जेव्हा एखाद्या गोष्टीची जाणीव होते तेव्हा ती उणीव किंवा ती कमतरता भरून काढण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात, अनेक चळवळी उभारल्या जातात आणि या चळवळी मधूनच एक परिवर्तनाचे नवे वारे वाहू लागते .हेच परिवर्तनाचे वारे महाराष्ट्रातील कोल्हापूर संस्थानात आणण्याचे कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केले. राजश्री छत्रपती शाहू महाराजांचे कारकीर्द ही इसवी सन १८८४ ते इसवी सन 1922 इतकी जरी कमी असली तरी ,त्यांनी आपल्या कारकिर्दीत केलेले जे परिवर्तन होते त्यांने कोल्हापूर संस्थानच नव्हे तर महाराष्ट्राला कलाटणी देणार होते . त्यांनी सुरू केलेल्या सामाजिक चळवळींमुळे महाराष्ट्रात परिवर्तनाची लाट सुरू झाली. शाहू महाराज यांची प्रेरणा घेऊन अनेक नवीन नेतृत्वाची सुरुवात झाली .शाहू महाराज यांनी केलेल्या कार्यामुळे भारताच्या उभारणीमध्ये मोलची भर पडली .पण कोणतेही कार्य हाती घेत असताना आणि त्यात ते सामाजिक परिवर्तन असेल तर टीका होतेच. ही बाब ठरलेली आहे पण तरीसुद्धा अशा कोणत्याच टिकेला न भीक घालता शाहू महाराज यांनी आपले कार्य अविरतपणे सुरू ठेवले .आणि त्याचेच फलित म्हणून आज ज्या स्त्रिया ताठमानाने उभे आहेत किंवा आपले कार्य करत आहेत ते फक्त राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यामुळेच. शाहू महाराज नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक सामाजिक समाज सुधारक आहेत की ज्यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य केले आणि नुसते कार्य करून ते थांबले नाहीत तर त्यांनी ते स्वतः आत्मसात करून अमंलात आणण्याचा प्रयत्न केला. आणि याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे राजश्री छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे इत्यादी.

**उद्दिष्टे:**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी केलेल्या कायद्यांचा अभ्यास जाणून घेणे

२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी स्त्रियांसाठी कायदे करत असताना व त्याची अंमलबजावणी कोणत्या पद्धतीने केली याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती-** सदर शोध निबंध हा दुय्यम साधनसामग्रीवर अवलंबून आहे यासाठी वेगवेगळी मासिके, पुस्तके, लेख, आणि इंटरनेट याचा वापर करण्यात आला आहे.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले कार्य-**राजश्री छत्रपती शाहू महाराज यांनी महिलांसाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे .भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे .आजही जी परिस्थिती आहे तशीच आहे. अजूनही स्त्रियांना समाजात दुय्यम वागणूक दिली जाते. दुय्यम स्थान आहे मग यावरून विचार करा की, एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रियांची अवस्था कशी असेल ? त्यावेळी तर परिस्थिती ही भयानक होती मुळातच स्त्रिया या परावलंबी होत्या त्यांना कोणताच अधिकार नव्हता. फक्त चूल आणि मूल या दोनच गोष्टींसाठी तिचा जन्म झाला आहे आणि याच्या पलीकडे तिचा अस्तित्वच नाही अशी समाजात रूढ होती किंवा तसी ती समजली जाई. बालविवाह, पुनर्विवाह, केशवपण, पडदा पद्धत अशा अनेक प्रथांमुळे तर स्त्रीचे जीवन हे एखाद्या जनावराप्रमाणे झालेले होते .स्त्री जन्म म्हणजे नरक यातना अशी धारणा बनली होती. स्त्रियांवर होणाऱ्या या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे कार्य महात्मा फुले पासून ते आज आगरकरांपर्यंत अनेक समाजसुधारकानी केले. त्यावेळी स्त्रीला शिक्षण मिळणे ही काळाची गरज बनली होती आणि म्हणूनच शिक्षणाशिवाय स्त्रियांचा उद्धार होणार नाही हे ओळखून महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू केली आणि याचा याचाच वारसा घेऊन शाहू महाराज यांनीही आपल्या कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणात प्रोत्साहन दिलेत. शिवाय त्यांच्या हक्कासाठी व त्यांच्या हक्क संरक्षणासाठी अनेक कायदे अमलात आणले कारण कोणतीही गोष्ट करायची म्हटली तर त्याला कायद्याचा आधार असणे गरजेचे आहे .आणि ही बाब लक्षात घेऊनच शाहू महाराज

यांनी कायद्याद्वारे प्रस्थापित समाज रचना आणि स्त्रीमुक्तीचे शस्त्र हाती घेतले. खऱ्या अर्थाने शाहू महाराज हे समस्त स्त्री जातीचे उद्धारक होते त्यांना माहिती होते की कायदे करून आणि त्या कायद्याची अंमलबजावणी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कोणत्याही गोष्टीवर आळा बसत नाही आणि म्हणूनच त्यांनी कायदे करून त्या कायद्याचे अंमलबजावणी होते की नाही याची पडताळणी स्वतः केली.

**शाहू महाराज यांनी महिलांसाठी केलेल्या कायद्याचा अभ्यास-**स्त्रियांना या पुरुषप्रधान संस्कृतीच्या जाळयातून बाहेर काढण्यासाठी शाहू महाराज यांनी क्रांतिकारक सात कायदे केले ते पुढील प्रमाणे

**1) विधवा पुनर्विवाह कायदा 1917-** शाहू महाराज यांनी सर्वात क्रांतिकारक उचललेले पहिले पाऊल म्हणजे विधवा पुनर्विवाह कायदा व त्यांनी आपल्या संस्थानात हा कायदा करून एक आदर्श राजा कसा असावा याचे उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले .कारण कनिष्ठ जातीमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचा स्वातंत्र्य होते पण समाजातील उच्चवर्णीय विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करता येत नव्हता .किंबविना समाज त्यांना मान्यता देत नव्हता आणि सर्वात वाईट पद्धत म्हणजे एखाद्या स्त्रीचा पतीचा मृत्यू झालेला झाला रे झाला की लगेच केसवपन केले जात.आणि ही बाब शाहू महाराज यांच्या लक्षात आली आणि म्हणूनच 1917 मध्ये त्यांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला .त्यामुळे विधवा स्त्रियांना एक प्रकारचा सन्मान मिळाला .त्यांच्याहि काही अडचणी होत्या त्या दूर झाल्या .आणि यापुढे जाऊन शाहू महाराजांनी कायद्यानुसार विवाहाची नोंद करण्याची पद्धती सुरू केली. त्यामुळे विधवा स्त्रियांना एक प्रकारचे भविष्याची सुरक्षितता मिळाली.

**२) पडदा पद्धती:** महाराष्ट्रात विशेषतः राजे राजवाड्यांच्या घराण्यात स्त्रियांना पडदा पद्धतीची चाल होती .या पाठीमागचे कारण म्हणजे स्त्रियांमध्ये असलेले सौंदर्य ,त्यांचे उपजतू गुण लपवणे हा होता. पण ही बाब जेव्हा शाहू महाराज यांच्या लक्षात आली, तेव्हा त्यांनी कानपूरच्या कुर्मिक क्षेत्रीय परिषदेत या पद्धतीचा निषेध केला. शाहू महाराज यांच्या मते, अशा अनेक कर्तृत्वात महिला आहेत ज्या सौंदर्याची खान आहेत ,पण ज्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर रणांगणावर शत्रूंशी लढा दिलेला आहे आणि शत्रूंशी दोन हात केलेले आहेत. उदाहरणार्थ. राजमाता जिजाबाई ,महाराणी ताराबाई साहेब, महाराणी सती अहिल्याबाई इ.या महान स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला व समस्त स्त्री जातीचा उद्धार केला. आणि म्हणूनच शाहू महाराज यांनी पडदा पद्धतीचा निषेध करत ही पद्धत बंद पाडली आणि पडदा पद्धती बंदीचा कायदा आपल्या संस्थानात लागू केला.

**3) आंतरजातीय विवाह कायदा -** 12 जुलै 1919 रोजी आंतरजातीय विवाह कायदा करून शाहू महाराजांनी कोल्हापूर गॅजेटमध्ये प्रसिद्ध केला. या कायद्यानुसार शाहू महाराजांनी कोणतेही जाती, धर्म न पाळता एकमेकांशी विवाह करू शकत होते. कारण शाहू महाराजांच्या मते जेवढ्या प्रमाणात आंतरजातीय विवाह होतील तेवढ्या प्रमाणात भारतीय समाजातील जातीभेद नष्ट होतील. आणि तेवढ्याच प्रमाणात आपल्या देशाची प्रगती होईल. पण शाहू महाराज यांनी नुसता कायदा करून थांबले नाहीत कारण मोठमोठे क्रांतिकारक भाषणे द्यायची आणि सांगायचे आणि प्रत्यक्षात कृती कोणतीच करायची नाही या मताचे शाहू महाराज नव्हते .आणि म्हणूनच आपणच सुरुवात केली तर समाजात सुरुवात होऊ शकते या धारणेने ,या विचारधारणेने शाहू महाराजांनी आपल्या चुलत बहिण चंद्रप्रभा बाई यांचा विवाह इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकर यांचे पुत्र युवराज यशवंतराव यांच्याशी निश्चित केला .यावरून शाहू महाराज हे किती क्रियाशील व्यक्तिमत्व होते यावरून समजते. आणि तेव्हापासूनच समाजातील आंतरजातीय विवाह कायदा अस्तित्वात आला आणि खऱ्या अर्थाने समाजातील जातीभेद नष्ट होण्यासाठी हा कायदा उपयुक्त ठरत आहे किंबहुना ठरलेला आहे .

**४) क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा-**क्रूरपण हे तर स्त्रियांवर झालेला सर्वात मोठ्या अन्यायाचे प्रतीक आहे. क्रूरपण हे अत्यंत वाईट पद्धती होती. कुटुंबात स्त्रियांवर होणारे अनेक प्रकारचे अन्याय, अत्याचार पुढे येत नाहीत. आणि म्हणूनच शाहू महाराज यांनी क्रूरपानाच्या वागणुकीचे जे प्रकार आहेत त्या सर्वांचा कायद्यात समावेश केला. अकरा कलमाच्या या कायद्यात स्त्रीला क्रूरपणे वागविण्यास सहा महिने शिक्षा व दोनशे रुपये दंड अशी तरतूद केली यामुळे क्रूर पण सारख्या वाईट पद्धतीवर मोठ्या प्रमाणात आळा बसला आणि खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या जीवनात एक चांगलं आयुष्य, चांगलं जीवन जगण्यास शाहू महाराज यांनी सुरुवात केली.

**५) देवदासी प्रतिबंध कायदा-** गुलामगिरीतून शूद्राती शुद्राची मुक्तता करण्यासाठी सामाजिक क्रांतीचे पताका खांद्यावर घेऊन राजश्री शाहू महाराजांनी आयुष्यभर कार्य केले. आपल्या कार्यातून ते आभाळाएवढे बनले होते .धर्माच्या नावाखाली देव देवतांना मुले मुली वाहण्याची घृणास्पद पद्धत संस्थानात होती. त्यातूनच काही अनैतिक प्रकार पण घडत होते आणि एकदा का देव देवाच्या नावाखाली मुले -मुली सोडल्या की त्यांना त्यांच्या आई-वडिलांच्या संपत्तीत कोणताच हक्क नसे. त्यांना घृणास्पद वागूनुक मिळत असे आणि म्हणूनच शाहू महाराजांनी अशा लोकांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे, आणि तो त्यांचा हक्क आहे आणि ते सुद्धा एक

माणूस आहेत आणि त्यांना माणसासारखीच वागणूक देणे हे आपल्या समाजाचा आणि आपलं कर्तव्य आहे या दृष्टिकोनातून त्यांनी 17 जानेवारी 1920 रोजी देवदासी ,जोगते ,मुरळी, जोग्या यासारख्या प्रथा बंदीचा कायदा केला .त्यांना त्यांच्या आई-वडिलांच्या संपत्तीत वारसा हक्क मिळवून दिला .

**६) घटस्फोटाचा कायदा** -शाहू महाराजांनी याच काळात घटस्फोटासंबंधीचा कायदा आपल्या संस्थानात केला. त्यामध्ये स्त्रीच्या हक्काचे संरक्षण कसे होईल ,घटस्फोटानंतर तिला आणि तिच्या मुलाबाळांना सासरच्यांच्याकडून कशा पद्धतीची सोय होईल किंवा तिचे भवितव्य कसे सुरक्षित होईल यासाठी शाहू महाराजांनी या कायद्याद्वारे तरतूद केली तसेच घटस्फोटानंतर संपत्तीच्या ताब्याची, पोटगीची व शिक्षणाविषयीची व्यवस्था ही या कायद्याने केली .त्यामुळे या कायद्याने ग्रामीण भागात जी जात पंचायत बसत होती आणि ती जात पंचायत काही वेळेस सासरच्या मंडळीच्या कडून निकाल देत असे . त्यामुळे अनेक गैरप्रकार जात पंचायतीमध्ये होत असत .पण शाहू महाराजांच्या या घटस्फोटाच्या कायद्यामुळे या गोष्टीला आळा बसला .आणि स्त्रीला एक घटस्फोटानंतर सुद्धा एक चांगलं जीवन जगण्याचा अधिकार शाहू महाराज यांनी दिला.

**७)वारसाचा कायदा-** जानेवारी 1920 मध्ये वारसा हक्काच्या कायद्यात दुरुस्ती केली कारण शुद्रांची अनावरास संतती आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णाचे अनावरस संतती यांना मिळणाऱ्या वारसा हक्कातील फरक काढून टाकला. सर्व वर्णाच्या अनावरास संततीतील जनक पिताच्या संपत्तीत वारसा हक्क दिला गेला. ही बाब स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाची होती .कारण असे केले तरच समाजात एक प्रकारचा वचक बसेल आणि वारसा हक्काने जे अनावरस संतती होती त्यांना सुद्धा कायद्याच्या आधारावर त्यांना वारसा हक्क मिळेल याची तरतूद शाहू महाराज यांनी केली.

थोडक्यात सांगायचे झाले तर खऱ्या अर्थाने शाहू महाराजांनी फक्त संस्थानातीलच लोकांचा विचार न करता तर अगदी तळागाळातील लोकांचा सुद्धा त्यांनी विचार केला कारण का जर कोणताही राजा किंवा कोणत्याही राजाचं राज्य जर प्रगतीपथावर किंवा यशस्वीपणे जर पुढे न्यायचे असेल तर जो मुख्य पाया असतो तो अगदी समाजातील तळागाळातील लोक होय त्यामध्ये गोरगरीब, शुद्रातील शूद्र , इत्यादी सर्व समाजाचा समावेश होतो. आणि म्हणूनच जोपर्यंत पाया मजबूत होत नाही तोपर्यंत कोणत्याही इमारतीचा बांधकाम हे भक्कम असत नाही या विचारधारणेने राजश्री शाहू महाराज प्रेरित झालेले होते.आणि त्यांनी हा वारसा समोर ठेवूनच अगदी आपल्या आयुष्याच्या अल्पकालावधीत त्यांनी समाजातील अगदी तळागाळातील उदा. गंगाराम कांबळे यासारख्या महार जातीतील मागासवर्गीय व्यक्तीला सुद्धा त्यांनी उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले .आणि नुसते प्रोत्साहन देऊन ते थांबले नाहीत तर ते स्वतः तिथे जाऊन त्याच्या उद्योग व्यवसायाच्या किंवा त्यांनी बनवलेले खाद्यपदार्थ खात असत आणि त्यामुळेच एक राजा जर असं करू शकतो तर बाकीच्या लोकांना कोणत्याही प्रकारची अडचण येता कामा नये या विचारातून,कृतीतून शाहू महाराजांनी आपले संस्थान घडवले आणि म्हणूनच कोल्हापूर सारखे संस्थान हे नुसते क्रांतिकारक किंवा समाज परिवर्तन नाही नसून तर ते क्रियाशील, समाज परिवर्तनशील संस्थान म्हणून ओळखले जाते .आणि हाच वारसा तो शाहू महाराजांनी घालून दिलेला आहे तो अजूनही त्याच पद्धतीने सुरू आहे

**सारांश** : शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या स्वतंत्र्यासाठी, त्यांच्या संरक्षणासाठी नुसते कायदे करून थांबले नाहीत तर त्यांनी त्या कायद्याचे अंमलबजावणी होते की नाही याकडे स्वतः लक्ष दिले खऱ्या अर्थाने शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य केले अगदी ब्रिटिश राजवटीत सुद्धा जे काय देणार नव्हते ते कायदे करून शाहू महाराजांनी स्त्रियांचा उद्धार केला कारण कोणत्याही कुटुंबाची स्त्री ही मुख्य भाग असते आणि मुख्य भागत जर खराब असेल किंवा मुख्य भागावरच जर अन्याय अत्याचार होत असतील तर संपूर्ण कुटुंब उध्वस्त व्हायला वेळ लागत नाही या प्रेरणेने शाहू महाराज नेहमी अस्वस्थ असत आणि म्हणूनच जोपर्यंत स्त्रीचा उद्धार होत नाही तोपर्यंत कुटुंबचा आणि समाजाचा उद्धार होणार नाही हि बाब शाहूमहाराज यांनी ओळखून कार्य केले. खऱ्या अर्थी शाहूमहाराज हे लोक राजा होते हे त्यांच्या कृतीतून दिसून येते.

**संदर्भ :**

1)जाधव रमेश लोकराजा शाहू छत्रपती , सुरेश एंजेन्सी ,पुणे.प्रथमावृत्ती -१९९७
२)भगत रा.तू – राजर्षी शाहू छत्रपती:- जीवन व कार्य, सिद्धराज प्रकाशन ,पुणे
3)पवार वसुधा - राजर्षी शाहू छत्रपती :- एक अभ्यास,सुमेरू प्रकाशन,डोंबिवली
४)पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू छत्रपती :- जीवन व कार्य ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,कोल्हापूर

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

45

# छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यातील सामाजिक न्याय

**प्रा. डॉ. राजेंद्र नाडेकर**
राज्यशास्त्रविभाग प्रमुख
भुसावळ कला, विज्ञान आणि पि. ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ.

---

**प्रस्तावना:-**

भारतीय समाज व्यवस्थेचे हे सदर वर्तमान स्वरूप प्राप्त करून देण्यातज्या महानायकांचा मोलाचा वाटा आहे. ज्यांनी आपल्या अथक ध्येयप्राप्तीसाठी रक्ताचे पाणीकेले, हाडांची काड केली व स्वप्नांची होळी केली. त्या सर्व महापुरुषांच्या समाजसुधारकांच्याप्रयत्नांचा परिपाक भारतीय समाज व्यवस्था समानतेवर आधारित व पुरोगामी निर्माणझाली. त्या महापुरुषांच्या समर्पणाने तयार झालेल्या या भारतीय समाज व्यवस्थेच्या विकासातअनेक थोर महापुरुषांचा हातभार आहे. त्यातील अग्रक्रमाने नाव घ्यावे असे छत्रपती शाहूमहाराज हे प्रथम होय. छत्रपती शाहू महाराजांच्या कृतीशील वर्तनामुळे सामाजिक जीवनातन्यायाचे वातावरण निर्मिण झाले.

कोल्हापूर संस्थान इतिहासामध्ये एक सधन व सुसंस्कृतसंस्थान म्हणून नावारूपाला आले. भारतीय लोकशाही व्यवस्थेतील सामाजिक न्यायाची तत्वेत्यांनी आपल्या संस्थानात पूर्वीच वापरली होती. एक आदर्श राज्यकर्ता, जाणता राजा, प्रजाहितदक्ष राजा, लोककल्याणकारी राजा अशी अनेकविध बिरुदावली त्यांना देता येतील.कोल्हापूर संस्थानातील जनतेला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टिकोनातून सक्षम बनविण्यासाठीत्यांनी प्रयत्न केले. शिक्षण, आरोग्य, प्रशासन इत्यादी सुधारणांमधून लोक कल्याणाचीकार्य केली. त्यामुळे त्यांचा 26 जून हा जन्मदिन सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केलाजातो. त्यांच्या कृतीतील सामाजिक न्यायाची ध्येयधोरणे यांचा संशोधनात्मक अभ्यास आपणया संशोधनातून करणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गादीवर 250 वर्षानंतर बसणारेते कर्तृत्ववान राज्यकर्ते होते. सामाजिक न्यायाच्या चष्म्यातून छत्रपती शाहू महाराजांचीकारकीर्द पाहिली तर एक आदर्श राज्यकर्ता म्हणून मान अभिमानाने झुकते. त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय कार्यातून उत्तम, कर्तव्यदक्ष, भावनिक, आदर्श प्रशासकाचे दर्शन घडते.त्यांच्या कृतीतून स्थापन झालेला सामाजिक न्याय आपण सदर संशोधनातून पाहू.

**उद्दिष्टे-**

1) सामाजिक न्यायाची संकल्पना समजणे.
2) छत्रपती शाहू महाराजांच्या कृतीतील सामाजिक न्याय जाणून घेणे.

**गृहीतके-** छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यातून सामाजिक न्याय प्रस्थापनेची पायाभरणी झाली.

**संशोधन पद्धती-** ग्रंथालयीन संशोधन पद्धत, ऐतिहासिक पद्धत, विश्लेषणात्मक पद्धत इत्यादी.

**सामाजिक न्याय संकल्पना-** "सामाजिक न्यायाची संकल्पना मानवा-मानवांमधील सामाजिक स्थितीच्याआधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणे, प्रत्येक व्यक्तिला आपल्या क्षमतेनुसारविकासाच्या समान संधी उपलब्ध असणे म्हणजे सामाजिक न्याय होय."1 "सामाजिक समता, आर्थिक समता व राजकीय समतानिर्माण करणे म्हणजे सामाजिक न्याय होय."

**1.सामाजिक समानता** -छत्रपतीशाहू महाराजांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. सामाजिक न्यायासाठीसामाजिक समता प्रस्थापित करणे महत्त्वाचे होते. त्यासाठी जातीभेद, धर्मभेद विषमतानष्ट करण्यासाठी कार्य केले. जातीय समानतेसाठी आंतरजातीय विवाहस प्रेरणा दिली. वर्णव्यवस्थेला विरोध करून वेदोक्त प्रकरणातून ब्राह्मण वादाला विरोध केला. त्यांनी सामाजिकसमानता निर्माण करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांनी महिलांचे आरोग्य आणि स्वच्छतासुधारण्यासाठी काम केले. महिलांना आरोग्य सेवा देण्यासाठी अनेक प्रसूती गृहे आणि रुग्णालयेस्थापन केली. बालविवाह, हुंडा, सती प्रथा यासारख्या सामाजिक दुष्कृत्यांपासून महिलांचेसंरक्षण करण्यासाठी त्यांनी अनेक कायदे तयार केले होते.

**वेदोक्त प्रकरण-** भारतीयसमाज व्यवस्थेत वर्णव्यवस्था आढळते. वर्ण व्यवस्थेतील वर्ण श्रेष्ठत्व ठरवण्यासाठीब्राह्मण वर्गाने एक सिद्धांत आणला. "नि:क्षत्रीय सिद्धांत" सिद्धांत मांडून त्याततेे म्हणतात, कलियुगात क्षत्रिय वर्ण नाहीसा झाला आहे. उरलेल्या क्षत्रियांचे रूपांतरशूद्र वर्णात झाले आहे. ब्राह्मणवीर परशुरामाणे 21 वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केली आहे."2 पंचगंगा नदीच्या तीरावरवेदोक्त प्रकरणाची ठिणगी भेटली. सन 1899 ला राजाराम शास्त्री भटजी मंत्र म्हणत असतानावेदोक्त मंत्र म्हणण्या ऐवजी पुराणोक्त मंत्र उच्चारत होते. त्यामुळे छत्रपती शाहूमहाराजांना याची प्रचंड चिड आली. त्यांनी त्या ब्राह्मणाला जाब विचारला. त्यांना वेदोक्तमंत्रांचा प्रश्न नव्हता पडला तर सामाजिक हक्काचा व सामाजिक समतेचा प्रश्न पडला होता.त्यामुळे त्यांनी पुढे वेदोक्त शाळा

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

सुरू करून बहुजन वर्गातील युवकांना वेदांचे पठणकरण्यास सांगितले. त्यांचे वेदोक्त प्रकरण हे खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेचलढा होता.छत्रपतीशाहू महाराज हे जातीव्यवस्थेचे विरोधक होते. जातिव्यवस्था हा सामाजिक प्रगतीतील मोठाअडथळा आहे आणि सर्व लोकांना त्यांची जात किंवा पंथ काहीही असले तरी समानतेने वागवलेपाहिजे. मानवताच खऱ्या अर्थाने धर्म असला पाहिजे अशा विचारांचे ते होते. त्यांनी जातीसमानतेला चालना देण्यासाठी अनेक उपाय योजले.

सत्यशोधकसमाजाची स्थापना:-छत्रपतीशाहू महाराजांनी महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाची स्थापना करूनमहात्मा फुलेंच्या विचारांना पुनर्जीवित केले. 11 जानेवारी 1911 रोजी सत्यशोधक समाजाचीस्थापना त्यांनी केली. कोल्हापूर संस्थानात वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित विचारांचाप्रचार प्रसार करण्यासाठी. "विश्वविख्यात जगतपती त्याला नकोत मध्यस्थी" या महात्माफुलेंच्या सत्यशोधक समाजाच्या ब्रीदाप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी काम केले. त्यांनीमध्यस्थींचे उच्चाटन करण्यासाठी ब्राह्मणेत्तर चळवळ नेटाने चालवली.

**एकेश्वरवादावर भर**- त्याचा सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून एकेश्वरवादावर भर होता. त्यामुळे सर्व मानव जात एकाच ईश्वराची लेकरे आहेत हा विचार प्रसारितझाला.यातून सामाजिक समतेचा संदेश त्यांनीपोहोचवला.

जाती समानतेसाठी त्यांचे योगदान:-छत्रपतीशाहू महाराजांनी खालच्या जातीतील लोकांना संधी देण्यासाठी अनेक उपाय योजले. ब्राह्मणव ब्राह्मनेत्तर चळवळ चालववी. त्यांनी अनेक शाळा आणि महाविद्यालये स्थापन केली. त्यांनीखालच्या जातीतील विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. विद्यार्थ्यांसाठीवस्तीगृह सुरू केले. जात, धर्माच्या आधारावर भेदभाव व्हायचा. त्यामुळे कनिष्ठ जातीतीलविद्यार्थी शिक्षण घेत नव्हते. त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचे काम केले.

**2.आर्थिक समानता-** छत्रपती शाहू महाराजांनी आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. सन 1902 मध्ये कोल्हापूर संस्थानात प्रशासनातील 50 टक्के जागा मागासवर्गासाठी राखीव ठेवण्याचा जाहीरनामा काढला.त्यामुळे 50 टक्के मागास वर्गाला प्रशासनामध्ये प्रवेश मिळाला. नोकरी, व्यवसायात स्थानमिळाल्याने आर्थिक विकास व्हायला हातभार लागला. शिक्षणासोबतच, छत्रपती शाहू महाराजांनीखालच्या जातीतील लोकांच्या आर्थिक कल्याणासाठी अनेक उपायही सुरू केले. त्यांनी अनेकसहकारी संस्था स्थापन केल्या आणि खालच्या जातीतील लोकांना त्यात सहभागी होण्यासाठीप्रोत्साहित केले. त्यांनी त्यांना त्यांचे व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि स्वावलंबीहोण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि इतर प्रोत्साहन देखील दिले.

**शिक्षणावरभर** -शिक्षणाचा अधिकार फक्त वरिष्ठ वर्गांना आहेही शिक्षणाची मक्तेदारी छत्रपती शाहू महाराजांना मोडून काढायची होती. त्यामुळे त्यांनीशिक्षणावर भर दिला वस्तीग्रह स्थापन केली आणि शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा यासाठीप्रयत्न केले. कोल्हापूर येथे उच्च शिक्षण देण्यासाठी राजाराम कॉलेजची स्थापना केली.त्यांनी महिलांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी अनेक उपाय योजले. केवळ महिलांसाठीअनेक शाळा आणि महाविद्यालये स्थापन केली. त्यांनी गुणवंत महिला विद्यार्थ्यांना त्यांच्याशिक्षणासाठी मदत करण्यासाठी शिष्यवृत्ती देखील दिली.

**मोफतशिक्षण:-**24 नोव्हेंबर 1911 रोजी अध्यादेश काढून संस्थानातीलसर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्याचा आदेश काढला. 7 एप्रिल 1919 च्या एका आदेशान्वये ते म्हणतात, "अस्पृश्य लोकांचे आपण देणे लागतो. त्यांची अविकासित अवस्था ध्यानी आणूनत्यांच्या शिक्षणास उत्तेजन द्यावे या हेतूने महाराजांनी त्यांना पुस्तके पद्या पेन्सिलमोफत दिल्या."3

वस्तीगृहाचीस्थापना-छत्रपतीशाहू महाराजांनी सर्वप्रथम 18 एप्रिल 1901 रोजी विक्टोरिया मराठा बोर्डिंग हे पहिलेवसतिगृह कोल्हापूर येथे स्थापन केले. 1901 मध्ये जैन बोर्डिंग स्थापन केली तसेच वेगवेगळयाजाती धर्मावर आधारित वीस वस्तीगृह सुरू केली. सन 1906 मध्ये मुस्लिमांसाठी मुस्लिमबोर्डिंग ची स्थापना केली. अस्पृश्य मुलांसाठी 1908 रोजी कोल्हापूर येथे मिस क्लार्कहोस्टेल स्थापन केले.

**कलांनाआश्रय:-** छत्रपती शाहू महाराज यांनी विविध कलांना आपल्याकोल्हापूर संस्थानात आश्रय दिला. त्यांनी मल्लविद्या संगीत नाट्य चित्रकला आणि अनेककलांचे कोल्हापूर येथे स्थापना केली. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे कोल्हापूरची ओळखकलापूर अशी झाली.

**व्यवसाय स्वातंत्र्य** -छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यवसाय बंदी उठवली.वर्ण व्यवस्थेतील कामावरील बंदी नष्ट केली. वेदांचे पठण करायला बहुजन वर्गाला सांगितले.माहूत, कोचमन, ड्रायव्हर, कुत्तेवाण, चहावाले असे विविध व्यवसाय अस्पृश्यांसाठी खुलीकेले. त्यामुळे इतर समाजाला ही व्यवसाय स्वातंत्र्य मिळाले आर्थिक विकासाचे संधी मिळूनआर्थिक समता प्रस्थापित करण्यास मदत झाली रद्द करून त्यांना स्वातंत्र्य दिले यातूनआर्थिक विकास साधण्यास सर्वांना पूरक संधी मिळू लागली. म्युनिसिपालिटीच्या चेअरमनपदीअस्पृश्य वर्गातील नेत्यांना नियुक्त केले.

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**3.राजकीय समानता -** छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांमधून सामाजिकन्यायाचे तत्व ते स्विकारतात. सामाजिक न्यायासाठी ते सर्वांच्या कल्याणाचा विचार करतात.छत्रपती शाहू महाराज म्हणतात, “आमचे सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिचेकल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमच्या संस्थानाची हर एक प्रकारे सदोदित भरभराट व्हावी, अशी आमची उत्कट इच्छा आहे.”4दि. 26 जून 1902 रोजी त्यांनी त्यांच्या प्रशासनातनोकरीसाठी मागासवर्गीय समाजाला 50 टक्के आरक्षणजाहीर केले. ब्राह्मण, शेनवी, प्रभू आणि पारशी समाजाव्यतिरिक्त इतर समाजासाठी हे आरक्षणहोते. या इतर समाजामध्ये मराठा आणि इतर मागासवर्गीय,भटके-विमुक्त आदिवासी आणि मागासवर्गीयसमाज होता. छत्रपती शाहू महाराजांनी ज्या तत्वानुसार 50 टक्के आरक्षण जाहीरकेले.तर 50 टक्के आरक्षण बदलून त्याचे प्रमाण आणखीन वाढवा. कारण, शाहूंच्या ‘सामाजिक न्याया’च्या संकल्पना द्वेषावर नाहीत, तर सत्य-तर्कनिष्ठ न्यायावर आहेत.स्वार्थासाठी त्यांनी सामाजिक न्यायाचा वापर केला नाही.छत्रपती शाहू महाराज हे महिलांच्या हक्कांचेखंबीर पुरस्कर्ते होते. त्यांनी त्यांची स्थिती सुधारण्यासाठी अथक परिश्रम घेतले.स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान संधी मिळायला हव्यात आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रातसमान अधिकार मिळायला हवेत असे त्यांचे मत होते.

**निष्कर्ष-** छत्रपती शाहू महाराजांच्या कृतीतून सामाजिक न्यायाची मुहूर्त मेढ रोवली गेली. त्यामुळे त्यांचाजन्मदिन सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. सामाजिक न्यायाची संकल्पना त्यांच्याकृतीतून अभ्यासले असता सामाजिक समता आर्थिक समता व राजकीय समता व्यापक प्रमाणात त्यांच्याकार्यातून दिसते. त्यांनी ही समानता प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले.बहुजन वर्ग असा शब्दप्रयोग वापरून त्यांच्या सामाजिक आर्थिक व राजकीय उद्धारासाठीअथक प्रयत्न केले. वंचित अस्पृश्य बहुजन वर्ग विकासाच्या प्रवाहात आला पाहिजे व त्यांचासर्वांगीण विकास झाला पाहिजे यासाठी प्रयत्न केले. पुरोगामी महाराष्ट्राचा सुधारणावादीचेहरा निर्मितीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले. स्वराज्य म्हणजे मुठभर लोकांच्या हातचीसत्ता नव्हे तर हे सुराज्य निर्माण झाले पाहिजे असे त्यांचे स्वप्न होते त्यासाठीजातीव्यवस्था नष्ट करून समतावादी समाज निर्माण करणे गरजेचे आहे. त्यांना समताधिष्ठितस्वराज्य अपेक्षित होते. शिक्षण हा खऱ्या अर्थाने परिवर्तनाचा दुवा आहे हे त्यांनीओळखले होते. शिक्षणाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे व माणिकमानवतावाद निर्माण झाला पाहिजे यासाठी प्रयत्न केले त्यांनी सामाजिक न्यायाचे तत्वआपल्या कृतीतून सिद्ध केले म्हणूनच खऱ्या अर्थाने ते सामाजिक न्यायाचे जनक ठरतात.

**संदर्भ-**

1) https://marathivishwakosh.org/41763/
2) पवारजयसिंगराव-राजश्री शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, जानेवारी 2012, पा.नं.32.
3) तत्रेयपान नं. 61q
4) तत्रेयपान नं. 21
5) जाधव रमेश -राजश्री शाहू छत्रपती- वाद आणि वास्तव, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, 1992
6) फडके य. दि.- शाहू छत्रपती आणि लोकमान्य, पुणे, 1982

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

46

# शाहू महाराजांचे पर्यावरण रक्षण विषयक कार्य: शाहू कालीन शिवारण्य (पडसाळी - मुडागड )

**प्रा. संजयकुमार मेणशी**
भूगोल विभाग प्रमुख,
गोपालकृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर

---

**प्रास्ताविक** -समतेचे पुरस्कर्ते, रयतेचे राजे युग प्रवर्तक राजर्षी शाहू महाराजांच्या कार्य कुशल नेतृत्वामुळे करवीर संस्थानात खऱ्या अर्थाने सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडले होते. राजर्षी शाहू महाराजांच्या कुशल व धोरणात्मक राज्यकारभारातूनच रयतेच्या किंबहुना समाजातील प्रत्येक घटकांच्या सर्वांगिण विकासाचा भक्कम पाया घातला गेला होता. राजर्षी शाहू छत्रपतींचे धोरणात्मक निर्णय तत्कालीन परस्थितीतील प्रमाणबद्ध तर होतेच त्याच बरोबर त्यांचे निर्णय आजच्या काळातही समाजातील सर्वच घटकांबरोबर पर्यावरण रक्षणासाठी अनुकरणीय व प्रेरणादायी आहेत. १८७४ ते १९२२ असे शाहू महाराजांना अवघे ४८ वर्षाचे आयुष्य लाभले शाहू महाराजांच्या ४८ वर्षाचे दैदिप्यमान कार्यकिर्दीची महती कथन करणारी लाखोंच्या संख्येने कागदपत्रे कोल्हापूर पुरालेखागार कार्यालयात जतन करण्यात आलेले आहेत. या उपलब्ध कागदपत्रांपेकी शाहू महाराजांच्या काळातील मूळ आदेश पुस्तकातून पर्यावरण रक्षणांकरिता वेळोवेळी निर्गमित झालेले आदेश याकडे आजच्या काळातही गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे संस्थान काळातील आदिवासी वाड्यातील सामाजिक, आर्थिक मागासलेपण दूर करण्याबरोबरच तेथील पर्यावरणाची हानी होऊ नये या करिता महाराजांचे कार्य अतुलनीय आहे.

**विशेष संज्ञा** -मुडागड एक प्राचीन किल्ला, दुर्गम किल्ला, शोध निबंधातील अंक, शाहूकालीन आदेश, मुडा- म्हणजे धान्य साठवणुकीवा किल्ला.

**समस्या विधान** -राजर्षी शाहू महाराज जसे सामाजिक समतेच्या धोरणाचे पुरस्कर्ते होते तसेच पर्यावरण रक्षण विषयक देखील पुरस्कर्ते होते. कोल्हापुरातील रस्त्यावरील लावलेल्या झाडांना उन्हाळ्यात पाणी घालण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रकमेची स्पेशल सॅक्शन शाहू महाराजांनी मंजुर केले होते. (आ. ४५१) पंचगंगा नदीत मर्यादीत केलेल्या जागेत जनावरे पाणी पिण्यास घालण्याचे नाहीत. अशी मनाई केली असताना देखील जे इसम नदीत जनावरे घालतात त्यांना त्यांच्या कृत्याबद्दल योग्य तो दंड करण्याचा सक्त आदेश शाहू महाराजांनी दिलेला होता. (आ. ४७५). अतिग्रे तलावात आसपासचे लोक पाणी भरतात, धुणीभांडी घासतात त्यामुळे पाणी दुषित होऊन रोग उत्पन्न होण्याचा धोका संभवत असल्यामुळे गावातील लोकांना नवीन हौद बांधून देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रकमेची मजुरी शाहू महाराजांनी दिलेली होती (आदेश ६०६) करवीर संस्थानातील पश्चिम घाटात मार्यातीत लाकूड तोड, गरज पडलेच शिकारीचे आदेश, कळंबा तलावाची बांधणी व कोल्हापूर शहरास सायफन पद्धतीने पाणी पुरवठा, राधानगरी धरण अश्या असंख्य पर्यावरणात्मक गोष्टी महाराजाच्या कार्यकाळात घडून आल्या.

यापैकी विशेष उल्लेखनीय व दुर्लक्षित पर्यावरणाचे महत्वाचे कार्य म्हणजे तालुक्यातील बाजारभोगाव जवळील पडसाळी धरणाजवळ मुडागड येथे हत्तीसाठी स्वतंत्र राखीव जंगलाची सोय ही खरोखरच पर्यावरणीय दृष्ट्या महत्वाची घटना आहे. आज पश्चिम घाटातील पर्यावरणाचा झालेला ऱ्हास यामुळे हत्तींचे मानवी वस्त्यांकडे होणारे स्थलांतर पाहता त्या काळातील महाराजांची दूरदृष्टी उल्लेखनीय आहे. एक भूगोल व पर्यावरणाचा अभ्यासक म्हणून मला मुडागड येथे भेट देण्याची तीव्र इच्छा झाली म्हणून दि. १ मे २०२२ रोजी आम्ही गोपाळ कृष्ण महाविद्यालयातील भूगोल विभागाचे २३ विद्यार्थी सहकारी प्राध्यापक व पडसाळी येथील जंगल मार्गदर्शक श्री. संपतराव पाटील यांच्या सहकार्याने ४ तासांचा प्रवास करून मुडागड येथील दुर्गम जंगलामधील भ्रमंती केली या अनुभवावर आधारित शोध निबंधाचा विषय आम्ही निवडला.

**उद्देश** –

१) शाहूकालीन नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) शाहूकालीन पर्यावरण विषयक समस्यांचा वेध घेणे

३) शाहूकालीन पर्यावरण रक्षण विषयक वेळोवेळी निर्गमित झालेल्या आदेशांचा अभ्यास करणे

४) शाहूकालीन पर्यावरण रक्षण विषयक आदेश सद्य काळातील परिस्थितीशी पडताळणे

५) बदलत्या आर्थिक सामाजिक परिस्थितीत होणारा पर्यावरणाचा ऱ्हास व शाहू कालीन आदेश यांचा तुलनात्मक अभ्यास करून शाहू महाराजांच्या पर्यावरण विषयक कार्याचे मूल्यमापन करणे.

**अभ्यास पद्धती -**करवीर संस्थांच्या पश्चिम घाटातील बाजारभोगाव जवळील पडसाळी धरणाजवळ मुडागड या दुर्गम भागात भेट देऊन शाहूकालीन पाऊलखुणांचा शोध घेणे याकरिता १ मे २०२२ रोजी मुडागड येथे प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण व या शास्त्रीय संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे याशिवाय पडसाळी वाडीतील लोकांकडून मुलाखती द्वारे माहिती संकलित केली प्रत्यक्ष भेटीतून मिळालेल्या माहितीचे एकत्रिकरण करून दुर्लक्षित मुडागड व शाहू महाराजांचे पर्यावरण विषयक कार्यांची माहिती सर्वांना उपलब्ध व्हावी हा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र -** मुडागड हे पडसाळी धरणाजवळील पश्चिम घाटातील दुर्गम ठिकाणांची उंची २२९० मी. इतकी आहे अक्षवृत्तीय स्थान १६° ६७' ६५'' उत्तर रेखांश ७३° ५१' ११'' पूर्व रेखावृत्त







**मुडागड - दुर्गम शाहूकालीन राखीव वन-** कोल्हापूर जिल्ह्यातील पश्चिमेकडील घाटाकडे कळे, काटेभोगाव, बाजारभोगाव ते पडसाळी या गावातून जवळपास ५५ कि.मी. चा प्रवास करत मुडागड येथे पोहोचता येते प्राचीन काळापासून कोकणातून घाटावर जाणे येण्यासाठी अनेक घाट मार्गाचा वापर केला जात असे या घाट मार्गाने कोकणातील बंदरात उतरणारा माल घाटावरील बाजारपेठांमध्ये नेला जात असे या घाट मार्गाचे रक्षण करण्यासाठी वेगवेगळ्या राजवटीत किल्ले बांधले गेले कोल्हापूर व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या काजिर्डा घाटाच्या रक्षणासाठी प्राचीन काळी मुडागड हा किल्ला बांधण्यात आला होता कोल्हापूर जिल्ह्यातील पडसाळी गावातून कोकणातील राजापूर जवळील काजिर्डा गावात हा घाट उतरतो पूर्वीच्या अनेक घाटांचे काळाच्या ओघात रस्त्यात रूपांतर झाले उदाहरणार्थ फोंडा घाट, अंबोली घाट, अंबा घाट परंतु काजिर्डा घाट त्याच मूळ प्राचीन स्थितीत राहिला आहे काळाच्या ओघात नाणेघाट प्रमाणे पूर्णतः दुर्लक्षित झालेला हा घाट शाहू महाराजांनी हत्तींसाठी राखीव वन म्हणून संरक्षित केला मुडागड किल्ल्यावर फारसे अवशेष नसले तरी तो किल्ला पाहण्यासाठी हा दाट जंगलातील ट्रेक फार सुंदर आहे.

**मुडागड इतिहास -** हा गड कोणी बांधला हे ज्ञात नाही पेशव्यांच्या काळात याचा उल्लेख आढळतो केशव व तुळाजी आंग्रे यांच्यात तेव्हा वितुष्ट आले होते त्याचवेळी तुळाजीने पन्हाळा प्रांतावर हल्ले केले त्याला आळा घालण्यासाठी येसाजी आंग्रे व सावंतवाडीकर यांनी एकत्रितपणे मुडागडला वेढा घातला व गड जिंकून घेतला. अशी ऐतिहासिक नोंद आहे.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**मुडागडावर पोहोचण्याच्या मार्ग** -कोल्हापूरहून मुडागड च्या पायथ्याशी असणाऱ्या पडसाळी गावापर्यंत नेहमी बसची व्यवस्था आहे कळे गावातून एक रस्ता अणुस्करा घाटाकडे जातो या रस्त्याने दहा किलोमीटर वरील बाजार भोगाव गाव लागते. या गावापासून पुढे जाऊन डाव्या बाजूने जाणारा रस्ता किसरूळ, काजवडे, पोंबुरे, पिसाळी, कोलीक या मार्गे पडसाळी गावात जाता येते. हे साधारणतः अंतर बाजार भोगाव पासून सर्वसाधारण १८ किलोमीटर आहे, तर कोल्हापूर पासून ५५ किलोमीटर इतके आहे.



पडसाळी पासून मुडागडला जाताना वाट सापडणे शक्य नाही. त्यामुळे गावातील वाटाड्या घ्यावा लागतो. गावातील नदी ओलांडल्यानंतर थोड्या वेळातच वाट घनदाट अरण्याकडे लागते. साधारणतः दोन तासात आपण गडाच्या पायथ्याशी येतो. खडागड चढून ३० मिनिटात आपण गडावर पोहोचतो. पडसाळी गावातून मुडागड पाहून परत येण्यास ५ तास लागतात.

**गडावरील ठिकाणे** -मुडागड हा किल्ला वनदुर्ग या प्रकारातील आहे. काही ठिकाणी याचा शिवारण्य म्हणून उल्लेख आहे. घनदाट अरण्य त्याचे बलस्थान आहे. यामध्येच मुडागडचे अवशेष हरवलेले आहेत. डोंगर चढत असताना गडाचे तटबंदीचे कातिव चिरे आपणास पहावयास मिळतात. गडमाथ्यावरून पडसाळी गावातील मध्यम प्रकल्प काजिर्डा घाट व गगनगड पाहता येतो.

**पर्यावरणीयदृष्ट्या मुडागडचे महत्त्व** -एकोणिसाव्या शतकामध्ये प्रबोधना नंतर महाराष्ट्रात नवे वारे वाहू लागले होते. आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात सुद्धा नवीन प्रकारच्या सुधारणा घडून याव्यात अशा प्रकारच्या निरनिराळ्या क्षेत्रामधील असंख्य व्यक्तींनी प्रयत्न केले. या सर्व व्यक्तींमध्ये राजर्षी शाहू छत्रपती यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. करवीर संस्थान या भौगोलिक क्षेत्रांमध्ये त्यांनी जे अधिकार वापरात आणले. मर्यादित क्षेत्र असले तरी त्यांनी आर्थिक सामाजिक आणि शासकीय बदल घडवून आणले, ते मोठे प्रभावी कार्य होते. एक भूगोलाचा अभ्यासक म्हणून मी त्यांच्या पर्यावरणीय कार्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला त्यावेळी त्यांचे अनेक आदेश कोल्हापूर संस्थांनातील पर्यावरण रक्षण संदर्भात महत्त्वाचे ठरले आहेत. ५४३ क्रमांकाच्या आदेशान्वये कळंबा तलावात माशांची शिकार हुजूर आज्ञेच्या पास शिवाय कोणासही करू देऊ नये यासाठी तलावावरील एक रखवालदार नेमण्यास महाराजांनी मंजुरी दिली होती. संस्थांनात जनावरांस लोक क्रूरपणे वागवत असे निदर्शनास आले वरून कोल्हापूर संस्थानात जनावरांचा छळ करण्यास मनाई चा कायदा लागू करणेकरिता शाहू महाराजांनी ६७८ क्र. आदेशान्वये कायदा केलेला दिसून येतो. थोडक्यात करवीर संस्थानात महाराजांनी पर्यावरण रक्षणा विषयक वेळोवेळी अनेक आदेश केलेले दिसून येतात. मुडागड यासारखे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील ठिकाणे संरक्षित राहणे करिता कायद्याने प्रयत्न केलेले दिसून येतात. लहान-मोठ्या कोल्हापूर बंधाऱ्यांचे छोट्या तलावांमध्ये रूपांतर केल्यामुळे संस्थानातील पर्यावरणाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी शाहू महाराजांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.



**राजर्षी शाहूंनी हत्तींसाठी राखून ठेवलेल्या शिवारण्याला भेट**

कोल्हापूर, ता. ११ : येथील निसर्गमित्र परिवारातर्फे लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वानिमित्त शाहू महाराजांनी वन्य हत्तींसाठी मुडागड येथे राखून ठेवलेल्या शिवारण्याला भेट दिली. गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या सुमारे तीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

अभ्यास सहलीमध्ये सह्याद्रीच्या परिसरातील जैवविविधता, भौगोलिक रचना, डोंगरदऱ्या, पाणवठे, झरे, गवताळ कुरणे, नदीची परिसंस्था, माती, दगड, शेती, धनगर वाडे परिसरातील परसबागा व स्थानिकांशी चर्चा इत्यादींविषयी माहिती देण्यात आली. तसेच जंगल भ्रमंती करताना पांढरा कुडा, गेळा, सुरंगी, टेंटू, भोकर, हिरडा, बेहडा, नाना, बहावा, अंजनी, करंबळ, शिवण, कुंभा, वारस, कुंकूफळ इत्यादी वृक्ष, तर वाकेरी, पायटी, दालचिनी, शिकेकाई, करवंद, मिरी, ऊक्षी, हरदल, मॉस, अळू, पात्रे, चोळ, घोटवेल, गोमाटी, घोरकंद इत्यादी रानभाज्या, झुडपे, वेली व गवताळ कुरणे आढळली. हरणटोळ, बेडूक, मासे, खेकडे, वन्यप्राण्यांचे ठसे, विविध फुलपाखरे, पक्ष्यांची व कीटक-मुंग्यांची घरटी अशा अनेक वन्यजीवांचे निरीक्षण करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

आधुनिक जीपीएस तंत्राचा वापर करून सर्व नैसर्गिक रचनांच्या नोंदी घेतल्या. विद्यार्थ्यांना निसर्गमित्रचे अनिल चौगुले, पराग केमकर, प्रा. संजय मेणशी, प्रा. नीलेश सुतारे यांनी मार्गदर्शन केले. मुडागड येथे गडाची स्वच्छता केली. मोहिमेचे संयोजन जमीर मुजीफ, महेश कांबळे, गेनू गावडे यांनी केले. शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. जयकुमार देसाई, प्राचार्य पी. के. पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

मुडागड : राजर्षी शाहू स्मृतिशताब्दीनिमित्त कृतज्ञता पर्वांतर्गत निसर्गमित्र संस्थेच्या वतीने शिवारण्य सहलीचे आयोजन झाले. त्यात सहभागी महाविद्यालयीन तरुणाई.

**कुड्याची भाजीची आठवण**

स्थानिक ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराजांच्या आठवणींचे कथन केले. शाहू महाराज आहूर ते पोर्ले या परिसरात भटकंती करत असताना शेतामध्ये एका आजीबाईने स्वयंपाकामध्ये कुड्याची भाजी केली होती. महाराजांना या भाजीची चव फारच आवडली व खूश होऊन महाराजांनी आजीबाईंना खणाच्या आकाराची जमीन बक्षीस म्हणून बहाल केली होती, अशी आठवण आक्काताई चौगुले यांनी सांगितली. पडसाळी धरण भेटीने या अभ्यास सहलीची सांगता झाली.

Kolhapur Main
12/03/2022 Page No. 8

मुडागड हा अतिशय दुर्गम भाग असून येथील जंगलसंपत्तीचा वापर मानवापेक्षा प्राणी व पशु पक्षांना अधिक व्हावा याकरिता मुडागड हे केवळ हत्तींसाठी राखीव जंगल म्हणून घोषित करणारे कदाचित भारतातील पहिले राजे असावेत, शाहू महाराजांच्या मते आपली हवा स्वच्छ करण्यास, आपले पाणी शुद्ध करण्यास, अन्न-पाणी, औषधे तयार करण्यास, पूर पाणी कमी

करण्यासाठी, तसेच संस्थानातील तापमान थंड राखण्यास मुडागड सारखी अनेक ठिकाणे मदत करतात यावरून शाहू महाराज पर्यावरण प्रेमी असल्याचे दिसून येते.

**निरीक्षणे –**

१) पन्हाळा तालुक्यातील पडसाळी येथे डोंगरात गगनबावडा व पन्हाळयाच्या हद्दीवर दुर्लक्षित मुडागड हा वनदुर्ग आहे

२) पश्चिम घाटातील जैव विविधतेचे दर्शन या प्रवासा दरम्यान होते

३) गडावर जाणेस कोणताही रस्ता नाही केवळ पायवाटा व त्याही चुकू नयेत म्हणून रंगीत रिबीन चे तुकडे झाडांना बांधून काही दुर्ग प्रेमी स्थानिक वाटाड्या घेऊन येथे पोहोचतात.

४) प्राचीन काळात धान्य तट्टयाच्या बोधक्यात साठवत. त्यांना मूडा म्हणत असत यावरून धान्य साठवण्याचा किल्ला म्हणून या गडास मुडागड असे नांव पडले.

५) गडावर आल्यावर प्राचीन अवशेषामध्ये एक खोदीव पाणी टाके, जांभ्या दगडातील कोसळलेली लहानशी तटबंदी, पाच बुरुज व एक छोटे शिव मंदिर पहावयास मिळते.

६) पडसाळी कोलीक व मुडागड येथील दाट जंगलास शाहू महाराजांनी शिवारण्य हे नांव दिले व येथे वन्य प्राणी संदर्भात अनेक प्रयोग केले. अशा नोंदी आढळतात. हत्तींसाठी राखीव ठेवलेल्या या जंगलात आज हत्ती आढळत नाहीत मात्र गव्यांचे सहज दर्शन होते.

७) सातारा येथील बा रायबा या दुर्ग प्रेमी संघटनेने येथे काही प्रमाणात साफ सफाई करून किल्ल्याचे अस्तित्व जतन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सारांश -**

१) शाहू महाराजांसारख्या द्रष्ट्या राजाने स्वातंत्र्यपूर्वकाळात मुडागड येथे हत्तींकरिता राखीव वन निर्मिती करून पर्यावरण पूरक कार्य केलेले दिसून येते.

२) स्वातंत्र्यानंतर वाढती लोकसंख्या व जंगलाचे घटते प्रमाण याचा विचार करून भारत सरकारच्या वतीने अनेक संरक्षित वने निर्माण झाली. त्याची प्रेरणा शाहूकालीन आदेशामध्ये असावी.

३) पर्यावरण संरक्षणाकरिता वेळोवेळी महाराष्ट्र राज्य सरकारकडून वनविषयक कडक कायदे निर्माण केले गेले याची सर्व प्रेरणा शाहूकालीन ठरावांमध्ये असावी

४) शाहू महाराजांच्या विविध आदेशान्वये व घाटातील अनेक वाडीवस्त्यांवरील लोकांच्यामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती निर्माण केली

५) डंगे धनगर सारख्या वनसंपत्तीचा आधारावर आर्थिक व्यवसाय करणाऱ्या जमाती आहेत आजही ते पश्चिम घाटात आपले अस्तित्व टिकवून आहेत.

६) मुडागड सारखी अनेक दुर्लक्षित व शाहू कालीन पाऊलखुणा दर्शवणारी वने यांचा शोध घेऊन शाहू महाराजांचे तत्कालीन दुर्लक्षित कार्य जगासमोर आणणे महत्त्वाचे आहे.

७) शाहू महाराजांचे पर्यावरण विषयक विविध आदेशांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

८) महाराष्ट्रात जलदुर्ग, गिरीदुर्ग व भुईकोट किल्ले आहेत पण वनदुर्ग किल्ल्याचा अभ्यास कमी झालेला दिसून येतो म्हणूनच मुडागड या वनदुर्ग किल्ल्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

९) पदभ्रमंती करण्यासाठी व शाहूकालीन पाऊलखुणा शोधण्यासाठी मुडागडचे विशेष महत्त्व असलेले आपणास पहावयास मिळते.

१०) २०२४ हे शाहू जन्मशताब्दी वर्ष साजरे केले गेले. या निमित्ताने सर्व युवा पिढीला एक महत्त्वाचा संदेश पश्चिम घाटातील तसेच महाराष्ट्रातील इतर कोणत्याही गड किल्ल्यावर पर्यावरणासाठी गेल्यानंतर प्लास्टिक कचरा टाकू नये तसेच गडकिल्ले व तेथील पशुपक्षी यांना कोणत्याही प्रकारची हानी पोहोचू नये याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे ज्यामुळे खऱ्या अर्थाने शाहू महाराजांची जन्मशताब्दी साजरी होईल.

**संदर्भ -**

1. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक - डॉ. जयसिंगराव पवार
2. राजश्री छत्रपती शाहूंचे निवडक आदेश संपादक संचालक पुराभिलेख संचनालय मुंबई
3. राजर्षी शाहू भटक्या विमुक्त समाजाचा उद्धार करणारा राजा संपादक - व्यंकप्पा भोसले

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**47**

# स्त्री मुक्तीचे दीपस्तंभ राजर्षी शाहू महाराज

**प्रा. डॉ. शोभा चाळके-म्हमाने**
इंग्रजी विभाग
श्रीशहाजीछत्रपतीमहाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना -**भारतीय समाज व्यवस्थेचा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहास पाहता या इतिहासावर अनेक दखलपात्र व्यक्तिमत्त्वाचा दूरगामी परिणाम झाल्याचे आपणाला दिसून येतो. मध्ययुगीन कालखंडानंतर भारतीय समाज व्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे झाल्याचे आपणाला दिसून येते. ब्रिटिश भारतात येणे हा भारत आधुनिकीकणाच्या दिशेने जाण्यासाठीचा महत्त्वाचा घटक समजला जातो. सम्राट अशोकानंतर एक छत्री सत्ता आणण्याचे महत्वपूर्ण कार्य ब्रिटिश राजवटीने केले होते. नव्या प्रशासन यंत्रणा, पाश्चात्य शिक्षण व्यवस्थेमुळे भारतीयांना भौतिक सुधारणेसह राष्ट्रीयत्वाची भावना समजण्यास मदत झाली होती. त्याचा परिणाम भारतात अनेक आधुनिक विचार प्रक्रिया रुजवण्यासाठी मदत झाली. भारतात असणाऱ्या अनेक जाचक रुढी, प्रथा, परंपरा या विरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात झाली होती. या काळात अनेक लोक शिक्षण प्रक्रियेमध्ये आल्याचेही आपल्याला दिसून येते. या आधुनिकीकरणाचा आणि भारतात सुरू झालेल्या उदारमतवादी धोरणाचा फायदा स्त्री मुक्ती चळवळीसह अनेक दबलेल्या, पिचलेल्या, वंचित समुदायांना सन्मान मिळवून देण्यासाठी झाल्याचा आपल्याला दिसून येतो. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, 1948 ला पुण्यामध्ये मुलीसाठी काढलेली पहिली शाळा, स्त्री स्वाभिमानासाठी आणि सन्मानासाठी उभारलेली चळवळ, भारतीय स्त्री मुक्तीच्या चळवळीला गतिमान करणारी ठरली. महात्मा फुले यांचा सत्यशोधकी विचार पुढे आपल्याला राजर्षी शाहू महाराज यांच्या कृतीमध्ये उतरल्याचे दिसून येते. लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांचा उन्नतीसाठी अतोनात प्रयत्न केल्याचे आपल्याला दिसून येतात. लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांना शिक्षण व समान हक्क मिळायला पाहिजे यासाठी खास प्रयत्न केले. जिच्या पोटी आपण जन्म घेतो ती शूद्र कशी असू शकते असे राजर्षी शाहू महाराजांना वाटते. ती जर सामर्थ्यवान असेल तर तिच्या पोटी जन्माला येणारी पिढी देखील सामर्थ्यवान असते असे राजर्षी शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांनी मुलींना फी माफी, शिष्यवृत्ती, बक्षिसे, राहण्याची व जेवणाची सोय केली. राजर्षी शाहू महाराजांच्या या प्रयत्नामुळेच त्या काळात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण 0.10% वरुन 0.35 % पर्यंत वाढले होते. राजर्षी शाहू महाराजांच्या या लोकाभिमुख कार्यामुळे त्यांचा उल्लेख "रयतेचा राजा" असाही केला जातो. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन तर दिलेच शिवाय तिच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणारे अनेक कायदेही अंमलात आणून तिची समाजाकडून व कुटुंबाकडून होणारी पिळवणूक थांबवण्याचा मोठा प्रयत्न केला. बहुजन हिताय! बहुजन सुखाय! यासाठी अनेक योजना अंमलात आणणारे राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रिया आणि सामान्यांच्या उत्कर्षासाठी आपले राजेपद पणाला लावले. विस्कळीत समाजाला मानवी समतेचे धडे दिले. काळाला स्वतःच्या ताब्यात घेऊन इतिहासाला वेगळे वळण दिले. ज्या इतिहासाला आणि काळाला राजर्षी शाहू महाराजांनी दिशा दिली. तो इतिहास आणि भारताचा भूतकाळ थोडक्यात पाहूया.

**स्त्री आणि भारतीय समाज ऐतिहासिक आढावा -**भारतीय परिप्रेक्ष्यामध्ये स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम राहिले आहे. मनुस्मृतीला आदर्श समजून समाजाची होणारी वाटचाल स्त्रियांसाठी नेहमीच त्रासदायक ठरली आहे. पेशवे काळात स्त्रिया व बहुजन समाज भयंकर परिस्थितीमधून जात होता. समाजात जातीचे जाळे घट्ट झाले होते. खेड्यातील जनता राजकारभारास मोठ्या प्रमाणात वैतागली होती. वर्ण आणि जाती व्यवस्थेने स्त्रियांचे जगणे बेहाल करून टाकले होते. जातिभेद, वर्णभेद सामाजिक विषमता भयानक प्रमाणात वाढलेली होती.अखिल मानव जातीला हीन लेखावी अशी लाजिरवाणी गोष्ट म्हणजे 'सती जाणे' ही प्रथा मोठ्या प्रमाणात समाजात रुजली होती. पती मेल्यानंतर काठ्यांच्या धमकीवर समाज त्याच्या पत्नीला पतीच्या चितेवर ढकलून तिथे जिवंत जाळत असत. यापेक्षा भयंकर म्हणजे काय असू शकते? कौर्य दर्शवणारी दुसरी दृष्ट प्रथा म्हणजे 'केशवपन' पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीचे पूर्ण केस कापले जात असत जेणेकरून तिचे सौंदर्य नष्ट व्हावे. इतकेच नव्हे तर स्त्रीला पुरुषाप्रमाणे मान वर करून बोलण्याची ही संधी नव्हती. स्त्री केवळ उपभोग्य वस्तू हीच धारणा समाजामध्ये विकसित झाली होती. बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, विधवा विवाह, प्रेम विवाह अशा गोष्टी समाजात खूप मोठ्या समस्या समजल्या जात होत्या. भारतीय स्त्री रूढीच्या कचाट्यात सापडली होती. धार्मिक रूढीप्रमाणे विविध जातीमधील स्त्रिया वेगवेगळ्या स्वरूपाचे कार्य करताना दिसत होत्या. त्याकाळी काही स्त्रियांना पतिनिधनानंतर वैधव्यात जगावे लागायचे. काही स्त्रिया केशवपन करुन घरातच कसेबसे जगायच्या. काही स्त्रिया सती जायच्या, बहुतांशी स्त्रिया घर

कामच करीत असत 'चूल आणि मुल' हेच तिचे विश्व होते. शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. पुनर्विवाह करता येत नव्हता. सार्वजनिक नियमांमध्ये तिचा सहभाग नव्हता.

अशा भयावह स्थितीमध्ये स्त्री गुलाम म्हणून जगत होते. समाज व्यवस्थेने व त्यांच्या ठेकेदाराने स्त्रियांचे जगणे विस्कटून टाकले होते. जगाच्या पातळीवरती औद्योगिक क्रांतीचे वारे जगभर वाहत भारततही आले आणि उदारमतवादी चळवळ भारततही रुजू होण्यास सुरुवात झाली. स्त्रियांच्या हक्काचे, स्वातंत्र्याचे बोलण्यात येऊ लागले. स्त्री मुक्तीच्या या सर्व प्रक्रियेमध्ये लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान अतिशय उच्च कोटीचे होते. स्त्रीमुक्तीची पहाट जवळ आणण्याचे अतिशय मोलाचे कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केले आहे. लोकराजे राजर्षी शाहू महाराज हे पुन्हा पुन्हा आठवावे असे भारतीय इतिहासाच्या पटलावरील महत्त्वाचे लोकराजे होते. ते जगा वेगळे कृतिशीलपणा जपणारे राजा माणूसही होते. आधुनिक दृष्टिकोन असलेले विज्ञाननिष्ठ राजे म्हणून ही त्यांना ओळखले जाते. अनेक क्रांतीपर्वाची सुरुवात त्यांनी आपल्या संस्थांमध्ये केल्याची दिसून येते. सहकार तत्व प्रणालीचा उदगाता म्हणूनही त्यांना ओळखले जाते. कलाविष्कार फुलवणारा कलाप्रेमी राजा म्हणूनही त्यांच्याकडे बघितले जाते. ब्राह्मणेत्तर चळवळींचा निर्माता म्हणूनच राजर्षी शाहूंची ओळख आहे. भटक्या जमातीला स्थिर करणारा गतिमान राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज, शेतकऱ्यांचा कैवारी, क्रांतिकारी चळवळींचे आधारस्तंभ, आपल्या जनतेला साक्षर बनवणारे शिक्षण महर्षी, अस्पृश्यांचा मुक्तिदाता, जाती-धर्माच्या पुढे जाऊन विचार करणारे पुढारी, परिवर्तनासाठी हट्टवादी भूमिका घेणारा लोकनेता, ज्ञानवंत राजा अशी ओळख असणारे नवयुगातील राष्ट्रपुरुष म्हणून राजर्षी शाहू महाराजांची एक वेगळी ओळख आहे.

लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यासाठी ठोस पावले उचलत काही महत्वाचे क्रांतिकारी कायदे केले होते. 1917 ला राजर्षी शाहू महाराजांनी विधवा पुनर्विवाह कायदा केला. 12 जुलै 1919 ला आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह कायदा केल्याचे दिसून येते. मानवाकच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षण हाच उपाय आहे असे राजर्षी शाहू महाराजांना वाटायचे. राजघराण्यांच्या नियमांचे उल्लंघन करून त्यांनी स्वतःच्या सुनबाई इंदुमतीदेवी यांना उच्चशिक्षित करून आत्मनिर्भर करण्यासाठी घोडेस्वारी, तलवारबाजीचे प्रशिक्षणही दिले होते. राजर्षी शाहू महाराजांनी मुलीसाठींच्या स्वतंत्र शाळांचाही पुरस्कार केला. 1893-94 मध्ये एकूण 26 शाळा होत्या. त्यात 1419 मुली शिक्षण घेत होत्या. वर उल्लेख केल्याप्रमाणे 1917 च्या जुलैमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. तसेच या कायद्यानुसार विवाहाची कायदेशीर नोंद करण्याची पद्धत ही सुरू केली गेली होती. 12 जुलै 1919 रोजी वर नमूद केल्याप्रमाणे 'कोल्हापूर इलाख्यातील विवाह संबंधी कायदा' या नावाने आंतरजातीय विवाहाचे गॅजेट प्रसिद्ध झाले होते. 2 ऑगस्ट 1919 रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅजेटमध्ये 'स्त्रियांना क्रूरपणे वागविण्याचे नाहीसे करावे किंवा त्यास प्रतिबंध करावा म्हणून केलेले कायदे' आणि 'कोल्हापूरचे काडी मोडण्याचे घटस्फोट नियम' हे स्त्रियांना संरक्षण देणारे आणखी दोन महत्त्वाचे कायदे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जारी केले होते. राजर्षी शाहू महाराज यांनी 17 जानेवारी 1920 रोजी 'हिंदू वारसा दुरुस्ती कायदा' करून उच्चवर्णीयांच्या अनौरस संततीला जनक पित्याकडून वारसा हक्क मिळवून दिला. हा त्या काळातील खरोखरच सामाजिक व्यवस्थेमधील क्रांतिकारी बदल करणारा निर्णय होता. या व अशा अनेक प्रागतिक व पुरोगामी विचारसरणीतून राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री पुरुष समतेचा संदेश भारतीय समाजाला दिला. राजर्षी शाहू महाराजांनी उचललेली ही पावले खऱ्या अर्थाने स्त्री उद्धाराचा एक यशस्वी प्रयत्न होता. राजर्षी शाहू महाराज यांना आपल्या जनतेची प्रचंड कणव होती. ते मानवतावादी पद्धतीने आपल्या समग्र जनतेकडे भेदभाव न करता पाहत. तसेच स्त्रियांनी शिकले पाहिजे, त्याचबरोबर आत्मनिर्भर ही बनले पाहिजे असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत. त्यामुळे स्त्री शिक्षणासाठी व स्त्रियांचा स्वाभिमान वाढवण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी महत्त्वपूर्ण पावले आपल्या राज्यामध्ये उचलल्याची आपणाला दिसून येतात. राजर्षी शाहू महाराज फक्त बोलत राहिले नाहीत तर आपले बोलणे कायद्यामध्ये रूपांतरित करून त्या भूमिकेला सक्षम करण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे आपल्याला दिसून येते. राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या बाजूने, त्यांच्या उन्नतीसाठी भूमिका घेणारे लोकराजे तर होतेच परंतु स्त्रीमुक्तीचे एक दीपस्तंभ होते.

**समारोप-** भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले यांच्यानंतर समाजामधील अस्पृश्यता, जातीभेद, दारिद्र्य संपवण्यासाठी व लोकशाही निर्मितीसाठी पोषक वातावरण निर्माण होण्यासाठीचे क्रांतिकारी काम लोक कल्याणकारी राजे राजर्षी शाहू महाराज यांनी केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्री उन्नतीसाठी व स्त्रियांच्या स्वाभिमानाची बीजे रोवण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांचे खूप महत्त्वाचे योगदान राहिल्याचे आपणाला दिसून येते. आपल्या अवतीभोवती इंग्रजाचे साम्राज्य असताना परिवर्तनाची वैचारिक व कृतिशील सुरुवात राजर्षी शाहू महाराजांनी मोठ्या खुबीने कोणतीही बंधने न जुमानता केली. समाजातील माणूस महत्त्वाचा समजून जात, धर्म, वंश यासारख्या मानवनिर्मित शोषण व्यवस्थेला त्यांनी विरोध केला. या काळात अनेक वेळा

इंग्रजांनी दबाव तंत्राचा वापर केला. अशावेळी मी स्वतः होऊन राजीनामा देईन अशी भूमिका राजर्षी शाहू महाराजांनी घेतली. पण स्त्रिया आणि बहुजन समाजाच्या उद्धाराचे काम त्यांनी थांबवले नाही. अशा प्रकारची निर्भीड समतावादी, मानवतावादी, बहुजनवादी आणि स्त्रीवादी भूमिका घेणारे राजे इतिहासात कमी सापडतील. म्हणूनच आजही राजर्षी शाहू महाराज यांची पुन्हा पुन्हा आठवण काढली जाते. त्यांच्या विचार व कार्यांचा जयघोष केला जातो.

**संदर्भ ग्रंथ**

1. मोरेगिरीश,राजर्षी शाहू विचार व कार्य: निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर एप्रिल२०२१
2. संपादक- पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ:महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी
3. कीरधनंजय,राजर्षी शाहू छत्रपती :पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
4.संपादक-प्रा. राजहंसकपिल,राजर्षी शाहूंना समजून घेताना.. : संवाद प्रकाशन, कोल्हापूर
5.म्हमानेअनिल,नवयुगातील राष्ट्रपुरुष राजर्षी शाहू महाराज : संवाद प्रकाशन, कोल्हापूर

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**48**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक धोरणाचे पाईक-सुशिलकुमार शिंदे

**श्री. नारायण रामलाल उंबरे**
संशोधक विद्यार्थी

**प्रा. डॉ. रमेश नामदेव शेवाळे**
मार्गदर्शक
संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय,
ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव

---

**प्रस्तावना :** अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात शिक्षण ही वरिष्ठ वर्गाचीच मक्तेदारी होती. सामान्य माणुस हा शिक्षणाच्या बाबतीत मागासलेला होता. त्यामुळे शेठ, सावकार यांच्याकडून सामान्य माणसाची कुचंबना होत होती. शिक्षणाचे महत्व म. जोतिबा फुले यांनी ओळखले होते. 'विद्येविना मती गेली, मती विना निती गेली, निती विना गती गेली, गती विना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले' असे वर्णन म. फुले यांनी केले आहे. बहुजन समाजाला शिक्षण दिल्याखेरीज त्यांची गुलामगिरीतून सुटका होणार नाही हे म. फुले यांना उमगल्यामुळे त्यांनी १८८२ साली नेमलेल्या हंटर कमिशनपुढे शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. अस्पृश्यांसाठी स्वत:च्या घरात व भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. या कार्यात त्यांच्या धर्मपत्नी सावित्रीबाई फुले यांची भक्कम साथ लाभली. स्वत: शेणमातीचे गोळे अंगावर झेलून, लोकांच्या शिव्याशाप खाल्ल्या. पण शिक्षणाचे कार्य त्यांनी सोडले नाही. या सर्व कार्यामागे बहुजन व अस्पृश्य समाजाचा विकास झाला पाहिजे हीच त्यांची भावना होती. या भावनेला प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचे काम महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराजांनी केले. शिक्षण हे जे मुठभर लोकांची मक्तेदारी झाले होते, त्या मक्तेदारीला मोडून काढून, शिक्षण समाजातील खालच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम शाहू महाराजांनी केले. मागासलेल्या वर्गाची बौध्दिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी किमान प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याचा त्यांनी पुरस्कार कला. नाशिकच्या एका भाषणात त्यांनी म्हटले होते, "खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुध्दिवर व ज्ञानावर हे जे जड आणि जुलमी जू लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण फार जरूरी आहे."[१] वेदोक्त प्रकरणात शाहू महाराज हे शिवाजी महाराजांचे वंशज असूनही त्यांचे क्षत्रियत्व नाकारले गेले. त्यांना वैदिक मंत्रांचा अधिकार नाकारला गेला. यांमुळे आपल्यावर झालेल्या या अन्यायामुळे आपली ही व्यथा आहे तर सामान्य व क्षुद्रांची काय व्यथा असेल असा विचार त्यांच्या मनात आला आणि या सामाजिक अन्यायाच्या विरोधात ते पेटून उठले. त्यासाठी त्यांनी जनतेला शिक्षण देऊन त्यांच्यात आत्मभान जागे केले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचा स्वाभिमान जागा केला. शाहू महाराजांनी यासाठी त्यांना लाभलेल्या राजकीय सत्तेचा तसेच अधिकारांचा वापर केला. यामुळे महाराष्ट्रात शिक्षणक्षेत्रात क्रांती घडून आली. शिक्षणक्षेत्रात झालेल्या या क्रांतीच्या ज्वालांनी सामाजिक अन्यायाच्या बेड्या तोडून टाकल्या.

**उद्देश्य :**

१) समाजक्रांतीच्या लढ्यातील एक महत्वाचे आयुध म्हणून शिक्षणाचे महत्व जाणणे.
२) राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक कार्य व धोरण जाणून घेणे.
३) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाची सद्यस्थितीत परिणामकारकता अभ्यासणे.
४) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाची सुशिलकुमार शिंदे यांनी केलेली अंमलबजावणी अभ्यासणे.
५) मुख्यमंत्री व मंत्रीपदी असतांना सुशिलकुमार शिंदे यांनी केलेले शिक्षणविषयक कार्य अभ्यासणे.

**गृहितके :**

१) शिक्षण हे सामाजिक क्रांतीतील महत्वाचे आयुध आहे.
२) राजर्षी शाहु महाराजांच्या राज्यकारभारच्या विविध धोरणांपैकी शिक्षणविषयक धोरण महत्वाचे आहे.
३) राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक कार्यापासून प्रेरणा घेऊन सुशिलकुमार शिंदे यांनी सामाजिक न्यायाच्या कार्यात शिक्षणाला महत्व दिले आहे.
४) शिक्षणामुळे व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक बदल घडुन येतात.

**तथ्य संकलन :** प्रस्तुत शोधनिबंध हा सामाजिक शास्त्रातील राज्यशास्त्र या विषयांतील असून दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, शासकीय दस्ताऐवज इत्यादींचा उपयोग तथ्य संकलनासाठी करण्यात आला आहे.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोधनिबंध हा सामाजिक शास्त्रातील राज्यशास्त्र या विषयांतील असून समाजशास्त्र संशोधन पध्दतीतील ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**विश्लेषण :** सुरूवातीच्या काळी माध्यमिक व उच्च शिक्षण फक्त शहरांतच उपलब्ध होते. बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठ्या शहरांवरच अवलंबून राहावे लागत होते. शिक्षणाविषयीची अनास्था, गरीबी व कौटुंबिक कामे यांमुळे बहुजन व गोरगरीब समाजातील मुले उच्च शिक्षणापासून वंचित राहत होती. त्यांच्या शिक्षणाच्या मार्गातील हा एक मोठा अडथळा होता. यांवर उपाय म्हणून शाहू महाराजांनी कोल्हापुरात वसतीगृह स्थापनेचा निर्णय घेतला.

**अ) वसतिगृहांची स्थापना :** सामान्य परिस्थितीतील पालकांना आपली मुले शिक्षणासाठी शहरात पाठविणे आर्थिकदृष्ट्या शक्य नव्हते. मुळातच दारिद्र्याच्या खाईत खितपडत पडलेल्या बहुजन व मागास समाजाला मुलांचे शहरातील शिक्षण परवडणारे नव्हते. या मुलांच्या राहण्या-खाण्याची सोय केल्याशिवाय त्यांचे शिक्षण होणार नाही हे शाहू महाराजांनी ओळखले. त्यांनी कोल्हापुरात विविध जातीधर्मांसाठी वसतीगृह स्थापनेचा निर्णय घेतला.

१८९४ मध्ये मराठा जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू केले. त्यास 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' हे नाव देण्यात आले. या वसतीगृहात मराठा जातीच्या विद्यार्थ्यांबरोबर इतरही जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. त्याचवर्षी जैनधर्मीय विद्यार्थ्यांसाठी 'दिगंबर जैन बोर्डिंग' सुरू करण्यात आले. त्यानंतर लिंगायत, सारस्वत, पांचाल, नामदेव, शिंपी, वैश्य, ढोर, चांभार, नाभिक इत्यादी विद्यार्थ्यांसाठी सुध्दा वेगळे वसतीगृह सुरू करण्यात आले. याशिवाय कोल्हापुराव्यतिरिक्त पुणे, नागपुर, नाशिक, अहमदनगर इत्यादी शहरातील वसतिगृहे आणि शैक्षणिक संस्थांना महाराजांनी मदत केली. तसेच गोरगरीब विद्यार्थ्यांना अधिक सवलत देण्याचे धोरण महाराजांनी अवलंबिले.

त्याकाळी जातीव्यवस्था अत्यंत प्रबळ होती. प्रत्येक जातीला स्वजातीचा अभिमान असल्याने एकाच वसतीगृहात सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असता तर त्यास अधिक लोकांचा प्रतिसाद मिळाला नसता. आपल्या जातीच्या मुलाने इतर जातीच्या विद्यार्थ्यांसोबत मिळून मिसळून एकत्र राहावे ही बाब त्यावेळेसच्या पालकांना अजिबात रूचली नसती, त्यापेक्षा आपला मुलगा न शिकलेला बरा असा विचार त्यांनी केला असता, म्हणून महाराजांचा जातवार वसतिगृह स्थापनेचा निर्णय त्याकाळी किती महत्वाचा होता हे यातून कळते. "महाराजांच्या डोक्यात वसतिगृहाचे इतके विलक्षण वेड भरले होते की, एकेकाळी त्यांनी लंडनमधील विद्यार्थ्यांसाठी तेथे एखादे स्वस्त वसतिगृह स्थापन करता येईल का, याचाही विचार केला होता."[२]

ब) सक्तीचे मोफत शिक्षण : राजर्षी शाहूंनी शिक्षणाच्या बाबतीत टाकलेले आणखी एक क्रांतिकारक पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात राबवलेली सक्तीची व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना होय. शिक्षण हेच सर्व सुधारणांची जननी आहे हे माहित असल्यामुळेच राज्यातील गोरगरीब व शिक्षणापासून वंचित असलेल्या जनतेला प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत दिले पाहिजे असे शाहू महाराजांना वाटत होते. त्यानुसार १९१२ मध्ये संस्थानातील प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा उघडण्याची मोहिम हाती घेतली. त्यानुसार अनेक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. पुढे या प्राथमिक शिक्षणाचा प्रसार महाराजांना समाधानकारक न वाटल्याने २४ जुलै १९१७ रोजी सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी २४ जुलै १९१७ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरनाम्यात म्हटले की, "येत्या गणेश चतुर्थीपासुन (३० सप्टेंबर) करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळातील फी या दिवसांपासून माफ करण्यात येत आहे."[३] २१ सप्टेंबर १९१७ रोजी शिक्षण तज्ज्ञांच्या समितीने तयार केलेल्या नियमावलीवर आधारित असा 'सक्तीच्या शिक्षणाचा कायदा' खास जाहिरनामा काढून प्रसिध्द करण्यात आला. या कायद्यान्वये शिक्षणांस योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आई-बापांवर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठविली नाहीत तर त्यांना दर महिना प्रत्येकी एक रूपया दंड करण्याची तरतुद करण्यात आली.

क) प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी: छोट्या-छोट्या गावांमध्ये चावडी, देवळे, धर्मशाळा इत्यादी इमारतीत शाळा सुरू केल्या गेल्या. काही ठिकाणी शाळा इमारती बांधल्या गेल्या. अशा प्रकारे प्राथमिक शिक्षणावर त्याकाळी कोल्हापुर संस्थांनात लाख रूपये रक्कम दरवर्षी खर्च होत होती. म्हणून शाहू चरित्राचे अभ्यासक जयसिंगराव गायकवाड ही गोष्ट तत्कालीन हिंदुस्थानच्या इतिहासात अपूर्व मानतात. त्याकाळी मुंबई ईलाख्याची ही शिक्षणाची तरतुद एक लाख रूपये नव्हती. अशा या प्राथमिक शिक्षणाच्या प्रचार प्रसारासाठी घरटी एक रूपया कर बसवला. या एक रूपयांत घरातील सर्व पोराबाळांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली. समाजातील इनामदार, सरंजामदार यांसारख्या बड्या मंडळींच्या उत्पन्नावर शेकडा २० रूपयांपर्यंत शिक्षणपट्टी आकारली गेली.

या सर्व पार्श्वभूमीवर १९१८ च्या प्रारंभीच शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानात प्राथमिक शिक्षणासाठी स्वतंत्र खाते स्थापन केले. संस्थानातील मामलेदार, महालकरी या अधिकाऱ्यांपासून गावच्या पाटलांपर्यंत सर्वांना या प्राथमिक शिक्षण चळवळीत सहभागी करून घेण्यात आले. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत शाहू महाराजांनी एक क्रांतिकारी निर्णय घेतला तो म्हणजे अस्पृश्यांसाठी असलेला शाळा बंद केल्या. त्यांना स्पृश्यांच्या मुलांसोबत शाळेत बसविण्यात आले.

ड) स्त्री शिक्षणांस प्रोत्साहन : शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानात स्त्री शिक्षणांस सुध्दा महत्व दिले. कोल्हापुर संस्थानचा स्त्री शिक्षणाचा दृष्टिकोण पुरोगामी होत कोल्हापुरातील 'फिमेल ट्रेनिंग स्कुल' मध्ये शिक्षिका असणाऱ्या रखमाबाई केळचकर या बुध्दीमान स्त्रिची नेमणूक केली होती. त्यांनी स्त्री शिक्षणांस गती देण्याचे प्रशंसनीस कार्य केले. मुला-मुलींसाठी एकत्र शाळा तर होत्याच पण खास मुलींसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. मुलींनी शाळेत यावे म्हणून उत्तेजन दिले जात होते. हुशार मुलींना प्रोत्साहन मिळावे म्हणून दरबारने खास शिष्यवृत्ती ठेवल्या होत्या. मुलींना उच्च शिक्षणाच्या बाबतीत ही शाहू महाराजांनी उदार दृष्टी ठेवली होती.

**इ) शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व देणग्या :** शाहू महाराजांनी उच्च शिक्षण घेणाऱ्या बहुजन समाजातील होतकरू तरूणांना देणगी व शिष्यवृत्ती दिली. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रावबहादुर पी. सी. पाटील यांची उदाहरणे तर इतिहासप्रसिध्द आहेत. याशिवाय नामवंत शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्रसिध्द पावलेल्या प्रि. सी. आर. तावडे यांना अमेरिकेस उच्च शिक्षणांस जाण्यासाठी, नामवंत समाजसुधारक भाई माधवराव बागल यांना जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकण्यासाठी अर्थसहाय्य केले. "१९१४ मध्ये एक आणि १९२० मध्ये तीन विद्यार्थ्यांना महाराजांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठविल्याची नोंदी मिळतात."[४] कोल्हापुर संस्थानच नव्हे तर संस्थानाबाहेर सुध्दा महाराजांना विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी देणग्या दिल्या. "उदाहरणार्थ मद्रासमध्ये त्यांनी थोर ब्राम्हणेतर नेते डॉ. नायर यांच्या स्मरणार्थ ५००० रूपये देणगीतून 'डॉ. नायर मेमोरियल स्कॉलरशिप' सुरू केली होती. संस्थानबाहेरच्या संस्थांमध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटी, श्री. शिवाजी मराठा सोसायटी, ताराबाई मराठा बोर्डिंग, पुणे, उटाजी मराठा बोर्डिंग, नागपुर, बनारस हिंदू युनिवर्सिटी, काशी इत्यादी अनेक संस्थांना महाराजांनी भक्कम अर्थसहाय्य दिलेले होते."[५]

शाहू महाराजांच्या या शिक्षणविषयक धोरणाचा उद्देश्य मुळातच बहुजन व पददलित समाजाचा विकास करणे हाच होता. त्यांच्या या शैक्षणिक कार्यामुळे सामाजिक भेदभाव कमी करण्यास मदत तर झालीच पण खऱ्या अर्थाने बहुजनांचा व अस्पृश्यांचा उद्धार झाला. स्वत:च्या पायावर निडरपणे उभे राहण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आले.

**शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक धोरणाची अंमलबजावणी करण्यात सुशिलकुमार शिंदे यांची भूमिका व कार्य :**

शाहू महाराजांच्या या शैक्षणिक धोरणाचे परिणाम केवळ कोल्हापुर संस्थानातच नाही तर अखंड महाराष्ट्रात दिसून आले. महाराजांच्या या कार्यापासून पुढे प्रेरणा घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील यांसारखे शिक्षण प्रसारक पुढे आले. जयांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी अनेक शाळा व महाविद्यालये काढून शिक्षणाची गंगा जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. यामुळे बहुजन समाजात शिक्षणविषयक जागृती वाढून गोरगरीबांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. शिक्षणामुळे अज्ञान, अंधकारात खितपत पडलेल्या समाजात एका नव्या सामाजिक क्रांतीची सुरूवात झाली.

पुढे शाहू महाराजांच्या विचारांचा व कृतीचा वारसा भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून अंमलात आणण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. भारतीय राज्यघटनेत राज्यकर्त्यांना राज्यकारभार करण्यासाठी मार्गदर्शक व उपयुक्त ठरतील अशा मार्गदर्शक तत्वांचा समावेश केला. वयाची १४ वर्षे पूर्ण होईपर्यंतच्या सर्व मुलामुलींना मोफत आणि सवलतीचे शिक्षण देण्याची व्यवस्था सरकारने करावी असे या घटनेच्या कलम ४५ मध्ये स्पष्ट करण्यात आले. घटन अंमलात आल्यापासून दहा वर्षाच्या आत सरकारने ही व्यवस्था करावी असे म्हटले आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचा कारभार घटनात्मक पध्दतीने चालविण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांवर सोपविण्यात आली. आजपर्यंत झालेल्या अनेक मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात अनेक प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा करून राज्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला जानेवारी २००३ मध्ये सुशिलकुमार शिंदे यांच्या रूपाने प्रथमच दलित मुख्यमंत्री लाभले. स्वत: अनुभवलेली गरीबी, जातीप्रथेचे सोसलेले चटके व स्वत: शिक्षणासाठी खाल्लेल्या खस्ता यांमुळे शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात त्यांनी सामाजिक न्यायविषयक व लोकोपयोगी कामे केली. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाची कसोशीने अंमलबजावणी करून वंचित व मागास समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री पदी नुमणुक होण्याअगोदर अर्थ, न्याय, कामगार, सांस्कृतिक, पर्यटन, समाजकल्याण यांसारख्या खात्यांचे बहुविध मंत्रीपद लाभले. या बहुविध मंत्रीपदाच्या व मुख्यमंत्रीपदाच्या माध्यमातून राज्याचा आर्थिक, औद्योगिक, सामाजिक व

शैक्षणिकदृष्ट्या विकास करण्याचा प्रयत्न केला. या विविधांगी विकासाबरोबरच राज्यात सामाजिक न्यायाच्या स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली.

सामाजिक न्यायाच्या प्रतिष्ठापनेत शिक्षण हे महत्वाचे साधन आहे, याचे महत्व जाणून विविध शैक्षणिक योजना व उपक्रम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राबविले. शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणापासून प्रेरणा घेऊन राज्यात विविध शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. सुशिलकुमारांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा व घेतलेले निर्णय पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) अर्थमंत्रीपदी असतांना केलेले शैक्षणिक कार्य :**

सुशिलकुमार शिंदे यांच्याकडे सर्वात जास्त काळ जे खातं होतं ते म्हणजे अर्थ व नियोजन. सुशिलकुमारांनी स्वत: गरीबी अनुभवली होती. या गरीबीमुळेच त्यांना शाळा सोडून कुटूंबाला हातभार लावावा लागला. त्यासाठी त्यांनी अनेक प्रकारची कामे केली. पुढे काम करून रात्रशाळेत शिक्षण घेतले. अशा या गरीबीचे चटके सोसलेल्या व्यक्तीकडे सलग नऊ वर्षे राज्याचे अर्थमंत्रीपद होते. १९८३ ते १९९० या काळातील अर्थमंत्री पदाच्या माध्यमातून राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणांवर भरघोस आर्थिक तरतुद केली. विविध शाळा व महाविद्यालयांची स्थापना करून शिक्षण सामान्य माणसाच्या घरापर्यंत आणण्याचे काम केले.

१९८४ साली राज्यातील प्राथमिक शाळांची संख्या ५०,००० होती. ती सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ५४१६० वरून सुमारे ८००० एवढी वाढवली. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांची संख्या ४०७ वरून ६०४ एवढी केली. जून १९८४ पासून मुलींना इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण मोफत केले होते ते जून १९८५ पासून १२ वी पर्यंत मोफत देण्यात निर्णय घेतला. मुलींसाठी तालुका पातळीवर वसतीगृहे सुरू केली. विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यात आलेली अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालये यांची संख्या अनुक्रमे ९ व १५ होती, ती दोन वर्षात अनुक्रमे ५० व ९० एवढी करण्यात आली. १९८५-८६ या वर्षी नाशिक व नागपुर विभागामध्ये मुलींसाठी दोन औद्योगिक संस्था सुरू करण्यासाठी २३.९० लाख रूपये तरतुद केली. १९८५-८६ मध्ये आश्रमशाळा संकुलसाठी ५.२६ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली. यात ४७ शाळांच्या इमारती पूर्ण करणे, नवीन आश्रमशाळा उघडणे व पोस्ट बेसीक शाळांमध्ये रूपांतर करणे इत्यादी कामे करण्याचे ठरले. मागासवर्गीय मुलांसाठी शैक्षणिक तरतुदी अनु. जाती व जमातीच्या मुलांसाठी शासकीय वसतीगृहे सुरू करण्यासाठी ६६ लाख रूपये खर्च करण्याचे प्रस्तावित केले. अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांसाठी निवासी पब्लिक स्कूल स्थापन करण्याचे ठरले.

उच्चशिक्षण क्षेत्र – अमरावती येथे विद्यापीठाची स्थापना केली.

रायगड जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाची स्थापना केली.

राष्ट्रीय शिक्षा धोरण १९८६ चा एक भाग म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकची स्थापना केली.

१९८९-९० पासून धुळे व यवतमाळ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना केली.

जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना केली.

**ब) मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील शैक्षणिक कार्य :** इयत्ता १ ली पासून इंग्रजी सुशिलकुमारांनी घेतलेला महत्वाचा व धाडसी निर्णय म्हणजे इयत्ता पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय होय. तत्कालीन शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे यांच्या मदतीने हा निर्णय घेतला.

राजीव गांधी अपघात विमा योजना – शालेय विद्यार्थी पायी चालत किंवा बसने किंवा इतर वाहतुकीने शालेय प्रवास करतांना काही अपघात झाला तर त्या विद्यार्थ्याला भरपाई देणारी किंवा विमा संरक्षण देणारी महत्वपूर्ण योजना सुरू केली. आजही विद्यार्थ्यांना ही योजना लाभदायक ठरत आहे. अभियांत्रिकी वगळता इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश संस्थानिहाय न करता ते सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे गुणवत्तेवर आधारित केंद्रीय पध्दतीने करण्याचा निर्णय घेतला. कृषी फलोत्पादन, वनशास्त्र, कृषी, अभियांत्रिकी, पशु वैद्यकीय, मत्स्य, दुग्ध तंत्रज्ञान इत्यादी अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा वाढणारा कल लक्षात घेता, कायम विनाअनुदान तत्वावर महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला.

मोफत पाठ्यपुस्तक योजना – राज्यातील सर्व जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका शाळांत तसेच वस्ती शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी च्या सर्व मुलींना तसेच या शाळांतील अनु. जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरवण्याची योजना हाती घेण्यात आली. मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण योजना – दारिद्र्य रेषेखालील, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांतील कुटुंबातील तरूणांसाठी शासनाने व्यवसाय प्रशिक्षण हमी योजना सुरू केली. या योजनेचा हेतू हा होता की विद्यार्थी स्वत:च्या पायावर उभा राहू शकेल.

सोलापूर जिल्ह्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ – मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात सुशिलकुमार शिंदे यांनी सोलापुर जिल्ह्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केली. एका जिल्ह्यासाठी स्थापन करण्यात आलेले हे एकमेव विद्यापीठ आहे.

मुख्यमंत्री करिअर मार्गदर्शन योजना – दहावी, बारावीनंतर पुढे कोणत्या संधी आहे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारी मार्गदर्शन योजना सुरू करण्यात आली.

विविध शिष्यवृत्ती योजना:

मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती :मागासवर्गीय इयत्ता पाचवी ते सातवीमधील विद्यार्थिनींसाठी असलेली शिष्यवृत्ती योजना इ. ८ वी ते १० वी तील विद्यार्थिनींकरीता सुध्दा सुरू करण्यात आली. शिष्यवृत्तीची रक्कमसुध्दा वाढविण्यात आली.

आदिवासी अपंग विद्यार्थी शिष्यवृत्ती: इ. ५ वी ते १२ वीत शिकणाऱ्या अपंग आदिवासी विद्यार्थ्यांना दरमहा रू. ५०० शिष्यवृत्ती व १०० रूपयांप्रमाणे वाहतूक भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला.

इतर मागासवर्गीयांसाठी फी माफी व शिष्यवृत्ती : इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतर देण्यात येणारी शिष्यवृत्ती लागू करण्यात आली.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेश शिष्यवृत्ती योजना : अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण देणारी ही महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेंतर्गत दरवर्षी दहा विद्यार्थ्यांना परक्या राष्ट्रातील नावाजलेल्या विद्यापीठात शिक्षण देण्यात येते. संपूर्ण खर्च महाराष्ट्र सरकार करते." आज या विद्यार्थ्यांची संख्या दहावरून दरवर्षी शंभर इतकी करण्यात आली आहे.

इ) देशांतर्गत शिक्षणासाठी राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती योजना :महाराष्ट्रातील तसेच भारतातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली.

राजर्षी शाहू महाराज प्राविण्य पारितोषिक योजना : शालांत परीक्षेत व उच्च माध्य. शालांत परीक्षेत राज्यात सर्वसाधारण यादीत पहिल्या येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यास २.५० लक्ष एवढी रक्कम पारितोषिक म्हणून देणारी योजना जाहीर करण्यात आली. विभागीय व जिल्हास्तरावर वेगवेगळी पारितोषिके देण्यात आली.[६]

इतर शैक्षणिक निर्णय :

अ) वसतिगृह क्षमतावाढ व अनुदान : सुशिलकुमार शिंदे मुख्यमंत्री असतांना राज्यात १९०२८ विद्यार्थ्यांना सोई सवलती देणारी २४३ मागासर्गीयांसाठीची वसतीगृहे होती. या वसतीगृहात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना वीस टक्के जागा ठेवलेल्या असतात. ही क्षमता विद्यार्थी संख्येच्या तुलनेने कमी आहे असे लक्षात येताच सन २००३-०४ मध्ये या वसतीगृहांची क्षमता ४००० जागांनी वाढविण्याचा निर्णय घेतला.

ब) आश्रमशाळा: आश्रमशाळांची गरज व मागणी विचारात घेता मागासवर्गीयांसाठी मोठ्या प्रमाणावर आश्रमशाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला.

क) वसतीगृहांचे श्रेणीवर्धन: वसतीगृहांना पुरेशा प्रमाणात सुसज्ज ग्रंथालये, शिकवण्या, खेळाच्या सुविधा व संगणक कक्ष देऊन वसतीगृहांचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय घेतला.

ड) अपंगांच्या शाळांना अनुदान: विनाअनुदान तत्वावर चालविल्या जाणाऱ्या राज्यातील ११३ अपंगाच्या अशासकीय शाळांना अनुदान तत्वावर आणण्यात आले.

सारांश: महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले यांच्यापासून सुरू झालेली शिक्षणाचे महत्व अधोरेखित करणारी परंपरा मुर्त स्वरूपात आणण्याचे काम राजर्षी शाहू महाराजांनी केले. वंचित, शोषित व बहुजन समाजाला शिक्षण देऊन त्याला त्याच्या स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम शाहू महाराजांनी केले. शिक्षणाच्या प्रचार व प्रसारासाठी राजसत्तेचा उपयोग केला. बहुजन व मागास समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांनी ओळखले. त्यांच्या या कार्यामुळे बहुजन व मागास समाजात शिक्षणाची ज्योत पेटली. या शिक्षणरूपी ज्योतीच्या साहाय्यानेच पुढे कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख यांसारख्या अनेक ज्योती प्रज्वलित झाल्या आणि त्यांच्या ज्ञानरूपी प्रकाशात महाराष्ट्र उजळून निघाला.

शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचे व कार्याचे महत्व सुशिलकुमार शिंदे यांनी ओळखले. त्यांपासून प्रेरणा घेऊन सामाजिक न्यायाची व्यापकता वाढविण्यासाठी शिक्षणरूपी अस्त्राचा वापर केला. म्हणूनच आज संपूर्ण भारतात सुशिलकुमारांनी सुरू केलेली परदेश शिष्यवृत्ती योजना एक आगळीवेगळी योजना म्हणून ओळखली जाते. या परदेश शिष्यवृत्ती योजनेला राजर्षी शाहू महाराज यांचे नाव देऊन त्यांच्या शिक्षणविषयक कार्याचा गौरव केला. सुशिलकुमारानंतर आलेल्या अनेक मुख्यमंत्र्यांनी टप्प्याटप्प्याने या योजनेत सुधारणा करून या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या दरवर्षी १०० इतकी निश्चित केली आहे. तसेच

सुरूवातीला फक्त अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली ही योजना आज रोजी अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास, मराठा समाज व अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी सुध्दा ही योजना सुरू करण्यात आली आहे. सुशिलकुमार शिंदे यांच्या या शिक्षणविषयक निर्णयांचा आज महाराष्ट्रातील जनतेवर सकारात्मक परिणाम झाला आहे. त्यांच्या सामाजिक न्यायविषयक कार्यात शिक्षणविषयक ध्येय धोरणांचा, निर्णयांचा मोलाचा वाटा आहे.

निष्कर्ष:

1. समाजक्रांतीच्या लढ्यातील शिक्षण हे महत्वाचे आयुध आहे.
2. राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक ध्येय धोरणांचा तत्कालीन महाराष्ट्रावर फार मोठा परिणाम दिसून येतो.
3. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व विचार आजच्या परिस्थितीतही तंतोतंत लागू होतात.
4. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणापासून सुशिलकुमार शिंदे यांना प्रेरणा मिळाली.
5. राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक धोरणाची सुशिलकुमार शिंदे यांनी महाराष्ट्रात अंमलबजावणी केली.

संदर्भ :

१) पाटील व्ही. बी., विसाव्या शतकामधील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन, पुणे, पृ. ३०
२) डॉ. पवार जयसिंगराव, समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. ११५
३) कित्ता, पृ. ११९
४) कित्ता, पृ. २०७
५) कित्ता, पृ. २०७
६) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, खंड १३२, क्रमांक ६, शासकीय मुद्रण लेखन सामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ६/७८

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

49

# राजर्षी शाहू महाराजांची बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत भूमिका

**डॉ. मुल्ला जे. यु.**
काकासाहेब चव्हाण महाविद्यालय , तळमावले

---

**प्रस्तावना :** छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी बहुमोल कार्य केले. जातीयता, ज्ञान आणि अंधश्रद्धा या चक्रामध्ये अडकलेल्या बहुजनसमाजाला सज्ञानी करण्यासाठी, तात्कालीन सामाजिक बंध, जातीयतेचे बंध कायदेशीररित्या तोडून टाकण्यासाठी शाहू राजांनी लोकशिक्षणाची चळवळ उभी केली आणि सर्वसामान्यांच्या घरापर्यंत ज्ञानगंगा पोहोचवण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केल्याचे दिसून येते. गरीब, अज्ञानी समाजाच्या हातात शिक्षणाचा वसा देऊन सर्वसामान्याचे जीवन समृद्ध करण्याचे ऐतिहासिक कार्य शाहू महाराजांनी केले आहे.

Keywords : राजर्षी, ब्राह्मणेतर समाज, कुणबी, बोर्डिंग, जातवार वसतिगृहे.

**विषय विवेचन :**

शाहू महाराज - कोल्हापूर संस्थानचे राजे, एकोणिसाव्या शतकातीलबहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत अत्यंत संवेदनशील असणारे, विश्वासू लोकशाहीवादी आणि मूलगामी समाज-सुधारक म्हणून संपूर्ण देशात त्यांना ओळखले जाते. कागलच्या घाटगे घराण्यातील तात्कालीन ब्रिटिश सरकारचे रिजन्ट श्री.जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे ज्येष्ठ सुपुत्र यशवंतराव उर्फ बाबासाहेब घाटगे यांचा जन्म 26 जुलै 1874 मध्ये झाला. दिनांक 17 मार्च 1884 रोजी आनंदीबाई राणीसाहेब यांच्याकडे यशवंतराव दत्तक म्हणून गेले. यशवंतराव उर्फ बाबासाहेब घाटगे यांनी नंतरच्या कालखंडामध्ये दिनांक 2 एप्रिल 1894 रोजी कोल्हापूरच्या गादीचे वारस म्हणून, शाहू छत्रपती राजे म्हणून कोल्हापूर संस्थांच्या राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारली. कालांतराने प्रजाहितासाठी, बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी, स्पृश्य अस्पृश्य भेदभाव, अंधश्रद्धा, जुन्या अन्यायी रुढी परंपरा नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे केलेल्या निस्वार्थी प्रयत्नामुळे, स्वकर्तृत्वाने शाहू छत्रपती महाराज हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणून सर्वज्ञात झाले. छत्रपती शाहू महाराजांना राजर्षी ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. राजर्षी = राजा + ऋषी. असा राजा की ज्याने लोक कल्याणाचा चा मार्ग स्वीकारला आणि प्रामाणिकपणे

लोककल्याणाचे कार्य करून लोकांच्या दृष्टीने तो ऋषी बनला. राजर्षीला ऋषी होण्यासाठी राजपदाचा त्याग करावा लागत नाही हे या ठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. राजर्षी हे त्यांच्या क्षत्रिय वर्गाची कर्तव्ये पार पाडतातच तथापि लोकांच्या अथवा प्रजेच्या हितासाठी त्यांनी केलेले कार्य हे इतके मोठे असते की त्यांना लोक ऋषीतुल्य मानतात किंवा त्यांना ऋषीचा दर्जा देतात. भारतीय एपिग्राफिकल शब्दकोशात नमूद केल्याप्रमाणे शाही वंशाचा ऋषी अथवा एक राजा ज्याच्या अंगी राजनीती आणि ऋषी असे दोन्ही गुण आहेत त्याला राजर्षी असे संबोधित केले जाते. राजर्षी शाहू महाराजांची बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत भूमिका विचारात घेत असताना तात्कालीन सामाजिक परिस्थितीचा आढावा घेणे आणि सदर परिस्थितीमध्ये बदल होण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले प्रयत्न आणि त्यातून त्यांना प्राप्त झालेले यश अपयश याचा उहापोह करणे या ठिकाणी संयुक्तिक ठरेल.

**1. शाहू पूर्व काळातील सामाजिक परिस्थिती-** इसवी सन 1757 ते इसवी सन 1857 या कालावधीमध्ये हिंदुस्थानात ब्रिटिशांनी व्यापारी साम्राज्य उभे केले. एकोणिसाव्या शतकात संपूर्ण हिंदुस्तानावर त्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले. सर बांधावर एक इंच अतिक्रमण खपवून न घेणाऱ्या कलियुगातील भारतीय मानवाच्या पूर्वीच्या वंशजानी ब्रिटिश साम्राज्याचा का स्वीकार केला याची कारणे शोधली असता असे आढळून येते की - i) ब्रिटिश साम्राज्यामुळे देश एकाच सत्तेखाली आला. ii) ब्रिटिश सत्तेकडून रयतेला शांतता व सुव्यवस्था मिळाली. iii) न्यायव्यवस्थेमध्ये कायद्यासमोर सर्व समान हे समतेचे तत्व प्राप्त झाले. iv) ब्रिटिशाकडून पाश्चात्य शिक्षणाचा पाया हिंदुस्थानात घातला गेला की ज्यामध्ये कोणत्याही प्रकारचा जातीवर आधारित भेदभाव केला जात नव्हता. v) पाश्चात्य शिक्षण सर्व वर्गांना खुले केले गेले त्यामुळे बाहेरच्या जगाच्या प्रगतीचे आकलन भारतीयांना होऊ लागले. vi) वस्तू व संदेश दळणवळणासाठी लोकांना सुविधा प्राप्त झाल्या. vii) कारखानदारीचा विकास होऊन औद्योगिक केंद्राची वाढ झाल्याने कामगार वर्ग उदयास आला.

**2. शाहूकालीन महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती-** i) संस्थानिकांची परिस्थिती - ब्रिटिशांनी महाराष्ट्रातील काही संस्थानिकांची राज्ये खालसा केली होती आणि त्या ठिकाणी वेगळ्या प्रकारची शासन व्यवस्था निर्माण केली होती. तर संस्थानिकांच्या ताब्यात असणाऱ्या संस्थानी मूलुखावर आपल्या प्रतिनिधी द्वारे ब्रिटिशांनी जबरदस्त पकड ठेवली होती. थोडक्यात तात्कालीन जहागीरदार व

संस्थानिक यांना राज्यकारभार करण्याची स्वायत्तता होती पण ब्रिटिशांची मर्जी सांभाळून हे सर्व करावे लागत असे. ब्रिटिशांचे धोरण अथवा त्यांच्या प्रतिनिधींना केलेल्या विरोधाची परिणिती म्हणून तात्काळ राजसत्ता सोडावी लागत असे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज देखील या प्रणालीला अपवाद नव्हते. ii) ब्रिटिशांचे पाश्चात्य शिक्षण धोरण - ब्रिटिशांच्या पाश्चात्य शिक्षण प्रसार धोरणाचा फायदा अपवादानेच ब्राह्मणेतरांना मिळाला कारण तात्कालीन समाज रचनेमध्ये ब्राह्मणेतर रयतेमध्ये मुख्यत्वे करून मराठा समाज होता. उच्च कुळीचे मराठा वगळता इतर मराठे कुणबी अथवा शेती करणारे होते. यापैकी उच्च कुळीचे मराठा अथवा सरदार घराण्यातील लोक लिहिण्या वाचण्या इतपत साक्षर होत असत. कुणबी मराठा आणि तात्कालीन इतर 18 पगड जाती, स्त्री वर्ग शिक्षणापासून वंचित होता. त्यांची सर्व पातळीवर केवळ पिळवणूक होत होती. अशा परिस्थितीत शूद्राती शूद्र समाजातील लोकांना , मुलींना शिक्षण देण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांच्याकडून झाला. अस्पृश्य समाजातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी शाळा काढल्या.

**3. कोल्हापूर संस्थानची तात्कालीन परिस्थिती -** कोल्हापूर संस्थान हे मराठा बहुल संस्थान होते. ग्रामीण विभागातील एखाद्या गावातील श्रीमंत मराठे आपल्या मुलाना उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठवीत नसत . कारण मुलांच्या राहणे खाण्याची सोय त्याकाळी कोल्हापूरमध्ये उपलब्ध नव्हती. यावर उपाय म्हणून शाहू महाराजांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वसतिगृह चळवळ सुरू केली. त्यांनी सर्व धर्मीयांसाठी इसवी सन 1896 मध्ये राजाराम कॉलेजला जोडून एका वसतिगृहाची सोय केली होती. वसतिगृहाचे व्यवस्थापन ब्राह्मण लोकांच्याकडे होते. ब्राह्मण लोकांचे ब्राह्मण्य ब्राह्मणेतर मुलांना जाचक वाटू लागल्याने वसतिगृहातील ब्राह्मणेतर मुलांची संख्या हळूहळू कमी होत गेली. आणि शेवटी सदर वसतिगृहामध्ये ब्राह्मणेतर मुलांचा प्रवेश बंद झाला. शाहू महाराजांनी मराठ्यांची काही मुले शिक्षणासाठी राजवाड्यावर आणली होती. राजवाड्यामध्ये त्यांना सर्व भौतिक सुविधा दिल्या गेल्या. अपेक्षा इतकेच होती की विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा. तथापि विद्यार्थ्याकडून ही अपेक्षा उपेक्षेमध्ये रूपांतरित झाली आणि बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी केलेला छत्रपतींचा हा प्रयत्न अपयशी ठरला.

**बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांचे योगदान -**बहुजन समाजात सुधारणा करून प्रगतीच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणावयाचे असेल तर सर्वप्रथम त्यांना शिक्षण दिले पाहिजे जेणेकरून की चांगले काय आणि वाईट काय यामधील फरक ओळखण्यास ते सक्षम होतील हे शाहू महाराजांनी सुरुवातीलाच जाणले होते. ब्रिटिश राजवटीत जातीव्यवस्था की ज्यामध्ये ब्राह्मण वर्ग धर्मशास्त्राद्वारे नियंत्रित,वर्ण व्यवस्थेतील सर्वोच्च वर्ग असल्याने संपूर्ण समाजावर ते प्रभुत्व गाजवत होते. ब्राह्मणेतर वर्ग हा निरक्षरता अंधश्रद्धा आणि दारिद्र्यात पिचलेला असल्याने सामाजिक,आर्थिक आणि राजकीय मागासलेपण त्यांच्यात होते. अशा बहुजन समाजातील लोकांना शिक्षण देणे हे त्याकाळी मोठे आवाहन होते. विद्यार्थ्यांना अत्यल्प खर्चात शहरी भागात निवासाची व जेवणाची सोय करून देणे हे फार मोठे आव्हान होते. जातनिहाय विद्यार्थ्यांच्या पालकांचा उच्च-नीच असा भेदभाव त्यांच्या मनातून काढून टाकणे ही त्यापेक्षा जास्त अवघड गोष्ट होती. स्वतःच्या जाती विषयी अभिमान असणाऱ्या पालकांनी जात बुडते अशा वेड्या संकल्पना मनात ठेवल्या तर बहुजन समाजा मध्ये शिक्षण प्रसार करावयाचा ही त्याहून अवघड गोष्ट होती. अशा परिस्थितीमध्ये - 1)इ.स.1901 ते इ.स.1920 या कालावधीमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर, पुणे, नगर, नाशिक इत्यादी ठिकाणी बहुजन समाजासाठी एकूण 26 वसतिगृहे स्थापन केली. त्यामध्ये काही जातवार वसतिगृहे देखील समाविष्ट होती. सदर वसतिगृहासाठी नियमित उत्पन्न प्राप्त होईल अशी व्यवस्था देखील दरबाराकडून केली गेली होती. कोल्हापूर शहराला तर मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस म्हणून ओळख मिळाली होती.

**शाहू महाराजांनी सुरू केलेली शैक्षणिक वसतिगृहे-**

१. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस . स्थापना: इ स. 1901, २. दिगंबर जैन बोर्डिंग स्थापना :इ स. 1901, ३. वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह स्थापना :१९०६, ४. मुस्लिम बोर्डिंग स्थापना : १९०६, ५. मिस क्लार्क होस्टेल स्थापना :१९०८, ६. दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग स्थापना १९०८, ७. श्री नामदेव बोर्डिंग स्थापना: १९०८, ८. पांचाळ ब्राह्मण वसतिगृह स्थापना: १९१२, ९. श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह -१९१५, १०. इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९१५), ११. कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह (१९१५), १२. आर्यसमाज गुरुकुल (१९१८), १३. वैश्य बोर्डिंग (१९१८), १४. ढोर चांभार बोर्डिंग (१९१९), १५. शिवाजी वैदिक विद्यालय वसतिरगृह (१९२०), १६. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस (१९२०), १७. इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९२१),१८. नाभिक विद्यार्थी वसतिगृह (१९२१), १९. सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग (१९२०), २०. श्री देवांग बोर्डिंग (१९२०), २१. उदाजी मराठा वसतिगृह, नाशिक (१९२०), २२. चौथे शिवाजी महाराज मराठा वसतिगृह, अहमदनगर

स्थापना:(१९२०), २३. वंजारी समाज वसतिगृह, नाशिक स्थापना(१९२०), २४. श्री शाहू छत्रपती बोर्डिंग, नाशिक स्थापना(१९१९), २५. चोखामेळा वसतिगृह, नागपूर स्थापना (१९२०), २६. छत्रपती ताराबाई मराठा बोर्डिंग, पुणे स्थापना (१९२०) वरील बोर्डिंग पैकी काही बोर्डिंग जातनिहाय निर्मित केलेली होती. खरे तर शाहू महाराजांनी जातिभेद आणि अस्पृश्यता याला आयुष्यभर विरोध केला होता. तथापि त्याकाळी परिस्थिती अशी होती की वसतीगृहातील अस्पृश्य मुलांमध्ये देखील उच्च- नीच असे एकमेकांच्या जातीबद्दल तुच्छता होती. शिवाय आपल्या जातीची बोर्डिंग कोल्हापुरात आहे असा विचार करून पालक देखील अशा बोर्डिंग मध्ये राहण्यासाठी आणि शिक्षण घेण्यासाठी मुलांना निश्चितपणे पाठवतील,केवळ या कारणामुळे छत्रपतींच्या समोर जातनिहाय बोर्डिंग काढण्याशिवाय इतर पर्याय नव्हता. सदर बोर्डिंग पैकी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी काढलेले श्री प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग विशेष उल्लेखनीय आहे की ज्या ठिकाणी पूर्वी बहुजन समाजाची मुले बोर्डिंग च्या आसपास राहणाऱ्या सधन कुटुंबामध्ये वार लावून जेवण घेत असत. सध्या या बोर्डिंगचे नाव श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊस, कोल्हापूर असे आहे .सदर बोर्डिंग मध्ये आज देखील बहुजन समाजातील मुले – मुली यांच्यासाठी राहणे,जेवण या बाबीची सोय कमीत कमी खर्चात उपलब्ध आहे. जात आधारित बोर्डिंग मध्ये मुस्लिम बोर्डिंग हे उल्लेखनीय बोर्डिंग आहे की ज्या ठिकाणी मुस्लिम धर्मियांची मुले मोहमेडन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून बोर्डिंग मध्ये राहून शिक्षण घेतात.

**2.राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या शाळा खालील प्रमाणे-**

१. प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा २. माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा ३. पुरोहित शाळा ४. युवराज अथवा सरदार शाळा ५. पाटील शाळा ६. उद्योग शाळा ७. संस्कृत शाळा ८. सत्यशोधक शाळा ९. सैनिक शाळा १०. बालवीर शाळा ११. डोंबारी मुलांच्यासाठी असलेली शाळा १२. कला शाळा. सुरुवातीच्या काळात स्पृश्य आणि अस्पृश्य प्रचंड भेदभाव असल्याने संबंधित मुले शिक्षणासाठी एकत्र बसणे ही अशक्यप्राय गोष्ट होती. अशा काळात स्पृश्य आणि अस्पृश्यासाठी स्वतंत्रपणे शाळांची संख्या वाढवणे हे एकमेव कार्य महाराजांनी हाती घेतले होते. नंतरच्या काळात म्हणजेच 28 सप्टेंबर 1919 रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करून या मुलांना सरकारी शाळांमधून दाखल करण्याचा पर्याय दिला आणि त्यामुळे स्पृश्य- अस्पृश्य हा भेदभाव कमी होण्यास देखील मदत झाली.

**3) बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय-**

इ.स. 1917 मध्ये शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी करवीर इलाख्यामध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा संमत झाला आणि प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले. त्याकाळी सक्तीच्या शिक्षण योजनेवर संस्थानच्या उत्पन्नातून एक लाख रुपये खर्चाची तजवीज छत्रपतींच्या कडून करण्यात आली. शिक्षणासाठी योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची सक्ती कायद्याने पालकावर करण्यात आली. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या लोकांना प्रति माह एक रुपये दंडाची तरतूद केली गेली. शाहू राजांचा हा निर्णय अभूतपूर्व होता कारण तात्कालीन मुंबई इलाख्यात देखील इतकी मोठी आर्थिक तरतूद शिक्षणासाठी करणे शक्य झाले नव्हते.

**प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी-**

प्राथमिक शिक्षण कायद्याच्या अंमलबजावणी अंतर्गत 500 ते 1000 लोकसंख्या असलेल्या गावात प्राथमिक शाळा सुरू केल्या गेल्या. या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेसाठी देऊळ, चावडी, धर्मशाळा, मंदिर इत्यादी बाबींचा इमारत म्हणून वापर केला गेला. काही ठिकाणी शाळेसाठी स्वतंत्र इमारती बांधल्या गेल्या. पहिल्या वर्षी एकंदरीत 96 शाळा सुरू झाल्या. 4 मार्च 1918 रोजी पहिल्या सक्तीच्या शाळेचे उद्घाटन चिखली या गावी छत्रपती शाहू महाराजांच्या हस्ते झाले. शाहू महाराजांनी प्रत्येक घरावर एक रुपया मात्र शिक्षण कराच्या माध्यमातून रयतेच्या मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली. या योजनेचा विस्तार होत गेला. नंतरच्या काळात हा खर्च तीन लाखापर्यंत वाढला गेला. वाढत्या खर्चाचा ताळमेळ घालण्यासाठी समाजातील मातब्बर मंडळी, यांच्यावर देखील नंतरच्या काळात शिक्षण कर बसवण्यात आला. अर्थात केवळ आर्थिक बाबींची पूर्तता करून प्राथमिक शिक्षण उपक्रम व्यवस्थित चालणे शक्य नव्हते. शक्तीच्या प्राथमिक शिक्षण उपक्रमाचे अंमलबजावणी योग्य होते किंवा नाही यासाठी दंड वसूल करणे, रेग्युलर शाळा तपासणी करणे इत्यादी कामांची जबाबदारी मामलेदार यांच्यावर सोपवली गेली. दिवसातून एकदा शाळा तपासणीचे काम गावातील पाटलांच्या वर सोपवले गेले. शेतकऱ्याच्या मुलासाठी सकाळी दोन तास सायंकाळी दोन तास शाळेत येण्याची सवलत दिली गेली. या सर्व बाबींचा परिणाम असा झाला की सुरुवातीला 1917-18 मध्ये 27 शाळा व 1296 मुले तर सन 1921- 22 मध्ये 420 शाळा व 22,007 मुले याप्रमाणे विद्यार्थी शिक्षणाचा आलेख वाढत गेला.

**स्त्री शिक्षण -**1. स्त्रियांचे शिक्षणासाठी संस्थांमध्ये खास मुलींच्या शाळा सुरू केल्या गेल्या. भुदरगड सारख्या मागासलेल्या ठिकाणी मुलींच्या शाळा सुरू झाल्या. 2. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत अशा स्त्रियांची राहणे, जेवणाची व्यवस्था दरबारा कडून मोफत

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

केली जात असे. 3. शिष्यवृत्ती- हुशार मुलींसाठी शिष्यवृत्तीची सोय केली गेली होती. 4. मोफत उच्च शिक्षण - राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलीसाठी मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली गेली होती. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि आर्थिक सहाय्य- 1. कला, कायदा, तंत्रज्ञान, वैद्यक विषयात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची सोय छत्रपतींनी केली होती. 2. आपल्या संस्थानाच्या बाहेरच्या विद्यार्थ्यांसाठी करवीर संस्थानातील महाराजांनी देणग्या दिल्याची नोंद आहे. अस्पृश्य समाजाच्या शिक्षणासाठी दिलेले योगदान- 1. दिनांक 24 नोव्हेंबर 1911 च्या आदेशानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गासाठी सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. 2. अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना खास शिष्यवृत्ती देण्याचे प्रयोजन केले गेले. 3. अस्पृश्यामधील मुलांच्यासाठी पाटी, पुस्तक पेन्सिली सहजपणे मोफत उपलब्ध व्हाव्यात म्हणून आर्थिक तरतूद छत्रपतींच्या कडून केली गेली. 4. अस्पृश्यासाठी रात्र शाळेची असणारी सुविधा दिनांक 28 नोव्हेंबर 1906 च्या आदेशाने कायम केली गेली. 5. अस्पृश्य समाजातील मुलींच्या शाळेसाठी संस्थानाकडून मंजुरी देण्यात आली तसेच या शाळेच्या वार्षिक खर्चाची तरतूद देखील संस्थांनच्या स्त्री शिक्षणाच्या अंदाजपत्रकात करण्यात आल्याची नोंद आहे. 6. संस्थानातील शिक्षण घेणाऱ्या अस्पृश्य मुलींच्या साठी विशेष शिष्यवृत्ती ठेवल्या गेल्या, संस्थानामध्ये जर अशा मुली उपलब्ध झाल्या नाहीत तर संस्थाना बाहेरच्या अस्पृश्य मुलींना त्या शिष्यवृत्ती देण्यासाठी महाराजांनी आदेश काढले होते. अस्पृश्यांना दिले जाणारे धार्मिक शिक्षण- उच्च वर्णीयांच्या बरोबरीने अस्पृश्यांना धार्मिक ज्ञान अथवा शिक्षण मिळवण्याचा हक्क आहे हे जाणून महाराजांनी आर्यसमाजीय स्वामींचा उपयोग करून अशा मुलांना योग्य तऱ्हेने धार्मिक शिक्षण देण्याची तरतूद केली होती.

**समारोप :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत तात्कालीन परिस्थितीमध्ये घेतलेली भूमिका आणि प्रत्यक्ष त्यांनी केलेले कार्य निश्चितपणे अनन्यसाधारण आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल. त्यांनी शिक्षण विषयक आखलेली धोरणे, निर्मित केलेले कायदे आणि समाजामध्ये शिक्षणाबद्दल प्रत्यक्ष झालेली जनजागृती आणि बदल यातून प्रेरणा घेऊन पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासह अनेक शिक्षण प्रसारकांनी बहुजन समाजाच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले परिणामी बहुजन समाज हा शिक्षणाच्या बाबतीत इतरांच्या बरोबरीने कार्यरत असल्याचे आढळून येते.

संदर्भ :

1. पवार,जयसिंगराव (2012) राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
2. भोसले, एस. (1981) राजर्षी शाहू संदर्भ आणि भूमिका , रणजीत प्रकाशन.
3. फाटक, न. (1972) श्री शाहू छत्रपती-सामाजिक सुधारणेबाबत विचार जागृती,एस. यु. के.
4. जाधव, रमेश (1992) राजर्षी शाहू छत्रपती वाद आणि वास्तव, महालक्ष्मी प्रकाशन.
5. साळुंखे, नानासाहेब (2016) शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन.
6. भगत, रा. तु.(1999) शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज सिद्धराज प्रकाशन.
7. पवार,जयसिंगराव ,(2001) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी.
8.http://www.wisdomlib.org
9.http://en.wikipedia.org
10.http://www.myupchar.com

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**50**

# राजर्षी छत्रपती शाहूजी महाराज यांच्या जीवन कार्यावरील साहित्य संपदा

**डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील**
ग्रंथपाल,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर आधारित जशी ग्रंथसंपदा आहे तशीच ग्रंथसंपदा मराठी मध्ये राजर्षी छत्रपती शाहूजी महाराज यांच्या जीवन कार्यावरील आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेमध्ये अडीचशेहून अधिक ग्रंथ राजर्षीच्या जीवन कार्याचा वेध घेतात. अनेक संशोधन पेपर, शोध प्रबंध व लघु शोध प्रबंधातून शाहू महाराजांच्या विचारांचे विवेचन केलेले आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या कल्याणकारी राज्याच्या संकल्पना शाहू महाराजांनी प्रत्यक्षात आपल्या कोल्हापूर संस्थांमध्ये राबवल्या. अति सामान्य गोरगरीब जनतेच्या हिताचे त्यांनी अनेक निर्णय घेतले आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत अधिकार, आरक्षणाचे तत्व, कष्टकरी गोरगरीब लोकांना विकासाच्या प्रवाहात आणणे आणि उद्योग व्यापार यामध्ये प्रगती साधण्यासाठी शाहूजी महाराज यांनी अनेकांना प्रोत्साह देऊन भक्कम पाठबळ दिले. त्यांच्या विविध कृतियुक्त विचारांचे प्रतिबिंब सदर ग्रंथांमध्ये पडलेले पहावयास मिळते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावरील ग्रंथसंपदेचा थोडक्यात आढावा घेणे.

२) राजर्षी शाहूंजी महाराज यांच्यावरील निवडक ग्रंथातील माहिती जाणून घेणे.

सदर संशोधन निबंधामध्ये काही मोजक्या ग्रंथांमधील माहिती थोडक्यात दिलेली आहे.

**राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, संपादक रमेश जाधव, प्रकाशक महाराष्ट्र शासन राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मंत्रालय, मुंबई- 2016.**

या ग्रंथाच्या प्रास्ताविकेत म्हटले आहे की, राजर्षी शाहू छत्रपती या युगप्रवर्तक महापुरुषाने आपल्या 28 वर्षाच्या दैदीप्यमान राज्यकारभारात समस्त समाजाचे सर्वांगीण कल्याण साधावे त्यांचे गोमटे व्हावे म्हणून जे सर्वंकश अविरत प्रयत्न केले आहेत त्या प्रयत्नांचा, कार्याचा आदर्श लोकांच्या समोर सातत्याने राहावा म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वतीने हे प्रकाशन केलेले आहे. 1976 मध्ये शिक्षण विभागाच्या वतीने हा ग्रंथ प्रकाशित केला होता 2015 साली या ग्रंथाची सुधारित तिसरी आवृत्ती महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित करण्यात आली. ही आवृत्ती 1268 पानांची द्विखंडात्मक झाली आहे. या ग्रंथात 41 लेख, 9 आठवणी आणि शाहू छत्रपती संदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे, शाहू छत्रपतींनी दिलेले हुकूम, आज्ञा या खेरीज प्राथमिक शिक्षण, मोफत सक्तीचा शिक्षणाचा कायदा, विवाह संबंधीचे कायदे, स्त्रियांना क्रूरपणे वागण्यास प्रतिबंध करणारा कायदा, वारसा कायदा यासारखे सामाजिक समता, व्यक्तिस्वातंत्र्य, बहुजनांना न्याय देणारे कायदे जे राजर्षी शाहू छत्रपतींनी प्रत्यक्षात अंमलात आणले त्याचे सविस्तर विवेचन या ग्रंथात केले आहे.

आमदार पी. बी. साळुंखे यांचे पहिल्या आवृत्तीचे संपादकीय, डॉ. रमेश जाधव यांचे तिसऱ्या सुधारित आवृत्तीचे संपादकीय निवेदन, करवीर छत्रपती घराण्याचा वंश वृक्ष, कागलकर घाटगे घराण्याचा वंश वृक्ष, शाहूकालीन कोल्हापूर संस्थांचा नकाशा यांची माहिती दिलेली आहे. पहिल्या खंडात राजर्षी छत्रपती शाहू व्यक्ती, विचार, काळ आणि कार्य व काही आठवणी यांची माहिती दिलेली आहे.

दुसऱ्या खंडामध्ये राजर्षींचे शाहूंचे व्यक्तिमत्व, विचार, काळ आणि कार्य याबाबतचे मान्यवरांचे लेख, आम्ही पाहिलेले शाहू छत्रपती, राजर्षी शाहू छत्रपतीकालीन महत्त्वाची कागदपत्रे, जाहीरनामे, राजर्षी शाहू छत्रपतीकालीन आदेश, हुकूम व कायदे, काही सामाजिक कायदे, निवडक व दुर्मिळ छायाचित्रे, काल व्यक्तीनाम सूची दिलेली आहे. पहिल्या खंडामध्ये डॉ. सूर्यकांत खांडेकर यांची 'जयजयकार' ही कविता, भाऊसाहेब घोणे, डॉ. अप्पासाहेब पवार, लोकमान्य टिळक यांचे व इतर मान्यवर लेखक, राजकारणी यांचे लेख दिलेले आहेत. या ग्रंथाच्या शेवटच्या पानावर मराठीतील पहिले ज्ञानपीठ पारितोषिक विजेते प्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांचे शाहू महाराजांच्या बाबतचे विचार सार स्वरूपात दिलेली आहेत.

वि. स. खांडेकर लिहितात, ''सर्व प्रकारच्या समतेचे तत्त्वज्ञान दैनंदिन व्यवहारात रूढ व्हायचे असेल तर त्याला ममतेचा आधार असावा लागतो. हा समाज माझा, ही माणसे माझी, यांची सुखदु:ख माझीच आहेत असे सतत जाणवल्याशिवाय व्यक्तीच्या

हातून उच्च तत्त्वज्ञानाला अनुरूप कृती होणे कठीण, हा ममतेचा महासागर शाहू महाराजांच्या अंतकरणात अष्टप्रहर हेलावत होता. तो काळ मिराजदारीच्या पूजेचा असूनही ती सोनेरी श्रृंखला तोडून जे जे विवेक बुद्धीला पटले तेथे महाराजांनी कुणाच्याही रागालोगाची परवा न करता आचरणात आणले. वरिष्ठांकडून कनिष्ठांच्या आणि बलदंडाकडून दुर्बलांचे शोषण किती प्रकाराने होते हे लक्षात येताच त्याला आळा घालण्याकरता विचार, उच्चार व त्यापेक्षा आचार या तिन्ही क्षेत्रात ते परखडपणाने वावरले. मानवावर केवळ मानव म्हणून उत्कट प्रेम करणारे हे मन लोकोत्तर होते. अन्यायविरुद्ध झगडताना ते वज्रकठोर बने. पण वंचित व दुःखितांच्या दर्शनाने ते कुसुम कोमल होई. पृथ्वीच्या पाठीवर अनेक सम्राट झाले असतील, अनेक राजाधिराज गाजून गेले असतील, पण समाजाच्या तळाच्या मानवतेवर माणूस म्हणून मायेची पाखर घालणारे राजे फार थोडे झाले असतील. राजर्षी शाहू महाराज हे त्यापैकी एक होते. सामाजिक क्रांतीचे त्यांचे स्वप्न एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे आजच्या वादळी जीवनात आपल्याला वाट दाखवायला पूर्णपणे समर्थ आहे.

यासह मान्यवरांचे विचार या राजर्षी शाहू गौरव ग्रंथात दिलेले आहेत. राजर्षींच्या जीवनकार्याचा हा मौलिक व प्रेरणादायी असा ग्रंथ आहे. केवळ तीनशे रुपये माफक किमतीमध्ये महाराष्ट्र सरकारने तो उपलब्ध करून दिलेला आहे. संपादक डॉ. रमेश जाधव यांनी मोठ्या अथक प्रयत्नाने हा ग्रंथ साकारलेला आहे. या ग्रंथाची 1268 पृष्ठे आहेत. या ग्रंथाचे संपादक डॉ. रमेश जाधव यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर इतरही ग्रंथसंपदा लिहिलेली आहे. त्यांची नावे अशी खालीलप्रमाणे.

**शाहू छत्रपती वाद आणि वास्तव, तिसरी आवृत्ती 2015.**

**लोक राजा शाहू छत्रपती प्रथम आवृत्ती 1997.**

या ग्रंथास 1998 सालचा महाराष्ट्र शासनाचा सर्वोत्तम चरित्र पुरस्कार मिळायला आहे. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे चा पुरस्कारही मिळालेला आहे. लोकराजा शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक, लोकराजा शाहू छत्रपती या ग्रंथांचा अनुवाद शरद कणबरकर यांनी केला. राजर्षी शाहू चरित्र, संक्षिप्त निवडक विजयी मराठा, शाहूकालीन पत्रकार श्रीपतराव शिंदे यांच्या लेखांचे संपादनही त्यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कोल्हापूर गॅझेटमधील शाहू छत्रपतींवरील मजकुराचे पुनर्लेखन 2004 साली त्यांनी केले आहे. राजयोगी पी. बी. साळुंखे यांच्या शाहू छत्रपती वरील व्याख्यानांचे संपादन 1984 साली त्यांनी केले आहे. शाहू छत्रपती दूरदर्शन मालिका, पटकथा व संबंधित संस्थेचे विश्वस्त म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे.

**राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, संपादक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. मंजुश्री पवार**

डॉ. जयसिंगराव पवार आणि डॉ. मंजुश्री पवार यांनी राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथामधील पहिल्या खंडात अंतरंग दिलेले आहेत. यामध्ये जयसिंगराव पवार यांनी लिहिलेले राजश्री शाहू छत्रपतींचे समग्र चिकित्सक चरित्र, तसेच 32 प्रकरणे दिलेली आहेत. खंड दुसरा मध्ये शाहूकालीन व उत्तरकालीन मान्यवरांचे 62 लेख दिले आहेत. सर फ्रेजर, प्रोफेसर लठ्ठे, नामदार भास्करराव जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धनंजय किर, कुसुमाग्रज, भाई माधवराव बागल, कॉम्रेड गोविंद पानसरे, डॉ. पाणतावने, प्रबोधनकार ठाकरे इत्यादींचे यामध्ये लेख आहेत.

तिसऱ्या खंडामध्ये राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, पत्रव्यवहार, हुजूर अज्ञा, वृत्तांत जाहीरनामे, हुकूमनामे, सामाजिक कायदे व शाहूकालीन दुर्मिळ छायाचित्रे दिलेली आहेत. चौथ्या खंडामध्ये शाहूकालीन आणि उत्तरकालीन मान्यवरांची व्याख्यानांतर्गत लिहिलेले लेख दिले आहेत. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, डॉ. रावसाहेब कसबे, भाई वैद्य, डॉ. रघुनाथ माशेलकर, अरुण साधू, शरद पवार इत्यादी मान्यवरांचे 38 लेख आहेत.

खंड पाच मध्ये राजर्षी शाहू छत्रपतींच्या आठवणी, पत्रव्यवहार, आदेश, संकीर्ण टिपणी, शाहू स्मारक ग्रंथाविषयीचे अभिप्राय, दुर्मिळ छायाचित्रे इत्यादींची माहिती दिलेली आहे. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीने हे पाच खंड प्रकाशित केलेले आहेत. या ग्रंथात शाहू महाराजांच्या विषयी मान्यवरांची मते दिलेली आहेत ती पुढील प्रमाणे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी म्हटले आहे की, ''मी जे कार्य करीत आहे त्याचे सर्व श्रेय शाहू महाराजांच्या शिकवणुकीला आहे.'' महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात, ''शाहू राजा नुसता मराठा नव्हता, ब्राह्मणेत्तरही नव्हता तर तो नवयुगातील सर्वांग राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा एक मोठा तरंग होता.'' ज्ञानपीठ पारितोषिक विजेते पद्मभूषण वि. स. खांडेकर लिहितात, ''एक राजा आपल्या अतुल्य स्थानावरून सहजपणे खाली उतरतो आणि दीर्घकाळ वंचित आणि उपेक्षित स्थितीत राहिलेल्या सामाजिक स्तरातल्या लोकात मिसळतो. त्यांना समतेच्या भावनेने वागवतो. हे दृश्य मोठे अद्भुत आणि रोमहर्षक आहे. पृथ्वीच्या पाठीवर अनेक सम्राट झाले असतील, अनेक राजाधिराज गाजून गेले असतील, पण समाजाच्या तळाच्या मानवतेवर माणूस म्हणून मायेची पाखर घालणारे राजे फार थोडे झाले. राजर्षी शाहू महाराज हे त्यापैकीच एक होते.''

राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथातील चार आणि पाच खंडांमध्ये मी शाहू राजां पासून काय मिळवले, कर्मवीर भाऊराव पाटील शाहू छत्रपतींच्या मनाचा उपक्रमशील विकास, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, योजकतेचे मेरुमणी, नामदार भास्करराव जाधव माझ्या शाहू महाराजांच्या आठवणी, रावबहाद्दूर डॉ. पी. सी. पाटील राजर्षींचे लोकोत्तर व्यक्तिमत्व ग. त्र्यं. माडखोलकर, मी पाहिलेले व अनुभवले शाहू महाराज गंगाधर, शिवराज्याचे मॉडेल सिद्ध करणारे शाहू महाराज भाई वैद्य, राजश्री शाहू इतिहासाला कलाटणी देणारा महापुरुष प्रा. एन. डी. पाटील, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची दिशा प्रा. बासरदार, शाहू महाराज आणि कोल्हापूर चळवळ, शाहू छत्रपती महाराज, प्रबोधनाची पहाट, न्यायमूर्ती जी. एन. वैद्य, शाहू छत्रपती संदर्भ, प्रेरणा आणि कार्य डॉ. एस. एस. भोसले, राजर्षी शाहू उपभोगशून्य स्वामी प्राचार्य पी. बी. पाटील, राजर्षी शाहू आणि सांस्कृतिक क्रांती रावसाहेब कसबे, राजर्षी शाहू छत्रपती महान समाज परिवर्तनवादी शरद पवार, शाहू महाराजांची कामगार चळवळ यशवंत चव्हाण, लोकांचा राजा शाहू छत्रपती वि. स. खांडेकर, तिसरा मुजरा राजर्षी शाहू महाराजांना विठ्ठलराव घाटे, शाहू महाराज एक धिप्पाड माणूस पु. ल. देशपांडे, शिवछत्रपती नंतरचा व्यापक दृष्टी असणारा राजा शाहू अरुण साधू, राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्यायाचे प्रणेते उत्तम कांबळे, राजर्षी शाहू एक भविष्यवेधी राजा डॉ. रघुनाथ माशेलकर, राजर्षी शाहू छत्रपती व देवी इंदुमती राणीसाहेब को. गो. सूर्यवंशी, शाहू छत्रपती आर्य समाज व ठियासॉफी तु. बा. नाईक, राजर्षी पदाचे पहिले मानकरी गणेश कृष्णा कुराडे, महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज प्राचार्य सोमनाथ रोडे, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामधील स्नेहबंध - एक शोध सोनवणे, राजर्षी शाहू आणि त्यांचे सत्यशोधक सहकारी डॉ. अरुण शिंदे, शाहू महाराजांची सामाजिक न्यायाची वैश्विकता डॉ. प्रकाश पवार, राजर्षी शाहू महाराज आणि समतेचा लढा डॉ. राजा दीक्षित, शिवछत्रपतींचे वैचारिक वारसदार शाहू छत्रपती डॉ. वसंतराव मोरे, राजर्षी शाहू छत्रपती व कृष्णाबाई केळकर डॉ. वसुधा पवार, राजर्षी शाहू छत्रपती आणि शिवछत्रपतींची स्मारके इंद्रजीत सावंत, राजर्षी शाहू कृतिशील विचारवंत राजा डॉ. सागर देशपांडे, राजश्री शाहू महाराज व सत्यशोधक डोने मास्तर सुशीला, राजर्षी शाहू महाराजांची अर्थनिती डॉ. जे. एफ. पाटील, राजर्षी शाहू छत्रपतींची सामाजिक न्यायाची विकासदृष्टी डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्वराज्य द्रोही होते काय? डॉ. मंजिरी पवार यांचे लेख या ग्रंथामध्ये आहेत.

शाहू चरित्रकार डॉ. धनंजय किर म्हणतात, ''अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसाठी शाहूंनी केलेल्या महान व अविरत परिश्रमामध्ये व प्रयत्नांमध्ये महात्मा गांधीजींच्या तोंडून आनंदाने उद्गार निघाले की, शाहू महाराज म्हणजे निस्वार्थी मिशनरी भावनेचे अद्वितीय उदाहरण होय.

सदर ग्रंथाचे पाच खंड हे 1928 पानांचे आहेत. या छत्रपती शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथास श्री शाहू छत्रपती महाराज आणि श्री मालोजीराजे छत्रपती तसेच ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी पुणे यांचे बहुमोल आर्थिक सहाय्य लाभलेले आहे. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीने हे खंड प्रकाशित केलेले आहेत. अत्यंत दर्जेदार लेखन राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या वरील ग्रंथात आहे. या ग्रंथाचे संपादक डॉ. जयसिंगराव पवार हे इतिहासाचे गाढे प्राध्यापक आहेत. त्यांनी 40 संशोधनात्मक ग्रंथ व 45 शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. वीस सामाजिक आणि साहित्यिक पुरस्काराने त्यांना सन्मानित केलेले आहे. 1991 साली स्थापन झालेल्या अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे ते संस्थापक संचालक आहेत. शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे ते मानद संचालक आहेत. मराठ्यांचा इतिहास आणि आधुनिक महाराष्ट्रवर लेखन, राजर्षी शाहू छत्रपतींचे चरित्र सर्व जगभर प्रसारित करण्याचे मिशन त्यांनी समोर ठेवले आहे. भारताच्या 15 भाषेत आणि जगाच्या 20 भाषांमध्ये शाहू चरित्र अनुवादित करण्याचा महत्त्वकांक्षी प्रकल्प त्यांनी हाती घेतला आहे. आत्तापर्यंत मराठी, कन्नड, कोकणी, उर्दू, तेलगू, हिंदी, सिंधी, गुजराती, इंग्लिश, जर्मन, रशियन इत्यादी भाषांमध्ये त्यांनी शाहू चरित्र ग्रंथाचे भाषांतर केले आहे. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या समृद्ध दालनात आणि शिवाजी ग्रंथालयाच्या विकासात त्यांचे मौलिक योगदान आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन कार्यावरील अनेक ग्रंथ त्यांच्या दूरदृष्टीने संकलित झालेले आहेत.

**राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारी राजा, डॉ जयसिंगराव पवार.अनुवाद पद्मा पाटील -** या ग्रंथाच्या सुरुवातीलाच राजर्षी शाहू महाराजांच्या वरील महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कोटेशन दिलेले आहेत ते असे. महात्मा गांधी म्हणतात, ''स्वराज्य की बुनियाद छत्रपती शाहू महाराज द्वारा सत्यशोधक समाज के तत्वो के अनुसार अस्पृश्यता नष्ट की। उन्होने स्वराज्य की वास्तविक बुनियाद ही डाली है।

**राजर्षी शाहूंची वाङ्मयीन स्मारके, प्राचार्य डॉ. जे. के. पवार -** छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून राजर्षी शाहूंची वाङ्मयीन स्मारके हा ग्रंथ प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांनी संपादित केलेला आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या वरील मराठी भाषेतील विविध ग्रंथसंपदेचा आढावा घेऊन त्यांनी या ग्रंथात राजर्षी शाहू महाराज यांच्यावरील 180

पुस्तकांची माहिती दिलेली आहे. या माहितीतून त्या पुस्तकांचा परिचय होतो. तसेच त्या पुस्तकातील शाहूंचे वैचारिक विचारधन आपणास पहावयास मिळते. या ग्रंथातील महत्त्वपूर्ण पुस्तके आणि त्यांचे लेखक असे.

श्रीमन्म महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तक विधानाची हकीकत सन 1885 लेखक सदाशिव देशपांडे, संपादक प्राचार्य विलास पवार. मुक्तहरी समारंभ अथवा श्रीमन्म महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांचा राज्याधिकार स्वीकारोत्सव, लेखक बाळाची महादेव करवडे, संशोधक यशोधन जोशी. शाहू छत्रपती सरकार करवीर यांची भाषणे, राजश्री शाहू महाराज यांचा पोवाडा, लेखक शंकर बळवंत भोसले. विजय मराठा राजर्षी शाहू विशेषांक 1923, संपादक श्रीपतराव लक्ष्मणराव शिंदे. श्रीमन्म छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे, संपादक डॉ जयसिंगराव पवार. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आठवणी, संपादक दत्ताजीराव यशवंतराव कुरणे, कैलासवासी राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांचा पोवाडा, शिघ्र कवी लहरी हैदर साहेब. राजर्षी शाहू महाराज, लेखक भाऊसाहेब बाळासाहेब पवार. श्री शाहूंचे चरित्र, वासुदेव आत्माराम लाटकर शास्त्री, संपादक डॉ. जयसिंगराव पवार. शाहू महाराज यांच्या आठवणीत, माधवराव बागल. लोकमान्य टिळक आणि राजेश शाहू महाराज एक मूल्यमापन, धनंजय कीर. आधुनिक भारतीय पुरोगामी राष्ट्रवादाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांची भाषणे, संकलन भगवानराव बापूसाहेब जाधव. राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे, श्री शाहू छत्रपती सामाजिक सुधारणेबाबतचा विचार जागृती, संपादक सत्यवादीकार बाळासाहेब पाटील. शाहू महाराजांची माणसे सरोजिनी बाबर. क्रांतीसुक्ते राजर्षी छत्रपती शाहू संपादक एस. एस. भोसले, राजर्षी शाहू काल, विचार आणि कार्य, एस. एस. भोसले. शाहू छत्रपती डॉ. रमेश जाधव. कथा राजर्षी शाहू महाराजांच्या उदयसिंह यादव. राजयोगी पी. बी. साळुंखे. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, य. दि. फडके. लोकशिक्षणाचे शिल्पकार, प्राचार्य राजू भगत. राजर्षी शाहू एक दृष्टीक्षेप, डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू महाराज चरित्र काव्य पी. टी. पाटील, राजर्षी शाहूंची अर्थनीती संपादक प्राचार्य जे. के. पवार. मानव अधिकारांचा पुरस्कर्ता राजा शाहू महाराज पद्मा पाटील. माझा राजा शाहू राजा गायत्री शिंदे. राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ संपादक डॉ. जयसिंगराव पवार, मंजुश्री पवार. रयतेचा राजा छत्रपती शाहू महाराज पी. एस. कांबळे. राजर्षी शाहूंना समजून घेताना कपिल राजहंस. बालकल्याणाचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज प्राचार्य जे. के. पवार. शाहू छत्रपती क्रांतिकारी राजा न्यायमूर्ती जी. एन. वैद्य, संपादक डॉ. जयसिंगराव पवार. नव्या युगातील राष्ट्रपुरुष राजर्षी शाहू महाराज, अनिल म्हमाणे. सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराज बाबा भांड. बहुजनांचे भाग्यविधाते राजर्षी शाहू महाराज प्राचार्य जे. के. पवार. वसतिगृहांचे आद्यजनक राजर्षी शाहू महाराज, प्राचार्य डॉ. दिनकर पाटील. राजर्षी शाहू महाराज एक अवलिया पुरुष प्रा. एन. डी. पाटील. समाज क्रांतीकारक राजर्षी शाहू छत्रपती जयसिंगराव पवार समाज प्रबोधन पत्रिका संपादक डॉ. अशोक चौसाळकर. या 180 पुस्तकांचा परिचय या ग्रंथात दिलेला आहे. शाहू महाराजांचे जीवन आणि कार्य याचे चिकित्सक विवेचन या ग्रंथांमधून दिसून येते. यातील सत्तरहून अधिक ग्रंथ श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या शिवाजी ग्रंथालयात उपलब्ध आहेत. या ग्रंथालयाचे विशेष सहकार्य लाभल्याची प्राचार्य जे. के. पवार यांनी या ग्रंथात नमूद केले आहे. या ग्रंथाच्या सुरुवातीलाच राजर्षी छत्रपती शाहू महाराज एक दर्शन प्रा. डॉ. सूर्यकांत खांडेकर यांची कविता दिलेली आहे. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य कर्तृत्व या काव्यातून दिसून येते. हौसाबाई चॅरिटेबल ट्रस्टच्या शाहू आध्यासनामध्ये वरील सर्व ग्रंथ आपणास पहावयास मिळतात. प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांनी या अध्यासनाची निर्मिती केलेली आहे.

**समारोप :** छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य आणि कर्तव्य खूप मोठे आहे. सुमारे अडीचशे हून अधिक ग्रंथांमध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांचे वर्णन विविध लेखकांनी, संपादकांनी केले आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, गुजराती आणि इतर परदेशी भाषेमध्ये शाहू महाराजांचे कार्य कर्तृत्व अभ्यासकांना संशोधकांना वाचावयास मिळते. उपलब्ध असलेल्या निवडक ग्रंथांमध्ये त्याचा थोडक्यात परिचय सदर लेखामध्ये देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ सूची:**

1) जाधव रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, सुधारित तिसरी आवृत्ती, महाराष्ट्र शासन, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मंत्रालय, मुंबई, 2016.
2) पवार जे. के. राजर्षी शाहूंची वाङ्मयीन स्मारके, राज प्रकाशन, कोल्हापूर, 2023.
3) पाटील पद्मा, राजर्षी, एक्सप्रेस पब्लिकेशन हाऊस, कोल्हापूर, 2007.
4) गौतम प्रज्ञावंत, शाहू राजा, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, 2008.
5) गर्गे स. मा., करवीर रियासत, 1980.
6) पवार जयसिंगराव, पवार मंजुश्री, राजर्षी शाहू पंचखंडात स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, 2019.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

51

# छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान

**श्रीमती उर्मिला राजेंद्र कदम**
ग्रंथपाल / असो.प्रोफेसर
कमला कॉलेज, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:** छत्रपती शाहू महाराज हे मराठा साम्राज्याचे एक महत्वपूर्ण आणि दूरदर्शी शासक होते. त्यांच्या काळात त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा केल्या, पण शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान अत्यंत महत्वाचे आहे. त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी व समाजातील असमानता दूर करण्यासाठी अनेक उपक्रम राबवले. छत्रपती शाहू महाराज, त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे आणि त्याने आपल्या काळात समाजात शिक्षणाच्या प्रसारासाठी अनेक उपक्रम केले. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान अतिशय महत्त्वाचे होते. त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा केली आणि विविध जातींना समान शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. तसेच, त्यांनी शिक्षकांच्या पगारात सुधारणा केली आणि शिक्षणाचे प्रावधान सर्व समाजासाठी खुलं केले. त्यांचा दृष्टिकोन आणि प्रयत्न भारतातील शिक्षण व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणारे ठरले.

**१) शाळा आणि शिक्षण संस्था स्थापन :** शाहू महाराजांनी त्यांच्या काळात शाळा व शिक्षण संस्थांची स्थापना केली. त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा करत शाळा सुरू केल्या ज्यामुळे स्थानिक लोकांना शिक्षण मिळवणे सोपे झाले. त्यांच्या काळात १५० हून अधिक शाळा स्थापन झाल्या, ज्यामुळे विविध समाजातील लोकांना शिक्षणाची संधी मिळाली. राजर्षी शाहू महाराज हे एक प्रभावशाली राजकारणी आणि समाजसुधारक होते. त्यांनी शिक्षण प्रसारासाठी अनेक महत्त्वाचे उपाय केले. त्यांचे शिक्षणासाठी केलेले प्रमुख उपाय पुढीलप्रमाणे:

राजर्षी शाहू महाराजांनी विविध शिक्षण संस्थांचा आणि विद्यालयांचा विकास करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांनी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणाच्या संस्थांचा विस्तार केला.

**शिक्षणासाठी अनुदान** : त्यांनी शाळा आणि महाविद्यालये चालवण्यासाठी आर्थिक मदतीची योजना सुरू केली. या अंतर्गत त्यांनी विद्यालयांना नियमित अनुदान देण्याची व्यवस्था केली.

**शिक्षकांच्या वेतनाची व्यवस्था** : राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षकांना योग्य वेतन दिले आणि त्यांचा आदर वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**समाजातील अडथळे हटवणे:** राजर्षी शाहू महाराजांनी जातीय भेदभाव आणि सामाजिक अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या कर्तृत्वामुळे सर्व स्तरातील लोकांना शिक्षण मिळवण्यास संधी मिळाली.

**प्रेरणादायक साहित्याचा प्रचार**: त्यांनी विविध भाषांमध्ये शिक्षणासाठी उपयुक्त साहित्य तयार करून वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन दिले.

**महिलांच्या शिक्षणावर भर**: राजर्षी शाहू महाराजांनी महिलांच्या शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांनी महिला शिक्षण संस्थांची स्थापना केली आणि महिलांना शिक्षणाचा अधिकार देण्याची व्यवस्था केली.

या उपायांच्या मदतीने शाहू महाराजांनी शिक्षणाच्या प्रसारात मोठे योगदान दिले आणि समाजाच्या सर्व स्तरांवर शिक्षणाचा प्रभाव वाढवला.

**२) विद्यार्थी वसतिगृह चळवळ:** करवीर संस्थानांमधील सर्व जाती धर्मातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी या दूरदृष्टीच्या विचाराने शाहू महाराजांनी विद्यार्थी वसतिगृह स्थापनेची मोहीम हाती घेतली व यशस्वी करून दाखवले विविध जाती धर्मातील पुढाऱ्यांना जाती-धर्मातील मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी एकत्रित केले. वसतिगृह चालविण्यासाठी मानसिक दृष्ट्या बळ दिले तसेच वसतिगृहासाठी जागा, इमारत, पैसा, पुस्तके, अनुदान इत्यादी स्वरूपात महाराजांनी स्वतः सहाय्य देखील केले. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत त्यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने विविध जाती धर्मातील विद्यार्थीसाठी **२०** विद्यार्थी वसतीगृहे स्थापन केली गेली.

**3) शैक्षणिक वर्तमान व सुधारणा:** राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या गुणवत्ता व पद्धतीत सुधारणा केली. त्यांनी विदयार्थ्यांसाठी उचित पाठ्यक्रम व शिक्षण साहित्याची व्यवस्था केली. त्यांनी शिकवणारे शिक्षक व प्रशिक्षक तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे एक अत्यंत प्रगतिशील आणि समाज सुधारक राजे होते. त्यांनी आपल्या शासनकाळात सामाजिक समावेश आणि सुधारणा करण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या. त्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे आहे:

**सामाजिक न्यायाचे पायाभूत काम:** राजर्षी शाहू महाराजांनी जातिवादी भेदभाव विरुद्ध कठोरपणे लढा दिला. त्यांनी आपले प्रशासन अशा पद्धतीने चालवले की, गरीब आणि वंचित वर्गातील लोकांनाही समान संधी उपलब्ध होईल.

**शिक्षणाचा प्रसार**: राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांनी अनुसूचित जाती आणि जनजातीतील मुलांसाठी शाळा सुरू केल्या. त्यांनी शिक्षण क्षेत्रात सुधारणा करून समाजातील कमीवर्गीयांना शिक्षणाच्या मुख्यधारेत आणले.

**राजकीय प्रतिनिधित्व:** शाहू महाराजांनी अनुसूचित जातींना राजकीय प्रतिनिधित्व दिले. त्यांनी त्यांच्या राज्यात त्या जातींना प्रशासनात भाग घेण्याची संधी दिली, ज्यामुळे त्यांच्या समस्यांवर अधिक लक्ष दिले जाऊ लागले.

**सामाजिक सुधारणा**: शाहू महाराजांनी जातीभेद कमी करण्यासाठी अनेक सामाजिक सुधारणा केल्या. त्यांनी अस्पृश्यतेच्या विरोधात कठोर पावले उचलली आणि अस्पृश्य समाजातील लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला.

**विवाह आणि कुटुंबीय सुधारणा**: त्यांनी बालविवाह आणि विधवा पुनर्विवाह यांसारख्या सामाजिक वाईट परंपरांविरुद्ध काम केले. त्यांनी विधवा महिलांच्या पुनर्विवाहासाठी प्रोत्साहन दिले.

**आर्थिक सुधारणा**: शाहू महाराजांनी समाजातील गरीब वंचित लोकांसाठी आर्थिक उपाययोजना केल्या. त्यांनी त्यांच्या फायद्यासाठी विविध योजनांची सुरुवात केली आणि आर्थिक विषमता कमी करण्याचे काम केले.

**स्वातंत्र्य आणि समानता**: त्यांनी सामाजिक समानतेचा आदर्श ठेवला आणि समाजातील सर्व स्तरांतील लोकांना समान मान्यता देण्याचा प्रयत्न केला.

छत्रपती शाहू महाराजांच्या या प्रयत्नांनी महाराष्ट्रातील सामाजिक स्थितीवर खूप मोठा प्रभाव टाकला आणि त्यांनी भारतीय समाजाच्या सर्व स्तरांमध्ये सुधारणा करण्यासाठी एक आदर्श ठेवला.

**४) सामाजिक समावेश**:राजर्षी शाहू महाराजांनी जातिवाद व सामाजिक भेदभावाच्या विरोधात लढा दिला. त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात समानता आणि समावेशी दृष्टिकोन ठेवला. विशेषत: त्यांनी वंचित वर्गाच्या लोकांना शिक्षणाची संधी देण्यासाठी अनेक उपक्रम राबवले. यामुळे समाजातील निम्न वर्गाच्या लोकांना शिक्षणाच्या माध्यमातून सुधारणा करण्याची संधी मिळाली. शाहू महाराज, म्हणजेच छत्रपती शाहू चैतन्य महाराज, यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक शिक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केले. त्यांचे प्रमुख योगदान खालीलप्रमाणे आहे:

**सामाजिक सुधारणा:** शाहू महाराज यांनी जातीभेद आणि सामाजिक असमानता विरोधात ठाम भूमिका घेतली. त्यांनी अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले.

**शिक्षणाचा प्रसार**: त्यांनी जाती व धर्माच्या पलीकडे जाऊन सर्व समाजाच्या शिक्षणाचा प्रसार केला. विशेषतः दलित आणि गरीब वर्गाला शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.

**संस्कृतीचा संवर्धन**: शाहू महाराजांनी भारतीय संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन केले. त्यांनी मराठी भाषा आणि संस्कृतीला प्रोत्साहन दिले, आणि पारंपारिक कला व साहित्याचे समर्थन केले.

**आर्थिक व सामाजिक विकास:** त्यांनी शेतकरी आणि कामगार वर्गाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीला सुधारण्यासाठी विविध योजना आणि उपक्रम सुरू केले.

शाहू महाराजांचा हा कार्यप्रवास आजही प्रेरणादायक आहे आणि त्यांच्या योगदानामुळे समाजात अनेक सकारात्मक बदल झाले आहेत.

**५) सामाजिक व सांस्कृतिक शिक्षण:** शाहू महाराजांनी आपल्या शिक्षण धोरणात समाजातील सांस्कृतिक व ऐतिहासिक ज्ञानाचा समावेश केला. त्यांचे धोरण त्याकाळच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचा भाग म्हणून शिक्षणाला महत्त्व देणारे होते. यामुळे विदयार्थ्यांना त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचा अभिमान वाटायला लागला. छत्रपती शाहू महाराज, यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक शिक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केले. त्यांचे प्रमुख योगदान खालीलप्रमाणे आहे:

**सामाजिक सुधारणा**: शाहू महाराज यांनी जातीभेद आणि सामाजिक असमानता विरोधात ठाम भूमिका घेतली. त्यांनी अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले.

**शिक्षणाचा प्रसार:** त्यांनी जाती व धर्माच्या पलीकडे जाऊन सर्व समाजाच्या शिक्षणाचा प्रसार केला. विशेषतः दलित आणि गरीब वर्गाला शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.

**संस्कृतीचा संवर्धन:** शाहू महाराजांनी भारतीय संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन केले. त्यांनी मराठी भाषा आणि संस्कृतीला प्रोत्साहन दिले, आणि पारंपारिक कला व साहित्याचे समर्थन केले.

**आर्थिक व सामाजिक विकास:** त्यांनी शेतकरी आणि कामगार वर्गाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीला सुधारण्यासाठी विविध योजना आणि उपक्रम सुरू केले. शाहू महाराजांचा हा कार्यप्रवास आजही प्रेरणादायक आहे आणि त्यांच्या योगदानामुळे समाजात अनेक सकारात्मक बदल झाले आहेत.

**निष्कर्ष:** राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान अत्यंत व्यापक व प्रभावी आहे. त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले कार्य आणि समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी केलेले उपाय आजही प्रेरणादायक ठरतात. त्यांच्या दूरदर्शी दृष्टिकोनामुळे अनेक वंचित वर्गाच्या लोकांना शिक्षण मिळवण्याची संधी प्राप्त झाली आणि त्यांच्या कार्याचा प्रभाव आजच्या काळातही कायम आहे. शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान त्यांच्या काळातील समाज सुधारणा आणि विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे ठरते. शिक्षणाच्या प्रसारासाठी उपाययोजना करताना शाहू महाराजांनी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी खास करून दलित व गरीब समाजातील लोकांसाठी शिक्षणाची व्यवस्था केली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळा आणि शिक्षण संस्था स्थापन केल्या गेल्या. शाहू महाराजांनी अशिक्षित समाजाच्या लोकांसाठी विशेष शाळा उघडल्या. त्यांनी ब्राह्मणांसोबतच अन्य समाजातील लोकांसाठीही शिक्षणाच्या संधी प्रदान केल्या, ज्यामुळे सामाजिक समानतेचा संदेश पुढे गेला. शिक्षक आणि शाळांच्या प्रोत्साहनाची योजनामध्ये त्यांनी शिक्षकांचे मानधन सुधारले आणि शाळांच्या प्रोत्साहनासाठी विविध योजना राबवल्या. यामुळे शिक्षण क्षेत्रात एक नवा उत्साह आणि स्थैर्य आले. शाहू महाराजांनी महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. विविध समाजासाठी वसतिगृह स्थापन केली. त्यांनी महिलांसाठी शाळा सुरू केल्या आणि शिक्षणाच्या पथावर महिला समाजाचे अधिकार व त्यांच्या आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने पाऊले उचलली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील भेदभाव कमी करण्याचा शाहू महाराजांचा प्रयत्न होता. त्यांनी उच्च व निम्न जातीच्या लोकांसाठी समान शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षणातील योगदान त्यांच्या काळातील समाजात परिवर्तन घडवण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरले. त्यांच्या उपक्रमांमुळे महाराष्ट्रात शिक्षणाच्या प्रसारासाठी एक नवा मार्ग खुला झाला आणि समाजातील विविध वर्गांना शिक्षणाच्या समान संधी मिळाल्या.

छत्रपती शाहू महाराज यांचे जीवन आणि शैक्षणिक कार्य यामुळे त्यांचा प्रभाव आजही टिकून आहे. त्यांच्या नावाने सुरु केलेले शैक्षणिक संस्थांचे कार्य आणि त्यांच्या समाज सुधारणा आजच्या काळातही प्रेरणादायक ठरतात. त्यांच्या कार्यामुळे त्यांचा आदर्श नवा पिढीला मार्गदर्शन करतो.

**संदर्भ:**

१) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ(२०१६),ले. डॉ. रमेश जाधव, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय मुंबई, प्रथम आवृत्ती.
२) श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र(२००८), ले. दिवाण बहादुर अण्णासाहेब बाबाजी लठ्ठे, संपादक, डॉ. जयसिंगराव पवार, संचालक शाहू संशोधन केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती
३) छत्रपती शाहू महाराज, ले. नाईक, टी.बी., अजब पुस्तकालय, कोल्हापूर
४) राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य(२०२३) ले.पाटील,एस.बी. प्रथम आवृत्ती.
५) वसतिगृहाचे आद्य जनक राजर्षी शाहू महाराज, ले. पाटील दिनकर, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

52

# राजश्री शाहू महाराज: सामाजिक सुधारांद्वारे वंचित समुदायांचे उन्नती करणारे थोर समासुधारक

**आशिष बाबासाहेब घाटगे,**
संशोधन विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

---

**प्रस्तावना**: महाराष्ट्राच्या समाज सुधारणेमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणारे असे कोल्हापूर संस्थानाचे दूरदृष्टीचे शासक आणि थोर समाज सुधारक राजश्री शाहू महाराज (१८७४-१९२२) यांनी त्यांच्या कार्यकाळात सामाजिक सुधारणा आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारतातील जातीव्यवस्था व त्याच्या प्रभावाखाली असलेला समाज यांच्या उन्नतीसाठी शाहू महाराजांनी आपल्या आयुष्यात अहोरात्र कार्य केले. त्यांनी समाजातील मागासलेल्या व दुर्बल वर्गाच्या लोकांमध्ये सक्षमीकरणासाठी विविध धोरणे राबवून समाजात समानता प्रस्थापित करण्याचे तत्व अंगीकारले. शाहू महाराजांनी आपल्या राज्यात म्हणजेच कोल्हापूर संस्थानापासून याची सुरुवात केली. ज्यामध्ये सर्वात महत्वपूर्ण म्हणजे १९०२ साली त्यांनी लागू केलेले आरक्षण धोरण, शाहू महाराजांच्या या कार्यामुळे मागास वर्गातील लोकांना शिक्षण आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये संधी उपलब्ध झाली. त्यांच्या या निर्णयामुळे समाजाच्या मनवृत्तीमध्ये सकारात्मक बदल घडून आले आणि दुर्बल घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याची दिशा मिळाली. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने शाहू महाराजांनी केलेले हे कार्य मोलाचे होते. त्याचप्रमाणे त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात केलेल्या कार्यावर विशेष लक्ष द्यावे लागेल. सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी व कल्याणासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. हे शाहू महाराजांनी ओळखले त्यामुळे त्यांनी अनेक शाळा उभारल्या. अस्पृश्यांना आणि मागासवर्गीयांना उच्च शिक्षण मिळावे या करता त्यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून उत्तेजन दिले. त्याचप्रमाणे समाजाच्या प्रगतीचा पाया हा शिक्षण आहे. याची जाणीव त्यांना होती म्हणून शाहू महाराजांनी शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना केली. त्यामुळे अनेक दुर्बल घटक शिक्षण घेऊ लागले व समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ लागले. शाहू महाराजांनी समाजामध्ये समतोल साधण्यासाठी रोजगाराच्या संधीमध्ये सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करून त्यांनी मागासवर्गीयांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. यामुळे सामाजिक न्याय आणि समानतेच्या दिशेने त्यांच्या या योगदानामुळे येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा मिळाली. आणि हा अस्पृश्यते विरुद्ध लढाईतील मोठा टप्पा पार पडला. शाहू महाराजांचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य देखील अनन्यसाधारण असून अस्पृश्यना सामाजिक समता व समान हक्क प्राप्त करून देण्यावर त्यांनी भर दिला. व विषमता नष्ट करण्यासाठी अनेक कृतिशील पावले उचलली. शाहू महाराजांची नेतृत्व आणि त्यांच्या धोरणांनी सामाजिक न्यायाची जाणीव समाजात रुजवली. शाहू महाराजांचे जीवन आणि कार्य म्हणजेच सामाजिक न्याय, समानता, एकता आणि सक्षमीकरणासाठी दिलेला लढा आहे. त्यांचे कार्य भारताच्या समाज सुधारण्याच्या इतिहासामधील मोलाचे आहे. व त्यांचे कार्य समाज सुधारण्याच्या प्रक्रियेमधील मैलाचा दगड आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे-** छत्रपती शाहू महाराजांनी वंचित समुदायांच्या उन्नतीसाठी सामाजिक सुधारांद्वारे केलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती -** या संशोधनात वर्णनात्मक (डिस्क्रिप्टिव्ह) संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनात दुय्यम माहितीचे स्रोत, जसे की पुस्तके आणि लेखांचा आधार घेतला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**: -१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीला, जातिव्यवस्थेमुळे भारतीय समाजामध्ये मोठी विभागणी झाली होती. भारतीय समाजामध्ये उच्चवर्गीय ब्राह्मण यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये अधिकार प्राप्त झाले होते. तर अस्पृश्य व मागासवर्गीय जातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील केले गेले नव्हते. त्यांना शिक्षण रोजगार आणि प्रगतीपासून वंचित ठेवण्यात आले होते. भारतीय समाजातील या अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध अनेक समाज सुधारकांनी चळवळी उभारल्या. व या अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध लढा दिला. या अन्यायकारी लढ्याविरुद्ध लढणारे एक महत्त्वाचे समाज सुधारक म्हणून राजश्री शाहू महाराज यांचे कार्य मोलाचे आहे. कोल्हापूरच्या राजघरण्यामध्ये जन्मलेले शाहू महाराज, यांच्यावर अनेक समाजसुधारकांचा प्रभाव होता. यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्यांनी प्रभावित होऊन मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कार्य करून त्यांना प्रगतीचा मार्ग दाखवला होता. शाहू महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये वंचित आणि मागासकीय

वर्गीय लोकांच्या उद्धारासाठी विशेष धोरणे आखले शाहू महाराजांनी शिक्षण आरोग्य आणि रोजगाराच्या संधी पोहोचवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांनी कोल्हापूर राजवटीमध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी योजना सुरू केल्या. अस्पृश्यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याची सुरुवात शाहू महाराजांनी केली. त्याचप्रमाणे महिलांच्या शिक्षणावरही भर दिला आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी कार्य केले. त्यांच्या या योगदानामुळे शोषित घटकांच्या अधिकाऱ्यासाठीचा लढा अधिक प्रभावीपणे पुढे गेला.

**शाहू महाराजांचे आरक्षण धोरण:-** भारताच्या समाजसुधारणेच्या इतिहासामध्ये 1909 मध्ये राजश्री शाहू महाराजांनी लागू केलेले आरक्षण धोरण सामाजिक सुधारणेमधील एक सर्वात महत्वपूर्ण पाऊल होते. या धोरणाने त्यांनी मागासवर्गांना शासकीय नोकऱ्यांमध्ये 50% आरक्षण देण्याची व्यवस्था केली हे धोरण भारतातील पहिल्या आरक्षण धोरण होते. या निर्णयामुळे तत्कालीन शासकीय वर्चस्वामध्ये असणारा जातीव्यवस्थेतील उच्च वर्णीय वर्गाला आव्हान मिळाले होते. व त्याचप्रमाणे वंचितांना रोजगाराच्या संधी प्राप्त होऊ लागल्या. हे धोरण केवळ नोकऱ्यांसाठीच महत्त्वपूर्ण नव्हते तर त्याद्वारे समाजातील विषमता दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला होता. शाहू महाराजांनी हे आरक्षणाचे धोरण नोकऱ्यांपुरतेच मर्यादित ठेवले नाही तर मागास वर्गातील शिक्षणासाठी ही तेवढेच महत्व दिले. मागास वर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सवलती देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये येण्याची संधी उपलब्ध करून दिली. यामुळे समाजातील वंचित दुर्बल घटकांना शिक्षणाची संधी मिळू लागली आणि त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाली. शाहू महाराजांचे हे धोरण सामाजिक समतेच्या आणि न्यायाच्या दृष्टीने क्रांतिकारी ठरले व त्यांची दूरदृष्टी वंचितांच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. अशा प्रकारे शाहू महाराजांनी भारतातील सामाजिक सुधारणांच्या चळवळीत एक ऐतिहासिक पाऊल उचलले.

**शिक्षणाच्या प्रसाराद्वारे सक्षमीकरण: -**शिक्षण ही सामाजिक परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे. याची जाणीव शाहू महाराजांना होती. त्यांच्या राजवटीमध्ये शिक्षणाच्या सुधारण्यासाठी चे केंद्र म्हणून कोल्हापूर ओळखले जाऊ लागले. विशेषतः मागासवर्गीय जातींना प्रोत्साहन देण्यासाठी शाहू महाराजांनी सक्तीचे व मोफत शिक्षण सुरू केले. जेणेकरून अशा समाजास मुख्य प्रवाहामध्ये सामील करता येईल. त्या काळामध्ये ही गोष्ट भारतासाठी क्रांतीकारक होती. शाहू महाराजांनी तत्कालीन समाजाची संरचना लक्षात घेऊन विविध जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न केले. ज्यामध्ये मुस्लिम, जैन, मराठा अशा विविध समाजातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकासाला चालना देण्यासाठी विद्यार्थी वस्तीगृहांची निर्मिती केली. त्याचप्रमाणे शिष्यवृत्तीच्या द्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता सुद्धा प्रदान केले ज्यातून त्यांना सामाजिक आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याकडे लक्ष ठेवले.

**अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव निर्मूलन:** भारतामधील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे जाती व्यवस्था आणि त्यातून निर्माण झालेली अस्पृशता व भेदभाव. या व्यवस्थेमुळे समाजाची विभागणी अशा पद्धतीने झाली ज्यामुळे समाजातील एकतेचा भंग होऊन विषमता निर्माण झाली. शाहू महाराजांच्या संदर्भातील वेदोक्त प्रकरण हे त्यांना समाज सुधारणा करण्यासाठी प्रवृत्त करणारी घटना होती. व समाजातील अमानवीय व्यवस्थेचे उच्चाटन करण्यासाठी शाहू महाराजांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. अस्पृश्यना शिक्षण शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण, आंतरजातीय विवाह याला प्रोत्साहन देऊन शाहू महाराजांनी अस्पृश्यतेचा प्रभाव कमी करून जातीय भेदभाव नष्ट करण्याचे प्रयत्न केले. त्याचप्रमाणे अस्पृश्यता निर्मूलन करण्यासाठी त्यांनी अनेक समाजसेवकांना सहकार्य देखील केले. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील माणगाव या ठिकाणी २१ व २२ मार्च १९२० मध्ये बहिष्कृत परिषदेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याशी सुरुवात केली व या सभेस राजश्री शाहू महाराज उपस्थित असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांनी या साठी सहकार्य केले. त्यामुळे अस्पृश्यता निर्मूलनाची सुरुवात कोल्हापूर संस्थानापासून झाले व यामध्ये शाहू महाराजांचे ही योगदान महत्त्वाचे आहे.

**समाज सुधारकांचे सहकार्य:** राजश्री शाहू महाराजांचे कार्य त्यावेळी अधिक प्रभावी ठरले जेव्हा त्यांनी जोतिराव फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या थोर समाज सुधारकांच्याशी सहकार्य केले. यातून त्यांनी वंचित व उपेक्षित घटकांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाची पावले उचलली. जातीय वर्चस्वाच्या विरोधात ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाने लढा दिला. व त्यांच्या या कार्याचे प्रखर समर्थन शाहू महाराजांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज यांच्या कार्यामुळे आधुनिक भारतीय समाजामध्ये समाज सुधारणा घडवून आली. शाहू महाराजांचे आरक्षण धोरण हे वंचित घटकांना शिक्षण आणि रोजगार या संधी उपलब्ध करून देणारे होते. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपला लढा तीव्र केला. ज्योतिराव फुले आणि शाहू महाराजांच्या समाजकार्यामुळे प्रभावित होऊन आपले कार्य चालू ठेवले व संविधान निर्माण करताना आरक्षण धोरणावर लक्ष दिले.

**शाहू महाराजांचा आधुनिक भारतातील वारसा:** छत्रपती शाहू महाराजांचा वारसा आजही आधुनिक भारतात अत्यंत प्रभावी आहे. त्यांच्या दूरदृष्टीने आखलेल्या धोरणांनी भारतातील सामाजिक न्यायाच्या मुलभूत संकल्पना आणि धोरणांना दिशा दिली. विशेषतः आरक्षण धोरणाचा पाया शाहू महाराजांनी १९०२ साली रचला, जेव्हा त्यांनी आपल्या राज्यात मागासवर्गीयांसाठी शैक्षणिक आणि शासकीय नोकऱ्यांत आरक्षण लागू केले. आज भारतात अस्तित्वात असलेल्या आरक्षण प्रणालीचे मूळ शाहू महाराजांच्या या क्रांतिकारी निर्णयातच आहे. शाहू महाराजांचा महाराष्ट्रातील समाज सुधारक आणि वंचित घटकांचे संरक्षक म्हणून विशेष आदर केला जातो. त्यांनी जातीय विषमतेविरुद्ध लढा देऊन समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोठे प्रयत्न केले. त्यांची नीतिमूल्ये आणि समाजवादाची तत्त्वे आधुनिक काळातील सामाजिक न्यायाच्या संकल्पनांमध्ये अंतर्भूत आहेत. त्यांच्या कामामुळे केवळ तत्कालीनच नव्हे, तर पुढील पिढ्यांतील नेत्यांनाही सामाजिक न्यायासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. आजही शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव समाजातील वंचित वर्गांच्या सक्षमीकरणासाठी चालविल्या जाणाऱ्या विविध योजना आणि उपक्रमांमध्ये दिसून येतो. त्यांच्या योगदानामुळे समाजातील दुर्बल वर्गांना शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी संधी मिळू लागली. छत्रपती शाहू महाराजांचा वारसा म्हणजे एक समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण समाज रचनेचा प्रेरणास्रोत आहे. त्यामुळेच ते आधुनिक भारताच्या सामाजिक न्याय आणि सुधारणा चळवळीतील आदर्श पुरुष म्हणून ओळखले जातात.

**निष्कर्ष:** छत्रपती शाहू महाराजांचे वंचित समुदायांच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान हे त्यांच्या दूरदृष्टी आणि सामाजिक न्यायाच्या प्रती असलेल्या दृढ निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी आपल्या राज्यात समाजातील दुर्बल आणि मागास वर्गांच्या सक्षमीकरणासाठी केलेले प्रयत्न आजही अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. शाहू महाराजांनी राबविलेले आरक्षण धोरण हे सामाजिक न्यायाच्या दिशेने उचललेले क्रांतिकारी पाऊल होते, ज्यामुळे शिक्षण आणि रोजगारात वंचित घटकांना संधी मिळू लागली. शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे समाजातील दुर्बल घटकांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या, ज्यामुळे ते आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम होऊ लागले. तसेच, अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेले प्रयत्न त्यांच्या समाजसुधारणेच्या दृष्टिकोनाचा भाग होते. त्यांनी जाती-धर्माच्या भेदभावाविरुद्ध उभे राहत, सर्व लोकांना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश दिला, ज्यामुळे समताधारित समाज घडवण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली. शाहू महाराजांचे कार्य आजच्या काळातही सामाजिक न्यायाच्या चळवळींसाठी एक प्रेरणास्थान आहे. त्यांच्या दूरदृष्टीने रचलेल्या धोरणांचा प्रभाव आजच्या आधुनिक भारताच्या विविध धोरणांवर दिसून येतो. त्यांच्या कार्यामुळेच सामाजिक सुधारणा चळवळींना पुढे जाण्याची दिशा मिळाली. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांचा वारसा भारतीय समाजात समानता आणि न्याय प्रस्थापित करण्याच्या दिशेने एक प्रेरणादायी मार्गदर्शक आहे.

**संदर्भ सूची:**

1. डॉ.जयसिंगराव पवार, (२०१२) 'राजश्री शाहू छत्रपती जीवन व कार्य' प्रथम आवृत्ती महाराष्ट्र, इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर.
2. P.. B. Salunkhe (1994) 'Rajarshi Shahu- The Pillar of Social Democracy' Kolhapur
3. राजश्री शाहू महाराजांची चरित्र एक विवेचक अभ्यास http://hdl.handle.net/10603/268938
4. **Dhananjay Keer (**1964), *Mahatma Jyotirao Phule: Father of Indian Social Revolution*, Popular Prakashan, Mumbai.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**53**

# अनुसूचित समाजाच्या उद्धारामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान

**कु. उषादेवी ईश्वरा चौधरी**
राज्यशास्त्र विभाग
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगली

---

**प्रस्तावना:**आपला भारतीय समाज शतकानू शतके जाती धर्म यातच अडकलेला आहे. या भारतीय समाजा ती सर्वात दुर्बल वंचित घटक म्हणजे अनुसूचित समाज. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य राजराजर्षी शाहू महाराजांनी केले. जातीयता निर्मुलन आणि रोटी बेटी व्यवहार हे प्रत्यक्षात आणून त्याची अंमलबजावणी करून राजसत्तेचा कशाप्रकारे वापर करता येईल याचे उदाहरण राजश्री शाहू महाराज यांनी सर्व समाजाला घालून दिले आहे. अनुसूचित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी प्रसंगी आपली राजगादी सुद्धा पणाला लावली होती. नेमके कोणत्या प्रकारचे योगदान त्यांनी दिलेले आहे आणि त्याचे महत्त्व कशा पद्धतीच आहे यावर आपण या शोधनिबंधात भाष्य केले आहे.

**महत्त्वाच्या संज्ञा-**या शोध निबंधात अनुसूचित समाज, दलित, वंचित घटक, जाती, कायदे, भारतीय समाजाचे पूर्वीचे स्वरुप, इत्यादी संज्ञा वापरण्यात आल्या आहेत.

**संशोधन पद्धती -**सदर शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर झाला आहे. प्राथमिक आणि दुय्यम साधने म्हणून चर्चा, निबंध, वर्तमानपत्रे, पुस्तके आणि इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे. लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांनी पूर्वापार पिडित वंचित घटक म्हणजे अनुसूचित समाजाला वर काढण्याचे कार्य, त्यांचा उद्धार करण्याचे कार्य केले आहे. राजर्षी शाहू महाराजांचा जन्म जुन १८७४ मध्ये झाला. कोल्हापूर संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांना चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी दत्तक घेतले. यानंतर 884 मध्ये त्यांचा राज्यारोहण समारंभ संपन्न झाला. त्यांचा एकूण कार्यकाल हा २८ वर्षे होता. या कार्यकालात त्यांनी समाजासाठी, आपल्या संस्थानातील लोकांसाठी काळाची गरज ओळखून अनेक सुधारणा आणि बहुजन समाजाला वर आणण्याचे कार्य केले. शाहू महाराज हे काळाच्या पुढे दृष्टी ठेवणारे होते. हे त्यांच्या अनेक सुधारणावादी दृष्टिकोनातून त्यांच्या अनेक कार्यातून दिसून येते. समाजातील सर्वात वंचित घटक म्हणजे अनुसूचित समाज किंवा दलित आणि स्त्रिया. या अनुसूचित म्हणजेच दलित समाजाला आणि स्त्रियांना प्रगतीसाठी त्यांच्या उद्धारासाठी अनेक महत्त्वाची कामे केली. या शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराज यांचे जीवन परिचय, अनुसूचित समाजाची पूर्वीची स्थिती, महाराजांनी केलेल्या सुधारणा, त्याचे महत्त्व विशद केले आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समाजात आपल्या राज सत्तेचा वापर करून सामाजिक य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच त्यांच्या या लोकोत्तर कार्यासाठी लोकांचा राजा म्हणजेच 'लोकराजा' असे संबोधले जाते.

**छत्रपती शाहू महाराज यांचा संक्षिप्त जीवन परीचय-** कोल्हापूर गादीचे वारसदार चौथे शिवाजी महाराज यांचे अहमदनगर येथे निधन झाले. त्यांना कोणतीही संतती नव्हती. ब्रिटिश सरकारने जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांची कोल्हापूर संस्थांचे राज्य प्रतिनिधी (रिजंट) म्हणून नेमणूक केली होती. कोल्हापूर संस्थानच्या चौथे शिवाजी महाराज यांच्या दत्तक मातोश्री सकवार राणीसाहेब यांनी श्रीमंत जयसिंगरावं उर्फ आबासाहेब घाडगे यांच्या थोरल्या चिरंजीव यशवंतराव उर्फ बाबासाहेब जयसिंगराव घाटगे यांना दत्तक घेण्यास संमती दिली. यशवंतराव यांचा जन्म २६ जून १८७४ कोल्हापूर येथील राजवाड्यात (सर्किट हाऊस) येथे झाला. यशवंतराव यांचे १७ मार्च १८८४ रोजी दत्तक विधान करण्यात आले. सन १८८९ ते २८९३ या काळात धारवाड येथे सर फ्रेझर यांच्या देखरेखिखाली त्यांचे शिक्षण झाले. २८९१ मध्ये बडोद्याचे खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. यानंतर २ एप्रिल २८९४ रोजी त्यांचा राज्य रोहन समारंभ संपन्न झाला. कोल्हापूर संस्थानचे महाराज म्हणून २८ वर्षे त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली. ६ मे २९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले.

**छत्रपती शाहू महाराजांच्या काळापूर्वी अनुसूचित समाजाची स्थिती-** ए. डब्ल्यू. ग्रीन. यांच्या जातीच्या व्याख्येनुसार, "जात ही सामाजिक स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे की जात व्यक्तीला तत्वतः सामाजिक दर्जा टाळता येणे अशक्य असते. व्यक्तीला जन्मामुळे प्राप्त होणारा दर्जा मरेतो कायम राहतो. जन्मानेच व्यक्तीला व्यवसाय निवासस्थान जीवनपद्धती विवाहातील जोडीदार निवडीचे क्षेत्र, मित्र, समूह वगैरे बाबी निश्चित केल्या जातात. शिवाय अशा व्यक्तीने तिच्या जातीपेक्षा कनिष्ठ जातीच्या लोकांशी शारीरिक किंवा इतर कोणतेही संबंध ठेवणे त्याज्य मानले जाते. जाती प्रथेला धर्माचे मान्यता असते."भारतीय समाज व्यवस्थेत

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण आणि याच्या अंतर्गत हजारो पोट जाती अशी सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था पूर्वापार चालत आली आहे. कर्मवादावर आधारीत या समाज व्यवस्थेत जन्म तत्वावर आधारीत अत्यंत बंदिस्त अशी स्तरीकरणाची व्यवस्था म्हणून भारतीय समाजव्यवस्था ओळखली जाते. ही व्यवस्था कर्मवादावरआधारित असल्याने मानव- मानवात उच्च- नीच, स्पृश्य- अस्पृश्य असे जातीभेद केले गेले. जातीभेदाच्या या उतरंडीवर सगळ्यात खाली शूद्र म्हणून समजला जाणारा आणि अस्पृश्य म्हणून हिणवला गेलेला अनुसूचित समाज म्हणजेच दलित समाज सर्वच दृष्टीने पिछाडीवर आणि अत्याचारग्रस्त राहिलेला आहे.

साधारणपणे वैदिक काळातील जातीव्यवस्था वर्णव्यवस्था लवचिक आणि बदलणारी होती. परंतु नंतरच्या उत्तर वैदिक काळात शुद्ध अशुद्धतेची भावना निर्माण झाली आणि जाती व्यवस्थेतील निर्बंध अतिशय कडक झाले. याच काळात आर्य आणि अनार्याचा संपर्क आला. या वांशिक वैशिष्ट्ये आणि भाषा संस्कृती याच्यामध्ये खूप फरक होता. सामान्यता या काळात आर्यांचा अनाऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन घृणेचा आणि तिरस्काराचा होता. आर्यांनी त्यांच्या समाज व्यवस्थेत आणणाऱ्यांना म्हणजेच शूद्रांना खाणे पिणे संपर्क ठेवणे यावर बंधने घातली आणि हा दुरावा कायम राहावा म्हणून स्मृतीकाल आणि धर्मकाळ यामध्ये त्यांना अस्पृश्य असे समजले जाऊ लागले. स्टॅन्ली राईस यांच्या मते अस्पृश्य हे मूळचे अनार्य द्रविड होते.आर्यांनी त्यांचा पराभव केल्यामुळे त्यांना हलकी, घ्रुणित, किळस वाटणारी कामे त्यांच्याकडे दिली गेली होती. या व्यवसाय भेदावरच त्यांना दूर ठेवू लागले आणि यावर आधारीतच जाती निर्माण झाल्या.

या सर्व वर्णभेदामुळे जातीभेदामुळे अनुसूचित समाजाला अनेक समस्यांना आणि अडचणींना तोंड द्यावे लागत होते. त्यांची राहण्याची व्यवस्था गावाबाहेर करण्यात आली होती. ते अस्पृश्य आहे हे ओळखण्यासाठी त्यांच्यावर अस्वच्छ कपडे अस्वच्छ जेवण अस्वच्छ जागा याचे बंधन घालण्यात आले होते. त्यांना नवीन वस्त्र, चांगली कपडे, ताजे जेवण, बांधीव घरे यांची मनाई होती. त्यांच्या स्पर्शाने किंवा संपर्काने पवित्र स्थळे देवालय वास्तू अपवित्र बनतील म्हणून या ठिकाणी त्यांना प्रवेशास मनाई होती. त्यांना शिक्षण घेण्याचा किंवा वेदोक्त धार्मिक विधीचाही अधिकार नव्हता. उच्च जातीने जे व्यवसाय नेमून दिलेले होते तेच व्यवसाय त्यांना करावी लागत. व्यवसाय निवडीचे त्यांना स्वातंत्र्य नव्हते. त्यांना शेती बाळगण्याचा ही अधिकार नव्हता. अनुसूचित समाजातील सर्वांचे व्यवसाय हे गलिच्छ, हलके समजणारे होते.

या समाजाला गावातील मुख्य वाट, पाणस्थळे, पूल,उद्याने, धर्मशाळा, शाळा, उपहारगृहे वापरण्यास मनाई होती. सततची दोन वेळच्या जेवणाची विवंचना, अर्धनग्नता आणि अपुरा निवारा यातच हा समाज पिचलेला, अडकलेला होता. यदाकदाचित या समाजातील कोणी नियम मोडला तर त्यांच्यावर अमानुष पद्धतीने अत्याचार होत असत. दंड मिळत असे.त्यांच्यावर लाभलेल्या अपात्रेतूनच शतकानुशतके कमीपणाची भावना या समाजात दृढ झाली होती. ज्याच्या हाती धर्मसत्ता राज्यसत्ता त्यांच्याकडे शरणागत भूमिका घेण्याकडे या समाजाचा कल होता. त्या काळात राजसत्तेवर धर्माचे वर्चस्व आणि धर्म ही उच्चवर्णीयांची मक्तेदारी बनलेली होती. उच्चवर्णी याप्रमाणेच अनुसूचित समाजालाही प्रगती, उन्नती आणि सुख सुविधा या गोष्टी तितक्याच आवश्यक गरजेच्या आहेत याची कुणालाच फिकीर नव्हती. इंग्रजांच्या काळात ही या समाजाला दारिद्रवस्थेत मागास आणि अडाणी ठेवण्यात आले.

छत्रपती शाहू महाराजांच्या पूर्वी या समाजामध्ये तसेच या समाजासाठी सार्वत्रिक जागृती आणि प्रभावी नेतृत्वाचा अभाव होता. छत्रपती शाहू महाराजांनी या अनुसूचित समाजाचे पुनरुत्थान करून त्यांच्यामध्ये माणूसकीची, समानतेची, बंधुत्वाची भावना रुजवली. छत्रपती शाहू महाराज यांच्या राजवटीपूर्वी अनुसूचित समाजाची म्हणजेच दलित समाजाची स्थिती अत्यंत दयनीय आणि पिछाडीची होती. त्यांना गावकुसाबाहेरील वस्ती किंवा लोक म्हणून ओळखले जात होते.

**छत्रपती शाहू महाराजांनी अनुसूचित जातीच्या उद्धारासाठी केलेले प्रयत्न-**छत्रपती शाहू महाराज हे शिकारीच्या आणि इतर निमित्ताने आपल्या संस्थानात खेडोपाडी फिरत होते, यावेळी उच्च समाज कशा पद्धतीने अनुसूचित समाजाला शुद्र समाजाला वागवत आहे याचा अनुभव त्यांना प्रत्येक ठिकाणी येत होता.अनुसूचित समाज जोपर्यंत आर्थिक सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या स्थिर होत नाही बलवान होत नाही तोपर्यंत जातीसंस्था पूर्णपणे नष्ट होणार नाही याची जाणीव छत्रपती शाहू महाराजांना होती. आणि म्हणूनच त्यांनी तळागाळातील या लोकांसाठी सर्व स्तरातून त्यांच्या प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. अनुसूचित समाजासाठी त्यांनी पुढील प्रकारे कार्य केले आहे.

शाहू महाराज स्वतः त्यांच्या झोपड्यात जाऊन जेवण करत असत. त्यांच्यासोबत वेळ घालवत असत. गंगाराम महाराला आर्थिक मदत करून फक्त हॉटेल काढण्यास सांगितले नाही तर स्वतः रोज आपल्या सोबत इतर लोकांना घेऊन त्या हॉटेलमध्ये चहा पिण्यास जात होते. जोपर्यंत अनुसूचित समाजाला शिक्षण मिळत नाही ज्ञान मिळत नाही तोपर्यंत त्यांची प्रगती होणे अशक्य आहे याची जाणीव शाहू महाराजांना होती. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिक मध्ये श्री उदाजी मराठा विद्यार्थी वस्तीगृहाच्या पायाभरणी

समारंभात ते म्हणाले की,"खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले आहे ते झुगारून देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे. असले शिक्षण मी माझ्या रयतेस देण्यास प्रारंभ केला आहे. त्याकरता सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून तो जारीने अमलात ठेवला आहे त्यामुळे पुढील पिढी तरी लवकरात लवकर लिहिणारी वाचणारी होईल अशी मला खात्री आहे."

जोतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची स्थापना बहुजन समाजाच्या उद्धरासाठी झालेली होती. परंतु फुले यांच्या निधनानंतर ही चळवळ थंड पडली होती. १९११ मध्ये कोल्हापुरात परशराम घोसरवाडकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची छत्रपती शाहू महाराजांनी पुनर्स्थापना केली. या चळवळीला आर्थिक मदत आणि सक्रिय पाठींबा दिला. १९०८ ते १९१९ पर्यंत कोल्हापुरात खास अनुसूचित समाजासाठी मिस क्लार्क वस्तीगृह, आर्य समाज, गुरुकुल वूड हाऊस वस्तीगृह, इंदुमती राणीसाहेब वसतिगृहे इत्यादी वसतिगृहांची स्थापना केली. १९११ मध्ये मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी माफी करण्याचा ठराव मान्य केला राजाराम हायस्कूल आणि राजाराम कॉलेजमधील अस्पृश्य विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश देण्यात आला तसेच या विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती मान्य केली. १९१९ मध्ये अस्पृश्य समाजाच्या वेगळ्या शाळा बंद करून सरकारी शाळातूनच मुले एकत्र बसण्याची पद्धत सुरू केली. अनुसूचित समाजाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने त्यांना स्वतंत्र व्यवसाय काढून देण्यास प्रोत्साहन दिले आणि आर्थिक मदत केली. अनुसूचित समाजाला खाजगी आणि सरकारी नोकरीत ५० टक्के आरक्षण जाहीर केले.

महार, मांग,चांभार,ढोर या जातीतील चार निवडक तरुण त्यांनी निवडले त्यांना विशेष शिक्षण देण्याची व्यवस्था केली तसेच या चौघांना वकिलीच्या सनदा दिल्या.हिंदू समाज रचनेत पोशाख व्यवसाय या प्रमाणे आडनावातही फरक करून ठेवला आहे. पूर्वी या लोकांना महार, चांभार, भंगी असे संबोधले जात होते. महाराजांनी ही पद्धत बंद करून त्यांना जाट, सरदार, पंडीत, सूर्यवंशी असे संबोधण्यात यावे असा हुकूम काढला.महार जातीला गावातील सर्वजण कामे सांगत असत ज्याला हरकाम्या असे म्हटले जात असे. त्यासाठी त्यांना काही जमीन वतन म्हणून दिली जात परंतु या बदलत त्यांच्याकडून कोणतीही कामे करून घेतली जात असे. १९१८ मध्ये महाराजांनी महार वतन खालसा करून त्यांना रयतवारीने जमिनी नावावर करून दिल्या.यासोबतच बैते म्हणजे बलुते देण्याची पद्धत रद्द करण्यात आली.१९१९ मध्ये कोल्हापूर इलाख्यातील महसूल,न्यायाधिकरण, आरोग्य अधिकारी ई.सर्व अधिकाऱ्यांनी अस्पृश्य नोकर, रोगी आणि इतर नोकरवर्गाशी मनुष्यतेने वागवावे, त्यांच्याशी समान वागावे असा कायदा केला. मध्ये सार्वजनिक इमारती धर्मशाळा, रेस्ट हाऊस, शासकीय अन्नछत्रे, सार्वजनिक विहिरी, पाणवठे येथे अस्पृश्यता विटाळ मानावयाचे नाही असा आदेश जारी केला. रामोशी बेरड महार मांग या जातीच्या लोकांची दररोजची हजेरी बंद केली 'वेठ-वरळा' प्रतिबंधतेचा आदेश काढला. तसेच या लोकांना समानतेची वागणूक द्यावी असा हुकूम काढला.आंतरजातीय आंतरधर्मीय विवाहाला प्रेरणा देण्यासाठी १९१८ मध्ये मिश्र विवाहाला पाठींबा देणारा कायदा केला.१९१९ मध्ये हिंदू आणि जैन यांच्यातील मिश्र विवाहांना कायदेशीर मान्यता देऊन आंतरजातीय तसेच आंतरधर्मीय विवाहास प्रोत्साहन दिले.माणगाव येथे १९२० मध्ये अनुसूचित समाजाची पहिली परिषद भरुन डॉ. आंबेडकरांच्या संग्रामाचे त्यांनी नेतृत्व करून कौतुक केले. हरप्रकारे डॉ. आंबेडकरांना त्यांनी सक्रिय पाठींबा देऊन मदत करण्याचा प्रयत्न केला. नाशिक येथील सभेत शाहू महाराज म्हणाले की,' सर्व जातीच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूरवर ठेवा. पाया पुरतेच पाहू नका. जातीभेद मोडणे इष्ट आहे. जरुर आहे. जातीभेद पाळणे पाप आहे. देशोन्नतीच्या कार्यातील हा एक मोठाच अडथळा आहे. तो दूर करण्याचे प्रयत्न नेटाने केले पाहिजेत."

**निष्कर्ष** -छत्रपती शाहू महाराजांनी अनुसूचित समाजाचे प्रश्न लक्षात घेऊन त्या प्रश्नाच्या मुळावरच घाव घालून अनुसूचित समाजाच्या उद्धारासाठी आपल्या राजसत्तेचा पुरेपूर उपयोग केला. अनुसूचित समाजामध्ये सर्वप्रथम माणूसकीची जाणीव निर्माण करून त्यांना इतर समाजाच्या बरोबरीस जगण्याचा प्रगती करण्याचा अधिकार दिला तसेच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. या त्यांच्या लोकोत्तर कार्याच्या योगदानामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेतृत्व पुढे उभे राहू शकले. आपल्या राज सत्तेचा वापर त्यांनी समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी केला म्हणूनच त्यांचा जन्मदिवस आपण 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून साजरा करतो.

**संदर्भ**

१) लोकराजा शाहू छत्रपती - डॉ. रमेश जाधव.
२) भारतीय राजकीय विचार भाग एक - प्रा. बी.बी. पाटील, प्रा. डॉ. सौ. उर्मिला चव्हाण.
३) भारतातील सामाजिक चळवळी - प्रा. डॉ.विजय मारुलकर, प्रा. डॉ.दयावती पाडळकर.
४) भारतीय सामाजिक समस्या - प्रा. ए. वाय. कोंडेकर.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

54

# संविधानापूर्व भारतातील शाहू महाराजांचे न्याय आणि समानतेचे विचार

**चौरे संदीप वसंत**
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र
श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:**भारतीय समाजातील न्याय आणि समानतेच्या विचारांची मुळे प्राचीन काळापासूनच अस्तित्वात आहेत, परंतु ब्रिटिश शासनाच्या काळात सामाजिक विषमतेने सर्वाधिक भीषण स्वरूप धारण केले होते. या काळात राजर्षी शाहू महाराज हे समाजसुधारणेचे एक अग्रणी नेतृत्व होते. त्यांचे कार्य संविधानाच्या निर्मितीपूर्वीच समाजातील दुर्बल घटकांसाठी न्याय आणि समानतेच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे होते. भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय इतिहासात अनेक समाजसुधारकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यापैकी राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अतुलनीय आहे. त्यांनी सामाजिक न्याय, समानता, आणि शिक्षणाच्या क्षेत्रात केलेले कार्य भारतीय समाजाच्या उदात्तीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांचे विचार आणि कार्य भारतीय संविधानाच्या निर्माणातही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे प्रभावी ठरले. हे संशोधन पत्र शाहू महाराजांच्या न्याय आणि समानतेसाठी केलेल्या योगदानाचा आढावा घेऊन, त्यांची समाज सुधारणा चळवळ कशी भारतीय संविधानाच्या मुल्यांशी जोडली गेली याचे सखोल विश्लेषण करतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांचा आढावा घेणे:शाहू महाराजांनी संविधानापूर्वी न्याय आणि समानतेच्या बाबतीत कोणते उपाययोजना केल्या, त्यांचा अभ्यास करणे.

२. सामाजिक सुधारणांमध्ये शाहू महाराजांचे योगदान ओळखणे: शाहू महाराजांच्या कार्यातून सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी केलेले योगदान अधोरेखित करणे.

३. शाहू महाराजांच्या विचारांचा भारतीय संविधानावर झालेला प्रभाव समजून घेणे:शाहू महाराजांचे न्याय, समानता, आणि आरक्षण यावरील विचार भारतीय संविधानाच्या निर्मितीत कसा प्रतिबिंबित झाला, हे स्पष्ट करणे.

४. शिक्षण आणि आरक्षण धोरणातील क्रांतीचा अभ्यास:शाहू महाराजांनी केलेल्या शिक्षण आणि आरक्षण धोरणांचा सामाजिक न्याय मिळवण्यासाठी झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास करणे.

५. संविधानापूर्वीच्या काळातील समाजसुधारकांच्या कार्याचा समकालीन भारतात असलेला वारसा समजावून घेणे: शाहू महाराजांचे कार्य आजच्या काळातील सामाजिक आणि राजकीय संरचनेवर कसा प्रभाव टाकते, हे समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी संशोधकाने तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धती वापरली असून, विविध संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, वर्तमापत्रात प्रकाशित लेख, संकेतस्थळ इ. आधार घेतला आहे.

**शाहू महाराजांचा परिचय:** शाहूजी महाराज, ज्यांना राजर्षी म्हणून ओळखले जाते, हे कोल्हापूर संस्थानचे शासक होते. त्यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांनी १८९४ साली कोल्हापूर संस्थानाचे राजेपद स्वीकारले आणि आपल्या राज्यकारभारातून सामाजिक न्याय व सुधारणा यांचा पाया घालण्याचे कार्य केले. शाहू महाराजांना बालपणापासूनच समाजातील शोषित, दलित, आणि वंचित वर्गाच्या समस्यांची जाणीव होती. या जाणीवेने प्रेरित होऊन त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. सामाजिक विषमता आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी अनेक धाडसी पावले उचलली, ज्यामुळे त्यांना समाजसुधारक राजे म्हणून ओळखले जाते.

**शाहू महाराजांचे न्याय आणि समानतेचे विचार:** शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि समानतेसाठी केलेले कार्य भारतीय संविधानाच्या आधीपासूनच समाजातील दुर्गम आणि दुर्बल घटकांसाठी न्याय साध्य करण्याचे होते. त्यांच्या कार्याचे काही महत्त्वपूर्ण पैलू खालीलप्रमाणे आहेत:

**१. जातीय समानता आणि सामाजिक न्याय:** भारतीय समाजात हजारो वर्षांपासून चालत आलेल्या जातीय विषमतेविरुद्ध शाहू महाराजांनी खंबीरपणे उभे राहिले. उच्चवर्णीयांद्वारे निचल्यांकडे पाहिले जाणारे अस्पृश्य लोक सामाजिक आणि धार्मिक जीवनातून बाहेर फेकले गेले होते. शाहू महाराजांनी या विषमतेला आळा घालण्यासाठी सर्वसमावेशक समाजाची संकल्पना मांडली. त्यांच्या

मतानुसार, कोणत्याही व्यक्तीची सामाजिक स्थिती ही त्याच्या जातीने नव्हे तर त्याच्या ज्ञानाने आणि कर्तृत्वाने ठरवली पाहिजे. यासाठी त्यांनी जातीभेद निर्मूलन आणि सर्वांसाठी समान न्याय व्यवस्था लागू करण्याच्या दिशेने प्रयत्न केले.

**२. शिक्षणातील क्रांती:** शिक्षण हा सामाजिक बदल आणि सुधारणा घडवून आणण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे, याची जाणीव शाहू महाराजांना होती. त्यांनी शिक्षणाला समाजातील सर्व घटकांसाठी खुलं केलं, विशेषतः दलित आणि वंचित वर्गासाठी. १९०२ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानात विनामूल्य आणि अनिवार्य प्राथमिक शिक्षण लागू केले, ज्यामुळे मुला-मुलींना शिक्षण मिळवणे शक्य झाले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील दुबळ्या वर्गाचा विकास होईल, असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी दलितांसाठी शाळा स्थापन केल्या आणि शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठीही विशेष व्यवस्था केली.

**३. आरक्षण धोरणाचा प्रारंभ:** आज भारतात लागू असलेल्या आरक्षण धोरणाची पायाभरणी शाहू महाराजांनी २० व्या शतकाच्या सुरुवातीला केली होती. १९०२ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानातील शासकीय सेवांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५०% आरक्षण जाहीर केले. हे आरक्षण दलित, शूद्र, आणि इतर मागासवर्गीय समाजाच्या प्रगतीसाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरले. आज भारतात लागू असलेली आरक्षण प्रणाली शाहू महाराजांच्या या आरंभानेच प्रेरित आहे.

**४. अस्पृश्यता निर्मूलन:** शाहू महाराजांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या राजवटीत दलितांना सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात समानता मिळावी यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. त्यांनी दलितांना मंदिर प्रवेशाचा अधिकार दिला, तसेच सार्वजनिक ठिकाणी त्यांना प्रवेश देण्यासाठी कायदे केले. शाहू महाराजांनी धार्मिक नेत्यांसमोर उघडपणे अस्पृश्यता प्रथेला विरोध दर्शविला आणि यामुळेच दलितांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांच्या कार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

**५. महिला सक्षमीकरण:** शाहू महाराजांचे कार्य केवळ दलितांच्या न्यायासाठीच मर्यादित नव्हते, तर त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणालाही प्राधान्य दिले. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले आणि महिलांना सामाजिक जीवनात समान स्थान मिळवून देण्यासाठी कायदे केले. १९१९ साली त्यांनी विधवा विवाह कायदा लागू केला, ज्यामुळे विधवांना पुन्हा विवाह करण्याचा हक्क मिळाला. शाहू महाराजांनी बालविवाह विरोधातही कठोर कायदे केले, ज्यामुळे स्त्रियांवरील अन्याय कमी करण्याचे कार्य केले.

**शाहू महाराजांचे विचार आणि भारतीय संविधान:** शाहू महाराजांनी सामाजिक न्याय, समानता, आणि शिक्षण यावर दिलेला भर भारतीय संविधानाच्या मुल्यांशी जवळून संबंधित आहे. त्यांच्या विचारांवरून प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात सामाजिक न्याय आणि आरक्षणाची तत्त्वे समाविष्ट केली. शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणाचा भारतीय संविधानातील कलम १५ आणि कलम १६ यावर थेट प्रभाव आहे, ज्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी विशेष तरतुदींची व्यवस्था केली गेली आहे. शाहू महाराजांनी ज्या प्रकारे संविधानापूर्वीच सामाजिक न्याय आणि समानतेची मुहूर्तमेढ रोवली, त्याचा प्रभाव संविधानाच्या प्रत्येक भागात दिसून येतो. त्यांचे विचार संविधानाच्या उद्देशिकेत उल्लेखिलेल्या स्वातंत्र्य, समानता, बंधुता या मुल्यांना पूरक ठरले आहेत.

**निष्कर्ष**: शाहू महाराजांचे कार्य भारतीय समाजात सामाजिक न्याय, समानता, आणि शिक्षणाच्या बाबतीत एक क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणणारे ठरले. संविधानाच्या निर्मितीपूर्वीच त्यांनी जे कार्य केले, ते भारतीय संविधानाच्या मूल्यांशी जोडले गेले आहे. त्यांच्या समाजसुधारणांच्या चळवळीमुळे दलित, मागासवर्गीय, आणि स्त्रियांसाठी एक नवा मार्ग मोकळा झाला. भारतीय संविधानात जे मूलभूत अधिकार आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांची प्रतिष्ठापना झाली आहे, ती शाहू महाराजांच्या कार्याच्या आणि विचारांच्या परिणामस्वरूप घडली आहे. त्यांच्या न्याय आणि समानतेच्या विचारांची पायाभरणी भारतीय संविधानाच्या रूपाने आजही कायम आहे, आणि त्यांचा वारसा आजच्या आधुनिक भारतातही जिवंत आहे. राजर्षी शाहू महाराजांचे जीवन आणि कार्य हे सामाजिक न्याय आणि समानतेसाठी प्रेरणा देणारे आहे, ज्यामुळे भारताच्या संविधानात आणि समाजात शोषित, वंचित, आणि दुर्बल घटकांना एक स्थायी प्रतिष्ठा मिळाली आहे.

संदर्भ:

१. "राजर्षी शाहू महाराज" - य. दि. फडके
२. "शाहू महाराज: एक समाजसुधारक" - डॉ. जयसिंगराव पवार
३. "शाहू महाराज आणि त्यांचे कार्य" - डॉ. सदाशिवराव गोरे
४. "Shahu Maharaj: A Great Social Reformer" - Ganesh P. D.
५. "Social Reform in India: The Role of Shahu Maharaj"- S. S. R. Patil

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

55

# छत्रपती शाहू महाराज आणि सामाजिक चळवळी

**डॉ.ज्योती रमेश कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड

---

**प्रस्तावना :**छत्रपती शाहू महाराज हे एक महान समाजसुधारक होते ज्यांनी आपल्या राज्यात अनेक प्रगतीशील उपाय सुरू केले. ते शिक्षण, कामगार कल्याण आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात अग्रणी होते. त्यांचा असा विश्वास होता की शिक्षण ही सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे आणि त्यांनी आपल्या राज्यात शिक्षणाला चालना देण्यासाठी अनेक उपाय केले. त्यांनी अनेक शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालये स्थापन केली आणि समाजातील सर्व स्तरांतील लोकांना शिक्षण उपलब्ध करून दिले.जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, यात त्यांनी सामजिक चळवळी उभारल्या आणि त्यांना प्रोत्साहन दिले. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे छत्रपती शाहू महाराज आधारस्तंभ होते.

**उद्दिष्टे :** १ .सामाजिक चळवळीची संकल्पना समजून घेणे

२.सामाजिक चळवळीच्या विस्तारासाठी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान अभ्यासणे

**विषय विवेचन :**प्रबोधन चळवळीच्या काळात धार्मिक वसामाजिक पुनर्रचनेवर सर्वाधिक भर दिला .माणूस हा समाजव्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानला.नवशिक्षित, बुद्धिमान व समाजोन्नतीची तळमळ असणाऱ्या सुधारकांनी हा लढा सुरू केला.स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा या मूल्यावर आधारित नवसमाजाची रचना करण्यासाठीप्रबोधनपर चळवळींनी व्यापक प्रयत्न केले.यातून सत्यशोधक चळवळ, ब्रह्मोणत्तर चळवळी उदयास आले. ज्यातून सामाजिक व्यवस्थामध्ये परिवर्तनाची मागणी पुढे आली.

**सामाजिक चळवळ :**सामाजिक चळवळ म्हणजे सामाजिक परिवर्तनाला चालना देण्याचा किंवा विरोध करण्याचा निरंतर सामूहिक प्रयत्न होय. तसेच यामध्ये सामुदायिक वर्तनाच्या परिवर्तनाची प्रक्रिया समाविष्ट असते. सामाजिक चळवळीमध्ये सामूहिक प्रयत्न सतत व दीर्घकाळ चालू असतो. तसेच त्यात योग्य असे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दिष्ट असते. ही एक निरंतर प्रक्रिया आहे.सामाजिक चळवळींचा सामाजिक परिवर्तनाशी अगदी निकटचा संबंध आहे. समाज हा कधीही स्थीर असत नाही. समाजात सतत परिवर्तन किंवा बदल होत असतात. सामाजिक चळवळी या समाजव्यवस्थेतील एखाद्या क्षेत्रात किंवा संपूर्ण समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणत असतात. म्हणजेच सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तनाला चालना देत असतात व सामाजिक परिवर्तनातून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी मदत होत असते. सामाजिक चळवळी या अगदी ऐतिहासिक काळापासून चालत आलेल्या आहेत. अर्थात सामाजिक चळवळी या त्या त्या काळातील समाजातील सामाजिक परिस्थितीनुसार निर्माण होत असतात.विशेषतः ब्रिटिश काळात अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या.

**छत्रपती शाहू महाराज आणि सामाजिक चळवळी :**२६ जून १८७४ - ६ मे, १९२२ या काळात कोल्हापुरातील जवळपास ९० टक्के लोकांना सर्व अभिशापांपासून मुक्त करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी ठोस आणि निर्णायक उपाय केले.यादरम्यान त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. गादीवर येण्यापूर्वी शाहू महाराजांनी कोल्हापूरचा दौरा करत राज्याची परिस्थिती समजून घेतली. यात त्यांना वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेचा प्रचंड पगडा जनतेवर दिसून आला. तसेच दारिद्र्यही त्यांना दिसून आले. यामागे अज्ञान हे कारण असल्याचे लक्षात आल्याने त्यांनी बहुजनांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले. त्यांनी प्रामुख्याने कोल्हापूर संस्थाणात सत्यशोधन चळवळ, ब्राह्मणोत्तर चळवळ, अस्पृश्यनिवारण चळवळ या चळवळीला मदत केली तसेच त्याल प्रोत्साहन दिले.

**सत्यशोधक चळवळ :**पुण्यात म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची सुरवात केली पण या चळवळीस प्रामुख्याने नंतरच्या काळात कोल्हापुरात आश्रय मिळाला, वेदोक्त प्रकरणातून राजर्षी शाहू छत्रपतींच्या जीवनाला कलाटणी मिळाली. १९०० ते १९०१ या दरम्यान वर्णवर्चस्वाच्या ब्राम्हणी अहंकाराचा जबरदस्त तडाखा शाहू छत्रपतींना वर्मी लागल्यावर २६ जुलै १९०२ रोजी त्यानी आपल्या संस्थानात मागासलेल्या जातीसाठी नोकरीमध्ये ५० टक्के जागा राखून ठेवल्याचा आदेश काढून प्रथमच समाजाच्या आर्थिक क्षेत्रात पूर्ण वर्चस्व असणा-या वर्गाविरुध्द जोरदार आवाज उठवला. आणि इथूनच छत्रपती शाहुंच्या बहुजन समाजाच्या

कार्यास सुरवात झाली. ख-या अर्थाने १९११ नंतरच कोल्हापूरात सत्यशोधक चळवळ अधिक जोरदारपणे सुरु झाली. प्रत्यक्ष कोल्हापूरात १९१३ मध्ये भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. शाहू छत्रपतींनी वेदोक्त प्रकरणानंतर सत्यशोधक चळवळीला अधिक प्रोत्साहन आणि पाठींबा देण्यास सुरवात केली. राजर्षी शाहू महाराजांनी जोतीरावांच्या तत्वांचा पुरस्कार केल्यामुळे महाराष्ट्रामध्ये सत्यशोधक समाजाचा हा हा म्हणता प्रसार होवून तो ब्राम्हणांची खुदद पाळेमुळे खणून काढण्या इतका खंबीर बनू लागला. सत्यशोधक मतांची पत्रे निघू लागली. सत्यशोधक समाजाच्या प्रगतीचा इतिहास जर पहिला तर सत्यशोधक समाजाची खरी प्रगती, वाढ किंवा जनतेत त्याचा प्रसार हा त्याला शाहू महाराजांचा आश्रय मिळाल्यानंतरच झाल्याचे दिसून येते.

**ब्राम्हणेत्तर चळवळ :**महाराष्ट्रात पूर्वापार स्थायिक झालेल्या जमातीचे आर्थिक व शैक्षणिक प्रगतीनुसार ब्राह्मण, प्रभू इत्यादी पुढारलेल्या ब्राम्हणेत्तर जाती मराठा, कुणबी, माळी, आगरी, भंडारी इ. ब्राम्हणेत्तर जाती आणि अस्पृश्य व इतर मागासलेल्या जमाती असे तीन विभाग पाडावे लागतात. पहिल्या महायुद्धानंतर इंग्रजांकडून काही प्रमाणात राजकीय हक्क मिळतील या आशेने हिंदू लोकांच्या निरनिराळ्या जातीत स्पर्धा सुरु झाली. महाराष्ट्रात मराठे बहुसंख्य असल्याने राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यासाठी मराठ्यांना प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे वगैरे पुढाऱ्यांनी 'मराठा राष्ट्रीय संघ' या संस्थेची स्थापना केली. मात्र ब्राम्हणेतर व अस्पृश्य समाजाला एकत्र आणण्याचे त्यांचे स्वप्न साकार झाले नाही. त्यामुळे ब्राम्हणेतराच्यां स्वतंत्र राजकीय पक्षाची उभारणी ही कल्पना पुढे आली. राष्ट्रीय चळवळीचा वाढता प्रभाव व पहिल्या महायुद्धामध्ये बदललेली परिस्थिती लक्षात घेवून दि. २० ऑगस्ट १९१७ रोजी भारतमंत्री माँटेग्यू यांनी ब्रिटीश सरकारचे हिंदुस्थान विषयक धोरण जाहीर केले. ब्रिटिश साम्राज्याचा अविभाज्य घटक असलेल्या प्रातिनिधिक स्वायत सरकार स्थापन करण्याचा हेतू माँटेग्यू यांनी स्पष्ट केल्यामुळे राजकीय हालचालींना सुरवात झाली. यानंतर सत्यशोधक चळवळीचे राजकीय चळवळीत रुपांतर होवून सत्यशोधक समाजाच्या सभासदांनी १९१८ साली 'ऑल इंडिया मराठा लीग' व 'डेक्कन रयत सभा' या संघटनांची स्थापना केली. या संघटनांनी मराठा व मागासवर्गीयासांठी राखीव जागा ठेवण्याची मागणी केली. सत्यशोधक चळवळी सारख्या मुलतः धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या चळवळीचे शाहू महाराजांच्या प्रेरणेने व पुढाकाराने ब्राम्हणेत्तर या मुख्यत: राजकीय चळवळीत रुपांतर झाल्यानंतर सर्व सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीत सामील झाले आणि १२ डिसेंबर १९२० रोजी पुणे येथील 'जेधे मॅन्शन' येथे ब्राम्हणेत्तर संघाची स्थापना करण्यात आली.

**अस्पृश्य निवारण चळवळ :**शाहूजींनी कोल्हापूर राज्यातून अस्पृश्यता दूर करण्याचा संकल्प केला होता. त्यासाठि १५ जानेवारी १९१९ रोजी अस्पृश्यता संपवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून त्यांनी आदेश काढला की जर कोणत्याही सरकारी संस्थेत लोकांना अस्पृश्य मानले गेले असेल तर अस्पृश्यता आणि असमानतेची वागणूक दिली गेली असेल आणि त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का लागला असेल तर. अधिकारी-कर्मचाऱ्यांना ६ आठवड्यांच्या आत राजीनामा द्यावा लागेल दलित वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी मोफत वसतिगृहे उघडली आणि त्यांच्यासाठी शिष्यवृत्तीची व्यवस्था केली. ३०सप्टेंबर १९१९ रोजी शाहूजींनी केवळ दलित समाजातील मुलांसाठी उघडलेली स्वतंत्र शाळा बंद करण्याचा आदेश जारी केला आणि सर्व शाळा सर्व प्रवर्गातील मुलाच्या प्रवेशासाठी उघडण्यात आल्या. त्यांच्या आदेशानुसार ते म्हणाले की सर्व जाती व सर्व धर्माची मुले एकत्रितपणे एकाच प्रकारच्या शाळेत अभ्यास करतील. दलितांच्या सबलीकरणाच्या दिशेने एक पाऊल म्हणून त्यांनी त्यांना गावचे अधिकारी म्हणून नेमले.

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

**सारांश :**कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण इ. सुधारणांचे पुरस्कर्ते शाहू महाराज होते. त्यांनी दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले. त्यांनी कोल्हापूर संस्थानाता सामाजिक चळवळी उभारल्या व त्या चळवळीतून कृती कार्यक्रम राबवले. ज्यामध्ये प्रजेचे हित सामावलेले होते. शोषित

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

घटकांसाठी समता व सामाजिक न्यायावर आधारित मूलगामी समाज परिवर्तनाचा घडवण्यासाठी सामाजिक समतेची चळवळ उभी केली.

**संदर्भसूची:**

१. नाईक तु.बा. , "छत्रपती राजर्षी शाहू महाराज", मेहता पब्लिकेशन , कोल्हापूर , २०१२
२. कोलते वि.भ., "शाहू महाराज: एक थोर राष्ट्रपुरुष", सनय प्रकाशन, नारायणगाव.
३. जाधवनरेंद्र , "महाराष्ट्रातील मानचिन्हे", मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे. १९८०
४. फडके यशवंत, , "राजर्षी शाहू छत्रपतींचे लोकाभिमुख प्रशासन )लेख(", पवार ' जयसिंगराव )संपा(, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी ,कोल्हापूर.२००१
५. साळुंखे पी.बी., "राजर्षी शाहू, भाषण तिसरे", शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,१९७३

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

56

# शाहू महाराजांचे स्त्रियांच्या हक्काबाबत विचार

**डॉ. दीपक रा. पाटील**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोवाड

---

प्राचीन काळातील भारतीय समाजाचा आढावा घेतल्यास भारतीय समाजात महिलांचा दर्जा हा पुरुषांच्या पेक्षा अतिशय कनिष्ठ होत गेला. त्यानंतर १९ व्या शतकामध्ये समतावादी विचारसरणीचा व मूल्यांच्या प्रभावमुळे स्त्रियांना अनेक अधिकार व हक्क हळूहळू मिळत गेले. उदा. राजा राममोहन रॉय यानी १८२९ मध्ये ब्रह्मो समाजाच्या माध्यमातून 'सतीप्रथा' बंद केली. आर्य समाजाने बालविवाह प्रथा, पडदा प्रथा बंद करण्यामध्ये मोठे कार्य केले. भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना कायद्याने दुय्यम दर्जा दिला जात असे. पण स्त्री हीच नवनिर्मिती करु शकते. निसर्गाने तिला अशी शक्ती बहाल केली आहे. स्त्री शिवाय पुरुष आणि पुरुषाशिवाय स्त्री हे दोघेही अपूर्ण आहेत. दोन्हीही समाजाचे महत्वाचे आधारस्तंभ आहेत. विचारवंतांच्या मते जर एखाद्या देशाची प्रगती मोजायची असेल तर त्या देशातील महिलांची स्थिती व दर्जा कसा आहे त्यांना कोणकोणते अधिकार आहेत. यावरुन मोजण्यात यावे. यावरुन कोणत्याही देशात स्त्रियांच्या विकासाला किती महत्वपूर्ण स्थान आहे. हे दिसून येते. हजारो वर्षापासून विशेषतः महिला व दलित वर्ग यांचे विविध हक्क, विकासाच्या संधी, नाकारुन त्यांचे जीवन काही धर्म मार्तंडानी बंदिस्त करुन टाकले होते. आर्थिक संसाधने त्यांना उपलब्ध होवू दिली नाहीत. तशी व्यवस्था जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आली होती. शिक्षणाच्या संधी नाकारल्या होत्या. 'चूल आणि मूल' याच बाबतीत त्यांना बंदिस्त करुन टाकले होते. परिणामी महिलांचा विकास झाला नाही. पण स्त्रियांना मानवतावादी सुधारणावादी विचारातून पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देण्यामध्ये कोल्हापूरच्या संस्थानांचे राजे छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान मोठे आहे.

**विधवा पुनर्विवाह कायदा :-** भारतामध्ये पती हाच परमेश्वर, मानण्याची पध्दत आहे. त्यामुळे पतीच्या निधनानंतर पत्नीचे अस्तित्व अमान्य केले जाते. त्यातूनच सतीची चाल रुढ झाली होती पण राजा राममोहन रॉय आणि समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे १८२९ साली सतीची चाल बंद करण्याचा कायदा ब्रिटीशांनी केला. पती निधनानंतर स्त्री जगू लागली. पण तिच्या वाट्याला पशूहीन वाईट दिवस आले. स्त्रियांना पती निधनानंतर मुंडन करावे लागते. त्यामुळे केशवपनाची वाईट प्रथा समाजात सुरु झाली. एखाद्या विधवेने पुनर्विवाहाचे धाडस केले तर तिला होणारे अपत्य अनौरस समजले जाई. त्यामुळे सामाजिक आणि धार्मिक बंधनामुळे इच्छा असूनही विधवा विवाह करण्याचे धाडस स्त्री आणि पुरुषांकडून होत नसे. हिंदू धर्मातील या अन्यायकारक प्रथेस छेद देण्यासाठी शाहू महाराजानी २७ जुलै १९१७ रोजी विधवा पुनर्विवाह करता येईल असा कायदा संमत केला. हिंदूच्या अनेक जातीत विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत इतर विवाहांप्रमाणे योग्य विधी न करण्याची पध्दती असल्यामुळे ज्या अनेक अडचणी निर्माण होत होत्या त्या या कायद्याने दूर करण्यात आल्या. तसेच या कायद्याने विवाहाची कायदेशिर नोंद करण्याची पध्दती सुरु केली गेली. त्यामुळे विवाहाचा पुरावा निर्माण होवून अन्यायाविरुध्द प्रतिकार करण्याचे बळ स्त्रीवर्गाला मिळाले. समाजाच्या स्वास्थासाठी विधवा विवाहास कायदेशीर मान्यता असणे आवश्यक बाब आहे असे शाहू महाराजांचे मत होते.

१९१९ साली कानपूरच्या १३ व्या कुरमी क्षेत्रिय परिषदेमध्ये या विषयावर बोलताना शाहू महाराज म्हणाले, 'कुरमी क्षेत्रियामध्ये विधवा विवाहाची प्रथा आहे. याचा मला मोठा आनंद आहे. आपली क्षेत्रिय जात भृणहत्त्या, व्यभिचार यापासून दूर असावी. आमच्या सरकारने विधवांच्या विवाहाचा कायदा पास केला आहे. जातीत आपदधर्म नाही त्या जातीत भृणहत्त्या, व्यभिचार अशी पापे घडतात. त्यामुळे हजारो मुले प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे.

**पडदा पध्दतीला विरोध :-** १९१९ च्या कुरमी परिषदेत बोलताना शाहू महाराजांनी पडदा पध्दतीचा जाहीर निषेध केला. त्या संदर्भात ते म्हणाले होते. "भारतवासीय लोक प्रगतीची तीन मुख्ये साधने समजतात. पहिले साधन पडदा दुसरे विधवा विवाहाला विरोध आणि तिसरे कोणालाही मिळून भोजन न करणे' पडदा पध्दतीचा विरोध व्यक्त करताना महाराज सांगतात, राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, महाराणी अहिल्याबाई, महाराणी कमलाबाई यानी राज्यांचा गाडाही हाकलेला आहे. आणि रणांगणावर जाऊन शत्रूबरोबर लढाई केली आहे. हे काम पडद्यात राहून करणे अशक्य आहे. पडद्यामुळे स्त्रियामधील शूरतावादी गुणांचा सर्वथा नाश होतो".

**आंतरजातीय विवाह कायदा :-** शाहू महाराजानी १२ जुलै १९१९ रोजी 'कोल्हापूर इलाख्यातील विवाहासंबंधी कायदा' या नावाने कायदा पारीत केला. त्यानुसार कोल्हापूर संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना जातीनिर्बंध न पाळता सदरहू

दोघांपैकी आपआपल्या कोणत्याही धर्माच्या व्यक्तींशी विवाह करण्याचे स्वातंत्र्य असेल. या कायद्यातील एक कलमातील तरतुदीनुसार विवाह वेळी पुरुषाचे वय १८ वर्षे व स्त्रीचे वय १४ वर्षे असावे. अशी अट असली घातली होती. तसेच १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची अथवा पालकांची संमती आवश्यक असणार नाही. या तरतुदीमुळे स्त्रीला आपला जोडीदार पसंतीने मिळविण्याचे स्वात्रंत्र्य मिळाले होते. आंतरजातीय किंवा आंतरधर्मिय विवाहाची नोंदणी सक्षम अधिकाऱ्यासमोर झाली पाहिजे. विवाह नोंदणीच्यावेळी नोंदणी अधिकारी व तीन साक्षीदार यांच्या समक्ष विवाह लावण्यात आला पाहिजे. विवाहानंतर अशा विवाहांना कायदेशिर संरक्षण दिले जाईल. आणि अशा विवाह नोंदणीसाठी छत्रपती शाहूनी 'विवाह नोंदणी अधिकारी' नियुक्त केला होता.

**स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंदी :-** २ ऑगस्ट १९१९ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये 'स्त्रिया क्रूरपणे वागविण्याचे नाहीसे करावे' आणि कोल्हापूरचे काडी मोडण्याचे (घटस्फोट) नियम' हे स्त्रियांना संरक्षण देणारे आणखी दोन कायदे शाहू महाराजांनी जारी केले. कारण स्त्रियावर छळ करणाऱ्यास शिक्षा देण्याबाबत इंडियन पिनल कोड मधील तरतुदी अपुऱ्या होत्या.

शाहू महाराज जनतेचे राजे असल्याने गोर गरीब कुटुंबात आणि एकंदरीत समाजामध्ये घरोघरी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची प्रखरता किती प्रचंड आहे. याची जाण त्यांना होती. पुरुषप्रधान कुटुंबात स्त्रियांना पुरुषांच्या आज्ञेत असावे लागते. पुरुषांना अनुकूल अशा केलेल्या सांस्कृतिक वर्चस्वामुळे स्त्रियांवर कुटुंबात अन्याय, अत्याचार, केले जातात. शाहू महाराजानी स्त्रियांच्या क्रूरतेस प्रतिबंध करणाऱ्या कायद्यामध्ये शारीरिक हिंसेबरोबर मानसिक हिंसेचा विचार केला. क्रूरपणाची हिंसा प्रतिबंध कायदा करताना शारीरिक, मानसिक त्रास कोणत्या स्वरुपाचे आहेत हे स्पष्ट करण्यात आले आहेत. उदा. स्त्रियांना अन्नपाण्यावाचून ठेवणे, मारहाण करणे, पत्नी असताना दुसऱ्या स्त्रीस घरी घेऊन येणे, स्त्रीच्या पतीव्रताबाबत संशय घेऊन त्रास करणे, चारचौघात अपमान करणे, सुनेस उपमर्द भाषा वापरणे, कुटुंबात भिती उत्पन्न करणे, स्त्रीचा सहवास टाळणे, इत्यादी अपराध करणाऱ्या व्यक्तीस कायद्याने ६ महिन्याचा कारावास व २०० रुपये दंडापर्यंत शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आली.

स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायविरोधात भारतीय संसदेने 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५' केला. आणि भारतातील स्त्रियांना कौटुंबिक हिंसाचारांतून मुक्तता करण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजानी १९१९ साली कायदा पारीत केला होता. यावरुन शाहू महाराजांच्या दूरदृष्टीची प्रचिती येते.

**घटस्फोटाचा कायदा :-** तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये विशेषतः हिंदू जातीमध्ये घटस्फोट (काडीमोड) घेण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे विवाह संस्थाच धोक्यात येऊन समाजव्यवस्थाच नष्ट होण्याची भिती असल्याने घटस्फोटावर निर्बंध आणणे गरजेचे आहे. तसेच हिंदू समाजव्यवस्थेमध्ये जात पंचायतीच्या लहरीपणावर घटस्फोट घडवून आणला जातो. त्यासाठी प्रतिबंध करणे हा या कायद्याचा उद्देश होता. हा कायदा तयार करताना शाहू महाराजांनी भारतातील नामवंत व्यक्तीचा सल्ला घेतला होता. डब्ल्यु. एस. वेल्डन यांच्याकडून कायदा करुन घेताना मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधिश न्या. सो. ओ. बिमन आणि मद्रास उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधिश न्या फैज तय्यबजी यांची मदत घेतली आणि संपूर्ण भारतात घटस्फोटाबाबत पहिला कायदा ११ जुलै १९१९ रोजी केला. घटस्फोटानंतर पत्नीला पोटगी देणे आणि अपत्याची जबाबदारी कोणाला द्यावयाची (आई-वडील) याबाबत नियम करण्यात आले. आणि कोणत्या कारणासाठी पती-पत्नीला घटस्फोट घेता येईल याबाबत स्पष्ट करण्यात आले.

**वारशाचा कायदा :-** हिंदू वारशाचा कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा' या नावाचा एक महत्वपूर्ण कायदा १७ जानेवारी १९२० रोजी करण्यात आली. या कायद्यानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांच्या अनौरस संतती यांना मिळणाऱ्या वारसा हक्कातील फरक काढून टाकला. सर्व वर्गाच्या अनौरस संततींना जन्मदात्या बापाच्या मिळकतीत वारसा हक्क दिला गेला. त्यामुळे पतित स्त्रियांच्या उध्दाराच्या दृष्टीने हा कायदा उपयुक्त झाला. कारण अनौरस संतती वाढविण्याची जबाबदारी स्त्रियांवर येत असे. आणि पुरुष मात्र मोकळा राहत असे. या कायद्यामुळे पुरुषांनाही जबाबदार धरल्यामुळे स्त्रियांना न्याय मिळाला.

**देवदासी प्रतिबंध कायदा :-** भारतीय समाजामध्ये अस्पृश्यतेप्रमाणेच जोगतिण किंवा देवदासी प्रथा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. कनिष्ठ वर्गात विशेष करुन गरीब कुटुंबात देवाच्या नावावर मुली सोडण्यात येत. या प्रथेमधूनच समाजात जोगतीण, मुरळी, देवदासी, इत्यादी प्रकारच्या पतित स्त्रियांचा वर्ग अस्तित्वात आलेला होता. या वर्गाचे अस्तित्व म्हणजे समाजावरील कलंकच होता.

देवाच्या नावावर सोडण्यात आलेल्या या मुलीवर, महिलांवर अन्याय, अत्याचार होत असत. जेंव्हा या मुली देवाच्या नावाने सोडल्या जात तेंव्हा त्या सर्वार्थाने देवाच्या बनत. जनक घराशी त्यांचा कांहीही संबंध राहात नसे. देवाच्या नावाखाली सुरु असलेली ही घातक प्रथा बंद झाली पाहिजे. असा छत्रपती शाहू महाराजानी विचार केला. या महिलांना न्याय देण्याचे ठरविले.

यासाठी १७ जानेवारी १९२० रोजी जोगतिण देवदासी प्रतिबंध कायदा केला. या कायद्यात महाराजानी असे म्हटले आहे की, ‘देवाच्या नावावर ज्या मुलींना देवाला वाहिलेले असते त्या सार्वजनिक अनैतिकतेच्या बळी ठरतात. अशा दुर्दैवी मुलींच्या समाजातील स्थानावर भाष्य करण्याची गरज नाही. तेंव्हा या प्रथेला मान्यता देणे हा हिंदू समाज व्यवस्थेवरील एक कलंक आहे. या मुलींना जुजबी सवलती देणे म्हणजे ही अनैतिक प्रथा चालू ठेवण्यासाठी नुकसान भरपाईचा देखावा करणे होय. तेंव्हा कोणत्याही सुसंस्कृत राज्याकडून अशा प्रकारच्या देवदासी स्त्रियांच्या स्थानाला जोडण्यात आलेल्या विशिष्ट हक्कांना मान्यता मिळणार नाही.महाराजानी उपरोध कायद्याने देवाना सोडलेल्या या स्त्रियांना मिळणाऱ्या समाजातील कायदेशीर दर्जाच अमान्य करण्यात येऊन देवदासी प्रथेचा पायाच उखडून टाकण्याचा महाराजानी प्रयत्न केला. शाहू महाराजांनी अनेक कायदे करुन स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या हक्कांचे रक्षण करुन पुरोगामी आणि लोककल्याणी राज्य कारभार केला.

संदर्भ ग्रंथ :-

1. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – डॉ. जयसिंगर पवार
2. लोकराजा शाहू छत्रपती – रमेश जाधव
3. छत्रपती शाहू महाराज आणि – स्त्री उन्नती -भारती पाटील
4. राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य – डॉ. जयसिंगराव पवार
5. शाहूंच्या आठवणी – प्रा. नानासाहेब साळुंखे
6. राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे – संपादक भगवानराव जाधव
7. शाहू छत्रपती आणि लोकमान्य – य. दि. फडके
8. वादळ आणि राजर्षी शाहू – कृ. गो. सुर्यवंशी

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

57

# राजर्षी शाहूंच्या अक्षर नि अक्षय धनाचे समृद्ध दालन : कोल्हापूरातील राजर्षी शाहू अध्यासन केंद्र

**डॉ. नीता पांडुरंग पाटील**
ग्रंथपाल, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

---

**सारांश:**लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कर्तृत्वाची समर्थ कारकीर्द म्हणजे तेजाची गाथा होती. राजर्षींचे संपूर्ण जीवन व कार्य चैतन्याचा एक अथांग महासागर होता. मानवी जीवनाचे असे एकही अंग, क्षेत्र दिसत नाही की जेथे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्य-कर्तृत्वाचा ठसा उमटला नाही. राजर्षी शाहू महाराजांनी सर्वच क्षेत्रात केलेल्या अलौकिक कार्याबद्दल आणि मांडलेल्या क्रांतिकारक पुरोगामी विचारांबद्दल अनेक इतिहासकारांनी, लेखकांनी, साहित्यिकांनी, कवींनी, शाहीरांनी शेकडोंनी ग्रंथ,पुस्तके लिहिली आहेत. राजर्षी शाहूंचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व दर्शविणाऱ्या ग्रंथांचे, पुस्तकांचे, अक्षर नि अक्षय धनाचे एक समृद्ध आणि दिमाखदार दालन कोल्हापुरातील राजोपाध्येनगर परिसरात 'राजर्षी शाहू अध्यासन' या नावाने उभारले आहे. राजर्षी शाहू अध्यासनामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन कार्यवर आधारित मराठी भाषेतील 210 हून अधिक ग्रंथ ,पुस्तके, विशेषांक आहेत. अध्यासनामार्फत राजर्षी शाहू च्या शतकोत्तर जयंती निमित्त वर्षभर विविध कार्यक्रम सुरू आहेत. अनेक विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक यांनी या अध्यासन केंद्रास भेटी दिलेल्या आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. कोल्हापुरातील राजर्षी शाहू आध्यासनाची माहिती करून घेणे.
2. या अध्यासनातील ग्रंथ संग्रहाची माहिती घेणे.
3. या आध्यासनाला भेट दिल्या मान्यवरांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे.

कोल्हापुरातील कै. सौ. हौसाबाई पवार चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे माजी प्राचार्य डॉ. जे. के. पवार व पवार परिवारातर्फे राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षाचे (सन २०२२) औचित्य साधत राजर्षी शाहूंच्या विचार आणि कार्याचा जागर अखंडित होत रहावा, यासाठी राजर्षी शाहू अध्यासन केंद्राची निर्मिती केली आहे.

सन १८८५ ते २०२३ या १३८ वर्षांमध्ये विविध मान्यवर, संशोधक,लेखक व शाहू प्रेमींनी आपल्या अभ्यासू लेखणीतून राजर्षी शाहू महाराजांच्या विचार कार्याचे जे पैलू ग्रंथ,पुस्तकातून मांडले आहेत; ते नव्या पिढीला, अभ्यासकांना एकाच ठिकाणी ओळख व माहिती रूपाने मिळावेत, यासाठी राजर्षी शाहू अध्यासन साकारले आहे. कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंत जयसिंगराव घाटगे हा मुलगा वयाच्या दहाव्या वर्षी म्हणजे १८८४ साली करवीर संस्थानच्या छत्रपती घराण्यात दत्तक आला. आणि पुढे ते छत्रपती शाहू महाराज झाले. छत्रपती शाहूंच्या दत्तक विधानाची सविस्तर पुस्तक स्वरूपात माहिती देणारे ‘श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तक विधानाची हकीकत १८८५' हे पुस्तक २५ फेब्रुवारी १८८५ रोजी प्रकाशित झाले. कोल्हापुरातील सेंट्रल मराठी स्कूलचे हेडमास्तर आणि इतिहासाची जाण असणारे अभ्यासक सदाशिव महादेव देशपांडे यांनी ऐतिहासिक दत्तक विधान सोहळ्याची नोंद पुस्तक रूपाने १३८ वर्षांपूर्वीच करून ठेवली होती. राजर्षी शाहूंच्या जीवनाशी संबंधित हे पहिलेच पुस्तक असावे. त्यानंतर १८९६ मध्ये 'श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांचा 'राज्याधिकारस्वीकारोत्सव' या नावाचे दुसरे पुस्तक प्रकाशित झाले. पट्टणकोडोली येथील हेडमास्तर बाळाजी महादेव करवडे यांनी हे पुस्तक लिहिले व प्रसिद्ध केले होते.

राजर्षी शाहू अध्यासनामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन कार्यवर आधारित २०६ हून अधिक ग्रंथ, पुस्तके, विशेषांक आहेत. त्यामध्ये राजर्षी शाहूंचे जीवन-चरित्र, स्मारकग्रंथ, गौरव ग्रंथ, राजर्षी शाहूंच्या भाषणांचे संग्रह, त्यांच्या आठवणी, त्यांची पत्रे, राजर्षी शाहूंचे जाहीरनामे, आदेश, हुकूमनामे, त्याचबरोबर राजर्षी शाहूंच्या जीवन कार्यावरील कादंबरी, नाटक, कथासंग्रह, काव्यसंग्रह, पोवाडे, असे जे-जे पुस्तक,ग्रंथ रूपाने प्रकाशित झालेले आहे, अशा सर्व साहित्यकृतींचा या अध्यासनामध्ये समावेश आहे. राजर्षी शाहूंच्या सान्निध्यातील काही लेखक,समकालीन लेखक,शाहू उत्तरकाळातील संशोधक, लेखक आणि विद्यमान काळातील लेखकांनी राजर्षी शाहूंच्या जीवन-कार्यावर, कार्यातील विविध पैलूंवर पुस्तकरूपाने जो प्रकाशझोत टाकला आहे; असे मराठी भाषेतील २१० ग्रंथ अध्यासनामध्ये उपलब्ध आहेत.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

डॉ. जे. के. पवार हे अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत. न्यू कॉलेज कोल्हापूर येथे त्यांनी ३२ वर्षे अध्यापनाचे कार्य केले आहे. तर २ वर्षे कोतोली ता.पन्हाळा येथील श्रीपतराव चौगुले आर्ट्स अँड सायन्स कॉलेजमध्ये त्यांनी प्राचार्य म्हणून प्रशासकीय जबाबदारी सांभाळली आहे. अध्यापन, अध्ययन, लेखन, वाचन, संशोधन, प्रकाशन आदी क्षेत्रात कार्यरत असनारे डॉ. पवार सामाजिक क्षेत्रातही आघाडीवर असतात. त्यांची एकूण ३० पुस्तके प्रकाशित झाली असून त्यापैकी ६ पुस्तके लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित आहेत. राजर्षी शाहूंवरील निस्सीम आदरापोटी, प्रेमापोटी त्यांनी हे अध्यासन सुरू केले आहे. आपल्या पेन्शन मधील दहा टक्के हिस्सा राजर्षी शाहू संबंधित कार्यावर ते खर्च करीत आहेत. राजर्षी शाहू अध्यासनासाठी डॉ.पवारांच्या दोन्ही भगिणींनी मिळून रोख एक लाख रुपये देणगी दिलेली आहे.

**प्रतिक्रिया :**

**प्राचार्य डॉ. जे. के. पवार**

१) राजर्षी शाहू अध्यासन केंद्राचा लाभ प्राध्यापक,संशोधक,विद्यार्थी आणि शाहूप्रेमींनी घ्यावा. राजर्षी शाहू संबंधित ग्रंथातील काही उतारे संशोधक, अभ्यासक व विद्यार्थ्यांना विनामूल्य झेरॉक्स प्रतित दिले जातात. २०२४-२५ हे वर्षे राजर्षी शाहू महाराजांचे शतकोत्तर सुवर्णजयंती वर्ष आहे. या निमित्ताने अध्यासनातर्फे वर्षभर राजर्षी शाहूंच्या विचार कार्याचा जागर करणारे विविध स्वरूपाचे ११ कार्यक्रम राबविले जाणार आहेत. या उपक्रमामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे. राजर्षी शाहू अध्यासन केंद्र शाहू प्रेमींसाठी मोफत उपलब्ध आहे त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा.

**डॉ. बी. एम. हिर्डेकर**

२) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांवरील पुस्तकांचे डॉ. जे. के. पवार यांचे अध्यासन केंद्र हे मुक्त अध्यासन व्हावे, डॉ.जे.के पवार यांनी साकारलेल्या अध्यासन केंद्रामधून ते शाहूप्रेमी, संशोधक, अभ्यासू प्राध्यापक, ग्रंथप्रेमी आणि शिक्षणप्रेमी दिसतात.अध्यासन केंद्रात प्रत्येक पुस्तकाचे मुखपृष्ठ दिसेल अशी सुंदर मांडणी केलेली आहे.

संजय सिंह चव्हाण, उदयसिंह बाळासाहेब पाटील कौलवकर, ऐश्वर्या नाईक, वृषाली पाटील, गजानन देशमुख, रमेश चव्हाण, डॉ. विजय चोरमारे, प्रकाश बाळू नाईक, देवीदास लांजेकर, विश्वास बागल यांच्यासह अनेकांनी या अध्यासन केंद्रास भेट दिल्यानंतर प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. विद्यार्थी, अभ्यासक, प्राध्यापक, संशोधक यांनी या अध्यासनास भेट देऊन छत्रपती शाहू महाराज यांचे जीवन व कार्य समजून घ्यावे. त्यांच्यावरील ग्रंथसंपदा पहावी असे आवाहन प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांनी केले आहे.

शासनाच्या वतीने तसेच आमदार ,खासदार निधीतूनही या अध्यासनास भरीव आर्थिक निधी देऊन या अध्यासनास आर्थिक पाठबळ उपलब्ध करून द्यावे असे सदर अभ्यासकाचे मत आहे.

**संदर्भसूची :**

1. प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांची मुलाखत.
2. राजर्षी शाहू अध्यासन केंद्रास भेट.
3. राजर्षी शाहू अध्यासन केंद्रास भेट दिल्या मान्यवरांचे अभिप्राय व प्रतिक्रिया इत्यादीचे अवलोकन केले.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

58

# छत्रपती शाहूजी महाराज और साटमारी खेल

**डॉ. प्रशांत बिभीषण पाटील,**
संचालक, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**परिचय:** साटमारी एक पुराना खेल है। साटमारी विदेशों में खेले जाने वाले 'बुल फाइट' जैसा ही एक खेल है, लेकिन उससे भी ज्यादा रोमांचक है। यह भारत में बहुत ही कम जगहों पर खेला जाता था, उनमें से एक था कोल्हापुर संस्थान। खेल में एक बड़ा बंद मैदान होता था, जिसमें सुरक्षा के लिए मैदान के भीतर कुछ दूरी पर गोलाकार बुर्ज (किलेबंदी) होते थे। प्रत्येक बुर्ज में चार छोटे द्वार थे। सभी दुर्गों के आसपास खेलने के लिए पर्याप्त जगह थी। हाथी को उकसाने और उसे धक्का देकर भगाने के लिए साटमारा के साहस, कौशल और चपलता की आवश्यकता होती है। यहां तक कि हाथी भी गुस्सा हो जाता है और साटमारा के पीछे भागने लगता है. खेल का मजा पूरे मैदान में हाथी का पीछा करना और उससे अपना बचाव करना है। इस खेल में अक्सर खिलाड़ियों के साथ-साथ हाथी भी गंभीर रूप से घायल हो जाते थे। यह खेल उन्नीसवीं सदी की शुरुआत में कोल्हापुर और बड़ौदा के तत्कालीन राज्यों में लोकप्रिय था और विशेष मेहमानों, विशेषकर ब्रिटिश गवर्नरों आदि के लिए प्रदर्शित किया जाता था। उस खेल में दगदारी, हाथियों की लड़ाई आदि भी शामिल थे। छत्रपती शाहू महाराज द्वारा कोल्हापुर में और कोल्हापुर राज्य में राधानगरी, सोंटली, रुकड़ी और पन्हाला में साटमारी अखाड़े बनवाए गए थे।

**उद्देश्य:** 1) पारंपरिक खेलोंके प्रती सभीको प्रोत्साहित करना।
2) साटमारी एक प्राचीन खेल से सभीको अवगत करना।
3) छत्रपति शाहू महाराज और साटमारी खेल के प्रती सभीको जाणकारी देना।

**साटमारी का अखाड़ा:** हाथियों की लड़ाई के लिए एक विशेष क्षेत्र तैयार किया जाता था, जिसे 'अग्गड़' कहा जाता था। इसे साटमारी अखाड़ा के नाम से भी जाना जाता है। अग्गड़ बड़ोद में स्थित है। बड़ोद में अग्गड़ लगभग साढ़े तीन सौ फीट (लगभग 106.68 मीटर) लंबा और लगभग दो सौ बीस फीट (67 मीटर) चौड़ा एक विशाल स्थान है, जो चारों ओर से पच्चीस फीट (7.62 मीटर) ऊंचे तटबंध से घिरा हुआ है। पक्ष. दर्शकों के लिए बैठने की व्यवस्था की गई। भव्य हाथियों को अगाग में लाने के लिए उत्तर-दक्षिण दिशा में दो बड़े दरवाजे लगाए गए थे। वे अंदर घुसते ही दीवार में लगे भारी-भरकम हाथियों को सरकाकर बंद कर देते थे। इसके अलावा, बैंक की दीवार में नियमित अंतराल पर छोटे दरवाजे [सात फीट (2.13 मीटर) ऊंचे मेहराब] लगाए जाते हैं, जिनके माध्यम से एक अकेला आदमी प्रवेश कर सकता है और बाहर निकल सकता है।

मैदान के मध्य में चालीस फीट (12.19 मीटर) व्यास वाला एक छोटा टावर है, जो गोलाकार है लेकिन अंदर से खुला है। इसमें प्रवेश के लिए छोटे-छोटे मेहराबदार दरवाजे हैं। आपातकालीन भागने के मार्ग के रूप में यदि मस्त हाथी घात के बहुत करीब आ जाते हैं, तो घात लगाने वाले उस मेहराब के माध्यम से गढ़ में प्रवेश कर सकते हैं और दूसरी तरफ से बाहर निकलकर अपना बचाव कर सकते हैं। साथ ही, साटमार की सुरक्षा के लिए अगादाह के एक तरफ एक पैंतीस फीट (10.66 मीटर) व्यास का घेरा खुदा हुआ है, जिसका उपयोग इसके सामने चल रहे हाथी की रक्षा के लिए किया जा सकता है; क्योंकि हाथी सामने और सीधी रेखा में तेजी से दौड़ सकता है; हालाँकि, वह अपने भारी शरीर के कारण घुमावदार गोलाकार रेखा में नहीं दौड़ सकता। घात लगाने वाला मोड़ के ओर भागकर इसका फायदा उठा सकता है। खंडेराव महाराज गायकवाड़ ने बड़ोदे में उस खेल के लिए एक विशेष अग्गड़ बनवाया था और सयाजीराव गायकवाड़ ने आसपास की दीवार पर दर्शकों के लिए एक गैलरी बनवाई थी। शाहू महाराज द्वारा कोल्हापुर में और कोल्हापुर राज्य में राधानगरी, सोंटाली, रुकड़ी और पन्हाला में साटमारी अखाड़े बनवाए गए थे।

**साटमारी खेल:** खेलने वाले नायकों के मैदान में प्रवेश करने के बाद, एक हाथी को मुख्य द्वार से छोड़ दिया जाता है और दरवाजा बंद कर दिया जाता है। खिलाड़ियों और हाथियों के बीच खेल एक बंद मैदान में शुरू हुआ। खिलाड़ी हाथ में भाला लेकर हाथी को छेदकर मार डालता है। जब खिलाड़ी हाथियों द्वारा कुचल दिया जाता है, तो खिलाड़ी को पास की संरक्षित प्राचीर में प्रवेश करना होता है और दूसरी तरफ से बाहर निकलना होता है। दरवाजा छोटा होने के कारण हाथी किलेनुमा बाड़े में प्रवेश नहीं कर सकते थे। दूसरे खिलाड़ी को उस समय के भीतर दूसरी तरफ से हाथी को भाला मारना था। हाथी पहले खिलाड़ी को छोड़कर दूसरे खिलाड़ी के पीछे दौड़ता है। यदि हाथी किसी खिलाड़ी को पकड़ लेता, तो उसे मुक्त करने के लिए, तीर और आपतबार (छोटेबम) के साथ

तैयार लोग आपतबार को मारते और हाथी पर तीर चलाते। तो हाथी डर जायेगा और पकड़े गये व्यक्ति को छोड़ देगा। फिर भी कुछ वीरों ने अपनी जान गँवा दी क्योंकि वे हाथी के चंगुल से बच नहीं सके!

खिलाड़ियों को साटमार, साटमार्या या साट्या भी कहा जाता है। यह खेल उन्नीसवीं सदी की शुरुआत में कोल्हापुर और बड़ौदा के तत्कालीन राज्यों में लोकप्रिय था और विशेष मेहमानों, विशेषकर ब्रिटिश गवर्नरों आदि के लिए प्रदर्शित किया जाता था। उस खेल में दगदारी, हाथियों की लड़ाई आदि भी शामिल थे। हाथियों को खेल के लिए भारी खुराक के साथ तैयार किया गया था। साटमारी के खेल के दौरान, उन्हें शराब पिलाई जाती थी और 'माजूम' (चीनी, बादाम, पिस्ता आदि से बना भांग का केक) खिलाया जाता था। उसी समय हाथियों से युद्ध करने वाले वीर मल्लों का निधन हो गया। मल्ला को हाथी के दाँत की याद आती थी और कभी-कभी वह उसके पेट के नीचे घुस जाता था और कठोर गुदा से उसे चौंका देता था।

छत्रपति शाहू महाराज ने मस्तवाल हाथी बजाने वाले व्यक्तियों को विशेष रूप से प्रशिक्षित किया। हजारों दर्शक मैदान के चारों ओर ऊंचे स्थान पर बैठे थे और हाथी के साथ चौंकाने और खेलने के इस साहसिक खेल को देखते थे। छत्रपति शाहू महाराजीने खेल नायकों की उत्साहपूर्वक प्रशंसा की गई और उन्हें पुरस्कार भी दिये जाते थे।

**कोल्हापुर में खासबाग के पास साटमारी स्थल:** बड़ोदे और कोल्हापुर में साटमारी क्षेत्र में थोड़ा भिन्न है; क्योंकि कोल्हापुर के साटमारी में मैदानी इलाकों की बजाय कई गढ़ हैं। पिछले पांच सौ वर्षों में कोल्हापुर में ऐसा खेल नहीं खेला गया. मंगलवार पेठ के शाहू अखाड़ा के पास साटमारी का मैच हुआ. साटमारी के नाममात्र अवशेष भी देखे जा सकते हैं।

कोल्हापुर में साटमारी अखाड़ा चौकोर है और दो सौ फीट (60.96 मीटर) लंबा और दो सौ फीट (60.96 मीटर) चौड़ा है। आमतौर पर साटमारी अखाड़ा गोलाकार होता है और इसका व्यास दो सौ फीट (60.96 मीटर) होता है। इसके चारों ओर पन्द्रह फीट (4.57 मीटर) ऊँचा ठोस पत्थर का आवरण बना हुआ है। जिस प्रकार पुराने महल में दीवार के आर-पार सीढ़ियाँ होती हैं, उसी प्रकार किले से एक निश्चित दूरी पर किले की दीवार से एक सीढ़ी है जो केवल एक व्यक्ति के प्रवेश के लिए और अंदर से किले तक जाने के लिए पर्याप्त बड़ी है। 60.96 मीटर व्यास का जो अखाड़ा बनता है उसे खेल का 'रंगन' कहा जाता है। रंगना में खोखले और मजबूत गोल मीनारें हैं। उन टावरों पर किरणें दौड़ रही हैं।

**साटमारी खेल का सामान्य प्रारूप:** मस्ता हाथीयों को रंगन में एक मेहराब के पास लाकर रखा जाता है। पास के एक मेहराब में खड़े होकर, साटमारी हाथी के पिछले पैरों से जुड़ी जंजीरों को खोल देता है। वहीं, शिकारी हाथी के अगले पैरों से कीलें हटाने के लिए कांटों का इस्तेमाल करते हैं। जैसे ही बिगुल बजता है, हाथी आज़ाद हो जाते हैं। आस-पास खड़े साटमारों में से एक हाथी के पास आता है और उसके पास एक भाला या उसके सिर पर एक रंगीन चाबुक छोड़कर, वह हाथी के सामने नाचता है और उसका ध्यान भटकाता है। गुस्साया हाथी जैसे ही हाथी के पीछे भागने लगता है तो दूसरी तरफ से दूसरा हाथी उसे गुस्सा दिलाता है और अपने ऊपर ले लेता है. इसी बीच तीसरा साटमार हाथी का ध्यान अपनी ओर खींचता है, जिससे वह उसके पीछे भागने को मजबूर हो जाता है। हाथी को उकसाने और उसे धक्का देकर भगाने के लिए साटमारा के साहस, कौशल और चपलता की आवश्यकता होती है। यहां तक कि हाथी भी गुस्सा हो जाता है और टीजर के पीछे भागने लगता है. खेल का मजा पूरे मैदान में हाथी का पीछा करना और उससे अपना बचाव करना है।

हालाँकि हाथी एक बड़ा और विशाल जानवर है, लेकिन उसकी सीधी दौड़ इंसान से भी तेज़ होती है। इसलिए साटमार उसे एक ही आदमी के पीछे समान रूप से भागने की इजाजत नहीं देते। दूसरा साटमार पहले को बचाने के लिए हाथी का ध्यान आकर्षित करता है और उसे अपने शरीर पर ले लेता है। ऐसे संकट में अक्सर साटमार को अपना भाला और चाबुक वहीं छोड़कर भागना पड़ता है और अपनी रक्षा करनी पड़ती है; कुछ अवसरों पर अग्गड़ में मदिरा बाण छोड़कर और धुंए की सहायता से हाथियों को डराकर सथमारों को बचाना पड़ता है। यदि कोई शिकारी हाथी के बहुत करीब है, तो हाथी के पिछले पैरों को काट दिया जाता है और खेल रोक दिया जाता है। हाथी के पैरों में चिमटी मरोड़ना जोखिम भरा होता है, क्योंकि परेशान हाथी के अचानक पलटने और काटने वाले शिकारी पर हमला करने की संभावना होती है।

**सारांश:** साटमारी हाथियों की लड़ाई का एक खेल था और उन्नीसवीं सदी की शुरुआत में भारत की सिर्फ़ दो रियासतों में खेला जाता था। ये रियासतें थीं बड़ौदा और कोल्हापुर। अभिलेखों के अनुसार यह खेल बड़ौदा राज्य में बहुत लोकप्रिय था। कोल्हापुर के महाराजा छत्रपति शाहू ने बड़ौदा के महाराजा सयाजीराव गायकवाड़ से मिलने के दौरान इस खेल के रोमांच का अनुभव किया और इसके रोमांच का अनुभव करने के बाद उन्होंने अपने राज्य में भी इस खेल को शुरू किया। इस खेल में अक्सर खिलाड़ियों के साथ-साथ हाथी भी गंभीर रूप से घायल हो जाते थे। हालाँकि यह खेल, 'साटमारी' राजघरानों के साथ-साथ आम लोगों के बीच भी बहुत

*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

लोकप्रिय था। महामहिम छत्रपति शाहू महाराज ने इस खेल के लिए एक अलग अखाड़ा बनवाया था। खेल के लिए ज़रूरी ख़ास औज़ार भी उनके कारीगरों ने बनाए थे। अखाड़ा अभी भी वहाँ है और कुछ औज़ार अभी भी संग्रहालय में देखे जा सकते हैं। "साटमारी" का वर्णन छत्रपति शाहू महाराज और छत्रपति सयाजीराव गायकवाड़ की जीवन के इतिहास में पढ़ा जा सकता है, ये अभिलेख हमें इस रोमांचकारी खेल की झलक देते हैं। हम स्थानीय संग्रहालयों से "साटमारी" को दर्शाती कुछ पेंटिंग या तस्वीरें और कोल्हापुर और बड़ौदा के तत्कालीन राज्यों के उपलब्ध आधिकारिक दस्तावेज़ों से संदर्भ एकत्र करने का प्रयास कर सकते है।

सदर्भ:

1) https://www.etvbharat.com/marathi/maharashtra/state/kolhapur/cheetah-came-back-to-india
2) https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner
3) https://thinkmaharashtra.com
4) https://dgipr.maharashtra.gov.in/node/4605

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

59

# ‘शाहूपुरी’ वसाहती विषयक छत्रपती शाहू महाराजांचा व्यापारी दृष्टीकोन

**डॉ. बाळासाहेब आमगोंडा कोटलगी**
सहा. प्राध्यापक,इतिहास विभाग प्रमुख
नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज सांगली

---

**प्रस्तावना :-** प्राचीन काळापासूनच कोल्हापूरला व्यापारी परंपरा लाभली आहे. सहयाद्री पर्वत रागांच्या कुशीत पंचगंगा नदीच्या काठावरील ‘करवीर’ हे ठिकाण अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जाते. येथील अनुकूल परिस्थितीमुळे या भागात ‘शेती’ हा प्रमुख व्यवसाय आढळतो. कालांतराने येथील शेतमालावर आधरित अनेक उद्योग आणि व्यवसाय या भागात विकसित झाले. शेतमाल, वस्तू आणि जिन्नस यांची खरेदी विक्रीसाठी अनेक बाजारपेठा आणि व्यापारी वसाहती स्थापन झाल्या. त्यापैकीच एक महत्त्वाची व्यापारी वसाहत म्हणजे ‘शाहूपुरी’ होय. एक व्यापारी केंद्र म्हणून कोल्हापुरास विशेष महत्त्व प्राप्त झाले असले तरी त्यांची सुरवात मात्र कोल्हापूर संस्थान काळातील राज्यकर्त्यांच्या व्यापारी ध्येयधोरणामुळे झालेली आढळते. छत्रपती शाहू महाराजांनी व्यापारी वसाहतीची भक्कमपणे पायाभरणी केल्याने व्यापारास चालना मिळाली. कोल्हापूर जिल्हा हा संपूर्ण महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.

**विषयाची निवड :-** १९व्या शतकाच्या प्रारंभी बाजार हा खेड्या पुरताच मर्यादित होता. शेतकरी गरजेपुरते धान्य ठेऊन बाकीचे धान्य विकत असे. या काळात आठवडी बाजारातून मालाची देवाण-घेवाण केली जात असे. १९ व्या शतकाच्या मध्यानंतर वाहतूक व दळणवळण व्यवस्थेतील सुधारणा आणि पिक लागवडी खालील क्षेत्रातील वाढ यामुळे व्यापारी मालाची उलाढाल वाढण्यास मदत झाली. परिणामी कायम स्वरुपी बाजारपेठेची आवश्यकता भासू लागली त्यातूनच करवीर किल्ला तटबंदीच्या बाहेर एक नवी वसाहत स्थापन करण्यात आली त्यालाच ‘शाहूपुरी’ असे नामकरण करण्यात आले. त्याच शाहूपुरी वसाहतीविषयी छ.शाहू महाराजांची नेमकी भूमिका आणि योगदान याचा आढावा घेण्याच्या दृष्टीकोनातून आर्थिक इतिहासाचा एक भाग म्हणून ‘शाहूपुरी वसाहतीविषयी छ.शाहू महाराजांचा दृष्टीकोन’ याचा संक्षिप्त अभ्यास प्रस्तुत शोध निबंधातून मांडला आहे.

**उद्देश :-**

१. छ. शाहूचे व्यापार विषयक दृष्टीकोन संक्षिप्त अभ्यासणे.
२. शाहूपुरी व्यापारी वसाहती स्थापनेमागील दूरदृष्टीचा आढावा घेणे.
३. शाहूपुरी वसाहतीची नियोजनबद्ध रचनेविषयी मांडणी करणे
४. शाहूपुरी वसाहत वाढीसाठी केलेल्या उपाय योजना अभ्यासणे.
५. शाहूपुरी वसाहतीमुळे झालेल्या बदलांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. प्राथमिक आणि दुय्यम प्रकाशित व अप्रकाशित साधनांचा वापर केला आहे. संबधित विषयाच्या अनुषगाने उपलब्ध साधनांचा शोध घेऊन परीक्षणाद्वारे वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून अन्वयार्थ लावून सद्यस्थिती विचारात घेऊन मांडणी केली आहे. प्रस्तुत संशोधन हे उपलब्ध साधनांवरून केले असल्याने हे संशोधन ऐतिहासिक तुलनात्मक विश्लेषणपद्धती मध्ये येते.

**व्यापारी परंपरा :-**कोल्हापूरला प्राचीन काळापासून समृद्ध अशी व्यापारी परंपरा लाभली आहे. कोल्हापूरातील ब्रम्हपुरी येथील उत्खननात रोमन घडणीचे पितळी धातूच्या प्रतिमा आणि नाणी आढळून आले आहेत यावरून कोल्हापूरचा ‘रोमन’ साम्राज्याशी व्यापारी संबध असल्याचे स्पष्ट होते.[१] लिबर्टी आणि व्हिनस यासारख्या कोल्हापुरातील काही ठिकाणाच्या नावावरून ग्रीक व रोमन संस्कृतीचा येथील भागावरील प्रभाव जाणवतो. सातवाहन काळातही प्रतिष्ठान (पैठण), तेर, जुन्नर,नाशिक,कऱ्हाट (कराड),आणि करवीर या ठिकाणी व्यापार चालत असल्याचे अनेक अवशेषावरून स्पष्ट होते.[२] कोल्हापूर प्रांतातील चालुक्य, शिलाहार आणि यादव कालीन शिलालेखातील वर्णनावरून व्यापार विषयक बाबींची माहिती आढळते. मध्ययुगीन काळातही पश्चिम किनारपट्टीवरील कारवार. गोवा. राजापूर आणि दाभोळ या बंदरातून व्यापारी माल घाट मार्गाने कोल्हापूरला आणला जात असे आणि या भागातील उत्पादित माल व वस्तू याच मार्गाने विविध बंदराकडे पाठविला जात असे. १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत व्यापाराची स्थिती फारसी समाधानकारक नव्हती ब्रिटिशाचा अमंल सुरु झाल्यानंतर काही बदल घडून आले. शेत लागवडीचे क्षेत्र विस्तारल्याने शेतमालाचे उत्पादन वाढले त्या मालास कायमस्वरूपी, हक्काचे योग्य बाजारभाव मिळवून देणाऱ्या बाजारपेठाची आवश्यकता निर्माण झाली,

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

त्यातूनच कोल्हापूर संस्थानात अनेक व्यापारी वसाहती स्थापन करण्यात आल्या, त्यात सर्वात महत्त्वाची छ. शाहू महाराजांनी स्थापन केलेली वसाहत 'शाहूपुरी पेठ' म्हणून ओळखली जाते.

**कोल्हापुरातील बाजारपेठा :-** प्राचीन काळापासून ब्रम्हपुरी आणि महालक्ष्मी मंदिर परिसरातच बाजाराचे ठिकाण होते. सन १७८८ मध्ये करवीर राज्याची राजधानी पन्हाळावरून कोल्हापूरला स्थानांतरीत झाल्याने संरक्षणासाठी भूईकोट किल्ला बांधला,तटबंदी व खंदक खोदून किल्ल्यातच निवासाची व्यवस्था केली. ब्रिटीशांनी १७८५ नंतर कोल्हापूर येथे वखार स्थापन केल्याने व्यापारी हालचाली वाढल्या.[४] १९व्या शतकाच्या प्रारंभी जयंती नालाच्या पश्चिमेला कोल्हापूर विस्तारत गेले. सन १८४४ मध्ये दाजी कृष्ण पंडित यांची पोलिटीकल सुपरिटेड म्हणून नियुक्तीनंतर त्याच्या पुढाकाराने तटबंदीच्या आतील भागात दगडी फरसी बसवून रस्ते वाहतुकी योग्य केले. सन१८५४ पासून नगर पालिका स्थापन झाल्यानंतर नगरपालिका ते गंगावेश दरम्यान अनेक पेढ्या निर्माण होऊन गुळाचा व्यवहार चालत होता.[५] १९व्या शतकाच्या अखेरीस किल्याच्या तटबंदी बाहेर वस्ती वाढत जाऊन ज्या दिवसी ज्या भागात बाजार भरत असे त्या दिवसावरून तेथील बाजार पेठ ओळखले जाऊ लागले.

**शाहूपुरी वसाहतीची स्थापना :-** छत्रपती शाहू महाराजांच्या प्रारंभीच्या काळात तटबंदीच्या आतील दाट लोकवस्तीसाठी बाहेर निवासाची गरज होती. तसेच शहरातील नगरपालिके समोरील जागा गुळाच्या वाढत्या व्यापारासाठी अपुरी पडत होती. दरम्यान शहराच्या पूर्वेकडील भागात सन १८९१ला रेल्वे स्थानक निर्माण झाले होते. शहर आणि रेल्वे स्थानक यामध्ये मोकळी जागा होती, ही जागा लोकवस्तीसाठी देण्याची योजना पुढे आली आणि गुळाच्या पेढ्याची अडचण लक्षात घेऊन येथे व्यापारी पेढी साठी जागा देण्याबद्दलची योजना छ. शाहुच्या आर्थिक धोरणाचा भाग म्हणून निश्चित झाले.

**वासाहीतीची प्रसिद्धी :-** सन १८९६मध्ये तत्कालीन सर्वाधिक प्रसिद्ध असणारे वृत्तपत्र 'बॉम्बे गॅझेट' यामधून कोल्हापुरातील या नव्या वसाहतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. या जाहिराती च्या माध्यामातून मुंबई आणि गुजरात या भागातील व्यापाऱ्यांना नव्या वसाहतीकडे आकर्षित करण्याबाबत प्रयत्न झाले. परिणामी निपाणी, बेळगाव, मुंबई आणि गुजरात या भागातून व्यापारी आकर्षित होण्यास मदत होऊन या ठिकाणी त्यांनी आपल्या व्यापारी पेढ्या स्थापन केल्याने येथील व्यापाऱ्यास प्रारंभ झाला. या नव्या नियोजनबद्ध वसाहतीचे पुढे दोन वर्षांनी 'शाहूपुरी' असे नामकरण करण्यात आले.

**वसाहतीची रचना :-** कोल्हापूर शहर आणि रेल्वे स्थानक या मधील मोकळया जागेत नियोजनबद्ध आखीव रेखीव वसाहत निर्माण करण्याच्या हेतूने ४० x ८० फुट आकाराचे ब्लॉक पाडून त्यांची लिलाव पद्धतीने विक्री करण्याचे दरबार कडून जाहीर केले होते.[६] परंतु कालांतराने सोयीनुसार विविध आकाराचे ब्लॉक तयार करून सदर जागेवर इमारत बांधकाम आणि त्याच्या रचने संबधित काही शर्ती व नियम तयार करून २१ मार्च १८९६मध्ये जाहीर नाम्यातून प्रसिद्ध करण्यात आले. या वसाहतीचे कामकाज चालविण्याकरिता रावसाहेब दत्तात्रय सीताराम घोलकर यांच्या अध्यक्षेतेखाली कृष्णाजी नारायण पंडित व भास्कर विठोबा जाधव यांची कमिटी नियुक्त केली. तसेच इमारत बांधकामा करीता पुढीलप्रमाणे आदेश काढण्यात आले.

१. सदरहु जागेत खजिना आढळल्यास त्यावर करवीर सरकारचा हक्क राहील.
२. खरेदी घेतलेल्या जागेवर तीन वर्षाच्या आत बांधकाम पूर्ण केले पाहिजे.
३. इमारत बांधताना सांडपाणी सार्वजनिक मोरीत येऊन मिळेल अशी तजवीज करावी.
४. इमारतीचा कोणताही भाग रस्त्याच्या बाजूच्या गटारीच्या आत ३ फुटापर्यंत असावा.
५. इमारतीच्या दोहों बाजूस निदान ५-५ फुटापर्यंत मोकळी जागा असली पाहिजे.
६. इमारतीच्या आघाडीस व पिछाडीस दोन्ही अंगास रस्ते ठेवण्यात येतील.
७. ग्यालरी किंवा ओटे अगर काही आपल्या जागेच्या मर्यादेत ठेवावे.
८. सदरहु जागा हिंदू ,मुसलमान,ख्रिश्चन वैगरे जातीत तंटा न होईल अशा तजविजीने देणे.
९. वरील शर्तीस अनुसरून ज्याच्या कडून वर्तन होणार नाही त्यास जागेची किंमत परत न देता ती जागा पुन्हा सरकारमधून देण्यात येईल.[७]

**सोयी सुविधा व सवलती :-** या नव्या वसाहतीत व्यापाऱ्यांना अधिक प्रमाणात आकर्षित करण्यासाठी छ.शाहूच्या कडून विशेष प्रयत्न करण्यात आले. छ. शाहू महाराज कागल मुक्कामी असताना निपाणीतील व्यापाऱ्यांना शाहूपुरीत व्यापारी पेढी सुरु करण्यासाठी आमंत्रित केले होते. वसाहतीत कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही, दोन इमारतीमधील संरक्षित अंतर, सांडपाण्याचे उत्तम व्यवस्थापन करण्यात आले. तसेच सर्वच जाती धर्मातील लोकांना कोणताही भेदभाव न करता जागेची व्यवस्था केल्याने मराठा, लिंगायत, जैन, ब्राम्हण, मारवाडी,गुजराथी, मुसलमान आदी समाजातील व्यापाऱ्यांनी पेढ्या स्थापन केल्या.

वसाहतीत इमारत बांधकामासाठी प्रोत्साहन दिल्यामुळे वस्ती वाढू लागली. व्यापाऱ्याच्या सुरक्षेसाठी पोलीस व्यवस्था करण्यात आली. नव्या वसाहतीत व्यापार स्थिर होण्याकरिता काही प्रमाणात कर सवलत जाहीर केली. या सर्व सोयी सवलती मुळे शाहूपुरी वसाहतीत व्यापार आकाराला येऊ लागला.

**वसाहतीची वाढ :-** कोल्हापूर परिसरात तयार होणाऱ्या गुळाला हक्काची बाजारपेठ निर्माण करण्याच्या हेतूने छ. शाहुनी प्रयत्न सुरु केले.कारण तत्पूर्वी कोल्हापूरचा गुळ कोकणात राजापूरच्या व्यापारी पेठेत पाठविला जात असे. तेथून तो गुळ 'राजापुरी गुळ' म्हणून निर्यात केला जात होता. गुळाचे उत्पादन कोल्हापुरात आणि नाव मात्र राजापूरचे होत असे, यावर मात करण्यासाठीच छ. शाहुच्या प्रयत्नातून गुळाची नवी बाजारपेठ या वसाहतीत ५ ते ७ वर्षात भरभराटीस आले.सन १९०२ पर्यंत या बाजारपेठेतून दरवर्षी ५० लाखांचा गुळ आणि २० लाखांचा भूईमूग निर्यात केला जाऊ लागला.[८] यावरून येथील एकंदरीत व्यापारी उलाढालीचा अंदाज येतो. सन १९०४च्या दरम्यान लाटकर, मिश्रकोटी, डुणुग, चौगुले, पाटणे, खोत, लांडे, नरके, मिठारी,बागे,शिंत्रे व शेटे यासारख्या व्यापाऱ्यांनी प्रारंभीच्या काळात पेढ्या सुरु केल्या. व्यापारी पेढ्यामुळे या परिसरात अन्य उलाढाली व लोकवस्ती वाढण्यास मदत झाली. एक ,दोन,तीन या क्रमाने गल्ली वसाविण्यास सुरवात झाली. परिणामी हळूहळू वसाहतीची वाढ होऊ लागली.

**व्यापाऱ्यांना भांडवल पुरवठा :-** शाहूपुरी वसाहतीतील व्यापार वाढीस लागला असला तरी व्यापाऱ्यांना प्रामुख्याने भांडवलाची अडचण भासू लागली. यासंबंधी महाराजांना समजताच त्यांनी तात्काळ एक जाहिरनामा काढून भांडवलाची सोय केली, तो जाहीरनामा पुढीलप्रमाणे प्रसिद्ध केला. ' व्यापार चालविणारे लोकांस पैशाची अडचण करिता सरकारने सोने गहाण ठेवून दरसाल दर शेकडा ३ रुपये व्याजाने रक्कम देण्याचे ठरले असून सदरहू कामाकरिता पैशाची गरज असेल त्यांनी एक्स्टेंशन ऑफिसर याच्याकडे येऊन ठरलेल्या नियमांची समज घेऊन व्यापार करावा.'[९] अशा प्रकारे केवळ ३ टक्के व्याजाने एका व्यक्तीस १०० ते ५००० रूपयापर्यंत सोने गहाण ठेवून कर्ज उपलब्ध करून दिले. छ. शाहुनी भांडवला संबधित व्यापाऱ्यांची प्रमुख समस्या दूर करून व्यापार वाढीस प्रोत्साहन दिले.

**व्यापारास संरक्षण :-** शाहूपुरी वसाहतीत सन १९०९-१०च्या दरम्यान शेतमालाची आवक कमी होत असल्याचे समजताच छ. शाहुनी त्यासंबंधी कारणाचा शोध घेऊन त्यावर उपाय योजनेच्या उद्देशाने एक खास जाहिरनामा काढला. 'तमाम लोकांस कळविण्याकरिता, हल्ली व्यापाराचा हंगाम सुरु आहे, तरी शाहूपुरीत मालाच्या गाड्या परगावाहून नेहमीप्रमाणे येत नसून त्याचे कारण सदर ठिकाणी येणारे गाड्या पोलिसांकडून वेठीस धरण्यात येत असल्याची बातमी गावोगावी पसरून गाड्या येण्याचे प्रमाण कमी झाल्याचे समजून आले आहे, असे झाले असता व्यापारास धोका संभव आहे, म्हणून शाहूपुरीत येणाऱ्या गाड्या पोलिसांकडून मुळीच धरण्यात येऊ नयेत असा हुकुम झाला आहे. तसेच पोलीस खेरीज इतरांकडून धाक दाखवून त्यांच्याकडून पैसे घेत असल्याचे नजरेस आले आहे यापुढे तसे वर्तन झाल्यास सक्त विचार केला जाईल'[१०] अशा प्रकारच्या जाहीरनाम्यातून शेतकरी आणि व्यापारी यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, त्याच्या हिताचे रक्षण केले. परिणामी शेतकऱ्यांना संरक्षण मिळाल्याने शेतमालाची आवक वाढून व्यापारास अधिक चालना मिळाली.

**निष्कर्ष :-** छ.शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभीच्या काळात सन १८९५ मध्ये जाहिरनामा काढून एका नव्या व्यापारी वसाहतीची स्थापना केली हीच वसाहत पुढील काळात शाहूपुरी वसाहत म्हणून प्रसिद्ध झाले. केवळ शहराच्या विस्तारासाठी वसाहत निर्माण केली नाही तर व्यापारी पेठ आणि लोकवस्ती अशा दुहेरी उद्देशाने या वसाहतीची निर्मिती करण्यात आली. सदर वसाहतीच्या वाढीसाठी अनेक सोयी सवलती जाहीर केल्या,वसाहतीची आखीव-रेखीव अशी नियोजनबद्ध आखणी करून कोणत्याही प्रकारे अतिक्रमण होणार नाही अशी अमलबजावणी केली. विविध जाती धर्मातील व्यापाऱ्यांना कोणताही भेदभाव न करता सामाजिक सलोख्याचे वातावरण वसाहतीत निर्माण केले. यातून त्याचा वैचारिक दूरदृष्टीकोन स्पष्ट होतो. छ. शाहुच्या प्रयत्नामुळेच 'कोल्हापुरी गुळ' प्रसिद्धीस आले. व्यापाऱ्याना अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा करून भांडवलाची समस्या सोडविले. व्यापारी वर्गाच्या हिताचे रक्षण करण्याबरोबरच शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारे अडवणूक व फसवणूक होणार नाही या बाबत महाराज दक्ष असल्याचे दिसते. व्यापाराबाबत छ. शाहू महाराजांचे निरीक्षण खूप सूक्ष्मपणे होते. व्यापार वृद्धींगत होण्यासाठी ते संवेदनशील असल्याचे दिसते. शेतमालावर आधरित व्यापाऱ्याला महाराजांनी अधिक प्रोत्साहन दिले. आपल्या कोल्हापूर इलाख्यात व्यापार स्थिर करण्यासाठी महाराजांनी संरक्षणात्मक धोरणाचा अवलंब केला. व्यापार वाढल्यास त्या संबधित इतर आर्थिक उलाढालीस चालना मिळून आर्थिकदृष्ट्या समृद्धता निर्माण करणे हे महाराजांचे मुख्य धोरण होते. पुढील काळात 'कृषी उत्पन्न बाजार समिती' ची स्थापना होऊन त्याचा विकास होण्याकरिता छ. शाहू महाराजांच्या या व्यापार विषयक धोरण कारणीभूत ठरले.

अशा प्रकारे छ. शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक सुधारण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्या आपल्या प्रजेला सक्षम आणि समृध्द करण्यासाठी जे जे त्यांना करणे शक्य होते ते त्यांनी आपल्या अधिकाराच्या माध्यमातून पूर्तता करण्याबाबत प्रयत्नशील राहिले. त्यांच्या नंतरच्या काळातही शाहूपुरीच्या विकासासाठी करवीर दरबाराकडून सहकार्य करण्यात आले. त्यामुळे कोल्हापूरच्या आर्थिक विकासात 'शाहूपुरी' बाजारपेठचा खूप मोठा वाटा मानला जातो. तत्कालीन कोल्हापूर संस्थानातील आर्थिक आणि व्यापारी उलाढालीचे केंद्र बनले. 'शाहूपुरी वसाहतीचे रुपांतर शाहूपुरी बाजारपेठेत झाले. कालांतराने यालाच 'शाहू मार्केट यार्ड'म्हणून ओळखले गेले. आज वार्षिक उलाढाल शेकडो कोटीच्यावर पोहचलेली ही बाजारपेठ दक्षिण- पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून नावारूपास आलेले आहे.

**संदर्भ :**

१. खंडालवाला कार्ल, ब्रह्मपुरी ललितकला, क्रमांक ७, १९६०, पृ. २९.
२. मोडक बा.प्र., 'कोल्हापूर कर्नाटक प्रांताचा इतिहास' चित्रशाळा, पुणे,१८७७ पृ.२१.
३. चिटणीस कृ.ना., 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था' भाग -३,उद्योगधंदे व्यापार उद्दीम,प्रकाशिका – रा. कृ. चिटणीस,नवी पेठ, पुणे, १९८५, पृ.११०.
४. मालगावकर मनोहर, 'द सी हॉक लाईप अँन्ड बॅटल्स ऑफ कानोंजी आंग्रे' आशिया पब्लिशिंग हाऊस, १९५९, पृ. २८७.
५. काशीद सुधाकर, 'कोल्हापूरच्या पाऊलखुणा' प्रभाकर पेपर्स लि. पृ.३.
६. लठ्ठे ए.बी.,'मेमरीज ऑफ हिजहायनेस श्री.छ.शाहू महाराज ऑफ कोल्हापूर' खंड – १ टाईम प्रेस, बॉम्बे,१९२४, पृ.११५.
७. डॉ. सांगवे विलास व डॉ. खणे बी.डी.,'राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स' (१८९४-१९०० ) खंड-२ शाहू संशोधन केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८३ ,पृ.१८६.
८. लठ्ठे ए.बी.,उपरोक्त पृ. ११५.
९. करवीर सरकारचे ग्याझिट,४ फेब्रुवारी १९०५ , भाग -१ पृ. ४१.
१०. उपरोक्त, २३ डिसेंबर १९१०, पृ. ५०.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

60

# छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कोल्हापूर येथे शाळा - वसतिगृहे सुरू न करण्यामागची भूमिका

**डॉ. श्रीधर भाऊसाहेब शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
मिरज महाविद्यालय, मिरज

---

**प्रस्तावना:-** महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तनाचा किंबहुना भारतातील शैक्षणिक परिवर्तनाचा कालखंड ब्रिटिश राजवटी पासून सुरू होतो. याआधीच्या कालखंडातील 'विद्या' ही सामान्यपणे 'वेदविद्या' म्हणून ओळखले जात असे आणि या वेदविद्येचा अधिकार हा केवळ ब्राह्मण वर्गापुरताच मर्यादित होता. शिक्षण हे जातीबद्दल रचनेत अडकले होते. या श्रेणीबद्ध शिक्षण व्यवस्थेमध्ये शूद्रांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता. या विषमतावादी शिक्षण व्यवस्थेला पहिला छेद महाराष्ट्रात दिला तो म्हणजे महात्मा फुले यांनी. मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे ऐतदेशीय म्हणून हे सर्व श्रेय महात्मा फुले यांच्याकडे जाते. महात्मा जोतीराव फुले हे सामाजिक समतेच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक म्हणून उदयाला आले. ज्यांचा काहीही अपराध नसताना शेकडो वर्ष समाजातील अस्पृश्य मागास लोकांचा छळ येथील उच्च वर्णी यांच्याकडून झाला व होत होता त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. फुले यांनी आपल्या कार्याने वाणीने व लेखणीने सनातन यांच्यावरती घनाघाती प्रहार केले. शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पसरत आले पाहिजे या इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणास त्यांनी विरोध केला. आणि प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे 'आधी कळस मग पाया' असे न होता 'आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षण प्रणाली असण्यावर महात्मा फुलेंचा आग्रह होता. १८८२ साली हंटर आयोगाकडे साक्ष देताना महात्मा फुले यांनी सरकारच्या चुकीच्या शैक्षणिक धोरणावर कडाडून हल्ला केला. मात्र त्यांच्या मुलगामी विचारांची पुसटशी दखल ही तीन वर्षांनी म्हणजे १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येय उद्दिष्टामध्ये नव्हती. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक सूचनांचा साधा उल्लेख ही केला गेला नाही. त्यामुळे मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणाबाबत एक अक्षर ही काँग्रेसने काढलेले दिसत नाही. त्रिभाषा सूत्राचा अवलंब कोठारी आयोगाने आणला असला तरी या अगोदर ७७ वर्षांपूर्वी महात्मा फुले यांनी त्रिभाषा सूत्राचा अवलंब शिक्षणात करावा यावर भर दिला होता.

जनसामान्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, खेड्यापाड्यातील मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून वस्तीगृहाची व्यवस्था करण्याची पहिली कल्पना महात्मा फुले यांनी मांडली.आणि गरीब होतकरू मुलासाठी वसतिगृहे व शिष्यवृत्तीची सुविधा देण्यावर भर दिला. फुलेंच्या नंतरच्या काळात न्यायमूर्ती रानडे, आगरकर, धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, महात्मा गांधी यांनी दलितांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले. पण ज्यावेळी स्त्रियांच्या दलितांच्या हक्कासाठी उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट करणाऱ्या जोतीरावांचा स्त्रियांचा उद्धार करता म्हणून सत्कार झाला त्यावेळी न्यायमूर्ती रांगडे दहा वर्षाचे होते विष्णुशास्त्री चिपळूणकर दोन वर्षाचे होते गोपाळ गणेश आगरकर महर्षी कर्वे पंडिता रमाबाई व महात्मा गांधी यांचा जन्म सुद्धा झाला नव्हता. म्हणजे मागासवर्गीय यांच्या शिक्षणासंबंधी मूलभूत विचार मांडणारे व कार्य करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते. त्यांच्या पाऊल खुनावरच छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या शैक्षणिक विचारांची बैठक तयार केली.

**संशोधनाचा हेतू:-** प्रस्तुत संशोधनातून छत्रपती शाहू महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे मागासवर्गीयांच्या शिक्षणासंबंधीची भूमिका समजावून घेणे हा आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाडा, विदर्भ, औरंगाबाद, महाड, पुणे, नाशिक सोलापूर येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शिक्षण संस्थांचे जाळे उभे केले. मात्र त्यांनी कोल्हापूर येथे कोणतीही शाळा किंवा वसतिगृह सुरू केले नाही याची कारणे शोधणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

**संशोधन पद्धती:-** इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे म्हणून सामाजिक शास्त्रात संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतींचा वापर केला आहे प्रस्तुत संशोधनाकरिता ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे याशिवाय सदरच्या संशोधनासाठी प्रामुख्याने क्षेत्रभेट सर्वेक्षण प्रश्नावली आणि मुलाखत तंत्र पद्धतीचा वापर केला आहे याशिवाय प्रकाशित अप्रकाशित लेखन साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

**छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक धोरण:** छत्रपती शाहू महाराजांची इसवी सन १८९४ ते १९२२ पर्यंतची २८ वर्षाची कारकीर्द केवळ कोल्हापूर संस्थांच्या नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. शाहू महाराज जेव्हा गादीवर आले तेव्हा कोल्हापूर संस्थान मधील शिक्षण विषयक परिस्थिती अत्यंत असमाधानकरक होती. अल्पसंख्या ब्राह्मण समाजच फक्त शिक्षित होता. आणि संख्येने मोठा असणारा बहुजन ब्राह्मणेत्तर समाज मात्र निरक्षरच राहिला होता. संस्थांच्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये सुद्धा ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व होते. १८९४ साली संस्थानातील ब्राह्मण अधिकाऱ्यांची संख्या ६० होती तर ब्राह्मणे तर अधिकाऱ्यांची संख्या केवळ ११ होती. महाराजांच्या खाजगी सेवेतील ब्राह्मण अधिकाऱ्यांची संख्या ४६ होती. तर ७ अधिकारी ब्राह्मणेत्तर होते. राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या एक ४४१ विद्यार्थ्यांपैकी ३६८ विद्यार्थी ब्राह्मण होते तर केवळ ६१ विद्यार्थी ब्राह्मणेत्तर होते. आणि राजाराम कॉलेजमध्ये ६१ विद्यार्थी होते त्यापैकी ५५ विद्यार्थी ब्राह्मण समाजाचे होते.[१]

**शाहू महाराजांनी मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी केलेल्या उपाययोजना:-** छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षणाबाबतची एकूण परिस्थिती लक्षात आल्यानंतर त्यांनी मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी काही विशेष उपाययोजना अमलात आणल्या.

१. मागासवर्गीय समाजाच्या व गरीब घराण्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पारितोषिके नादा-या अशा शैक्षणिक सवलती उपलब्ध करून दिल्या.
२. सक्तीची आणि मोफत प्राथमिक शिक्षण सर्वच बहुजन समाजासाठी देण्यात आले.
३. शाळेतील अभ्यासक्रमांची जाणीवपूर्वक पुनर्रचना करण्यात आली.
४. शिक्षणावरील वाढीव खर्चाची तरतूद म्हणून संस्थानातील अधिकारी जागीरदार व सदन व्यक्ती यांच्यावर शिक्षण कर बसविण्यात आला.
५. अस्पृश्यांच्या मुलासाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद करण्यात आल्या.
६. मागासलेल्या विद्यार्थिनींच्या राहण्या जेवणाची मोफत व्यवस्था दरवारातर्फे 1919 सालापासून करण्यात आली.
७. विद्यार्थ्यांसाठी आपापल्या जातीतील स्वतंत्र वसतिगृहे उघडण्यात आली.

**विद्यार्थ्यांची जातीनुसार स्वतंत्र वसतिगृहे:-** कोल्हापूर म्हणजे 'विद्यार्थी वसतिगृहांची माता' ' मदर ऑफ बोर्डींग हौसिस' असे संबोधले जात होते. गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा असूनही शहरातील कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन त्यांना राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे त्यांचे शिक्षण खंडित होत होते. म्हणून शाहू महाराजांनी सर्व जाती जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूरमध्ये एक वस्तीग्रह काढले होते विद्यार्थ्यांच्या राहण्या जेवण्याची मोफत व्यवस्था केली होती तरीसुद्धा या वसती ग्रहांमध्ये तीन वर्षात एकही ब्राह्मण जाती व्यतिरिक्त विद्यार्थी प्रवेश घेतला नाही या यशस्वी प्रयोगामुळे राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृहे 1901 सालापासून उघडण्यास सुरुवात केली. जातीवाचक बोर्डिंग मधील महाराजांची राष्ट्रीय दृष्टी होती त्यांनी स्थापन केलेली विविध वसतिगृहे १. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग १९०१, २. दिगंबर जैन बोर्डींग १९०५, ३. वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह १९०६, ४. मुस्लिम बोर्डिंग १९०६, ५. मिस क्लार्क होस्टेल १९०८, ६. दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग १९०८, ७. श्री नामदेव बोर्डिंग१९११, ८. पांचाळ ब्राह्मण वसतिगृह १९१२, ९. श्रीमती सरस्वती गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह १९१५, १०. इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल १९१५, ११. रावबहादुर सबनीस प्रभू बोर्डिंग १९१५, १२. आर्य समाज गुरुकुल १९१८, १३. वैश्य बोर्डिंग १९१८, १४. ढोर चांभार बोर्डिंग १९१९, १५. शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह १९२०, १६. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस १९२०, १७. सुतार बोर्डिंग १९२१, १८. नाभिक विद्यार्थी वसतिगृह १९२१, १९. सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग १९२०, २०. श्री देवांग बोर्डिंग १९२१ यातील मिसक्लर्क होस्टेल हे दलितासाठी सुरू केलेले होते हे पुढे दलितांच्या विचार मंथनाचे एक केंद्रच बनलेले दिसून येते त्यामुळे तिचा अधिक विस्ताराने विचार करणे आवश्यक आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूरमध्ये जे वसतीगृह सुरू केले ते म्हणजे मिस क्लार्क होस्टेल होय कोल्हापूर मधील जैन बोर्डिंग मध्ये दिवाण बहाद्दूर अण्णासाहेब लट्टे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 14 फेब्रुवारी 1908 रोजी सभा भरून अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्याप्रसार करणारी मंडळी स्थापन करण्यात आली व तिच्या विद्यमान शाहू महाराजांच्या इच्छेप्रमाणे वस्तीग्रह काढण्याचे ठरले नामदार भास्करराव जाधव रावबहादूर महादेव गणेश डोंगरे गणपतराव कदम श्रीपतराव शिंदे खंडेराव बागल यांनी बोर्डिंग च्या स्थापने वेळी व पुढेही बरेच परिश्रम घेतले शाहू महाराजांनी बोर्डिंग रविवार पेठेतील 200 बाय 150 जागा 25 खोल्यांच्या इमारतीसह दिली आणि संस्थेस दर साल 55 रुपये ग्रंटही दिली. मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या मिस व्हायोलेट क्लार्क अस्पृश्यता निवडण्यासाठी अंतकरणपूर्वक प्रयत्न करीत होत्या त्यांनी हॉस्टेलच्या मदतीसाठी एक नृत्याचा

प्रयोग करून त्यातून आलेले पाच हजार रुपये होस्टेलला दिले या मानवतावादी कुमारिकेची ही तळमळ पाहून शाहू महाराजांनी मिस क्लार्क हे तिचे नाव होस्टेलला दिले.

संस्थेच्या 1922 सालच्या अहवालात संस्थेचे उद्देशात "अस्पृश्य वर्गासाठी अस्पृश्यातूनच सुशिक्षित व सुधारणावादी पुढारी निर्माण व्हावे असाही एक उद्देश देण्यात आला आहे तो इतर मागासवर्गीय वसतिगृह नाही अनुकरणीय आहे"[२] या बोर्डिंग मधील एक विद्यार्थी कै. डी एस पवार हे कोल्हापूर पालिकेच्या स्थायी समितीचे चेअरमन होते त्या काळातील भारतातील सर्व नगरपालिकेतील पहिलेच अस्पृश्य वर्गातील ते चेअरमन असावेत पुढे ते आमदार झाले अस्पृश्यांच्या या बोर्डिंग आत सध्या 100 मुले असून त्यापैकी अनेक जण अस्पृश्यत्तर जातीतील आहेत अलीकडच्या काळातील पुरोगामी चळवळींच्या बैठकासाठी सुद्धा या वस्तीग्रहाचा वापर होत आहे याशिवाय दलित चळवळीतील कोल्हापूर जिल्ह्यातील उदयाला आलेले नेतृत्व दत्ता जाधव बाबासाहेब वडगावकर मंगलराव माळगे श्यामप्रसाद कांबळे प्रकाश होलस्वार इत्यादी नेतृत्वाला चर्चा करण्यासाठी किंबहुना रात्रीचा निवारण देण्यासाठी मिस क्लार्क होस्टेलच सुरुवातीच्या काळात उपयोगी पडत होते नामांतराची चळवळ रीडन्सच्या बैठका अन्याय अत्याचारांच्या बैठकांची हुकमी जागा म्हणून या होस्टेल कडे पाहिले जाते एकूणच कोल्हापूरच्या दलितांच्या शैक्षणिक आणि सामाजिक उन्नतीसाठी मिसक्ला होस्टेलचे योगदान फार मोठे आहे.

**वसतिगृह चळवळीची फलनिष्पत्ती:-** छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये विविध जातींची वस्तीग्रह स्थापन केल्यामुळे वस्तीगृहात राहून अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सहज शक्य झाले आणि त्यांनी पुढील काळात महाराष्ट्रातील राजकारण समाजकारण अर्थकारण शिक्षण कला इत्यादी क्षेत्रात नेतृत्व केले यामुळे पुण्याखालोखाल कोल्हापूर हे विद्याभ्यासाचे केंद्र बनले मुंबई ठाण्यापासून ते बेळगाव धारवाड पर्यंत बहुजन समाजाची वस्तीग्रह म्हणजे आपल्या मुलाबाळांच्या भाग्योदयाची केंद्रे भासू लागली या वस्तीगृहात शिकलेल्या विद्यार्थ्यांनी यातून प्रेरणा घेऊन विद्येत मागासलेल्या समाजासाठी वस्तीग्रह स्थापन केली. यामध्ये महाराजांचे शिष्य म्हणून घेणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून ज्ञानगंगा खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवली ठिकठिकाणी हायस्कूल कॉलेज याबाबत गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन केली त्यांच्या शैक्षणिक कार्याची नाळ थेट शाहू महाराजांच्या चळवळीशी जोडली गेली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिक्षणाबाबतची भूमिका:-** "पोट जाळा पण शिक्षण घ्या" अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलितांना आग्रही हाक होती. शिक्षणाने मग ते कितीही उच्च स्तरावरचे घेतले असले तरीही सामाजिक विषमतेतून निर्माण होणाऱ्या अन्यायाचा पाठ दूर होत नाही हे त्यांनी स्वतः अनुभवले होते. परंतु दलितांना सामाजिक न्याय मिळवायचा असेल तर त्यांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांनी ओळखले होते. यासाठी प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षण तर हवे आहेच विद्वत्तेच्या आंतरजातीय किंबहुना आंतरराष्ट्रीय तुलनेत शोभून दिसतील अशी काही माणसे निर्माण करणे ही महत्त्वाचे आहे असे त्यांचे मत होते. अशा माणसांमुळे समाजाला प्रतिष्ठा मिळते. समाजाच्या सर्व घटकांच्या मनात स्वाभिमान जागा करतात व अस्मिता निर्माण करतात हा त्यांचा अनुभव होता. यासाठी त्यांनी मुंबई येथे ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायद्यानुसार या संस्थेची १९४५ साली नोंदणी झाली तिचा नंबर १३७५ हा होता.[३] शिक्षणाबद्दल ते म्हणतात " शिक्षण ही एक पवित्र संस्था आहे शाळेत मने सुसंस्कृत होतात शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याची पवित्रक्षेत्र ते एक राष्ट्रीयतेचे मानवतेचे आणि अज्ञान तम दूर करण्याचे उदात्त कार्य आहे शाळेत सम बुद्धीचे उदात्त निपक्षपाती थोर मनाचे शिक्षक पाहिजेत शिक्षक वर्ग हा राष्ट्राचा सारथी आहे कारण त्याच्या हातात शिक्षणाच्या नाड्या असतात यास्तव शिक्षक कोण असावा यासारखा समाज सुधारण्याच्या दृष्टीने पाहता दुसरा महत्त्वाचा प्रश्न नाही "[४]

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीने महाराष्ट्रात चालवलेली महाविद्यालये:-** १. सिद्धार्थ कला आणि शास्त्र महाविद्यालय मुंबई १९४६, २. सिद्धार्थ वाणिज्य अर्थशास्त्र महाविद्यालय मुंबई १९५३, ३. सिद्धार्थ विधी महाविद्यालय मुंबई १९५६, ४. मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद १९५०, ५. मिलिंद बहुउद्देशीय हायस्कूल औरंगाबाद १९५५, ६. संत गाडगे महाराज विद्यार्थी वस्तीगृह पंढरपूर, ७. सिद्धार्थ प्रकाशन संस्था १९५४, ८. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज महाड, ९. देवी रमाबाई आंबेडकर विद्यार्थी आश्रम दापोली, १०. मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल औरंगाबाद इ.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कोल्हापूर येथे शाळा वसतिगृहे सुरू न करण्यामागची भूमिका:- छत्रपती शाहू महाराजांची समताधिष्ठित शिक्षण व्यवस्था:-** दत्तोबा पवार यांच्यामुळे छत्रपती शाहू महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली तेव्हापासून या दोन महापुरुषांमधील मैत्री अधिक दृढ झाली. छत्रपती शाहूराजांनी डॉक्टर बाबासाहेबांची विद्वत्ता आणि समाजाविषयी त्यांची तळमळ पाहून मूकनायक या त्यांच्या वृत्तपत्राला आर्थिक मदत दिली होती एवढेच नाही तर जातीय

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

व्यवस्थेवरती आधारलेली समाज व्यवस्था मोडीत काढण्यासाठी कागल संस्थान मधील माणगाव येथे १९२० रोजी दक्षिण महाराष्ट्र बहिष्कृत वर्गाची परिषद भरविली व तिचे अध्यक्षपद स्वतः भूषविले याशिवाय छत्रपती शाहू महाराज अस्पृश्यांच्या हितासाठी नवनवीन कायदे करीत होते मुंबई प्रांतातील शिक्षणासाठी जितका पैसा खर्च केला जात होता त्यापेक्षा दुपटी होऊन अधिक कोल्हापूर संस्थानामध्ये शाहू महाराजांनी खर्च केले होते याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती.

शिक्षणाचे महत्त्व सांगताना छत्रपती शाहू महाराज म्हणतात "शिक्षणानेच आमचा तरुण उपाय आहे असे माझे ठाम मत आहे शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये कधीही निपजणार नाही. म्हणूनच सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची हिंदुस्तानला अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतीत आमचा गतकाळ म्हटले म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता म्हणून आणि त्यांच्या मागून झालेल्या शास्त्रकाराने त्यावेळच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातीच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले आणि खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्या मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले."[५] शिक्षणातील अडचणीचे पेशवाईचे उदाहरणे त्यांना शाहू महाराजांनी सांगितले" साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह महाराज हे पेशव्यांच्या ताब्यात असताना लहानपणी लिहिणे वाचणे शिकण्याची त्यांना बंदी होती तेव्हा त्यांच्या पुज्य व धोरणे आईने त्यांना रात्री बारा वाजता उठून ब्राह्मण्य तर पंतोजी कडून लिहिणे वाचणे शिकवण्याचे काम केले" [६] पेशवाईत खुद्द छत्रपतींना चोरून मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत होते मग इतरांची काय अवस्था यामुळे शाहू महाराजांनी अस्पृश्य मुलांच्या स्वतंत्र सोयी सवलती तसेच पुस्तकांची सारी सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल अशी राज आज्ञा १९१९ मध्ये काढली याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना होती. आणि छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये विविध जाती जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी २० वसतिगृहे सुरू केली होती. यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यावरती छत्रपती शाहू महाराजांच्या समता दृष्टीत शैक्षणिक कामाचा प्रभाव होता. या प्रभावामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभेच्या उद्देशांमध्ये वसतिगृहाची भूमिका मांडली होती व ती पुढे कार्यवाहीतही आणली. त्यामुळे छत्रपती शाहू महाराज अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी जे काम कोल्हापूरमध्ये करीत आहेत तेच काम मी महाराष्ट्रामध्ये करीत आहे तेव्हा कोल्हापूरमध्ये आपण स्वतंत्र शिक्षण संस्था काढणे ती चालविणे, वसतिगृहे निर्माण करणे डॉ.आंबेडकरांना नैतिकदृष्ट्या योग्य वाटले नसावे म्हणून दक्षिण महाराष्ट्रात त्यांच्या शिक्षण संस्थेच्या शाखा दिसत नाहीत. याशिवाय दलित बहुजन समाजाच्या शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्याचे आणि तसा नवा शिक्षित वर्ग निर्माण करण्याचे की, जो भारतीय संविधानाशी प्रामाणिक राहील बहुजन समाजाशी प्रतारणा करणार नाही असा वर्ग या तीन जिल्ह्यांमध्ये निर्माण करण्याचे काम कर्मवीर भाऊराव पाटील रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून करत होते. याशिवाय कर्मवीरांची डॉ.आंबेडकरांशी मैत्री होती. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी आपल्या स्वतंत्र शाळा या जिल्ह्यामध्ये सुरू न करता रयत शिक्षण संस्थेला मदत करण्याचेच धोरण स्वीकारले.

**समारोप -** छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण हे मागासवर्गीयांच्यासाठी त्यांच्या उद्धारासाठी अत्यंत अनुकूल होते. महात्मा फुलेंच्या नंतर कोल्हापूरमध्ये मागासवर्गीयांच्यासाठी शिक्षणाचे जे मूलभूत काम केले गेले ते छत्रपती शाहू महाराजांच्या कडून. विविध वसतिगृहे, शाळा, महाविद्यालय यामधून मागासवर्गीय मुलांना आपल्या ज्ञानाची चमक दाखवीता आली. याशिवाय शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांची मैत्री वैचारिक ऋणानुबंध यामुळे बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण महाराष्ट्रात पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून विविध शाळा, महाविद्यालय, वसतिगृहे उभी केली. ती सुरू केली पण कोल्हापूर सातारा या ठिकाणी छत्रपती शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारखे निष्ठावंत बहुजन प्रेमी नेते शैक्षणिक काम करीत असल्यामुळे त्यांनी या ठिकाणी एकही शाळा किंवा वसतिगृह स्थापन केले नाही.

**संदर्भ:-**

१. सगवे विलास (डॉ.), लेख: ' राजर्षी शाहू महाराजांचे अभूतपूर्व शिक्षण कार्य: व्याप्ती व फलश्रूती' पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (संपादक) महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, पृ.५९२

२. शिंदे माधवराव व श्रीपतराव,'भारतातील वस्ती ग्रहांचे आद्य जनक',(लेख), जाधव रमेश (डॉ.) संपादक, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई २०१६ पृ.५९

३. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे दप्तर घटना

४. दाभोळकर देवदत्त (प्राचार्य)"महाराष्ट्रातील शिक्षण व समाज परिवर्तन", शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर पृ.१९

५. पानसरे गोविंद," राजर्षी शाहू वसा आणि वारसा", प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, १९९७

६.कित्ता पृ.१७

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

61

# आपत्ती व्यवस्थापनाचा मानदंड : राजर्षी शाहू महाराज

**प्रा. एम. आय, मुजावर**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना** : इतिहासाच्या खजीन्यामध्ये चिरंतन प्रेरणा देणारी तेजस्वी व्यक्ती म्हणजे शाहू महाराज, आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचे विचार आणि कार्य मोलाचे ठरले, असे एक थोर समाजसुधारक सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते छत्रपती राजर्षी महाराज हे होते. शाहू महाराजांचा राज्यारोहण समारंभ गव्हर्नर लॉर्ड हॅरिसयांचे उपस्थितीत २ एप्रील १८९४ मध्ये संपन्न झाला. शाहू छत्रपतींची कोल्हापूरात राजवट सुरू झाली. खऱ्या अर्थाने ते कोल्हापूर संस्थानचे छत्रपती बनले. शाहू महाराज यांनी करवीरच्या अधिकारांची सुत्रे हाती घेतली. गेली अनेक दशके कोल्हापूरातील जनता याची वाट पाहत होती. या घटनेने संपूर्ण मराठी राष्ट्राला आनंद झाला केसरींच्या अभिनंदनपर लेखात त्यांचे वर्णन करताना लोकमान्य टिळक म्हटले होते “हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रासाठी आनंदाचा दिवस आहे. पण कोल्हापूरच्या लोकांसाठी ही अत्यंत दुर्मीळ संधी आहे.”

**शोधनिबंधाची उद्दीष्टे :** 1) शाहू महाराजांनी दुष्काळावर राबवलेल्या उपाय योजनांचा अभ्यास करणे.
2) शाहू महाराजांच्या प्लेग विषयी मात करण्यासाठी राबवलेल्या उपाय योजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:-** प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केलेला असून लिखित स्वरूपात उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, वर्तमानपत्रे इत्यादीचा आधार घेऊन विश्लेषणात्मक मांडणी करण्यात आलेली आहे.

**आपत्ती व्यवस्थापन:** कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार हाती घेण्यापूर्वी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची कधी पायी तर कधी घोडयावरून पाहणी केली होती. करवीर राज्याला अनेक वर्षे स्थैर्य लाभलेले नव्हते. शिरोळ, गडहिंग्लज गारगोटी भागात ते हिंडले होते. आपल्या राज्यातील लोकांच्या कल्याणासाठी व्यापार करणे आणि त्यांची दु:ख् आणि दारिद्रय दूर करणे हे त्यांचे पहिले कर्तव्य् होते. लोकांच्या सर्वंकश कल्याणाचा राज्यकारभार सुरू झाला. लोक मोठया आशेने राजाकडे पाहू लागले. लोक सुख-समाधानाने राहू लागले होते. तोच संस्थानामध्ये आस्मानी संकटे ऊभी राहीली. त्या संकटांमुळे संपूर्ण जनजिवन विस्कळीत झाले होते. १८९६-१८९९ च्या दरम्यान दुष्काळ आणि प्लेग या दोन संकटांमुळे महाराजाच्या प्रशासकाच्या क्षमतेची कसोटी लागली. नुकत्याच राज्याच्या गादीवर आलेल्या तरूण राजाला हया दुहेरी दुर्धर संकटांना तोंड द्यावे लागले.

**दुष्काळ :** १८९६ च्या उत्तरआर्धात कोल्हापूर संस्थानात दुष्काळामुळे फार गंभिर परिस्थीती निर्माण झाली होती. उन्हामुळे जमीनी करपू लागल्या झाडे झुडपे वाळु लागली. नदी, नाले, विहीरी, तळे कोठेही पाण्याचा एक थेंबही दिसेनासा झाला. लोक वरूण राजाची वाट पाहू लागली. शेतकऱ्यांच्या घरातील धान्याचे साठे संपून गेले. जनावरे डोळया देखत प्राण सोडत होती. जगण्यासाठी लोक गावे सोडत होते. सर्व सामान्य जनता भरडून निघाली. अन्नाच्या किमती वाढल्या. एक मणाचे पोते आधि १ रूपया १४ आन्यांना मिळत होते तेच पोते आता ४ रूपये झाले होते. पावणेतीन रूपयाचे गव्हाचे पोते आता साडेचार रूपये तर साडेतीन रूपये मण आसणारा तांदुळ साडेचार रूपये मण झाला होता. राजर्षी शाहूंनी या संकटाचे गांभीर्य लक्षात घेवून जनतेला धीर दीला. डोंगराळ प्रदेशावर दुष्काळाची परिस्थीती यामुळे पन्हाळा, पेन, भुदरगड व कटकोळ या दुष्काळग्रस्त भागातून शाहू छत्रपतींनी जानेवारी १८९७ पासून ते मे १८९७ पर्यंत लोकांना धीर देतच प्रवास केला. दुष्काळावर मात करण्यासाठी महाराजांनी अनेक उपाय योजना राबवील्या.

**दुष्काळावर उपाययोजना :**

1) दुष्काळाच्या व अवर्षणाच्या काळात अधिकाऱ्यांना निर्णय त्वरीत देता यावे म्हणून त्यांनी पन्हाळयातील राजवाडा व कोल्हापूरचा राजवाडा तसेच ब्रिटीश राजप्रतिनिधींचे कार्यालय ही दुरध्वनीने जोडली.
2) भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी साठेबाजी करणारे व्यापारी शेठजी आणि देव धर्माचा बागलबुवा दाखवून लुटणारे पुरोहित यांच्या गैरवर्तनाल आळा बसेल असे महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची तत्काळ अंमलबजावणी केली.
3) दुष्काळावर नियंत्रण ठेवण्यासाठी धान्य् साठयांची पुनर्रचना केली आणि स्वस्त धान्याची दुकाने उघडली. व्यापाऱ्यांना त्यांनी खरेदी केलेल्या किमतीलाच धान्य् विकण्याचा हुकुम केला.
4) शेतकऱ्याना जमीन करातून मुक्त करून त्यांच्या गुरांना स्वस्तात चारा देण्याची व्यवस्था केली.

5) शाहू छत्रपतींनी कोल्हापूर संस्थानातील विहीरी, तळे, तलाव यांचा शोध घेवून त्यामधील गाळा काढण्याची व्यवस्था केली. लोकांना रोजगार मिळावा आणि पिण्याचे पाणी मिळावे यासाठी विहीरी खोदल्या तलाव, रस्तो, कालवे यांची कामे सूरू केली.
6) शेतकऱ्यानी सोडून दिलेल्या मुक्या जनावरांना जगवण्यासाठी संस्थानात अनेक ठीकाणी छावण्या उघडल्या.
7) अनाथ, अपंग व निराधार लोकांसाठी अन्नछत्रे व अनाथालय काढले. विवीध ठिकाणी नऊ निराधार आश्रम काढले होते. पंन्नास हजार निराधारांना अन्न, वस्त्रे देवून जिवदान दिले.
8) दुष्काळी कामावर जाणाऱ्या स्त्रीयांच्या लहान मुलांसाठी पाळणाघरे उघडण्यात आली आणि त्यांना दुधाचा पुरवठा करण्यात आला.
9) शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात तगाई दिली. तर नोकरदार वर्गाला दुष्काळी भत्ता वाटला. दुष्काळावर मात करण्यासाठी भास्करराव जाधव या अधिकाऱ्याने काम पाहिले होते. १८९६-९७ च्या दुष्काळात संपूर्ण भारतात १० लाख लोकांचे मृत्यु झाले. परंतू कोल्हापूर संस्थानामध्ये एकही भुकबळी गेला नव्हता.

प्लेग : १८९६ च्या प्रारंभी प्लेगची सुरूवात मुंबई येथे झाली. तो हळू हळू सातारा, रत्नागीरी, बेळगांव या भागात पसरला. त्यानंतर त्याचा प्रादुर्भाव कोल्हापूर संस्थानातही झाला. शाहू महाराजांनी हे ही आव्हाण स्विकारले. त्याकाळी वैद्यकीय तंत्रज्ञान आणि सोयी सुविधा नसतानाही शाहू महाराजांनी व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर प्लेगच्या साथीचा सामना केला होता. असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे महानगराध्यक्ष अभिजीत वाघ यांनी केली.

प्लेग विषयी उपाययोजना :
1) प्लेग विषयी सविस्तर माहीती देणारा जाहीरनामा १० डिसेंबर १८९८ रोजी प्रसिद्ध केला.
2) पटकीच्या दिवसात खेडयापाडयात स्वच्छता राखली व प्लेगग्रस्त गावांची वस्ती हलवली. अनेक गावांचे पाण्याच्या ठिकाणी स्थलांतर केले.
3) कोटीतिर्थ येथे प्लेग हॉस्पीटल उघडले. त्या रूग्नालयाला महाराज दररोज भेट देत. सरकारने फक्त औषधोपचार केले. ठिकठिकाणी सुसज्ज् दवाखाने सुरू केले. १९१० मध्ये आलेले लसीकरण सक्तीचे केले. त्यानी स्व्त:सह सर्व परिवाराला व अधिकाऱ्याना देखील लसिकरण करून घेतले.
4) होमिओपॅथी मध्ये प्लेगवर औषध असल्याचे त्यांना कळाले, त्यानंतर देशातील पहिले सार्वजनिक होमिओपॅथी रुग्णालय कोल्हापुरात सुरू झाले.
5) अन्य राज्यातून येणाऱ्या प्रवाशांची वैद्यकीय तपासनी होऊनच प्रवेश दिला जाऊ लागला.
6) लोकांमधील अंधश्रध्दा दूर करण्यासाठी प्रबोधन कार्य सुरू केले. उपचारा संबंधीची माहीती पत्रके गावोगावी वाटण्यात आली.
7) शाहू महाराजांनी संपूर्ण कोल्हापूर रिकामी केली. त्यावेळी समाजावर अंधश्रद्धेचा प्रचंड पगडा होता. पण शाहू महाराजांनी रयतेला वैज्ञानिक माहिती देण्याचे काम हाती घेतले. लोकांना व्यवस्थित माहिती मिळावी यासाठी हजारो पत्रके छापली ती वाटली गेली. ज्यांना वाचता येत नाही, त्यांच्यासाठी गावागावात त्यांचे वाचन करण्यात आले.
8) प्लेगची बातमी देण्याऱ्यास बक्षीस देण्यात आले. प्लेगग्रस्त् लोकांच्या निरिक्षणासाठी छावण्या उघडण्यात आल्या.

निष्कर्ष: - शाहू महाराजांनी आपल्या प्रजाजनांना प्लेगच्या व दुष्काळाच्या तावडीतून सुखरूप पणे बाहेर काढण्यासाठी अविरत प्रयत्न् केले. शाहू महारांजांच्या अथक आणि नियोजन बध्द प्रयत्नामुळे दुष्काळाचा पराभव झाला आणि प्लेगचा प्रादुर्भाव थांबला. शाहू महाराज हे आपल्या प्रजेच्या हिताची आणि सुरक्षीततेची रात्रंदीवस काळजी करणारे होते. १८९६ - १८९९ च्या दरम्यान दुष्काळ आणि प्लेग या संकटाशी शाहू छत्रपतींनी दिलेला लढा यावरून त्यांचे आपत्ती कालीन व्यवस्थापकिय कौशल्य् दिसुन येतात. वयाच्या पस्तीसाव्या वर्षी हा राजा दुष्काळ आणि प्लेग या संकटाशी प्रजेच्या संरक्षणासाठी निर्धाराने लढला म्हणूनच तो लोकराजा या पदवीला पात्र झाला.

संदर्भ :
1) आपत्ती व्यवस्थापनाचा मानदंड : विशेष लेख - प्रा. डॉ. रमेश जाधव
2) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : प्रा. डॉ. रमेश जाधव
3) राजर्षी शाहू छत्रपती : एक समाजक्रांतीकारी राजा - डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार
4) समाज क्रांतिकारक-राजर्षी शाहू महाराज - डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर
5) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान-एक अभ्यास – प्रदीप पाटील

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**62**

# राजर्षी शाहूंचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य

**प्रा. डॉ. के. आर. गावडे**
इतिहास विभाग प्रमुख
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड

---

**प्रस्तावना:** राजर्षी शाहू छत्रपतींनी 2 एप्रिल 1894 रोजी कोल्हापूर गादीची राज्यसूत्रे आपल्या हाती घेतली. त्यावेळी केसरीकार टिळकांनी 'करवीर क्षेत्री राजकीय कपिलाष्ठीचा योग' या अग्रलेखात छत्रपती शाहूंना शुभेच्छा दिल्या. तो दिवस खरोखरीच केवळ कोल्हापूर संस्थानालाच नव्हे तर अखिल महाराष्ट्राला मंगलदायक ठरला. छत्रपती शिवाजी महाराजानंतरचा लोकाभिमुख, प्रजहितदक्ष, जनते शहाणी करून सोडणारा, त्यांची 'अवनती थोपवून त्यांना उन्नतीकडे नेणारा असा राजा महाराष्ट्रात प्रथमच झाला. ते ज्ञानी व क्रियाशील होते. राजा असूनही रयतेमध्ये मोकळेपणाने फिरणारे होते. त्यांनी सर्व थरातील प्रजेचे जीवन जवळून पाहिले. अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य हे मानवाचे तीन मोठे शत्रू आहेत हे त्यांना ज्ञात होते. अस्पृश्य व्यक्तीच्या सावलीचा ही विटाळ मानणारी विकृत विचारधारा मुळापासून उपटून टाकण्यासाठी त्यांनी आयुष्यभर आपल्या जीवनाचे रान केले. राजर्षी शाहूंनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी पुढील कार्य केले.

**की वर्ड्स:** अस्पृश्यांसाठी शिक्षण, परिषदा व प्रबोधन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मदत, अस्पृश्यता मुक्तीचे जाहीरनामे, अस्पृश्योद्धार प्रत्यक्ष कृती कार्यक्रम

**उद्दिष्टे:** प्रस्तुत शोधपत्राची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

1. शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निर्मूलनाचे विचार समजावून घेणे.
2. शाहू महाराज यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :** राजर्षी शाहूंचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य या प्रस्तुत शोधपत्रासाठी विविध प्राथमिक व दुय्यम ऐतिहासिक साधनांचा उपयोग करून त्याचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून सदर शोधपत्रासाठी त्याचा उपयोग केला आहे.

**1.अस्पृश्यांसाठी शिक्षण:** अस्पृश्यांच्या वाट्याला आणलेले तिरस्कारमय जीवन हे त्यांच्या अज्ञानाचा एक भाग होते. हा अज्ञानमय अंध:कार त्यांच्या जीवनातून दूर होऊन त्यांना ज्ञानाचा प्रकाश मिळावा, ते मानसिक गुलामगिरीतून मुक्त व्हावेत यासाठी त्यांनी 'अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन करून भास्करराव जाधव त्याचे प्रमुख केले.[1] अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व राहण्यासाठी शाहूंनी कोल्हापुरात 1908 साली 'मिस क्लार्क' हे वसतिगृह सुरू केले.[2] राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी केलेल्या खास प्रयत्नांचे उल्लेख त्यांच्या सह निवडक आदेशात मिळतात. कोल्हापुरात चांभार, महार इ. अस्पृश्य लोकांसाठी असलेली 'रात्रीची शाळा' त्यांनी 28 नोव्हेंबर 1906 च्या आदेशाने कायम केली. [3]

4 ऑक्टोबर 1907 च्या एका आदेशान्वये कोल्हापुरातील चांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील 'मुलींच्या शाळेसाठी' मंजुरी देण्यात आली. तसेच त्या शाळेसाठी दरसाल रुपये 96 खर्चाची तरतूद ही संस्थांच्या स्त्री शिक्षणाच्या अंदाजपत्रकातून करण्यात आली.[4] भास्करराव जाधवांनी 1909 साली स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वसतिगृहास इमारतीसाठी जागा उपलब्ध करून दिली. राजर्षी शाहूंनी संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गात सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आलयाचा आदेश 24 नोव्हेंबर 1911 रोजी काढला.[5] दैनावस्थेतील अस्पृश्यांना शिक्षणासाठी उत्तेजन द्यावे म्हणून त्यांनी 7 एप्रिल 1919 रोजी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी पुस्तके, पाट्या, पेन्सिली मोफत देण्यासाठी अडीच हजार रुपये मंजूर केले. तलाठी वर्गातील अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एप्रिल 1919 साली आठ रुपये शिष्यवृत्ती जाहीर केली. [6]राजर्षी शाहूंनी 24 सप्टेंबर 1919 रोजी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करून त्यांना सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घ्यावे असा आदेश दिला. धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांच्या स्मरणार्थ शाहू राजांनी 1920 साली 10000 रुपये गुंतवून त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपये प्रमाणे आठ शिष्यवृत्ती सुरू केल्या. त्यापैकी तीन शिष्यवृत्ती अस्पृश्य मुलींच्यासाठी ठेवल्या होत्या.[7] राजर्षी शाहूंच्या राज्यारोहणाच्या वेळेस संस्थानात अस्पृश्यांसाठी फक्त 5 शाळा होत्या. त्यामध्ये 168 विद्यार्थी शिक्षण घेत होते तेच प्रमाण 1912 साली अस्पृश्यांसाठी 27 शाळापर्यंत गेले व त्यामध्ये 636 विद्यार्थी शिक्षण घेत होते.[8] यावरूनच अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या क्षेत्रात राजर्षी शाहूंनी केलेल्या धाडसी व क्रांतिकारी कार्याची कल्पना येते.

**2.परिषदा व प्रबोधन**: राजर्षी शाहू अस्पृश्यांच्यात जनजागृती करण्यासाठी सातत्याने झटत होते. अस्पृश्यांच्या अनेक परिषदा त्यांनी भरविल्या. त्या परिषदांचे अध्यक्ष स्थानही त्यांनी भूषविले. अस्पृश्यांच्या जनजागृतीसाठी त्यांनी माणगाव ते दिल्ली आणि नागपूर ते हुबळीपर्यंत भाषणे दिली. मार्च 1920 च्या माणगाव येथील अस्पृश्यता निर्मूलन परिषदेत ते म्हणाले की "इतर देशात मनुष्याला मनुष्यप्रमाणे जसे वागवतात तसे आपल्या देशात वागविले पाहिजे. तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार? तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हांस नको आहेत. कृतीने जातिभेद मोडून आम्हांस मनुष्या प्रमाणे वागवतील असे पाहिजेत'.[9] नाशिक येथे 15 एप्रिल 1920 रोजी श्री उदोजी मराठा विद्या वसतिगृहाच्या कोनशीला समारंभाच्या वेळी शाहू महाराज म्हणाले की, 'जातिभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोमाने केले पाहिजेत. शाहूंनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्यात जनजागृती केली. त्यांना आपल्या हक्काची जाणीव करून दिली.

**3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मदत:** राजर्षी शाहूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यास मोठे सहाय्य केले. त्यांना आर्थिक सहाय्य देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'मूकनायक' नावाचे पाक्षिक काढण्यास मदत केली.[10] डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 1920 साली उच्च शिक्षण घेण्यासाठी लंडनला जाण्याकरिता राजर्षी शाहूंनी आर्थिक सहाय्य केले. माणगाव येथे मार्च 1920 रोजी अस्पृश्यता निवारण परिषद शाहूंनी आयोजित केली. त्याचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले. बाबासाहेब आंबेडकर हेच भाविकाळात अस्पृश्यांचे उद्धारक असतील आणि तेच तुमचे नेते असतील असा आशावाद व्यक्त केला. अस्पृश्य समाजाच्या मुलाने मिळविलेल्या ज्ञानाचा गौरव करण्यासाठी शाहूंनी कोल्हापुरात बाबासाहेबांची हत्तीवरून मिरवणूक काढून साखर वाटली. सोनतळी कॅम्पवर बाबासाहेबांसमवेत सहभोजन घेतले. कोल्हापूरी जरी पटका देऊन गौरव केला.

**4. अस्पृश्यता मुक्तीचे जाहीरनामे:**

**अ. महार वतने रद्दबातल केली**: महारवतनामुळे त्यांचे जीवन अत्यंत हलाखीचे बनले होते. ते सवर्णाच्या गुलामगिरीत कैद झाले होते त्यांची यातून मुक्तता करण्यासाठी राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात 1918 साली महारांची बलुते बंद केली. त्या जमिनी त्यांच्या नावावर रयतवारीने करून दिल्या.[11] कोल्हापूर संस्थानातील महारांची महार वतनाच्या गुलामगिरीतून मुक्तता केली.

**ब. सरकारी व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली:**

आपल्या संस्थानातून अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी अनेक जाहीरनामी काढले. 1 जानेवारी 1919 रोजी त्यांनी महसूल व न्याय खाते आणि आरोग्य विभागासाठी जाहीरनामा काढून अस्पृश्यता पाळण्यास मनाई केली. 20 जानेवारी व ऑगस्ट 1919 मध्येच विद्या खात्यासाठी ही हा जाहीरनामा काढला.[12] राजर्षी शाहूंनी 6 सप्टेंबर 1919 रोजी सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाऊसेस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पाणुते,सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही.[13] असा अस्पृश्यता निवारण्याचा जाहीरनामा तमाम जनतेसाठी काढला. हे सर्व जाहीरनामे त्यांनी गॅझेट करून घेतले. महार मांगादी अस्पृश्यांना दिलेल्या मानवी हक्काच्या विरुद्ध जे दंगेधोपे करतील त्यांना कडक शासन होईल असे फर्मानेही काढले.

**क. अस्पृश्यांना सरकारी सेवेत सामावून घेतले:** शाहूंनी पाटलांच्या मुलांना त्यांच्या कारभाराचे ज्ञान देण्यासाठी इसवी सन 1913 ला 'पाटील शाळा' काढली. तिचे नामकरण 'दिल्ली दरबार पाटील शाळा' असे झाले. 23 फेब्रुवारी 1918 रोजी शाहूंनी कुलकर्णी वतने बंद करून तलाठी पद्धत सुरू केली. महार समाजातील आणि इतर अस्पृश्य वर्गातील तरुणांना शाहू राजांनी तलाठी पदी नेमले.[14] दत्तोबा पवारांची कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली. त्यांनी 1917 साली संस्थांच्या लष्करी फडात चार अस्पृश्यांची नेमणूक केली. त्यापैकी दोघे महार होते. तर दोघे मांग होते. त्यांनी अस्पृश्यांपैकी काहींची मुलकी खात्यात 'दप्तरबंद' म्हणून तर 20 महार व्यक्तींची पोलीस म्हणून नेमणुका केल्या.[15] शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाचा बाऊ न करता त्यांना आपल्या अनेक खात्यात सामावून घेतले. सरकारी पागेत, हत्ती खाण्यात, शिकारी विभागात, टपाल खात्यात त्यांना संधी दिली. काहींना माहूत बनवले तर काहींना आपल्या राज परिवाराचे कोचमन/ ड्रायव्हर बनविले.

**ड. अस्पृश्योद्धार प्रत्यक्ष कृती कार्यक्रम:** लोकांच्या मनातून शिवाशिव, उच निचता ही भावना नष्ट व्हावी म्हणून राजर्षी शाहूंनी गंगाधर कांबळे या मुलास सत्यसुधारक हॉटेल काढून दिले.[16] ते नेहमी तेथे चहा पिण्यास जात व आपल्या समवेत सर्व लोकांनाही सोबत नेत. ते महार, मांग, कातकरी, बुरुड यांना पंक्तीस घेऊन जेवत असत. त्यांच्या मडक्यातले पाणी ते पीत असत. ते त्यांना सोबत घेऊन दौरे करत असत.[17] राजकन्या अक्कासाहेब यांच्या लग्नाच्या वरातीत कमरेस तलवारी बांधलेले, गाड्या घोड्यावरील रुबाबदार अस्पृश्य कोचमननी व राजेशाही हत्तीवरील संस्थानी पोशाखातील माहुतांनी आपल्याबरोबर समस्त अस्पृश्य समाजाची ही प्रतिष्ठा वाढवली होती. भंगी, महार व चांभार या जातीतील पैलवानांना त्यांच्या अस्पृश्यतेमुळे जोड मिळत नसे. तेव्हा शाहू महाराजांनी भंग्यांना 'पंडीत'

महाराना 'जाट' तर चांभार पैलवानांना 'सरदार' ही नवीन नावे दिली.[18] राजर्षी शाहूंनी संधी, योग्य शिक्षण व प्रोत्साहन मिळाल्यास कोणतेही लहान मोठे काम करण्याची लायकी आपल्या समाजाच्या अंगी आहे याची जाणीव त्यास व इतरांस ही करून दिली.

**निष्कर्ष :** राजर्षी शाहूंचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य अत्यंत क्रांतिकारी आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील इतर प्रांतात ही अशी महान क्रांती पूर्वी घडली नव्हती. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या व्यक्ती तलाठी, वकील, नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नेमणे. त्यांना पैलवान करणे, पोलीस व दप्तर बंदी नेमणे हे दुर्मिळ क्रांतीमय दृश्य महाराष्ट्रातच दिसले. राजर्षी शाहूंनी शाळा, तलाव, रुग्णालये, कचेऱ्या, राजवाडा, राजांची पंगत ही सर्व हरिजनांना खुली केली. त्यांची हजेरी व अवहेलना बंद करून त्यांचे माणुसकीचे हक्क परत दिले. त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून नोकऱ्या दिल्या. धंदे काढण्यास उत्तेजन दिले. एका अस्पृश्यास उपहारगृह काढून देऊन त्या उपहारगृहात महाराज स्वतः चहा घेऊ लागले. त्यांनी महार, मांगांना माहुत व कोचमन म्हणून नेमले. राजकन्येच्या विवाहाच्या वेळी इतर नागरिकांबरोबर अस्पृश्यांनाही पाहुण्यांच्या आदर सत्काराची कामे देऊन त्यांनी त्या समारंभात त्यांना मिरवले. म्हणूनच त्यांच्या कार्याचा गौरव करताना धनंजय किर म्हणतात "मानवी हक्काचा जाहीरनामा घोषित न करता दलितांना आणि पद दलितांना त्यांचे मानवी हक्क परत देण्याची ही कृती म्हणजे युगप्रवर्तक धैर्याची नि कृतिशूरपणाची पताकाच होय".

**संदर्भग्रंथ सूची**

1.पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती 2007, पृ.72
2. कित्ता, पृ.73
3. कित्ता, पृ.74
4.कीर धनंजय, प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती व्याख्यानमाला, डॉ. इथापे उषा, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मार्च 1970, पृ. 13
5. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, मुंबई 1979 पृ.42
6. संगवे विलास (संपा.), शाहू छत्रपती, राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, खंड IX शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, 2005 पृ. 58
7. कित्ता, पृ.63
8. पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कित्ता, पृ. 82
9. जाधव भ.बा., (संपा.) राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, १९७१ पृ. 29
10. खैरमोडे जां.भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड 1, पुणे, 1992 पृ. 86
11. साळुंखे पी.बी. (संपा.) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, 1976, पृ. 103
12. पवार जयसिंगराव व शिंदे विजयराव (संपा) विजय मराठा राजर्षी शाहू दर्शन, विजय मराठा, कोल्हापूर 2011, पृ. 87
13. मून वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक 20 मे मुंबई 1927 पृ. 23
14. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे, 1989 पृ. 74
15. . पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कित्ता, पृ. 85
16. लट्टे अ.बा. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, 2002 पृष्ठ 235
17. कुरणे द. य. (संपा) कै. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आठवणी, पृ. 63
18. पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कित्ता, पृ.135

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

63

# स्त्री उद्धारकर्ते:राजर्षी छत्रपती शाहू महाराज

**प्रा. डॉ. सौ. सुनिता एस. राठोड**
श्री शहाजी छ. महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.

---

**प्रास्ताविक -**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये फुले, शाहू, आंबेडकर यांचे योगदान मोलाचे आहे. यामध्ये शाहू महाराजांचे वेगळेपण म्हणजे राजा असूनही त्यांनी आपल्या राजदंडाचा वापर प्रत्येक घटकांच्या उन्नतीसाठी केला आहे. महात्मा फुलेंनी महाराष्ट्रात समतेची बीजे पेरली. त्यांनी शुद्रातिशुद्रांना, स्त्रीयांना गुलामगिरीच्या आणि अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढण्याचे कार्य केले आहे. महात्मा फुलेंची ही परंपरा खंडीत न होता ती शाहू महाराजांच्या कार्यातून प्रवाहित होत राहिली. ब्रिटीश राजवट असताना शाहू महाराजांनी केलेले कार्य हे संपूर्ण भारतात अभिनव स्वरूपाचे होते. शाहू महाराजांचे कार्य हे उभे (Vertical) होते. सर्वस्तरांना स्पर्श करणारे होते.

शाहू महाराजांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत. यामध्ये दुर्बल घटकांच्याकरिता शिक्षण, शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी कार्य, उद्योगधंद्याविषयी धोरण, प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण विषयक धोरण, शिष्यवृत्ती, वसतिगृहाची व्यवस्था इत्यादी कार्यांचा उल्लेख होतो. यातीलच एक अतिशय महत्त्वाचा पैलू म्हणजे स्त्रियांची उन्नती. स्त्री शिक्षण, स्त्री उद्धारासाठी केलेले कार्य होय. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले कार्य, सामाजिक सुधारणा व स्त्रियांना आत्मनिर्भर व आत्मसन्मानित बनविण्यासाठी व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी केलेले कायदे आणि सद्यस्थिती याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. शाहू महाराजांचे हे महत्त्वपूर्ण विचार विद्यार्थ्यांपर्यंत, समाजापर्यंत पोहोचविणे आपले कर्तव्य आहे. या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे ठरते.

**उद्दिष्ट्ये**

1) राजर्षी छ. शाहू महाराजांचे स्त्री मुक्ती विषयक कार्य अभ्यासणे.
2) राजर्षी छ. शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य अभ्यासणे.
3) राजर्षी छ. शाहू महाराजांचे स्त्री सुधारणेविषयीचे कायदे अभ्यासणे.

**गृहीतके**

1) स्त्री सुधारणाविषयक कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही.
2) अजुनही स्त्रियांकडे पाहण्याची समाजाची मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही.

**संशोधन पध्दती -** प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलन सामग्रीवर आधारित आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके व इंटरनेटच्या सहाय्याने वस्तूस्थितीच्या आधारे माहितीचे संकलन केले आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी -**

भारतातील समाज व्यवस्थेकडे पाहिल्यास भारतीय समाज हा वर्णावर, जातीवर आधारित आहे. ही व्यवस्थाच मुळात विषमता निर्माण करणारी पुरुषप्रधान संस्कृतीचे समर्थन करणारी विषमता देवांशी, स्वर्गाशी, नरकाशी, पुनर्जन्माशी जोडलेली आहे. ज्यांना अशा विषमतेची झळ पोहचली, त्यांनी बंड करणे स्वाभाविक आहे. परंतु बंड होण्यास कितीतरी वर्षे लोटली गेली. वेगळेपण म्हणजे एक राजा असून त्यांना कोणतीही झळ न पोहचता बंड करणे तसे व्यवहारिक नाही. परंतु महाराष्ट्रातील करवीर संस्थानामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी प्रतिगामी व्यवस्थेविरूद्ध बंड केले. ब्राह्मणी परंपरेमध्ये भरडल्या जाणाऱ्या आणि उपेक्षित, किड्या मुंग्यासारखे आयुष्य जगणाऱ्या संख्येने मोठ्या समाजाला माणूस म्हणून जगण्याकरिता स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सन्मान मिळवून देण्यासाठी शाहू महाराजांनी बंड केले आणि समाजाची रचना, सुसंस्कृतपणा, माणुसकी, परिवर्तन आणि न्यायाशी जोडली. अशी सामाजिक नवरचना करणारा राजा म्हणून शाहू महाराजांचे नाव अजरामर आहे. वर्षानुवर्षे भारतीय समाजात दलित, महिला, भटके हे पिळवणुकीचे साधन बनले आहेत आणि ज्या समाजात निम्याहून अधिक संख्येने महिला असतील, त्यांना दुय्यम स्थान असेल, तर अशा समाजाची कधीच प्रगती होणार नाही. भारताच्या बाबतीत हेच घडले. भारत प्रगतीत मागे पडला. कारण भारताने आपली निम्मी शक्ती कुजविली आहे. स्त्रीला गुलाम बनवून तिला दुय्यम स्थान दिले आहे. कधी तिला हुंड्यासाठी जाळले, ती विधवा झाली म्हणून तिला पतीच्या चितेवर जाळून टाकले, तर कधी मुंडन करून अंधारात कोंडले. सामाजिक विकासाच्या जडण-

घडणीमध्ये प्रत्येक घटकाचा सहभाग असणे महत्त्वाचे असते. परंतु आपल्या भारतात तर या महत्त्वपूर्ण घटकाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचे काम केले आहे.

आपल्या भारतीय समाजात स्त्रियांच्या वाट्याला जेवढ्या यातना आल्या आहेत, तेवढ्या इतर कोणत्याही समाजात आल्या नसाव्यात. स्त्री एकाचवेळी देवी, माता होती आणि बलात्काराचे साधनही होती. संस्कृतीच्या ओझ्याखाली दबल्या गेलेल्या धार्मिक रुढी-परंपरा यामुळे जखमी झालेल्या स्त्रीला वाचविण्यासाठी बुद्धापासून प्रयत्न सुरू झाले आहेत. महात्मा फुले यांनी या सर्व प्रयत्नांना चळवळीचे स्वरूप दिले. स्त्री सुद्धा माणूस आहे. तिचे भावविश्व, कर्तबगारी, तिचे जग, तिचे मोठेपण या सर्वांचा महात्मा फुलेंनी तपशीलवार विचार केला आणि भारतीय संस्कृतीला सुरुंग लावणारी गोष्ट केली. ती म्हणजे पुण्यात स्त्रियांच्यासाठी शाळा सुरू केली व आपल्या परीने प्रयत्न सुरू केले. त्यांच्याकडे धनसंपत्ती नव्हती, राजकीय सत्ता नव्हती, त्यांनी सनातनीचे घाव झेलत स्त्री मुक्तीची लढाई पुढे नेली. त्यांच्यानंतर शाहू महाराजांनी स्वतःकडे धनसत्ता आणि राजसत्ता असताना याचा वापर स्वतःसाठी, ऐषआरामासाठी करण्याऐवजी या सत्तेचा वापर समाजाच्या कल्याणासाठी स्त्रियांच्या उद्धारासाठी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**स्त्री मुक्ती विषयक शाहू महाराजांची भूमिका -** शाहू महाराजांनी केलेले स्त्री मुक्तीचे कार्य दोन पातळीवरील दर्शक ठरते. एक म्हणजे स्त्री शिक्षीत झाली पाहिजे. यासाठीचे प्रयत्न आणि स्त्रियांना स्वातंत्र्य प्राप्त व्हावे, यासाठीचे केलेले कायदे होय. शाहू महाराजांनी जे 19 व्या शतकाच्या सुरुवातीस स्त्री मुक्तीचे कार्य केले ते 20 व्या शतकातील स्त्री मुक्ती चळवळीचे प्रवेशद्वार ठरले आहे. महाराजांचे हे कार्य जागतिक दर्जाचे होते. जागतिक पातळीवर ज्यावेळी उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, जहालवादी स्त्रीवाद आणि समाजवादी स्त्रीवाद अशी मांडणी केली जात होती, त्यावेळी शाहू महाराजांचे स्त्री मुक्तीचे कार्य हे उदारमतवादी स्त्री वादामध्ये बसणारे होते.

**शाहू महाराजांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य -**राजर्षी छ. शाहू महाराजांच्या परिवर्तनवादी विचारसरणीमध्ये व्यापक अशा सामाजिक समतेची उत्स्फुर्त जाणीव होती. या जाणिवेतूनच त्यांनी स्त्रियांचा उद्धार करण्याचे कार्य हाती घेतले. स्त्री दास्याची शृंखला खंडीत करायची असेल तर प्रथम स्त्री शिक्षित झाली पाहिजे. याची जाणीव महात्मा फुले यांच्याप्रमाणे शाहू महाराजांनाही झाली. त्यानंतर स्त्री शिक्षण हा त्यांच्या परिवर्तनवादी कार्याचा एक भागच बनला. कोल्हापूर संस्थानचा कारभार त्यांच्या हाती येताच त्यांनी शिक्षण प्रसाराचे व्रत हाती घेतले आणि स्त्री शिक्षण विषयक पुढीलप्रमाणे कार्य केले आहे.

**सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले-** प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण असून हा सर्वांचा अधिकार असून ते सर्वांना घेता आले पाहिजे. त्यामुळे महाराजांनी 24 जुलै 1917 ला आपल्या संस्थानामध्ये हुकूम काढला. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे आहे आणि या प्राथमिक शिक्षणावर जो खर्च करावा लागत होता. तो खर्च त्यांनी आपल्या संस्थानाच्या उत्पन्नातून करत असत. पुढे या खर्चामध्ये वाढ होत गेली. शाहू महाराजांच्या या शैक्षणिक कार्यामध्ये स्त्री शिक्षणाचा समावेश होता. त्यांनी डोंगराळ, मागास व ग्रामीण भागात मुलींच्यासाठी शाळा काढल्या. त्यांनी आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काही वर्षातच भुदरगडसारख्या सह्याद्री जवळच्या मागास भागात मुलींच्यासाठी शाळा स्थापन केल्या व ज्या ठिकाणी मुलींच्या शाळा स्वतंत्र नाहीत अशा ठिकाणी मुलींनी शाळेत यावे व मुलांच्या बरोबरीने एकत्रित शिक्षण घ्यावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मुलींना शिक्षित करण्यासाठी समाजातील जातीभेदचा विळखा सैल होण्याची वाट न पाहता त्यांनी चांभार व ढोर मुलींच्यासाठी स्वतंत्र शाळा काढून त्यांना शिक्षणाची दारे खुली केली. इतकेच नाही तर मुलींच्या शिक्षणामध्ये शिक्षकांनी अधिक रस घ्यावा म्हणून त्यांनी मुलांच्या शाळेत पास होणाऱ्या मुलींच्या संख्येवर तेथील शिक्षकांना बक्षीसे देण्याची अभिनव कल्पना राबविली.

**प्रौढ स्त्री शिक्षण-** प्रौढ स्त्रियांच्या बाबतीतही त्यांनी विशेष लक्ष दिले आहे. यासाठी एक खास हुकूम जाहीर केला की, मागास जातीतील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या प्रौढ स्त्रियांना राहण्याची व जेवणाची सर्व व्यवस्था दरबाराकडून मोफत केली जाईल. हुषार मुलींचे शिक्षण खंडीत होऊ नये यासाठी त्यांनी अशा मुलींच्या पुढील शिक्षणासाठी दरबारच्यावतीने शिष्यवृत्ती सुरू केली. आपल्या कन्या आक्कासाहेब महाराज यांच्या विवाह प्रित्यर्थही त्यांनी इयत्ता 4 थीच्या वार्षिक परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनींसाठी प्रत्येकी रुपये 40 अशा शिष्यवृत्त्या सुरू ठेवल्या. ही शिष्यवृत्ती त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर गुजरातमध्येही सुरू केली.

**उच्च शिक्षण व अधिकार -** शाहू महाराजांनी फक्त मुलींच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावरच भर दिला नाही तर त्यांना उच्च शिक्षण देण्याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. अत्रिकाबाई डॅनियल बेकर या ख्रिश्चन मुलीला उच्च शिक्षणासाठी पुण्याला पाठविले. राधाबाई सुर्यवंशी, ताराबाई खानोलकर यांच्यासह पाच मुलींना त्यांनी मुंबईला उच्च शिक्षणासाठी पाठविले. कृष्णाबाई केळवकर यांना मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवून त्यांना डॉक्टर बनविले. पुढे याच कृष्णाबाईना उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी

E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

इंग्लंडला पाठविले. ही शाहू महाराजांच्या प्रोत्साहानाने उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांची इतिहासातील ज्ञात उदाहरणे आहेत.

**सर्वांगीण विकासासाठी शिक्षण -**शाहू महाराजांचा स्त्री उन्नतीविषयीचा दृष्टिकोन स्त्री कर्तृत्वाला शिखर मिळवून देणारा होता. त्यांनी कोल्हापूरमध्ये फिमेल ट्रेनिंग स्कूल सुरू केले आणि तेथे रखमाबाई केळवकर या हुषार स्त्री ची शिक्षिका म्हणून नेमणूक केली. रखमाबाईंनी आपली निवड सार्थ ठरवत कोल्हापूर संस्थानातील स्त्री शिक्षणाला चालना दिली. महाराज केवळ सर्व स्तरावर स्त्री शिक्षणाची दारे खुली करून थांबले नाहीत तर स्त्रियांच्या राजकीय सहभागाचीही त्यांना गरज वाटत होती. त्यामुळे त्यांनी 1895 मध्ये मुंबईमध्ये भरलेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाला कृष्णाबाई व रखमाबाई केळवकर या दोन हुशार भगिनींना स्वयंसेविका म्हणून कोल्हापूरमधून पाठविले होते. याबरोबरच शाहू महाराजांचा स्त्री शिक्षणाचा परिघ, त्यांची स्नुषा इंदुमती देवी यांचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. इंदुमती देवी 11 व्या वर्षी विधवा झाल्या. त्यावेळी सर्व राजकुटुंबाचा रोष पत्करून महाराजांनी त्यांना शिक्षित करण्याचे ठरविले. महाराजांच्यासारखा कर्ता आणि पोलादी मनाचा सासरा इंदुमतीच्या पाठीशी उभा राहिला. महाराजांनी इंदुमतींना केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही तर त्यांना जीवनातील अनंत आव्हानांना सामोरे जाता यावे म्हणून सारथ्य, शिकार, अश्वारोहण, मोटार ड्रायव्हिंग अशा विविध गोष्ट शिकविल्या. अशाप्रकारे स्त्री जीवनामध्ये शिक्षणाचे वंगण घातल्याशिवाय तिच्या परिवर्तनाचे चाक फिरणार नाही, हे महाराजांनी ओळखले होते.

**स्त्रीयांच्या मानवी हक्काचा रक्षणकर्ता: शाहू महाराजांचे स्त्री सुधारणेविषयक कायदे -**शाहू महाराजांना याचीही जाणीव होती की, स्त्री जीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी जहाल सामाजिक परिवर्तनाची गरज आहे. स्त्रीला माणूस म्हणून जगण्यासाठी फक्त शिक्षण देवून चालणार नाही तर स्त्री दास्य विमोचनाचे कायदे गरजेचे आहेत. म्हणून त्यांनी स्त्री उद्धाराचे कायदे केले. यामध्ये -

1) **विधवा पुनर्विवाह कायदा -** सन 1917 मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा आपल्या संस्थानात करून हिंदू धर्मशास्त्रानी व सामाजिक बंधनांनी विधवा स्त्रियांना पुनर्विवाहास बंदी होती, ती कायदेशीर मार्गाने दूर केली. ते फक्त हा कादा करून थांबले नाही तर त्यांनी आपली स्नुषा इंदुमतीसमोरही पुनर्विवाहाचा पर्याय ठेवला. पतीच्या निधनानंतर त्या स्त्रीला पुढील आयुष्य अतिशय जिकीरीचे होते. कुटुंबामध्ये आणि समाजात तिला सन्मान दिला जात नाही. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये तिला सहभागी होता येत नाही. बऱ्याचवेळा पतीच्या मृत्यूला, पत्नीलाच जबाबदार मानले जाते. त्यामुळे शाहू महाराजांनी विधवा विवाह कसा आवश्यक आहे, याचा आपल्या संस्थानाबरोबर संस्थानाबाहेरही ऊहापोह केला आहे.

2) **आंतरजातीय व आंतरधर्मिय विवाह कायदा -**स्त्री उद्धाराबरोबरच राष्ट्रहिताला पुष्टी देणारा आंतरजातीय, आंतरधर्मिय विवाह कायदा शाहू महाराजांनी 1919 मध्ये केला. महाराजांनी हे कायदे केले. तो काळ महिलाविषयक सुधारणांना मोठ्या प्रमाणावर विरोध करणारा होता. एका बाजूला धर्मातील हस्तक्षेप म्हणून महिलाविषयक प्रश्नाबाबत आवाज उठविण्यास बंदी तर दुसरीकडे आधी सामाजिक की आधी राजकीय अशा वादामध्ये हा प्रश्न पुन्हा बाजूला जात असे. अशावेळी हे कायदे करणे म्हणजे राज्यकर्ता म्हणून अत्यंत आव्हानात्मक होते. परंतु आपली बांधिलकी ज्या मानवी हक्कासाठी आहे त्यासाठी महाराज भक्कमपणे उभे राहिले. येथेही महाराजांनी सुधारणेची सुरुवात स्वतःच्या घराण्यापासून केली. त्यांनी आपल्या जनक घराण्यातील आपली बहिण चंद्रप्रभाबाई यांचा विवाह धनगर घराण्यात करून दिला. अशाप्रकारे त्या काळातील समाज मनावर मात करून असे विवाह घडवून आणताना महाराजांना कोणत्या दिव्यातून जावे लागले असेल, याची कल्पनाच करू शकत नाही.

3) **स्त्री छळवणूक प्रतिबंध कायदा -**तिसरा कायदा शाहू महाराजांनी केला तो म्हणजे स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त व्हावा. या कायद्यामध्ये महाराजांनी स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास बंदी करण्याबद्दलचे नियम आहेत. यामध्ये केवळ शारीरिक छळ नाही तर मानसिक त्रास देणेही शिक्षेस पात्र मानले आहे. स्वतंत्र भारतामध्ये हा कायदा करायला 2005 हे साल उजडावे लागले. तसेच शाहू महाराजांनी स्त्रीला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य दिले.

4) **काडीमोड कायदा 1919-** शाहू महाराजांनी हा कायदा केला. त्यामुळे जातपंचायतीच्या लहरीवर चालणारी काडीमोड पद्धत बंद केली. स्त्रियांच्या स्वाभीमानाला ठेच पोहचवणाऱ्या पद्धती त्यांनी हुकूम काढून बंद केल्या. 1921 मध्ये शिमग्याच्या सणाला स्त्रियांबद्दल बिभत्स भाषा वापरण्याचे बंद करण्याबद्दल त्यांनी हुकूम काढला. मराठा समाजामध्ये असणाऱ्या धोशा, पडदा पद्धतीचा निषेध करून ते असे म्हणतात की, या पडदा पद्धतीमुळे स्त्रियांमधील विरत्वाचे गुण नष्ट होतात.

5) **देवदासी प्रथा बंद करणारा कायदा -** समाजातील दुर्बल वर्गातील स्त्रिया, देवदासी, जोगतीनी, मुरळी, भावींनी यांच्यासाठी 1920 मध्ये कायदा करून या प्रथा बंद केल्या. हा कायदा केल्याने हळूहळू का होईना पण प्रथा कमी होण्यास मदत झाल्याचे दिसते आहे. असे विविध कायदे करून शाहू महाराजांनी स्त्रियांच्या हातात संरक्षणाचे एक हत्यारच दिले आहे. एका एत्तदेशीय राजाने आपल्या संस्थानामध्ये इंग्रज सरकारपेक्षाही प्रगत कायदे केले. ही गोष्ट भारताच्या इतिहासामध्ये क्रांतीकारक ठरते.

यावरून शाहू महाराजांचा स्त्रियांच्या प्रश्नाकडे पर्यायाने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा स्त्रीच्या अस्मितेच्या सर्व कक्षांना स्पर्श करणारा असून या दृष्टिकोनामुळेच त्यांनी स्त्री उद्धाराची व्यापक दूरदृष्टी स्पष्ट होते.

**समारोप:** भारतीय समाज हा अंधश्रद्धा, रुढी परंपरा यांच्या बंधनात अडकलेला होता. अशा या बेड्यामध्ये अडकलेल्या समाजाला त्यातून सोडवणे हे गरजेचे होते. याचा परिणाम प्रामुख्याने भारतीय स्त्रिया आणि मागास समाजातील लोकांना सहन करावा लागत होता. यातून त्यांची मुक्तता करून एक आदर्श समाज निर्मितीचे काम हे महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर पुरुषांनी केले. महिलांना चूल आणि मूल अशा बंधनात समाजाने जखडून ठेवले होते. स्त्रीया एकप्रकारे गुलामासारखे जीवन जगत होत्या. त्यांना कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. पुरुषप्रधान समाजात अनेक अन्याय सहन करावे लागत होते. याची जाणीव या थोर पुरुषांना झाली, हे स्त्री वर्गाचे भाग्यच म्हणावे लागले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कारभार हातात घेतल्यानंतर त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा पहिला विचार करून स्त्री शिक्षणासंबंधी, अध्यादेश काढून स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली आणि स्त्री शिक्षण सक्तीचे केले. हुषार मुलींच्या उच्च शिक्षणाचीही सोय केली. त्यांना मुंबईला आणि परदेशातही पाठविले. आज आपण पाहतो आहे, कितीतरी मुले-मुली परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेत आहेत. याचं बीज या थोर पुरुषांनी पेरले. आज त्याचा मोठा वटवृक्ष झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताच्या संविधानात सर्वांना शिक्षण हक्काचे आणि सक्तीचे करून समाजाला चांगली दिशा दिली. यापुर्वी महात्मा जोतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. शाहू महाराजांना राजा म्हणून ऐशआरामात जीवन जगता आले असते, पण त्यांनी तसे केले नाही. प्रथम समाजाचा आणि प्रामुख्याने महिलांचा विचार केला. एक स्त्री शिकली की एक कुटुंब शिकतं असा संपूर्ण समाजच आपण शिक्षित करण्याचे ध्येय समोर ठेवून अत्यंत मोलाचे आणि एक आदर्श शिक्षित समाज निर्मितीचे कार्य केले. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचे योगदान मोठे आहे. भारताच्या राष्ट्रपती पदापर्यंत आजची स्त्री पोहोचली आहे. यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे योगदान महत्त्वाचे आणि मोलाचे आहे, हे आपल्याला कधीच विसरून चालणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**

1) प्रा. डॉ. रुपेश जाधव (संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, सुधारित तिसरी आवृत्ती, प्रकाशक महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, 2016
2) डॉ. बाबा आढाव (संपा.), पुरोगामी सत्यशोधक, पुरोगामी सत्यशोधक प्रकाशन, 73, नाना पेठ, पुणे - 411002, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च 2024 अंक 1
3) प्राचार्य रा. तु. भगत, शिक्षणमहर्षी राजर्षी शाहू महाराज, द्वितीय आवृत्ती, नवल प्रकाशन, 87, संस्कृती अपार्टमेंट, पुणे, 15 जून 1949.
4) प्रबोधन प्रकाशन जोती अंक 814, प्रकाश व संपादक प्रसाद माधव कुलकर्णी, इचलकरंजी, फेब्रुवारी 2002

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**64**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि ब्राह्मणेत्तर चळवळ

**प्रा. संदिप भैरू जाधव**
इतिहास विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

---

सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, प्रशासकीय आणि शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये ब्राह्मण समाजाचे वर्चस्व आणि प्रभुत्व निर्माण केले होते. तसेच वेगवेगळ्या मार्गांनी बहुजन समाजाला आपल्या मुठीत जखडून ठेवले होते. ब्राह्मण समाजाच्या मगरमिठीत सापडलेल्या ग्रामीण महाराष्ट्रातील या मृतप्राय बहुजन समाजात जागृती करण्याचे काम महात्मा फुले यांनी सुरु केलेल्या सत्यशोधक चळवळीने सर्वप्रथम केले.[१] महात्मा फुलेंच्या निधनानंतर त्यांच्या काही सहकाऱ्यांनी सत्यशोधक चळवळ पुढे नेली. परंतु, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळ काहीशी कमकुवत व असंघटीत झालेली होती. तिला पुन्हा संघटीत, प्रवाही व आक्रमक बनविण्यातराजर्षी छत्रपती शाहू शाहू महाराजांची महत्वाची भूमिका होती.[२] १९११ साली राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांच्या प्रेरणेने आणि पाठींब्याने भास्करराव जाधव यांच्या पुढाकाराने पुणे येथे सत्यशोधक समाजाची एक परिषद भरली व त्यातून सत्यशोधक चळवळीचे पुनरुज्जीवन झाले. त्यानंतर दरवर्षी सत्यशोधकांच्या परिषदा भरू लागल्या.[३] महाराजांनी सत्यशोधक समाजाची आपल्या संस्थानात शाखा काढून सत्यशोधक समाजाला राजाश्रय दिला.

सत्यशोधक समाजाने जलशांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर सामाजिक सुधारणांवर भर देऊन ब्राह्मणांच्या जुलूमशाहीवर हल्ले केले. सर्व प्रकारच्या भेदभावाला विरोध केला. त्यामुळे ब्राह्मणांनी सत्यशोधक कार्यकर्त्यांवर खोटे आरोप लावून खटले भरले. अशावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक-ब्राह्मणेत्तर जलसाकरांना मदती केल्या.[४]

ब्राह्मण समाजाच्या जुलूमशाही व वर्चस्वाला करवीर संस्थानही अपवाद नव्हते. संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतल्यानंतर महाराजांनी ब्राह्मणांच्या या वर्चस्वाला शह देण्यास सुरुवात केली होतीच. त्यातूनच त्यांनी बहुजन समाजातील भास्करराव जाधव, दाजीराव विचारे, रघुनाथ सबनीस यासारख्या ब्राह्मणेत्तर व्यक्तींना संस्थानातील महत्वाची पदे दिली.[५] परंतु, वेदोक्त प्रकरणानंतर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी ब्राह्मणांच्या शिरजोरी आणि वर्चस्वाला शह देण्यासाठी सर्वच क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर तयारी केली. यातूनच त्यांनी अंधारात चाचपडत असलेल्या बहुजन समाजाला पुढे आणण्यासाठी प्रयत्न केले. याचे मूळ शिक्षणात असल्याची जाणीव महाराजांना होतीच. त्यामुळे शिक्षण देऊन बहुजन समाजाला पुढे आणण्यासाठी त्यांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणाच्या सोयी निर्माण करून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार केला. काही अडचणीमुळे बहुतांशी विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नसल्यामुळे महाराजांनी अशा प्रत्येक समाजातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी जवळपास २० वसतिगृहे काढली. या वसतिगृहांना इमारती आणि उत्पन्नाची साधने उपलब्ध करून दिली. त्यामुळेच शिक्षण घेतलेली बहुजन समाजातील पहिली पिढी या वसतिगृहातून घडली गेली.[६]

भारतात टप्याटप्याने जबाबदार शासनव्यवस्था निर्माण करणे हे ब्रिटीश सत्तेचे अंतिम ध्येयधोरण असल्याचे भारतमंत्री लॉर्ड मॉन्टेग्यू यांनी २० ऑगस्ट १९१७ रोजी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये घोषित केले. महायुद्ध समाप्तीनंतर हिंदुस्थानाला घटनात्मक सुधारणा व राजकीय हक्कांचा एक हप्ता देण्यात येईल असे या घोषणेत सूचित करण्यात आले होते. भारतमंत्री लॉर्ड मॉन्टेग्यू यांनी ब्रिटीश संसदेत हिंदुस्थानातील भावी घटनात्मक सुधारणांसंबंधी ही महत्वपूर्ण घोषणा केल्यानंतर देशातील विविध समाजघटकात राजकीय जागृतीला चालना मिळाली. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी महाराष्ट्रातील खेडोपाडी विखुरलेल्या अडाणी, कष्टकरी बहुजन समाजाला येऊ घातलेल्या घटनात्मक सुधारणा, लोकशाही हक्क यांचा लाभ घेऊन राज्यकारभारात सहभागी होता यावे म्हणून त्यांच्यात राजकीय आकांक्षा निर्माण करण्याचे मौलिक कार्य केले. २०व्या शतकाच्या सुरुवातीला स्वराज्याची मागणी जोर धरू लागल्यानंतर आणि ब्रिटीश सरकार राजकीय सुधारणांचा हप्ता देऊ लागल्यानंतर राजकीय सत्ता ब्राह्मणांच्या हाती जाऊन ब्राह्मणशाही प्रबळ बनेल व बहुजन समाजाच्या प्रगतीला अडथळे निर्माण होतील असे सत्यशोधकीय-ब्राह्मणेत्तर नेतृत्वाला वाटू लागले. १९१६ नंतर महाराष्ट्रात ब्राह्मणेत्तर राजकीय चळवळ जोर धरू लागली. त्यातूनच डेक्कन रयत असोसियशन, ऑल इंडिया मराठा लीग यासारख्या ब्राह्मणेत्तर संघटना स्थापन झाल्या. भारताच्या भावी कायदेमंडळात ब्राह्मण प्रतिनिधींचे प्राबल्य न राहता ब्राह्मणेत्तर समाजाला त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान मिळावे यासाठी त्यांनी लोकजागृती करण्यास सुरुवात केली.[७] याच उद्देशाने महाराष्ट्रात भटभिक्षुकांच्या मक्तेदारीवर हल्ला करून बहुजन समाजात मोठ्या प्रमाणावर सामाजिक जागृती केलेल्या

सत्यशोधक चळवळीला राजकीय वळण देण्यात आले.राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने १९२० साली ब्राह्मणेत्तर पक्षाची स्थापना करण्यात आली. ब्राह्मणेत्तर चळवळीची सत्यशोधक चळवळ ही जननी ठरली. सत्यशोधक समाजाची विचारसरणी, सत्यशोधक चळवळीचे संघटन व कार्यकर्त्यांचे जाळे यांच्या आधाराने ब्राह्मणेत्तर पक्ष झपाट्याने वाढला.[८] पुढे१९१९ च्या कायद्यानुसार १९२० मध्ये कायदेमंडळाच्या झालेल्या निवडणुकामध्ये किर्तीवामनराव निंबाळकर, गंगाजी काळभोर, पांडुरंग जाधव, दाजीराव विचारे, सीताराम केशव बोले, आनंदराव सुर्वे, इ. ब्राह्मणेत्तर मंडळी प्रांतीय कायदेमंडळावर निवडून गेली. तर अण्णासाहेब लठ्ठे व केशवराव बागडे केंद्रीय कायदेमंडळावर निवडून गेली.[९]

तत्कालीन महाराष्ट्रातील बहुतांशी वृत्तपत्रे ही ब्राह्मण समाजाच्या मालकीची होती. शिवाय या वृत्तपत्रांचे संपादकही ब्राह्मण असल्यामुळे ही वृत्तपत्रे सत्यशोधक-ब्राह्मणेत्तर चळवळीवर आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज व त्यांच्या कार्यावर नेहमी आगपाकड, टीका करीत होती. त्यामुळे ब्राह्मणेत्तर समाजाची बाजू मांडणाऱ्या आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरोधात बहुजन समाजात जागृती निर्माण करण्यासाठी ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांची गरज असल्याची जाणीव राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना होती.[१०] त्यामुळे महाराजांनी बहुजन समाजातील व्यक्तींना वृत्तपत्रे काढण्यासाठी प्रोत्साहित केले, त्यांना सर्व प्रकारचे सहाय्य केले. महाराजांच्या अशा प्रोत्साहनाने आणि सहाय्यामुळे विजयी मराठा, तरुण मराठा, विश्वबंधु, डेक्कन रयत, शिवछत्रपती, भगवा झेंडा, राष्ट्रवीर यासारखी वृत्तपत्रे सुरु झाली. महाराजांनी या वृत्तपत्रांना अडचणीच्या काळात आधार दिला, आर्थिक सहाय्य केले, संपादकांचे सत्कार केले, त्यांना उत्तेजन दिले. या वृत्तपत्रामध्ये जर आपापसात वाद निर्माण झाले तर महाराज मध्यस्थी करून ते मिटवीत असत.[११] महाराजांच्या अशा प्रेरणेने आणि सहाय्यामुळे ब्राह्मणेत्तर पत्रकारिता वाढू लागली आणि यामुळे सत्यशोधक-ब्राह्मणेत्तर चळवळीचा विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविणे शक्य झाले.

**सारांश :-**

महात्मा फुलेंनी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना करून उच्च वर्णीयांनी कनिष्ट वर्णीयांच्या चालविलेल्या शोषणाबद्दल आवाज उठविला आणि पुरोहितांची मध्यस्थी नाकारली. सत्यशोधक समाजाच्या पायावर विसाव्याशतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात ब्राह्मणेत्तर चळवळ उदयास आली. कॉंग्रेस पक्षात आणिसरकारी प्रशासन व्यवस्थेमध्ये अग्रस्थानी असलेल्या ब्राह्मण समाजाच्या नेतृत्वाला आव्हान देण्यासाठी उच्च मराठा वर्गाने ब्राह्मणेत्तर चळवळ चालविली. राजर्षीशाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर चळवळीत प्रथमपासूनच सक्रीय सहभाग घेतला. किंबहुना राजर्षी छत्रपती शाहू महाराज हेच या चळवळीचे प्रेरणास्थान होते. त्यामुळे ब्राह्मणेत्तर चळवळ संपूर्ण महाराष्ट्रभर फोफावली. सामाजिक धार्मिक असलेल्या सत्यशोधक चळवळीला शाहूंनी काहीसे राजकीय स्वरूप दिल्यामुळे त्यातून पुढे ब्राह्मणेत्तर चळवळीचा आणि पक्षाचा उदय झाला. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर चळवळीला आर्थिक, राजकीय आणि नैतिक बळ पुरविले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सक्रीय सहाय्यामुळे ही चळवळ बळकट आणि प्रभावी होऊन संपूर्ण भारतभर तिचा झेंडा फडकू लागला. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी फक्त महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर चळवळीला आधार दिला असे नव्हे तर त्यांनी अखिल भारतीय ब्राह्मणेत्तर चळवळीलाही गतिमान केले.

**संदर्भ:-**

१. भोसले (डॉ)अरुण, दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ. १५५.
२. अवनीश पाटील(संपा.), राजर्षी शाहू छत्रपती विचारवेध, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ. ८९
३. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र-खंड दुसरा, के'सागर पब्लिकेशन्स, पुणे, २०२३, पृ. १९५.
४. उपरोक्त, अवनीश पाटील(संपा.), पृ. ८५
५. रमेश जाधव, शाहू छत्रपती आणि सत्यशोधक चळवळ, रमेश जाधव(संपा.), राजश्री शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, २०१६ पृ. ९०४.
६. उपरोक्त, अवनीश पाटील(संपा.), पृ. ८४.
७. जयसिंगराव पवार, मंजुश्री पवार(संपा.), राजश्री शाहू छत्रपती : जीवन व कार्य- खंड १, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, २०१९ कोल्हापूर, पृ. १६७.
८. उपरोक्त, भोसले (डॉ)अरुण, पृ. १५५-१५६)
९. उपरोक्त, फडके य. दि. पृ. २२६.
१०. कित्ता, पृ.२०३-२०४.
११. अलोक जन्नाटकर, शाहू महाराज व ब्राह्मणेत्तर चळवळ, समाज प्रबोधन पत्रिका, अंक २३९, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२, पृ. ६८-६९

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

65

# राजर्षी शाहू महाराज यांच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास

**प्रा. सुभाष बाजीराव शिंदे**
भारतीय जैन संघटनेचे
कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, वाघोली

---

**प्रस्तावना :** समाज परिवर्तनात बदल घडविण्यात अस्पृश्यता निवारण, सामाजिक सुधारणा चळवळ, शैक्षणिक सुधारणा नवीन विचार प्रवाह निर्माण केला. या बदलातून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाज परिवर्तनाच्या दिशेने राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अतिशय मौलिक व महत्त्वाचे ठरते. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाज परिवर्तनाच्या वाटचालीमध्ये विशेष स्थान महाराष्ट्राच्या सामाजिक गतीशीलतेच्या परिवर्तनवादी धोरणामध्ये राजर्षी शाहू महाराज यांना दिले जाते. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारात व कृतीमध्ये अस्पृश्य उद्धाराची प्रचंड जाणीव, वस्तीगृह चळवळीचा प्रयोग व तंत्र, शिक्षण प्रसाराचे कार्य, जातिभेद निर्मूलनाचे कार्य, स्त्रीजातीच्या संरक्षणासंदर्भातील भूमिका, सत्यशोधक समाजाची पुनर्स्थापना, आर्य समाजाविषयी भूमिका, औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेली कामगार चळवळ व त्या संदर्भात विवेचन, विविध कलेमधील योगदान विविध समाज हिताच्या दृष्टीने समाजाच्या कार्यासाठी प्रसिद्ध असणारे समाज क्रांतिकारक व महाराष्ट्राचे भाग्यविधाता असेही राजर्षी शाहू महाराजांना ओळखले जाते. विशेष म्हणजे कोल्हापूर प्रांतात राजर्षी शाहू महाराज यांनी याची पहिल्यांदा सुरुवात केली आणि तेथूनच परिवर्तनवादी सुरुवातीला नवा आयाम मिळाला.

राजर्षी शाहू महाराज यांनी शेती, उद्योग, सहकार, औद्योगिक धोरण यामध्ये बदल घडवून आणला. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली असे म्हटले जाते. त्यांचे विचार, तत्त्वप्रणाली, त्यांनी केलेले कार्य यांचा अभ्यास आधुनिक अर्थशास्त्राच्या दृष्टिनेही महत्त्वाचा ठरतो. राजर्षी शाहू महाराजांनी १८९४ ते १९२२ या कालखंडात कोल्हापूर संस्थानाचा कारभार छत्रपती या नात्याने पाहिला. सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी ते आयुष्यभर झटले. आपल्या राजकीय कारकिर्दीत उद्योग, शेती, सहकार, श्रम, व्यापार, मानवी गुंतवणूक, शिक्षण, पाटबंधारे, आरोग्य व मनोरंजनाकडे विशेष लक्ष देऊन मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या. श्री शाहू छत्रपतींचे आर्थिक धोरण हे आर्थिक विकासाला अनुरूप होते. त्यांनी आपल्या संस्थानात ज्या ज्या सुधारणा राबविल्या त्या त्या आधुनिक समाजवादी अर्थशास्त्रीय सिद्धांतावर आधारित असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज यांचे शेती, उद्योग, सहकार, औद्योगिक धोरण या दृष्टिकोनातून 'राजर्षी शाहू महाराज यांच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास' या विषयाचा परामर्ष या शोधनिबंधातून घेतलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

१. समाज परिवर्तनात बदल घडविण्यात नवीन विचार प्रवाह कसे निर्माण झाले याचा अभ्यास करणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे राजर्षी शाहू महाराज यांचे शेतीविषयक तत्व व भूमिका याचा अभ्यास करणे.
३. राजर्षी शाहू महाराजांचे राजर्षी शाहू महाराज यांचे सहकार विषयक तत्व व भूमिका याचा अभ्यास करणे.
४. राजर्षी शाहू महाराजांनी उद्योग व व्यवसाय वाढीसाठी केलेले कार्य समजून घेणे.
५. राजर्षी शाहू महाराजांची औद्योगिक क्षेत्राविषयी व जल व्यवस्थापना संदर्भात असलेली भूमिका अभ्यासणे.

**विषयविवेचन :**

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म कागल घाटगे घराण्यामध्ये २६ जुलै १८७४ मध्ये झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत आबासाहेब घाटगे असे होते. करवीर संस्थानाला दत्तक गेल्यानंतर त्यांचे नामकरण शाहू असे करण्यात आले. सन १८८४ मध्ये शाहू महाराजांचा दत्तक विधानांचा समारंभ, ०१ एप्रिल १८९१ मध्ये त्यांनी बडोदा संस्थानातील सरदार खानविलकरांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी विवाह, सन १८८५ मध्ये शिक्षणासाठी त्यांची रवानगी राजकोटच्या राजकुमारांच्या कॉलेजमध्ये, सन १८८९ पर्यंत शाहू महाराज यांनी राजकोट या ठिकाणी शिक्षण, फ्रेझर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी शैक्षणिक विकास केला, २ एप्रिल १८९४ मध्ये राज्यकारभाराची सर्व सूत्रे वयाच्या २० व्या वर्षी हाती घेतली. राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक प्रवास सुरू असतानाच संस्थानात लोकहिताच्या कार्याचा दृष्टीने त्यांनी लक्ष दिले. त्यांच्या या कार्यामुळेच नवे पर्व समाजपरिवर्तनामध्ये दिसून आले. त्याचा परिणाम अनेक शतके महाराष्ट्रावर राहिला. समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने समानतेसाठी त्यांनी प्रयत्नही केला. अस्पृश्यता निवारण, शैक्षणिक सुधारणा, आर्थिक विकास, औद्योगिक विकास यामध्ये मूलभूत बदल घडवून आणला.

सर्वप्रथम राजर्षी शाहू महाराजांनी शेती व्यवस्थेत बदल घडवून आणून शेती व्यवस्थेतील आधुनिक उपक्रमाची जाणीव संपूर्ण महाराष्ट्राला करून दिली. शेतीविषयक खर्चासाठी शेतकरी वर्ग सावकारावर अवलंबून असे. शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनल्याशिवाय राष्ट्रोद्धार अशक्य आहे असा शाहू महाराजांचा विचार होता. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत सहकारी क्षेत्रातून वाजवी दराने शेतीसाठी कर्जपुरवठा करून दिला. यासाठी १९२२ साली सुमारे पंचवीस अर्थपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था उभ्या केल्या. आपल्या देशात शास्त्रीय पद्धतीने शेती विकास केला तर आपण यामध्ये नक्कीच यशस्वी होऊ शकतो. शेती शास्त्रीय पद्धतीने केल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन पूर्वीपेक्षा अधिक पटीने वाढते असा निष्कर्ष त्यांनी युरोपीय दौऱ्यामध्ये पाहिला होता. कोल्हापूर संस्थानात आधुनिक शेती पद्धतीचा प्रसार व शेतीमधून अधिकाधिक उत्पादन वाढवण्यासाठी १९१२ मध्ये कोल्हापुरात ' किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट' नावाची संस्था स्थापन केली[१] शेती शास्त्रीय पद्धतीने केल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन पूर्वीपेक्षा अधिक पटीने वाढते असा निष्कर्ष त्यांनी युरोपीय दौऱ्यामध्ये पाहिला.'किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट'या संस्थेचे मुख्य उद्देश म्हणजे,

१) पारंपारिक शेती व्यवस्थेतील दोष दूर करणे

२) सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करणे असे होते.

३) या दृष्टिकोनातून त्यांनी बी- बियाणे, रासायनिक खते, योग्य पद्धतीचे प्रशिक्षण व ज्ञान, आधुनिक पद्धतीची शेतकऱ्यांना सुधारित अवजारे याचा परिचय करून देणे.

४) शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित अधिकाऱ्यांची सुद्धा नियुक्ती करणे.

शेतकऱ्याचा अशिक्षितपणा दूर करण्यासाठी संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. खेडेगावातील शाळेतच त्यांना शेतीविषयक शिक्षण देण्याची सोय केली. वारसाहक्काने जमिनीचे समान तुकडे होत असल्याने १९१३ ला अविभाज्य इनामाचा कायदा केला. राजर्षी शाहू महाराजांनी शेती अवजाराचे प्रदर्शन आपल्या कोल्हापूर या आपल्या संस्थानात भरविले. यातूनच कोल्हापुरात आधुनिक शेती अवजारांचे म्युझियम शाहू महाराजांनी सुरू केले. बदल या तत्वातून पारंपारिक पिकांमध्ये सुद्धा बदल घडवून आणण्याचा प्रयोग कोल्हापुरात यशस्वी करून दाखवला. उदा. कोल्हापूर संस्थानात व्यापारी तत्त्वावर चहा पिकवण्याचा प्रयत्न हा परिपूर्ण ठरला.

राजर्षी शाहू महाराजांनी शेतीवर आधारित अनेक लागवडीचे प्रयोग आपल्या संस्थानात घेतले. पारंपरिक पिकांशिवाय नवी पिके घेण्याचा उपक्रम राबविला. डोंगराळ जमीन पडीक राहण्यापेक्षा काहीतरी पीक घेऊन तेथील लोकांना रोजगार मिळावा यासाठी पन्हाळा पेठयातील पेंडखेले गावी जंगल खात्यामार्फत कॉफीची लागवड केली. भूधरगड येथे चहाची लागवड केली. शेलाप येथे रेशीम, पन्हाळा व भूधरगड येथे वेलदोडे, कोको, इंडियन व इतर प्रकारचे रबर, ताग, अंबाडी, कंबोडियन कापूस इ. लागवडीचे प्रयोग केले. राजर्षी शाहू महाराजांनी शेती, उद्योग, सहकार या तिन्ही क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडवून आणल्याने महाराष्ट्रात हरितक्रांतीचा विकास कोल्हापूर संस्थानांमध्ये मोठ्या प्रमाणात झाला असे मानले जाते. याच परिवर्तनाचा परिणाम व विकास म्हणजे जल व्यवस्थापनाच्या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य हे उल्लेखनीय ठरते.

शेती विकास व जलव्यवस्थापनासंदर्भात त्यांनी महत्त्वाची भूमिका सकारात्मक व परिणामकारक ठरली. दुष्काळाचा सामना कसा करावा ? यावर उपाय शोधावा यासाठी त्यांनी जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, लहान मोठे बंधारे या सर्वांच्या दुरुस्तीची कामे जल व्यवस्थापनाच्या दृष्टीने त्यांनी हाती घेतली. याचबरोबर सन १९०२ मध्ये 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले आणि या संदर्भातील उपाययोजनाही त्यांनी पूर्ण केल्या. कोल्हापूर या संस्थांमध्ये राधानगरी सारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प निसर्गनिर्मित पावसाच्या पाण्याचा वापर व योग्य जलव्यवस्थापन व दुष्काळाचा सामना सहज करण्यासाठी त्यांनी हाती घेतलाव यामध्ये त्यांना अधिकच यश प्राप्त झाले.[२] सन १९०९ मध्ये राधानगरी धरणाचे बांधकाम सुरू झाले तर सन १९१८ पर्यंत हे बांधकाम पूर्ण अवस्थेत दिसून आले. जल व्यवस्थापनाचे त्यांचे हे भरीव कार्य खऱ्या अर्थाने शेती व्यवसायाला व शेती विकास योजनेला विकसित अवस्थेत घेऊन जाणारे ठरले.

राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण व्यापार आणि उद्योग याच्या विकसनशीलतेवर अवलंबून होते. त्यांच्या मते, ' केवळ शेती करून चालणार नाही तर व्यापार व व्यवसाय याच्यामध्ये विकसित धोरण आमच्या लोकांचे असावे.' युरोपीय लोकांचे धोरण व्यापार उद्योगात मोठ्या प्रमाणात अग्रेसर असल्यामुळे त्यांची झपाट्याने प्रगती झाली. असाही निष्कर्ष त्यांनी समाजासमोर ठेवला. पाश्चात्य देशांच्या प्रगतीचे खरे व्यापारी धोरण आहे हे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी प्रथमतः आपल्याच संस्थानांमध्ये स्वतंत्र पद्धतीच्या बाजारपेठांची स्थापना व्यापारी धोरणाला चालना देण्यासाठी केली. सन १९०२ च्या सुमारास व्यापारामध्ये महाराष्ट्रात

अग्रेसर असलेली ' शाहूपुरी ' नावाची नवी बाजारपेठ निर्माण केली. हे याचे उत्तम उदाहरण मानता येईल.[३] बाजारपेठ या धोरणामुळे गुळ उत्पादन व भुईमूग शेंगा व इतर उत्पादने यांची निर्यात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागाबरोबर विविध देशांमध्ये मोठ्या प्रमाणात झाली.

उद्योगांना चालना देण्यासाठी शाहू महाराजांनी नवे उद्योग सुरू व्हावे यासाठी औद्योगिक सर्वेक्षण प्रथमता केले. त्यानुसार संस्थानात पुढे कापड उद्योग व्यवसाय, औषधी तेल उद्योग व्यवसाय कोल्हापुरात भरभराटीस आले. महाराजांच्या मते, ' देशातील औद्योगिकीकरणाच्या इतिहासात उद्योग व्यवसाय यांना महत्त्वाचे स्थान आहे जर यांची विकसित अवस्था दिसून आली तर नक्कीच देश प्रगतीपथावर जाईल.' हे त्यांनी विचार मांडले व त्या दृष्टीने कार्यवाही केली. म्हणजेच सन १९०४ मध्ये त्यांचा हा प्रयोग यशस्वी ठरला. याच वर्षी तेलउद्योगांमध्ये कोल्हापूर संस्थानाने मोठी प्रगती केली. आपल्या संस्थानातील नाविन्यपूर्ण वस्तूचे नमुने त्यांनी मुंबई, कलकत्ता तसेच अमेरिका व जपान या देशातील वेगवेगळ्या तज्ञांकडे पाठवणे. त्यातूनच पुढे यावर आधारित अभिनव उद्योगांचा प्रयोग त्यांनी यशस्वीरित्या राबवला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मधुमक्षिका पालन उद्योग, कष्टर्क्र रंग निर्मिती उद्योग यांचे मानले जाते. उद्योगधंद्यांविषयी प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी प्रशिक्षित अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. प्रसंगी पाश्चात्य देशातील पुढारलेल्या तज्ञांची मदतही त्यांनी घेतली. याचा संदर्भ जर आपण पाहिलात तर मधुमक्षिकापालन उद्योगासंदर्भात त्यांनी मॅक्लीन यांना लिहिलेले पत्र यातून दिसून येते.

याच नवीन उद्योगाच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांच्या प्रेरणेनेच पुढे सन १९०६ मध्ये ' शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विहींग मिल्स' या कापड गिरणीची स्थापना कोल्हापूर संस्थानात झाली.[४] यामुळे कापड उद्योगात कोल्हापूर संस्थान अग्रेसर ठरले. त्यामुळे रोजगाराच्या अनेक संधी स्थानिक लोकांना सहजपणे उपलब्ध होत गेल्या. पुढे याच उद्योग व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर ऑइल मिल, सॅ.मिल, इलेक्ट्रिक कंपनी, मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग स्थापन होत गेले. या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आर्थिक तरतूद देखील त्यांनी घडवून आणली. म्हणजेच शाहू महाराजांच्या अभिनव प्रयोगातील उद्योग व्यवसायाला संरक्षण, त्यांना आर्थिक भांडवल व स्वयंपूर्ण पाठबळ देऊन ते टिकवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे आर्थिक विकासास हातभार लागला हे निश्चितच त्यांच्याच कार्याचे यश ठरते.

**५.शाहू महाराजांचे सहकार तत्व :**

शाहू महाराजांना सहकार तत्वाचे आद्य पुरस्कर्त असेही म्हटले जाते. कारण प्रथमतः शासकीय यंत्रणेद्वारे उद्योग व व्यवसाय सुरू करण्याऐवजी सहकारी तत्त्व जर उद्योग व्यवसायामध्ये आणले तर यामध्ये भरभराट येईल असे मत शाहू महाराजांचे होते. त्यातूनच त्यांनी आधुनिक बदलाच्या पार्श्वभूमीवर कारागीर लोकांचे परंपरागत व्यवसाय यामध्ये आधुनिकता निर्माण करणे व ते टिकवणे या दृष्टीने नवे सहकाराचे तत्व स्वीकारावे असा उपदेश शाहू महाराजांनी तत्कालीन कालखंडामध्ये केला. सहकाराच्या माध्यमातून उद्योगांना लोकाश्रय कशा पद्धतीने मिळेल हे तत्व त्यांनी स्वीकारले.

सहकार तत्वाला पुढे कायद्याचे स्वरूप प्राप्त करून द्यावे यासाठी त्यांनी सन १९१२ मध्ये 'सहकारी संस्था विषयक कायदा' केला.[५] याची नोंदणी व्हावी यासाठी 'सहकार निबंधकाची' नियुक्ती त्यांनी संस्थानांमध्ये केली. त्यांच्या या धोरणामुळे सहकारी तत्त्वाला अनुसरून सहकारी संस्था निर्माण होत गेल्या. याचे उत्तम उदाहरण सन १९१३ मध्ये 'दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी' ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधव यांचा नेतृत्वाखाली स्थापन झाली.[६] पार्श्वभूमीवर पुढे विविध कार्यकारी सरकारी संस्था. सहकारी उपसा जलसिंचन संस्था, सहकारी दूध संस्था, ग्रामीण पतपुरवठा संस्था या कोल्हापूर व महाराष्ट्रभर निर्माण होत गेल्या. उद्योगांना लोकाश्रय मिळाल्याने सहकार क्षेत्र भरभराटीस आले. सहकारक्षेत्राच्या या धोरणामुळेच शेती, उद्योग, व्यापार, व्यवसाय यामध्ये आधुनिकता प्राप्त होत गेली. याच तत्वाला अनुसरूनच सहकारी सुत गिरण्या यांची भरभराटी होऊन कापड उद्योग मोठ्या प्रमाणात नावारूपाला आला. म्हणजेच राजर्षी शाहू महाराजांचे सहकार विषयक तत्व यशस्वी झाले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आधुनिक महाराष्ट्राला गतिशीलतेकडे घेऊन जाणारा सहकार हा विषय शाहू महाराजांच्या कोल्हापूर संस्थानातूनच पुढे आला याचे सर्व श्रेय शाहू महाराजांना जाते.[७] थोडक्यात शाहू महाराजांनी समाज परिवर्तनाच्या विधायक कार्याबरोबरच शेती व्यवसाय, जलव्यवस्थापन, व्यापार व उद्योग, सहकार तत्व यामध्ये आधुनिकता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. युरोपीय देशातील नवीन तत्त्वप्रणाली जर अमलात आली तर शेती, उद्योग, व्यवसाय यामध्ये आधुनिकता निर्माण होईल. या पार्श्वभूमीवरच त्यांनी आर्थिक धोरण विकसित करताना नाविन्यपूर्ण बदल घडून आणले व या बदलांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन त्यांना संरक्षण दिले. त्यामुळेच दीर्घकाळापर्यंत कोल्हापूर संस्थान व पर्यायाने महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये शेती, उद्योग, व्यवसाय या आर्थिक धोरणाशी निगडित असणाऱ्या घटकांमध्ये बदल घडवून आला.

**निष्कर्ष:**

१.राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचारासंदर्भातही कार्य मौलिक स्वरूपाचे ठरते.

२. शाहू महाराजांनी शेती व्यवस्थेत बदल घडवून आणून शेती व्यवस्थेतील आधुनिक उपक्रमाची जाणीव संपूर्ण महाराष्ट्राला करून दिली.

३. राजर्षी शाहू महाराजांचे जलव्यवस्थापनाचे हे भरीव कार्य खऱ्या अर्थाने शेती व्यवसायाला बळ देणारे ठरले.

४. राजर्षी शाहू महाराजांनी सहकाराच्या माध्यमातून उद्योगांना संरक्षण दिले .

५. सहकारक्षेत्राच्या या धोरणामुळेच शेती, उद्योग, व्यापार, व्यवसाय यामध्ये आधुनिकता प्राप्त होत गेली.

६. आधुनिक महाराष्ट्राला गतिशीलतेकडे घेऊन जाणारा सहकार हा विषय परिपूर्ण ठरला.

७. उद्योगांना चालना देण्यासाठी शाहू महाराजांनी नवे उद्योग सुरू व्हावे.

**संदर्भ:**

१. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८, पृष्ठ क्रमांक १४३-१४५.

२.कुलकर्णी मीना व कुलकर्णी ब.शी., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, प्रथम आवृत्ती १९७५ कोल्हापूर ,पृष्ठ क्रमांक ७७.

३.कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पहिली आवृत्ती मुंबई १९८९, पृष्ठ क्रमांक १८.

४.पवार जयसिंगराव (संपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती मे २००१, पृष्ठ क्रमांक २०१.

५.कित्ता, पृष्ठ क्रमांक २०८.

६. कित्ता, पृष्ठ क्रमांक २१०.

७. कित्ता, पृष्ठ क्रमांक २११.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

66

# छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक परिवर्तनाची माणगाव परिषद

**प्रा. तेजस धनपाल गवळी**
(सहा. प्राध्यापक)
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय मिरज जि. सांगली

**प्रस्तावना-** आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत परिवर्तनवादी विचारांची पेरणी करणारे,वर्ण व्यवस्थेमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता विरोधी भूमिका मांडणारे अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरा यांना विरोध करणारे, मानवमुक्तीसाठी लढा लढणारे, क्रांतिकारी समाज सुधारक, अस्पृश्योद्धारक, आरक्षणाचे जनक, सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणारे, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कार्यातून बहुजन समाजाला जागृत करणारे दीन-दलित, बहिष्कृत, वंचित लोकांना समानतेच्या प्रवाहात येण्यासाठी त्यांची उन्नती होण्यासाठी जाती प्रथा निर्मूलनासाठी नव-नवे उपक्रम राबविणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी २१ व २२ मार्च १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली 'बहिष्कृत वर्गाची पहिली ऐतिहासिक परिषद' माणगाव. यशस्वीरित्या आपल्या संकल्पनेतून, युक्तीतून,दूरदृष्टीतून नियोजनबद्ध संपन्न करून दाखविली. यास ‘माणगाव परिषद' म्हणून ओळखले जाते. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात मोलाचे योगदान देणारी ही परिषद ठरली या माणगाव परिषद यशस्वी होण्यामागे छ. शाहू महाराज यांचे योगदान बहुमूल्य आहे.शेकडो वर्षापासून सामाजिक,सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आलेल्या लोकांची ही परिषद होती. भविष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची, स्वातंत्र्य समता, बंधुता, एकता यामानवी मूलभूत हक्कांसाठी लढा देणाऱ्या क्रांतीची मुहूर्तमेढ ठरली.शाहू महाराजांच्या परिवर्तनवादी विचारातून साकार झालेली माणगाव परिषदेने भारतातील विषमतावादी समाज व्यवस्थेला आवाहन केले बहिष्कृत लोकांच्या मनात सामाजिक आणि धार्मिक गुलामी विरोधात लढा देण्याचे बळ या माणगाव परिषदेच्या माध्यमातून शाहू महाराजांनी दिले. मानवी हक्काच्या लढाईत या माणगाव परिषदेचे महत्त्व मोलाचे आहे शाहू महाराजांची माणगाव परिषद घेण्यामागे असणारी दूरदृष्टी ऐतिहासिक ठरली ही परिषद म्हणजे त्यांच्या सामाजिक परिवर्तनाची एक महत्त्वाची घटना होय.

**संशोधन विषया मागील उद्दिष्टे**

१) छत्रपती शाहू महाराज यांचे ‘माणगाव परिषद’ संपन्न होण्यासाठी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.
२) छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक चळवळीचा आढावा घेणे.
३) माणगाव परिषद निमित्ताने शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध तपासणे.

**संशोधन विषयाची व्याप्ती:** भारत देशात वर्णव्यवस्था होती आणि या वर्णव्यवस्थेमुळे अनेक भेदभाव निर्माण झाले होते. त्यामध्ये जातीभेद निर्माण झाल्याने अस्पृश्य, वंचित, बहिष्कृत लोकांच्यावर अन्याय अत्याचार होत असायचे त्यांना मानवी मूलभूत अधिकार नसायचे या लोकांच्या स्वातंत्र्यासाठी अनेक समाजसुधारक प्रयत्नशील होते महाराष्ट्रामधील म.फुले, शाहू महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रस्थानी येते छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यता निर्मूलनासाठी अनेक उपक्रम राबवत असायचे त्यातीलच एक "दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद" माणगाव या परिषदेच्या माध्यमातून त्यांनी मानव मुक्तीसाठी प्रयत्न केले.छ. शाहू महाराज यांच्या सामाजिक परिवर्तनाची माणगाव परिषद या विषयाच्या अनुषंगाने आढावा घेतला जाईल.

**"दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद" माणगाव या गावी घेण्यामागे शाहू महाराजांची युक्ती -** दि.२१ व २२ मार्च १९२० रोजी "दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद" माणगाव या गावी संपन्न झाली. छ.शाहू महाराज यांच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासात या परिषदेचे महत्त्व बहुमूल्य आहे. या परिषदमधून शाहू महाराज यांची मानवी मूल्यांची महत्त्वकांशा दिसून येते. त्यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने ही ‘माणगाव परिषद’ घेण्यात आली. छ. शाहू महाराज यांचे करवीर संस्थान होते. या संस्थानात अस्पृश्य लोकांच्या उन्नतीसाठी परिषद व्हावी अशी मनोधारणा होती. कोल्हापूर सारख्या मोठ्या शहरात परिषद न घेता माणगाव या खेडेगावात परिषद घेण्याचे योजले. दळणवळणाची आधुनिक साधने उपलब्ध नसणाऱ्यागावात परिषद का ? घेण्यात आली असा प्रश्न उभा राहतो पण, परिषदेसाठी माणगाव हे गाव निवडण्यामागे महाराजांचे चातुर्य दडलेले होते. माणगाव हे गाव कागल संस्थानात येत होते पण शाहू महाराजांचे करवीर संस्थान होते आपल्या संस्थानात परिषद न घेता कागल संस्थानातील माणगाव या गावी परिषद घेण्याची कारणे ही वेगळी होती. यापाठी राजकीय डावपेचहोते. पहिले कारण असे की, माणगाव हे गाव खेडे असले तरी त्या गावच्या महार समाजात ऐकी होती. माणगाव गावातून अस्पृश्यता सारखी मनाला लागलेली कीड कायमस्वरूपी

नष्ट व्हावी यासाठी माणगावचे काही पुढारलेले लोक प्रयत्नशील होते. त्यामध्ये आप्पासाहेब पाटील, थोरले नाना मास्तर, नागोजी कांबळे इ.समाजहित जोपासणारी मंडळी एकत्र येऊन शाहू महाराज यांच्यासोबत माणगाव परिषदेचे नियोजन केले कागल संस्थानातील अप्पासाहेब पाटील हे महाराजांचे विश्वासू जहागिरदार होते. माणगाव परिषद संपन्न होण्यासाठी या लोकांचे मोलाचे सहकार्य लाभेल म्हणून स्थानिक लोकांच्या विश्वासावर हे गाव निवडण्यात आले. तसेच एक महत्त्वाचे कारण असे की, अस्पृश्य समाज्याची परिषद कोल्हापूर संस्थानात घेतल्याने या परिषदेला गालबोट लागण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. ही परिषद होऊ नये यासाठी डावपेच केले जातील अशी शंका होती. शाहू महाराजांना ही परिषद यशस्वीरित्या पार पाडायची होती म्हणून, त्यांनी कागलसंस्थानातील माणगाव हे गाव निवडले गेले. शाहू महाराजांच्या राजकीय, सामाजिक चळवळीवर कटकारस्थानी ब्राह्मण लोकांचे लक्ष होते ब्राह्मणी वृत्तपत्रातून महाराजांच्या वर टीका होत असायची. लोकहित कार्यात जाणूनबुजून अडथळे निर्माण केले जात असायचे याची महाराजांना कल्पना होती."दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद" माणगाव मध्ये घेण्यामागे हेतू साफ होता की, परिषद शांततेत पार पडावी आणि बहिष्कृत लोकांचे कल्याण व्हावे या मनोभावाने त्यांनी ही परिषद माणगाव या गावी घेण्याचे ठरविले माणगाव परिषदेला शाहू महाराज उपस्थित राहणार आहेत ही बातमी फुटू दिली नाही २२ मार्च रोजी महाराज आपल्या राजवाड्यातून बाहेर निघताना शिकारीच्या वेशभूषेत बाहेर पडले जेणेकरून त्यांच्यावर लक्ष ठेवणाऱ्या कर्मठ लोकांना वाटावे की महाराज शिकारीला चालले आहेत.तसेच तेशिकारीच्या वेशभूषेत परिषदेमध्ये उपस्थित राहिले. त्यावेळी त्यांच्यासाठीडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद यशस्वी व होणे खूप महत्त्वाचे होते. त्यांचा युक्तीने महाराष्ट्राच्या इतिहासात माणगाव परिषद म्हणून नोंद झाली

**माणगाव परिषदेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आमंत्रण :** शाहू महाराज 'पन्हाळा लॉज' मध्ये चहा घेत होते त्यावेळी 'टाइम्स ऑफ इंडिया' च्या १६ जानेवारी १९१९ रोजीच्या अंकात. 'A Mahar On Home Rule'हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लेख महाराजांनी वाचला या लेखात कॉंग्रेसच्या अधिवेशनात सामाजिक प्रश्नांना दुर्लक्ष केले जात होते त्याच्या निषेदार्थ " स्वातंत्र्य मिळवणे हा टिळकांचाच नव्हे तर, महारांचा देखील जन्मसिद्ध हक्क आहे"याबाबत मुद्देसूद मांडणी लेखात केली होती तो लेक वाचून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल महाराजांच्या मनात आदर निर्माण झाला. डॉ. आंबेडकर यांच्या बद्दलआणखी माहिती मिळवण्याची जिज्ञासा वाढली महाराष्ट्रातील पीडित लोकांच्या प्रगतीसाठी त्यांच्या जागृतीसाठी एक प्रतिभावंत व्यक्तीची आवश्यकता महाराजांना होती अस्पृश्य समाजाला मानवी मूलभूत हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांच्यातीलच नेता महाराजांना हवा होता आणि तो डॉ. आंबेडकर यांच्या यांच्या रूपात मिळाला.

१७ डिसेंबर १९१९ रोजी मुंबई मध्ये महाराजांनी प्रत्यक्ष डॉ. आंबेडकर यांची भेट घेतली त्या भेटी दरम्यान अस्पृश्य उद्धाराची चर्चा झाली आणि त्यातून समजले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर खूप प्रतिभावंत आहेत. या देशातील पिढीत, बहिष्कृत समुदायास न्याय व हक्क मिळवून देतील. कर्मठ लोकांच्या विचारांविरोधी लढण्याची धमक या तरुणांमध्ये आहे याची खात्री महाराजांना झाली. डॉ. आंबेडकर यांच्या भावी कार्यासाठी सहकार्य करायचे हे महाराजांनी ठरविले. डॉ. आंबेडकर यांना त्यांच्या वृत्तपत्रासाठी २५०० रुपयांची मदत केली. अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी एक परिषद घेतली पाहिजे त्या परिषदेचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर असायला हवे अशी महाराजांची इच्छा झाली. डॉ. आंबेडकर अस्पृश्य लोकांची उन्नती करू शकतात हा महाराजांचा विश्वास होता. यांच्या प्रेरणेने अस्पृश्य लोक मानवी हक्कासाठी पेटून उठतील, शिक्षण घेतील, नोकरी, व्यवसाय करतील त्यांचे राहणीमान सुधारेल अशी अपेक्षा महाराजांच्या मनात निर्माण झाली. म्हणून शाहू महाराजांनी माणगाव परिषदेसाठी डॉ. आंबेडकर यांना आमंत्रित केले

**छत्रपती शाहू महाराज यांचा माणगाव परिषदेमधून मानवमुक्ती लढा:** २१ व २२ मार्च १९२० रोजी माणगाव परिषद डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली २१ मार्च परिषदेच्या पहिल्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले. २२ मार्च परिषदेच्या दुसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यावेळी शाहू महाराज उपस्थित झाले ते शिकारीच्या वेशभूषेतच होते. माणगावच्या लोकानी त्यांचे जंगी स्वागत केली. त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. माणगाव परिषदेबद्दल आपली मते मांडायला सुरुवात केली. डॉ. आंबेडकर यांचे खूप कौतुक केले. आज पर्यंत त्यांनी समाज परिवर्तनासाठी कोण कोणती कार्य केलेली आहेत त्यांचा आढावा दिला. आपल्या भाषणाच्या सुरुवातीस डॉ. आंबेडकर यांच्या बद्दल गौरव उद्गार उच्चारले "आज माझे मित्र आंबेडकर यांनी या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले आहे त्यांच्या भाषणाचा लाभ मला मिळावा म्हणून मी शिकारीहून आलो आहे. आंबेडकर सर्व मागासलेल्या जातीचा परामर्श घेतात याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो".डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिभेवर, विद्वत्तेवर महाराजांचा खूप विश्वास होता त्यांना अभिमान वाटत होता की, महार समाजातील एक तरुण

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

विलायतेला जाऊन उच्च दर्जाचे शिक्षण घेतो याबद्दल महाराजांच्या मनात आंबेडकर यांच्या बद्दल आदर होता त्यांना खात्री झाली होती की एक दिवस डॉ. आंबेडकर संपूर्ण देशाचे कल्याण करेल म्हणून ते पुढे आपल्या भाषणात म्हणतात "आतापर्यंत अस्पृश्य समाज निकृष्ट अवस्थेत पोहोचण्याचे कारण म्हणजे आम्ही आपला योग्य पुढारी निवडला नाही आज केवळ बडबडणाऱ्या पुढाऱ्यांची गरज नाही तर आम्हाला कृतिशील पुढारी हवा आहे आणि आज तुम्ही आम्हाला खरा पुढारी शोधून दिला त्याबद्दल मी तुमचे मनःपूर्वक आभार मानतो माझी खात्री आहे की, डॉ.आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाही इतकेच नव्हे तर एक वेळ अशी येईल की ते संबंध हिंदुस्थानाचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता सांगते" अशा भावना व्यक्त केल्या महाराजांच्या अशा होती की, हा समुदाय डॉ. आंबेडकर यांना आदर्श मानेल यांना नेता बनवून राजकारणात, समाजकारणात यश मिळवेल. डॉ. आंबेडकर यांना माणगाव परिषदेसाठी निमंत्रित करण्याची महाराजांची दूरदृष्टी खरी ठरली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा नेता संपूर्ण विश्वाला मिळाला भारतीय संविधानाच्या रूपात सर्वांना स्वातंत्र्य, समता, बंधुता,एकता, समान हक्क व अधिकार दिले आणि देशात आमूलाग्र बदल घडविला.

करवीर संस्थानात अनिष्ट रूढी, परंपरा, जातिभेद हा मुळातून नष्ट व्हावा यासाठी नव-नवे योजना शाहू महाराज राबवत असायचे. माणगाव परिषद हा एक सामाजिक परिवर्तनाचा प्रयत्नच होता समाज उद्धारासाठी त्यांनी अतोनातप्रयत्न केले.गोर-गरीब, दिन-दलित, अस्पृश्य, बहिष्कृत, वंचित लोकांना इथल्या वर्णव्यवस्थेने स्वतःच्या स्वार्थासाठी शेकडो वर्ष गुलामगिरीत ठेवले. त्यांच्यावर अनेक बंधने लादली या बंधनातून मुक्त करण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात काही कायदे अमलात आणले. काही समाजसुधारक कृती केल्या. शाहू महाराज माणगाव परिषदेमध्ये म्हणाले की मानवी मूलभूत हक्कांपासून दूर ठेवलेल्या कर्मठ लोकांविरुद्ध मी लढा देत आहे. जातिभेद नष्ट होणे गरजेचे आहे असे परखड मत ते मांडू लागले त्यांनी अस्पृश्य आणि विविध मागासलेल्या जातींच्या लोकांकरिता अनेक कायदे केले महार, मांग, रामोशी, बेरड या लोकांवरलावलेली हजेरी पद्धत बंद केली. ग्रामीण भागात बलुत पद्धत बंद केली. ते परिषदेवेळी भाषणातून शिक्षणाचे महत्व सांगताना म्हणाले "शिक्षणाशिवाय तुमची उन्नती होणार नाही, डॉ. आंबेडकर एक उत्तम उदाहरण तुमच्यासमोर आहे" शिक्षणामुळे या लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल होणार याची जाणीव असल्याने महाराजांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. जातीनुसार शाळा बंद करून सर्व जातींसाठी एकच शाळा असा जाहीरनामा काढला. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचा हुकुमी आदेश काढला. संस्थानातील सरकारी नोकरी मागासवर्गीयांसाठी 50% आरक्षण दिले. तलाठी जागेवर बहिष्कृत वर्गाची लोकांच्या नेमणूक व्हाव्यात यासाठी कायदे केले असे अनेक योजना त्यांनी राबविल्या या योजना राबवत असताना सनातनी लोकांकडून होणारा विरोध यावरही त्यांनी भाषणातून मनमोकळे केले. परिषद दरम्यान आपल्या परखड मतातून विचारातून त्यांनी बहिष्कृत वर्गाने प्रेरणा घ्यावी त्यांना कायद्याची माहिती व्हावी आणि मानवी हककच्या लढ्यामध्ये तेही सहभागी होतील असा उद्देश होता. भारतातील विषमतावादी समाज व्यवस्थेला आव्हान देणारी ही परिषद होती बहिष्कृत लोकांच्या मनात सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीच्या विरोधी क्रांतीचे बिजे या परिषदेने पेरली परिषद संपन्न झाल्यानंतर माणगावातील कर्मठ लोकांनी महार समाजावर आणि आप्पासाहेब पाटील यांच्यावर बहिष्कार टाकला त्यांना त्रास दिला हे महाराजांना समजल्यावर त्यांनी बहिष्कार ज्यांनी टाकलेला आहे त्यांना चांगलीच समज दिली. या परिषदेच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक एकोपा होण्यासाठी,मानवी जीवन बदलण्यासाठी त्यांचे प्रयत्न हे दिसून येतात.

**समारोप-** माणगाव परिषद यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी महाराजांची युक्ती, चातुर्य, नियोजन महत्त्वाचे ठरते त्यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने ही परिषद पार पडली त्यांच्या सामाजिक चळवळीतील एक महत्त्वाची घटना आहे. डॉ. आंबेडकर या क्रांतीसुर्याची सुरुवात शाहू महाराजांच्या सहकार्याने माणगाव परिषदेच्या माध्यमातून झाली. शाहू महाराजांनी बहिष्कृत लोकांवर होणारे अन्याय अत्याचार थांबावे यासाठी तळमळीने केलेले प्रयत्न दिसून येतात या परिषदेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकर यांची प्रेरणा अस्पृश्य समाज घेईल आपले जीवन बदलेल हा हेतू या परिषदेच्या माध्यमातून दिसून येतो डॉ. आंबेडकरांनी परिषदेचे दरम्यान काही ठराव केले त्यातील एक ठराव असा आहे की 'श्रीमन्ममहाराज शाहू छत्रपती सरकार इलाका करवीर यांनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समतेचे हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कृत्य आरंभिले आहे.याबद्दल त्यांचा वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा, असे या परिषदेचे मत आहे'. या ठरावाच्या माध्यमातून हे समजते की, बहिष्कृत लोकांसाठी शाहू महाराज एक वरदानच आहेत हे. छ. शाहू महाराज यांचा माणगाव परिषदेतील योगदान मुळे समजते.

**संदर्भ साधने**

१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : संपादक – डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, जानेवारी २००१
२) मी आणि माणगाव परिषद : प्रज्ञावंत गौतम , प्रियदर्शी प्रकाशन , कोल्हापूर. २००८
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक : वसंत मून , महाराष्ट्र शासन, मुंबई १९९०
४) लोकराजा शाहू छत्रपती : डॉ. रमेश जाधव, सुरेश एजन्सी, पुणे,२०१०

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

67

# शाहूकालीन संगीत परंपरा : १८९५ ते १९२२

**प्रियांका राजाराम पाटील**
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधीविभाग,
शिवाजी, विद्यापीठ, कोल्हापूर

---

संस्थानकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळात कोल्हापूरने विविध क्षेत्रांत जी प्रगती केली त्याचे मूळ छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहनात सापडते. संस्थानपूर्व काळामध्ये असलेल्या कलांना संस्थान काळात व्यासपीठ मिळाले. राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला यांसह विविध लोककलांना राजाश्रय मिळवून दिला. संस्थानाचे आर्थिक पाठबळ मिळाल्यानंतर येथील कलाकारांनी मागे वळून पाहिले नाही. गानमहर्षी अल्लादिया खाँ, केशवराव भोसले, आबालाल रेहमान यांच्यासह असंख्य कलाकारांनी कोल्हापूरचा नावलौकिक जगभर केला. वैयक्तिक मदतीबरोबरच देवल क्लबसारख्या संस्थांनाही अर्थसाहाय्य दिले. या पाठबळामुळे कोल्हापूरनगरी क्रीडा नगरी बरोबरच कलानगरी ही बनली. कोल्हापूरची संगीत कारकीर्द १८३८ ते १८९४ दरम्यान सुरू झाल्याचे दिसते. छत्रपती बुवा महाराज, बाबासाहेब महाराज, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी येथील कलांना राजाश्रय दिला. प्रसिद्ध गवई महादेव बुवा गोखले यांना संस्थानाचे पहिले दरबार गवई होण्याचा मान मिळाला. जैनुल अब्दुल्ला खान यांच्याकडे त्यांनी गायकीचे शिक्षण घेतले. त्यांनी ख्याल गायकी महाराष्ट्रात सर्वप्रथम आणून ती रूढही केली. गोखले घराण्यातच ते संगीत शिक्षण देत. संगीत नाटक अकादमीच्या संग्रहात त्यांच्या चिजा व बंदिशी नोटेशनसह आहेत. त्यांची गोखले घराण्याची गायकी बाळबोध वळणाची असली तरी ती साधी व सुबक होती.[१] छत्रपती शाहू महाराजांच्या पूर्व काळात कोल्हापुरात भजन, कीर्तन, मेळे, लावणी, तमाशा, साकी, दिंडी, ओव्या, लोकगीते, वाघ्या-मुरळीची गाणी असे संगीत प्रकार होते. लोकसंगीताबरोबर धृपद धमार, ठुमरी, गझल अशा प्रकारचे शास्त्रीय संगीतही होते. ते राज दरबार, जहाँगीरदार, सावकार अशा लोकांमधून ऐकले जाई. संस्थानाचा नवरात्रोत्सव व रामनवमी उत्सवात लोकसंगीत व शास्त्रीय संगीत व्हायचे. या संगीत मेळाव्यामध्ये गायनासाठी बाहेरून गायक-कलाकार यायचे.[२]

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापुरात १८९४ मध्ये वयाच्या विसाव्या वर्षी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना संगीत कलेबद्दल आवड होती. छत्रपती शाहू महाराज या कलाकारांना दरबाराचे आश्रित म्हणून नाही तर संस्थानाचे वैभव समजत असत. याच भावनेने त्यांना व त्यांच्या कलेची जोपासना करणे हे त्यांना आपले कर्तव्य वाटे.[३] त्याकाळी स्थानिक आणि बाहेरील कलावंतांना, गायक-वादक यांना दरबाराची नोकरी असायची. देवीपुढे नित्य गाणे गाऊन लोकांचे मनोरंजन करणे, स्वतः आनंद घेणे असे सर्वत्र सुरू असे. प्रसिद्ध गवई कै. महादेवबुवा गोखले हे तेव्हा दरबार गवई म्हणून संस्थानात नोकरीस होते. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र यांनीही दरबाराचीच नोकरी केली व हीच परंपरा त्यांचे चिरंजीव व सुप्रसिद्ध गायक सदूभाऊ गोखले यांनी सुरू ठेवली. सदूभाऊ हे जुन्या राजवाड्यातील तुळजाभवानी देवीपुढे गोखले घराण्याची पूर्वीपासून प्रचलित असलेली बालबोध वळणाची साधी आणि सुबक गायकी म्हणत.[४] पुढे विश्वनाथराव गोखले, त्र्यंबकराव दातार, गोविंदराव देवल, नातू फौजदार, भाऊसाहेब लिमये यांच्या पुढाकाराने १८८३ मध्ये करवीर गायन समाजाची स्थापना झाली.[५]

१८९३ मध्ये बाबा देवल, विश्वनाथभाऊ गोखले, त्रंबकराव दातार यांनी एका भाड्याच्या खोलीत नव्याने गाणे सुरू केले. रोज सायंकाळी दैनंदिन कामे आवरून गाण्याचा आस्वाद घेण्यासाठी हे लोक एकत्र जमायचे. या जागेत संगीत रंगभूमीवरील कलावंत रजबअली, चिन्नया स्वामी, अल्लादिया खाँ यांसारखे कलाकार गायक येत. जसजशी रसिकांची संख्या वाढेल तसतशी ही जागा कमी पडू लागली. त्यामुळे लक्ष्मी थिएटर मागे म्हणजेच सध्याच्या दैवज्ञ बोर्डिंगच्या मागे लुकतुकेंच्या माडीवर ही मंडळी एकत्र जमू लागली. बाबा देवल तर तेथेच राहून गानसेवा देऊ लागले. त्यांच्या गाण्याच्या आवडीमुळे या जागेला देवल क्लब असे नाव पडले. पुढे देवल क्लब व करवीर गायन समाज हे १९४६ मध्ये एकत्र आले. व त्याला गायन समाज देवल क्लब हे नाव दिले गेले.[६]

एके दिवशी शांताराम बापू, भालजी पेंढारकर, बाबूराव पेंढारकर मुनिसिपालिटीचे माधवराव जोशी या कलाकारांनी विनोदी नाटकांचे विडंबन 'मानापमान' या नाटकातून केले. योगायोगाने एका प्रयोगाला छत्रपती शाहू महाराज स्वतः उपस्थित होते. हे नाटक त्यांना खूप आवडले. नाटक संपल्यानंतर त्यांनी या कलावंतांना बोलावून विचारले. 'हे कशासाठी करताय?' तेव्हा या कलावंतांनी त्यांना देवल क्लबला इमारत नाही. ती इमारत तयार होण्यासाठी या नाटकाचे प्रयोग करतोय, त्यासाठी 'फंड' निर्माण करण्यासाठी करतोय, असे सांगितले. तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी संगीत कलेला प्रोत्साहन देण्यासाठी, संगीत कला अधिक बहरण्यासाठी

संस्थानाकडून काहीतरी देण्याची व्यवस्था केली. त्यांनी जुन्या देवल क्लबची जागा व सुरुवातीला तीन हजार रुपये मदत दिली आणि तीन हजारांचे बिनव्याजी कर्जही दिले. पुढे १९११ मध्ये स्वतः छत्रपती शाहू महाराजांनी जुन्या बिल्डिंगचे उनद्घाट केले. त्यांनी देवल क्लबला जागा देतानाही कोल्हापुरात केंद्रस्थानी दिली म्हणजे कोल्हापूरच्या आजूबाजूला माळ अन् माळ मोकळा असताना खासबाग हे सांस्कृतिक केंद्र व्हावे, यासाठी खासबागच्या पाठीमागे केशवराव भोसले नाट्यगृहाच्या शेजारी जागा दिली. त्याच्याजवळच हत्ती साठमारीचे मैदान असा कला, क्रीडा, सांस्कृतिक संगम तयार झाला. या देवल क्लबमध्ये त्याकाळी महाराष्ट्रात आठ दिवस चालणारा महोत्सव कोल्हापुरात प्रथमच आयोजित केला गेला.[७]

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर आल्यावर गानमहर्षी गौरीशंकर मानले गेलेले कलावंत गानमहर्षी अल्लादिया खाँ यांना त्यांनी १८९५ मध्ये कोल्हापुरात दरबार गायक म्हणून आणले. खाँ साहेबांबरोबर त्यांचे बंधू हैदर खाँ आणि तीन पुत्र म्हणजे खाँ भूर्जी खाँ व नसिरुद्दीन खाँ असे सर्व गवई कुटुंब कोल्हापूरला आले. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी खाँ साहेबांना आजीव पेन्शन दिली. रोजचं मटण, तूप, इम्पोर्टेड बिस्किटे दिली. ठिकठिकाणी गाणी शिकवण्याचे कार्यक्रम करण्याची मुभा दिली. अल्लादिया खाँ हे मूळचे जयपूर संस्थानातील उनियारा गावचे. ते जयपूर अत्रोली घराण्याचे प्रवर्तक होते. त्यामुळे त्यांच्या गायकीला जयपूर अत्रोली घराणे नाव पडले. चुलते जहाँगीर खाँ यांच्याकडून त्यांना गायनाचे धडे मिळाले. आमलेटा संस्थानात असताना अतिगायनाने त्यांचा आवाज बसला. त्यामुळे त्यांचा आवाज जाड झाला. म्हणून त्यांनी आपली पूर्वीची धृपद धमार गायन शैली बदलली आणि स्वतःच्या आवाजात बसेल, अशी गायनाची नवीन शैली तयार केली. तिलाच जयपूर अत्रोली घराण्याची गायकी असे म्हटले जाते. इतर आग्रा, किराणा घराण्याच्या तुलनेत जयपूर अत्रोली घराण्यातील शब्दांचा मेळ हा बुद्धी व भावना यांच्याशी अतूटपणे साधल्यामुळे रसिक आकर्षित होत. अशा पद्धतीने या घराण्यातील गायकांनी स्वतःचे कौशल्य विकसित करून तिला विशिष्ट दर्जा प्राप्त करून दिला.[८] अल्लादिया खाँ साहेबांनी स्वतःच्या गानसौंदर्यासाठी धिमी लय घेतली. ही इतर घराण्यांपेक्षा वेगळी होती. मैफलीत गाण्यासाठी त्यांनी बिहागडा, खोकर, सावनी कल्याण, जयत, त्रिवेणी, शुद्ध नट, नायकी कानडा, काफी कानडा, असे अप्रचलित असलेले राग निवडले. ग्वाल्हेर-आग्रा घराण्याच्या तिलवाडा, झुमरा, एकताल या तालांऐवजी धीमा त्रिताल, आडा चौताल, झपताल, हे ठेके प्रचलित केले. त्याचबरोबर अंतरीच्या प्रतिभेला अनुसरून वादी-संवादी बदलून रागाचे मूळ रूप बदलवले.[९]

अल्लादिया खाँ यांनी तानीबाई कागलकर, पंडित भास्करबुवा बखले, हैदर खाँ म्हणजे नथन खाँ, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डीकर, जसदनवाला, गोविंदबुवा शाळीग्राम, निवृत्तीबुवा सरनाईक, जरीवाला, अनंतराव शिरगावकर, नातू अजिजुद्दीन खाँ यांसारख्या दिग्गज कलाकारांना गायकीचे धडे दिले. या कलाकारांनी अल्लादिया खाँ यांची जयपूर अत्रोली घराण्याची परंपरा पुढे सुरू ठेवली. हे गायक अखिल भारतीय कीर्तीचे बनले.[१०]

केसरबाई या अब्दुल करीम खाँ यांच्या शिष्या. अल्लादिया खाँ यांची गानकला त्या शिकल्या. छत्रपती शाहू महाराजांसमोर खाँ साहेबांनी शिकविलेल्या चिजा त्या गायल्या. त्यावेळी महाराजांनी अल्लादिया खाँ यांचे गाणे तू अमर करशील व त्यांचे नाव काढशील, अशी त्यांच्या गाण्याची प्रशंसा केली. त्याप्रमाणेच केसरबाई या अखिल भारतीय ख्यातीच्या गायिका झाल्या. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी 'विश्वभारती'तर्फे त्यांना 'सुरश्री' या किताबाने गौरविले. स्वतंत्र भारताने त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित केले. हा गौरव एकाअर्थाने अल्लादिया खाँ व शाहू महाराज यांनी कलेच्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीचाच होता.[११]

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी देवासचे प्रसिद्ध गवई रजबअली खाँ, किराणा घराण्याचे अर्ध्वयू हैदरबक्ष खाँ, अब्दुल करीम खाँ, अल्लादिया खाँचे बंधू हैदर खाँ, पूत्र भूर्जी खाँ, नथ्थन खाँ, अंजनीबाई मालपेकर अशा असंख्य गायकांना राजाश्रय दिला. हैदरबक्ष खाँ यांनी अब्दुल करीम खाँ यांना किराणा घराण्याचे संगीताचे धडे दिले. तसेच अंजनीबाई मालपेकर या थोर गायिकेनेही हैदरबक्ष खाँ यांच्या किराणा घराण्याची परंपरा जोपासली. तसेच अल्लादिया खाँ यांचे बंधू हैदर खाँ यांच्या शिष्या लक्ष्मीबाई जाधव यांनीही हिंदुस्थानात 'गानचंद्रिका' म्हणून आपली कीर्ती अजरामर केली. पुढे त्या बडोदा सरकारच्या दरबारात गायिका म्हणून रुजू झाल्या. मेनका शिरोडकर, सी बालाजी, आप्पासाहेब देशपांडे, सरदार बाई, अझमबाई यांनी अल्लादिया खाँ यांचे पुत्र भूर्जी खाँ यांची किराणा घराण्याची परंपरा पुढे चालविली. भूर्जी खाँ यांचे शिष्य गजाननबुवा जोशी, मल्लिकार्जुन मन्सूर, वामनराव सडोलीकर, धोंडुबाई कुलकर्णी, मधुकर सडोलीकर यांनी त्यांची परंपरा पुढे सुरू ठेवली.[१२] भूर्जी खाँ यांचे शिष्य गजाननबुवा जोशी, मल्लिकार्जुन मन्सूर, वामनराव सडोलीकर, धोंडुबाई कुलकर्णी, मधुकर सडोलीकर यांनी त्यांची परंपरा पुढे सुरू ठेवली.[१३] याच दरम्यान उत्तर हिंदुस्थानातील धृपद, धमार, ख्याल असे अभिजात संगीत बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, भूगंधर्व रहिमत खाँ यांनी सुरू केली. या कलाकारांच्या हसू-हुद्दखाँ घराण्याच्या गायकीचा प्रभाव महाराष्ट्राबरोबर कोल्हापूरमध्येही पडला होता.[१४] अल्लादियाँ यांच्या

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

घराण्यातील पै. नथ्थन खाँ यांनीही जयपूर अत्रोली गानविद्येची परंपरा शेवटपर्यंत ठेवली. 'जे माझ्यापाशी आहे ते सर्व अल्लादियांच्या चरणी' याच भावनेने ते गात असत. त्यांनी प्रसिद्ध संगीततज्ज्ञ वामनराव देशपांडे, गायिका धोंडुबाई कुलकर्णी यांना संगीताचे धडे दिले.[१५] अल्लादिया खाँ यांचे शिष्य कै. गोविंदबुवा शाळीग्राम यांनीही त्यांचा वारसा अखंडपणे चालविला. गोविंदराव टेंबे यांच्या मते, 'गोविंद बुवा अल्लादिया खाँ यांसारखे चिजेचे तोंड असे काही बांधून टाकीत की, ती तरकीब कुणालाच जमली नाही.' गोविंदरावांना गळ्याचे दुखणे निर्माण झाले नसते तर अल्लादिया खाँ यांच्या गायकीचा बुलंद वारस म्हणून कलावंतासाठी ते एक आदर्श बनले असते. गोविंदबुवा शाळीग्राम यांचे शिष्य आनंदराव लिमये यांनी ही परंपरा पुढे सुरू ठेवली.[१६]

अल्लादिया खाँ यांनी मोगुबाई कुर्डीकर यांना शिष्या बनवून तालीम दिली. पुढे मोगुबाईंना १९२४ मध्ये आग्रा घराण्याचे बशीर खाँ यांच्याकडून आग्रा घराण्याची तालीम मिळाली. त्यानंतर त्या विलायत हुसेन खाँ साहेबांच्या गंडाबंध शिष्या झाल्या. पुन्हा १९३४ मध्ये मोगुबाईंनी अल्लादिया खाँ यांची १२ वर्षे तालीम घेतली. पुढे त्यांना संगीत नाटक अकादमीचे ॲवॉर्ड, पद्मभूषण पुरस्कार, रागतपस्विनी, दि लास्ट टिटान या पदव्यांनी गौरविले गेले. श्रीमती किशोरी आमोणकर, वामनराव देशपांडे, श्रीमती कमल तांबे, श्रीमती कौशल्या मंजेश्वर, श्रीमती सुशीलाराणी पटेल, पद्मा तळवलकर, सुहासिनी मुळगावकर, श्रीमती सुलभा पिशवीकर इत्यादी शिष्यांनी मोगुबाईंची ही परंपरा पुढे चालविली.[१७] अल्लादिया खाँ यांचे शिष्य पं. निवृत्तीबुवा सरनाईक यांच्याही संपूर्ण भारतभर मैफली झाल्या. त्यांनी घडविलेल्या सुप्रसिद्ध गायिका अजमबाई, सरदारबाई कारदगेकर, सुधाकर डिग्रजकर, आप्पासाहेब देशपांडे, मुरलीधर पेटकर, पुरुषोत्तम सोळांकूरकर, अरुण कुलकर्णी, नीलाक्षी जुवेकर, प्रसाद सावकार, लता गोडसे, वंदना भागवत इत्यादी शिष्यांनी त्यांची परंपरा पुढे नेली.[१८] निवृत्तीबुवा यांनी कोलकत्याला असताना दिनकर पणशीकर, विजया जाधव, प्रसाद गुळवणी या संगीत ॲकॅडमीच्या रिसर्च स्कॉलरना गुरुकुल पद्धतीत शिकविले. कोल्हापुरातही त्यांनी वेगवेगळी प्रारूपे तसेच सांजगिरी, भावसार, विराटभैरव, सुघराई, विहंग, मालीगौरा, डागुरी, मालवी यांसारखे दुर्मीळ राग रुजविले. निवृत्तीबुवांच्या शिष्यांपैकी सुधाकरबुवा डिग्रजकर यांच्या शिष्या भारती वैशंपायन यांनी शिवाजी विद्यापीठामधून असंख्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये गायत्री पंडितराव, भाग्यश्री मुळे, अश्विनी कुलकर्णी, गौरी कुलकर्णी, मुग्धा देसाई, शामराव सुतार, नितीन मुनीश्वर यांचा समावेश होतो. सुधाकरबुवांचे शिष्य शरद बेनाडीकर, मंगला जोशी, शुभदा वायंगणकर, शिवपाल बनसोडे, अरुण जेरे, रमा कुलकर्णी, विनोद डिग्रजकर, किशोरी कुलकर्णी यांनी ही परंपरा पुढे सुरू ठेवली.[१९] अल्लादिया खाँ यांच्या घराण्याची परंपरा पुढे चालविणारे महाराष्ट्र कोकीळ शंकरराव सरनाईक यांनी उतारवयातही भजनाच्या रूपाने गानसेवा सुरू ठेवली. त्यांनी कोल्हापूर रसिकांचे अनेक नाटकांमध्ये गायनातून मनोरंजन केले. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी कोल्हापूर नगरपालिकेने त्यांच्या घरासमोरील चौकास त्यांचे नाव दिले.[२०] कै. गोविंदराव टेंबे यांच्या नट, नाटककार, संगीत दिग्दर्शक, कवी, हार्मोनियम वादक अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने कोल्हापूरचे कलात्मक जीवन बहरले. त्यांनी शंकरराव सरनाईक, हिराबाई बडोदेकर, बालगंधर्व अशा अनेक कलाकारांना घडविले. त्या गोविंदराव टेंबे, अल्लादिया खाँ व भास्करबुवा बखले यांना गुरुस्थानी मानत. त्यांनी मराठी रंगभूमीवरील नाट्य संगीतला बालगंधर्वांच्या गायकीतून किर्लोस्कर वळणापासून थोडे बाजूला नेत श्रवणीय, मादक, सौंदर्यशाली, क्रांतिकारक वळण दिले. गोविंदरावांनी कोल्हापूरचा नवलौकिक देशभर केलाच. त्याचबरोबर कोल्हापूरच्या रसिकांना संगीताची एक दृष्टीही दिली.[२१] पंडित वामनराव सडोलीकर यांना जयपूर घराण्याची तालीम उ. भूर्जी खाँ साहेब आणि काही काळ प्रत्यक्ष अल्लादिया खाँसाहेब यांच्याकडून मिळाली. बंधू मधुकर सडोलीकर, कन्या पंडिता श्रुती सडोलीकर-काटकर यांनी त्यांची परंपरा जपली. पुढे मधुकर उर्फ नाना सडोलीकर यांनी विविध रागांमध्ये विपुल बंदिशी निर्माण केल्या. कोल्हापुरातील जयपूर गायकी टिकवून जयपूर घराण्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. सौ. माणिक भिडे, श्रीमती मीनाताई वझे या त्यांच्या शिष्यांनी हीच परंपरा पुढे नेली.[२२] नटसम्राट बालगंधर्व शाहू महाराजांच्या प्रेरणेने किर्लोस्कर मंडळीत आले. गोविंदराव टेंबे यांनी दिलेल्या संगीतामुळे बालगंधर्वांची गाणी संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली.[२३] बालगंधर्वांनी भूप, यमन, बिहाग, बागेश्री, भीमपलास यांसारखे राग लोकप्रिय केले.[२४] बालगंधर्वांइतकीच असामान्य प्रतिभा असलेले कलाकार म्हणजे केशवराव भोसले. वयाच्या चौथ्या वर्षांपासून त्यांनी जनुभाऊ निमकरांच्या 'स्वदेश हितचिंतक मंडळी'त प्रवेश केला. आणि विविध भूमिका साकारू लागले. त्यांची वयाच्या दहाव्या वर्षी रंगभूमीवर 'शारदे'ची भूमिका पाहून छत्रपती शाहू महाराजांची कौतुकाची थाप मिळविली. पुढे त्यांनी कोल्हापुरात आणि महाराष्ट्रात अनेक ठिकाणी नाटकांचे प्रयोग करून नाट्य रसिकांचे मनोरंजन केले. कोल्हापुरात बालगंधर्वांबरोबरही त्यांच्या संगीताचे संयुक्त जलसे झाले. त्यांनी गायनातून तडप, चैतन्य व प्रतिभा या गुणांनी रसिकमनावर राज्य केले. म्हणूनच रसिक जणांनी त्यांना 'संगीतसूर्य' ही पदवी बहाल केली. त्यांनी गुरू दत्तोपंत जांभेकर आणि रामकृष्ण बुवा वझे यांनी दिलेली गानविद्या पुढे अजरामर केली. खुद्द शाहू महाराजांनीही भा. वि. वरेरकरांना सांगितले की, 'केशा (केशवराव भोसलेंना महाराज प्रेमाने केशा म्हणत.) म्हणजे

एक तळपती तलवार आहे. तीच जर हाती मिळाली तर तुम्ही जग जिंकाल.' इतके केशवरावांचे कर्तृत्व उल्लेखनीय होते. १९१६ मध्ये केशवरावांच्या 'मृच्छकटीक' या नाटकाचा प्रयोग रसिक जनतेला पाहायला मिळावा यासाठी शाहू महाराजांनी २५ हजार प्रेक्षक बसतील एवढे 'खुले नाट्यगृह' पॅलेस थिएटरच्या रूपात उभारले. या थिएटरमध्ये केशवरावांसहित अनेक कलावंतांनी असंख्य नाट्यप्रयोग केले. शाहू महाराजांनी कला प्रेमाचे प्रतीक म्हणून एका रोमन नाट्यगृहाप्रमाणे भव्य व वैभवशाली पॅलेस थिएटर (सन १९१३ ते १९१५) अवघ्या तीन वर्षांत उभारले आणि संगीत, नाट्य क्षेत्रांतील कलाकारांना त्यांची कला साकारण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. स्वातंत्र्योत्तर काळात १९५७ मध्ये महाराष्ट्र शासनाने या थिएटरचे 'केशवराव भोसले नाट्यगृह' असे नामकरण केले आणि शाहूकालीन एका महान कलावंताचे स्मारक बनविले. ही बाब कोल्हापूरच्या कलापरंपरेत उठावदार झालेली दिसून येते.[२५]

**समारोप:** कोल्हापूर हे संगीताचे माहेरघर असल्याचे स्पष्ट होते. राजर्षी शाहू महाराजांना संगीत कलेबद्दल अपार प्रेम होते. संगीत कला ही रुजली आणि वाढली पाहिजे, या जाणिवेतून त्यांनी अल्लादिया खाँ यांसारख्या गवयांना दरबारी नोकरी देऊ केली. त्यांना योग्य बिदागी आणि इतर गरजेच्या वस्तू देऊ केल्या. शिकवणीसाठी परवानगी दिली. पॅलेस थिएटर उभारले. देवल क्लबला जागा उपलब्ध करून दिली. यामुळे असंख्य गायक-कलावंत घडले. त्यांनी ही परंपरा पुढे अजरामर केली. अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनामुळे संगीत कला कोल्हापुरात रुजली. पूर्वीपासूनच पिढीजात गायकांचा संगीत प्रपंच हा मोठा आणि समृद्ध होता, हे लक्षात येते. अल्लादिया खाँ यांचे एकही रेकॉर्ड आज उपलब्ध नाही. त्यांचे शिष्य परंपराच त्यांच्या गायकीची अनुभूती घडवून आणतात. अल्लादिया खाँ यांनी अपरिचित राग गायनातून परिचित केले. अनोख्या रागांचे आकर्षण निर्माण करून संगीत कला समृद्ध केल्याचे दिसते. त्यांच्या गायनात अनवट व अवघड रागांची मांडणी आणि विस्तार करण्याच्या मोहक शैलीसह संगीत कला समृद्ध करण्याची तळमळही होती. त्यांनी शिष्यपरंपरा निर्माण केली आणि कोल्हापुरातही संगीत परंपरा सुरू असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर प्रसिद्ध गवई रजबअली खाँ, हैदरबक्ष खाँ, अब्दुल करीम खाँ, अल्लादिया खान यांचे बंधू हैदर खाँ, पुत्र भूर्जी खाँ, नथन खाँ, अंजनीबाई मालपेकर यांनी किराणा घराण्याची परंपराच जोपासली. त्यांच्या शिष्यांनी ही परंपरा पुढे चालविल्याचे दिसून येते.

संदर्भ

१) पोटे सुधीर (संपा.), 'आनंद-पर्व' जयपूर घराणे स्वरचिंतन, कोल्हापूर, स्मरणिका २०१८, पृष्ठ क्र.३६
२) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, जानेवारी २००१, पृष्ठ क्र.२०७
३) टेंबे गोविंदराव, गानमहर्षी अल्लादिया खाँ यांचे चरित्र, प्रीमियर प्रिंटर्स, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती, पृष्ठ क्र. ६
४ भिडे ग. रं., देशपांडे पु. लं., (संपा.) कोल्हापूर दर्शन, इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिस, पुणे-४, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९७१, पृष्ठ क्र. १६२
५) मुलाखत, डिग्रजकर श्रीकांत, दि.२१ फेब्रुवारी २०२३
६) https://marathivishwakosh.org
७) उपरोक्त मुलाखत
८) स्वराभिषेक, दिवाळी अंक, दैनिक सकाळ-२०२२
९) उपरोक्त, पोटे, २०१८, पृष्ठ क्र. ३७
१०) उपरोक्त मुलाखत
११) उपरोक्त, पवार, जानेवारी २००१, पृष्ठ क्र. २१८
१२) कित्ता, पृष्ठ क्र. २१८
१३) उपरोक्त, भिडे, देशपांडे, जानेवारी १९७१, पृष्ठ क्र. १६३
१४) कित्ता, पृष्ठ क्र.१६४
१५) कित्ता, पृष्ठ क्र.१७०
१६) कित्ता, पृष्ठ क्र.१७०
१७) उपरोक्त, पोटे, २०१८, पृष्ठ क्र. ४१
१८) उपरोक्त, भिडे, देशपांडे, जानेवारी १९७१, पृष्ठ क्र. १७०
१९) उपरोक्त, दिवाळी अंक, २०२२
२०) उपरोक्त, भिडे, देशपांडे, जानेवारी १९७१, पृष्ठ क्र. १७०
२१) कित्ता, पृष्ठ क्र. १७१
२२) उपरोक्त, पोटे, २०१८, पृष्ठ क्र. ४२, ४३
२३) उपरोक्त, पवार, जानेवारी २००१, पृष्ठ क्र. २२१
२४) उपरोक्त, पोटे, २०१८, पृष्ठ क्र.३९
२५) उपरोक्त, पवार, जानेवारी २००१, पृष्ठ क्र. २२२, २२३

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

68

# लोकराजा राजर्षी शाहू महाराज: सामाजिक लोकशाहीचा स्तंभ

**श्री. रवींद्र ज. भोसले**
प्रबंधक,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराज १८७४ ते १९२२ या कालखंडात जेमतेम ४८ वर्षे आयुष्य लाभलेला लोकराजा. खरे पहायला गेले तर हा कालखंड भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या मध्यावधीचा कालखंड. या कालखंडात भारत पारतंत्र्यात होता. भारतातील जवळपास ५५० संस्थानिक इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारून आपले राज्य सुखासीन जगण्यासाठी ब्रिटिशांच्या तनखा सुरू राहण्यासाठी धडपडताना दिसून येत होते. पण वयाच्या २० व्या वर्षी राजर्षी शाहू महाराजांनी त्या काळामध्ये खऱ्या अर्थाने आपल्या रयतेच्या कल्याणासाठीच आपल्याला छत्रपती म्हणून राज्यकारभाराची सुत्रे हाती मिळाली आहेत, हे जाणूनच राज्यकारभार करण्यास सुरूवात केली.भारतीय पारतंत्र्याच्या काळात आपली प्रजा केवळ प्राथमिक शिक्षणाने शिक्षित होवू शकली तरी समाज सुधारणेची बरीच उद्दिष्ट्ये साध्य होतील याचा विचार करून प्रजेसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणारा हा राजा खरोखरीच दूरदृष्टीचा राजा म्हणूनच ओळखला जात असे. महाराजांनी केवळ समाज सुधारणांवर लक्ष देत असतानाच स्वत:च्या संस्थानाचा सर्वांगीण विकास कशा पद्धतीने घडवून आणता येईल याचाही विचार केलेला दिसून येतो. या अनुषंगाने महाराजांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना कोल्हापूरात आणून शिक्षणाच्या सुविधा पूर्ण करीत असताना त्यांच्या राहण्यासाठी प्रथम वसतिगृहाची सुरूवात व्हिक्टोरिया बोर्डींग पासून (१९०१ साली) सुरू केली. त्या वसतिगृहामध्ये सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व त्यांच्या भोजनाचीही सोय करून दिली. परंतु समाजमनावर त्या कालखंडात असणाऱ्या अस्पृश्यतेच्या जोखडामुळे वसतिगृहात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहून सर्व जातीधर्मासाठीच्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे निर्माण केली. (मराठा, जैन, मुस्लीम, लिंगायत, नाभिक, सोनार, शिंपी, मागासवर्गीय, वैश्य इत्यादी) व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. शिक्षणाच्या अभावामुळे खालावलेल्या सामाजिक स्तरामुळे व दारिद्र्यामुळे अस्पृश्यांची अवस्था अतिशय दयनिय व हालाखीची होती. त्यासाठी महाराजांनी अस्पृश्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अत्यंत प्रामाणिकपणाने प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणजे १९०२ साली केलेला आरक्षणाचा कायदा आपल्या संस्थानात लागू केला आणि हा कायदा करणारे शाहू महाराज हे भारतातील पहिले राजे होते.

पुण्यामध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाजाला काही कालावधीनंतर उदासीनता आली. परंतु शाहू महाराजांनी मोठ्या हिंमतीने महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजात कोल्हापूर संस्थानामध्ये पुर्नजीवीत करण्याचे काम महाराजांनी केल्याचे दिसून येते. विधवा केशवपनासारख्या रूढी परंपरांना विरोध करण्याचे काम कोल्हापूर संस्थानातील नाभिक समजाने त्या काळात केल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे खऱ्या अर्थाने महाराजांनी सत्यशोधक समाजाला करवीर संस्थानात दिलेला आश्रयच व त्यामुळे झालेले समाज प्रबोधन म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. राजर्षी शाहू महाराजांनी छत्रपती शिजी महाराजांचा वैचारिक वारसा चालू ठेवण्याचे त्यांच्या कृतीतून व आचरणातून दिसून येते. शाहू महाराजांनी स्वत:च्या राज्यरोहणावेळी केलेला जाहीरनामा हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्राप्रमाणेच केल्याचे दिसते. यामध्ये **''रयतेचे कल्याण हाच राज्यकारभाराचा प्रमुख उद्देश असावा''** असे महाराजांचे ठाम मत होते.

राजर्षी शाहू महाराजांच्या कालखंडामध्ये राजकीय पारतंत्र्याबरोबरच सामाजिक भेदाभेदांची समाजव्यवस्था घट्ट होती. भारतामध्ये तत्कालीन राजे व संस्थानिक ब्रिटीशांची मर्जी राखून स्वत: ऐषआरामात सत्ता भोगणे याशिवाय काहीच करत नसते. परंतु अशा या सभोवतालच्या वातावरणातून आपल्या रयतेला कसे मुक्त करता येईल याचा सातत्याने विचार महाराज करत असल्याचे दिसून येते. त्यासाठी प्रसंगी महाराजांनी समाजातील प्रस्थापित उच्चवर्णीयांशी वैर पत्करले होते. यासाठीच महाराजांनी गंगाराम कांबळे या अस्पृश्य समाजातील व्यक्तीला शहराच्या मुख्य रस्त्यावर म्हणजे भाऊसिंगजी रोडवर हॉटेल काढून दिले व स्वत: दरबारी मंडळीसह त्या हॉटेलमध्ये चहा प्यायला जात असत. त्यामुळे नाईलाजाने दरबारी मंडळीनाही चहा प्यायला लागत असे. अशा पद्धतीने अस्पृश्यता निर्मुलनाची सुरूवात महाराजांनी केली. त्याबरोबरच ३ मे १९२० मध्ये नागपूरमध्ये आयोजित बहिष्कृत भारत समाज परिषदेच्या अधिवेशनात ब्राह्मणवाद्यांचा विरोध झुगारून महाराज उपस्थित राहिले होते. महाराजांनी जातीभेद समूळ नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा मंजूर केला व फक्त कायदा करून महाराज थांबले नाहीत तर त्यांनी स्वत:ची चुलत बहिण चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदोरच्या होळकरांचे पुत्र यशवंतराव (धनगर समाज) यांचेशी घडवून आणला

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

व स्वत:च्या कुटुंबातच समाजपरिवर्तनाचा आदर्श रयतेसमोर ठेवला.जातीव्यवस्थेने जन्माधिष्ठीत व्यवसाय करण्याचे बंधन त्या काळामध्ये घातले होते. परंतु महाराजांनी कोल्हापूर गॅझेटमध्ये (२२ फेब्रुवारी १८९८) रोजी व्यक्तीस व्यवसाय स्वातंत्र्य दिले व अशा पद्धतीने जातीभेद संपविण्याचे उपाय केले. सर्वजातीय स्त्रियांविषयीचीही महाराजांची भूमिका ही प्रोत्साहनाची असल्याची दिसून येते. जुलै १९१७ मध्ये विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता देणारा कायदा संमत केला. महाराजांनी संस्थानात स्त्रियांच्या शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र शाळा व वसतिगृहे निर्माण केली. आंतरजातीय विवाहांना संरक्षण व प्रोत्साहन विवाह नोंदणीसाठी विवाह नोंदणी अधिकारी नियुक्त केला. १७ जानेवारी १९२० मध्ये महाराजांनी देवदासी प्रतिबंधक कायदा केला. जानेवारी १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा, पोटगीची तरतूद, वारसा हक्क यामुळे स्त्रियांना संरक्षण मिळाले.

**शेती उद्योग सहकारातील योगदान :** महाराजांनी रयतेच्या शेतीतील उत्पन्न वाढविणेसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. यामध्ये प्रामुख्याने शेतीसाठी मुबलक पाणी मिळावे यासाठी १९०२ मध्ये करवीर संस्थानात पाटबंधारे धोरण जाहीर केले. त्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून त्यावर देखरेखीसाठी जलसिंचन अधिकारी नियुक्त केला. राधानगरी मध्ये फेजीवडे गावी भोगावती नदीवर धरण बांधण्यास सुरूवात केली. १९१२ मध्ये शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे याकरिता कोल्हापूरमध्ये किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूट सुरू केले. त्यामध्यमातून शेतकऱ्यांना प्रगत शेतीविषयक प्रशिक्षण दिले. परंपरागत पिकांबरोबरच चहा, कॉफी, रबराचे मळे निर्माण केले. त्यामुळे कोल्हापूरच्या चहाची बाहेरच्या राज्यात निर्यात होऊ लागली. संस्थानातील शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी शाहुपूरीमध्ये मोठी बाजारपेठ वसविली. त्यामुळे व्यापारी व शेतकरी या दोघांचीही सोय झाली. कोल्हापूर संस्थानाबरोबरच महाराजांनी जयसिंगपूर येथे सुद्धा बाजारपेठ निर्माण केली. कोल्हापूर संस्थानात कापड उद्योग, मधमाशीपालन उद्योग, सुगंधी औषध तेल उद्योग सुरू करून लोकांना त्याच्या प्रशिक्षणासाठी देशाच्या विविध भागात संस्थानामार्फत पाठविले. १९०६ मध्ये कोल्हापूरात शाहू मिल या कापड गिरणीची स्थापना करून वस्त्रोद्योगाला चालना देवून लोकांना रोजगार उपलब्ध करून दिले.

शाहू महाराजांनी १९१२ मध्ये सहकारी संस्था विषयक कायदा निर्माण केला व सहकारी संस्थांची कायदेशीर नोंदणी करण्यासाठी सहकार निबंधकाची नियुक्ती केली. १९१३ साली कोल्हापूरमध्ये दि कोल्हापूर अर्बन को. ऑप. सोसायटी ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधव यांच्या नेतृत्त्वाखाली स्थापन करून कोल्हापूरात सहकार क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली. ब्राह्मण्यवादाचा क्लेशदायक अनुभव त्यांनी स्वत: घेतला होता. त्यामुळे शाहू महाराज विचाराने पक्के बहुजनवादी झाले होते. त्यांच्या बहुजनवादास ब्राह्मण्यवाद्यांनी प्रखर विरोध केला होता. महाराजांची प्रचंड निर्भत्सना केली होती. तरीही महाराजांनी आपला बहुजनवादी निर्धार जाहीरपणे स्पष्ट मांडला होता. त्यासाठी त्यांनी ब्रिटीश सरकारची सुद्धा पर्वा केली नाही. समाजातील ब्राह्मणशाहीला छेद देण्यासाठी महाराजांनी मराठा समाजातील सदाशिव बेनाडीकर या तरूणाला क्षात्रजगद्गुरू पदावर नेमणूक केली व पुरोहितशाहीवरील ब्राह्मण समाजाची मक्तेदारी मोडून काढण्याचे काम केले. कोल्हापूरात बहुजन समाजातील मुलांना धार्मिक शिक्षण मिळण्याकरिता शाहू वैदिक स्कूलची स्थापना केली.

**कला रसिक :** शाहू महाराज कलारसिक होते. त्यांनी नाट्य, संगीत, चित्रपट, चित्रकला या कलांवर अतोनात प्रेम केले. १८९२ साली महाराजांनी देवल क्लब या संगीत संस्थेची स्थापना कोल्हापूरमध्ये केली. त्याबरोबरच अल्लादिया खाँ, अब्दुलकरीम खाँ, लक्ष्मीबाई जाधव, अंजनीबाई मालवेकर यासारख्या कलाकारांना राजाश्रय देवून त्यांची गायन कला सर्व भारतभर पोहचविण्याचे कार्य केले. संगीतसूर्य केशवराव भोसले व बालगंधर्व अशा अनेक दिग्गज कलावंतांना महाराजांनी राजाश्रय देवून प्रोत्साहित केले व कलाकारांच्या प्रोत्साहनासाठी १९१५ साली भव्य पॅलेस थिएटर बांधले. कलामहर्षी बाबूराव पेंटर यांना चित्रपट निर्मितीसाठी मंगळवारपेठेमध्ये स्टुडिओसाठी जागा देणगीदाखल दिली. यामळेच कोल्हापूरची ओळख मराठी चित्रपटसृष्टीचे माहेरघर झाली. आबालाल रहिमान यांच्यासारखा चित्रकार नावारूपास आला. अशा या शाहू पर्वाचा अंत ६ मे १९२२ रोजी झाला. त्यावेळी सुद्धा त्यांचे अंत्यसंस्कार परंपरागत पद्धतीने न होता शाहू वैदिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी केले. ही त्या काळातील सामाजिक क्रांतीची घटनाच मानावी लागेल. अशाप्रकारे शाहू महाराजांचे बहुजनवादी विचार चिरंतन ठरणारे असून आजच्या समाजाला समुद्रातील दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक, प्रबोधनात्मक ठरणारे आहे व नेहमीच राहतील.

**संदर्भ :**

१) राजर्षी शाहू समजून घेताना!, प्रा. कपिल राजहंस.
२) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, डॉ. रमेश जाधव, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**69**

# राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरसंस्थानामध्ये राबविलेल्या शेती विकास विषयक धोरणांचा चिकित्सक अभ्यास

**श्री. अर्जुन राजाराम कांबळे**
अर्थशास्त्र विभाग, सहाय्यक प्राध्यापक,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,कोल्हापूर

**श्री. शुभम तानाजी पाटील**
भूगोल विभाग, सहाय्यक प्राध्यापक,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,कोल्हापूर

---

**प्रस्तावना-**भारत हा कृषिप्रधान देश असून येथील अर्थव्यवस्था पूर्णपणे शेतीवरच आधारलेली आहे. हवामानाचा लहरीपणा त्यामुळे देशात जर 10 ते 12 वर्षांनी अतिवृष्टी तर पुढील 10-12 वर्षात दुष्काळ हा ठरलेलाच होता.सन1896 ते 1899 या काळात जेव्हा संपूर्ण भारतात दुष्काळ पडला होता त्याचवेळी आजूबाजूला प्लेग ची साथ ही चालू होती. त्यावेळी दोन्ही आपत्तींना तोंड देताना महाराजांची दमछाक होऊ लागली या काळात संस्थानाचा खजिना त्यांनी लोकांसाठी वापरला व प्रथम त्यांनी तातडीचे उपाय केले आणि लगेचच त्यांनी यावर दीर्घकालीन उपाय योजनेस सुरुवात केली. त्यांनी ओळखले किसंस्थानामधील शेतीचा विकास झाल्याशिवाय इथला शेतकरी सुखी होणार नाही. महाराजांचे इथल्या शेतीवर आणि शेतकऱ्यावर प्रेम होते आणि म्हणूनच त्यांनी दुष्काळ वअतिवृष्टीयांसारख्यानैसर्गिकआप्त्तींकडूनहोणारेनुकसान व सावकार, कुलकर्णी यांचेकडून होणारे आर्थिकवमानसिकशोषण थांबविण्यासाठी त्यांनी कृषी विषयक अनेक कल्याणकारीधोरणे राबवली जी आजही इथल्या शेतकऱ्यांच्या सुखाचा आधार आहेत.

**शोधनिबंधाची व्याप्ती-**सदरच्या संशोधनाची व्याप्ती ही शाहू महाराजांनीकोल्हापूरसंस्थानामध्ये राबविलेल्या कृषी विकास धोरणांच्या अभ्यासाशी संबंधित आहे.

**शोधनिबंधाची उद्दीष्टे**

१. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरसंस्थानामध्ये राबविलेल्याकृषी विकास धोरणांचा आढावा घेणे.

२. राजर्षी शाहू महाराजांच्या कृषी धोरणांचा शेतकऱ्यावर झालेल्या परिणामांचा चिकित्सकपणे अभ्यास करणे.

**अभ्यासक्षेत्र:**




***संदर्भ:-** राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, संपादक मंडळ अध्यक्ष; आमदार पी बी साळुंखे*

**संशोधन पध्दती-** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम तथ्य संकलनावर आधारलेला असून माहिती गोळा करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख व इंटरनेट साधनसामग्रीचा वापर केला आहे.

**माहितीचे विश्लेषण-** राजर्षी शाहू महाराज हे राजे असूनही स्वतःचे कुळ शेतकरी वर्गाचे आहे हे सांगताना त्यांना कोणताही कमीपणा वाटत नव्हता.स्वतःचा उल्लेख शेतकरी अथवा शेतमजूर असा करण्यात त्यांना अभिमान वाटे. त्यांचे दत्तक वडील हे भोसले कुळातील होते.म्हणजेच आपण शेतकरी वर्गातील आहोत याची त्यांना जाणीव होती. हा देश कृषी प्रधान असल्याने शेतीची उन्नती झाल्याशिवाय इथल्या शेतकऱ्याची उन्नती होणार नाही हे त्यांनी ओळखले होते, परंतु निसर्गाचा लहरीपणा व निर्दयीसावकारीव्यवस्था अशाअस्मानीआणिसुलतानीसंकटांमुळे इथला शेतकरी पिचला आहे. त्याचे शोषण होत आहे म्हणूनच राज्याभिषेका नंतर शेती राजर्षी शाहू महाराजानीकृषीविकासासाठी अनेक धोरणे राबवली.

**शाहूपुरी व्यापारी पेठेची स्थापना :-** शाहू महाराज 1894 साली गादीवर बसले त्यावेळी संस्थानात चौदा हजार एकर उसाचे क्षेत्र होते. कोल्हापूरचा गूळ हा उच्च दर्जाचा असतो हे त्यांनी ओळखले म्हणून व्यापार वाढावा व बाहेरचा पैसा इकडे यावा,आपल्याशेतकऱ्याच्या गुळाला चांगला भाव मिळावा व शेतकऱ्याचे कल्याण व्हावे या उद्देशाने त्यांनी रेल्वे स्टेशन नजीक सन

1895 साली शाहूपुरी व्यापारी पेठेची स्थापना केली. या बाजारपेठेची वाढ होण्यासाठी पुणे, मुंबई यांसारख्याशहरातील व्यापाऱ्यांना सवलती देऊन त्यांना शाहूपुरी व्यापार पेठेत व्यापार करण्यास प्रोत्साहन दिले.सन 1899 साली कागल मध्ये निपाणीच्या व्यापाऱ्यांची सभा घेऊन कोल्हापूरला व्यापारी केंद्र बनवण्यासाठी त्यांना सवलती देण्याचे जाहीर केले. अशा प्रकारे पाच ते सात दुकानांपासून शाहूपुरी व्यापारी पेठेची सुरुवात झाली त्यावेळी गुळाचा वार्षिकव्यापार दोन ते तीन लाखांचा होता, जो आजवार्षिक 250 कोटींपर्यंतपोहोचलाआहे.

शेती, उद्योग, शिक्षणाबरोबर राजर्षी शाहू महाराजांनी व्यापार क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटवला. शाहू महाराजांनी शाहूपुरी व्यापार पेठ स्थापन करण्याचा निर्णय घेऊन येथील व्यापाराला चालना दिली. 1895 मध्ये घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक वस्तू जगभरात निर्यात होत असून, कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत आहे. त्याचा जिल्ह्याच्या अर्थकारणावर चांगलाच परिणाम दिसून येत आहे. संस्थानकाळात कोल्हापुरात उत्पादित होणारा गूळ कोकणमार्गे मुंबईमध्ये पाठवला जात होता. प्रामुख्याने राजापूर बंदरावरून गूळ मुंबई शहरात येत असल्याने राजापुरी किंवा कोकणी गूळ म्हणून ओळख निर्माण झाली होती. येथे उत्पादित होणाऱ्या गुळाची ओळख कोल्हापुरी गूळ म्हणून मिळावी यासाठी शाहू महाराजांनी शाहूपुरीत व्यापार पेठेची 1895 मध्ये स्थापना केली. तत्पूर्वी शाहू महाराजांनी कोल्हापुरात इतर वस्तूंची आवक वाढविण्यासाठी इतर संस्थांना पत्रे पाठवली होती. गुळाच्या व्यापारपेठेची केवळ स्थापना न करता संस्थानाबाहेरील व्यापाऱ्यांना येथे व्यापार करण्यासाठी निमंत्रित केले होते. शाहू महाराजांच्या विनंतीला मान देऊन त्यावेळी अनेक व्यापाऱ्यांनी कोल्हापुरात व्यापार सुरू केला. गुळाची स्वतंत्र व्यापारपेठ निर्माण झाल्यानंतर 'कोल्हापुरी गूळ' असा ब्रँड तयार झाला. व्यापारपेठेची स्थापना न करता, शेतकऱ्यांना विविध सुविधा देत नगदी पिके घेण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी धरण, सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे गुळासोबत इतर अन्नधान्यांच्या माध्यमातून व्यापाराला अधिक चालना मिळाली. त्यानंतर रेल्वेसारखी वाहतूक व्यवस्था सुरू झाल्याने व्यापार अधिक वाढतच गेला. व्यापाऱ्यांच्या वाढत्या संख्येमुळे स्वातंत्र्यानंतर शाहूपुरीतून गुळाची व्यापारपेठ सध्याच्या शाहू मार्केट यार्डमध्ये स्थलांतर करण्यात आली. तत्कालीन जिल्हाधिकारी राम प्रधान आणि तात्यासाहेब मोहिते यांनी यासाठी पुढाकार घेतला. व्यापाऱ्यांचा विरोध मोडीत काढत नव्या जागेत गुळाच्या व्यापाराला सुरुवात झाली. त्यानंतर अस्तित्वात आलेल्या शेती उत्पन्न बाजार समितीमुळे हा व्यापार अधिकच वाढत गेला. त्यातून जिल्ह्याची संपूर्ण अर्थव्यवस्थाच बदलून गेली. जिल्ह्याच्या अर्थकारणात झालेला बदल हा राजर्षी शाहू महाराजांनी घेतलेल्या निर्णयामुळेच झाल्यानेच सद्य:स्थितीला कोल्हापूरचा गूळ दुबईपर्यंत पोहोचला आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमधून दरवर्षी गूळ खरेदी-विक्रीतून सुमारे २५० कोटींची उलाढाल होत असली, तरी भाजीपाला, कांदा-बटाटा व इतर कृषिमालाच्या खरेदी-विक्रीतून येथील व्यापार अधिक भरभराटीस आला. इतर राज्य व जिल्ह्यांतून येणारा कांदा-बटाटा, कडधान्याचा कोकणसह दक्षिणेकडील राज्यांना पुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे इतर राज्यांतून अनेक कृषी उत्पादने येथील बाजार समितीमध्ये येत आहेत. यामधून दरवर्षी कोट्यवधींची उलाढाल होत असून अनेकांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अर्थकारण अधिक मजबूत होऊन जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळत आहे. याचे सर्वस्वी श्रेय सध्याच्या राजकीय लोकप्रतिनिधींपेक्षा राजर्षी शाहू महाराजांचे आहे.

**शेतकऱ्यांना कर्जे व दुष्काळात आधार:-** 1897 सालच्या दुष्काळाची संस्थानाला मोठी झळ लागली होती. अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले होते त्यांच्या जमिनी सावकाराच्या ताब्यात होत्या त्यावेळी त्या जमिनी सावकाराच्या पाशातून मुक्त करण्यासाठी शाहू महाराजांनी पिडीत शेतकऱ्यांना कर्जे दिली. शेतकऱ्यांच्या जनावरांना चारापाणी देऊन आसरा दिला व संस्थानामध्ये ती जनावरे पाळण्याची व शेतकऱ्यांना हवी तेव्हा तीपरत घेऊन जाण्याची हमी महाराजांनी दिली. जनावरांनाचरण्यासाठी जंगले खुली केली वशेतकऱ्याला शेत साऱ्यात सूट दिली.

**चहा, कॉफी व तुतीची लागवड:-** पारंपारिक पिकांबरोबर शेतीत वेगवेगळे प्रयोग केले तर शेतकऱ्याची प्रगती होण्यास वेळ लागणार नाही हे ओळखून सन 1904 साली महाराजांनी पन्हाळा येथे कॉफी लागवडीचा यशस्वी प्रयोग केला. कॉफी प्रमाणे चहाची ही लागवड केली होती. रेशीम पैदा करण्यासाठी तुतीच्या लागवडीचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी वाखासाठी कोरफडीची (फडे)लागवड केली.

**कृषीप्रदर्शन:-** शेतकऱ्यांना विविध पिकांची माहिती व्हावी शेतकरी शेती व्यवसायाकडे कसे आकर्षित होतील यासाठी महाराजांनी शेतीविषयक प्रदर्शन भरविण्यास सुरुवात केली. 1914 साली खासबाग मैदान येथे कृषीप्रदर्शन भरवून त्यात जनावरांचा, शेतीचा त्याचबरोबर कला व औद्योगिकता अशा तीन भागात त्याचा समावेश केला. शेती बरोबरच जोडधंदा मिळावा त्याचबरोबर जनावरांचे

चांगल्या रीतीने पालन पोषण व्हावे, चांगले बैल निपजावे याकडेही महाराजांचे लक्ष होते. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी बक्षीस योजनाही सुरू केली होती.

**पिकांचे संरक्षण:-** वरूणराजाने साथ दिली किशेती चांगल्या प्रमाणात पिकतेपण पिकांचे चांगल्या प्रकारे संरक्षण नाही झाले तर हातातोंडाला आलेले पीक शेतकऱ्यालागमावून बसावे लागते यासाठी शाहू महाराजांनी उपाययोजना केल्या.महाराजांनी पिकांची नासाडी करणाऱ्या रानडुक्करासारख्या पशूंना लोकांच्या मदतीनेशिकारकरूनठार मारण्यासाठी त्यांना दरबाराच्या वतीने बंदुका देण्यात याव्यातअसेहुकूम करून सांगितले.

**कुलकर्णी वतने नष्ट केली:-** शेतकऱ्यांनावतनदारी वइनामधारी जाचक ठरली होती. कुलकर्णी इनामदार हा वर्ग शेतकऱ्यांची पिळवणूक करत होता. शेतकऱ्यांवर कुलकर्ण्यांचा जुलूम होत होता. त्यांच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी महाराजांनी सन1918 मध्ये कुलकर्णी वतने नाहीशी करण्याचा कायदा केला व तलाठी पद्धत सुरू करून शेतकऱ्याला कुलकर्ण्याच्या जाचातून मुक्त केले.

**राधानगरी धरण:-** योग्यसिंचनव्यवस्थेशिवाय शेतकऱ्याला खात्रीशीर उत्पन्न मिळणार नाही.हेमहाराजांनी ओळखूनदुष्काळापासून संरक्षण करण्यासाठी 1909 सालामध्ये मोठी योजना हाती घेतली. दाजीपूर नजीक भोगावती नदीला बांधारा घालून धरण बांधले. 1908 साली धरणाच्या बांधकामात सुरुवात झाली. महाराणी लक्ष्मीबाई तलाव असे नाव या बांधाऱ्यास दिले. 1908 साली राधाबाई उर्फ आक्कासाहेब महाराज यांचा विवाह झाला. या विवाहाची आठवण म्हणून या धरणाजवळ श्री राधाबाई यांचे नावावरून राधानगरी हे गाव वसविले. जवळजवळ 1917 पर्यंत धरणाचे बरेच काम पूर्ण झाले. तोपर्यंत 26 लाख रुपये खर्च झाले होते. आर्थिक अडचणींमुळे हे काम बंद ठेवावे लागले. पुढे ही जबाबदारी राजाराम महाराजांवर येऊन पडली. ती योजना म्हणजेच सध्याचे राधानगरी धरण होय यामुळेच राधानगरी ते शिरोळ पट्ट्यातील शेतकरी आजही सुखाने जगत आहे. सुमारे 22,000 एकर कृषीक्षेत्राला पाणी मिळू लागले. याबरोबरच महाराजांनी शेतीसाठी'पाणी आडवा पाणी जिरवा'वकर्जाच्यासावकारीपाशातून सुटण्यासाठीतळागाळापर्यंतशिक्षण पोहोचवणे तसेचकृषीपूरक सहकारी संस्थांचीउभारणीअशी अनेक धोरणे त्यांनी शेती विकासासाठीकेली. महाराजांच्या या दूरदृष्टी मुळेच आजही कोल्हापूर जिल्हा सुखी आणि समृद्ध म्हणून ओळखला जातो.

**तोफांचे नांगर:-** पहिल्या महायुद्धानंतर दोन वर्षांनी या युद्धाची झळ हिंदुस्थानाला बसू लागली त्यामुळे विलायतेवरून येणारे सर्व यंत्रे, लोखंड पोलाद व कच्चा माल हे सर्व थांबले हे त्यामुळे आपल्याकडील कारखान्यांची स्थिती बिकट झाली. त्याला किर्लोस्कर कारखाना ही अपवाद नव्हता. नांगराला लागणारे लोखंड आणायचे कोठून हा प्रश्न पडला होता. हळीस पट्ट्यांना लागणाऱ्या पट्ट्या जर्मनीहून यायच्या त्याही थांबल्या होत्या. फाळ,पाठी, मधला भाग यांना लागणारे बीड इंग्लंड वरून यायचे. नांगराना लावायचा रंग सुद्धा परदेशातून यायचा. अशावेळी नांगरांचा पुरवठा कसा करायचा अशी अडचण निर्माण झाली होती. परंतु लक्ष्मणरावांनी पुण्याच्या काही व्यापाऱ्याकडून स्क्रॅप घेऊन काही अंशी ही गरज पूर्ण केली. परंतु ही तात्पुरती सोय होती. यानंतर बिडाचा व लोखंडाचा तुटवडा भासू लागल्यानंतर किर्लोस्करांना एक नवी युक्ती सुचली. गडावरती पडून असलेल्या तोफांचा वापर नांगर करण्यासाठी करावा असे त्यांना वाटले. पुढे कोल्हापूरच्या टेक्निकल स्कूलचे सुप्रिडेंट श्री. एस. व्ही. काटे यांच्याशी संबंध आल्यानंतर त्यांच्यापुढे हा प्रश्न त्यांनी मांडला. त्यांनी हा प्रश्न श्रीमंत बापूसाहेब कागलकर यांच्यासमोर मांडला त्यांनी प्रतिनिधींना घेऊन राजवाड्यात शाहू महाराजांच्या समोर ही हकीकत सांगितली शाहू महाराजांनी गडावरअसलेल्या तोफा शेतकऱ्यांना उपयोगी पडणार आहेत म्हणून मान्यता दिली व यापासून नांगर बनवण्यास सुरुवात झाली. जेणेकरून शेतकऱ्यांना नांगराचा पुरवठा करता येईल.

**समारोप-** महाराजांच्या कृषी विकास धोरणांचा आढावा घेतल्यानंतर असे दिसून येते की, महाराजांनी शेतकऱ्याचे नैसर्गिक, मानवनिर्मित तसेचउपद्रवीवन्यपशु अशा अनेक आपत्ती पासून संरक्षण करून शेतकऱ्याला प्रोत्साहन देऊन व्यापारी शेती करण्यास प्रवृत्त केले. त्यासाठी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या म्हणूनच कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी आपणास आज ही सुखी आणि समृद्ध दिसत आहे.

**संदर्भ**

1. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, संपादक मंडळ अध्यक्ष; आमदार पी बी साळुंखे
2. छत्रपती राजर्षी शाहू महाराज: तुकाराम बाबाजी नाईक; युनिव्हर्सल पब्लिकेशन कोल्हापूर
3. राजर्षी शाहू एक दृष्टिक्षेप: डॉक्टर जयसिंगराव पवार; मंजुश्री प्रकाशन कोल्हापूर.
4. राजश्री शाहू विचार व कार्य. डॉक्टर गिरीश मोरे.निर्मिती प्रकाशन कोल्हापूर.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

70

# छत्रपती शाहू महाराज आणि स्त्री मुक्ती: २१ व्या शतकातील प्रासंगिकता

**श्री. सोमनाथ विजया ज्ञानदेव रसाळ**
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जिल्हा सिंधुदुर्ग तथा
संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना**

भारतात १९ व्या शतकात ब्रिटीशांचे शासन होते. त्याचवेळी नामधारी म्हणून अनेक संस्थानात वंशपरंपरेने ,वारसा हक्काने काही संस्थांनीक राजे ही प्रशासन चालवत होते. मात्र त्यांचे प्रशासन हे ब्रिटीशांच्या अंमलाखालील होते. भारतास स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जवळपास अशी ५०० संस्थाने आणि संस्थानिक देशात होते.या संस्थानिकांपैकी बरेच नामधारी राजे ब्रिटिशांचे मांडलिक होऊन आपल्या आलिशान राजवाड्यांमध्ये चैन विलासात जीवन जगत होते. तर काही संस्थानिक व राजे मात्र आपल्या प्रजेच्या हितासाठी प्रयत्न करत होते. त्या थोडक्या राजांमध्ये करवीर संस्थानचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड अशा राजांचा उल्लेख आजही अभिमानाने केला जातो. त्यात ही राजा असूनही खरा लोकशाहीवादी व समाजसुधारक राजा म्हणून १९व्या व २०व्या शतकात ज्यांचे नाव अग्रक्रमाने इतिहासात नोंदले गेले आहे, ते म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. शाहू महाराजांचा जन्म सन १८७४ सालचा. करवीर संस्थानचे राजे म्हणून त्यांचे अधिकारारोहन २ एप्रिल १८९४ साली म्हणजे १९ व्या शतकाच्या उत्तराधार्त झाले. तिथुन २० व्या शतकाच्या पूर्वाधार्त त्यांच्या मृत्यू समयीपर्यंत म्हणजे सन १९२२ सालापर्यंत सुमारे २८ वर्षे करवीर संस्थानचे राजे म्हणून त्यांनी अविरतपणे प्रजाहित दक्ष राजा म्हणून प्रजेच्या मनावर राज्य केले.

तत्कालीन सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता मागास, वंचीत, शोषीत, समाज घटकांचे मागासलेपण, वंचीतपण, व शोषण संपविण्यासाठी एका राजाने कशी धोरणे आखावीत व राबवावीत याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणून त्यांच्या २८ वर्षाच्या अधिकार काळाकडे पाहता येईल. सन २०२४ हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्म वर्ष आहे. आज १५० वर्षांनंतरही त्यांचे अनौकीक विचार, कार्य, धोरणे आणि लोकोपयोगी निर्णय २१ व्या शतकामध्ये लोक प्रशासन आणि राज्य कारभार चालवताना उपयोगी आणि पथदर्शी ठरत आहे.

त्यांनी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी घेतलेले सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच कायदा , पुनर्विवाह कायदा, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह कायदा, देवदासी प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा, मुलींच्या लग्नाच्या वयाचा नियम, मुलांसोबत मुलींनी एकाच शाळेत शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहनपर बक्षिसांचे नियम, हुशार मुलींना पुढील उच्च शिक्षणासाठी दरबारतर्फे शिष्यवृत्ती देण्याचे नियम अशा विविध कायदे, नियम व धोरणाच्या माध्यमातून शाहू महाराजांनी आपल्या करवीर संस्थानातील स्त्रियांना विकास आणि समानतेच्या अनेक विविध संधी उपलब्ध करून दिल्या आणि खऱ्या अर्थाने भारतातील स्त्री मुक्तीच्या चळवळीस एक अधिष्ठान प्राप्त करून दिलेले आहे. स्त्रियांच्या मुक्तीसाठी व समानतेसाठी त्यांनी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी केलेले कायदे, नियम व धोरणे २१ व्या शतकातही उपयुक्त आणि पथदर्शी ठरताना दिसत आहेत. त्यामुळे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्त्री मुक्तीसाठीचे कार्य आजच्या काळात कसे प्रासंगिक आहे याचा प्रस्तुत शोध प्रकरणात अभ्यास केला आहे.

**उद्देश :-** प्रस्तुत शोध प्रकरणाची उद्देशे पुढीलप्रमाणे आहेत.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणातून स्त्री मुक्तीसाठी केलेले प्रयत्न आणि आजच्या काळातील त्यांची प्रस्तुतता यांचा अभ्यास करणे.

२) स्त्रियांचे शोषण थांबविण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले प्रयत्न आणि आजच्या काळातील त्यांची प्रस्तुतता यांचा अभ्यास करणे.

३) स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले प्रयत्न आणि आजच्या काळातील त्यांची प्रस्तुतता .

**तथ्य संकलन व संशोधन पद्धती:-** सदर शोध प्रकरणाचा अभ्यास करताना राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केलेले विविध कायदे, निर्णय व धोरणे यांचे प्रसिद्ध झालेले गॅझेट, शाहू महाराजांच्या निर्णयांची चिकित्सा करणारे विविध ग्रंथ, लेख इ.च्या सहाय्याने तथ्य संकलन करणेत आले आहे. तसेच वर्णनात्मक संशोधन पद्धतीच्या सहाय्याने सदर संशोधन प्रकरणाचा अभ्यास करणेत आला आहे.

**विषय विवेचन तथा कार्याची चर्चा :-** महाराष्ट्रात देशाच्या तुलनेत सर्वात आधी सामाजिक सुधारणांचा पाया घातला गेला आहे. त्यात पुरोगामी विचारसरणीचा मोठा वाटा आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या पायाभरणीकरिता महाराष्ट्राला प्रामुख्याने महात्मा जोतीराव

फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या प्रमुख तीन समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला आहे. म्हणूनच महाराष्ट्राला "फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र" अशी ओळख प्राप्त झाली आहे. आजही वैचारिक दृष्ट्या महाराष्ट्राच्या विचारसरणीचा अभ्यास करताना या त्रिमूर्तीशिवाय तो अभ्यास अपूर्णच राहतो. महात्मा फुलेंनी स्त्री मुक्ती चळवळीचा पाया घातला असेल तर त्यावर आपल्या राजसत्तेचा आणि प्रगल्भ विचारांचा वापर करून स्त्रीमुक्तीची इमारत उभारण्याचे काम महाराष्ट्रात विशेषत: करवीर संस्थानात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केलेले आहे. असे म्हणता येईल. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्त्री मुक्तीसाठी तथा यांच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याची प्रामुख्याने तीन भागांत विभागणी करता येईल:-

**अ] स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य आणि आजच्या काळातील त्याची प्रस्तुतता :-** "व्यक्तीच्या सर्वांगीण सुधारणेची गुरुकिल्ली म्हणजे शिक्षण" असे शाहू महाराज मानत असत. त्यामुळेच आपल्या संस्थानातील सर्व प्रजाजनांना लिहिता, वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास त्यांनी समर्थ व्हावे म्हणून "सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा"२९ सप्टेंबर १९१७ साली शाहू महाराजांनी लागू केला. या कायद्यानुसार वयाच्या सातव्या वर्षापासून चौदाव्या वर्षापर्यंतच्या मुलांना त्यांच्या आई-बापांनी शाळेत पाठवण्याची सक्ती केली गेली. आई-बापांनी वरील सक्तीच्या वयोगटातील मुलांना शाळेत न पाठविल्यास दर महा त्यावेळचा एक रुपया दंड भरावा लागे आणि असा दंड लागू झालेपासून एक महिन्याच्या आत न भरल्यास लॅन्ड रेव्हीन्यूचे नियमांप्रमाणे जंगम, जिंदगी जप्त करून दंड वसूल करण्याची तरतूद केली होती. अशाप्रकारे शिक्षण सक्तीचे करण्याची आणि शाळेत न पाठविल्यास पालकांना दंड करण्याची तरतूद त्यापूर्वी आणि त्यानंतर ही भारतात कोणत्याही कायद्यात केलेली दिसून येत नाही. मुळात भारताच्या स्वातंत्र्यानंतर ५८ वर्षांनी सन २००५ मध्ये "शिक्षणाचा अधिकार"(Right to Education)हा कायदा भारतात लागू करण्यात आला आहे. म्हणजे शाहू महाराजांनी या कायद्याच्या ८८ वर्षापूर्वीच शिक्षणाच्या अधिकाराचे महत्व ओळखले असल्याचे यावरून दिसून येते. तसेच आजच्या २१ व्या शतकातही प्राथमिक शिक्षणास अधिकाराचा दर्जा देताना शाहू महाराजांनी जो वयोगट सक्तीचा केला, तोच वयोगट भारत सरकारने निवडल्याचे दिसते. यावरून शाहू महाराजांच्या कार्याची आजच्या काळातील प्रस्तुतता दिसून येते.

**ब] स्त्रियांना विविध प्रकारच्या शोषणातून मुक्ती देण्यासाठी केलेले कायदे व कार्य आणि त्यांची २१ व्या शतकातील प्रस्तुतता :-**शाहू महाराजांनी आपल्या अधिकार काळात विशेषतः २० व्या शतकाच्या सुरुवातीस स्त्रियांच्या सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक सामाजिक कायदे केले. त्यातील पुढील चार सामाजिक कायदे हे स्त्री दास्य विमोचानातून स्त्री उद्धाराचे मुर्तीमंत प्रतिक म्हणून ओळखले जातात.

**१)विधवा पुनर्विवाहाचा कायदा(१९१७):-** शाहू महाराजांनी सन १९१७ मध्ये आपल्या संस्थानात विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला होता. त्या काळी हिंदू धर्मातील रूढी व सामाजिक बंधनामुळे विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्यास बंदी घातली होती. परंतु त्या काळी वयाच्या १२ व्या, १३ व्या वर्षातही अनेक लहान मुली विधवा व्हायच्या. त्यामुळे तिथून पुढचे भले मोठे आयुष्य त्यांना एकाकी जगावे लागायचे. त्यामुळे स्त्री म्हणून त्यांना संसार, कुटुंब यांचे सौख्य लाभावे, सन्मानाने जगता यावे म्हणून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात विधवा विवाहांवरील बंदी कायदेशीर मार्गाने ऊठवून स्त्रियांच्या पुनर्विवाहाचा मार्ग मोकळा केला.

**२)आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास व नोंदणी पद्धतीस मान्यता देणारा कायदा(१२ जुलै १९१९):-** स्त्रियांच्या उद्धारासोबतच जाती-धर्मातील विषमतेची भावना कमी करून विविध जाती-धर्मात रोटी-बेटी व्यवहार व्हावेत म्हणून शाहू महाराजांनी १२ जुलै १९१९ साली आणखी एक क्रांतिकारक कायदा आणला. तो म्हणजे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास व नोंदणी पद्धतीने विवाहास मान्यता देणारा कायदा होय. त्या काळी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह हे धर्म किवा शास्त्र संमत नव्हते. त्यामुळे असे विवाह कायदेशीर ठरवून अशा विवाहातून झालेली संतती अनौरस ठरवली जात असे. यातूनही एखाद्या स्त्रीने धाडसाने असा विवाह केल्याच तिला सामाजिक रोष आणि हाल अपेष्टांना सामोरे जावे लागायचे. शाहू महाराजांनी असे विवाह कायदेशीर ठरविणारा आणि धर्मातील रूढी परंपरांना डावलून ज्यांना नोंदणी पद्धतीने विवाह करायचा असेल, त्यांना तसे करण्यास कायदेशीर स्वतंत्र्य देणारा 'हा' कायदा अंमलात आणला. या कायद्यानुसार विवाह नोंदणीच्या वेळी वराचे वय १८ वर्षे आणि वधूचे वय १४ वर्षे असले पाहिजे असा निर्बंध घातला गेला. तसेच १८ वर्षे पूर्ण झालेल्या वधूस असा विवाह करण्यास पालकांच्या संमतीची गरज राहिली नाही. ही फार क्रांतिकारक तरतूद शाहू महाराजांनी केली होती. अश्या सामाजिक सुधारणेची सुरुवात महाराजांनी आपल्या जनक घराण्यापासून करण्याचा घेतलेला निर्णय होता.

महाराजांनी आपल्या जनक घराण्यातील चुलत बहिणीचा विवाह धनगर समाजातील युवकासोबत यांच्या सोबत करून आंतरजातीय विवाहांना समाज मान्यता देण्यासाठी स्वत:च्या घरापासून सुरुवात केल्याचे दिसून येते. आजच्या काळातही बाल

विवाह होऊ नयेत म्हणून भारत सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६ साली तयार केलेला आहे. त्यानुसार १८ वर्षाच्या आत मुलींचा विवाह हा बाल विवाह समजून तो विवाह बेकायदेशीर ठरविला जातो. तरीही बाल विवाह करण्याची प्रवृत्ती कमी झालेली नाही. तसेच आजही आंतरजातीय–आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांना ऑनर किलिंग च्या नावाखाली संपविले जाणे, समाजातून बहिष्कृत करणे असे प्रकार होताना दिसतात. यावरून शाहू महाराजांनी सुमारे १०० वर्षापूर्वी असा कायदा केल्यानंतर जनभावनांवर मात करून असे विवाह घडवून आणताना महाराजांना कोणत्या संकटांना आणि लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल असेल याची कल्पनाच केलेली बरी.

**३) स्त्रियांच्या छळवणुकीस प्रतिबंध करणारा कायदा (२ ऑगस्ट १९१९):-** शाहू महाराजांच्या काळी विविध समाजाच्या शास्त्रकारांनी कुटुंबातील प्रमुखांना कुटुंबातील स्त्रियांना किरकोळ शासन किंवा शिक्षा करण्याची परवानगी दिलेली होती. परंतु तिचा सर्रास दुरुपयोग करून स्त्रियांना वाईट रीतीने वागवण्याचा जणू परवाना मिळाल्याची समजूत करून त्या काळी वाटेल तशी क्रूर वागणूक स्त्रियांना दिली जायची. त्या काळी क्रूर वागणूक दिल्यास भारतीय दंडविधान संहितेनुसार काही गुन्ह्यात शिक्षा देण्याची तरतूद होती. परंतु जे जाच किंवा क्रूर वागणूक भारतीय दंडविधान संहितेच्या मर्यादेत येत नाहीत, अशा जाच किंवा क्रूर वागणुकीमुळे होणाऱ्या दुष्परिणामास आळा घालण्यासाठी शाहू महराजांनी "स्त्रियांना क्रूरपणाने वागविण्याचे बंद करण्याबद्दल नियम" या नावाने कायदा लागू केला. या कायद्यानुसार महाराजांनी वयाची १६ वर्षे पूर्ण केलेले समजुतीचे वयात आलेले समजावेत असे जाहीर केले आणि असा समजुतीच्या वयात आलेला जो कोणी(यात स्त्री व पुरुष दोघांचाही समावेश केला आहे) स्त्रियांशी क्रूरपणाची वागणूक करेल, त्याला ६ महिने कैद व दंडाची शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात केलेली दिसून येते. अशा प्रकारचा स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा स्वतंत्र भारतात लागू होण्यास सन २००५ साल उजडावे लागले. परंतु शाहू महाराजांनी असा कायदा १०० वर्षापूर्वीच लागू केला होता. याबाबत शाहू महाराज स्त्री – मुक्तीच्या बाबतीत काळाच्या किती पुढे जाऊन विचार करणारे दृष्टे राज्यकर्ते होते हे दिसून येते.

**४) हिंदू अनौरस संतती व जोगतिणीसंबंधी कायदा (१७ जानेवारी १९२०)** शाहू महाराजांना "वंचित- शोषित,पिडीत आणि रंजल्या गांजलेल्यांचा लोकराजा" असे का म्हटले जाते याचे उत्तर देणारा कायदा म्हणून हा कायदा सांगता येईल. त्या काळी समाजातील अनौरस संततीची हेटाळणी होत असे. काही जातीत तर त्यांना पित्याच्या मालमत्तेत वारसा हक्कच मिळू शकत नसे. महाराजांनी या अपेक्षित लोकांना न्याय मिळवुन देण्यासाठी ज्या अनौरस संततींना आतापर्यंत वारसा हक्क मिळत नव्हता, त्यांना तो या कायद्याने मिळवून दिला. तसेच याच कायद्याच्या दुसऱ्या कलमानुसार जोगतीण, मुरळी, देवदासी, भावीण म्हणून देवाला अगर देवळात सोडलेल्या अथवा धर्माच्या नावावर अन्य तऱ्हेने सोडलेल्या स्त्रियांना कोणत्याही परिस्थितीत जनक घराण्यातील वारसाचे अथवा इतर विशिष्ट हक्क मिळणार नाहीत अशी तरतुद केली गेली. वारसा हक्क मिळणार नसल्यामुळे स्त्रिया देवदासी, मुरळी, जोगतीण होण्यास प्रवृत्त होऊ नयेत म्हणून एक प्रकारे त्यांना परावृत्त करण्यासाठीच असा कायदा शाहू महाराजांनी केलेला दिसून येतो. महारष्ट्रात देवदासी प्रथा नाहीशी करणे अधिनियम २००५ साली लागू करण्यात आला. शाहू महाराजांनी या कुप्रथेस स्त्रियांनी बळी पडू नये म्हणून १०० वर्षापूर्वीच असा कायदा केल्याचे दिसून येते.

**क) स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होण्यासाठी केलेले कार्य आणि त्याची आजच्या काळातील प्रस्तुतता:-** शाहू महाराजांनी स्त्रियांचे शिक्षणासाठी तसेच स्त्रियांच्या वेगवेगळया प्रकारच्या होणाऱ्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी जसे कायदे केले, तसेच स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व समाजात निर्माण करता यावेत यासाठी आपल्या अधिकारकाळात विविध कायदे हुकूम लागू केले. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायदे व हुकूमाचा समावेश होतो.

**१) विविध जातीधर्मियांसाठी कोल्हापुरचा काडीमोड कायदा(११ जुलै १९१९):-** "त्या काळी विविध जाती धर्मात काडीमोड (घटस्फोट) पद्धतीत असलेली ढिलाई नाहीशी करून 'नवरा-बायको यांमधील भौतिक संबंध' कायद्याने सुरक्षित राखणे तसेच समाजाचा नैतिक पाया मजबूत ठेवणे यासाठी शाहू महाराजांनी ११ जुलै १९१९ रोजी आपल्या करवीर संस्थानात काडीमोड (घटस्फोट) कायदा जारी केला. हा कायदा ख्रिश्चन व पारसी लोक सोडून संस्थानातील सर्व जाती धर्माच्या लोकांना लागू केला. मुस्लीम जातीतील नवऱ्यांना त्यांच्या शरियतमधील नियमांनुसार बायकोला 'तलाक' देण्याचा हक्क या कायद्याने मान्य केला होता. तरीही या कायद्यानुसार अन्य जातीधर्माप्रमाणे मुस्लीम धर्मीय स्त्रियांना व संततींना त्यांच्या हक्काचे संरक्षण मिळाले होते. विशेषतः ज्या समाजात जातपंचायतीची वैवाहिक संबंधांच्या बाबतीत जबरदस्त पकड होतो. त्या समाजातील स्त्री पुरुषांची जातपंचायतीच्या कचाट्यातून या कायद्याच्या कलम २७ ने मुक्तता करण्याचे क्रांतिकारक काम केले."(राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ)

**२) शिमग्याच्या सणात स्त्रियांविषयी बीभस्त भाषा वापरणाऱ्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा जाहीरनामा (२१ मार्च १९२१)**

महाराजांच्या काळी शिमग्याचे सणात स्त्रियांना उद्देशून निंद्य व बीभस्त भाषा वापरली जायची. त्यामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र, स्वाभिमान व स्वतंत्र्य अस्तित्वाला उणेपना येत असे. तो नष्ट व्हावा म्हणून शाहू महाराजांनी "शिमग्याच्या सणात स्त्रियांना उद्देशून बीभस्त भाषा वापरण्याची चाल बंद करावी. या हुकुमाविरुद्ध कोणी वर्तणूक केल्यास त्यावर कायद्याप्रमाणे काम चालविले जाईल."(१) असा हुकुम तथा जाहीरनामा काढला होता. यावरून स्त्रियांच्या स्वतंत्र अस्तित्व आणि स्वाभिमानाला डिवचणाऱ्या प्रथा, पद्धती या शाहू महाराजांनी अशा प्रकारचे हुकूम आणि जाहीरनामा काढून बंद केल्याचे दिसून येते. त्यामुळेच शाहू चरित्र अभ्यासक प्रा. डॉ. मंजुश्री पवार म्हणतात कि, "शाहू महाराजांचा स्त्री प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्त्रीच्या अस्मितेच्या सर्व कक्षांना स्पर्श करणारा होता आणि या दृष्टीकोनातूनच त्यांनी स्त्री उद्धाराचा ध्वज आपल्या हाती घेतला."

**निष्कर्ष तथा अभिप्राय :-**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी एकंदरीत त्यांच्या अधिकारकाळात म्हणजे १९ व्या शतकाचा उत्तरार्ध व २० व्या शतकाच्या सुरुवातीस तत्कालीन सनातनी विचारांच्या, स्त्रिया, मागास व वंचित घटकांना गुलाम बनवून ठेवण्याच्या वृत्तीच्या समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आपल्या राजसत्तेचा पुरेपूर वापर करून घेतल्याचे प्रकर्षाने दिसून येते. तत्कालीन समाजरचनेत असलेले दोष दूर करणारे, दुर्बल, शोषित वंचीताना अन्यायी रूढी व परंपरातून मुक्ती देणारे, विशेषतः मागासवर्गीय १००८ स्त्रियांचे विविध अत्याचारांपासून संरक्षण करणारे, दुर्बल, वंचित, शोषित, मागास आणि स्त्रिया अशा उपेक्षित घटकांना त्यांचे न्याय हक्क व समानतेची संधी प्राप्त करून देणारे विविध कायदे व हुकुम करून शाहू महाराजांनी करवीर संस्थानातील स्त्रियांना सामाजिक समतेची व न्यायाची कवाडे उघडी करून देण्याचे क्रांतिकारक कार्य केलेले दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या कार्याचे यथार्थ वर्णन करताना शाहू चरित्र अभ्यासक प्रा.डॉ.मंजुश्री पवार म्हणतात कि "त्यांच्या काळात इतर राजे किंवा सामजसुधारक ही होते. परंतु त्यांचे कार्य समाजाच्या वरच्या स्तराच्या सुधारणेचे होते. किंबहुना ते कार्य आडव्या स्वरूपाचे होते. तर शाहू महाराजांनी केलेले कार्य हे उभे असे सर्व स्तरांना स्पर्श करणारे होते." राजर्षी शाहू महाराजांनी १९व्या व २०व्या शतकात स्त्रियांच्या शिक्षण, मुक्ती, उद्धारासाठी आणि स्वातंत्र्यासाठी केलेले विविध कायदे, हुकूम व प्रयत्न आज २१व्या शतकातही स्त्रियांच्या सर्वांगीण विकास आणि उद्धाराकरीता खालील प्रमाणे पथदर्शी ठरताना दिसत आहेत-

१) वंचित, शोषित, पीडितांचे सशक्तीकरण आणि प्रगतीसाठी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या शिक्षणाला दिलेले महत्वाचे स्थान आज २१व्या शतकातही ज्ञानाधारित जगात देखील तितकेच महत्वपूर्ण असल्याचे सिद्ध होते.
२) लिंग समानता,स्त्रियांचे हक्क,स्त्रियांचा स्वाभिमान, अस्तित्व यांना प्रस्थापित करण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले कायदे आणि धाडसी प्रयत्न आज २१व्या शतकातील स्त्रीवाद आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी चाललेल्या संघर्षाच्या बाबतीत ही प्रासंगिकता दाखवून देतात.
३) बालविवाह रोखणे, विवाहाचे वय निश्चित करणे आणि आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासारख्या त्यांच्या पुरोगामी सामाजिक सुधारणा आज २१व्या शतकातही समाज सुधारणेच्या प्रयत्नांना प्रोत्साहित करतात.
४) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्वतः मधील अंगभूत, अलौकिक नेतृत्व गुण, दूरदृष्टी आणि धाडशी प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर स्त्री मुक्तीसाठी केलेले कायदे व कार्य आज २१व्या शतकात स्त्रियांच्या शाश्वत विकास व लिंग समानतेसाठी कायदे करताना पथदर्शी व प्रासंगिक ठरत आहेत.

अशाप्रकारे सदर संशोधन प्रकरणातून सिद्ध होते कि १९व्या व २०व्या शतकात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी, शिक्षणासाठी आणि स्वतंत्र अस्तित्वासाठी राजसत्तेचा केलेला वापर व कार्य आज २१व्या शतकातील स्त्रियांच्या शाश्वत विकास, लिंग समानता, सामाजिक न्याय व समानता प्रस्तापित करण्यासाठी लढणाऱ्या समाज धुरीणांसाठी एक प्रेरणा स्रोत बनले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

१ करवीर सरकारचे गॅझेट भा.१.ता.२९ सप्टेंबर १९१७.
२ करवीर सरकारचे गॅझेट ता.११ जुलै १९१९.
३ करवीर सरकारचे गॅझेट ता.१२ जुलै १९१९.
४ करवीर सरकारचे गॅझेट भा.४ ता.२ ऑगस्ट १९१९
५ करवीर सरकारचे गॅझेट ता. १७ जानेवारी १९२०
६ राजर्षी छत्रपती शाहू स्मारक ग्रंथ (२५ मे २००१) संपादक, डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

71

# राजर्षी शाहू महाराजाचे विचार व आचाराचे वारसदार : छत्रपती राजाराम महाराज

**डॉ. डी. पी.गावडे**
सहयोगी प्राध्यापक
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**छत्रपती राजाराम महाराजाचा जन्म ३१ जुलै १८९८ साली राजर्षी शाहू छत्रपती घराण्यात झाला. शाहू महाराजानी भावी राज्यकर्ता म्हणून राजाराम महाराजाना दिवाण सबनीस यांच्यामार्फत राजकीय व व्यवहारवादी शिक्षण दिले. सन १९१२ ते १९१५ या कालावधित राजाराम महाराजांनी विदेशामध्ये शिक्षण घेतले. राजाराम महाराजानी विदेशातून आल्यानंतर अलाहाबादला शेती शिक्षणाचा कोर्स केला. शाहू महाराजानी राजाराम महाराजावर हेतूपूर्वक जबाबदाऱ्या टाकून त्यांना जबाबदारीची जाणीव करून दिली. राजर्षी शाहू महाराजाच्या अकाली निधनानंतर ३१ मे १९२२ रोजी कोल्हापूर संस्थानच्या कारभाराची सुत्रे होती घेतली.

**राजाराम महाराजाचे कार्य:**

१) **छत्रपती राजाराम महाराजाचे अस्पृश्यता निर्मुलन :** राजर्षी शाहू महाराजाच्याप्रमाणे छत्रपती राजाराम महाराजांनी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. राजाराम महाराजांनी पुढाकार घेऊन इंदूरचे होळकर व कागलची धाकटी पाती यांचा विवाह घडवून आणला. तत्कालीन कालखंडात समाज परिवर्तनाचे काम करणाऱ्या सत्यशोधक समाज व आर्य समाज यांना मदत केली. महाराज स्व:ता आर्य समाजाचे पुरस्कर्ते होते. २४ सप्टेबर २०२७ रोजी आर्य समाजाच्या अस्पृश्यता कॉन्फरनमध्ये झालेल्या ठरावाची दखल घेवून छत्रपती राजाराम महाराजांनी महार, मांग, रामोशी या जातीची हजेरी पध्दती कायमची बंद करण्याचे आदेश राजर्षी शाहू महाराजानंतर पुन्हा काढले. यानंतर कोल्हापूर संस्थानात हा प्रश्न पुन्हा निर्माण झाला नाही.वेठवरळा प्रतिबंधक कायद्याची अमलबजावणी केली. वरीष्ठ जातीकडून कोणत्याही प्रकारची वेठवरळा कामे सांगायची नाहीत आणि जर सांगीतली गेली तर त्यांना नोकरीतून कमी केले जाईल व याची जबाबदारी गावकामगार पाटलानी घ्यावी असा आदेश काढला. छ. राजाराम महाराजांनी १९३२ मध्ये रेडेजत्रा करण्यास हुकूमाने बंदी घातली. राजर्षी शाहू महाराजाच्या निधनानंतर महार वतनाचा रयतावा पूर्ण करण्यासाठी हूकूम काढला. महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील ४८० गावातील महार लोकांच्या जमिनीचा रयतावा पूर्ण केला . त्यामुळे नोकरी करायची गरज राहीली नाही. छ. राजाराम महाराज अस्पृश्य बांधवाना खास कार्यक्रमासाठी निमंत्रित करीत होते. छत्रपती शाहू महाराजाचा आदर्श समोर ठेवून उच्च वर्गीयाची पारंपारीक मानसिकता नष्ट करून कनिष्ठ वर्गातील लोकांच्या मानसिकता बदलून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी महाराजानी प्रयत्न केला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे म्हसू सेकू मानेची निवड. म्हसू सेकूची हेडकोचमन पदी निवड करून महाराजानी जातीपेक्षा आपण गुणवत्तेला महत्व देतो हे दाखवून दिले. अस्पृश्यांना वैयक्तिक व संस्था पातळीवर आर्थिक मदतीचे धोरण राबविले. महाराजानी सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा १९३९ ला पास केला. या कायद्यानुसार सहा महिन्यानी शिक्षा किंवा ५०० रूपये दंड किंवा दोन्ही शिक्षा एकदम भोगाव्या लागतील. अशी तरतुद होती. याच्यातून त्या समाजामध्ये सामाजिक समता व न्यायाचा त्याचा दृष्टीकोन दिसून येतो.

**२) वसाहतीची स्थापना :** छ. राजाराम महाराजांनी लक्ष्मीपूरी, ताराबाई पार्क व राजारामपूरी या वसाहतीची स्थापना केली. शाहू मिलच्या पूर्वेस नवीन ब्लॉक्स पाडून मातंग समाजाच्या राहण्याची सोय केली. पाचगाव येथील मांग लोकांनी सरकारी परवानगी न घेता सोडलेल्या जागेवर बेकायदेशीररित्या घरे बांधली होती परंतू महाराजांनी त्यांच्यावर विरोधीकृती न करता ज्या जागेवर घरे बांधली गेली त्या जमिनी संबंधीताच्या नावावर केल्या. संस्थानातील सर्व महार लोकांच्या इनाम जमिनी रयतावा करून महार लोकास देवून त्यांना गुलामगीरीतून मुक्त करण्यासाठी ज्या पाच लोकांची मदत केली त्यांना जमिन देण्याचे मंजूर करून जमिनी दिल्या. महार वतन नष्ट करून इनाम जमिनी नावावर करून घ्यावी यासाठी जणजागृती करण्यासाठी नोकरदारांना रजा दिल्या.

**३) धर्मनिरपेक्षतावादी राजाराम महाराज-** महाराजाचे जैन समाजाच्या विषयी निरपेक्षवृत्तीचे धोरण होते. जैन बोर्डिंगला महत्वाची जागा दिली.रा. शाहू महाराजांनी पर्युषण पर्वाच्या शेवटच्या पवित्र दिवशी संस्थानात कोणीही जीवीत हत्या करून नये असा आदेश काढला होतो तोच आदेश राजाराम महाराजानी कायम ठेवला. मौजे पाडळी बुद्रुक येथील मुस्लीमाना कबस्तानासाठी जागा दिली. आजरा येथील धार्मिक दंगलग्रस्तांना आर्थिक मदत दिली. मुस्लीम विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उर्दु शाळा स्थापन केल्या.

**४) राजाराम महाराजाचे शैक्षणिक कार्य :-**

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**स्त्रीशिक्षण :** प्राथमिक व स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी छ. राजाराम महाराजानी शिक्षवृत्या दिल्या तसेच शाहू महाराजानी चालू केलेल्या शिष्यवृत्या कायम ठेवल्या. यामध्ये राणी रकवारबाई, अहिल्याबाई शिष्यवृत्ती, मिसेस पेरीज शिष्यवृत्ती वॉलर शिष्यवृत्ती, राधाबाई अक्कासाहेब महाराज बक्षीस, मिसेस पेरी बक्षीस इत्यादीचा समावेश होतो. प्राथमिक शाळेतून शिक्षण घेवून बाहेर पडल्यानंतर मूलीनी माध्यमिक शिक्षण घेता यावे यासाठी छ. राजाराम महाराजानी महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कुलची स्थापना केली. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीकरीता सर्व प्रकारची फी माफ केली. त्यामुळे मुलीना महाविद्यालयीन शिक्षण घेणे शक्य झाले. छ. राजाराम महाराजाचे असे मत होते की बलवान स्त्रीपुरूष हीच खरी राष्ट्राची संपती आहे. शिक्षण खात्यातील स्त्री नोकर व इतर असा भेदभाव न करता सरकारी स्त्री नोकराना बाळंतपणाची रजा देण्याबदल जाहीरनामा काढून दिनांक ९ डिसेंबर १९३९ रोजी लागू केला.

**अस्पृश्याना शिक्षण सूधारणा सुविधा :** इलाखा पंचायतीच्या शाळामधील २३४९ विद्यार्थ्याची फी माफ केली. मोफत पाटी-पुस्तके उपलब्ध करून दिली. शैक्षणिक गुणवता वाढविण्यासाठी शिकवणी वर्गाची सोय केली. इलाखा पंचायतीच्या २५ अस्पृश्यांना शिक्षण म्हणून नियुक्ती केली.

**दलितांना शिक्षण सुधारणेसाठी शिष्यवृत्या** : छ. राजाराम महाराजांनी दलित विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्या चालू केल्या. कै. प्रिन्स शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ १९२४ मध्ये शिष्यवृत्या चालू केल्या.

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत कायद्याची अमलबंजावणी -** रा. शाहू महाराजानी १९१८ मध्ये सक्तीचे व मोफत शिक्षणाचा कायदा केला परंतू महाराजाच्या अकाली निधनामुळे कायद्याच्या अमलबंजावणी करण्यास शाहू महाराजांना पुरेसा वेळ मिळाला नाही. मात्र छ. राजाराम महाराजांनी कायद्याची अमलबंजावणी करून शिक्षणाला गती देण्याचे काम केले.

**शाळा :** ज्या गावात शाळा नव्हत्या त्या गावात शाळा उघडण्यास सुरूवात केली प्रथम करवीर व मुदरगड तालुक्यातील गावात शाळा उघडल्यनंतर इतर तालुक्यातून शाळा उघडल्या. वडगाव, हेर्ले,. घुणकी , मनपाडळे खोची या गावात रात्रशाळा चालू करून ज्या पौढांना शिक्षणाची आवड आहे त्यांच्या शिक्षणाची गरज पूर्ण केली. गावचा कारभाराची जबाबदारी तलाठी व पाटील यांच्याकडे होती. या गावकारभार पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदारीची व अधिकारांची माहिती योग्य व्हावी यासाठी पाटील व तलाठी शाळा स्थापन केल्या.

**फी सवलतीचे धोरण** : विद्यार्थ्यांना साध्या कागदावर अर्ज केला तरी शाळा, राजाराम हायस्कुल , राजाराम कॉलेजमधील विद्यार्थ्याना फी सवलती मिळत होत्या.

**माध्यमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षणाविषयी धोरण-** महाराजानी माध्यमिक शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी विद्यार्थ्याना शिष्यवृत्या दिल्या. प्रयोगशाळा , गंथालये उपलब्ध करून दिली. राजाराम कॉलेज आर्थिक अडचणीमध्ये असताना १९२२-२३ मध्ये राजाराम कॉलेजला वर्षाला जादा २५००० रूपये द्यायचे कबुल केले. राजाराम महाविद्यालमध्ये सर्वसामान्य विद्यर्थाला शिकता यावे यासाठी फी कमी ठेवली होती.कायद्याचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी साईक्स लॉ कॉलेजी स्थापना केली. माध्यमिक शाळेतील शिकवणाऱ्या शिक्षकाना प्रशिक्षणाची गरज होती ही गरज ओळखून २० जुलै १९३४ रोजी महाराणी ताराबाई कॉलेजी स्थापना केली. या कॉलेजला बीटी कॉलेज म्हणून ओळखले जाते.

**बालवीर चळवळ :** राजाराम महाराजानी स्काऊट ऑर्गनायझर याच्या सहकार्याने शिक्षकासाठी सोनतळी येथे ट्रेनिंग कॅम्प घेतला. स्काऊंट संस्थेला सोनतळी येथील बंगला व पाच एकर जागा दिली तसेच संस्थेला आवश्यक असणाऱ्या वस्तू उपलब्ध करून दिल्या.

**तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण :** महाराजानी पारंपारिक शिक्षणाबरोबरच तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी जयसिंगराव घाटगे टेक्निकल स्कूलची स्थापना केली. शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्याना औद्योगिक शिक्षण देण्यासाठी १९२८ मध्ये ओब्रायन टेक्निकल स्कूलची स्थापना केली.

**समारोप :** राजर्षी शाहू महाराजाच्या अकाली मृत्यूनंतर छत्रपती महाराजांनी १९२२ ते १९४० या कालावधीमध्ये संस्थानचा राज्यकारभार केला. राजाराम महाराजानी अस्पृश्यता निर्मुलनाचे महत्वपूर्ण कार्य केले. लक्ष्मीपुरी, राजारामपुरी वसाहतीची स्थापना केली त्याचबरोबर मातंग व मांग समाजाच्या राहण्याची व्यवस्था केली. राजाराम महाराजाचे धार्मिक धोरण निरपेक्षवृत्तीचे होते. महाराजांनी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिष्यवृत्ती, फी सवलत दिली. स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांनी केलेल्या कायद्याची अमलबंजावणी केली. पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी संस्थाची स्थापना केली. खऱ्या अर्थाने शाहू महाराजाच्या विचाराचा वसा व वारसा राजाराम महारांनी जपला.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**संदर्भ :**

१) केशव हरेल, 'छत्रपती राजाराम महाराज', अक्षर दालन, कोल्हापूर २०१६
२) गर्गे, स.म., 'करविर रियासत', तिसरी आवृत्ती , श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर,२००३
३) गायकवाड, खंडेराव आनंदराव, 'करवीर सरदारांच्या कैफियती', जानेवारी १९७१
४) पाटील बाळासाहेब, 'जीवणचक्र', सत्यवादी प्रकाशन, कोल्हापूर
५) पाटील बाळासाहेब संपा. 'कोल्हापूरची मोठी माणसं', कल्पक प्रकाशन, कोल्हापूर, १९८३
६) पवार जयसिंगराव, जाधव, रमेश, 'निवडक विजयी मराठा', विजयी मराठा पकाशन, कोल्हापूर, मार्च १९९३
७) फडके , य. दि. 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ ते ४', श्री विद्या प्रकाशन, पुणे १९९३

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**72**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कोल्हापूर संस्थानाच्या कृषी विकासातील योगदान

**डॉ. सौ. अरुंधती दिपक पाटील,**
सहाय्यक शिक्षिका (भूगोल विभाग)
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना**

भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा असून कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या २०२३ च्या आकडेवारीनुसार शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १८.३ % आहे. याचा अर्थ भारतीय शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा इतर देशांपेक्षा जास्त आहे. याच व्यवसायामुळे प्राचीन काळात सुवर्णभूमी म्हणून भारताची ओळख होती. आपला आर्थिक विकास आपल्याला साध्य करून घ्यावयाचा असेल तर, शेतीच्या विकासाला प्राधान्य द्यायला हवे. ज्या संस्थानातील बहुसंख्य लोक आपल्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून होते अशा संस्थानांपैकी एक संस्थान म्हणजे कोल्हापूर संस्थान होय. शेती, उद्योग व व्यापार इत्यादी क्षेत्रांचा विकास झाल्यास जनतेचे दारिद्रय नष्ट होईल अशी राजर्षी शाहू महाराजांची खात्री होती. कोल्हापूर संस्थानातील ९०% जनतेची उपजीविका शेतीवर अवलंबून होती. औद्योगिक विकास हा कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे हे शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांनी शेती विकासाला प्राधान्य दिले. शेतीच्या विकासासाठी अनेक उपाययोजना अमलात आणल्या. संस्थानातील शेती विकासासाठी नैसर्गिक व मनुष्यनिर्मित संकटाशी सामना करीत सातत्याने प्रयत्न केले. हे सर्व प्रयत्न महाराजांनी १८९५-९६ पासून सुरू केले. प्रगत देशाच्या तुलनेत आपल्या देशातील कृषीची उत्पादकता कमी आहे. कृषी उत्पादन वाढविण्यासाठी शेतीचे आधुनिकीकरण करणे व शेती व्यवसायाला प्रतिष्ठा मिळवून देणे हाच कृषी विकासाचा पाया आहे अशी शाहू महाराजांना खात्री होती.

शाहू महाराजांनी शेतीमधील संशोधनाला चालना दिली. शेतकऱ्यांना बियाणांच्या, खतांच्या, पैशाच्या स्वरूपात मदत केली. त्यांनी स्वतः दरबारातर्फे वेगवेगळ्या लागवडीचे सतत प्रयत्न केले. निधी उभे करून व्यावहारिक व तात्विक संशोधनाला गती दिली. आदर्श शेती संस्थानामार्फत सुरू केली. शेतीविषयक प्रदर्शने, लोकांना उत्तेजनार्थ बक्षीस व हरितक्रांती घडविण्यासाठी पाटबंधारेच्या योजना आखल्या. त्यामुळे कृषी विकासाला चालना मिळाली. त्यांचे कृषी क्षेत्रातले कार्य शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणणारे ठरले. त्यांचे आर्थिक सुधारणांमध्ये असलेले महत्त्वपूर्ण योगदान स्पृहणीय आहे. या लेखामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या कृषी क्षेत्रातील कार्याचा आढावा घेतला आहे.

**कृषी शिक्षण आणि सुधारणा :** शाहू महाराजांनी कृषीक्षेत्राच्या विकासासाठी शिक्षण आणि संशोधनाच्या महत्वाला ओळखले. त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि पद्धती शिकवण्यासाठी विविध कार्यक्रम राबवले. शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी कृषी मेळावे आणि प्रदर्शने भरवली. कोल्हापूर संस्थानातील जैन परिषदेने नोव्हेंबर १९०९ मध्ये एक शेती विषयक प्रदर्शन भरविले त्या मध्ये शेतीविषयक उत्पादने, औजारे ठेवण्यात आली.

युरोपमध्ये शेती शास्त्रीय पद्धतीने केली जात असल्याने शेतीपासून अधिक उत्पादन घेता येते हे शाहू महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते. तेव्हा आपल्या देशातही कृषी क्षेत्रात शेतीसंबंधी आधुनिक बियाणे रासायनिक खते व आधुनिक मशागत आणि सेंद्रिय शेतीच्या पद्धती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. याचा फायदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात झाला. या वरून शाहू महाराजांना शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करायची होती असे म्हणता येईल.

कृषी शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी त्यांनी शेतकरी विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेसाठी मोठे प्रयत्न केले. यामुळे शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने शेती करण्याची सवय लागली आणि शेतीचे उत्पादनशीलता वाढली. त्याचबरोबर, कृषी संशोधनासाठी शास्त्रज्ञांना आणि अभ्यासकांना प्रोत्साहन देऊन त्यांनी नवनवीन प्रयोगांना चालना दिली.

**सामाजिक न्यायाची दिशा आणि कृषी विकास :** शाहू महाराजांचा समाजविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विचार आणि कृती यांचा परिणाम कृषी क्षेत्रावरही झाला. ते सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते, आणि शेतकऱ्यांच्या, विशेषतः दलित आणि मागासवर्गीय शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

त्यांनी दलित, शूद्र, आणि इतर मागासवर्गीय शेतकऱ्यांना जमीनमालकीचा हक्क मिळवून देण्यासाठी अनेक कायदे पारित केले. जमिनीवर शेतकऱ्यांचा मालकी हक्क निर्माण होण्यासाठी त्यांनी जमीनीच्या पुनर्वितरणाच्या योजना राबविल्या. ही धोरणे

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने मोठे पाऊल होते. शेतकऱ्यांना जमिनीवर अधिकार मिळाल्याने त्यांचे जीवनमान उंचावले आणि कृषी उत्पादनांमध्येही वाढ झाली.

**सिंचनाच्या सुविधा आणि पाण्याचे व्यवस्थापन :** महाराष्ट्रातील शेतकरी खूप मोठ्या प्रमाणात नैसर्गिक पावसावर अवलंबून होते. पाणी व्यवस्थापनाच्या अभावामुळे अनेक वेळा दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असे. शाहू महाराजांनी या समस्येकडे गांभीर्याने पाहिले आणि शेतकऱ्यांसाठी पाण्याच्या सुविधा पुरवण्यासाठी सिंचनाच्या योजनांना मोठे महत्त्व दिले. सिंचनाच्या सुविधा वाढविण्यासाठी त्यांनी तलाव, कालवे आणि जलाशय बांधण्याच्या कामाला चालना दिली. यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी सुधारली आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सुविधांचा फायदा मिळू लागला. पाण्याच्या योग्य वापरामुळे कृषी उत्पादनातही मोठी वाढ झाली, आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही सुधारले.

कोल्हापूर संस्थानातील शेती सुजलाम सुफलाम होण्यासाठी संपूर्ण जमिनीचे क्षेत्र सिंचन क्षेत्राखाली येण्यासाठी राधानगरी धरणाची कल्पना त्यांच्या मनात आली. 1909 मध्ये राधानगरी धरणाच्या बांधकामाला सुरुवात केली 1915 सालापर्यंत राधानगरी धरणात 14 लाख रुपये खर्च करण्यात आले आणि चाळीस फुटापर्यंत बांधकाम झाले या धरणातून दरवर्षी 600 दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठी उपलब्ध झाले शेतीला बारा महिने पाणी उपलब्ध झाल्याने शाहू महाराजांचे हरितक्रांतीचे स्वप्न साकार झाले त्यामुळे कोल्हापूर संस्थानांमध्ये कृषी विकासाला चालना मिळाली व रोजगाराच्या संधीत वाढ होण्यास मदत झाली.

**शेतीमध्ये आधुनिक पिकांची लागवड :** शेती क्षेत्राचा कायापालट करायचा असेल तर शेतीमध्ये परंपरागत पिकांबरोबर आधुनिक पिके जसे चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, कोको यासारखी पिके घेतली पाहिजेत अशी धारणा शाहू महाराजांना होती. पुढे शाहू महाराजांनी संस्थानातील पश्चिम भागात जास्त पाऊस असणाऱ्या सह्याद्रीच्या भागात नव्या पिकांची लागवड केली. त्यांनी दरबारातर्फे अनेक रोपवाटिका तयार करून घेतल्या व या रोपांचा पुरवठा शेतकऱ्यांना केला शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यासाठी आधुनिक शेती कशी फायदेशीर आहे हे दर्शविले आहे.

**शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत :** शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीला सुधारण्यासाठी विविध योजना सुरू केल्या. त्यांचे आर्थिक स्वावलंबन करण्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांसाठी सुलभ कर्ज योजना लागू केल्या. यामध्ये अल्पव्याजी कर्ज, कर्जमाफी, आणि कर्ज पुनर्रचना अशा विविध योजनांचा समावेश होता. शेतकऱ्यांना कर्जाचे ओझे कमी करून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी त्यांनी आवश्यक ते सर्व उपाय केले.

याचबरोबर, शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी व्यापारी केंद्रे उघडली. शेतकऱ्यांना योग्य दरात त्यांचा शेतमाल विकण्याची संधी मिळावी यासाठी बाजार समित्यांची स्थापना केली. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळू लागला आणि त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली.

**सुधारित जमीन सुधारणा आणि सामाजिक न्याय :** शाहू महाराजांनी जमिनीच्या पुनर्वितरणाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात आणली. या पुनर्वितरणामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात स्थिरता आणि आत्मनिर्भरता आली. त्यांनी जमिनीच्या कायद्यानुसार दलित आणि मागासवर्गीयांना त्यांच्या जमिनीवरील अधिकार दिले. यामुळे शेतकऱ्यांना शाश्वत जमीनधारणा झाली आणि ते कृषी उत्पादनात मोठी वाढ करू शकले.

**निष्कर्ष :**छत्रपती शाहू महाराज यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य अनमोल आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील कृषीक्षेत्राने प्रगतीचा नवा मार्ग धरला. सामाजिक न्याय, कृषी शिक्षण, सिंचन सुविधा, आणि शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत यांसारख्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून दिले. त्यांच्या कार्याचा महाराष्ट्राच्या कृषीक्षेत्रावर दीर्घकालीन परिणाम झाला आहे. शाहू महाराजांची दूरदृष्टी, समर्पण आणि लोकाभिमुखता ही त्यांची नेतृत्व गुणवैशिष्ट्ये होती, जी आजही महाराष्ट्रातील शेतकरीवर्गासाठी प्रेरणादायक ठरतात. त्यामुळेच शाहू महाराजांचे कृषिक्षेत्रातील योगदान महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्वाचा अध्याय आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. आमदार पी बी साळुंखे - राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, २३ फेब्रुवारी १९७६, पृ. क्र.१६७ ते १७०.
2. जयसिंगराव पवार - राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य महाराष्ट्र इतिहास, प्रबोधीनी कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १ जानेवारी २०१२, पृ. क्र. १४१.
3. दिलीप सुरवाडे - राजर्षी शाहू महाराज, लोकसाहित्य प्रकाशन, १ मे २०१०, पृ. क्र. ११५.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

73

# राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांचे कार्य

**डॉ.अर्जुन ग.येरगे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
संपतराव माने महाविद्यालय, खानापूर ता.खानापूर

**प्रा.रुपेश रमेश जाधव**
राज्यशास्त्र विभाग
राजा श्रीपतराव भंगवंतराव महाविद्यालय, ओंध ता.खटाव जि.सातारा

---

**प्रस्तावना-**राजर्षी शाह महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपला राज्यकारभार जनतेसाठी व जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी चालवता शाहू महाराजाना रयतेचा राजा हा महासन्मान आपल्या कृती व कार्याद्वारे मिळवलेला होता या दोन्ही राजांनी बिटिश शासनाच्या पुढे जावून अनेक क्रांतिकारी निर्णय घेतल्यामुळे त्यांचा फायदा सर्वसामान्य जनतेला झाला त्यामुळे लोककल्याणकारी राज्याचा पाया घालण्याचे कार्य या दोन्ही राजानी आपल्या कालखंडामध्ये केल्याचे दिसून येते. महाराजा सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहु महाराज यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीत उच्चवर्णीय व बिटिश यांचा वर्चस्वाखाली बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी आपली सत्ता खर्ची केली. त्यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी प्रयत्न केले महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे विविध क्षेत्रातील कार्य महत्वपूर्ण आहे समाजातील गोरगरीब दीनदीलत भटक्या जमाती, वंचित पिढीतांची उध्दार करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले आधुनिक काळातही त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळते आधुनिक काळात भारतीय समाजाच्या विकासात त्यांच्या विचार व कार्याचा प्रभाव समाजावर पडलेला दिसतो महाराजा सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यातून पुरोगामी विचार व्यक्त होतात दीन दुबळ्या माणसांच्या सक्षमीकरणासंबंधी विचार स्त्री, गोरगरीब वंचित उपेक्षिताना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी धडपड यातून त्यांचे विचार व कार्य समता प्रस्थापित करणारे होते शेतकरी, कामगार व स्त्रियांच्या सामाजिक प्रश्नांना गतिमान केले दोघाचे कार्य हे सर्वसमावेशक होते. राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभारात ब्राम्हाची मक्तेदारी मोडून काढून लोकप्रशासनात सर्व जातीचे लोक असणे आवश्यक आहे त्या दृष्टीने न्यांनी ब्राम्हण सेवकाचा प्रशासनावरील प्रभाव कमी करण्यासाठी आणि सर्व समान घटकाना सहभागी करण्याचा हेतूने त्यानी पूर्वीचे राज्य प्रतिनिधी मंडळ त्या जागी 'प्रशासन मंडळ' बरखास्त करूनत्या जागी प्रशासन मंडळ नेमले तसेच त्यांनी सर्व जाती - धर्माच्या लोकांच्या विकासाचे धोरण निर्माण करुन त्यांनी एकाच जातीला राज्यकारभारात स्थान न देता सर्व जातीचा सहभाग करून घेतला यासाठी त्यांनी २६ जुलै१९०२ साली प्रशासनासाठी नोकरीत मागासलेल्या जातीना ५०% आरक्षणाची तरतूद केली मोफत सक्तीचे शिक्षण, आरक्षण धोरण, आरक्षण चळवळ, प्रचलत धोरण आरक्षण, वेदोक्त प्रकरण सत्यशोधक समाज, स्त्री शिक्षण,न्याय त्याचबरोबर राजर्षी शाहू महाराजांनी राबविलेली अर्थिक धोरणे व कार्यक्रम जनकल्याणकारी होती, शेती व आधुनिकतेबद्दल त्यांचे विचार परिवर्तनवादी होने इ स १८७५ ते इ स १९३९ दरम्यान सयाजीराव गायकवाड बडोदा संस्थानाचे अधिपती होते ते अत्यंत पुरोगामी कृत्तीचे, कर्तववान होते बड़ोदा संस्थानातीत प्रजेच्या कल्याणासाठी केलेले कार्य महत्वाचे आहे. पड्दा पध्दती बंदी, बालविवाह बंदी कन्याविक्रय बंदी, स्त्रियाना वारसा हक्क मिळवून देणे, अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह, इ सुधारणा प्रत्यक्षात त्यांनी अंमलात आणल्या घटस्फोटा संबंधीचा कायदा हा सर्व भारतान पहिल्यादा त्यांनी जारी केला, त्यामुळे आजच्या शासनाता त्याचे कार्य दिशादर्शक ठरते

**संशोधनाचे महत्व :**महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक विकासाचे कार्य व विचार पुढील पिढीस प्रेरणा देणारे ठरते म्हणून या विषयाचे महत्त्व जाणून घेता येते. राजर्षी शाहू महाराज आणि महाराज सयाजीराव गायकवाड यांनी सर्वच क्षेत्रात लोकोपयोगी व समाजहिताची कामे केली आहेत, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, न्याय तसेच सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्वे संस्थानात अंमलात आणली. तसेच संस्थानातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकामास चालना दिली तत्कालीन परिस्थितीत अनेक कल्याणकारी व कांतीकारक निर्णय घेतले. महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, शैक्षणिक, शेती, कला, क्रीडा व संस्कृती या सर्व क्षेत्राच्या संवर्धनासाठी समाज कल्याणकारी निर्णय घेतले तसेच त्यांनी आपल्या कारकिर्दीतमध्ये शूद्र, अस्पृश्य, जातीसाठी विकासाची **द्वारे** खुली केली. आरक्षण, राखीव जागा, शिष्यवृत्ती इतर मदतीच्या माध्यमातून हजारो वर्षापासून वंचित जाती जमातीचा सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणला. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे आजही त्यांचे कार्य महत्वपूर्ण ठरते. कारण आजही कल्याणकारी राज्य कसे असावे ते महाराज सयाजी गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यातून दिसून येते त्यांचे कार्य आधुनिक शासनाला सुध्दा दिशादर्शक आहे.

**संशोधन उद्दिष्टे**

1) राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सामजिक कार्याचा आढावा घेणे

2) राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे

3) राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अर्थिव कार्याचा समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे

**संशोधन गृहीतके**

1) राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य समाज उध्दरासाठी खर्ची घातल्यावे दिसते

2) राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड, यांनी समाजातील दुर्बल मुलाच्या शिक्षणासाठी कार्य केले.

3) राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी लोककल्याणकारी धोरणाच्या माध्यमातून दुर्बल घटकाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले

**संशोधन पद्धती :**प्रस्तुत संशोधन विषयात "महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे या संशोधन विषयाचे उद्दिष्ट आहे ते पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

तथ्य संकलन : प्रस्तुत संशोधन विषयाच्या तथ्य संकलनामाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही साधनांचा वापर केला जाणार आहे

**1. प्राथमिक साधने :**महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर गुजरातमधील बडोदा संस्थान आणि महाराष्ट्रातील कोल्हापूर संस्थानातील प्राचीन मूळ कागदपत्रे, गॅझेट, दरबारातील रेकॉर्ड, हुजूर आदेश, फाईल्स, वार्षिक प्रशासन अहवाल, संस्थानाशी व प्रशासनाशी संबंधीत पत्रव्यवहार इत्यादी प्राथमिक साधनामध्ये वापर करण्यात येणार आहे.

**२. दुय्यम स्त्रोत :**महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांच्याशी संबंधित जीवन चरित्रावर प्रकाशित ग्रंथ, आत्मचरित्र, आत्मकथा, आठवणी, वैयक्तिक लेख, इतर विषयातील एम.फिल., पीएच.डी. प्रबंध नियतकालिके, संशोधन अहवाल, पाक्षिके, साप्ताहिक तसेच इंटरनेटचा उपयोग प्रसारमाध्यमातून मिळणारी माहिती इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात येणार आहे.

**समारोप-** राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड हे दोघेही महापुरुष समाज सुधारणासाठी उत्तम प्रशासक आदर्श राजे होते. समाजाचा विचार मानवतावादी विचार लोकशाही विचार अन्यायास आणि शोषणास विरोध करणारे विचार दोन्ही राजाचे विचार समतुल्य होते.राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड या दोघांचा बराचसा कालखंड समकालीन असा होता. महाराजा सयाजीराव राजर्षी शाहू महाराजाहून ११ वर्षांनी मोठे होते. दोघेही दत्तकपुत्र म्हणून बडोदा आणि कोल्हापूरच्या गादीवर आले. या दोन लोकोत्तर पुरूषामध्ये असलेल्या साम्य भेदाचा विचार केला आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात सयाजीरावांनी ७५,००० लेखी हुकूम काढले. तयार केलेले कायदे छापले. सयाजीरावांनी अगोदर जे जे कायदे केले, सुधारणा केल्या त्याच राजर्षी शाहूंनी कोल्हापूरात केल्या. दोघांनीही शिक्षणास प्रोत्साहन दिले, दोघेही लोककल्याण आणि समाजसुधारणासाठी उत्तम प्रशासनाचा आदर्श होते.

**निष्कर्ष-** 1) राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या आरक्षण धोरणामुळे समाजातील सर्व वंचित घटकांना सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात समान संधी प्राप्त करून दिली. 2) राजर्षी शाहू महारांज व सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक सुधारणामुळे लोकाच्या ज्ञानामध्ये भर पडली लोकांनी अनिष्ट पंथा परंपरा सोडून नवीन सामाजिक सुधारणा स्वीकारल्या. 3) १९१७ साली शाहू महाराजांनी सक्तीचे शिक्षणाची सुरुवात केली व १८९२ मध्ये सयाजीराव गायकवाड यांनी सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली त्यामुळे आज शिक्षणाचा प्रसार प्रत्येक घराघरात झाला ते त्यांच्या दूरदुष्टीपणा वे कल्पकतेमुळे आज शक्य झाले आहे.

**संदर्भसूची :**

1 भांड बाबा (संपा.), खंड १२, महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई २०१७

2.. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २००१

3. जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, २०१७

4. जाधव रमेश, राजर्षी शाहू छत्रपती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, २०१६

5. फडके य. दि., शाहू छत्रपती आणि लोकमान्य, विद्या-प्रकाशन, पुणे, १९८६,

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

74

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज: पुरोगामी राजकीय सुधारणांचे प्रणेते

**प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश**
सहयोगी प्राध्यापक,इतिहास विभागप्रमुख,
आर्टस् अंड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता.- वाळवा, जि. सांगली

---

**प्रस्तावना:**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरवातीला भारतातील एक प्रमुख समाजसुधारक आणि राजकीय दूरदर्शी होते. त्यांची कारकीर्द केवळ एक राजाच्या भूमिकेपुरती मर्यादित नव्हती, तर त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी ठोस पावले उचलली. शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील शोषित, मागासवर्गीय, आणि दलितांसाठी न्याय आणि समतेचे ध्येय घेतले होते. त्यांच्या सुधारणात्मक दृष्टिकोनाचा पाया सामाजिक न्याय, सामाजिक सक्षमीकरण, आणि शैक्षणिक प्रगतीमध्ये होता.शाहू महाराजांचे कार्य प्लेटोच्या 'रिपब्लिक' मध्ये वर्णिलेल्या आदर्श तत्त्वज्ञ-राजाप्रमाणेच होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत जातीभेद आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला आणि आरक्षणाच्या धोरणांची सुरुवात केली. १९०१ साली मागासवर्गीयांसाठी ५०% आरक्षण लागू करण्याच्या ऐतिहासिक निर्णयाने त्यांनी देशातील समाजिक न्यायाच्या चळवळीची पायाभरणी केली. शिक्षण हे समाजिक प्रगतीचे साधन म्हणून ते ओळखत होते, म्हणूनच त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. यामुळे मागासवर्गीय लोकांना शिक्षणाच्या माध्यमातून सशक्त होण्याची संधी मिळाली. शाहू महाराजांनी अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव संपवण्यासाठी केलेले प्रयत्न आणि त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयांमुळे समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडले. शाहू महाराजांचे राजकीय सुधारणांचे विचार त्यांच्या काळाच्या पुढे होते. त्यांचा वारसा आजही सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणाच्या चळवळींना प्रेरणा देतो. त्यांच्या कार्याचा अभ्यास हा केवळ ऐतिहासिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर वर्तमान सामाजिक स्थितीच्या उजळणीसाठी देखील महत्त्वाचा आहे.

**बीज संज्ञा :** राजर्षी, छत्रपती, आरक्षण, सामाजिक समता, न्याय, ब्राह्मणेतर, शिष्यवृत्ती, पुरोगामी

**जीवन:** छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव आणि आईचे नाव राधाबाई होते. १७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी यशवंतरावांना दत्तक घेतले आणि त्यांचे नाव 'शाहू' ठेवले. शाहू महाराजांचे शिक्षण १८८९ ते १८९३ दरम्यान धारवाड येथे झाले, जिथे त्यांनी शैक्षणिक आणि शारीरिक विकास केला. १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई यांच्याशी शाहू महाराजांचा विवाह झाला. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला आणि पुढील २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे राहिले. शाहू महाराजांचे निधन ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे झाले. त्यांच्या पुरोगामी विचारसरणीने समाजसुधारणांची नवी दिशा ठरवली.

**पुरोगामी राजकीय सुधारणांचे प्रणेते:**छत्रपती शाहू महाराज हे खरे अर्थाने लोकशाहीवादी आणि समाजसुधारक होते. १८९४ साली त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ साली निधन होईपर्यंत, त्यांनी समाजातील मागासवर्गीयांसाठी उल्लेखनीय कार्य केले. शाहू महाराजांनी जाती-पंथाचा भेद न करता सर्वांसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय केली, हे त्यांच्या पुरोगामी धोरणांपैकी एक महत्त्वाचे प्राधान्य होते. त्यांच्या राजवटीत मागासवर्गीयांसाठी ५०% आरक्षणाचा निर्णय घेऊन सामाजिक समतेसाठी एक ठोस पाऊल उचलले. ब्रिटिश राजसत्तेच्या काळात शाहू महाराजांनी सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आणि बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी अनेक सुधारणा घडवल्या. सनातनी वर्गाच्या विरोधाचा सामना करून, त्यांनी दलित आणि मागासवर्गीयांसाठी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीचे मार्ग खुले केले. त्यामुळे महाराष्ट्राला "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे नाव मिळाले. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक सुधारणांनी भारतातील बदलांच्या प्रक्रियेला गती दिली. त्यांच्या राजकीय दृष्टिकोनात सामाजिक न्याय आणि शोषित वर्गाच्या सक्षमीकरणाचा विचार केंद्रस्थानी होता. त्यांच्या या सुधारणांचे महत्त्व आणि त्याचा पुढील काळातील भारतीय राजकारणावर होणारा परिणाम हा अभ्यासाचा एक गहन विषय आहे.

१. **सामाजिक न्यायासाठी आरक्षणाची स्थापना-**शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी मागासवर्गीयांसाठी ५०% आरक्षणाची अंमलबजावणी केली. त्यांचा उद्देश उच्च जातीत वर्चस्व असलेल्या प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक

समतोल साधणे होता. आरक्षण धोरणामुळे मराठा, कुणबी, दलित, आदिवासी यांसारख्या समाजघटकांना नवी संधी मिळाली म्हैसूर, मद्रास, आणि बॉम्बे प्रेसिडेन्सीने त्यांच्या उदाहरणातून प्रेरणा घेतली.

शाहू महाराजांच्या दृष्टिकोनाचा गाभा असा होता की न्याय आणि सामाजिक समता केवळ कायद्यांमधूनच नव्हे तर व्यवस्थात्मक पातळीवरही आणली पाहिजे. त्यांनी अनेक ब्राह्मण अधिकारी आणि उच्च जातींचे वर्चस्व मोडण्यासाठी हे धोरण राबवले, यामुळे व्यवस्थेत ब्राह्मणेतरांचा समावेश झाला. त्यांच्या या धोरणांमुळे ब्राह्मणेतर समाजाच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ झाली आणि त्यांना राज्यकारभारातही स्थान मिळाले.

२. **शिक्षण आणि सामाजिक प्रगती-**शिक्षण हे राजकीय सुधारणांचे एक प्रमुख साधन होते. शाहू महाराजांनी १९१२ मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. यामुळे मागासवर्गीय आणि दलित समाजातील लोकांना शैक्षणिक प्रगतीसाठी संधी मिळाली. त्यांच्या धोरणांमुळे कोल्हापूरातील शैक्षणिक क्षेत्रात एक मोठा बदल घडला, जिथे शिक्षणाचा फायदा केवळ उच्च जातींनाच मर्यादित राहिला नव्हता. शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

शाहू महाराजांनी केवळ शाळा स्थापन केल्या नाहीत, तर उपेक्षित समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती दिल्या, ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश होता. या धोरणांमुळे शाहू महाराजांनी राजकीय सुधारणा साध्य करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात एक निर्णायक पाऊल उचलले. छत्रपती शाहू महाराजांनी शैक्षणिक प्रगतीसाठी विविध समाजघटकांसाठी वसतिगृहांची स्थापना करून महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. त्यांच्या प्रयत्नांमुळे वेगवेगळ्या जाती, पंथ, आणि धर्मांच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यांनी १९०१ मध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस आणि दिगंबर जैन बोर्डिंगची स्थापना केली. १९०६ मध्ये वीरशैव लिंगायत आणि मुस्लिम बोर्डिंग सुरू करून धार्मिक विविधतेला पाठिंबा दिला.

शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी १९०८ साली मिस क्लार्क होस्टेल आणि दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग उघडले. १९२० पर्यंत त्यांनी विविध जातींसाठी २५ पेक्षा जास्त वसतिगृहे स्थापन केली, ज्यात शिवाजी वैदिक विद्यालय, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, आणि नाशिकचे उदाजी मराठा वसतिगृह यांचा समावेश होता. शाहू महाराजांच्या या प्रयत्नांमुळे सर्व समाजघटकांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी आधार मिळाला आणि सामाजिक न्यायाचा पाया भक्कम झाला.

३. **अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव विरोधात सुधारणा-**शाहू महाराजांनी अस्पृश्यता आणि जातीय भेदभावाला विरोध केला. त्यांनी दलित समाजासाठी आरक्षण, वसतिगृहे आणि शिष्यवृत्तीची व्यवस्था केली. १५ जानेवारी १९१९ रोजी त्यांनी आदेश जारी केला की, कोणीही अस्पृश्यतेचे पालन करणार नाही, आणि जो अधिकारी किंवा कर्मचारी अशा प्रकारची वागणूक करेल, त्याला राजीनामा द्यावा लागेल. या आदेशामुळे कोल्हापूर संस्थानात सामाजिक समतेची भावना निर्माण झाली. शाहू महाराजांनी दलितांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायदे केले, जसे की ३० सप्टेंबर १९१९ रोजी दलित विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळा बंद करून सर्व जातींना एकत्र शिक्षण देणारी शाळा उघडणे. त्यांनी अस्पृश्यता संपवण्यासाठी आंतरजातीय विवाह कायद्याची अंमलबजावणी केली आणि सार्वजनिक धार्मिक स्थळे राज्याच्या ताब्यात घेऊन समाजाच्या सर्व घटकांना समतोल स्थान दिले.

४. **महिलांचे सक्षमीकरण आणि समानता-**महिलांसाठी समान हक्क मिळवून देण्यासाठी शाहू महाराजांनी १५ एप्रिल १९११ रोजी एक महत्वपूर्ण आदेश दिला. यामध्ये महिलांना संपत्ती, विवाह आणि दत्तक हक्कांचे संरक्षण देणारे ठोस पाऊल उचलले. हा आदेश डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलाचा आधार बनला. शाहू महाराजांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले हे प्रयत्न त्यांच्या पुरोगामी विचारसरणीचे उदाहरण होते.

५. **प्रशासकीय सुधारणा आणि विकेंद्रीकरण-**शाहू महाराजांनी प्रशासकीय क्षेत्रातही अनेक सुधारणा केल्या. त्यांनी नोकरशाहीचे आधुनिकीकरण केले आणि प्रशासन अधिक प्रतिसादक्षम बनवले. राजकारणातील ब्राह्मण वर्चस्व कमी करण्यासाठी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर समाजाला प्रशासकीय पदांवर नियुक्त केले. १९०२ साली आरक्षण लागू केल्यानंतर, १९२२ साली ब्राह्मणेतर समाजाचे प्रमाण ७०% पेक्षा जास्त झाले होते.

६. **ब्राह्मणेतर चळवळीचे समर्थन-** शाहू महाराज हे ब्राह्मणेतर चळवळीचे कट्टर समर्थक होते. त्यांनी समाजातील उच्च जातींच्या वर्चस्वाला आव्हान दिले आणि इतर समाजांना राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात स्थान मिळवून दिले. त्यांनी ब्राह्मणेतर समाजाच्या सक्षमीकरणासाठी राजकीय सुधारणांचा पाया घातला.

**वेदोक्त वाद-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या राजकीय सुधारणांमध्ये वेदोक्त वाद एक महत्त्वपूर्ण घटना आहे. राजघराण्यातील ब्राह्मण पुरोहितांनी ब्राह्मणेतर समाजाचे वैदिक पद्धतीने संस्कार करण्यास नकार दिल्याने शाहू महाराजांनी आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाला पाठिंबा दिला. त्यांनी मराठा समाजाच्या हक्कांसाठी प्रचार केला आणि ब्राह्मण वर्चस्वाला

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

आव्हान दिले. त्यांनी धाडसी निर्णय घेऊन ब्राह्मण पुजाऱ्यांना हटवून "क्षात्रजगद्गुरू" ही पदवी एका मराठा युवकाला दिली, ज्यामुळे ब्राह्मणेतर समाजाचा धर्मगुरू म्हणून तो ओळखला जाऊ लागला. या घटनेला "**वेदोक्त वाद**" असे म्हटले जाते. या वादामुळे शाहू महाराज ब्राह्मणेतर चळवळीचे नेते बनले आणि मराठा समाजाला त्यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आणले. यामुळे ब्राह्मणेतर समाजाला अधिक सन्मान आणि हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अधोरेखित होतात.

७. **शाहू महाराजांचा दूरदृष्टीचा वारसा-**शाहू महाराजांनी केलेल्या या सुधारणांचे महत्त्व आजही कायम आहे. त्यांचे कार्य सामाजिक न्याय, समता आणि सक्षमीकरण यावर आधारित होते. त्यांनी कोल्हापुरात जे धोरणे राबवली, ती नंतर भारतीय राज्यघटनेतही प्रतिबिंबित झाली. त्यांच्या विचारांमुळे भारतातील अनेक सामाजिक आणि राजकीय सुधारणांना दिशा मिळाली.
त्यांचा दृष्टिकोन, विशेषत: सामाजिक न्याय, शिक्षण, प्रशासकीय सुधारणांवर आधारित होता, ज्यामुळे त्यांना "सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ" म्हटले जाते. त्यांच्या काळात त्यांनी घेतलेल्या सुधारणांमुळे भारतातील सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया पुढे गेली. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसारावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. स्त्री शिक्षणासाठी त्यांनी राजाज्ञा काढली आणि अस्पृश्यता नष्ट करण्याच्या उद्देशाने १९१९ मध्ये सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा तयार केला. शिक्षणाबरोबरच शाहूंनी दुष्काळ आणि प्लेगच्या काळात तातडीची मदत पुरवली. त्यांनी विविध संस्थांची स्थापना करून कृषिविकास आणि शेतकऱ्यांच्या सहकाराला प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांचे शिक्षण ब्रिटिश अधिकारी फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. त्यांनी शाळा, दवाखाने, आणि सार्वजनिक सुविधा समानतेने उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. सामाजिक बंधुभाव, समता, आणि सर्व समाजघटकांना विकासाची समान संधी देण्याचे कार्य त्यांनी केले. यामुळे त्यांना 'महाराजांचे महाराज' म्हणून गौरव मिळाला. शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना स्वतंत्र व्यवसायास प्रोत्साहित केले, व अस्पृश्य समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी शिक्षण आणि 'मूकनायक' वृत्तपत्रासाठी सहकार्य केले. त्यांची सामाजिक न्यायाची भूमिका आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी केलेले कार्य त्यांच्या नावावर 'आरक्षणाचे जनक' म्हणून गौरवले जाते. त्यांच्या कार्याचा इतिहासकारांनी आणि समकालीन लेखकांनी केलेला गौरव शाहू महाराजांच्या समर्पणाचे प्रतीक आहे.

**मूल्यमापन:** 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज: पुरोगामी राजकीय सुधारणांचे प्रणेते' हा लेख छत्रपती शाहू महाराजांच्या महत्त्वपूर्ण राजकीय आणि सामाजिक सुधारणा यांचा अभ्यास करतो. लेखात शाहू महाराजांच्या राजकीय विचारधारेचा आणि सामाजिक न्यायासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा ओघ मांडला आहे.शाहू महाराजांनी १९०२ साली आरक्षणाची अंमलबजावणी करून मागासवर्गीयांसाठी मोठे पाऊल उचलले. त्यांची ही भूमिका भारतीय राज्यघटनेच्या सिद्धांताला मार्गदर्शन करणारी ठरली आहे. लेखामध्ये आरक्षणाच्या ऐतिहासिक महत्त्वावर योग्य प्रकाश टाकण्यात आला आहे, ज्यामुळे सामाजिक वर्चस्व मोडून सामाजिक समतेची दिशा मिळाली.शिक्षण क्षेत्रातील सुधारणांबाबत लेखाने शाहू महाराजांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरवले आहे, विशेषतः दलित आणि मागासवर्गीय समाजाच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेली शिष्यवृत्ती योजना आणि शैक्षणिक सुधारणांची चर्चा सकारात्मक आहे. अस्पृश्यता विरोधी कायद्यांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक बदल घडवून आणला, ज्यामुळे कोल्हापूर संस्थानात सामाजिक समता प्रस्थापित झाली.महिलांच्या सक्षमीकरणासंदर्भात दिलेले उदाहरणे, तसेच प्रशासकीय सुधारणा यांवरही लेखाने चांगला दृष्टिकोन मांडला आहे. लेखातील दूरदृष्टीचा वारसा आणि शाहू महाराजांचा सामाजिक आणि राजकीय सुधारणा क्षेत्रातील प्रभाव प्रभावीपणे विशद केला आहे.

**संदर्भ :**

१. *डॉ. एस.एस. भोसले, क्रांतीसुक्ते: राजर्षी छत्रपती शाहू महाराज : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, तृतीय आवृत्ती जुलै २००६.* *https://sahitya.marathi.gov.in/scans/Krantisutre%20Rajshree%20Chatrapati%20Shahoo_0118.pdf*
२. *डॉ.पाटील अवनीश (संपादक), राजर्षी शाहू छत्रपती विचारवेध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, समाज प्रबोधन पत्रिका, २०२४.*
३. *प्रा. डॉ. रमेश जाधव, राजर्षी शाहू छत्रपती, नॅशनल बुक ट्रस्ट, २०१३*
४. *भगत रा. तू. : 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज जीवन व शिक्षण कार्य' सिद्धराज प्रकाशन, पुणे. २००१*
५. *साळुंखे हिंदुराव, 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज': महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.*
६. *नाईक, तु. बा. 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज': मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे.*
७. *बगाडे दत्तात्रय राजाराम, 'राजर्षी शाहू महाराज आणि कायदे कानून' : पक्ष प्रकाशन संस्था कोल्हापूर.*
८. *https://www.youtube.com/watch?v=AliUARJFZxY*
९. *https://www.youtube.com/watch?v=e6_ZaINbuH0*

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

75

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे वसतिगृहाच्या चळवळीतील योगदान: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. विशाल वसंत कुरणे**
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :** कोल्हापूर म्हणजे विद्यार्थी वसतिगृहाची माता असे म्हणण्यात शाहू महाराजांना आनंद व सार्थ अभिमान वाटत असे. ब्रिटिश पार्लमेंटला 'मदर ऑफ पार्लमेंटस' असे मोठया अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात, त्याप्रमाणे कोल्हापूरास 'मदर ऑफ बोर्डिंग हौसिस' म्हणजे 'विद्यार्थी वसतिगृहांची माता' असे सार्थ नाव मिळाले आहे. राजर्षीच्या शिक्षणविषयक प्रसाराचे मुख्य सूत्र "वसतिगृहात्मक शिक्षणाची सोय" सन १८९६-९७ साली उपलब्ध करून दिली हे विसरता येणार नाही. स्वघरापासून दूर असलेले घर म्हणजे वसतिगृह अशी भावना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण करून वसतिगृहात्मक शिक्षणाची प्रचंड मोठी चळवळच राजर्षी शाहूंनी सुरू केली. या वसतिगृह चळवळीचा हेतू समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना विद्या मिळावी हाच होता.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१) कोल्हापूर संस्थानातील वसतिगृहांच्या निर्मितीचा बहुजन समाजाच्या शैक्षणिक स्थितीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.

२) छत्रपती शाहू महाराजांचे जाती निहाय वसतिगृह निर्मिती मागील दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती :** प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर केला आहे.

**तथ्य संकलन :** प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन स्त्रोताचा वापर केला आहे. यामध्ये संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिके, मराठी विश्वकोश खंड, वर्तमान पत्रातील कात्रणे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**कोल्हापूर संस्थानातील वसतिगृहांच्या निर्मितीचा बहुजन समाजाच्या शैक्षणिक स्थितीवर झालेला परिणाम :** राजर्षी शाहू महाराजांचा आधुनिक महाराष्ट्राचे एक द्रष्टे शिल्पकार म्हणून गौरव करावा लागेल. शिक्षणाच्या अभावामुळे दीन-दु:खी झालेल्या लोकांच्या जीवनात शाहूंनी ज्ञानगंगेचा एक नवा प्रवाह निर्माण केल्याचे दिसून येते. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात ५०% जागा बहुजन समाजासाठी राखीव ठेवल्या. तसेच वसतिगृह हा शिक्षण प्रसारामागील आधारस्तंभ ठरला. गोरगरीब, हुशार, होतकरू आणि पद दलितांचा यामुळे उद्धार झाला. ज्या मागास वर्गीय अनुसुचित जाती-जमातींना प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची कवाडे बंद होती, त्यांना शिक्षणाची दारे खुली झाले. त्यामुळे वसतिगृह स्थापनेमागे प्रत्येक जातीमधील गरीब मुलांचे शिक्षण थांबू नये हा हेतू होता. वसतिगृहामध्ये अत्यंत माफक पैशामध्ये राहण्या-जवेण्याची सोय केली होती. यामध्ये विशेष म्हणजे ज्या मुलांना माफक पैसे देणे शक्य नव्हते त्या मुलांसाठी 'प्रिन्स शिवाजी मराठा' फ्री बोर्डिंगची व्यवस्था राजर्षी शाहू महाराजांनी केली. याशिवाय राजर्षी शाहू महाराजांनी गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देखील देत होते. २० मे १९११ रोजी प्राथमिक शाळेतील १५% विद्यार्थ्यांना त्यांची फी पूर्णपण माफ करण्याचा निर्णय घेतला. यापुढे तर प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

कोल्हापूरात वसतिगृहांमधून बाहेर पडलेली नामांकित विद्यार्थी कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूलच्या पांडुरंग चिमणाजी पाटील राहणार वडगाव हा मॅट्रीकची परीक्षा उत्तमरित्या पास झाला. सातारचे पी. के. शिंदे, एस. बी. जाधव, तासगावचे ए. आर. पवार, जे. पी. नाईक, लोकनेते बाळासाहेब देसाई, कम्युनिस्ट कॉ. मिरजकरांपर्यंत, पंजाबचे गव्हर्नर डी. सी. पावटे, साहित्यिक ग. ल. ठोकळ इ. विद्यार्थी या वसतिगृहामधून आधुनिम महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी असे शेकडो कर्तबगार व्यक्ती उदयास आले.

**जाती निहाय वसतिगृह निर्मिती मागील दृष्टीकोन :** सर्व जातीसाठी एक बोर्डिंग काढण्याचा १८९६ साली केलेला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर शाहू महाराजांनी प्रत्येक जातीची बोर्डिंग काढण्यास १९०१ सालापासून सुरुवात केली. शिक्षणाच्या बाबतीत ज्या ज्या जाती मागे पडल्या आहेत. त्यांना 'एकाच जातीचे' मानून शाहू महाराज पुढे घेऊन जात होते. पिढयान्पिढया ज्या समाजाची पिछेहाट झालेल्या, अंत्यजापासून वंजाऱ्यापर्यंतच्या सर्व समाजाला वर खेचण्याचा राजर्षी शाहूंचा मनापासून प्रयत्न होता. मागास वर्गीयांना अज्ञान हे आपल्या पाचवीलाच पुजलेले आहे. ब्राह्मणानीच ज्ञान घ्यावे द्यावे असा मूलत: चूकीचा समज मागासलेल्या जातीमधील लोकांच्या मनामध्ये घर करून बसला होता.

*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

ब्राम्हणेतरांच्या मनात स्वाभिमानशून्यतेच्या कल्पना इतक्या भरल्या होत्या की, ज्ञानसंपादने हे आपले कर्तव्य नसून परमेश्वराने व निसर्गानेही ते आपणास निषिद्ध ठरविले आहे असा समज त्यांचा होता. या भ्रामक विचारांचे निराकरण झाल्याशिवाय मागासवर्गीय जाती-जमाती मध्ये शिक्षणाचा प्रसार होणार नाही असा शाहू महारांजाचे मत होते. प्रत्येक जातीचे मतपरिवर्तन करून त्यांना शिक्षणाकडे वळविणे हे कठीण काम राजर्षींनी आत्मियतेने व तळमळीने केले. याचे कारण राजर्षींच्या मनात शिक्षण-प्रेमाविषयीचा 'जिवंत झरा' होता. समाज मनावर असलेला जातीनिष्ठतेचा पगडा ओळखूनच राजर्षींनी वसतिगृहातच शिक्षणासाठी जातनिहाय वसतिगृहे काढण्यास प्रोत्साहन दिले. त्या काळातील जातीनिष्ठ समाजव्यवस्थेची अवस्था पाहून शाहू महाराजांनी प्रत्येक जातीने आपापल्या ठिकाणी वसत असलेल्या शक्तीनिशी शिक्षण घेतले पाहिजे, असा आग्रह राजर्षींचा होता.

राजर्षी शाहू महाराजांना सर्व जाती बांधवाच्या अंगणामध्ये विद्यामृताचे झरे निर्माण करावयाचे होते. 'समाजसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून राजर्षी शाहू महाराजांनी त्या त्या जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहे उपलब्ध करून देऊन शिक्षणाची संधी घेण्यासाठी प्रवृत्त करायचे होते. ज्या त्या जाती-जमातींच्या पुढाऱ्यांना एकत्र करून शिक्षणातून स्वजातीचा आता तरी उद्धार करा असे सांगावयाचे होते. जातीनिहाय वसतिगृहे स्थापन करण्यामागचे उद्देश पुढीलप्रमाणे:

१) समाजाच्या सर्व स्तरांमध्ये वसतिगृहात्मक शिक्षणविषयक जागृती निर्माण करणे.
२) शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी कमी करणे.
३) दुय्यम व उच्च शिक्षणास वाव करून देणे.
४) समाजाच्या उन्नतीसाठी वसतिगृहे काढतील असे कार्यकर्ते तयार करणे.
५) शिक्षणाची दारे सर्वांना मोकळी करणे.
६) जातीभेदाची भावना क्षीण करणे.

**राजर्षी शाहू महाराजांनी एकूण २० जातवार वसतिगृहे स्थापन केली, ती खालीलप्रमाणे :** १९०१- व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, १९०५- दिगंबर जैन बोर्डिंग,९०६- मुस्लिम बोर्डिंग, १९०७- वीरशैव लिंगायत बोर्डिंग, १९०८- मिस क्लार्क हॉस्टेल, १९०८- दैवज्ञ बोर्डिंग, १९११- नामदेव बोर्डिंग, १९१२- कायस्थ प्रभू बोर्डिंग, १९१२- पांचाल ब्राह्मण बोर्डिंग, १९१२- सारस्वत बोर्डिंग, १९१५- इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल, १९१८- आर्य समाज गुरूकुल, १९१८- वैश्य बोर्डिंग, १९१९- ढोर चांभार बोर्डिंग, १९२०- शिवाजी वैदिक विद्यालय बोर्डिंग, १९२०- प्रिन्स शिवाजी फ्री मराठा बोर्डिंग, १९२०- सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग, १९२१- सुतार बोर्डिंग, १९२१- नाभिक विद्यार्थी वसतिगृह, १९२१- श्री देवांग बोर्डिंग.

**निष्कर्ष :**

१) समाजातील जातीसंस्थेच्या निर्बंधामुळे, पवित्र-अपवित्रतेच्या दृष्टीकोनामुळे एकत्रित शिक्षण घेण्यामध्ये अडथळा निर्माण होत होता. जातीनिहाय वसतिगृहाच्या निर्मितीमुळे प्रत्येक जातीमध्ये शैक्षणिक गतीशीलतेचे प्रमाण वाढले.
२) जातीनिहाय वसतिगृहामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची शिक्षणामध्ये अभिरूची निर्माण झाली.
३) वसतिगृहाच्या स्थापनेमुळे समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत छत्रपती शाहूंना शिक्षण पोहचवता आले.
४) वसतिगृहांच्या निर्मितीमुळे सर्व जातीचे शिक्षणात समावेशन झाले. परिणामी प्रत्येक जातीला विकासाच्या प्रवाहात आणणे शक्य झाले.

**संदर्भ सूची :**

१) गर्गे स. मा., 'करवीर रियासत', पुणे प्रकाशन, प्रथमावृत्ती १९६८.
२) साळुंखे पी. बी., 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६.
३) भगत रा. तु., 'राजर्षी शाहू: शिक्षणविषयक विचार आणि कार्ये', चैतन्य प्रकाशन, कोल्हापुर, प्रथमावृत्ती, १९८१.
४) भगत रा. तु., 'शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज', सिद्धराज प्रकाशन पुणे, १९९९.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

76

# राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याची उपयुक्तता

**प्रा. डॉ. सुरेश मारुती चव्हाण**
इतिहास विभाग प्रमुख
कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज

---

**प्रस्तावना -** आपल्या 28 वर्षांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानाचा कायापालट करणारे राजर्षी शाहू महाराज हे प्रजाहितदक्ष सत्ताधिश होते. समाज सुधारण्यासाठी स्वीकारलेल्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी अत्यावश्यक असणारे असामान्य शौर्य व धैर्य त्यांच्याजवळ होते. समाजाला मानवी समान संधीचे मूलभूत हक्क मिळवून देणारे ते थोर राष्ट्रपुरुष होते. मानवी मूल्यांची जाणीव ठेवणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांनी अमानवी प्रवृत्ती विरुद्ध आयुष्यभर लढा दिला. समाजातील अस्पृश्य जातींना, दिनदलितांना न्याय देणे आणि लोकशाही समाजाची बांधणी करणे या संदर्भात त्यांनी केवळ विचारच मांडले नाहीत तर आपल्या राजसत्तेचा वापर करून जाणीवपूर्वक आणि तितक्याच निर्धाराने सामाजिक न्यायासाठी अनेक निर्णय घेतले. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांमध्ये राजर्षी शाहू महाराजांची गणना केली जाते. समाजामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी स्वतंत्र भारताला जे निर्णय घ्यावे लागले त्याची ऐतिहासिक पायाभरणी राजर्षी शाहू महाराजांनी केलेली होती.

त्यातूनच शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याची उपयुक्तता स्पष्ट होते. म्हणूनच सदर शोधनिबंधामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य व त्याची उपयुक्तता यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे**

१. राजर्षी शाहू महाराज यांची जडणघडण अभ्यासणे.
२. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकणे.
३. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची उपयुक्तता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती -** प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच समाजशास्त्रीय ऐतिहासिक विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा चिकित्सकपणे वापर केला आहे. त्या अनुषंगाने समकालीन साहित्य, संदर्भग्रंथ, अहवाल, विशेषांक ,वृत्तपत्रे इत्यादी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून सदरचे संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**राजर्षी शाहू महाराजांची जडणघडण:** राजर्षी शाहू महाराजांचा जन्म 26 जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव असे होते. याच दरम्यान कोल्हापूर संस्थानात एक दुःखद घटना घडली. ती म्हणजे १८८४ रोजी चौथे शिवाजी यांना इंग्रजांनी वेडे ठरवून अहमदनगरच्या तुरुंगात डांबून ठेवले आणि येथेच निपुत्रिक अवस्थेत त्यांचा अंत झाला. तेव्हा कोल्हापूरच्या राजगादीचा प्रश्न निर्माण झाला. म्हणून विधवा राणीसाहेब आनंदीबाई यांनी कागलच्या घाटगे घराण्यातील जयशिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे चिरंजीव यशवंतराव यांना दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १८८४ रोजी यशवंतरावांचे दत्तक विधान मंजूर झाले आणि पुढे वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजेच १८९४ रोजी समारंभपूर्वक यशवंतरावांचा राज्याभिषेक होऊन कोल्हापूरच्या राजगादीची सत्ता सुत्रे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या हाती घेतली. सन १८९४ ते १९२२ अशी २८ वर्षे राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन हिताय बहुजन सुखाय हे सूत्र सतत ध्यानीमनी ठेवून लोककल्याणकारी राज्यकारभार केला. त्याचा मागोवा घेतला असता त्यांच्या जाहीरनाम्यातील, 'आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी' तिच्या कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थांनचे हर एक प्रकारे भरभराट होत जावी अशी आमची उत्कट इच्छा आहे' हे शब्द राजर्षी शाहू महाराजांनी केवळ औपचारिकतेचा भाग म्हणून आपल्या जाहीरनाम्यात मुद्रित केले नव्हते तर ते कृतीत आणले होते हे लक्षात येते.

**सामाजिक कार्य:** राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कार्यकाळात समाज, शिक्षण, संस्कृती, संगीत, कला, खेळ, रंगभूमी, शेती, उधोग यासारख्या विविध क्षेत्रात मोलाचे कार्य केले. खरं तर वेदोक्त प्रकरणामुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. पंचगंगा नदीमध्ये स्नान करताना आपल्याच पुरोहिताकडून झालेल्या अपमानाच्या प्रचंड वेदनेमधूनच त्यांच्या जीवनात सामाजिक कार्याच्या बंडखोरीचा जन्म झाला. आणि त्यातूनच शाहू महाराजांनी महान कार्याचा इतिहास घडविला. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची अथवा समाजाची प्रगती होत नाही याची जाणीव शाहू महाराजांना असल्याने त्यांनी शिक्षणास महत्त्व दिले. अज्ञानात बुडून गेलेल्या आपल्या देशात उत्तम मुत्सद्दी आणि लढवय्ये वीर कधीच निपजणार नाहीत. म्हणूनच त्यांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

आवश्यकता वाटत होती. त्याचाच एक भाग म्हणून १९१७ मध्ये कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

याच वेळी प्राथमिक शाळेच्या फी माफीची घोषणाही करण्यात आली. शिवाय व्यावसायिक शिक्षणासाठी पाटील स्कूल व तलाठी स्कूल सुरू केले. समाजात तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट ची स्थापना केली. तर लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल ची स्थापना केली. यासारख्या अनेक शैक्षणिक उपाययोजना करून समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला.

भारत हा खेड्यांचा देश आहे. अशा खेड्यापाड्यात पसरलेल्या हजारो गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या मुलांना शहरात येऊन उच्च शिक्षणाचा पैलतीर गाठता यावा म्हणून शाहू महाराजांनी निरनिराळ्या जातीची वसतीगृहे स्थापन केली. प्रथम त्यांनी १८९६ साली सर्व जातींसाठी एक वस्तीगृह सुरू करण्याचा अभिनव प्रयोग केला पण तिथे सर्वच जाती-धर्माची मुले गुण्यागोविंदाने राहणे अशक्य असल्याने महाराजांनी मराठा, ब्राह्मण, जैन, मुसलमान ,अश्पृष्य यासारख्या विविध जातीसाठी स्वतंत्र वस्तीगगृहे सुरू केली.

शाहू महाराजांच्या जीवन कार्यातील अतिशय क्रांतिकारक तत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध दिलेला लढा होय. हा लढा देताना त्यांना निकटवर्तीयांकडून व स्वकीयांकडून मोठा विरोध झाला पण त्याला न जुमानता त्यांनी सामाजिक क्रांतीचा हा स्फुलिंग प्रज्वलित ठेवला. अस्पृश्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी अतिशय दक्षतेने व आंतरिक जिव्हाळ्याने प्रयत्न केले. शिक्षण, वसतीगृह, शासकीय नोकऱ्यांमध्ये स्थान याबरोबरच दैनंदिन जीवनात अस्पृश्यतेचा कलंक धुवून निघावा व सर्वच लोकांना सहनिवास असावा म्हणूनही खास प्रयत्न केले. शाहू महाराजांनी तत्कालीन समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे वृत्त अंगीकारले होते.

त्यांच्या मते हिंदू समाजरचना ही गळक्या भांड्याच्या उतरंडीसारखी आहे. वरील परिस्थितीला छेद देण्यासाठी शाहू महाराजांनी प्रथम वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी नष्ट केली, महार वतणे रद्दबातल करण्यात आली. रामोशी जातीच्या लोकांना हजेरी लावण्यासाठी रोज फाटलांकडे जाण्याची पद्धतही कायद्याने बंद करण्यात आली. खाजगी व सरकारी गाड्यांवर सारथी म्हणून अस्पृश्य व्यक्तींची नेमणूक केली. माहुत म्हणून अस्पृश्यांच्या नेमणुकीने त्यांची प्रतिष्ठा वाढवली. काही अस्पृश्यांना मानाच्या तलवारी देऊन सरकारी समारंभात सरदार व क्षत्रिय वर्गाबरोबर मान दिला. बलुतेदारीत अंतर्भूत असणाऱ्या सक्तीच्या सेवेच्या जबाबदारीतून महार वर्गाची मुक्तता हे ग्रामीण आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील शाहू महाराजांचे क्रांतिकारक पाऊल होते. हजेरी ची प्रथा बंद करून अस्पृश्य वर्गांवर परंपरेने लाभलेल्या गुन्हेगारीच्या आरोपातून मुक्तता केली. महार वर्गावर लादलेल्या वेठबिगारीतून त्यांची सुटका केली. सरंमजामशाही समाजाच्या अर्थव्यवस्थेत अस्पृश्य मंडळींना व्यावसायिक स्वातंत्र्य नव्हते. जमीनदार व वतनदार वर्ग अस्पृश्यांच्या सर्व प्रकारच्या शोषणावर जगत होता. या आर्थिक व सामाजिक स्वरूपाच्या शोषणातून स्वतंत्र, स्वाभिमानी व सन्माननीय स्थान त्यांना प्राप्त व्हावे म्हणून शासकीय नोकरीतील नोकऱ्यांत त्यांचा समावेश करण्यात सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक अभिसरणाच्या दृष्टिकोनातून अतिशय दूरगामी परिणाम करणारा जाणीवपूर्वक प्रयत्न शाहू महाराजांनी केला. आडनावावरून जातीवाचकता दिसून आल्यानंतर शाहू महाराजांनी जाट, सरदार, पंडित अशी नावे देऊन अस्पृश्यतेची भावना समाजातील कमी करण्याचा विशेष प्रयत्न केला. अस्पृश्य वर्गातून तलाठ्यांची नेमणूक करणे, आरोग्य व शिक्षण खात्यात अस्पृश्यांना समानतेची वागणूक देणे, नगरपालिकेत अस्पृश्यांना खास प्रतिनिधित्व देणे, त्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देणे, पाण्याचे नळ, तलाव, विहिरी, धर्मशाळा अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाहणे, सोनतळी, स्टेशनबंगला या ठिकाणी अस्पृश्यांच्या साठी मोफत निवासस्थाने उघडणे, अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा रद्द करणे, सुशिक्षित अस्पृश्यांना वकिली च्या समदा देणे या सर्व गोष्टी शाहू महाराजांनी अस्पृश्यता उद्धारासाठीच अतिशय आत्मीयतेने केल्या होत्या. आंतरजातीय विवाह हा जातीविरहित एकसंघ समाज निर्मितीला पोषक आहे या व्यापक मानवतावादी प्रेरणेने आंतरजातीय विवाह कायदा करून त्यांनी सामाजिक एकतेला चालना देण्याचा प्रयत्न केला.

सामाजिक क्षेत्रातील समानतेबरोबरच शाहू महाराजांनी आर्थिक, औद्योगिक, सहकार व शेती क्षेत्रातही मोठे बदल घडवून आणले. आर्थिक उन्नतीसाठी शाहू मिल्सची स्थापना, शेती व औद्योगिक विकासासाठी वीजनिर्मिती करणारे राधानगरी धरण, शेती प्रदर्शनाची कल्पना आदीं बदलत्या काळातील नव्या गरजांशी सुसंगत असणारे विविध प्रयत्न शाहू महाराजांनी विचारपूर्वक करून राज्यातील समाज अधिक समृद्ध व्हावा यासाठी निर्धाराने पावले टाकली. आधुनिक शेती पद्धतीचा प्रसार व शेतीमधून अधिकाधिक उत्पादन वाढवण्यासाठी किंग एडवर्ड एग्रीकल्चरल इन्स्टिट्यूट ची स्थापना केली. बी बियाणे, रासायनिक खते योग्य पद्धतीचे प्रशिक्षण व सुधारित अवजारे यांचा परिचय करून दिला. जुन्या विहिरी, छोटे मोठे तलाव, लहान मोठे बंधारे इत्यादींच्या माध्यमातून जल व्यवस्थापनाच्या दृष्टीने मोठे कार्य केले. व्यापारी धोरणाला चालना देण्यासाठी स्वतंत्र पद्धतीच्या बाजारपेठांची स्थापना केली.

नव्या ज्ञानावर, तंत्रज्ञानावर, साधनांवर आधारित आर्थिक समृद्धी, ज्ञान विज्ञान शिक्षण यावर आधारित सामाजिक समता व त्यातून अनुभवास येणारा सामाजिक न्याय या शाहू महाराजांच्या व्यक्तीत्वाच्या व जीवनकार्याच्या मानवतावादी प्रेरणा होत्या. गवताच्या काडीला महत्त्व नाही पण गवताच्या पेंडीला महत्त्व आहे म्हणून संघटित असा संदेश त्यांनी समाजाला दिला त्यामुळेच शाहू महाराज असंख्य दिन दुबळ्यांचे एवढा आधार बनले होते की, जसे लोखंडाचे कन लोहचंबूकाकडे धाव घेतात तसे समाजातील सर्व लोक शाहू महाराजांकडे धाव घेत होते.

**कार्याची उपयुक्तता:** १९२० साली नागपूर येथे भरलेल्या परिषदेत राजर्षी शाहू महाराज म्हणतात की, अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसाला लावणे हे निंद आहे. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटक अवयव आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क समान आहेत ही भावना धरून पुढील कामास लागले पाहिजे. यावरून राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणेमागील अर्थ व उपयुक्तता स्पष्ट होते. शाहू महाराजांचे अस्पृश्य उद्धाराचे कार्य म्हणजे त्यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून उचललेले सर्वात मोठे परिवर्तनावादी पाऊल होते. त्यांच्या अस्पृश्यता उद्धाराच्या कार्याची महती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ म्हणजे राजर्षी शाहू महाराज म्हणून वर्णन केली आहे. यावरूनही असे दिसून येते की, राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अस्पृश्य व मागासलेल्या समाजाचा उद्धार करणे, या समाजामध्ये शिक्षण प्रसार करणे, जातीयता दूर करणे, सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे, स्वातंत्र्य समता बंधुता न्याय या तत्त्वांचा पुरस्कार करून समाजसुधारणा करणे याच विषयाला अनुसरून होते ही सुद्धा त्यांच्या कार्याची प्रस्तुतताच म्हणावी लागेल. शंभरहून अधिक वर्षापूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी काळाची पाऊले ओळखून, दूरदृष्टी ठेवून विचार तर केला होताच , पण त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड ही दिली होती हे अनेक प्रसंगातून व कार्यातून स्पष्ट होते. जसे की, आपला राज्याभिषेक झाल्यानंतर त्यांनी दुसऱ्याच दिवशी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करून पेशवाईत बंद करण्यात आलेल्या राज्याभिषेक शक सुरू करून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र स्मृतींना उजाळा दिला. आपल्या संस्थानात १९१७ रोजी शाळांची संख्या २७ तर विद्यार्थ्यांची संख्या १२९६ इतकी होती ती संख्या महाराजांच्या शैक्षणिक कार्यामुळे १९२२ रोजी शाळांची संख्या ४२० तर विद्यार्थ्यांची संख्या २२७०० एवढी वाढली होती. खेड्यापाड्यातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून दूरदृष्टीकोणातून सुरू केलेल्या वस्तीगृह चळवळीमधून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये अमुलाग्र क्रांती घडुन आली. म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांना आधुनिक भारताच्या इतिहासातील वस्तीगृहाचे जनक तर कोल्हापूर नगरीला वसतीगृहांची जननी म्हणून ओळखले जाते. थोडक्यात राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी ठरले. शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, दळणवळण, अस्पृश्यता उद्धार, समानता हे त्यांचे कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाहीच्या दृष्टीने मुख्य घटक बनले. राजर्षी शाहू महाराजांच्या या कार्याच्या माध्यमातून महाराष्ट्राला समाज परिवर्तनाची नवी दिशा मिळाली. याशिवाय कला, क्रीडा यांनाही त्यांनी राजाश्रय दिला. कृषी, औद्योगिक क्षेत्रात युरोपियन विचारधारेवर नवा प्रगतीचा पाया त्यांनी रचला. त्यामुळेच अत्यंत कठीण काळात राजर्षी शाहू महाराजांनी काळाची पावले ओळखून क्रांतिकारी मार्गाचा अवलंब करून व विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन सामाजिक कार्याचा एक महान आदर्श घालून दिला तो आदर्शच आजच्या घडीला त्यांच्या कार्याची उपयुक्तता तथा प्रस्तुतता स्पष्ट करतो.

**सारांश** इतिहासाचा मागोवा घेतल्यास पृथ्वीच्या पाठीवर अनेक राजे होऊन गेले पण लोकांनाच स्वतःच्या हृदयसिंहासनावर विराजमान करून घेणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांसारखे फार थोडे राजे होऊन गेल्याचे दिसून येते.

यातच त्यांच्या कार्याची महानता स्पष्ट होते. सामाजिक परिवर्तनाची महात्मा फुले यांनी पेटवलेली मशाल तितक्याच ताकतीने प्रज्वलित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हाती सोपवण्याची महान कामगिरी महाराष्ट्राच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराजांनी केली असेच आपणाला म्हणावे लागेल. आजच्या पुरोगामी महाराष्ट्राची थोरवी शाहू महाराजांच्या पुरोगामीपणात दडलेली दिसून येते. जुने बुरसटलेले विचार ताज्य मानून नवनव्या विचारांची कास धरून उज्वल अशा मानवतेकडे महाराष्ट्राची जी आगेकूच झाली या आधुनिक महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणून राजर्षी शाहू महाराजांना ओळखले जाते. संपूर्ण समाज परिवर्तनाला राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध क्रांतीची आवश्यकता असते. असे असले तरी या सर्व क्रांतीचा मूळ पाया सामाजिक क्रांतीचाच असतो कारण सामाजिक क्रांती वाचून राजकीय व आर्थिक क्रांती निष्फळ ठरतात. परिपूर्ण अशी सामाजिक क्रांती समाजात घडली नाही तर विफलता वाढीस लागते, विघटन सुरू होते. म्हणूनच वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी मोडून काढण्यापासून ते कनिष्ठ वर्गाला उन्नत करण्यापर्यंत, गंगाराम कांबळे यांना हॉटेल काढून देण्यापासून ते महार वतने बंद करण्यापर्यंत, हजेरी लावण्याची पद्धत बंद करण्यापासून ते तळागाळातील लोकांच्या हाताला काम देण्यापर्यंत आणि जातीव्यवस्थेला छेद देण्यापासून ते समानतेवर आधारित

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

समाजनिर्मिती पर्यंत राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभाराला समतेवर आधारलेल्या सामाजिक क्रांतीची व कृतीची जोड देऊन मानवतावादी कार्याचा एक सुवर्ण अध्याय घडविला. पण आज राजकारणाची अवस्था व सभोवतालचे वातावरण पाहिले असता पावला पावलावर भासणारी राष्ट्रीय एकात्मतेची वाण व विफलतेची भावना यांचा जन्म सामाजिक क्रांतीच्या अभावातच झाला आहे यात मात्र शंका नाही. ती घडल्याशिवाय राष्ट्राला राष्ट्रीयपण येणार नाही व माणसाला माणूसपण ही येणार नाही आणि एकदा का हे मान्य केले की राजर्षी शाहू महाराज यांची थोरवी, दृष्टेपण आणि कार्याची उपयुक्तता लक्षात येते. त्यांनी अंगीकारलेल्या सामाजिक क्रांतीचे व कार्याचे महात्म्य आज घडीला दिसून येते.

**संदर्भ सूची**

१. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी पुणे, 1997
२. नानासाहेब साळुंखे, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन कोल्हापूर, 2015
३. जयसिंगराव पवार (संपा) श्रीमछत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र खंड एक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2021
४. अवनीश पाटील (संपा), राजर्षी शाहू छत्रपती विचारवेध, डायमंड पब्लिकेशन पुणे, पहिली आवृत्ती 2024
५. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, 20१२
६. दैनिक महासत्ता, दिनांक 26 जून २००८
७. दैनिक महान कार्य, दिनांक 26 जून 2022
८. तु. बा. नाईक, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, २००६
९. जाधव भगवानराव,(संपा) राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजाराम प्रिंटिंग प्रेस कोल्हापूर, 1971
१०. गोविंद पानसरे, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती 2003
११. कृ. ग. सूर्यवंशी, राजर्षी शाहू: राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन पुणे, 1984
१२. भास्करराव धटावकर, (संपा) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, १९८८
१३. भास्कर भोळे, छत्रपती शाहू महाराज, एक्सल प्रिंटिंग प्रेस पुणे, 2010
१४. एस एस भोसले(संपा) राजर्षी शाहू: काळ विचार आणि कार्य, कोल्हापूर जिल्हा परिषद, व्यंकटेश प्रिंटिंग प्रेस कोल्हापूर,

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

77

# छत्रपती शाहू महाराज: ब्राह्मणेत्तर स्त्रीसुधारणावाद परिप्रेक्ष

**प्रियांका शशिकांत रणणवरे**
अभ्यासक, कोल्हापूर

---

प्रस्तावना: भारतामध्ये घडलेली स्त्रीदास्य विमोचन चळवळ ही स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक उत्कर्षासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या स्त्री सुधारणा चळवळीचा विविध अंगांनी अभ्यास करण्यात आलेला आहे. या चळवळीचे अभ्यासक विविध दृष्टिकोनांमधून तिचे विश्लेषण करतात, ज्यात मार्क्सवादी, वंचित इतिहास (सबाल्टर्न), स्त्रीवादी आणि ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर दृष्टिकोनांचा समावेश आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात, सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून सुरू झालेली ब्राह्मणेत्तर चळवळ ही विशेष महत्त्वाची मानली जाते, कारण तिने बहुजन समाजातील स्त्री सुधारणा आणि त्यांचे सामाजिक हक्क यांना केंद्रस्थानी आणले. या चळवळीने स्त्रीविषयक सुधारणा अभिजन वर्गाच्या विचारसरणीपासून दूर नेऊन बहुजन वर्गाच्या हितासाठी दिली. या स्त्री सुधारणा चळवळीचा अभ्यास करताना जात, वर्ग आणि लिंग या तीन घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते. भारतीय समाजजीवनात जातिसंस्थेच्या विषमतावादी नियमांवर आधारित असलेली व्यवस्था ही अधिकारांची विषम वाटणी करणारी होती. या विषमतेमुळे १९ व्या शतकापर्यंत भारतीय समाजजीवनात ती प्रमुख वैशिष्ट्य ठरली होती. पुरुषप्रधान समाजरचनेत जात आणि स्त्रीत्व हे दुय्यम स्थानावर होते. ब्राह्मणेत्तर समाजातील समाजसुधारकांना या परिस्थितीचा विचार करणे भाग होते, कारण अभिजनवादी समाजसुधारक हे केवळ ब्राह्मण स्त्रियांपुरते मर्यादित होते. अपवादात्मक काही उदाहरणे सोडल्यास, त्यांनी बहुजन स्त्री सुधारणेला जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले होते. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून निर्माण केलेली बहुजन स्त्री सुधारणा चळवळ ही ब्राह्मणेत्तर स्त्री सुधारणा चळवळीला प्रेरणादायी आणि दिशादर्शक ठरली. वर्णसंस्कृतीच्या बंधनात अडकलेल्या शिक्षण प्रणालीला स्त्री, शूद्र, अति-शूद्र यांच्यासाठी खुली करून त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महात्मा फुल्यांनी केले. यामुळे बहुजन समाजात आत्मभान आणि राजकीय हक्कांची जाणीव निर्माण झाली. सत्यशोधक चळवळीने जातीनिर्मूलनाच्या विचारांना बळ दिले, तसेच त्याच अनुषंगाने स्त्रीदास्य निर्मूलन आणि स्त्री सुधारणा चळवळीची मुळे अधिक घट्ट रोवली गेली.

वर्णवर्चस्ववादी अभिजन वर्ग आणि बहुजन समाज यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ब्राह्मणेत्तर चळवळ उदयाला आली. या चळवळीतील स्त्री सुधारणा हा एक महत्त्वपूर्ण घटक होता. बहुजन समाजातील स्त्री-पुरुषांमधील सामाजिक दरी दूर करण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे, त्यांच्यात आत्मभान आणि स्वाभिमान निर्माण करणे हे या चळवळीला अत्यंत गरजेचे वाटत होते. छत्रपती शाहू महाराजांनी या चळवळीला बळ दिले आणि स्त्री सुधारणा चळवळीला पुढे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. शाहू महाराजांना हे पूर्ण विश्वासाने माहीत होते की, स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत बदल घडविण्याची क्षमता फक्त शिक्षणातूनच प्राप्त होऊ शकते.

**मुख्य बीज शब्द:** छत्रपती शाहू महाराज, स्त्रीसुधारणावाद, सामाजिक सुधारणा, सामाजिक न्याय, स्त्री हक्क, कुलीन समाजातील असमानता, शाहू महाराजांचे विचार, सामाजिक समरसता, स्त्रीसशक्तिकरण इत्यादि;

**इतिहास लेखनात्मक उद्देश:**

१) शाहू महाराजांच्या विचारधारेचा अभ्यास करून, ब्राह्मणेत्तर समाजातील स्त्रियांसाठी त्यांनी सुचवलेल्या सुधारणा आणि त्यांच्या प्रभावाचा विश्लेषण करणे.

२) ब्राह्मणेत्तर समाजात स्त्रीसुधारणेच्या संदर्भात शाहू महाराजांनी केलेले प्रयत्न आणि त्यावेळची सामाजिक परिस्थिती याचा आढावा घेणे.

३) शाहू महाराजांच्या सुधारणा पुढे आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आणि त्यांच्या निर्णयांचा ब्राह्मणेत्तर स्त्रियांच्या जीवनावर कसा प्रभाव पडला, याचे विश्लेषण करणे.

४) शाहू महाराजांनी दिलेल्या सुधारणा आणि त्यांच्या धारणांचा ब्राह्मणेत्तर समाजातील स्त्रियांच्या हक्कांवरील प्रभाव.

५) शाहू महाराजांच्या कार्यामुळे ब्राह्मणेत्तर समाजातील सामाजिक न्याय व समरसतेत कसे योगदान झाले, याचा अभ्यास करणे.

६) शाहू महाराजांच्या सुधारणा चळवळीचा ऐतिहासिक संदर्भ आणि आजच्या समाजातील समानतेच्या प्रश्नांसह त्याचे संदर्भ पाहणे.

वरील उद्देशांच्या माध्यमातून शाहू महाराजांच्या ब्राह्मणेत्तर स्त्रीसुधारणावादाच्या ऐतिहासिक महत्वाचा आणि त्याच्या सामाजिक परिणामांचा प्रस्तुत शोध निबंधामध्ये अभ्यास केला आहे.

**विषय विश्लेषण:** स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी स्त्री शिक्षिका तयार होणे अत्यावश्यक होते. याच उद्देशाने, १८८२ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी अध्यापक विद्यालय स्थापन केले.[१] हे केवळ शिक्षणाच्या पायाभरणीसाठी नव्हे तर स्त्रियांना आत्मनिर्भर आणि स्वतंत्र बनवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. शाहू महाराजांनी कृष्णाबाई केळवकर यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवले. त्या काळात बहुजन समाजातील महिलेला वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश देणे ही एक धाडसी आणि क्रांतिकारी कृती होती. केळवकर यांनी आपले शिक्षण पूर्ण करून १९०२ मध्ये अल्बर्ट एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलमध्ये सहाय्यक डॉक्टर म्हणून जबाबदारी स्वीकारली. त्या काळातील सामाजिक स्थिती विचारात घेतल्यास, ही घटना बहुजन समाजासाठी प्रेरणादायी होती. एवढेच नव्हे, तर पुढे उच्च शिक्षणासाठी शाहू महाराजांनी त्यांना इंग्लंडमधील डब्लिन येथे शिष्यवृत्ती देऊन पाठवले.[२] त्यांच्या या कृतीतून, स्त्री शिक्षणाच्या सुधारणेला दिलेले महत्त्व आणि उदारमतवादी दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. शाहू महाराजांचा स्त्री शिक्षणावरील भर केवळ शब्दांपुरता नव्हता, तर तो प्रत्यक्षात उतरवलेला होता. त्यांनी शिक्षणाला समाजातील सामाजिक विषमतेच्या विरोधात एक प्रभावी शस्त्र मानले. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण मिळायला हवे, हा त्यांचा ठाम विश्वास होता. मुली उत्तीर्ण झाल्यास शिक्षकांना इनाम देण्याची पद्धत सुरू करून त्यांनी शिक्षणव्यवस्थेत प्रोत्साहन दिले.[३] या धोरणांनी समाजात शिक्षणाचा प्रसार होताच, परंतु शाहू महाराजांनी हे सुनिश्चित केले की शिक्षणाच्या संधी सर्वांना, विशेषतः शूद्रातिशूद्रांना मिळाव्यात.

शाहू महाराजांनी प्रिन्स शिवाजी यांच्या मृत्यूनंतर आपली सून, इंदुमती राणीसाहेब यांना शिक्षित करण्याचा निर्णय घेतला. त्या काळात विधवांना शिक्षण देण्याचा विचारही धाडसी मानला जात असे, आणि शाहू महाराजांचा हा निर्णय समाजाच्या संकुचित दृष्टिकोनाच्या पुढे होता. त्यांनी या निर्णयाचा कठोर विरोध असूनही त्याला पूर्ण समर्थन दिले आणि योग्य शिक्षकांची नेमणूक केली.[४] महत्त्वाचे म्हणजे, शाहू महाराजांची स्त्री शिक्षणाविषयीची तळमळ केवळ उच्चवर्गीय स्त्रियांपुरती मर्यादित नव्हती, तर ती शूद्रातिशूद्र समाजातील मुलींसाठीही होती. १९०७ मध्ये त्यांनी ढोर आणि चांभार समाजातील मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली.[५] त्यांच्या मते, स्त्रियांचे शिक्षण म्हणजे समाजाच्या विकासासाठी आवश्यक पायाभरणी होती. त्यांचा विश्वास होता की स्त्री शिक्षणामुळे संपूर्ण कुटुंबाचे शिक्षण होऊ शकते.

शाहू महाराजांचे स्त्री शिक्षणाचे धोरण हे ब्राह्मणेत्तर चळवळीशी निगडित होते. त्यामुळे ते अभिजनवादी विचारधारेपासून दूर होते. १९ व्या शतकातील अभिजन सुधारकांचे स्त्री शिक्षणाचे प्रयत्न केवळ ब्राह्मण समाजापुरते मर्यादित होते, परंतु शाहू महाराजांनी या संकुचित दृष्टिकोनाला नाकारले आणि सर्व समाजघटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. गणपतराव सूर्यवंशी त्यांच्या "राजा शाहू आणि समाज प्रबोधन" या ग्रंथात म्हणतात की, शाहू महाराजांनी स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व मान्य करून स्त्रियांना पुरुषाइतकेच हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला.[६] शाहू महाराजांनी केवळ शूद्रातिशूद्र समाजातील स्त्रियांचे शिक्षण नाही तर ब्राह्मण समाजातील स्त्रियांच्या शिक्षणासाठीही प्रयत्न केले. त्यांनी डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या अमेरिकेतील शिक्षणासाठी आर्थिक मदत केली होती,[७] आणि डॉ. कृष्णाबाई केळवकर यांना प्रशिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. या कृतींमधून त्यांच्या स्त्री शिक्षणाबद्दलची बांधिलकी स्पष्टपणे दिसते. शाहू महाराजांनी परिचारिका प्रशिक्षणासाठीही प्रयत्न केले, ज्यामुळे स्त्रियांना वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळाली. त्यांनी अशा मुलींना शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहन दिले.[८] त्यांच्या या धोरणांमुळे स्त्री शिक्षणाच्या प्रसाराला आणि स्त्रियांना सामाजिक स्थिती सुधारण्याच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली.

कोल्हापूर संस्थानात छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण देण्याची सुरुवात केली. हे केवळ शिक्षणाची उपलब्धता देणारे पाऊल नव्हते, तर शिक्षणातील समानतेचा व्यापक दृष्टिकोन होता. त्यांनी राजाराम महाविद्यालयातील विद्यार्थिनींची फी माफ केली आणि त्यांना शिष्यवृत्तीची सोय केली. मुलींमध्ये शिक्षणाबद्दल रुची निर्माण व्हावी आणि त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी त्यांनी चौथीच्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या दोन मुलींना "राधाबाई आक्कासाहेब महाराज स्कॉलरशिप" आणि "नंदकुवर महाराणी भावनगर स्कॉलरशिप" सुरू केली.[९] मुलींच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून शाहू महाराजांनी मुलींसाठी "अहिल्याबाई गर्ल्स हायस्कूल" आणि "मा. लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल" सुरू केले.[१०] "एक स्त्री शिकली तर अख्खे कुटुंब शिकेल" या उक्तीवर त्यांचा ठाम विश्वास होता. शाहू महाराजांच्या या प्रयत्नांचा परिणाम असा झाला की, कोल्हापूरातील स्त्री शिक्षणाच्या प्रमाणात मोठी वाढ झाली.

शाहू महाराज हे केवळ विचार करणारे नाही तर प्रत्यक्ष कृती करणारे सुधारक होते. त्यांनी जी धोरणे आखली किंवा घोषणा केल्या त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. त्यांनी दीर्घकाळापासून चालत आलेल्या आणि समाजाला जखडून ठेवणाऱ्या अनेक प्रथा-परंपरांवर प्रहार केला, ज्यात बालविवाह हा कळीचा मुद्दा होता. अभिजनवादी सुधारकांनी बालविवाहावर

पूर्वीपासून टीका केली होती, परंतु त्यांचा दृष्टिकोन मर्यादित होता आणि तो फक्त त्यांच्या वर्गापुरताच मर्यादित होता. छत्रपती शाहू महाराजांनी मात्र बालविवाहाविरोधी व्यापक अभियान राबवले. त्यांची ठाम भूमिका होती की मुलीचे वय १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत तिचे लग्न होऊ नये, अन्यथा हे मानवी अन्याय आणि निर्दयपणाचे लक्षण ठरेल. त्यांच्या या विचारातून मुलींच्या विवाहाविषयीचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो.[११] केवळ विधान करून ते थांबले नाहीत, तर १२ जुलै १९१९ रोजी मुलीचे वय १४ वर्षे झाल्यावरच विवाह करण्याचा कायदा संमत केला.[१२] त्याचप्रमाणे, बालविधवांच्या विवाहालाही त्यांनी कायदेशीर मान्यता दिली.[१३] बालविवाहाविरोधात ब्राह्मणेत्तर समाजात जागृती करण्यासाठी शाहू महाराजांनी जी प्रभावी मोहीम राबवली तिचे प्रतिबिंब ब्राह्मणेत्तर चळवळीतील वृत्तपत्रांमध्ये स्पष्ट दिसते. विधवांच्या बाबतीत समाजातील अन्यायकारक प्रथांवरही शाहू महाराजांनी लक्ष केंद्रित केले. १९व्या शतकातील विधवांचे जीवन हे अत्यंत अन्यायपूर्ण होते. शाहू महाराजांनी फक्त बालविधवांच्या समस्याच नव्हे, तर सर्वसामान्य विधवांच्या समस्यांनाही सामाजिक स्तरावर आणले. जुलै १९१७ मध्ये त्यांनी विधवांच्या पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला.[१४] हा विधवांच्या दु:खाला वाट मोकळी करून देण्याचा एक प्रामाणिक आणि क्रांतिकारक प्रयत्न होता.

शाहू महाराजांनी विधवांना समाजात प्रतिष्ठा मिळावी आणि त्यांच्या जीवनात सुधारणा व्हावी यासाठी विवाहाचे हक्क समानतेने दिले. ते १९१९ मध्ये कानपूरमध्ये बोलताना म्हणतात, "विधवाविवाहास कायदेशीर मान्यता मिळाल्यामुळे समाजातील अन्याय कमी होईल आणि मानवतावादी दृष्टिकोन प्रकट होईल. हे समाजाच्या निरोगीपणासाठी आवश्यक आहे."[१५] ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर समाजात अभिजनवादी विचारधारेमुळे अनेक वाईट प्रथा रूढ झाल्या होत्या. शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर चळवळीच्या माध्यमातून स्त्री सुधारणा चळवळीला मोठे पाठबळ दिले. शाहू महाराजांनी समाजाच्या विकासासाठी केलेल्या कामात त्यांच्या सुधारक दृष्टिकोनाची झलक दिसते. त्यांच्या स्त्री शिक्षण आणि सामाजिक सुधारणा चळवळीतील भूमिका ही क्रांतिकारक होती आणि समाजातील अन्याय आणि विषमता दूर करण्याच्या दृष्टीने प्रेरणादायी ठरली.

१९व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर समाजात आंतरजातीय विवाहाला सामाजिक मान्यता नव्हती. अशाप्रकारचे विवाह धर्मब्राह्य आणि बेकायदेशीर मानले जात होते, कारण प्राचीन काळापासून विवाह ही एक धार्मिक गोष्ट म्हणून समजली जात होती. छत्रपती शाहू महाराजांनी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाला विधवा विवाहाइतकेच महत्त्व दिले आणि त्याला कायदेशीर मान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न केला. १२ जुलै १९१९ रोजी, त्यांनी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना मान्यता देणारा कायदा संमत केला,[१६] जो जातीअंताच्या लढ्यामधील एक क्रांतिकारक पाऊल होते. या कायद्याच्या संदर्भात, छत्रपती शाहू महाराजांचे वैचारिक पुरोगामीत्व स्पष्ट होते. पटेल बिला[१७] च्या पार्श्वभूमीवर हा कायदा संमत झाला आणि ब्राह्मणेत्तर चळवळीने या बिलाला आपला पूर्ण पाठिंबा दिला. शाहू महाराजांचे आंतरजातीय विवाहासंबंधीचे विचार अत्यंत प्रगल्भ होते आणि सामाजिक समतेची भावना वाढवणारे होते. नवसारी[१८] येथे आंतरजातीय विवाहावर भाषण देताना, शाहू महाराजांनी स्पष्टपणे सांगितले की, "जातिभेदामुळे समाजात फूट पडली आहे, आणि रोटी-बेटी व्यवहारात अडथळा निर्माण झाला आहे."[१९] त्यांनी पटेल यांच्या विधेयकाचे समर्थन केले आणि असे मत व्यक्त केले की, जाती-जातीतील विवाह होऊ लागल्याशिवाय समाजातील जातीभेदाची तीव्रता कमी होणार नाही.

छत्रपती शाहू महाराजांनी संमत केलेला आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह कायदा हा केवळ सामाजिक सुधारणा नव्हता, तर जातीअंताच्या लढ्यातील एक महत्त्वाचे पाऊल होते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ब्राह्मणवर्गाने यास विरोध करण्याचा प्रयत्न केला, कारण त्यांना आपले वर्णवर्चस्व आणि श्रेष्ठत्व टिकवून ठेवायचे होते. शाहू महाराजांनी स्त्री सुधारणावादामध्ये फक्त विचार मांडले नाहीत, तर प्रत्यक्ष कृती केली. त्यांनी स्वतःच्या मुलीचा आंतरजातीय विवाह घडवून आणला, ज्यामुळे समाजात मोठी चर्चा झाली. २० मे १९९० रोजी नागपूर येथे बोलताना, त्यांनी आंतरजातीय विवाहाच्या महत्त्वावर जोर दिला आणि असे नमूद केले की, "खरोखरच आंतरजातीय विवाह सामाजिक समता आणि ऐक्याकडे जाण्याची महत्त्वाची पायरी आहे."[२०] शाहू महाराजांच्या या कृतीतून दिसते की, त्यांनी समाजातील जातीच्या चौकटी मोडून सामाजिक समानतेच्या दिशेने पुढे जाण्याचा प्रयत्न केला. आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह हे फक्त सामाजिक सुधारणांचे साधन नव्हते, तर समाजातील जात आणि धर्म यांच्यातील अडथळ्यांना दूर करण्याचे एक महत्त्वाचे पाऊल होते.

छत्रपती शाहू महाराजांचे विचार आणि कृती हे सामाजिक सुधारणा क्षेत्रात खरोखरच पुरोगामी होते. त्यांनी केवळ कायदे आणि धोरणे मांडली नाहीत, तर स्वतःच्या कुटुंबात आंतरजातीय विवाह घडवून आणला, ज्यातून त्यांच्या विचारांची स्पष्टता आणि दृढता दिसते. त्यांचे प्रयत्न जातीअंताच्या लढ्यातील एक महत्त्वपूर्ण टप्पा होते आणि या लढ्यात त्यांचे योगदान अजोड आहे.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

छत्रपती शाहू महाराजांनी स्त्री सुधारणा चळवळीत घेतलेली भूमिका आणि त्या अनुषंगाने त्यांनी केलेले कायदे हे स्त्रियांच्या वर होणाऱ्या अन्यायांचे परिमार्जन करणारे होते. पुरुषसत्ताक समाजपद्धती, ज्यामध्ये कुटुंब हा प्रमुख घटक होता, हा स्त्रियांच्या छळाचा मूळ केंद्र होता. या पुरुषप्रधान समाजरचनेला विवाहसंस्थेच्या माध्यमातून धार्मिक मान्यता मिळाल्याने, स्त्रियांना त्यातून बाहेर पडणे कठीण झाले होते. या अन्यायकारक स्थितीला तडा देण्यासाठी, छत्रपती शाहू महाराजांनी ११ जुलै १९१९ रोजी विविध जाती-धर्मीयांसाठी घटस्फोट (काडीमोड) कायदा संमत केला.[२१] या कायद्याद्वारे, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील धार्मिक अधिष्ठानाला सुरुंग लावण्यात आला आणि स्त्रियांना अन्यायकारक जातपंचायतीच्या कचाट्यातून मुक्त करण्याचा प्रयत्न झाला. जातपंचायतीच्या माध्यमातून निर्माण झालेल्या पुरुषप्रधान वर्चस्ववादी वृत्तीवर हल्ला करून स्त्रियांची मुक्तता करण्याचा हा एक महत्त्वाचा टप्पा होता. शाहू महाराजांनी फक्त घटस्फोट कायदा केला नाही, तर २ ऑगस्ट १९१९ रोजी स्त्रियांच्या छळवणुकीला आळा घालणारा कायदाही संमत केला.[२२] हा कायदा भारताच्या कायदा इतिहासातील पहिला कायदा होता, जो कौटुंबिक अत्याचारांवर प्रतिबंध घालतो. या कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांचे हक्क आणि अधिकार जनसामान्यांत मान्यतेस आले, ज्यामुळे समाजात स्त्रियांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न झाला.

महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून उदयाला आलेली ब्राह्मणेत्तर चळवळ ही वर्ग, वर्ण, आणि जातीच्या अधारित वादाला छेद देणारी होती. महात्मा फुलेंनी स्पष्ट केले की, शिक्षण हा स्त्रीदास्य निर्मूलनाचा सर्वोत्तम पर्याय आहे, आणि त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. अभिजन वर्गातील समाजसुधारकांची स्त्री सुधारणा चळवळ ही केवळ त्यांच्यापुरती मर्यादित होती, परंतु फुलेंनी याला एक पर्याय दिला आणि स्त्री सुधारणा बहुजन समाजासाठी केंद्रित केली. छत्रपती शाहू महाराजांनी या ब्राह्मणेत्तर चळवळीला पुढे नेऊन, बहुजन समाजात शिक्षणाची ज्ञानगंगा प्रवाहित करण्याचे कार्य केले. त्यांचे स्त्री शिक्षणाविषयीचे धोरण काळाच्या पुढचे होते, कारण त्यांच्या मते, एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. शाहू महाराजांनी बालविवाहाला विरोध करणारा क्रांतिकारी कायदा संमत केला आणि मुलीचे लग्न १४ वर्षे पूर्ण झाल्यावरच करावे असा महत्त्वपूर्ण कायदाही संमत केला. हे निर्णय फक्त अभिजनवर्गापुरते मर्यादित नव्हते, कारण शाहू महाराजांनी बहुजन समाजातही काही वाईट प्रथा आणि परंपरांच्या विरोधात लढा दिला. ब्राह्मणेत्तर चळवळीने बहुजन स्त्रीसुधारणेचा पाया घातला, परंतु पुढे, या चळवळीचे नेतृत्त्व अभिजनवादी वर्गाच्या हातात गेले. यामुळे दलित स्त्रियांच्या समस्यांवर पुरेसे लक्ष केंद्रित झाले नाही आणि त्यांची स्थिती तितकीशी सुधारली नाही.

समारोप: शाहू महाराजांच्या कायद्यांच्या माध्यमातून स्त्री हक्कांची जाणीव समाजात व्यापकपणे पसरली आणि त्यांचा सुधारक दृष्टिकोन भारतीय समाजातील वाईट प्रथा आणि परंपरांच्या विरोधात ठामपणे उभा राहिला. त्यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध केलेले कार्य हे केवळ सुधारक विचारांनी प्रेरित नव्हते, तर प्रत्यक्ष कृतीने सिद्ध झाले. छत्रपती शाहू महाराजांचा ब्राह्मणेत्तर स्त्रीसुधारणावाद हा भारतीय सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांनी केवळ स्त्री शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले नाही, तर स्त्रियांना समाजात सन्मानाने जगता यावे, त्यांना समान हक्क मिळावेत यासाठी अनेक ठोस पावले उचलली. त्यांच्या ब्राह्मणेत्तर स्त्रीसुधारणावादामध्ये जाती, धर्म, आणि वर्गभेदाच्या पलीकडे जाऊन सर्व स्त्रियांना एकसमान न्याय मिळावा, हा व्यापक दृष्टिकोन होता. शाहू महाराजांनी समाजातील अभिजन वर्ग आणि ब्राह्मणेत्तर समाजातील स्त्रियांची अवस्था लक्षात घेऊन आपल्या सुधारणा राबवल्या. त्यांच्या मते, शिक्षण हा स्त्री स्वातंत्र्याचा, समानतेचा आणि स्वाभिमानाचा मार्ग होता. त्यामुळे त्यांनी मुलींना शिक्षण मिळावे यासाठी अनेक शैक्षणिक धोरणे आणली. शाहू महाराजांनी स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र शाळा आणि शिष्यवृत्त्या सुरू केल्या. अहिल्याबाई गर्ल्स हायस्कूल आणि लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल सारख्या संस्थांच्या स्थापनेमुळे समाजातील स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली. त्यांचे धोरण "एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते" या तत्त्वावर आधारित होते. त्यांच्या ब्राह्मणेत्तर स्त्रीसुधारणावादामध्ये शिक्षणाच्याच जोडीला सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहणे देखील होते. त्यांनी बालविवाहासारख्या प्रथांचा विरोध केला आणि १९१९ साली मुलींच्या विवाहाचे किमान वय १४ वर्षे निश्चित करणारा कायदा संमत केला. हा कायदा त्यांच्या प्रागतिक दृष्टिकोनाचे द्योतक होता, कारण त्या काळात बालविवाह सामान्य होता आणि तो अनेक स्त्रियांना मानसिक व शारीरिक त्रास देत होता. त्यांनी यासोबतच विधवांच्या पुनर्विवाहालाही कायदेशीर मान्यता दिली, ज्यामुळे विधवांना नव्याने जीवन सुरू करण्याची संधी मिळाली. स्त्रियांवरील कौटुंबिक आणि सामाजिक अत्याचार रोखण्यासाठी शाहू महाराजांनी १९१९ साली स्त्रियांच्या छळवणुकीविरोधी कायदा मंजूर केला. हा कायदा भारताच्या इतिहासातील पहिल्यांदाच स्त्रियांवरील कौटुंबिक छळाच्या विरोधात उभा राहणारा होता. यातून त्यांच्या सुधारणा केवळ एकतर्फी नव्हत्या, तर त्यांनी स्त्रियांवरील अन्याय आणि अत्याचार थांबवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. शाहू महाराजांचे आंतरजातीय विवाहाविषयीचे विचारही क्रांतिकारक होते. त्यांनी १२

जुलै १९१९ रोजी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. या कायद्यामुळे समाजातील जातीय आणि धार्मिक भेद दूर करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. त्यांच्या मते, सामाजिक समता साधायची असेल तर आंतरजातीय विवाह हे महत्त्वाचे साधन ठरू शकते. त्यांनी स्वतःच्या मुलीचा आंतरजातीय विवाह करून समाजासमोर आदर्श ठेवला.

शाहू महाराजांच्या स्त्रीसुधारणावादाची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे त्यांनी जातीव्यवस्थेविरुद्ध लढा दिला. त्यांचे सुधारक दृष्टिकोन हे सत्यशोधक समाजाच्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत होते, ज्याची स्थापना महात्मा ज्योतिराव फुले यांनी केली होती. शाहू महाराजांनी फुल्यांच्या विचारसरणीला पुढे नेले आणि स्त्री शिक्षण, स्त्री हक्क, आणि सामाजिक समता यांवर आधारित धोरणे आखली. त्यांनी अभिजन समाजाच्या मर्यादित स्त्री सुधारणा विचारांना धुडकावून लावले आणि बहुजन स्त्रियांच्या उन्नतीसाठी कार्य केले. छत्रपती शाहू महाराजांचा ब्राह्मणेत्तर स्त्रीसुधारणावाद हा भारतीय समाजातील अन्यायकारक प्रथांना आव्हान देणारा आणि स्त्री स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणारा होता. त्यांच्या धोरणांनी समाजातील सर्व स्तरांतील स्त्रियांना शिक्षण आणि समानतेच्या संधी दिल्या. त्यांच्या क्रांतिकारक निर्णयांनी स्त्रियांवरील कौटुंबिक आणि सामाजिक अत्याचार थांबवण्यास मदत केली आणि त्यांच्या उन्नतीसाठी मार्ग खुले केले. शाहू महाराजांचे हे कार्य केवळ त्यांच्या काळात महत्त्वाचे ठरले नाही, तर आजही त्यांचे योगदान आदर्श मानले जाते.

**संदर्भसूची व तळटिपा**

१) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००१, पृ. १०४.
२) कित्ता, पृ. १११.
३) धाठावकर भास्कर (संपा.), शाहू छत्रपतीचे निवडक आदेश, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९, पृ. १३९.
४) सुर्यवंशी, ग. सु., राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, १९७८, पृ. ५४.
५) धाटावकर, उपरोक्त, पृ. ४५.
६) सुर्यवंशी, उपरोक्त, पृ. २३९.
७) साळुखे, हिंदुराव, छत्रपती शाहू स्मृतिदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर,
१९९८, पृ. १०६
८) धाटावकर, उपरोक्त, पृ. ९५
९) पवार, ज. भा., राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ. १२३.
१०) सुर्यवंशी, ग.सु., उपरोक्त, पृ. २४०. साळुखे, हिंदुराव, उपरोक्त, पृ.१६.
११) सुर्यवंशी, कृ. गो, राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ४२९.
१२) पवार, ज. भा., राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर,
२००१, पृ. १०१६.
१३) धाटावकर, उपरोक्त, पृ. १५१.
१४) पवार, ज. भा., उपरोक्त, पृ. ११२
१५) कित्ता, पृ. ११३
१६) पवार, ज. भा., उपरोक्त, पृ. १०२१.
१७) नवसारी येथे १३ डिसेंबर १९१८ रोजी आर्य समाजाची परिषद झालेली होती. त्या परिषदेत शाहू महाराजांनी आपले भाषण दिलेले होते.
१८) इ. स. १९१८ मध्ये विठ्ठलभाई पटेल यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देण्यासाठी हे बिल मांडले होते. ते पटेल बिल म्हणून ओळखले जाते. या बिलाला लोकमान्य टिळकासहित सर्वच सनातनी नेत्याचा विरोध होता.
१९) कीर धनंजय, उपरोक्त, पृ. ३६९
२०) सुर्यवंशी, ग. सु., उपरोक्त, पृ. २४२.
२१) पवार, ज. भा., उपरोक्त, पृ. १०२४-२५.
२२) पवार, ज. भा., उपरोक्त, पृ. १०२१.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

78

# बेळगाव मधील ब्राम्हणेतर चळवळीचे आश्रयदाते बॅरीस्टर भुजंगराव केशवराव दळवी

**श्री इराप्पा विष्णू मोरे**
संशोधक विद्यार्थी, बेळगाव

---

बेळगाव जिल्ह्यात जी सत्यशोधक चळवळ व ब्राम्हणेतर चळवळ नावारूपाला आली, बहरली किंवा विस्तारली ती येथील अनेक सत्यशोधक – ब्राम्हणेतर नेत्यांच्यामुळे. महात्मा फुले यांचे लेखन, ग्रंथसंपदा आणि पत्नी सावित्रीबाई फुले यांना सोबत घेऊन, बहुजनांस उभे केलेले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य सर्वांसमोर आहे. याच लेखनातून आणि कार्यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील अनेक पिढ्या आजपर्यंत घडल्या आणि घडण्या-घडवण्याची ही प्रक्रिया अखंडीतपणे आजही सुरू आहे. सत्यशोधक समाजाचा तत्कालीन कार्याचा आढावा घेणे आणि या चळवळीला योगदान देणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांच्या कामासंबंधी माहिती घेणे ही आज काळाची गरज आहे.

महात्मा जोतिबा फुलेंच्या जीवन चारित्र्याच्या, महात्मा फुलेंच्या कार्याचा-विचारांचा वारसा घेऊन त्यांच्याच प्रमाणे बेळगाव परिसरात अनेक सर्वसामान्य ब्राम्हणेतर व्यक्तींनी निस्वार्थिपणे, आपल्या जीवनाची पूर्ण हयात समाज कार्यासाठी, समाजाच्या उध्दारासाठी खर्ची घातली. यामध्ये निवृत्त न्यायाधीश भुजंगराव दळवी, रावबहादूर मामासाहेब लाड वकील, शामराव देसाई मास्तर, बहिर्जी शिरोळकर, डॉक्टर कोवाडकर, खेमाजीराव गोडसे, गावडोजीराव पाटील, गुंडोजीराव सोनवलकर, संत गोविंदराव मेलगे, नरसिंगराव भुजंगराव पाटील, सट्टूप्पा टक्केकर, गुरुअण्णा मास्तर ही प्रमुख नेतेमंडळी होती. यांच्या सोबत अनेक नेते, सहकारी ब्राम्हणेतर मंडळी 20 व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात खेड्यापाड्यात जाऊन ब्राम्हणेतर समाजाच्या उन्नतीसाठी, मागासलेल्या बहुजन समाजासाठी, सत्यशोधक समाजाच्या प्रचारासाठी सभा घेत असतं. सत्यशोधक समाजाच्या प्रचारासाठी पोवाड्याचे , कीर्तनाचे कार्यक्रम करीत असत. बहुजन समाजातील कर्जबाजारीपणा, त्यांच्यातील अंधश्रद्धा, देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी वाढलेली प्राणीहत्या नवस, जत्रा, व्यसनाधीनता यांच्याविरुद्ध जोरदार प्रचार करीत. सामुदायिक लग्न पद्धती, शिक्षण प्रचार आणि शिक्षणाचे महत्त्व पटवीत. सामाजिक प्रबोधनाचे कार्य ही मंडळी अतिशय नेटाने करीत, त्यामुळेच तर या भागातील बहुजन समाज जागा झाला आणि शिकू लागला. महात्मा फुले, कर्मवीर अण्णासाहेब शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा विचारांचा त्यांच्या मनावर पगडा बसला त्या प्रेरणेतूनच त्यांचे कार्य अधिक प्रभावी बनले, समाज सुधारण्याची बीज त्यांच्यात रुजले, त्याची फळे आजचा समाज चाखतो आहे.(राष्ट्रवीर साप्ताहिक 4 मे 1997) बहुजन हिताची, समाज सुधारणेची व प्रबोधनाची प्रेरणा घेऊन अवतरलेल्या बेळगाव जिल्ह्यातील व परिसरातील भुजंगराव दळवी यांचे कार्य अतुलनीय व प्रेरणादायी आहे. बेळगाव जिल्ह्यातील तत्कालीन बहुजन समाजाचा अभ्यास अनेकांनी केला, आज सत्यशोधकीय विचारांचा वारसा जपणारा मोठा समुदाय बेळगाव मध्ये आहे, पण न्यायमूर्ती भुंजगराव दळवी यांच्या जीवनावर कोणी प्रकाश टाकलेला दिसून येत नाही. सर्व ब्राम्हणेतर चळवळीतील नेत्यांमध्ये भुंजगराव दळवी उपेक्षित राहिलेले दिसतात.

सत्यशोधक भुजंगराव केशवराव दळवी यांचा जन्म 14 जून 1892 रोजी बेळगाव येथे झाला. सत्यशोधक ब्राह्मणेतर कार्यकर्ते भुजंगराव दळवी हे इ. स. 1912 मध्ये बी. ए. झाले. इ. स. 1916 मध्ये ते एल. एल. बी. झाले. पुढे वकिली करता करता ते सरकारी वकील झाले. इ. सन 1923 मध्ये बेळगाव मतदार संघातून मुंबई कायदे कौन्सिल साठी निवडून आले. पुढे त्यांनी खानदेशातील जळगाव येथे जिल्हा व सेशन न्यायाधीश म्हणून 1935 पर्यंत काम केले. याच दरम्यान बेळगाव मध्ये शिवाजी प्रिंटिंग प्रेस संघटनेची स्थापना करून सत्यशोधक राष्ट्रवीर नियतकालिकाचा प्रारंभ केला. या राष्ट्रवीर साप्ताहिक पत्राचा पहिला अंक 9 मे 1921 रोजी प्रसिध्द झाला होता.

भुजंगराव दळवी हे सत्यशोधक ब्राह्मणेतर पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते होते. बेळगाव जिल्ह्यातील सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीच्या प्रसारासाठी डेक्कन ब्राम्हणेतर समाज परिषदांचे आयोजन बेळगाव जिल्ह्यात केले जात असे त्या प्रत्येक परिषदेत भुजंगराव दळवी यांचा सक्रिय सहभाग असायाचा. बेळगाव येथे इसवी सन मे 1921 मध्ये आयोजित केलेल्या सत्यशोधक समाज परिषदेच्या दहाव्या बैठकीचे भुजंगराव दळवी हे सेक्रेटरी होते.(राष्ट्रवीर साप्ताहिक 3 पान नंबर 1921 मे 9) तर इसवी सन 1927 मध्ये डीलाय रोड मुंबई येथे सत्यशोधक गोविंदराव शिंदे यांनी एका ब्राह्मणेतर परिषदेचे आयोजन केले होते, या परिषदेचे अध्यक्ष दस्तुरखुद्द भुजंगराव दळवी हेच होते. या मुंबई येथील ब्राम्हणेतर समाजाच्या परिषदेत ब्राह्मणेतर पक्षाच्या सदस्यांनी कॉंग्रेस

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

पक्षात प्रवेश घेऊन काँग्रेस व्हावे की होऊ नये या विषयावर प्रदीर्घ खल करण्यात आला होता.(सत्यशोधकांचे अंतरंग जि ए उगले पान नंबर 250) बेळगाव जिल्ह्यातील ब्राम्हणेतर नेते यांनी आपल्या समाजाचा उध्दार करीत असताना किंवा सत्यशोधक समाजाचे कार्य करीत असताना कधीच काँग्रेस पक्षात प्रवेश केला नाही. उलट बेळगाव जिल्ह्यातील ब्राम्हणेतर नेते हे कामगार पक्षात सक्रिय झालेले दिसतात.

भुजंगराव दळवी हे मराठा समाजातील पहिले बाणेदार व उत्साही पदवीधर वकील होते. जेव्हा भुजंगराव दळवी यांनी वकिली सुरू केली होती तेंव्हा समाजात केवळ जन्मजातीवर माणसाचे मोठेपण अवलंबून होते. ब्राह्मण्याने हजारो वर्षांच्या रूढींनी जखडून टाकलेला बहुजन समाज निस्तेज व निष्प्रभ झालेला होता. या सामाजिक वृत्तीमुळे समाजात माणुसकीच राहिली नव्हती, या बहुजन समाजाला जागे करण्याचे महत्तम् कार्य महाराष्ट्रात म. जोतीबा फुले यांनी सुरू केले होते व त्याची वाट राजर्षी शाहू छत्रपतींनी ही धरली होती. त्या चळवळीत भुजंगराव दळवीनी हिरीरीने भाग घेतला व मराठादि मागासलेल्या बहुजन वर्गात अंधःरूढींचे उच्चाटन करण्याचे महत्वाचे कार्य केले. या बहुजन समाजाचा उद्धार शिक्षणाशिवाय होणार नाही, शिक्षणाशिवाय सामाजिक सुधारणा व समता अशक्य आहे याची संपूर्ण जाणीव भुजंगराव दळवींना असल्यामुळे मराठा बहुजन समाजात शिक्षणाच्या प्रसारासाठी स. १९२०-२१ पासून बेळगाव परिसरातील खेड्यापाड्यांत मराठी शाळा काढण्यासाठी मराठा शिक्षण संस्था त्यांनी स्थापन केल्या होत्या. या शैक्षणिक संस्थेमार्फत बऱ्याच खेड्यांत मराठी शाळा सुरू झाल्या. त्या मराठी शाळा पुढे इंग्रजांच्या व स्वातंत्र्यांनंतर जिल्हा बोर्डाने आपल्या हाती घेतल्या. भुंजगराव दळवी त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून स्थापन केलेल्या मराठी शाळा आजही सुरू आहेत. आजही बेळगाव परिसरातील मराठा बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे कार्य करीत आहेत.

मराठा समाज हा जुनाट रूढींनी पोखरलेला व विस्कळीत झालेला समाज होता. उच्चनीचतेच्या जंजाळात या समाजात असंख्य पोटजाती निर्माण झालेल्या होत्या; व त्यामुळे ब्राह्मण्याचा वरचष्मा अव्याहतपणे चालू होता. त्या रूढींना उखडून काढून मराठा समाजात एकजूट निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य श्री. भुजंगराव दळवी यांनी सतत केले व त्यांत भरपूर यशही संपादन केले. त्याचे प्रतिक म्हणजे 1956 सालानंतर निर्माण झालेल्या बेलंगाव सीमा लढ्यात मराठा समाजाने खंबीर नेतृत्व निर्माण केले तर बेळगाव सीमाभागातून अनेक मराठी आमदार कर्नाटक राज्याच्या विधानसभेवर निवडून गेले तसेच बेळगाव महानगरपालिकेचा महापौर ही बहुतेक वेळा मराठाच निवडून येत असे, बेळगावच्या महानगरपालिकेवर मराठा बहुजन समाजाचा नेहमीच वरचष्मा राहिला आहे.

समाजसुधारणेत सामाजिक ऐक्य व शिक्षण याबरोबरच समाजाचा आर्थिक पायाही मजबूत असणे जरूर आहे म्हणून भुजंगराव दळवी यांनी व्यापार, उद्योग, सरकारी नोकऱ्या वगैरेंना प्रोत्साहन तर दिलेच पण शक्य तेव्हा बहुजन समाजाच्या उध्दारासाठी आर्थिक मदतही केली. शेकडो सुशिक्षित तरूणांना सरकारी व निमसरकारी नोकऱ्यात प्रवेश मिळवून दिला. त्यामुळे आज हजारो कुटुंबे स्वावलंबनाने व स्वाभिमानाने जगत आहेत. नवीन व गरजू व्यापाऱ्यांना योग्यवेळी आर्थिक मदत व्हावी म्हणून बेळगावामध्ये मराठा सहकारी बँक सुरू करण्यात त्यांनी फार प्रयत्न केले व मार्गदर्शनही केले, ही मराठा बँक आजही येथील बहुजन मराठा समाजाचे प्रतीक राहिले आहे. त्याचे दृश्य फल आजच्या मराठा बँकेच्या भरभराटीत दिसून येते.

भुजंगराव दळवी यांनी वकिली सुरू केल्यापासून त्यांना या धंद्यातील त्याकाळच्या नामांकित वकिलांची फारच मोठी मदत झाली. कै. केशवराव, कै. न्यायमूर्ती लोकूर इत्यादी निष्णात वकील गुरुपासून वकिली धंद्यात अत्यंत अभ्यासूपणा व आपल्या अशीलाची बाजू योग्य रीतीने न्यायासनापुढे मांडण्याची कला त्यांनी अल्पावधीत हस्तगत केली व ती अखेरपर्यंत टिकविली. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांची अभ्यासूवृत्ती अजिबात कमी झालेली नव्हती. सरकारी वकील म्हणून त्यांनी बेळगावात अद्वितीय यश संपादन केले. या यशाची गुरुकिल्ली म्हणजे अखंड अभ्यास, खटले मांडण्याची हातोटी व नेकी, म्हणूनच त्यांना ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून स. १९३३ साली नेमण्यात आले होते. न्यायाधीशपदाची कामगिरी न्यायमूर्ती भुजंगराव दळवी यांनी अत्यंत चोखपणे पार पाडली होती. ज्या ब्रिटिश सरकारने त्यांना नोकरी दिली त्या सरकारविरुध्दच पहिला निकाल त्यांनी दिला होता, यावरून त्यांची न्यायनिष्ठूरता सिध्द होते.

राजकीय जीवनात त्यांनी अगदी पहिल्यापासून उडी घेतलेली होती. पण राजकारणाला त्यांनी उपजीविकेचा धंदा कधी केला नाही. त्यामुळेच निःस्पृहपणे व नेकीने राजकारण त्यांना करता आले.स.१९२३ पासून लोकल बोर्ड, स्कूल बोर्ड, बेळगाव महानगरपालिका यांचे राजकारण त्यांच्या हाती आले व राहिले याला मुख्य कारण त्यांची न्यायप्रियता व सचोटीपणा.स. १९३३ मध्ये त्यांनी न्यायाधीशांची नोकरी पत्करल्यानंतर स. १९३७-३८ पासून त्यांच्या या कार्याला ओहोटी लागली.

सन १९२२ मध्ये ते मुंबईच्या विधिमंडळावर निवडून आले होते व त्यानंतर १९५२ मध्ये पुन्हा त्या विधिमंडळावर त्यांची बेळगाव शहरातून निवड झाली. या दोन्ही काळात त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व अभ्यासयुक्त अशी भाषणे केलेली आहेत. त्यांचे विधिमंडळातील शेवटचे भाषण डिसेंबर १९५६ मध्ये म्हैसूर विधानसभेत झाले. त्या भाषणात त्यांनी बेळगाव या सीमा भागाची कैफियत इतक्या मुद्देसूद आधारांनी मांडली की त्यांना उत्तर देताना श्री.एस. निजलिंगप्पा यांनी मराठी माणसाला महाराष्ट्रातच राहावयाचे असेल तर त्यास आपली हरकत नाही असे मान्य केले होते. त्यानंतर मात्र ते या विधिमंडळाच्या भानगडीत पडले नाहीत. काँग्रेसमध्ये आल्यास मंत्री होण्याची आशा बऱ्याच पुढाऱ्यांनी त्यांना दाखविली, पण भुजंगरावजींनी ती गोष्ट अमान्य केली. यावरून अधिकारलालसा त्यांना कदापी शिवू शकली नाही हे स्पष्ट आहे.

इ.स.१९४८ साली ते सरकारी नोकरीतून निवृत्त झाले व पुन्हा त्यांनी वकिली सुरू केली. याही वेळी त्यांनी उत्कृष्ट वकिली केली ती अगदी आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत. कै. भुजंगराव दळवी सरकारी नोकरीत असताना बेळगावच्या मराठा मंडळ शाळेची नेहमीच विचारपूस करीत अस यावरून त्यांची शैक्षणिक कामाप्रतीची निष्ठा या आपल्या बहुजन समाजाच्या शिक्षणाची काळजी दिसून येते. त्यांनी आपल्या सेवा निवृत्तीनंतर या शाळेची भरभराट करण्यास मदत केली होती. या शाळेची इमारत बांधण्यासाठी पुष्कळ प्रयत्न झालेले होते. पण त्यात यावे तसे यश आले नव्हते. पण भुजंगराव दळवीनी या संस्थेची सूत्रे हाती घेतल्याबरोबर निधी जमा होऊ लागला व इमारत उभी झाली. ती पूर्ण करण्याची त्यांची मनीषा फार होती. त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्नही सुरू केले होते. पण तेवढ्यात त्यांच्यावर काळाचा घाला आला. पण त्यांचे कार्य व त्यांची ती इच्छा पूर्ण करणे हे येथील मराठा बहुजन समाजाने आपले एक आद्य कर्तव्य मनौन ही संस्था उभी केली व आजही ती कार्यरत आहे.

आपल्या राजकीय तत्वज्ञानाचा प्रचार मराठी व अडलेल्या जनतेस व्हावा, बहुजन समाजाचा उध्दार व्हावा, त्यांच्या वैचारिक जाणिवा निर्माण व्हाव्यात म्हणून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून राष्ट्रवीर हे साप्ताहिक सुरू केले. त्यांच्या या कार्यातील सहकारी श्री.डी.ए.बिर्जे व कैलासवासी शामराव संताजी भोसले हे होते. या वर्तमानपत्रासाठी त्यांनी श्री. शिवाजी प्रिंटिंग प्रेस सुरू केली होती व त्याच्यासाठी एक इमारतही खरेदी केली. हे वर्तमानपत्र लोकशिक्षणासाठी कायम चालावे म्हणून त्यांनी श्री. शिवाजी प्रेस चे श्री शाहू प्रकाशन मंडळ ही पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन करून या वर्तमानपत्राला चिरस्थायीत्व प्राप्त करून दिले व या पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून गुरुवर्य श्री. शामराव गोविंदराव देसाई यांना त्यांच्या समाजसेवेबद्दल दरमहा रुपये १०० पेन्शन ठरवून दिली. एवढी न्यायमूर्ती भुजंगराव दळवी यांची समाजाबद्दलची निष्ठा व प्रेम !

नेकी हा त्यांचा स्थायीभाव होता. सती व जुगुळ या नावाने प्रसिध्दीस आलेल्या या लाचलुचपतीच्या दोन खटल्यात त्यावेळी सी.आय.डी. श्री. भुंजगराव दळवी हे ब्राह्मणेतर पक्षाचे असल्याने व वरील दोन्ही खटल्यातील आरोपीमध्ये बहुतेक सर्व आरोपी ब्राह्मणेतर असल्यामुळे भुंजगराव दळवी यांनी या खटल्याच्या निवाड्यासाठी मुंबईचे नामांकित वकील दिले होते. सरकारतर्फेही एखाद्या प्रसिध्द वकील आणावा अशी मागणी केली होती. पण बेळगावचे त्यावेळचे श्री. डिव्हीजनल मॅजेस्ट्रेट हे युरोपियन होते. त्यांनी मुंबई सरकारला स्पष्ट कळविले की आपला हा प्रॉसीक्युटर म्हणजे श्री. भुंजगराव दळवीसाहेब यांच्यावर आपला पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे या खटल्यात प्रॉसीक्युटर म्हणून भुंजगराव दळवी यांनीच कां केले व त्यांनी ही खटले जिंकून लाचखोरांना कठोर शिक्षा करविल्या होत्या. (राष्ट्रवीर दि. : ११ मे १९६५) असा हा आजचा एकमेव पुढारी, आश्रयदाता महान गुरु व धीरगंभीर वृत्तीचा नेता ब्राम्हणेतर चळवळीला लाभला ज्यामुळे बेळगाव परिसरातील सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळ भरभराटीस लागली व बेळगाव परिसरातील बहुजन समाजाचा उध्दार झाला, त्यांच्या गेल्यानंतर येथील बहुजन समाजाच्या कार्यातील ही पोकळी भरून येणे अशक्य आहे. पण त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या कांही नेत्यांनी त्यांचे कार्य पुढे नेटाने चालू ठेवले जे कांही प्रमाणात आजही चालू आहे.

संदर्भ:-

1) राष्ट्रवीर साप्ताहिक अंक 9 मे 1921
2) महाराष्ट्रातील सत्यशोधक व ब्राम्हणेतर चळवळ – प्राचार्य एस एस गाठाळ
3) सत्यशोधकांचे अंतरंग- जि. ए . उगले
4) राष्ट्रवीर साप्ताहिक अंक 1933 राष्ट्रवीर साप्ताहिक अंक 1933
5) राष्ट्रवीर साप्ताहिक अंक 1965

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

79

# छत्रपती शाहू महाराज आणि सामजिक न्याय

**ज्योती प्रकाश बनसोडे**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांनी आपापल्या संस्थांनांमध्ये अनेक क्रांतिकारक पावलं टाकून स्वतःपासूनच बदलांची सुरुवात केली होती. राजसत्तेचे प्रमुख असूनही शैक्षणिक, राजकीय, सामाजिक बदलांसाठी आवर्जून कार्य केले. शाहू महाराजांनी आपल्या राज्यात समता प्रधान समान रचना, लोकशाही आणि समाजवाद रुजविण्याचा प्रयत्न केला. सामाजिक समतेची प्रतिष्ठापना हे त्यांचे मुख्य उद्दीष्ट होते. त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यीक, क्रिडा, संगीत, कृषी व आरक्षण या क्षेत्रात अमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले. अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराज हे लोककल्याणकारी व क्रांतिकारी विचारांचा वारसा लाभलेले राजा होते. बहुजनांना शिक्षण, जातीभेद निर्मूलन, नोकऱ्यांमध्ये आरक्षण आणि स्त्रीमुक्तीसाठी कायदे करणारे ते सुधारणावादी समाजसुधारक असून सामाजिक न्यायाची स्थापना त्यांनी त्यांच्या कार्यातून केली.

**उद्देश :**

१.सामाजिक न्याय संकल्पना समजून घेणे.

२.छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय स्थापनेसाठी केलेले प्रयत्न अभ्यासणे.

**सामाजिक न्याय :**

सामाजिक न्याय' ही संकल्पना सर्वप्रथम १,५०० ते २,५०० वर्षांपूर्वी ज्यूडाइझम, ख्रिश्चन, इस्लाम, बौद्ध, हिंदू धर्म इत्यादींच्या शिकवणुकीतून व त्याच काळातील 'सोफोक्लिझ' व 'एस्किलिस'च्या ग्रीक शोकांतिकांसारख्या पाश्चिमात्य साहित्यातून अवतरली. त्यानंतर धर्मांचे संस्थीकरण होऊन ते राज्ये आणि साम्राज्यांशी जोडले गेल्यामुळे न्यायाच्या संकल्पनेचा नैसर्गिक विकास खुंटला. त्यानंतर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे पुनःप्रकटन हे सतराव्या व अठराव्या शतकांत पाश्चिमात्य समाजात धर्मनिरपेक्ष मानववाद, बुद्धिवाद, वैज्ञानिक क्रांती व प्रबोधनकाळ यांच्या वाढीबरोबर पाहायला मिळते. या नव्या परिप्रेक्ष्यात सामाजिक संरचनेचे विश्लेषण करणाऱ्या रुसोसारख्या राजकीय तत्त्ववेत्त्यांनी समाजातील अन्यायकारक बाबींची चिकित्सा केली आणि त्यातूनच सामाजिक न्यायावर आधारित समाजरचनेच्या चौकटीला चालना मिळाली. समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क, स्त्री-पुरुष समानता, समाजातील सर्व व्यक्तींना शिक्षणाची, विकासाची संधी आदी मूल्ये आणि तत्त्वे ही सामाजिक न्यायाची उद्दिष्टे होत. 'न्याय' ही मानवी संकल्पना असल्यामुळे ती गतिमान आहे. न्यायाची कल्पना भिन्न-भिन्न समाजात वेगवेगळी असते.

सामाजिक न्याया'ची ही संकल्पना प्रत्येक नागरिकाला समजणे व त्याचे आकलन होणे अत्यंत गरजेचे आहे. 'सामाजिक न्याया'चे आकलन करून त्यानुसार वर्तन करण्याचे प्रत्येकाने ठामपणे ठरविल्यास 'अन्याय' ही संकल्पनाच कालबाह्य ठरेल. किंबहुना 'अन्याय' ही संकल्पना पूर्णपणे नाहीशी होऊन 'सामाजिक न्याय' स्थापित व्हावा, याकरिता राजर्षी शाहू महाराज यांनी आपले उभे आयुष्य खर्ची केले. विविध कार्य व उपक्रमांच्या माध्यमातून कठोर निर्णयांच्या माध्यमातून सामाजिक अन्यायाला पाठिंबा देणाऱ्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. समाजसुधारणेसाठी राज्यकारभारातील अनेक पारंपरिक नियम त्यांनी बदलले, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनेक नवीन कायदे स्थापित केले आणि हे कायदे न पाळणाऱ्यांवर कडक कारवाईदेखील केली.

**छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय स्थापनेसाठी प्रयत्न :**

"राजर्षी शाहू महाराजांनी जेव्हा राज्याची सूत्रे हाती घेतली, तेव्हा महाराष्ट्रात ब्राह्मण लोकसंख्येच्या मानाने पाच टक्के होते. तरी त्यांचे राज्यकारभारामध्ये ब्रिटिशांच्या खालोखाल प्रभुत्व होते. शिक्षण खाते, महसूल खात्यामधील देखरेख आणि अशाच प्रकारच्या सरकारी कारभारात त्यांचे महत्त्व होते. ग्रामीण भागात तर ग्रामाधिकारी, सावकार व पुरोहित हे ब्राह्मणच असत. ब्राह्मण कारकून, ब्राह्मण वकील, मामलेदारांसारखे महसूल अधिकारी हे जरी ब्रिटिशांच्या अधिकाराखाली काम करीत असले तरी ते वरील ग्रामीण त्रिकुटाला आतून सामील असत. हे ब्राह्मण अधिकारी आपल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांजवळ शेतकऱ्यांच्या तक्रार अर्जातील महत्त्वाचे मुद्दे किंवा संबंधित पुराव्याच्या गोष्टी गाळून टाकीत असत. राज्यकारभारात एकाच जातीचा भरणा आणि वर्चस्व

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

असल्यामुळे न्यायदान करताना व कायद्याची अंमलबजावणी करताना हे ब्राह्मण अधिकारी ब्राह्मण सावकार व जमीनदार यांच्या बाजूने न्याय देऊन गरीब शेतकऱ्यांना शिक्षा देत असत." अशा प्रकारे राज्यकारभारातील न्याय पक्षपाती, अन्यायमूलक व भ्रष्टाचारी बनला होता.

शाहू महाराजांनी सत्ता हाती येताच शासनाचा दर्जा व कार्यक्षमता वाढवण्याच्या हेतूने कार्यक्षम अधिकाऱ्यांच्या शोधास सुरूवात केली. राज्यकारभारात समतोलपणा रहावा व मागासलेल्या जातीतील तरूणांनी उच्च शिक्षण घेऊन आपली लायकी वाढवावी, यासाठी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर समाजातील सुशिक्षित तरूणांना प्रशासनात नेमून त्यांना राज्यकारभाराचे ज्ञान देण्याचे ठरविले.

शाहू छत्रपतींनी मोठ्या अधिकाराच्या जागी ब्राह्मणेतरांची नेमणूक केली इतकेच नव्हे, तर त्यांनी आपल्या दिमतीस गरीब वर्गातील लोक ठेवले. त्यांचा हेतू एवढाच होता की, गरीब लोकांच्या हितासाठी त्यांनी जे हुकूम काढले होते, त्यांची अंमलबजावणी होते की नाही हे त्यांच्याकडून कळावे. शाहू महाराजांना वाटत असे की, चांगल्या गोष्टी चांगल्या माणसाकडून कळतात आणि वाईट गोष्टी अडचणीत असलेल्या माणसाकडून कळतात.

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक पुनर्रचनेचा कार्यक्रम राबविताना तत्त्व आणि व्यवहाराचा योग्य समन्वय साधला. त्यांचे महाराष्ट्राच्या संदर्भातील मोल नोंदवताना सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासक लक्ष्मण गायकवाड लिहितात, "रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज यांनी मागासवर्गीय व बहुजन समाजाच्या हितरक्षणासाठी व त्यांची शैक्षणिक प्रगती करून इतरांबरोबर वाटचाल करण्यासाठी १९०२ साली आरक्षण ठेवण्याचा पहिला प्रयत्न केला. मागासवर्गीय व बहुजन समाजाच्या महाराष्ट्रातील प्रगतीस शाहू महाराजांचे आरक्षणच महत्त्वपूर्ण ठरले आहे. महाराष्ट्रातील आज मागासवर्गीय व बहुजन समाजातील राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात जे काही पुढारलेले लोक आहेत, त्यात शाहू महाराजांचे आरक्षणच कारणीभूत आहे हे मान्य करावे लागेल.

समाजात महिलांना सन्मानाचे स्थान मिळावे यादृष्टीने छत्रपती शाहू महाराजांनी प्रयत्न केले. त्यांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा केला. बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. राजर्षी शाहू महाराजांनी घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला.

प्रेमाने वागविले तर गुन्हेगार समजली जाणारी माणसेदेखील बदलतील, आपला विकास साधतील असे नवे मानवतावादी समीकरण महाराजांनी मांडले. रोटीबंदी, बेटीबंदी व व्यवसाय बंदी हे तीन निर्बंध जाती व्यवस्थेत होते. ते समूळ नष्ट केल्याशिवाय जातीभेद समूळ नष्ट होणार नाही म्हणून त्यांनी आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला. जाती व्यवस्थेतील व्यवसायबंदी उठवली. त्यांनी व्यवसाय स्वातंत्र्य देवून एक प्रकारच्या सामाजिक गुलामगिरीतून जनतेची मुक्ती केली. समाजात आमुलाग्र बदल घडवून भारतीय प्रबोधनात एक नव आयाम निर्माण केला

भटक्या विमुक्त जातीच्या उद्धारासाठी आपल्या राज्यात रोजगार दिलेत. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले.

छत्रपती शाहू महाराज हे जातीव्यवस्थेचे कट्टर विरोधक होते आणि त्यांनी समाजात जातीय समानता वाढवण्यासाठी अथक परिश्रम घेतले. जातिव्यवस्था हा सामाजिक प्रगतीतील मोठा अडथळा आहे आणि सर्व लोकांना त्यांची जात किंवा पंथ काहीही असले तरी समानतेने वागवले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी जाती समानतेला चालना देण्यासाठी अनेक उपाय योजले आणि त्यांच्या राज्यात जात-आधारित भेदभाव दूर करण्यासाठी कार्य केले. त्यांनी खालच्या जातीतील लोकांना संधी देण्यासाठी अनेक उपाय योजले आणि केवळ त्यांच्यासाठीच अनेक शाळा आणि महाविद्यालये स्थापन केली. त्यांनी खालच्या जातीतील विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी मदत करण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि शिष्यवृत्ती देखील दिली. त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचे काम केले आणि ते सर्वांसाठी अनिवार्य केले

त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानांपैकी एक म्हणजे शाहू छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना, ज्याचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना दर्जेदार शिक्षण प्रदान करणे हा होता. संस्था संपूर्ण महाराष्ट्रात अनेक शाळा आणि महाविद्यालये चालवते आणि हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते जे अन्यथा या संधीपासून वंचित राहिले असते.

छत्रपती शाहू महाराज हे देखील कामगार कल्याणाचे अग्रेसर होते. त्यांनी मजुरांच्या कामाची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना चांगले वेतन आणि राहणीमान देण्यासाठी अनेक उपाय सुरू केले. कामगार हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांचे कल्याण आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. त्यांनी अनेक कामगार कल्याणकारी योजना स्थापन केल्या आणि कामगारांना वैद्यकीय सुविधा, घरे आणि इतर सुविधा दिल्या.

१८९७ च्या सुमारास एक मशीद हिंदू अधिकाऱ्यांनी जबरदस्तीने ताब्यात घेतल्याचे प्रकरण शाहू महाराजांच्यासमोर आले होते, शाहू महाराजांनी या प्रकरणाची चौकशी करुन ते प्रकरण सलोख्याने निकालात काढले होते. त्यानंतर राजवाडा परिसरातील एका मशिदीच्या जागेवरुन वाद झाला होता. या मशिदीलाही शाहू महाराजांनी शाहुपुरीत वेगळी जागा देऊन ते प्रकरण शांत केले होते. हिंदू- मुस्लीम वाद होऊ नये यासाठी ते काळजीपूर्वक पावलं टाकत असल्याचं दिसून येतं. कोल्हापूरची सुत्रं हाती आल्यावर १८९४ साली शाहू महाराज पुण्याला गेले होते. त्यावेळी गणपती उत्सवाच्यावेळी पुण्यात हिंदू-मुस्लीम भांडण झाले होते. तेव्हा शाहू महाराजांनी सार्वजनिक सभेला हिंदू मुस्लीम यांच्यात शांततेचा समेट घडवून आणावा असा सल्ला दिला होता. या सल्ल्याचा उल्लेख सुधारक पत्राने करुन शाहू महाराजांच्या या सुचनेवर पुण्यातील पुढारी विचार करतील अशी अपेक्षा व्यक्त केली होती. शाहू महाराजांनी मुस्लीम बोर्डिंगच्या स्थापनेत, शिक्षणकार्यात वाटा उचलला हे तर सर्वांनाच माहिती आहे.

**सारांश :**सामाजिक न्याय म्हणजेच समाजातील दुर्लक्षित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न होय. राजर्षी शाहू महाराजांनी याच घटकासाठी केलेले कार्य सर्वज्ञात आहे. त्यामुळे एक महान द्रष्टे, दयाळू नेते आणि सामाजिक न्यायाचे कृतीशील नेते होते. १८७४ मध्ये कोल्हापूर, महाराष्ट्राच्या राजघराण्यात जन्मलेले ते १८९४ मध्ये वयाच्या २० व्या वर्षी राज्याचे राजे बनले. ते केवळ राज्यकर्तेच नव्हते तर समाजसुधारक देखील होते ज्यांनी वंचित घटकांचे जीवन उंचावण्यासाठी अथक परिश्रम घेतले. समाजाचा. समता, न्याय आणि बंधुत्व या तत्त्वांवर त्यांचा विश्वास होता आणि त्यांनी आपल्या जीवनकाळात या मूल्यांना चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

संदर्भसूची :

१. भगत, रा. तु. (२०१६). राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व शिक्षणकार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन्स.
२. पवार जयसिंगराव,( नोव्हेंबर २००५), "राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा", मेहता पब्लिशिंग हाऊस , कोल्हापूर.
३. चव्हाण रा .ना., ( २००२), "राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य , सनय प्रकाशन, पुणे.
४. कीर धनंजय, (२०१७), "लोकराजा शाहू महाराज व्यक्तित्व आणि विचार", सुधीर गवळी प्रकाशक, पुणे.
५. सरगडे संजय कुमार,( २६ जून २०२२), "लोककल्याणकारी राजा- राजर्षी छत्रपती शाहू महाराज", दैनिक मुक्तागिरी- लेख.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**80**

# एक अभ्युदय राजा : राजर्षि छत्रपति शाहू महाराजा

**डॉ. अक्षय राजेन्द्र भोसले**
हिंदी विभाग,
श्री शहाजी छत्रपति महाविद्यालय, कोल्हापुर

---

भारत एक ऐसा देश है जो अनेकों आक्रमण और परकीय सत्ता की चपेट में आकर अपनी सामजिक स्थिति पूर्णत: अस्तव्यस्त कर चुका था। स्वातंत्र्यपूर्व भारत में ब्रिटिश सरकार द्वारा विकसित आर्थिक नीतियों का उद्देश्य भारत को ब्रिटेन के बढ़ते उद्योगों के आपूर्तिकर्ता के रूप में बनाना था। नीतियों को ब्रिटेन के विकास और उसकी आर्थिक स्थिति को बढ़ावा देने के लिए लक्षित किया गया था। भारत और उसके विकास को पूरी तरह नज़रअंदाज कर दिया गया। ऐसी नीतियों के कारण भारत ब्रिटेन से कच्चे माल का आपूर्तिकर्ता और तैयार माल का बाजार बन गया। भारत में ऐसी नीति का प्रभाव गहरे रूप में रहा है। इतिहास साक्षी है कि बुद्धिजीवियों, प्रतिभावानों और क्रांतिकारियों ने महाराष्ट्र के जीवन को आकार देने के लिए अपनी सारी शक्ति समर्पित कर दी है। छत्रपति शिवाजी महाराज ने स्वराज्य के बल पर पहचान और स्वशासन दिया। तानाजी, संताजी, धनाजी आदि ने वीरता का अनुष्ठान किया और फुले, अगरकर, शाहू महाराज, सावरकर, अम्बेडकर जैसी महात्माओं ने क्रांतिकारी विचार दिये।

भारत देश में व्यक्ति की गुणवत्ता को हमेशा जाति और धर्म के घेरे में रखा गया दृष्टिगत हुआ है। व्यक्तियों और घटनाओं की निष्पक्ष व्याख्या दुर्लभ दिखाई देती है। इस देश के इतिहासलेखन में दागदार मनोवृत्ति की मोटी परत है। असली इतिहास तो अभी लिखा जाना बाकी है ! इतिहासकारों ने अब तक कई व्यक्तियों को न्याय ही नहीं दिया है और कई घटनाओं की व्याख्या अपनी सुविधा के अनुसार की है। लेकिन जैसे-जैसे दिन बीतेंगे, अब तक उपेक्षित शख्सियतों को इतिहास में उनकी सही जगह मिलने जा रही है। घटित घटनाओं का ईमानदारी से अवलोकन होगा। ऐसे में शहाजी महाविद्यालय, कोल्हापुर में घटित हो रही 'शाहू महाराजा जी के शतकोत्तर जन्मशताब्दी के अवसर पर संगोष्ठी का होना एहम बात है। शाहू महाराज एक ऐसे महान व्यक्तित्व हैं जो जातिवाद का शिकार होकर भी 'राजर्षि' उपाधि के अधिकारी हुए।

महाराष्ट्र के क्रांतिकारियों की सशक्त परंपरा में कोल्हापुर रियासत के छत्रपति राजर्षि शाहू महाराज का महत्वपूर्ण स्थान है। शाहू महाराज महाराष्ट्र के सामाजिक इतिहास में एक तूफानी और रचनात्मक शक्ति के रूप में उल्लेख के पात्र हैं। इस राजा ने अपनी शक्ति का प्रयोग केवल लोक कल्याण के उद्देश्य से किया। डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखती है "गडकरी के नाटक 'राजसंन्यास' का एक कथन सार्थक है. "राजा राज्य का स्वामी होता है, राज्य का हड़पना राज्य का त्याग है।" यह कहना कठिन नहीं है कि इस कथन से शाहू महाराज के जीवन और कार्य का पता चल गया है। उन्हें कभी भी व्यक्तिगत सुखों में डूबे हुए नहीं देखा गया। उन्होंने सदैव आम आदमी की उन्नति और खुशहाली के बारे में सोचा। आम आदमी - जो विभिन्न जंजीरों से बंधा हुआ है, जिसके जीवन में नए विचारों और खुशियों की सुबह नहीं हुई है, पीड़ित, वंचित आदमी सक्षम और सुशिक्षित बनने से वंचित है।"[1] एक साहित्यकार की हृदय में एक राज के कार्य की छाया किस भांति उमडी हुई है यह स्पष्ट होता है.

शाहू महाराज का दृष्टिकोण कितना प्रगतिशील था और वे कितने दूरदर्शी विचारक थे, इसका पता उनके कृषि, सहकारिता और उद्योग के क्षेत्र में किए गए कार्यों से भी चलता है, इसलिए उन्हें 'हरित क्रांति का जनक' कहना अनुचित नहीं होगा और आज 'सहकारी बल के सर्जक'. लेकिन उनकी असामान्यता इन क्षेत्रों में उनके द्वारा किए गए कार्यों या शासन में किए गए सुधारों में परिलक्षित होती है, और इस तथ्य में भी कि उनके प्रत्येक सुधार का उद्देश्य पिछड़े समाज के लाभ के लिए था और उसी उद्देश्य के लिए किया गया था। यह आदमी दिल से गरीबों का उद्धारक था, जो उनके हर शब्द, लेखन और कार्य में झलकता था। प्रा. मीना कुलकर्णी कोल्हापुर की वरदायिनी : राधानगरी धरण-योजना लेख में लिखती है "राधानगरी बाँध के बारे में निर्णय लेने के उपरांत प्रकल्प में महाराजा जी इतने गुम हो गए कि उसके बारे में वे सदैव चिंतातुर दृष्टिगत हुए है, उन्होंने एक पत्रिका में कहा कि : My lifes ork will have been doe when I complete this project."[2] इस भान्ति महाराजा जी ने अपने आप को बांध के काम के लिए समर्पित किया था. इतिहास में ऐसा राजा मिलना कठिन है जो अछूतों, श्रमिकों आदि हाशिये पर पड़े समूहों की बैठकों में सीधे शामिल होता हो। लेकिन उससे भी बढ़कर, उनके जैसा नेता जो उनके कष्टों और अन्याय को अपने ऊपर अत्याचार समझकर उन्हें दूर करने के लिए हर तरह की शारीरिक और मानसिक कष्ट उठाता है और यह सब राजा की गद्दी पर बैठकर विलासितापूर्ण जीवन का आनंद लेते हुए करता है!

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

शाहू महाराज ने माना कि आज़ादी का मतलब मुट्ठी भर लोगों का शासन और बहुजनों की निरंतर दासता हैउनकी सार्वजनिक स्थिति यह थी कि भारत को स्वराज मिलना चाहिए। लेकिन उन्होंने इस बात पर जोर दिया कि सबसे पहले यहां के बहुजनों को इस स्वशासन का आनंद लेना चाहिए।मा. इन्द्रजीत लिखते है " रय्यत के हित में कामकाज कैसे करना आवश्यक है ! ' इसका उत्तम उदहारण है राजर्षि छात्रपति का कार्यकाल ।सौ साल पहले करवीर गद्दी पर आरूढ़ होकर मा. राजा जी ने अपनी कारकीर्द में बहुजन समाज के आरक्षण का निर्णय लिया एवं अनेक क्रान्तिकारी निर्णय लिए।[3] इसीलिए वे सभी सामाजिक, शैक्षणिक और आर्थिक रूप से पिछड़ी जातियों के उद्धार और विशेष रूप से अछूतों और दलितों के समग्र उत्थान के लिए कड़ी मेहनत कर रहे थे। शिक्षा ही प्रगति की नींव है, यह पहचानकर उन्होंने महात्मा फुले की तरह शिक्षा के प्रसार के कार्य को प्राथमिकता दी। साथ ही उन्हें यह भी एहसास हुआ कि केवल शिक्षा प्रदान करने से कोई पिछड़ा समाज आगे नहीं बढ़ सकता। इसलिए उन्होंने उन्हें सरकारी तंत्र में शामिल करके उनकी सामाजिक स्थिति और आर्थिक स्तर को बढ़ाने की रणनीति की पहचान की थी। जब शासन व्यवस्था में एक ही जाति का प्रभुत्व हो जाता है तो विभिन्न प्रकार की बेवफाई उत्पन्न हो जाती है वह इसे वास्तविक अनुभव से जानता था। इसीलिए उन्होंने सरकारी व्यवस्था में गैर-ब्राह्मणों के लिए सीटें आरक्षित रखकर दोनों उद्देश्यों को प्राप्त करने का प्रयास किया। भारतीय संविधान ने विशेष प्रावधान बनाकर इसका और भी समर्थन किया है।

शाहू महाराज समानता, न्याय, भाईचारा, जातिवाद उन्मूलन, अस्पृश्यता और दलितों के उद्धार के जिन लक्ष्यों के लिए जिए और लड़े, उन्हें आज भारतीय संविधान में सम्मान का स्थान मिला है। लेकिन इन अधिकारों की मान्यता के लिए उन्हें उस समय के स्वतंत्रता संग्राम के अग्रदूतों और उन समाज सुधारकों से कड़ा संघर्ष करना पड़ा जो ऊंची जातियों के बीच सामाजिक सुधार लाने में सबसे आगे थे। इससे पता चलता है कि राष्ट्र, समाज और लोगों की अवधारणाओं की परिभाषाएँ उनके विरोधियों द्वारा कितनी संकीर्ण थीं और केवल उच्च वर्गों तक ही सीमित थीं।

समाज में स्वार्थी, क्षुद्र और बुरी ताकतें किसी व्यक्ति को किस प्रकार मानसिक यातना के निम्नतम स्तर तक ले जा सकती हैं, इसका ज्वलंत उदाहरण राजर्षि शाहू महाराज पर उनके राज्य और राज्य के बाहर के शत्रुओं द्वारा की जाने वाली अंतहीन यातना है। जब उनके हितों पर खतरा मंडराता है तो तथाकथित पढ़े-लिखे लोग भी सांप की तरह डसने को किस तरह प्रेरित होते हैं, इसका उदाहरण परंपरावादियों ने शाहू महाराज द्वारा शुरू किए गए शासन, शिक्षा, समाज और धर्म में सुधारों का किस तरह विरोध किया, यह देखा जा सकता है। शाहू महाराज के शासनकाल के दौरान उन्हें जिन विभिन्न अजीब घटनाओं का सामना करना पड़ा, उनसे पता चलता है कि समाज के मुट्ठी भर लोग शासक के खिलाफ किस हद तक साजिश रच सकते हैं और उसे बदनाम करने के लिए सबसे निचले स्तर तक जा सकते हैं। शाहू महाराज के शासनकाल से यह सीख मिलती है कि शासक चाहे राजा हो या जनता का प्रतिनिधि, यदि उसे अपनी नीतियों और कार्यक्रमों को सफल बनाना है तो उसे प्रशासन में ऐसे लोगों की आवश्यकता होती है जो ऐसी नीतियों के अनुकूल हों। और कार्यक्रम. बचपन में किए गए कार्य की न्यायप्रियता के प्रति दृढ़ विश्वास, अन्याय के प्रति हार्दिक आक्रोश, दृढ़ संकल्प और दृढ़ता के कारण महाराजा सभी कठिनाइयों का सामना करते हुए बहादुरी से अपने जीवन का कार्य करने में सक्षम हुए। अगर उनकी जगह कोई और होता तो जिन असामाजिक, घृणित और विनाशकारी ताकतों से उन्हें जूझना पड़ रहा था, उनके डर से उन्होंने अपना काम बीच में ही छोड़ दिया होता।

इतिहास में किसी राजा के कंधे पर सामाजिक क्रांति का झंडा कम ही देखने को मिलता है। समाज सुधारक राजा तो बहुत हुए हैं, परंतु सामाजिक क्रांतिकारी राजा मिलना कठिन है। "सत्यशोधक समाज के तत्त्वों के अनुसार छत्रपति शाहू महाराज इन्होने अश्पृश्यता नष्ट की। यह स्वराज्य की सच्ची नींव ही है। इसकी समस्त कल्पना मुझे है। हर एक को उनके आदर्श लेना होगा।"[4] शाहू महाराज ने ऐसे दुर्लभ राजा बनने के लिए बहुत कुछ किया, इसीलिए उनका नाम आज भी सभी को याद है और रहेगा।

जाति, नस्ल, संप्रदाय के कृत्रिम आधार पर लोगों के बीच भेदभाव करने वाली और लोगों के एक बड़े समूह को अछूत मानकर उन्हें गांव से बाहर रखने वाली विचारधारा अन्याय की सीमा है। इस सोच में कोई तर्क नहीं है और कोई सामान्य सहानुभूति नहीं है। राजर्षि शाहू जी ने मानवता का अपमान करने वाली इस विचारधारा को पूरी तरह से नकार दिया और मानवता की सेवा की। उन दिनों ब्राह्मणों को छोड़कर बाकी सभी शूद्र कहलाते थे। इसलिए संपूर्ण गैर-ब्राह्मण समुदाय हाशिए पर था। बौद्धिक शक्ति तथाकथित ऊंची जातियों को विरासत में मिली थी। अत: महाराजा जी ने वसतिगृह के निर्माण किए। डॉ. रमेश जाधव कहते है, "दुर्लभ जाती आर्थिक-सामजिक और राजकीय दृष्टि जब तक शक्तिशाली होगी नहीं, तब तक जातिसंख्या समूल नष्ट होगी नहीं । यह शाहू छत्रपति जी का जातिसंख्या नष्ट करने के संघर्ष का प्रमुख सूत्र था । इसलिए उन्होंने वसतिगृह चलवल जारी की।"[5] समाज के इस अन्याय के कारण सदियों से मानसिक और बौद्धिक शक्ति नष्ट होती जा रही है। समाज के बहुसंख्यक वर्ग को इस संकट से मुक्ति

दिलाने के लिए इतिहास में किये गये प्रयासों में एम. फुले और शाह छत्रपति के जोशीले प्रयास हाल के दिनों में महत्वपूर्ण रहे हैं। दलित मुक्ति के इस आंदोलन को बाबा कहा जा सकता है। मनुष्य का जन्म स्वतंत्र होने के लिए हुआ है। एक सामाजिक और धार्मिक व्यवस्था जो उसके प्राकृतिक आवेगों को दबा देती है, स्वतंत्रता के लिए एक बड़ा ख़तरा है। जाति-पाति की पूर्वकल्पित पारंपरिक व्यवस्था के कारण मनुष्य अनेक बंधनों से बंधा हुआ था। शाहू छत्रपति के विचारों की इसी व्यापक विषयवस्तु के कारण वे मनुष्य को अपने कार्य का केन्द्र मानते थे। डॉ.भास्कर भोले जी कहते है "पृथक जाति का अस्तित्व में होना यह अपने सभी तरह की उन्नति के आड़े आने के कारन जातिनिर्मुलन यही अपने देशामुक्ति की पूर्व शर्त है। ऐसी तटस्थ भूमिका होने के कारण जातिनिर्मुलन के हर एक प्रयास को शाहू छत्रपति जी ने अपना सहयोग दिया था । बड़ी तादात में अंतरजातीय विवाह संपन्न कराना यही जातिनिर्मुलन का प्रभावी राह है ऐसा उन्हें लगता था।[6] एक राजा के रूप में समाज के सभी वर्गों को समान न्याय देना और सभी की रक्षा करना उनकी नैतिक जिम्मेदारी थी। यदि एक वर्ग बौद्धिक एवं भौतिक रूप से उन्नत हो और शेष पूर्णतया पतित अवस्था में रहे तो राज्य का संतुलन बिगड़ जाता है। शाहू महाराज ने उदारवादी सिद्धांत को आत्मसात किया कि प्रत्येक व्यक्ति को प्रत्येक व्यवसाय में राज्य को संतुलित करने का पूर्ण अधिकार है। इसका नतीजा न सिर्फ उनके संस्थान में बल्कि पूरे महाराष्ट्र में देखने को मिला. महाराज इतने क्रांतिकारी थे कि उनकी दृष्टि सबसे पहले वंचितों और पीड़ितों के कल्याण पर केंद्रित थी। उन्होंने समाज का सूक्ष्म अवलोकन किया था। उसने कई रंग-बिरंगे लोगों को देखा था। योग्यता में रुचि रखने वाले महाराज ने अपनी विशेषज्ञता से अपने राज्य में कवि, लेखक, गायक, चित्रकार, नट, शिकारी, कुशल किसान, विद्वान शिक्षक पैदा किए और सभी के सहयोग से कोल्हापुर राज्य को कला का घर बनाया और संस्कृति। जिन लोगों के वह करीब आया वे अलग-अलग जाति और धर्म के थे। महाराज मानवता एवं सद्गुण के पुजारी थे। उसकी शोभा में कोई अन्तर न आया। किसी के गले की आवाज की सुंदरता, किसी के बालों की सुंदरता, किसी के अच्छे से कमाए गए शरीर की ताकत और सुंदरता, किसी की बुद्धि और किसी के प्रति वफादारी खो जाएगी। वे उनके पास यह सोचकर आते थे कि यह आदमी हमारे राज्य की प्रतिष्ठा बढ़ा रहा है, यह हमारा है। कोल्हापुर की धरती पर कलाकारों की संतानों की परंपरा शाहू राजाओं के समय से ही फली-फूली और आज भी जारी है। ये सभी बातें उनके सभ्य, मानवीय रुख पर स्पष्ट प्रकाश डालती हैं।

'क्रांतिकारी' शब्द का प्रयोग हाल ही में शिथिल रूप से किया गया है। शाहू महाराज के कार्यो का अध्ययन करते समय इस शब्द का सही प्रयोग किया जा सकता है। प्रा. नानासाहब सालुखे इस बारे में कहते है," निर्बल की रक्षा कारन यही बल शाली की सच्ची पहचान एवं सफलता भी है,राजर्षि निरंतर कार्य करते रहें हैं, बड़े कार्य ताकत के बल पर नहीं बल्कि सहनशीलता के बल पर किए जाते है, वे निरंतर अपना कार्य करते रहें हैं, इसीकारण वे साजक्रान्ति कर पाए हैं।"[7] वैसे देखा जाएं तो समाज सुधारकों और क्रांतिकारियों के बीच एक महत्वपूर्ण अंतर है। 'क्रांतिकारी' शब्द उस विचारशील व्यक्ति को दिया जा सकता है जो पिछली धारणाओं, विचारों, व्यवहार को तोड़कर उनके स्थान पर आधुनिक युग और तर्कसंगत सोच के अनुकूल मूल्यों को लाने के लिए कृतसंकल्प है। समाजवाद प्रायः स्थितिजन्य होता है। क्रांतिकारी दृष्टिकोण जड़ जमा चुकी यथास्थिति को उखाड़ फेंकना चाहता है। एक क्रांतिकारी के लिए पुराने तौर-तरीकों को उखाड़ फेंकने की सदियों पुरानी प्रवृत्ति से संघर्ष करना अपरिहार्य है। शाहू राजा के जीवन में संघर्ष के अनेक उदाहरण हैं। केवल सृजन संभव है ! जिस प्रकार कला का एक महान कार्य परिस्थितियों के प्रभाव से उत्पन्न होता है, उसी प्रकार महाराष्ट्र की भूमि ने शिवाजी महाराज के समय से ही शाहू महाराज को उत्पन्न करने का सपना देखा था ऐसा कहना सही होगा।

इसलिए यह कहना गलत होगा कि केवल परिस्थितियों और समय ने ही शाहू महाराज को आकार दिया। कुछ गुण सोने के होते हैं और कुछ गुण सुनार के। एक बीज में अंकुरित होने और बढ़ने की सहज इच्छा होती है। हालाँकि कुछ प्रतिकूल कारक भी होते हैं, लेकिन यह बीज उनसे लड़कर ही विकसित होता है। महाराज के समग्र जीवन पर नजर डालें तो पता चलता है कि उनका गतिशील व्यक्तित्व सदैव विकास की दिशा में आकार ले रहा था, परिवर्तनशील था। शाहू महाराज के विद्रोह का निश्चित ही एक रचनात्मक अर्थ है। उनके विद्रोह के पीछे एक रचनात्मक सोच है। किसी नये समाज के क्रांतिकारी सपने की तरह शाहू छत्रपति ने भी एक नये समाज के निर्माण का सपना देखा था। इसे पूरा करना बहुत मुश्किल काम था। ब्रिटिश शासकों को लोकलुभावन राष्ट्रप्रमुख पसंद नहीं थे। इसलिए, शाहू महाराज को सभी प्रगतिशील आंदोलनों के निर्माण में कई बाधाओं को साहस और कूटनीति से पार करना पड़ा। छत्रपति ने प्रतिक्रियावादी ताकतों, ब्रिटिश शासन के खिलाफ खड़े होकर समाज का चेहरा बदलने का ऐतिहासिक प्रयास किया। इन प्रयासों को दर्ज किये बिना महाराष्ट्र का सामाजिक इतिहास नहीं लिखा जा सकता। क्योंकि शाहू महाराज का कार्य इस इतिहास का एक उज्ज्वल अध्याय है।

1. संपा. डॉ. जयसिंगराव पावर, राजर्षि शाहू स्मारक ग्रन्थ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापुर प्रथम आवृत्ति,जनवरी 2001, पृष्ठ – 381

2. संपा. डॉ. जयसिंगराव पावर, राजर्षि शाहू स्मारक ग्रन्थ, प्रा. मीना कुलकर्णी कोल्हापुर की वरदायिनी : राधानगरी धरण-योजना ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापुर प्रथम आवृत्ति,जनवरी 2001, पृष्ठ - 693
3. इन्द्रजीत सावंत, शोध शाहू छात्रपतिंच्या छायाचित्रांचा, पृष्ठ – 09
4. महात्मा गांधी – सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रन्थ, राजर्षि शाहू छत्रपती : जीवन व कार्य, डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कव्हर पेज
5. डॉ. रमेश जाधव, लोकाराजा शाहू छत्रपति, गुलाबराव मारुतिराव कारले, सुरेश एजंसी, पुणे, प्रथम आवृत्ति, पृष्ट. 27
6. संपा. डॉ. जयसिंगराव पावर, राजर्षि शाहू स्मारक ग्रन्थ, डॉ. लक्ष्मण भोले, शाहू छत्रपति : परंपरा आणि आधुनिकता , महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापुर प्रथम आवृत्ति,जनवरी 2001, पृष्ठ – 408
7. प्रो. नानासाहेब सालुखे, शाहुंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन , पृष्ठ. भूमिका से 03

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**81**

# राजर्षी शाहू महाराज यांचे कृषीविषयक धोरण

**डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार**
इतिहास विभागप्रमुख
विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा, सांगली

---

**प्रस्तावना:-** राजर्षी शाहू महाराज हे थोर समाजसुधारक होते. शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व त्यांचे 'शाहू' हे नाव ठेवले. धारवाड येथे शाहू महाराजांचे शिक्षण झाले. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांची मुलगी लक्ष्मीबाई बरोबर त्यांचा विवाह झाला. यावेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाई यांचे वय १२ वर्षाचे होते. एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.शाहू महाराजांनी रयतेच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात कार्य केले. विविध क्षेत्रात योगदान दिले. शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. अस्पृश्यता, जातिभेद नष्ट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या एकूणच सामाजिक उन्नतीसाठी शाहू राजांनी प्रयत्न केले. याचबरोबर राजर्षी शाहू महाराज यांचे शेती सुधारणा विषयक कार्यही महत्वपूर्ण आहे. शाहू महाराजांनी राज्य कारभार स्विकारल्यानंतर सर्वप्रथम शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले त्यांच्या समस्या, अडीअडचणी समजावून घेतल्या शेतकऱ्यांचे दुःख व दारिद्रय स्वतः जवळून पाहिले. शेतीच्या दुरावस्थेमुळे शेतकऱ्यांचे दारीद्रय वाढते, तसेच शेतीची उत्पादकता कमी असल्यामुळे उत्पन्न कमी होते हे त्यांनी जाणले. शेतकऱ्यांना या परिस्थितीतुन बाहेर काढण्यासाठी त्यांनी शेती सुधारणेकडे लक्ष दिले त्याचा आढावा खालील प्रमाणे-

**सार्वजनिक पाटबंधारे खात्याची निर्मिती :** शाहू महाराजांनी सतत पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाय योजना राबविली. याकरिता आराखडा आखून अतिशय नियोजनबध्द पध्दतीने कार्य सुरू केले. शेतकऱ्यांना एकत्रीत करून मार्गदर्शन शिबीराच्या माध्यमातुन योग्य मार्गदर्शन केले. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन 1902 मध्ये ''सार्वजनिक पाटबंधारे धोरण'' जाहीर केले. या धोरणाच्या यशस्वी अमलंबजावणीसाठी स्वतंत्र ''पाटबंधारे खाते'' निर्माण करून या खात्याअंतर्गत नविन बंधारे बाधणे, जुन्या बंधाऱ्यांची नोंद घेणे, नविन धरणे बांधण्यासाठी आर्थिक तरतूद करून जुन्या धरणाच्या देखभालीसाठी प्रयत्न करणे, विहीर खोलीकरण व दुरूस्ती करणे, त्यांची देखभाल करणे इ. कामे त्वरेने हाती घेण्याचे महत्वपूर्ण काम केले. पावसाचे पाणी अडवून व शेतीत मुरवून त्याचा शेतीसाठी उपयोग करण्यावर भर दिला.

**राधानगरी धरण बांधले :-** सततच्या दुष्काळावर मात करण्यासाठी कोल्हापूर परिसरात मोठा प्रकल्प हाती घेणे गरजेचे आहे हे शाहू महाराज यांच्या लक्षात आले. याकरिता त्यांनी सर्वे केला व भोगावती नदीवर ''राधानगरी'' या धरणाच्या बांधकामास दिनांक 18 फेब्रुवारी 1907 रोजी प्रारंभ केला. या धरणाच्या बांधकामास सर्वस्तरातून निधी गोळा करण्यास प्रयत्न केला. त्यांच्या स्वप्नातील हे धरण त्यांच्या हयातीत पुर्ण होऊ शकले नाही. पुढे त्यांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी या धरणाचे अर्धवट राहीलेले काम पुर्ण करून प्रकल्प पूर्ण केला. हा प्रकल्प 1935 मध्ये पूर्ण झाला. राधानगरी धरणामुळे कोल्हापूर पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनले. मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनी शाहू महाराजांना पत्र पाठवून राधानगरी धरणाच्या बांधकामाविषयी काही सूचना व गौरव उदगार काढल्याचे दिसून येते. राधानगरी धरणाच्या बांधकामासाठी शाहू महाराजांनी आपली सर्व शक्ती व सर्व आयुष्य खर्च करण्याबाबतचा निश्चय केला होता आणि अशा पद्धतीचे पत्र त्यांनी मुंबई राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमुखास लिहिल्याचे आढळते. राधानगरी धरणाचे पाणी कोकणात नेऊन जलविद्युत निर्माण करण्याची महत्त्वाची योजनाही शाहू महाराजांची होती मात्र ती सत्यात उत्तरली नाही. या प्रकल्पावरून महाराजांची दूरदृष्टी लक्षात येते. आजही कोल्हापूर परिसराला या धरणाचा उपयोग होतांना दिसून येतो.

**सामुहिक सिंचन धोरण :-**राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी शाश्वत उपाययोजना केल्या. 1902 च्या दुष्काळात त्यांनी शेतकरी समाजाचे कष्ट ओळखले आणि शेतीतील समस्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्याच वर्षी

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

त्यांनी “सामुहिक सिंचन धोरण” आणले. या धोरणासाठी त्यांनी पाटबंधारे अधिकारी नेमले. त्या अधिकाऱ्यानी त्यांच्या प्रांतातील प्रत्येक गावाची तपासणी केली आणि दुष्काळी स्थितीच्या तीव्रतेनुसार गावांसाठी सिंचन निधीची व्यवस्था केली.

**किंग एडवर्ड कृषी संस्थेची स्थापना :-** राजर्षी शाहू महाराज यांनी शेतकऱ्यांना त्यांचे पीक उत्पादन आणि विविध शेती पद्धती करिता आधुनिक तंत्रे शिकण्यासाठी 1912 मध्ये कोल्हापूर येथे ‘किंग एडवर्ड कृषी संस्थेची’ स्थापना केली. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना बि-बियाणे, रासायनिक खते, सुधारित यंत्रे याबद्दलची माहिती देण्यात येत असे. त्याकरिता खास तज्ञ कृषी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. तसेच शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी व उत्पादन वाढीसाठी तांत्रिक उपकरणे खरेदी करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले.

**शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिलची स्थापना :-** शाहू महाराजांनी असंख्य प्रकल्प निर्माण केले. त्याचाच एक भाग म्हणजे ‘शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिलची’ स्थापना होय. या मिलच्या स्थापनेमुळे शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळू लागला.

**सहकारी संस्थांची स्थापना:-** शाहू महाराजांनी बाजारपेठ आणि व्यापारातील मध्यस्थांचा सहभाग दूर करण्यासाठी शेतकऱ्यांसाठी विविध सहकारी संस्थाची स्थापना केली. यामुळे शेतकऱ्यांच्या मालाची विक्री मोठ्या प्रमाणात होऊ लागली व शेतकऱ्यांचा फायदा झाला.

**वनाची निर्मिती : -**शेतकऱ्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी या दृष्टिने शाहू महाराज यांनी वनविषयक कायद्यात बदल केला. रस्त्याच्या दोन्ही बाजूस असणारी झाडे अथवा फांद्या तोंडण्यास त्यांनी बंदी केली व त्या संदर्भात ०५ जून १९०० रोजी कायदा केला होता. स्वतः लक्ष घालुन इमारती लाकुड तसेच वनौषध वनस्पतीची लागवड करण्यासाठी आवाहन शेतकऱ्यांना तसेच प्रजाजन यांना केले होते. शेतकऱ्यांनी साग, हिरडा, बेहाडा, आंबा, फणस, काजू याची लागवड केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊ शकते यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केले. दि. ०६ ऑक्टोबर रोजी त्यांनी आपल्या संस्थानात चहा, कॉपीबरोबर मसाल्याच्या पदार्थांची लागवड करण्यासंदर्भात सूचना केल्या होत्या. पन्हाळयाच्या तबक बागेत वेलदोडा लागवड करण्यासंदर्भात त्यानी आदेश दिला होता.

**शेती सुधारणा पुस्तकाचे वाटप:** बारामतीचे महादेव देवधर यांनी शेती सुधारणा नावाचे पुस्तक लिहिले होते. शाहू महाराजांच्याकडे हे पुस्तक घेऊन देवधर आले. महाराजांनी ते पुस्तक पाहिले व त्याचा अभ्यास संस्थानातील शाळांनी करावा, तसेच या पुस्तकाचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा म्हणून या पुस्तकाच्या शंभर प्रती घेण्यासंदर्भाचा आदेश 20 जून 1913 रोजी केला होता.

**शेती अवजारांचे प्रदर्शन व संग्रहालयाची निर्मिती:**शेती संदर्भातील नवनवीन अद्यावत अवजारांचे शेतकऱ्यांना ज्ञान मिळावे, त्याची माहिती व्हावी याकरता महाराजांनी शेती अवजारांचे प्रदर्शने भरवली. शेतकऱ्याना विविध बाबींची अद्ययावत माहिती देउन खऱ्या अर्थाने प्रगतशिल बनविले. तसेच शेती उपकरणांचे अद्ययावत संग्रहालय निर्मिती सुध्दा केली.

**शेतकाऱ्याना कर्ज पुरवठा :**

शेतीसाठी शेतकरी सावकाराकडून कर्ज घेत असे. सावकार शेतकऱ्यांना कर्ज देत असतात कर्जावर मोठ्या प्रमाणात व्याजदर आकारत व त्यांची पिळवणूक करत असत. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार शेतकऱ्यांना लुबाडतात यावर उपाययोजना करण्यासाठी महाराजांनी सन 1895 मध्ये कर्जबाजारी शेतकऱ्यांना दरबारामार्फत कर्जपुरवठा करण्यास प्रारंभ केला. व्हिक्टोरिया राणीच्या स्मरणार्थ एक निधी स्थापन करून त्यातून सावकारांनी शेतकऱ्यांच्या जप्त केलेल्या जमिनी सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना भरघोस आर्थिक पुरवठा केला. मुलकी ठराव क्रमांक 720 नुसार 12 मार्च 1918 रोजी सावकारांच्या मनमानी कारभाराविरोधात वटहुकूम काढला व सावकाराच्या संदर्भात कडक नियम केले होते.

**नगदी पिकांची लागवड :**नगदी पिकाकडे शेतकऱ्यांनी वळले पाहिजे असे शाहू महाराजांचे मत होते. याचाच एक भाग म्हणून त्यांनी पन्हाळा येथे चहा, कॉफी, रबर यांचे खास मळे तयार केले. बेळगावी बटाटे, कापूस, ताग, रेशीम या सारखी पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत केले. पन्हाळा येथे त्यांनी केलेला चहा उत्पादनाचा प्रयोग मोठया प्रमाणावर यशस्वी झाला. ‘‘पन्हाळा चहा’’ या नावाने हा चहा प्रसिध्द होता. शाहू महाराज यांनी पॉलिटिकल एजंट फेरीश यांना पन्हाळ्याच्या चहाच्या मळयात तयार झालेला चहा भेट म्हणून पाठविला. हा चहा त्यांना फारच आवडला. त्यानंतर चहा लागवड मोठ्या प्रमाणात करण्यासंदर्भात त्यांनी सूचना केल्या होत्या. महाराजाच्या मृत्युनंतर हा प्रयोग बंद पडला.

एकूणच शाहू महाराजांचे शेती विषयक कार्य लक्षात घेतले तर असे दिसून येते की, शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन निघावे व शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. कोल्हापूर परिसरात त्यांनी शेती विकास करण्यासाठी निर्धारपूर्वक व योजनाबध्द पध्दतीने कार्य करून या परिसरात खऱ्या अर्थाने हरितक्रांती विकसीत केली.

**संदर्भग्रंथ सूची :-**

1. पवार जयसिंगराव (संपा.) राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१
2. पवार जयसिंगराव, राजश्री शाहू छत्रपती जीवन व कार्य, ताराराणी बुक सर्विस, कोल्हापूर, २०१४
3. पवार जयसिंगराव, राजश्री शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१८
4. पवार जयसिंगराव पवार मंजुश्री, राजश्री शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१९
5. भोसले एस. एस. (संपा.), क्रांतीसुक्ते राजश्री छत्रपती शाहू, तृतीय आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६ .
6. तोफखाने वा. द., राजश्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९६३
7. नाईक तु. ब., छत्रपती राजश्री शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७४
8. खणे बी. डी., राजश्री शाहू छत्रपती ऑफ कोल्हापूर, कोल्हापूर, २०२१
9. जाधव रमेश, राजश्री शाहू छत्रपती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २०१३
10. लोकराज्य मासिक, जून-२०२४

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

82

# वसतिगृह चळवळीचे प्रणेते: राजर्षी छत्रपती शाहू महाराज

**प्रा. गौरव काटकर** **प्रा. ऐश्वर्या हिंगमिरे** **प्रा. प्रतिमा शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

पार्श्वभूमी - राजर्षी शाहू महाराज कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती तसेच एक थोर भारतीय समाज सुधारक होते. ब्रिटिश काळामध्ये बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी शाहू महाराजांनी अनेक प्रयत्न केले. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलितांच्या आणि मागासवर्गीयांच्या उत्कर्षासाठी दिले. त्या काळात अस्पृश्यता, असमानता आणि ब्राह्मणवादी व्यवस्था होती. सामान्य जनतेच्या विकासासाठी या गोष्टी घातक आहेत, हे शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यांनी बहुजन समाजाला या रूढी, परंपरेतून आणि समाजव्यवस्थेतून बाहेर काढण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले. 1919 साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरण्याची पद्धत बंद केली. खेड्यापाड्यातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आभाळ होऊ नये यासाठी त्यांच्या राहण्या जेवण्याची व्यवस्था असणारी वस्तीगृहे स्थापन करून संस्थानातील शिक्षण व्यवस्थेला परिपूर्णत्व देण्याची पराकाष्टेचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला.

उद्दिष्ट्ये :

१. शाहू महाराज यांचे वसतिगृह स्थापनेमागचा विचार जाणून घेणे.
२. शाहू महाराज यांनी स्थापन केलेल्या वासतिगृहांची थोडक्यात माहिती करून घेणे.

**वसतिगृह चळवळीमागील कारण:** सन 1896 मध्ये राजाराम कॉलेजमध्ये उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शाहू महाराजांनी कॉलेजला जोडून एक वस्तीगृह स्थापन केले होते. मात्र 1899 साली संस्थानातील वडगाव इथले चिमणाजी पाटील यांचा मुलगा पांडुरंग हा मॅट्रिक पास झाल्याचे महाराजांना समजले. त्यांनी पांडुरंगला बोलाऊन त्याची आस्थेने चौकशी केली. तेव्हा शिक्षण घेत असताना शहरातील वसतिगृह व खानावळीवरील ब्राह्मण वर्चस्वाची त्यांना जाणीव झाली.

**वसतिगृहांची आवश्यकता:** मागसवर्गीय लोकांमध्ये उच्च शिक्षणाची ओढ निर्माण व्हावी यासाठी शाहू महाराज यांनी खूप प्रयत्न केले. त्यावेळीस त्यांच्या लक्षात आले की खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांचा राहण्याचा खूप मोठा प्रश्न निर्माण होत आहे. तसे पाहील्यास १८९६ मध्ये कोल्हापुरात उच्च शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यासाठी दरबारच्या खर्चाने एक वसतिगृह स्थापन केले होते. व त्याचे अध्यक्ष असि. जज्ज व्ही. बी. गोखले हे होते. वसतिगृहाची सर्व व्यवस्था ब्राह्मण मंडळीकडेच असल्याने एकाही ब्राह्मणेतर मुलास तेथे प्रवेश दिला जात नव्हता. ब्राह्मणेतर मुलास शिक्षणाचा अधिकार नाही अशी त्यांची मनोभूमिका होती. त्यामुळे इतर समजतील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत होते. समाजातील सर्व जाती धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे व कोणत्याही जातीचा विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे निर्माण करण्याची कल्पना शाहू महाराज यांनी मांडली व ती सत्यातही उतरवली. मराठा ,जैन, लिंगायत, मुस्लिम, अस्पृश्य, सोनार, शिंपी, पांचाळ, गोंड सारस्वत, इंडियन ख्रिश्चन, वैश्य, ढोर, चांभार, सोनार, नाभिक, सोमवंशी आर्य क्षत्रिय, कोष्टी अशा विविध जाती धर्माचे वीसपेक्षा जास्त वसतिगृहे शाहू महाराज यांनी निर्माण केली.

1. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग: व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना18 एप्रिल 1901 रोजी मामासाहेब खानविलकर, आप्पासाहेब म्हैसाळकर, भास्करराव जाधव, दाजीराव विचारे, शिवाजीराव सावंत इ. प्रमुख मराठा व्यक्तींच्या सहकार्याने शाहू महाराजांनी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना' केली. पी.सी.पाटील हे या वस्तीगृहाचे पहिले विद्यार्थी ठरले. वस्तीगृहाच्या नावात मराठा असले तरी तिथे सर्व जातीधर्माचा विद्यार्थ्यांना प्रवेशाचे धोरण होते.
2. दिगंबर जैन बोर्डिंग: दिगंबर जैन बोर्डिंग इमारतीचा पाया १९०४ साली शाहू महाराजांच्या हस्ते बसविण्यात आला व १९०५ साली त्यांच्याच हस्ते इमारतीचा उद्घाटन समारंभ साजरा करण्यात आला. यासाठी शाहू महाराज यांनी दसरा चौकातील जमीन व दर वर्षी ३५० रुपयांची ग्रँड दिली.
3. वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह : हे वसतिगृह १९०६ साली स्थापन झाले. लिंगायत समाजातील पुढाऱ्यांनी वसतिगृहासाठी रंकाळा तलावाच्या पश्चिमेस असलेला घोलकर बंगला खरेदी केला. महाराजांनी यासाठी २५० रुपयांची ग्रँट सुरू केली.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

4. मुस्लिम बोर्डिंग: मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र बोर्डिंग काढण्याचे प्रयत्न शाहू महाराजांचे १९०२ सालापासून होते. शेवटी शाहू महाराजांच्या प्रेरणेने १५ नोव्हेंबर १९०६ रोजी दि मोहामेडन एज्यपकेशन सोसायटी मार्फत मुस्लिम बोर्डिंग काढण्याचे ठरलिले. महाराजांनी दसरा चौकातील २५,००० चौ. फूट जागा दिली.

5. मिस क्लार्क होस्टेल: मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांची कन्या मिस् व्हायोलेट क्लार्क अस्पृशता निवारणासाठी अंत:करणपूर्वक प्रयत्न करीत होत्या. त्यांनी होस्टेलच्या मदतीसाठी एक नृत्याचा प्रयोग करुन त्याचे आलेले ५००० रुपयांचे उत्पन्न होस्टेलला दिले. या कुमारिकेची ही तळमळ पाहून महाराजांनी तिचे नाव होस्टेलला दिले.

6. इंडियन ख्रिश्चन होस्टेल: हे वसतिगृह शाहू महाराजांनी ७ जून १९१५ रोजी शाहूपुरीत सुरू केले.

7. आर्यसमाज गुरुकुल: शाहू महाराजांच्या प्रेरणेने १८ मार्च १९१८ रोजी आर्य समाजाची शाखा स्थापन झाली. आर्य समाज गुरुकुल मोफत प्राथमिक व माध्यमिक शाळा काढण्यात आल्या. १५० एकर जमीन व ६०००० रुपये मदत म्हणून दिले.

8. वैश्य बोर्डिंग : वैश्य बोर्डिंगची स्थापना १९१८ मध्ये झाली.

9. शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह: वैदिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाहू महाराजांनी ६ जुलै १९२० रोजी जुन्या राजवाड्यावर शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह वसतिगृह सुरू केले.

10. श्रीनामदेव बोर्डिंग: शुक्रवार पेठ येथे हे वसतिगृह १९११ मध्ये निर्माण केले व त्यासाठी ५० रुपये ग्रँट दिली.

11. पांचाळ ब्राह्मण वसतिगृह: पाच हजार रुपये सरकारच्या तिजोरीत ठेवून ८% व्याज ठेवीवर देण्याची व्यवस्था करून १९१२ मध्ये हे वसतिगृह निर्माण केले.

12. श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह: हे वसतिगृह शाहू महाराजांनी ७ जून १९१५ रोजी शाहूपुरीत सुरू केले.

13. रावबहाद्दूर सबनीस प्रभू बोर्डिंग: इमारतीच्या जागेसह ६०००/- रुपये मदत करून दरवर्षी ५० रुपयांची ग्रँट सुरू केली.

14. ढोर-चांभार बोर्डिंग: अस्पृश्य जातींसाठी १९१९ मध्ये शाहू महाराज यांनी १००० रुपये देवून हे वसतिगृह सुरू केले. व २५० रुपयांची ग्रँट दिली.

15. सुतार बोर्डिंग: १९२१ मध्ये स्थापन केलेल्या या वसतिगृहात गुजरात-कर्नाटक येथून विद्यार्थी येत होते.

16. सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग: १९२० मध्ये हे वसतिगृह निर्माण केले व या वासतिगृहसाठी जागा उपलब्ध करून दिली.

17. नाभीक विद्यार्थी वसतिगृह: या वासतिगृहसाठी १५० रुपये ग्रँट दिली.

18. श्रीदेवांग बोर्डिंग: या वासतिगृहसाठी गंगावेश येथे जागा दिली.

19. दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग:१९१६ मध्ये सोनार समाजातील विद्यार्थ्यासाठी हे वसतिगृह तयार केले.

अशी विद्यार्थी वसतिगृहे शाहू महाराजांनी स्थापन केली.प्रत्येक वसतिगृह इमारती,खुल्याजागा, कायमस्वरूपी उत्पन्नाची साधने उपलब्ध करून गरीब विद्यार्थ्यांना योगक्षेमाची सुख व्यवस्था केली गेली.

**वसतिगृहांना आर्थिक मदत:**

1909 साली भास्करराव जाधव व त्यांच्या सहकार्याने स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वसतिगृहाच्या इमारतीसाठी छत्रपती शाहू महाराजांनी जागा उपलब्ध करून दिली. राजर्षी शाहू महाराजांनी केवळ आपल्या संस्थानातीलच अस्पृश्यांची काळजी वाहिली; असे नाही तर संस्थानाबाहेरील अनेक अस्पृश्य विद्यार्थी व वसतिगृहास सढळहस्ते अर्थसाह्य केले.

**वसतिगृहे स्थापनेची चळवळीचे निष्कर्ष:**

तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये जातवास्तव भयान स्वरूपाचे होते. जातीची उतरंड मनी मानसी खोलवर रुजलेली होती. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी जातवार वसतिगृहे स्थापन करण्याचा निर्णय तत्कालीन सामाजिक परिस्थिती ध्यानी धरून घेतला होता. काहीही करून सर्व ब्राम्हणेतर तर समाजातील मुले शिकायला हवीत. हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून त्यांनी वसतिगृहे स्थापन केली. काहीही करून सर्व समाजातील मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजेत, हीच भावना त्यामागे होती. एकदा ती शिकली, त्यांच्या मनातील ही जात-धर्म, भेदाभेदाची भावना आपोआप नष्ट होईल, याची त्यांना खात्री होती. याचे प्रत्यंतर पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या उदाहरणातून येते. शाहू महाराजांच्या प्रेरणेतून आणि संस्थानातील वसतिगृहात राहून शिक्षण घेतलेल्या भाऊरावांनी पुढे आपल्या रयत शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. त्या संस्थेच्या वसतिगृहात मात्र सर्व जाती-धर्माच्या मुलांना एकत्र निवास व भोजन केले पाहिजे, असा दंडक घातला आणि शाहू महाराजांना अभिप्रेत असलेल्या समताधिष्ठित शिक्षणाचा प्रारंभ ब्राह्मणेतर समाजात

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

मोठ्या प्रमाणावर झाला. याला राजर्षी शाहू महाराजांनी उभारलेली वसतिगृहांची चळवळ मोठ्या प्रमाणात कारणीभूत होती. असे दिसून येते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे एक अत्यंत द्रेष्टे राजे होते. कोल्हापूर सारख्या अन्य संस्थानांच्या तुलनेत छोट्या असणाऱ्या संस्थानाला केवळ राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यामुळे देश पातळीवर लौकिक प्राप्त झाला. रयतेच्या कल्याणाचा हिताचा विचार करणारे आणि त्यासाठी विविध योजना आखून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी झटणारे लोककल्याणकारी राजे म्हणजे राजर्ष छत्रपती शाहू महाराज होत. राजश्री शाहू महाराजांचे कार्य आपणा सर्वांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक असेच आहे, अशा प्रकारे कोल्हापूर संस्थानात शिक्षण, सामाजिक प्रबोधन, सर्वसामान्य माणसाचा विचार करणारा राजा, पुरोगामी राजर्षी शाहू महाराजांचे भारताच्या इतिहासामध्ये खूप मोठे स्थान आहे.

**संदर्भ :**

1. डॉ. अरुण भोसले, "राजर्षी शाहूंकडून शिक्षण, वसतिगृह चळवळीला बळ", पुढारी वर्तमान पत्र, २३ जून २०२२.
2. पी. पी. शेजुळ, "राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचाराची प्रासंगीकता", "Cosmos Multidisiplinry Research E-Journal, ISSN No. 2456-1665,valume III- Issue II, April- May-June 2018,pp 15-18
3. डॉ. वैशाली विठ्ठल खेडकर, "राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य", "देश आणि विदेशातील विविध पुरुष कर्तुत्वाचे योगदान", पान नं. १९-२२.
4. आनंद मेणसे, "शाहू महाराज-शैक्षणिक कार्य!", थिंक महाराष्ट्र, १२ जुलै २०२४.
5. "राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य", vikaspedia

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

83

# राजर्षि शाहू महाराज का सामाजिक योगदान

**प्रा. डॉ. सारिका राजाराम कांबळे**
श्री. शहाजी छत्रपति महाविद्यालय, कोल्हापुर

**शोध आलेख का सारांश :-** राजर्षि शाहू महाराज एक समाज सुधारक और दूरदर्शी व्यक्ति थे जो अपने लोगों के विकास और सामाजिक रूप से वंचित वर्गों की बेहतरी के लिए प्रेरित थे | वे समाज के सभी सदस्यों के बीच समानता लाने की कोशिश में थे | अपने शासनकाल उन्होंने समानता को बढ़ावा देने के लिए जाति भेदभाव व्यवस्था में कई क्रांतिकारी योजनाएं शुरू कर सामाजिक परिवर्तन किए | शाहु महाराज का सभी क्षेत्रों का कार्य काफी महत्त्वपूर्ण है| सामाजिक सुधार के साथ-साथ उन्होंने अन्य कई क्षेत्रों में बेजोड़ कार्य किया है |

**बीज शब्द :-**शिक्षा व्यवस्था ,अस्पृश्य निवारण , सामाजिक सुधार, रियासत, शासनकाल

**प्रस्तावना :-**महाराष्ट्र के कोल्हापुर जिले में अंग्रेजों के शासनकाल में कोल्हापुर रियासत के रूप में उसकी एक पहचान बन गई थी | राजर्षि शाहू महाराज ने अपने महान एवं सर्जनशील विचारों के माध्यम से अपना नाम इतिहास के सुनहरे पन्ने पर अजरामर कर दिया है | उन्होंने अपने शासनकाल में जो सामाजिक बदलाव किए वह विशेष सराहनीय है | आज भी हम उनके कार्यों को देखते है तो तत्कालीन परिस्थिति में कम सुविधाओं के होने के बावजूद भी उन्होंने अपनी रियासत में काफी बदलाव किए | साथ ही वास्तु का निर्माण किया जिसको हम ऐतिहासिक धरोहर के रूप में देखते है | ऐसे लोकराजा राजर्षि शाहू महाराज ने किए कार्यो को विस्तार से देखना जरुरी है |राजर्षि शाहू महाराज का जन्म 26 जून, 1874 में कागल नामक गाँव में हुआ | पिता का नाम महाराजा जयसिंग (दूसरे) और माता महारानी ताराबाई है | सन 1895 में सत्ता में आए और 1922 में उनकी मृत्यु होने तक कोल्हापुर रियासत में शासन किया | शाहू महाराज ने कई क्षेत्रों में सुधार किए उनके कार्य का विस्तार निम्नलिखित रूप में देखा जा सकता है |

**सामाजिक सुधार :-** राजर्षि शाहु महाराज ने अपने रियासत में जातिव्यवस्था, शिक्षा क्षेत्र, कृषि व्यवस्था, जल व्यवस्था आदि विभिन्न क्षेत्रों में महत्त्वपूर्ण कार्य किया है |

**शिक्षा क्षेत्र :-** शाहु महाराज ने शिक्षा क्षेत्र में जो योगदान दिया है वह काफी सराहनीय है | उन्होंने सभी वर्ग के लोगों को शिक्षा देने का प्रयास किया | राजर्षि शाहू महाराज शिक्षा के महत्त्व की व्याख्या करते हुए अपने भाषण में कहते है-"मेरा निश्चित मत है कि शिक्षा ही हमारे पार उतरने का साधन है | इतिहास बताता है कि शिक्षा के बिना किसी भी देश की उन्नति नहीं हो सकती है | अज्ञान में डूबे हुए देश में उत्तम राजनीतिज्ञ तथा लडके शूरवीर कदापि उत्पन्न नहीं हो सकते |"[1] प्रस्तुत उद्धरण से महाराज की शिक्षा के प्रति होने वाली आस्था दिखाई देती है | शाहू महाराज को पता चला की 'सरूड-सांगाव' नामक गाँव के पाटील का पुत्र पांडुरंग चिमाजी पाटील मट्रिक पास हुआ है तो यह जानकर महाराज काफी खुश हुई | उन्होंने तुरंत ही घुड़सवार भेजकर उसे मिलने के लिए आमंत्रित किया | पांडुरंग चिमाजी पाटील ने बहुजन समाज के सामने एक आदर्श रख दिया | उन्होंने उससे मट्रिक की पढाई के दौरान आई दिक्कतों के बारे में पूछताछ की | पूछताछ करने पर यह ज्ञात हुआ कि वह जिस भोजनालय में खाना खाने जाता था वह भोजनालय ब्राह्मण परिवार का था इसके बारे में विस्तार से जानने के बाद यह ज्ञात हुआ कि वह भोजनालय अच्छा ही था परंतु मराठों को पत्तों से बनी थाली में भोजन परोसा जाता था इतना ही नहीं तो खाना खाने के बाद उन्हीं को वह थाली उठानी पड़ती थी और उस पर गोबर फैलाकर उस जगह को साफ़ करना पड़ता था | यह सुनकर महाराजा को गुस्सा आया फिर भी अधिक जानने हेतु उन्होंने पांडुरंग से पूछताछ जारी रखी | मट्रिक की पढाई पूरी होने के बाद आगे की पढाई के बारे में उसकी मंशा जानने की कोशिश की | पांडुरंग ने बिना डरे घर के हालात का जिक्र किया और आगे खेती करने के बारे में बताया | पांडुरंग से आप बीती सुनकर महाराज के मन में अपने रियासत के बच्चों को आगे की पढाई करना कितना कठिन कार्य है इस बात का एहसास हुआ | बच्चे मेधावी तथा पढाई में आगे बढने की चाहत होने के बावजूद भी शिक्षा से वंचित है यह जानकर उनके लिए रहने और खाने का प्रबंध होना जरुरी है यह उनके ध्यान में आया और इस दृष्टि से उन्होंने अपने कदम बढ़ाने की शुरुआत की | राजाराम महाविद्यालय में पांडुरंग पाटील, सातारा के पी.के.शिंदे एस.डी.जाधव तासगाव के आर.आर. पवार आदि ने दाखिला लिया है यह समझते ही महाराज को बेहद ख़ुशी हुई | इसी दौरान कोल्हापुर में प्लेग की बीमारी फ़ैल चुकी थी | ऐसी स्थिति में इन चार छात्रों को महाराज ने बुलाकर पन्हाला में स्थित दत्त मंदिर में उनके रहने तथा खाने का इंतजाम किया और यही पर पहले मराठा छात्रावास का शुभारंभ किया |

**मराठा छात्रावास –** महाराज ने छात्रावास स्थापन करने से पूर्व न्यायमूर्ति रानडे और गोपाल कृष्ण गोखले इन दो विद्वानों के साथ ही बापूसाहेब, रघुनाथ व्यंकाजी, सबनीस, भास्करराव जाधव, दत्ताजीराव विचारे इन लोगों से भी सलाह मशवरा कर 'व्हिक्टोरिया मराठा

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

छात्रावास' स्थापन किया | 25 सितम्बर, 1901 में व्हिक्टोरिया मराठा छात्रावास की नई इमारत का शुभारंभ हुआ | स्वयं महाराज बीच बीच में आकर छात्रावास की साफ़-सफाई, छात्रों की पढाई, उन्हें आनेवाली दिक्कतों, भोजन की सुविधा इन बातों की ओर सूक्ष्मता से ध्यान देते थे | महाराज कभी कभी छात्रावास के सभी छात्रों को राजकुल के सभी परिवार के साथ भोजन के लिए आमंत्रित करते थे| छात्रो को कभी कभार कुश्ति दिखाने का भी प्रयोजन होता था ताकि छात्र पढाई के साथ ही सेहत की ओर भी ध्यान दे यह उद्देश्य भी होता था | मराठा छात्रावास के संदर्भ में प्रा. नानासाहेब साळुंखे कहते है –" मराठा एज्युकेशन सोसायटीला महाराजानी जयंती नाल्याच्या परिसरात नव्या राजवाड्याच्या मार्गावर एक बंगल्यासह, काही इमारती व आवार दिले. 25 सप्टेंबर 1901 व्हिक्टोरिया मराठा वसतिगृहाच्या इमारतीचा शुभारंभ करण्यात आला. तसेच 47 हजाराची दिली आणि भेडसगावातील जमीन पण दिली. त्याशिवाय रु.५५० चे वार्षिक अनुदान दिले ."[2] अर्थात ( महाराज ने मराठा एज्युकेशन सोसायटी को जयंती नाले के इलाके में नए राजमहल के रस्ते पर एक बंगले के साथ ही कुछ इमारते और जगह दी | 25 सितम्बर, 1901 व्हिक्टोरिया मराठा छात्रावास की इमारत का शुभारंभ किया | साथ ही 47 हजार रूपए और भेड़सगाँव की जमीन भी देन में दे दी इसके अतिरिक्त 550 रुपए का वार्षिक अनुदान भी दिया |) प्रस्तुत संदर्भ से ज्ञात होता है की महाराज शिक्षा के प्रति काफी सजग थे और उन्होंने इस कार्य को पूरा करने के लिए काफी आर्थिक सहायता के साथ जमीन आदि में भी अपना सहयोग दिखाया |

**जैन छात्रावास :-** कोल्हापुर में जैन परिषद ने अप्रैल 1901 में 'दिंगबर जैन छात्रावास' जैन मंदिर में शुरू किया | महाराज ने इस छात्रावास के लिए व्हिक्टोरिया मराठा छात्रावास के सामनेवाली खुली जगह दी| व्हिक्टोरिया मराठा छात्रावास से भी अधिक बड़ी जगह जैन छात्रावास को पाकर जैन लोग काफी खुश हुए |

**मुस्लिम बोर्डिंग –** शाहू महाराज की प्रेरणा से 'मोहमेड्म एज्युकेशन सोसायटी' 15 नवंबर, नवबंर, 1906 में स्थापन की गई | इस सोसायटी को दसरा चौक पास होनेवाली 25,000 चौ.फिट जगह देकर इमारत बनाने के लिए 5,500 रुपए चंदा दिया | महाराज ने स्वयं इसमें ध्यान देकर बीस कमरे सिर्फ तीन महीने में बनवाकर लिए|

**लिंगायत छात्रावास –** महाराज ने रंकाला तालाब के पश्चिम की ओर होनेवाला 'घोलकर बंगला' वीरशैव लिंगायत छात्रावास के लिए दिया| इस बंगले में सन 1907 में छात्रावास शुरू किया इसके साथ ही 250 रुपए का वार्षिक अनुदान देना शुरू किया | बाद में यह जगह बदलकर रविवार पेठ में एक बड़ा वाडा बनाकर दिया | इस समाज ने इस जगह पर 'अक्कमहादेवी मंडप' बनाकर दूसरे मंजिल पर लडकियों के लिए छात्रावास शुरू किया |

**अस्पृश्य छात्रावास** –14 अप्रैल, 1908 में रविवार पेठ के 'एकेश्वरी मंदिर' में इस छात्रावास की शुरुआत की गई | महाराज ने स्थायी इंतजाम करने के लिए हरिजन तालाब के किनारे की विस्तीर्ण जगह और वहां की विशाल इमारत इस संस्था की दे दी | सन 1914 में छात्रावास को सफलता प्राप्त होती देख इसी जगह पर एक और इमारत का निर्माण किया | महाराज ने इस इमारत को बनाने का आधे से ज्यादा खर्चा किया |

**देवज्ञ बोर्डिंग –** महाराज ने सन 1914 में इस छात्रावास के लिए मंगलवार पेठ के लक्ष्मीप्रसाद थिएटर के पास होनेवाली खुली जगह और वहां की स्थित इमारत दे दी | साथ ही छात्रावास के लिए 180 रुपए का अनुदान मंजूर किया | छात्रावास को स्थायी आय उत्त्पन्न हो इसलिए गंगावेश में बड़ी जगह और उस जगह पर होनेवाली इमारत भी दे दी | सुनार समाज का यह छात्रावास आज भी सफलता के पथ पर दिखाई देता है |

**नामदेव छात्रावास** – महाराज ने शिंपी समाज के लिए शुक्रवार पेठ का वाडा खरीदकर उसी जगह 2 अप्रैल , 1911 में युवराज राजाराम महाराज के करकमलों से इस छात्रावास की शुरुवात की |

**पांचाल ब्राह्मण समाज छात्रावास –** महाराज ने ब्राह्मण सदृश्य पांचाल ब्राह्मणों के लिए सन 1912 में दसरा चौक के मुस्लिम बोर्डिग के पीछेवाली जगह इस छात्रावास के लिए दी | इसके साथ ही पांचाल समाज रंकोबा देवाया के पेडॉल एवं उनके छात्रावास के लिए एक हजार रुपए का चंदा दिया |

**सारस्वत ब्राह्मण छात्रावास –** महाराज ने दसरा चौक की एक खाली जगह सारस्वत छात्रावास को देकर इमारत का निर्माण करने के लिए 5 हजार रुपए चंदा दे दिया | इस इमारत का उद्घाटन 20 मई, 1915 में शाहू महाराज के हाथों से हुआ |

**कायस्थ प्रभु छात्रावास –** दसरा चौक के सारस्वत छात्रावास के पासवाली जमीन इमारत और 2 हजार रुपए का चंदा देकर 50 रुपए का वार्षिक अनुदान भी दिया |

**इंडियन ख्रिश्चन छात्रावास-** छत्रपति शाहू मिल के पश्चिम की और होनेवाली जयंती नाले के इलाके में 34 एकड़ 25 बीघा जमीन का पूरा टुकड़ा छात्रावास को दिया |

**आर्य समाज छात्रावास अर्थात गुरुकुल** – इस छात्रावास के लिए पद्माल तालाब के पास 15 एकड़ जमीन दे दी| इसके साथ ही गुरुकुल चलाने के लिए 5 हजार रुपए का चंदा दिया | राजदरबार कर्नल वुड हाउस नाम से एक अनाथालय चलाता था वह भी एक छात्रावास ही था | वह भी आर्य समाज को दिया | दरबार के द्वारा ही गुरुकुल का खर्चा चलाया जाता |

**वैश्य समाज छात्रावास-** महाराज ने इस समाज के लिए रविवार पेठ की 1230 चौ,फिट जगह दी|

**वैदिक समाज छात्रावास** – शाहू महाराज ने वैदिक शिक्षा की शुरुआत पुराने राजवाड़े में किया |6 जुलाई, 1920 में शिवाजी वैदिक छात्रावास शुरू करके रविवार पेठ के पास होनेवाली बिंदु चौक में स्थित इमारत छात्रावास को दे दी गई| यहाँ पर वेदों की तरह धर्मविधि करने की शिक्षा ब्राह्मणत्तर समाज को देने की शुरुआत की |

महाराज ने उपर्युक्त विविध छात्रावासों का निर्माण कर सभी जातिधर्म के लोगों को शिक्षा का समान हक मिले इसी उद्देश्य से कोल्हापुर रियासत में शिक्षा क्षेत्र में काफी बड़ा परिवर्तन किया | इस संदर्भ में डॉ. रमेश जाधव कहते है –“ दुर्बल जाती आर्थिक-सामजिक आणि राजकीय दृष्ट्या जो पर्यंत शक्तिशाली होत नाहीत, तो पर्यंत जातिसंस्था समूळ नष्ट होणार नाही . हे शाहू छत्रपतीचे जातिसंस्था नष्ट करण्याच्या संघर्षाचे प्रमुख सूत्र होते. म्हणूनच त्यांनी विद्यार्थ्यांच्या जतवार वसतिगृहांची चळवळ उभी केली.”[3]( अर्थात दुर्बल जाति आर्थिक सामाजिक और राजनीतिक दृष्टि से जब तक शक्तिशाली नहीं बनती है तब तक जातिसंस्था जड़ से ख़त्म नहीं होगी. यह शाहू छत्रपति का जातिसंस्था ख़त्म करने के संघर्ष का प्रमुख सूत्र था इसिलिए उन्होंने छात्रों के जातिनिहाय छात्रावास का आंदोलन शुरू किया |) प्रस्तुत उद्धरण शाहू महाराज ने अलग अलग धर्म के छात्रावास बनाने के पीछे की वजह को स्पष्ट करता है | इससे सभी जाति-धर्म के लोगों को शिक्षा प्राप्त करने का मौका मिल सका | जातिव्यवस्था के कारण किसी भी जाति के व्यक्ति की शिक्षा खंडित न हो या उसे शिक्षा ग्रहण करने का मौका न मिले यही सोचकर उन्होंने अलग-अलग जाति धर्म के छात्रावासों का निर्माण किया | जिससे अधिक से अधिक लोग शिक्षा से लाभान्वित हो सके इसी उद्देश्य को सामने रखकर और शिक्षा माध्यम से समाज में फैली अज्ञानता को दूर करने का प्रयास किया | तत्कालीन समय में ऐसा कदम उठाकर एक क्रांतिकारी आंदोलन चलाना नामुमकिन होने के बावजूद भी उसे मुमकिन बनाने की सोच शाहू महाराज में थी ऐसा कहना अनुचित न होगा |

**अस्पृश्योंद्धार** –शाहू महाराज ने अस्पृश्य जाति के लोगों का उद्धार करने हेतु काफी बड़ा कार्य किया है | उन्होंने अपने रियासत के सभी पिछड़े जाति का उद्धार शिक्षा की सहायता से करने की नीति अपनाई थी और उसके अनुसार 1908 में ही अपने नजदीकी लोगों की सहायता से अस्पृश्य छात्रावास शुरू किया था | इस संदर्भ में डॉ. जयसिंगराव पवार कहते है –“ अस्पृश्य मानलेल्या जातीत ‘विद्या प्रसारक मंडळी’ नावाची संस्था ही स्थापन केली होती. भास्करराव त्याचे प्रमुख होते. या वसतिगृहास अस्पृश्यांची मुले मिळविण्यापासून ते या मुलांचा शैक्षणिक दर्जा स्पृश्य शाळांतील मुलांच्या दर्जाइतका आणण्यापर्यंत, सर्व प्रकारचे प्रयत्न ही मंडळी करीत होती, पण मुळात अस्पृश्य समाजात शिक्षांची इतकी प्रचंड अनास्था होती की, त्यांच्या पोह-यात पुरेसे पाणी येणे मुश्किल होते. महाराजांनी या सर्व आडचणीवर मात करण्याचे प्रयत्न सुरु केले.”[4] प्रस्तुत उद्धरण से स्पष्ट होता है कि शाहू महाराज अस्पृश्य जाति के लोगों की शिक्षा के प्रति सजग होकर कई मुश्किलों का सामना कर उन्हें अच्छे मुकाम पर पहुँचाने की कोशिश में लगे हुए थे |

**कृषि क्षेत्र** –राजर्षि शाहू महाराज ने किसानों की स्थिति सुधारने हेतु कई उपाय योजना को कार्यन्वित किया | सन 1902 में पड़े अकाल के दौरान उन्होंने किसानों के समस्याओं को पहचानकर उसी वर्ष ‘सामूहिक सिंचाई नीति’ प्रस्तुत की | इस नीति के लिए उन्होंने सिंचाई अधिकारियों को नियुक्त किया इन लोगों ने अपने इलाके के हर गाँव की जाँच की और सूखे की स्थिति की गंभीरता को ध्यान में रखते हुए गांवों के लिए सिंचाई निधि की व्यवस्था की | उन्होंने सिंचाई की समस्याओं को हल करने के लिए 18 फरवरी, 1907 को राधानगरी नामक गाँव में ‘राधानगरी बांध’ का निर्माण कार्य शुरू किया | यह बांध छत्रपति शाहू महाराज की अपनी प्रजा के कल्याण के प्रति दृष्टि का प्रमाण है |

निष्कर्षत: हम कह सकते है कि राजर्षि शाहू महाराज एक महान समाजसुधारक, शिक्षाप्रेमी और न्यायप्रिय राजा थे | उनके कार्य एवं सोच की वजह से महाराष्ट्र और पूरे भारत के समाज के विकास में उनका योगदान काफी सराहनीय है | उनके कार्य का प्रभाव आज भी दिखाई देता है |

**संदर्भ ग्रंथ सूची** –

1. अनुवादक प्रा. वेदकुमार वेदालंकार - क्रांति के अग्रदूत राजर्षि शाहू महाराज पृ. 55
2. प्रा. नानासाहेब साळुंखे- शाहूंच्या आठवणी पृ. 225
3. डॉ.रमेश जाधव- लोकराजा शाहू छत्रपती पृ. 27
4. डॉ. जयसिंगराव पवार- राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य पृ. 60

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

84

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज व कृषी क्षेत्रातील परिवर्तनीय कार्य

**प्रा. सागर हरी चरापले,**
सहाय्यक शिक्षक, पर्यावरण विभाग,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर.

---

**परिचय:**राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे भारतातील एक दूरदर्शी नेते आणि सुधारणावादी होते, विशेषत: कृषी क्षेत्रातील त्यांच्या अपवादात्मक योगदानासाठी ओळखले जाते. २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर, महाराष्ट्र येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म झाला. फार कमी वयातच म्हणजे १८९४ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर राज्याचे शासक बनले. तथापि, कृषी क्षेत्रातील त्यांच्या नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनीय कार्याने त्यांना वेगळे केले आणि त्यांना भारतीयांमध्ये एक आदरणीय व्यक्ती बनवले. समाजसुधारक ज्योतिबा फुले यांच्या योगदानाने प्रभावित झालेले, शाहू महाराज हे एक आदर्श नेते आणि सक्षम राज्यकर्ते होते जे त्यांच्या राजवटीत अनेक प्रगतीशील आणि पथभ्रष्ट कार्यांशी निगडीत होते. १८९४ मध्ये त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी आपल्या राज्यातील खालच्या जातीतील लोकांसाठी अथक परिश्रम घेतले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते.

**कृषी क्षेत्रातील शाहू महाराजांच्या लक्षणीय कामगिरी:**

इतिहासातील कृषी क्षेत्रातील शाहू महाराजांच्या सर्वात लक्षणीय कामगिरीपैकी एक म्हणजे जमीन सुधारणांची अंमलबजावणी. त्याला समजले की विद्यमान जमीन मालकी पद्धती अत्यंत विस्कळीत आहेत, मोठे जमीन मालक कमी भाग्यवान शेतकऱ्यांचे शोषण करतात. ही असमानता दूर करण्यासाठी त्यांनी भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनीचे पुनर्वितरण करून त्यांना उपजीविकेचे सन्माननीय साधन उपलब्ध करून देणारी धोरणे लागू केली. यामुळे सर्वांना जमिनीवर समान प्रवेश मिळण्याची, सक्षमीकरणाची आणि सामाजिक न्यायाची भावना वाढीस लागली. याशिवाय, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रे आणि उपकरणे वापरण्यास प्रोत्साहित करून कृषी उत्पादकता वाढवणे हेही जमीन सुधारणांचे उद्दिष्ट आहे. शाहू महाराजही सहकारी शेतीचे खंबीर समर्थक होते. त्यांचा असा विश्वास होता की लहान आणि विखंडित जमीन शेतीच्या विकासात अडथळा आणते. यावर मात करण्यासाठी त्यांनी विविध गावांमध्ये सहकारी संस्था स्थापन केल्या, शेतकऱ्यांना त्यांची संसाधने एकत्र करण्यासाठी आणि एकत्रितपणे काम करण्यास प्रोत्साहित केले. सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना चांगले तंत्रज्ञान, उपकरणे आणि कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यास मदत केली. शेतकऱ्यांमध्ये सहकार्य आणि सहकार्याची भावना वाढवून, शाहू महाराजांनी प्रभावीपणे कृषी उत्पादकता सुधारली, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आणि चांगले उत्पन्न मिळाले.

**कृषी पद्धतींच्या प्रगतीसाठी कृषी शिक्षण:-**

शिवाय, कृषी पद्धतींच्या प्रगतीसाठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून शाहू महाराजांनी कृषी शाळा आणि प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या. या संस्थांचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्र, पीक रोटेशन आणि पशुपालन पद्धतींबद्दल शिक्षित करणे होते. शिक्षणाद्वारे, शेतकरी अधिक ज्ञानी आणि कुशल बनले, त्यांना नाविन्यपूर्ण आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्यास सक्षम केले. शाहू महाराजांनी कृषी क्षेत्रात संशोधन आणि विकास कार्यक्रम सुरू केले, वैज्ञानिक प्रगतीला प्रोत्साहन दिले आणि शेतकऱ्यांमध्ये सर्वोत्तम पद्धतींची माहिती प्रसारित केली. त्यांच्या प्रत्यक्ष योगदानाव्यतिरिक्त, शाहू महाराजांना कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाचे महत्त्व देखील समजले. शेतजमिनींना स्थिर पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी सिंचन प्रकल्प, कालवे आणि धरणे बांधण्यात गुंतवणूक केली. जलस्रोतांच्या उपलब्धतेमुळे शेतकऱ्यांना त्यांची पिके कार्यक्षमतेने पिकवता आली, अगदी कोरड्या पावसात किंवा दुष्काळातही. शिवाय, शाहू महाराजांनी कृषी बाजार आणि साठवणुकीच्या सुविधा उभारल्या, शेतीमालाची विक्री आणि साठवणूक केली.

**नाविन्यपूर्ण शेतीला प्रोत्साहन देणे-**

शाहू महाराजांच्या कार्याची दूरदृष्टी त्यांच्या प्रत्येक पावलावर दिसून येते. कोणतेही काम करताना ते नेहमी पुढील शंभर वर्षांचा विचार करत. शेतीकडेही त्यांनी कधीच पारंपरिक पद्धतीने पाहिले नाही. माझा शेतकरी शहाणा झाला पाहिजे, त्याने नवीन पिके घ्यावीत, असा आग्रह धरला. त्यामुळेच त्यावेळी त्यांनी अनेक नवीन पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले. त्यात त्यांनी स्वतः जातीने लक्ष घातले. रेशीम, वेलदोडे, कोको, भारतीय रबर, ताग, अंबाडी, बेळगावी बटाटा, लाख, शिंगाडे, टॅपिओका, (शाबू) आणि

कंबोडियन कापूस यासारख्या अनेक पिकांची लागवड आणि प्रक्रिया करण्याचा त्यांनी प्रयोग केला. त्यांनी पन्हाळ्याजवळ कॉफी आणि चहाची लागवड केली. या शेतातील चहा नंतर पन्हाळा क्रमांक 4 या ब्रँडने विकला जात असे. शाहू महाराज हा चहा बडोद्याच्या सयाजीराव महाराजांसह अनेकांना पाठवत असत आणि त्यांना तो आवडायचा.

**शेतकऱ्यांना पोलाद नांगरणारा राजा**

पहिल्या महायुद्धात इंग्रजांना पोलादाचा तुटवडा जाणवू लागला. त्यावेळी इंग्रजांनी हिंदुस्थानातील तोफा वितळवून त्यांचा वापर शस्त्रे बनवण्यासाठी केला. शाहू महाराजांनी आपल्या राज्याच्या तोफा इंग्रजांकडे नेल्या आणि त्या किर्लोस्कर कंपनीला दिल्या, ज्याने शेतकऱ्यांना त्यांची शस्त्रे बनवू नयेत म्हणून पोलादी नांगर बनवले.

**शेतीमालाची विक्रीसाठी बाजारपेठ:**

पायाभूत सुविधांच्या विकासामुळे शेतकऱ्यांसाठी केवळ बाजारपेठेतील प्रवेशच सुधारला नाही तर कापणीनंतरचे नुकसानही कमी झाले, चांगले उत्पन्न आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित झाली. शाहू महाराजांच्या कृषी क्षेत्रातील कार्यामुळे केवळ त्यांच्याच राज्यातील शेतकऱ्यांचे जीवनच बदलले नाही तर संपूर्ण भारतीय शेतीवर त्याचा कायमस्वरूपी परिणाम झाला. शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने शाश्वत आणि न्याय्य कृषी व्यवस्था निर्माण करण्यात त्यांचे पुढाकार महत्त्वपूर्ण ठरले. शाहू महाराजांचे कृषी क्षेत्रातील अपार समर्पण आणि प्रयत्नांमुळे त्यांना "राजर्षी" किंवा "राजा-संत" ही पदवी मिळाली, जे त्यांच्या प्रजेच्या कल्याणासाठी त्यांची वचनबद्धता दर्शवते.

**गुळाचा व्यापार**

शाहू महाराजांचा भर केवळ चांगल्या शेतीवर नव्हता; त्यामुळे त्यांना येथे बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. त्यावेळी कोल्हापूर संस्थानात उत्पादित होणारा उत्तम दर्जाचा गूळ सह्याद्रीच्या पलीकडे घाटात उतरून कोकणातील राजापूरच्या बाजारपेठेत जायचा आणि तेथून तो मुंबईला वगैरे पाठवला जायचा. हा गुळ तेव्हा 'राजापुरी गुळ' म्हणून ओळखला जात असे. म्हणजेच गूळ कोल्हापूरचा असून नाव राजापूर आहे. महाराजांनी ही परिस्थिती बदलण्याचा निर्णय घेतला. राज्याभिषेकानंतर दुसऱ्या वर्षी रेल्वे स्थानकाजवळील जमिनीवर 'शाहूपुरी' नावाची नवीन बाजारपेठ उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यांनी कोल्हापूर, कागलँड निपाणी येथील व्यापाऱ्यांना विशेष सवलती देऊन गोदामे उभारण्यासाठी प्रोत्साहित केले. अवघ्या पाच-सहा वर्षात ही नवी बाजारपेठ जोरात उभी राहिली आहे. संस्थेतील कृषी मालाला संस्थेची बाजारपेठ मिळाली.

**सारांश:**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खरे द्रष्टे आणि सुधारणावादी होते ज्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आणि शेतीच्या प्रगतीसाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांच्या जमीन सुधारणा, सहकारी शेतीला चालना, शिक्षण आणि पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक या सर्वांनी कृषी क्षेत्राच्या वाढीला आणि विकासाला हातभार लावला. आजही त्यांचे कार्य प्रेरणादायी आणि दूरदर्शी नेतृत्व आणि पुरोगामी धोरणे समाजात सकारात्मक बदल कसे घडवून आणू शकतात याचे ज्वलंत उदाहरण आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची साधी राहणी, मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी केलेले उल्लेखनीय प्रयत्न आणि शैक्षणिक, सामाजिक आणि जलसंधारणासारख्या कृषी सुधारणांमध्ये त्यांनी दिलेले खरे योगदान आपल्या देशासाठी अधिक चांगल्या गोष्टी करण्यासाठी नेहमीच मार्गदर्शन करत राहील.

**संदर्भ:**

१) https://aissms.org/rajarshri-shahu-maharaj-a-visionary-and-social-reformist
२) https://navjyot.net/wp-content/uploads/2022/12/20-1.pdf
३) author/online-lokmat. बळीराजाचा राजा... शाहमहाराज शेती व शेतकरी. Lokmat. Published June 26, 2020. Accessed November 2, 2022.
४) Life History of Shahu Chhatrapati. Accessed November 3, 2022. //www.culturalindia.net/reformers/shahu-chhatrapati.html
५) Pawar J., Samaj kranti karak Rajarshi Shahu Chhatrapati, (2021)

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

85

# कलासक्त राजर्षी शाहू महाराज

**श्री.पंढरीनाथ पाटील**
सहाय्यक शिक्षक,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

महाराष्ट्राच्या आणि संपूर्ण भारताच्या इतिहासातील एक अलौकिक महान व्यक्तिमत्व म्हणजे राजर्षी शाहू महाराज! एक प्रभावी समाजसुधारक म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे नाव नेहमीच सन्मानाने घ्यावे लागते. एक राजा असूनही समाजातील वंचित,शोषित घटकांबद्दल असलेली आस्था शाहू महाराजांना एक वेगळाच राजा बनवते. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचा आणि आपल्या संस्थानांमध्ये रयतेचे राज्य आणण्याचे उल्लेखनीय कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. समाजातील शोषित,वंचित घटकांबाबत शाहू महाराजांना कमालीचे आस्था होती. शाहू महाराजांनी समाजातील याच घटकांना खऱ्या अर्थाने हक्क मिळवून दिला.राजर्षी शाहू महाराजांना रयतेचा राजा, दिनदलितांचा कैवारी, लोककल्याणकारी राजा अशा विविध उपाध्यांनी ओळखले जाते. समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केले. शेती, शिक्षण, राजकारण ,समाजकारण ,अर्थकारण ,समाजातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, आरोग्य, पर्यावरण, महिला विषयक दृष्टिकोन अशा अनेकविध् बाबींवर तर राजर्षी शाहू महाराजांनी आपले लक्ष केंद्रित केलेच पण त्याचबरोबर महाराजांनी कलाक्षेत्रावर ही नितांत प्रेम केले व कला जोपासण्याचे व कलाकारांना नवउभारी देण्याचे बळ दिले हेही विसरून चालणार नाही.

कला आणि कलाकारांवरील निस्सीम प्रेमामुळे आणि श्रद्धेमुळे छत्रपती शाहूंची कलाप्रेमी राजा म्हणून सुद्धा ओळख आहे.गायन, वादन, अभिनय, नाट्यकला, शिल्पकला ,चित्रकला, मल्लविद्या अशा विविध कलांचे राजर्षी शाहू महाराज चाहते होते आणि त्यामुळेच कोल्हापूरला "कलापूर" अशी एक वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ओळख प्राप्त झाली आहे. राजर्षी शाहू महाराजांनी कलाकारांच्या अंगभूत गुणांचा विकास करण्यासाठी संस्थानातील कलाकारांना सर्वतोपरी सहाय्य केले आणि कलाकारांना व नाटककंपनी वाल्यांना अर्थसहाय्य करून त्यांना अडीअडचणीत मदत करून कलाकारांना उभे करण्यामध्ये त्यांनी मोलाचा वाटा उचलला. रंगभूमीवर एकेकाळी अधिराज्य गाजवलेले अण्णासाहेब किर्लोस्कर ,दत्तोपंत हल्लाळकर ,भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी, रंगकर्मी केशवराव भोसले, बाबुराव पेंटर ,चित्रकला तपस्वी आबालाल रहिमान, गायिका सकवार बाई ,साहेबजान व सोयीजान या बहिणी, आनंदराव पेंटर, तबलजी दादा लाडू, बळवंतराव रुकडीकर, गणपतराव गुरव, पखवाजपटू साधले बुवा, नाटककार आणि पेटीवादन पटू गोविंदराव टेंबे, शाहीर लहरी हैदर असे अनेक कलाकार नावारुपास आले आणि अजरामर झाले ते राजर्षी शाहूंच्या राजश्रयामुळेच!!!

जयपुर अंतरोली घराण्याची गायिकी असणारे अल्लादिया खा यांच्या गायन कलेकडे आकर्षित होऊन १८९५ साली राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना आपला 'दरबारी गायक' म्हणून नेमले. महाराजांनी दिलेल्या प्रेरणेतून आणि अलादिया खा साहेब यांच्या शिकवणीतूनच पं. भास्कर बुवा बखले,हैदर खा,मंजी खा, केसरबाई करेकर, गोविंद बुवा शाळीग्राम, निवृत्तीबुवा सरनाईक असे नामवंत गायक नंतरच्या काळात कोल्हापुरात उदयास आले.

अल्लादिया खा यांना शाहू महाराज फक्त दरबारी गायक मानत नसत तर त्यांनी त्यांना आपल्या खास परिवारात मानाचे स्थान दिले होते. राजा आणि अश्रित असे नाते महाराजांनी कधीच मानले नाही, तर ते अलादिया खा यांना आपले मित्र मानत असत. त्यांनी त्यांच्यावर कधी हुकूमत गाजवली नाही. म्हणूनच अगदी शेवटच्या क्षणापर्यंत अलादिया खा महाराजांशी एकनिष्ठ राहिले. महाराजांच्या काळात कोल्हापूर दरबारी गायिका व नर्तकी म्हणून बाळाबाई बांदोडकर या होत्या महंमद खा व अल्लादिया खा यांच्याकडून गायनाचे धडे गिरवलेल्या बाळाभाई यांना महाराजांनी दिलेले प्रोत्साहन व केलेले सहाय्य यामुळे पुढील काळात त्या गायिका व नर्तकी म्हणून नावारूपास आल्या.

१९०१ साली कोल्हापुरात आलेल्या अब्दुल करीम खा यांच्या दरबारातील गाण्यांच्या कार्यक्रमांमध्ये महाराजांनी त्यांना भरपूर प्रमाणात बिदागी दिली व पुढील जवळपास सहा महिन्यांच्या कालावधीत दरबारात मुक्काम करावे असे सांगितले. मैसूरच्या सुप्रसिद्ध गायिका गुलाबबाई सहज फिरत कोल्हापुरात संस्थानी आल्या त्यांना सारंगी साथ करणाऱ्या हैदरबक्ष यांची कला व कौशल्य ओळखून महाराजांनी हैदर बक्ष यांना आपल्या दरबारी नोकरीस् ठेवले. ते शेवटपर्यंत महाराजांचा सोबत राहिले. शाहू महाराजांच्या योगदानामुळे मराठी रंगभूमीला मिळालेला एक संगीतसूर्य म्हणजे केशवराव भोसले .स्वदेश हितचिंतक मंडळी या नाटक कंपनीतून्

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

उदयोनमुख झालेले केशवराव भोसले यांनी १९०८ मध्ये कलादर्श नाटक मंडळ स्थापन केले. या नाट्य मंडळाच्या माध्यमातूनच त्यांनी मृच्छकटिकचे अनेक प्रयोग केले . महाराजांनी यावेळी केशवरावांना खूप मोठी शाहू महाराजांच्या योगदानामुळे मराठी रंगभूमीला मिळालेला एकसंगीत सूर्य म्हणजे केशवराव भोसले स्वदेश हितचिंतक मंडळ या नाटक कंपनीतून उदयनमुक्त झालेले केशवराव भोसले यांनी 1908 मध्ये कलादर्शन नाटक मंडळ स्थापन केले या नाट्य मंडळाच्या माध्यमातूनच त्यांनी मृच्छकटिक चे अनेक प्रयोग केले.महाराजांनी यावेळी त्यांना मोठी बिदागी देऊन गौरविले . याच केशवरावांनी मिळवलेली संपूर्ण संपत्ती पुढे देवल क्लब या संस्थेच्या उभारणीस त्यांनी खर्च केली.

केशवरावांच्या बरोबरीनेच महाराजांनी जुना राजवाडा, लक्ष्मीप्रसाद थिएटर अशा ठिकाणच्या किर्लोस्कर,शाहू नगरवासी, महालक्ष्मी प्रासादिक कंपनी या नाट्य कंपन्यांची विशेष बडदास्त ठेवली. त्याचबरोबर कोल्हापूर संग्रहित नाटक मंडळी, शिवराज संगीत नाटक मंडळी, यशवंत संगीत नाटक मंडळी,बळवंत नाटक मंडळी या नाटक मंडळींना महाराजांना दिलेला राजाश्रय हा खूप मोठा आधार होता. नारायण राजहंस अर्थात बालगंधर्व यांचे गायन कौशल्य, अभिनय हेरून महाराजांनी त्यांना किर्लोस्कर नाटक कंपनीत रुजू करून घेतले. स्त्री भूमिकांची एक वैशिष्ट्यपूर्ण छाप रसिक मनावर उमटविलेल्या बालगंधर्वांनाही महाराजांचे सर्वतोपरी पाठबळ कायमच मिळत राहिले. महाराजांनी शाहीर आणि शाहिरी काव्यांनाही राजश्रय् दिला त्यांना बिदागी देणग्या, मानधना बरोबरच सरकारी नोकऱ्याही दिल्या.

आपल्या शीघ्र कवित्वामुळे त्याकाळी एक वेगळीच ओळख निर्माण झालेली शाहीर लहरी हैदर यांना मराठी शहिरीचे अग्रदूत मानले जाते. त्यांचे झाशीची राणी, तानाजी मालुसरे,छत्रपती शाहू, भोंदू साधू,जोधपुरची राणी हे पोवाडे त्याकाळी प्रचंड गाजले. शाहीर पिराजीराव सरनाईक पट्टशिष्य असणाऱ्या शाहीर लहरी हैदर यांना महाराजांनी दिलेला राजाश्रय त्यांची कारकीर्द खुलवण्यास सहाय्यभूत ठरला. त्याचबरोबर. भजन संगीतातील तुकाराम बुवा सरनाईक, कृष्णा बागणीकर, शाहीर विठ्ठल डोणे शाहीर रामचंद्र माळी अशा उमद्या गुणी कलाकारांना सर्वोतोपरी सहाय्य करून कलेवरील आपली श्रद्धा दृढ केली.

"व्हाईसरॉय मेडल" प्राप्त आबालाल रहमान यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच कोल्हापूर चित्रकला खोलवर रुजवली. महाराजांनी १८८७ साली त्यांची 'दरबार चित्रकार' म्हणून नेमणूक केली आणि त्यांना दरबारी तनखा सुरू केली. याच प्रेरणेतून पुढे कोल्हापुरातील चित्रकला क्षेत्रात आनंदराव पेंटर, बाबुराव पेंटर, बाबा गजबर, दत्तोबा दळवी ,भाई माधवराव् बागल ही नावे नावारूपास आली आणि त्यांनाही महाराजांचा आश्रय आणि आधार मिळाला.

एकूणच कलेच्या क्षेत्रात महाराजांचे कार्य विविधांगी, बहुरंगी, दर्जेदार , मौलिक स्वरूपाचे असेच आहे.विविध कलांना महाराजांनी जसा राजाश्रय दिला तसा अनेक कलावंतांनाही आपल्या पदरी ठेवून, त्यांना मदत करून त्यांच्या संसाराची आणि चारितार्थाची काळजी महाराजांनी दूर केली.काहींना जमिनी, नोकऱ्या, घरे दिली. आपले राज्य म्हणजे कलावंतांची खाण आहे, हे जाणून कोल्हापूरला "कलानगरी" ही ओळख निर्माण करून देण्याचे अनमोल कार्य महाराजांनी केले हे निश्चित!!!!!

**संदर्भ-**

१) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ.
२) राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य- डॉ.जयसिंगराव पवार.

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

86

# छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक व अस्पृश्योद्धाराचे कार्य

**सौ.अस्मिता महेंद्र इनामदार**
वाणिज्य विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रस्तावना-** आधुनिक महाराष्ट्राच्या व भारताच्या इतिहासात शैक्षणिक ,सामाजिक , आणि सर्वांगीण क्रांतीचे उद्गाते,शिल्पकार तसेच सामाजिक समतेचे पुरस्कर्ते ,अस्पृश्यतेचा काळिमा पुसणारे, विद्येचे पुजारी गुणीजणांचे व कलावंतांचे आश्रयदाते ,हरितक्रांतीचे जनक, बहुजनांचे महान दैवत, थोर विचारवंत, संस्थानिकांचे मेरुमणी, ब्राह्मणेतर व सत्यशोधक चळवळीचे आश्रयदाते, आधुनिक महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचे एक महान मानकरी आणि थोर महामानव राजर्षी शाहू छात्रापती महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अमर असे कार्य करून अलौकिक अशी कीर्ती संपादन केली आहे.

शाहू महाराजांची १८९४ ते १९२२ अशी २८ वर्षाची कारकीर्द सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अतिशय क्रांतिकारी व हितकारी ठरली. लोकनायक राजा म्हणून त्यांनी दिलेले योगदान सर्वच राज्यकर्ते व भावी पिढ्यांना मार्गदर्शक तसेच प्रेरणादायी ठरणारे आहे.प्रस्तुत शोधनिबंधात त्याच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज -**छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी जयासिंगराव घाडगे व राधाबाई यांच्या पोटी झाला. आषाढी एकादशीच्या मंगल दिवशी कोल्हापूर येथे कसबा बावडा नजीकच्या ‘लक्ष्मी विलास पॅलेस ‘ या ठिकाणी झाला. छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांचा अहमदनगर किल्ल्यात १८८३ मध्ये अंत झाला. त्यांच्या धर्मपत्नी महाराणी आनंदीबाई यांनी बाल शाहूस दत्तक घेण्याचे ठरविले. महाराजांच्या आई राधाबाई यांचे १८७७ मध्ये निधन झाले. त्यानंतर १८८४ रोजी दत्तक विधान होऊन महाराजांचा राज्यारोहण समारंभ थाटात करण्यात आला.महाराजांचे बालपणीचे नाव यशवंतराव होते. त्यावेळचे पॉलीटीकल एजंट कर्नल एच.ए. रीव्हज यांनी दत्तक विधानास मान्यता दिली.त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर जेम्स फर्ग्युसन यांनीही या दत्तकास मान्यता दिली. व्हिक्टोरिया राणीच्या १८५८ च्या जाहीरनाम्यानुसार संस्थानिकास दत्तक घेण्यास परवानगी देण्यात आली होती. यशवंतरावाच्या दत्तक विधानानंतर शाहू महाराज हे नामानिधान करण्यात आले.

शाहू महाराजांचा राज्यारोहण समारंभ २ एप्रिल १८९४ रोजी त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड हरीस यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी दक्षिणेतील अनेक संस्थानिक, सरदार लोक, कोल्हापूर राज्यातील अधिकारी वर्ग व परदेशी पाहुणे हजर होते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे-**

१ . राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य समजून घेणे.
२ . राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या अस्पृश्यधारक कार्याची माहिती घेणे.

**संशोधन पद्धती-** प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी दुय्यम तथ्य–संकलन पद्धतीचा अवलंब केलेला असून लिखित स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके,
इंटरनेट इत्यादींचा आधार घेऊन विश्लेषणात्मक मांडणी करण्यात आलेली आहे.

**राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य-**शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हि त्यांच्या प्रजेला अमोल अशी देणगी होय.शिक्षण म्हणजे ज्ञान. आणि ज्ञानासारखे पवित्र असे काहीच नाही अशी महाराजांची समजूत होती. बहुजन समाजाला शिक्षणाची नितांत आवशक्यता आहे हे महाराजांना पटले होते प्रजेचे अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य नष्ट करण्यासाठी महाराजांनी शिक्षणाची कास धरली.मुठभर लोकांची शिक्षण क्षेत्रात असलेली मक्तेदारी त्यांना नष्ट करायची होती.म्हणून महाराजांनी मागासलेल्या जमातीला शिक्षणाचा मार्ग खुला केला.

**राजर्षी शाहू महाराज आणि प्राथमिक शिक्षण -**शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाचे प्रचंड सामाजिक महत्त्व जाणून ,कोणत्याही विरोधाला न जुमानता १९१७-१८ साली गणेश चतुर्थीला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. महारांजाच्या मनात हि योजना १९१२-१३ पासून होती. महाराजांनी एकून १०० शाळा सुरु केल्या. महाराष्ट्र राज्यात मात्र प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे होण्यास १९४८ साल उजाडावे लागले. यावरून शाहू महाराजांनी किती वर्षे आगोदर प्राथमिक शिक्षणाची गरज ओळखली होती हे दिसून येते.

शाहू महाराजांनी लोकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून बक्षिसे , शिष्यवृत्या देण्यास सुरुवात केली. २५/०६/१९१९ च्या आदेशाने तलाठी स्कूलमध्ये येणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांना द.म . आठ रुपये व दहा रुपयांच्या स्कालरशीप तीन महिने मुदतीने दिल्या. मेडीकल लायब्ररी,लॉ, लायब्ररी, इत्यादींना महाराजांनी आर्थिक मदत दिली. महाराजांनी काही विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशी पाठविले. शंकर आबाजी ढवळे याला आय.ए.एस. परीक्षेसाठी इंग्लंडला जाण्यासाठी २००० रुपयांची मदत केली. एका मराठा विदार्थ्यास इंजिनियरिंग शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्यासाठी महाराजांनी ४००० रुपये दिले.जैन जातीच्या दोन विद्यार्थ्यांना, चित्रकलेच्या पुढील शिक्षणासाठी महाराजांनी इटलीला पाठविले.

महाराजांनी शिक्षणाच्या विविध क्षेत्राकडे लक्ष दिले होते. १८९६ पासून कृषी शास्त्राचे विशेष अभ्यासक्रम सुरु केले. पुण्याच्या कृषी महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना शिकता यावे म्हणून छात्रवृत्त्या मंजूर केल्या. महाराजांना श्रम, प्रतिष्ठा व कृषी शिक्षणाचे महत्त्व पटले होते म्हणून त्यांनी स्वताच्या दोन्ही मुलांना इंग्लंडला व अलाहाबादला तांत्रिक व कृषी शिक्षणासाठी पाठविले.

**राजर्षी शाहू महाराज आणि स्त्री शिक्षण -** शाहू महाराज स्त्री-शिक्षणाचे भोक्ते होते.स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी आज्ञा काढली.स्त्रियांच्या शिक्षणासाठी तसेच त्यांच्या राहण्याजेवण्याची व्यवस्था करण्यासाठी महाराजांनी तरतूद केली होती.त्यांनी कृष्णाबाई केळवकर या हुशार विद्यार्थिनीला ग्रेट मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षणासाठी पाठविले. १९०२ मध्ये त्यांना ए. इ.हॉस्पिटलमध्ये असिस्टंट डॉक्टर म्हणून नेमले. पुढे त्यांना उच्च शिक्षणासाठी डब्लिनला पाठविले. १९०३ मध्ये त्या परत आल्या त्यानंतर त्याच हॉस्पिटल मध्ये डॉक्टर म्हणून १९२४ पर्यंत सेवा बजावली.

शाहू महाराजांची धाकटी सून श्रीमंत इंदुमती राणीसाहेब महाराज या केवळ साडेअकरा वर्षाच्या असताना विधवा झाल्या. महाराजांना त्यांची खूप काळजी वाटत होती. म्हणून त्यांनी इंदुमातीदेविना शिक्षण द्यायचे ठरविले.त्यावेळी त्यांना खूप मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले.त्यांच्या पत्नीने सुद्धा खूप विरोध केला होता. पण कॉलेज अखेर शिक्षण देण्याचे ठरविल्यानंतर त्यांच्या मनाला आराम पडला. त्यांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी सोनतळीला खास आश्रम उघडला. निष्णात अशा शिक्षकाची त्यांनी नेमणूक केली. त्यांच्या शिक्षणाबाबत ते डॉ.बेझंट बाईंचा ते सल्ला घेणार होते. यावरून सुनेबाबतचे वात्सल्य व स्त्री-शिक्षणाबद्दल तळमळ दिसून येते. 'स्त्री शिक्षणविषयक महाराजांची दृष्टी अत्यंत सहानुभूतीची होती. पुरुषांच्या एवढे स्त्रियांनीही शिक्षण घेतले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. मुलीना भले-बुरे, चांगले-वाईट, योग्य –अयोग्य हे समजण्याची शक्ती ज्या शिक्षणामध्ये आहे असे शिक्षण दिले पाहिजे असे त्यांचे मत होते.असे शिक्षण देणारे गुरुजन जर चारित्र्यसंपन्न असतील तर त्या मुली बेताल होणार नाहीत.स्त्रियांना खरे थोरपणाचे, संयमाचे, नीतीधैर्याचे, माणुसकीचे शिक्षण स्वत आचरून दाखविणाऱ्या शिक्षकाद्वारे केले पाहिजे. तसे शिक्षक मिळविण्यासाठी समाजाने वाटेल ती किमत देण्यास तयार असले पाहिजे असे धोरण महाराजांनी ठरविले होते.

**राजर्षी शाहू महाराज आणि वसतिगृहांची चळवळ -**शाहू महाराजांची वसतिगृहांची चळवळ ही त्यांची मोठी देणगी आहे. महाराजांनी १८९७ ते १९२१ पर्यंत एकामागून एक अशी एकूण वीस वसतिगृहे सुरु केली.१९०१ साली व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग व दिगंबर जैन बोर्डिंग,१९०६ साली वीरशैव लिंगायत विध्यार्थी वसतिगृह व मुस्लिम बोर्डिंग,१९०८ साली मिस क्लार्क होस्टेल व दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, १९११ व १९१२ साली श्री नामदेव बोर्डिंग व पांचाल ब्राम्हण वसतिगृह, १९१५ साली श्रीमती सरस्वतीबाई गौड सरस्वत ब्राम्हण विध्यार्थी वसतिगृह, इंडियन ख्रिचन होस्टेल,रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग, १९१८ साली आर्य समाज गुरुकुल व वैश्य बोर्डिंग, १९१९ साली ढोर चांभार बोर्डिंग, १९२० साली श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउसे व शिवाजी वैदिक विदयालय आणि १९२१ साली सुतार बोर्डिंग, नाभिक विध्यार्थी वसतिगृह,सोमवंशीयआर्यक्षत्रिय बोर्डिंग व देवांग बोर्डिंग सुरु केली. त्याशिवाय महाराजांच्या प्रेरणेने कोल्हापूरच्या बोर्डिंगचा आदर्श पुढे ठेवून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बोर्डिंग निघाली.पुण्यास छत्रपती ताराराणी मराठा बोर्डिंग, अहमदनगरास चौथे शिवाजी महाराज वसतिगृह आणि नाशिकास उदाजी मराठा विध्यार्थी वसतिगृह व वंजारी समाज विध्यार्थी वसतिगृह सुरु झाले. कोल्हापूर संस्थानामध्ये २६ व बाहेर ६ अशी एकूण ३२ वसतिगृहांना महाराजांनी सढळ हाताने मदत केली.म्हणूनच कोल्हापूरला ‘ विध्यार्थी वसतिगृहांची माता ’ म्हणून संबोधण्यात येते, ते सार्थ आहे. विध्यार्थी वसतिगृहे स्थापन करणे हे कोल्हापूरचे वैशिष्टय आहे. येथे विध्यार्थी वसतिगृहांची जेवढी संख्या आहे तेवढी दुसऱ्या ठिकाणी क्वचितच आढळेल.शाहू महाराज हे ‘ भारतातील विध्यार्थी वसतिगृहांचे आद्य जनक ‘ आहेत. हि सर्व वसतिगृहे महाराजांची जिवंत स्मारके असून त्यात शिकलेल्या विध्यार्थ्यानी छत्रपती शाहू महाराजांचा नावलौकिक सर्व भारतभर पसरविला आहे.

**छत्रपती शाहू महाराज आणि अस्पृश्योद्धाराचे कार्य -**शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्याइतकेच महत्त्वाचे कार्य म्हणजे अस्पृश्योद्धाराचे कार्य.अस्पृश्यांचा उद्धार करणारे महाराज म्हणजे विसाव्या शतकातील एक नवीनच अवतार होय. अस्पृश्यता हि एक अमानुष गुलामगिरी असून हिंदू समाजावरचा तो एक कलंक आहे अशी महाराजांची धारणा होती. तो कलंक धुऊन काढण्याचा पहिला

प्रामाणिक प्रयत्न महात्मा फुले आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला. महाराजांनी हेच कार्य करून त्याला चालना दिली. महाराजांनी हातातील राज्दंडचा वापर करून चातुर्वर्ण्याची उतरंड पार भुईसपाट केली.

महाराजांनी गाकुसाबाहेर राहणारे आणि माणसातून उठलेले महार,मांग, चांभार, ढोर इत्यादींना त्यांनी घरात घेतले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच अस्पृश समाजात जागृती होऊन त्यांच्या कारकिर्दीत अस्पृश विद्यार्थ्यांची संख्या दसपट झाली. महाराजांनी अस्पृश्यांना सन्मानाने नोकर्या मिळवून दिल्या, त्यांना चांगल्या तर्हेने वागणूक मिळावी म्हणून खास प्रयत्न केले. डॉ.आंबेडकरांच्या कार्याची पायाभरणी करण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. अस्पृशांच्या विविध ठिकाणी भरलेल्या परिषदेला अध्यक्ष म्हणून हजर राहिले. याच काळात अस्पृश्योधाराच्या दृष्टीने विविध वटहुकुम काढले. महाराजांच्या प्रयत्नामुळेच अस्पृश समाजात क्रांतिकारक परिवर्तन घडले.

सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया हि महाराजांच्या आयुष्यातील अत्यंत म्हत्ताची कामगिरी होय. अनेक लोक आपल्या जातीला किंवा समाजाला वर आणण्यासाठी प्रयत्न करतात पण आपल्याहून दलित किंवा मागास जातीच्या समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणारे शाहू महाराजांसारखे समाजसेवक व समाजसुधारक फारच थोडे असतात. सामाजिक स्वातंत्र्यासाठी लढणारे शाहू महाराज भारतातीलच नव्हे तर जगातील पहिले राजे होते. गंगाराम कांबळे नावाच्या नोकराला त्यांनी स्वताच्या पैशातून महाद्वार रोडवर भर रहदारीच्या रस्त्यावर व मोक्याच्या जागेवर हॉटेल काढून दिले. लोकांनी हा गंगाराम अस्पृश असल्याबद्दल तक्रार केली. पण महाराज रोज दरबारी मंडळीना आपल्या गाडीतून त्या सत्य सुधारक हॉटेलात घून जात आणि सर्व सरदार मंडळींसोबत जाहीर चहापानाचा कार्यक्रम करत असत. महाराज स्वत त्या हॉटेलमध्ये चहा घेत असलेले पाहून लोकांना आश्चर्य वाटे. कारण त्या काळच्या समाजाला हे रुचणारे व पचणारे नव्हते . अशा तर्हेचे धाडस त्याकाळी शाहू महाराजाशिवाय अन्य कोणत्याही संस्थानिकाने दाखवलेले नाही.

महाराजांनी संस्थानातील नोकर्यांमध्ये मागासलेल्या जातीजमातींसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय २६ जुलै १९०२ रोजी घेऊन प्रत्यक्ष अंमलात आणण्यास सुरुवात केली. जातीनिर्मुलनासाठी शैक्षणिक, लोकसंपरकीय प्रशासकीय व अखेरचा बडगा म्हणून कायदे करून उपक्रम राबविले. टीचभर जमिनीच्या आमिषाने महार कुटुंबाला पिढ्यानपिढ्या वरिष्ठ जातीच्या गुलामगिरीत अडकवलेल्या 'महार वतनाची' क्रूर पद्धत १८ सप्टेंबर १९१८ रोजी कायद्याने बंद केली.

महाराजांना हरिजनाइतकेच भटक्या जमातीबद्दल प्रेम होते. फासे पारधी, ह्रणमारे, बेरड, डोंबारी, कोंगडी ह्या जातीच्या उद्धारासाठी महाराजांनी फार कष्ट घेतले. त्यांच्यासाठी रस्त्याची तळी खोदण्याची अशी सार्वजनिक कामे काढून त्यांना रोजगार पुरवीत असत.एकदा असेच त्यांनी शित्या बेरडाबरोबर भाकरी व कालवण खाल्ले. त्यानंतर त्याला मोठ्या प्रेमाने बक्षीस दिले व शित्या बेरडाचा निरोप घेतला. महार, मांग रामोशी व बेरडाची हजेरी महाराजांनी १ ऑगस्ट १९१८ च्या हुकुमाने बंद केली. अशा या थोर महामानवाचा मृत्यू ६ मे, १९२२ रोजी झाला.

**निष्कर्ष**

१ .शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य हे आधुनिक भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीचे महत्त्वपूर्ण पाऊल होते. त्यांच्या कार्यामुळे दलित, मागासवर्गीय, शेतकरी, आणि महिलांच्या जीवनात मोठा बदल घडून आला. ते एक प्रेरणादायी नेतृत्व होते, ज्यांनी सामाजिक न्याय, समानता आणि शिक्षण मुल्यांवर आधारित समाजनिर्मितीची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या कार्याची प्रेरणा आजही सामाजिक सुधारणांच्या चळवळी मध्ये जाणवते.

२. छत्रपती शाहू महाराजांनी दलितांसाठी केलेले कार्य हे भारतीय समाजातील सामाजिक न्यायाच्या लढ्यातील एक महत्त्वपूर्ण पर्व होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे दलितांना समान हक्क मिळविण्याच्या दिशेने एक महत्त्वाची पायरी पार पडली. त्यांची भूमिका आणि कार्य आजही भारतीय समाजातील सामाजिक न्यायाच्या चळवळीसाठी प्रेरणादायक आहे.

**संदर्भसूची-**

1) राजा शाहू आणि समाज प्रबोधन -- डॉ. गणपतराव सुबराव सूर्यवंशी रणजीत प्रकाशन, १९२/२, इचलकरंजी १९७८
2) शाहूंच्या आठवणी -------- प्रा. नानासाहेब साळुंखे वृषाली प्रकाशन , कोल्हापूर६ जून २०२२
3) वैज्ञानिक संस्कृतीचा दार्शनिक राजर्षी शाहू छत्रपती -- वीर उत्तमराव मोहिते जाई प्रकाशन १० मे २००९
4) इंटरनेट
5) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान-एक अभ्यास.--- पाटील प्रदीप, छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा १२ फेब्रुवारी २०२१

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

87

# पश्चिम महाराष्ट्राच्या शेती विकासामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जलधोरण

**डॉ. संजय सागरू सपकाळ,**
राज्यशास्त्र विभाग,
श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आटपाडी, जि. सांगली,

---

**प्रस्तावना-**पश्चिम महाराष्ट्रामध्ये शंभर वर्षापूर्वी शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक कार्याचा ठसा सगळ्या देशावर उमटलेला आहे. त्या काळाच्या चोकटीत कुठेही न बसणारे, पण भविष्याचा वेध घेणारे अनेक निर्णय शाहू महाराजांनी घेलते. प्रचंड त्रास झाला. मात्र तरीही त्यांनी त्यांची अंमलबजावणी केली. त्याचे सुपरिणाम आज दिसत आहेत. राजवाड्यामध्ये ऐषआरामात जीवन जगणे हे महाराजांना मान्य नव्हते किंवा सगळ्यांना खूष ठेवून परंपरेच्या पावलावर पाऊल ठेवून राज्यकारभार करणे हा त्यांच्या प्रकृतीचा भाग नव्हता. सत्तेचा उपयोग लोकांच्या हितासाठीच झाला पाहिजे. तळागाळातील शेवटच्या घटकाला देखील हे माझे राज्य आहे असे वाटले पाहिजे असे प्रयत्न शाहू महाराजांनी केले, याला इतिहास साक्षी आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर त्यांचाच वारसा चालविणाऱ्या शाहू महाराजांचे राज्य या संस्थानातील प्रत्येक माणसाला हे राज्य माझ आहे असे वाटले होते. महाराजांचे व्यक्तिमत्व, त्यांचे निर्णय सर्वस्पर्शी होते. शंभर वर्षापुढच्या कोल्हापूर संस्थानातील चित्र त्यांच्या डोळ्यापुढे होते. म्हणूनच शेती, शिक्षण पाणी याला महाराजांनी आपले जीवन कार्य मानले. संस्थानचा खजिना रिकामा होतोय, याची पर्वा न करता अगदी जिद्दीने हाती घेतलेले काम पूर्ण केली. महाराष्ट्रात त्याकाळी कितीतरी संस्थाने असतील, मात्र सिंचन विभाग स्वतंत्ररित्या स्थापन करणारे, शेती व्यवसाय समृद्ध करणारे शाहू महाराज एकमेव राजे असावेत म्हणून त्यांच्या जलविषयक व शेती विषयक धोरणाचा शोध घेणे महत्वाचे वाटते.

आजच्या प्रगत काळातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती आहे. शाहू महाराजांच्या काळात तर कोल्हापूर संस्थानचा शेती हाच मुख्य व्यवसाय होता. पुरेशा सिंचन सुविधांचा अभाव, अज्ञान यामुळे शेतकऱ्यांची अवस्था कमालीची दयनीय झाली होती. शाहू महाराजांनी १९०२ च्या दरम्यान युरोपचा दौरा केला. नैसर्गिक साधनसंपत्तीचा युरोपात होत असलेल्या काटेकोर वापराने महाराज प्रभावित झाले. युरोपात फिरणाऱ्या राजांना कोल्हापूरचा शेतकरी दिसत होता. आपल्या संस्थानात वाहणाऱ्या नद्या तरी ही कोरडी राहणारी जमीन आणि मनात जन्म घेत होता महाकाय प्रकल्प.

**स्वतंत्र पाटबंधारे धोरण -**संस्थानात पडलेल्या दुष्काळावर कायमची मात करण्याच्या विचाराने त्यांच्या मनात घर केले आणि १९०२ मध्ये आपल्या संस्थानात महारांनी अपूर्व असे सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. संस्थानात स्वतंत्र पाटबंधारे खात्याची निर्मिती केली. व त्यावर खास अधिकाऱ्यांची नेमणूक केली. या खात्यामार्फत प्रत्येक गावाची पाणी परीस्थितीची पहाणी करण्यात आली. नवीन विहीरी, जुन्या विहीरी, लहान-मोठे तलाव यांची तपशील वार माहिती घेऊन त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. नवीन योजना अंमलात येत होत्या. नवीन विहीरी आणि तलावांच्या बांधकामावर प्राधान्य देण्यात येऊ लागले. पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंब थांबलाच पाहिजे, याकडे महाराजांनी कटाक्षाने लक्ष दिले.

शाहू महाराजांचे जलधोरण योग्य होते पाटबंधारे खाते निर्माण करून शंकर सीताराम गुप्त यांची पाटबंधारे अधिकारी म्हणून त्यांनी नेमणूक केली. १९०६ मध्ये संस्थानात ११ हजार ७०० इतक्या विहीरी होत्या. त्यांची संख्या १९२० पर्यंत १२ हजार ८०० झाली. शेतकऱ्यांना जुन्या विहीरी दुरुस्त करण्यास आणि नवीन विहीरी काढण्यासाठी संस्थानकडून कर्जपुरवठा करण्यात आला. शहापूर, रुकडी, शिरोळ या परिसरात २० नवीन तलाव बांधण्यात आले तर काही जुन्या तलावांची दुरुस्ती करण्यात आली.

शाहू महाराजांच्या दृष्टीने हे प्रयत्न तोकडे पडत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत होते. कोल्हापूर जिल्ह्यातून पंचगंगा, वारणा, भोगावती यासारख्या मोठ्या नद्याबरोबर काही छोट्या अनेक नद्या वहातात आणि या नद्यांचे वाहून समुद्राला मिळणारे पाणी महाराजांना अडवायचे होते. कुठे तरी प्रवाह थांबला पाहिजे, तो शेतीकडे वळला पाहिजे यासाठी त्यांच्या डोक्यात मोठी योजना आकार घेत होती आणि कोल्हापूर संस्थानात वाहणाऱ्या एखाद्या नदीवर मोठे धरण बांधावे असे त्यांनी ठरविले. पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्याचे धोरण पहिल्यांदा शाहू महाराजांनी राबविले. त्याचे महत्त्व आज शंभर वर्षानंतर आपल्याला समजले आहे. यावरून शाहू महाराज हे किती पुढचा दूरदृष्टीचा विचार करत होते हे समजते.

**राधानगरी धरणाची पार्श्वभूमी -** कोल्हापूर संस्थानातून सेवानिवृत्त, मायदेशी गेलेल्या कर्नल फेरिस या इंग्रज अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रास ते म्हणतात, "आपण येथून निघून गेल्यावर मी सुमारे २० बंधारे बांधले, पण माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही. म्हणून मी

आता एक मोठा सिंचन प्रकल्प हाती घेणार आहे. संपूर्ण भारतात मोठा असा तो प्रकल्प असणार आहे. त्यासाठी मी माझी पूर्ण हयात लावत आहे. ही योजना यशस्वी व्हावी, हीच माझी अंतरीची इच्छा आहे." शाहू महाराजांनी जगभर प्रवास केल्यानंतर जगात आपण कुठे जे-जे चांगले पाहू ते आपल्या संस्थानात सुरु करण्यावर त्यांचा भर राहिला खरा राज्यकर्ता असाच असावा लागतो.

शाहू महाराज सन १९०२ ला युरोपला गेले होते. तेथील भौतिक प्रगतीने प्रभावित झाले. निसर्गातील साधनसंपत्ती किती खुबीने समृद्धीसाठी वापरता येते हे तिथे त्यांनी पाहिले तेथील धरणे पाहून आपणहि अशी धरणे का बांधू नयेत, असा विचार त्यांच्या मनात आला. सह्याद्रीच्या माथ्यावर शेकडो इंच पाऊस पडतो. तेथून उगम पावणाऱ्या नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात. आणि उन्हाळ्यात कोरड्या पडतात. सह्याद्रीत कोसळणाऱ्या पावसाचे पाणी अडवून देशावरील जमीनीस दिले गेले तर ही भूमी खऱ्या अर्थाने सूजलाम सूफलाम होईल असा आशावाद त्यांच्या मनामध्ये निर्माण झाला. याच आशावादातून राधानगरी धरणाची पायाभरणी झाली. कोल्हापूर सारख्या २० ते ३० लाख रुपयांचे वार्षिक उत्पन्न असलेल्या संस्थानाने अशा मोठ्या धरणाच्या कामास हात घालणे सामान्य गोष्ट नव्हती. आपले कर्तव्य म्हणून महाराजांनी या प्रकल्पाकडे पाहिले.

पश्चिम महाराष्ट्रामधील हा पहिलाच प्रकल्प होता. राधानगरी धरणाचे प्रत्यक्ष बांधकाम सन १९०९ झाली सुरु झाले. १९१८ पर्यत त्यावर २६ लाख रुपये खर्ची पडले होते. ४० फुटांपर्यत बांधकाम झाले. या कामावर ३ हजार गवंडी व मजूर काम करत होती. हा प्रकल्प राबविताना महाराजांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. अनेक अडचणी असूनही त्यांनी सर्वात मोठे धरण असलेल्या राधानगरी पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यास दृढ संकल्प केला. "जेव्हा मी हा प्रकल्प पूर्ण करेल तेव्हा माझ्या आयुष्याचे महत्त्व पूर्ण होईल." असे शाहू महाराजांचे राधानगरी प्रकल्प पूर्ण करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. हे यावरून दिसते. १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धामुळे प्रकल्पाचे बांधकाम स्थगित करावे लागले. छत्रपती शाहूंनी १९१७ मध्ये या प्रकल्पाकरिता त्यांची वैयक्तिक जमीन विकण्यास काढली होती. व कालव्याचे काम पूर्ण करण्याकरिता ५ लाख रुपये दिले होते. या प्रकल्पाचा उपयोग प्रामुख्याने हातकणंगले व शिरोळ तालुक्याला झाला. शाहूंच्या निधनानंतर पुढे छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात म्हणजे १९५७ ला हा प्रकल्प पूर्ण झाला. त्याकरिता लागलेला निधी हा १३८४ लक्ष होता.

आज राधानगरी धरण कोल्हापूर परिसरातील हरितक्रांतीचा आधार आहे. कोल्हापूर व इचलकरंजी शहराला पाणी पुरवठा या धरणातून होत आहे. ६०० दशलक्ष घनफुट पाणी शेतीसाठी उपलब्ध आहे.

**शेती क्षेत्रातील विकास -** शाहू महाराजांनी नेहमी दूरदृष्टीचा विचार केला. शेतीकडेही त्यांनी पारंपारिक दृष्टीने पाहिले नाही. माझा शेतकरी शहाणा झाला पाहिजे त्याने नवीन पिके घेतली पाहिजेत. यासाठी त्यांनी अनेक नवीन पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले. त्यांनी स्वत: लक्ष घालून रेशीम, वेलदोडे, कोकोआ इंडियन रबर, ताग, अंबाडी, बेळगावी बटाटे, लाख, शिंगाडे, टॅपिओका (शाबू) कंबोडीयान कापूस अशा अनेक पिकांची लागवड व प्रक्रिया करण्याचे प्रयोग केले. पन्हाळ्याजवळ त्यांनी कॉफी व चहाची लागवड केली. या मळ्यातील चहा त्यावेळी पन्हाळा नं.४ या ब्रॅंडने विकला. तसेच बडोद्याच्या सयाजीराव महाराजांसह अनेकांना शाहू महाराज हा चहा पाठवीत असत.

तसेच शेतकऱ्यांच्या औजारासाठी शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील तोफा इंग्रजांनी नेऊन त्यांची शस्त्रास्त्रे तयार करू नयेत म्हणून त्या तोफा शेतकऱ्यांसाठी पोलादी नांगर तयार करणाऱ्या किर्लोस्कर कंपनीला दिल्या. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण मिळावे म्हणून संस्थानात सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी १९१२ साली त्यांनी कोल्हापूरात 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' ही संस्था स्थापन करून शेतकी शाळा सुरु केल्या होत्या. शेतीतील आधुनिक शेतीचे तंत्र समजावे यासाठी शेती व पशु पक्ष्यांची भव्य प्रदर्शने महाराज भरवीत होते. शेतीविषयक वस्तुसंग्रहालय निर्माण केली. अशा प्रदर्शनातून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्यांचे नमुने, माहितीपत्रके, उत्तम पैदाशींच्या जनावरांचे प्रदर्शन भरवली.

शाहू महाराजांचा भर नुसती चांगली शेती करण्यावरच नव्हता तर त्या शेती मालाला बाजार पेठ ही उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न केले. संस्थानात उत्पादीत होणारा उत्कृष्ट पद्धतीचा गुळ राजापूरच्या बाजारपेठेत जात असे. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी रेल्वे स्टेशनजवळ जमिनीवर 'शाहूपूरी' नवी बाजारपेठ वसवली. कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापाऱ्यांना खास सवलती दिल्या. व संस्थानात शेतीमालास नवी बाजार पेठ निर्माण केली.

संस्थानातील पश्चिम भागातील सह्याद्रीच्या डोंगर रांगामधील वनस्पती बारमाही फुलाफळांनी बहरलेली असल्यामुळे संस्थानात शेतीला जोडधंदा म्हणून मधुमक्षिकापालन उद्योग सुरु केले. आज महाराष्ट्र शासनामध्ये कर्जमाफीच्या घोषणा होत असल्या तरी शाहू महाराजांनी शेतीसाठी अनेक योजना राबवल्या शेतीच्या शिक्षणासाठी अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यास बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले होते. अशा प्रकारे शाहू महाराजांनी जलसिंचन व शेती विकासाचा पाया त्या काळामध्ये घातला होता.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

**समारोप -**जलसिंचन व शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीचा विकास म्हणजे शेतकऱ्यांचा विकास, पर्यायाने देशाचा विकास हे सूत्र डोळयासमोर ठेवून छत्रपती शाहू महाराजांनी पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर संस्थानामध्ये शेतीसाठी जलसिंचनाची मुलभूत सुधारणा केल्या, त्याला जोड म्हणून नवनवीन उद्योगधंदे सुरु केले. आणि या उद्योगधंद्यांना सहकार तत्वाची जोड दिली. म्हणूनच पश्चिम महाराष्ट्रामध्ये शाहू महाराजांनी शंभर वर्षापूर्वी केलेल्या विकासामुळे कोल्हापूर संस्थान शेती, सहकार व उद्योगधंदे, सिंचन या क्षेत्रावर आघाडीवर दिसतो.

**संदर्भ**

१) जाधव रमेश, (२०१६), 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', सुधारित तिसरी आवृत्ती महाराष्ट्र शासन, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मंत्रालय, मुंबई.

२) किर धनंजय, (१९९२), 'राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राजा' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३) पवार जयसिंगराव (संपा.), (२०१९), 'राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ', खंड एक ते पाच, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.

४) फडके य.दि., (१९९५), 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड-३ श्री विद्या प्रकाश, पुणे.

५) डॉ. पवार जयसिंगराव, (२०१६), 'राजर्षी शाहू छत्रपती-जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

६) जाधव रमेश, (१९९२), 'राजर्षी श्री शाहू छत्रपती: वाद आणि वास्तव', कोल्हापूर.

७) दै. लोकमत, 'बळीराजाचा राजा....शाहू महाराज शेती व शेतकरी', दि. २६ जून २०२०.

८) दै.सकाळ, 'शाहू महाराजांचे जलधोरण आजही उपयुक्त', दि. ३० जून २०२४.

९) दै. सकाळ, 'शाहू महाराजांचे कल्पक जलधोरण', २६ जून २०१७.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / September 2024 / Special Issue 14 Volume II

88

# An Agri-Economic legacy of Chhatrapati Shahu Maharaj to the Sustainable development in Maharashtra and its present relevance

**Dr. S. R. Kattimani**
Associate Professor & HOD, Dept. of History,
Vivekanand College, Kolhapur

---

**Introduction:**

